म.ग्रं.सं. ठाणे
विषय : चरित्र
सं. क्र. : ९३९४

महाराष्ट्राची तेजस्विनी

# पंडिता रमाबाई

देवदत्त नारायण टिळक

REFBK-0010998

नागरिक प्रकाशन, नाशिक

दा. सं.
१०९९८

१३१२
मा.रि.सं.
१०/७/६६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २५६६० वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...



प्रिय रिथबालिला, प्रीतीची भेट.

रमाबाई

महाराष्ट्राची तेजस्विनी

# पंडिता रमाबाई

देवदत्त नारायण टिळक

१०९९८

REFBK-0010998

नाशिक

नागरिक प्रकाशन : १

© १९६०, देवदत्त नारायण टिळक

किंमत सव्वा सहा रुपये
(पुठ्ठा बांधणी)

पहिली आवृत्ति : २२ ऑक्टोबर १९६०

किंमत चार रुपये
(साधी बांधणी)

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

Published with the aid of the Indian Literature Fund of National Christian Council of India, Nagpur.

प्रकाशक :
देवदत्त नारायण टिळक
शान्तिसदन,
आग्रा रोड, नाशिक

# अनुक्रमणिका


**विषयप्रवेश** **पृष्ठें १ ते ९**

रमाबाईंच्या चरित्राच्या अखंड देखाव्याचा एकसंधी चित्रपट

१. **अनंतशास्त्री** **पृष्ठें १० ते २७**

चित्पावनांचा इतिहास १०–१४; उपनांवें १४; अनंतशास्त्रींना पेशवे वाड्यांत स्त्री-शिक्षणाची झालेली प्रेरणा १५–१६; 'परमेश्वरां'नीं करून ठेवलेलें कर्ज व त्याची फेड १६–१७; गव्हर्नराचा दस्तक १७; शास्त्रीबोवांची संतती १७; नेपाळ–गुजराथ वगैरे प्रवास १८–१९; अनंतशास्त्र्यांचा चारशें मंडळींशीं वाद २०–२१; गंगामूळ येथें वाघाशीं गांठ २३; घरजांवई २५; कृष्णाबाईंच्या पतींची शास्त्रीबोवांवर फिर्याद २६–२७.

२. **रम्य तें बाळपण** **पृष्ठें २८ ते ४५**

शेअर्समध्यें गुंतविलेला पैसा २८–२९; शेअर्सपायीं मुंबईत उडालेला गोंधळ ३०–३१; शास्त्रीबोवांचा बेंगरुळास मुक्काम ३२–३५; रमाबाईंची शिकण्याची हौस व जिज्ञासा ३६–३८; रमाबाईंची पहिली वर्तमानपत्रीं प्रसिद्धी ३८–३९; रमाचें शिक्षण ४०; द्वारका ४१–४३; घटिकाचल ४३–४४; श्रीनिवासचे उपास-तापास ४४; एका संस्थानिकाची गृहस्थिति ४४–४५.

३. **कलकत्ता व सिल्हट** **पृष्ठें ४६ ते ६१**

अनपेक्षित संकटें व मद्रासमधील दुष्काळ ४६–४७; जलसमाधीचा विचार ४८–४९; अनंतशास्त्र्यांचा मृत्यु व अघटित प्रेतक्रिया ४९; लक्ष्मीबाईंचा शेवट ५०; पुनः प्रवास : उत्तर सीमेपासून कलकत्त्यापर्यंत ५१–५२; रेवळस : तरंगणारे सप्तर्षि ५२; कलकत्त्यांत पदार्पण ५३; रमाबाईंचा सत्कार ५३–५६; पंडिता रमाबाई सरस्वती ५५; बंगाली स्त्रियांनीं दिलेलें मानपत्र : ५६–५७; सिल्हट येथील सत्कार ५८–६१.

४. **बिपिन बिहारी कीं श्रीपाद बाबाजी** **पृष्ठें ६२ ते ७३**

बिपिन बिहारी दास ६२–६४; देशभक्त बिपिन चंद्र पालनीं दिलेली माहिती ६५; शशधर तर्कचूडामणी ६६; 'सहा' जात ६७–६८; सिल्हट येथें महाराष्ट्रीय पंडित दाखल होतात ६९–७३.

५. **रमाबाईंचें वैवाहिक जीवन** **पृष्ठें ७४ ते ८८**

अनसूयाबाई ऊर्फ अणुअक्का ७४–७५; सिल्हटहून डाक्याला ७५–७६; श्रीनिवास शास्त्र्यांचा मृत्यु ७६–७७; पुष्कळ श्रीमंत व शिकलेल्यांच्या मागण्या, व लोकापवाद ७८–७९; रमाबाई विवाहबद्ध होतात ८०; बिपिन बिहारींची जात व रमाबाईंचा जातिविषयक दृष्टिकोन ८१–८५; बायबलची ओळख व फारकत ८६;

बिपिन बिहारींचा अंत व प्रेतक्रिया ८६–८७; अण्णासाहेब कर्व्यांचा ह्या घटनेसंबंधीं अभिप्राय ८७; रमाबाईंच्या आयुःक्रमाला निराळी दिशा लागते ८८.

६. पुणें पृष्ठें ८९ ते ११०

पुणें व तेथील पुढाऱ्यांविषयीं ८९–९१; पुण्या–मुंबईच्या बिनबोभाटी संस्था ९१–९२; रमाबाईबरोबर असलेला बंगाली मुलगा ९२; पहिलें पुराण ९३; रमाबाईंची तळमळ व धूर्तपणा ९४–९५; मिस् हर्टफर्ड व बाजारगप्पा ९६–९७; पंडिता रमाबाईंच्या व्याख्यानांचीं आमंत्रणें रमाबाई रानडे स्वतः घरोघरीं जाऊन देत ९८–९९; रमाबाईंचा सडेतोडपणा ९९; आर्य महिला समाज १००–१०२; हंटर कमिशन १०३–१०९; हंटर साहेबांचें रमाबाईसंबंधीं व्याख्यान व विक्टोरिया राणीवर त्याचा परिणाम १०९–११०.

७. परदेशगमन पृष्ठें १११ ते १२७

खानेसुमारींतील आंकडेवारी १११; स्त्रीदास्यविमोचनासाठीं मदत मागणें व स्वतःच डॉक्टर होण्याची रमाबाईंची कल्पना ११२–११३; इंग्लंडचें प्रवासवर्णन ११५; येशू ख्रिस्ताचा स्त्रीजातीविषयीं दृष्टिकोण ११७; वॉंटेज येथें रमाबाईंचा व मनोरमेचा बाप्तिस्मा ११९; फादर गोरेंचीं पत्रें व रमाबाईंची एक साक्ष १२१; धर्माचें 'बाबेल' १२२; गोपाळराव जोशींचें अमेरिकेस प्रयाण व वास्तव्य १२५; डॉ. बॉडले; आनंदीबाई व गोपाळराव ह्यांचीं रमाबाईंना पत्रें १२६; स्वीकार कां केला १२६; रमाबाईंच्या अमेरिकन प्रवासाला मित्रमंडळीचा विरोध १२७.

८. ख्रिस्ती धर्मांगिकार पृष्ठें १२८ ते १४१

धर्मान्तर नसून धर्मांगिकार १२८–१२९; महाजनो येन गतः स पन्थाः १३०–१३१; शब्दबीज–म्लेंच्छांच्या देवाचा जप १३२–१३३; बाईंच्या चरित्राशीं जुळणारी गोष्ट १३४–१३५; ख्रिस्ताला पातक्यांविषयीं वाटणारा कळवळा १३६–१३७; पत्रकारांच्या प्रतिक्रिया १३७–१४१.

९. ह्यातींत व दिवंगत झाल्यावरहि पृष्ठें १४२ ते १५९

रमाबाईंनीं फसविलें १४२–१४६; फादर गोरे ह्यांच्या शिकवणुकीचा परिणाम १४६; केसरीची टीका १४७; श्री. वैद्यांच्या मनावर झालेला चिरस्थायी परिणाम १४८; सतरा विधानांतील चार खरीं १४९–१५९.

१०. दुर्भाग्याचांच तो दिवस पृष्ठें १६० ते १७३

ज्ञानोदयांत रमाबाईवर टीका १६०–१६२; हिंदीत्व कायम १६३–१६६; शील निष्कलंक १६७; श्री. हरि नारायण आपट्यांचा अनुभव १६९; रे. टिळकांचें मत १७२; सोशल कॉन्फरन्समध्यें आमंत्रण १७३.

११. रमाबाईंचीं धर्ममतें पृष्ठें १७४ ते १८७

फादर गोऱ्यांचें पुस्तक 'ख्रिस्ती धर्म ईश्वरदत्त आहे' १७४–१७६; नीतिपर वाक्यें

पण सत्यें दोषशून्य १७८–१७९; परमेश्वर आत्मस्वरूप आहे १८०–१८१; परमेश्वराशीं ऐक्य १८२–१८३; बाप्तिस्मा कशाला ? १८४–१८६; विचारस्वातंत्र्य हें प्रत्येकाला असतेंच म्हणून नळांतून पन्हळांतून विचारप्रवाह नकोत—१८७.

१२. अमेरिका पृष्ठें १८८ ते २०४

वादळाचा तडाखा १८८–१९०; डॉ. आनंदीबाईंची भेट १९१; आनंदीबाईंचा पदवीदान समारंभ १९२; अमेरिकेंत राहून तेथील ज्ञानप्राप्ति १९३; अमेरिकन किंडर गार्टन १९४; अमेरिकन स्त्रियांविषयीं माहिती १९५; मद्यपाननिषेधक स्त्रीपरिषद १९६; स्त्रियांचीं लोकसेवेचीं कामें १९७–२००; अनवाणी हिंडल्यानें फजिती २०१.

१३. रमाबाई असोसिएशन व तिचें कार्य पृष्ठें २०५ ते २१९

रमाबाई असोसिएशनची स्थापना २०५–२०६; असोसिएशनची घटना २०७–२०८; रमाबाई सर्कल्स व रमाबाई असोसिएशन ऑफ पॅसिफिक कोस्ट २०९–२१०; फिबीबाईचें पत्र २१०–२१३; त्यावर रमाबाईंचें उत्तर व नंतर पंधरा वर्षेपर्यंत त्या विषयावर चाललेला वाद २१६–२१९.

१४. शारदासदन पृष्ठें २२० ते २३३

स्थापना २२०; आनंदीबाई कर्वे २२१; मनोरमाबाईचें समारंभाचें वर्णन २२१; विधवा विद्यार्थिनींची वाढ २२२; आनंदीबाईंच्या कामाचें सार्टेफिकेट २२३; शारदासदन पुण्यास नेण्यांत येतें २२४; रमाबाई मुलींना दुधातुपांत लोळविते—केसरी-सुधारकांत ह्यावरून वाद २२५; शारदासदनांत पाहुणेमंडळीनें काय पाहिलें २२६; हॅम्लीननें पाहिलेलें दृश्य २२७; शारदासदनाच्या मालकीची इमारत व तिचें उद्‌घाटन २२७–२३१; विरोधी व पाठीराखे २३१; यवद्वीपांत झालेला परिणाम २३२–२३३.

१५. आश्रमवासिनी पृष्ठें २३४ ते २५०

रुक्मिणीबाईची कथा २३४; ताराची कथा २३५–२३९; जिवूची कथा २३९–२४१; केशवपन टाळण्यासाठीं पुण्याजवळ एक मुलगी मुसलमान होते व दुसरी अहमदनगरास जाऊन अनीतींत पडते २४१–२४२; सरस्वतीची गोष्ट २४२–२४४; सदनाला भेट देणारे एक शहाणे संस्थानिक २४५; रमाबाईंचा आश्रम मोडल्यावर मुलींच्या भवितव्याविषयीं काथ्याकूट २४६; पंडिता रमाबाई व कर्मवीर शिंदे २४६–२५०.

१६. वादळापूर्वी पृष्ठें २५१ ते २६९

रमाबाईंच्या प्रार्थनेला मुली जातात त्यावरून २५१–२५४; रमाबाईंचें म्हणणें २५४–२५७; मुली काढून घेण्याच्या खटपटी २५८–२५९; अण्णासाहेब कर्व्यांच्या विवाहानिमित्त समारंभ २५९–२६०; गोपाळराव जोशी व वासुकाका

जोशी ह्यांच्या खटपटीनें उठलेलें तुळशीचें वादळ २६१ ते २६४; पंडिताबाईचा केसरींत खुलासा व त्यावर वाद २६५–२६९.

१७. संमतिवय बिलाचा आघात पृष्ठें २७० ते २८३
फुलमणी दासीची गोष्ट २७०; स्त्रियांचा व्हाईसरॉयकडे अर्ज व त्यासंबंधीं उलटसुलट बातम्या २७१–२७३; सुधारक पत्र केसरीचें म्हणणें खोडून काढतें २७४–२७८; गोपाळराव जोश्यांचा संगमावर जाहीर बाप्तिस्मा व पुणें वैभवकारांची जाहीर माफी २७९; रमाबाईनीं हाकलून दिलेल्या कृष्णाबाईचे उपद्याप २८१; जीव घेण्याच्या धमक्या २८३.

१८. सार्वजनिक चरित्र संपलें ? पृष्ठें २८४ ते ३०३
बाई कोणाची भीडमुर्वत ठेवीत नसत २८४; हिंदी राष्ट्रभाषा असली पाहिजे २८५; देवनागरी लिपी असायला पाहिजे २८६; कॉंग्रेसचे स्त्री प्रतिनिधी २८७–२९३; रमाबाईच्या भाषणासंबंधीं रचलेलें एक कल्पित काव्य २९३; सामाजिक परिषदेंतील रमाबाईचें भाषण २९४–२९५; रमाबाईची गव्हर्नरशीं खटाखटी २९६–३०३.

१९. कृष्णमेघ व त्याची रुपेरी कड पृष्ठें ३०४ ते ३२२
धर्मान्तर करण्यांत आपणहि रमाबाईचें अनुकरण करावें अशी इच्छा; सुधारकानें बाईची बाजू घेतल्यानें केसरीशीं तंटे ३०३–३०५; बाप्तिस्म्यांची मागणी ३०५; एकच कथा निरनिराळ्या पत्रांत निरनिराळी ३०६–३१०; रमाबाईच्या भोंवतीं निराळें वादळ ३१०; गोमतीबाईचें शिक्षण व चरित्र ३११–३१४; आगरकरांचा अभिप्राय ३१४–३१५; सुबोधपत्रिकेची टीका ३१५; केडगांवला प्रमाण ३१६; सामाजिक परिषदेंत पडसाद ३१६–३१८; रमाबाई रानड्यांचा कनवाळूपणा ३१९; तेवढ्यांत बाईना धैर्यानें पाठिंबा देणारे ३१९–३२०; अण्णासाहेबांचा अभिप्राय ३२१–३२२.

२०. पंधराचा वर्ग करून मागणी पृष्ठें ३२३ ते ३४०
ख्रिस्ती झालें तरी ख्रिस्त सांपडला नाहीं ३२३–३२५; लोणावळ्यांत पुनः प्रार्थना व १५ च्या जागीं २२५ ची मागणी ३२६–३२७; दुष्काळाचीं वर्णनें ३२८; केडगांवांत झोपड्या ३२९; रमाबाईनीं लिहिलेल्या दुष्काळासंबंधीं आठवणी ३३०–३३८; रमाबाईचें अमेरिकेला पुनः प्रयाण ३३८–३३९; रमाबाई असोसिएशनचें विसर्जन व नवीन समितीची स्थापना; बाईचें परत येणें ३३९–३४०.

२१. केडगांव पृष्ठें ३४१ ते ३५५
मुली व जमीन दोन्ही अजब ३४१–३४२; कांहीं मुलें दुसरीकडे पाठविलीं ३४३–३४४; पुनः दुष्काळाचा जोर ३४४; डॉलर्सची आयात व कामकऱ्यांची गर्दी ३४५; कडक शिस्त ३४५; मुलींचे बाप्तिस्मे ३४६; मुक्ति म्हणजे बायकांचा तुरुंग ३४७; कलेक्टरची मुक्तीस भेट ३४८; दुष्काळी मुलींसंबंधीं शंकांना सुबोधपत्रिकेचें उत्तर ३४९; केडगांव ३४९; उपासनामंदिर ३५०–३५१; रोग्यांची

शुश्रूषा व दवाखाना ३५१; बाईंच्या विहिरी ३५२; मंदिरांत रोषनाई ३५३; निरनिराळीं सदनें ३५४–३५५.

२२. झरोक्यांतून पृष्ठें ३५६ ते ३६८

रमाबाईंची केडगांवच्या कामाची एका दिवसाची रोजनिशी ३५६–३५९; बटलरबाईंनीं पाहिलेली जेवणाची व्यवस्था ३५९; कृष्णराव व राजस—राजसचा केडगांवला फेरफटका ३५९–३६०; रमाबाई छापील पुस्तकावर रेघोट्या कां मारतात ३६१–३६२; रमाबाई मुलींच्या मनांतील भाव ओळखीत ३६३; प्रार्थना म्हणजे काय ३६४; सोनाराविषयीं चौकशी ३६५; माझा हात पैसा चाळणारी चाळण आहे ३६६; बाईंचें जनावरांवरील प्रेम-नंदी-गाडवी ३६७–३६८.

२३. मनोरमा पृष्ठें ३६९ ते ३८८

बालपण ३६९–३७०; पोट दुखतें म्हणू नये ३७०; बंगाली लकब ३७१; वॉँटेजमध्यें मनूचा सांभाळ ३७२–३७५; आईला मदत ३७५; मनोरमेच्या नव्या पदव्या; एम्. ए. चा अभ्यास ३७६; कोणाहिपेक्षां आई अधिक ३७७; ऑस्ट्रेलियांत 'ताई' ३७८–३७९; मनोरमेचें लग्न झालें तर ३७९; जातेस ? जा ३८१; गुलबर्ग्याचें शान्तिसदन ३८२–३८३; संजीवनाची चळवळ ३८४; कोडिकनाल व परत ३८५; शेवट ३८६–३८८.

२४. रमाबाईंचे सहकारी पृष्ठें ३८९ ते ४०७

रमाबाईंनीं माहेराहून आणलेली मंडळी ३८९–३९०; रुक्मिणीबाई ३९१–३९२; भीमाबाई ३९२–३९३; मिनी एब्रॅम, दादासाहेब गद्रे व कृष्णाबाई ३९३; सुंदराबाई ३९४–३९६; कार्यकर्त्यांसाठीं प्रार्थना ३९७–३९८; दादासाहेबांच्या निश्चयाची चमक ३९९; दादासाहेबांची गोष्ट ३९९; पुनर्विवाहित ४००; शारदेवर ख्रिस्ती संस्कार ४०१–४०२; दादांचें काम ४०३; मामा ब्रुअर ४०४; कृष्णाबाई ४०३ –४०७.

२५. रमाबाईंची वाङ्मयसेवा पृष्ठें ४०८ ते ४२८

ग्रंथांचे दोन गट ४०८; स्त्रीधर्मनीति ४०८–४१०; रमाबाईंचा इंग्लंडचा प्रवास ४१०–४११; युनायटेड् स्टेट्स्‌ची लोकस्थिति आणि प्रवासवृत्त ४११–४१३; बालोद्यान ४१३–४१४; बायबलचें भाषान्तर ४१४; हजारों नांवें ४१४; प्रा. साठे ह्यांचा अनुभव ४१६; मूर्खालाहि समजलें पाहिजे ४१७; कांहीं शब्दः उत्पन्न, पुत्र, परमेश्वर, मुक्ति, पश्चात्ताप ४१८–४२०; स्वराज्य नव्हे स्वाराज्य ४२१; भजनसंग्रह ४२२; प्रचंड कामाला सुरुवात ४२४; भाषान्तराचीं पद्धत ४२६–४२८; 'इब्री' व्याकरण ४२८.

२६. विश्वासाचीं व प्रार्थनेचीं फळें पृष्ठें ४२९ ते ४४६

पांढरपेशांच्या दृष्टीपुढें नेहमीं उच्चवर्णीय लोक ४२९–४३०; अस्पृश्यांच्या मुलांना सरकारी शाळेंत घेण्यासंबंधीं सरकारी ठराव व प्रयोग ४३०–४३१; फुल्यांचा पुढाकार–सरकारी साह्य यथातथाच–वर्गणीदारांचा ठणठणाट ४३१; ईश्वराचीं सारीं लेकरें एकाच दर्जाचीं ४३२; विश्वासाचीं आश्चर्यकारक उदाहरणें: भुसावळ ४३३–४३४; उद्धार–गृह ४३४–४३५; खेडुतांना साह्य ४३६–४३७; विहिरी

आटल्या ४३७–४३९; वॅगनभर गाजरें ४३९; अंध मुलीचा विश्वास ४४२–४४४; वाऱ्याची दिशा बदलते : ४४५–४४६.

२७. **धर्मसंजीवन** पृष्ठें ४४७ ते ४६०

पहिलें धर्मसंजीवन ४४७; धर्मसंजीवनाची जरुरी ४४८; ऐतिहासिक आधार ४४९–४५०; पापें पदरीं घेतलीं ४५१; मुलगी पेटली; पोहोराभर पाणी आणलें. ४५३–४५४; तींत अनुभव ४५४; पवित्र आत्म्याची एकच खूण–प्रेम ४५५; दोन मिशनरी शास्त्राधार घेऊन येतात ४५७; बाप्तिस्मा म्हणजे काय ४५८–४५९; रमाबाईंचा पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याचा अर्थ ४६०.

२८. **प्रस्थान** पृष्ठें ४६१ ते ४६९

रमाबाई रानडे चकित झाल्या ६१–४६२; विश्वासाचें चित्र ४६३; हातांतलें काम संपल्यावर बोलीव ४६४; हुंदके ४६५; शेवटली गोष्ट ४६; कपड्याचीं ठाणें आलीं; दुकानें बंद झालीं ४६७; तारा व प्रेतक्रिया ४६८–४६९.

१. **परिशिष्ट** पृष्ठें ४७० ते ४७१

रमाबाईंच्या चरित्रांतील काहीं संस्मरणीय तारखा

२. **परिशिष्ट** पृष्ठें ४७२ ते ४७४

रमाबाईंचा पितृकुलवंशवृक्ष, ४७२; मातृकुल वंशवृक्ष; श्री. विपिनबिहारी मेधावींचा वंशवृक्ष ४७४.

३. **परिशिष्ट** पृष्ठें ४७४ ते ४७६

रमाबाईंचें माहेर व माहेरचे नातेवाईक :

रामशास्त्री--रमाबाईंचे सापत्न बंधु ४७४, पहिले अनंतशास्त्री व त्यांचें दानशूरत्व ४७५, 'माळ' व गंगापूर गांवांसंबंधीं माहिती ४७५; 'त्यो' चा अर्थ ४७६.

४. **परिशिष्ट** पृष्ठें ४७७ ते ४७८

रमाबाईंची कुंडली ४७७, मनोरमाबाईंची कुंडली ४७८.

५. **परिशिष्ट** पृष्ठें ४७९ ते ४८०

मावश्या व पंडिता रमाबाईंच्या नंतर आलेल्या व्यवस्थापिका.

६. **परिशिष्ट** पृष्ठें ४८० ते ४८१

आर्य महिला समाजाचे उद्देश व नियम

७. **परिशिष्ट** पृष्ठें ४८२ ते ४८३

स्त्रीधर्मनीति

८. **परिशिष्ट** पृष्ठें ४८४ ते ४८७

रमाबाईंचा इंग्लंडचा प्रवास

९. **परिशिष्ट** पृष्ठें ४८८ ते ४९२

युनायटेड स्टेट्सची लोकस्थिति आणि प्रवासवृत्त

१०. **परिशिष्ट** पृष्ठें ४९३ ते ४९७

महाराष्ट्राच्या तेजस्विनी रमाबाईंनीं चौपाटीवर दिलेल्या व्याख्यानाचा गोषवारा.

११. **परिशिष्ट** पृष्ठें ४९८ ते ५००

ग्रंथांचें व इतर लिखाणांचें ह्या पुस्तकास झालेलें साहाय्य.

# प्रस्तावना

प्रमाणबद्ध पण सर्वांना पटेल असें पंडिताबाईंचें चरित्र लिहिणें ही एक अत्यंत कठीण गोष्ट आहे. एक तर त्यांच्या चरित्रांत विरोधाभासात्मक व विसंवादी दिसणाऱ्या अशा पुष्कळ घटना असून एकंदर समाजांत त्यांच्याबद्दलचे झालेले गैरसमज फार खोलवर व दूरवर रुजलेले आहेत. त्यांचें मूळ उपटून काढलें तरी मुळ्यांचें जाळें बाहेर काढायला परिस्थितीची सारी जमीनच उलटीपालटी करायची वेळ येते व असें करणारा लेखक साहजिकच पक्षपाती किंवा वकिली करणारा– 'apologetic' वाटतो.

अशा परिस्थितींत हें पुस्तक लिहीत असतांना साहजिक व सरळ मार्ग एकच वाटला तो म्हणजे ह्या चरित्रांत होतां होईल तों रमाबाईंच्या शब्दांचा व विधानांचा उपयोग करणें व जेथें तें शक्य नसेल तेथें त्यांच्याबरोबर राहून त्यांचें व त्यांच्या कामाचें बारकाईनें निरीक्षण केलेल्या व्यक्तींचे शब्द प्रमाण समजून त्यांचा उपयोग करणें. अशा रीतीनें मिस लुइया फुलर, क्लेमेंटेना बटलर, मिसेस् हेलन डायर, मनोरमाबाई मेधावी, रमाबाई रानडे, काशीबाई कानिटकर, आनंदीबाई कर्वे, ह्यांच्या लिखाणांचा उपयोग केलेला आहे. ज्या ठिकाणीं लोकमताचा व लोकभ्रमाचा प्रश्न आला आहे तेथें होतां होईल तों प्रमुख विरोधी मतांचे उल्लेख करण्यांत आलेले आहेत. 'केसरी' व 'सुधारक' ह्या दोन्ही वर्तमानपत्रांचा त्याबाबत मुक्तहस्तानें उपयोग केलेला आहे.

ह्याशिवाय बरीच माहिती मुलाखती घेऊन जमविलेली आहे, तसेंच जवळजवळ ६०–७५ निरनिराळ्या पुस्तकांचा व वृत्तपत्रांच्या फायलींचा उपयोग करण्यांत आला आहे. त्यांची जंत्री शेवटीं जोडली आहे.

रमाबाईंचा बाप्तिस्मा ही त्यांच्या चरित्रांतील सर्वांत विवाद्य बाब होती.

ती बातमी प्रसिद्ध होतांच हिंदुस्थानांतील कोनाकोपऱ्यांत त्याची भयंकर प्रतिक्रिया झाली. बाईंच्या ह्या कृत्याची कारणमीमांसा आपापल्यापरी जो तो करूं लागला व आतां त्या गोष्टीला पाऊणशें वर्षें होऊन गेलीं तरी अद्याप कोणाला त्याचें समाधानकारक उत्तर सांपडल्यासारखें दिसत नाहीं.

तेव्हां बाई ख्रिस्ती कां झाल्या, हिंदुधर्माविषयीं त्यांचा अनुभव व कल्पना हीं काय होतीं, त्या ख्रिस्ताकडे कशा आकृष्ट झाल्या, त्यांच्या ख्रिस्तीपणाचें स्वरूप काय होतें, हें होतां होईल तों त्यांच्याच शब्दांत पुस्तकाच्या मध्यवर्ती आठव्या प्रकरणांत सांगितलें आहे. त्याच प्रकरणांत त्यांच्या ख्रिस्ती धर्मांगिकाराची कारणमीमांसा परवांपर्यंत कशी होत होती ह्यासंबंधीं थोडक्यांत सांगून त्या ख्रिस्ती झाल्या म्हणजे त्यांच्यांत काय फरक झाला हें पुढच्या दोन प्रकरणांत दिलें आहे. आपल्या ब्राह्मो मित्रांना बाईंनीं आपल्या ख्रिस्ती धर्मस्वीकाराबद्दल जें स्पष्टीकरण केलें आहे तें अकराव्या प्रकरणांत सांगितलें आहे. इतकी लांबावळ न लावतां बाईंनीं ता. २९ सप्टेंबर १८८३ रोजीं ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला एवढें सांगून तो विषय हातावेगळा करायचा असता, असें कोणी म्हणेल. परंतु असें म्हणणें हा विचारवंतांच्या बुद्धीचा अपमान करण्यासारखें आहे. अपुऱ्या साहित्यसामग्रीमुळें गेल्या पाऊणशें वर्षांत जें कोडें उलगडणें अशक्य झालें तें कदाचित् ह्या माहितीमुळें निःपक्षपाती बुद्धीला सहज उलगडतां येईल. तेव्हां केवळ सनावळी देऊन हा प्रश्न न मिटवितां आठ, नऊ, दहा व अकरा ह्या प्रकरणांत विस्तृतपणें हा विषय हाताळला आहे.

एखाद्या सरळगामी नदीच्या प्रवाहानें वाहतां वाहतां मध्येंच एखाद्या तलावाचें स्वरूप धारण करून, पुढचा प्रवास आक्रमण्याच्या अगोदर, कांहीं काळ तेथेंच रेंगाळल्यासारखें करावें, तसेंच रमाबाई असोसिएशनच्या दहा वर्षांच्या काळांत बाईंच्या चरित्राचें कांहींसें झालें आहे; कारण तेथें एकट्या रमाबाईंचाच नव्हे, तर साऱ्या महाराष्ट्राचा, पुरोगामी व पुरातन मतप्रणालींचा, इतकेंच काय तर हिंदी व अमेरिकन मनोवृत्तींचाहि परामर्श घ्यावा लागला आहे; पुष्कळशा गैरसमजांचीं जुनीं पुराणीं कोळिष्टकें झटकून टाकावीं लागलीं आहेत. त्यामुळें हा प्रवास मध्येंच थोडा मंदावल्यासारखा वाटणें अपरिहार्य आहे.

रमाबाईंच्या साऱ्या आयुष्यांत त्यांची बाजू त्यांच्याच दृष्टिकोनानें पाहण्याचें अवघड काम श्री. प्रबोधनकार ठाकरे ह्यांच्याखेरीज दुसऱ्या कोणाला फारसें

साधल्यासारखें दिसत नाहीं. जो तो लेखक बाईंच्या चरित्राकडे आपल्याच चष्म्यांतून पाहात असलेला आढळतो. उदाहरणार्थ: रमाबाई असोसिएशन कधींहि मिशनरी संस्था नव्हती. उलट, ती मिशनरी संस्था नाहीं म्हणून तिला द्रव्यसाहाय्य करूं नये असा प्रचार अमेरिकेंत कांहीं ठिकाणीं झालेला. असें असतांहि रमाबाईंविषयीं इकडे जें लिखाण प्रसिद्ध झालें व आजहि होत आहे त्यांत रमाबाईंना अमेरिकेंतील मिशनरींनीं मदत केली असें चकचकीत सांगण्यांत येतें. एक मराठी व एक इंग्रजी अशीं केवळ दोनच उदाहरणें येथें घेऊं.

१९५६ सालीं प्रसिद्ध झालेल्या "मराठी माणसें व मराठी मनें" ह्या पुस्तकांत म्हटलें आहे, "दहा वर्षेपर्यंत आपण पैशाची मदत देऊं असें अमेरिकन मिशनऱ्यांकडून अभिवचन घेऊन त्या हिंदुस्थानांत परत आल्या."[1]

मार्च १९५९ मध्यें प्रसिद्ध झालेल्या इंग्रजी पुस्तकांतूनहि तेंच आढळतें.

'She came into contact with Missionaries and with their help went to England where she embraced Christianity.'[2]

परंतु खुद्द रमाबाईंनीं आपली कैफियत मांडली असती तर ती कशी मांडली असती ही दृष्टि ठेवून वाचकांस रमाबाईंचें चित्र दिसावें असा अल्प प्रयत्न येथें करण्यांत आला आहे. तो कितपत साध्य झाला आहे हें वाचकांनींच ठरवायचें आहे.

महाराष्ट्राच्या स्वभावधर्माप्रमाणें, शेंडी तुटो कीं पारंबी तुटो, आपले झगडे तडीला पोंचविणारे पक्ष आतांप्रमाणेंच तेव्हांहि होते. रमाबाईंवरूनहि दोन पक्ष तेव्हां झाले होते. मात्र बाईंची बाजू घेणाऱ्या पक्षानें एका विशिष्ट मर्यादे-पर्यंतच बाईंची पाठराखणी केली. पुढें जेव्हां बाईंच्या शाळेंतील मुली ख्रिस्ती होऊं लागल्या तेव्हां हे दोन्ही पक्ष एक झाले. ह्यानंतर रमाबाई अगदीं एकाकी पडल्या. त्यांच्या चरित्रलेखनाचें अत्यंत कठीण काम त्यांच्या आयुष्यांतील त्या कालखंडापासून सुरू होतें व तो भाग समजावून देणें चरित्रलेखकाचें कर्तव्य आहे. मात्र असें करतांना त्यानें रमाबाईंचें वकीलपत्र घेऊन त्यांचें तें सर्व खरें करून दाखविण्याचा विडा उचललेला नाहीं.

---

१. "मराठी माणसें मराठी मनें", पृष्ठ ४६.

२. "Lokamanya Tilak" by Pradhan & Bhagwat, पृष्ठ ५७.

त्यांची बाजू स्वच्छपणें मांडणें एवढेंच त्याचें काम आहे, खोट्याचें खरें करणें व खऱ्याचें खोटें करणें हें त्याचें काम नाहीं.

हें पुस्तक मूळ ज्या समितीसाठीं लिहिण्यांत आलें ती समिति फार उच्च शिखरीं स्थापन झालेली आहे. रमाबाईंच्या मूर्तीवर चढलेलीं गैरसमजाचीं पुटें फोडून काढण्यांत वापरलेली छन्नी अधिक अणकुचीदार व मारलेले घणाचे घाव जोरदार आहेत, ते त्यांना मानवले नाहींत. शिवाय लोकमताचा बागुलबुवा तर त्यांना अधिकच भिववितो. त्यांच्यासाठीं लिहिलेल्या ह्या चरित्रांत लिहिला गेलेला कांहीं मजकूर कायम राहिला आहे. तो म्हणजे ह्या चरित्रांत आलेला कोकणस्थांचा व पुण्याचा थोडा इतिहास. मराठी वाचकांना तो बहुतेक चांगला माहीत असेल परंतु हें पुस्तक महाराष्ट्रीयेतर वाचकांच्या हातीं जाण्याचा संभव असल्यानें तो मजकूर अशा वाचकांना उपयुक्त होईल असें वाटल्यावरून मुद्दाम देण्यांत आला होता व तो नंतर आहे तसाच राहूं दिला आहे.

विषयप्रवेश म्हणून सुरुवातीलाच बाईंच्या चरित्राचा थोडक्यांत आराखडा दिला आहे. तेंहि साधारणतः चरित्रलेखनपद्धतीला सोडून आहे. परंतु पुढें बाईंच्या चरित्रांत वेगवेगळा वादविषयक भाग इतका आहे कीं त्यांच्या कथेची सांखळी मधूनमधून तुटल्यासारखी होते, व एकसंधी चरित्रकथा वाचावयाला मिळत नाहीं. तेव्हां ती न्यूनता भरून काढण्यासाठीं हा सुरुवातीचा मजकूर दिला आहे. ह्यामुळें एकदां रमाबाईंच्या चरित्राचें स्थिरचित्र पाहून घेऊन त्यांची तोंडओळख झाल्यावर पुढें आपण शांतपणें अधिक विस्तारानें त्यांच्याविषयीं माहिती मिळविण्यास सिद्ध होतों.

[ग्रहांवर किंवा ताऱ्यांवर रमाबाईंची भिस्त मुळींच नव्हती.] लोकमान्य टिळक किंवा रमाबाई ह्यांच्यासारखीं कर्तृत्ववान् माणसें भविष्यशोधनाच्या भानगडींत पडत नाहींत. त्यांच्या दैवाचीं चरित्रें त्यांच्या मुठींत असतात. तरी कित्येक वाचकांच्या जिज्ञासातृप्तीसाठीं कांहीं मित्रांच्या आग्रहास्तव परिशिष्ट ४ मध्यें रमाबाईंची व मनोरमाबाईंची पत्रिका दिली आहे.

रमाबाईंच्या पतीकडील माहिती जवळजवळ नव्हती व अजूनहि तितकी नाहीं. मात्र बाईंच्या मावस दिराचे चिरंजीव श्री. हेमेन्द्रनाथ दास ह्यांचें नांव व पत्ता शोधतां शोधतां लागून त्यांच्याकडून श्री. मेधावींच्या वंशवृक्षाची व इतर कांहीं माहिती मिळाली. कुमारी राजस कृष्ण डोंगरे ह्यांच्या वडिलांचा व

बाईंचा निकटचा नातेसंबंध असल्याचीहि माहिती मिळाली. ह्या बाईंकडून एक फारच महत्त्वाचें असें खुद्द बाईंच्या हातचें चिकट-बुक मिळालें. ह्यांत कांहीं दुर्मिळ कात्रणें आहेत, व एक ठिकाणीं तर वहीचें अर्धे पान बाईंनीं आपल्या हातानें लिहिलेलें आढळतें (पृष्ठ ३०३). मात्र त्यांत एक फार मोठा दोष राहून गेला आहे. तो म्हणजे ह्या चिकटबुकांत चिकटविलेल्या उताऱ्याचीं प्रसिद्धीस्थळें व दिनांक, मास, वर्ष इत्यादि बहुतेक ठिकाणीं दिलेलीं नाहींत. हीं अंदाजानें लावून घ्यावीं लागलीं. पण हीं जवळजवळ ६०–७० वर्षांच्या पूर्वींचीं असल्यानें तीं ग्राह्य मानायला हरकत नाहीं. त्यांतून घेतलेल्या मजकुराखालीं तळटीपांत, 'बाईंच्या चिकट-बुकांतून' एवढाच उल्लेख केला आहे.

रमाबाई असोसिएशनबद्दलची अगदीं सुरुवातीची माहिती व अहवालहि ह्या चिकटबुकांत मिळाल्यामुळें त्यांचा मला फारच उपयोग झाला. ह्याशिवाय हेलन एस्. डायर ह्यांनीं लिहिलेल्या रमाबाईंच्या चरित्राची १९०० सालची आवृत्ति बाईंच्या संग्रहांत मिळाली. मीं एक अनुमान केलें होतें तें बरोबर असल्याचें ह्या पुस्तकावरून सिद्ध झालें. बाईंच्या बहुतेक चरित्रांत त्यांनीं कॉंग्रेसच्या पांचव्या अधिवेशनांत केलेल्या एका तडफदार भाषणाचा उल्लेख आहे. परंतु ह्या बाबतींत कोणत्याहि अधिकारी पुस्तकांत उल्लेख सांपडत नाहीं व कॉंग्रेसचा त्या सालचा अहवालहि कोठें मिळेना. पुष्कळ शोध करतां करतां शेवटीं दक्षिण हैदराबादच्या कुमारी लूद् कनारन ह्यांच्या खटपटीनें तो अहवाल मिळाला व वरील घटनेचा अगदीं पटेल असा उलगडा झाला.

आणखी एक उणीव हें चरित्रलेखन करीत असतांना सारखी जाणवत होती. ती म्हणजे बाईंचें माहेर माळहेरंजी व गंगामूळ येथील प्रत्यक्ष माहिती असलेल्या कोणातरी व्यक्तीशीं परिचय. हीहि उणीव मोठ्या अघटित रीतीनें भरून निघाली. हें चरित्र मी लिहीत आहें असें ऐकून माळहेरंजीचे श्री. एम्. लक्ष्मण हरिहर जोशी ह्यांनीं मला पत्र लिहून त्याविषयीं माहिती विचारली व अशा रीतीनें ह्या गृहस्थांची ओळख होऊन पुष्कळशा गोष्टींची त्यांच्याकडून शहानिशा करून घेतां आली.

शेवटीं आभारप्रदर्शन.

केडगांव मुक्ति मिशनमधील सध्यांच्या अधिकारी वर्गानें आपल्या ताब्यांतील कागदपत्रें देऊन तेथील महत्त्वाच्या व्यक्तींच्या भेटी करवून दिल्या. प्रबोधनकार

ठाकरे ह्यांनीं चरित्राचा कांहीं भाग वाचून उपयुक्त सूचना केल्या व त्यांनीं लिहिलेल्या रमाबाई चरित्राच्या वेळीं महाराष्ट्रांतील विद्वान मंडळींशीं त्यांचा झालेला मनोरंजक पत्रव्यवहार माझ्या हवालीं केला. श्री. मामासाहेब दाते ह्यांनीं हिंदु महासभेच्या अध्यक्षीय भाषणांतील माझ्या विषयाला लागू असणारा भाग काढून उतरून पाठविला. श्री. कृष्णाजी विनायक पेंडसे ह्यांनीं कुलवृत्तांत मार्गदर्शन केलें, डॉ. वि. भा. गोवंडे ह्यांनीं रमाबाईविषयक आपल्या लहानपणींच्या आठवणी देऊन शिवाय अंगावर शहारे आणणारे टीकासंदर्भ काढून दिले. मी ह्या सर्वांचा अत्यंत ऋणी आहें.

श्री. डॉ. कमलाबाई देशपांडे ह्यांनीं हें संपूर्ण चरित्र काळजीपूर्वक वाचून त्याबद्दल कित्येक महत्त्वाच्या सूचना केल्या व शंकाकुशंकांचें पुन्हां पुन्हां पत्रोत्तरांनीं समाधान केलें व श्री. गं. दे. खानोलकर ह्यांनीं आपलें एक हस्त-लिखित मला पाहूं दिलें व बिपिनचंद्र पाल, रविंद्रनाथ टागोर इत्यादींसंबंधीं माहिती पुरविली, त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.

श्री. आनंदराव वि. श्रीखंडे ह्यांनीं पुस्तकालयांत बसून इंदुप्रकाश व नवयुग मासिक व सुबोध पत्रिका ह्यांत रमाबाईविषयक सांपडेल तेवढा मजकूर शोधून काढला व पानेंचीं पानें भरून लिहून पाठविलीं; माझे बाल मित्र श्री. बाळकृष्ण सदाशिव प्रधान व त्यांची कन्या कुमारी प्रमोदिनी बा. प्रधान ह्यांनीं पुण्यास केसरी ऑफिसमध्यें बसून तेथील जुन्या फायली चाळण्याचें असेंच काम माझ्यासाठीं केलें; दुसऱ्या एका बालमित्राचे चिरंजीव श्री. मा. ग. कुळकर्णी ह्यांनीं पुस्तकाच्या वेष्टणाची सजावट करून दिली. रावसाहेब नी. दा. अभ्यंकर यांनीं जुनीं फाईलें चाळून बाजीराव पेशव्यांनीं अभ्यंकर घराण्यांतील कोणत्या मुलीशीं लग्न केलें होतें ती माहिती शोधून काढली व रमाबाईंच्या आजोळची माहिती शोधण्यांत मदत केली. मुंबई सरकारचे डायरेक्टर ऑफ आर्काईव्हज्, डॉ. पी. एम्. जोशी ह्यांनींहि असेंच संशोधनात्मक कार्य करतांना साह्य केलें. प्रा. म. दा. साठे ह्यांनीं व डॉ. गो. वि. देवस्थळी ह्यांनीं संस्कृतविषयक शंकांचें निरसन केलें; हुबळीचे श्री. सी. बी. कर्बी ह्यांनीं बाईंच्या संस्कृत काव्यरचनेचे नमुने मिळवून मदत केली; मिस् लुइया फुलर ह्यांनीं संगमनेरहून नाशकास मुद्दाम माझ्या घरीं येऊन हें पुस्तक ऐकलें व ह्यांत त्यांच्यासंबंधीं असलेला मजकूर बरोबर आहे कीं चुकला आहे हें सांगितलें; श्री. शामसुंदर मनोहर

आढाव ह्यांनीं मला लागतील तीं पुस्तकें व लागेल ती माहिती व मदत लागेल तेव्हां मोठ्या आपुलकीनें पुरविली; त्रिंबकचे क्षेत्रोपाध्याय श्री. गजानन ऊर्फ रामचंद्र गोविंद घैसास ह्यांनीं डोंगरे व अभ्यंकर कुटुंबांच्या वंशावळी शोधण्याच्या कामीं मदत केली; नागपूरचे माझे मित्र प्रा. भवानीशंकर पंडित यांनीं कांहीं गीतांचीं पद्यमय मराठी भाषान्तरें करून दिलीं; श्री. शरच्चंद्र वामन रानडे ह्यांनीं आपल्या संग्रहीं असलेले रमाबाईंचे जुने फोटोग्राफ व हस्ताक्षर हीं मला दिलीं; ह्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहें.

माझे मित्र श्री. कृ. स. अभ्यंकर ह्यांनीं तर साह्याची कमालच केली. स्वतः नाशकास येऊन त्यांनीं मजबरोबर हस्तलिखित वाचलें, अत्यंत उपयुक्त सूचना केल्या इतकेंच नव्हे तर दुरुस्त हस्तलिखित पक्कें झाल्यावर पुनः एकदां तें बारकाईनें वाचून पुष्कळसे संदर्भ पुरविले. त्यांचा माझा ऋणानुबंधच असा आहे कीं माझ्या लिखाणास त्यांच्याकडून असेंच वारंवार व असेंच आपुलकीनें साह्य मिळत आलें आहे व त्यांनाहि लेखनाचा व वाचनाचा नाद असल्यानें त्यांचें हें साह्य उपकारकच होतें.

ह्या लांबलचक यादींत आणखी दोन नांवें घातल्याखेरीज ती पुरी होणार नाहीं. एक बॉम्बे ट्रॅक्ट अँड बुक सोसायटीचे सेक्रेटरी श्री. सुमन्त दयानंद करंदीकर व दुसरें मौज प्रिंटिंग ब्यूरोचे श्री. वि. पु. भागवत. करंदीकरांच्या अनेकविध साह्यांनीं पुस्तक प्रसिद्ध होण्याचा योग आला व 'मौजे'नें १५ दिवसांत ५३२ पानांचें पुस्तक तयार करून तें दिवाळीच्या आंत हातांत ठेवण्याचा विक्रम करून दाखविल्यानें मी ह्या दोघांच्या ऋणाखालीं वांकून गेलों आहें.

शेवटीं एक खुलासा करणें राहिलें.

बारापंधरा रुपये किंमतीचें हें पुस्तक तुम्हांला ४ किंवा ५ रुपयांना देणें परवडतें कसें? असा प्रश्न वारंवार विचारण्यांत येत आहे. त्याला एकच उत्तर देण्याचा मोह होतो कीं रमाबाईंच्या चरित्रांत जसे अनेक चमत्कार पाहण्यास मिळतात तसाच त्यांच्या ह्या चरित्रग्रंथाच्या बाबतींतहि चमत्कार घडला आहे. मात्र ही विधिघटना योजनाबद्ध आहे. अलीकडच्या पुस्तकांच्या किंमती पाहून पुस्तकें गरिबांसाठीं नसतात असेंच म्हणावें लागतें. मात्र वाचकांची वाढती संख्या व वाढती उत्कंठा पाहून पुस्तकें स्वस्त किंमतींतच देण्याची वेळ आली आहे व तशी कांहीं तरी व्यवस्था व्हायला हवी अशीहि

खात्री पटूं लागते. तसें करण्याचें मीं ठरविलें व हें करतांना मी माझ्या मित्रमंडळीवर ओझें घातलें. २६ मित्रांनीं मला सक्रिय सहानुभूति दाखविली. ह्यांपैकीं २३ भारतीय आहेत व त्या तेवीसपैकीं १३ हिंदु आहेत. माझ्या साह्यकर्त्यांचा हा एक गट. कांहींना मीं अशी विनंति केली होती कीं नव्या नव्या निघणाऱ्या खेड्यांतील वाचनालयांसाठीं पुस्तकें विकत घेऊन तुम्ही तीं वाचनालयांना बक्षिस द्या व मला अप्रत्यक्ष रीतीनें साह्य करा. ह्याहि मार्गानें पुस्तकांचा खप झाला. माझ्या एका विद्यार्थिनीनें आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ देणगी म्हणून मला २५० लायब्ऱ्यांसाठीं १००० रुपये दिले.

किंमत कमी ठेवतां आल्यानें नासिकच्या एका पोस्टमननें व एका भंग्यानें आगाऊ पैसे भरून पुस्तकें घेतलीं व ह्या महागाईची जाणीव अधिकच तीव्रतेनें करून दिली.

पुष्कळशा भरंवशाच्या म्हशींना टोणगे झाले हें खरें; तरी कांहीं कांहीं शेळ्यांना तीनतीन, चारचार गोजिरवाणीं करडें झालीं, व त्यांनींच मला खरा हात दिला. ह्या शिवाय नॅशनल खिश्चन कौन्सिलनें व मुंबईच्या पंडिता रमाबाई शतवार्षिक उत्सव मंडळानें अनुक्रमें देणगीरूपानें व कर्जाऊ म्हणून रक्कम देऊन मला हातभार लावला.

अशा स्थितींत अधिक किंमत ठेवून वाचकांना व साह्यकारी मित्रांना फसवायचें म्हणजे प्रामाणिकपणाला अंधारकोठडींत टाकण्यासारखें आहे. तसें करायला आजच्या काळांत सुद्धा मला धैर्य होत नाहीं, एवढेंच.

—आणि लेखनाच्या बाबतींत व पैशानें इतकी भरघोस मदत मिळाल्यावर, मीं विशेष असें केलें आहे तरी काय, असा प्रश्न उभा राहतो.

नाशिक
ऑक्टोबर २०, १९६०

**देवदत्त नारायण टिळक**



विपिन बिहारीदास मेधावि
(प्रकरण ४)

रमाबाई






श्रीपाद बाबाजी ठाकूर
(प्रकरण ४)



DAGUERRO-
TYPE
चित्र :
(पृष्ठ २९)

लक्ष्मीबाई, रमा, अनंतशास्त्री, × × × श्रीनिवास व कृष्णा

रमाबाईचें जन्मस्थान : गंगामूळ (पृष्ठ २४-२५)





डॉ. रेचेल बॉडले
(पृष्ठ १२३–१२६)



फ्रान्सिस ई. विलर्ड
(पृष्ठ १९५)



डॉ. आनंदीबाई जोशी (पृष्ठ १९१)

पुण्यांतील शारदासदनाची इमारत (पृष्ठ २२५)






लो. बाळ गंगाधर टिळक
(पृष्ठ २७२)



गोपाळ गणेश आगरकर
(पृष्ठ २७२)



**गोपाळराव जोशी** (पृष्ठ २७०.)

शतंजीवी डॉ. अण्णासाहेब कर्वे (पृष्ठ २७९)





अमेरिकेस जातांना
(प्रकरण १२)

मनोरमा व रमाबाई



वाङ्मयसेवा



मनोरमाबाई

सिस्टर जिरॅल्डिन



वाँटेज येथील चर्च (पृष्ठ ११९)





प्रवेश करतेवेळीं व नंतर







शेतकी प्रमुख, एक परदेशीय पाहुणी, रमाबाई व सुंदराबाई
(पृष्ठें ३९३-३९५)



दादासाहेब गद्रे
(पृष्ठें ३९८–३९९)



'जिवू' (पृष्ठें ३३९ ते ३४१)
व
मिनी एब्रॅम (पृष्ठें ३९६-३९८)



रुक्मिणीबाई व त्यांच्या 'त्यो'
(पृष्ठे २३४–२३५)



सुभद्राबाई रमाबाई
मनोरमाबाई
(पृष्ठ ३९०)

गोमतीबाई (पृष्ठे ३०६ ते ३१४)





मुली येत तेव्हां



आल्यानंतर सहा महिन्यांनीं

आणि कांहीं काळानंतर






पुण्यांतील शारदासदन निवासी :　　　　सुंदराबाई　　　　रमाबाई




**मुक्तिसदन**

दुष्काळांत असे
मानवी सांपळे
रमाबाईंनीं वांचविले

रमाबाईचें बायबल.
ह्यावर हजारों नांवें
लिहिलीं आहेत.
त्या प्रत्येक व्यक्तीची
आठवण करून बाई
प्रार्थना करीत





रमाबाईंची समाधी



राजस कृष्ण डोंगरे
(प्रस्तावना–तेरा)



श्री. हेमेन्द्रनाथ दास
(प्रस्तावना–बारा)



आज

पृष्ठ
२५२

१०९९८

# विषयप्रवेश


कविसम्राट् रवीन्द्रनाथ ठाकूर ह्यांची भारताला ओळख करून दिली ती पश्चिमेनें. नोबेल पारितोषिक मिळेपर्यंत बंगालच्या बाहेर भारतांत फारसें कोणीं त्यांचें नांव ऐकलें नव्हतें. रवीन्द्र-नाथांच्या बाबतींत निदान त्यांच्या भाषाभूमीला तरी त्यांची माहिती होती. परंतु ज्या व्यक्तीबद्दल आम्ही लिहीत आहों तिला अशीच प्रसिद्धी जेव्हां बाहेरच्या जगांत मिळाली तेव्हां तिच्या माहेराला तिचें नांव अपरिचित होतें! ही व्यक्ति म्हणजे, १९५८ सालीं आपण ज्यांची जन्मशताब्दि साजरी केली त्या पंडिता रमाबाई होत.

१८७८ सालीं जुलै महिन्यांत एका सुप्रभातीं मुंबईच्या दैनिकांतून अशी एक बातमी फडकली:

"हल्लीं कलकत्त्यास रमाबाई नांवाची कोणी मराठा स्त्री आली आहे. तिनें कलकत्त्यांत कांहीं दिवस मुक्काम करून तेथील विद्वान् मंडळीस चकित करून सोडलें आहे. बाई संस्कृत भाषा बोलते, जागच्या जागीं संस्कृतमध्यें काव्य करते. तिचें वय बावीस वर्षांचें असून ती अविवाहित आहे. महाराष्ट्रीय असली तरी कर्नाटक प्रान्तांतून आली आहे."

महाराष्ट्रीय स्त्री ! कर्नाटकांतून आलेली ! बावीस वर्षें वयाची ! तरी अद्याप अविवाहित ! संस्कृत भाषेंत बोलते ! बोलते इतकेंच नाहीं तर संस्कृतमध्यें 'कवनें'हि रचते ! आणि तींहि जागच्या जागीं !

सारेंच विलक्षण ! सारा सुशिक्षित महाराष्ट्र खडबडून जागा झाला. बाई-बद्दल येथील विद्वान् शोध घेऊं लागले. त्यांना जे शोध लागले व लागत राहिले त्यांनीं सुशिक्षित महाराष्ट्राला अधिकच धक्के दिले. त्यांना जागृत केलें, विचार करायला लावलें, काम करायला लावलें.



रमाबाईंची समाधी



राजस कृष्ण डोंगरे
(प्रस्तावना–तेरा)



श्री. हेमेन्द्रनाथ दास
(प्रस्तावना–बारा)



आज

पृष्ठ
३५३

१०९९८

# विषयप्रवेश

कविसम्राट् रवीन्द्रनाथ ठाकूर ह्यांची भारताला ओळख करून दिली ती पश्चिमेनें. नोबेल पारितोषिक मिळेपर्यंत बंगालच्या बाहेर भारतांत फारसें कोणीं त्यांचें नांव ऐकलें नव्हतें. रवीन्द्रनाथांच्या बाबतींत निदान त्यांच्या भाषाभूमीला तरी त्यांची माहिती होती. परंतु ज्या व्यक्तीबद्दल आम्ही लिहीत आहों तिला अशीच प्रसिद्धी जेव्हां बाहेरच्या जगांत मिळाली तेव्हां तिच्या माहेराला तिचें नांव अपरिचित होतें! ही व्यक्ति म्हणजे, १९५८ सालीं आपण ज्यांची जन्मशताब्दि साजरी केली त्या पंडिता रमाबाई होत.

१८७८ सालीं जुलै महिन्यांत एका सुप्रभातीं मुंबईच्या दैनिकांतून अशी एक बातमी फडकली:

"हल्लीं कलकत्त्यास रमाबाई नांवाची कोणी मराठा स्त्री आली आहे. तिनें कलकत्त्यांत कांहीं दिवस मुक्काम करून तेथील विद्वान् मंडळीस चकित करून सोडलें आहे. बाई संस्कृत भाषा बोलते, जागच्या जागीं संस्कृतमध्यें काव्य करते. तिचें वय बावीस वर्षांचें असून ती अविवाहित आहे. महाराष्ट्रीय असली तरी कर्नाटक प्रान्तांतून आली आहे."

महाराष्ट्रीय स्त्री! कर्नाटकांतून आलेली! बावीस वर्षे वयाची! तरी अद्याप अविवाहित! संस्कृत भाषेंत बोलते! बोलते इतकेंच नाहीं तर संस्कृतमध्यें 'कवनें'हि रचते! आणि तींहि जागच्या जागीं!

सारेंच विलक्षण! सारा सुशिक्षित महाराष्ट्र खडबडून जागा झाला. बाईबद्दल येथील विद्वान् शोध घेऊं लागले. त्यांना जे शोध लागले व लागत राहिले त्यांनीं सुशिक्षित महाराष्ट्राला अधिकच धक्के दिले. त्यांना जागृत केलें, विचार करायला लावलें, काम करायला लावलें.

पुढील प्रकरणांतून ह्या बाईंचें क्रमशः चरित्र दिलें आहे. मात्र मधूनमधून अनेक वादाचे प्रश्न हाताळावे लागल्यानें बाईंच्या चरित्राच्या अखंड देखाव्याचा एकसंधी चित्रपट (Panorama) अगदीं थोडक्यांत खालीं दिला आहे.

२३ एप्रिल १८५८ रोजीं पहाटे मंगरूळजवळील गंगामूळ ह्या डोंगरावर पंडिता रमाबाई ह्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचें नांव अनंतशास्त्री व मातुःश्रीचें नांव लक्ष्मीबाई. ह्यांचा जन्म डोंगरे नांवाच्या चित्पावन ब्राह्मण कुळांत झाला. अनंतशास्त्री व लक्ष्मीबाई हीं दोघेंहि संस्कृतपारंगत होतीं. गंगामूळास त्यांनीं आश्रम बांधून एक लहानशीच पण टुमदार वसाहत उठवून दिली होती. तेथें विद्यार्थी येऊन संस्कृत विद्या संपादन करून जात.

अनंतशास्त्र्यांना घरच्या कटकटीमुळें गंगामूळचा त्याग करावा लागला. ते आपली पत्नी, मुलगा व दोन मुली घेऊन त्यानंतर साऱ्या भारतांत तीर्थयात्रा करीत फिरले. गंगामूळ सोडतांना रमाचें वय अगदीं लहान म्हणजे केवळ सहा महिन्यांचें होतें. माळ किंवा माळहेरंजी हें त्यांचें गांव जवळच होतें. तेथें कांहीं काळ काढून मग शास्त्रीबोवांनीं आपल्या तीर्थयात्रेस सुरुवात केली.

अनंतशास्त्र्यांनीं आपल्या पत्नीला व मुलींना संस्कृत शिकविलें म्हणून शेजाऱ्यापाजाऱ्यांकडून व घरच्या माणसांकडूनहि त्यांना फार छळ सोसावा लागला. गांव सोडल्यावर सर्व हिंदुस्थानच्या तीर्थयात्रा करीत करीत तर कांहीं तीर्थांच्या ठिकाणीं दीर्घ मुदतीचा मुक्काम करीत, अखेर पंधरा सोळा वर्षांनीं हें कुटुंब मद्रास इलाख्यांत शिरलें. त्याच वेळेस मद्रास अत्यंत दुर्धर अशा दुष्काळानें ग्रासलेलें होतें. त्या दुष्काळांत काळानें रमाबाईंच्या आईवडिलांच्या व थोरल्या बहिणीच्या आहुती घेतल्या. राहतां राहिल्या रमाबाई व त्यांचा थोरला भाऊ श्रीनिवास.

ह्या दोघा भावंडांनीं आपलें तीर्थयात्रेचें व्रत तसेंच कायम ठेवून तीनचार वर्षे पायपिटी केली. भटकत भटकत त्यांनीं चारपांच हजार मैलांचा पायीं प्रवास केला. त्या प्रवासांत तीं दोघें पुराण सांगत व संस्कृतमध्यें व्याख्यानें देत. पण त्यांना कोणीं फारसें विचारलें नाहीं. हिंडत हिंडत शेवटीं तीं कलकत्ता शहरीं आलीं. तेथें मात्र त्यांच्या विद्वत्तेचें साफल्य झालें. कलकत्ता येथील ब्राह्मो पुढाऱ्यांनीं व ककलत्ता विश्वविद्यालयांतील पंडितांनीं त्यांची कदर केली. मोठ्या

सन्मानानें त्यांना युनिव्हर्सिटींत आमंत्रून रमाबाईंना पंडिता सरस्वती असें विरुद अर्पण केलें. येथून पुढें बाईंची कीर्ति साऱ्या भारतांत पसरली.

सुखाचा तो काळ फार अल्प ठरला, कारण पाहातां पाहातां काळानें झडप घालून बाईंचा एकुलता एक आधार श्रीनिवास ह्याला उचलून नेलें. बाई आतां अगदीं उघड्या पडल्या. त्यानंतर बाईंनीं आपल्या बंधूंच्या एका मित्राशीं लग्न केलें. त्याचें नांव बाबू बिपिन बिहारीदास मेधावी असें होतें. मेधावी बंगाली होते व शूद्र होते. म्हणजे हा विवाह आंतरप्रान्तीयच नव्हे तर आंतरजातीयहि होता. त्यामुळें लोकमत फारच क्षुब्ध झालें. १८८० च्या काळांत अशी गोष्ट कोणाच्या स्वप्नींहि येणें अशक्य होतें. आणखीहि एक विशेष म्हणजे तो विवाह प्रतिलोम विवाह होता.

पण काळानें बाईंचा हाहि आधार हिरावून घेतला. विवाहानंतर १९ महिन्यांच्या आंत मेधावींवर कॉलऱ्याच्या रूपानें काळानें झडप घातली. आतां बाईंना एकच विरंगुळा उरला. तो म्हणजे त्यांची कन्या मनोरमा. त्यानंतर मनोरमेला घेऊन त्या आपल्या माहेरीं—महाराष्ट्रांत आल्या.

इकडे येऊन शांतपणें इंग्रजीचा अभ्यास करण्यांत वेळ घालविण्याचें त्यांनीं ठरविलें होतें पण त्याच्या आधींच इकडे येऊन पोंचलेल्या त्यांच्या कीर्तीनें तें जमूं दिलें नाहीं. परिस्थितीनें त्यांच्या हातावर समाजसुधारणेचें कंकण बांधून त्यांना इकडे येतांच कामाला लावलें. ह्या कार्याचें दृश्य फळ म्हणजे 'आर्य महिला समाज.' पुण्यास व मुंबईस समाजाची स्थापना केल्यावर त्या ठाणें, सोलापूर, अहमदनगर अशा ठिकाणीं त्या कामासाठीं गेल्या व तेथें तेथें त्यांनीं 'समाजा'ची स्थापना केली. हें काम चालू असतांच हंटर साहेबांच्या अध्यक्षतेखालीं सरकारी विद्याविषयक चौकशी समिती नेमण्यांत आली. बाईंना त्या समितीपुढें आर्य महिला मंडळाच्या प्रतिनिधि ह्या नात्यानें साक्ष द्यावी लागली. ही साक्ष इतकी परिणामकारक झाली कीं हंटर साहेबांनीं तिचें इंग्रजी भाषांतर करवून घेऊन पुढें विलायतेंत बाईंसंबंधीं एक व्याख्यान दिलें. बाईंचा लौकिक आतां परदेशांत जाऊन पोंचला. आतां आपल्या इंग्रजी शिक्षणाविषयीं बाईंना अधिकच निकड वाटूं लागली. भारतांत राहून कितीहि काळ घालविला तरी तें शिक्षण नीटसें होणार नाहीं असें त्यांच्या मनानें घेतलें व त्यासाठीं खुद्द इंग्लंडला जाण्याचें त्यांनीं ठरविलें.

'स्त्रीधर्मनीति' नांवाचें एक पुस्तक लिहून त्याच्या विक्रीवर त्यांनीं आपला व आपल्या कन्येचा प्रवासखर्च उभा केला, व इंग्लंडहून भारतास येण्यास निघालेल्या स्त्रियांना मराठी शिकविण्याचें काम करून त्यावर आपला खाण्या-राहण्याचा खर्च भागविण्याचें ठरवलें. अशा रीतीनें त्या इंग्लंडला गेल्या. इंग्लंडला गेल्यावर तेथें परित्यक्ता स्त्रियांसाठीं होत असलेलें काम पाहून त्यांना आश्चर्य वाटलें व त्याचें कारण शोधूं जातां तें येशू ख्रिस्ताच्या व्यक्तिमत्वांत सांपडून त्यांचें लक्ष ख्रिस्ताच्या धर्मानें अधिक आकर्षित करून घेतलें व पुढें लौकरच त्यांनीं बाप्तिस्मा घेऊन ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. लग्नापूर्वीं दोन वर्षांपासूनच त्यांचा हिंदु धर्मावरील विश्वास उडाला होता. मात्र त्यामुळें त्यांचा परमेश्वरावरील विश्वास कमी झाला नव्हता. उलट तो दृढच झाला होता.

इंग्लंडमधून बाईंची कीर्ति आतां अमेरिकेंत पसरली. फिलाडेल्फिया येथें डॉ. आनंदीबाई जोशी ज्या कॉलेजांत शिकत होत्या त्या कॉलेजच्या प्रिन्सिपल डॉ. बॉड्ले ह्यांनीं बाईंचीं कीर्ति ऐकली होती. बाई आपल्या मावशी (Aunt) आहेत असें डॉ. आनंदीबाईंनीं बॉडले बाईंना सांगितलें होतें. त्यामुळें डॉ. आनंदीबाईंच्या पदवीदान समारंभालाच पंडिता रमाबाईंना बोलावण्याचें त्यांनीं ठरविलें. बाईंना जवळ जवळ एक वर्षभर आधींपासून आग्रहाचीं पत्रें जाऊं लागलीं, इतकेंच नाहीं तर त्यांचा प्रवासखर्चहि डॉ. बॉडलेबाईंनीं पाठवून दिला. रमाबाईंना इंग्लंडमधील आपला अभ्यास असा मध्येंच सोडून द्यायला नको होतें; परंतु त्या आमंत्रणांतील अगत्य पाहून त्यांनीं अमेरिकेचें तें आमंत्रण स्वीकारलें.

महाराष्ट्रांतून अमेरिकेंत जाणारी पहिली स्त्री आनंदीबाई व इंग्लंडमध्यें जाणारी पंडिता रमाबाई. दोघींपैकीं एकीलाहि दुसरी परदेशांत चालली आहे ह्याची जाणीव नव्हती. पण योगायोग असा कीं दोघींनीं भारताचा किनारा १८८३ च्या एप्रिलमध्येंच सोडला. एक कलकत्त्याहून निघाली तर दुसरी मुंबईहून व पुढें दोघींचीहि गाठ अमेरिकेंत पडली. त्या वेळपावेतों दोघींनींहि एकमेकींस पाहिलें नव्हतें. आनंदीबाई रमाबाईंची वाट पाहात दोन दिवस बंदरावर बसून होत्या.

अमेरिकेंतील स्त्रियांची प्रगति व विशेषतः तेथील शिक्षणपद्धति पाहून रमाबाईंचें मन तेथें रमलें. भारतांत परत आल्यावर येथील गरीब अज्ञ बालविधवांसाठीं

त्याच धर्तीवर आपणहि एक संस्था काढायची असा त्यांनीं संकल्प केला. ह्या प्रश्नाबाबत अमेरिकन लोकमत जागृत करण्यासाठीं रमाबाईंनीं 'हाय कास्ट हिंदु वूमन' नांवाचें एक इंग्रजी पुस्तक लिहिलें. त्या पुस्तकामुळें अमेरिकेंत लोकमत बाईंना अनुकूल होऊन तेथील लोकांनीं त्यांच्या कार्यांत त्यांना साह्य करतां यावें म्हणून 'रमाबाई असोसिएशन' स्थापन केली व त्यांना दहा वर्षें साह्य करण्याचें आपल्या अंगावर घेतलें.

रमाबाई भारतांत परत आल्या व येथें येतांच त्यांनीं आपली 'शारदासदन' नांवाची सुप्रसिद्ध संस्था स्थापन केली. ह्या संस्थेमध्यें ख्रिस्ती धर्माचा प्रत्यक्ष उपदेश करावयाचा नाहीं व त्या धर्माचें क्रियाशील प्रदर्शन करावयाचें नाहीं असें बाईंनीं ठरविलें. परंतु रमाबाईंच्या ख्रिस्ती शीलाची मुलींवर अप्रत्यक्ष रीतीनें छाप पडून कित्येक मुली आपणास ख्रिस्ती व्हायचें असें सांगूं लागल्या. ह्या निमित्तानें वादळ होऊन सदनांतून कांहीं मुली काढून घेण्यांत आल्या. पुण्यांतील सुधारक वर्गानेंहि आपला पाठिंबा काढून घेतला. तरी पण सदनाचें काम चालूच राहिलें. 'रमाबाई असोसिएशन' त्यांना दहा वर्षें मदत करणारच होती, तीं दहा वर्षें संपत आलीं. त्यामुळें पंडिता रमाबाईंनीं पुण्यापासून ३४ मैलांवर असलेल्या केडगांव ह्या ठिकाणीं बरीचशी जागा खरेदी करून शारदा सदन व आपलें इतर काम तिकडे हालविलें.

बाई केडगांवास जाण्याच्या सुमारास मध्य प्रदेशांत व नंतर दोन वर्षांनीं गुजराथेंत भयंकर स्वरूपाचे दुष्काळ पडले. लोक अन्नान्न करून तडफडूं लागले. आपण स्वतः दुष्काळाच्या भट्टींत होरपळून निघाल्याचें विस्मरण बाईंना कधींच झालें नव्हतें. त्या दुष्काळग्रस्तांच्या साह्यार्थ धावून गेल्या. त्यांच्या भोंवतीं आतां दोन अडीच हजार अनाथ अपंगांचा घोळका जमा झाला होता. इतक्यांच्या नुसत्या उदरभरणाचाच नव्हे तर पालनपोषणाचा व शिक्षणाचाहि प्रश्न होता. परंतु रमाबाईंचा परमेश्वराच्या सामर्थ्यावर इतका दृढ विश्वास होता कीं, त्या विश्वासाच्या जोरावर त्यांनीं एवढ्यांचेंहि संगोपन केलें. ह्यांतील बहुतेक मुली हिंदु समाजाच्या खालच्या थरांतून आलेल्या होत्या. स्वतः रमाबाईंनीं तर त्यांची वाटेल तशी हलकीसलकी सेवा केलीच, पण त्यांचें पाहून त्यांच्या संस्थेंतील उच्चवर्णीय बालविधवाहि ती करण्यास पुढें सरसावल्या.

शारदासदनाच्या बाबतींत रमाबाईंना अगदीं शेवटपर्यंत तिहेरी विरोधकांना

तोंड द्यावें लागलें. हिंदु समाजाच्या एका मोठ्या गटाची, त्या केवळ ख्रिस्ती असल्यामुळेंच त्यांच्या कार्याबद्दल संशयाची वृत्ति होती. उलट भारतांतील पुष्कळ ख्रिस्ती लोक बाई एक धर्मातीत संस्था चालवीत आहेत असें मानून त्यांना विरोध करीत होते. जेथून पैसा यायचा त्या अमेरिकेंतहि 'हें मिशनरी काम नाहीं म्हणून आपण अशा कामाला कशाला मदत करायची' अशी कांहींशी विरोधी वृत्ति दिसून येत होती.

केडगांव जें एक वैराण माळरान होतें, त्याला आतां एका शहराची शोभा आली. शेतीपासून छापखान्याच्या कामापर्यंत सारीं कामें तेथील स्त्रिया करूं लागल्या. माझ्या दाराशीं येईल ती माझी मुलगी. मग ती उच्चवर्णीय असो नसो, अस्पृश्य मानलेली असो कीं गुन्हेगार ठरलेल्या जातींतील असो. तिच्या पालनपोषणाची, शिक्षणाची व कांहीं तरी विद्या उद्योग शिकवून तिला स्वावलंबी बनविण्याची जबाबदारी मी घेईन, हें व्यापक धोरण बाईंनीं जाहीर केलें. त्यांनीं केडगांवच्या आश्रमाला मुक्तिसदन हें नांव दिलें. पुण्याच्या शारदा सदनाचाहि त्या कामांत अंतर्भाव होता. पुण्याची मालमत्ता मात्र आतां विकून टाकण्यांत आली. बाईंच्या नवीन कामांत अंधांसाठीं शाळा अगदीं पहिल्यापासून होती. शिवाय परित्यक्ता स्त्रियांसाठीं त्यांनीं कृपासदन नांवाची संस्था त्याच वेळेस काढली. मुक्तिसदनांतील धार्मिक व नैतिक शिक्षण ख्रिस्ती धर्मानुसार राहाणार हा संकेत त्यांनीं आतां कायम केला. तरी त्यांत शारदासदन म्हणून जो भाग होता त्याला पूर्वींच्या शारदासदनाचे नियम त्यांनीं कायम ठेवले होते. मुक्तिसदन ख्रिस्ती होतें, तरी ख्रिस्ती धर्माचें माहात्म्य मनोमन पटल्याशिवाय व कोणी आग्रहानें मागणी केल्याशिवाय आणि त्या मागणीची कसोटी पाहिल्याशिवाय कोणाहि आश्रमांत आलेल्या किंवा आणलेल्या बायांना किंवा मुलींना बाप्तिस्मा देण्यांत आला नाहीं,—आजहि देण्यांत येत नाहीं. धर्मप्रसाराचा ह्या सदनाचा हेतु कितीहि उघड असला तरी मानवतेच्या सेवेला प्राधान्य असून धर्माचा मुद्दा ज्याच्या त्याच्या इच्छे-वर ठेवलेला आहे.

हिंदी नॅशनल कॉंग्रेसला १८८९ सालीं पहिल्यानेंच स्त्रीप्रतिनिधि गेल्या, त्यांत रमाबाईंचा पुढाकार होता. संमतिवयाच्या बिलासंबंधीं स्त्रियांचें संघटित लोकमत सरकारच्या नजरेस आणण्याचा यशस्वी प्रयत्न त्यांनीं मुंबईच्या व पुण्याच्या

स्त्रियांच्या सभा भरवून व त्या बाबतींत लेखी अर्ज व्हाइसरॉयकडे रवाना करून केला. त्यांचें आणखी एक मोठें कार्य म्हणजे मूळ हीब्रु व ग्रीक वरून केलेलें बायबलचें मराठी भाषान्तर. हें काम त्यांनीं अत्यंत कसोशीनें केलें. तें चालू असतांनाच त्यांच्या प्रिय कन्येच्या मृत्यूच्या प्रसंगास त्यांना तोंड द्यावें लागलें. केडगांवचा नित्याचा कार्यक्रम सांभाळून कित्येक वर्षें चाललेलें बायबलच्या भाषान्तराचें हें काम त्यांना अखेरपर्यंत पुरलें. मूळ भाषांतून संपूर्ण बायबलचें असें भाषान्तर साऱ्या जगांत दुसऱ्या कोणत्याहि एकट्या व्यक्तीनें आजपर्यंत करून दाखविलेलें नाहीं व एकट्या स्त्रीनें तर नाहींच नाहीं. बाईंच्या कर्तबगारीची छाप इतरांवरहि पडून त्यांनीं त्यांना कार्यक्षम केलें.

रमाबाईसंबंधीं महर्षि डॉक्टर अण्णासाहेब कर्वे आपल्या 'आत्मवृत्तां'त म्हणतात :

"महाराष्ट्रांत विधवाशिक्षणाच्या इमारतीचा पाया घालण्याचें अत्यंत श्रेष्ठ कार्य पंडिता रमाबाई ह्यांनीं केलें. त्यांनीं विधवाशिक्षणाचें कार्य स्वतःच्या बळावर केवढ्या तरी स्वरूपाला आणलें ह्याबद्दल दक्षिणी समाजानें नेहमीं कृतज्ञ राहिलें पाहिजे. अशा ह्या पराक्रमी स्त्रिया हिंदुस्थानांत काय पण ह्या भूतलावरहि हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या सुद्धां मिळायाच्या नाहींत."

आणि अण्णासाहेबांचा हा आदर त्यांच्या १०० वर्षांच्या हयातीनंतरहि कायम राहिल्याचें मुंबईस पंडित जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखालीं ता. १८ एप्रिल १९५८ रोजीं त्यांच्या सत्कारसमारंभांत दिसून आलें. त्या वेळीं त्यांनीं ज्यांचें स्नेहऋण कबूल केलें त्यांतहि पहिलें नांव रमाबाईंचें होतें. टाईम्स म्हणतो[१].

Dr. Karve said that his heart was full today with grateful memory of his departed friends like Pandita Ramabai, Dr. Bhandarkar, Mr. G. K. Gokhale, Sir Vithaldas Thackarsy, Justice Patkar and numerous others who helped him to make concrete his dream. "To them I offer my sincere thanks."

---

१. Times of India, १९-४-१९५८

अण्णासाहेबांच्या पत्नी सौ. आनंदीबाई कर्वे ह्या बाईंच्या शारदा सदनांतील पहिल्या विद्यार्थिनी होत. त्या आपल्या 'माझें पुराण' ह्या आत्मचरित्रांत म्हणतात :

"पंडिता रमाबाईंनीं जो उपदेश मला वेळोंवेळीं केला तो माझ्या मनांत मीं टिकलीप्रमाणें गोंदून ठेवला आहे. बाईंच्या शिकवणुकीचा व अनुभवाचा माझ्या आयुष्यावर फार परिणाम झालेला आहे. बाईंचा मला कधीं विसर पडणार नाहीं. आपल्या जातीसाठीं—बायकांसाठीं—कांहीं तरी करावें अशी इच्छा त्यांच्याच उदाहरणावरून माझ्या मनांत उत्पन्न झाली. पुढें हिंगण्याचा आश्रम व इतर संस्थांकरितां जी कांहीं थोडी सेवा मीं केली ती त्यांच्याच उपदेशाचें फळ आहे........विधवांच्या शिक्षणाप्रमाणें पोरक्या मुलांबद्दल कळकळ पंडिताबाईंच्याच आचरणानें माझ्या मनांत उत्पन्न झाली. पुढें माझ्या आयुष्यांत मीं जीं अनेक पोरकीं मुलें पाळलीं त्याचें बीज यांतच आहे."

सरोजिनी नायडूंनीं आपल्या एका भाषणांत रमाबाईंना हिंदु संत मालेंत नमूद करतां येण्यासारखी पहिली ख्रिस्ती व्यक्ति असें म्हटलें आहे.[१] ख्रिश्चियाना येथें भरलेल्या प्राच्य परिषदेंत प्रो. मॅक्स मुल्लर ह्यांनीं राजा राममोहन राय ह्यांच्या तोडीची ही नारी आहे, असे उद्गार रमाबाईंच्याबद्दल बोलतांना काढले होते. बुद्धिमत्तेच्या दृष्टीनें रमाबाईंसारख्या व्यक्ति शें दोनशें वर्षांच्या काळांत हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्याहि झाल्या नाहींत. मराठी, कानडी, गुजराथी, बंगाली, हिंदी व तुळू ह्या सहा भारतीय भाषा त्यांना चांगल्या अवगत होत्या. संस्कृत तर त्यांना मायबोलीप्रमाणें होती. इंग्रजींत त्यांनीं पुस्तकें लिहिलीं. हीब्रू व ग्रीक शिकून त्यांनीं त्याहि भाषांत प्रावीण्य मिळविलें.

नारायण वामन टिळक ह्यांनीं रमाबाईंविषयीं म्हटलें आहे "वेगवती नदीप्रमाणें कधींहि अडून न राहाणारी त्यांची इच्छाशक्ति, एखाद्या वीरालाहि लाजवील असलें त्यांच्या अंगीं असलेलें शौर्य, त्यांचें अमर्याद औदार्य, ज्याला बांध म्हणून ठाऊक नाहीं असलें त्यांचें विचारस्वातंत्र्य," पारिजातकाप्रमाणें भरगच्च फुललेलें त्यांचें प्रेम, इत्यादि नैसर्गिक गुण पाहिल्यावर बुद्धि थक्क होऊन जाते.

---

१. "The first Christian to be enrolled in the calendar of Hindu Saints." Dr. N. McNicol: Pandita Ramabai. Page 140.

२. बोध आणि रंजन, ना. वा. टिळक.

जगानें पंडिता रमाबाईंना ओळखलें आहे. भारतानें मात्र ओळखलें कीं नाहीं कोण जाणे! त्यांच्या जन्माला आत्तांशीं १०० वर्षें झालीं आहेत. म्हटलेंच आहे कीं 'कालोह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी.'

बर्नार्ड शॉनें सेन्ट जोन नाटकाचा शेवट ज्या शब्दांत केला आहे तेंच शब्द येथें लागू पडतात:—"परमेश्वरा, तूं जग तर सुंदर निर्माण केलेंच आहेस. पण तुझ्याच साधूंचा स्वीकार करण्यास तें केव्हां सिद्ध होणार? किती दीर्घ काळ लागणार कोण जाणे!"[1]

---

१. बर्नार्ड शॉ. सेन्ट जोन "Oh God, Thou madest this beautiful earth. When will it be ready to receive Thy saints? How long, O Lord, how long?"

# १ अनंतशास्त्री

रमाबाईंच्या एक इंग्लिश चरित्रकर्त्या जेन चॅपल म्हणतात.—"एखाद्या मनुष्यप्राण्याच्या मनोरचनेविषयीं आपणांस जर सम्यक् व चोख असें मत बनवायचें असेल तर त्याच्या जन्माआधींच्या कित्येक पिढ्यांचा इतिहास उत्तम रीतीनें अवगत असायला पाहिजे."[१]

रमाबाईंच्या पुष्कळ पिढ्यांचा इतिहास शोधणें अशक्य नाहीं व तो शोधतां रमाबाई व त्यांचे वडील अनंतशास्त्री ह्यांच्या वागणुकींतील पुष्कळशीं कोडीं सोडविणें सुलभ होतें.

त्यांचें मूळ आपल्याला चित्पावन जातीच्या इतिहासांत सांपडतें. ह्या लोकांनीं महाराष्ट्राच्या भूमीवर गेल्या दोनतीन शतकांत जवळजवळ प्रत्येक क्षेत्रांत कांहीं तरी नांव केलेलें आढळतें. ही गोष्ट पाश्चात्यांच्या नजरेंत विशेष भरलेली दिसते.[२] पेशवे चित्पावन होते. मराठेशाहीच्या शेवटल्या काळांत त्यांनीं त्या राजवटीला सांवरून धरलें. मराठेशाही जाऊन आंग्लाई आली तरी त्यांनीं आपलें स्थान त्या सुरुवातीच्या काळांत सुद्धा अढळ राखलें. इंग्रजांना ह्या जातीचा संशय व भय वाटायचें तरी त्यांच्याशींच गोडीगुलाबीनें वागून त्यांनीं आपला सुरुवातीचा राज्यकारभार हाकला. नंतर आंग्लाईशीं निरनिराळ्या मार्गानें टक्कर देण्यास उभ्या ठाकलेल्या महाराष्ट्रीयांत पुढाकार ह्याच लोकांचा होता.

१ Rightly and fairly to judge the character of any human being, one should be well acquainted with his family history for several generations before he was born. This being in most cases impossible, it is better obviously, to judge very mercifully or not at all."
Jane Chapel

२. डॉ. निकल मॅक्निकल : 'पंडिता रमाबाई', पान ३.

टिळक, गोखले, सावरकर किंवा वासुदेव बळवंत फडके ह्या राजकारणांतील साऱ्या प्रसिद्ध व्यक्ति चित्पावनच होत. गो. ग. आगरकर किंवा डॉ. कर्वे वगैरे सामाजिक सुधारणेचे बंडखोर चित्पावन. आपल्या बुद्धिमत्तेनें पाश्चात्यांनाहि दिपवून टाकणारे न्यायमूर्ति रानडे चित्पावन. वाङ्मयक्षेत्रांत चिपळूणकरांपासून केळकरांपर्यंत, खाडीलकरांपासून कोल्हटकरांपर्यंत, हरि नारायण आपट्यांपासून नारायण हरि आपट्यांपर्यंत सारे चित्पावन. सुरुवातीला टिळक, केशवसुत व विनायक अशीं जीं कवींचीं नांवें निदर्शित करण्यांत येत तीं चित्पावनांचींच. वृत्तपत्रव्यवसायाबद्दलहि तेंच म्हणतां येईल. १८३२ सालीं बाळशास्त्री जांभेकरांनीं मराठी वृत्तपत्रांच्या भव्य इमारतीचा पाया घातल्यानंतर त्याच्या प्रचंड भिंती, खांब आणि घुमट बांधण्याचें कार्य ज्या चिपळूणकर, टिळक, आगरकर, परांजपे, खाडिलकर, केळकर आणि अच्युतराव कोल्हटकर अशा सात शिल्पकारांनीं पूर्ण केलें ते सारे चित्पावन होते.

"विधवाशिक्षणाच्या इमारतीचा पाया घालण्याचें अत्यंत श्रेष्ठ कार्य करणाऱ्या पंडिता रमाबाई ह्याहि" चित्पावनच होत्या.

आपल्या चित्पावन ह्या पुस्तकांत श्री. ना. गो. चापेकर म्हणतात.

"चित्पावन ही एक कुतूहलास्पद जात आहे ह्यांत शंका नाहीं. अनेक शतकें कोंकणांत ताकभात खाऊन कालक्रमणा करणारे हे चित्पावन पेशवाईंत धूमकेतूप्रमाणें एकदम उदयास कसे आले हें कोडें आनुवंशिक शास्त्रज्ञांस उलगडतां न येण्यासारखें आहे." त्यांच्या उत्पत्तीसंबंधीं अनेक तर्क व अनेक दंतकथा आहेत. पारशी लोक संजानला लागले, बेने इस्राएल अलिबागेस उतरले; तसेच हे चित्पावन परदेशाहून गुहागरला येऊन पोंचले असावे असा एक तर्क आहे. इराण किंवा बर्बर देशांतून तेथील क्रांत्युद्भव छळापासून स्वसंरक्षणार्थ पळ काढून त्यांनीं भारताचा आश्रय घेतला असावा. संकटांत सांपडलेल्या परदेशीयांचें आपल्या अंतःकरणाच्या औदार्यामुळें व देशाच्या विस्तारामुळें भारत नेहमींच स्वागत करीत असतो हें अगदीं चालू इतिहासावरूनसुद्धां दिसून येईल. निवाऱ्यापुरती जागा मिळतांच ह्या पाहुण्यांनीं तेथील जमिनीची मशागत करून ती लागवडीस आणली. पण ह्या खटपटींत त्यांचीं वर्षानुवर्षें निघून गेलीं. सर्वांना पुरेल इतकी जागा व भरपूर काम लाभल्यानें तेथून बाहेर पडण्याची त्यांना आवश्यकता वाटली नाहीं. परंतु असें किती

दिवस चालणार? लोकसंख्या वाढते त्या प्रमाणांत पायांखालची जमीन पसरूं लागत नाहीं; अशा वेळीं पुनः कांहीं जणांना दुसरीकडे निवारा शोधणें भाग पडतें व अशा रीतीनें कित्येकांची पुनः पांगापांग होते.

कोंकणस्थ म्हणजे चित्पावन अशी एक चुकीची समजूत असते. चित्पावन कोंकणस्थ आहेत परंतु कोंकणस्थांत आणखी किती तरी जातींचा समावेश होतो. पेशव्यांना चित्पावन हा शब्द आवडत नसे म्हणून त्यांनीं चित्पावन म्हणजेच कोंकणस्थ असा पर्याय बनविला, असें म्हणतात. पेशव्यांना तो शब्द न आवडण्याचें कारण चितेपासून पावन करून घेतलेला असा त्याचा अर्थ लावण्यांत येतो म्हणून. तो शब्द कित्येकांच्या मतें चित्तपावन तर कित्येकांच्या मतें चित्यपावन असा असावा. क्षिति + पावन = चिति + पावन = पृथ्वीला पवित्र करणारे [शब्दकोश]. आपआपल्या मताप्रमाणें त्याचीं सबळ अशीं कारणेंहि ते देतात. चित्पावनांच्या उत्पत्तीसंबंधीं अनेक आख्यायिका आहेत. ह्यांपैकीं फार प्रचारांतील कथा अशा आहेत.

परशुरामानें पृथ्वी निःक्षत्रिय केली, ह्या संहाराबद्दल यज्ञाचें प्रायश्चित्त घ्यावें असें त्यानें ठरविलें. पण त्या कामासाठीं ब्राह्मण मिळेनात. तो सह्याद्रीच्या टेकडीवर बसून विचार करीत असतां जहाज फुटल्यामुळें कांहीं प्रेतें समुद्रांतून वाहात येतांना त्याला दिसलीं. त्यानें खालीं येऊन तीं प्रेतें जिवंत करून त्यांना ब्राह्मणधर्म शिकविला. तीं १४ होतीं. त्यानें नंतर समुद्र हटवून त्यांना वसतीसाठीं जागा तयार करून दिली. ती जागा म्हणजे रत्नागिरी जिल्ह्यांतील वशिष्ठी नदीकांठचा चाळीस मैलांचा किनारा होय.

दुसरी आख्यायिका अशी कीं, समुद्रकांठीं परशुराम स्नानास गेला असतां तेथें चितास्थानीं अचानक कांहीं पुरुष त्याच्या दृष्टीस पडले. तेहि १४ च होते! आपण कोळी असून मासे मारण्याच्या कामीं आपण कुशल असल्याचें त्यांनीं परशुरामाला सांगितलें. त्यांची वस्ती समुद्रकांठीं होती. परशुरामानें त्यांच्याच जाळ्यांचीं जानवीं बनवून त्यांना पवित्र केलें व त्यांना ब्राह्मणधर्म शिकविला. परशुरामाला हे लोक चितास्थानीं सांपडले, व त्यानें त्यांना पावन केलें म्हणून ते चित्पावन.

गुंजीकर म्हणतात, "चित्पावन ब्राह्मण पूर्वीपासून ज्या प्रदेशांत राहात आले आहेत, त्या प्रदेशाला बर्बर कोंकण हें नांव आहे. बर्बर कोंकणाच्या

थेट पश्चिमेला समुद्रापलीकडे आफ्रिका खंडांतील इजिप्त देश आहे. तेथें किनाऱ्यापासून पश्चिमेस ५० कोसांवर "बर्बर" ह्या नांवाचें प्राचीन नगर आहे. त्या प्रदेशाला बर्बरी देश अशी सामान्य संज्ञा आहे. बर्बर देशांतील लोक हिंदुस्थानांतील लोकांपेक्षां गोरे, उंच बांध्याचे, सरळ नाकाचे आणि घाऱ्या डोळ्याचे असतात. रावसाहेब मंडलिकांच्या तर्काप्रमाणें चित्पावन हा "जिप्तवान" म्हणजे इजिप्तवाला ह्याचा अपभ्रंश आणि बर्बर कोंकण म्हणजे कोंकणांतील ज्या प्रदेशांत बर्बर लोक येऊन राहिले तो प्रदेश. परंतु दंतकथा व आख्यायिका कांहींहि असल्या तरी कांहीं गोष्टी स्पष्ट आहेत.

परशुराम नांवाचा कोणी महापराक्रमी पुरुष तीनचार हजार वर्षांपूर्वी होऊन गेला. त्यानें सह्याद्रीच्या पश्चिमेस वसाहत करण्याचें अवघड काम तडीस नेलें. त्या कामीं त्याला सुखासमाधानानें कालक्रमणा करीत असलेल्या लोकांपैकीं कोणी साह्य करण्यास मिळेनात, तेव्हां त्यानें तेथल्याच मूळ वन्य जातींतील कांहीं लोक घेऊन त्यांना शिक्षण दिलें किंवा परदेशांतून आलेल्या धाडशी लोकांना ब्राह्मण्याची दीक्षा देऊन वसाहत केली. ते लोक अग्निपूजक म्हणजे 'अग्निहोत्री' असल्यानें त्यांना आपल्या धार्मिक कृत्यांसाठीं पत्न्यांची जरूरी होती व परशुरामानें जोगाईच्या आंब्याच्या १४ उपवर मुली आणून त्यांचीं लग्नें त्या १४ निर्वासितांशीं लावून दिलीं व अशा रीतीनें चित्पावनांची मूळ कथा असावी असें संभवतें.

परशुरामासंबंधानें अशा आख्यायिका उत्तरेस भडोचपासून दक्षिणेस थेट केरळपर्यंत आहेत.

चित्पावनांनीं सह्य पर्वतास लागून असलेलें समुद्राचें पाणी भर टाकून मागें हटविलें व सुमारें ४० मैल रुंदीची जमिनीची पट्टी तयार केली. काटक-पणा, बुद्धिमत्ता व दूरदर्शित्व हे जे गुण ह्या लोकांत दिसून येतात ते ४० मैलांच्या टापूचें वसतिस्थान बनवितांना त्यांनीं पैदा केलेले आहेत. डॉ. मॅक्निकल म्हणतात: 'The distinction of the Chitpawan Brahman is to be found in the fact that he cannot only dream but can realize his dreams'[१]. म्हणजे चित्पावनांचा विशेष

१. Pandita Ramabai. 3

ह्या कीं ते केवळ स्वप्नें पाहात नाहींत तर तीं साध्य करून घेतात. ह्याचा प्रत्यय वर उल्लेखिलेल्या स्त्री-पुरुषांच्या चरित्रांवरून पटण्यासारखा आहे.

चित्पावनांचीं एकंदर सरासरीं ३०० उपनांवें आहेत. त्यांत डोंगरे हें एक आहे. १४० चित्पावनांत एक डोंगरे नांवाची व्यक्ति सांपडते. कित्येक वर्षांपूर्वीं सुमारें ४८ चित्पावनी घराण्यांतील लोकांनीं कोंकण सोडून दक्षिण कन्नडमध्यें जाऊन तेथें वसाहत केली. उत्तरेला सागर प्रान्तांत किंवा दक्षिणेंत तंजावरमध्यें जशी महाराष्ट्रीयांची वस्ती आढळते तशीच ही म्हैसूरमधील महाराष्ट्रीयांची वसाहत आहे. ह्यांच्यांत साठे, वेलणकर, भावे, चितळे अशीं नांवें आढळतात[१]. "ही मंडळी दक्षिण कानडा जिल्ह्यांत केव्हां गेली हें निश्चित सांगतां येत नाहीं. तथापि पोर्तुगीज लोकांकडून होणाऱ्या धर्मच्छळामुळें कांहीं चित्पावन घराणीं तिकडे गेलीं व त्यांच्याबरोबर ही 'डोंगरे' मंडळीहि तिकडे गेली असावी. दक्षिण कानडा जिल्ह्यांतील काकीळ, उप्पिनंगडी आणि फत्तूर या तालुक्यांत त्यांची वस्ती आहे. तेथें त्यांचा मुख्य व्यवसाय सुपारी पिकविण्याचा असून भातशेती थोड्या प्रमाणांत आहे."[२]

आपल्या चरित्रनायिकेच्या वडिलांचें संपूर्ण नांव अनंतपद्मनाभ परमेश्वर डोंगरे असें होतें. अनंतशास्त्री हे घरचे चांगले संपन्न असून दक्षिण कानडांतील मंगळूर जिल्ह्यांत त्यांचें गांव आहे. हें गांव पश्चिम घाटाच्या पायथ्याशीं असून त्या गांवाचें नांव माळहेरंजी असें आहे. तेथें अनंतशास्त्र्यांचें बालपण गेलें. त्यांचे आजोबा कृष्णशास्त्री हेहि पढिक विद्वान् होते. आपल्या आजोबांपाशीं एकीकडे वेदाध्ययन करावें व एकीकडे नारळी पोफळी इत्यादि शिंपाव्या असा त्यांचा क्रम असे. पुढें आजोबा वारले व बाराव्या वर्षी अनंताचें लग्न झालें. लग्न झाल्यानंतर नवरदेव कोणाला न कळवितां घरांतून पळून गेले ते शृंगेरी शंकराचार्यांच्या संस्थानांत प्रगट झाले. तेथें त्यांनीं गुरूजवळ अध्ययन केलें. त्यांचे तेव्हांचे एक सहाध्यायी पुढें शंकराचार्यांच्या गादीवर बसले. शृंगेरीस सहा वर्षें अध्ययन केल्यावर वयाच्या अठराव्या

---

१. डोंगरे कुलवृत्तान्त, पान २२०

२. डोंगरे कुलवृत्तान्त, पान १९३

वर्षीं त्यांनीं पुण्याचा रस्ता धरला. श्रीमंत दुसरे बाजीराव पेशवे ह्यांचे गुरु वे. शा. सं. रामचंद्रशास्त्री साठे ह्यांचा येथें त्यांना आश्रय मिळून त्यांनीं त्यांच्या पदरीं शागिर्दी पत्करिली. चार वर्षे रामचंद्रशास्त्र्यांकडे त्यांनीं अध्ययन केलें. पुण्यास असतां त्यांना कधीं कधीं पेशवेवाड्यांत जाण्याची संधि मिळे. बाजीराव साहेबांची एक पत्नी वाराणशीबाई ह्यांना पेशव्यांच्या सांगण्यावरून रामचंद्रशास्त्री संस्कृत रघुवंश शिकवीत असत. त्या प्रसंगीं कधीं कधीं अनंत त्यांच्या बरोबर असायचा. बाईसाहेबांची वाणी मधुर, संस्कृत उच्चार स्पष्ट व शुद्ध, संस्कृत भाषाच आधीं गोड आणि ती कवि कालिदासकृति, ह्यांमुळें मणिकांचन योगाप्रमाणें त्यांच्या म्हणण्याला फारच बहार येई. बाईसाहेब श्लोक म्हणत त्या वेळीं अनंतशास्त्री ते ऐकून संतुष्ट होत. त्याच वेळीं अनंतशास्त्र्यांनीं प्रतिज्ञा केली कीं आपणहि आपल्या गांवीं परत जाऊन आपल्या घरच्या बायकांना संस्कृत शिकविणार.

वाराणशीबाईंना संस्कृत शिकविलें म्हणून दुसरे बाजीराव पेशवे हे स्त्रीशिक्षणाचे आद्य प्रवर्तक होते व त्यांना पंडिता रमाबाई किंवा अण्णासाहेब कर्वे ह्यांच्या इतकाच त्या बाबतींत मान मिळायला हवा असा एक मुद्दा गेल्या वर्षीं बाईंची शतसांवत्सरी झाली त्या व्याख्यानबाजींत व त्या लेखनभरांत निघाला होता. परंतु स्त्रियांना साधारणतः लिहिणें वाचणें शिकविण्याच्या विरुद्ध बहुजनसमाज असला तरी राजेरजवाड्यांच्या घरांत त्या शिक्षण पावत असत. पेशव्यांच्या घरांत तर सरसहा स्त्रियांना लेखन वाचन येत होतें असें दिसतें. १७४५ सालीं नानासाहेब पेशव्यांच्या आजीनें नानासाहेबांस लिहिलेलें एक खरमरीत पत्र सांपडलें आहे असें श्री य. न. केळकर आपल्या एका लेखांत म्हणतात (ऐतिहासिक काळच्या स्त्रियांचीं खाजगी मनोरंजक पत्रें. 'श्री' जाने. १९६०) ह्याच लेखांत राघोबादादांच्या पहिल्या बायकोच्या म्हणजे जानकीबाईंच्या व तिच्या जावेच्या म्हणजे गोपिकाबाईंच्या पत्रव्यवहाराची गोष्ट दिली आहे. इतकेंच काय पण नाना फडणविसांच्या आजोळच्या एका वृद्ध आजीबाईनें नानांना लिहिलेलें एक पत्र सुद्धा उपलब्ध आहे. खुद्द ह्या दुसऱ्या बाजीरावाच्या वेणूबाई नांवाच्या आणखी एका बायकोनें आपल्या नवऱ्यास लिहिलेल्या एका पत्राचा शेवट कवितावद्ध असलेला आढळतो! ती कविता अशी :

*बहुत दिवस झाले स्वारिला नाथराया,*
*विरहपदरज्वाला मी शकेना वराया.*
*निशिदिनिं मन माझें वेधिलें प्राणमित्रा;*
*सदनिं कधिं सखा तो दृश्य होईल नेत्रां ?*

खुद्द पंडिता रमाबाईंना ह्या बाजीरावासंबंधीं काडी इतकाहि आदर नव्हता. स्त्रीशिक्षणाबाबत बाजीरावास अशी तळमळ लागली होती असें ह्या कांहीं आधुनिक वक्त्यांप्रमाणें रमाबाईना वाटलें असतें तर त्यांनीं बाजीरावास खात्रीनें आपलीं स्तुतिसुमनें वाहिलीं असतीं. त्या उलट ह्या गृहस्थांबद्दल बाई काय उद्गार काढतात तें पहा.

"दुसऱ्या बाजीरावांनीं ६० व्या वर्षांच्या वयांत, अंध झाल्यावर अग्निहोत्र कायम ठेवण्याकरतां, एका ९–१० वर्षांच्या मुलीशीं लग्न केलें होतें. ह्या बाईसाहेब हल्लीं नेपाळांत आहेत. कपाळ आमच्या हिंदुस्थानांतील बायकांचें!! बाजीरावसाहेब आमच्या जातीचे राजे असून, नात्यानें माझे मावसे होते. तरी ते आपले म्हणून त्यांचे दुर्गुण माझे आवडते नाहींत."[१]

१८१८ सालीं इंग्रजांनीं राज्यसूत्रें हातीं घेऊन बाजीराव साहेबांची रवानगी ब्रह्मावर्तीं केली. त्यांच्या पाठोपाठ रामशास्त्रीहि ब्रह्मावर्तीं गेले. पण जाण्याआधीं त्यांनीं आपल्या प्रिय शिष्यास 'शास्त्री' हें बिरुद देऊन मोठ्या दुःखानें त्यास घरीं जाण्यास परवानगी दिली.

घरीं माळहेरंजीला येऊन पाहातात तों 'परमेश्वरांनीं' म्हणजे त्यांच्या वडिलांनीं आळसांत लोळण्याचा विक्रम करून खंडीभर कर्ज करून ठेवलें होतें. वडिलांचें कर्ज निवारण करण्यासाठीं अनंतशास्त्री पुनः घराबाहेर पडले. आतां ते म्हैसूर राजधानींत गेले. ह्या वेळीं तेथें कृष्णराज वडेर हे महाराज राज्य करीत होते. दातृत्वासंबंधीं महाराजांची फार ख्याति होती. त्यांच्या पदरीं मुख्य सभापंडित म्हणून रामशेषशास्त्री द्राविड हे होते. रामशेषशास्त्री पुण्याच्या रामचंद्रशास्त्र्यांचे सहाध्यायी होते. आपल्या सहाध्यायाच्या-शिष्यावर त्यांचेंहि मोठें प्रेम जडलें. त्यांनीं अनंतशास्त्र्यांची व महाराजांची गांठ घालून दिली. महाराज अनंतशास्त्र्यांच्या विद्वत्तेवर खूष झाले व त्यांनीं त्यांना

१ पंडिता रमाबाई ह्यांचा इंग्लंडचा प्रवास, पान १४ तळटीप.

जागच्या जागीं पंचवीस हजार रुपयांची बिदागी दिली. महाराजांची ही देणगी त्यांच्या लौकिकाला साजेशीच होती. ह्यानंतर जाऊन येऊन दहा वर्षें अनंतशास्त्री महाराजांकडे होते व त्या अवधींत महाराजांनीं त्यांना आणखीहि पुष्कळ द्रव्यदान केलें व चवरी वगैरे मानचिन्हेंहि दिलीं.

वडिलांनीं करून ठेवलेलें सर्व कर्ज फेडून अनंतशास्त्र्यांनीं आपल्या मुलाचें व मुलीचें लग्न उरकून त्यांच्याहि ऋणांतून ते मुक्त झाले. नंतर वडील मातुःश्रींना घेऊन ते काशीयात्रेस निघाले. कुटुंबांतील सर्व मंडळी बरोबर होतीच; शिवाय इतर लोकहि होते.

मुंबईच्या गव्हर्नरानें आपल्या सहीचा एक 'दस्तक' म्हणजे रहदारीचा परवानाहि दिला होता. एक पालखी, दोन गाड्या, बारा भोई इत्यादि लवाजम्यासह साठ माणसांची ही यात्रा निघाली. गव्हर्नराच्या 'रहदारी परवान्यांत' अनंतशास्त्र्यांची माहिती देऊन, वाटेनें शास्त्रीबोवांची चांगली बरदास्त ठेवावी अशी ह्या देशांतील राजे रजवाडे, सरदार, व इतर बडे लोक यांना 'विनंति' केली होती. गव्हर्नर वगैरे बडे अधिकारी त्या वेळीं करीत असलेल्या 'विनंत्यांचा' अर्थ वेगळाच असे. ह्या 'दस्तक' घेऊन आपलें खेडें सोडून अनंतशास्त्री प्रवासाला निघाले. त्यांच्याबरोबर त्यांचा मोठा लवाजमा होता. वाटेंतच त्यांचें कुटुंब संग्रहणीनें वारलें. [ डोंगरे कुलवृत्तांतांत त्या नेपाळांत वारल्या असें म्हटलें आहे ]

सौ. यमुनाबाईंच्या पोटीं शास्त्रीबोवांना पुष्कळ संतती झाली होती. परंतु एक मुलगा रामकृष्णशास्त्री व एक मुलगी रखुमामाई एवढींच काय तीं जगलीं. अनंतशास्त्र्यांचे चिरंजीव रामशास्त्री मोठे पंडित होते. त्यांना म्हैसूर दरबारांतून नेमणूक होती. त्यांनीं पुत्रसंततीसाठीं दोन बायका केल्या परंतु एकीच्याहि पोटीं पुत्र न झाल्यानें त्यांनीं दत्तक घेतला. माळ व हासन येथें आज त्यांचे पांच नातू हयात असून उद्योगधंदा करीत आहेत.

काशी वगैरे त्रिस्थळीं यात्रा करून नंतर अनंतशास्त्र्यांनीं आपल्या वडिलांना खटल्यासह परत माळहेरंजीला पाठवून दिलें व ते स्वतः काशींतच आणखी अध्ययनासाठीं राहिले. तेथें राहून, त्यांनीं षट्शास्त्रनिष्णात प्रसिद्ध पंडित भाऊशास्त्री नियोगी आणि प्रसिद्ध नैय्यायिक गणेशशास्त्री दातार ह्यांच्याजवळ दर्शनशास्त्राचें सतत चार वर्षें अध्ययन केलें.

यापूर्वीं अनंतशास्त्री शैवमतावलंबी असून अद्वैतवादी[1] होते. परंतु न्याय-दर्शनाच्या अध्ययनानें त्यांचें अद्वैताचें वेड अगदीं नाहींसें झालें. ज्या मतांत ईश्वराचा आणि प्राण्यांचा सेव्यसेवक भाव आहे असें हें मत त्यांना पटून पुढें त्यांनीं तेथेंच वैष्णव दीक्षा घेतली.

नंतर ते नेपाळांत गेले. तेथील राजानें त्यांचा फार चांगल्या रीतीनें सन्मान केला. निघतांना राजानें त्यांना एक पालखी, दोन हत्तीचीं पिलें, नाभींत कस्तुरी असलेला भोत भरलेला एक कस्तुरी मृग आणि पुष्कळ द्रव्य देऊन त्यांची रवानगी केली. प्रवासांत तीं हत्तीचीं पिलें मेलीं. परंतु त्यांच्या रेशमी व बनातीच्या झुली आणि कस्तुरी मृगाचें मोत भरलेलें शरीर नेपाळची आठवण म्हणून कित्येक वर्षें संभाळून ठेवल्याचें रमाबाईंना आठवत असे असें त्या लिहितात.[2]

ह्यानंतर अनंतशास्त्र्यांनीं गुजराथेंत पर्यटन करण्याचें ठरविलें व त्यांचा तो प्रवास सुरू झाला. वाटेंत पैठण मुक्कामीं गंगेवर स्नान करीत असतां एका पांथस्थाचें लक्ष त्यांनीं वेधून घेतलें. हे पांथस्थ वाईकर होते. त्यांचें नांव माधवराव अभ्यंकर. त्यांच्याबरोबर त्यांची एक नऊ वर्षांची व एक सात वर्षांची अशा दोन अल्पवयीन कन्या होत्या. शिवाय बरोबर त्यांची पूर्णगर्भा भार्याहि होती. ही सर्व मंडळी काशीयात्रेला निघाली होती. एवढ्यावरच आटोपलें नाहीं. हे गृहस्थ वाईहून साष्टांग नमस्कार घालीत काशीस चालले होते! परंतु ह्या अचाट श्रमांमुळें त्यांचें अंग सुजून त्यांना वाटेंतच पैठणला मुक्काम करावा लागला होता. आतां त्यांना थोडें बरें वाटूं लागलें होतें व पुढें कूच करायला लागायचें, परंतु हें एवढें मोठें लटांबर घेऊन जायचें म्हणजे मोठें कर्म कठीण! कडोसरीला फक्त १४ रुपये उरले होते. पुढें कसें जायचें ह्या विवंचनेंत असतां अचानक अनंतशास्त्र्यांची तेजस्वी मूर्ति स्नानास उतरली असतां त्यांच्या नजरेस पडली. तशी एक तेजस्वी कल्पना त्यांच्या

---

१. जीव व शिव एकच (परमात्मा—) असें मत. "जडसृष्टि आभासात्मक असल्यामुळें खोटी व ब्रह्म हेंच एक सत्य व आत्मतत्त्व आहे; जीव हा परमात्म्यापासून अभिन्न असल्यामुळें तो व शिव एकच होय", हें **शांकर (शंकराचार्यांचें) मत.**—महाराष्ट्र शब्दकोश.

२. सुबोध पत्रिका—१३ ऑगस्ट १८८२.

मनाला चाटून गेली. माधवरावांनीं ह्या आकर्षक पुरुषासंबंधीं त्यांच्या आश्रितांकडे चौकशी केली, व तींत हे गृहस्थ विधुर आहेत असें त्यांना आढळलें. माधवराव अनंतशास्त्र्यांना भेटले. त्यांचें वय ४४ वर्षांचें होतें तरी त्यांचा तेजस्वी चेहरा, बलिष्ठ शरीर, विद्वत्ता, रूप, गंभीर स्वभाव आणि पदरीं असलेली संपत्ति पाहून आपल्या 'उपवर' कन्येस पदरीं घ्यावें अशी माधवरावांनीं त्यांना गळ घातली.

पेशवेपत्नी वाराणशीबाई ह्यांच्या सुसंस्कृतीमुळें अनंतशास्त्र्यांच्या मनांत उत्पन्न झालेली ईर्षा लुप्त झालेली नव्हती. पहिल्या पत्नीनें त्यांना ह्या बाबतींत अगदीं निराश केलें होतें. आतां ह्या लहान मुलीचा स्वीकार करून आपण तिला पंडिता बनवूं असें एक छानदार स्वप्न त्यांनीं एका क्षणांत उघड्या डोळ्यांनीं पाहिलें[१] व अभ्यंकरांच्या मागणीला होकार भरला. दुसऱ्याच दिवशीं मुहूर्त असल्यानें चिमुकली सौभाग्यकांक्षिणी अंबा सौभाग्यवती लक्ष्मीबाई झाली व आपल्या नवपरिणीत वधूसह व तिच्या धाकट्या बहिणीसह अनंतशास्त्री मंगरूळच्या रस्त्याला लागले. इकडे जावईबापूंच्या ह्या उपकारांचें ओझें पाठीवर घेऊन माधवरावांनीं काशीकडे कूच केलें.

अनंतशास्त्र्यांचा गुजराथचा दौरा अशा रीतीनें रहित झाला. ह्या दोन लहान मुलींना घेऊन ते माळहेरंजीला आले. बायकोला आपल्या आईच्या स्वाधीन करून तिला शिक्षण देण्याचा आपला निश्चय त्यांनीं जाहीर केला.

ह्यानंतर माधवराव अभ्यंकरांचें काय झालें त्याबाबत नीटशी संगतवार माहिती मिळत नाहीं. पेशवाईच्या अखेरीस बंडाळ्या, लुटालूट ह्यांत होरपळून निघालेल्या कुटुंबांपैकीं त्यांचें हें एक कुटुंब होतें. सर्वस्व गेल्यावर त्यांनीं पुण्यास येऊन ब्रिटिश सरकारची नोकरी पत्करली. परंतु तेथें वरिष्ठांचें व त्यांचें न पटल्यानें त्यांनीं नोकरीचा राजीनामा दिला. तरी सरकारनें त्यांना शेवटपर्यंत पेन्शन देण्याचा ठराव केला व मरेपर्यंत त्यांनीं ब्रिटिश सरकारचें पेन्शन घेतलें असें दिसतें.

वैतागानें त्यांनीं पुणें सोडलें. वाईस येऊन काय थोडी आवराआवर करायची

---

१. श्री. गोपाळराव जोशी व डॉ. आनंदीबाई जोशी ह्यांच्या आयुष्यांतील प्रसंगाशीं केवढें कमालीचें हें साम्य! 'आनंदीबाई जोशी यांचें चरित्र,' पानें १९ व २१.

ती करून दोन लहान लहान पोरी व गरभारशी बायको घेऊन ते तेथून काशीयात्रेला निघाले. काशीयात्रा पुरी करून ते वाईला स्थायिक झाले असावे-कारण रमाबाई म्हणतात, "मी सहासात वर्षांची असतां कांहीं दिवस माझ्या आजोबांनीं मला आजोळीं नेली होती." म्हणजे मुलीचें लग्न पैठण मुक्कामीं लावून दिल्यानंतर कमींत कमी वीस वर्षांनंतरची ही गोष्ट असली पाहिजे. त्यावरून एवढें मात्र स्पष्ट होतें कीं, माधवराव काशीयात्रेहून सुखरूप वाईला येऊन पोंचले असले पाहिजेत व त्यांनीं आपल्या आयुष्याचीं बरींच वर्षें पाहिलीं असलीं पाहिजेत. सत्तेचें घर व वेळच्या वेळीं मिळणारें पेन्शन ह्यांमुळें त्यानंतर वैतागाच्या आहारीं जाण्याचे प्रसंग त्यांच्यावर फारसे आले नसावेत.

अनंतशास्त्री जुन्या वळणाचे होते तरी त्यांच्या शिक्षणाचा, देशाटनाचा व विशेषतः त्यांच्या स्वतंत्र बुद्धीचा त्यांच्या वर्तनावर विलक्षण परिणाम झाला होता. घरीं येतांच त्यांनीं कुळाचार, भुताखेतांच्या पूजा वगैरे चटसारें बंद करून टाकलें. हरितालिका, चंपाषष्ठी, गणेश चतुर्थी वगैरे व्रतें ते आपल्या घरांत कोणाला करूं देत नसत[१]. अशा प्रकारच्या वर्तनानें अनंतशास्त्री लोकांत अगदींच अप्रिय होऊं लागले. तशांत ते आपल्या नवपरिणीत स्त्रीला संस्कृत शिकवूं लागले! हा त्यांचा उद्योग जेव्हां बाहेर फुटला तेव्हां तर गहजबच उडाला. वडील वारले होते. पण मातोश्री जिवंत होत्या. मुलानें सुनेला संस्कृत पाठ द्यावे हें त्यांनाहि पसंत नव्हतें. लोकांच्या कावकावींत त्यांचीहि चिवचिव शास्त्रीबोवांच्या कानीं कपाळीं चाललेली असे. बायको अगदीं लहान, पण मोठी समजूतदार. त्यामुळें शास्त्रीबोवांना तेवढा मोठा समाधानाचा ठेवा सांपडल्यासारखें वाटे.

शास्त्रीबोवा आपल्या बायकोला देववाणी शिकवितात ही कागाळी मध्वाचार्यांचें मुख्य स्थान उडुपी येथें अनंतशास्त्र्यांच्या धर्मगुरूपर्यंत जाऊन पोंचली. मठाधिकाऱ्यांनीं शास्त्रीबोवांना उडुपीला बोलावून त्यासंबंधीं जाब विचारला, "स्त्रियांस देववाणी (संस्कृत) न शिकविण्याची धर्माज्ञा मोडून तुम्ही

---

१. एक साक्ष, पान २२. त्यांना Orthodox Reformer म्हणत असें रमाबाई सांगतात. (Testimony) ह्यावरून प. वा. प्रा. श्री. म. माटे स्वतःला 'सनातनी सुधारक' म्हणत त्याची आठवण होते.

आपल्या पत्नीला संस्कृत शिकवीत आहां हा तुमचा अपराध तुम्हांला कबूल नाहीं का?" ह्यावर शास्त्रीबोवांनीं आपण आपल्या स्त्रीला संस्कृत शिकवितों, परंतु त्यांत धर्माज्ञेविरुद्ध कांहीं करीत नाहीं व तसें सिद्ध करून देण्यास आपण तयार आहों असें सांगितलें. आपण 'बाबावाक्यं प्रमाणं' मानीत नाहीं, मात्र आपण करतों त्यांत शास्त्राविरुद्ध कांहीं नाहीं. स्त्रीशूद्रांना आपण वेद शिकवीत नाहीं. संस्कृत शिकवितों व त्यांत पाप नाहीं."

अनंतशास्त्र्यांचें हें बाणेदार उत्तर ऐकून मठाधिकाऱ्यांनीं त्यांचें म्हणणें मान्य केलें व आपलें म्हणणें सिद्ध करण्यास त्यांना योग्य मुदत दिली.

कांहीं दिवसांनीं शिरूर सोदे येथें पंडितांची एक मोठी सभा भरविण्यांत आली. तींत कर्नाटकांतील प्रसिद्ध प्रसिद्ध विद्वान् आचार्य, शास्त्री, आणि पुराणिक मिळून सुमारें ४०० मंडळी अनंतशास्त्र्यांशीं वाद करायला उभी राहिली. अनंतशास्त्र्यांनीं श्रुति, स्मृति, संग्रह, पुराणें आणि महाभारत रामायणादि इतिहासांतून स्त्रियांस शास्त्राध्ययन करण्याचा अधिकार असल्याचीं वचनें गोळा करून तीं त्या विद्वद्वृन्दाच्या पुढें टाकलीं. वाद लेखी चालला होता. लेखी प्रश्न येत व शास्त्रीबुवा त्यांना लेखी उत्तरें देत. हा वाद दोन महिने चालला होता. शेवटीं अनंतशास्त्र्यांनीं तयार केलेला तो ग्रंथ प्रमाण म्हणून त्या सभेनें मान्य केला. ग्रंथाला प्रमाणग्रंथ म्हणून मान्यता मिळाली हें दर्शविण्यासाठीं वादांत भाग घेतलेल्या पंडितांपैकीं दोघां प्रमुख पंडितांनीं त्यावर सह्या केल्या; अशा रीतीनें स्त्रियांना संस्कृत शिकविण्यामधील एक मोठी आडकाठी दूर झाली.

तो ग्रंथ हस्तलिखित असून रमाबाई म्हणतात, आपण तो प्रत्यक्ष पाहिलेला आहे. मात्र त्या काळीं मुद्रणकलेची प्रगति झालेली नसल्यानें तो तसाच मागें पडला. १८७२ च्या सुमारास अनंतशास्त्री कर्नाटकांतून पुण्यास गेले असतां त्यांनीं तो आपल्याबरोबर नेला व तिकडेच एका नातेवाईकाकडे ठेवला. पुढें तो छापून काढावा असें रमाबाईंच्या मनांत फार होतें, परंतु ज्या नातेवाईकाकडे तो होता तो कांहीं दाद लागूं देईना. आपण एकट्याच अनंतशास्त्र्यांच्या वारस उरलों आहों तेव्हां तो आपणांस मिळण्यास कांहीं हरकत नसावी असें बाईंचें म्हणणें होतें. पण काय असेल तें असो, बाईंना तो मिळविण्यांत यश आलें नाहीं व ग्रंथ प्रसिद्ध करून पितृऋणांतून अंशतः मुक्त होण्याची त्यांची इच्छा अशा रीतीनें अपुरी राहिली.

ह्या वादानंतर अनंतशास्त्र्यांवर बहिष्कार पडण्याचें टळलें. पण आतां त्यांनाच समाजाचा वीट आला होता. त्यांनीं समाजाला पूर्णपणें ओळखलें. कोणाशीं अन्नव्यवहार वगैरे ठेवण्याचें त्यांनींच आतां बंद केलें. जनसमाजाचें आपल्यावर आधिपत्य असूं नये एवढाच त्यांत त्यांचा हेतु होता. त्यांच्या एखाद्या कृत्यांत जर कोणीं अडथळा केला तर ते त्याला स्पष्ट सांगत, "मी तुमच्याबरोबर कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेवीत नाहीं; तेव्हां तुम्हांला विनाकारण माझ्या कामांत ढवळाढवळ करण्याचें प्रयोजन नाहीं. कर्तव्य आणि अकर्तव्य ह्याचें ज्ञान मला माझ्यापुरतें भरपूर आहे. न्याय्य कृत्यांत मी समाजाला मुळींच भीक घालणार नाहीं. समाजापैकीं कोणाला वाटेल त्यानें माझ्याशीं संबंध ठेवावा, वाटेल त्यानें ठेवूं नये. मी केवळ ईश्वराला भिऊन वागणारा आहें. तुम्हांला भिऊन चालणारा नाहीं."

इकडे लक्ष्मीबाईंचें संस्कृतचें अध्ययन व्यवस्थित चाललें होतें. बाहेरच्या कोणाशीं फारसा संबंध नसला तरी घरांत सासूबाईंची मर्जी संभाळून त्यांना आपला अभ्यास चालू ठेवायचा होता, व तें काम म्हणजे एक तारेवरचा नाच होता. पण त्या माउलीनें आपल्या पतीची मर्जी संभाळली तशी आपल्या सासूचीहि संभाळली. पांच सहा वर्षें अशा रीतीनें निघून गेलीं. लक्ष्मीबाईंना अधिक शिकवावें असें अनंतशास्त्र्यांना आतां वाटूं लागलें पण तें मात्र सगळ्यांच्या मिजासी संभाळून होणें शक्य नव्हतें. घरांत व बाहेरहि खटके उडूं लागले. जात्या अनंतशास्त्री एकांतप्रिय, त्यांत अशी घरांतली व बाहेरची एकसारखी कटकट, त्यामुळें कंटाळून त्यांनीं अरण्यवास पत्करण्याचें ठरविलें. लक्ष्मीबाईंची आपल्या पतीबरोबर कोठेंहि जाण्याची तयारी होती. त्यांचें वय केवळ १५-१६ वर्षांचें होतें. त्या वयांत त्या आपल्या पतीबरोबर रानांत जाण्यास तयार झाल्या ह्यावरून त्यांच्या पतिनिष्ठेची व धैर्याची ओळख पटते.

अनंतशास्त्र्यांनीं जवळच्याच एका रानांत म्हैसूर दरबाराकडून दोन अडीच मैलांचा जमिनीचा एक तुकडा मिळविला. त्यांत यात्रेचें एक ठिकाण असून तेथून तुंगा, भद्रा व नेत्रावती अशा तीन नद्यांचा उगम होतो. तुंगा व भद्रा पूर्ववाहिनी असून, पुढें कांहीं अंतर वेगवेगळ्या प्रवास करून त्या एक होतात व त्यांना तेथून पुढें तुंगभद्रा असें नांव प्राप्त होतें. नेत्रावती जवळच ५० मैल पश्चिम किनाऱ्याकडे वाहत जाऊन समुद्राला मिळते. उगमाच्या ठिकाणाचें

नांव गंगामूळ असें आहे. समुद्रसपाटीपासून हें ठिकाण ४०३७ फूट उंचीवर आहे. सुमारें सहा कोस आसपास बलगी नांवाच्या अत्युच्च वृक्षांची किर्र झाडी आहे. त्या अरण्यांत व्याघ्रादि क्रूर श्वापदें इतस्ततः हिंडत असतात. मधून मधून यात्रेकरू ह्या ठिकाणीं जात. पण कोणी तीन दिवसांपेक्षां अधिक राहत नसत. तसेंच तेथें कोणी एकटादुकटा कधीं जात नसे. असा एक समज होता कीं, तेथील देवांना व ऋषींना कोणी तीन दिवसांपेक्षां तेथें अधिक राहिलेलें खपत नसे. जर कोणी तसला आचरटपणा केलाच तर ते त्याच्यावर क्रुद्ध होत आणि मग जोराचा घंटानाद व शंखनाद सुरू होई आणि बलगीच्या अरण्यांतील सारे हिंस्र आश्रित आपला मोर्चा ह्या पांथस्थाकडे वळवीत. म्हणून ही विषाची परीक्षा पाहण्यास कोणी तेथें तीन दिवसांपेक्षां अधिक थांबण्याचा हिय्याच करीत नसत.

ह्या भयाण परंतु रमणीय एकांतवासांत आपल्या षोडशवर्षा भार्येस घेऊन राहण्याचें अनंतशास्त्र्यांनीं ठरविलें. त्या काळांत स्त्रिया पतीची आज्ञा देववाणी-प्रमाणें मानीत. लक्ष्मीबाईंची आई गर्भार असून पायीं पायीं काशीयात्रा करायला निघाली होती. लक्ष्मीबाई अशीच एक आर्य स्त्री होती. शिवाय तिची अनंतशास्त्र्यांच्या ठायीं पति म्हणून व गुरु म्हणून निस्सीम भक्ति होती. तेव्हां ती पतीबरोबर कोठेंहि जाण्यास तयार होती. माळहेरंजी सोडून हीं पतिपत्नी गंगामूळला एक दिवस दाखल झालीं.

तेथील एक रमणीय स्थळ त्यांनीं शोधून काढलें व तेथें मुक्काम ठोकला. अरण्यांतून वाघोबांना जरा बाहेर फेरफटका मारण्याची त्याच दिवशीं हुक्की येऊन ते डरकाळ्या फोडीत हें जोडपें निजलें होतें तेथें येऊन ठेपले. लक्ष्मीबाईंनीं तावडतोब डोक्यावरून पासोडी ओढून घेतली व डोळे गच्च मिटून त्या मुरकुंडी वळून तेथेंच पडून राहिल्या व अनंतशास्त्री त्या पोरीजवळ पहारा करीत बसले. वाघ विस्तावाच्या वाटेस जात नाहीं हें त्यांना ठाऊक होतें. त्यामुळें त्यांना एवढें भय वाटलें नाहीं. त्यांनीं जवळ पडलेल्या काट्याकुट्या पेटविल्या आणि वाघोबांना भिवविलें. अशा रीतीनें गंगामूळ येथील त्यांच्या नव्या संसाराला सुरुवात झाली. दुसऱ्या दिवशीं सूर्योदयानंतर त्यांच्या जिवांत जीव आला.

त्या दोघांनीं तावडतोब एक झोपडी बांधायला सुरुवात केली. हळू हळू

माळहेरंजीहून कुमक आली. तेथील अरण्याचा बराचसा भाग त्यांनीं साफसूफ करून घेतला व त्यावर घरें बांधायला सुरुवात केली. तुंगा नदीच्या काठीं शास्त्रीबोवांनीं स्वतःसाठीं घर बांधलें. हळू हळू आल्या गेल्या यात्रेकरूंसाठींहि तेथें घरें उभीं राहिलीं. होतां होतां त्या ठिकाणीं एक लहानसा गांवच वसला व शास्त्रीबोवा तेथें होते तोंपर्यंत तोहि होता. शंभर सव्वाशें गुरें, सात आठ कुळांचीं कुटुंबें, घरांतील वीस पंचवीस माणसें, आणि इतर विद्यार्थीगण असा मोठा पसारा तेथें दिसूं लागला. रमाबाई म्हणतात :

"रानांतील वाघ वगैरे श्वापदें दररोज अंगणांतून हिंडत असत. तेथें घराचे आसपास आमच्या मातुःश्रींनीं बाग केला होता. त्यांत तिनें चांफा, गुलाब, आंबे, फणस वगैरे फुलांचीं व फळांचीं झाडें लावलीं होतीं. तीं अजून (म्हणजे १८९०–९१ पर्यंत) आमच्या मातुःश्रींच्या सदाचरण आणि वडिलांच्या धैर्याबद्दल साक्ष देत आहेत." नुकत्याच म्हणजे १९५५–५६ सालीं तेथें मुद्दाम जाऊन आलेल्या कुमारी राजस कृष्ण डोंगरे लिहितात: "आम्ही बहुतेक वाट चढतच होतों. उतरण कमी. गंगामूळ माळहेरंजीपासून ९ मैल आहे. तेथें त्यांचें घर आहे. पण वरचें छप्पर अजिबात नाहींसें झालें आहे. घराच्या भिंतींच्या बाजू आहेत. अनंतशास्त्री ह्यांनीं देऊळ बांधण्यासाठीं मोठमोठे दगडाचे खांब तयार करून ठेवले होते. पण देऊळ बांधलें गेलें नाहीं. त्यांचा दक्षिणी पाटा वरवंटा (मोठा दगड व आंत गोल गोल फिरविण्याचा दगड) अद्याप तेथें पडला आहे. मद्रास किंवा दक्षिण हिंदुस्थानांत लोक ह्या उखळीसारख्या पाव्यांत मसाला घालून तो तयार करतात."

साऱ्या संसाराचा गाडा आतां लक्ष्मीबाई ओढूं लागल्या. त्यांनीं दररोज पहांटे उठून दूध दुभत्याचें पहावें, सारें घरकाम करावें, आल्यागेल्याचें पाहावें, बागबगीच्याची मशागत करावी, आणि इतकें सगळें करून उरलासुरला सगळा वेळ अभ्यासांत खर्च करावा. रात्रंदिवस खपून संस्कृत व्याकरण व न्यायशास्त्र ह्या विषयांत त्या पारंगत झाल्या. पुष्कळ वेळेला अनंतशास्त्री कोठें बाहेरगांवीं गेले असले म्हणजे लक्ष्मीबाई त्यांच्या शिष्यांना पाठ देत.

गंगामूळला आल्यानंतर ह्या दंपतीस पुष्कळ अपत्यें झालीं. त्यापैकीं पहिले दोन मुलगे तान्हेपणींच वारले. त्यानंतर तुंगभद्रा उर्फ कृष्णाबाई जन्मली. तिच्या पाठोपाठ श्रीनिवास ऊर्फ नारायण जन्मला. त्यानंतर आणखी एक

मुलगा झाला तोहि आपल्या बाळपणींच वारला. त्याच्यानंतर वैशाख शुद्ध दशमीला पहांटे म्हणजे २३ एप्रिल, सन १८५८ रोजीं पहांटे त्यांची सर्वांत धाकटी कन्या रमा ही जन्मली. कृष्णाबाईच्या व रमाबाईच्या वयांत जवळजवळ १० वर्षांचें अंतर होतें.

अनंतशास्त्र्यांनीं आपलें दुसरें लग्न व्हायच्या आधीं पहिल्या कुटुंबापासून झालेल्या मुलीचें लग्न करून टाकलें होतें परंतु कृष्णाबाईचें मात्र लग्न ती वीस एकवीस वर्षांची होईपर्यंत करायचें नाहीं असें त्यांनीं ठरविलें होतें. गंगामूळला आल्यानंतर त्यांच्या मागें समाजाचा भुंगा नव्हता, तरी त्यांच्या कानांशीं एकसारखी गुणगुण करणारी व अधूनमधून नांगी मारणारी मधमाशी होती. ती त्यांना स्वस्थ बसूं देईना. तिनें शास्त्रीबोवांच्या मागें एकसारखी भुणभुण लावली कीं, पोरीचें लग्न माझ्या डोळ्यांदेखत करून टाक. वडील वारले होते, त्यामुळें शास्त्रीबोवांना मातोश्रींचें मन दुखविणें फारच कठीण होतें. त्यांनीं एका अटीवर कृष्णाबाईचें लग्न करून देण्याचें कबूल केलें. ती अट म्हणजे जो मुलगा घरजावई होऊन मुलीबरोबर आपल्याजवळ राहून विद्याभ्यास करायला कबूल असेल अशा मुलाला मुलगी देईन. शोधतां शोधतां असा मुलगा मिळाला व शास्त्रीबुवांनीं मुलगी उजवून टाकली. शास्त्रीबुवांनीं स्वतःच्या तत्त्वाविरुद्ध एवढीच एक गोष्ट केली असें नाहीं, तर त्यांनीं श्रीनिवास १८ वर्षांचा असतां त्याचेंहि लग्न मुंबईच्या एका व्यापारी मित्राच्या अत्याग्रहाला बळी पडून व आईला आणखी थोडें समाधान देण्यासाठीं करून टाकलें. खुद्द रमाबाईंना सुद्धा आपल्या वडिलांचें हें कृत्य समर्थनीय वाटत नसे. श्रीनिवासला ती मुलगी अगदीं आवडत[1] नसे व त्या दोघांनीं कधीं संसार केला नाहीं.

घरजावयांचा विद्याभ्यास आतां सुरू झाला. जावईबापूंचें अभ्यासांत लक्ष लागेना. ते जात्या उनाड, आळशी व आइतखाऊ होते, त्यांत वाईट संगतीची भर पडून एक दिवस ते पळून गेले !

१. श्री. द्वा. गो. वैद्य आपल्या 'नवयुग मासिकां'तील लेखमालेंत म्हणतात : 'श्रीनिवासचें लग्न त्याच्या वयाच्या १८ व्या वर्षी त्याला पसंत नसलेल्या मुलीशीं उरकून घेतलें. अनंतशास्त्र्यांच्या हातून ही चूक झाली असें रमाबाईंनीं स्पष्ट म्हटलें आहे, पण त्यांच्या हातून ही चूक कशी झाली ह्याचा मात्र उलगडा रमाबाईंना करतां आला नाहीं.

पहिल्या मुलीचे पतीहि आतां हळू हळू सासऱ्याशीं उद्धटपणें वागूं लागले. गंगामूळला आल्यानंतर माळावरच्या जमीनजुमल्याची देखरेख शास्त्रीबोवांनीं वडील जावयांवर सोंपविली होती. ते हळू हळू वतनवाडीच्या उत्पन्नाचा स्वाहा करूं लागले व कांहीं विचारलें तर उद्धटपणाचीं उत्तरें देऊन गोष्ट उडवून देऊं लागले. कोणाच्या तरी चिथावणीवरून वडील चिरंजीव रामकृष्ण पंडितहि ह्याच सुमाराला अनंतशास्त्रींजवळ वडिलोपार्जित संपत्तीचा वांटा मागूं लागले !

संसारांत होणाऱ्या ह्या फाटाफुटीचें चित्र डोळ्यांपुढें उभ राहतांच शास्त्रीबोवांना मनस्वी दुःख झालें. अतिशय दुःखित अंतःकरणानें अनंतशास्त्र्यांनीं संसाराची वांटणी करून अर्धा वांटा रामकृष्ण पंडितांच्या पदरांत टाकला. ह्यानंतर शास्त्रीबोवांच्या मातोश्री वारल्या.

दहा साडेदहा वर्षें गंगामूळास मोठ्या आनंदानें केलेल्या संसाराची वाताहत झाली. गंगामूळास आतां पहिल्या थाटानें राहाणें अशक्य होतें. उत्पन्नाचा आंकडा खर्चाच्या आकड्याशीं नेहमीं तंडूं लागला. गंगामूळ आतां मोठें यात्रेचें ठिकाण बनलें होतें. कितीतरी यात्रेकरू शास्त्रीबोवांच्या औदार्याचा व लक्ष्मीबाईंच्या दिलदारपणाचा फायदा घेऊन फुकट पाहुणचार झोडीत. कोणाहि पाहुण्याला उपाशीं धाडायचें नाहीं असा शास्त्रीबोवांचा व लक्ष्मीबाईंचा नियम होता; व असे असंख्य अतिथी त्यांच्या घरचा पाहुणचार नेहमीं घेऊन तृप्त होऊन जात. मोठमोठ्या पंक्ती उठत, पण परिणाम भोगावे लागत यजमानाला व यजमानिणीला.

तशांत त्याच सुमाराला त्यांच्यावर आणखी एक मोठी आपत्ति आली. त्या आपत्तीचें वर्णन रमाबाईंच्या शब्दांत वाचलेलें बरें. हें वर्णन स्वतःच्या बहिणीसंबंधीं आहे असें त्या म्हणत नाहींत; पण 'हाय कास्ट हिंदु वूमन' ह्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत प्रस्तावनालेखिका डॉ. बॉडले, 'पुस्तकाचें पान ६३ पंहा व बाईंच्या चरित्रांतील एक प्रसंग तेथें वाचा' म्हणून सांगतात. रमाबाई त्या ठिकाणीं म्हणतात :

"तेरा वर्षें उलटून गेल्यावर हे तरुण गृहस्थ आपली बायको मागायला आले. परंतु तिच्या आईबापांचा तिला त्या माणसाबरोबर पाठवायला जीव

होईना. कारण तो निव्वळ एक भिक्षेकरी होता. प्रामाणिकपणें आपलें व आपल्या पत्नीचें पोट भरील अशी शक्ती त्याला नव्हती कीं बुद्धीहि नव्हती. त्याला तिचें संरक्षणहि करणें शक्य नव्हतें. त्याच्या बायकोलाहि त्याच्याबरोबर जायला नको होतें, कारण तो तिला एखाद्या परक्या माणसा-प्रमाणें होता. अशा परिस्थितींत तिचें त्याजवर प्रेम असणें अगर त्याच्या-विषयीं तिला आदर वाटणेंहि शक्य नव्हतें. पुष्कळशा सनातन्यांना कळेना कीं मुलीनें आपल्या नवऱ्याबरोबर कां जाऊं नये! तो एक कवडीमोलाचा माणूस आहे ही गोष्ट ते विसरत होते. त्या लोकांनीं आपसांत वर्गणी जमवून मुलीविरुद्ध व सासूसासऱ्याविरुद्ध फिर्याद करवून त्यांना कोर्टांत खेचलें. त्या केसची सुनावणी होऊन हिंदु कायद्याप्रमाणें कोर्टानें फिर्यादीच्या बाजूनें निकाल दिला. त्या बिचारीला अशा रीतीनें त्याच्याबरोबर जाणें भाग पडणार होतें. पण कॉलरा येऊन त्यानें बिचारीची सुटका केली!"[१]

ही फिर्याद केव्हां झाली, कोठें झाली व किती दिवस चालली वगैरे खुलासा कोठें सांपडत नाहीं. एवढा भरला संसार उधळून अनंतशास्त्री गंगामूळ सोडून निघाले तेव्हां, कीं त्यानंतर, त्यांच्यामागें कोर्टाचा हा ससेमिरा लागला ह्याचाहि तर्क करतां येत नाहीं. का कोर्टाचा नुसता निकालच आपल्या हातीं घेऊन जांबईबापू कोकलत बसले आणि श्वशूर पोरीला घेऊन कोर्टाच्या "ज्युरि-स्डिक्शन"च्या बाहेर निघून गेले आणि तिकडे रस्त्यानें कॉलरा होऊन मुलीचें कांहीं बरेंवाईट झालें?

अनंतशास्त्र्यांच्या आयुष्यांतील हा भीषण काळ दारांतून डोकावत होता त्याच सुमाराला रमाबाईनीं त्या घरांत प्रवेश केला. गंगामूळ सोडून ही मंडळी निघाली तेव्हां खालीं माळहेरंजीला जातांना रमाला एका पाटींत घालून गड्याच्या डोक्यावर दिलें होतें. अशा रीतीनें वयाच्या सहाव्या महिन्यापासूनच रमाबाईनीं आपल्या आयुष्याच्या लोकविलक्षण प्रवासाला सुरुवात केली.

१. The High-Caste Hindu Woman, पान ६३

# २ रम्य तें बालपण

रमाबाईंचें वय साडेपंधरा वर्षांचें होईपर्यंत त्यांच्या वडिलांची सांपत्तिक स्थिति फार चांगली होती. त्यांना व्यापारांत खूप फायदा होत असे असें रमाबाई म्हणतात.[१] म्हणजे जरी बाईंच्या आयुष्याला तीर्थयात्रेनें सुरुवात झाली तरी त्यांचे वडील अगदींच भुकेकंगाल नव्हते. तीर्थयात्रा करतांना ते पुराणें सांगत, पण भिक्षा कधीं मागत नसत. त्यांची वृत्ति अयाचित[२] होती. त्यांनीं माळहेरंजीच्या मालमत्तेची विल्हेवाट लावल्यावर ते ह्या तीर्थयात्रेला निघाले होते, बरोबर त्यांची स्त्री व तीन मुलें होतीं. पुष्कळशा तीर्थांच्या जागीं त्यांनीं बिऱ्हाड थाटून वर्ष वर्ष मुक्काम ठोकलेले आहेत. अशा रीतीनें त्यांनीं १५ वर्षे तीर्थयात्रा केल्या. अयाचित वृत्ति असूनहि त्यांचा योगक्षेम इतका चांगला कसा चालला होता?

ह्याचें उत्तर हें कीं, मुंबई वगैरे व्यापारी शहरांत त्यांचें चांगलें दळणवळण होतें. व्यापारांत त्यांनीं कांहीं 'शेअर्स' खरेदी केले होते. बाई तर एका ठिकाणीं म्हणतात कीं, आपल्या वडिलांना व्यापारांत एकदां एक लक्ष पंचाहत्तर हजार रुपयांचा फायदा झाला होता.[३] तरी पण माळहेरंजी सोडतांना त्यांच्याजवळ कांहीं माया असल्याचें दिसत नाहीं. वडील जावयानें हातीं सांपडलें तें दाबलें, वडील मुलानें आपला वांटा काढून घेतला, धाकट्या जावयानें बायको मिळविण्यासाठीं सरकारदरबार केला. अशा स्थितींत ते गांवाबाहेर पडले. पण रमाबाई म्हणतात त्याप्रमाणें त्यांची सांपत्तिक स्थिति फार चांगली असली तर तें केवळ

१. सुबोध पत्रिका—८ ऑक्टोबर १८८२.
२. अयाचित वृत्ति म्हणजे याचना न करतां जें मिळेल तेवढ्यावर संतुष्ट राहणारा.
३. श्री. द्वा. गो. वैद्यः नवयुग—एप्रिल-मे १९२२ जोड अंक.

त्यांनीं 'शेअर्स' मध्यें गुंतविलेल्या पैशामुळेंच शक्य होतें. ते कदाचित् ज्याला 'स्लीपिंग पार्टनर' म्हणतात असे कोणाचे तरी 'स्लीपिंग पार्टनर' असावेत.

१८८९ सालीं प्रसिद्ध झालेल्या 'युनायटेड स्टेट्स्ची लोकस्थिति व प्रवास-वृत्त' ह्या पुस्तकांत रमाबाई म्हणतात : '२५ वर्षांपूर्वीं आम्ही सहपरिवार कुमठ्याहून नावेंत बसून मुंबईस जात होतों.'[1] २५ वर्षांपूर्वीं म्हणजे सरासरी १८६४ सालीं ही मंडळी मुंबईस गेली होती. त्याच सुमाराला ह्या परिवाराचा एक फोटो काढलेला आहे. हेलन डायर आपल्या रमाबाईचरित्राच्या पहिल्या आवृत्तींत म्हणतात, हा फोटो daguerreotype आहे.[2] असल्या तऱ्हेच्या फोटोची पद्धत त्याच सुमारास रूढ होती. १८६३ सालीं प्रसिद्ध झालेल्या एका मुंबई वर्णनांत माडगांवकर (पान २५०) लिहितात. 'सूर्यकिरणाच्या योगानें तसबिरी काढण्याचे कारखाने हल्लीं जिकडेतिकडे आहेत. असे चेहरे काढणारे तीस चाळीस सांपडतील.' म्हणजे १८६३–६४ च्या सुमारास शास्त्रीबोवा सर्व कुटुंबासह मुंबईसारख्या अति दूरच्या प्रवासाला केवळ नावेचा प्रवास करून गेले होते. तेव्हां एवढा खटाटोप करण्याचें प्रयोजन काय, असा साहजिक प्रश्न उद्‌भवतो. त्याचें कारण त्या वेळेस मुंबईच्या शेअर बाजाराला असलेली भयंकर तेजी व अनंतशास्त्र्यांनीं शेअर्समध्यें गुंतविलेला पैसा हें असलें पाहिजे. आपण वर पाहिलेंच आहे कीं रमाबाई म्हणतात, आपल्या वडिलांना व्यापारांत एकदां एक लक्ष पंचाहत्तर हजार रुपयांचा फायदा झाला होता; पण नंतर त्यांत एवढी मोठी खोट बसली कीं, नवीन विकत घेतलेल्या वाड्यांची विल्हेवाट लावून कर्ज निवारावें लागलें.

इतका भरमसाट फायदा होतो काय आणि चटकन एवढी खोट बसते कशी, हें कोडें १८६१ ते १८६५ ह्या वर्षांत झालेल्या मुंबईंतील एका विलक्षण घडामोडीचें थोडें निरीक्षण केल्यास लक्षांत येईल.

ह्या घटनेचें वर्णन श्री. अनंत काकबा प्रियोळकर ह्यांच्या रा. ब. दादोबा पांडुरंग ह्या ग्रंथाच्या आधारें खालीं दिलें आहे.[3]

---

१. युनायटेड स्टेट्स्ची लोकस्थिति व प्रवासवृत्त, पान १०७

२. Pandita Ramabai by Helen Dyer, आवृत्ति पहिली, पान ११

३. रावबहादुर दादोबा पांडुरंग, पानें २७५ ते २७९

१८६१ ते १८६५ ह्या वर्षी संयुक्त संस्थानांत (युनायटेड स्टेट्स्) बऱ्याच कटकटी उत्पन्न होऊन शेवटीं आपसांत यादवी युद्ध झालें. ह्या अंतस्थ युद्धामुळें अमेरिकेंतील कापसाची पैदास व निर्यात बंद झाली. म्यांचेस्टर वगैरे भागांत हा कापूस खपायचा व जवळ जवळ सारा औद्योगिक इंग्लंड ह्या कापसावर आपलें पोट भरीत होता. त्या भागांतील गिरण्यांना उपासमारीची वेळ आल्यामुळें त्यांना हिंदुस्थानांतला कापूस घ्यावा लागला. येथें मिळेल तो कापूस मुंबई मार्गानें इंग्लंडला जाऊं लागला. लोकांनीं आपल्या उशांतलासुद्धां मळका सळका कापूस काढून विकला! ह्या युद्धापूर्वीं कापसाचा भाव जो १२० रु. ते जास्तींत जास्त १८०रु. खंडी होता तो आतां १००० रु. झाला! हुबळी, धारवाड, नागपूर, वऱ्हाड, गुजराथ येथून मुंबईस कापसाचे ढीगच्या ढीग येऊन पडूं लागले. मुंबईस लोकांची गर्दी उसळली. घरें पुरेनात. तेव्हां चार-चार पांचपांच मजली इमारती उठूं लागल्या. नव्या नव्या औद्योगिक कंपन्या व बँका निघूं लागल्या. बॅकबे रिक्लेमेशन कंपनीनें तर लोकांना वेडच लावलें. दोन कोटी भांडवल उभें करण्यासाठीं दोन हजार शेअर्स काढण्यांत आले. ह्याच्याहि उगमाशीं कापसाला आलेला हा भरमसाट भाव. एकादी बँक किंवा कंपनी निघायचा उशीर, कीं तिचे शेअर्स चुटकीसरसे खलास होऊन जात. ह्या पंचवार्षिक घालमेलींत दादाभाई नौरोजी, जगन्नाथ शंकरशेटपासून तर डॉ. भाऊ दाजी व रावबहादुर दादोबा पांडुरंगपर्यंत मंडळी सांपडली होती. शेअर्स घ्यायचे, थोडाफार नफा मिळतो आहे असें दिसलें कीं विकून टाकायचे व नवीन शेअर्स खरेदी करायाचे असा एक मोठा धंदाच बनून गेला होता. बँका, रिक्लेमेशन वगैरे सारा धंदा भागीदारांच्या जिवावर! पण पांच वर्षें फुगत फुगत फुगलेला हा बुडबुडा अमेरिकन युद्ध संपतांच एखाद्या टांचणीच्या नुसत्या स्पर्शानें फुटावा तसा फटकन फुटून गेला व हजारों श्रीमंत व श्रीमंतांच्या नादीं लागलेले गरीबगुरीब रसातळाला गेले. बॅकबे रिक्लेमेशनच्या ५०,००० रुपयांच्या शेअरची किंमत १००० रुपयांवर घसरली. ह्यावरून एकंदर परिस्थितीची कल्पना होईल. बँकांच्या चौकशा, त्यांच्यांतल्या अंदाधुंदी, इत्यादि गोष्टी चव्हाट्यावर यायला बँक ऑफ बॉम्बेची चौकशी होईपर्यंत १८६८ साल उजाडलें. अशा ह्या उलाढालींत अनंतशास्त्री सांपडून एकदां त्यांना तिनें पैशांच्या राशीवर नेऊन बसविलें तर पुनः खालीं तोंडघशीं पाडलें.

रमाबाईंच्या बाळपणींच्या आठवणींतील एक ठळक आठवण आहे ती आगगाडीची.[1] आपल्या अमेरिकेच्या प्रवासवृत्तांत त्यांनीं ती दिलेली आहे.

"माझीं मातापितरें सपरिवार कुमठ्याहून नावेंत बसून मुंबईस जात असतां, त्यांस सदाशिवगडांत[2] दोनतीन दिवस थांबून दुसऱ्या नावेची वाट पाहावी लागली. आम्ही जेथें उतरलों होतों तें ठिकाण तेथें नवीनच झालेल्या लोखंडी रस्त्याजवळ असून त्याच्या पलिकडच्या बाजूस आगगाडीचा टप्पा होता.[3] आम्ही तेथें उतरलों त्या दिवशीं दुपारून तिघी इंग्रजी बायका त्या टप्प्यांत एका बांकावर येऊन बसल्या. त्यांचे लहगे इतके फुगीव होते कीं त्यांपैकीं एक बाई उभी राहिली किंवा बसली असल्यास तिच्या लहंग्यानें निदान दीडदोन वार व्यासाच्या वर्तुळाएवढी जागा व्यापून टाकली असती. ह्या प्रकारचा विचित्र पोषाख व तो धारण करणाऱ्या ताम्रमुखी बाया त्यापूर्वीं कधींच माझ्या दृष्टीस पडल्या नव्हत्या. त्यांस पाहून, मला आधींच भय वाटूं लागलें होतें. इतक्यांत एका मनुष्यानें कांहीं पदार्थांनीं भरलेली एक लहानशी टोपली त्या बायांपाशीं आणली; तेव्हां त्यांपैकीं एक बाई पटकन उठून ती टोपली घेऊन आपण बसली होती त्या बांकाखालीं ठेवून पुनः बाकावर बसली! हें पाहून मला जें काय भय वाटलें आणि पोटांत कसें धस्स झालें तें आठवल्यास आतां मला हंसूं येतें, पण तेव्हां माझ्या मनाची खात्री झाली कीं ह्या बायका कोणी तरी कैकाडणी, नाहीं तर राक्षशिणी असाव्यात. लोकांचीं पोरें आणि दुसरे पदार्थ चोरून आपल्या फुगीव लहंग्यांमध्यें लपवून घेऊन ह्या जात असतील, आणि कदाचित् एकादे दिवशीं मी आईच्या किंवा

---

१. युनाइटेड स्टेट्स्ची लोकस्थिति व प्रवासवृत्त, पान १०७

२. सदाशिवगडास आपलें बाळपण घालविलेले आमचे मित्र डॉ. दिवेकर लिहितात : Kumthe is on the coast, a pretty unsafe harbour, about 30 miles from Karwar. In those days there was no steamer, I think people used to go by road (bullock carts) to Karwar, then Sadashivgad and then to Madgaon Railroad where they caught train coming from Marmagoa to Bombay via Fonda.

परंतु रमाबाईंच्या म्हणण्याप्रमाणें त्यांना सदाशिवगडलाच दुसऱ्या नावेची वाट पहात बसावें लागणार होतें. म्हणून कदाचित् ही मंडळी गोव्याच्या रेल्वे लाईनवरील एखाद्या गांवीं आपल्या मित्रमंडळींस भेटायला गेली असावी.

३. रेल्वे रस्त्याला लोखंडी रस्ता व स्टेशनला टप्पा हे बाईंनीं योजिलेले शब्दप्रयोग पहावे.

बाबांच्या डोळ्यांआड झालें तर त्या मला देखील आपल्या लहंग्याच्या आंतील पिशवींत घालून नेतील."

ही आठवण १८६४ सालची, म्हणजे रमा सहा वर्षांची होती त्या वेळची आहे. यात्रा करतांकरतां अनंतशास्त्री मुंबईच्याहि फेऱ्या करीत असें ह्यावरून उघड दिसतें.

ह्याच सुमाराला शास्त्रीबोवांचा मुक्काम बेंगरुळास होता. तेथूनच कुमठा, मुंबई वगैरे हालचाली चालू असत असें दिसतें. बेंगरुळास ते निदान एक वर्ष-भर तरी होते. त्या वेळेस कृष्णाबाई १४ वर्षांची व श्रीनिवास १२ वर्षांचा होता. शास्त्रीबोवा ह्या दोघांचें शिक्षण स्वतः करून घेत. लहान रमा त्यांत बसे व त्यांचा अभ्यास संपला म्हणजे बापाच्या भोवतीं भोवतीं करी. तिच्या शिक्षणाला अजून आरंभ झाला नव्हता. मात्र तिचे नेत्र तीक्ष्ण व कान तिखट असल्यानें ती जें जें पाहायची व जें जें ऐकायची तें तें तिच्या मनांत पक्केपणीं घर करून राहायचें. हळू हळू शास्त्रीबोवांची माहिती गांवांत होऊं लागली, आणि लोक त्यांच्या घरीं येऊं लागले. आपल्या १४ वर्षांच्या मुलीलाहि शास्त्रीबुवा मुलांबरोबर संस्कृत पाठ देत असतात आणि बायको तर म्हणे त्यांनीं मोठी पंडिताच करून ठेवली आहे! हळू हळू हीहि बातमी पसरली कीं उडुपींत ४०० पंडितांना वादांत जिंकून गेलेला शास्त्री तो हाच. आतां मात्र त्यांना स्वस्थ बसवेना. बायकांना धर्मग्रंथ वाचूं दिल्याचें पातक केल्याबद्दल त्यांची कानउघडणी करावयाला व जमल्यास त्यांना वादांत जिंकायला तेथील एक एक स्थानिक शास्त्री त्यांच्याकडे येऊन वाद घालीत बसूं लागला. अशा वेळीं वडील मुलें तेथून उठून जात, पण रमा तेथेंच घोटाळायची. ती शास्त्रीबोवांची फारच लाडकी होती व नेहमीं त्यांना चिकटून चिकटून असायची.

एकीकडे रमा आपल्या खेळण्यांत चूर झालेली दिसे, पण तिचे कान संपूर्णपणें तो वाद टिपून घेण्यांत गुंतलेले असत. वादाचा अर्थबोध तिला होत असे असें नाहीं. पण तिला त्यांत गंमत वाटायची व वाद कोठपर्यंत आला आहे हें तिच्या चटकन ध्यानांत यायचें. वादाचा शेवट केव्हां व कसा होणार ह्याचाहि आराखडा तिनें बांधून ठेवला होता. पाहुणेमंडळी वाद करूं लागली कीं मोठमोठ्यानें आरडाओरडा करूं लागत. व 'इति व्योमसंहितायाम्' हे

शब्द ऐकले कीं रमा समजे, वाद संपला! मग वाद घालीत बसलेला शास्त्री उठून सरळ उंच मान करून, चालायला लागायचा.

*स्त्रीशूद्रब्रह्मबंधूनां तंत्रज्ञानेऽधिकारिता ।*
*एकदेशे परोक्ते तु, न तु ग्रंथपुरस्सरम् ।*

**इति व्योमसंहितायाम्**

स्त्रिया, शूद्र आणि ब्रह्मबंधु, म्हणजे कर्मबाह्य झालेले ब्राह्मण यांस वेदाव्यतिरिक्त धर्मग्रंथांचें ज्ञान करून घेण्याचा अधिकार आहे; परंतु तें ज्ञान केवळ एकदेशिक असून लोकांचा [म्हणजे ग्रंथ वाचण्याचा ज्यांना अधिकार आहे अशा पुरुषांचा] उपदेश ऐकून संपादिलेलें असावें; स्वतः ग्रंथपठण करून स्त्री-शूद्रांस तंत्रज्ञान करून घेण्याचा अधिकार नाहीं, असें व्योमसंहितेंत सांगितलेलें आहे.

पाहुण्या शास्त्रीबोवांचा आरडाओरडा सुरू झाला कीं, शेवटीं तो व्योमसंहितेवर थांबणार अशी छोट्या रमेची नेहमीं अपेक्षा असे. पण एक दिवस मोठाच चमत्कार घडला. एक शास्त्री आले व ते अनंतशास्त्र्यांशीं खूप वेळ बोलत बसले. पण त्यांच्या तोंडून एकदांहि व्योमसंहितेचा उल्लेख झाला नाहीं. रमाच्या इवल्याशा डोक्यानें ठरविलें कीं, हे गृहस्थ कांहीं विद्वान् नसावेत. कारण वाद कडाडला नाहीं कीं त्यांत व्योमसंहितेची बिजली चमकली नाहीं. शेवटीं त्या गृहस्थानें कहरच केला. कारण शास्त्रीबोवांकडून ते जायला उठले ते सरळ माजघरांत लक्ष्मीबाईंकडे गेले. रमाहि त्यांच्या मागोमाग आंत गेली. त्यांनीं लक्ष्मीबाईंना अभिवादन करून मोठ्या आदरानें त्यांची रजा घेतली. रमाला कांहीं ह्याचा अर्थच कळेना. इतर शास्त्री कधीं आपल्या 'बाई'कडे ढुंकून पाहात नसत. नाक वर करून येत तसेच नाक वर करून बाहेर पडत.

दिवसभर अनंतशास्त्र्यांच्या भोंवतीं भोंवतीं करणारी रमा रात्रीं मात्र आईच्या मागें मागें असायची. आईच्या कुशीवांचून तिला झोंप येत नसे. आईला ती 'बाई' म्हणे. बाळपणीं गंगामूळ आश्रमांत तेथील छात्रगण व नोकरवर्ग लक्ष्मीबाईंना 'बाई' म्हणत त्यावरून मुलेंहि बाई म्हणूं लागलीं होतीं. रात्रीं जेवण झाल्यावर नेहमींप्रमाणें 'बाई'नें अंथरूण घातलें व

रमाला निजायला नेलें. रमा 'बाई'च्या कुशींत शिरल्यावर जवळ कोणी नाहीं असें पाहून तिनें हळूच विचारलें,

"बाई, दुपारून आपल्याकडे आला तो माणूस कोण होता ग?"

"त्यांचें नांव वासुदेवाचार्य आहे. ते इकडे भेटायला आले होते."

"बाई ग, त्यांना कांहीं येत नाहीं वाटतं?"

"कां बरं? ते तर फार विद्वान् आहेत!"

"मग त्यांनीं व्योमसंहिता कशी म्हटली नाहीं? त्यांना कांहीं येत असतं तर ते व्योमसंहिता म्हटल्यावांचून कसे राहिले असते?"

"अहा ग वेडे! एवढ्यावरच का तूं त्यांना अडाणी ठरविलंस? अग ते फार विद्वान् आहेत. त्यांना इतकी माहिती आहे कीं व्योमसंहितेची मातब्बरी त्यांना वाटत नाहीं. अन् त्यांना व्योमसंहितेची जरुरीहि नव्हती, कारण तुझे वडील अन् ते अगदीं एक मताचे आहेत."

पण एवढ्यावर रमाचें समाधान झालें नाहीं. वासुदेवाचार्यांनीं येऊन आईला मस्तक लववून अभिवादन केलें तें कसें? वडिलांकडे येणाऱ्या कोणत्याच शास्त्र्यानें आजपर्यंत असला प्रकार केला नव्हता!

"बाई, मला खरंच वाटतं ते मोठे नव्हते. नाहींतर त्यांनीं येऊन तुला नमस्कार केला नसता."

"बाळ, रिकामी घागर असते ना, ती फार खळखळ करते. घागर गच्च भरलेली असली म्हणजे तिचा आवाज मुळींच येत नाहीं. जे खरे खरे विद्वान् असतात ते नम्र असतात. त्यांच्या तोंडून कधीं गर्जना होत नाहींत. जे नम्र असतात, त्यांना स्त्रियांना योग्य तो मान द्यायला संकोच वाटत नाहीं. वासुदेवाचार्यांनीं मला येऊन नमस्कार केला, कारण त्यांच्या अंगीं नम्रता आहे. त्यांना खोटा अभिमान नाहीं. माणसानं कसं नेहमीं नम्र असावं."

रमाला आपल्या आईचें भाषण किती समजलें असेल कोणास ठाऊक; पण वासुदेवाचार्यांना मात्र ती कधीं विसरली नाहीं. त्या वेळेपासूनच विद्वानांच्या योग्यतेसंबंधींचा रमाचा समज बदलत चालला.[१]

---

१. एक साक्ष, पान १५.

बेंगरूळास असतांना अनंतशास्त्री ज्या गृहस्थांच्या घरांत बिऱ्हाडानें राहात त्यांची एक लेक कांहीं दिवसांसाठीं माहेरपणाला आली होती. तिला रमाच्याच वयाची एक मुलगी होती. तिचें नांव तिप्पी. तिप्पीचे आईबाप गर्भश्रीमंत होते. तिप्पी नेहमीं दागिन्यांनीं मढविलेली असायची. एक दिवस गम्मत म्हणून तिप्पीच्या आईनें तिप्पीच्या अंगावरले सर्व दागिने रमाच्या अंगावर चढविले. ते घातल्यावर आपण कोठें तरी हवेंत तरंगत चाललों आहों असें रमाला वाटूं लागलें. ती धावत धावत आपल्या 'बाई'कडे गेली आणि म्हणाली :

"बाई! बाई! बघ ना दागिने कसे छान दिसतात माझ्या अंगावर! एवढे पुरेत मला."

लक्ष्मीबाईंच्या डोळ्यांना टचकन् पाणी आलें. त्यांनीं रमाला पोटाशीं धरलें, तिच्या पाठीवरून हात फिरविला आणि तिला म्हटलें,

"बाई ग, अंगीं गुण असले म्हणजे ते ह्या नकली दागिन्यांपेक्षां किती तरी अधिक शोभा आणतात माणसाला." रमानें मुकाट्यानें जाऊन तिप्पीच्या आईपुढें अंगावरचे दागिने उतरून ठेवले. आपल्या लाडक्या बाईच्या तोंडून निघालेल्या ह्या एकाच वाक्यानें रमाला साधेपणाचें जें शिक्षण मिळालें तें तिला जन्मभर पुरलें. त्यानंतर दागिन्यांचें आकर्षण तिला जन्मांत कधीं वाटलें नाहीं. साऱ्या जन्मांत तिनें एकच दागिना जपून ठेवला होता. तो ती कधीं वापरीत मात्र नसे. तो म्हणजे तिच्या पतीनें लग्नाच्या वेळीं तिला घातलेली अंगठी.

श्रीनिवासची मुंज झाली तेव्हां रमा अगदींच लहान होती. श्रीनिवास-कडून संध्या पाठ करून घेण्यांत येई. पण तो मनांतल्या मनांत संध्या करूं लागला तर विसरून जाई. शिवाय हा खरोखरच तें पाठांतर करतो का नुसतेच ओठ हालवितो हें समजायला मार्ग नव्हता. तेव्हां अनंतशास्त्र्यांनीं त्याला ती मोठ्यानें म्हणायला सांगितली. तो संध्या मोठ्यानें घोकूं लागला कीं रमाचे कान त्याच्याकडे वळत. ऐकून ऐकून तिलाहि संध्या तोंडपाठ झाली. उठतां, बसतां, खेळतांना, फिरतांना व्यवस्थित सूर काढून ती अघमर्षणाचे मंत्र व गायत्री मंत्र म्हणूं लागे. स्त्रियांच्या कानीं हे मंत्र पडणें पातक! रमाच्या आईबापांपुढें हें एक मोठें कोडें येऊन पडलें. त्यांनीं पुष्कळ वेळेला दरडावून

तिचें तोंड बंद करण्याचा प्रयत्न केला पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं श्रीनिवासलाच सांगावें लागलें कीं, 'बाबा रे, आतां तूं संध्या मनांतल्या मनांत म्हण.' श्रीनिवासचें संध्यापठण थांबलें तेव्हां रमाचेंहि थांबलें !

रमा चार वर्षांची झाली तेव्हांपासून लक्ष्मीबाईंनीं तिला शिकवायला प्रारंभ केला. अनंतशास्त्री मोठ्या मुलांच्या शिक्षणांत, वादविवादांत व इतर व्यवसायांत दंग असायचे. रमा एकसारखी त्यांच्याबरोबर असायची; ती त्यांची फार लाडकी होती हें खरें, पण तिच्या शिक्षणाचा सारा बोजा मात्र तिच्या 'बाई'नें आपल्या शिरावर घेतला होता. ती रात्रींची आईच्या ताब्यांत असायची. तेवढ्या अवधींत लक्ष्मीबाई तिचें शिक्षण करून घ्यायच्या. त्यांची भ्रमंती चालली होती तरी त्यामुळें त्या शिक्षणांत कधीं खंड पडला नाहीं. अगदीं पहांटे लक्ष्मीबाईंनीं रमाला हळुवारपणें जागें करावें व तिच्याकडून थोडथोडें पाठांतर करवून घ्यावें. अशा रीतीनें सिद्धांतकौमुदी, अमरकोश, काव्यें, नाटकें, महाभारत वगैरे अनेक ग्रंथ तिच्या तोंडपाठ झाले. त्यांचा अर्थ मात्र सांगण्यांत येत नसे. तें काम पुढें कित्येक वर्षांनीं पार पडलें.

रमा सहा एक वर्षांची असतांना एकदां आपल्या आजोबांबरोबर वाईस आजोळीं गेली होती. तेथें अभ्यंकरांच्या वाड्यांत एक बिऱ्हाड राहत असे. त्यांतली एक तरुण बाई रोज खोलीचें दार बंद करून ध्यान करायची. आपणहि तिच्यासारखें ध्यानस्थ बसावें अशी रमाला तीव्र इच्छा झाली.

"मावशी, तुम्ही दार लावून काय हो करीत असतां ?" रमानें विचारलें.

"बाळ, मी देवाचें ध्यान करीत असतें" मावशीनें उत्तर दिलें.

"मलाहि देवाचें ध्यान करायचें आहे, मला शिकवा ना कसें ध्यान करायचें तें" रमा.

मावशीनें रमाची विनती मान्य केली. दुसऱ्या दिवशीं मावशी रमाला घेऊन खोलींत गेली. खोलीचें दार बंद झालें. मावशी व रमा शेजारीं शेजारीं खालीं बसल्या.

"डोळ्यांवर हात ठेवून डोळे घट्ट मीट."

रमानें दोन्ही पंजे डोळ्यांवर दाबून धरले.

"आतां असें मनांत आण कीं, तुझ्यासमोर पितांबर नेसून देव उभा आहे."

"बरं."

थोडा वेळ गेल्यावर मावशीनें विचारलें,

"काय दिसतंय् तुला?"

"देव दिसतो" रमा म्हणाली. "पहा पहा त्याचा पितांबर दिसतोय्."

शिष्यीण आणि भक्तीण दोघीहि मोठ्या खूष झाल्या!

रमाच्या स्वभावधर्माप्रमाणें त्या देवदर्शनानंतर तिला स्वस्थ बसवेना. तिनें बाहेर आल्यावरहि मधून मधून हाताच्या पंजांनीं डोळे घट्ट दाबून धरण्याचा व देव पाहण्याचा प्रयोग चालूच ठेवला. तिच्या डोळ्यासमोर मोठमोठाले हिरवे पिवळे ठिपके दिसत. त्यालाच ती पितांबर समजली होती. त्या अंधाऱ्या खोलींत आपल्याला देवबिव कांहीं दिसले नव्हते, केवळ हे मोठमोठे ठिपकेच दिसले होते व त्यांनाच आपण पितांबर समजलों असें तिच्या ध्यानांत आलें. तिला त्याची खूप मजा वाटली व डोळे घट्ट आवळून ते ठिपके पाहण्याचा एक नवीनच खेळ ती आतां खेळूं लागली.

रमाला शिकायला फार हवें असे, पण त्यासाठीं करावे लागणारे परिश्रम टाळण्याचा उपाय ती शोधीत होती. श्रम न करतां पाठ लक्षांत ठेवण्याची युक्ति ती शोधूं लागली. ती आधीं देवाला नवस करायची पण देव कांहीं ह्या बाबतींत वळला नाहीं. नवसाला पावायचें देवानें साफ नाकारलें. आतां ती मंत्रतंत्रांच्या मागें लागली. कांगुणीच्या बिया हयग्रीवाच्या मंत्रानें मंत्रून खाव्या म्हणजे मेहनतीवांचून विद्या येते असें कोणीं तिला सांगितलें. त्यावर ती कांगुणीची एक एक बी मंत्रून खाऊं लागली. पण त्याचा म्हणावा तसा उपयोग होत नाहीं असें पाहून तिनें एक दिवस वाटीभर कांगुण्यांचें तेल काढलें आणि तें मंत्रून गट्ट करून टाकलें व विनासायास येणाऱ्या विद्येची ती वाट पाहात बसली. मात्र विद्येच्या ऐवजीं ओकाऱ्या मात्र आल्या आणि त्याहि भरपूर आल्या!

रमानें देवाला विद्येच्या बाबतींतच तेवढें एकटें संकट घातलें असें नाहीं. एकदां तिनें देवाला खूपच भंडावून सोडलें होतें. ती नेहमीं ऐके कीं, बायकांचा जन्मच व्यर्थ. तसेंच घरांत नेहमीं बोलत कीं, रमा मुलगा झाली असती तर छान झालें असतें. कशाला मुलगी झाली कोणास ठाऊक? मुलगा व्हायला हवी होती.

मग दाखवला असता तिनें आपला पराक्रम. तिलाहि वाटूं लागलें, आपण मुलगा झालें पाहिजे. तिनें देवाला नवस करण्यास सुरुवात केली. शेंकडों नवस केले, पण देवानें येथेंहि तिची पुरी निराशा केली.

बेंगरूळचा मुक्काम हालवून शास्त्रीबोवा दक्षिणेंत तिरुपति किंवा वेंकटाचल नांवाचें क्षेत्र आहे तेथें आले. तेथें वेंकटेश नांवाच्या देवाचें फार मोठें मंदिर आहे. लक्षावधि यात्रेकरूंची तेथें झुंबड उडते. रमा अजून लहानच होती. दुसऱ्यांचें कांहीं पाहिलें कीं तसें करायचें हा तिचा छंद होता. अनंतशास्त्री घरांत विष्णुमूर्तीची व शाळीग्रामाची पूजा करीत. वेंकोबाच्या गिरीवर वेंकोबाच्या रक्तचंदनाच्या बाहुल्या मिळत. लक्ष्मीबाईनीं रमाला तसली एक बाहुली घेऊन दिली होती. अनंतशास्त्री विष्णुमूर्तीचे जे जे सोपस्कार करीत ते ते सगळे रमा त्या बाहुलीचे सोपस्कार करूं लागली. बाहुलीच्या डोक्यावर पाणी ओतावें, तिला गंध लावावें, त्या गंधावर फुलें चिकटवावीं, तिला नैवेद्य दाखवावा, तिच्या भोंवतीं प्रदक्षिणा घालाव्या. रमाची ही पूजाअर्चा घरांत कुतूहलाचा एक मोठा विषय होऊन बसली. पुढें पुढें अगदीं आठ वर्षांची होईपर्यंत घरांतील मोठीं माणसें जीं जीं नैमित्तिक व्रतें, उपवास वगैरे करीत तीं तीं सर्व रमा मोठ्या भक्तिभावानें करायची.

तेव्हांपासून रमा एकादशी व्रत, चातुर्मास्य व्रत, कृष्णजन्माष्टमी व्रत, इत्यादि व्रतोपवास करायला लागली. अनंतशास्त्र्यांच्या घरीं सर्व एकादशा अगदीं कडकडीत निर्जळी करण्याचा प्रघात होता. गोकुळाष्टमीला तर पाण्याचा घोटहि न घेतां उपास पार पडायचा. रमा लहान असल्यानें निर्जळी करण्याची तिच्यावर कोणी सक्ती करीत नसे. पण दहा वर्षांची होईपर्यंत तिनेंहि इतरांप्रमाणें निर्जळी करण्याचा उपक्रम सुरू केला. याशिवाय नित्यनैमित्तिक व्रतें ती करीतच असे.

ह्याच सुमाराला रमाला पहिली वर्तमानपत्री प्रसिद्धी मिळाली.

१८६६ पर्यंत, म्हणजे ८ वर्षांची होईपर्यंत रमाचें संस्कृत पाठांतर खूप झालेलें होतें. त्याबद्दल त्या वेळच्या पायोनियर नांवाच्या इंग्रजी पत्रांत खालील अर्थाची बातमी प्रसिद्ध झाली होती :

"अयोध्येंत दक्षिणेंतून एक मोठा पंडित आला आहे. त्याच्याबरोबर त्याची पत्नी, अठरा वर्षांची व आठ वर्षांची अशा दोन कन्या व सोळा वर्षांचा

मुलगा आहेत. त्या सर्वांना कित्येक ग्रंथसुद्धा तोंडपाठ येतात. एका सभेंत त्या पंडितानें हजारों श्लोक पाठ म्हटले. धाकट्या मुलीनें सुद्धा आपल्या बापाप्रमाणेंच श्लोक स्पष्ट व सुंदर रीतीनें म्हटले."

अनंतशास्त्र्यांनीं मुलांकडून माध्वमताचे सिद्धांत तोंडपाठ करून घेतले होते. शास्त्रीबोवांचीं मतें कडकडीत जुन्या चालीचीं होतीं, तरी स्त्रियांनीं स्वतः पुराणें वाचावीं, पुराणमंत्रांनीं शाळिग्रामाची पूजा करावी व ओंकाराच्या ठिकाणीं श्री हें पद लावून नारायण-कृष्ण-वासुदेव ह्या मंत्राचा जप करावा असें त्यांचें मत होतें, व त्यांच्या म्हणण्याप्रमाणें सर्व करीत. रमाहि करी. भागवत, भगवद्गीता, महाभारत वगैरे पुराणग्रंथ वाचायला ते आपल्या घरच्या स्त्रियांना सांगत, व त्या त्याप्रमाणें वाचीतहि. अनंतशास्त्र्यांच्या घरीं आषाढी व कार्तिकी अशा दोन एकादशांना सुदर्शन होम होत असे. अशा वेळीं गुरुमठीं जाऊन तप्तमुद्रा घ्यायची इतर वैष्णवांची रीत होती. वयाच्या आठ वर्षांपासून एेंशीं वर्षांपर्यंत माणूस आपल्या कृत्यास जबाबदार धरला जातो, तेव्हां मुलांना मुंजीच्या वेळीं व मुलींना लग्नाच्या वेळीं विष्णुदीक्षा देण्यांत येई.

अनंतशास्त्री वैष्णव होते खरे. परंतु गुरुमठीं जाऊन संन्याशाच्या हातूनच हा तप्तमुद्रासमारंभ व्हायला हवा असा शास्त्राधार त्यांना कधीं आढळला नाहीं. लग्नमुंजीचा व विष्णुदीक्षेचा कांहींएक संबंध नाहीं असें ते म्हणत.

---

१. ओंकाराचा स्त्रियांना अधिकार नसल्यानें अनंतशास्त्रींनीं ओंकाराच्या ठिकाणीं 'श्री' ह्या पदाची योजना करण्याची युक्ति काढली असावी.

२. तप्तमुद्रा घ्यायची व ती दर वर्षीं! म्हणजे कानशिलांचें धिरडें होऊन जाण्याचा प्रसंग! ह्यावर आमचे मित्र प्रा. म. दा. साठे म्हणतात, "माध्व संप्रदायांत तप्तमुद्रेची प्रथा आहे. जे कट्टर वैष्णव आहेत त्यांना लहानपणींच ही तप्तमुद्रा दोन्ही कान-शिलांवर देतात. हा धार्मिक विधि समजला जातो. त्याच्यावर मग गंधाची मुद्रा रोज देतात. तप्तमुद्रा दर वर्षीं देतात हें खरें नाहीं; श्रीमंत मनुष्यानें अधिक दक्षिणा दिली तर त्याला चटका बसू नये अशा बेतानें तप्तमुद्रा दिली जाते असें म्हणतात. एकदां धार्मिक विधि म्हटल्यानंतर व त्यांत श्रद्धा असली तर तप्तमुद्रेचें कांहीं वाटत नाहीं. तो एक देहदंड समजला जातो. मुसलमानांत लहान मुलांचा सुंताविधि नाहीं का होत! लांब मुदतीचीं उपोषणें हा त्यांतलाच प्रकार आहे.

रमा आठ वर्षांची झाली तेव्हां तिला गुरुमठींत न जातां घरींच वडिलांच्या हातून तप्तमुद्रांकित विष्णुदीक्षा प्राप्त झाली. रमा आतां आठ वर्षांची झाली होती–मोठी झाली होती. तप्तमुद्रा घेतल्यावर तिला कोण लहान म्हणणार? आतां तिला बरेंच कळूं लागलें होतें. बेराग म्हणजे भांग. तेव्हां भांग आणि तंबाखूची आवड असणारा तो बैरागी असा तिनें बैरागी शब्दाचा त्या वयांत अर्थ लावला होता.

रमाचें बहुतेक शिक्षण तिच्या मातेच्या पायांपाशीं झालें. 'मी अगदीं लहान होतें तेव्हांपासून आईनें मला नेमानें शिकवायला आरंभ केला आणि मी चौदा वर्षांची होईपर्यंत रात्रंदिवस मेहनत घेऊन मला शिकविलें.'[१] लक्ष्मीबाईनीं रमाला इतकें उत्तम शिक्षण दिलें व विद्याभ्यासंगाची अशी गोडी लावून दिली कीं पुढें तिला आपला अभ्यास वाढवितांना दुसऱ्यांची फारच थोडी मदत घ्यावी लागली. ही शिक्षणपद्धति मात्र फार जुनाट होती.

रमाबाईंना आपल्या आईच्या ह्या उपकाराचें कधींच विस्मरण पडलें नाहीं. त्यांचें पहिलें इंग्रजी पुस्तक 'The High Caste Hindu Woman' त्यांनीं खालील शब्दांत आपल्या मातेला अर्पण केलें आहे:

To The
Memory of my beloved Mother
LAXMIBAI DONGRE
Whose sweet influence and able instruction
have been
the light and guide of my life,
this little volume
is most reverently dedicated.

ह्या कुटुंबानें जेव्हां वेंकोबाच्या गिरीवर मुक्काम ठेवला होता,—आणि तो चांगला एक वर्षभर होता–तेव्हां रमाचें वय दहा एक वर्षांचें होतें. त्या गिरीवर रानामध्यें पापनाशिनी नांवाची एक लहानशी नदी आहे. ती डोंगराच्या कड्यावरून खालीं पडून दरींतून वाहात जाऊन रानांत घुसते. तेथील रानाचा देखावा फारच मनोहर आहे. त्यांतल्या त्यांत त्या धबधब्या-

१ एक साक्ष, पृष्ठ १५

मुळें तर तिची शोभा द्विगुणित झाली आहे. मात्र तेथील बैराग्यांनीं आणि क्षेत्रोपाध्यायांनीं धबधब्याची शोभा धुळीस मिळविली आहे असें बाई एके ठिकाणीं म्हणतात. ह्या धबधब्याखालीं बसून आपलीं पापें धुऊन काढण्यांत पुष्कळ यात्रेकरू निमग्न झालेले असतात. पाप धुतलें गेलें कीं नाहीं हें खालीं नदीच्या प्रवाहांत तरंगणाऱ्या तवंगामुळें समजतें. असा तवंग दिसूं लागला कीं आपलीं पापें धुतलीं गेलीं असें समजण्यास हरकत नाहीं असें पुजारी सांगतात. मजा अशी कीं, बहुतेक असा तवंग हरहमेश दृष्टोत्पत्तीस येतो. कारण त्या गर्दींत डोक्याला चपचपीत तेल लावलेल्या स्त्रिया व बुचडेवाले पुरुषहि असंख्य असतात! तशांत मद्रासकडील स्त्रीपुरुष एरंडेल चोपडून स्नान करतात. त्या वेळच्या आठवणींत रमाबाई लिहितात:

"त्या धबधब्याखालीं बसून आम्हीं सर्वांनीं पापनाशिनीचें पाणी आमच्या डोक्यांवरून वाहूं दिलें. मग आमच्या डोक्यांवरील तेलाचे तवंग आम्हीं खालीं प्रवाहांत पाहिले. पापें धुऊन गेलीं ह्याचें प्रमाण कांहीं आम्हांला पटलें नाहीं. बैराग्यांचीं, तीर्थोपाध्यायांचीं व भिक्षुकांचीं ढोंगें मात्र आम्ही पाहात होतों."

रमा बारा वर्षांची झाली तेव्हांच्या ह्या खालीं दिलेल्या दोन आठवणी आहेत.

ह्या कुटुंबाचा मुक्काम तीर्थयात्रेनिमित्त एक वर्षभर द्वारकेस होता. द्वारका वैष्णव पंथी लोकांचें एक महाक्षेत्र असून भारताच्या पश्चिम किनाऱ्याला सौराष्ट्रांत तें आहे. पूर्वीं हें एक बेट असून श्रीकृष्णानें ती नगरी एका रात्रींत निर्माण करून सुवर्णानें व हिऱ्यामाणकांनीं मढवून काढली अशी कथा आहे. येथेंच राहून श्रीकृष्णानें यादवांवर राज्य केलें. कृष्णनिधनानंतर ही नगरी समुद्रांत बुडून दिसेनाशी झाली. अद्याप पावेतों तेथें श्रीकृष्णाचा राजवाडा आहे परंतु तो पातक्यांच्या दृष्टीस पडत नाहीं. ह्याच ठिकाणीं संत मीराबाई पतिसहवास सोडून कृष्णभक्तींत तल्लीन होऊन राहिली होती. स्त्रीदास्यविमोचनासाठीं झगडणारी पहिली शूर आर्य महिला म्हणून रमाबाईंना मीराबाईबद्दल फार आदर वाटे. दररोज समुद्रस्नान घडावें ह्या हेतूनें अनंतशास्त्री येथें येऊन राहिले होते. समुद्र हा सर्व तीर्थांचा राजा, त्यांत दररोज स्नान केल्यानें अमर्याद पुण्यप्राप्ति होते. त्रैलोक्याच्या पवित्र नद्यांचें स्नान घडल्यासारखें तें होतें ह्याच समजुतीनें शास्त्रीबोवांनीं तेथें एक वर्षपर्यंत

मुक्काम ठोकला होता. ह्याच मुक्कामांत कपिलाषष्ठीची महापर्वणी आली. मग काय, दुधांत साखर पडल्यासारख झालें. कपिलाषष्ठी दर साठ वर्षांनीं येते, त्यावरून ह्या मंडळीच्या आनंदाची कल्पना करतां येईल. त्या दिवशीं श्रीकृष्ण आपल्या भक्तांवर मोठा कृपाप्रसाद करणार होता. आपल्या आवडत्या भक्तांना तो आपल्या सुवर्णनगरीचें दर्शन घेऊं देणार होता. जे यात्रेकरू निष्पाप असतील त्यांनाच हें दर्शन घडणार होतें. त्या दिवशीं समुद्रस्नान करून, व देवांची व ब्राह्मणांची पूजाअर्चा करून उपाध्यायास दानें व दुसऱ्या वस्तू अर्पून यात्रेकरूंना आपापल्या पापांचें निरसन करतां येणार होतें. राजे-रजवाडे, गरीब, श्रीमंत, विद्वान्, अडाणी, सर्व जातींचें, सर्व दर्जाचे लोक त्या दिवशीं समुद्रस्नानास द्वारकेंत जमले होते. शास्त्रीबोवाहि त्या दिवसाची आतुरतेनें वाट पहात होते. त्या दिवशीं सायंकाळीं सहकुटुंब स्नान करून ब्राह्मणांस यथेच्छ दानधर्म केल्यावर व वेदमंत्र म्हटल्यावर ते समुद्रकांठीं दिव्य नगरीच्या दर्शनार्थ येऊन बसले. सकाळीं ढग येऊन धुकेंहि पडलें होतें. पण सायंकाळ होत चालली तसतसें आकाश निरभ्र होऊं लागलें. ऊनहि पडलें. आशा लागून राहिलेली वेळ येऊन ठेपली. पश्चिमेकडील आकाशाचा थोडा भाग व क्षितिजाजवळचे मेघ एकदम उजळले. मावळत्या सूर्याचे तांबडे पिवळे किरण त्यांवर पसरून एक सुंदर व मनोवेधक देखावा त्यांच्या दृष्टीस पडूं लागला. यात्रेकरूंत एकदम उत्साह दिसूं लागला. चहूंकडे आश्चर्योद्गार कानीं पडूं लागले. कोणी म्हणत सुवर्णनगरी दिसूं लागली, तर कोणी विचारीत, आम्हांला ती कशी दिसत नाहीं? कित्येकांना त्या रंगीबेरंगी ढगांतच दिव्य मंदिराच्या व सुशोभित मनोऱ्यांच्या आकृति भासमान होऊं लागल्या. कोणी म्हणत, हे नुसते कल्पनेचे मनोरे आहेत. कुठें? कांहीं सुद्धा दिसत नाहीं! बिचारी रमा अनिमिष नेत्रांनीं तो देखावा पाहात राहिली. पण तिला मात्र त्या सुवर्णनगरीचा एकहि मनोरा दिसला नाहीं! अनंतशास्त्र्यांच्या कुटुंबापैकीं एकानेंहि ह्या बाबतींत तोंड उघडलें नाहीं. कारण नगरी दिसली नाहीं म्हणेल तो पातकी ठरत होता! आणि स्वतःस पातकी ठरवून घेण्यास कोणी फारसा उत्सुक नव्हता. अनंतशास्त्रीहि त्याला अपवाद नव्हते.

आपल्याला द्वारका दिसली नाहीं म्हणून श्रीनिवासच्या मनाला फारच चरका बसला. तसें पाहतां त्यानंतर त्या कुटुंबांतील प्रत्येकाला वाईट वाटलें

होतें. श्रीनिवास आतां मारुतीचा उपासक बनला. रमाबाई म्हणतात, त्यानें तेथेंच खडतर उपवासाला सुरुवात केली. दिवसांतून पन्नास वेळेला तरी तो मारुतीचें स्तोत्र म्हणायचा. सात आठवडे त्यानें केवळ एक पंचपात्रीभर पाणी व एक संध्येच्या पळीभर साखर एवढ्यावर काढले, त्यानंतर एक आठवडा रोज एक पंचपात्रीभर दूध सेवन केलें. नंतर दूध, पाणी, साखर ह्यांपैकीं कशालाहि स्पर्श न करतां एक आठवडा अगदीं निर्जळी उपवास केला. ह्या उपासतापासामुळें त्याला भयंकर क्षीणता आली. त्याची प्रकृति मूळची अतिशय सुदृढ व शरीर गोटीसारखें पीळदार. पण या उपवासामुळें त्याची माती झाली. त्याच्या मूळच्या निकोप प्रकृतीमुळें तो ह्या भयंकर दिव्यांत जगला तरी, दुसऱ्या कोणाची गठडीच वळली असती. त्यानें सर्व कांहीं अगदीं यथासांग केलें होतें. आतां मारुतिराया आपल्याला प्रत्यक्ष दर्शन देऊन आपल्या शिरावर तो वरदहस्त ठेवणार अशा आशेनें तो बजरंग बलीची वाट पाहात बसला. पण त्याच्या पदरीं दारुण निराशा पडली. तरीहि मारुतीवरील त्याचा विश्वास बिलकुल ढळला नाहीं. आपलेंच कांहीं तरी चुकलें असलें पाहिजे असें त्याच्या मनानें घेतलें. आपण आणखी खडतर तपश्चर्या करणार, असें त्यानें बोलून दाखविलें.[1] पण तावडतोब कांहीं करणें त्याच्या शक्तीबाहेरचें होतें. अंगांत बुंदभरहि शक्ति उरली नव्हती. अशा स्थितींत तो हिंडूं फिरूं लागतांच त्या मंडळीनें द्वारका सोडली.

आतां पापक्षालनार्थ दुसऱ्या क्षेत्राच्या ठिकाणीं जाण्याचें ठरवून त्यांनीं आपला मोर्चा दक्षिणेकडे वळविला. मद्रासजवळील घटिकाचलावरील हनुमानाच्या देवालयांत ते येऊन पोंचले. येथें हें कुटुंब एक वर्षभर राहिलें. परंतु तेथेंहि त्यांना आपल्या प्रार्थनेचें उत्तर मिळालें नाहीं. आपल्याप्रमाणेंच इतर यात्रेकरूंपैकीं कोणाचाहि कांहीं फायदा झाला नाहीं अशी मात्र उलट त्यांची येथील अनुभवावरून खात्री पटली. फायदा जर कोणाचा झाला असला तर तो तेथील पुजाऱ्यांचा. ह्याच वेळेपासून रमाच्या मनांत एक प्रकारच्या संदेहानें गोंधळ निर्माण केला. अशा मनस्थितींत ते घटिकाचलीं पोचले.

तेथील हनुमानाचें मंदिर एका टेकडीवर आहे. हें दैवत फार जागृत आहे

---

१. मिस् फुलर ह्यांनीं रमाबाईच्या तोंडून ऐकलेली हकीगत.

असें म्हणतात. दोन मैलांवर आणखी एका टेकडीवर नरसिंहाचें मंदिर आहे. जवळच वराहावताराचेंहि मंदिर आहे. हीं सारींच दैवतें जागृत असल्याचें पुजारी सांगतात. घटिकाचलीं तर एका घटकेंत पातकें जळून खाक होतात. इतर क्षेत्रांत जें व्हायला वर्षानुवर्षे लागतात तें येथें २४ मिनिटांत म्हणजे एका घटिकेंत होतें. म्हणूनच तर ते घटिकाचल !

श्रीनिवासचें व्रत पुनः येथें सुरू झालें. रोज पहांटे तीनला उठून तो गार पाण्यानें स्नान करायचा. नंतर घरच्या देवांची पूजाअर्चा करायला बसायचा. तें झालें म्हणजे तसाच डोंगरावर जाऊन मारुतीला १०८ प्रदक्षिणा घालायचा, १०८ साष्टांग नमस्कार घालायचा व नंतर दुपारीं तीन वाजेपर्यंत तेथेंच एका कोपऱ्यांत ध्यानस्थ बसायचा. हें सारें आन्हिक संपेपर्यंत तो अन्नाचा एक कणहि तोंडांत घेत नसे. अशा तऱ्हेनें त्याचें जीवन कित्येक महिने चाललें होतें. तेथेंहि कांहीं फायदा होत नाहीं असें पाहिल्यावर शास्त्रीबोवांनीं तें ठिकाण सोडलें.[1]

रमा आतां तेरा वर्षांची झाली. प्रवासांत ती मंडळी कोणत्याशा संस्थानांत आली. संस्थानांतील जनानखान्यांतील राण्यांना भेट देण्याचें निमंत्रण लक्ष्मीबाईंना व त्यांच्या वडील मुलीला मिळालें. त्यांच्याबरोबर रमाहि राजवाड्यांत गेली. राजेसाहेबांना चार राण्या होत्या. वडील राणीला दोन पुत्र होते. त्यामुळें ती राजेसाहेबांची आवडती होती. त्या राणीसाहेबांचें मुखकमल प्रफुल्लित दिसत होतें. पण आवडतीच्या महालांतून ह्या पाहुण्या जेव्हां दुसऱ्या तीन राण्यांच्या महालांत गेल्या तेव्हां त्यांना तेथें जमीनअस्मानाचा फरक दिसून आला. त्या बिचाऱ्यांना मूलबाळ नव्हतें. त्यामुळें राजेसाहेबांची त्यांच्यावर खप्पा मर्जी झालेली होती. त्यांचीं तीं सुकलेलीं तोंडें पुढें कित्येक दिवस रमाच्या नजरेपुढून हाललीं नाहींत. त्या बिचाऱ्यांना आशेचा एकहि तंतू दिसत नव्हता. एका बंगाली मुलीची अशीच एक कथा त्यावेळीं रमाच्या ऐकण्यांत आली होती. ती मुलगी गर्भार राहिली तेव्हां तिच्या नवऱ्यानें तिला बजावलें होतें कीं, जर मुलगी झाली तर मला तोंड दाखवूं नको. बिचारीनें सारें गर्भारपण धास्तींत कंठलें होतें.

---

१. कुमारी राजस कृष्ण डोंगरे ह्यांच्या रमाबाईच्या आगामी इंग्रजी चरित्रावरून.

एकदां यमुना नदीच्या तीरावर रमानें एक दीर्घ किंकाळी ऐकली. तिचें लक्ष तावडतोब तिकडे वेधलें गेलें. यमुनेच्या तीरावर उघड्यावर एका सुकुमार बालिकेला तिचा नवरा व सासू मारीत होते. मात्र दिवसांढवळ्या चाललेली ही मारपीट इतर कोणाच्या मनाला पीळ पाडीत असल्याचें दिसत नव्हतें. किंकाळ्या एकसारख्या येत होत्या. नऊ वर्षांच्या रमाबाईंवर मात्र त्यांनीं एवढा परिणाम केला कीं पुढें जन्मभर तो प्रकार त्या विसरल्यासारखें दिसत नाहीं. त्या म्हणतात,

"तिच्या किंकाळ्या माझ्या काळजाला जाऊन भिडल्या. आतां त्या गोष्टीला तीस वर्षें होऊन गेलीं आहेत तरी अजून त्या माझ्या कानांत घुमत आहेत. माझ्या भगिनींना यथाशक्ति साह्य करण्याचें जें पवित्र कर्तव्य मीं अंगिकारलें आहे त्याची पहिली हांक ती होती असें मला वाटतें"

अब्राहाम लिंकनला आपल्या बालवयांतच गुलामगिरी बंद करण्याची स्फूर्ति झाली ती अशाच एका किंकाळीनें. एका नीग्रो मुलीची विक्री चालली होती. एका झाडामागें उभ राहून तो आणि त्याचे दोघे मित्र ती पाहात होते. मुलीला त्या वेळीं मारपीट होत होती. ती ऐकून अब्राहाम आपल्या सोबत्यांना म्हणाला होता,

"देवा! देवा! गड्यांनो! चला येथून! ह्या गोष्टीला मूठमाती देण्याची संधि तर मला मिळूं द्या. मी ही गुलामगिरी अगदीं खोल खोल गाडून टाकीन."[२]

बाळपण रम्य होतें, तरी त्याच वेळेस रमाबाईंच्या आयुष्यांतील कार्याच्या इमारतीचे पायाभरणीचें अवघड कामहि सुरू झालें होतें.

---

१. Quarterly Mission Paper : 1896.

२. Abraham Lincoln by Lord Charnwood. पान १४.

## ३ कलकत्ता व सिल्हट

द्वारका सोडीपर्यंत अनंतशास्त्र्यांची सांपत्तिक स्थिति चांगली होती हें आपण मागल्या प्रकरणांत पाहिलेंच आहे. त्यानंतर मद्रासजवळील घटिकाचलावरील हनुमानाच्या क्षेत्रीं त्यांचा मुक्काम पडला. आणि तेव्हांपासून मात्र त्यांना पैशाची चणचण भासूं लागली. मद्रासच्या भयंकर दुष्काळाची व त्यांच्या पुढील हालअपेष्टांची नांदी येथेंच सुरू झाली म्हणण्यास हरकत नाहीं. रमाबाई म्हणतात :

"पण पुढें दैवयोगानें व्यापारांत जबर नुकसान येऊन त्यांत आमच्यावर लुटारू लोकांचीहि कृपा झाली आणि होतें नव्हतें तें सारें गेलें........२४ हजार रुपये त्यापायीं कर्ज झालें. कांहीं नवीन खरेदी केलेल्या वाड्या गहाण टाकून तें वारावें लागलें."[१] पण नंतर मुंबईनें शास्त्रीबोवांवर इतका परिणाम केला कीं पूर्वीं ज्यांनीं आपल्या मुलांना 'नवदेद्यावनीं भाषां....प्राणैःकंठगतैरपि' हा श्लोक पढवून त्याप्रमाणें वागण्याची ताकीद देऊन ठेवली होती[२] तेच आतां आपल्या मुलांना मुंबईला ठेवून त्यांना इंग्रजी शिकविण्याचे बेत करूं लागले.[३]

पण शास्त्रीबोवांचे हे सारे बेत जागच्या जागीं राहून त्यांना आपल्या साऱ्या कुटुंबासमवेत एका अगदींच अनपेक्षित अशा संकटाला तोंड द्यावें लागलें. घटिकाचलीं येईपर्यंत सर्व कांहीं सुरळीत चाललें होतें. पण व्यापारांत भयंकर खोट, त्यापायीं कर्ज, दरोडेखोरांची कृपा, आणि शास्त्रीबोवांचा कमालीचा प्रामाणिकपणा, ह्यामुळें त्यांच्या हातांत एक कपर्दिकहि राहिला नाहीं. आणि अशा वेळीं मद्रासेंतील न भूतो न भविष्यति अशा दुष्काळाची

---

१. सुबोधपत्रिका : ८ ऑक्टोबर १८८२.

२. एक साक्ष, पान १६.

३. नवयुग मासिक : एप्रिल–मे १९२२.

भीषण छाया पसरूं लागलेली. १८७६–१८७७ सालच्या ह्या दुष्काळानें ५० लाख लोकांचे बळी घेतल्याचें सांगतात. मद्रासकडे दुष्काळानें आपला जबडा वासण्यास सुरुवात केली तेव्हां ही मंडळी तिरुपति क्षेत्रांत येऊन दाखल झाली. दानधर्म केल्यावांचून त्यांना राहावत नव्हतें व अशा स्थितींतहि त्यांनीं तो चालू ठेवला होता! त्यासाठीं जवळ होतें नव्हतें तें किडुकमिडुक त्यांनीं विकून टाकलें. अशानें तरी देव पावेल व आपल्याला पहिले दिवस पुनः दिसतील असें त्यांना वाटत असावें. आतां तीं खरोखर कफल्लक बनलीं. तीं सगळीं माणसें संस्कृतविद्यापारंगत होतीं, धार्मिक होतीं, त्यांच्या अंगीं दातृत्व कमालीचें होतें, प्रामाणिकपणाहि होता. पण ह्यांपैकीं कशाचाहि त्या अडचणीच्या वेळीं उपयोग होण्यासारखा नव्हता.

त्यांच्यापैकीं एकालाहि व्यवहारज्ञान असल्याचें दिसत नाहीं. शेती येत होती, पण शेतें नव्हतीं. व्यापार म्हणजे मुंबईंतील 'शेअर्स,' पण शेअर्स असणें म्हणजे कांहीं व्यवहारज्ञान नव्हे, आणि तेथें आतां बरीच खोट आलेली. हातानें मोलमजुरी करणें त्यांना शक्य नव्हतें, कारण तें काम त्यांच्यासारख्या ब्राह्मण शास्त्रीमंडळींचें नव्हे. भीक मागणें तर अशक्यच. कधीं जन्मांत भिकेचें अन्न खाल्लें नव्हतें व कंठीं प्राण आले तरी तें त्यांच्या स्वप्नांतहि आलें नसतें.

ह्याबाबत रमाबाईंच्या हातच्याच आठवणी देण बरें. रमाबाई म्हणतात: "जे कांहीं थोडेबहुत दागदागिने होते ते विकून टाकण्यांत आले, आणि आलेल्या पैशांचा विनियोग स्वतःच्या कुटुंबाचा चरितार्थ चालविण्याकडे करण्याऐवजीं गरीब ब्राह्मणांना दानधर्म करण्यांत झाला! हे पैसे अशा रीतीनें संपल्यावर आमच्या कुटुंबाला भुकेनें तडफडून मरण्यावांचून अन्य मार्ग उरला नाहीं. आतां पुढें काय करावें हा विचार करण्यासाठीं आम्ही एकत्र जमलों. आम्ही सर्वांनीं असें ठरविलें कीं, अरण्यांत जाऊन सर्वांनीं अन्नपाण्यावांचून मरावें हें बरें! दारिद्र्यावस्थेंत आपल्या लोकांत मरणें हें आम्हांला अत्यंत कमीपणाचें वाटलें. या वेळीं आम्ही व्यंकटगिरी पर्वतावरील तिरुपति नांवाच्या एका सुप्रसिद्ध तीर्थस्थानीं राहात होतों. वरील भयंकर विचार ठरवून आम्ही सर्वजण त्याच रात्रीं अरण्यांत जाण्यास निघालों. तेथें आम्हीं झाडपाला व खजुरीच्या बिया खाऊन कसेतरी अकरा दिवस आणि अकरा रात्री काढल्या.

ह्या उपासमारीचा तीव्र तडाखा माझ्या वृद्ध व अशक्त पित्यास सहन होईना."

ह्या बाबतींत डोंगरे कुलवृत्तांतांत म्हटलें आहे, "अनंतशास्त्री अत्यंत क्षीण झाले होते. त्यांना पाऊल उचलवेना, अशा स्थितींत त्यांनीं आतुर[१] संन्यास घेतला."[२]

बाई पुढें म्हणतात.

"जवळच एक पवित्र तीर्थाचें तळें पाहून त्यांत माझ्या वडिलांनीं आणि त्यांच्या मागोमाग आम्हींहि जलसमाधी घेण्याचें ठरविलें. माझ्या वडिलांनीं एकामागून एक अशी कुटुंबांतील माणसांची रजा घेतली. मी लहान होतें. तेव्हां शेवटीं माझी पाळी आली. त्यांनीं मला जवळ पोटाशीं घट्ट धरून प्रेमानें कुरवाळलें आणि खोल गेलेल्या क्षीण आवाजांत ते म्हणाले 'बाळे, मी तर आतां जातों, परंतु माझें तुझ्यावर केवढें प्रेम आहे याचें तूं नित्य स्मरण ठेव. जें सत्य, नित्य व धर्म्य आहे तेंच तूं आचर; तूं जगली वांचलीस तर नित्य देवाच्या मार्गांत चाल. देवाची नित्य सेवा करणें हेंच तुझें ध्येय असूं दे. तूं माझं शेवटलं अपत्य आहेस आणि तूं मला सर्वांहून अधिक प्रिय आहेस. मी तुला देवाच्या स्वाधीन करून जात आहें. तोच तुझं रक्षण करील. त्याचीच तुझ्यावर सत्ता आहे; आणि त्याचीच तूं नित्य सेवा केली पाहिजेस,"

अशा प्रेमळ व ईश्वरनिष्ठ पित्याची व तुमची स्वर्गांत गांठ पडणार नाहीं, असें कोणी रमाबाईंना अमेरिकेंत असतांना म्हटलें, त्यावेळीं बाईंनीं उत्तर दिलें,

"अमेरिकेंत जर कोणी अशा मताचा असेंल कीं माझीं मातापितरें, प्रभु येशूचा संदेश कोणीं त्यांना दिला नाहीं म्हणून नरकांत पडलीं असतील तर मला त्यांना एवढेंच बजावायचें आहे कीं असले शब्द माझ्या देखत बोलत जाऊं नका. माझ्या वडिलांना परमेश्वरप्राप्तीची इतकी तहान लागली होती आणि माझी आई इतकी कनवाळू होती कीं असलें कांहीं मी ऐकणार नाहीं. मला तें सहन होणार नाहीं."[३]

साधु सुंदरसिंग ह्यांनींहि कँटरबरीच्या आर्चबिशपला असेंच सुनविलें होतें.

---

१. आतुर संन्यास म्हणजे मरणसमयीं घाईघाईनें घेतलेला संन्यास.

२. डोंगरे–कुलवृत्तान्त, पान २१२

३. Women who worked & won. J. Chapel, पान १३१

भाषणांत कांहीं असला विषय निघून सुंदरसिंग म्हणाले होते: 'माझी आई जर मला स्वर्गांत भेटली नाहीं तर मी परमेश्वराला सांगेन, मला नरकांत पाठीव. तेथें मी आपल्या आईजवळ सुखांत राहीन.'[1]

पण श्रीनिवासला वडिलांचा हा असला मृत्यु पहावेना. चला, आपण परत लोकवस्तींत जाऊं, मिळेल तो कामधंदा न लाजतां मी करीन व सर्वांचा योगक्षेम कसातरी चालवीन. चलाच परत. अशी त्यानें वडिलांना गळ घातली. मुलाच्या ह्या विनंतीला अनंतशास्त्र्यांनीं संमति दिली व सर्व मंडळीनें मोठ्या कष्टानें अरण्यांतून गांवाकडे प्रवास सुरू केला. अनंतशास्त्र्यांना अगदीं चालवत नव्हतें. ते फार अशक्त झाले होते. तशांत त्यांची दृष्टीहि अत्यंत मंद झाली होती. कशी तरी रखडत रखडत ही मंडळी एका खेड्यांत येऊन दाखल झाली. वाटेंत त्यांना एक देऊळ लागलें, त्यांत त्यांनीं आश्रय घेण्याचा प्रयत्न केला पण तेथील भटजीबुवांनीं त्यांना तेथून हाकून लावलें! आपण ब्राह्मण आहों ह्या त्यांच्या बोलण्यावर कोणी विश्वास ठेवीना, इतके ते कलाहीन झाले होते. शेवटीं एका पडक्या देवळांत त्यांनीं मुक्काम केला. ज्या दिवशीं ही मंडळी कशीबशी गांवांत पोंचली त्याच दिवशीं अनंतशास्त्र्यांना ताप भरला. त्या आजारांत त्यांना साखरपाणी हवें होतें. मुलें त्यांना पाणी देऊं शकलीं पण बापड्यांना साखर कोठली मिळणार? बापाला आपण शेवटीं थोडी साखरसुद्धा दऊं शकलों नाहीं ह्याचें त्या मुलांना अतिशय वाईट वाटलें. पण वाईट वाटण्यापलीकडे बिचारीं काय करणार? तो आजार अनंतशास्त्र्यांचा शेवटला आजार ठरला. आपल्या पत्नीला व तीन मुलांना अनाथ सोडून अनंतशात्र्यांनीं इहलोकचा प्रवास संपविला. पण आतां प्रश्न आला प्रेतक्रियेचा. त्यांच्या जातीगोताची खात्री न वाटून कोणी त्यांना साहाय्य करण्यास पुढें येईना. शेवटीं एका ब्राह्मणाला दया येऊन त्यानें आपल्या खर्चानें मजुराकरवीं गांवापासून दोन मैलांवर खड्डा खणवून दिला. स्वतः साह्य करण्याची सुद्धा त्याची इच्छा होती, पण जातगंगेला तो भीत होता. श्रीनिवासानें एका धोतरांत बापाचें प्रेत बांधून तें तेथें दोन मैलांवर आपल्या पाठुंगळीं नेऊन पुरलें. दुरून दुरून तो कनवाळू ब्राह्मण श्रीनिवासाच्या

---

१. डॉ. निकल् मक्निकल : 'पंडिता रमाबाई,' पान २९

मागें मागें चालत होता. अनंतशास्त्र्यांनीं शेवटीं संन्यास घेतलेला असल्यानें त्यांचें दहन शास्त्रविहीत नव्हतें. संन्याशाला जाळण्याऐवजीं पुरण्याची पद्धत आहे.

वडील वारले त्याच दिवशीं रमाबाईंच्या मातुःश्रींना ताप भरला. आपण ह्या आजारांतून उठत नाहीं असें त्या म्हणूं लागल्या व त्यांचाहि तो शेवटलाच आजार ठरला. श्रीनिवास मोठ्या हिरीरीनें कामधंदा करून सर्वांचें पोषण करायला निघाला होता, परंतु ह्या आजारामुळें व स्वतःहि उपासतापासांनीं तो अत्यंत क्षीण झालेला असल्यानें त्याला कांहींहि कामधंदा करतां येईना. त्यामुळें खाण्यापिण्याचे आणखीच हाल होऊं लागले. आईचा आजार वाढूं लागला. लोकांच्या मदतीवर अवलंबून ही मंडळी आजारी आईला घेऊन कशीतरी रायचूरला येऊन पोंचली. सगळीच मंडळी उपासमारीनें अगदीं टेकीला आलेली. रमाबाई लिहितात: "माझ्या आईला भुकेचा ताप सहन होईना. ती अगदीं व्याकूळ होऊन गेली होती. तेव्हां तिनें मला शेजारच्या घरून बाजरीची भाकरी मागून आणायला सांगितलें. मी तेथें कशीबशी गेलें खरी, पण आईकरतां मला बाजरीच्या भाकरीचा एवढासा तुकडा द्या, असे शब्द मात्र माझ्या मुखावाटें बाहेर पडेनात. मीं आपले मनोविकार आंतल्या आंत दाबून ठेवण्याचा शक्य तों प्रयत्न केला आणि डोळ्यांवाटे अश्रु येऊं न देण्याची पराकाष्ठा केली. पण शेवटीं माझ्या नाकांतून पाण्याची धार लागली. तें पाहून त्या प्रेमळ बाईनें अंदाज केला व मला विचारलें, तुला कांहीं हवें आहे का? मी हो म्हणालें व मला माझ्या आईकरतां बाजरीच्या भाकरीचा एक तुकडा द्या म्हणून म्हटलें. तो मिळाल्यावर त्या बाईचे आभार कसे मानावे हें मला कळेना. मी तशीच ती भाकरी घेऊन तडक निघालें व धावत धावत येऊन आईला ती दिली. पण अशक्तपणामुळें तिला ती खाववेना. तिच्या अंगांत ताप खूप भरला होता व ती बेशुद्धावस्थेंत होती. अशाच स्थितींत तिचें प्राणोत्क्रमण झालें!"

पुनः प्रश्न आला प्रेतक्रियेचा. श्रीनिवासनें बाबा पुता करून कशींतरी दोन माणसें उभीं केलीं. तिसरा श्रीनिवास व चवथ्या खांदेकरी स्वतः रमाबाई! रमाबाई ठेंगण्या असल्यानें त्यांना तिरडीचा कोपरा आपल्या डोक्यावर ठेवावा लागला व त्यामुळें अधिक भार त्यांच्यावर पडत होता.

१०९९८

ह्यानंतर वडील बहीण. उपासमारीला बळी पडून चारसहा महिन्यांतच तीहि मृत्युमुखीं पडली. अशा रीतीनें १८७४ च्या जुलै महिन्यांत अनंतशास्त्री, ऑगस्ट महिन्यांत लक्ष्मीबाई व डिसेंबरांत किंवा १८७५ च्या सुरुवातीस कृष्णाबाई इतकीं माणसें एकामागून एक गेलीं.

पांच माणसांपैकीं आतां दोघेंच उरलीं. त्यांनीं आपल्या आईवडिलांचें तीर्थयात्रेचें व्रत कायम ठेवून पुढील मार्ग क्रमण्यास सुरुवात केली. मद्रास इलाख्यांतून निघून त्यांनीं थेट उत्तरेचा मार्ग धरला. पायीं पायीं प्रवास करीत तीं दोघें थेट काश्मीरपर्यंत गेलीं. ४००० मैलांचा प्रवास त्यांनीं पायीं पायीं केला. सतत चार वर्षें उत्तर भारतीय क्षेत्रांतून तीर्थयात्रा करीत हीं भावंडें फिरत राहिलीं. ह्याहि प्रवासांत त्यांना अतिशय कष्ट पडले. रमाबाई ह्या प्रवासासंबंधीं लिहितात :

"माझी बहिण वारण्यापूर्वीं थोडे दिवस आम्ही उदरनिर्वाहासाठीं कामधाम शोधीत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं अशीं फिरत चाललों होतों. पण फारसें कामहि मिळालें नाहीं म्हणून अन्नाचाहि वषट्कारच !"[1]

बहिणीच्या मृत्यूनंतरहि जवळजवळ कलकत्त्याला पोंचेपर्यंत तोच प्रकार होता.

"माझा भाऊ आणि मी यात्रा करीत करीत हिंदुस्थानच्या उत्तर सीमेपर्यंत जाऊन तेथून थेट पूर्वेकडे वळून कलकत्त्यापर्यंत आलों. मधूनमधून माझ्या भावाला काम मिळे; तथापि आमचा बहुतेक काळ भटक्यांसारखा जाई. बरेच वेळां उपाशी राहण्याचेहि प्रसंग आमच्यावर येत. भावाला काम मिळालें तर वेतन अगदीं कमी, म्हणजे दरमहा चार रुपये व कधीं कधीं त्याहूनहि कमी मिळे. म्हणून मूठभर दाणे भिजवून थोडया मिठाबरोबर ते फाकण्याची आमच्यावर पाळी यायची. पांघरायला घोंगडया वगैरे जाड वस्त्रें आमच्याजवळ नव्हतीं, छत्र्या नव्हत्या, अनवाणीच आम्ही प्रवास करीत होतों. रात्रीच्या वेळेस रस्त्याच्या कडेला झाडाखालीं किंवा पुलाच्या कमानीखालीं विश्रांति घेत असूं, अगर उघडया हवेंत भूमीची शय्या करून तीवर डोकें टेकीत असूं. पंजाबांत झेलम नदीच्या कांठीं रात्र काढण्याचा प्रसंग आला तेव्हां भयंकर थंडीपासून रक्षण होण्यासाठीं वाळूमध्यें दोन खळगे करून त्यामध्यें गळयाइतकें आम्हीं

---

१. वषट्कार म्हणजे हवन करतेवेळीं उच्चारावयाचा एक शब्दप्रयोग.

स्वतःला पुरून घेतलें." (आणि ह्याचमुळें कानाला ती भयंकर थंडी झोंबून रमाबाईंना बहिरेपण आल्याचें त्यांनीं पुढें कित्येक वर्षांनीं मिस् फुलर ह्यांना सांगितल्याचें त्या लिहितात.) "कधीं कधीं भुकेनें पोटांत इतकी आग पडायची कीं ती शमविण्यासाठीं मिळतील तीं रानफळें खाऊन सालीसकट त्यांच्या बियाहि आम्ही गिळंकृत करीत असूं."[१] मिस् फुलर ह्यांना रमाबाईंनीं त्यावेळच्या हालअपेष्टांचें वर्णन करतांना सांगितलें होतें कीं, अन्नाप्रमाणें कपड्याचेहि हाल होते. अर्धी साडी अंगावर ठेवून अर्धी धुवावयाची व वाळवायची आणि ती वाळल्यावर नेसून अंगावरची धुवावयाची, असें त्यांना करावें लागे.

सन १८७६ सालीं हिमालयाच्या आसपास भटकत असतांना तीं मंडीजवळ रेवळस नांवाच्या सरोवराजवळ आलीं. क्षेत्रविधि करणारांचें हें मोठें पवित्र स्थान.

तेथें पोंचतांच क्षेत्रोपाध्यायांनीं ह्या भावंडांची चौकशी केली. तीं भणंग भिकारी आहेत असें ध्यानांत येतांच त्यांनीं सांगितलें, सांभाळा बरं, ह्या सरोवरांत भयंकर सुसरी आहेत. पाण्यांत उतरूं बितरूं नका. फुकट प्राणास मुकाल. ह्यांनीं तेथल्या सात टेकड्यांची कीर्ति आपल्या आईच्या तोंडून ऐकली होती कीं, तेथें सप्तर्षि स्नानासाठीं उतरत असतात व प्रसन्न झाले तर किनाऱ्याजवळ येऊन भक्तांना दर्शन देतात. हे सप्तर्षि म्हणजेच समोर पाण्यांत दिसणाऱ्या सात टेकड्या. पण क्षेत्रोपाध्याय त्या गोष्टीची दाद लागूं देईनात. उलट पाण्यांत मोठमोठ्या सुसरी असून त्यांच्या तावडींत कोणी सांपडला तर त्याला त्या गट्ट करतात असा त्यांनीं त्यांना धाक घालून ठेवला. सुसरी गट्ट करतात ना ? करूं द्या ! नाहींतरी अन्न कुठें पोटभर मिळतें आहे ? अशा पवित्र स्थळीं मरण आलें तर तेवढेंच मोक्षप्राप्तीला बरें ! सकाळींच भटजीबोवा येण्याच्या आंत आपण पाण्यांत उतरायचें असें ठरवून तीं दोघें तेथल्या जवळच्याच धर्मशाळेंत झोंपलीं. सकाळीं उठतांच श्रीनिवास पोहत पोहत त्या टेकड्यांजवळ गेला. जवळ जाऊन पाहातो तों देवदार लांकडाच्या तराफ्यावर दगडमाती रचून त्यांवर गवत आणि झाडपाला उगवलेल्या त्या कृत्रिम टेकड्या ! पोहत पोहत मागें जाऊन त्या ढकलल्या कीं तीरावर सहज आणतां

१. पंडिता रमाबाई: (मराठी वाङ्मय कमिटी), पान २५

येतात. द्वारकेची सोन्याची नगरी, व्यंकोबाच्या रानांतील पापनाशिनी नदी, घटिकाचलावरील हनुमान इत्यादींमुळें ह्या भावंडांना आधींच ह्या साऱ्या अवडंबराचा वीट आला होता. त्यांत आतां ह्या सप्तर्षीची भर पडली. क्षेत्रोपाध्याय सकाळीं येऊन पाहतात तर एका सप्तर्षीला श्रीनिवासशास्त्री किनाऱ्याकडे ढकलीत आणीत आहेत! ह्यावर दोघां भावंडांना अपशब्दमिश्रित आशीर्वाद भटजीबोवांकडून मिळाले ह्यांत नवल नाहीं.

असें करतां करतां १८७८ साल उजाडलें. श्रीनिवासशास्त्री व रमाबाई कलकत्त्यास येऊन पोंचलीं. कलकत्ता शहर भारताची राजधानी होती. राजा राममोहन रायची ती कर्मभूमि होती. सतीबंदीची लाट ह्याच शहरांत प्रथम निघाली व स्त्रीस्वातंत्र्याचे जोरदार पुरस्कर्ते येथेंच निपजले. प्रबोधनकार ठाकरे आपल्या रमाबाईंच्या चरित्रांत म्हणतात, "प्राचीन मनुस्मृतीच्या दंडकावर डोळे मिटून विश्वासानें आचारविचार करणारे लाखों लोक ह्या शहरांत होते, तसेंच तसल्या धर्माचरणांत मनाला शांति नाहीं, माणुसकीला वाव नाहीं, स्त्रियांच्या उद्धाराला कोठेंच वाव नाहीं, असल्या पोथी, भिक्षुक-पूजक धर्माच्या नादानें पुरोगामी जमान्यांत हिंदुजनांना कोठेंहि टिकाव धरतां येणार नाहीं म्हणून त्यांतला वाईट भाग कापून काढून चांगल्याचा तेवढा जोरानें पुरस्कार करावा, अशा विचारांनीं थरारलेले शेंकडों पंडितहि होते. या विचारांचे आद्य बंडखोर राजा राममोहन राय. त्यांच्या पावलांवर पाऊल ठेवून केशवचंद्र सेन, कालीचरण बानर्जी, पंडित महेशचंद्र न्यायरत्न प्रभृति मंडळींनीं ब्रह्मोसमाज संस्था चालवून हिंदुधर्माचें नवीनीकरण जोरानें चालविलें होतें."[1]

अशा ह्या नव्या विचारांच्या लोकांत हीं भावंडें येऊन पडलीं. आजवर गेल्या चार वर्षांत त्यांची कदर करणारे व त्यांची खरी किंमत ओळखणारे, पोटभरू भिक्षुक, उपाध्ये, गंजड गोसावडे यांनींच गजबजलेल्या तीर्थक्षेत्रादि ठिकाणीं जेथें जेथें ते हिंडले, तेथें कोणी नव्हते. एका वस्त्रानिशीं आलेल्या वीस वर्षे वयाच्या चमकदार, सभाधीट स्त्रीनें एका देवळांत आपल्या संस्कृत ज्ञानाची व पांडित्याची आपल्या अस्खलित वाणीनें चमक दाखवितांच विजेच्या वेगानें सारें कलकत्ता शहर त्या बातमीनें हालवून सोडलें. उपासमारीनें त्या दोघांचे

---

१. प्रबोधनकार ठाकरेकृत पंडिता रमाबाई, पान १९

देह जरी कृश झाले होते, तरी ज्ञानाची, संस्कृतीची आणि अविचल नीतिमत्तेची झकाकी त्यांच्या मुद्रेवर ओसंडत होती. पुरोगामी सुधारक पंडितांचें लक्ष बाईंनीं तत्काळ आकर्षित करून घेतल. पुराणग्रंथांतले अठरा हजार श्लोक घडाघड पाठ म्हणून दाखवून तिनें शास्त्र्यांना चकित केलें व तिचें व्याकरणांतील नैपुण्य पाहून वैय्याकरणी दिङ्मूढ होऊन गेले.

सुरुवातीला तर बाईंच्या कौतुकाचा जल्लोष उडून गेला. कलकत्त्याच्याच नव्हे तर साऱ्या भारताच्या कानाकोपऱ्यांत बाइचें नांव दुमदुमून राहिलें होतें. कलकत्ता येथील सिनेट हॉलमध्यें तेथील पंडितांनीं व अध्यापकांनीं एक मोठी सभा भरवून त्यांचा सन्मान केला. रमाबाई कलकत्त्याच्या सिनेट हाऊसमध्यें गेल्या. तेथें प्रो. टाने, प्रो. गौ व पंडित महेशचंद्र न्यायरत्न बसले होते. त्या तिघांहि संस्कृत पंडितांनीं रमाबाईंचें स्वागत केलें. नंतर प्रो. टाने ह्यांनीं इतर पंडितांच्या साह्यानें रमाबाईंच्या स्वागतपर असा एक संस्कृत श्लोक रचला :

*यया भवत्या चकिताः पण्डिता ईदृशा वयम् ।*
*ततो भव्यामहे साक्षात् वर्ततेऽत्र सरस्वती ।।*

असा आरंभ केलेल्या ह्या श्लोकांचा भावार्थः—'ज्या आपण मोठमोठ्या पंडितांस थक्क करून सोडलें आहे, त्या आपण मनुष्ययोनींतील एक व्यक्ति आहां असें आम्हांस वाटत नाहीं. आपण प्रत्यक्ष विद्यादेवी, श्री सरस्वतीच ह्या अवनीतलावर मनुष्यरूप धारण करून अवतरलां आहां असें आम्हांस वाटतें. मी स्वतः जरी जन्मतः म्लेंच्छ असलों तरी मीं आजपर्यंत पुष्कळ पंडितांच्या विद्वत्तेचें प्रदर्शन पाहिलें आहे. परंतु आपल्यासारख उदाहरण आपलेंच. मी आपल्यासारखा कवि नाहीं. काव्यद्वारां आपली स्तुति करावयास मी असमर्थ आहें. मी आपणांस नमस्कार करतों.'

ह्यावर बाईंनीं तेथल्या तेथें दिलेलें उत्तर असें होतें :—

*भवद्भिर्यानि पुष्पानि प्रक्षिप्तानि ममोपरि ।*
*अहं न तत्पात्रभूता, न तथैवास्मि पंडिता ।।*

*पर्वताकारसदृशा भवद्भिर्मे गुणाः स्मृताः ।*
*परमाणुसमास्ते स्युः किंत्वेतद्गुणगौरवम् ॥*
*नाहं सरस्वती साक्षात् मन्यध्वे मां न शारदाम् ।*
*किंतु तस्याः समामध्ये एकाहं परिचारिका ॥*

'आपण माझी जी एवढी प्रशंसा केली तिला मी मुळींच पात्र नाहीं. आपल्या ह्या सरस्वती मंदिरांतील मी एक गरीबशी उपासिका आहें. आपली स्तुति आपल्या चांगुलपणाची व गुणग्राहकतेची साक्ष पटवते. आपल्यासारख्या विद्वान् लोकांनीं मजविषयीं जे उद्‌गार काढले ते ऐकून मी विद्वानांच्या व पंडितांच्या ह्या शहरांत आल्याचें सार्थक झालें असें मला वाटत आहे."

त्यानंतर बाईंच्याकडून जागच्या जागीं आणखी कांहीं श्लोक रचवून घेण्यांत यावे अशी सूचना आली. सूचनेप्रमाणें त्यांनींहि तेथल्या तेथें दिलेल्या विषयावर श्लोक रचून आपलं शीघ्रकवित्व तेथें जमलेल्या विद्वानांना पटवून दिलें. तेव्हां ते सर्व पंडित थक्क झाले. ह्याच सभेंत बाईंना 'सरस्वती' हें बिरुद देण्यांत आलें. त्या वेळेपासूनच त्यांना 'पंडिता रमाबाई सरस्वती' म्हणूं लागले. ह्यापूर्वीं किंवा ह्यानंतर भारतांत पंडिता ह्या नांवानें दुसरी कोणतीहि स्त्री ओळखली गेली नाहीं.[1]

"नंतरच्या काळांत असल्या पदवीची त्यांना स्वतःला कांहीं किंमत नव्हती. आणि आपलें संस्कृतचें ज्ञान हें केवळ फोल विद्वत्ता मिरविण्यासारखें आहे असें त्या मानीत. परंतु इतक्या लहानपणीं झालेल्या त्यांच्या सन्मानाचें द्योतक त्यांच्या मनाविरुद्ध असलें, तरी तें त्यांच्या विद्वत्तेची साक्ष देत शेवटपर्यंत त्यांच्याबरोबर राहिलें."[2]

पडिता रमाबाईंना कलकत्त्यास वारंवार प्रवचनें व व्याख्यानें द्यावीं लागत. आपल्या भाषणांत त्या आपल्या शौर्यशाली पूर्वजांचीं उदहारणें देऊन आपलें म्हणणें पटेल असें सोपें करून सांगत. पूर्वकाळींच्या स्त्रिया कशा पुढें गेलेल्या होत्या हें तेथील बंगाली स्त्रीसमाजापुढें केलेल्या भाषणांत त्यांनीं दाखवून

---

१. ह्याला पंडिता क्षमाबाई राव हा एक अपवाद आहे. मात्र रमाबाईप्रमाणें, क्षमाबाईंच्या बाबतींत 'पंडिता' हें विशेषनाम न बनतां विशेषणच राहिलें.

२. Pandita Ramabai : MacNicol , पान ४३

दिलें.[1] भाषण संस्कृतमध्यें होतें व त्याचें भाषान्तर बंगालींत करण्यांत आलें. बाई म्हणाल्या:

"पूर्णपणें थाटलेल्या व गजबजलेल्या दरबारांत द्रौपदी आपल्या पित्या-बरोबर बसत असे. युधिष्ठिरालाहि जुगार न खेळण्याविषयीं ती बजावायची. उघड्या दरबारांत श्रीकृष्ण आपल्या मातेसह बसायचा. ह्यावरून असें सिद्ध होतें कीं, त्या पुरातन काळीं स्त्रियांना आतांप्रमाणें वाळींत टाकीत नसत. बाल-विवाहानें स्त्रियांच्या प्रगतीचे सर्व मार्ग रोखले गेले आहेत. आपण शास्त्राध्ययन केलें म्हणजे आपल्याला दिसून येईल की, पूर्वींच्या भारतानें बालविवाहाला मान्यता दिलेली नव्हती. लोक म्हणतात बालविवाह जर थांबविले आणि स्त्रियांना शिक्षण दिलें तर त्या अनीतिमान् होतील. पण हें असत्य आहे. सत्यभामा, सावित्री आणि त्यांच्यासारख्या इतर पुष्कळजणी सिद्ध करतात कीं हें म्हणणें असत्य आहे."

त्यावेळीं त्या बंगाली स्त्रियांनीं बाईंना बंगाली भाषेंत खालीलप्रमाणें मानपत्र अर्पण केलें. बंगालमध्यें तेव्हां व आत्तांहि कांहीं प्रमाणांत गोषाची पद्धत आहे, हें वाचकांना माहीत असेलच.

"आर्यमहिले, आपण भारतवर्षीय स्त्रियांचें भूषण आहां. ह्या शहरचे सर्व लोक विस्मय पावले आहेत. आपल्या बुद्धीस, विद्वत्तेस आणि कवित्वशक्तीस जो मान मिळत आहे, त्याचें आम्हांस भूषण वाटत आहे. कारण आपण आमच्या देशभगिनी आहां. आम्हां स्त्रियांसच नव्हे तर भरतखंडांतील सर्वांसच अभिमान वाटणें उचित आहे. उच्च शिक्षणानें स्त्रियांचीं मनें किती अलंकृत होतात हें आपल्याच उदाहरणावरून प्रतीत होतें. हल्लींच्या काळांतील विद्वान् महिलांचे दृष्टांत द्यायचे झाले तर आम्हांला परदेशांतील स्त्रियांचीं नांवें घ्यावीं लागत, परन्तु आपलें दर्शन आम्हांस झाल्यानें आतां तसें करण्याचें कारण उरलें नाहीं. आमच्या प्राचीन हिंदु चाली आणि रीतीभाती ह्यांस अनुसरून चाललें तर आमच्या देशांतल्या स्त्रियांस केवढा लाभ होण्याचा संभव आहे हें आतां आपल्या उदाहरणावरून लोकांच्या सहज लक्षांत येईल. पुरातन

---

१. देशभक्त आनंद मोहन बोस ह्यांनीं ही सभा बोलाविली होती व खास स्त्रियांसाठीं बोलावलेली भारतांतील ही पहिलीच सभा होती.

काळच्या पुष्कळ नामांकित स्त्रियांबद्दल वाचण्यांत व ऐकण्यांत येतें. ते त्यांचे उत्तम गुण आज आम्हांस आपल्याठायीं प्रत्यक्ष पाहण्यास मिळत आहेत.

"एवढी विशाल बुद्धि व उत्तम विद्वत्ता आपल्या अंगीं असून आपल्या ठायीं यत्किंचितहि गर्व नाहीं. उलट लीनता, सरळ स्वभाव, आणि सात्विकता यांची आपण प्रत्यक्ष प्रतिमा आहां असें भासतें.

"या देशाच्या कोणा स्त्रीचा सन्मान करण्याकरितां आजपर्यंत (१८७८) अशी प्रसिद्ध सभा कधीं झाली नाहीं. परन्तु आपलें आगमन येथें झाल्यामुळें असल्या सभांस प्रारंभ झाला आहे. आपले सद्गुण आणि मनाची स्वतंत्रता पाहून स्वदेशांतील स्त्रियांचा योग्य मान ठेवण्याविषयीं आमच्या देशबांधवांची प्रवृत्ति होईल अशी आम्ही मनापासून उमेद बाळगितों. स्त्रियांस स्वतंत्रता असणें ही गोष्ट शुद्ध विदेशी अगर परद्वीपांतील आहे हा समज आपण आमच्या पुरुषांच्या मनांतून दूर करावा."

एका पंडितानें ह्या मानपत्राचें संस्कृतमध्यें भाषांतर करून सांगितलें. मग बाईंनीं त्याचें उत्तर संस्कृतमध्यें दिलें. त्याचें बंगाली भाषांतर करून सभेंतील स्त्रियांना तें सांगण्यांत आलें.

बाबू केशवचंद्र सेन, कालीचरण बानर्जी इत्यादि सुधारकाग्रणींनीं बाईंना व श्रीनिवासशास्त्र्यांना आपल्या घरीं नेऊन त्यांच्याबद्दलचा आदर व्यक्त केला. केशव चंद्र सेनांच्या घरीं दिलेल्या भेटीसंबंधीं बाई म्हणतात,

"त्यांनीं आमचा प्रेमानें आदरसत्कार करून आपल्या पत्नीची व मुलींची आणि आमची ओळख करून दिली. मुलींपैकीं एकीचें लग्न कुचबिहारच्या महाराजांशीं झालें होतें. ती चौदा वर्षांहून कमी वयाची असल्यामुळें ब्राह्मोसमाजाचा नियमभंग केल्यानें त्यांच्यावर समाजबंधूंनीं व इतरांनीं टीकेची झोड उठविली होती. निरोप देतांना त्यांनीं माझ्या हातीं वेदाची एक प्रत देऊन मीं वेद वाचले आहेत का म्हणून प्रश्न केला. मानेनें नकार दर्शवून मीं म्हटलें, वेदग्रंथ वाचण्याला स्त्रिया पात्र नाहींत व तसें करण्याची त्यांना परवानगीहि नाहीं. हें हिंदुधर्ममत मीं स्पष्टपणें बोलून दाखविलें, तेव्हां त्यांना हंसू आलें. कांहीं अधिक न बोलतां वेद व उपनिषदांचें वाचन करावें असें त्यांनीं मला सुचविलें."

बाबू केशवचंद्र सेन ह्यांच्या हंसण्यांतील इशारा घेऊन रमाबाईंनीं

ऋग्वेदाचा व उपनिषदांचा कसोशीनें अभ्यास करण्यास ताबडतोब सुरुवात केली.

श्री. हेमेन्द्रनाथ दास म्हणतात "केशवचंद्रांच्या सांगण्यावरून त्या वेद वाचूं लागल्या व हळू हळू एकेश्वरवादिनी झाल्या. हिंदु धर्मासंबंधीं अनास्थेचें बीज ह्यापूर्वींच रोवलें गेलें होतें. वेदपठणानंतर मूर्तिपूजेकडे त्यांचें मन जाईना. श्रीनिवासहि मूर्तिपूजेचा घोर विरोध करूं लागले. ह्याच वेळीं त्यांनीं स्पृश्यास्पृश्य विचार सोडून दिला."[१]

ह्याच सुमाराला रमाबाई व श्रीनिवासशास्त्री ह्यांची कांहीं ख्रिस्ती लोकांशींहि ओळख झाल्याचें दिसतें. एका ठिकाणीं तीं भावंडें प्रार्थनेच्या वेळीं गेलेलीं दिसतात. रमाबाई लिहितात : "हे लोक गुडघे टेकून व डोळे झांकून प्रार्थना करतांना पाहून मला आश्चर्य वाटलें. रिकाम्या खुर्च्यांत त्यांना कोणता देव दिसतो तें मला समजेना. त्यांतील दोघां युरोपियनांनीं मला एक संस्कृत बायबल दिलें. परंतु तें पुस्तक नेहमींच्या संस्कृत भाषेप्रमाणें नसल्यानें तें वाचण्याच्या भानगडींत मी पडलें नाहीं.'[२]

ह्याविषयीं श्री. हेमेन्द्रनाथ दास त्याच लेखांत पुढें म्हणतात: "भारतीय ख्रिस्ती लोकांच्या समितीनें भ्राताभगिनींना एका सामाजिक संमेलनांत बोलावून त्यांचें विशेष अभिनंदन केलें. रेव्हरंड कृष्ण मोहन बंदोपाध्याय[३] व कालीचरण बंदोपाध्याय प्रभृति समितीच्या सभासदांच्या प्रेरणेनें ही अभिनंदनाची सभा भरली होती."

---

१. प्रवासी : फाल्गुन १३६६ पृष्ठ ५४६.

२. 'A Testimony' पृष्ठ ६. रमाबाईंना संस्कृत बायबल देणारे हे दोघे मिशनरी कलकत्त्यांतीलच मिशनरी असावेत. संस्कृत बायबलचा कांहीं भाग (नवा करार) श्रीरामपूरच्या छापखान्यांत १८०८ सालीं छापण्यांत आला होता. त्याचे भाषान्तरकर्ते म्हणजे केरी आणि वॉर्ड हे ह्या वेळेस हयात नव्हते. परंतु ह्या पुस्तकांत आणखी भर पडत पडत शेवटीं केरीच्या मृत्यूपर्यंत म्हणजे १८३४ पर्यंत तें संपूर्ण होत आलें होतें. केरी त्याच्यावर शेवटला हात फिरविण्याच्या बेतांत होता. पुढें १८७० च्या सुमारास म्हणजे तीस पस्तीस वर्षांनीं कलकत्त्याच्या मिशनरींनीं 'तपासून शुद्ध करून' पुनः नवी आवृत्ति काढली व तीच आवृत्ति रमाबाई म्हणतात त्याप्रमाणें त्याच भाषांतरकर्त्यांपैकीं कोणीं तरी त्यांना दिली असावी.

३. बानर्जी

कलकत्त्याइतक्याच आपुलकीनें ह्या भावंडांचें स्वागत व सन्मान श्री हट्ट [Sylhet] व डाका (ढाका [Dacca]) ह्या दोन ठिकाणीं झाला. त्यांतल्या त्यांत सिल्हटच्या समारंभांची व तेथील वास्तव्याची अपूर्वता विशेष होती. हीं भावंडें १८७९ मध्यें दि. १७ सप्टेंबर रोजीं सिल्हट येथें पोंचलीं. तीं बहुतेक तेथें बोटीनें गेलीं असावीं. त्यांच्या स्वागतार्थ एक अभ्यर्थना समिती स्थापण्यांत आली होती. तीं दोघें सुरमा नदीच्या चांदनी घाटावर पोंचतांच गांवांतल्या मान्य व विद्वान् मंडळीनें त्यांची मिरवणूक काढून त्यांना नया सडकेवर एका घरीं नेलें. तेथें शहरांतील मुख्य मुख्य लोक त्यांना पाहण्या-साठीं जमा झाले होते. मणिपुरी राजवाडीच्या नाटचमंदिरांत एक विराट सभा झाली. पंडिता बाईंना संस्कृतमध्यें एक अभिनंदनपत्र देण्यांत आलें. सिल्हट जिल्हा स्कूलचे मुख्य पंडित श्री. कालीचरण शर्मा ह्यांनीं तें वाचलें. रमाबाईंनीं त्याला एक लांबलचक उत्तर दिलें. अर्थात् तें संस्कृतमध्यें होतें. गांवच्या प्रख्यात पंडितांनीं ह्या सभेंत भाग घेतला होता. सभास्थानीं सिल्हटचे डेप्युटी कमिशनर मि. जॉन्सन होते.

ह्या सभेंत पंडितांनीं रमाबाईंना तीन कठीण समस्या पूर्तीसाठीं दिल्या. थोडा विचार करून बाईंनीं त्या पुऱ्या केल्या. त्या अशा होत्या.

**पहिली समस्या** : *गद्यमिदं विनाङ्गम्*

**उत्तर** : *विद्यां समभ्यस्य सदानवद्यां*
*ग्राह्यो विवेको मनसेति सम्यक् ।*
*नरस्य सर्वैरपि तत्त्वबुध्या*
*नालोच्यते गद्यमिदं विनाङ्गम् ॥*

निर्मळ अशा विद्येचा नीट अभ्यास करून, प्रत्येकानें आपल्या मनाशीं योग्य तो विचार ठरवून ग्रहण करावा. मानवाचें (म्हणजे त्यानें रचलेलें) हें गद्य (म्हणजे गद्यात्मक धर्मग्रंथ) शास्त्राधार असल्यावांचून सर्वांकडूनच प्रमाण मानलें जात नाहीं.

**दुसरी समस्या** : *सा तत्र चित्रायते*

**उत्तर** : *या जानाति परप्रज्ञामुरुमतिः स्त्री सा समाजे सती*
*धर्मैकप्रतिपादकेऽविदितसद्धर्मेऽभिजानत्यपि ।*

*मुग्धत्वादनवद्यनीतिविषयज्ञानावबोधक्षमा*
*बाला नातिविवेकवादकुशला सा तत्र चित्रायते ॥*

अत्यंत विद्वान्, कुशाग्र बुद्धीची अशी ती स्त्री केवळ धर्मप्रतिपादन करणाऱ्या, (परंतु) वास्तविक धर्मस्वरूप न जाणणाऱ्या अशा समाजामध्यें गेली असतां सर्व कांहीं जाणत असूनहि, तसेंच निर्मळ नीतितत्त्वांचें प्रतिपादन करण्याची योग्यता असूनहि केवळ मुग्धपणामुळें वितंडवाद करण्याची संवय नसल्यानें, तेथें (त्या समाजांत) चित्राप्रमाणें म्हणजे तटस्थ, स्तब्ध राहते.

**तिसरी समस्या** : *अहो दग्धोऽस्मि वृष्टिभिः*
**उत्तर** : *विद्युत्पातभयग्रस्तमतिरज्ञजनः क्वचित् ।*
*शीतकाले वदत्येवं अहो दग्धोऽस्मि वृष्टिभिः ॥*

पावसाची वेळ असून, विजा कडाडत आहेत व हवेंत पावसानें अगदीं गारवा आणला आहे अशा वेळीं कोणी अडाणी मनुष्य वीज पडेल कीं काय या भीतीनें हतबुद्ध होऊन शीतकाल असूनहि म्हणतो, 'ह्या पावसानें मी जाळून निघालों आहें.'

ह्याच सभेंत रमाबाईंना एक थैली देण्यांत आली. त्या भाषण करून खालीं बसल्यावर श्री. रायबहादूर सीतामोहन दास ह्यांनीं कलकत्त्याच्या 'श्री हट्ट संमीलनी' ह्यांनीं दिलेलें मानपत्र वाचून दाखविलें. असें म्हणतात कीं, ह्या मानपत्राची रचना पूज्य डॉक्टर सुंदरीमोहन दास ह्यांची होती. रमाबाईंनीं त्याहि मानपत्राला यथोचित उत्तर दिलें. श्री हट्ट जिल्हा स्कूलच्या शिक्षकांनीं व विद्यार्थ्यांनीं ह्या भावंडांना शाळेंत येऊन भाषण करण्याची विनंती केली. तेथेंहि बाईंनीं संस्कृतांत भाषण केलें व पंडितांनीं दिलेल्या आणखी समस्यांची पूर्ति केली. जिल्हा स्कूलमध्यें पंडिता बाईंना सिल्हट येथें बनविलेला एक हस्तिदंती पंखा व एक सोन्याची अंगठी भेट म्हणून देण्यांत आली. ह्या ठिकाणीं महिलांची एक लहानशी संस्था होती तेथें येऊन संस्थेंतील भगिनी-मंडळाची ओळख करून घ्यावी अशी विनंति त्यांना करण्यांत आल्यानें बाईंनीं त्यांच्याहि सभेंत जाऊन त्यांची ओळख करून घेतली. गिरीश विद्यालयांत रमाबाईंच्या अभ्यर्थनेसाठीं सभा झाली. त्या सभेला डेप्युटी कमिशनर, पोलिस अधिकारी, युरोपियन स्त्रिया व सरकारी अधिकारी हजर

होते, गुढ्या तोरणें उभारण्यांत आलीं होतीं. एका सुसज्जित तोरणावर लिहिलें होतें—

*"रमे रमा समागच्छ कृपया छात्रमंदिरे"*

ह्या सभेस श्री. बिपिन बिहारी दास हजर असून त्यांनीं बाईंच्या पूर्वींच्या जीवनाचा इतिहास आपल्या ओजस्वी भाषेंत श्रोत्यांना सांगितला. ह्याच मुक्कामांत बिपिनबाबूंचा व रमाबाईंचे बंधु श्रीनिवासशास्त्री ह्यांचा दाट परिचय झाला. श्री. बिहारींची विद्वत्ता, संघटनक्षमता व इतर गुणांमुळें श्रीनिवासशास्त्री मोहून गेले व त्या वृत्तीचें पुढें दृढ स्नेहांत रूपान्तर झालें.

ह्याच मुक्कामांत बिपिनबाबूंनीं रमाबाईंना विवाहाबद्दल विचारलें व भावाची अनुमति असल्यास आपली कांहीं हरकत नाहीं असें रमाबाईंनीं त्यांना सांगितलें.

## ४ बिपिन बिहारी कीं श्रीपाद बाबाजी?

बिपिन बिहारी दास हे आपणास बिपिन बिहारीदास मेधावी म्हणवीत. मेधावी हे उपनांव बिपिन बिहारींना केव्हां व कसें प्राप्त झालें हा एक मोठा गमतीचा प्रश्न उपस्थित करतां येण्यासारखा आहे. देशभक्त बिपिनचंद्र पाल हे बिपिन बिहारींचे सहाध्यायी व त्यांच्याच गांवचे. त्यांनीं १८५७ ते १८८४ पर्यंतच्या आपल्या आयुष्यांतील आठवणींचें पुस्तक लिहिलें आहे. त्यांत त्यांनीं बिपिन बिहारी दास ह्यांच्या संबंधानें बरेंच लिहिलें आहे. त्यांत मेधावी ह्या उपनांवाचा ते चुकून सुद्धा उल्लेख करीत नाहींत. पाल बाबूंचें हें लिखाण रमाबाईंच्या विवाहपूर्वचरित्राचें आहे.[१]

श्री. मेधावींच्या मावस बहिणीचे नातू श्री. हेमेंद्रनाथ दास ह्यांच्या माहिती-प्रमाणें[२] 'मेधाई (स्थानिक भाषेंत) किंवा मेधावी ही त्यांच्या कुळाची उपाधि (पदवी) होती." परंतु मेधावी ह्या गोत्रदर्शक शब्दाचा आडनांवासारखा उपयोग करून दास हा शब्द बिहारी ह्या शब्दाला जोडून घेण्याची कल्पना कोणाची? खुद्द बिपिन बिहारींची किंवा त्यांना पूज्य मानणाऱ्या त्यांच्या गांवकऱ्यांची किंवा त्यांच्या पत्नीची, हें सांगणें कठीण आहे. सेवावृत्तीचें द्योतक अशा दास ह्या आडनांवाचा त्या अद्वितीय पुरुषोत्तमानें स्वतः होऊन त्याग केला असेल किंवा त्यांच्या सुविख्यात पत्नीनें मेधावी हें नांव चालविण्यास त्यांचें मन वळविलें असेल. रमाबाईंनीं आपल्या संस्थेंतील निरनिराळ्या शाखांना, विहिरींना, स्थलांना अशींच अनुरूप नांवें दिलीं असल्याचें आढळतें.

---

१. 'Memories of MY LIFE AND TIMES in the days of my youth' (1857-1884) by B. C. Paul. प्रकरण १९, पानें ३७४ ते ३८०

२. प्रवासी : चैत्र १३६६ (१८६०)

शिवाय लग्न झाल्यानंतर पुरुषांनीं स्त्रियांचीं नांवें बदलण्याची प्रथा आहे तशी स्त्रियांनीं आपल्या पतींचीं नांवें कां बदलूं नयेत असें रमाबाईसारख्या व्यक्तीस वाटणें अस्वाभाविक नाहीं.

मेधाविन् ह्या शब्दाचा अर्थ सुज्ञ, विद्वान, प्राज्ञ असा आहे व बाबू बिपिन बिहारीदास ह्यांना हा शब्द बरोबर लागू पडतो; इतकेंच नाहीं तर त्यांच्या पत्नीलाहि तो सार्थ असा होता.

श्री. बिपिन बिहारींचा जन्मदिवस मिळत नाहीं. तरी डॉक्टर सुंदरीमोहन दास व बिपिन चन्द्र पाल ह्यांचे ते समकालीन व 'अंतरंग मित्र' होते, त्यावरून ठोकळ मानानें असें अनुमान करायला हरकत नाहीं कीं त्यांचा जन्म इसवी सन १८५२ ते १८५७ च्या दरम्यान झाला असला पाहिजे. करीमगंज सबडिव्हिजनमधील मध्यतिकान्दि ह्या गांवीं त्यांचा जन्म झाला. त्यांच्या पित्याचें नांव माणिक्यराम दास व मातेचें नांव सुभद्रा असें होतें. माणिक्यराम दास हे पैशानें श्रेष्ठ नव्हते तर आपल्या उन्नत चारित्र्यानें, तेजस्वितेनें व स्पष्टवक्तेपणामुळें ते प्रसिद्धि पावले होते. बिपिनबाबूंची माता सुभद्रा हीहि त्याच गुणांनीं मंडित होती. हे सद्गुण बिपिन बिहारींना आपल्या मातापितरांकडून वारसा म्हणून लाभले होते. बाल्यकालापासूनच बिपिन बिहारींना विद्यार्जनाबद्दल विशेष आल्हाद होता. परंतु वडिलांच्या घोर दारिद्र्यामुळें बिपिन बिहारींना आरंभापासूनच परिस्थितीशीं संग्राम करीत स्वयंप्रतिष्ठ (self supporting) व्हावें लागलें. प्रवेशपरीक्षेनंतर कलकत्त्याला जाऊन पुढील शिक्षण घेण्याची प्रबल इच्छा होती. पण त्यासाठीं पैसा कोठून आणायचा ? पैसा मिळविण्यासाठीं ते आसामांत गेले व तेथेंच ते एफ्. ए. व बी. ए. झाले. बी. ए. पास झाल्यावर ते गोहाटी नॉर्मल स्कूलचे मुख्याध्यापक झाले व तेथेंच एम्. ए. ची तयारी करूं लागले. १८७६ सालीं ते कृतित्वासह (With Distinction) एम् ए. झाले. कलकत्ता विद्यापीठाच्या कॅलेंडरांत त्यांच्या नांवापुढें तारकाचिन्ह असून (star) खालीं लिहिलें आहे, Passed Honours in Arts. सिल्हटचे इतिवृत्तकार श्री. पंडित अच्युतचरण चौधरी तत्त्वनिधि ह्यांनीं लिहिलें आहे कीं, कठीण रसायनशास्त्रांत एम्. ए. ची परीक्षा बिपिनबाबूंनीं विश्वविद्यालयांत प्रथमस्थान प्राप्त करून घेतली. १८७९ सालीं प्रेसिडेन्सी कॉलेजांतून ते बी. एल्. हि झाले.

गोहाटीच्या नॉर्मल स्कूलमध्यें शिक्षक असतांना त्यांनीं 'रसायनाची उपक्रमणिका' नांवाचा एक सचित्र ग्रंथ लिहिला. तो १२८४ च्या श्रावण महिन्यांत म्हणजे इ. स. १८७८ च्या जून-जुलैमध्यें जयगोविंद सोम ह्यांच्या (इंडियन ख्रिश्चन हेरल्ड प्रेस) छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला. ह्या पुस्तकांत विपिनबाबूंनीं स्वतः पारिभाषिक शब्द बनवून वापरले आहेत, हा त्या ग्रंथाचा विशेष होय. ह्यापूर्वीं रसायनशास्त्राची अशी परिभाषा वंग भाषेंत दुसरी कोठें नव्हती. बिपिनबाबू ह्या क्षेत्रांतील पथप्रदर्शकच नव्हेत तर त्यांचा हा ग्रंथ त्या वेळच्या बंगालींत अद्वितीय होता.

बिपिन बाबू कवि व संगीतज्ञहि होते. बिपिनचंद्र पाल ह्यांच्या आत्मचरित्रांत ह्या गोष्टीचा उल्लेख सांपडतो. श्री. केशवचंद्र सेन विलायतेंतून परत आले तेव्हां कलकत्ता विद्यापीठाच्या तरुण मंडळींनें जो स्वागतसमारंभ केला त्यांत बिपिन बिहारींनीं एक स्वतः रचलेलें सुंदर पद्य म्हटलें होतें. त्यावेळीं बिपिन बिहारींची व ब्रह्म समाजी मंडळीची बरीच घसरट होती. तरी ते स्वतः ब्राह्मो होते कीं नाहीं ह्याबद्दल शंकाच आहे. मात्र त्यांच्या मित्रमंडळींत पाल बाबू व डॉ. सुंदरीमोहन ही कट्टर ब्राह्म मताची मंडळी होती आणि त्यांच्याबरोबर समाजसुधारणेच्या कार्याला बिपिन बिहारींनीं स्वतःला वाहून घेतलें होतें हें निश्चित. बाबू बिपिन बिहारी हे कवि होते ह्याचा आणखी एक पुरावा सांपडतो तो असा कीं, सिल्हट येथील पहिल्या साप्ताहिक पत्राचे संपादक श्री. प्यारीचरण दास ह्यांच्या पद्य पुस्तकाचा पहिला भाग प्रसिद्ध झाल्यावर श्री. बिपिन बाबूंनीं त्यांना कळविलें होतें कीं आपण त्याच्या दुसऱ्या भागाची पद्यरचना करूं. त्या सूचनेला प्यारीबाबूंनीं आनंदानें संमतीहि दिली होती. ती गोष्ट लक्षांत धरूनच त्यानंतर प्यारीबाबूंनीं काढलेल्या पुस्तकाला त्यांनीं भाग तिसरा म्हणून म्हटलें.' श्री. बिपिन बाबूंच्या कामाच्या निकडीमुळें व पुढें त्यांना आलेल्या अनपेक्षित मृत्यूमुळें तो द्वितीय काव्यखंड कधींच प्रसिद्ध झाला नाहीं.

बिपिनबाबूंना संगीताचीहि फार आवड व माहिती होती. एखाद्या संगीताच्या बैठकीस त्यांना कधीं कोणाचें आमंत्रण आलें तर ते गेल्यावांचून

---

१. प्रवासी : चैत्र १३६६

राहात नसत. एकदां बिपिनबाबूंच्या भाचीचे पति सिल्हटचे प्रसिद्ध पखवाजी श्री. बंकबिहारीदास ह्यांनीं एका नर्तकीच्या गाण्यास त्यांना आमंत्रण केलें. ते हजर राहिले. मात्र त्यांच्या जेव्हां नजरेस आलें कीं ती नर्तकी श्रोत्यांच्या अंगाशीं लगट करीत आहे, तेव्हां त्यांना फार राग आला. होतां होतां हा प्रयोग त्यांच्यावर होण्याची पाळी आली तेव्हां त्यांनीं आपल्या खुर्चीवरून ताडकन उठून, आपल्या हातांतील चाबकानें त्या नर्तकीला रपाटे घातले व आपल्या जामाताला म्हटलें, 'ज्या ठिकाणीं पवित्र संगीताची अशी विटंबना होणार असेल तेथें मी कधीं पाऊल टाकणार नाहीं.' असें म्हणून ते रागानें तेथून निघून गेले व त्यांनीं आपली ही प्रतिज्ञा शेवटपर्यंत पाळली.

बिपिन बिहारीदास ह्यांच्या अंगीं एक अतिशय आश्चर्यकारक शक्ति होती. आपल्या कारकुनाला एकीकडे बसवून ते त्याला एखाद्या मुकदम्यांतील कैफियत सांगत तर त्याच वेळेस दुसऱ्या इसमाला आपल्या भाषणांतील मजकूर सांगत. ह्या दोन्हींतहि कधीं चूक होत नसे. वक्ते म्हणूनहि त्यांनीं चांगलीच कीर्ति कमावली होती. पाल बाबूंनीं आपल्या आत्मचरित्रांत बिपिन बिहारींबद्दल म्हटल आहे. 'He was one of the most successful students in the University from our District.' श्री. बिपिन बिहारीदास हे दिसण्यांत अतिशय सुरेख, उंचे पुरे, सशक्त व रुबाबदार गृहस्थ होते. पाल बाबू त्यांच्याबद्दल पुढें लिहितात : 'Tall of stature, he was so made that his very sight had a fascinating appeal even to men. how much more was it likely to appeal to a woman !'

वरील उद्गार ज्या पाल बाबूंचे आहेत ते म्हणजे सुप्रसिद्ध देशभक्त बिपिनचंद्र पाल. बिपिनचंद्र पाल हें नांव एक वेळ लोकमान्य टिळक व लाला लजपतराय ह्यांच्याबरोबर उच्चारलें जात असे. खेड्यांपाड्यांतून महाराष्ट्रभर चावड्यांच्या व तालमींच्या भिंतीवर लाल-पाल-बाल हीं चित्रें चितारलेलीं पुष्कळांच्या ध्यानांत असतील. आतां तर सरकारनें पालबाबूंची छबी पोस्टाच्या तिकिटावरहि छापली आहे. बिपिन बिहारीदास व बिपिनचंद्र पाल हे एक वेळचे सहाध्यायी व दोस्त. एकाच गांवचे रहिवासी. त्यांची मैत्री कलकत्त्यास झालेली. पण ती सिल्हटला आल्यावर फारशी टिकलेली दिसत नाहीं. दोघेहि गांवीं परतल्यावर दोन वेगवेगळ्या गटांत सांपडले.

गोहाटीच्या नॉर्मल स्कूलमध्यें शिक्षक असतांना त्यांनीं 'रसायनाची उपक्रमणिका' नांवाचा एक सचित्र ग्रंथ लिहिला. तो १२८४ च्या श्रावण महिन्यांत म्हणजे इ. स. १८७८ च्या जून-जुलैमध्यें जयगोविंद सोम ह्यांच्या (इंडियन ख्रिश्चन हेरल्ड प्रेस) छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला. ह्या पुस्तकांत ब्रिपिनबाबूंनीं स्वतः पारिभाषिक शब्द बनवून वापरले आहेत, हा त्या ग्रंथाचा विशेष होय. ह्यापूर्वीं रसायनशास्त्राची अशी परिभाषा वंग भाषेंत दुसरी कोठें नव्हती. ब्रिपिनबाबू ह्या क्षेत्रांतील पथप्रदर्शकच नव्हेत तर त्यांचा हा ग्रंथ त्या वेळच्या बंगालींत अद्वितीय होता.

बिपिन बाबू कवि व संगीतज्ञहि होते. बिपिनचंद्र पाल ह्यांच्या आत्मचरित्रांत ह्या गोष्टीचा उल्लेख सांपडतो. श्री. केशवचंद्र सेन विलायतेंतून परत आले तेव्हां कलकत्ता विद्यापीठाच्या तरुण मंडळींनें जो स्वागतसमारंभ केला त्यांत ब्रिपिन ब्रिहारींनीं एक स्वतः रचलेलें सुंदर पद्य म्हटलें होतें. त्यावेळीं ब्रिपिन ब्रिहारींची व ब्रह्म समाजी मंडळीची बरीच घसरट होती. तरी ते स्वतः ब्राह्मो होते कीं नाहीं ह्याबद्दल शंकाच आहे. मात्र त्यांच्या मित्रमंडळींत पाल बाबू व डॉ. सुंदरीमोहन ही कट्टर ब्राह्म मताची मंडळी होती आणि त्यांच्याबरोबर समाजसुधारणेच्या कार्याला बिपिन ब्रिहारींनीं स्वतःला वाहून घेतलें होतें हें निश्चित. बाबू ब्रिपिन ब्रिहारी हे कवि होते ह्याचा आणखी एक पुरावा सांपडतो तो असा कीं, सिल्हट येथील पहिल्या साप्ताहिक पत्राचे संपादक श्री. प्यारीचरण दास ह्यांच्या पद्य पुस्तकाचा पहिला भाग प्रसिद्ध झाल्यावर श्री. ब्रिपिन बाबूंनीं त्यांना कळविलें होतें कीं आपण त्याच्या दुसऱ्या भागाची पद्यरचना करूं. त्या सूचनेला प्यारीबाबूंनीं आनंदानें संमतीहि दिली होती. ती गोष्ट लक्षांत धरूनच त्यानंतर प्यारीबाबूंनीं काढलेल्या पुस्तकाला त्यांनीं भाग तिसरा म्हणून म्हटलें.[१] श्री. ब्रिपिन बाबूंच्या कामाच्या निकडीमुळें व पुढें त्यांना आलेल्या अनपेक्षित मृत्यूमुळें तो द्वितीय काव्यखंड कधींच प्रसिद्ध झाला नाहीं.

ब्रिपिनबाबूंना संगीताचीहि फार आवड व माहिती होती. एखाद्या संगीताच्या बैठकीस त्यांना कधीं कोणाचें आमंत्रण आलें तर ते गेल्यावांचून

१. प्रवासी : चैत्र १३६६

राहात नसत. एकदां बिपिनबाबूंच्या भाचीचे पति सिल्हटचे प्रसिद्ध पखवाजी श्री. बंकबिहारीदास ह्यांनीं एका नर्तकीच्या गाण्यास त्यांना आमंत्रण केलें. ते हजर राहिले. मात्र त्यांच्या जेव्हां नजरेस आलें कीं ती नर्तकी श्रोत्यांच्या अंगाशीं लगट करीत आहे, तेव्हां त्यांना फार राग आला. होतां होतां हा प्रयोग त्यांच्यावर होण्याची पाळी आली तेव्हां त्यांनीं आपल्या खुर्चीवरून ताडकन उठून, आपल्या हातांतील चाबकानें त्या नर्तकीला रपाटे घातले व आपल्या जामाताला म्हटलें, ‘ ज्या ठिकाणीं पवित्र संगीताची अशी विटंबना होणार असेल तेथें मी कधीं पाऊल टाकणार नाहीं. ’ असें म्हणून ते रागानें तेथून निघून गेले व त्यांनीं आपली ही प्रतिज्ञा शेवटपर्यंत पाळली.

बिपिन बिहारीदास ह्यांच्या अंगीं एक अतिशय आश्चर्यकारक शक्ति होती. आपल्या कारकुनाला एकीकडे बसवून ते त्याला एखाद्या मुकदम्यांतील कैफियत सांगत तर त्याच वेळेस दुसऱ्या इसमाला आपल्या भाषणांतील मजकूर सांगत. ह्या दोन्हींतहि कधीं चूक होत नसे. वक्ते म्हणूनहि त्यांनीं चांगलीच कीर्ति कमावली होती. पाल बाबूंनीं आपल्या आत्मचरित्रांत बिपिन बिहारींबद्दल म्हटल आहे. ‘He was one of the most successful students in the University from our District.’ श्री. बिपिन बिहारीदास हे दिसण्यांत अतिशय सुरेख, उंचे पुरे, सशक्त व रुबाबदार गृहस्थ होते. पाल बाबू त्यांच्याबद्दल पुढें लिहितात : ‘Tall of stature, he was so made that his very sight had a fascinating appeal even to men. how much more was it likely to appeal to a woman !’

वरील उद्गार ज्या पाल बाबूंचे आहेत ते म्हणजे सुप्रसिद्ध देशभक्त बिपिनचंद्र पाल. बिपिनचंद्र पाल हें नांव एक वेळ लोकमान्य टिळक व लाला लजपतराय ह्यांच्याबरोबर उच्चारलें जात असे. खेड्यांपाड्यांतून महाराष्ट्रभर चावड्यांच्या व तालमींच्या भिंतीवर लाल-पाल-बाल हीं चित्रें चितारलेलीं पुष्कळांच्या ध्यानांत असतील. आतां तर सरकारनें पालबाबूंची छबी पोस्टाच्या तिकिटावरहि छापली आहे. बिपिन बिहारीदास व बिपिनचंद्र पाल हे एक वेळचे सहाध्यायी व दोस्त. एकाच गांवचे रहिवासी. त्यांची मैत्री कलकत्त्यास झालेली. पण ती सिल्हटला आल्यावर फारशी टिकलेली दिसत नाहीं. दोघेहि गांवीं परतल्यावर दोन वेगवेगळ्या गटांत सांपडले.

पाल बाबू कट्टर ब्राह्मो होते, तर श्री. मेधावी कट्टर सनातनी हिंदु होते. मेधावी हे शूद्र होते असें खुद्द रमाबाई एकदोन ठिकाणीं म्हणतात. पाल बाबू आपल्या ह्या लिखाणांत म्हणतात. "सिल्हटमध्यें राष्ट्रीय शाळा व 'परिदर्शक' ह्यांच्या निमित्तानें मी काम करण्यास गेलों असतां हिंदु पुनरुज्जीवन (Revival) व प्रतिक्रिया (Reaction) ह्यांची लाट आमच्याहि लहानशा शहरावरून चालली होती. आम्ही जरा जोरदारपणें ब्राह्मो समाजाच्या तत्त्वां-प्रमाणें धार्मिक व सामाजिक मतप्रचार एकीकडे करीत होतों; तर आमच्या-बरोबरच्या कांहीं सुशिक्षित तरुणांनीं चालू हिंदु चाली व शिक्षण ह्यांच्या बाजूनें आमच्या विरुद्ध चळवळ सुरू केली होती. ह्या चळवळीचे अध्वर्यु माझे जुने मित्र प. वा. बाबू बिपिन बिहारी दास हे होते."

तसें पाहिलें तर सुशिक्षित बंगाली लोकांस ह्या सुमाराला ब्रह्मसमाजी मतांनीं अगदीं भारून टाकलें होतें. परंतु आपल्याकडे सुधारणावाद्यांना श्री. चिपळूणकरांदि पुढाऱ्यांनीं जसें सबूर करायला लावलें, तसेंच बंगालमध्यें जरा अधिक डोळेदिपाऊ पद्धतीनें तेथल्या सनातनी वृत्तीच्या लोकांनीं लावलें. पंडित शशधर तर्कचूडामणि[1] नांवाचे एक धर्मप्रचारक ह्या वेळेस उदयास येऊं लागले होते. हिंदूंचीं जुनीं शास्त्रें नव्या स्वरूपांत आकर्षक पद्धतीनें मांडण्याची लकब त्यांना फार उत्तम साधली होती. ख्रिस्ती धर्मप्रचारकांस तोडीला तोड म्हणून त्यांनीं जीं व्याख्यानें दिलीं त्यांमुळें कलकत्त्याच्या लोकांवर एवढा पगडा बसला कीं श्री रामकृष्ण परमहंसासारखी व्यक्तीहि त्यांना येऊन भेटून गेली. परंतु पुढें रामकृष्णांच्याच सांगण्यावरून अनुभूति प्राप्त होण्यासाठीं कांहीं साधना करावी म्हणून व कांहीं आदेश मिळावा म्हणून आपलें प्रचारकार्य थांबवून त्यांनीं आसाममधील कामाख्य पीठीं जाऊन दीर्घ तपश्चर्येला सुरुवात केली[2].

शशधर ह्यांनीं कलकत्ता सोडलें तरी त्यांच्या कर्मठ विचारांचें बीं रुजून परधर्मद्वेषाचें रान कांहीं काळ तरी माजलें. कांहीं तरुण मंडळी इतकी असहिष्णु बनली कीं आर्य धर्माभिमानाच्या नांवाखालीं त्यांनीं साल्हेशन

---

१. श्री. गं. दे. खानोलकर ह्यांच्या टागोरांवरील आगामी पुस्तकावरून

२. श्रीरामकृष्णलीलाप्रसंगः चतुर्थ खंडः पृष्ट २३६

आर्मीच्या लोकांना संधि मिळेल तेव्हां मारहाण करण्यास सुरुवात केली. कविसम्राट टागोरांनीं आपल्या 'मानसी' नांवाच्या काव्यग्रंथांत 'धर्मप्रचार' नांवाची एक उपहासगर्भ कविता लिहून ह्या चळवळीचें स्वरूप चांगलें उघडें नागडें केलें आहे[१].

पाल बाबूंच्या लहानपणीं व तारुण्यांतहि सिल्हट हा आसामचा भाग नसून डाक्क्याच्या बाजूला बंगालचाच एक भाग होता. पाल बाबू सिल्हटला आले तेव्हां तेथें ब्रह्म समाजाचा मागमूसहि नव्हता. बिपिनचंद्र पाल व त्यांचे दोघे जोडीदार एवढेच काय ते तेथील ब्राह्मो. ते सडे फटिंग होते. त्यांच्यावर इतका कडक बहिष्कार घालण्यांत आला होता कीं त्यांचीं भांडीं वगैरे घासायला त्यांना हिंदू नोकर मिळेनात. तेव्हां त्यांनीं मोठ्या पंचायतीनें मुसलमान नोकर मिळविला. बिपिनचंद्र बाबू हे आपल्या बापाचे एकुलते एक पुत्र होते तरी कलकत्त्याहून ब्राह्मो दीक्षा घेऊन आल्यानें त्यांना आपल्या वडिलांच्या घरांत पाऊलहि टाकण्याची सोय नव्हती. पाल बाबू एकदां आजारी पडले तेव्हांसुद्धां वडिलांनीं मुलाच्या समाचाराला जाण्याचें नाकारलें. पुढें स्वतःच्या मृत्युसमयीं मात्र बापानें त्यांना जवळ केलें.

पाल बाबू म्हणतात कीं : कलकत्त्यास असतांना बिपिन बिहारी दास हे आपला बहुतेक काळ आपल्याबरोबर व सुंदरी मोहन ह्यांच्याबरोबर घालवीत असत व आपल्या सामाजिक सुधारणेच्या कामांत आपल्याला मनोभावें हातभार लावीत असत. ते शहा जातीचे होते व त्या काळांत शहा जातीच्या लोकांना उच्च वर्णीय हिंदु अस्पृश्य मानीत. आम्ही मात्र असला भेदाभेद झुगारून दिला होता व आमच्या प्रांतांतून आलेल्या शहा जातीच्या विद्यार्थ्यांबरोबर उघड उघड अन्नव्यवहार करीत होतों. आमच्या ह्या उदारपणाचें कौतुक आमच्या प्रांतांतील विद्यार्थी करायचे. परंतु आम्ही सिल्हटला गेल्याबरोबर ह्याच विद्यार्थ्यांनीं आपल्या पगड्या फिरविल्या व ते आमच्या विरुद्ध वागूं लागले.

'शहा' हे पालबाबूंच्या म्हणण्याप्रमाणें अस्पृश्य मानले जात कीं काय ह्याविषयीं पुढच्या प्रकरणांत जरा अधिक विस्तारानें लिहिलें आहे.

ह्या वादंगासंबंधीं श्री. हेमेन्द्रनाथ दास आपल्या प्रवासींतील लेखांत म्हणतात : ब्राह्मभावापन्न बिपिन बाबू एम्. ए., बी. एल. पास करून श्री हट्ट

---

१. Edward Thompson's Rabindra Nath Tagore. पान ७५

येथें आले तेव्हां तेथें रक्षणशील (Conservative) हिंदु समाज व उदारनैतिक ब्राह्म समाज ह्यांच्यामध्यें भीषण संघर्ष चालला होता. कलकत्त्याहून परत आलेल्या तेजस्वी हिंदु तरुणांना, ते ब्राह्म समाजास मिळाल्यानें श्रीहट्टच्या हिंदूंकडून अपाङ्क्तेय करण्यांत येई. बापानें मुलाचा त्याग केला, थोरल्या भावानें धाकट्या भावाला घरीं येऊं दिलें नाहीं, असलीं पुष्कळ उदाहरणें सांपडतात. बिपिन बिहारी आपल्या आप्तेष्टांच्या दडपणास बळी पडून सनातन हिंदु धर्मासंबंधीं भाषणें करूं लागले. व बिपिनचन्द्र पाल त्यांचा युक्तिवाद खंडन करण्यासाठीं ब्राह्म समाजांत बोलूं लागले. पुनः त्यांच्या युक्तिवादाचें खंडन करून हिंदु धर्माचें प्राधान्य दाखविण्यासाठीं बिपिन बिहारी जनसभेंत भाषण देत. असें ह्या दोघांचें वाग्युद्ध सिल्हटमध्यें बरेच दिवस चाललें होतें. श्री. प्रल्हादचंद्र सेन हे त्या वेळीं शाळकरी विद्यार्थी होते. ते एकदां लेखकाला (श्री हेमेन्द्रनाथ दास ह्यांना) म्हणाले, श्रीहट्टचे विद्यार्थी दोन्ही पक्षांचें वक्तृत्व ऐकून आनंदाचा उपभोग घेत. त्या विद्यार्थ्यांनीं मेधावींना नांव दिलें होतें 'ताजी' (अरबी घोडा) व बिपिन पाल बाबूंना ते म्हणत 'तट्टू'

श्री. हेमेन्द्रबाबूंचें म्हणणें कीं, बिपिन बाबूंनीं आप्तेष्टांच्या आग्रहाला बळी पडून ब्राह्ममत सोडलें व ते सनातनी हिंदु धर्माची बाजू उचलून धरून बिपिन-चंद्र पाल ह्यांच्या विचारांचें खंडन करीत. पण त्यांचें हें म्हणणें मनाला पटत नाहीं. एक तर हेमेन्द्र बाबूंच्याच म्हणण्याप्रमाणें बिपिन बिहारी हे उन्नत चारित्र्यानें, तेजस्वितेनें व स्पष्टवक्तेपणामुळें प्रसिद्धी पावले होते. अशा वृत्तीचा माणूस घरच्या दडपणानें इतक्या सहजासहजीं विरुद्ध मताचा प्रमुख लढवय्या बनेल हें शक्य वाटत नाहीं. उलट शशधर तर्कचूडामणि ह्यांची लढाऊ मशाल त्यांनीं कलकत्त्याहून आणून ती आग आपल्या गांवीं पेटविली असावी हेंच मनाला अधिक पटतें.

हें वादंग चाललें असतांनाच सिल्हटमध्यें एक गमतीची गोष्ट घडून आली. रमाबाईंची कीर्ति महाराष्ट्रापर्यंत पोहंचली होती. त्याच वेळीं कोणी महाराष्ट्रीय पंडित सिल्हटला येऊन दाखल झाले. बिपिन बिहारी पक्षानें ह्या गोष्टीचा फायदा घेण्याचें ठरविलें. एक सभा बोलाविण्यांत आली. सभेला दोन्ही पक्षांची अतोनात गर्दी जमा झाली. रमाबाईंच्या वडील बंधूंनीं अध्यक्षपद सुशोभित केलें. वक्ते एक कडकडीत सनातनी गृहस्थ असून त्यांना आपल्या मातृभाषेखेरीज

आणखी एकच भाषा येते व ती म्हणजे संस्कृत अशी बातमी चहूंकडे पसरली. हे शास्त्रीबुवा हिंदु धर्माचें मंडण करणार व तें संस्कृतमध्यें अशी जोराची जाहिरात झाली होती. मृत समजल्या जाणाऱ्या भाषेंत शास्त्रीबोवा कसे काय बोलतात इकडे सगळ्यांचें लक्ष लागून राहिलें होतें. शास्त्रीबोवा बोलायला लागले. कुतूहल शिगेला पोंचलें होतें. शास्त्रीबोवा अत्यंत विद्वान् असल्याची खात्री त्यांच्या तोंडून बाहेर पडलेल्या पहिल्या एकदोन वाक्यांवरूनच झाली. श्रोतृवृन्द थक्क होऊन गेला. शास्त्रीबोवा अत्यंत सोप्या संस्कृतमध्यें सहज लीलेनें व अस्खलित वाणीनें बोलूं लागले. परंतु हिंदु धर्माचें मंडण करणारें भाषण होणार अशी जी अपेक्षा होती ती शास्त्रीबोवांनीं हळूहळू आपल्या भाषणाचा ओघ जेव्हां प्रचलित हिंदु धर्माच्या विरुद्ध वळविला व त्यांत कसकशा सुधारणेची गरज आहे हें ते सांगूं लागले तेव्हां ढासळूं लागली. पाल बाबू व त्यांची मित्र-मंडळी खूष झाली. हा कोणी जुन्या पद्धतीचा शास्त्रज्ञ नसून अगदीं अद्ययावत् विचार केलेला संस्कृतविद्याविभूषित विद्वान् आहे अशी त्यांची खात्री झाली. तर इकडे बिपिनबाबूंच्या सनातनी पक्षाचा क्षोभ अनिवार होऊं लागला. अध्यक्षांच्या हातांत चिठ्ठयावर चिठ्ठया येऊन पडूं लागल्या कीं, व्याख्यात्यांना मूळपदावर आणा. त्या चिठ्ठया पाहून व्याख्यात्यांनीं एकदम आपला नूर पालटला व ते अस्खलित इंग्रजींत बोलूं लागले: Gentlemen, I must no longer conceal my identity. My name is Shripad Babaji Thakur. I belong to the Bombay Civil Service. I had been to England to pass the usual competitive examination to enter the Civil Service."

आपण मुंबईकडील सरकारी अधिकारी असून आपण तो अधिकार प्राप्त करून घेण्यास लागणारी परीक्षा देण्यासाठीं इंग्लंडला जाऊन आलों आहों व आपलें नांव श्रीपाद बाबाजी ठाकूर असें आहे वगैरे खुलासा व्याख्यात्यांच्या तोंडून ऐकतांच सभेच्या निमंत्रकांचा बोजवारा उडाला व सभेंत एकच गोंधळ उडाला. दुसऱ्या दिवसापासून श्री. ठाकूर पाल बाबूंचेच पाहुणे बनले व त्यांनीं त्यांच्या उतरण्याची सोय एका मुसलमान जमीनदार स्नेह्यांकडे केली.

ह्या नाट्यपूर्ण घटनेचें रहस्य लौकरच बाहेर फुटलें. लोकांची कांहीं गंमत करण्यासाठीं किंवा भारताचा तो रमणीय भूभाग पाहण्यासाठीं श्री. ठाकूर सिल्हटला इतक्या दूर आले नव्हते. सुप्रसिद्ध रमाबाईंपुढें आपल्या विद्वत्तेचें

प्रदर्शन करून त्यांचा हात विवाहांत आपल्या हातीं पडणें शक्य आहे का, हें अजमावून पाहण्यासाठीं त्यांनीं एवढा खटाटोप केला होता! पण त्यांच्या व्याख्यानाला खुद्द रमाबाईंचे बंधु श्रीनिवासशास्त्री अध्यक्ष असूनहि त्या मात्र हजर राहिल्या नाहींत! त्यांना मुद्दाम आमंत्रण देण्यांत आलें होतें, तरी त्यांनीं नकार दिला.

बाईंच्या लिखाणांत एकदोनदां आपल्याला कोणा विद्वान् व श्रीमान् महाराष्ट्रीयानें मागणी घातली असल्याचा उल्लेख आहे. तो उल्लेख श्री. ठाकूर ह्यांच्याच बाबत होय.

श्रीपाद बाबाजी ठाकूर हे मुंबई इलाख्यांतील पहिले आय्. सी. एस्. ते बहुभाषाकोविद होते. मॅट्रिकला त्यांनीं संस्कृत घेतलें होतें, तर ग्रीक भाषा घेऊन ते बी. ए. झाले! ते कऱ्हाडे ब्राह्मण होते. वडिलांची गरिबी असून ते मुंबईंतील एका मोठ्या छापखान्यांत नोकरीला होते. बाबाजींची गरिबी होती तरी दोन प्रार्थनासमाजपंथीय धुरिणांनीं म्हणजे दादोबा पांडुरंगांचे बंधु डॉ. आत्माराम पांडुरंग व रावबहादूर राम बाळकृष्ण ह्यांनीं बाबाजींना उत्तेजन व आर्थिक साहाय्य देऊन त्यांच्या चिरंजीवांचें प्राथमिक शिक्षण करविलें.

श्रीपाद बाबाजींचा जन्म मुंबईंत १८४७ सालीं झाला. त्यांचें शिक्षणहि मुंबईसच झालें. न्यायमूर्ति काशिनाथ त्रिंबक तेलंग हे त्यांचे मॅट्रिकच्या वेळीं सहाध्यायी होते. १८६४ सालीं मॅट्रिक व १८६७ सालीं ते बी. ए. झाले. आरंभीं त्यांनीं मुंबईस डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरचें काम केलें. इतक्यांत त्यांना सर मंगळदास नथुभाई शिष्यवृत्ति मिळाल्यानें ते इंग्लंडला आय्. सी. एस्. चा अभ्यास करण्यासाठीं गेले. तेथें ते बॅरिस्टरहि झाले. सुरेन्द्रनाथ बॅनर्जी व श्रीपाद बाबाजी हे इंग्लंडमध्यें एकाच वेळीं अभ्यास करीत होते. बंगाली मित्रांकरवीं रमाबाईंच्या पाणीग्रहणाची खटपट एका महाराष्ट्रीयानें कशी केली असेल तेंहि कोडें ह्या घटनेनें सुटतें.

श्रीपाद बाबाजींना इंग्लिश, संस्कृत, लॅटिन, हीब्रू, ग्रीक, झेंद, फार्सी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, स्पॅनिश, पाली, अरबी, कानडी, गुजराथी अशा पंधरा भाषा उत्तम अवगत होत्या!

इंग्रजी, मराठी व संस्कृतमध्यें ते उत्तम वक्तृत्व करीत. त्यांना वाचनाचें मोठें

वेड होतें. त्यांचा ग्रंथसंग्रह एवढा मोठा होता कीं साऱ्या भारतांत त्यावेळीं त्याची बरोबरी करणारा ग्रंथसंग्रह कोणाजवळ नव्हता. अचाट स्मरणशक्ति व अष्टपैलू बुद्धिमत्ता ह्यांचें त्यांना उपजत देणें होतें.

संस्कृत कोशरचनेचें काम त्यांनीं आरंभिलें होतें. हिंदु धर्मावर त्यांची अपार श्रद्धा होती. इंग्लंडांत असतां ते मूर्तिपूजेची तरफदारी करणारीं आणि भारतीय संस्कृति व भारतीय विद्या ह्यांचा महिमा पटवून देणारीं भाषणें करीत. शिकारपुरांत सेशन जज्ज असतांना सांस्कृतिक पुनरुज्जीवनच्या अनेक प्रकारच्या योज़ना त्यांच्या डोक्यांत घोळत होत्या. ह्या योजना प्रत्यक्षावस्थेंत आणण्यांत पंडिता रमाबाईंसारखी भागवत—धर्माभिमानी विदुषी आपल्यास सहचारिणी लाभल्यास आपल्याला आपल्या कार्यांत खात्रीनें यशप्राप्ति होईल असें त्यांना वाटत होतें. व त्यासाठीं बाईंना आपली ओळख करून देण्याचा अभिनव प्रयोग त्यांनीं केला. बाई म्हणतात, आपल्या बंधूंच्या मृत्यूनंतर कांहीं बंगाली मित्रांच्या तर्फे कोणीं महाराष्ट्रीयानें त्यांच्यासाठीं पुनः प्रयत्न केला. सुरेंद्रनाथ बानर्जी व ठाकूर इंग्लंडांत सहाध्यायी होते त्यावरून ह्याहि म्हणण्याला दुजोरा मिळतो हें आपण वर पाहिलेंच आहे.

उलट ह्याच कारणानें आपल्याला रमाबाईंचा सहधर्मिणी म्हणून लाभ व्हावा असें त्यांच्या पतीला म्हणजे बाबू बिपिन बिहारींनाहि वाटत होतें असें दिसतें. पंडिता रमाबाई कधींहि ब्रह्मो नव्हत्या. त्या व त्यांचे बंधु भागवत-धर्मावर संस्कृत प्रवचनें करीत. बाबू बिपिन बिहारीदास ह्यांची प्रवृत्ति जरी ब्रह्मो मताकडे असली तरी ते ब्रह्मो समाजाची सोबत सोडून नव हिंदु चळवळींत सामील झाले व आपल्याला आपल्या कार्यांत पंडिता रमाबाईंचा फार उपयोग होईल असें त्यांनाहि वाटत असलें पाहिजे व त्यांनीं स्वतः होऊन बाईंशीं लग्नाची गोष्ट काढली.

परंतु ह्या घटनांनंतर ह्या बहीणभावंडांना डाक्याचें आमंत्रण येऊन त्यांनीं सिल्हट सोडलें

२२ जुलै १८८९ ह्या दिवशीं श्री. ठाकूर ह्यांना शिकारपूर येथें पक्षघात होऊन त्याच दिवशीं त्यांना देवाज्ञा झाली.

न्यायी व निःस्पृह म्हणून त्यांचा लौकिक होता.

रमाबाई त्या दिवशीं श्री. ठाकुरांच्या व्याख्यानाला हजर राहिल्या असत्या तर काय झालें असतें ? ह्या विचाराचें उत्तर—कदाचित् त्याचे फार दूरगामी परिणाम झाले असते असें द्यावें लागतें. रमाबाई व्याख्यानाला मुद्दाम गेल्या नाहींत. कदाचित् हे गृहस्थ अशा अशा अंतस्थ हेतूनें आले आहेत असा त्यांना सुगावा लागला असेल. अद्याप लग्नाचा विचार त्यांच्या मनांत आलेला नसेल. त्यांचे बंधु श्रीनिवासशास्त्री ह्यांच्यावर त्यांचा सारा भरंवसा व तो पाठीराखा होता म्हणून त्यांना अद्याप कोणाच्या आश्रयाची गरज भासली नाहीं. श्रीपाद बाबाजींची मागणी येणार व त्यासाठींच ते येथें प्रगट होत आहेत ही माहिती बाहेर पडल्यावर श्री. मेधावींनीं बाईंना लग्नाविषयीं विचारलें असावें. रमाबाईचें उत्तर, श्रीनिवासशास्त्र्यांचा मृत्यु व नंतर बाईंचा विवाह ह्या गोष्टी आपण मागें पाहिल्याच आहेत. परंतु त्या दिवशीं जर बाई ठाकुरांच्या व्याख्यानाला हजर राहिल्या असत्या, त्यांच्यावर श्री. ठाकूरांच्या विद्वत्तेचा पगडा बसला असता व श्री. ठाकुरांनीं तडकाफडकी श्रीनिवासशास्त्र्यांजवळ गोष्ट काढली असती, तर काय झालें असतें ? विद्वत्ता, मानमान्यता, पैसा इत्यादि कोणत्याहि बाबतींत उणेपणा नसलेल्या ह्या तरुण माणसाची मागणी आपल्या बहिणीच्या हिताचीच असल्याचें पाहून कदाचित् श्रीनिवासशास्त्र्यांनीं होकार भरला असता. श्री. ठाकूर महाराष्ट्रीय व तशांत ब्राह्मण होते हीहि एक गोष्ट असल्या विवाहाला अनुकूल होती.

बाकी गोष्टी झाल्या तशाच झाल्या नसत्या असें धरून चालल्यास कोणाशींहि लग्न केलें असतें तरी रमाबाईंच्या कपाळचें वैधव्य चुकत नव्हतें असें म्हणावें लागेल. फरक एवढाच झाला असता कीं, ठाकुरांशीं त्यांचा विवाह झाला असता तर आणखी ७ वर्षें त्यांच्या सार्वजनिक कार्याला सुरुवात झाली नसती. बाबू बिपिन बिहारीदास ता. ४ फेब्रुवारी १८८२ रोजीं वारले. श्रीपाद बाबाजी २२ जुलै १८८९ रोजीं वारले. म्हणजे बाईंनीं इंग्लंड-अमेरिका करून परत भारत गाठून शारदा सदन स्थापिल्यानंतर चार पांच महिन्यांची ही गोष्ट. श्रीपाद बाबाजींशीं त्यांचा विवाह झाला असता तर आपल्याला शारदा सदनाची गोष्टहि कदाचित् ऐकायला मिळाली नसती.

आणखी एक गोष्ट कदाचित् झाली नसती. रमाबाईंच्या स्फूर्तीनें इंडो-

नेशियांतील जाव्हा बेटांत स्त्रीशिक्षणाचें व स्त्रीसुधारणेचें कार्य सुरू झालें तें होणें शक्य झालें नसतें, कारण हें कार्य सुरू करणारी महिला १८८९ मध्यें कोणत्या स्थितींत असती हें सांगणें कठीण आहे. ह्या बाबतींत पुढें शारदा-सदन ह्या प्रकरणांत अधिक विस्तारानें लिहिलें आहे.

# ५ रमाबाईंचें वैवाहिक जीवन

१८८२ पर्यंत रमाबाई महाराष्ट्रांत आल्याचा उल्लेख कोठें आढळत नाहीं. नाहीं म्हणायला १८६४ सालीं ही मंडळी एकदां जलमार्गानें कुमठ्याहून नावेंत बसून मुंबईस जाण्यासाठीं निघालेली व वाटेंत सदाशिवगडला थांबलेली आढळतात. त्या वेळीं मुंबईस daguerreotype पद्धतीचा फोटो घेण्यांत आला तोहि अस्तित्वांत आहे. त्यानंतर आणखी एकदां श्रीनिवासच्या लग्नासाठीं कदाचित् त्यांचें मुंबईस जाणें झालें असेल. परंतु त्यानंतर तीर्थयात्रेनिमित्त सर्व कुटुंबानें व रमाबाई आणि श्रीनिवास यांनीं केलेल्या अफाट प्रवासांत मुंबईचा किंवा महाराष्ट्रांतील क्षेत्रांचा कोठेंहि उल्लेख येत नाहीं. तरी निदान कलकत्त्यास आल्यावर रमाबाईंचें लक्ष महाराष्ट्रानें वेधून घेतल्याचें दिसतें. त्या इकडचीं बहुतेक वर्तमानपत्रें बोलावून वाचीत, व मधून मधून त्यांत लिहीतहि.

नाशिककडे सौ. अनसूयाबाई ऊर्फ अणुअक्का नांवाच्या एक संस्कृतज्ञ विदुषी प्रगट झाल्या होत्या. त्या पुराणें सांगत व त्यांच्याविषयीं त्या वेळेस वर्तमानपत्रांतून बराच बोलबाला झाला होता. रमाबाईंनीं त्या वेळेस मुंबईच्या इन्दुप्रकाशांत कांहीं लिखाण प्रसिद्ध केलें होतें. ह्या लिखाणावरून बाईंच्या त्या वेळच्या मराठी भाषेची कल्पना करतां येते. त्या भाषेवरून त्यांना महाराष्ट्राची प्रत्यक्ष ओळख फारशी नसावी हें सहज ध्यानांत येईल. खालीं दिलेला उतारा इन्दुप्रकाशाच्या २० ऑगस्ट, १८७९च्या अंकांतून घेतला आहे.

'आज आमच्या म्हणजे स्त्रीजातीच्या जीवनाचें सुप्रभातच झालें म्हटलें पाहिजे. कां न म्हणावें? पाहा! जी प्राचीन माननीय भारतवर्षवासी लोकांची पवित्र भाषा संस्कृत तिचें ज्ञान होणें अति दुर्घट व गहन. त्या भाषेंत लोकाश्चर्यकारक विद्वत्ता संपादन करून सद्वाक्यामृतनिधि एक महिला' हें

सौ. अनसूयाबाईंस उद्देशून आहे. 'मुखचंद्र अज्ञानांधतमसाच्छन्न भारतस्त्रीजन नभोमंडळांत उगवला.' बाईंची मराठी भाषा त्यावेळीं केवढी संस्कृतजड होती हें वरील दोनचार वाक्यांवरून दिसून येईल. त्यांचा मराठीचा संसार त्यावेळीं घरांत जें कांहीं ऐकण्याबोलण्यांत येत असेल तेवढ्यावरच चालला असावा. ह्या पत्रांत अनसूयाबाईंना अशी विनंति केली आहे कीं : 'केवळ पुराण-श्रवणानें बायकांस नीतीचा किंवा धर्माचा चांगला बोध होत नाहीं कां कीं, त्या केवळ कथारसांत निमग्न असतात. म्हणून स्त्रियांस बोध होण्यासाठीं बाईंनीं वक्तृत्व करून धर्मानुसार नीतीनें कोणता मार्ग धरल्यास उन्नति व सुख होईल तो मार्ग रुचण्याचा उपदेश करावा म्हणजे परस्परांची चाल पाहून स्त्रियांची दशा सुधारेल.'

सौ. अनसूयाबाईंना एक विशेष गोष्ट सांगण्यासाठीं रमाबाईंनीं हें पत्र लिहिलें होतें व ती म्हणजे आपली उपदेशाची पद्धत बदला. भारतीय स्त्रियांची उन्नति हा केवळ एकच विषय ह्या विशी उलटून एकविसाव्या वर्षांत पदार्पण करणाऱ्या मुलीच्या मनांत प्रामुख्यानें होता हें पाहून मन आश्चर्यानें थक्क होतें.

सिल्हटला रमाबाईंची व बिपिन बाबूंची जानपछान झाली व श्रीनिवास—शास्त्री व बिपिन बाबू चांगले स्नेही बनले. परंतु त्याच्याहि आधीं म्हणजे बिपिन बिहारी हे गोहटीला तेथील नॉर्मल स्कूलचे मुख्याध्यापक असतांना रमाबाई व श्रीनिवासशास्त्री गोहटीला गेले होते व त्याच ठिकाणीं त्यांचा परिचय झाला होता. बिपिन बिहारींची विद्वत्ता, मधुर चारित्र्य व निष्कपट वागणूक ह्या गुणांमुळें तेथील शिक्षित समाज व सामान्य लोक ह्यांना त्यांच्याबद्दल नितान्त आदर वाटत असल्याचें ह्या भावंडांच्या नजरेंतून निसटलें नाहीं.

रमाबाई व त्यांचे बंधु साऱ्या बंगालभर आतां आपलें कार्य करीत हिंडू लागले. सिल्हटहून तीं भावंडें आतां डाक्क्याला आलीं.

तेथील एका सभेंत रमाबाईंनीं घोषणा केली कीं :

'मला सर्व भारतांतील स्त्रिया एकसारख्याच आहेत. जेथपर्यंत माझ्या शरिरांत रक्ताचा एक बिंदुमात्र आहे तेथपर्यंत आपल्या जातीचे (अर्थात स्त्री-

जातीचें) कल्याण व सुधारणा करण्याच्या कामांत मी पराङ्मुख होणार नाहीं. आजपासून स्त्रीजातीची सुधारणा करायची हें व्रत मीं धारण केलें आहे.'[1]

नेमकें ह्याच वेळेस महाराष्ट्रांतून बाईंना भेटायला एक शिष्टमंडळ आलें. रमाबाईंसंबंधीं एकसारख्या बातम्या व विचार मराठी पत्रांतून प्रसिद्ध होत असत. त्यांतच सुबोधपत्रिकेनें एका संपादकीय स्फुटांत म्हटलें होतें, 'रमाबाईंना महाराष्ट्रांत आणलेंच पाहिजे.' त्यांना इतक्या दूर, परदेशांत 'अनाश्रित' ठेवणें निर्दयपणाचें आहे. पत्रिकेच्या ह्या मताप्रमाणें हें शिष्टमंडळ कलकत्त्याला व तेथून पुढें डाक्क्याला गेलें. त्यांनीं पत्रिकेच्या ह्या मताप्रमाणें बाईंची गांठ घेऊन त्यांना इकडे येण्याचें आग्रहाचें आमंत्रण दिलें. तुमच्या आमंत्रणाचा स्वीकार करण्याचा प्रयत्न मी करीन असें रमाबाईंनीं शिष्टमंडळाला उत्तर दिलें. परंतु इतक्यांत कांहीं घटना इतक्या वेगवान गतीनें घडूं लागल्या कीं रमाबाईंच्या महाराष्ट्रांत येण्याच्या बेताला जोरजोरानें हेलकावे बसूं लागले.

डाक्क्याला आल्यानंतर श्रीनिवासशास्त्री आजारी पडले. त्यांनीं वेळोवेळीं केलेले घोर उपवास, ऐन पौगंडावस्थेंत मद्रासच्या दुष्काळांत झालेली त्यांची आबाळ आणि शेवटीं ४००० मैलांचा पायीं प्रवास ह्यामुळें त्यांची प्रकृति एकसारखी ढासळत चालली होती. त्यांना मृत्यूचें दुःख किंवा भय वाटत नव्हतें. मात्र एकच चिंता त्यांच्या मनास एकसारखी जाळीत होती. आपण गेल्यावर आपल्या तरण्याताठ्या बहिणीचें काय होणार ? ह्या अफाट जगांत तिला कोणीच नव्हतें. त्यामुळें त्यांचा प्राण घुटमळत होता.

"ताई, माझ्यामागें तुझें कोण रक्षण करील ? तुला एकटीला सोडून जायचें ? कसें होईल तुझें ?"

"भाऊ, आपली काळजी वाहणारा परमेश्वर नाहीं का आपल्याजवळ ? कशाला काळजी करतोस माझी ? तो जवळच आहे."

"असा माझा भरंवसा आहे व तुझाहि असेल तर मग काय भय आहे ? देवच तुला सांभाळील" असें म्हणून श्रीनिवासशास्त्र्यांनीं प्राण सोडला.

बाई त्या वेळेस ख्रिस्ती नव्हत्या, परंतु येथून पुढें त्यांचा विश्वास व अनुभव दाविदाच्या तेवीसाव्या स्तोत्रासारखा तंतोतंत बनल्याचें दिसून येतें.

---

१. नवयुग : १९२२ एप्रिल-मे जोडअंक

त्या स्तोत्राचें मराठी भाषांतर प्रा. भवानीशंकर पंडितांनीं येणेंप्रमाणें करून दिलें आहे :

*मला राखी भगवान । नाहीं कशाचीहि वाण ॥*
*माझी भूक वा तहान । करी तोच निवारण ॥*
*नेई सन्मार्गीं तो मला । आत्मा माझा आनंदला ॥*
*काळ जरी मारी मिठी । नाहीं भीती माझ्या पोटीं ॥*
*कारण तो माझ्यामागें । त्याच्या लवाजम्यासंगें ॥*
*करी माझें संरक्षण । तोच माझें समाधान ॥*
*असतांना तो दातारू । वैऱ्यांची कां पर्वा करूं ॥*
*न्हाऊं माखूं तो घालीतो । प्याला भरतो सांडे तों ॥*
*आहे जीवीं ह्या जीव तों । करी कल्याण कृपा तो ॥*
*त्याच्या जाईन मी गांवा । तेथें घेईन विसावा.. ॥*

मातापित्याच्या निधनाच्या वेळीं आलेले अनुभव, त्यांच्या प्रेतक्रियेचे झालेले सोहळे व शेवटीं त्यांच्यानंतर चार वर्षांच्या तीर्थयात्रेंतील अनुभव ह्यामुळें त्या दोघां भावंडांचा प्रचलित हिंदु धर्मावरील विश्वास उडून गेला होता. मात्र हिंदुधर्मावरील विश्वास उडाला म्हणजे परमेश्वरावरील विश्वास उडाला असें नाहीं. ते नास्तिक बनले नव्हते. नास्तिकवादाकडे साऱ्या जन्मांत रमाबाईंची एकदांहि प्रवृत्ति झाली नाहीं.

भावाच्या मृत्यूनंतर रमाबाई अगदींच एकट्या पडल्या. त्या म्हणतात. 'ह्या वेळीं मला किती दुःख झालें तें सांगतां येणार नाहीं. माझ्या बंधूंनीं मरते वेळीं सांगितलें होतें कीं, तुझ्याबरोबर आणि माझ्याहि बरोबर ईश्वर आहे, काळजी करूं नको, तो सर्व कांहीं सुरळित करील. त्यावर विश्वास ठेवून मीं खंबीरपणें धैर्य धरलें.'

श्रीनिवासशास्त्र्यांच्या निधनाची बातमी महाराष्ट्रांत पोंचतांच बाईंच्या भवितव्याबद्दल इकडे पुनः चर्चा सुरू झाली. बाईनीं आतां लग्न करावें असें कित्येकांनीं सुचविलें. रमाबाई आपल्या भावाच्या मृत्यूनंतर डाक्क्याहून कलकत्त्याला आल्या होत्या व तेथें त्यांच्याकडे एकसारख्या लग्नाच्या ह्या सूचना व विनंत्या येऊं लागल्या. बिपिन बिहारींच्या कानीं जेव्हां हें गेले

तेव्हां ते ताबडतोब कलकत्त्यास आले व त्यांनीं बाईंना आपल्या मागणीची आठवण दिली. बाईंनीं त्यांच्या म्हणण्याला रुकार दिला व रजिस्टरनें लग्न करण्याचें त्यांचें ठरलें.

एवढी वीस एकवीस वर्षे वाढलेली ब्राह्मणकन्यका अद्याप अविवाहित राहिली कशी ह्याबद्दल रिकामटेकड्या मेंदूंचे कारखाने जोरजोरानें खडखडूं लागले. त्यांतून एक छानदार कलाकृति बाहेर पडली. ती अशी कीं, बाईंच्या वडिलांनीं पंढरपूरच्या विठोबाशीं बाईंचें लग्न लावून दिल असल्यानें त्यांना दुसरें लग्न करणें शक्य नव्हतें, म्हणून लौकिकांत त्या अविवाहित राहिलेल्या दिसतात. आणि ह्या कारखान्यांतून आणखीहि एक पूरक चीज निर्माण करण्यांत आली. मुलीच्या नशिबांत वैधव्य लिहिलेलें असल्यानें काळाला चकविण्यासाठीं तिच्या डोकेबाज बापानें ही युक्ति करून तिचें वैधव्य टाळलें! रमाबाईंच्या कानांवर ही बाजारगप्प गेली तेव्हां त्या हतबुद्धच झाल्या. त्यांनीं एक लांबलचक पत्रक प्रसिद्ध करून ह्या बातमीचा खोटेपणा व खोडसाळपणा दाखवून दिला. रमाबाई त्या पत्रकांत म्हणतात.

'त्या वेळेस आणि आमचे वडील होते तोंवर पुष्कळ श्रीमंत आणि विद्वान् गृहस्थांकडून मजकरितां मागण्या येत असत. आणि त्या त्या स्थळीं माझें लग्न करून द्यावें म्हणून पुष्कळांचा आग्रह पडे. तरी वडिलांची पूर्वींची प्रतिज्ञा (म्हणजे मुलगीस ज्ञान झाल्यावांचून व तिची खुषी असल्यावांचून तिचें लग्न करून द्यायचें नाहीं ही) चालविण्यांत त्यांचें पाऊल मागें पडलें नाहीं. या त्यांच्या (मुलगी मोठी झाली तरी अविवाहित ठेवली) लोकविलक्षण कृत्याबद्दल त्यांस स्वजनांकडून आणि समाजाकडून फार त्रास सोसावा लागला. तरी ते निस्पृह असल्याकारणानें व कोणाशीं कोणत्याहि प्रकारचा व्यावहारिक किंवा इतर संबंध ठेवीत नव्हते म्हणून समाजाच्यानें त्यांचें कांहीं करवलें नाहीं. कोणी कोणी अशा कल्पना करतात कीं आमचे वडील ज्योतिषशास्त्रांत निष्णात होते. त्यांनीं माझ्या जन्मपत्रिकेंत मला वैधव्ययोग (सप्तमस्थानीं मंगळ असणें) होता, म्हणून माझें लग्न मुळींच न करण्याचा निश्चय केला आणि पंढरीच्या विठोबाबरोबर माझें लग्न करून दिलें. ह्या कल्पनेमध्यें

१. परिशिष्ट ४ पाहा.

काडीचाहि तथ्यांश नाहीं. कारण आमचे वडील देवभोळेपणाचे व भुतें, ग्रह वगैरेंचे उपद्रवास मुळींच जुमानीत नव्हते. खुद्द आमच्या मातोश्रींच्या जन्मपत्रिकेंत वैधव्य-योग असून त्यांनीं तिच्याबरोबर विवाह करून घेतला. तशीच महाराष्ट्र, कर्नाटक आणि द्राविड या देशांतून भुतें, ग्रह, देव, देवी वगैरेंच्या नांवास सोडून देण्याची चाल आहे ती शुद्ध वेडेपणाची आहे असें ते म्हणत असत. असें असून ते स्वतः तसें कृत्य करतील हें कितपत खरें असावें? बरें, जर त्यांनीं आपल्या मुलीला देवालाच अर्पून दिली तर मग तिला आपले घरीं कां ठेवली? सोडून कां नाहीं दिली? पंढरपुरास किंवा द्वारकेस त्यांनीं आपल्या मुलीस देवास समर्पण करून देतांना कोणत्या मनुष्यानें पाहिलें आहे? जर त्या देवळामधून व देवास त्यांनीं आपली मुलगी एखाद्या स्थावर मालमत्तेप्रमाणें भेट केली तर ती परत घेण्याचा त्यांचा काय अधिकार होता? असो. वर लिहिलेल्या लोकांच्या अदृष्टाश्रुत कल्पना माझ्या कानीं आल्या म्हणजे लोकांच्या डोक्यांतून असल्या विलक्षण कल्पना उद्भवतात तरी कशा म्हणून मला फार चमत्कार वाटतो. जे लोक, लोकांच्या तोंडून उडत असलेल्या भलभलत्या गप्पा ऐकून माझी माहिती लोकांस देऊं इच्छितात किंवा देतात, त्यांनीं तसें करूं नये अशी त्यांस माझी विनयपूर्वक सूचना आहे. कारण माझी पक्की माहिती पहिल्यापासून शेवटापर्यंत ज्यास आहे असें माझ्यावांचून दुसरें मनुष्य ह्या जगांत मिळणार नाहीं. जी गोष्ट माझ्या वडिलांच्या किंवा मातोश्रींच्या तोंडून मीं कधीं ऐकली नाहीं अशी जर लोकांनीं आपण ती पाहिली किंवा ऐकिली असें बळेंच म्हटलें तर त्यांस काय म्हणायचें?"[1]

राशीभविष्य, भुतेंखेतें, मृतांच्या आत्म्याशीं बोलणें, इत्यादि गोष्टी बाईंना अगदीं वर्ज्य होत्या. डॉ. आर. ए. ह्यूम हे बाईंची अमेरिकेंतील एक गोष्ट नेहमीं सांगायचे. बोस्टन शहरीं एकदां मृतांच्या आत्म्याशीं बोलणारे एक योगी प्रगट झाले. त्यांच्या प्रयोगांना खूप गर्दी उसळायची. एकदां मोठ्या आग्रहानें बाईंना ह्या प्रदर्शनांत नेण्यांत आलें. बाई आलेल्या कळतांच बुवाजी खूप खुलले. त्यांनीं आपल्या श्रोत्यांना जाहीर केलें कीं आतां रमाबाईंचे वडील प्रगट होत आहेत. योगीराज घुमूं लागले. अनंतशास्त्री आले. नंतर शास्त्री-

१. सुबोध पत्रिका; ८ ऑक्टोबर १८८२.

बोवांनीं बुवांच्या मुखानें आपल्या प्रिय कन्येला हांका मारण्यास सुरुवात केली. 'रेएमा! रेएमा!' हे शब्द ऐकतांच रमाबाई ताडकन उभ्या राहिल्या व म्हणाल्या, माझे वडील मला कधींच रेमा म्हणणार नाहींत, असें म्हणून त्या तेथून निघून गेल्या व सभा उधळली.'[१]

भाऊ वारल्यावर रमाबाई बंगालमध्यें एकट्याच राहिल्या. त्यांना 'परदेशांत अनाश्रित संकटें भोगीत राहूं द्यावें हें फारच अश्लाघ्य' असें महाराष्ट्रांतील कांहीं पुढाऱ्यांस वाटूं लागलें. मुंबईस स्टूडंट लिटररी सोसायटीची मुलींची शाळा होती. तेथील विद्यार्थिनींची संख्या कधीं वाढत नसे, कारण तेथें पुरुष शिक्षक असल्यानें मुलगी दहा वर्षांची झाली कीं तिला तिचे पालक शाळेंतून काढून घेत. बाईंनीं येऊन ही शाळा आपल्या हातीं घ्यावी अशी खटपट सुरू झाली. परिस्थिति कशी आहे तें प्रत्यक्ष पाहून काय तें ठरविण्याचें म्हणून बाईंनीं मुंबईस येऊन जाण्याचें कबूल केलें व तसें करण्यापूर्वीं स्वामी दयानंद सरस्वती ह्यांना भेटायला त्या मेरठला (मिरतला) जाऊन आल्या. इकडे महाराष्ट्रीय पुढारी त्यांच्या आगमनाची वाट पहात बसले असतां त्यांच्या हातीं बाईंच्या ऐवजीं सर्वांनाच थक्क करून टाकणारी एक बातमी येऊन पोहंचली. ती बातमी अशी होती—

'तारीख १३ मिनहूस सिल्हत येथील जज्ज कोर्टांतील वकील बाबू विपिन बिहारीदास एम्. ए., बी. एल्. यांजबरोबर रमाबाईंचा विवाह १८७२ च्या ॲक्टाखालीं होणार आहे.'

रमाबाईंना आपल्यामागें लागलेल्या हितचिंतकांच्या सूचनांतून, कींव करणारांच्या उसाशांतून, काकदृष्टीच्या कटाक्षांतून निसटण्याचा एकच मार्ग होता व तो म्हणजे विवाहबद्ध होऊन आपल्या भोंवतीं पतिरक्षणाचा कोट उभा करणें. भावाच्या मृत्यूला इतके थोडे दिवस झाले होते तरी त्यांना हें लग्न तावडतोब उरकून घ्यावें लागलें. नाहींतर त्यांना ह्या जंजाळांतून मुक्त होणें फार कठीण गेल असतें.

आणि त्याप्रमाणें १३ जून १८८० रोजीं रमाबाईंचें लग्न बांकीपूर येथील

---

१. मराठीप्रमाणें इंग्रजी वर्णमालेचे उच्चार वर्णानुसार नसल्यानें Rama ह्या अक्षरांच्या जुळणीनें होणारा उच्चार रमा, रामा, किंवा रेमा ह्यांपैकीं कांहींहि होण्यासारखा आहे. बुवांना तो 'रेमा' वाटला, परंतु त्यामुळेंच त्यांचें बिंग फुटलें!

रजिस्ट्रारपुढें श्री. बिपिन बिहारी दास ह्यांच्याबरोबर रजिस्टर पद्धतीनें नोंदविण्यांत आलें.

ह्यानंतर साहजिकच रमाबाईंचें महाराष्ट्रांत येणें अगदीं अशक्य कोटींतलें झालें.

रमाबाईंनीं प्रतिलोम विवाह केला. श्री. बिपिन बिहारी हे 'सहा' जातीचे होते. ही जात अस्पृश्य जात असल्याचें श्री. बिपिनचंद्र पाल आपल्या पुस्तकांत म्हणतात. ह्या बाबतींत श्री. हेमेन्द्र नाथ दास आपल्या 'प्रवासी'मधील लेखांत म्हणतात :

'श्रीहट्टांतील प्रतिष्ठित वैश्य साहा कुलांतील होते. नुकतेंच हिंदुस्तान स्टँडर्डमध्यें लिहिलें गेलें आहे कीं, बिपिन बिहारी हरिजन होते. पण त्याच पत्रांत श्री. अनाथदास बंधु ह्यांनीं पत्र लिहून तें विधान खोटें असल्याचें कळविल आहे. १३५६* सालीं मी कलकत्त्यास होतों तेव्हां पाहिलें कीं 'शतजीवनी' नामक पुस्तकांत म्हटलें होतें कीं, बिपिन बिहारी जातीनें 'सूत्रधार' होते. त्यापूर्वीं 'साहित्य संवाद' नांवाच्या पत्रिकेंत म्हटलें होतें कीं महाराष्ट्रीय ब्राह्मणकन्या रमाबाईनें एका 'शूडीशीं' विवाह केला.[१] पण मेधावी हे हरिजन, सूत्रधार किंवा शूडी ह्यांपैकीं कोणीहि नव्हते.'

शहा किंवा साहा ही जात पालबाबू म्हणतात त्याप्रमाणें खरोखरच अस्पृश्य जात होती काय हा मोठा प्रश्न आहे. बाबू बिपिन बिहारीदास हे शूद्र होते असें रमाबाईंनीं आपल्या लिखाणांत दोनतीनदां म्हटलें आहे. खरोखर ती जात अस्पृश्य समाजांत मोडत असती तर तसें उघड सांगायला बाईंनीं कधीं मागेंपुढें पाहिलें नसतें.

बिपिन बिहारींचे आजोबा म्हणजे आईचे वडील वैष्णवचरण दास अष्टपति हे त्या प्रान्तांत एक सबजज्ज होते. त्या काळांत हा हुद्दा ब्राह्मण किंवा कायस्थांदींनाहि मिळणेंकठी ण होतें. शहा जात जर अगदीं—पालबाबू म्हणतात इतकी मागासलेली असती व तिला त्या वेळीं अस्पृश्य मानीत असतील तर

* हें बंगाली वर्ष आहे, ह्यांत ५९४, व सुरू झाल्यावर ५९३ मिळवले म्हणजे इसवी सन मिळतो.

१. शुडी हा बहुतेक दारूविक्रेता असावा. आपल्याकडे कलालवर्ग असतो तसा.

बोवांनीं बुवांच्या मुखानें आपल्या प्रिय कन्येला हांका मारण्यास सुरुवात केली. 'रेएमा! रेएमा!' हे शब्द ऐकतांच रमाबाई ताडकन उभ्या राहिल्या व म्हणाल्या, माझे वडील मला कधींच रेमा म्हणणार नाहींत, असें म्हणून त्या तेथून निघून गेल्या व सभा उधळली.[१]

भाऊ वारल्यावर रमाबाई बंगालमध्यें एकट्याच राहिल्या. त्यांना 'परदेशांत अनाश्रित संकटें भोगीत राहूं द्यावें हें फारच अश्लाघ्य' असें महाराष्ट्रांतील कांहीं पुढाऱ्यांस वाटूं लागलें. मुंबईस स्टूडंट लिटररी सोसायटीची मुलींची शाळा होती. तेथील विद्यार्थिनींची संख्या कधीं वाढत नसे, कारण तेथें पुरुष शिक्षक असल्यानें मुलगी दहा वर्षांची झाली कीं तिला तिचे पालक शाळेंतून काढून घेत. बाईंनीं येऊन ही शाळा आपल्या हातीं घ्यावी अशी खटपट सुरू झाली. परिस्थिति कशी आहे तें प्रत्यक्ष पाहून काय तें ठरविण्याचें म्हणून बाईंनीं मुंबईस येऊन जाण्याचें कबूल केलें व तसें करण्यापूर्वीं स्वामी दयानंद सरस्वती ह्यांना भेटायला त्या मेरठला (मिरतला) जाऊन आल्या. इकडे महाराष्ट्रीय पुढारी त्यांच्या आगमनाची वाट पहात बसले असतां त्यांच्या हातीं बाईंच्या ऐवजीं सर्वांनाच थक्क करून टाकणारी एक बातमी येऊन पोहंचली. ती बातमी अशी होती—

'तारीख १३ मिनहूस सिल्हत येथील जज्ज कोर्टांतील वकील बाबू बिपिन बिहारीदास एम्. ए., बी. एल्. यांजबरोबर रमाबाईंचा विवाह १८७२ च्या ॲक्टाखालीं होणार आहे.'

रमाबाईंना आपल्यामागें लागलेल्या हितचिंतकांच्या सूचनांतून, कींव करणारांच्या उसाशांतून, काकदृष्टीच्या कटाक्षांतून निसटण्याचा एकच मार्ग होता व तो म्हणजे विवाहबद्ध होऊनें आपल्या भोंवतीं पतिरक्षणाचा कोट उभा करणें. भावाच्या मृत्यूला इतके थोडे दिवस झाले होते तरी त्यांना हें लग्न ताबडतोब उरकून घ्यावें लागलें. नाहींतर त्यांना ह्या जंजाळांतून मुक्त होणें फार कठीण गेलं असतें.

आणि त्याप्रमाणें १३ जून १८८० रोजीं रमाबाईंचें लग्न बांकीपूर येथील

---

१. मराठीप्रमाणें इंग्रजी वर्णमालेचे उच्चार वर्णानुसार नसल्यानें Rama ह्या अक्षरांच्या जुळणीनें होणारा उच्चार रमा, रामा, किंवा रेमा ह्यांपैकीं कांहींहि होण्यासारखा आहे. बुवांना तो 'रेमा' वाटला, परंतु त्यामुळेंच त्यांचें बिंग फुटलें !

रजिस्ट्रारपुढें श्री. बिपिन बिहारी दास ह्यांच्याबरोबर रजिस्टर पद्धतीनें नोंदविण्यांत आलें.

ह्यानंतर साहजिकच रमाबाईंचें महाराष्ट्रांत येणें अगदीं अशक्य कोटींतलें झालें.

रमाबाईंनीं प्रतिलोम विवाह केला. श्री. बिपिन बिहारी हे 'सहा' जातीचे होते. ही जात अस्पृश्य जात असल्याचें श्री. बिपिनचंद्र पाल आपल्या पुस्तकांत म्हणतात. ह्या बाबतींत श्री. हेमेन्द्र नाथ दास आपल्या 'प्रवासी'मधील लेखांत म्हणतात:

'श्रीहट्टांतील प्रतिष्ठित वैश्य साहा कुलांतील होते. नुकतेंच हिंदुस्तान स्टॅंडर्डमध्यें लिहिलें गेलें आहे कीं, बिपिन बिहारी हरिजन होते. पण त्याच पत्रांत श्री. अनाथदास बंधु ह्यांनीं पत्र लिहून तें विधान खोटें असल्याचें कळविल आहे. १३५६* सालीं मी कलकत्त्यास होतों तेव्हां पाहिलें कीं 'शतजीवनी' नामक पुस्तकांत म्हटलें होतें कीं, बिपिन बिहारी जातीनें 'सूत्रधार' होते. त्यापूर्वीं 'साहित्य संवाद' नांवाच्या पत्रिकेंत म्हटलें होतें कीं महाराष्ट्रीय ब्राह्मणकन्या रमाबाईनें एका 'शूडीशीं' विवाह केला.[1] पण मेधावी हे हरिजन, सूत्रधार किंवा शूडी ह्यांपैकीं कोणीहि नव्हते.'

शहा किंवा साहा ही जात पालबाबू म्हणतात त्याप्रमाणें खरोखरच अस्पृश्य जात होती काय हा मोठा प्रश्न आहे. बाबू बिपिन बिहारीदास हे शूद्र होते असें रमाबाईंनीं आपल्या लिखाणांत दोनतीनदां म्हटलें आहे. खरोखर ती जात अस्पृश्य समाजांत मोडत असती तर तसें उघड सांगायला बाईंनीं कधीं मागेंपुढें पाहिलें नसतें.

बिपिन बिहारींचे आजोबा म्हणजे आईचे वडील वैष्णवचरण दास अष्टपति हे त्या प्रान्तांत एक सबजज्ज होते. त्या काळांत हा हुद्दा ब्राह्मण किंवा कायस्थांदींनाहि मिळणें कठीण होतें. शहा जात जर अगदीं–पालबाबू म्हणतात इतकी मागासलेली असती व तिला त्या वेळीं अस्पृश्य मानीत असतील तर

---

* हें बंगाली वर्ष आहे, ह्यांत ५९४, व सुरू झाल्यावर ५९३ मिळवले म्हणजे इसवी सन मिळतो.

१. शुडी हा बहुतेक दारूविक्रेता असावा. आपल्याकडे कलालवर्ग असतो तसा.

एवढ्या हुद्द्यावर त्यांच्यापैकीं कोणी त्या काळांत चढला नसता. मेघनाथ शहा ह्याचें नांव बंगालमध्यें एक मोठा 'सायन्टिस्ट' म्हणून एक वेळ दुमदुमत होतें, ते ह्याच जातींतील. आज जरी कांहींहि शक्य असलें, तरी त्या काळीं अस्पृश्यांच्या एखाद्या जातींतून असा माणूस निघणें किंवा निघूं देणें शक्य नव्हतें. शहा जातींतील आणखी किती तरी विद्वानांचीं नांवें सांगतां येतील.

मैमनसिंग बंगाल डिस्ट्रिक्ट गॅझेटमध्यें[1] खालच्या जातींची एक यादी दिली आहे. ती खालच्या जातींची आहे. शब्द वापरले आहेत ते Lower Caste असे आहेत. Untouchable असा शब्द वापरलेला नाहीं. ह्या यादींत मात्र चांभार, धोबी, डोंब, तेली, मोची, नामशूद्र, राजबन्सी, कुंभार इत्यादि नांवांबरोबर शाहा हें नांव आढळतें. पण ह्या यादींतील कोणालाहि अस्पृश्य म्हणून म्हटलें नाहीं हें लक्षांत ठेवायला हवें.

सिल्हट हा तसें पाहतां पूर्व बंगाल प्रान्ताचा एक भाग आहे. पूर्व बंगालमध्यें ज्या तत्त्वांवर जातिव्यवस्था आधारलेली आहे त्याच तत्त्वांवर ती येथेंहि आधारलेली दिसून येते. परंतु सरहद्दीच्या भागांत सामाजिक रीती-भातींना थोडासा ढिलेपणा असणें अपरिहार्य असतें, तसेंच तें येथेंहि होतें. 'वैद्य' आणि 'कायस्थ' ह्यांच्यांत आपसांत बेटीव्यवहार होतात. आणि पुष्कळ वेळेला कायस्थ मुली खालच्या जातींत देण्यांत येतात. ह्यामुळें मुलीची उच्च जात नष्ट होऊन ती आपल्या नवऱ्याच्या जातीची बनते. मात्र त्यामुळें मुलीचीं माणसें जातीबहिष्कृत होत नाहींत. सिल्हटमधील 'शहा' ही जात एक व्यापारी जात असून त्यांनीं फार पैसा कमावलेला आहे. समाजांतहि त्यांचा दर्जा फार चांगला असतो.

एका आंग्लो बंगाली शब्दकोशांत 'साहा' ह्या शब्दाची अशी फोड केली आहे : 'Surname of several mixed castes in Bengal especially the distiller caste, 'शाहा' जरी 'वैद्य' कायस्थांच्या मुली करीत तरी ब्राह्मणांच्या मुली करीत असा उल्लेख कोठें सांपडत नाहीं.

कर्णाला सूतपुत्र म्हणून हिणविणाऱ्यांना त्यानें जें बाणेदार उत्तर दिलें त्यांत थोडा बदल करून बिपिन बिहारींबद्दल म्हणतां येईल कीं 'विप्रः

1. Bengal District Gazetteer Mymansing, page 29.

शूद्रोऽतिशूद्रो वा यो वा को वा भवाम्यहं। दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम्।' विपिन बाबूंना शूद्र म्हटलें काय किंवा अतिशूद्र म्हटलें काय, सूत्रधार म्हटलें काय किंवा शूडी म्हटलें काय, हरिजन म्हटलें काय किंवा अस्पृश्य म्हटलें काय, त्यांचें असाधारण व्यक्तिमत्त्व नष्ट होत नाहीं. ते खरे खरे मेधाविन् होते, व जेथें जेथें त्यांनीं वास्तव्य केलें तेथील शिक्षितांनीं व अशिक्षितांनीं त्यांना मानच दिला आहे. पंडिता रमाबाईंसारख्या तेजस्वी बुद्धिमतीनें त्यांचा पति म्हणून स्वीकार केला होता. त्यांच्या जातीचा प्रश्नच कोठें उरतो? त्यांच्या चरित्रावरून ते कोणालाहि वंदनीयच वाटले असते. आणि रमाबाईंनीं ह्या बाबतींत दाखविलेल्या समदृष्टीची, धैर्याची व उदारतेची वाहवा करतांना लेखण्या व जिभल्या थकून गेल्या तरी त्यांना ती पुरेशी करतां येणार नाहीं.

अत्यंत खेदाची गोष्ट म्हणजे रमाबाईंच्या ठायीं क्षुद्र जातीयता होती असला आभास उत्पन्न करण्याचा प्रयत्न ह्या क्षणापर्यंत करण्यांत येतो ही. त्यामुळें खालील दोन विधांनाचा येथेंच समाचार घेणें भाग पडत आहे.

'ज्या ब्राह्मणांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारला त्यांचे दोन भाग पडतात. त्यांतील एक भाग फारच मोठा आणि दुसरा अत्यंत लहान आहे. धर्मांतरानंतर मोठा भाग मांसाहारी बनला. दुसऱ्या अत्यंत लहान भागांत पंडिताबाई, भास्करराव गोवंडे, आणि कविवर्य नारायण वामन टिळक ही मंडळी होती. ती शेवटपर्यंत शाकाहारीच राहिली. इंग्लंड-अमेरिका या देशांत असतांना देखील बाई शाकाहारीच राहिल्या. त्यांनीं धर्म बदलला होता पण आचरणानें त्या अगदीं वैष्णव होत्या. त्या कांदा लसूण देखील खात नसत.'

पुढें पाहा :

'पण रोटीव्यवहाराच्या वेळीं मोठी अडचण भासूं लागली.'[1]

पहिली गोष्ट रमाबाई मुळींच वैष्णव उरल्या नव्हत्या. कांदा लसूण न खाणें हें वैष्णवतेचें लक्षण नाहीं. कुत्रीं मांजरें सुद्धा कांदा लसूण खात नाहींत. पण तेवढयानें तीं वैष्णव बनलीं असें म्हणतां येणार नाहीं. दुसरें, बाईंना स्वतःला जरी मांस आवडत नसलें तरी तेवढ्यामुळें त्यांनीं मांसाहारी लोकांना

१. 'अनुराधा' एप्रिल १९६० पृष्ठ १७

अपंक्त लेखिलें नाहीं. अमेरिकेंत त्यांच्या सन्मानार्थ मोठमोठ्या जेवणावळी झालेल्या असल्याचें मिसेस् डायर आपल्या पुस्तकांत म्हणतात. त्या जेवणावळींत बसून बाई जेवल्या होत्या व त्यामुळें आपण 'बाटलों' असें त्यांना कधीं वाटलें नाहीं. खुद्द रमाबाईंची मुलगी मांसाहारी होती व त्यामुळें रमाबाईंनीं मुलीबरोबर अन्नव्यवहार करण्याचें सोडून दिलें नव्हतें. आणि नारायण वामन टिळक तर ख्रिस्ती झाल्यापासून शेवटपर्यंत मांसाहारी होते ह्याची पक्की माहिती लेखकाला आहे ! टिळकांच्या पत्नी लक्ष्मीबाई शाकाहारी होत्या तरी वांईस, त्या अगदीं जुन्या काळांत भंग्याच्या घरीं जाऊन जेवून आल्या होत्या.[1] ह्यांच्यापैकीं केवळ भास्कररावांच्या अंगीं लेखक म्हणतात त्याप्रमाणें रोटी-व्यवहाराचें भय असेल परंतु बाईंच्या अगर टिळकांच्या अंगीं तें होतें असें म्हणणें म्हणजे ह्या व्यक्तींची विनाकारण नालस्ती करण्यासारखें आहे. टिळकांनीं म्हटलेंच आहे.

*सोडिली मीं जात जात निर्मियो*
*असे देवराया न हो कधीं*[2]

आतां हें पहा:

'ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यावरहि बाईंच्या मनांत पुनर्विवाहाचा विचार आला असता तर कुकडे, ढवळे, लेले, आठवले, करमरकर अशा ख्रिस्ती झालेल्या एखाद्या ब्राह्मणाशीं त्यांना पुनर्विवाह सहज करतां आला असता.'[3]

ज्या बाईला ख्रिस्ती होण्यापूर्वी आणि तोहि ज्या काळांत जातिभेदांच्या साखळदंडांनीं माणूस करकचून आवळून बांधला गेलेला होता अशा काळांत एका शूद्राशीं किंबहुना बिपिनचंद्र पालच्या म्हणण्याप्रमाणें एका अस्पृश्याशीं विवाहबद्ध होण्यास मुळींच कमीपणा वाटला नाहीं तिला, ज्या धर्मानें सर्व भेदाभेद झुगारून दिलेले, त्या धर्माची अनुयायी झाल्यावरहि असल्या कुकडे-ढवळे-लेले-आठवले-करमरकरांच्या प्राप्तीच्या संभवानें हर्षवायु होणार होता काय ?

---

१. साठ वर्षांपूर्वी : स्मृतिचित्रें भाग २ पृष्ठ ९२–९३
२. अभंगांजलि पृष्ठ ६५ अभंग १९४ .
३. उतारा 'अनुराधा' एप्रिल १९६० : पृष्ठ २०

बाईंना हो नाहीं म्हणणारें कोणीं नव्हतें. त्या आपल्या भविष्याची दिशा ठरविण्यास पूर्ण मुखत्यार होत्या. पण बिपिन बाबूंची मात्र परिस्थिति तशी नव्हती. त्यांच्या जातींत 'वैद्य' वा 'कायस्थ' मुली आल्या होत्या व त्यांचें कोणाला विशेष वाटत नव्हतें. पण एका ब्राह्मणाबरोबर त्यांचें विवाहबद्ध होणें जातीरिवाजाच्या विरुद्ध होतें! त्यामुळें तो विवाहविधिहि त्यांच्या गांवीं किंवा जवळपास कोठें होणें जवळजवळ अशक्य होतें. सिल्हटपासून अत्यंत दूर अशा एका जिल्ह्याच्या ठिकाणीं म्हणजे बांकीपूर येथें जाऊन हें विवाहकार्य उरकून घ्यावें लागलें. शिवाय बांकीपूरला मिस्टर व मिसेस्. बिव्हरेज नांवाच एक इंग्रज कुटुंब होतें. त्यांनीं ह्याच कायद्याखालीं रजिस्टर लग्न केल होतें, त्यांचें साह्य व सहानुभूति आपल्याला लाभेल असें श्री. बिपिन बाबूंना वाटलें असावें, व खरोखरच त्या इंग्रज जोडप्यानें त्यांना त्या वेळीं खूप साहाय्य केलें.

लग्नानंतर बिपिन बाबूंनीं सिलचर येथें वकिली करण्यास सुरुवात केली. ह्या लग्नामुळें त्यांना जातिबहिष्कृत व्हावें लागलें तरी भारतीय व युरोपियन समाजांत त्याना चांगली मानमान्यता होती. घरीं प्रेमळ पत्नीचा सहवास व सुख होतें. वकिलीचा जम चांगला बसूं लागला होता. ह्यामुळें आपण जातिबहिष्कृत झालों आहों ह्या गोष्टीची त्यांना कांहीं खंत वाटली असेल असें नाहीं.

ह्या जीवनांतील एकाच विशेष गोष्टीचा उल्लेख आढळतो. मेधावी कोर्टाच्या कामांत नेहमीं निमग्न असायचे व दिवसभर त्या कामानिमित्तानें बाहेर जायचे. पण त्यांच्या घरचा पुस्तकसंग्रह चांगल्यापैकीं होता. त्याचा रमाबाई दुपारच्या वेळीं खूप फायदा घ्यावयाच्या एकदां त्यांना त्या संग्रहांत बंगाली भाषेंत लूककृत शुभवर्तमान सांपडलें. ह्यापूर्वीं बाईंनीं खिस्ती धर्माचें स्वभाषेंत पुस्तक पाहिल नव्हतें, एकदां कोणीं त्यांना संस्कृत नवा करार दिला होता, परंतु तें संस्कृत क्लिष्ट वाटल्यानें रमाबाईंनीं तो वाचला नाहीं. त्यांनीं हें बंगाली शुभवर्तमान मात्र वाचून काढलें. त्यांच्या मनांत मोठें कुतूहल उत्पन्न झालें. मेधावी कामावरून परत आल्यावर रमाबाईंनींच त्यांना ह्या पुस्तकासंबंधीं सांगितलें. मेधावींना त्याबद्दल कौतुक वाटून त्यांनीं शेजारीं राहणाऱ्या ॲलन नांवाच्या मिशनरीला बोलावून आणून

त्यांच्याशीं आपल्या पत्नीची ओळख करून दिली. ते रमाबाईंना म्हणाले, 'तुला अगदीं एकटें एकटें वाटत असेल. हे मिशनरी साहेब येऊन तुला बायबलसंबंधीं माहिती देत जातील. तुझाहि वेळ कंटाळवाणा जाणार नाहीं. मीं हें पुस्तक वाचलें आहे व त्यांतील शिक्षण मला आवडतें.'

रमाबाई अशा रीतीनें बायबलचा अभ्यास करूं लागल्या.

परंतु ह्यावरून पुढें नवराबायकोंत खटका उडून मि. ॲलनचें येणें जाणें बंद झालें. ह्याविषयीं पुढें प्रकरण ६ व ८ मध्यें थोडें अधिक विस्तारानें लिहिलें आहे.

पण ह्या एका बनावाखेरीज त्यांच्या वैवाहिक जीवनामध्यें कांहीं दुसरा दुःखदायक प्रकार झाला नाहीं. फारच सुखाचे असे ते दिवस पाहतां पाहतां निघून गेले. एक वर्षाच्या आंत त्यांच्या त्या सौख्याची चालती बोलती प्रतिमा मनोरमेच्या रूपानें अवतीर्ण झाली. ईस्टरच्या पूर्वरात्रीं म्हणजे शनिवार ता. १६ एप्रिल १८८१ रोजीं रात्रीं मुलीचा जन्म झाला. बिपिनबाबूंनीं आपल्या डायरींत तें टिपून ठेवलेलें होतें व डायरीचें तें एक पान मनोरमेनें जन्मभर आपल्या संग्रहीं जिवापलीकडे जपून ठेवलें होतें.

परंतु काळाला रमाबाईंचें सुख पाहवलें नाहीं. अठरा एकोणीस महिने हा सुखी संसार पाहिल्यावर त्यानें श्री. बिपिन बिहारीदास ह्यांच्यावर झडप घातली. ३ फेब्रुवारी १८८२ रोजीं रमाबाई इन्फ्लुएन्झानें आजारी पडल्या. त्याच दिवशीं त्यांची नोकरीणहि आजारी पडली. बिपिन बाबूंना एक फार महत्त्वाचा मुकदमा त्या दिवशीं कोर्टांत चालवायचा होता, तेव्हां त्यांना घरांत लक्ष देण्यास पुरेसा वेळ नव्हता. सायंकाळीं कोर्टांतील काम आटोपून घरीं येतात तों पत्नी तापानें फणफणली असून मनोरमेच्या खाण्याकडेहि कोणीं पाहिलेलें नाहीं! तिला त्यांनीं खायला घालून निजविल्यावर मग त्यांना बायकोकडे व स्वतःकडे लक्ष द्यायला फावलें. त्यांचा आहार फार मोठा असे, पण त्या दिवशीं घरांत कांहीं नव्हतें. तेव्हां त्यांनीं पोटभर फुटाणे खाऊन आपली भूक शमविली. रात्रीं पोटांत कळ येऊन ओकाऱ्या होऊं लागल्या. डॉक्टरांनीं सांगितलें हा Asiatic Chollera आहे. अनेक उपाय केले पण कांहीं उपयोग झाला नाहीं. ता. ४ ला पहांटे मेधावींचें प्राणोत्क्रमण झालें. रमाबाई 'बी. बी.' असें म्हणून शोक करूं लागल्या व त्यांत त्यांना मूर्छा आली. त्या आपल्या पतीला बी. बी. म्हणत.

पहिल्यापासून शेवटपर्यंत श्री. हेमेंद्रनाथ दास ह्यांचे वडील महेन्द्रनाथ दास व श्री. प्रल्हादचरण दास अष्टपति रोग्याच्या शय्येजवळ होते. बिपिन बिहारी जातिबहिष्कृत असल्यानें शवदहनाकरितां कोणी येईना. तेव्हां महाप्राण श्री. राम हरिचरणदास बहादूर ह्यांनीं पुढें होऊन शवाची व्यवस्था केली. श्री. महेंद्रनाथ दास, श्री. प्रल्हाद बाबू व आणखी दोन छात्र ह्यांनीं बाकीचीं कार्यें उरकलीं. ह्या सर्वांना प्रायश्चित्त देण्याचा घाट घालून सनातनी एकमेकांच्या कानांत कुजबुजत होते, पण रायबहादुरांच्या प्रयत्नानें कोणाहि प्रेतवाहकावर तसा प्रसंग आला नाहीं.

आई, बाप व शेवटीं पति अशा तीन प्रिय माणसांच्या प्रेतक्रियांचे झालेले हे सोहळे पाहून त्या कोमल स्त्रीला काय वाटलें असेल ह्याची कल्पनाच करावी. बाई पुनः एकट्या पडल्या. नाहीं म्हणायला नऊदहा महिन्यांच्या मनोरमेचा तेवढा त्यांना आधार राहिला. बाप, आई, बहीण, एका पाठीमागून एक पटापट गेलीं. त्यांच्यानंतर ज्यानें ह्या सर्वांची जागा भरून काढली होती तो एकुलता एक पाठीराखा भाऊ, तोहि गेला! आपलें म्हणायला आतां जगांत कोणी राहिलें नाहीं, तेव्हां लग्न केलें. तर भारतीय स्त्रियांवर ज्या एका प्रसंगानें आपल्या सर्वस्वाची होळी करण्याची पाळी येते ती वैधव्यदशाच रमाबाईंवर कोसळली!

ह्या घटनेसंबंधीं डॉक्टर अण्णासाहेब कर्वे आपल्या आत्मचरित्रांत लिहितात, 'कित्येक वेळेला मनुष्यावर दुःखाचे प्रसंग येतात ते बरे कीं वाईट, हें ठरविणें मोठें कठीण असतें. वैधव्य प्राप्त होणें ह्याहून अधिक दुःखकारक प्रसंग हिंदु स्त्रियांच्या आयुष्यांत नाहीं ही गोष्ट कोणीहि कबूल करील; पण शहाण्या स्त्रियांनीं त्या प्रसंगाचा सुद्धा स्वतःच्या व इतरांच्या उन्नतीच्या कामीं उपयोग करून घेतला आहे. याचें एक ठळक उदाहरण पंडिता रमाबाई होत. हा प्रसंग जर त्यांच्यावर न गुदरता तर जी अमोलिक लोकसेवा त्यांच्या हातून घडली ती कधीं घडली नसती. जो प्रसंग एकाला अधोगतीला नेण्यास कारण झाला तोच दुसऱ्याला उन्नतीप्रत नेऊं शकतो."[१]

रमाबाईंना बहिष्कृत मानण्यांत येत असल्यानें पतिनिधनानंतर सासरीं

---

१. कर्वे : आत्मवृत्त, पृष्ठ ११४.

राहणें त्यांना अशक्य होतें. त्यांनीं तो प्रदेशच सोडला. तो सोडतांना बरोबर पतिगृहांतून त्यांना कांहींहि नेतां आलें नाहीं. केवळ पतीनें अभ्यासाच्या निमित्तानें केव्हां तरी अडीचशें रुपयांचें ऋण करून ठेवलें होतें तें फेडण्याची नैतिक ज़बाबदारी शिरावर घेऊन त्यांनीं सिलचर सोडलें. तें अडीचशें रुपये त्यांनीं महाराष्ट्रांत आल्यावर फेडून टाकले.

रमाबाईंच्या आयुःक्रमाला निराळी दिशा लागली. कोणत्याहि संकटाला तोंड देण्याचें अलौकिक सामर्थ्य त्यांच्या अंगीं होतें ही गोष्ट ह्या वेळीं चांगली प्रत्ययाला आली.

*'सागर पोहत बाहुबळानें*
*नांव तयास मिळो न मिळो रे*
*स्वतःच तेजोनिधि जो भास्कर*
*तद्गृहिं दीप जळो न जळो रे*
*जो करि कर्म अहेतु निरंतर*
*दैव तयासि वळो न वळो रे.'*

कवि अण्णाजी बोबडे ह्यांचे हे बोल रमाबाईंच्या पुढील चरित्रावरून किती सार्थ आहेत हें दिसून येतें.

## ६ पुणें

ह्यानंतर, परदेशांत घालवलेलीं वर्षें सोडल्यास, पुणें व त्याचा परिसर हीच रमाबाईंची कार्यभूमि ठरली. पुण्याची ऐतिहासिक परंपरा शिवाजी महाराजांपर्यंत सहज पोंचते. महाराजांनीं बाळपणांत शिस्तीचे धडे पुण्यांत घेतले व शाईस्तेखानास शासन देण्याचा अद्वितीय पराक्रम अगदीं तरुणपणीं तेथेंच केला. तरी पण सध्याच्या पुण्याच्या महात्म्याचा पाया पहिल्या बाजीरावांनीं घातला. तेथूनच कर्तबगार पुरुषांची व स्त्रियांची अभिमान बाळगण्यासारखी एक परंपराच—दुसऱ्या बाजीरावाचा थोडासा काळ सोडल्यास—पुण्यास दाखवितां येईल. मात्र हीं कर्तबगार माणसें पिढीजात पुणेकर होतीं असें क्वचितच सांपडेल. रानडे, टिळक, गोखले, आगरकर हे सर्वजण बाहेरून पुण्यास येऊन स्थायिक झाले होते. केवळ थंड गोळा होऊन पडलेल्या महाराष्ट्रास रानड्यांनीं नवचैतन्य दिलें असें लो. टिळकांनीं यथार्थपणें म्हटलें आहे. नोकरीनिमित्त रानडे ह्यांस मुंबईस व इतर शहरीं राहावें लागलें, तरी त्यांना पुण्याबद्दलच विशेष आपलेपणा वाटत होता. व त्यांच्यामुळेंच पुणें ही महाराष्ट्रांतील कार्यकर्त्यांची मक्का बनली होती. राष्ट्रीय सभेचें पहिलें अधिवेशन पुण्यास व्हायचें पण आयत्या वेळीं रोगाची साथ उद्‌भवल्यामुळें तें मुंबईस हालविण्यांत आलें. महाराष्ट्र साहित्य संमेलनाचीहि जन्मभूमि पुणेंच. 'यः क्रियावान् स पंडितः' ही परंपरा म. म. दत्तो वामन पोतदार ह्यांच्यासारख्यांनीं पुढें चालविल्यामुळें पहिली भारत इतिहास परिषद, तसेंच पहिली पौर्वात्यविद्या परिषद पुण्यांतच झाली. महाराष्ट्रांतील लोकांस 'संस्था' बनविण्यास रानडे ह्यांनींच शिकविलें. पुण्यास आज शिवाजी महाराजांच्याच काय पण पेशव्यांच्याहि खुणा फारशा राहिल्या नाहींत. पण संस्था व पक्ष हीं पुण्यांत भरपूर प्रमाणांत सांपडतील.

'पुणें म्हणजे कार्यकर्त्यांचें मोहोळ' असें राजेन्द्रप्रसाद ह्यांनीं म्हटलें आहे. हिंदुस्थानच्या राजकीय जागृतींत पुण्याचा वांटा फार मोठा आहे. गेल्या तीनशें वर्षांत महाराष्ट्रानें एकदां शिवाजी महाराजांच्या रूपानें तर एकदां लोकमान्य टिळकांच्या रूपानें दोन युगपुरुष निर्माण करून एकदां मोंगलाईस तर एकदां आंग्लाईस शह देऊन साऱ्या भारताचें पुढारीपण मिळविलें.

ब्रिटिश राजवटींतील राजकीय जागृतींत पुण्याचा वांटा फार मोठा होता. परंतु तितकाच तो सामाजिक जागृतींतहि होता. ह्या कार्यकर्त्यांना छळ सोसावा लागला हें अगदीं खरें, पण लोकांनीं स्वस्थ बसण्यापेक्षां आपल्या मताबद्दल असा आग्रह धरलेलाच रानड्यांसारख्या विचारवंतांना आवडे. कोणींसें म्हटलें आहे कीं, पुण्याच्या हवेंत द्विदल बीजांची उत्पत्ति लौकर होते. पक्षभेद अगदीं तीव्र सीमेपर्यंत नेऊन पोंचविलेला पुण्यास आढळेल. रमाबाईंच्या वेळेला टिळक व आगरकर हे दोन विरोधी पक्षाचे प्रभावी प्रचारक होते. त्या वेळच्या लेखनाचा आवेश व हिरीरी कांहीं वेगळीच! पक्षभेदाची ही तीव्रता रमाबाईंच्या कार्यास बाधली, पण उलट त्यांच्या कार्यानें ह्या लोकांनाहि विचार करावयास लावलें. 'हिंदु शारदासदन कां नाहीं?' हा जो प्रश्न पुढें आगरकरांनीं विचारला तो काय सुचवितो?

तसें पाहिलें तर राजमाता जिजाबाई सोडल्या तर पहिल्या बाजीरावांच्या मातोश्री राधाबाई ह्यांच्यापासून सुधाबाई जोशींपर्यंत पुण्यास कर्तबगार स्त्रियांची परंपरा[1] जशी दाखवितां येते तशी सकारण वा निष्कारण पुणेकरांनीं छळ केल्याचीं उदहारणेंहि त्या दुसऱ्या पेशव्यांपासूनच दाखवितां येतात. पुढें आगरकरांची त्यांच्या जिवंतपणींच प्रेतयात्रा कांहीं पुणेंकरांनीं काढली तर सुधारक पत्राचे नंतरचे एक संपादक वासुदेव बळवंत पटवर्धन ह्यांना शारीरिक इजाहि केली गेली होती. फार कशाला? पटेल बिलाच्या वेळेला केळकरांनाहि ह्या छळाची चुणूक भासली. ह्यांत राधाबाई किंवा सुधाताई ह्यांचाहि

---

१. १९४९ सालीं पुण्यास भरलेल्या महाराष्ट्र साहित्य सम्मेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून म. म. पोतदारांनीं त्या परिसरांत होऊन गेलेल्या व असलेल्या कर्तबगार व्यक्तींचें स्मरण केलें. पण त्यांना फक्त एकाच स्त्रीचें स्मरण त्या वेळेस झालें. तेंहि डेक्कन कॉलेज रिसर्च इन्स्टिटयूटच्या अनुषंगांत मनुष्यमापन शास्त्राची सामग्री जुळविणाऱ्या विदुषी सौ. इरावतीबाई कर्वे ह्यांचें.

पुणेंकरांनीं छळ केला असें सुचवावयाचें नाहीं. किंबहुना रूढी मोडणाऱ्याहि स्त्रियांच्या छळाचें स्वरूप पुरुषांच्या छळापेक्षां भिन्न होतें. त्यांच्यावर कशी टीका होई ह्याचा एक अल्पसा नमुना काशीबाई कानिटकरांच्या शब्दांत ह्याच प्रकरणांत इतरत्र दिला आहे. म्युनिसिपल शाळामंडळाचे एक सभासद व 'भावे स्कूल' ह्या पुण्यांतील एका प्रसिद्ध शाळेचे संचालक ह्यांनीं जोडे व छत्री वापरण्याबद्दल शिक्षकांवर टीका केल्याचा व काशीबाईंच्या चुलत सासऱ्यांनींच त्यांचा पाठपुरावा केल्याचा उल्लेख 'सुधारक' पत्रांत आढळतो. 'देशाभिमानी व धर्माभिमानी म्हणविणाऱ्या पत्रांकडून' होत असलेल्या शिव्यांचा अखंड भडिमार आपल्याबरोबरच आपल्या निरपराध स्त्रीलाहि सोसावा लागत असल्याचें आगरकरांनीं महाराष्ट्रीयांस लिहिलेल्या 'अनावृत्त पत्रांत' म्हटलें आहे.

ज्योतीबा फुले ह्यांच्या पत्नींना कशा छळाला तोंड द्यावें लागलें तें बहुतेकांस माहीत असेल. रमाबाईंच्या छळाचें स्वरूप मुख्यतः वर्तमानपत्रीं हल्ल्याचें होतें. कांहीं कांहीं वेळेला हा हल्ला इतक्या गलिच्छ स्वरूपाचा असे कीं एकदां 'पुणें वैभव'कारांना कोर्टांतून अद्दल घडवून देणें रमाबाईंना भाग पडलें होतें.

रमाबाई महाराष्ट्रांत आल्या त्या प्रथम मुंबईस गेल्या. तेथून मात्र त्या ताबडतोबच पुण्यास आल्या. त्या येथें येऊन पोंचण्याच्या आधींच त्यांची कीर्ति येऊन पोंचली असल्याचें त्यांना आढळलें. त्या वेळेस पुण्यांत बायकांची एक सभा भरत असे. ह्या 'सभेचा' बोभाटा नव्हता. केरूनाना छत्रे येथें येत व जमलेल्या बायकांना कांहीं तरी शिक्षण देत. बंगाल किंवा उत्तर हिंदुस्थानांत त्या वेळेस बायकांना जसा गोषा होता तसा महाराष्ट्रांत नव्हता. स्त्रिया पुरुषांच्या व पुरुष स्त्रियांच्या नजरेस पडत व बोलणें चालणेंहि अधिक मोकळेपणानें होत असे. तरी स्त्रियांच्या सभा वगैरे प्रकार अगदींच नवीन असल्यानें त्यांचा होतां होईल तोंवर 'बोभाटा' होऊं न देण्याची खबरदारी घेत. पुण्याप्रमाणेंच मुंबईसहि एक 'बिनबोभाटी' सभा सुरू झाली होती. ती मुंबईच्या प्रार्थना समाजाच्या विद्यमानें भरत असे. तींत सदाशिव पांडुरंग केळकर व डॉ. सखाराम अर्जुन हे ज्ञानदान करीत. डॉक्टरसाहेब तर सूक्ष्मदर्शक यंत्रासारखीं उपकरणें वापरून आपलें शिक्षण अधिक आकर्षक

करीत. ह्याच दोन सभांतर्फे रमाबाईंना आपलें काम करणें आरंभीं सोपें गेलें.

रमाबाई पुण्यास यायच्या पांचसहा दिवस आधीं पुण्याच्या ह्या स्त्री-सभेची बैठक भरली होती. त्या दिवशीं त्या सभेंत पंडिता रमाबाईंखेरीज दुसरा विषयच नव्हता. ती कशी दिसत असेल? कोठें उतरणार असेल? आपली तिची कधीं गांठ पडेल का? जवळच कोठें उतरली तर बरें! भेटतां तरी येईल. नाहींतर जाईल कोठें लांब उतरायला! अशा तऱ्हेच्या कुतूहल-पूर्ण प्रश्नोत्तरांनीं त्या दिवशींच्या बैठकीस रंग चढला होता. त्या सभेंत रमाबाईसाहेब रानडेहि होत्या. भिडे आणि मोडक[१] होते. रमाबाईसाहेबांनीं त्यांच्याकडे जाऊन विचारलें तर ते म्हणाले 'अहो पंडिता रमाबाई कोणी परकी थोडीच आहे! आपलीच आहे ती. आम्ही मंडळीनें तिला बोलावलें आहे. ती दुःखीकष्टी बाई. तुम्ही जाऊन तिचा समाचार घेतला पाहिजे.'

बाई आपल्यांतच येऊन उतरणार हें ऐकून सभतील त्या स्त्रियांना फार आनंद वाटला. चारपांच दिवसांनीं रमाबाई आल्या. रमाबाईसाहेब रानडे म्हणतात, 'पुण्यास त्यांच्याबरोबर भाऊ मानलेला एक गरीब बंगाली मुलगा होता. त्यांची मुलगी मनोरमा ह्या वेळेस सव्वा वर्षाची होती. बाई येऊन अभ्यंकरांच्या वाड्यांत उतरल्या.'[२]

श्री. हेमेन्द्रनाथ दास ह्या मुलाची अशी माहिती देतात: कीं हा एक ब्राह्मणाचा गरीब मुलगा असून त्याचें नांव बंका बिहारी शर्मा असें होतें. ब्राह्मणांना ठाकूर म्हणत. बंका ठाकुराला स्वैयंपाक फार चांगला येत असे. पुढें बाईंनीं त्याला आपल्याबरोबर इंग्लंडलाहि नेलें होतें.

---

१. श्री. विष्णु मोरेश्वर भिडे व श्री. वामन आबाजी मोडक.

२. हा वाडा काळ्या वावरांत म्हणजे शुक्रवारांत असल्याचा रमाबाईसाहेबांनीं उल्लेख केला आहे. येथेंच बायकांच्या सभा भरत असत. येथें एकदां स्त्रियांचें ट्रेनिंग कॉलेज होतें. श्री. कृ. स. अभ्यंकर ह्यांच्या माहितीप्रमाणें हा वाडा म्हणजे त्यांच्या चुलत चुलत घराण्याकडे बरींच वर्षें असलेला, सचीवाच्या वाड्याच्या पिछाडीचा, 'अभ्यंकरांचा वाडा' किंवा 'अभ्यंकर चाळ' होय. एके काळीं ना. गोखले ह्यांचें बिऱ्हाड ह्या वाड्यांत असल्याचें विश्वसनीय रीत्या समजतें. सध्यां तो श्री. गानू ह्यांनीं खरेदी केली आहे.

बाई आल्यावर ठरल्याप्रमाणें महिला मंडळांतील प्रत्येक जणीनें जाऊन त्यांची भेट घेतली. बाईंना एकटें एकटें वाटूं नये असा त्यांत हेतु होता. तसें पाहिलें तर रमाबाईंना उघड उघड जवळ करण्याची पुण्यास कोणाची तयारी नव्हती. प्रागतिक मंडळीहि घरच्या धाकानें बिचकत. खुद्द रानडयांच्या घरीं त्यांचें जाणेंयेण सुरू झालें पण त्यामुळें रमाबाईसाहेबांना घरांतलीं बोलणीं खावीं लागत.[1]

'पंडिताबाईंचें पहिलें पुराण आमच्या घरीं झालें' रमाबाईसाहेब रानडे आपल्या आयुष्यांतील आठवणींत लिहितात. 'तेथून प्रत्येक आठवड्यांत एकेकाच्या घरीं पुराण व्हावें म्हणून ठरलें.' त्याप्रमाणें रानडे व रमाबाईसाहेब जेथें जेथें पुराण असेल तेथें तेथें दोघे मिळून जात. ह्यामुळें घरांतील 'भगिनी मंडळ' ह्या 'सुधारकांवर' रागावे. दुपारच्या वेळीं शेजारच्या पाजारच्या बायकांनीं जमायचें व तेथें बसून वाती करायच्या. रमाबाई म्हणतात 'आमच्या घरीं वातींचा एक कारखानाच तयार झाला होता. वातींचें लक्ष करायचें होतें. ह्या कारखान्यांत पुष्कळशा बायका नुसत्या शिळोप्याच्या गप्पा मारण्यासहि जमत. मग काय? चेष्टेला व चर्चेला सीमाच नाहीं. त्यांत आमचा दोघांचा कल तिकडे असल्यानें पंडिताबाईंच्या नांवानें आमचीहि चेष्टा करण्यास व पाहिजे तसें बोलण्यास, आमच्या घरांतील बायकांस अनायासें संधि मिळाली, व ती त्यांनीं कधींहि वायां घालविली नाहीं. पंडिताबाईंबद्दल त्यांना दिवसानुदिवस जास्त जास्त तिटकारा येऊं लागला. त्या आमच्या घरीं आल्या म्हणजे, ती 'बाटगी आहे, तिला शिवून आमच्या घरांत विटाळ माजवूं नकोस, तुम्हांला आवडत असली तर तिला तुम्ही गळ्यांत बांधून बसा; पण आम्हांला हा भ्रष्टाकार खपायचा नाहीं. काय मेली! बापानें चांगलें श्री. द्वारकानाथाशीं लग्न लावून दिलें असतांना पुनः तिनें बंगाली बाबूशीं लग्न करून देह बाटविला. बरें संसार तरी नीट केला का? तेंहि नाहीं. सारें निर्दाळून आतां जग बाटवायला आली आहे.' वगैरे अगदीं तिटकाऱ्यानें बोलायच्या'[2]

---

१. आमच्या आयुष्यांतील आठवणी, पृष्ठ १०३-१०७; १२८

२. आमच्या आयुष्यांतील आठवणी, पृष्ठ १०४.

इतकें होतें तरी बाईंच्या भाषणाची मोहिनी अशी होती कीं त्यांचे विरोधी सुद्धा त्यांचीं भाषणें ऐकण्यासाठीं धडपडत. त्यांच्या ह्या मोहक भाषणांसंबंधीं रमाबाई रानडे म्हणतात, 'आधींच पंडिताबाईंची वाणी अस्खलित व गोड असून विषय प्रतिपादन करण्याची शैली उत्तम. बोलत असतांना श्रोत्यांचें मन आपल्या भाषणाकडे आकर्षण करून घेण्याची त्यांची विलक्षण हातोटी होती. हे चारहि गुण त्यांच्यामध्यें असल्यामुळें शहरांतील सर्व जुन्या व नव्या शिक्षणेच्छु विद्वानांना पंडिताबाईंचें कौतुक व अभिमान वाटूं लागला व दर शनिवारच्या सभेला आपल्या घरच्या बायकांना व मुलींना ही मंडळी नियमानें पाठवूं लागली.'[1]

रमाबाईंनीं आपल्या बुद्धिमत्तेनें, विद्वत्तेनें, व वक्तृत्त्वानें साऱ्यांनाच चकित करून सोडलें होतें. काशीबाई कानिटकर लिहितात: 'बायको माणूस, बोलते तरी कशी, हें पाहण्याची उत्कंठा प्रत्येक पुरुषाला लागली होती. पंडिताबाईंचीं व्याख्यानें आपणा पुरुषवर्गाला एकट्याला ऐकावयास मिळतील. कारण युरोपियन विद्वान् स्त्रियांचीं भाषणें जशीं आपणास ऐकायला मिळतात तसेंच हेंहि घडेल. पण पंडिताबाई कसल्या वस्ताद? त्यांना हा पुरुषांचा कावा पूर्ण माहिती! पंडिताबाईंचीं व्याख्यानें, पुराणें वगैरे जें काय होईल त्यांच्या निमंत्रणपत्रिकेंत एक अट घातलेली असे. ती ही कीं जे कोणी पुरुष व्याख्यानाला येतील त्यांनीं आपली पत्नी, मुलगी, सून, बहीण, भावजय, अशापैकीं खुद्द घरची स्त्री बरोबर आणल्याशिवाय त्यांना रांगेंत बसतां येणार नाहीं. या त्यांच्या अटीमुळें मला माझ्या श्वशुरांबरोबर पंडिता रमाबाईंस व त्याच प्रसंगीं रमाबाई (रानडे)स पहाण्याचा योग आला.'[2]

'प्रसिद्ध मराठी कादंबरीकार हरि नारायण आपटे ह्यांना स्त्रीशिक्षणाबद्दल अत्यंत कळकळ होती. तेव्हां पंडिता रमाबाईंसारख्या विदुषी स्त्रीबद्दल त्यांना

---

१. त्याच पुस्तकाचें पान १०६.

२. कै. श्री. रमाबाई रानडे: चरित्र उमाकान्त: काशीबाई कानिटकरांची प्रस्तावना: पान ४ स्त्रीपुरुषांना एकदम एखाद्या समारंभाला बोलाविण्याची ही तऱ्हा त्यावेळीं अगदीं नाविन्यपूर्ण होती. बाई ह्या आमंत्रणपत्रिका स्वत: हातानें लिहून पाठवीत असें आमच्या संग्रहीं असलेल्या खालील पत्रिकेवरून दिसतें.

[टीप नं. २ चा मजकूर पुढील पानावर पाहा]


अत्यंत आदर वाटावा हें साहजिकच आहे. पंडिता रमाबाई पुण्यास आल्या तेव्हां त्यांचीं जागोजाग पुराणें व व्याख्यानें करविण्याच्या कामीं हरिभाऊंनीं इतर स्नेह्यांबरोबर पुढाकार घेतला होता. ते स्वतः त्यांच्या व्याख्यानाला जात एवढेंच नव्हे तर मथूताईंसहि[1] नेत. अर्थात् घरांतील मंडळीस न कळवितां हें करावें लागे. तेथें त्यांचे मित्रहि आपआपल्या पत्न्यांसमवेत आलेले असत.'[2]

पंडिता रमाबाईंचा पुण्यास येण्याचा मुख्य हेतु इंग्रजी शिकण्याचा होता व त्या स्वतःच इंग्रजीचा अभ्यासहि खाजगी रीतीनें करूं लागल्या होत्या. बाईंनीं एक दिवस रमाबाईसाहेब रानडयांना म्हटलें,

'मी हल्लीं हॉवर्डचा दुसरा भाग शिकतें आहें, पण पुण्यास आल्यापासून शिकण्याचें नीट जमतच नाहीं.' त्या वेळेस हॉवर्डचीं क्रमिक पुस्तकें वाचून लोक इंग्रजीचा अभ्यास करीत. दुसऱ्या पुस्तकाला बाईंनीं नुकतीच सुरुवात केली होती. वहिनीसाहेबहि इंग्रजीचा अभ्यास करीत असत. त्यांना खुद्द रानडे शिकवीत. पण हें बोलणें झालें त्याच सुमारास रानडयांना बरेंच फिरतीचें

---

पान ९४ वरून



The undersigned requests the pleasure of Mrs. Vamanrao Ranade's company at a meeting held in honor of the 5th Anniversary of the Sharada Sadan on Monday March 12th 1894 at 4:30 P.M.

Ramabai.

१. मथूताई हरिभाऊंच्या पहिल्या पत्नी.
२. हरि नारायण आपटे. (वेणूबाई पानसेकृत) पान १०५

काम निघाल्यानें तेथील ट्रेनिंग कॉलेजच्या प्रिन्सिपॉल मिस् हरफर्ड ह्यांना त्यांनीं आपल्या पत्नीला शिकविण्यास विनंती केली होती. वहिनीसाहेब ह्या बाईसंबंधानें लिहितात : 'वानवडीच्या झनाना मिशनमधील एक मडम मला शिकविण्यास ठेविली आहे. ती मला शिकवावयास येत असते.' ही मडम म्हणजेच मिस् हरफर्ड. ह्या बाई मूळ झनाना मिशनमध्यें काम करण्यास आलेल्या दिसतात. परंतु पुढें त्यांना मुख्याध्यापिकेची ही सरकारी नोकरी मिळाल्यानें त्यांनीं मिशनचें काम सोडलें. परंतु त्यांनीं आपलें धर्मप्रसाराचें काम अजिबात सोडलें नव्हतें. त्या खाजगी शिकवण्या करीत व त्याबद्दल मोबदला न घेतां बायबल शिकण्याची परवानगी घेत.

मिस् हरफर्ड शिकवायला येते त्या वेळेस तुम्हीहि या, कांहीं हरकत नाहीं, असें वहिनीसाहेबांनीं पंडिताबाईना आमंत्रण दिलें. अशा रीतीनें पंडिता-रमाबाईचें रानड्यांकडे जाणें येणें अधिक होऊं लागलें. पण ह्यामुळें रानड्यांच्या घरांत केवढा गहजब उडाला! 'आधींच ह्या बाईचा तिटकारा आमच्या बायकांना आला होता. त्यांत त्या दररोज आमच्या घरीं येऊं लागल्या. त्या माझ्याशीं हसत, बोलत व विशेष स्नेहाच्या रीतीनें प्रेम करीत, तें त्यांना आवडलें नाहीं....बसायला येणाऱ्या बायकांनीं रोज नव्या नव्या कंड्या सांगाव्यात : पंडिता रमाबाईनीं सभा केली आहे. त्यांचा पुरुषांवर कटाक्ष आहे, पुरुषांच्या ताब्यांत बायकांनीं कां वागावें? ते बायकांना गुलामासारखे वागवितात, त्यांची पर्वा करीत नाहींत, चोवीस तास बायकांनीं काबाडकष्ट करावेत, पुरुष घरीं आले कीं, त्यांना आंघोळीला पाणी उपसून द्यावें, आयतें जेवायला वाढावें, आपण दमलें भागलें असलें तरी तें मनांत न आणतां नवऱ्याचे पाय चेपावे आणि इतकें करूनहि कोठें चुकलें कीं लाथाबुक्क्यांशीं गांठ. असे हे जुलमी पुरुष, त्यांच्या ताब्यांत तुम्ही न राहतां मोकळ्या व्हा,'

अशा तऱ्हेच्या बातम्यांच्या सुकाळानें वहिनीसाहेबांच्या जाचालाहि बहर आला.

ह्या बाजारगप्पांना कांहीं आधार तरी होता का?

श्री. द्वा. गो. वैद्य ह्यांनीं 'नवयुग' मासिकांतील आपल्या लेखांत बाईंच्या एका व्याख्यानाचा सारांश दिला आहे. बाई म्हणाल्या होत्या : 'हल्लींच्या स्त्रियांची स्थिति फारच शोचनीय आहे. त्यांस विद्या नाहीं, ज्ञान नाहीं! कोणी

म्हणतात त्यांना ज्ञान शिकवून मग पुरुषांनीं काय करायचें? पण हल्लीं पुरुषांची स्थिति कोठें चांगली आहे? ते केवळ लाकडाच्या बाहुल्याप्रमाणें होऊन दास्यत्वांत पडले आहेत! हें पुरुषत्वाचें लक्षण नाहीं. स्त्रियांची स्थिति सुधारली असतां पुरुषांची स्थिति सुधारेल. ज्या देशाच्या स्त्रियांची स्थिति सुधारते त्याच देशाची एकंदर स्थिति सुधारते. जशा स्त्रिया असतात तशी त्यांची संतती होते. हल्लीं स्त्रियांची स्थिति पाहिली तर त्यांच्यांत कित्येक दुर्गुण शिरले आहेत. त्या सासुरवासांत असल्यामुळें खोटें बोलण्याची त्यांस संवय लागते, मग ही संवय पुढें मुलांस लागते. अशा रीतीनें देशांतले लोक सत्य, तेज व साहसहीन होतात. आपण सर्वांनीं सत्याचें व्रत धरलें पाहिजे व तें आमरण चालविलें पाहिजे. कोणास वाटेल कीं आम्हीं स्त्रियांनीं काय सुधारणा करावी? आम्हीं पडलों परतंत्र! तर मी त्यांस असें सांगतें कीं, आम्ही स्वतंत्र आहों. आम्ही आपल्या स्वातंत्र्याचें रक्षण मात्र केलें पाहिजे. आमच्यापेक्षां पुरुषांस जास्त हक्क अगर स्वातंत्र्य असण्याची कांहींएक जरुरी नाहीं. सध्या पुरुष आमच्यावर अधिक हक्क अम्मल चालवीत आहेत व आम्हांस घरांतील इतर वस्तूंप्रमाणें लेखीत आहेत. ह्या स्थितींत आम्ही आपला उद्धार करून घेण्यास झटलें पाहिजे. आपण सर्वांनीं मिळून एक सभा स्थापन करावी असा माझा हेतु आहे. कोणास वाटेल कीं हे पुरुषांच्या विरुद्ध बंड आहे, आणि पुरुषांच्या विरुद्ध कांहीं करणें हें पाप आहे. त्यांस माझें असें उत्तर आहे कीं आपण हल्लीं पुष्कळ मोठें पाप करीत आहों. पुष्कळ पुरुष वाईट गोष्टी करतात. आपण त्या विषयीं निषेध न करतां स्वस्थ बसतों, हेंच मोठें पाप आहे. आपणास अनीतीची किंवा अन्यायाची गोष्ट करायची नाहीं. तर न्याय व नीति यांना अनुसरूनच चालावयाचें आहे. द्रव्यसाहाय्य करणेंहि आपल्याला कठीण नाहीं. उगीच कांहीं भाकडकथा सांगणारे पुराणिक, त्यांस आम्ही स्त्रिया द्रव्य पुरवितों; त्यांच्या कुटुंबांस दागदागिन्यांनीं मढवितों. त्यांतूनच अशा सभेच्या कार्यासाठीं थोडें द्रव्यसाहाय्य करायचें मनांत आणिल्यास तें मुळींच जड जावयाचें नाहीं.'

दुसऱ्या एका ठिकाणीं रमाबाईंनीं म्हटलें होतें—

It is evident that women being one half of the people of this country are oppressed and cruelly treated by the other half. To put a stop to this anomaly is worthy of a good Govt.

काम निघाल्यानें तेथील ट्रेनिंग कॉलेजच्या प्रिन्सिपॉल मिस् हरफर्ड ह्यांना त्यांनीं आपल्या पत्नीला शिकविण्यास विनंती केली होती. वहिनीसाहेब ह्या बाईसंबंधानें लिहितात : 'वानवडीच्या झनाना मिशनमधील एक मडम मला शिकविण्यास ठेविली आहे. ती मला शिकवावयास येत असते.' ही मडम म्हणजेच मिस् हरफर्ड. ह्या बाई मूळ झनाना मिशनमध्यें काम करण्यास आलेल्या दिसतात. परंतु पुढें त्यांना मुख्याध्यापिकेची ही सरकारी नोकरी मिळाल्यानें त्यांनीं मिशनचें काम सोडलें. परंतु त्यांनीं आपलें धर्मप्रसाराचें काम अजिबात सोडलें नव्हतें. त्या खाजगी शिकवण्या करीत व त्याबद्दल मोबदला न घेतां बायबल शिकण्याची परवानगी घेत.

मिस् हरफर्ड शिकवायला येते त्या वेळेस तुम्हीहि या,. कांहीं हरकत नाहीं, असें वहिनीसाहेबांनीं पंडिताबाईना आमंत्रण दिलें. अशा रीतीनें पंडिता-रमाबाईचें रानड्यांकडे जाणें येणें अधिक होऊं लागलें. पण ह्यामुळें रानड्यांच्या घरांत केवढा गहजब उडाला! 'आधींच ह्या बाईचा तिटकारा आमच्या बायकांना आला होता. त्यांत त्या दररोज आमच्या घरीं येऊं लागल्या. त्या माझ्याशीं हसत, बोलत व विशेष स्नेहाच्या रीतीनें प्रेम करीत, तें त्यांना आवडलें नाहीं....बसायला येणाऱ्या बायकांनीं रोज नव्या नव्या कंड्या सांगाव्यात : पंडिता रमाबाईनीं सभा केली आहे. त्यांचा पुरुषांवर कटाक्ष आहे, पुरुषांच्या ताब्यांत बायकांनीं कां वागावें? ते बायकांना गुलामासारखे वागवितात, त्यांची पर्वा करीत नाहींत, चोवीस तास बायकांनीं काबाडकष्ट करावेत, पुरुष घरीं आले कीं, त्यांना आंघोळीला पाणी उपसून द्यावें, आयतें जेवायला वाढावें, आपण दमलें भागलें असलें तरी तें मनांत न आणतां नव-ऱ्याचे पाय चेपावे आणि इतकें करूनहि कोठें चुकलें कीं लाथाबुक्क्यांशीं गांठ. असे हे जुलमी पुरुष, त्यांच्या ताब्यांत तुम्ही न राहतां मोकळ्या व्हा,'

अशा तऱ्हेच्या बातम्यांच्या सुकाळानें वहिनीसाहेबांच्या जाचालाहि बहर आला.

ह्या बाजारगप्पांना कांहीं आधार तरी होता का?

श्री. द्वा. गो. वैद्य ह्यांनीं 'नवयुग' मासिकांतील आपल्या लेखांत बाईंच्या एका व्याख्यानाचा सारांश दिला आहे. बाई म्हणाल्या होत्या : 'हल्लींच्या स्त्रियांची स्थिति फारच शोचनीय आहे. त्यांस विद्या नाहीं, ज्ञान नाहीं! कोणी

म्हणतात त्यांना ज्ञान शिकवून मग पुरुषांनीं काय करायचें? पण हल्लीं पुरुषांची स्थिति कोठें चांगली आहे? ते केवळ लाकडाच्या बाहुल्याप्रमाणें होऊन दास्यत्वांत पडले आहेत! हें पुरुषत्वाचें लक्षण नाहीं. स्त्रियांची स्थिति सुधारली असतां पुरुषांची स्थिति सुधारेल. ज्या देशाच्या स्त्रियांची स्थिति सुधारते त्याच देशाची एकंदर स्थिति सुधारते. जशा स्त्रिया असतात तशी त्यांची संतती होते. हल्लीं स्त्रियांची स्थिति पाहिली तर त्यांच्यांत कित्येक दुर्गुण शिरले आहेत. त्या सासुरवासांत असल्यामुळें खोटें बोलण्याची त्यांस संवय लागते, मग ही संवय पुढें मुलांस लागते. अशा रीतीनें देशांतले लोक सत्य, तेज व साहसहीन होतात. आपण सर्वांनीं सत्याचें व्रत धरलें पाहिजे व तें आमरण चालविलें पाहिजे. कोणास वाटेल कीं आम्हीं स्त्रियांनीं काय सुधारणा करावी? आम्हीं पडलों परतंत्र! तर मी त्यांस असें सांगतें कीं, आम्ही स्वतंत्र आहों. आम्ही आपल्या स्वातंत्र्याचें रक्षण मात्र केलें पाहिजे. आमच्यापेक्षां पुरुषांस जास्त हक्क अगर स्वातंत्र्य असण्याची कांहींएक जरुरी नाहीं. सध्या पुरुष आमच्यावर अधिक हक्क अम्मल चालवीत आहेत व आम्हांस घरांतील इतर वस्तूंप्रमाणें लेखीत आहेत. ह्या स्थितींत आम्ही आपला उद्धार करून घेण्यास झटलें पाहिजे. आपण सर्वांनीं मिळून एक सभा स्थापन करावी असा माझा हेतु आहे. कोणास वाटेल कीं हे पुरुषांच्या विरुद्ध बंड आहे, आणि पुरुषांच्या विरुद्ध कांहीं करणें हें पाप आहे. त्यांस माझें असें उत्तर आहे कीं आपण हल्लीं पुष्कळ मोठें पाप करीत आहों. पुष्कळ पुरुष वाईट गोष्टी करतात. आपण त्या विषयीं निषेध न करतां स्वस्थ बसतों, हेंच मोठें पाप आहे. आपणास अनीतीची किंवा अन्यायाची गोष्ट करायची नाहीं. तर न्याय व नीति यांना अनुसरूनच चालावयाचें आहे. द्रव्यसाहाय्य करणेंहि आपल्याला कठीण नाहीं. उगीच कांहीं भाकडकथा सांगणारे पुराणिक, त्यांस आम्ही स्त्रिया द्रव्य पुरवितों; त्यांच्या कुटुंबांस दागदागिन्यांनीं मढवितों. त्यांतूनच अशा सभेच्या कार्यासाठीं थोडें द्रव्यसाहाय्य करायचें मनांत आणिल्यास तें मुळींच जड जावयाचें नाहीं.'

दुसऱ्या एका ठिकाणीं रमाबाईंनीं म्हटलें होतें—

It is evident that women being one half of the people of this country are oppressed and cruelly treated by the other half. To put a stop to this anomaly is worthy of a good Govt.

ह्यावर टीका करतांना श्री. वैद्य म्हणतात :

ह्यांत अतिशयोक्ति आहे व हें सिद्ध करावयास स्वतः रमाबाईंचेंच उदाहरण पुरेसें आहे. पत्नी, माता, भगिनी ह्या नात्यांनीं इतरांचा छळ झालेला त्यांनीं पाहिला. पण त्यांचा स्वतःचा तसा छळ झाला नाहीं.

ही टीका कशी फोल ठरते हें सहज दिसून येईल. बाईंच्या बाबतींत त्यांचा छळ किंवा कुचंबणा झाली नाहीं म्हणून त्या सभोंवतालीं जें पाहात तें कां खोटें होतें? खुद्द त्यांच्या बहिणीच्या संसाराची झालेली परवड त्या कधीं विसरल्या नव्हत्या. त्यांच्या भावानेंहि आपली बायको नांदवली नव्हती आणि पुरुषांचें वर्चस्व खुद्द बाईंना जाणवलें नाहीं असें कसें म्हणतां येईल? इतका प्रेमळ पिता, पण तो त्यांना आपल्या मर्जीप्रमाणें कोठें वागूं देत होता? त्यांना वेदमंत्र म्हणण्याची आवड पण तेथें बापानें त्यांचें तोंड बंद केलेंच कीं नाहीं? आणि एवढा प्रेमळ व पुरोगामी पति, पण आपण ख्रिस्ती होण्यास काय हरकत आहे असें बाईंनीं नुसतें सुचवितांच मि. ॲलनला घरीं येण्याची बंदी करून आपला नवरेपणाचा हक्क त्यांनी गाजविला. हें आपल्याला पटणार नाहीं पण ट्रॅममध्यें स्त्रियांसाठीं राखून ठेवलेले बांक किंवा आगगाडींत त्यांच्यासाठीं राखून ठेवलेले डबे हीं ह्या प्रकारच्या स्त्रियांच्या दौर्बल्याची अप्रत्यक्ष सरकारी मान्यताच नाहीं का? जर बहुसंख्य पुरुष स्त्रियांना सारख्या दर्जानें वागविते तर स्त्रियांना असल्या संरक्षणाची जरूरीच पडती ना.

पंडिता रमाबाईंच्या सभांना स्त्रियांना आमंत्रणें देण्यास रमाबाई रानडे स्वतः घरोघर जात व तीं देत. पंडिता रमाबाईंनीं आर्य महिला समाज स्थापन केला त्या वेळच्या अशा एका प्रसंगाचें वर्णन काशीबाई कानिटकर करतात, 'बायका जमल्या पाहिजेत, नुसत्या चिठ्यांनीं त्या येणार नाहींत म्हणून वहिनीबाई आणि पुढारी मंडळीपैकीं दुसरी एक, येण्यासारख्या बायकांना बोलावणें करण्यास गेल्या.' ह्या प्रसंगीं एका पुढाऱ्याच्या घरून त्यांची जी बोळवण झाली त्याचें वर्णन पुढें काशीबाई करतात. 'त्या गृहस्थाची बायको विरुद्ध मताची होती हें रमाबाईसाहेबांना ठाऊक नव्हतें. त्या गेल्यावर घरधनिणीनें त्यांना बसायला पाट दिले. बाई जें जें कांहीं बोलत होती त्यांत सुधारणाप्रिय लोकांना टोमणे देत होती. पण रमाबाई साहेबांच्या साध्या सीध्या मनाला तें समजत नव्हतें. घरधनी सुधारणाप्रिय होते तेव्हां ह्या बाईच्या प्रत्येक विधानाचा त्या

सरळ अर्थ घ्यायच्या. शेवटीं सभेचें आमंत्रण केलें तेव्हां मात्र बाईनें एकदम पेट घेतला. 'तुम्हां सुधारक बायकांनीं आतां तोंडाला रंग लावून नाच करण्याचेंच तेवढें राहिलें आहें. तेवढें करून टाका म्हणजे तुमचे हात गगनाला पोहंचतील. या तिच्या बोलण्यानें वहिनीबाईंच्या डोळ्यांना पाणी आलें. त्यानीं चटकन जाग्यावरून उठून जाण्याचा रस्ता धरला, पण एक अक्षरहि तोंडावाटें काढलें नाहीं. बरोबरची बाई चांगली खमंग होती, पण तिला उत्तर देण्यास वहिनीबाईंनीं अवसरच दिला नाहीं. त्यांच्या मागोमाग तिलाहि निघून यावें लागलें.'[१]

रमाबाईंनीं लोकजागृतीचें काम फार जोरदार रीतीनें व तितक्याच सपाट्यानें आरंभिलें. त्यांना पुरोगामी गटाचा फार मोठा पाठिंबा होता. बाईंनीं आपल्या व्याख्यानांचा व पुराणांचा धूमधडाका उडवून दिला. स्त्रियांच्या अवनतीसंबंधीं लोकजागृति करायची म्हणून त्यांनीं आपल्या जिवाचा आटापिटा चालविला. त्यासाठीं आतां त्यांनीं महाराष्ट्रभर दौरे काढले. महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांत त्यासाठीं त्यांच्या राघोभराऱ्या सुरू झाल्या. त्यांच्या सभांना अतोनात गर्दी जमे. ह्या गर्दीचें कारण टिळकचरित्रकार केळकर ह्यांनीं मोठें खुबीदार असें दिलें आहे. केळकर म्हणतात:

'त्यांचें तेज, त्यांचें तारुण्य, त्यांची विद्वत्ता, त्यांचें वैधव्य ह्या सर्व गोष्टींचा परिणाम लोकांच्या मनावर झाला.'[२]

बाई पुष्कळदां कोणाचीहि भीडभाड न ठेवतां अत्यंत सडेतोडपणें बोलत, मग ती एखादी व्यक्ति असो, संस्था असो, कीं सरकार असो. सोलापुरास त्यांची व्याख्यानें झालीं त्यांतील एक व्यसनाधीनतेविरुद्ध होतें. दारूच्या व तंबाखूच्या व्यसनांबद्दल बोलतांना, त्या वेळच्या शिष्ट समजल्या गेलेल्या ह्या व्यसनांची व व्यक्तींची त्यांनीं चांगलीच हजेरी घेतली. रमाबाईंनीं चिरुट ओढणारास एक दाताचा डुक्कर म्हटलें. कारण तोंडांत चिरुट असला म्हणजे तो माणूस डुकरासारखा दिसतो, व जे पुरुष आपल्या कर्तव्यास जागत नाहींत त्यांना

---

१. उमाकान्तकृत कै. श्री. रमाबाई रानडे. प्रस्तावना, पान ११. ही दुसरी बाई बहुधा काशीताईच असाव्यात.

२. लो. टिळक चरित्र : केळकर, पृष्ठ ३१५.

त्यांनीं शंखोबा म्हटलें.[१] पण आश्चर्य असें कीं लोक त्यांचें निमूटपणें ऐकून घेत, ह्याबद्दलहि केळकरांजवळ खुलासा आहे. केळकर म्हणतात:

'बाई धीट, दुसऱ्यावर छाप ठेवणारी व हरजबाबी असल्यामुळें कोणी तिच्याशीं प्रत्यक्ष गांठ घालून वाद किंवा निषेध केला नाहीं.'[२]

खरोखरच बाईंच्या ह्या वाक्सरितेच्या धबधब्याखालून निर्माण होणारी विद्युत् वर्तमानपत्रांत अग्रलेखांच्या, स्फुटांच्या, किंवा बातमीपत्रांच्या, रूपानें साऱ्या महाराष्ट्रीय वाचकांच्या मनांत लखलखाट करून टाकायची. बाईंच्या भाषणांवरून निरनिराळ्या मतांच्या वृत्तपत्रांच्या आपसांत चकमकी होऊन त्यांतूनहि अनेक वेळेला ठिणग्या उडाल्या आहेत.

बाईंचा तुफानी प्रचार चालू झाला. पुढील कार्याची बैठक कशी बसवावी याचा मनोमन बोधहि त्यांना होत गेला आणि त्याप्रमाणें त्यांनीं आपलीं पावलें टाकलीं.

पुण्यामुंबईंत अस्तित्वांत असलेल्या 'बिन बोभाटी' स्त्रीसभांना मूर्त स्वरूप देऊन त्यांना 'आर्य महिला समाज' असें नांव देण्याचें त्यांनीं ठरविलें. वेगवेगळ्या गांवीं ह्या सभा स्थापन होणार होत्या, परंतु त्या एखाद्या मध्यवर्ती संस्थेच्या शाखा असणार नव्हत्या.

आर्य महिला समाजाचे वेध रमाबाई येण्याच्या आधींपासून पुण्यामुंबईस लागलेले होते हें २१ ऑक्टोबर १८८१ च्या सुबोधपत्रिकेवरून दिसून येतें.

'स्त्रियांचें ज्ञान वाढवावें, त्यांस कोणत्याहि विषयाचा विचार करण्याची व आपले विचार बोलून दाखवण्याची संवई लागावी, नीति, सन्मार्ग व धर्म यांचा सामान्य बोध व्हावा आणि कांहीं नाहीं तरी निदान परस्परपरिचय, दळणवळण व स्नेह वाढीला लागावा. सारांश, कोणीकडून तरी आमच्या स्त्रियांची स्थिति सुधारण्याचा प्रयत्न करावा म्हणून प्रयत्न व्हायला पाहिजेत.'

प्रार्थना समाजाच्या इतिहासांत ह्या लेखाच्या परिणामाबद्दल म्हटलें आहे :

'सुबोधपत्रिकेंतील वरील चाबूक मिळाल्यावर पुनः कांहीं दिवस काम जोरानें चालू लागलें. डॉ. सखाराम अर्जुन सारखे गृहस्थ अनेक व्याख्यानें

---

१. ज्ञानोदय : ११ जुलै १८८९.

२. लो. टिळक चरित्र : केळकर, पृष्ठ ३१६.

देऊन आपल्या उदार विचारांचा स्त्रियांस लाभ देऊं लागले. डॉ. सदाशिव वामन काणे व गोविंदराव वा. कानिटकर शास्त्रीय विषयांवर व्याख्यानें देत असत. नंतर पंडिता रमाबाईंचा काळ आला."[1]

म्हणजे मुंबईस तरी भूमि नांगरून वखरून तयार होती व नंतर 'पंडिता रमाबाईंचा काळ आला.' रानडे, कानिटकर वगैरे मंडळी सरकारी नोकर होते तरी त्यांचें सामाजिक कार्यांत फार लक्ष असे. मुंबईहून पुण्यास त्यांच्या बदल्या झाल्या तरी त्यांनीं आपलें लक्ष त्या कार्यांतून काढून घेतलें नाहीं. त्यामुळें मुंबईचें लोण पुण्याला सहज पोंचलें, व मुंबईप्रमाणें पुण्यासहि रमाबाईंना नांगरलेली भूमि मिळाली.

मग बाईंनीं विशेष असें काय केलें असा प्रश्न येतो. सर्वच त्यांना आयतें तयार मिळाल्यावर मग राहिलें काय? याला उत्तर प्रार्थना समाजाच्या ह्या इतिहासांतच सांपडतें. या बनावाच्या चारच वर्षें आधींची गोष्ट. बाबू प्रतापचंद्र मुझुमदार सारखा एक समर्थ पुरुष मुंबईस येऊन त्यांनीं स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रश्न हातीं घेतला. पण त्यांनीं असें पाहिलें कीं इकडे पडद्याची अडचण नाहीं तरी सुद्धा शिक्षण घेण्यास पुढें येणाऱ्या स्त्रियांची संख्या इतकी अल्प आहे कीं तो नाद सोडून देणेंच इष्ट आहे. बाबू प्रतापचंद्र मुझुमदारांना जें साधलें नाहीं तें बाईंकडून होणार होतें. नुसती नांगरलेली भूमि असून उपयोगी नाहीं. बीज, ऊन, पाऊस, वारा हीं सारीं असल्याशिवाय पीक येत नसतें. आर्यमहिला समाजाची भूमि तयार झालेली होती, परंतु त्या भूमींत भरगच्च पीक येण्यासाठीं ज्या बाकीच्या तयारीची जरुरी होती ती बाईंच्या व्यक्तिमत्त्वानें पुरविली.

ता. ३० एप्रिल १८८२ रोजीं पुण्यास बाईंनीं ह्या विषयावर दीड तास एक अत्यंत परिणामकारक असें व्याख्यान दिलें. त्याचा परिणाम असा झाला कीं, दुसऱ्या दिवशीं पुण्याच्या आर्यमहिला समाजाची स्थापना झाली.

ह्यानंतर त्यांनीं सोलापुरास व पंढरपुरास समाजाची स्थापना केली. एकट्या सोलापूरच्याच कार्यक्रमावरून त्यांना केवढा प्रचंड पाठिंबा मिळत होता, हें दिसून येईल. हा एक वृत्तपत्रीय उतारा पाहा:

---

१. प्रार्थना समाजाचा इतिहास, पान १६६.

१०९९८

'रविवार (ता. ५ नोव्हेंबर) रोजीं पंडिता रमाबाई सोलापूरला पोंहचल्या. मंगळवार पेठेंत मुलींच्या शाळेंत स्त्रीशिक्षणावर त्यांचें व्याख्यान झालें. गर्दी अतिशय झाली. श्री. मल्लाप्पा वारदांनीं बाईंना लुगडें देऊन पन्नास रुपये दिले. सोमवारीं मल्लिकार्जुनाच्या देवळांत पुराण झालें. भारतांतील एका ब्राह्मण स्त्रीनें एका ब्राह्मणास खऱ्या ब्राह्मणाचीं लक्षणें सांगितलीं हा विषय होता. रात्रीं इंग्रजी शाळेच्या दिवाणखान्यांत आर्य महिला समाजाच्या स्थापनेंच्या प्रसंगीं त्याच विषयावर व्याख्यान झालें. मंडळी इतकी आली होती कीं बसायला जागा पुरेना. श्री. चक्रदेव यांनीं त्या प्रसंगीं ५० रु. दिले. तिसरें व्याख्यान चक्रदेवांच्या घरीं कुलीन स्त्रियांकरितां. शहरांतील कामगारमंडळातर्फे ५० रु. देण्यांत आले. एकादश स्कंधांतील एका भागावर पुराण. पुराणास शास्त्री मंडळी हजर होंती. प्रवास खर्चासाठीं मंडळींनीं बाईंना चाळीस रुपये दिले.'

पंडिता रमाबाईंनीं अहमदनगर (७–१०–१८८२) ठाणें (डिसेंबर १८८२) बार्शी इत्यादि ठिकाणीं जाऊन तेथेंहि असाच विजय संपादन केला व तेथेंहि आर्य महिला समाजाची स्थापना केली असें सुबोधपत्रिकेवरून दिसून येतें.'[१]

महाराष्ट्रांतील दौरा संपवून बाई मुंबईस आल्या. २५ नोव्हेंबर १८८२ रोजीं आर्य महिला समाजाचे उद्देश ह्या विषयावर त्यांचें सुमारें तासभर मोठें सुश्राव्य भाषण झालें. हें भाषण ऐकण्यास प्रार्थना मंदिरांत सुमारें २०० स्त्रिया व ४०० पुरुष हजर होते. पंडिताबाईंच्या आगमनानें मुंबई शहर अगदीं हेलावलें होतें. ३० नोव्हेंबर रोजीं मुंबई शहरीं आर्य महिला समाजाची स्थापना होऊन तींतच पूर्वींची सभा विलीन करण्यांत आली.

ह्या मुक्कामांत बाईंनीं रात्रीं प्रार्थना समाजांत दीड तास धर्मोपदेश केला. दुसऱ्याच दिवशीं गुजराथी सोशल युनियन तर्फे हलाई भाट्यांच्या महाजनवाडींत त्यांनीं हिंदींत व्याख्यान दिलें. ह्या भाषणाचा विशेष असा कीं बाईंनीं पुढें लिहिलेल्या 'स्त्री–धर्म–नीति' ह्या पुस्तकाचा आराखडा ह्या भाषणांत रेखाटला गेला. त्या भाषणाच्या वेळीं ह्या विषयाच्या तन्मयतेचा त्यांना जो अनुभव आला त्याचेंच दृश्य फळ म्हणजे त्यांचें 'स्त्री-धर्म-नीति' हें पुस्तक. ह्याच मुक्कामांत पार्शी जमातीसाठींहि त्यांचें एक भाषण झालें.

---

१. सुबोधपत्रिका १९–११–१८८२ व ३–१२–१८८२.

आर्य महिला समाज जागजागीं स्थापन झाले. मात्र चहूंकडे त्या समाजाची घटना सारखीच होती ती पुढें परिशिष्ट ६ मध्यें दिली आहे.

पुण्यास पाय ठेवल्यापासून तर इंग्लंडला जाण्यासाठीं बांधाबांधीला लागेपर्यंत एक वर्षाचा काळ लोटला होता. एवढ्या अवधींत बाईंनीं केवढी जागृति केली, केवढी खळबळ उडवून दिली, केवढें भरीव कार्य केलें, तें सारें पाहातांच मति गुंग होऊन जाते! मात्र इंग्लंडला जाण्यास निघण्यापूर्वीं बाईंनीं केलेल्या दोन संस्मरणीय गोष्टी कधीं कोणी त्या कालांत विसरणें शक्य नव्हतें. एक त्यांची हंटर कमिशनपुढील साक्ष व दुसरें म्हणजे त्यांचें 'स्त्री-धर्म-नीति' हें पुस्तक.

'स्त्री-धर्म-नीतीसंबंधीं पुढें प्रकरण २५ व परिशिष्ट ७ मध्यें अधिक विस्तृतपणें सांगितलें आहे. स्त्रीधर्मनीति हा एक अत्यंत दुर्मिळ ग्रंथ आहे' परंतु आजच्या काळींहि त्याचा उपयोग होईल, इतका तो ग्रंथ अप्रतिम आहे.

आर्य महिला समाजाची धामधूम चालली असतांना त्याच वर्षीं पुण्यास शिक्षणाची चौकशी करणारें एक सरकारी मंडळ आलें. लार्ड रिपनच्या कारकीर्दींत सर डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर ह्या इंग्रज शिक्षणतज्ज्ञाच्या अध्यक्षतेखालीं हें मंडळ शिक्षणाबाबत चौकशी करण्यासाठीं नेमण्यांत आलें होतें. हंटर कमिशन ह्या नांवानें हें शिक्षण चौकशी मंडळ ओळखलें जातें. हें जेव्हां पुण्यास आलें तेव्हां आर्य महिला समाजाच्या सभासद स्त्रिया व इतर संभावित नागरिक स्त्रिया एकत्र जमून, त्यांनीं ह्या कमिशनचें स्वागत करण्याचें ठरविलें. ह्या स्वागत समारंभांत पंडिता रमाबाईंचें व रमाबाई रानड्यांचें भाषण झालें. ह्या संबंधानें रमाबाईसाहेब लिहितात: 'कांहीं दिवसांनीं हिराबागेंत एज्युकेशन कमिशनची सभा भरली. त्या कमिशनपुढें स्त्रीशिक्षणावर मला व पंडिता रमाबाईंना बोलावयास सांगितल. माझी मात्र त्या वेळीं धांदल उडाली. दहापांच वाक्यें कशींबशीं बोलून एकदांचीं संपविलीं. पंडिता रमाबाई जात्या विदुषी, बोलण्याची पुष्कळ संवय व सभाधीट असल्यानें त्यांचें भाषण फार उत्तम वठलें.'[1]

पंडिता रमाबाईंनीं ह्या वेळीं खानेसुमारींतील आकडेवारींचें साहाय्य घेऊन मोठें दणदणीत भाषण केलें. ब्रिटिश सत्तेखालीं असलेल्या ९,९७,००,०००,

१. आमच्या आयुष्यांतील आठवणी; पान १४४

स्त्रियांपैकीं केवळ ९,९५,०० स्त्रिया साक्षर आहेत असें १८८१च्या खानेसुमारीच्या अहवालांत म्हटलें आहे. ज्या दोन लाख स्त्रियांना लिहितां वाचतां येतें असें दाखवलें आहे, त्या खरोखरच शिकलेल्या आहेत असें म्हणतां येणार नाहीं, कारण मुलींचा शाळेंत जाण्याचा काळ त्यांच्या वयाच्या ७ व्या वर्षापासून ९ व्या वर्षांपर्यंतचाच तेवढा असतो. एवढ्या काळांत त्यांना मराठी दोन तीन क्रमिक पुस्तकांचें वाचन व बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार एवढें गणित फार फार झालें तर होऊं शकेल. एवढ्यावरून दोन लाख स्त्रिया शिक्षित झाल्या असें म्हणतां येणार नाहीं. सरकारी शाळा, मिशन शाळा, खाजगी शाळा व झनाना मिशनच्या शाळा ह्या सार्‍यांच्या एकत्रित प्रयत्नांचें हें सार्‍या भारतांतील फळ! हा तो शिष्यवृन्द! भारतांत न थकतां स्त्री शिक्षणास विरोध करणार्‍या प्रबल शक्तींपुढें एवढी तरी विद्यार्थिनींची संख्या कशी सांपडली हें आश्चर्य आहे. नऊदहा वर्षांच्या, शाळेंतून नुकत्याच निघालेल्या मुली जेव्हां लग्नाच्या बेडींत अडकविल्या जातात, तेव्हां तर त्यांची लिहिण्या-वाचण्यापासून संपूर्ण फारकत होते. नवर्‍याच्या घरीं एखादा कागदाचा तुकडा किंवा पुस्तक हातीं धरणें ही अत्यंत लाजिरवाणी गोष्ट समजण्यांत येते. उच्च-वर्णीय स्त्रियांची अशी एक सर्वसाधारण समजूत असते कीं, त्यांच्या वाचनानें व हातांत जर लेखणी धरली तर त्या लेखणीनें त्यांचे नवरे पटापट मृत्युमुखीं पडतात. विधवा जीवनाच्या भयांत त्यांची ज्ञानप्राप्तीची तहानभूक करपून जाते. ह्याशिवाय बालपत्नींना स्वसुधारणेला फुरसद कोठें मिळते? जिच्यांत तेवढी प्रबळ इच्छा असेल व जिला वेळहि भरपूर आहे अशी एखादी नशीबवान कोणी असलीच तर आपल्या सासरचीं वडील माणसें पाहातील कीं काय अशी एकसारखी भीति तिच्या पाठीमागें हात धुऊन लागलेली असते. तिचा हा छंद लपवून ठेवणें अशक्य असतें व एकदां का त्याचा बोभाटा झाला कीं मग काय विचारतां? चेष्टा, छळणूक व शेवटीं हा मूर्खपणाचा धंदा सोडून देण्याची वडील मंडळींची आज्ञा ह्या गोष्टींना बिचारीला तोंड द्यावें लागतें. येथें तिच्या वाङ्मयीन धावपळीची इतिश्री होते. नवर्‍याचें पाठबळ,—तो पुरोगामी मतांचा असला तर उपयोगी पडण्याचा संभव असतो. पण असलीं उदाहरणें सांपडणें जवळजवळ अशक्यच असतें. बरें, ह्या तुटपुंज्या शिक्षणसंस्थांत शिक्षण देणार्‍या स्त्रिया तरी पुर्‍या शिकलेल्या

असतात का? मुळींच नाहीं. त्यामुळें दोनतीन इयत्ता झालेल्या ह्या मुली शिकल्या असतील तें सारें चटकन विसरून जातात.[१]

ह्यानंतर बाईंची हंटर कमिशनपुढें साक्ष झाली, ती येणेंप्रमाणें :

**प्रश्न** : भारतांतील शिक्षणपद्धतीवर मतदान करण्यास तुम्हाला त्या विषयाचा काय अनुभव मिळाला आहे आणि कोणत्या भारतीय प्रान्तासंबंधीं तुम्ही सांगणार आहां?

ह्या प्रश्नाचें उत्तर देतांना बाईंनीं थोडक्यांत परंतु अतिशय स्पष्ट शब्दांत आपल्या मातापितरांची गोष्ट सांगितली. तसेंच, आपल्या वडिलांचे, बंधूचे व पतीचे तद्विषयक विचार सांगितले. ह्या सर्व गोष्टींनीं आपल्याला स्त्रीशिक्षणासंबंधीं मत बनविण्यास अवसर दिला व तो भारतांतील निरनिराळ्या प्रान्तांतील होता. ह्या प्रश्नाच्या ह्या दीर्घ उत्तराचा बाईंनीं असा समारोप केला :

'ज्या गृहस्थाला आपल्या स्त्री शिक्षण विषयक मतांमुळें पुष्कळ छळ सोसावा लागला व ज्याला आपल्या मतांच्या पुरस्कारार्थ वादविवाद करावे लागले व आपलीं मतें अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत प्रत्यक्षांत आणून दाखवावीं लागलीं त्या गृहस्थांची मी मुलगी आहें. मला माझ्या आयुष्यभर ह्या कार्यासाठीं झगडणें हें आपलें कर्तव्य वाटत आहे व ह्या देशाच्या स्त्रियांची परिस्थिति लोकांपुढें मांडणें हें मी आपलें कर्तव्य समजतें.

**प्रश्न** : मुलींच्यासाठीं शिक्षकांचा योग्य पुरवठा करण्याचा सर्वोत्तम मार्ग कोणता?

**उत्तर** : मला हें उघड दिसतें आहे कीं ज्या स्त्रियांना दुसऱ्याला शिकवायचें आहे त्यांना स्वतःला त्या विषयाचें विशेष ज्ञान आसायला हवें. (त्यांनीं त्या विषयाचें विशेष शिक्षण घेतलेलें असावें.) त्याशिवाय त्यांना आपल्या जन्मभाषेचें बिनचूक ज्ञान असून इंग्रजीचें सुद्धां ज्ञान असायला हवें. त्या शिक्षिका कुमारिका असोत, लग्न झालेल्या असोत किंवा विधवा असोत, त्यांना नीतिज्ञान बरोबर असून त्यांचें वर्तन चोख असायला पाहिजे. त्यांची निवड खानदानीच्या घराण्यांतून व्हायला हवी. त्यांना चांगल्या शिष्यवृत्त्या देण्यांत आल्या

१. The High Caste Hindu Woman. पृष्ठ १०२,१०३

पाहिजेत. मुलांच्या शाळेंतील शिक्षकांपेक्षां मुलींच्या शाळेच्या अध्यापिकांना पगार अधिक द्यायला हवा. कारण त्यांचें शील व कुल उच्च दर्जाचें असणार. कॉलेजच्या आवारांतच विद्यार्थिनींची राहण्याची सोय व्हायला हवी, अशा रीतीनें त्यांच्यावर नजर ठेवून त्यांना योग्य वळण लावणें सुलभ होईल. वसतिगृहाची इमारत.मोठी असून सर्व तऱ्हेच्या उपकरणांनीं सुसज्ज असायला हवी. अशा इमारतींत विद्यार्थिनींना व शिक्षकिणींना राहतां आलें पाहिजे. त्यांच्यावर मुख्याध्यापिका एतद्देशीय असायला हवी व तिचा सामाजिक दर्जा उच्च असायला पाहिजे. नुसतें लिहिणें वाचणें येऊन फायद्याचें नाहीं. त्या बरोबरच त्यांची नीति व त्यांची वर्तणूक उत्तम असली पाहिजे.

**प्रश्न** : आतांपर्यंत तुम्हीं दाखविलेत त्याखेरीज आणखी कोणते दोष सध्यांच्या शिक्षणपद्धतींत तुम्हांला आढळले व ते दूर करण्याचे कोणते मार्ग तुम्ही सुचवाल ?

**उत्तर** : मुलींच्या शाळा तपासण्याचें काम स्त्री इन्स्पेक्टरांनींच करावें. ह्या इन्स्पेक्ट्रेस-मग त्या हिंदी असोत कीं युरोपियन असोत—फार उच्च दर्जाचें शिक्षण पावलेल्या असाव्या व त्यांचा सामाजिक दर्जाहि उच्च असायला हवा. पुरुष इन्स्पेक्टर स्त्रियांच्या शाळा तपासावयास अयोग्य आहेत कारण (१) ह्या देशाच्या स्त्रिया जात्या फार भित्र्या आहेत. एखादा पुरुष इन्स्पेक्टर मुलींच्या शाळेंत गेला कीं तेथील विद्यार्थिनी व शिक्षकिणी भांबावून जातात व त्यांच्या तोंडांतून शब्दहि बाहेर पडत नाहीं. अशा स्थितींत इन्स्पेक्टर वाईट शेरा देईल आणि सरकार तेथील स्त्रीशिक्षिकेच्या जागीं एखाद्या पुरुष शिक्षकाची नेमणूक करील व अशा रीतीनें ती शाळा स्त्री शिक्षकिणीला मुकेल. मुलींचें शिक्षण मुलांच्या शिक्षणाहून भिन्न असल्यानें मुलींच्या शाळांवर स्त्री शिक्षकाच असायला पाहिजेत. (२) दुसरें कारण हें आहे कीं ह्या देशांतील शेकडा नव्वद सुशिक्षित पुरुष स्त्रियांच्या शिक्षणाच्या विरुद्ध आहेत. त्यांना आपल्या समजांत स्त्रियांना योग्य स्थान द्यायला नको आहे. राईच्या दाण्याएवढा दोष स्त्रींत आढळला तर ते त्याचा पर्वत करून दाखवितील आणि तिच्या शीलाचा सत्यानाश करायला निघतील. असेंच नेहमीं पहाण्यांत येतें कीं गरीब दीन बाई सुशिक्षित व धीट नसल्यानें तिच्या शीलाच्या चिंधड्या उडतात. अधिकाऱ्यांच्या कानांशीं पुरुषांना सहज लागतां येतें. त्यामुळें

पुरुषांवर कोणीहि डोळे झाकून विश्वास ठेवतो व बिचाऱ्या स्त्रीला रडत बसावें लागतें. सरकारला पितृस्थान भूषवायचें असल्यानें स्त्री व पुरुष ह्यांत सरकारनें भेद करणें योग्य नाहीं. हें अगदीं उघड आहे कीं स्त्रीया ह्या लोकसंख्येच्या अर्ध्या आहेत व लोकसंख्येचा दुसरा अर्धा भाग त्यांना पायांखालीं तुडवीत आहे. ह्या अन्यायाचा शेवट करणें हें चांगल्या सरकारचें कर्तव्य आहे.

मला आणखी एक सूचना करायची आहे कीं हिंदुस्थानांत स्त्री डॉक्टरांची अतिशय जरुरी आहे व ती उणीव दूर व्हावी. आमच्याकडे पुष्कळ डॉक्टर आहेत पण ते पुरुष डॉक्टर आहेत. आमच्या देशाच्या स्त्रिया इतर देशाच्या स्त्रियांपेक्षां अधिक लाजाळू आहेत. आपल्या रोगासंबंधीं एखाद्या पुरुषास कांहीं सांगत बसण्यापेक्षां त्या जीव देणें पत्करतील. ह्या देशांत शेंकडों आणि हजारों स्त्रिया त्यांच्या वयाला पुरीं वर्षे भरायच्या आधींच मृत्युमुखीं पडतात ह्याचें कारण स्त्री वैद्यांचा अभाव. म्हणून सरकारला मी अशी विनंति करीन कीं स्त्रीयांना वैद्यकीय शिक्षण देण्याची व्यवस्था व्हावी. ह्या शिक्षणाचे अभावीं ह्या देशांतील मोठी संख्या आज मृत्युमुखीं पडत आहे.[१]

हंटर कमिशनपुढें दिलेल्या साक्षीच्या वेळीं रमाबाईंची त्या कमिशनमधील सभासदांनीं उलट तपासणी ( क्रॉस एक्झ्यामिनेशन ) केली. तींत खालील प्रश्न विचारण्यांत आले.[२]

### १. मि. जेकब

**प्रश्न :** बॉम्बे कॉलेज ऑफ मेडिसिनमध्यें स्त्रियांना मिडविफरीचें शिक्षण देण्यासाठीं एक वर्ग काढण्यांत आला आहे, हें तुम्हांला ठाऊक आहे काय ?

**उत्तर :** होय, त्याबद्दल मीं ऐकलें आहे. पण मला असें वाटतें कीं त्याबरोबरच त्यांना कांहीं औषधाचें ज्ञानहि देण्यांत यावें म्हणजे त्या त्याचा उपयोग आपल्या कुटुंबांत व गांवीं करूं शकतील.

### २. मि. ली. वार्नर

**प्रश्न :** बहुसंख्य पुरुषवर्ग हा स्त्रीशिक्षणाच्या विरुद्ध असल्याचा तुमचा स्वतःचा अनुभव आहे काय ?

---

१. The High Caste Hindu Woman प्रस्तावना पृष्ठ : १६—१७

२. Education Commission (Bombay) RePot Vol. II Page 439

**उत्तर** : होय. मी आपल्या स्वतःच्या अनुभवावरून हें म्हणतें शिवाय स्त्रियांना संधि न मिळाल्यानें, त्यांचीं बाळपणीं लग्नें होत असल्यानें, व हिंदु जीवनांतील इतर गोष्टींमुळें त्यांच्यापुढें शिक्षणाच्या बाबतींत मोठाल्या अडचणी उभ्या राहत असतात.

३. अध्यक्ष

**प्रश्न** : मुंबई इलाख्यांत मुलींना घरीं शिक्षण मिळाल्याचीं आणखी कांहीं उदाहरणें आहेत कीं तुमचें तेवढें एकच उदाहरण दाखवितां येईल ?

**उत्तर** : आहेत. पण फार थोड्या प्रमाणांत. खुद्द माझ्या परिचयांतील अशा फारच थोड्या स्त्रिया आहेत. त्यांनीं आपल्या मातृभाषेचा थोडासा अभ्यास केला आहे. कांहीं थोडक्यांना संस्कृत येतें; व फक्त एक दोघींना इंग्रजी येतें. त्या शिवणकाम पुष्कळ करतात. घरांतील सारें शिवणकाम त्या करूं शकतात. स्वतःच्या चोळ्या शिवणें, मोजे विणणें वगैरे त्या करूं शकतात.

**प्रश्न** : हिंदु कुटुंबांतील एतद्देशीय स्त्रिया काव्य, धार्मिक कथा इत्यादि मुखोद्गत म्हणूं शकतात का ?

**उत्तर** : बहुतेक प्रत्येक हिंदु कुटुंबांत एखादी तरी स्त्री पुराणांतील भाग व काव्य तोंडपाठ म्हणूं शकते. परंतु लिहिणेंवाचणें जवळजवळ नाहींच म्हटलें तरी चालेल. फार थोड्यांना गणित येतें. फार थोड्यांना हिशेब ठेवतां येतो. ज्यांना गणित येत नाहीं त्या हाताचीं बोटें मोडून किंवा रेघा ओढून किंवा जमिनीवर फुलें टाकून हिशेब करतात. माझ्या म्हणण्याचा भावार्थ असा कीं त्या गाणीं तोंडपाठ म्हणूं शकतात. तीं गाणीं नेहमीं उच्च दर्जाचीं काव्यें असतात असें म्हणतां येणार नाहीं.

**प्रश्न** : सर जमशेटजींच्या दवाखान्यांतील स्त्रियांसाठीं उघडलेल्या वर्गांत चांगल्या कुळांतील एतद्देशीय स्त्रिया जातील असें तुम्हांला वाटतें काय ?

**उत्तर** : अशा स्त्रिया आरंभीं आरंभीं फार थोड्या प्रमाणांत जातील. परंतु ती अडचण हळू हळू कमी कमी होत जाईल.

ह्या गोष्टीनंतर चार वर्षांनीं बाईनीं आपल्या 'युनायटेड स्टेट्स्‌ची लोकस्थिति आणि प्रवासवृत्त' ह्या पुस्तकांत स्त्रीशिक्षणाबाबत लोकमताविषयीं असें लिहिलेलें आढळतें :

'आज सुमारें चार वर्षांमागें, हिंदुस्थानांत एका मद्रासेवांचून दुसरें कोठेंहि स्त्रियांस वैद्यकी शिकण्याची सोय नव्हती. आणि मद्रासेंतहि फार वरिष्ठ प्रतीचें शिक्षण मिळण्याची सोय नव्हती. लोकमत तर सर्वसाधारण स्त्रीशिक्षणास सुद्धां अनुकूल असें नव्हतें. तें स्त्रियांस वैद्यकीचें शिक्षण देण्याविरुद्ध फारच कडाक्याचें होतें हें सांगायाला नको. इ. स. १८८३ या सालांत पुण्यांत एज्युकेशन कमिशन नांवाच्या मंडळीपुढें—चालू असलेल्या स्त्रीशिक्षणांत कोणकोणते फेरफार आणि सुधारणा करणें उचित आहे ह्याविषयीं माझें मत देण्यास सदरील कमिशननें मला बोलावलें तेव्हां स्त्रियांस वैद्यकीचें शिक्षण अवश्य मिळावें म्हणून मीं सूचना केली. त्यानंतर त्या मंडळीचे अध्यक्ष डॉ. हंटर यांनीं मला सांगितलें कीं वैद्यकी हा विषय साधारण विद्याशिक्षणांत मोडत नसल्यानें त्याविषयीं सरकारास आमच्यानें सूचना करवणार नाहीं. परंतु मी घरगुती रीतीनें ही गोष्ट वरिष्ठ सरकारपुढें आणीन. पुढें पुष्कळ सज्जनांच्या उद्योगानें विलायतेहून स्त्री वैद्य आणविण्याकरितां एक मोठी वर्गणी जमा झाली. आणि सरकारनेंहि हा विषय शिकणाऱ्या बायकांकरितां कांहीं नेमणुका करून देऊन बायकांकरतां पुरुषांच्या वैद्यक शाळांमधून वर्ग काढले. पण रीतीप्रमाणें त्यांनीं आधीं मोठ्या मोठ्या विद्वानांच ह्याविषयीं काय मत आहे असें विचारलें. तेव्हां जसे त्रिविध जन असतात तशींच त्रिविध उत्तरें सरकारला मिळालीं हें येथें नव्यानें सांगायला नको. ह्यांत आश्चर्य मानण्याची गोष्ट एवढीच कीं कांहीं सुधारक आणि स्त्रीजनोन्नतीच्छु म्हणविणाऱ्या मंडळीचेंहि मत स्त्रियांस वैद्यक शिकवूं नये असें पडलें. बंगाल देशांतील भारतवर्षीय ब्राह्मसमाजाचे पुढारी केशवचंद्र सेन यांचें मत असें पडलें कीं स्त्रियांस विश्वविद्यालयां-(युनिवर्सिटी) मधून परीक्षासुद्धां देण्याची मोकळीक नसावी: आणि वैद्यक शिकल्यास स्त्रियांचें स्त्रीत्व राहाणार नाहीं. त्या असला कठीण विषय शिकण्यास उपयुक्त नाहींत.'[1]

बाईंना फारसें इंग्रजी येत नव्हतें. त्यामुळें त्यांची साक्ष मराठींतच झाली. पण त्यांच्या साक्षीचा सर हंटरच्या मनावर इतका विलक्षण परिणाम झाला कीं त्यांनीं त्या साक्षीचें इंग्रजींत भाषान्तर करविलें, आणि तें छापून घेतलें.

---

१. युनायटेड स्टेट्सची लोकस्थिति व प्रवासवृत्त. पृष्ठ १०.

बाईंच्या अंगच्या कळकळीचा पुष्कळच लोकांवर परिणाम झाला, त्यांतच हंटर साहेब होते. एडिन्बरोमध्यें डॉ. हंटर ह्यांनीं 'रमाबाई व त्यांची कामगिरी' ह्या विषयावर व्याख्यान दिलें. त्या व्याख्यानांत त्यांनीं बाईविषयीं व त्यांच्या कार्याविषयीं माहिती दिली. बाईंच्या सन्मानार्थ सभेंतील श्रोतृवृंद स्वयंस्फूर्तीनें उभा राहिला व त्यांनीं टाळ्यांचा गजर केला. डॉ. हंटर स्वतः ह्या प्रसंगासंबंधीं लिहितात:

"When I spoke of a high-caste Indian lady being thus employed, that great English audience rose as one man and applauded the efforts which the Pandita Ramabai was making on behalf of her country women."[1]

हंटर साहेबांचें हें भाषण व्हिक्टोरिया राणीच्या वाचनांत येऊन राणीनें ह्या विषयांत प्रत्यक्ष लक्ष घातलें व भारतीय स्त्रियांच्या वैद्यकीय शिक्षणास चालना दिली. ह्यानंतरच स्त्रीशिक्षण, स्त्री डॉक्टर व स्त्रियांसाठीं दवाखाने ह्यांचा भारतांत उदय झाला. १८८५ मध्यें लार्ड डफरीन येथें व्हाइसरॉय होऊन आले तेव्हां त्यांच्या पत्नीनें व्हिक्टोरिया राणीच्या उत्तेजनानें येथें खास स्त्रियांसाठीं डफरिन दवाखाने सुरू केले.

कलकत्यानें महाराष्ट्राला बाईंची ओळख करून दिली तशी हंटर साहेबांनीं इंग्लंडला त्यांची ओळख करून दिली. त्यांची कीर्ति दिगंतीं पोंचली. नुसतें इंग्लंडच नव्हे तर अमेरिकाहि त्यांच्याविषयीं आतां वाचूं बोलूं लागली!

---

१. High Caste Hindu Woman: Introduction xv.

## ७ परदेशगमन

हंटर कमिशनपुढें साक्ष देण्याच्या आधीं बाईंनीं १८८१ सालीं झालेल्या खानेसुमारीचा रिपोर्ट चांगला अभ्यासिला होता. त्यामुळें त्यांना कमिशनपुढें ठणठणीत बोलतां आलें. ह्या अभ्यासाचा दुसरा जो एक परिणाम झाला तो मात्र फारच महत्त्वाचा होता. आपल्या दलित भगिनींचा उद्धार व्हावा असें त्यांना नेहमीं वाटे परंतु हा उद्धार करण्यास आपणच पुढें सरसावलें पाहिजे असें हे आंकडे पाहिल्यानंतर त्यांच्या मनानें पक्कें घेतलें. त्या खानेसुमारींतील खालीं दिलेले आंकडे कोणालाहि खिन्न केल्यावांचून राहाणार नाहींत, मग त्या आंकड्यांनीं बाईंना अस्वस्थ करावें ह्यांत काय नवल?

इंपिरिअल सेन्सस कमिशनर मि. बेन्स ह्यांचा तो रिपोर्ट होता. त्या रिपोर्टावरून दिसून येतें कीं हिंदुस्थानची त्या वेळची लोकसंख्या २८,९१,८७,३१५ इतकी होती. ह्यांत लिहितां वाचतां येणारे लोक केवळ १,२०,९७,५३० एवढेच होते. २४ व्यक्तींत एक पुरुष लिहूं वाचूं शकत होता व ५३२ व्यक्तींत एक स्त्री लिहूं वाचूं शकत होती! साऱ्या हिंदुस्थानांत साक्षर स्त्रियांची संख्या केवळ ५,४३,४९५ होती. बाईंचें हृदय विदीर्ण केले असेल तें विधवांच्या आंकडेवारीनें. सरासरी एकूणतीस कोटींत २,३०,००,००० विधवा होत्या! त्यांतील पांच ते नऊ वर्षांतल्या ५१,८७५ होत्या तर चार वर्षांखालच्या १०,१६५ होत्या! पुढें तीन वर्षांनीं बाई अमेरिकेंत गेल्या तेव्हां त्यांना तेथें १०० ते ९३ पुरुष व ८९ स्त्रिया साक्षर असलेल्या आढळल्या. तेथले ते आंकडे पाहून रमाबाईंच्या मनाला हिंदुस्थानची स्थिति अधिकच बोचली असेल.

स्त्रियांच्या व विशेषतः अनाथ दुर्दैवी स्त्रियांच्या सेवेला वाहून घ्यावयाचें

असा जो बाईंनीं त्या वेळेस निश्चय केला त्याला आणखीहि एक तात्कालिक कारण घडलें. ह्याच सुमाराला एकानें रमाबाईकडे एक मुलगी आणून सोडली. ती एक बालविधवा होती. काळें कुळकुळीत व तिरळें असें तें ध्यान होतें. तिला कोणी जवळ उभें करीत नसे. पांचव्या वर्षीं बिचारीचें लग्न करून टाकण्यांत आलें होतें. लग्न झाल्यावर कांहीं दिवसांनीं तिचा नवरा मेला. त्यानंतर तिच्या छळाला सुरुवात झाली. आपला मुलगा अवदसेनें खाल्ला म्हणून सासू तिला उठतां लाथ व बसतां बुक्की देऊं लागली. शेजाऱ्या पाजाऱ्यांना तसेंच वाटायचें त्यामुळें तेहि तिच्याकडे त्याच दृष्टीनें पाहायचे. त्यांत एक सहृदय शेजारी होता. अतीच झालें तेव्हां त्यानें मुलगी उचलली आणि रमाबाईंच्या आश्रयाला आणून सोडली.

त्या मुलीकडे पाहून बाईंना तिचा अतिशय कळवळा आला. त्यांनीं तिला आपल्या पोटाशीं धरलें, तिच्या तोंडावरून हात फिरविला व तिची समजूत केली. त्या स्वतः विधवा असल्यामुळें तर त्यांना ती मुलगी अगदींच जवळची वाटली. त्यांनीं तिला आपल्या जवळ ठेऊन घेतलें. 'जे का रंजले गांजले। त्यासि म्हणे जो आपुले' ही वृत्ति तर ह्या वागण्यांत होतीच पण त्याहून त्यांत कांहीं थोडें अधिकहि होतें, म्हणजे त्यांत परिस्थितीबद्दल चीडहि होती. असल्या स्त्रियांबद्दल नुसती सहानुभूतीच नव्हती तर सहानुभूतिजन्य कर्तव्यजागृति—कर्तव्याची तीव्रतर जाणीव त्यांच्या ह्या वागणुकींत होती. हा बोजा आपल्यालाच उचलायचा आहे, हें दुसऱ्या कोणाचें काम नाहीं, दुसरा कोणी आपल्याला हातभार लावायला येणार नाहीं, असले विचार त्यांच्या मनांत उद्‌भवले.

ह्या बारा वर्षांच्या अबलेला पाहून, आपल्या मनांत कोणत्या विचारांनीं खळखळ उडवून दिली त्याचें शब्दचित्र रमाबाईंनीं आपल्या 'Mukti Prayer Bell' नांवाच्या मासिकांत रेखाटलें आहे.

'त्या आकृतीकडे मीं पाहिलें. तिला पाहतांच माझ्या मनांत कालवाकालव सुरू झाली. असल्या ह्या क्लेश भोगणाऱ्या भगिनींसाठीं कांहीं तरी करायला हवें असे जे विचार पूर्वीं मनांत येत ते केवळ वाऱ्यावरचे असत. त्या विचारांना आतां खराखुरा आकार येऊं लागला. हिंदु विधवांच्या वसतिगृहाचा एक आराखडा तयार करून तो आपल्या देशबांधवांपुढें मांडावा असें एक मोठें

जोराचें विचारचक्र माझ्या डोक्यांत फिरूं लागलें. ह्या कामासाठीं कोठून कांहीं मदत मिळते का, हें पाहण्यासाठीं मीं सहा महिन्यांपेक्षां अधिक काळ त्या खटपटींत घालविला, पण मला कांहीं यश आलें नाहीं. मग असा विचार डोकावूं लागला कीं आपल्या ह्या गरीब भगिनींसाठीं कांहीं करायचें तर स्वतःच डॉक्टर होऊन कां नाहीं त्यांना साह्य करूं ? कांहीं मार्ग जर उघडला तर त्यासाठीं इंग्लंडलाहि जाण्याची माझी तयारी होती. जो अदृश्य परमेश्वर माझ्या पावलांना मार्गदर्शन करीत होता, त्याच्याच प्रेरणेनें माझ्या पुढच्या कार्याची घडण होत होती. आपल्या योजना कृतींत आणणें त्याच परमेश्वरानें शक्य केलें.'[१]

पुढें शारदासदनाच्या उद्घाटन समयीं रमाबाईंनीं ह्याबाबत केलेल्या भाषणाचा अहवाल मुंबईच्या इंदुकप्राशांत प्रसिद्ध झाला होता. त्यांत बाईंनीं ह्या विषयाचें अधिक विस्तृत विवरण केलें आहे.[२]

'अशा प्रकारच्या एखाद्या संस्थेची स्थापना करण्याचा माझा निश्चय ठरला. मी पुण्यास आलें, मुंबईस आलें, अहमदाबादेस गेलें आणि तेथील पुढारी व धनवान् लोकांस माझा विचार कळविला. परंतु मोठी दुःखाची गोष्ट आहे कीं, आमच्या हितचिंतकांपैकीं कोणासहि तो रुचला नाहीं. त्यांत काय अर्थ आहे ? तसें करण्याची कांहीं जरुरी नाहीं ! असेंच मला सांगण्यांत आलें. एक उदार गृहस्थ मात्र मला म्हणाले कीं, आम्ही तुम्हांस १०,००० रुपये देतों. अट ही कीं तुम्ही तेवढ्यांत ४०,००० रुपयांत होणारें काम करून दाखवा.' आतां आपणच सांगा हें माझ्यानें किंवा कोणाच्यानेंहि कसें होणार ? माझा निरुपाय झाला, तेव्हां स्वदेश सोडून विलायतेस जाण्याचा मीं निश्चय केला.'[३]

बाईंनीं इंग्लंडला जाण्याचें ठरविलें हें ऐकतांच त्यांच्या मित्रमंडळींत मोठी खळबळ उडाली. त्यांच्या वयाकडे पाहून व त्यांना इंग्रजी जवळजवळ अगदीं येत नसल्यानें ही बाई तेथें आपली फजिती करून घेईल असें त्यांची

१. Mukti Prayer Bell : September 1907

२. इंदुप्रकाश : १८–३–१८८९

३. इंदुप्रकाशः १८ मार्च १८८९.

जी खरी खरी हितचिंतक मंडळी होती त्यांना वाटूं लागलें. 'अहो तुम्हाला वैद्यक शिकायचें तर त्यासाठीं इतकें दूर आणि परक्या देशांत कशाला जायला हवें? आपल्या मद्रासेंत आहे ना स्त्री वैद्य तयार करण्याची शाळा! असें ते म्हणूं लागले. ह्याला बाईंचें असें उत्तर होतें :

'माझा वैद्यकी शिकण्याचा इरादा आहे. परंतु हिंदुस्थानांत राहून चार वर्षांनीं मॅट्रिक्युलेशन परीक्षा देऊन येथें वैद्यकी शिकण्यांत तिचा कांहीं एक उपयोग झाला नसता. कारण हिंदुस्थानांत बी. ए. परीक्षेपर्यंत अभ्यास केला तरी लंडन युनिव्हर्सिटींत पुनः मॅट्रिक्युलेशन परीक्षा दिल्यावांचून येथील मेडिकल कॉलेजांत प्रवेश नाहीं असा कायदा आहे. हिंदुस्थानांत राहून मद्रास मेडिकल कॉलेजांत शिकावें तर मला माझ्या देशभगिनींच्या उपयोगी पडण्यास जितकें ज्ञान पाहिजे तितकें मद्रासेंत होत नाहीं........लंडन युनिव्हर्सिटीची मॅट्रिक्युलेशनची परीक्षा हिंदुस्थानांतील मॅट्रिक्युलेशनपेक्षां सुलभ आहे. येथें राहून ती परीक्षा मी सव्वा किंवा दोन वर्षांत देऊं शकेन अशी मला उमेद आहे. परंतु हिंदुस्थानांत राहून चार वर्षांनींहि मला ही परीक्षा देण्याची शक्ति आली नसती.'

बिपिनचन्द्र पाल आपल्या आठवणींत लिहितात कीं ह्याच सुमाराला (म्हणजे १८८१-८२ च्या सुमराला) बाबू दुर्गादास आपल्या कन्येला मद्रास-मधील मेडिकल कॉलेजमध्यें टाकण्यासाठीं कलकत्त्याहून मद्रासेस गेले. त्या वेळीं मद्रासेंतच फक्त स्त्रियांच्या वैद्यकीय शिक्षणाची सोय होती असें दिसतें. व मॅट्रिकची परीक्षा दिलेल्या स्त्रियांना त्यांत प्रवेश मिळे. सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ सर जगदीशचंद्र बोस ह्यांच्याशीं पुढें ह्या मुलीचा विवाह झाला.

रमाबाई मद्रास कॉलेजचा व मॅट्रिक परीक्षेचा जो उल्लेख करतात तो बहुतेक ह्याच वस्तुस्थितीला अनुलक्षून असावा.

'ह्या उत्तेजक देशांत हिंदुस्थानपेक्षां अभ्यास जास्त वेळ करतां येतो. कारण हा मुलूख थंड असल्याकारणानें सतत बारा तास मेहनत केली तरी थकवा येत नाहीं. परंतु अशी मेहनत हिंदुस्थानसारख्या उष्ण मुलखांत माझ्यासारख्या मनुष्याच्यानें कदापि व्हायची नाहीं; आणि येथें पाहून सवरून जितकें लवकर ज्ञान होतें तितकें हिंदुस्थानांत होण्यास साधनें फार थोडीं आहेत, हें मला

हिंदुस्थानांत असतां अनुभवी मित्रांनीं सांगितलें होतें आणि आतां तर अनुभवानें समजलें.'[१]

वरील उत्तर एका पत्रांत होतें. हें पत्र बाईंनीं इंग्लंडला पोंचल्यावर येथील मित्रांच्या शंकांना उत्तरें देण्यासाठीं लिहून पाठविलें होतें.

इंग्लंडच्या ह्या प्रवासवर्णनांत बाई म्हणतात कीं, मीं कोणाचेंहि साह्य मागितलें नाहीं. हें विधान सर्वस्वी खरें नाहीं असें The High Caste Hindu Woman च्या शेवटल्या पॅऱ्यावरून दिसून येईल असें कित्येकांचें म्हणणें आहे.[२] पण संदर्भ लक्षांत घेतल्यास, पंडिता रमाबाई करीत आहेत तें विधान यत्किंचितहि अतिरंजित नाहीं अशी खात्री पटेल. केडगांवच्या हल्लींच्या मंडळीचें असें म्हणणें आहे कीं पंडिता रमाबाई याचना (म्हणजे Appeal) करीत नसत. त्या फक्त देवाची प्रार्थना करीत व देव त्यांच्या गरजा पुरवी, परंतु खरोखरी येथें त्या जें म्हणतात तें सर्वस्वी वेगळें आहे. आपण आपल्या कष्टानें पैसे मिळविले, मिळवीत आहों व मिळविणार आणि त्याच्या जोरावर आपण आपला प्रवासखर्च आणि आपला इंग्लंडमधील खाण्याराहण्याचा खर्च—दुसऱ्यावर थोडा देखील भार न घालतां—करणार व करीत आहों, असा त्यांच्या बोलण्याचा आशय होता.

१. इंग्लंडच्या प्रवासाचा सारा खर्च त्यांच्या 'स्त्री-धर्म-नीति' ह्या पुस्तकावर त्यांनीं मिळविला. पहिलीच आवृत्ति एका झटक्यांत खपली, कारण त्यांतील अर्धीं पुस्तकें सरकारनें खरेदी केलीं. दादोबा पांडुरंग[३] हे आपल्या आयुष्याच्या

---

१. रमाबाईंचा इंग्लंडचा प्रवासः पृष्ठें १७ व १८

2. 'Will you not all of you who read this book think of these, my country-women, and rise, moved by the common impulse, to free them from life-long slavery and infernal misery? I beg you friends, and benefactors, educators and philanthropists, all who have any interest in or compassion for your fellow-creatures, let the cry of India's daughters, feeble though it be, reach your ears and stir your hearts. In the name of humanity, in the name of your sacred responsibilities as workers in the cause of humanity, and, above all, in the most holy name of God, I summon you, true women and men of America to bestow your help quickly, regardless of nation, caste or creed.' High Caste Hindu Woman. पृष्ठ ११९

३. प्रियोळकरकृतः दादोबा पांडुरंग चरित्र पृष्ठें ४०६, ४०७.

शेवटल्या घटकेपर्यंत सरकारी नौकरींत होते. शेवटलीं दोन वर्षे ते मराठी ट्रान्स्लेटर ह्या हुद्यावर होते. त्यांच्या शिफारशीवरून तीं पुस्तकें सरकारनें खरेदी केलीं.[१]

२. इंग्लंडमध्यें खाण्याराहण्याच्या सोयीसाठीं रमाबाईंनीं काम पत्करिलें होतें. त्यासाठीं त्यांना कोणीं एखादी स्कॉलरशिप दिली नव्हती. इंग्लंडहून भारतांत येणार असलेल्या 'सिस्टर्सना' मराठी शिकविण्याचा त्यांनीं पत्कर घेतला होता व त्याबद्दल त्यांना इंग्रजी शिक्षण व राहण्याखाण्याची व्यवस्था हीं मोबदला म्हणून मिळत होती[२].

३. बाईंनीं इंग्लंडला पोंचल्यावर भारतांतील आपल्या एका मित्राला लिहिलेल्या पत्राचा वर उल्लेख आला आहे. त्या मित्रानें तें पत्र पुढें पुस्तकरूपानें प्रसिद्ध करून त्याच्या विक्रीचा पैसा बाईंना त्यांच्या 'अभ्यासाच्या साह्यार्थ' पाठवून दिला.

४. एका वर्षानंतर चेल्टनहॅम येथील स्त्रियांच्या कॉलेजमध्यें संस्कृत अध्यापिकेचें त्यांना काम मिळून त्यावर अध्ययनाची व खाण्यापिण्याचीहि तरतूद झाली.

वरील पुराव्यावरून दिसून येईल कीं बाईंचें विधान 'असेल माझा हरि तर देईल खाटल्यावरी' असलें ऐतखाऊ व बेपर्वाईचें नव्हतें. त्याचें अधिष्ठान सत्यांत व सत्याचा उगम आत्मविश्वासांत होता.

'हायकास्ट हिंदु ऊमन' ह्या पुस्तकाच्या शेवटीं बाईंनीं जी 'याचना' किंवा 'अपील' केलें आहे तें पाहण्यासारखें आहे. हें अपील बाईंनीं स्वतःसाठीं केलें नसून 'हिंद कन्यकां'साठीं केलेलें आहे.

'पंडिता रमाबाई यांचा इंग्लंडचा प्रवास' ह्या पुस्तकांतील विधान जेव्हां बाईंचा बाप्तिस्मा झालेला नव्हता व बाप्तिस्मा घेण्याचा त्यांचा उद्देशहि नव्हता, तेव्हांचें आहे. त्या ह्याच पुस्तकांत म्हणतात : 'सिस्टर सुपीरियर कडून मला निरोप कळला कीं येथें आलें असतां त्यांच्या ज्या पुष्कळ सिस्टर्स हिंदुस्थानास जाणार आहेत त्यांस मराठी शिकण्याची जरुरी आहे व तें काम जर मीं

१. पंडिता रमाबाई, फुलरः पृष्ठ २५.
२. रमाबाईंचा इंग्लंडचा प्रवासः पृष्ठ ५.

पत्करिल तर माझा खर्च (खाण्यापिण्याचा) त्या चालवितील आणि मला इंग्रजी शिकवितील....मीं त्यांना सांगून पाठविलें कीं त्यांनीं जो माझा पत्कर घेतला तो जर निःस्वार्थ असेल (म्हणजे पुढें मला आभारी करून ख्रिश्चन करण्याच्या आशेनें किंवा दुसऱ्या कोणत्याहि प्रकारच्या मतलबानें नसेल) तरच मी त्यांच्या मंडळीपाशीं राहाण्यास जाईन नाहींपेक्षां जाणार नाहीं.' 'Nothing would induce me to embrace Christianity' असें विधान बाईंनीं पंढरपुरास केलें होतें. बाईंचा आत्मविश्वास दांडगा होता. व आपण जें काय साह्य घेऊं तें धर्मादाय म्हणून न घेतां काम करून त्याचा मोबदला घेणार आहों असला स्वाभिमान त्या बाळगीत होत्या.

रमाबाईंनीं हिंदुस्थान सोडलें, तेव्हां इग्लंडला गेल्यावर त्या ख्रिस्ती धर्म स्वीकारतात कीं काय अशा संशयी वृत्तीनें त्यांच्या प्रार्थनासमाजी मित्रमंडळीचा जीव धाकधूक होत होता. ह्यासंबंधानें मिस फुलर लिहितात: [१]

"Her friends of the Prarthana Samaj in both Poona and Bombay were in two minds about her going to England. Until she had become so interested in Christianity, they had favoured her going, but now they feared lest she became a Christian. In her earlier lectures she had quoted much from the Bhagwat-Gita, which she knew entirely by heart; but of late she had quoted almost exclusively from the Gospels. When questioned about this change, she replied that she still loved the Gita, but that she was much taken up with the teaching of Jesus Christ, and especially by his attitude towards women, that she naturally spoke of what was uppermost in her mind."

येशू ख्रिस्ताची स्त्रीजातीसंबंधीं जी शिकवण व वागणूक होती तिनें बाईंना आकृष्ट केलें होतें व त्याचा परिणाम म्हणजे त्यांच्या अलीकडल्या व्याख्यानांतून बायबलमधील संदर्भ अधिक प्रामुख्यानें येऊं लागले. आधीं आधीं प्रार्थनासमाजी मित्र मंडळी बाईंच्या परदेशगमनाला अनुकूल होती परंतु हा फरक त्यांच्या नजरेस येतांच ते बाईंच्या जाण्याच्या विरुद्ध झाले. त्यामुळें बाईंच्याहि मनाचा कृतनिश्चय झाला कीं आपण कसल्याहि प्रलोभनाला

१. The Triumph of an Indian Widow : Fuller. पृष्ठ २६.

बळी पडून ख्रिस्ती होणार नाहीं. म्हणूनच वर उल्लेखल्याप्रमाणें त्यांनीं साह्य घेतांना ही गोष्ट हडसून खडसून पक्की करून घेतली.

रमाबाई इंग्लंडांत गेल्यावर वॉन्टेज गांवच्या Sisters of the Community of St. Mary the Virgin' ह्या भगिनीवर्गाबरोबर राहणार होत्या. पण तें एका मिशनरीब्रोवांना न आवडून बाईच्याकडे त्यांचें मन वळवायला ते गेले. त्यासंबंधानें बाई म्हणतात :

'मी इकडे येण्याच्या आदल्या दिवशीं रात्रीं एका पाद्रीसाहेबांनीं येऊन मला इकडे आणि विशेषतः या मंडळींत न येण्याविषयीं पुष्कळ समजावून सांगितलें. परंतु माझी सर्व तयारी झालेली होती आणि माझा निश्चय कांहीं केल्या फिरेना. शेवटीं त्यांचे उपाय थकले तेव्हां साहेब मनांतल्या मनांत रागावले आणि मला म्हणाले : पहा बाई, तुम्ही आतां आमचें मत घेतल्यावांचून जात आहां. तुम्हांला तिकडची बोली येत नाहीं. तुमच्याजवळ पुष्कळसा पैसा नाहीं, अशा स्थितींत तुमच्यावर जर कांहीं वाईट प्रसंग आला तर आम्ही कांहीं साह्य करणार नाहीं. कारण तुम्ही आमचें ऐकत नाहीं.' वास्तविक असें म्हणण्याचा त्यांस कांहीं अधिकार नव्हता, कारण मी कोणत्याहि प्रकारचें साह्य त्यांच्यापाशीं मागितलें नव्हतें. असो, तरी मीं त्यांना उत्तर दिलें : 'अहो साहेब, तुम्हीं मला साह्य केलें नाहीं म्हणून काय झालें? माझा ईश्वर मला साह्य करील. मनुष्यानें मनुष्याचें तारण किंवा मारण करवत नाहीं. जें मनुष्य वाघाच्या तोंडांत आहे तें दुसऱ्याला वाघापासून कसें वांचवील?—सदरहू साहेबांनीं जसें निष्कारण म्हटलें तसेंच माझ्या देशबांधवांजवळ इकडे येण्यासंबंधीं मी साह्य मागितलें तर तेहि मला तसेंच पण सकारण म्हणतील, या भयास्तव मीं कोणाचेंहि साह्य मागितलें नाहीं. कारण सर्वांच्या मताविरुद्ध मी इकडे निघून आलें हें उघडच आहे,'

सर्व व सर्व तऱ्हेच्या विरोधाला तोंड देऊन रमाबाई आपल्या दोन वर्षांच्या कन्येसह इंग्लंडला जाण्यास निघाल्या. १८८३ सालीं एप्रिल महिन्याच्या २० तारखेस सायंकाळीं ४ वाजतां बुखारा नांवाच्या बोटीनें मुंबईहून निघून १७ मे रोजीं त्या इंग्लंडच्या किनाऱ्याला लागल्या. त्यांना उतरून घेण्यास वाण्टेज येथील 'भगिनी' आल्या होत्या. त्यांनीं त्यांचें प्रेम-पूर्वक स्वागत केलें. वाण्टेज हें ऑक्सफर्ड जिल्ह्यांतील बर्कशायर तालुक्यांतील एक लहानसें

शहर आहे. ह्या ठिकाणीं 'कम्युनिटी ऑफ सेंट मेरी दि व्हर्जिन' ह्या नावानें प्रसिद्ध असलेल एक कॉन्व्हेंट म्हणजे मठ आहे. तेथील 'सिस्टर्स' रमाबाईंना व त्यांच्या कन्येला आपल्या मठांत घेऊन आल्या. बाई पुण्यास असतांना, मिस हरफर्डनें त्यांच्यापैकीं एका सिस्टरशीं बाईंची ओळख करून दिली होती. रमाबाई म्हणतातः 'ह्या सिस्टरर्सपैकीं एकजण माझी आध्यात्मिक बाबतींत माता झाली. तिनें मला ताबडतोब धार्मिक व इतर शिक्षण देण्यास सुरुवात केली. ह्या भगिनीचें ऋण व चेन्टनहॅम येथील स्त्रियांच्या कॉलेजच्या प्रिन्सिपाल मिस् बील ह्यांचें ऋण मी कधींच विसरणार नाहीं.'[1]

रमाबाईंनीं ज्या सिस्टरला आपली माता म्हटलें होतें तिचें नांव सिस्टर जिराल्डीन असें होतें. हिनेंच पुढें मनोरमेचें कांहीं काळ संगोपन केलें. मनोरमा हिला 'आजीबाई' म्हणे.

पुढें रमाबाईंनीं येथें आपल्या कन्येसह बाप्तिस्मा घेऊन ख्रिस्ती धर्माचा अंगिकार केला. सिस्टर जिराल्डीन त्या प्रसंगीं साक्षीदार होत्या.[2]

२९ सप्टेंबर १८८३ रोजीं वाण्टेज येथील ख्रिस्ती उपासनालयांत बाप्तिस्म्याचा विधि कॅनन बटलर ह्यांच्या हस्तें झाला. हे गृहस्थ 'कम्युनिटी ऑफ सेंट मेरी द व्हर्जिन' ह्या संस्थेचे संस्थापक व डीन होते. बाप्तिस्म्याच्या वेळीं दोघा मायलेकींचीं नांवें बदलण्यांत आलीं. त्यांना दोघींनाहि एकच म्हणजे 'मेरी' हें नांव देण्यांत आलें[3]. परंतु पुढें त्या दोघींनीं आपलीं जुनींच नांवें म्हणजे रमा व मनोरमा हीं वापरलीं. २४ वर्षां पूर्वीं ह्याच मतानुसारी चर्चमध्यें निळकंठशास्त्री गोरे ह्यांचा बाप्तिस्मा झाला होता. बाप्तिस्म्याच्या वेळीं त्यांना 'नहेम्या' असें नवें नांव देण्यांत आलें होतें. त्यांनीं मात्र आपलें नवें बायबलमधील नांव ख्रिस्ती झाल्यानंतर वापरलें. बाप्तिस्मा झाल्यानंतर ह्या मतानुसारी चर्चमध्यें Confirmation अथवा दृढीकरण म्हणून एक विधि असतो. तो विधि रमाबाईंच्या बाबतींत त्याच वर्षीं डिसेंबरमध्यें करण्यांत आला.

---

१. रमाबाईंचा इंग्लंडचा प्रवास पृष्ठ ३१.

२. Dr. MacNiçol: Pandita Ramābai. पृष्ठ ६२.

३. राइट रेव्हरेंड बिशप विल्यम लॅश–मुंबईचें बिशप—ह्यानीं आपल्या एप्रिल १९५८ च्या बिशप्स लेटरमध्यें बाप्तिस्म्याच्या रेकार्डचा उतारा देऊन ही माहिती प्रसिद्ध केली आहे.

बाईच्या ख्रिस्ती धर्म स्वीकाराविषयीं पुढें एका प्रकरणांत अधिक विस्तारानें लिहिलें आहे. मिस फुलर ह्यांनीं आपलें 'The Triumph of an Indian Widow' हें रमाबाईचें चरित्र त्यांच्याजवळ राहूनच लिहिलें आहे. बाईच्या सान्निध्यामुळें व त्यांच्याकडे लेखिका स्वतःच्या लहानपणापासून राहिल्यानें त्यांची माहिती विश्वसनीय मानण्यास हरकत नाहीं. ह्या बाबतींत त्या म्हणतात.

'She had during her wanderings become a theist.[१] Her husband had been a theist, and it was easy for her to accept our Lord as the Unitarians[२], do; but the doctrine of His essential Deity troubled her, and after some months, with characteristic frankness, she told the Sisters that since she did not think त्यांच्या श्रद्धेनुसार she could be a Christian she could no longer stay with them, putting herself under greater and greater obligation, when in the end she could only disappoint them. She would not return, she said unless she became convinced of the truth of their teaching, in which event she would become a Christian. With great sorrow they saw her go, and never did they cease to pray for her return until she did indeed come back. It was the letters of Father Goreh, himself a Konkanastha Brahman, a Sanskrit scholar, and a master of Logic, that had convinced her. It was he who understood, out of his own experience and suffering, how to satisfy her mind for he, too. had come the very way she must take.'[3]

मिस फुलर ह्यांचें म्हणणें थोडक्यांत असें होतें कीं ह्या वेळेस बाईनीं जरी बाप्तिस्मा घेऊन ख्रिस्ताला उघड उघड पत्करिलें होतें तरी त्यांचा विश्वास संपूर्णपण ख्रिस्ती माणसाप्रमाणें नव्हता. ख्रिस्ती धर्मावर त्यांचा विश्वास होता

---

१. Theist ईश्वरवादी (-बाबा पदमनजी व रानडे.) Theism-Belief in The existence of a God supernaturally revealed to man and sustaining a personal relation to his creation. (Oxford)

२. Unitarian ईश्वर एकात्मक आहे, व पिता, पुत्र व पवित्र आत्मा, असा त्रयात्मक नाहीं असें मानणारा ख्रिस्ती (-रानडे)One who is a member of a Christian body that maintains against the doctrine of Trinity that God is one person. (Oxford)

३. Triumph of an Indian Widow. पृष्ठ २७

तो त्यांच्या पतीप्रमाणें 'थीइस्टिक' मतानुसारी होता. त्यामुळें त्या 'युनिटेरियन मतानुसारी तर नाहींत ना, असाहि कित्येकांचा समज होई.

ख्रिस्ती पंथाचा त्र्यैक्यावर (Trinity) फार कटाक्ष असतो. परंतु ख्रिस्ती लोकांत साधारणतः असा एक पंथ आहे कीं जो त्र्यैक्य मानीत नाहीं. त्यांना Unitarians म्हणजे एकेश्वरवादी म्हणतात. त्र्यैक्य मानणारे परमेश्वर पिता, परमेश्वर पुत्र (म्हणजे येशू ख्रिस्त) व परमेश्वर पवित्र आत्मा ही एकच व्यक्ति आहे असें मानतात. युनिटेरियन लोकांना युरपमध्यें बराच छळ सोसावा लागला होता. ह्या मताच्या ख्रिस्ती लोकांना इतर ख्रिस्ती लोक पाखंडी म्हणतात. आपण पूर्णपणें ख्रिस्ती होणें शक्य नाहीं तेव्हां वॉन्टेज येथील भगिनी मंडळांत राहाण योग्य नाहीं असें वाटून रमाबाईनीं कांहीं दिवस तो आश्रम सोडला होता. त्यावेळीं तेथील 'भगिनींनीं' बाईसाठीं अखंड प्रार्थना सुरू केली व नंतर कांहीं दिवसांनीं आपल्या 'विश्वासांत' फरक झाल्याचें बाईच्या ध्यानांत आल्यावर त्या वॉण्टेजला परत आल्या.

ह्याच संशयावर्तांत असतां बाईना फादर गोरें ह्यांनीं कांहीं पत्रें लिहिलीं होती. २५ वर्षांपूर्वीं फादर गोरे अशाच विचारचक्रांत सांपडले होते. त्यांना त्या वेळीं ज्या तऱ्हेच्या मार्गदर्शनाची जरुरी होती, तशीच ह्या वेळीं बाईना होती व हें जाणून त्यांनीं हीं पत्रें लिहिलीं. ह्या दोन्ही व्यक्ती संस्कृतच्या अधिकारी होत्या व त्यामुळें बाईच्या ह्या संमोहावस्थेंत फादर गोऱ्यांच्या त्या पत्रांचा बाईना फार उपयोग झाला.

त्या निर्णायक समयीं खुद्द बाईंची विचारसरिता कशी वाहात होती ह्याचें दिग्दर्शन 'A Testimony' ह्या पुस्तकावरून समजेल. बाई म्हणतात :

'माझ्या बाप्तिस्म्यानंतर व दृढीकरणानंतर (Confirmation) मी निरनिराळ्या धार्मिक पुस्तकांच्या साह्यानें ख्रिस्तीधर्म सिद्धांतांचा अधिक बारकाईनें अभ्यास केला. ख्रिस्ती धर्मपंथांतील वेगवेगळ्या धर्मशिक्षणानें मी अगदीं भांबावून गेलें. आपला विशेष सिद्धांत सिद्ध करण्यासाठीं प्रत्येकजण बायबलचाच आधार घेत होतें.

'माझ्या बाप्तिस्म्यानंतरचीं पांच वर्षें, मीं ह्या सगळ्यांचा अगदीं कसोशीनें अभ्यास करण्यांत घालविलीं. ख्रिस्ती धर्मपंथांतल्या हाय चर्च, लो चर्च,

बॅप्टिस्ट, मेथॉडिस्ट, प्रेस्बिटेरियन, फ्रेंडस, युनिटेरियन्स,[१] रोमन कॅथलिक, ज्यू[२] इत्यादि महत्त्वाच्या पंथांतील लोकांशीं माझ्या गांठी पडल्या, इतकेंच नाहीं तर स्पिरिच्युॲलिस्ट्स्, थिऑसॉफिस्टस, मर्मोन्स, ख्रिश्चन सायंटिस्ट्स्, व ज्याला गूढवादी धर्म म्हणतात (Aucult Religion) त्याहि पंथाचे लोक मला भेटले.

'ख्रिस्ती म्हणविणाऱ्या देशांत धर्माचें हें बाबेल (ब्रह्मघोटाळा) पाहिल्यावर मला काय वाटलें असेल, व एका पंथाचें शिक्षण दुसऱ्याच्या विरुद्ध आहे हें पाहून माझें मन किती खिन्न झालें असेल, ह्याची कल्पनाच कोणाला करतां येणार नाहीं. नास्तिक पंथ थिआसफी[३] ह्या नांवानें, बहुभार्याव्रती मार्मोन ह्या नांवानें, भुताखेतांच्या मागें लागलेले स्पिरिच्युअलिस्ट, जुने वेदान्ती मत चालविणारे ख्रिश्चन सायंटिस्ट, असे युरोपियन पोषाखांत वावरणारे पौर्वात्य पंथहि मला येथें आढळले. त्यांच्या जुन्या पोषाखांत मी त्यांना ओळखीत होतेंच. त्यांचें शिक्षण मला नवें वाटलें नाहीं. देशकालपरत्वें व हवामानाप्रमाणें त्यांनीं आपले पोशाख बदलले आहेत हें मीं तेंव्हांच ताडलें. जुन्या ख्रिस्ती पंथांतहि भेद होतेच........हें सर्व एकच दर्शवीत होते कीं लोक आपसांत भांडत होते व त्यांच्यांत एवढें देखील ऐक्य नव्हतें. मी माझ्या नव्या धर्मांगिकारानें संतुष्ट होतें तरी माझ्यापुढें फार मोठाल्या बौद्धिक अडचणी उभ्या होत्या. मला सांपडलें नाहीं असें कांहीं तरी आहे असें वाटे व तिकडे माझी ओढ लागली होती. माझ्या योग्य असा ख्रिस्ती धर्म मला सांपडला होता. पण त्या धर्माचा गाभा जो ख्रिस्त तो मला मिळाला नव्हता. जगांत येणाऱ्या प्रत्येकाचा तो प्रकाश आहे.[४]'

---

१. ह्या युनिटेरियन लोकांचा आरंभीं आरंभीं अमेरिकेंत कसा छळ झाला ह्याची माहिती रमाबाईंच्या 'युनायटेड स्टेट्स्‌ची लोकस्थिति व प्रवासवृत्त' पुस्तकांत सांपडते (पृष्ठ १९३). इ, स. १७०५ मध्यें वर्जिनिया संस्थानच्या शासकांनीं असा ठराव केला, कीं जो कोणी एका परमेश्वरांत तीन व्यक्ति असून त्यांचें ऐक्य आहे व बायबल हा ईश्वरप्रणीत ग्रंथ आहे ह्या गोष्टी कबूल करणार नाहीं त्याला तीन वर्षें कैदेची शिक्षा मिळेल आणि त्याच इसमानें फिरून ह्या गोष्टी नाकारल्यास त्याला सरकारी कामें वगैरे मिळण्यास पुष्कळ अडथळे असावे.'

२. ज्यू किंवा यहुदी हे लोक ख्रिस्ती नाहींत.

३. थिऑसफी नास्तिक्यवादी आहे काय? ४. A Testimony पृष्ठें १५, १६.

वॉण्टेज येथील 'सिस्टर्स' संबंधीं बोलतांना रमाबाईंनीं मिस फुलर ह्यांना सांगितलें कीं सिस्टर जिराल्डीन ह्या 'भगिनीनें' आपल्याला आपल्या आयुष्यांतील सर्वांत मोलवान देणगी दिली. ती म्हणजे शिस्त. तसेंच टापटीप व वक्तशीरपणा ह्यांचें मोलहि मला येथेंच कळलें.

वॉण्टेजच्या ममताळू 'भगिनी मंडळा' मध्यें एक वर्षभर राहून रमाबाईंनीं इंग्रजी भाषेचें पुष्कळ ज्ञान संपादन केलें. तेथें त्यांना ख्रिस्ती धर्माचेंहि पुष्कळ शिक्षण मिळालें. १८८२ सालीं बाईंनीं वॉण्टेज मठ सोडला व त्या चेल्टन-हॅम येथील स्त्रियांच्या कॉलेजमध्यें पुढील शिक्षण घेण्यास गेल्या. मनोरमेला वॉण्टेज भगिनींकडेच ठेवण्यांत आलें. चेल्टनहॅम कालेजांत बाई अध्ययनाचें व अध्यापनाचें अशीं दोन्ही कामें करूं लागल्या. संस्कृत शिकवून त्या आपला तेथील खर्च भागवीत. कॉलेजमध्यें त्या स्वतः गणित, सायन्स व इंग्रजी वाङ्मय हे तीन विषय शिकत.

कॉलेजच्या प्रिन्सिपॉल बील ह्यांचें रमाबाईंना फार साह्य झालें व सिस्टर जिराल्डीन प्रमाणेंच ह्या बाईंविषयींहि रमाबाईंना फार कृतज्ञता वाटे.

रमाबाईंना ऐकायला फार कमी येत असे, त्यामुळें त्या मिस् बीलच्या-अगदीं जवळ बसून त्यांचीं 'लेक्चर्स' ऐकत. मिस् बील ह्या शनवारचा बायबलचा वर्ग घेत. त्यावेळीं त्यांना अगदीं खेटून बसलेल्या व ऐकण्यांत गर्क झालेल्या रमाबाई अजून आपल्या डोळ्यांपुढून हालत नाहींत असें त्यांच्या एक सहाध्यायी म्हणतात. मिस् बिलच्या त्या वर्गांतील शिक्षणांत योहानाच्या शुभवतमानांतील पहिल्या अध्यायाच्या पहिल्या ८ वचनांवर त्यांनीं जें भाष्य केलें तें रमाबाईच्या अंतःकरणांत नेहमींचें बिंबलें होतें.

अशा रीतीनें चेंल्टनहॅम येथील कॉलेजांत रमाबाईंचा अभ्यास फार चांगल्या रीतीनें चालू झाला. मनोरमेची काळजी घेणाऱ्या 'मावशा' व 'आजी' वॉण्टेज मठांत त्यांना देवानें दिल्या होत्याच. १८८६ च्या मार्च महिन्यापर्यंत अशा रीतीनें बाईंचा अभ्यासक्रम सुरळितपणें आटोपला. मध्यंतरीं १८८५ च्या जानेवारी महिन्यांत अमेरिकेंतील फिलाडेल्फिया येथील स्त्रियांच्या वैद्यकीय कॉलेजच्या मुख्याध्यापिका डॉ. रेचेल बॉडले ह्यांच्याकडून रमाबाईंना

---

१. The Triumph of an Indian Widow. पृष्ठ २७

एक पत्र आलें. त्यांत त्यांनीं बाईंना मोठ्या आग्रहानें अमेरिकेला येण्याचें आमंत्रण दिलें होतें. रमाबाईंची कीर्ति केवळ इंग्लंडमध्येंच घुटमळत न राहतां साऱ्या जगांत पसरूं लागली होती. ती ऐकून बॉडले बाईंना रमाबाई-बद्दल कुतूहल वाटून यांनीं त्यांना अमेरिकेंत येण्याचें आमंत्रण पाठविलें. ह्या आमंत्रणाला त्यांनीं निमित्त शोधलें होतें तें आनंदीबाई जोशींच्या पदवीदान समारंभाचें! तो होणार होता सव्वा वर्षानंतर! म्हणजे मार्च १८८६ मध्यें. पण आनंदीबाईंनीं पंडिता रमाबाई आपल्या आत्या असल्याचें अमेरिकेंत सांगून ठेवलें होतें. ( इंग्रजी aunt ह्या शब्दाचा अर्थ आत्या, मामी, काकी, मावशी, ह्यांपैकीं कांहींहि होतो. आपण रमाबाईंच्या niece असून त्या आपल्या aunt आहेत असें आनंदीबाईंनीं आपल्या अमेरिकन मित्रांना सांगितलें होतें.) त्यावरून आपल्या भाचीच्या पदवीदान समारंभाचें आमंत्रण दिल्यास रमाबाई खात्रीनें अमेरिकेस येतील अशा समजुतीनें हें आमंत्रण सव्वा वर्ष आधीं बाईंच्या हातीं जाऊन पडलें!

फिलाडेल्फिया येथील स्त्रियांना वैद्यकी शिक्षण देणारें विद्यालय हें त्या देशांतील पहिलें स्त्री वैद्यक विद्यालय व आनंदीबाई ह्या तेथीलच नव्हे तर अमेरिकेंतील पहिल्या हिंदी विद्यार्थिनी होत. आनंदीबाईंचे पति गोपाळराव हे आपल्या विक्षिप्तपणावरून चांगलेच गाजलेले गृहस्थ होते. पण त्यांनीं केलेलें एक कृत्य त्यांच्या साऱ्या दोषांचें परिमार्जन करण्याइतकें थोर होतें. तें एक साधे पोस्टमास्तर होते. पण स्त्रीशिक्षणाच्या नुसत्या गप्पा ठोकून इतर सुधारक वेळ मारून नेत त्याचा त्यांना फार राग येई व आपण एक तरी स्त्री आदर्शवत् शिकवून त्यांना धडा घालून देणार असा दृढ निश्चय करून त्यांनीं आपल्या पत्नीस शिक्षण देण्यास सुरुवात केली. त्यांसाठीं कच्छ भूज, श्रीराम-पूर (बंगाल), कलकत्ता अशासारख्या दूरदूरच्या प्रांतांत त्यांनीं आपल्या बदल्या करवून घेतल्या व अत्यंत हाल अपेष्टा सोसल्या. शेवटीं त्यांनीं तिला अमेरिकेला पाठवून एम्. डी. पर्यंत तिच्या शिक्षणाचा पल्ला गांठविला. अर्थात् गोपाळराव जन्मदरिद्रीच होते. पण त्यांची निश्चयशक्ति आश्चर्य वाटण्यासारखी होती. पत्नी अमेरिकेला गेल्यावर त्यांनाहि अमेरिकेस जाण्याची लहर आली. अमेरि-

---

१. काशीबाई कानिटकरकृत डॉ. आनंदीबाई जोशी : पृष्ठ २१

केला जायचें म्हणजे जायचें. निघतांना त्यांच्या खिशांत स्वतःची एक दमडीहि नव्हती. पांच रुपये एकापासून उसने घेऊन त्यांनीं कलकत्ता बंदर सोडलें. अमेरिकेंत पोंचण्यास अशा रीतीच्या प्रवासामुळें त्यांना दोन वर्षें लागलीं. बायको गेल्यानंतर एक वर्षानें त्यांच्या प्रवासाला सुरुवात झाली. म्हणजे गोपाळराव अमेरिकेंत जाऊन पोंचले ते १८८६ च्या सुरुवातीला. त्याच्या आधीं एक वर्ष बॉडले बाईंचें रमाबाईंना आमंत्रण गेलें होतें.

गोपाळरावांच्या प्रवासाचें वर्णन काशीबाई कानिटकरांनीं आपल्या डॉ. आनंदीबाईच्या चरित्रांत केलें आहे तें असें :

'गोपाळराव अगदीं साध्या म्हणजे भगव्या वस्त्रानिशीं चालूं लागले, मजुरांनीं भरलेली एक अगदीं भिकार आगबोट ब्रह्मदेशास जात होती, तींतून ब्रह्मदेशास जाण्यास गोपाळरावांची स्वारी निघाली. आगबोटींत अतिशय गर्दी होती....श्रीरामपुराहून निघतांना जे पांच रुपये आगबोटीच्या भाड्याकरितां त्यांनीं उसने घेतले होते, ते त्यांनीं ब्रह्मदेशांत मिळवून परत पाठवून दिले.'[1]

शेवटपर्यंत त्यांचा खाक्या असाच दिसतो. एकदां तर त्यांनीं पत्नीजवळ पैशाची मागणी केल्याचें दिसतें. '....आपणापाशीं एक पैसा नाहीं ? तर असें करूं नये. मजपाशीं दोन दागिने ठोक आहेत. ते मागितल्यास पाठवून देतें'[2] असें आनंदीबाईंनी त्यांना लिहिलें. पण शेवटपर्यंत त्यांच्या पैशाच्या लटपटी चाललेल्या असत. परत येतांना कोल्हापूर दरबारानें त्यांना आनंदीबाईच्या व त्यांच्या प्रवासखर्चासाठीं दोन फर्स्ट क्लासचीं तिकिटें घेतां येतील इतका पैसा पाठविला होता. पण ह्या स्वारीनें एकच तिकीट फर्स्ट क्लासचें घेऊन एक नोकराचें तिकीट घेतलें,[3] इतकेंच काय तर परत भारतांत आल्यावर त्यांना पैशाची गरज पडली तेव्हां उसनवारीसाठीं त्यांनीं हात पसरले पण त्यांना कोणी पैसे देईना. केसरीमराठा संस्थेनें मात्र त्यांना त्या वेळीं थोडी मदत केली.[4] पंडिता रमाबाईंच्या चरित्रांत गोपाळरावांच्या दारिद्र्याचा पाढा एवढ्या

---

१. काशीबाई कानिटकरकृत आनंदीबाई जोशींचें चरित्र : पृष्ठें २४२.२४८:

२. तेंच. पृष्ठ २१४.

३. तेंच. पृष्ठ २८४, २९०.

४. तेंच. पृष्ठ ३०९.

विस्तारानें वाचण्याचें कारण अमेरिकेंतून आपण पंडिताबाईंना प्रवासखर्च पाठविला व त्यांचीं भाषणें आपण तेथें करविलीं अशा थापा गोपाळरावांनीं मारल्या असाव्या असें दिसते.

खरी गोष्ट अशी होती कीं डॉ. बॉडले ह्यांना रमाबाईंना भेटण्याची फार इच्छा होती म्हणून १८८५ च्या सुरवातीपासूनच त्यांना अमेरिकेंत येण्याचीं त्या आग्रहाचीं आमंत्रणें देऊं लागल्या, आपला अभ्यासाचा जम इंग्लंडमध्यें जो इतक्या चांगल्या रीतीनें बसूं लागला होता त्यांत व्यत्यय येऊं नये म्हणून बाई जाण्यास कां कूं करीत होत्या, तेव्हां निदान भाचीच्या पदवीदान समारंभाला तरी हजर राहा असा आग्रह डॉ. बॉडले ह्यांनीं सुरू केला. त्यांनीं बाईंना आनंदीबाईंकडून व अमेरिकेंत नुकतेंच पाऊल टाकलेल्या गोपाळरावांकडूनहि तशीं पत्रें लिहविलीं. इतकेंच नव्हे तर त्यांच्या व मनोरमेच्या प्रवास खर्चासाठींहि रमाबाईकडे पैसे रवाना केले. तेव्हां बाईंना त्यांचें म्हणणें मोडवेना.

पंडिताबाई ह्याबद्दल लिहितात :

'त्यावेळीं मी इंग्लंडांतील चेल्टनहॅम शहरच्या स्त्रीविद्यालयांत अध्ययन व अध्यापन करीत होतें. प्रथमतः मीं कांहीं विशेष कारणामुळें त्यांचें बोलावणें स्वीकारलें नाहीं परन्तु त्यांनीं स्वतः आणि सौ. आनंदीबाई जोशी आणि रा. गोपाळराव जोशी यांकडून पत्रें लिहवून मला अमेरिकेस जाण्याचा आग्रह केला. तेव्हां मला कितीहि अडचणी असल्या तरी माझ्यानें त्यांचें बोलावणें नाकारवेना. कारण एक तर बॉडलेबाई परजातीय आणि परधर्मीय असून त्या हिंदु स्त्रियांविषयीं इतका कळवळा बाळगतात हे त्यांचे आम्हांवर फारच उपकार आहेत. दुसरें असें कीं, वैद्यकीसारखा कठीण विषय घेऊन पदवी मिळविलेली असें साऱ्या हिंदु स्त्रियांपैकीं आनंदीबाई जोशी ह्यांचें हेंच पहिलें उदाहरण आहे.'[२]

हो नाहीं करतां करतां बॉडले बाईंच्या आमंत्रणाचा स्वीकार करून बाई एक वर्षानंतर अमेरिकेला जाण्यास निघाल्या. इंग्लंडला जाण्यास त्या निघाल्या

१. देवगिरीकरकृत वासूकाका जोशी. पृष्ठ १८६.

२. युनायटेड स्टेटची लोकस्थिति व प्रवास वृत्त. पृष्ठ १.

त्या वेळीं त्यांची भारतांतील मित्रमंडळी त्यांच्या ह्या विचाराला विरोध करून उठली तोच प्रकार त्या अमेरिकेला जाण्यास निघाल्या त्यावेळीं इंग्लंडांत झाला.

बाई म्हणतात माझ्या इंग्रजी मित्रमंडळीच्या मनांतून मीं ह्या देशीं यावें असें मुळींच नव्हतें, तेव्हां माझें इकडे अमेरिकेंत येणें त्यांस पसंत पडलें नाहीं, हें सांगायाला नको. त्यापैकीं कित्येक मैत्रिणींनीं तर आम्ही तारू फुटून समुद्रांत बुडून मरून जाऊं असें भाकित करून ठेवले होतें. कारण फेब्रुवारी महिना समुद्रयानास फारसा अनुकूल नाहीं. तशांत ह्या वर्षीं ह्या महिन्यांत फारच तुफानें झालीं, आणि अमेरिकेच्या किनाऱ्यानजीक आणि आसपास पंचवीस तीस मैल समुद्रांत कडक थंडीमुळें पाणी थिजून अमेरिका खंडाला बर्फाचें वेष्टण पडलें आहे. अमेरिकेच्या किनाऱ्यानजिक पुष्कळ तारवें फुटलीं.[१]

मात्र ह्या दोन्ही विरोधांत एक मोठा फरक होता. इंग्लंडमधील मित्रमंडळीला भीति होती ती त्या जाणार होत्या तें तारु फुटण्याची, तर भारतीय मित्रमंडळीला त्यांच्या धार्मिक तारवाला तडा जाईल कीं काय ही भीति पडली होती, हें आपण मागेंच पाहिलें होतें.

---

१. युनायटेड स्टेट्सची लोकस्थिति व प्रवास वृत्त : पृष्ठ २.

## ८ ख्रिस्ती धर्मांगिकार

रमाबाईंच्या बाप्तिस्म्याची बातमी भारतांत पोंचतांच जिकडे तिकडे कमालीची खळबळ उडून गेली. बावीस वर्षे अविवाहित राहून बाईनें लोकमताला आधींच डिवचलें होतें. त्यानंतर आन्तरप्रान्तीय विवाह केला, तर तो प्रतिलोम. तोहि हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें न करतां त्या दिवसांत कधीं कोणी ऐकलाहि नसेल अशा पद्धतीनें—म्हणजे सरकारी कचेरींत जाऊन केलेल्या नोंदणीपद्धतीनें! मग बाई उठते आणि खुशाल विलायतेला जाते! सारेंच विलक्षण! पण हे सर्व अपराध लोक विसरत चालले होते इतक्यांत बाई ख्रिस्ती झाल्याची ही भयंकर बातमी येऊन थडकली.

ह्यानंतर आज त्या गोष्टीला पाऊणशें वर्षे झालीं तरी त्या वेळेस जनतेनें बाईच्या विरुद्ध दिशेला जी मान वळविली ती वळविली. अजून सरळ त्यांच्याकडे बघून व आपलेच तर्क लढवीत न बसतां बाई काय म्हणतात हें पाहण्याची तसदी कोणीं घेतल्याचें दिसून येत नाहीं. एकदां जे समज झाले तेच—व कांहीं कांहीं बाबतींत बदलत्या काळाला अनुसरून मुरड घातलेले—परंतु तत्त्वतः—तसेच समज आजहि कायम आहेत. आतां बाईंच्या सन्मुख होऊन व होतां होईल तों त्यांच्याच शब्दांत हें कोडें उकलण्याचा आम्हांला प्रयत्न करायाचा आहे.

प्रथम बाई ख्रिस्ती कां झाल्या व त्या ख्रिस्ती कशा झाल्या हें पाहूं. लग्न होण्यापूर्वीं दोन वर्षे व ख्रिस्ती होण्यापूर्वीं चार वर्षे बाईंनीं हिंदु धर्माचा त्याग केला होता. त्याग केला होता म्हणजे त्या त्यागाचा कांहीं विधि किंवा समारंभ करण्यांत आला होता असें नाहीं. पण आपला त्या धर्मावर विश्वास नाहीं असें त्या उघड उघड सांगत इतकेंच. त्यांत विशेष ध्यानांत धरण्यासारखी

गोष्ट म्हणजे त्यांनीं हिंदुधर्माचा त्याग केला असला तरी हिंदुत्वाचा[१] कधींच त्याग केला नव्हता. तो त्यांनीं शेवटपर्यंत केला नाहीं. तसेंच हिंदु धर्माच्या त्यागामुळें देवावरील त्यांचा भाव कधींच कमी झाला नाहीं. तोहि अगदीं शेवटपर्यंत कायम राहिला इतकेंच नव्हे तर वृद्धिंगत होत गेला.

तेवढ्यासाठीं, बाईंच्या ह्या कृतीला धर्मान्तर न म्हणतां ख्रिस्ती धर्मांगीकार म्हटलें आहे.

---

१. रमाबाईनीं हिंदुधर्माचा त्याग केला होता पण हिंदुत्वाचा त्याग केला नव्हता असें आम्ही म्हणतों तें नीट समजून घ्यावयाला हवें. हिंदुत्व म्हणजे भारतीयत्व. ही एक गोष्ट ध्यानांत न ठेवल्यानें फार गैरसमज होत असतात, व ते केवळ ख्रिस्ती लोकांचेच नव्हेत तर हिंदूंचेहि होतात. अशाच एका गैरसमजाचा उल्लेख नुकताच आला आहे. रमाबाई वैष्णव होत्या. कारण काय? तर त्या कांदा लसून खात नसत!

हिंदुत्व व हिंदुधर्म ह्यांत फार अंतर असून त्या बाबतींत कलकत्त्यास १९३९ सालीं भरलेल्या हिंदु महासभेच्या अधिवेशनांत अध्यक्षांनींहि ही गोष्ट स्पष्ट केली आहे. "The Hindu Mahasabha is a national organisation of Hindudom (हिंदुत्व) The Mahasabha is not a Hindu Mission. It leaves religious questions regarding Theism, Monotheism, Pantheism, or even atheism to be discussed and determined by the different Hindu Schools of religious pursuations. (हिंदुधर्म) It is not a Hindu Dharma Mahasabha but Hindu National Mahasabha. (१९३९ हिंदु महासभेचा रिपोर्ट : पृष्ठ २५)

त्याचप्रमाणें १९३८ सालीं हिंदु महासभेच्या नागपूर येथील अधिवेशनांत हिंदुमहासभेच्या अध्यक्षांचे खालीं दिलेले उद्‌गार चिंतनीय आहेत.

"The Christian minority is civil, has no extra territorial political designs against India is not linguistically and culturally averse to the Hindus and therefore can be assimilated with us."

आणि हिंदूंना ख्रिस्ती लोकांसंबंधीं खरें खरें भय वाटतें तें हेंच. आपण धर्माव्यतिरिक्त इतर बाबतींत भिन्न नाहीं हें प्रत्यक्ष कृतीनें ख्रिस्ती लोक दाखवीत आहेतच. तेंच रमाबाईनीं आपलें भारतीयत्व अगर हिंदुत्व कायम ठेवून दाखवून दिलें होतें.

(१९३८ हिंदुमहासभेच्या अधिवेशनाचा रिपोर्ट : पृष्ठ ४३)

बाईंनीं हिंदु धर्म सोडला, हिंदुत्व सोडलें नाहीं असें जें वर म्हटलें आहे तें बाई हिंदुधर्म कशाला म्हणत तें त्यांच्याच शब्दांत पाहिलें म्हणजे स्पष्ट होईल.

बाईंची हिंदुधर्माची कल्पना अशी होती : (व त्यांनीं त्याग केला होता तो हिचा.)

'सर्व हिंदु, वेदांना व इतर आपन्हुति ग्रंथांना ईश्वरप्रणित शास्त्रें मानतात. एका सर्वोच्च आत्म्यावर म्हणजे परमात्म्यावर त्यांचा विश्वास आहे. हा परमात्मा शुद्ध, भावनाविरहित, सर्वव्यापी, पवित्र व निराकार आहे. परतुं त्याच्यावर जेव्हां मायेचा (illusion) परिणाम होतो, तेव्हां तो आकार धारण करतो; पुरुष व स्त्री अशीं रूपें तो घेतो. जगांतील सर्व कांहीं तो आपल्या स्वतःतून उत्पन्न करतो. त्यामुळें नद्या, डोंगर, आकाशांतील नक्षत्रें, पाणी इत्यादिकांची पूजा करण्यांत त्यांना पाप वाटत नाहीं, कारण हीं सर्वच ईश्वराशीं समद्रव्यक असून एकाच आत्म्याचीं आविष्करणें आहेत; त्यामुळें मनुष्य निवडील त्या कोणत्याहि आवडत्या दैवताला तो परमेश्वर मानून इतर दैवतांना दुय्यम स्थान देतो.

'परमेश्वराच्या ह्या समद्रव्यकतेमुळच हिंदूंचा आत्म्याच्या अमरत्वावर विश्वास आहे. मनुष्याला त्याच्या कर्माप्रमाणें शिक्षा किंवा बक्षिस मिळतें. आपल्या कर्माचें फळ भोगण्यासाठीं निरनिराळ्या प्रकारच्या योनींत त्याला जन्म घ्यावा लागतो. शेवटीं आपल्या कर्मफलाच्या फेऱ्यांतून तो सुटतो तेव्हां त्याला परमेश्वराची ओळख पटते व परमेश्वराचा आपला संबंध काय ह्याची जाणीव होते. मग तो परमेश्वरांत विलीन होऊन जातो. त्याचें निराळें अस्तित्व संपतें. एखाद्या नदीनें आपला आपलेपणा समुद्रांत विलीन करावा त्याप्रमाणें हें होतें.

'ह्या तत्त्वाप्रमाणें मनुष्याला चौऱ्याशीं लक्ष जन्म घ्यावे लागतात तेव्हां तो ब्राह्मणाच्या पोटीं येतो. ब्राह्मणाच्या जन्मास आल्याशिवाय तो परमात्म्यांत विलीन होऊं शकत नाहीं. इतर जन्मांत जरी त्याला परमात्म्याविषयीं खरें ज्ञान प्राप्त झालें तरीहि मोक्ष शक्य नाहीं. ब्राह्मणाखेरीज दुसऱ्या प्रत्येक जातीच्या व्यक्तीला शास्त्रविहीन वर्तन न होऊं देण्याची अत्यंत दक्षता राखावी लागते. जर कांहीं चुकलें तर पुनः चौऱ्यांशीं लक्षांचा फेरा सुरू होतो.

'ब्राह्मणाला मात्र आपल्या निराळ्या अस्तित्वांतून सुटण्याची ही शेवटली संधि असते. तेव्हां एकसारखा प्रयत्न करून त्यानें हें ज्ञान प्राप्त करून घेतलेंच पाहिजे. सामाजिक किंवा धार्मिक बाबतींत जर कां त्याच्या हातून कांहीं चुकलें तर त्याला जन्ममरणाच्या फेऱ्यांत पुनः सांपडावें लागतें.'

बाई पुढें म्हणतात: 'कलकत्त्यास असतांना मला तेथील पडद्यांतील स्त्रियांना स्त्री–धर्म–नीतिवर व्याख्यान द्यावें लागलें. पण तें देण्याच्या आधीं मला धर्मशास्त्रांचा फार चांगला अभ्यास करावा लागला. त्या अभ्यासांत एक गोष्ट माझ्या ध्यानांत आली कीं एका पुस्तकानें एखादी गोष्ट अत्यंत धार्मिक म्हणावी तीच दुसऱ्यानें अधार्मिक ठरविलेली असावी. शेवटीं मला हें वचन आढळलें

*श्रुतिर्विभिन्ना स्मृतयश्च भिन्नाः।*
*नैको मुनिर्यस्य वचः प्रमाणम्।*
*धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम्।*
*महाजनो येन गतः स पन्थाः॥*'[१]

हा तो हिंदुधर्म व ह्याच्या अनुषंगीं ज्या इतर गोष्टी त्यांचा बाईंनीं त्याग केलेला होता. वरील उतऱ्यांत उल्लेखिलेल्या व्याख्यानासाठीं त्यांनीं धर्मशास्त्राचा जो अभ्यास केला त्यांत त्यांना आढळून आलें कीं ह्या शास्त्रांच्या मतें स्त्रीला मोक्षप्राप्ति नाहीं. पति हाच तिचा परमेश्वर आणि स्त्री वाईट, अत्यंत वाईट, अनृता. ती अपवित्र आहे असें तर सर्वच शास्त्रें सांगतात 'There are two things on which all these books, the Dharma Shastras, the sacred epics, the Puranas, and modern poets, the popular preachers of the present day and orthodox high caste men, all were agreed, that women of high and low caste, as a class, were bad, very bad, worse than demons, as unholy as untruth, and that they could not get Moksha as men. The only hope of their getting this much-desired liberation from Karma and its results, viz. countless millions of births and deaths and untold sufferings, was the worship of their husbands.

---

१. बाईंच्या A Testimony ह्या पुस्तकांतून. पृष्ठ १०

वडिल वारल्यानंतर आपल्या बंधूसह रमाबाईंनीं दोन वर्षे तीर्थयात्रा केल्या, त्यावेळीं तीर्थक्षेत्रांत त्यांना जे अनुभव आले त्यामुळेंहि त्यांना अगदीं वीट आला होता. श्रद्धान्वित मन एका टोकापर्यंत पोचल्यावर तेथें जर त्याला विफलतेचा जोराचा टोला मिळाला तर घड्याळाच्या लंबकाप्रमाणें तें ताबडतोब परतीचा प्रवास सुरू करून दुसरें टोंक गाठीपर्यंत मध्यें थांबत नाहीं. ह्या बहिण भावंडांची हिंदुधर्मावरील श्रद्धा वडिलांच्या मृत्यूपर्यंत कळसाला पोहंचली होती. त्यानंतर मात्र कलकत्त्याला पोहंचेपर्यंत ती साफ नष्ट झाली.

श्री हेमेन्द्रनाथ दास आपल्या 'प्रबासीं'तील लेखांत म्हणतात, 'देशभ्रमण करतांना दोघांचा बऱ्याच प्रतिष्ठित हिंदु कुटुंबांशीं संबंध आला. बालविधवांची स्थिति पाहून रमाबाईंना फार वाईट वाटे. मद्रासकडील ब्राह्मण व अब्राह्मण ह्यांच्यामधील विषमता, त्यांनीं पाहिली होती. तीर्थातीर्थांतल्या पंडे व गुंड ह्यांच्या दुष्टपणाचा अगणित वेळां अनुभव आला होता. तीर्थस्थानीं रुपयांच्या बदला स्वर्गांत जाण्याची व्यवस्था, देवमंदिरांतील महंतमहाराजांच्या अफाट लीला, देवदासींची बीभत्स प्रथा ह्यांचीं अनेक उदहारणें त्या दोघांच्या पाहाण्यांत आलीं होतीं. त्यामुळें रमाबाईंचें मन दोलायमान झालें व त्यांचा प्रचलित हिंदुधर्मावरील विश्वास उडाला.'[1]

"As I had lost all faith in my former religion my heart was hungering after something better."[2]

रमाबाई खिस्ती धर्माकडे कशा वळल्या, हेंहि आतां आपण होतां होईल तितकें त्यांच्यांत शब्दांत पाहूं.

'शब्दबीज' नांवाची बाईंची एक आठपानी पुस्तिका आहे.[3] तींत आपल्याला 'येशू खिस्त' हे शब्द पहिल्यानें केव्हां व कसे ऐकण्यास मिळाले हें बाईंनीं सांगितलें आहे. पुस्तिकेचें 'शब्द बीज' हें नांव मोठें अर्थपूर्ण आहे. ह्या पुस्तिकेंतील कांहीं मजकूर खालीं दिला आहे :

'गंगोदकांत स्नान करून आणि ब्राह्मणांची पूजा करून पुण्यसंचय

१. प्रबासी फाल्गुन १९६०.
२. 'A Testimony' पृष्ठ १२.
३. 'The Word-Seed' ह्या इंग्रजी पुस्तिकेचें भाषान्तर.

करावा व आपला आणि आम्हां मुलांचा उद्धार साधावा म्हणून माझे आईवडील एकदां काशीयात्रेस गेले असतां '**येशू**' हें नांव प्रथम माझ्या कानीं पडलें.

'माझे आईवडील ख्रिस्ती लोकांचा व म्लेंच्छांचा-म्हणजे परदेशांतील लोकांचा-संबंध कटाक्षानें टाळीत. पण एके दिवशीं कर्मधर्मसंयोगानें एक ख्रिस्ती माणूस माझ्या वडिलांना भेटण्यास आला. तो हिंदी ख्रिस्ती होता कीं युरोपिअन होता व त्याचें माझ्या वडिलाशीं काय भाषण झालें हें कांहींच मला आठवत नाहीं. पण तो त्यांच्याशीं बोलत असतां जे दोन शब्द—**येशू ख्रिस्त**—माझ्या कानीं पडले तेवढेच काय ते मला आठवतात. तो निघून गेल्यावर त्याच्याकडून ऐकलेले ते दोन शब्द सारखे माझ्या तोंडांत घोळत राहिले. मीं ते बऱ्याच वेळां उच्चारले असावे, कारण माझी बहीण खूपच घाबरली आणि माझ्या ह्या आपल्याशींच बडबडण्याकडे तिनें आईचें लक्ष वेधलें. आईनें म्लेंच्छांच्या देवाच्या नांवाचा जप न करण्याविषयीं किंबहुना तें नांव पुनः तोंडावाटें सुद्धां न काढण्याविषयीं मला ताकीद दिली. पण मी मात्र तें नांव कधींहि विसरलें नाहीं.'

ह्यानंतरची तेरा वर्षांची गोष्ट. पंडिता रमाबाई कलकत्त्यास आल्या. त्यांचा तेथील ब्रह्मो समाजांतील विद्वान् पुढाऱ्यांशीं परिचय झाला व येथेंच त्यांना आपल्यांत कांहीं तरी कमी आहे व ती पोकळी भरून काढायला हवी अशी तळमळ लागली. त्यांनीं ब्राह्म धर्माची दीक्षा घेतली नाहीं, तरी त्यांच्या उपासनांना त्या हजर राहात. ब्रह्म समाजाचीं तत्त्वें त्यांना पूर्णपणें मान्य नसलीं तरी तीं त्यांना हिंदुधर्मापेक्षां अधिक पटत असत. ख्रिस्ती लोकांत एक 'युनिटेरियन' म्हणून पंथ आहे तो बऱ्याच अंशीं ब्रह्म समाजाच्या जवळ ज़वळ आहे. अशा रीतीनें ब्रह्म समाजाच्या निकट सान्निध्यानें त्या ख्रिस्ती धर्माच्या दिशेनें अगदीं नकळत ओढल्या जाऊं लागल्या. इतक्यांत भावाच्या निधनामुळें त्या अगदीं उघड्या पडून त्यांना लग्न करण्याची आवश्यकता वाटूं लागली.

बाई पतिगृहीं गेल्यावर त्यांना चिंतनाला व वाचनाला अधिक वेळ व अधिक निवांतपण मिळूं लागलें. त्या वेळचा अनुभव त्यांनीं ह्याच पुस्तिकेंत सांगितला आहे तो असा :

'त्यानंतर तेरा वर्षांनीं एका स्नेह्यानें माझ्या पतींच्या हातीं मला एक छापील कार्ड पाठविलें. त्या कार्डावर पुढील शब्द होते. 'तूं आपलें लक्ष

परमेश्वराकडे लाव.' ते शब्द ऐकून माझ्या मनांत विचारांनीं गर्दी केली. इतकीं वर्षें मीं देवावांचून आणि कसल्याहि आशेविना घालविलीं होतीं. मला वाटूं लागलें जणुं काय माझ्या हृदयांत एक भली मोठी पोकळी निर्माण झाली आहे, ती भरून काढलीच पाहिजे, आणि ज्याचें हृदय पतितांविषयींच्या करुणेनें व प्रेमानें परिपूर्ण आहे त्या देवाशिवाय कोणालाहि ती पोकळी भरून काढणें शक्य नाहीं. मला त्याच्या साह्याची गरज भासूं लागली आणि माझ्या आयुष्यांत प्रथमच, आमचीं हृदयें त्याच्याकडे वळावीं म्हणून, त्या अज्ञात देवाची मीं प्रार्थना केली.

'प्रार्थना कशी करावी याची मला कल्पना सुद्धां नव्हती. पण पवित्र आत्म्याच्या साह्यानें, धर्मग्रंथांतील शब्दांनीं माझ्या हृदयांत प्रार्थनारूप धारण केलें आणि योग्य वेळीं देवानें माझ्या प्रार्थनेचें उत्तर दिलें व आपल्या कृपा-प्रसादानें मला त्या धन्य शुभवर्तमानाच्या प्रकाशांत आणलें.

'वरच्या हकिकतीनंतर कांहीं आठवड्यांनीं मला एक लहानसें पुस्तक—पवित्र लुकाचें शुभवर्तमान—सांपडलें. तें कोणीं आणलें व त्या जागीं कोणीं ठेवलें, मला माहीत नाहीं. पण मीं तें वाचलें आणि त्यांत सांगितलेली कथा मला फारच आवडली. याच सुमारास माझ्या पतींनीं, ज्या स्नेह्यांनीं कांहीं आठवड्यांपूर्वीं तें कार्ड मला पाठविलें होतें, त्यांची ओळख करून दिली. त्या स्नेह्यांनीं मला उत्पत्तीचा पहिला अध्याय वाचून दाखविला व त्याचें स्पष्टीकरण केलें. ते वाचीत असलेल्या त्या शब्दांत विलक्षण आकर्षण होतें. देवाच्या पवित्र आत्म्याच्या त्या संदेशाला माझ्या हृदयानें तात्काळ साद दिली.'

हे एक मिशनरी असून त्यांचें नांव मि. ॲलन असें होतें. वाचतां वाचतां एक दिवस बाईंना वाटलें आपण ख्रिस्ताच्या धर्माचा स्वीकार करण्यास काय हरकत आहे? हा प्रश्न त्यांच्यापुढें उभा राहतांच त्यांनीं आपल्या पतीला आपलें मन मोकळें करून तें सांगितलें. त्यांत त्यांचा अव्याजपणा, पतिप्रेम, निर्भयता व सरळपणा मोठ्या उठावानें दिसून येतो. स्त्री-धर्म-नीति बाईंच्या अंगीं केवढी मुरली होती हें त्यांच्या ह्या एका वागणुकीनें दिसून येतें.

मात्र रमाबाईंच्या पतीनें ह्या बाबतींत अगदींच कठोर वर्तन केलें असें दिसतें. बाप्तिस्मा घेऊन ख्रिस्ती होणें म्हणजे तिरस्कृत अशा ख्रिस्ती समाजांत मिसळून जाणें. रमाबाईंशीं विवाह केल्यानें त्यांनां आधींच जातिबहिष्कृत व्हावें

लागलें होतें. त्यांत असली लोकविलक्षण कल्पना आपल्या बायकोनें उराशीं बाळगलेली आहे. बिपिन बाबूंचा क्रोध अनावर झाला. त्यांनीं मि. ॲलनला आपल्या घरीं येण्याची तावडतोब बंदी केली. व रमाबाईंच्या अंगावरहि त्यांनीं त्या वेळीं हात टाकला असावा, असा तर्क करण्यास जागा आहे. १० डिसेंबर १८८७ रोजीं बाईंनीं 'Tha Daily Inter–Ocean–' Chicago ह्या पत्राच्या प्रतिनिधीला दिलेल्या मुलाखतीवरून ह्या संशयाला बळकटी येते. High Caste Hindu Woman ह्या पुस्तकांत बाईंनीं आपल्या वडील बहिणीची गोष्ट तिऱ्हाईत बाईंची गोष्ट म्हणून अशीच सांगितली होती. परंतु त्या पुस्तकाच्या प्रस्तावना लेखिका डॉ. बॉडले ह्यांनीं ती गोष्ट बाईंच्या बहिणीचीच असल्याचें सांगून कोणती तें स्पष्ट करण्यासाठीं पृष्ठ सुद्धां दर्शविलें आहे. 'इंटर ओशन'च्या प्रतिनिधीला दिलेल्या मुलाखतींतील गोष्ट बाईंच्या आयुष्यांतील त्या प्रसंगाशीं अगदीं तंतोतंत जुळती आहे. आतां ती गोष्ट पाहा :

"There *is* a *widow* (तिरपा टाईप आमाचा) whose husband wished her to be visited and instructed by a missionary but when the time came and she was convinced of the truth of Christianity and wished to accept it publicly, the husband *commanded* her not to do this, and after that the missionary was not allowed to visit the wife and I have seen the wife *abused and beaten* by the husband and compelled to remain in the home without confessing Christianity."

ह्यांतील संपूर्ण गोष्ट बाईंच्या स्वतःच्या गोष्टीशीं जुळते. शिवाय is आणि widow हे शब्द वापरून बाई ह्या शंकेला अधिक बळकटी आणतात. ह्याशिवाय आपल्या A Testimony नांवाच्या पुस्तकांत मि. ॲलनला श्री. बिपिन बाबूंनीं घरीं येण्याची बंदी केली त्याचा उल्लेख करून नंतर रमाबाई लिहितात 'ते अधिक जगले असते तर काय झालें असतें कोण जाणे.'

'He was very angry and said he would tell Mr. Allen not to come to our house any more. I do not know just what would have happened had he lived much longer.[1]

ह्यानंतर त्यांच्यावर पतिनिधनाचा प्रसंग ओढवला. पुढें पुण्यास आल्यावर त्यांनीं व रमाबाईसाहेब रानड्यांनीं पुण्याच्या मिस् हरफर्डजवळ इंग्रजी शिका-

१ A 'Testimony' by Pandita Ramabai, पृष्ठ १२.

यला सुरुवात केली. मिस् हरफर्डच्या रिवाजाप्रमाण त्यांना इंग्रजीबरोबर बायबलचा अभ्यास करावा लागला. इंग्रजीच्या अभ्यासापेक्षां बायबलच्या अभ्यासानें बाईंचें लक्ष अधिक वेधून घेतलें व सोळा वर्षांपूर्वीं पेरण्यांत आलेल्या 'शब्दबीजा'नें आतां खरोखरीचें मूळ धरलें. मात्र बाईंना कोणी कसल्याहि तऱ्हेची फूस लावून खिस्ती करणें शक्य नव्हतें, व त्यांनीं इंग्लंडला जाण्यापूर्वीं ज्या खिस्ती संस्थेंत त्या राहणार होत्या त्यांना तसें ठणठणीत रीतीनें बजावलें होतें. पण आपल्याला परमेश्वरच खिस्ताकडे ओढीत आहे अशी बाईंची पुढें खात्री झाली. आपल्या खिस्ती धर्मस्वीकाराच्या शेवटल्या पायरीसंबंधानें बाई लिहितात:

'१८८३ च्या सुरुवातीस मी इंग्लंडला गेलें. हेतु हा, कीं माझ्या आयुः-क्रमांतील कामगिरीसाठीं मी शिक्षण घेऊन तयार व्हावें. इंग्लंडच्या किनाऱ्याला पाय लागतांच वाँटेज येथील प्रेमळ 'सिस्टर्स'नीं माझें स्वागत केलें. त्यांपैकीं एकीची पुण्यास असतांना मिस् हरफर्ड ह्यांनीं सेंट मेरीज होममध्यें माझ्याशीं ओळख करून दिली होती. त्या सिस्टर्सनीं मला आपल्या वसतिगृहांत नेलें व तेथें त्या मला व्यावहारिक व धार्मिक विषयांचें शिक्षण देऊं लागल्या. त्यांची व चेल्टनहॅम कॉलिजच्या मुख्याध्यापिका मिस् बेली ह्यांची मी अत्यंत ऋणी आहें. त्या भगिनींनीं माझ्या बाबतींत अत्यंत श्रम करून पुढें माझ्या कार्यांत नेहमीं उपयोगी पडेल असें शिक्षण मला दिलें.

'एकदां मदर सुपीरियरनें हवा पालटण्यासाठीं मला लंडनमधील सिस्टर्स-होमच्या शाखा पाहण्यासाठीं पाठविलें. त्यांनीं पतित स्त्रियांच्या उद्धारार्थ चालविलेलें कार्य मला दाखविलें. तेथल्याच रेस्क्यू होममध्यें राहून गेलेल्या कांहीं स्त्रियांची व माझी तेथें गांठ पडली तेव्हां त्यांच्यामध्यें अगदीं पूर्ण पालट झालेला पाहून व त्यांनीं दुसऱ्यांचीं दुःखें हलकीं करण्याच्या कामीं स्वतःला वाहून घेतलेल पाहून माझ्या आयुष्यांत येथें अगदीं प्रथमच पतित स्त्रियांच्या उद्धाराकरितां कांहीं करण शक्य आहे हें मला पटलें व ज्या खिस्ती लोकांना हिंदू लोक अस्पृश्य मानून निष्ठुर आहेत असें समजतात ते जनतेच्या दृष्टीनें त्याज्य अशा दुर्दैवी स्त्रियांसाठीं किती कनवाळूपणा आचरूं शकतात हें माझ्या तेथें ध्यानांत आल.

'माझ्या स्वतःच्या देशांतील हिंदूंनीं असल्या स्त्रियांसाठीं अशा प्रकारचें काम

केलेलें मीं कधी पाहिल नव्हतें कीं ऐकल नव्हतें. कोणीहि त्यांच्याशीं प्रेमळपणान बोलल्याचें मला ठाऊक नाहीं किंवा त्यांना वाममार्गापासून दूर सारण्याचा प्रयत्न केल्याचेंहि मीं कधीं पाहिलें नाही. अशा स्त्रियांच्या बाबतींत हिंदू शास्त्रें कठोर आहेत. पतित स्त्रियांना वेशीबाहेर घालवून कोल्ह्याकुत्र्यांकडून खाववावें अशी स्मृतिकारांची राजाला स्पष्ट आज्ञा आहे. त्या फार मोठ्या पातकी असून दयापात्र नाहीत असें त्याचें म्हणणें आहे. फुलहॅम येथील हीं वसतिगृहें पाहून व त्यांत चाललेलीं दयेचीं कामें पाहून मला असें वाटूं लागलें कीं, हिंदुधर्म व ख्रिस्तीधर्म ह्यांत खरें खरें अंतर येथें आहे. मला शिकवीत असणाऱ्या सिस्टरला मीं विचारलें: असल्या पतित स्त्रियांच्या उद्धाराचें कार्य ख्रिस्ती लोक कां करतात? त्यांनीं शोमरोनी स्त्रीची व ख्रिस्ताची भेट झाली ती गोष्ट मला वाचून दाखविली. त्यांच्या त्यावेळच्या संभाषणाची मला फोड करून सांगितली. ख्रिस्ताला पातक्याविषयीं वाटणारा कळवळा व अलोट प्रेम तिनें मला विशद करून सांगितलें. त्यानें त्यांचा द्वेष केला नाहीं तर तो त्यांच्या तारणासाठीं पुढें सरसावला. हिंदूंच्या धार्मिक पुस्तकांत मीं असें कधीं कांहीं वाचलें नाहीं. योहानाच्या शुभवर्तमानाचा चौथा अध्याय वाचल्यावर माझी खात्री झाली कीं, आपण दैवी तारक आहों असा जो येशूचा दावा आहे तो खरा आहे. माझी अशी खात्री पटली कीं, हिंदुस्थानच्या किंवा जगांतल्या दुसऱ्या कोणत्याहि पदतलीं तुडविल्या जाणाऱ्या स्त्रियांचा तोच तारणारा आहे.

'अशा रीतीनें माझें मन ख्रिस्ताच्या धर्माकडे आकर्षलें गेलें. बौद्धिक दृष्टीनें ह्या सत्याबद्दल माझी खात्री पटली व १८८३ च्या उत्तरार्धांत वॉंटेज येथें मीं बाप्तिस्मा घेतला.'[१]

रमाबाई ख्रिस्ती कां झाल्या ह्याविषयीं आपण आतांपर्यंत विचार केला. आतां त्याविषयीं वर्तमानपत्रांवरून दिसून येणाऱ्या १८८३ ते १९५८ पर्यंतच्या प्रतिक्रिया पाहूं,

**केसरीकारांनीं** १८९३ मध्यें रमाबाईच्या विषयीं एक स्फुट लिहिलें होतें. तें सुधारक पत्रानें आपल्या ११ सप्टेंबर १८९३ च्या अंकांत मुद्दाम उद्धृत केलें आहे. तें असें : 'पंडिताबाईनीं धर्मांतर केलें हें आमचें दुर्दैव होय.

---

1. Pandita Ramabai by Helen S. Dyre : पृष्ठें ३२ : ३३ : ३४

तथापि तेवढ्याच कारणासाठीं आम्ही त्यांस टाकून द्यावें हें उचित होणार नाहीं. धर्मान्तराबरोबर त्यांनीं आपला देशाभिमान टाकला नाहीं हें त्यांस श्रेयस्कर आहे. ख्रिस्ती धर्म प्रसारार्थ त्यांनीं आपला प्रयत्न चालविला नाहीं असें आतांपर्यंतच्या त्यांच्या वर्तनावरून व लोकांपुढें त्यांनीं दर्शविलेल्या विचारांवरून उघड होत आहे. तेव्हां त्यांच्याविषयीं मनांत कांहीं किंतु धरून त्यांच्यापासून विलग राहणें व त्यांनीं हातीं घेतलेल्या कार्यास साहाय्य न करणं हें आत्मविघाताचें कारण होईल.'

परन्तु केसरीकारांची रमाबाईविषयींची ही वृत्ति नेहमीं अशीच कायम नसे.

ह्या शिवाय कित्येक अविचारी लेखकहि आपलें रमाबाईविषयींचे लेख प्रसिद्ध करीत. त्यांचें अग्रणीत्व 'पुणें वैभव' या पत्राकडे जातें. गोपाळराव जोशी नुकतेच ख्रिस्ती झाले होते. त्या समयाला उद्देशून १२ जुलै १८९१ च्या 'पुणें वैभवांत' स्फुट आलें कीं आतां गोपाळराव जोशी व रमाबाई हीं दोघेंहि ख्रिस्ती झालीं असून त्यांचा बेत कांहीं दिवसांपुरता प्रयोगात्मक विवाह करण्याचा ठरला आहे. अतीच झालें तेव्हां असल्या पत्रांना अद्दल घडावी म्हणून रमाबाईंनीं फिर्याद करून पुणें वैभवकारांना माफी मागायला लावलें होतें.

**नवयुग मासिक** : एप्रिल–मे १९२२ : जोडअंक

आमच्या हिंदुधर्माची पतित स्त्रियांविषयीं अत्यंत क्रूर दृष्टि आहे. कुत्र्यांनीं त्यांना खुशाल फाडून खावें. पतित स्त्रियांविषयीं प्रेमाचा विचार कोणाच्या मनांत येणार नाहीं. त्यांना प्रेमानें जवळ करून, त्यांच्याशीं प्रेमानें वागून, त्यांस सदाचरणी करण्याचा व पुढील सर्व आयुष्य सत्कार्यांत घालविण्याचे महाकार्य ह्या 'सिस्टर्स आफ मर्सी' करीत आहेत व हा सर्व ख्रिस्ती धर्माचा, ख्रिस्ताच्या उपदेशाचा परिणाम होय असें पाहून त्यांचें मन ख्रिस्ती धर्माकडे पूर्णपणें वळलें व त्या ख्रिस्ती झाल्या. हिंदु लोकांनीं आपल्याला प्रोत्साहन दिलें नाहीं म्हणून त्या ख्रिस्ती झाल्या हें म्हणणें अगदीं अन्यथा आहे.

**सुबोधपत्रिका** : ३० एप्रिल १९२२.

श्री शांताबाई कशाळकर ह्यांनीं १९२२ मध्यें रमाबाईंचा एक मृत्युलेख १३ व ३० एप्रिलच्या अंकांत प्रसिद्ध केला होता. त्यांत त्या म्हणतात :

हिंदुस्थानच्या दुर्भाग्याचाच तो दिवस. (-म्हणजे रमाबाई ख्रिस्ती झाल्या

तो-) अशा तऱ्हेच्या बाईला हिंदु समाज व हिंदु स्त्रिया आंचवल्या. पण त्यांचें धर्मांतर ही गोष्ट बायकांनीं विचारांत घ्यायचें कारण नाहीं. मनुष्याच्या हातून नेहमींच सर्व गोष्टी पुढचें बरोबर धोरण ठेऊन घडतात असें नाहीं. मनुष्य अप्रतिम धैर्याचा असला तरी एखादे वेळेस न कळत तो मोहवश होतो आणि त्या मोहाच्या भरांत तो अशी दिशा घेतो कीं त्यामुळें तो आपल्या जन्माचें अहित करून घेतो.

**सकाळ :** १९ एप्रिल १९५३.

डॉक्टर कमलाबाई देशपांडे ह्यांनीं रमाबाईवर १९५३ सालीं 'सकाळ' पत्रांत दोन लेख लिहिले होते. त्यांत त्या म्हणतात :

'बाईंनीं लग्न केलें तें एका सुशिक्षित खऱ्या, पण जातीनें शूद्र असलेल्या माणसाबरोबर. बंगालमधील लोक विद्वत्तेचें कौतुक करणारे खरे पण त्यावेळीं हें जातिनिर्मूलन त्यांना पचण्याजोगें नव्हतें व त्यामुळें प्रथम कौतुक करणारा समाज दुरावला आणि त्याचवेळीं प्रेमळपणानें वागविण्यांत हातखंडा असलेला मिशनरी समाज त्यांना जवळचा वाटूं लागला. जातिनिर्बन्धामुळें बापाच्या अंत्यविधीस आलेल्या अडचणीचे मनावर झालेले परिणामहि होतेच, त्यामुळें तोच ख्रिश्चन दयाळूपणा त्यांना दसपट वाटला. महाराष्ट्रांत त्या आल्या त्या वेळीं त्यांचें कौतुक अखिल जनतेनें केलं. पण त्यांचा मिशनऱ्यांकडील ओढा पाहून कांहीं मंडळी साशंक झाली. बाई महत्त्वाकांक्षी, सध्यांच्या काळांत 'इंग्लिश'शिवाय गति नाहीं हें त्यांनीं हेरलें व त्यासाठीं त्या इंग्लंडला गेल्या. मिशनरी मंडळी मदतीस होतीच. तेथें त्यांना एका कॉलेजांत संस्कृतच्या प्रोफेसर नेमल्या....पण तेथेंच बाईंनीं मुलीसकट ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला.

**तरुण भारत :** अग्रलेख : १८ एप्रिल १९५८

श्री. ग. त्र्यं. माडखोलकर ह्यांनीं आपल्या तरुण भारतांतील रमाबाई विषयक अग्रलेखांत म्हटलें आहे :

'प्रो. डॉ. कर्वे यांनीं आपल्या शतकाच्या आयुष्यांत एकहि तीर्थयात्रा केली असेल असें वाटत नाहीं. पण रमाबाईंच्या आयुष्याचीं पहिलीं बावीस वर्षें आपल्या ऋषितुल्य वडिलांच्या सान्निध्यांत स्वेच्छेनें स्वीकारलेल्या वनवासामध्यें

आणि नंतर तीर्थाटनांत गेलीं व या भरतखंडांत आसेतुहिमाचल परिभ्रमण केल्यानंतर त्या १८८२ सालीं पुण्यास येऊन स्थायिक झाल्या. पण संस्कृत विद्येचें अध्ययन, धर्मशास्त्रांचा व्यासंग, तीर्थयात्रा, सत्संगति इत्यादि धार्मिक मानले गेलेले सर्व परंपरागत संस्कार रमाबाईवर झालेले असतांना सुद्धां ता २९ सप्टेंबर १८८३ रोजीं त्यांनीं लंडन येथें हिंदुधर्माचा त्याग करून खिस्ती धर्माची दीक्षा घेतली; व त्यांचें पुढील सर्व आयुष्य हिंदी स्त्रियांच्या उन्नतीच्या कार्यांत तर खरेंच, पण त्याबरोबरच खिस्ती धर्माच्या प्रसारांतहि गेलें. डॉ. कर्वे ह्यांनीं स्वधर्मांत व स्वसमाजांत राहून,—स्वधर्मीयांनीं व स्वसमाजानें केलेला अमानुष छळ मुकाट्यानें सोसून जें स्त्रीजातीच्या उद्धाराचें कार्य अत्यंत निष्ठेनें यावज्जीव केलें, तेंच कार्य पंडिता रमाबाईंनीं स्वधर्माचा व स्वसमाजाचा त्याग करून, आमरण तितक्याच निष्ठेनें केलें, एवढाच काय तो या दोन थोर व्यक्तींच्या कार्यांतील फरक.

'पण हा फरक किती महत्त्वाचा, किती मूलगामी आहे! त्या फरकाचें मर्म समजावून घेतल्याशिवाय, खुद्द महर्षि डॉ. कर्वे यांनाहि स्फूर्तिदायक झालेल्या पंडिता रमाबाईंच्या भिन्न परिस्थितींतील महान् समाजसेवेचें यथार्थ मूल्यमापन होऊं शकणार नाहीं. ज्या स्त्रीचा जन्म धर्मशील अशा पंडित कुलांत झाला, जिचें पूर्वायुष्य गीर्वाण वाणीच्या अध्ययनांत आणि तीर्थाटनांत गेलें व अत्यंत बिकट अवस्थेंत, अन्नान्नदशा आली असतांना सुद्धां, जिचें सत्त्व कधीं ढळलें नाहीं अशा ह्या लोकोत्तर स्त्रीनें वयाच्या पंचविसाव्या वर्षी धर्मांतर कां केलें? ह्या प्रश्नाचें उत्तर, रमाबाईंनीं तीर्थाटनाच्या काळांत देशभर हिंडत असतांना धर्माच्या नांवावर जे भयानक दुराचार आणि विशेषतः उच्च जातींतील विधवांची जी राक्षसी गांजणूक पाहिली, त्यामुळें त्यांच्या कोमल मनावर झालेल्या विदारक परिणामांत सांपडेल. आजहि जर आपलीं तीर्थक्षेत्रें सर्व प्रकारच्या भ्रष्टाचाराचीं आणि गलिच्छपणाचीं केंद्रें आहेत तर पाऊणशें वर्षांपूर्वीं त्यांची स्थिति काय असेल?

राजा राममोहन राय ह्यांच्यासारख्या धैर्यमेरूच्याहि हृदयाचें विदारण आपल्या स्त्रीवर्गाची जी हीनदीन स्थिति पाहून झालें त्या भीषण स्थितीच्या अवलोकनानें, साक्षात् अनुभवानें आणि चिंतनानें पंडिता रमाबाई ह्या अखेर खिस्ती धर्माचा आश्रय घेण्यास उद्युक्त झाल्या.'

आपल्या हीनदीन स्त्रीवर्गाच्या हालअपेष्टा पाहून रमाबाई ख्रिस्ती झाल्या असें सुचवून श्री. माडखोलकरांनीं ह्याच लेखांत आणखीहि एक कारण सुचविलें आहे. तें म्हणजे: 'माहेरचा विध्वंस करण्यास कारणीभूत होणारा व त्यांच्या वडिलांना देशोधडीस लावणारा सनातन्यांचा हटवाद.'

वरील उताऱ्यांवरून रमाबाईंना गोपाळरावांशीं प्रायोगात्मक लग्न करावयाचें होतें (पुणें वैभव), 'त्या मिशनरी लाघवाला भुलल्या'. (डॉ. कमलाबाई), 'स्त्रियांवर जो अमानुष अन्याय होत होता त्या गोष्टीला चिडून तसेंच त्यांच्या वडिलांना देशोधडीला लावण्यांत आलें व त्यांच्या माहेराचा विध्वंस केला' म्हणून (श्री. माडखोलकर), त्या ख्रिस्ती झाल्या अशीं अनुमानें काढलेलीं आढळतात. खुद्द रमाबाई कां व कशा ख्रिस्ती झाल्या ह्याचा ह्या प्रकरणाच्या आरंभींच खुलासा करण्यांत आला आहे, त्याच्याशीं हीं अनुमानें ताडून पाहण्यासारखीं आहेत.

ह्याशिवाय 'त्या मोहाला बळी पडून त्यांनीं आपल्या जन्माचें अहित करून घेतलें व त्यांना हिंदु समाज व हिंदु स्त्रिया आंचवल्या' हा आणखी एक आक्षेप आहे. हा आक्षेप सर्वसाधारणपणें घेतला जातो. त्यासाठीं पुढच्या एका प्रकरणांत त्याच्याविषयीं विशेष विवरण केलें आहे.

## ९ हयातींत व दिवंगत झाल्यावरहि

गेल्या प्रकरणांत दिलेल्या टीका सहानुभूतीच्या ओलाव्यानें आर्द्र झालेल्या असल्यानें त्यांत संयम, सभ्यता व शुचिता आढळून येते. पण त्या काळांत परंपरेच्या रुळलेल्या मार्गाबाहेर एखादें जरी पाऊल कोणीं टाकलें तरी त्या व्यक्तीला समाज उभा भाजून खाण्यास सज्ज असे. अशा व्यक्तींच्या विरुद्ध टीकाकारांच्या लेखण्यांना तीक्ष्ण धार लावलेली असे व त्यांच्या शाईंत हलाहल विष मिसळलेलें असे. सहानुभूतीचा तेथें खडखडाट असायचा. टीकाविषयाला नामोहरम करणें एवढी एकच कामगिरी करायची असल्यानें असला टीकाकार आपल्या संहारक टीकेंत दयामाया, सत्यासत्य, इत्यादि गोष्टींकडे पूर्णपणें दुर्लक्ष करी.

अशा ह्या टीकांचें एवढें भारी भारूड सर्वच्या सर्व लिहून काढलें तर त्याचाच एक ग्रंथ होईल. हा कोळसा आहे एवढें सुज्ञांस सांगितलें म्हणजे त्याच्या काळेपणाची ओळख करून देण्यासाठीं तो आणखी उगाळीत बसण्याची गरज नसतेच, सूज्ञ तो आपोआप ओळखतो. मात्र त्या वेळच्या कांहीं लिखाणांचा परिणाम इतका चिरस्थायी झाला आहे कीं ते विचार लोकांच्या मनांत घर करून अद्याप राहिले आहेत. वानगीदाखल येथें त्याचीं फक्त तीनच उदाहरणें देतों.

पंडिता रमाबाईंचा बाप्तिस्मा झाल्याची बातमी इंग्लंडहून इकडे येऊन थडकतांच त्यांच्यावरील टीकांचा नुसता डोंब उठला. मुंबईच्या इंदुप्रकाशासारख्या गोगलगाईसुद्धां मारक्या म्हशी बनल्या. २० ऑक्टोबर १८८३ च्या अंकांतील इन्दुप्रकाशाचें स्फुट या दृष्टीनें वाचण्यासारखें आहे. त्याचें शीर्षकच पहा. 'अहाहा! ही विदुषी खरी.' हें तें शीर्षक! आतां पहिलेंच वाक्य पहा. 'पंडिता रमाबाईचे संबंधानें आलेलें वृत्त ऐकून

आम्हांस फारसें नवल वाटलें नाहीं कारण हा प्रकार असा केंव्हां ना केंव्हां तरी होणारच होता.' म्हणजे दुगाणी झाडतांना तेवढ्यांतल्या तेवढ्यांत 'आम्ही म्हटलेंच होतें' अशी स्वतःच्या शहाणपणाची शेखीहि मिरवून घेतली! संपूर्ण लेखांत बाईंचा उल्लेख एकेरी संबोधनानें केलेला आहे. पुढें ११–११–८३ च्या अंकांत एक अग्रलेख आहे, त्यांतलीं हीं कांहीं वाक्यें पहा: 'प्रार्थना समाज व्यासपीठावर बसून बाबू प्रतापचंद्र मुजुमदारांप्रमाणें मोठें पांडित्य करण्याचाहि डौल हिनें किती एक प्रसंगीं घातला आहे.–हिनें आपल्या अंगच्या अल्प विद्येनें आमच्या ह्या प्रांतांतल्या पुष्कळ समंजस लोकांस देखील थक्क करून सोडलें आणि शेवटीं फसविलें.'

ह्या एक दोन वाक्यांत बाई 'ठक' होत्या असें भासविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनीं 'डौल' आणला व प्रतापचंद्र मुजुमदारांच्या पायरीला पाय लावला! आज इतक्या वर्षांनीं बाईंचीं योग्यता कळते व प्रतापचंद्र मुजुमदारहि त्यांच्यापुढें लहान दिसूं लागतात, अशा वेळीं वरील वाक्य वाचून लेखकाची कींव येते. 'आणि शेवटीं फसविलें' म्हणजे सदसद्विवेकबुद्धीला पटलें तें केलें—बाप्तिस्मा घेतला!

'बाईनीं फसविलें' म्हणण्याची ही साथ थेट अलीकडच्या काळांत चांगल्या चांगल्या उदारमतवादी लोकांत सुद्धां पसरलेली आढळून येते. प्रबोधनकार ठाकरे ह्यांनीं बाईंचें चरित्र लिहिलें. त्यावर त्यांच्याकडे आलेल्या एका पत्रांत खालील मजकूर पाहाण्यास मिळतो.

'I still regard Pandita Ramabai as having secured the sympathies of reformers on false pretences and this was certainly a blot on her career.'

वरील पत्राचे लेखक एक फार मोठे विद्वान् व उदारमतवाले प्रागतिक आहेत. पत्राची तारीख १० जानेवारी १९५१ आहे.

बाईना ह्या पुरोगाम्यांनीं मदत काय केली? तर नुसती सल्लामलत देण्याची! आणि त्यांना 'फसवून' बाईनीं काय मिळविलें? कोरडी सल्ला-मसलत! तसें पाहिलें तर बाईंचें कोणतेंहि कृत्य चोरून लपवून नव्हतें. 'सुधारक' पत्राला बाईनीं स्पष्ट शब्दांत लिहिलें होतें कीं सदनांत आलेल्या मुली ख्रिस्ती होणार नाहींत अशी हमी मी देत नाहीं. आणि बाईंचें हें पत्र

'सुधारका'नें छापून प्रसिद्ध केलें होतें. शिवाय बाईंच्या प्रार्थनेच्या वेळीं ज्या मुली येऊन बसत त्यांना ह्या कृत्याबद्दल पालकांची संमति होती. तेथें सुद्धां बाईंनीं तेवढी खबरदारी घेतली होती. तेव्हां बाईंनीं सल्लागारांना फसविलें कसें हें टीकाकारच जाणोत. 'बाई चंचल आहे. ती हिंदु होती ती ब्रह्मो झाली.' [बाई कधीं काळीं ब्रह्मो होत्या ह्याला कांहीं पुरावा नाहीं. ब्रह्मो व प्रार्थना समाजाच्या सदस्यांत बाईंची पुष्कळ मित्रमंडळी होती एवढ्यावरून त्यांना ब्रह्मो म्हणायचें असेल तर गोष्ट वेगळी.] आणि मग ख्रिस्ती झाली ह्यावरून 'मुसलमानी धर्म हाच सर्वांत उत्तम तारण मार्ग आहे, असा चित्तवेधक बोध करणारा जर कोणी काजी कधीं तीस मिळाला, तर ती कदाचित् मुसलमानहि होईल.' असें इंदुप्रकाशला वाटलें. काळानें पुढें सिद्ध करून दिलें कीं बाईंत यत्किंचितहि अस्थिरता नव्हती. त्यांचे विचार व विश्वास अत्यंत स्थिर होते. आणि हें त्यांच्या 'टेस्टिमनी'च्या दोन आवृत्त्यांवरून सिद्ध होतें. पहिली आवृत्ति १८९७ सालची आहे. व दुसरी १९१७ची आहे. ह्या दोन्ही आवृत्त्यांत वीस वर्षांचें अंतर आहे, हें लक्षांत ठेवून दोन्हींतला मजकूर ताडून पहावा म्हणजे त्यांच्या विश्वासांत कांहींहि फरक झाला नाहीं, हें दिसून येईल. इंदुप्रकाशकर्ते बाईंच्या बाबतींत इतके घसरले कीं ते म्हणतात, 'त्या बाईस शिक्षण कमी असल्यामुळें तिच्या हातून हा पर्याय घडला आहे. हीच जर ती ह्यापेक्षां चांगली शिकलेली असती, तर असें चांचल्य तिच्या हातून कधींहि घडलें नसतें.'

५-११-१८८३ च्या इंदुप्रकाशांत इंग्रजी बाजूच्या स्फुटांत म्हटलें आहे :

'It is reasonable to suppose that she has been as hastey in accepting Christianity as probably she was in lecturing and writing against it with all the ridicule of sarcasm till within a short time before her conversion.'

रमाबाईंच आत्तांपर्यंतचें चरित्र वाचणाराला असें दिसून येईल कीं इंदु-प्रकाश म्हणतो त्याप्रमाणें ह्या तडकाफडकी ख्रिस्ती झाल्या नव्हत्या. अगदीं बालपणीं त्यांनीं ऐकलेला 'येशू' हा शब्द त्यांच्या मनांत घर करून बसला होता. लग्न झाल्यानंतर तरुणपणीं तर पतिगृहीं त्यांनीं बायबलचा अभ्यासच थोड्याबहुत प्रमाणावर केला होता, आणि तोहि पतीच्या संमतीनें आणि त्यांनीं ओळख करून दिलेल्या एका ख्रिस्ती धर्मोपदेशकाच्या साह्यानें. त्याच वेळीं

त्यांनीं आपली ख्रिस्तीधर्म स्वीकाराची इच्छाहि पतीला बोलून दाखविली होती. पुढें पतिनिधनानंतर त्या पुण्यास आल्या व तेथें मिस् हर्टफर्डनें इंग्रजी शिकवितां शिकवितां त्यांना बायबलचें शिक्षण दिलें व त्यांत त्यांचें लक्ष अधिक वेधायचें. ह्या सर्व गोष्टींचें कार्य त्यांच्या सुप्त-संवेदनेंत (Sub-conscious) चाललें असतांच त्या इंग्लंडांत गेल्या. मनांतील कांहीं समस्या तेथें सुटल्या व त्या ख्रिस्ती झाल्या.

इन्दुप्रकाश पुढें म्हणतो :

'The Pandita had no definite views on religion, while in India, though she seemed to approve the doctrines of the Brahmo Samaj, and there is nothing striking in the fact she has accepted the faith of those who started by providing her just with what she most desired—the means to go to England and reside in England.'

रमाबाईंनीं आपल्या व आपल्या मुलीच्या प्रवास खर्चासाठीं येथून जाण्याआधीं आपल्या 'स्त्रीधर्मनीति' ह्या पुस्तकाच्या विक्रीवर पैसा उभा केला. त्या जाण्याआधीं पुस्तकाच्या दोन आवृत्त्या निघाल्या. इंग्लंडला पोहंचल्यावर त्यांच्या तेथील अनुभवाच्या एका पुस्तकावर त्यांच्या मुंबईंतील मित्रमंडळीनें आणखी कांहीं पैसा त्यांना मिळवून पाठविला व इंग्लंडमध्यें मराठी व पुढें कॉलेजमध्यें संस्कृत अध्यापनाचें काम करून त्यांनीं आपला व आपल्या कन्येचा सर्व खर्च भागविला ह्या सत्य गोष्टी जगजाहीर असतां इंग्लंडला जाण्यास मिळावें व खाण्यापिण्याची सोय व्हावी म्हणून त्या ख्रिस्ती झाल्या असें विधान इंदुप्रकाशनें करावें हें खरोखर मोठें आश्चर्य आहे. आणि 'हीच जर ती ह्यापेक्षां चांगली शिकलेली असती तर—' येथें तर इंदुप्रकाशनें गहजबच केला आहे. तेव्हांच काय, पण आत्तांहि रमाबाईंपेक्षां अधिक चांगली शिकलेली महिला सांपडेल कीं नाहीं शंका आहे. खरें पाहतां रमाबाईंचा हिंदुधर्मावरील विश्वास उडण्यास त्यांचें उच्च शिक्षणच कारणीभूत झालें. व त्यांनीं ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला ह्याचें कारण त्यांच्या ठायीं वसत असलेलें अप्रतिम धैर्य. समाज इतका विरुद्ध असतां आपल्याला पटलेलें तत्त्व उघडपणें मान्य करण्यास असामान्य धैर्य लागतें; तें बाईंच्या ठायीं होतें.

इंदुप्रकाशनेंच पुढें जे तारे तोडले आहेत ते तर अधिकच दैदीप्यमान आहेतः इंदुप्रकाश पुढें म्हणतो—

'तिच्या अल्प शिक्षणांत तिला स्वतंत्रता वाजवीपेक्षां फाजील मिळून तिजवर कशाचाहि आळा राहिला नाहीं, तितक्या कारणानें हें कृत्य झालें.'

म्हणजे बाई एखाद्या कजाग सासूच्या हाताखालीं सांपडायला हव्या होत्या. मग पाहिलें असतें त्या कशा ख्रिस्ती झाल्या असत्या त्या! सासूनें शिताफळीचा फोंक घेऊन सडकूनच काढली असती पाठ! असेंच ह्या इंदुप्रकाशला म्हणायचें होतें कीं काय?

रमाबाईंनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं रे. फादर गोरे ह्यांच्या शिकवणीनें व त्यांच्या पत्रांमुळें आपलें मन ख्रिस्ती धर्माकडे वळलें नसतें तर आपण कधीं ख्रिस्ती झालों नसतों.

ह्या विधानाचें इंदुप्रकाशला मोठें आश्चर्य वाटत आहे व इतकें परिणामकारी पुस्तक[1] हें होतें तर आणखी लोक उठून बाईप्रमाणें पटापट ख्रिस्ती कां झाले नाहींत असा त्यांचा सवाल आहे.

शंका अगदीं बरोबर आहे. एक आश्चर्य वाटतें, तें हें कीं ह्या पुस्तकाला मिळावी तशी प्रसिद्धी कां मिळाली नाहीं? मात्र जर कोणाच्या हातीं तें पडलेंच असेल, व त्यामुळेंच त्याचा ख्रिस्ती धर्मावर विश्वास बसला असेल तर पुढें येऊन बाप्तिस्म्याच्या विधीनें ख्रिस्ती धर्म स्वीकारण्यास त्याला हरकत कोणती होती? हरकत कोणतीच व कसलीच नव्हती. पण माणसाच्या हाडींमासीं खिळलेल्या एका व्यवहारसूत्राची त्या गोष्टीला आडकाठी होती. तें व्यवहारसूत्र :

*यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं*
*नो करणीयं नाचरणीयम् ।*

१. रे. फादर निळकंठशास्त्री नहेम्या गोरे हे एक ख्रिस्ती झालेले काशीकडील महाराष्ट्रीय पंडित होते. रमाबाई पुण्यास असतां त्यांनीं बाईंना ख्रिस्ती धर्माचें सत्य पटविलें. पुढें त्या इंग्लंड अमेरिकेंत गेल्या तेव्हां फादर गोरे ह्यांनीं बाईंना ख्रिस्ती धर्मासंबंधीं कांहीं पत्रें धाडलीं. तीं पुढें एकत्र करून एक पुस्तक बनविलें व तें पंच हौद प्रेसनें त्या वेळेस छापून काढलें होतें. आज मात्र त्याची एकच प्रत पंच हौद मिशनच्या पुस्तकालयांत पाहावयास मिळते.

आपल्याला पटेल त्याचा अंगिकार धैर्यानें करणारी बाईसारखी शूर स्त्री एखादीच सांपडते. व त्या शौर्याचा, त्या विवेकबुद्धीचा, त्या सचाईचा अभाव हें एकमेव कारण, ह्या प्रश्नाचें उत्तर देतांना दिसून येतें.

इंदुप्रकाशसारख्या असल्या 'मऊ मेणाहूनंच्या' मनांत जर एवढी अढी तर बोलून चालून बाईंची चटणी उडवायला निघालेल्या केसरीकारादि मंडळींचीं अढी निरगांठच म्हणायला हवी. सुरगांठीची अढी सहज सुटून जाण्याचा संभव—पण निरगांठ मात्र ओढाताणीनें आणखी बळकट बसते.

आतां केसरींतील एकच उदाहरण घेऊं. १२–१–१९०४ च्या अंकांतल्या अग्रलेखांतील केसरीचीं हीं सूचक वाक्यें पाहा.

१. 'दुष्काळाच्या अपूर्व पर्वणीमध्यें **जाळ्यांत गोळा केलेल्या** विधवा'—

२. 'जुन्या चालीच्या व कर्मठ बापानें आपल्याला थोडेंबहुत संस्कृत कसें शिकविलें व त्या **तुटपुंज्या** (Smattering) ज्ञानाचे साह्यानें'—

३. 'त्यांचा पति मरण पावल्यावर पंडिता रमाबाईंचा हिंदुसमाजानें फारच छळ व जाच केला. त्यामुळें त्यांस हिंदुधर्माचीं बंधनें तटकन तोडून टाकण्याची स्फूर्ति झाली आणि हिंदु धर्मांत न मिळणारें स्वातंत्र्य ख्रिस्ती **धर्मांत मिळाल्यानें**'—

४. 'प्रभु येशू आपल्या प्रिय भक्तिणीस **एका रात्रींत पावला**'—

५. 'आपलें **चुटपुटतें** संस्कृत भाषेचें ज्ञान'—

६. 'शेवटीं **ख्रिस्तीण** करून टाकावें'—

७. 'तीं प्रभु येशूचे कळपांत शोभतील अशीं **कोंकरें** आहेत'—

८. 'पंडिता रमाबाईंनीं **पांघरलेल्या पांडित्याचें**'—

९. 'कातडें पांघरलेल्या या **मायावी वाघीणीस**'—

१०. 'हिंदुत्वाचा जो एक कलंक त्यांच्या नांवाच्या मागें 'पंडिता' या पदवीचे रूपानें लागला आहे तो नाहींसा करून तेथें त्यांनीं '**रेव्हरंडा**' हें पवित्र उपपद धारण करावें'—

ह्या सर्व लेखांत ख्रिस्ती लोकांचें हंसें करण्याच्या हेतूनें नेहमीं वापरण्यांत येणारी तुच्छतादर्शक व उपहासगर्भ वाक्यरचना (वाक्यें १ व ७) बाईंना

संस्कृत पुरेसें येत नव्हतें (वाक्यें २, ५, ८), त्या एक क्रूर राक्षसी होत्या (९), विधवेला तुच्छतेनें वापरण्यांत येणारा शब्द वापरण्याची हौस (१०) हिंदू देवदासींप्रमाणें बाईंचें वर्तन होतें अशीं सूचक वाक्यें वा शब्द (३, ६, ४) हीं सारीं ह्या एका लेखांत एकवटलीं आहेत.

ह्या असल्या लेखांचा परिणाम त्या वेळच्या वाचकांच्या मनावर इतका खोलवर रुजला कीं, त्यावेळेस शाळेंत जाणारे केसरीचे एक वाचक पण आतां पेन्शनींत निघालेले (८५ वर्षांचे श्री. त्र्यंबकराव वैद्य) अजून त्याच तऱ्हेचें लिखाण लिहिण्यास सिद्ध होतात, केसरी तें छापतें व वाचक मिटक्या मारून वाचतात; वैद्य म्हणतात :

'मला पैसे द्या. मी वाटेल तितक्या स्त्रिया ख्रिस्ती धर्मांत आणीन' असा त्यांच्या प्रत्येक भाषणांत रोख असे. याचाच अर्थ समाजसुधारणेपेक्षां ख्रिश्चन धर्म प्रचारावरच त्यांचा भर होता. कै. रानडे व कै. भांडारकर या दोघांना पंडिता रमाबाईंच अंतरंग माहीत नसल्यानें त्या उभयतांचा सुरुवातीस शारदासदन काढण्यांत पाठिंबा मिळाला होता. पण आश्रम केडगांव येथें नेल्यावर त्यांतील बहुतेक सर्व विधवा ख्रिस्ती झाल्या. तेव्हां केसरीमध्यें बरेच लेख आले होते. पंडिताबाईंनीं पैसा कोणत्या सबबिवर मिळवीला, व आश्रमांत असलेल्या विधवांपैकीं किती ख्रिस्ती झाल्या हें पाहिलें म्हणजे सरकारचा पाठिंबा असलेले मिशनरी यांना जें धर्मांतराचें काम करतां आलें नाहीं तें या पंडिताबाईंनीं कसें चुटकीसरसें करून दाखविलें तें दिसून येईल.'

रमाबाईंच्या चरित्रांत ही एक मोठी गोष्ट दिसून येते कीं, त्यांच्याइतकें परिस्थितीशीं झगडण्याचें दिव्य फारच थोड्यांना करावें लागलें आहे. त्यांच्या संबंधानें मुद्दाम जितके गैरसमज पसरविण्यांत आले तितके ते दुसऱ्या कोणाविषयींहि पसरविण्यांत आले नसतील, आणि त्यांच्या इतके शिर उन्नत ठेवून आपलें कार्य तडीस नेणारेहि क्वचितच!

मजा अशी कीं ज्यांच्या विधवा लेकी, सुना, बाईंच्या आश्रयाला आल्या त्यांच्यापैकीं कोणीच तक्रार घेऊन पुढें आलें नाहीं. ओरडणारे फक्त 'पुढारी-'च होते. ज्यांचा ह्या प्रश्नाशीं खरोखर जिव्हाळ्याचा संबंध ते नुसते मुग्धतेनें पाहात, ऐकत, नाहींतर वाचीत असत. शेवटीं अतीच झालें तेव्हां त्यांच्यांतील

कांहींनीं संकोचत संकोचत पुढें येऊन सांगितलें, अहो, आमची रमाबाईविरुद्ध कांहीं तक्रार नाहीं.[1]

असो, हें झालें बाई जिवंत असतां त्यांच्याविषयीं झालेल्या अन्यायाबद्दल. त्या दिवंगत झाल्यावरहि ह्याच पद्धतीनें व ह्याच दृष्टीनें त्यांच्याविषयीं अतिशयोक्त, असंशोधित, किंवा वेळ पडेल तेथें स्वकपोलकल्पित विधानें ठोकून देण्यांत आपण त्यांच्यावर कांहीं अन्याय करीत आहों अशी कल्पनाहि बहुतेक लेखकांना येत नाहीं. ज्या ज्या पुस्तकांत रमाबाईविषयीं कांहीं लिहिलेलें आढळेल त्या त्या पुस्तकांत हीच एकुलती एक पद्धत स्वीकारलेली दिसून येते. ह्याचें एकच उदाहरण देऊन हें प्रकरण संपवूं.

पुण्याचे विख्यात कॉंग्रेसभक्त आणि चित्रमयजगत्चे 'संयोजक' श्री. त्र्यं. र. ऊर्फ मामासाहेब देवगिरीकर यांनीं वासुकाका जोशी यांचें चरित्र लिहिलें आहे. त्यांतील पान १८६, पॅरेग्राफ १ मधील त्यांच्या रमाबाई विषयींच्या विधानांची वानगी चाखली म्हणजे त्या पंडितेबद्दल नव्याजुन्या दृष्टिकोनांची आणखी ओळख करून द्यायलाच नको. ह्या एका पॅरेग्राफमध्यें १७ विधानें आहेत त्यांपैकीं केवळ चारच वस्तुस्थितीला धरून आहेत.

| *देवगिरीकर म्हणतात* | *वस्तुस्थिति* |
|---|---|
| १. त्या विलायतेस गेल्या | बरोबर. |
| २. त्या एका श्रीमान् मराठा स्त्री बरोबर | श्रीमान् मराठा स्त्रीबरोबर बाई त्या स्त्रीची 'Companion' किंवा 'आया' म्हणून गेल्या असा पटकन ग्रह करून देण्याचा ह्या एका वाक्यार्थांत धूर्त हेतु दडलेला थोड्याशा बारकाईनें विचार केल्यास दिसून येईल. प्रथमत: बाई इंग्लंडला गेल्या त्या स्वत:च्या पैशावर. हंटर कमिशनपुढें रमाबाईंची नुकतीच साक्ष झाली होती व तिच्यामुळें सरकार- |

१. 'सुधारक' : २० जुलै: १७ आगष्ट: ७ सप्टेंबर १८९१.

देवगिरीकर म्हणतात　　वस्तुस्थिति

दरबारीं त्यांचें वजन फार वाढलें होतें व स्वत: विद्याखात्याच्या मुख्य अधिकाऱ्यानें शिफारस करून रमाबाईंचीं पुस्तकें लायब्ऱ्यांसाठीं व शाळांसाठीं खरेदी केलीं.

दुसरा असा एक भास ह्या वाक्यानें करून देण्यांत येतो तो बाईंना कांहीं सोबतीची गरज होती व 'मर्द मराठा स्त्री सोबत मिळाली म्हणून त्या जाऊं शकल्या.' 'सागर पोहत बाहुबळानें त्याला नाव मिळो न मिळो रे.' बाईंना दुसऱ्याच्या सोबतीची गरज काय? ही मराठा स्त्री कोण? ह्याचाहि पत्ता नाहीं. आज सतराशेंसाठ स्त्रिया विलायतचा प्रवास करतात व त्याचें कोणाला कांहीं महत्त्वहि वाटत नाहीं पण १८८३ सालीं जेव्हां फक्त आनंदीबाई जोशी आणि रमाबाई अशा दोघीच स्त्रिया आणि त्याहि पहिल्याच महाराष्ट्रीय महिला परदेशाला गेल्या त्या वेळच्या ह्या 'मर्द मराठा' स्त्रीबद्दल केवढा गवगवा झाला असता! ह्या 'आया' चें नांव देवगिरीकरांना कळतें व तिला बरोबर घेऊन जाणाऱ्या 'मेमसाहेबांचें' कसें कळत नाहीं? हो. एक मराठा स्त्री त्यासुमारास इंग्लंडला गेली. पण ती पुढें चारपांच वर्षांनीं. तिचें नांव, ह्याच लोकांनीं बरेंच गाजविलें होतें. ती म्हणजे

| देवगिरीकर म्हणतात | वस्तुस्थिति |
| --- | --- |
| | 'दादाजी विरुद्ध रखमाबाई' ह्या प्रसिद्ध केसमधील रखमाबाई. ह्या लोकांनीं सम्मति बिलाच्या वेळीं जितका हिरीरीनें बिलाच्या विरुद्ध बाजूनें भाग घेतला होता तितकाच ह्या बाईच्या विरुद्ध घेतला होता. ही पंडिताबाईंची एक मैत्रीण होती असें त्या आपल्या The High Caste Hindu Woman ह्या प्रसिद्ध पुस्तकाच्या ६६ व्या पानावर म्हणतात. शिवाय ह्या बाई विलायतेला गेल्या त्या २२ मार्च १८८९ रोजीं (ज्ञानोदय ३१ ऑक्टोबर १८८९) तेव्हां ह्यांच्याहि बरोबर रमाबाई गेल्या असणें संभवत नाहीं. आतां आणखी एक संभव आहे तो सुंद्राबाई पवार ह्यांच्या बाबतींत. पण सुंद्राबाईंचे वडील मराठा होते तरी त्या जन्मापासून खिस्ती होत्या व त्यांना मराठा म्हणणें रास्त नाहीं. तरी वादासाठीं त्या 'त्या' मराठा स्त्री होत्या असें धरून चालल्यास त्या रमाबाईंबरोबर होत्या असें त्यांच्या व रमाबाईंच्या अशा दोन्ही चरित्रांत कोठें आढळत नाहीं. |
| | 'वुइमेन्स अॅण्टीओपियम एजन्सी लीग' ह्या संस्थेमार्फत त्यांनीं दोनदां इंग्लंडमध्यें जाऊन हिंदुस्थान सरकारच्या अफूविषयक धोरणाविरुद्ध इंग्लंडमध्यें लोकमत तयार करण्याची जोराची |

| देवगिरीकर म्हणतात | वस्तुस्थिति |
| --- | --- |
| | खटपट केली होती. ह्या बाईंनीं पुढें शारदासदन पुण्यास आल्यापासून तें केडगांवला जाईपर्यंत जवळ जवळ १० वर्षें रमाबाईबरोबर काम केलें. पुढें त्यांनीं आपली वेगळी संस्था काढली. पण त्या रमाबाईशीं किंवा रमाबाई त्यांच्याशीं कधींच भांडल्या नाहींत, उलट सुंदराबाईंच्या शेवटल्या काळांत रमाबाईंनीं त्यांना आर्थिक मदत केल्याची नोंद सांपडते. |
| ३. वाटेंत ह्या दोघींचें भांडण झालें. | देवगिरीकरांच्या २,५,७, ह्या वाक्यांत रमाबाई ही एक भांडकुदळ बाई होती, ती कृतघ्न असून कोणी कांहीं उपकार केल्यास त्यावर उलटणारी अशी क्षुद्र मनाची व विचित्र वृत्तीची बाई होती असा वाचकांचा समज करून देण्याचा एक खट्याळ उद्देश दिसतो. |
| ४. हिंदुस्थानांत बाप्तिस्मा नको म्हणून त्यांनीं विलायतेस मुलीसह बाप्तिस्मा घेतला. | काय हें धाष्ट्र्याचें विधान ? बाई येथून निघतांना आपण कधीं बाप्तिस्मा घेणार नाहीं असें त्यांनीं प्रसिद्ध केलें होतें. त्या ख्रिस्ती कशा झाल्या ह्याचें वर्णन प्रकरण ८ मध्यें केलें आहे. A Testimony ह्या पुस्तकांत तें त्यांनीं अधिक स्पष्ट केलें आहे. पंडिता रमाबाई यांचा 'इंग्लंडचा प्रवास' ह्या पुस्तकांतील चौथ्या हरकतीला उत्तर देतांना रमाबाई म्हणतात.—'ज्याला समुद्रांत |

| देवगिरीकर म्हणतात | वस्तुस्थिति |
|---|---|
| | उडी टाकायची त्यानें थंडीला भिण्यांत काय अर्थ आहे? एक मात्र भय, तें हेंच कीं ख्रिश्चन धर्म स्वीकारणें. तें करण्यास मला हिंदुस्थानांत पुष्कळ लोकांनीं उपदेश केला आहे. मनुष्याच्या मनाचा निश्चय नाहीं तर त्याला हिंदुस्थान काय आणि इंग्लंड काय?' आणि रमाबाई इतक्या भित्र्या असत्या तर त्यांनीं इंग्लंडला जाण्याच्या आधीं प्रतिलोम विवाहासारखीं जीं काहीं धाडशी कृत्यें केलीं तीं केलीं नसतीं! पण त्यांच्याकडे डोळे झांक करून असें विधान करण्याचें धाडस देवगिरीकरांनीं मात्र केलें! |
| ५. त्यांना विलायतेंत एका कॉलेजांत संस्कृतच्या अध्यापिका नेमिलें. | दुसरें सत्य विधान. |
| ६. पण पुढें या बाईचें व मिशनचें जमेनासें झालें. | बाईचें व 'मिशनचें' इतकें चांगलें होतें कीं बाईंना अभ्यास करण्यास सोपें पडावें म्हणून तेथील सिस्टर्स मनोरमेचा सांभाळ करीत. म्हणूनच बाईंना शिकून शिकविण्यास सवड झाली. मुलगी त्या वेळेस अगदीं लहान म्हणजे अडीच वर्षांची होती. अशी व्यवस्था मे १८८३ पासून १७ फेब्रुवारी १८८६ पर्यंत म्हणजे बाई अमेरिकेला गेल्या तों वर चालली. तोंपर्यंत भांडण वगैरे झालें नव्हतें. |

| देवगिरीकर म्हणतात | वस्तुस्थिति |
|---|---|
| ७. रमाबाईंच्या स्वतंत्र वृत्तीमुळें व सडेतोड स्वभावामुळें.... | ह्यांतील 'मुळें' खेरीज बाकी सर्व बरोबर आहे. रमाबाई स्वतंत्र वृत्तीच्या व सडेतोड स्वभावाच्या होत्या. एवढें हें १७ पैकीं ३ रें सत्य, |
| ८. त्या मिशनशीं भांडल्या. | असत्य. पहिली गोष्ट त्या मुळीं तेथें मिशन मध्यें नव्हत्याच, त्या वॉन्टेज येथील सेंट मेरीज कान्व्हेंटमध्यें राहात होत्या व चेल्टनहॅम लेडीज कॉलेजमध्यें शिकवीत होत्या. ह्या सस्थांना जर लेखक मिशन म्हणत असतील तर तें चूक आहे व तेथील लोकांशीं त्या भांडल्या म्हणत असतील तर ती घोडचूक आहे. |
| ९. बाईंनीं बाप्तिस्मा घेईपर्यंत त्यांना जी मदत मिळे किंवा त्यांची जी चहा होई ती बाप्तिस्मा घेतल्यावर थांबली. | केवढा अजब शोध? आधीं ही 'मदत' कोण देत होतें व ही 'चहा' कोणाकडून होत होती? बाप्तिस्मा कोणीं दिला व त्यांच्याकडूनच हीं बंद झालीं कीं काय हें तरी सांगायचें होतें! चहाच म्हणायची तर बाप्तिस्म्यानंतरच —नुसत्या विलायतेंतच नव्हे तर आतां अमेरिकेंतहि होऊं लागली. बाप्तिस्मा झाल्यानंतर खरोखरच त्रिखंड पृथ्वी-वरील खिस्ती लोकांचे डोळे रमाबाईंकडे लागले. (युरोप, अमेरिका व आस्ट्रेले-शिया) बाईंना आपल्या कामाकरितां लक्षावधि रुपये एकट्या अमेरिकेंतील खिस्ती लोकांनीं दिले. पहिलीं दहा वर्षें संपल्यावर नुसत्या अमेरिकेनेंच नव्हे तर |

*देवगिरीकर म्हणतात* — *वस्तुस्थिति*

जगानें त्यांना त्यांच्या गरजांत हातभार लावला. दीड दोन हजारांचा संसार त्या चालवीत होत्या व तो चालवूं लागल्या त्या बाप्तिस्मा झाल्यानंतर 'मदत' व 'चहा' होत होती म्हणून. तेराव्या प्रकरणांत बाईंच्या बाप्तिस्म्यानंतरची हकीगत दिली आहे. तिच्यावरून बाईंची 'मदत' व 'चहा' कमी झाली कीं शेकडों पटींनीं वाढली हें दिसून येईल.

१०. रमाबाईंनीं गोपाळराव जोशांच्या पत्नीला—आनंदीबाईंना पत्र लिहिलें कीं मला अमेरिकेस यावयाचें आहे, भाड्याकरतां पैसे धाडा.

रमाबाईंच्या बाप्तिस्म्यानंतर त्यांच्याकडे अमेरिकेंतील पुष्कळ लोकांचें लक्ष खिळून राहिलें. त्यांतच फिलाडेल्फिया येथील 'इमेन्स मेडिकल कॉलेज आफ् पेन्सिल्व्हेनिया' ह्या कॉलेजच्या डीन, म्हणजे प्रिन्सिपॉल रेचेल एल्. बॉडले ह्या एक होत्या. आनंदीबाई जोशी ह्याच कॉलेजच्या विद्यार्थीण होत्या. बॉडले बाईंच्या मनांत रमाबाईंना अमेरिकेंत बोलावून घ्यायचें होतें आनंदीबाईंचा पदवीदान समारंभ त्याच सुमारास व्हायचा होता व हें निमित्त रमाबाईंना बोलावण्यास उत्तम आहे असें वाटून त्यांनीं रमाबाईंना आमंत्रण पाठविण्याबद्दल आनंदीबाईंना सुचविलें. आनंदीबाईंनाहि रमाबाईंना पाहण्याची फार इच्छा झाली होती. तेव्हां त्यांनीं

| देवगिरीकर म्हणतात | वस्तुस्थिति |
| --- | --- |
| | बाईंना आग्रहाचें आमंत्रण दिलें. मात्र त्याआधीं जवळ जवळ एक वर्षापूर्वी डॉ. बॉडलेनीं स्वतः रमाबाईंना आमंत्रण केलें होतें. बाईंनीं अजून आपला इंग्लंडमधील अभ्यास पुरा केला नव्हता. तो अर्धवट टाकून त्यांना मुळींच जायला नको होतें. परंतु आनंदीबाई व डॉ. बॉडलेबाई ह्यांचीं मोठ्या आग्रहाचीं पत्रांवर पत्रें येऊं लागलीं व रमाबाई त्या आग्रहाला बळी पडल्या. अर्थात् ज्यांच्या आमंत्रणावरून इतक्या दूर जायचें त्यांनीं प्रवासखर्च द्यावा हें ओघानें आलेंच व त्याप्रमाणें डॉ. बॉडले ह्यांनीं तो दिला. आतां ही सरळ गोष्ट आपल्याला हवा तो मसाला भरून किती विपर्यस्त करण्यांत येते तें देवगिरीकरांनीं येथें दाखवून दिलें आहे. आणि आनंदीबाई काय एवढ्या तालेवार लागून राहिल्या होत्या कीं त्यांना रमाबाईंच्या भाड्याचे पैसे पाठवितां येणार होते? त्यांनाच परत येतांना कोल्हापूरच्या महाराजांनीं त्यांच्या व गोपाळरावांच्या भाड्याचे पैसे पाठवले तेव्हां अमेरिकेचा किनारा सोडतां आला. कोल्हापूरला आनंदीबाईंना महाराजांनीं कामासाठीं बोलावलें होतें. (ही सर्व माहिती व खालीं दिलेली माहिती काशीबाई कानीटकर ह्यांनीं |

| देवगिरीकर म्हणतात | वस्तुस्थिति |
| --- | --- |
| | गोपाळराव व आनंदीबाई ह्यांच्या पत्रव्यवहाराच्या आधारानें लिहिलेल्या आनंदीबाईंच्या चरित्रावरून घेतली आहे.) |
| ११. आनंदीबाई त्या वेळेस अमेरिकेंत पतीसह होत्या, व शिकत होत्या. | ह्या वाक्याचा झोंक असा आहे कीं आनंदीबाई व गोपाळराव ह्यांनीं अमेरिकेंत घर करून संसार थाटला होता. पण असें मुळींच नाहीं. गोपाळराव नुकतेच अमेरिकेंत पोंचले होते व दोघेहि डॉ. बॉडलेकडे पाहुण्यांसारखे राहात होते. आनंदीबाईंचें शिकणें संपलें होतें व त्या पदवीदान समारंभाची वाट पहात होत्या व ह्याच पदवीदान समारंभास रमाबाईंना आग्रहाचीं आमंत्रणें चाललीं होतीं. |
| १२. गोपाळरावांनीं रमाबाईंना पैसे पाठविले. | खुद्द गोपाळरावांना अमेरिकेंत पोंचण्यास कलकत्त्याचा किनारा सोडल्यावर दोन वर्षें लागलीं. कारण मालबोटींवर मजुरी करून ते गेले. निघतांना त्यांच्या जवळ एक छदाम नव्हता. पांच रुपयांची उसनवारी करून ते निघाले. परत येतांना तीच रड. कोल्हापूरच्या महाराजांनीं आनंदीबाईंच्या गाड्याबरोबर ह्या नळ्याचीहि यात्रा घडविली होती, आणि परत आल्यावर बायको आजारी असतांना खर्चाला पैसे नव्हते, कोणी उसनवारी देईना, त्यावेळेस ‘केसरी’ व |

| देवगिरीकर म्हणतात | वस्तुस्थिति |
| --- | --- |
| | ‘मराठा’नें त्यांना पैशाची मदत केली! असे हे दरिद्री नारायण म्हणे रमाबाईंना पैसे पाठवितात. |
| १३. रमाबाई अमेरिकेंत गेल्या. | बऱ्याच अवकाशानंतर आणखी एक सत्य. |
| १४. त्यांनीं आपल्या मुलीला लंडन मिशनांत ठेवलें. | वहावा! म्हणजे त्यांचें मिशनशीं भांडण झालें नव्हतें तर! |
| १५. त्या एकट्याच अमेरिकेंत गेल्या. | खोटें, त्यांनीं मनोरमेलाहि बरोबर नेलें होतें. |
| १६. गोपाळरावांनीं रमाबाईंची व्याख्यानें करविलीं. | गोपाळरावांची तेथें काय पत होती? आपल्या स्वतःच्या व्याख्यानबाजीनें तेथें गोपाळराव अत्यंत अप्रिय झाले होते. त्यांच्या कच्छपीं रमाबाई लागल्या तर संपलेंच असतें. गोपाळरावांनीं हिंदुस्थानांत जितका विक्षिप्तपणा केला त्याच्या दसपट अमेरिकेंत करण्याचा त्यांचा रोख होता. सुरुवातहि झाली होती. पण आनंदीबाईंना परत फिरणें अगदीं अगत्याचें होतें व ह्यांना त्यांच्याबरोबर येण्यासाठींच तिकीट होतें म्हणून बिचाऱ्या आनंदीबाईंनीं मिळवि-लेली तेथील अब्रू घालविण्याची संधि पतिराजांना मिळाली नाहीं. आपण मागें राहतों असा त्यांचा आधीं आधीं आनंदीबाईंच्या मागें लकडा लागला होता, पण थोडक्यांत निभावलें. अशा |

| *देवगिरीकर म्हणतात* | *वस्तुस्थिति* |
| --- | --- |
| | ह्या माणसाच्या शिफारशीवरून बाईंचीं व्याख्यानें झालीं नाहींत हें हिंदुस्थानच्या विधवांचें मोठें भाग्य. |
| १७. गोपाळराव मराठ्यामध्यें बाई-विरुद्ध लिहूं लागले. ही बाई फसवी आहे, बाटविणारी आहे : वगैरे. | केव्हां ? १८९३ मध्यें बाईंच्या शारदासदनांतली पहिली विद्यार्थीण ख्रिस्ती झाली. त्याच्या आधींच जर गोपाळरावांनीं बाईंच्या विरुद्ध असें लिहिलें असेल तर आपण मूर्ख आहों असें त्यांनीं आपल्याच लिखाणानें सिद्ध केलें असें म्हणावें लागेल. कारण एखादी गोष्ट घडण्याच्या आधींच ती अशी अशी घडली आहे असें म्हणणारा माणूस एक तर मूर्ख म्हणावा किंवा लबाड तरी म्हणावा. गोपाळरावांचा स्वतःचा बाप्तिस्मा १८९१ सालीं झाला. त्यानंतर त्यांचे ताबूत थंडे झाले. आधीं आधीं त्यांच्या विक्षिप्त-पणामुळें त्यांनीं स्वतःला मोठें महत्त्व प्राप्त करून घेतलें होतें. पण ते 'बाटल्यावर' वर्तमानपत्रकर्ते त्यांना महत्त्व देईनासे झाले. नंतर त्यांच्याबद्दल फारसें ऐकायला येत नाहीं. तेव्हां त्यांचें हें 'मराठा'मधील लिखाण बहुतेक १८९१ च्या आधींचें असावें व तसें असलेंच, तर गोपाळरावांच्या विक्षिप्त-पणाचा तो आणखी एक नमुना ह्या पलीकडे त्याला कांहीं किंमत नाहीं. |

## १० दुर्भाग्याचाच तो दिवस!

रमाबाईसंबंधीं जे गैरसमज झालेले आहेत त्याचें प्रातिनिधिक मागच्या प्रकरणांत दिलेल्या शांताबाई कशाळकर ह्यांच्या रमाबाईविषयक मृत्युलेखांत उत्तम सांपडतें.

रमाबाईंना हिंदु समाज व हिंदु स्त्रिया आंचवल्या. त्यांना मोह पडला. त्या मोहाच्या भरांत त्यांनीं स्वतःचें अहित करून घेतलें. व तें अहित त्यांचें जन्माचें झालें.

मोह म्हणून कांहीं असतो व त्याची बाईंना कधीं झळ लागली आहे असें बाईंच्या साऱ्या चरित्रांत कोठें आढळत नाहीं. तसेंच आपलें ऐहिक अथवा पारमार्थिक अहित त्यांनीं करून घेतल्याचा प्रत्यय त्यांना किंवा इतरांना आलेला नाहीं. आतां त्या हिंदु स्त्रियांना किंवा हिंदु समाजाला, किंवा हीं त्यांना कितपत आंचवलीं हें पाहूं.

बाईंना ख्रिस्ती होऊन सहा वर्षें झालीं होतीं; त्या ख्रिस्ती असल्याचें हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यांत दुमदुमत होतें अशा परिस्थितींत त्यांनीं बार्शी-सारख्या सनातनी शहरांत तेथील हिंदु देवळांत जाऊन प्रवचन केलें! त्याबाबत बाईंच्या एक अमेरिकन चरित्रलेखिका म्हणतात :

"रमाबाई ख्रिस्ती झाल्या होत्या तरी त्यांच्या विद्वत्तेची कदर उदार मनाचे हिंदु लोक करीत, हें कृतज्ञतापूर्वक कबूल केलें पाहिजे. बार्शीला त्यांना बोलवून त्यांचें स्त्रियांसाठीं एका दिवाणखान्यांत व्याख्यान ठरविण्यांत आलें. परंतु तसल्या ठिकाणीं येण्यास स्त्रिया धजेनात. तेव्हां पुरुषांनीं आग्रह केला कीं आम्हांला हिंदु पवित्र ग्रंथांतून प्रवचन हवें. रमाबाई म्हणाल्या 'ठीक आहे! पौल [इंग्रजींत पॉल—ख्रिस्ताचा एक प्रेषित] ह्यानें जसा यहुदी लोकांना यहुदी पद्धतीनें व हेल्लेणी लोकांना [ग्रीक लोकांना] ग्रीक पद्धतीनें उपदेश

केला तसाच तुमच्या पद्धतीनें तुम्हांस मी उपदेश करीन.' नंतर हिंदु पुराणाचा एक भाग वाचून त्यांनीं तो इतका उत्तम फोड करून सांगितला कीं लोकांनीं तोच उपदेश आमच्या देवळांत करा असा आग्रह धरला. ह्याबद्दल रमाबाईंनीं लिहिलें आहे कीं 'येथें तर अगदीं कडेलोट झाला. सनातनी हिंदूंनीं बहिष्कृत अशा खिस्ती व्यक्तीला आपल्या मंदिरांत येऊं देणें—एवढेंच काय पण आग्रह करून नेणें व हिंदूंच्या पवित्र शास्त्रांतून तिनें वाचलेला भाग ऐकून घेणें हा एकूणिसाव्या शतकांतला एक चमत्कारच म्हणावा लागेल!' बाईंना मिळालेल्या संधीचा त्यांनीं इतका योग्य उपयोग करून घेतला कीं तुम्ही आणखी रहा असा तेथील स्त्रिया त्यांना आग्रह करूं लागल्या'[1]

ह्यानंतर 'ज्ञानोदय' नांवाच्या खिस्ती साप्ताहिकांत बाईंच्यावर टीकेची झोड उठली. बाईंनीं त्यापैकीं 'लक्ष' नांवानें लिहिणाऱ्या एका टीकाकाराला खालीलप्रमाणें चोख उत्तर दिलें:

'हिंदु पुराण सांगितलें ह्यांत मीं काय 'अनन्वित' कृत्य केलें हें मला समजत नाहीं! बार्शीसारख्या ठिकाणीं, जेथें बायकांना सभा म्हणजे मोठा बाऊ आहे असें वाटतें, व ज्या साध्या भोळ्या बायकांना पुराणच काय तें ठाऊक, व्याख्यान कशाशीं खावें हें देखील माहीत नाहीं त्यांस 'पुराणांतलेंच एखादें वाक्य घेऊन त्यावरून दोन बोधपर गोष्टी सांगण्यांत मोठें पाप आहे असें आपल्यास वाटतें काय? वाटत असेल तर 'लक्षा'चें पत्र ज्यांत आहे त्याच 'ज्ञानोदयाचे'अंकांत पत्रकर्त्यांनीं लिहिलेल्या निबंधामध्यें,

*एक एव सुहृद्धर्मो निधनेऽप्यनुयाति यः।*
*शरीरणे समं नाशं सर्वमन्यत्तु गच्छति ॥*

ह्या हिंदुस्मृतीच्या श्लोकाच्या आधारें जो बोधप्रद निबंध आला आहे तो कसा आला? व आपण मधूनमधून तुकारामासारख्या हिंदूंचे अभंग, उपदेश वगैरे आपल्या वाचकांच्या बोधाकरितां उतरून घेतां हें कसें? 'लक्षा'च्या समजुतीप्रमाणें हीं आपलीं कृत्यें 'अनन्वित' नव्हेत काय? मी कांहीं धर्मासंबंधीं उपदेश करण्यास बार्शीस गेलें नव्हतें व तसला उपदेश मी करणार नाहीं हें बार्शीच्या लोकांस ठाऊक होतें. माझें व्याख्यान आणि

1. Pandita Ramabai Saraswati: by Clementina Butler. पृष्ठ ७८–७९

पुराण हीं दोन्ही साधारण सामाजिक नीति कशी असावी ह्या विषयावर होतीं. 'लक्षा'स संस्कृत भाषा येत असून भागवत पुराणाची माहिती असेल, तर विजयध्वजी पाठाच्या चतुर्थ स्कंधाच्या बाविसाव्या अध्यायांत प्रारंभापासून २७ व्या श्लोकापर्यंत पृथुसनत्कुमार (ह्या पृथु राजावरून पृथ्वी हें नांव पडल्याची कथा आहे. सनत्कुमार हा ब्रह्मदेवाचा मानसपुत्र मानला जातो.) संवादाचा भाग वाचून मीं पुराण सांगितलें; हिंदूंच्या देवळांत जाऊन अशा प्रकारचें पुराण सांगायला कांहीं हरकत आहे, असें मला वाटत नाहीं. आपण सुचविल्याप्रमाणें मुंबईंतील एखाद्या देवळांत चातुर्मासांत पुराण किंवा मुसलमानी मशिदींत कुराण सांगण्यास मी सिद्ध आहें. मात्र हिंदूंनीं आपलीं देवळें व मुसलमानांनीं आपल्या मशिदी यांचीं दारें उघडलीं पाहिजेत व त्यांच्या पुराणांचें व कुराणांचें मी सांगेन तसें पुराण ऐकण्यास तयार असलें पाहिजे. देवळांत किंवा मशिदींत नीतिपर उपदेश करण्यांत मी कांहीं पाप करतें असें मला वाटत नाहीं.'[1]

हिंदु देवळांत जाऊन पुराण सांगण्याचें आमंत्रण बाईंना मिळतें व तें स्वीकारून निःशंक मनानें त्या जाऊन हिंदु देवळांत पुराण सांगून येतात ह्यावरून त्या खिस्ती झाल्यानें त्यांनीं आपलें 'हिंदुत्व' सोडलें होतें असें म्हणण्याचा कित्येकांचा अट्टाहास असतो तो खरा नाहीं हें दिसून येईल. बाईंच्या सव्वापांच वर्षांच्या मनोरमेला इंग्लंडमध्यें कोणीं कौतुकानें म्हटलें 'अग तूं अगदीं अमेरिकन बनलीस' तेव्हां तिनें ताडकन् उत्तर दिलें होतें 'नाहीं नाहीं मी हिंदु आहें.' बाईंचा इंग्लंडांत बाप्तिस्मा झाला आणि त्या भारतांत परत आल्या त्या 'मड्डम' बनून आल्या नाहींत. त्यांनीं आपलें धर्माव्यतिरिक्त सारें 'हिंदुत्व' कायम ठेवलें होतें. किंबहुना त्यांच्या बाबतींत असेंहि म्हणतां येईल कीं मी मी म्हणविणाऱ्या कडकडीत सोवळ्या मंडळींनीं 'हिंदुत्व'निष्ठ आचार-शुचिता त्यांच्यापासून शिकण्यासारखी होती. त्यांनीं आपल्या एकूण एक राष्ट्रीय चालीरीती कायम ठेवल्या होत्या. १९०४–०५ सालीं लेखकानें कांहीं दिवस बाईंच्याकडे काढले आहेत व त्या वेळेस त्यांच्याकडे त्यांच्या हातांखालीं कामाला असलेल्या युरोपियन व अमेरिकन स्त्रीपुरुषांना त्यांनीं शाकाहारी

१. ज्ञानोदय : २५.७.१८८९.

अन्न सेवन करण्यास व जमिनीवर बसून ताटांत अगदीं हिंदु पद्धतीप्रमाणें जेवायाला लावलें होतें हें लेखकानें प्रत्यक्ष पाहिलें आहे. रोजच्या रोज वीस पंचवीस गौरकाय परदेशियांची अशी पंगत बसत असे. इतकें चकाय तर एकदां दिल्ली दरबारहून परतलेला हाऊस ऑफ लॉर्डस्‌चा एक सभासद बाईंना भेटायला आला असतां त्यालाहि त्याच पंक्तींत बसून जेवावें लागलें होतें, व बाई खात तसलेंच निर्मांस अन्न सेवन करावें लागलें होतें. इकडे ज्या वेळेस बाहेरून कडकडीत सोवळें दाखविणारे राजेरजवाडे बूट स्टाकिण्या चढवून साहेबाच्या टेबलावर बसून सहभोजन करण्यांत स्वतःचा मोठा मान झाल्याचें मानीत होते, त्याच वेळेस बाईंच्या घरीं आलेला साहेब पाटावर बसून हाता-बोटांनीं घास कसे घ्यायचे तें शिकत होता.

शारदा सदन ही संस्था बाईंनीं ख्रिस्ती झाल्यानंतर साडे पांच वर्षांनीं काढली. सदनाला तेथील पहिल्या विद्यार्थिनीचें नांव देण्याचें ठरविल्यावर तें नांव एका हिंदु देवतेचें म्हणून तेवढ्यावरून त्यांना तें त्यावेळीं आक्षेपार्ह वाटलें नाहीं. उलट विद्यादेवीचें नांव म्हणून त्यांनीं त्याचें स्वागतच केल्याचें दिसतें. शारदा सदनाच्या उद्‌घाटनप्रसंगीं बाईंच्या विनंतीवरून श्री. वामन आबाजी मोडक ह्यांनीं बंगाली चालीवर एक गाणें रचून दिलें. त्यांतील हीं कडवीं पाहा:

*ऋषिज्ञान विलसित*
*धर्मवृक्ष कुसुमित*
*नाना दिव्य फलयुक्त*
*शोभताती माते*

प्राचीन भारतीय ऋषींचा गौरव ह्या ख्रिस्ती बाईला चालत होता. इतकेंच नाहीं तर,—

*सुलभा गार्गी मैत्रेयी*
*भैमी[1] सावित्री वैदेही[2]*
*धन्य तारा मीरा*
*कन्या तव माते*

---

१. दमयंती २. सीता

ह्या हिंदु पुराणांतील स्त्रियाहि तिला पूज्य वाटत होत्या. इतकेंच नाहीं तर

*धीरोदार महाशूर*
*तव पुत्र धुरंधर*
*राम भीष्म पार्थवीर*
*वीरसू तूं माते*

हे हिंदु पुराणांतील थोर पुरुषहि तिला वंदनीय वाटत होते. ती आतां त्यांना देव मानण्यास राजी नव्हती, पण तिनें त्यांचा वैरी म्हणून त्याग केला नव्हता. त्यांच्याबद्दल तिला नितांत आदर होता.

ह्या बाईनें आपली पूर्वपरंपरा सोडली नव्हती म्हणून अभिमान वाटण्याऐवजी पुण्यांतील एका प्रतिष्ठित देशाभिमानी पत्राला ह्याचाच मोठा विषाद वाटत होता. 'अहह बाईंनीं आपलें रमा हें नांव सोडलें नाहीं, कीं पंडिता ही उपाधी झुगारून दिली नाहीं,' असे तिला टोमणे मारण्यांत आले होते.

बाईंच्या ह्या वृत्तीमुळें हिंदु व खिस्ती अशा दोहोंतील सोवळ्या मंडळींच्या अंगाचा तिळपापड उडत असे हें आरंभीं बाईंनीं एका खिस्ती लेखकाला दिलेल्या उत्तरावरून दिसून येईल. पण बाईंच्यामधील एका विशेषत्वाचें त्या वेळच्या व आतांच्याहि पुष्कळ लोकांना आकलन करतां आलें नाहीं व येत नाहीं. तें विशेषत्व हें कीं, बाईंच्या अंगीं असलेला सांस्कृतिक हिंदुपणा कोणाला कधीं हिरावून घेणें शक्य नव्हतें. हिंदु पुराणाचा उपयोग करून हिंदु स्त्रियांना हिंदु देवळांत जाऊन उपदेश करणें, व तेंहि एकदां संपूर्णपणें खिस्तीपणांत मुरल्यावर व १८८९ सारख्या पुरातन काळांत, अमेरिकेहून येऊन फार दिवस झाले नव्हते तोंच, ही कांहीं लहान सहान गोष्ट नाहीं.

बाई खिस्ती होत्या. त्यांचा खिस्तीधर्मत्यागाचा हेतु नव्हता—अगदीं शेवटपर्यंत नव्हता, तरीपण खिस्ती झाल्यावर सात वर्षांनीं बाईंनीं केलेल्या एका भाषणांतील खालील उतारा पाहा. शारदा सदन मुंबईहून पुण्यास नेण्यांत येत होतें. त्या वेळेस एक उत्तम बांधणीचें ऋग्वेदभाष्याचें पुस्तक व एक सोन्याचें घड्याळ[१] मुंबईच्या स्त्रीसमाजाकडून त्यांना अर्पण करण्यांत येऊन मानपत्र देण्यांत आलें.

१. हें सोन्याचें घड्याळ पुढें रमाबाईंनीं रे. राघवेंद्रराव नेवासकर ह्यांना बक्षिस दिलें. आज तें राघवेंद्ररावांच्या चिरंजिवांजवळ आहे.

ह्या मानपत्राला उत्तर देतांना बाईंनीं जें भाषण केलें तें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. घारापुरीच्या लेण्यांत अर्धपुरुष व अर्धस्त्री अशी एक दक्षिणामूर्ति[1] नामक मूर्ति आहे. तिच्या आधारावर स्त्रीपुरुषांचा पूर्वीं संबंध कसा होता हें मोठ्या मार्मिकतेनें रमाबाईंनीं दाखवून दिलें; परंतु तीच मूर्ति आंज कशी छिन्नविछिन्न झाली आहे. ही छिन्नविछिन्नावस्था हल्लींच्या स्थितीचें द्योतक आहे. वेदभाष्याची बहुमोल पुस्तकें नजर केलीं म्हणून आभार मानून बाई म्हणाल्या : 'कांहीं वर्षांपूर्वीं स्त्रियांना वेदाध्ययनाचा अधिकार नाहीं असें मला स्वतःला वाटत असे. तसें मीं कलकत्त्यास असतांना केशवचंद्र सेन ह्यांना बोलूनहि दाखविलें व मला त्यांनीं यजुर्वेदाचें पुस्तक बक्षिस दिलें. आणि आतां आपण मला वेदभाष्याचे ग्रंथ बक्षिस देत आहां. त्या प्रसंगीं केशवचंद्र सेन ह्यांनीं मला वेदाधिकार दिला. आज आपण—माझ्या देशभगिनी—तो अधिकार मला देत आहां. यावरून प्रथम तो अधिकार आपण संपादिला असें होतें. स्त्रीजातीचें पाऊल इतकें पुढें पडलेलें पाहून मला फार संतोष होतो.'[2]

वरील संपूर्ण भाषणावरून बाईमध्यें खिस्ती झाल्यामुळें कोणता कृत्रिमपणा उत्पन्न झाल्याचा दिसून येतो? वेदावर विश्वास नसतांहि वेद ग्रंथाचा त्या आदरानें स्वीकार करतात, व बोलतांना चकचकीत हिंदु अर्धनारीनटेश्वराचें उदाहरण घेऊन त्यावर आपलें भाषण उभारतात.

---

१. श्री. गणेश हरि खरे (भारत इतिहास संशोधन मंडळ) हे आपल्या मूर्तिविज्ञान नांवाच्या ग्रंथांत लिहितात (पृष्ठ ११३) 'शिवाच्या ज्ञान, योग, गान, ह्यांतील प्रवीणता दाखविणाऱ्या मूर्तींना दक्षिणामूर्ति म्हणतात. त्याचें तोंड दक्षिणेकडे असे किंवा त्याच्या मूर्ति देवळाच्या विशेषतः गाभाऱ्याच्या दक्षिणेकडील कोनांत बसवतात म्हणून त्यास दक्षिणामूर्ति हें नांव पडलें असावें.' महाराष्ट्रांत अशा मूर्ति क्वचितच असतील. अर्थात् अर्धनारीनटेश्वराबद्दल दक्षिणामूर्ति शब्द रमाबाईंच्या भाषणाचा सारांश देणारांनीं चुकीनें वापरला असावा. श्री. स. वा. जोगळेकर ह्यांनीं आपल्या घारापुरी नांवाच्या पुस्तकांत अर्धनारीनटेश्वर ह्या मूर्तीचें सचित्र वर्णन केलें आहे त्यांतहि दक्षिणामूर्ति असा उल्लेख सांपडत नाहीं. किंबहुना कलकत्त्यांतील दक्षिणेश्वराचें मंदिर व त्यांतील दक्षिणामूर्ति बाईंच्या स्मृतिपटलावर अद्यापहि कायम असल्यानें घारापुरीच्या अर्धनारीश्वर मूर्तीला त्यांनीं अहेतुक 'दक्षिणामूर्ति' म्हटलें असेल.

२. नवयुग मासिक : एप्रिल—मे १९२२ जोड अंक

बाईंच्या अंगचा 'हिंदुपणा' त्यांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यानें नष्ट झाला नाहीं, असें म्हणतांना 'हिंदु' हा शब्द धर्माचा निदर्शक म्हणून वापरण्यांत आलेला नाहीं. सावरकर म्हणतात त्याप्रमाणें हिंदुत्वाची कल्पना मान्य केल्यास हें कोडें सहज सुटेल. हिंदु धर्म म्हणजे अमूक एक धर्म असें म्हणतां येत नाहीं. उपास्य दैवतें अनेक व साधनेंहि अनेक आहेत; म्हणजे तर्कशास्त्रदृष्ट्या हा एकच धर्म आहे असें म्हणतां येणार नाहीं. 'हिंदुत्व' मात्र एकच आहे. व तें अभेद्य आहे.

'आवेस्ती, इराणी, यहूदी, ग्रीक व इतर लोक आपल्याला आपल्या जुन्या सिंधु किंवा इंदु नांवानें ओळखीत व आजच्या घटकेपर्यंत ओळखीत आहेत.'

हिंदु महासभेच्या एका अध्यक्षीय भाषणांत अध्यक्षांनीं म्हटलें होतें.

'The Hindu Mahasabha is not a religious organization. Hindutwa or Hindu-ness does not depend on particular spiritual belief or system of philosophy.'[2]

श्री. के. नटराजन हे गृहस्थ 'इंडियन सोशल रिफॉर्मर' पत्राचे संपादक म्हणून प्रसिद्ध होते. शारदा सदनांत झालेल्या धर्मान्तराच्या टीकाकारांशीं माझी सहानुभूति नाहीं, ठोकळेबाज धर्ममतांवर (doctrine or dogma) माझा विश्वास नाहीं असें १८९५ च्या पुण्याच्या सामाजिक परिषदेंत सांगणारे हे गृहस्थ, पण पुढें हिंदु महासभेच्या एका प्रान्तिक अधिवेशनाचे अध्यक्ष झाले होते!

मात्र हिंदु सभेचे, सर्वच सभासद हिंदुत्वाच्या ह्या व्यापक स्वरूपास —केवळ तोंडी नव्हे तर प्रत्यक्षांत—मान्यता देतात असें आढळत नाहीं.

ही दृष्टि जर त्या वेळेस असती तर बाईंच्या बाबतींत करण्यांत आले ते उपद्व्याप करून त्यांना 'हिंदु समाजांतून उठविण्याचा' प्रश्नच उद्भवला नसता. पंच हौद चहा प्रकरण जसें आज पोरकट वाटतें तसेंच जर ह्या दृष्टि-कोनांतून पाहूं गेलें तर हेंहि वाटेल.

---

१. आवेस्ता हे एका भाषेचें नांव आहे. लोकांचें नाहीं. जरतुष्ट्राच्या गाथा ह्या भाषेंत आहेत.
२. हिंदु महासभेच्या कलकत्ता अधिवेशनांत श्री. सावरकरांनीं केलेलें अध्यक्षीय भाषण (रिपोर्ट पृष्ठ २५.)

बाईंच्या नीतिमत्तेबद्दल तर त्यांच्या कट्टर शत्रूनेंहि कधीं अवाक्षर काढलें नाहीं. वासूकाका जोशी ह्यांच्या चरित्रांत बाईंबद्दल ठिकठिकाणीं विपर्यस्त माहिती देऊन बाईंना हिणकस ठरविण्याचा प्रयत्न झालेला आहे, तरी त्याहि पुस्तकांत बाईंच्या शीलाबद्दल धन्योद्गारच काढले आहेत. हे—चरित्रकार म्हणतात :

'पण दुसरी एक गोष्ट त्यांच्याबद्दल सांगतां येईल, वर्ष दीडवर्षांचा वैवाहिक जीवनाचा काळ सोडला, तर त्यांना मोहाचे प्रसंग अनेक होते, लग्नापूर्वी व वैधव्यदशेंत त्यांच्या चारित्र्याविषयीं कोणीं शंका घेतली नाहीं, एरव्ही त्यांचें पाऊल वांकडें पडलें असतें तर त्याचा गवगवा झाला असता व त्यांना समाजांतून उठवून लावलें असतें.'[1]

बाई ख्रिस्ती झाल्यानें त्यांचें शील भ्रष्ट झालें नव्हतें! त्यांचा हिंदीपणा नष्ट झाला नव्हता! बरें, त्यामुळ त्यांच्यांत राज्यकर्त्यांची हांजी हांजी करण्याची प्रवृत्ति बळावली होती काय? ह्याबाबत टिळकचरित्रकार श्री. केळकर काय म्हणतात तें पाहावें; श्री. केळकर म्हणतात :

'बाई तेजस्वी होत्या त्यामुळें त्यांनीं आपल्या समाजाप्रमाणें युरोपियन अधिकाऱ्यांचीहि कधीं फारशी भीड ठेवली नाहीं. प्लेगच्या धामधुमींत अधिकाऱ्यांकडून व त्यांच्या हस्तकांकडून अनेक प्रकारचे अत्याचार घडले, त्या वेळीं एकीकडे गोपाळराव गोखले हे आपल्या कांहीं अतिशयोक्त विधानांबद्दल माफी मागण्यास तयार झाले असतां रमाबाईंनीं जाहीर रीतीनें अधिकाऱ्यांच्या कित्येक दुष्कृत्यांचा निषेध केला, यामुळें 'नारि असुनि सत्यपणा तूंच राखिला,' हें त्यांचें संगीत गुणवर्णन पुण्याच्या लोकांच्या तोंडीं बरेच दिवस राहिलें होतें.'[2]

नामदार गोखल्यांवर हा प्रसंग त्यांच्या कांहीं मित्रांकडून त्यांना पुरविण्यांत आलेल्या माहितीचा पाठपुरावा करण्यास संबंधित व्यक्ति पुढें येऊं न शकल्यानें ओढवला होता. त्या काळांतच काय पण आतां सुद्धां ज्या स्त्रियांची अब्रू घेण्यांत आली असेल त्या तशी साक्ष देण्यास पुढें येणार नाहींत.

बाईंनीं मात्र माघार घेतली नाहीं. त्यांच्या एका पत्रावरून सरकारी वर्गांत

१. वासुकाका जोशी : चरित्र पृष्ठ १९०.
२. केळकरकृत टिळकचरित्र. पृष्ठ ३३१.

मोठी खळबळ उडाली होती. ह्यासंबंधीं बाईंच्या सान्निध्यांत असलेले श्री. शंकर बळवंत कुळकर्णी लिहितात :

'बाईंचा स्वाभाव करारी व धडाडीचा होता. खऱ्या गोष्टी सराळून सांगणें, हा त्यांचा बाणाच होता. एक वेळेस दोष दाखवून सरकारास योग्य दिशा दाखवावी म्हणून 'बॉंबे गार्डियन' पत्रांत त्यांनीं खडसून लेख लिहिला. तेणेंकरून बाईंवर नोकरशाईंची वक्रदृष्टि झाली. त्या वेळच्या गव्हर्नरासहि चमत्कारिक वाटलें. त्याच वेळीं प्लेगच्या धामधुमीमुळें पुण्याचें वातावरण प्रक्षुब्ध झालें होतें. लो. टिळक ह्यांना ह्याच वेळीं सरकारी पाहुणचार मिळाला होता. पंडिताबाईंनाहि पाहुणचाराचें आमंत्रण होतें पण प्रसंग टळला.'[1]

आज जो हिंदु समाज व जी हिंदु स्त्रीजात बाईंना मुकली म्हणतात, त्याच हिंदु समाजांतील स्त्रीपुरुष मोटारी भरभरून साईबाबांच्या दर्शनाला जात आहेत, बाबा मलंगची तीर्थयात्रा करीत आहेत इतकेंच काय परंतु वांद्र्याच्या मौंट मेरीला व गोव्याच्या फ्रान्सिस झेवियरला नवस करीत आहेत!

उलट बाई हिंदु समाजाला मुकल्या असें जे म्हणतात त्यांच्यापेक्षां आपल्या कर्तृत्वानें, आपल्या नीतिमत्त्वानें, आपल्या स्वदेशप्रेमानें, आपल्या समाजसेवाव्रतानें एक रेसभरहि कमी न भरणाऱ्या ह्या बाई हिंदु समाजाला मुकतात!

रमाबाईंनीं ज्या धर्माचा अंगिकार केला त्या धर्मांत तरी मानवतेविरुद्ध नीतीविरुद्ध किंवा परमेश्वराविरुद्ध, असें कोणतें शिक्षण आहे कीं त्या धर्माचा स्वीकार करणें म्हणजे हिंदु समाजाविरुद्ध किंवा भारताविरुद्ध महापातक करणें आहे? महात्मा गांधी, विनोबा भावे, काका कालेलकर इत्यादि थोर व्यक्तींनीं ह्या धर्माचे गोडवे गायिले आहेत, इतकेंच नाहीं तर केसरीकारांनींहि अभावितपणें एका अग्रलेखांत खिस्ती धर्माची थोरवी मान्य केली आहे. फादर डेमियनवरील लेखांत केसरीकार म्हणतात 'आपल्या धर्मांत आणलेल्या लोकांस तेथेंच सुखानें आत्ममुक्ति आहे व त्याच धर्मात निधन श्रेय, असें वाटायला लावण्याची योग्यता खिस्ती धर्माची आहे. त्या धर्माची दिशा नेहमीं लोकोपयोगित्वाकडे असते. परोपकार करावा हेंच त्या धर्माच्या अधिकाऱ्यांना आरंभापासून शिकविलेलें असतें. आपल्यांतील पुढाऱ्यांनीं, धर्माभिमान्यांनीं, व धर्मा-

१. सच्छास्त्रप्रदीपक. ज्या. १९३२. प्रकरण १८ पाहावें.

धिकाऱ्यांनीं या गोष्टीचा विचार करावा....'

खाजगी बोलण्यांत किंवा जीं खाजगी पत्रें कधीं प्रसिद्ध होणार आहेत अशी तरळतीहि कल्पना नसतांना लिहिलीं जातात अशा पत्रांत माणसाचें खरें खरें मनोगत अगदीं आडपडदा न ठेवतां प्रगट होतें. सुप्रसिद्ध कादंबरीकार प. वा. हरि नारायण आपटे ह्यांनीं दुसऱ्या दोन साहित्यिकांना म्हणजे कानिटकर पतिपत्नींला लिहिलेलीं पत्रें सन १९२९ मध्यें प्रसिद्ध करून श्री. काशीबाई कानिटकरांनीं मराठी वाङ्मयांत एक अभिनव भर घातली आहे. 'हरिभाऊंचीं पत्रें' असें त्या पुस्तकाचें नांव आहे. त्यांतील ८६ ते ९६ हीं पृष्ठें शक्य असेल तर वाचावी. त्यांत मिशनरी कार्य व हिंदी ख्रिस्ती लोक ह्या विषयांवर त्यांनीं आपले विचार मांडले आहेत. ज्या ख्रिस्तीधर्मस्वीकारामुळें रमाबाईसारख्या व्यक्ती कांहीं लोकांना द्वेष्य वाटतात त्या ख्रिस्ती धर्माबद्दल हरिभाऊ लिहितात.

'Love thy brothers' खेरीज ते कांहीं शिकवितात काय? तुम्हांस आपसांत भांडा म्हणून सांगतात काय?....Religion of Amity जितका ख्रिस्ती लोकांत आहे तितका आमच्या लोकांत नाहीं. कारण एका ग्रंथांत, नव्हे एकाच ग्रंथाच्या एका भागांत Religion of Amity तर पुढच्याच भागांत Religion of enmity! ख्रिस्ती धर्माचे Dogmas आहेत ते सोडून द्या; पण त्यांचें मुख्य महत्तत्व, ख्रिस्ताचें उपदेशसार Love thy brothers हें आहे. त्याला कोठेंहि विसंगतता नाहीं. माझे मित्र व शिक्षक फादर रिव्हिंगटन. ते व मी एक वेळ बोलतां बोलतां ते म्हणाले 'आम्ही तुम्हां हिंदु लोकांपुढें दोन गोष्टी ठेवतों. Bible and Bottle तुम्ही पहिली घेत नाहीं. पण दुसरी मात्र ताबडतोब उचलतां.' तत्काळ मीं त्यांना उत्तर दिलें कीं 'तुम्ही म्हणतां ती गोष्ट खरी आहे.'[२]

गोखले, टिळक इत्यादिकांनीं आपापल्या संस्था निर्माण करतांना जेसुईट पंथी ख्रिस्ती मिशनरींचा आदर्श पुढें ठेवला होता हें त्यांच्या त्यांच्या चरित्रांतून नमूद करून ठेवण्यांत आलेलें आढळतें.[3]

---

१. केसरी : अग्रलेख ६ ऑगस्ट १८८९.

२. हरिभाऊंचीं पत्रें: पृष्ठ ९२.

३. ताम्हनकरकृत टिळक चरित्र. पृष्ठ ३७. व हॉयलंडकृत गोखले चरित्र. पृष्ठ १०३ (दोन्ही इंग्रजी)

बाईंच्या आहाराविषयीं विचार केला तर आजच्या पिढीला आश्चर्याचा धक्काच बसेल. इंग्लंड अमेरिकेसारख्या थंड देशांत त्यांनीं मांसाशनच काय, पण अंडींहि खाल्लीं नाहींत. साऱ्या जन्मांत त्यांनीं कांदालसुणाला स्पर्श केला नाहीं. आपल्या हाताखालीं काम करणाऱ्या पंधरावीस गौरकाय सहकाऱ्यांना सुद्धां त्यांनीं हाच आहार घेण्यास शिकविलें[1]. इतक्या थंड प्रदेशांत बाईंना हा आहार सोसतो तरी कसा ह्याचें आश्चर्य इंग्रजांना व अमेरिकनांना वाटल्याचें नमूद आहे. बाईंनीं जन्मभर कांदा लसूणहि खाल्ला नाहीं हें ठाऊक असलेले लोक खाण्यापिण्यांत सैलपणा मिळावा म्हणून त्या ख्रिस्ती झाल्या, असली आचरट कल्पना करणार नाहींत असें वाटतें. बाईंच्या इतकें व्रतस्थ राहण्याचें, महात्मा गांधींच्या खेरीज अलीकडे क्वचित्च कोणा हिंदी पुढाऱ्यास साधलें असेल.

बाईंनीं धर्मांतर केलें म्हणजे काय केलें तें मागच्या प्रकरणांत सांगितलें आहे. बाई हिंदु धर्म म्हणजे काय समजत होत्या हेंहि आपण पाहिलें आहे. इतर विद्वान, हिंदु धर्म कशाला म्हणतात हेंहि आपणास ठाऊक आहे. बाईंच्या नवधर्मस्वीकारानें त्यांच्यांत काय 'वाईट' प्रकार शिरले त्याचाहि आपण विचार केला, त्यांनीं भारतीयांचें कोणतें 'अहित' केलें ह्याचाहि आपण विचार केला. ह्या सर्व विचारांवरून बाई हिंदु धर्मीयांना कशा मुकल्या ह्याचा विचार करणें आतां सोपें पडेल.

ह्या बाबतींत रमाबाईंनीं 'वागून' दाखविलें तसें फारसें ह्या विषयावर लिहिलें नाहीं. तरी आपल्या 'युनायटेड स्टेट्सची लोकस्थिति व प्रवासवृत्त' ह्या पुस्तकांत त्यांनीं ह्यासंबंधीं आपले विचार प्रगट केले आहेत. बाई म्हणतात :

'युनायटेड स्टेट्समध्यें सर्व लोक ख्रिस्ती असून त्यांत रोमन क्याथोलिक व प्राटेस्टंट अशीं दोन मुख्य मतें आहेत आणि शिवाय त्यांत पोटभेद अनेक आहेत. त्यांच्यांत मतभेद असले तरी धर्मभेद नाहींत. ते मतभेद देशहिताच्या कोणत्याहि कामीं आड येत नाहींत. एका कुटुंबामध्यें नवराबायको, किंवा मुलें आणि त्यांचे आईबाप हे निरनिराळ्या मतांचे असलेले आढळून येतात; तरी त्यांच्यांत परस्पराविषयीं असलेल्या स्वाभाविक प्रेमांत कांहीं अंतर भासत नाहीं.

1. Women Who have Worked and Won, पृष्ठ १४२

'आमच्या देशांतील लोकांनीं ह्या गोष्टीचा अवश्य विचार करावा. आम्हां लोकांचीं मतें आणि धर्म निरनिराळे असले, तरी देशहिताच्या आणि लोकहिताच्या कामीं आम्हांस एक होतां येईल, आणि होणें अवश्य आहे. कोणत्या तरी धर्माच्या किंवा मताच्या अवलंबनानें परलोकांत आम्ही एका विशेष उत्तम ठिकाणीं आऊं, आणि आमच्या उलट मताचे व अन्यधर्मी शेजारी निराळ्याच ठिकाणीं जातील, असा आमचा समज असला, तरी निदान आम्हांला एका देशांत व एकाच पृथ्वीवर राहायचें आहे. सूर्यप्रकाश, पर्जन्य, वारा, पृथ्वी इत्यादि उत्तम ईश्वरी देणग्या आम्हांलाच तेवढ्या मिळतात आणि अन्य मताच्या लोकांस मिळत नाहींत, असें निदान ह्या लोकीं तरी आपल्या अनुभवास येत नाहीं. तर ज्या आमच्या अन्यधर्मी व अन्य मतावलंबी बंधुभगीनींवर ईश्वराची दया, आमच्यावर असते तिच्याहून कोणत्याहि अंशीं कमी नाहीं, असें आम्हांस दिसून येतें, त्यांच्याशीं आम्हीं सलगीनें व सभ्यतेनें कां वागूं नये? देशहिताच्या आणि लोकहिताचा कामांत आम्हीं सर्वांनीं एक कां होऊं नये? हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, शैव, वैष्णव, गाणपत्य, शिया, सुन्नी, एपिस्कोपल, प्रेसबिटेरियन, मेथॉडिस्ट, एकेश्वरवादी, त्र्यैक्येश्वरवादी आणि तेहतीसकोटिदेववादी, ह्या सर्वांनीं मतद्वेष एकीकडे गुंडाळून ठेऊन आपसांत एकी करून देशसेवा केली पाहिजे.'[१]

ज्ञानोदयाच्या १९१७ च्या पहिल्याच अंकापासून कीर्तनकलाप म्हणून एक सदर उघडण्यांत आलें होतें. त्यावेळीं रे. टिळकांनीं म्हटलें होतें : पुराण किंवा प्रवचन, भजन व कीर्तन हे हिंदिस्तानांतले धर्मसंजीवनाचे व धर्मप्रचाराचे परंपरागत, लोकमान्य मार्ग आहेत. दोन अडीचशें वर्षांपूर्वीं अनेक कारणांचें समुच्चयतः कार्य घडून या देशांत भक्तिमार्गानें विलक्षण उसळी खाऊन अनेक साधुसंत पुढें आणिले. या साधुसंतांनीं कांहीं अंशीं ल्यूथरचें व पुष्कळ अंशीं बाप्तिस्त योहान्नाचें कार्य करून तुमचा आमचा ख्रिस्ती उपदेशकांचा मार्ग सोपा केला. हें महत्कार्य करीत असतां यांनीं प्रवचन, भजन आणि कीर्तन ह्या साधनांचा जितका उपयोग केला आहे, तितका दुसऱ्या कोणत्याहि साधनाचा केला असल्याचं दिसत नाहीं. सांप्रतकाळीं सुद्धां कर्मकांडाबाहेरच्या हिंदुधर्माचें जीवित ह्या तीन साधनांवर पुष्कळ अवलंबून आहे. तत्त्वज्ञांच्या

१. युनाइटेड स्टेटस्‌ची लोकस्थिति व प्रवासवृत्त : पृष्ठें १९४–१९५ तळटीप

कर्कश तर्कानें नव्हे, नीतिज्ञांच्या सत्यंवद धर्मंचर असलेल्या नीरस सूत्रांनीं नव्हे, तर या कर्कश तर्कांना आणि नीरस सूत्रांना अमृततुल्य करून सोडणाऱ्या कवींनीं, व हें अमृत नीटनेटक्या रीतीनें लोकांना वाढणाऱ्या प्रवक्त्यांनीं किंवा पौराणिकांनीं, भजनीबुवांनीं, कीर्तनकारांनीं हिंदु लोकांची स्वधर्मश्रद्धा जिवंत ठेवली आहे.

'आमची पक्की खात्री आहे, कीं ज्या दिवशीं महाभारताबरोबर ख्रिस्ती महामंडळाचा अत्यंत रसाळ इतिहास साऱ्या हिंदिस्तानांत सर्वत्र संचार करील, ज्या दिवशीं श्रीमद्रामायणाप्रमाणें श्रीमत्ख्रिस्तायन ह्या देशांत काव्यपात्रांमधून भक्तिरसाचे लोटचे लोट वाहवूं लागेल, ज्या दिवशीं शेकडों ख्रिस्तशिष्यांचीं चरित्रें पुराणोपपुराणांप्रमाणें सर्व देशभर होतील, ज्या दिवशीं ह्या काव्यांतला, ह्या पुराणांतला निर्मल, गोड, नवजीवनप्रद भक्तिरस, गानवादनवक्तृत्वाच्या कीर्तनाभिध त्रिवेणीसंगमांतून महापुरासारखा वाहूं लागेल, ज्या दिवशीं अनेक ख्रिस्ती भक्तांनीं स्वतःच ईश्वरचरणीं तादात्म्य झालेले असतां गाइलेलीं साधीं, परंतु मनाला आकर्षून घेणारीं भजनें, वासंतिक वायूनें जशा वृक्षलता डोलवाव्या, त्याप्रमाणें जनतेस डोलवूं लागतील त्या दिवशीं हिंदिस्तानांत ख्रिस्ती धर्माचा पाहुणेपणा जाऊन तो येथलाच होईल.

'ही गरज ख्रिस्तीतर लोकांची मात्र आहे असें नाहीं. आम्ही ख्रिस्ती लोक सुद्धां हिंदभूचींच लेकरें आहों. ध्यानरति, गानवादनलुब्धता, भावलीनता ही जशी इतर लोकांची तशी आमचीहि निसर्गदत्त संपत्ति आहे.

याच संपत्तीच्या जोरावर आम्हांमधला भक्तिभाव वाढणार आहे.'

पुष्कळ अंशीं रमाबाईंची विचारप्रणालीं अशीच असल्याचे दिसून येईल.

पंडिता रमाबाईंच्या बाबतींत असेंच म्हणावें लागेल कीं त्यांनीं भारताचें नियमशास्त्र किंवा संदिष्टशास्त्र रद्द करण्याचा विडा उचलला नसून तीं पूर्ण करण्यास त्या झटत राहिल्या.[१] त्या मूर्तिपूजक नसल्या तरी मूर्तिभंजक नव्हत्या.

---

१. 'नियमशास्त्र' व 'संदिष्टशास्त्र' हीं यहुदी लोकांचीं धर्मनियमांचीं पुस्तकें होतीं. येशू ख्रिस्तावर त्याचे वैरी असा आक्षेप घेत कीं हा आमचें 'नियमशास्त्र' व आमचें 'संदिष्टशास्त्र' रद्द करायला आला आहे. त्यामुळें येशूच्या सांगण्यांत नेहमीं येई कीं आपण हीं जुनीं धर्मशास्त्रें रद्द करण्यास आलों नसून तीं पूर्ण करण्यास आलों आहों. रमाबाईंच्या बाबतींतहि तसेंच कांहींसें म्हणतां येतें.

म्हणूनच १८८९ सालीं मुंबईंत भरलेल्या तिसऱ्या सोशल कॉन्फरन्समध्यें[1] त्यांना विशेष आमंत्रण मिळून त्यांनीं तेथें श्रोत्यांना हालवून सोडणारें भाषण केलें व विधवांच्या सक्तीच्या केशवपनाविरुद्ध ठराव पास करून घेण्यांत मदत केली. त्या जर हिंदु समाजाला किंवा हिंदु स्त्रियांना आंचवल्या असत्या किंवा हिंदु स्त्रिया त्यांना आंचवल्या असल्या तर त्यांना इतका उपद्व्याप करीत बसण्याचें काय प्रयोजन होतें[2] ?

१. सोशल कॉन्फरन्स ही हिंदूंच्याच समाजसुधारणेचा विचार करणारी संस्था होती. परधर्मांत गेलेल्यांना परत घेण्यासंबंधानेंहि तिनें ठराव केलेले आढळतील.
२. टाईम्स ऑफ इंडिया : ३० डिसेंबर १८८९.

## ११ रमाबाईंचीं धर्ममतें

रमाबाई ख्रिस्ती कां झाल्या हें कोडें हिंदु व प्रार्थना-समाजीयांपुढें तर होतेंच, पण गंमत अशी कीं त्यानें कित्येक ख्रिस्ती लोकांनाहि भंडावून सोडलें होतें. ज्ञानोदय[१] पत्रांत 'ख्रिस्तदास', 'लक्ष' 'B. P.' (बाबा पदमनजी)[२] व खुद्द ज्ञानोदयकार ह्यांनीं आपल्या लेखणीनें ख्रिस्तीतर लेखकांइतकेंच बाईंना सळो कीं पळो करून सोडलें होतें.

ख्रिस्ती लोकांना विषाद वाटत होता तो बाई ख्रिस्ती समाजाविषयीं उदास होत्या म्हणून, शारदासदनांत ख्रिस्ती धर्मशिक्षण देण्यांत येत नव्हतें म्हणून व रमाबाई 'युनिटेरियन' आहेत असा झालेला किंवा केलेला गैरसमज होता म्हणून.

बाप्तिस्मा घेण्यापूर्वीं त्याविषयीं रमाबाईंचें मन 'दृढ करण्यांत' त्यांना फादर गोरे ह्यांच्या सल्ल्याचें साह्य झालें होतें. ह्याच प्रकरणांत पुढें बाईंच्या १९ फेब्रुवारी १८८९ च्या एका पत्राचा विस्तृत सारांश दिला आहे, त्यांत त्या म्हणतात कीं, 'ब्राह्मो लोक वेद, बायबल, कुराण वगैरे धर्मग्रंथांतून स्वतःच्या उपयोगासाठीं जीं वचनें निवडून घेतात त्यांचा अर्थ ते स्वेच्छेनें लावतात; ह्या

---

१. हें प्रथम अमेरिकन मराठी मिशननें चालविलेलें व नंतर पश्चिम भारतांतील सहा निरनिराळ्या मिशनांनीं चालविलेलें साप्ताहिक होतें. आतां तें मासिक म्हणून प्रसिद्ध होतें.

२. बाबा पदमनजी ह्यांना ख्रिस्ती लोकांचे विष्णुशास्त्री चिपळूणकर म्हणतात. शब्दकोश, हिंदुधर्माचें स्वरूप, अरुणोदय, यमुनापर्यटण इत्यादि १२५ विविध ग्रंथ त्यांनीं लिहिले आहेत. बाबा पदमनजी हे B. P. किंवा कधीं कधीं बा. प. अशी सही करीत. महात्मा ज्योतिबा फुले ह्यांच्या 'ब्राह्मणांचें कसब' ह्या पुस्तकाला बाबा पदमनजी ह्यांनीं प्रस्तावना लिहिली आहे. तिच्यावर त्यांनीं B. P. अशीच सही केली आहे

विषयाची माहिती प्रथम रे. निळकंठशास्त्री गोरे यांनीं मला करून दिली. त्यांनींच ख्रिस्ती धर्मतत्त्वाच्या अध्ययनांत मला पुष्कळ मदत केली हें मी मोठ्या आनंदानें सांगतें. त्यांचीं सर्वच मतें जरी मला ग्राह्य नाहींत तरी पुष्कळ गोष्टींत त्यांच्या व माझ्या विश्वासांत साम्य आहे. त्यांच्या मदतीवांचून मला लागावी तशी ख्रिस्ती धर्माची गोडी लागली नसती.' पुढें रमाबाई अमेरिकेंत असतां फादर गोरे ह्यांना असें समजलें कीं, त्या 'संभ्रांतते'च्या आवर्तांत सांपडल्या असून नामधारी ख्रिस्तानुसारी, पण वस्तुतः अज्ञेयवादी, विवेकरहित असल्या लोकांच्या विचारांचें व वागणुकीचें दडपण त्यांच्यावर पडलें आहे. अशा स्थितींत त्यांना टेंका देणारे कोणी नसल्यानें त्यांची ख्रिस्तश्रद्धा कमकुवत झाली आहे.'[१] ही हकीकत पंडिता रमाबाईच्या मृत्यूनंतर १८–१९ वर्षांनीं प्रसिद्ध झालेल्या 'नहेम्या निळकंठशास्त्री गोरे ह्यांचें संक्षिप्त चरित्र' नांवाच्या ख्रिस्ती प्रकाशनांत दिली आहे. रमाबाई असोसिएशन स्थापन करण्याच्या कामीं पंडिताबाईंनीं जें पंथनिरपेक्ष साह्य घेतलें त्यामुळेंच हा प्रवाद उठलेला असावा. फादर गोरे ह्यांचा हा चरित्रकार पुढें म्हणतो कीं ही गोष्ट जेव्हां रे. गोरे ह्यांना समजली तेव्हां त्यांना आपल्या स्वतःच्या अशाच मानसिक चलबिचलीची आठवण झाली. आपण त्या वेळेस त्या संशयाच्या भोवऱ्यांतून कोणत्या विचारसरणीनें मुक्त झालों तें आठवून त्यानीं ते विचार पत्ररूपानें लिहून काढले व तें पत्र रमाबाईंना पाठवून दिलें. हें व पूर्वीं बाई इंग्लंडमध्यें असतां फादर गोरे ह्यांनीं बाईंना ख्रिस्तीधर्मस्वीकाराबद्दल लिहिलेलें पत्र हीं दोन्ही पुढें पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालीं. त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे ज्यास येथें पहिलें पत्र व दुसरें पत्र म्हटलें आहे तीं खरोखर पत्राप्रमाणेंच लिहिलीं होतीं परंतु ज्यांच्याकरितां तीं लिहिलीं होतीं त्यांचें नांव त्यांत लिहिलें नव्हतें. असें दिसतें कीं आधीं हीं दोन्हीं पत्रें वेगवेगळीं हस्तपत्रकाप्रमाणें छापलीं होतीं. नंतर त्यांत बरीच भर घालून व पुष्कळ नवे विषय घालून त्याचें पुस्तक बनविण्यांत आलें. पुस्तकाचें नांव 'ख्रिस्ती धर्म ईश्वरदत्त आहे' असें आहे. तें २०० पानांचें डेमी साईजचें आहे. त्या पुस्तकाची छाप चालू प्रकरणांतील बाईंच्या कांहीं लिखाणावर पडलेली आढळून येईल.

---

१. नहेम्या निळकंठशास्त्री गोरे : पृष्ठ ७२

बाईंच्या एक इंग्रजी चरित्रकार म्हणतात :

'The fact of her having become a Christian made all except the reform party among the Hindus inclined to stand aloof from her, while the announcement that her school was to teach only secular subjects did not attract the Indian Christians in Bombay.'[1]

रमाबाईंवर फादर गोऱ्यांच्या पहिल्या पत्राचा जसा परिणाम झाला तसा ह्या दुसऱ्या पत्राचा झाला नाहीं. कारण गोऱ्यांच्या ह्याच चरित्रांत पुढें म्हटलें आहे.

'ह्या कोटिक्रमानें फादर गोऱ्यांनीं स्वतःची खात्री करून घेतली होती; आणि त्याच कोटिक्रमानें रमाबाईंचेंहि शंकानिरसन होईल असें त्यांस वाटलें. पण ही त्यांची आशा पूर्ण झाली नाहीं. धर्मविचारांत रमाबाई जास्तच वहावत जाऊन स्वदेशीं परत आल्या.'

म्हणजे थोड्याशा सुधारकांखेरीज एकीकडे सर्व हिंदू बाईंना दुरावले तर बाईंच्या शाळेंत धर्मशिक्षण नसल्यानें हिंदुस्थांतील खिस्ती लोक त्यांच्याकडे आकर्षिले गेले नाहींत.

मुंबईचे खिस्ती लोक रमाबाईंच्या बाबतींत 'थंडगार' होते हा समज पुढें पुष्कळ दिवस कांहीं कांहीं ठिकाणीं कायम होता. हें बाईंच्या मृत्यूनंतर भरलेल्या स्मारक–सभेचा अहवाल सुबोधपत्रिकेंत आला होता, त्यावरून दृग्गोचर होतें. कारण सुबोध–पत्रिकाकारांनीं त्या सभेला कोण कोण खिस्ती पुढारी अनुपस्थित होते व कोणीं कोणीं हजर राहून सभेंत भाग घेतला नाहीं त्यांची जंत्री दिली होती.

बाईंचा ब्रह्मोसमाजाशीं व प्रार्थना समाजाशीं फार जिव्हाळ्याचा संबंध होता. बाई खिस्ती झाल्या त्यापेक्षां ब्रह्मो किंवा प्रार्थना समाजांत समाविष्ट झाल्या असत्या तर अधिक बरें झालें असतें, त्या हिंदुधर्मत्याग करूनहि हिंदु राहिल्या असत्या असें कित्येकांना वाटे. व त्या विचारसरणीच्या लोकांच्या समाधानासाठीं बाईंनीं एक दीर्घ पत्र लिहून 'मीं खिस्तीधर्म कां

१. Pandita Ramabai : Helen S. Dyre. : पृष्ठ ९

घेतला' ह्या मथळ्याखालीं तें सुबोधपत्रिकेंत प्रसिद्ध केलें. सुबोधपत्रिकेवरून पुढें तें ज्ञानोदयानें घेतलें.

बाईंनीं पत्राला सुरुवात केली आहे ती आपण ब्राह्मोसमाजासारख्या Eclectic पंथाचा (म्हणजे सर्वच पंथांतून आपल्याला जें उत्कृष्ट वाटेल तें घेणाऱ्या पंथाचा; सारसंग्राहक पंथाचा) स्वीकार कां केला नाहीं हें सांगून 'हिंदूंच्या वेदशास्त्रपुराणांतून ब्रह्माच्या स्वरूपगुणांचें वर्णन व उत्तम नीति ज्यांत आहे अशीं वाक्यें काय थोडीं आहेत? त्यावरूनच एक उत्कृष्ट मत कां करून घेऊं नये?'

अशा प्रश्नाला उत्तर देतांना त्या म्हणतात: 'आपल्या पूर्वजांच्या धर्मग्रंथांतून चांगलीं नीतिपर व परमेश्वरस्वरूपप्रतिपादक वाक्यें पुष्कळ आहेत हें मला कबूल आहे. त्यांपैकीं कांहीं मला ग्राह्य आहेत.' पण परमेश्वर 'जसा इहलौकिक जीवनास आवश्यक पाहिजेत ते ते पदार्थ समयीं पाठवून देतो त्यास म्हणजे आपल्या पारलौकिक जीवनाची काळजी नसेल असें नाहीं. ज्या ज्या ठिकाणीं आणि काळीं जें सत्य व आत्मिक गोष्टींचें ज्ञान आम्हांस मिळालें पाहिजे तें परमेश्वर कोणाच्या तरी द्वारें आपल्याला देतो. आतां निरनिराळीं सत्यें निरनिराळ्या समयीं आपल्या लोकांस प्रगट होतात ह्याचें कारण एवढेंच कीं सगळींच सत्यें एका काळीं समजून घेण्यापुरती शक्ति मनुष्यजातीला एकदम प्राप्त होत नाहीं. तान्ह्या बाळाला जोंधळ्याची भाकरी वगैरे गुरु अन्न खाऊन पचविण्याची शक्ति नसते म्हणून त्याला कांहीं वेळ जननीचें दूध अन्नाच्या ठिकाणीं प्राणधारक होत असतें. तसेंच मनुष्यजातीच्या बाल्यावस्थेंत सृष्ट पदार्थांची पूजा इत्यादि उपायच तिला सत्य धर्माच्या जागीं होते. पुढें जसजशी तिला प्रौढ दशा येऊं लागली तसतशीं अधिकाधिक प्रौढ व गहन सत्यें आकलन करून घेण्याची शक्ति तिच्या अंगीं आली हें पाहून तीं सत्यें परमेश्वरानें आपल्याकडे पाठविलीं.

हिंदु धर्मग्रंथांतून विखरून पडलेलीं सत्यें जेव्हां आपल्यास प्राप्त झालीं तेव्हां त्याहून अधिक उच्च व गहन सत्यांचें आकलन करण्याची शक्ति आपल्यांत नव्हती असें सांगून बाई म्हणतात: 'पण सर्वदाच असें अशक्त रहावें अशी परमेश्वराची मर्जी नाहीं. त्यानें योग्य काळीं सर्वांहून श्रेष्ठ, गहन

आणि या जगांतील सर्व सत्यांचें एक भांडार असें मत ख्रिस्ताकडून जगास दिलें. तेव्हां ख्रिस्त जें म्हणाला आहे कीं, 'I came not to destroy but to fulfil the Law,' हें सर्वस्वी खरें आहे.

'आज आपल्यास बायबल म्हणून जो ग्रंथसमूह उपलब्ध आहे तो साद्यंत म्हणजे, त्यांतील प्रत्येक पद आणि अक्षर अगदीं ईश्वरी सत्या-सारख शुद्ध व निर्दोष आहे असा माझा समज नाहीं. बायबलांत क्षेपक भाग व पाठभेद पुष्कळ आहेत. ते आजपर्यंत बऱ्याच शोधक लोकांनीं पुष्कळदां मूळ ग्रंथांतून गाळून टाकले, नंतर पुनः त्यांत घातले व पुनः वगळले. असा क्रम फार प्राचीन काळापासून चालला आहे. जर हा ग्रंथ अनादि असल्यासारखा शुद्ध असता तर असा प्रकार झाला नसता, परंतु त्यांतील मुख्य भागांत म्हणजे ख्रिस्ताचा उपदेश म्हणून जो भाग आहे त्यांत खरोखरच अनादि सत्य पूर्णत्वास पावलें आहे असें निःपक्षपाती धर्मविचारकास वाटल्यावांचून रहाणार नाहीं. परमेश्वर सृष्टींतील सर्व गोष्टी कांहीं तरी नियमित मार्गानें घडत असतात. ते नियम जसे शास्त्रीय विषयांस (म्हणजे रसायन, गणित इत्यादि सुयंत्र नियमित i. e. exact sciences) लागू आहेत, तसे ते धर्मतत्त्वासहि लागू आहेत. गणितांत (मग ते कोणत्याहि देशांत असो) जसे चार आणि चार मिळून नऊ, किंवा दहाला पांचांनीं भागिलें तर त्याचा भागाकार तीन करतां येणार नाहीं, तसेंच धर्मांतहि सत्य आणि असत्य, ज्ञान आणि भ्रांति हीं मिसळून धर्मतत्त्व करितां येणार नाहीं. खाणींतून नवीन खणून काढलेल्या सुवर्णमिश्रित मृत्तिकेंत पारा घातला म्हणजे तो जसा स्वाभा-विक आकर्षण शक्तीनें सोन्याचें आकर्षण करून घेतो पण मातीचें आकर्षण करीत नाहीं, चुंबक जसा लोहाला आपलेकडे ओढून घेतो, वाळूला घेत नाहीं,

---

१. हें वचन बायबलमधील मत्तय ५:१७ येथें सांपडेल. बाईनीं ह्या ठिकाणीं खालील तळटीप दिली आहे : एथें व पुढें मीं नव्या करारांतील जीं वाक्यें उतरून घेतलीं आहेत तीं इंग्रजींत आहेत, ह्याचें कारण ह्या ग्रंथाचें मराठी भाषांतर चांगलें नाहीं. तें वाचल्यानें ग्रंथाचा आशय बरोबर समजून येत नाहीं, एवढेंच नाहीं तर कोठें कोठें वाक्याचा अर्थबोध म्हणणाराच्या आशयाच्या उलट होतो. इंग्रजी उतारे घेतले आहेत तेहि अलीकडे शोधून छापलेल्या Revised Version नांवाच्या आवृत्तीतील आहेत.

तसेंच आपले हृदयांत परमेश्वरानें जें सनातन सत्य घालून ठेवलें आहे तें बाहेरील आप्त वाक्यांत उपलब्ध असलेल्या सत्यास आपल्याकडे आकर्षून घेतें, असत्यास घेत नाहीं. ज्या आप्तवाक्यांतील गोष्टींशीं अंतर्यामीं परमात्म्याच्या उपदेशाची ओळख राहात नाहीं तें सत्य नव्हे. बायबलांत अशीं कित्येक वाक्यें आहेत कीं, ज्यांच्या आशयाशीं अंतर्यामीं ईश्वरप्रेरणेची ओळख पटत नाहीं. तर तीं वाक्यें अक्षरशः सत्य आहेत असें धरून चालण्यावरच आपल्या मुक्तीची आशा अवलंबून नाहीं. परंतु ख्रिस्ताचा उपदेश म्हणून जो भाग आपण वाचतों त्याचा प्रकार तसा नाहीं. अंतःकरण मोकळें करून ज्या दुराग्रहशून्य मनुष्यानें तो भाग वाचून पाहिला असेल त्याला त्यांतील सत्यें दोषशून्य आहेत असें वाटल्यावांचून राहिलें नसेल; कारण त्या सत्याची खूण अंतरात्म्याच्या साक्षी-वरून पटते. ख्रिस्ताच्या उपदेशांत मनुष्यजातीच्या ऐहिक पारत्रिक सुखास अवश्य अशीं सर्व सत्यें एकत्र असलेलीं मिळतात. असें जर आहे तर तीं मिळविण्याकरतां शेकडों ग्रंथांच्या तोंडाकडे का बघावें? राममोहन राय ह्यांनीं ब्रह्म समाजाची स्थापना केली, तेव्हांचें ब्राह्मत अद्वैत वेदांत हें होतें. आतांचें ब्राह्मत त्याहून फार निराळें आहे. असें सांगून ब्राह्मो लोक आपण निवडलेल्या वचनांचा अर्थ स्वतःला अनुकूल असा संदर्भाकडेहि लक्ष न देतां कसा करून घेतात ह्याचीं हवीं तितकीं उदहारणें दाखवून देण्याची आपली तयारी त्यांनीं दर्शविली आहे. त्या पुढें म्हणतात : 'आतां ह्यावरून इतक्या निरनिराळ्या ग्रंथांतून जीं कांहीं सनातन सत्यें मिळतात तीं मला ग्राह्य नाहींत किंवा ते ग्रंथ वाचूं नयेत असें माझें म्हणणं नाहीं. खरींच सत्यें आहेत त्यांच्या सत्यत्वाविषयीं माझा अंतरात्मा साक्ष देतो व तीं मला ग्राह्य आहेत. परंतु तीं कांहीं पुष्कळ ठिकाणीं विखरून पडलेलीं आहेत, कांहीं अपूर्ण आहेत व कांहीं चालत्या काळास निरु-पयोगी आहेत. तर त्या सर्वांच्या पाठीस न लागतां ज्यांत (माझ्या मतें) सर्व आवश्यकीय सत्यांचा समावेश असून जो पूर्णत्वास पावला आहे त्या ख्रिस्ताचे उपदेशाचा मीं अंगिकार केला. असें करणें हें, आपल्या जवळ होतें नव्हतें तें विकून लहान सहान किडुक मिडुक न घेतां मोठ्या मोलाचें एकच, पण आपल्या तेजानें इतर सर्व रत्नांस मागें टाकणारें असें रत्न घेतल्याप्रमाणें आहे.'

'ख्रिस्तीधर्म एवढा चांगला आहे तर तोच ज्यांचा धर्म अशा लोकांस इतरांवर जुलूम करणें वगैरे दुष्ट कृत्यांपासून निवृत्त करण्याची शक्ति त्याच्या

अंगीं कशी नाहीं ?' ह्या सुबोधपत्रिकाकारांच्या प्रश्नास उत्तर देतांना बाई म्हणतात, ती तशी शक्ति आहे. मात्र जे ख्रिस्ती म्हणवून घेणारे लोक जुलमी आणि दुर्वृत्त असे दिसतात त्यांनीं ख्रिस्ती धर्माचें ग्रहण केलें असें जें तुमचें म्हणणें दिसतें तें खरें नाहीं. आपल्या पूर्वजांच्या धर्मपुस्तकांत अमुक एका देवाच्या, तीर्थाच्या आणि पदार्थाच्या नामस्मरणानें किंवा गंगेचा वारा लागल्यानें मनुष्याचें पाप क्षय पावतें, अशी फलश्रुति आहे, तशी ती ख्रिस्ती धर्माविषयीं कोठें असलेली तुम्ही पाहिली आहे काय ? माझें नामस्मरण केल्यानें व माझ्या उपदेश वाक्याचें नुसतें श्रवण केल्यानें तुमचें पाप जाऊन तुम्हांस मोक्षप्राप्ति होईल असें कृष्णानें पुष्कळ ठिकाणीं म्हटलें आहे तसें ख्रिस्तानें कधीं म्हटलें नाहीं. त्याच्या मुख्य शिष्यांनींहि तसें सांगितलें नाहीं. ख्रिस्त म्हणतो :

'And why call ye me Lord, Lord, and do not the things which I say.'[1] 'Not every one that sayth unto me Lord, Lord shall enter into the kingdom of Heaven but he that doeth the will of my Father which is in Heaven.'[2] 'Even as I have loved you that ye also love one another, by this shall all men know ye are my disciples.'[3] 'If any man would come after me let him deny himself and take up his daily cross and follow me.'[4] 'Blessed are they that hear the word of God and keep it.'

'ख्रिस्ताचें नाम धारण केल्यानेंच दुष्कृत नाहींसें होत नाहीं. त्याच्या उपदेशाप्रमाणें वागलें पाहिजे. तरच तसें होईल, औषधाच्या अंगीं रोगशमनाची शक्ति असते खरी, पण त्याकडे नुसतें पाहिल्यानेंच त्याचा गुण येत नाहीं. ह्यांत औषधाची चूक आहे काय ? तसेंच जे स्वतःला केवळ ख्रिस्ती म्हणवितात पण ख्रिस्ताच्या उपदेशाप्रमाणें आचरण करीत नाहींत त्यांच्या दुष्कृत्यांबद्दल ख्रिस्ती धर्माला जबाबदार करावा कीं काय ? माझ्या नामस्मरणानें व माझ्या उपदेशश्रवणानें तुमचें दुष्कृत जाईल असें कृष्णानें म्हटलें आहे, तसेंच जर

१. लूक ६:४६:
२. मत्तय ७:२१:
३. योहान १३:३४,३५:.
४. मत्तय १६:२४

ख्रिस्तानें म्हटलें असतें तर मात्र ख्रिस्ती म्हणविणाऱ्या लक्षावधि दुर्वृत्त मनुष्यांच्या दुष्कर्मांबद्दल ख्रिस्ती धर्माच्या डोक्यावर दोषाचें खापर फोडण्यास चिंता नाहीं.

'अंतरात्म्याच्या साक्षीवरून व अनुभवावरून ख्रिस्ती धर्म म्हणजे ख्रिस्तानें सांगितलेला व आचरिलेला धर्म मला सर्वोत्तम व निर्दोष आहेसा दिसतो. कोणी जर त्याचें आस्थापूर्वक आचारण करील तर तो सज्जन होईल. ख्रिस्तानें उपदेशिलेला धर्म परलोकाविषयीं काळजी वाहातोच, पण इहलोकाविषयींहि त्याला औदासिन्य नाहीं. कोणत्याहि जातीच्या किंवा वर्गाच्या मनुष्यामध्यें कोणत्याहि कारणानें वितुष्ट पडून वैर उत्पन्न व्हावें असें कांहींच त्या धर्मांत सांगितलें नाहीं, म्हणून तो मैत्रधर्म आहे. त्याच्या नियमांत पूर्वापर विरोध नाहीं. शास्त्रीय व अनुभविक प्रमाणांच्या अग्नींत घालून त्याची परीक्षा केली तरी तो तावून सुलाखून काढलेल्या सोन्यासारखा अधिक उज्ज्वल दिसतो; म्हणून तो सयुक्तिक आणि शुद्ध आहे असें मला वाटतें. आतां त्या धर्माच्या मूल तत्त्वांविषयीं व त्याच्या प्रचारकांविषयीं माझा काय समज आहे तें सांगतें.

'वर मीं ख्रिस्ती म्हणजे ख्रिस्तानें उपदेशिलेला व आचरिलेला धर्म मला उत्तम दिसतो असें म्हटलें आहे याचें कारण हें कीं, नुसता ख्रिस्ती धर्म म्हटला म्हणजे त्यावरून नाना तऱ्हेच्या मतांचा असा अर्थबोध होण्याचा संभव आहे. हल्लीं जीं निरनिराळ्या प्रकारचीं शेकडों मतें 'ख्रिस्ती' म्हणवितात त्यांच्या पूर्वापर आणि परस्पर विरोधाशीं स्वतः ख्रिस्ताचे उपदेशाचा कांहीं संबंध नाहीं. ख्रिस्ताचा उपदेश वाचून जो त्याचा धर्म असा मला वाटला त्याचें स्वरूप हें :

'परमेश्वर आत्मस्वरूप आहे. त्याला भजणारांनीं अंतःकरणांत सत्य आस्थापूर्वक त्याची भक्ति करावी. वरकांती कर्मठपणा केल्यानें मोक्षप्राप्ति होत नाहीं. परमेश्वर प्रीतिस्वरूप आहे. आम्ही परस्परांवर निष्कपट प्रीति केली तरच देव आमच्या सन्निध असतो व आमच्यांत त्याची प्रीति पूर्णत्वास पावते. ह्या योगानें तो आम्हांत आहे व आम्ही त्याच्यांत आहों असें आम्ही जाणतों. कारण तसें व्हावें म्हणून त्यानें आपला आत्मा म्हणजे चिच्छक्ति आम्हांस दिली आहे. जे आपणास ख्रिस्ताचे शिष्य म्हणवितात त्यांनीं परस्परांशीं

व सर्वांशीं मैत्रीनें वागलें पाहिजे. तसें केलें तरच ते खिस्ताचे शिष्य म्हणविण्यास योग्य होतात. तुम्ही परस्परांवर प्रीति करा ही खिस्ताची शेवटली आज्ञा आहे. आपल्याप्रमाणें आपल्या शेजाऱ्यावर (म्हणजे आपल्याहून इतर व्यक्तींवर) प्रीति करावी आणि सर्वांतःकरणानें परमेश्वराची भक्ति करावी ह्या दोन गोष्टींवर सगळ्या शास्त्रांचे, उपदेशकांचे उपदेश अवलंबून आहेत असें खिस्त म्हणतो.

'परमेश्वर प्रकाशस्वरूप आहे. त्याच्यांत अंधकार मुळींच नाहीं. आम्ही परमेश्वराची भक्ति करतों म्हणून आपल्या सजातीय कोणत्याहि प्राण्यावर द्वेष करीत असून त्या प्रकाशमयाचीं लेकरें अशी थोरवी मिरवून अंधारांत चालत म्हणजे पापें करीत असूं तर आम्ही असत्य बोलतों असें ठरतें.'

'God is a spirit and they that worship Him must worship Him in spirit and in truth.'[1] 'The kingdom of God cometh not with observation.'[2] 'God is love, if we love one another God abideth in us and love is perfected in us'[3] 'Hereby we know that we abide in Him and He in us because He has given us of His spirit.'[4] 'God is light and in Him there is no darkness at all.'[5] If we say that we have fellowship with Him and walk in darkness we lie, and do not the truth. If man say I love God and hateth his brother he is a liar.'[6]

खिस्ताविषयीं स्वतःचा समज बाई पुढील प्रमाणें स्पष्ट करतात.

'Jesus Christ was born of the seed of Dvaid according to the flesh. . . was declared to be the son of God according to the spirit of holiness by the resurrection of the dead.'[7]

---

१. योहान ४:२४
२. लूक १७:२०
३. १ योहान ४:१६ उत्तरार्धः
४. १ योहान ४:१३
५. १ योहान १:५ उत्तरार्धः
६. १ योहान ४:२०.
७. रोम १ : ३–४ : ह्या सगळ्या धर्मांचे मूलतत्त्वाच्या वर्णनांत मीं दहांना वाटतील तशीं दहांचीं कपोलकल्पित वाक्यें घातलेलीं नाहींत. नव्या करारांतील खिस्ताच्या उपदेशांतून व त्याला अनुसरून असलेल्या त्याच्या शिष्यांच्या वाक्याचे उतारे घेतले आहेत.

'It was the good pleasure of the father that in him should all the fullness dwell and through him to reconcile all things unto himself.'[१] 'For in him dwelleth all fullness of Godhead bodily.'[२]

'देवाचें व खिस्ताचें ऐक्य होतें तें इतकें कीं, आपल्याला ज्यानें पाहिलें त्यानें परम पित्याला पाहिलें असें खिस्तानें म्हटलें आहे. तो म्हणतो कीं, परमेश्वर आणि मी एक आहें. मी खिस्ताला तो साधारण मनुष्य होता असें म्हणत नाहीं. ईश्वरी अंश त्याच्या अंगीं पूर्णत्वानें वसत होता. खिस्तानें आपल्या मरणापूर्वीं आपल्या शिष्यांविषयीं परमेश्वरापाशीं प्रार्थना केली आहे. तींत तो म्हणतो, हे पवित्र पित्या, तूं आपलें नांव मला दिलें आहेस त्यांत तूं त्यांना (शिष्यांना) राख आणि आम्ही (तूं आणि मी) जसे एक आहों तसे तेहि आमच्यांत एक होतील असें कर. मी त्यांच्यांत आणि तूं माझ्यांत असेच ते एक होऊन पूर्णत्वास प्राप्त व्हावेत.'

ह्यावरून खिस्तानें आपले जे शिष्य अनन्य भावानें परमेश्वराची भक्ति करतील व आपल्या उपदेशाप्रमाणें चालतील तेहि आपल्याच प्रमाणें परमेश्वराशीं ऐक्य पावतील असें सांगितलेलें दिसतें. आपण किती तत्परतेनें तल्लीन होऊन परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणें सर्व कृत्यें करीत आहों व त्याचें आपलें केवढें ऐकात्म्य आहे हें समजावून सांगण्यासाठीं खिस्तानें वारंवार म्हटलें आहे :

'I can of myself do nothing, as I hear I judge; and my judgment is righteous because I seek not mine own will but the will of Him that sent me.'[3] 'Verily verily I say unto you the son can do nothing of himself but as he seeth the Father doing.'[४] 'My teaching is not mine but His that sent me. If any man will do His will he shall know of the teaching whether it be of God or I speak from myself.'[५]

---

१. कलस्स १ : १९–२०
२. कलस्सै २ : ९
३. योहान ५:३०
४. योहान ५:१९
५. योहान ७:१६, १७

'ख्रिस्ताचा उपदेश हा परमेश्वराकडून आला आहे ह्याबद्दल माझा अंतरात्मा साक्ष देतो आणि इतर धर्मांत असलेल्या सनातन सत्याशीं त्याचा विरोध नाहीं म्हणून ख्रिस्त जें म्हणाला कीं, 'मी परमेश्वराकडून आलों आहें, मी जें बोलतों तें माझें नव्हे तर परमेश्वराचें सांगणें आहे. मजवर जो विश्वास ठेवील त्यानें मजवर नव्हे तर ज्यानें मला पाठविलें त्यावर विश्वास ठेवल्यासारखें होईल. इ. इ. हें मला खरें वाटतें. जो सर्वमान्य सनातन सत्याचा उपदेश करतो, केवळ उपदेशच नव्हे तर आचरणहि करतो तो एखाद्या लहान गोष्टीकरतां खोटं बोलेल असें म्हणवत नाहीं. * जर ईश्वरी विभूति जगांत कोठें तरी प्रगट होऊन मनुष्याला दृग्गोचर झाली असेल तर ती ख्रिस्ताच्या ठायीं झाली होती असें मला वाटतें.'

ख्रिस्ताबद्दल स्वतःला काय वाटतें हें स्पष्ट करून बाई म्हणतात :—

'ख्रिस्ताचा उपदेश ऐकून तो खरा व सर्वोत्तम आहे असा माझा समज झाल्यावरहि जर मी ख्रिस्तास माझा गुरु तारक म्हणून त्याच्या उपदेशाचें ग्रहण करणार नाहीं व त्यानें केलें असें आचरण करून दाखवणार नाहीं तर माझा उद्धार होणार नाहीं असें मला वाटतें.'

'बाप्तिस्मा कशाला पाहिजे?' ह्या प्रश्नाला बाई असें उत्तर देतात कीं, 'ब्राह्म समाजाचे सभासद होतांना मी त्या धर्मावर विश्वास ठेवतों अशी प्रतिज्ञा करून वहींत आपली सही घातली तिचा उद्देश तोच बाप्तिस्मा घेण्याचा उद्देश होय. पाण्यांत बुडी मारण्यानें किंवा तें डोक्यावर शिंपडून घेतल्यानें मोक्षप्राप्ती होत नाहीं हें खरें. जो मनुष्य ख्रिस्ताच्या उपदेशावर विश्वास ठेवील त्यानें बाप्तिस्मा न घेतला म्हणून त्याच्या मुक्तीचा मार्ग बंद होत नाहीं हेंहि खरें, तरी मत ग्रहण करून वहींत सही करणें व पाणी शिंपडून घेणें ह्या लहान लहान कृति कांहीं थोड्या महत्त्वाच्या नाहींत.'

* ज्यानें ख्रिस्तासारखा निर्दोष, प्रौढ, विचारपूर्ण सर्वांस एकाच रीतीनें लागू होणारा असा उपदेश केला व जो पहिल्यापासून शेवटपर्यंत त्याप्रमाणें स्वतः वागला अशा एका तरी उपदेशकाचें उदाहरण कोणत्या तरी ग्रंथांत पाहिलेलें तुम्हास आठवतें काय?

ह्यापुढें बाईंनीं ज्या विचारसरणीला उत्तर दिलें आहे ती ब्रह्मोसमाजापुरतीच किंवा त्या कालापुरतीच मर्यादित नाही. त्या म्हणतात: 'बाप्तिमा घेतल्यानें आपल्या समाजांतून निघून मी वेगळी झाल्यासारखी झालें, आतां माझा उपयोग समाजास व्हावा तितका होणार नाहीं. कारण बाप्तिस्मा घेतल्यानें मजविषयींची पूज्यबुद्धि लोकांत राहिली नाहीं, पण हीच मी बाप्तिस्मा न घेतां समाजांत राहिलें असतें आणि तेथेंच असून ख्रिस्ताविषयींची माझी पूज्यबुद्धि लोकांस सांगितली असती तर कांहीं वावगें नव्हतें आणि त्या स्थितींत माझा उपयोग आतांपेक्षां अधिक झाला असता. अशा भाषणांत कांहीं युक्तायुक्तता व विचारप्रौढी आहे असें मला वाटत नाहीं. तुम्हांस जी गोष्ट खरी दिसते ती मला खरी वाटते असें म्हटल्यानेंच सगळा कार्यभाग आटपत नाहीं. तर जें तुम्हांस खरेसें वाटतें तें तुम्ही आचरण करतां ह्याची कांहीं तरी खूण तुमच्या कृतींत असावी. विधवांचें दुःख शमन करावें, ज्या विधवांची तसें करण्याची इच्छा असेल त्यांचा पुनर्विवाह व्हावा; मुलांचीं व मुलींचीं लग्नें लहानपणीं करूं नयेत, मूर्तिपूजा करूं नये इत्यादि उत्तम गोष्टी तुम्हाला खऱ्या वाटतात ना? मग त्या तोंडानें बोलूनच केवळ त्यांवर तुमचा विश्वास आहे असें लोकांस कळविल्यास नाहीं का चालणार? त्या केल्याच पाहिजेत कशाला? निदान त्या तुम्ही करणार अशी एखादी खूण तरी काय म्हणून तुम्हीं लोकांपुढें ठेवावी? अशानें लोकांत तुमच्याविषयींची पूज्यबुद्धि कमी होते म्हणून त्यांस तुमचा व्हावा तसा उपयोग करून घेतां येत नाहीं हें म्हणणें फार सयुक्तिक आहे असें तुम्हांस वाटतें ना?

'साधारण समाजाच्या समजाउलट, पृथ्वी सपाट नाहीं गोल आहे असें म्हणायला, विधवांचें दुःख शमन करणें, जातिभेद अपायकारक आहे तो सोडणें, मूर्तिपूजा न करणें इत्यादि गोष्टी करायाला जसें मनुष्याला धैर्य लागतें व नाना प्रकारची हानि व लोकापवाद सोसूनहि त्या करण्यास जो सिद्ध असेल किंवा नसेल त्याच्या कृतीवरून त्याच्या सत्यनिष्ठेची परीक्षा होते, तशीच आजकाल आपल्या देशांत ख्रिस्ती धर्मावर विश्वास ठेवणारांची परीक्षा बाप्तिस्मा वगैरे घेतल्यानें होते. ह्या लहानसहान कृती कसोटीसारख्या आहेत. कुरुंद आणि कसोटी ह्यांची स्वतःची योग्यता फारशी नाहीं; परंतु सोनें जरी निखळ, आणि रत्न खरें असलें तरी त्यांस एखाददुसरे वेळीं कसोटी व शाण ह्यांचा

स्पर्श होण्याची जरुरी आहे. तसेंच तुमचें मत चांगलें असलें तरी तें कृतिरूपी कसोटीला लावलें पाहिजे.'

ह्यापुढें खिस्त मृतांतून उठला ह्याचें मर्म व Holy Spirit म्हणजे काय हें विशद करतांना बाई म्हणतात : 'खिस्त मृतांतून उठला म्हणजे विश्वरूपी होऊन अमर झाला तसाच त्याचा उपदेश ऐकल्यावर त्यावर विश्वास ठेवून त्याप्रमाणें वागणारे विश्वरूपी व अमर होतील, असें खिस्त शिष्यांचें म्हणणें आहे तें इतर धर्मांतील आत्म्याच्या अविनश्वरतेबद्दल जें कांहीं सांगितलें आहे त्याचेंच रूपांतर म्हटल्यास चालेल. खिस्ताच्या उपदेशांत Holy Spirit of God ह्या नांवाचा उल्लेख बहुत ठिकाणीं केलेला आहे; मराठींत "पवित्र आत्मा" असें त्याचें भाषांतर केलेलें आहे. त्यावरून Holy Spirit या शब्दाचा खरा अर्थबोध होत नाहीं असें मला वाटतें, म्हणून मी त्या शब्दाचें भाषांतर परमेश्वराची पवित्र चिच्छक्ति असें करतें. कार्यकारित्वाविषयीं मला पूर्ण विश्वास आहे. ह्या चिच्छक्तीच्या योगानें आम्हांस सत्यासत्याची, चांगल्यावाइटाची निवड करतां येते; सत्य जाणून त्यासारखें आचरण करण्यास धैर्य येतें; हृदयांत ह्या चिच्छक्तीचें सान्निध्य असल्यानें आम्हांस असत्कर्मापासून निवृत्त आणि सत्कर्मीं प्रवृत्त होण्याविषयीं प्रेरणा होते, ईश्वरी सत्य ओळखून घेण्यास हिचें मोठें साह्य असतें, हिच्या योगानें परमेश्वर व आम्ही त्याचीं लेकरें ह्यामध्यें व आमचा तारक खिस्त व त्याचे इतर शिष्य ह्यांमध्यें परस्परांशीं जें ऐक्य असलें पाहिजे व जो ऐक्यबोध असला पाहिजे तो होतो.'

'इंग्रजींत ज्याला 'अपोसल्स क्रीड' म्हणजे प्रेषितांचा विश्वास[१] म्हणून म्हणतात तो मला ग्राह्य आहे. मी बाप्तिस्मा घेतांना ह्यावर माझा विश्वास आहे असें म्हटलें आहें. त्यांत सांगितलेल्या ज्या गोष्टी आहेत त्यांचा बोध मला

१. म्हणजे खिस्ताच्या प्रेषितांना मान्य असलेलीं खिस्तीधर्ममतें. इ. स. १५० सालीं ह्यांना प्रथम मान्यता मिळाली असावी. मराठींत ह्यांना 'प्रेषितांचा मतांगिकार' व इंग्रजींत Apostles' Creed असें म्हणतात. Creed म्हणजे धर्मसिद्धांतसंग्रह किंवा धर्मसूत्रसंग्रह. आपल्याला हा धर्मसिद्धांत संग्रह मान्य असल्याचें आपण आपल्या बाप्तिस्म्याच्या वेळेसच जाहीर केलें असें बाईंचें म्हणणें; म्हणजे आपण आतां खिस्ती असल्याबद्दल कोणाला शंका येण्याचें कारणच राहात नाहीं असा त्यांचा अभिप्राय.

जसा होतो तसा तो मला ग्राह्य आहे. त्या सगळ्या गोष्टींचें विवरण करायला वेळ नाहीं म्हणून तें केलें नाहीं.'

त्यानंतर बाईंनीं विचारस्वातंत्र्यबद्दल केलेलें विवरणहि फार महत्त्वाचें आहे. त्या म्हणतात : 'मला ख्रिस्तोपदिष्ट धर्म व त्याच्या मूलतत्त्वांचा जो बोध झाला तो ह्या प्रकारचा आहे. इतरांचा बोध निराळ्या प्रकारचा असेल. माझ्या मतांत सुधारण्यासारखे पुष्कळ भाग असतील व त्यांत चुकाहि पुष्कळ असतील; पण सध्यांचा माझा समज असा आहे. वय आणि अनुभव वाढत जातो तसतशी मनुष्याची विचारशक्ति पूर्णतर व पक्वतर होत जाते तशी माझीहि होईल. विचारसरणी ही सर्वांची एकाच प्रकारची संभवत नाहीं. म्हणून पुष्कळ मनुष्यें एकाच धर्मांत असूनहि त्यांचीं निरनिराळीं मतें होतात. एका मतांतील पुष्कळ मनुष्यांचे विचार देखील अगदीं एकसारखे असत नाहींत. विचारस्वातंत्र्य हें प्रत्येक मनुष्यास असलेंच पाहिजे. एखाद्या विशेष मतांत शिरलें म्हणजे त्याचे निर्बंध व त्याच्या प्रवर्तकांची विचारसरणी ह्यांचा अंगिकार करावा लागतो, म्हणजे धर्म हा पाण्यासारखा जीवनप्रद आहे. तो स्वतः अंतर्यामींच्या प्रेरणेस अनुसरून आचरावयाचा सोडून आपल्याच सारख्या इतर मनुष्यांनीं घालून दिलेल्या नियमानें चालावयाचें म्हणजे लोकांच्या ओंजळीनें पाणी प्याल्यासारखें आहे. म्हणून मी ख्रिस्ती धर्मानुयायांच्या एखाद्या विशेष मतांत शिरत नाहीं. ख्रिस्ताचा सद्धर्मरूपी जीवंत पाण्याचा झरा त्याच्याच जवळून आपल्यास पाहिजे तितकें अमृतजल मिळत असतां तें निरनिराळ्या मतांच्या गहन, दुर्बोध व दूषित वाक्य किंवा मतरूपी नळांतून किंवा पन्हाळांतून आल्यावरच घेतलें पाहिजे अशी आवश्यकता मुळींच नाहीं.'

१८८९ च्या ज्ञानोदयांत ह्या पत्रावरून पुष्कळ 'कावलेलें' लिखाण आधीं व नंतर आलेलें सांपडतें. आधीं कारण हें पत्र बरेच दिवस आधीं सुबोध-पत्रिकेंत प्रसिद्ध झालें होतें.

रेव्हरेंड टिळक 'ख्रिश्चियानिटी' व 'चर्चियानिटी' असे दोन भेद सहज गमतीनें करीत असत. बाईंच्या लिखाणांतील शेवटला टोला ह्या चर्चभेदाला आहे.

## १२ अमेरिका

१७ फेब्रुवारी १८८६ रोजीं 'ब्रिटश प्रिन्सेस' नांवाच्या स्टीमरमध्यें बसून रमाबाईंनीं आपल्या कन्येसह लिवरपूल बंदर सोडलें. मित्र मंडळीच्या अपेक्षेप्रमाणें प्रवासांत त्यांना अतिशय त्रास झाला. तसें पाहिलें तर समुद्रप्रवासाला अनुकूल वेळ नसल्यानें त्या जहाजावर फारच थोडे लोक होते. पण त्यांपैकीं बहुतेक धार्मिक वृत्तीचे लोक युरप सोडून अमेरिकेंत वसाहत करण्यासाठीं निघालेले होते. जहाजाची वादळानें त्रेधा उडूं लागली तसतसे हे लोक एकत्र जमून प्रार्थना करूं लागले व 'हालेलुया हालेलुया' म्हणून जयघोष करूं लागले. 'हालेलुया' ह्या हीब्रू शब्दाचा अर्थ 'ईश्वराची स्तुति करा' असा आहे.

फेब्रुवारी महिना समुद्रप्रवासाला फारसा अनुकूल नसतो. त्यांतल्या त्यांत १८८६ सालांतलीं वादळें तर विशेषच जाणवलीं. त्यामुळें लोक समुद्रप्रवासाला घाबरत होते. त्याच महिन्यांत अमेरिकेच्या किनाऱ्याजवळ पुष्कळ तारवें फुटल्याचेंहि वृत्त इंग्लंडांत येऊन धडकलें होतें. ह्या जहाजांवर पहिल्या वर्गाचे फक्त चार पुरुष व तीन बायका इतके उतारू होते. तिसऱ्या वर्गांत मात्र बायका, पुरुष व मुलेंबाळें मिळून १९० उतारू होते. हे सर्व वर म्हटल्याप्रमाणें आपला देश सोडून अमेरिकेंत स्थाईक होण्याकरितां चालले होते.[१] युरपमधील धार्मिक छळ टाळायला व आपापल्या मताप्रमाणें धर्माचरण करायला सोपें पडावें म्हणून ह्यापूर्वींच पुष्कळ युरोपियन लोक अमेरिकेंत जाऊन स्थाईक झाले होते. त्यांचा लोंढा अद्याप ओसरला नव्हता. कांहीं काळानंतर मात्र अमेरिकन सरकार ह्या निर्यातीवर नियंत्रण घालूं लागलें. परंतु बाई लिहितातात त्या वेळपर्यंत ही चालूच होती.

---

१. युनायटेड स्टेट्सची लोकस्थिति आणि प्रवासवृत्त. पृष्ठ २.

ह्या प्रवासांत बाईंनीं अशी एक चमत्कारिक गोष्ट ऐकली कीं त्या समुद्रांत जहाज शिरल्यावर जर कोणीं परमेश्वराचें स्मरण केलें किंवा त्याची उपासना केली तर सैतान कोपतो, आणि मोठें वादळ होतें असा खलाशांचा समज आहे. त्या रात्रीं आणि पूर्वीं आणखी दोनदां ह्या लोकांनीं प्रार्थना केल्यावर भयंकर वादळ झालें व ह्या लोकांच्या प्रार्थनेचाच हा परिणाम असा समज करून घेऊन जहाजाच्या कर्णधारानें त्या लोकांशीं तंटा केला. वादळ कमालीचें भयंकर होतें. तुफानामुळें अतिशय त्रास होऊं लागला. खोलींतील हवा दूषित होऊन डोकें वर करवेना. लाटा खोल्यांच्या खिडक्यांवर जोरजोरानें आघात करीत. श्वासोच्छ्वास करणें कठीण होऊं लागलें. वरच्या मजल्यावर जाऊन आडवें व्हावें असें मनांत येऊन रमाबाई उठल्या पण त्यांना जागचें हालवेना. शेवटीं कसें तरी करून त्या एकदाच्या वरच्या मजल्यावर जाऊन एका खुर्चीवर पडल्या. त्यानंतर त्यांना बरें वाटूं लागलें. ह्या ठिकाणीं त्यांच्या मनांत जे विचार आले ते त्यांनीं लिहून ठेवले आहेत. ह्याच अनुभवानें आपण आपल्या आयुष्यांतील एक मोठा धडा शिकलों असें त्या म्हणतात.

'एका घटकेच्या पूर्वीं समुद्राची लाट खिडकीवर आदळत असतां कांहीं चमत्कारिक भीतीमुळें माझ्यानें तिकडे पहावतसुद्धां नसून पोटांत धस्स होत होतें. पण घटकेंत काय अद्‌भुत चमत्कार झाला तो पहा. आतां वरच्या मजल्यावर मी उभी राहून नाव बुडूं बुडूं होत असतां तें समुद्राचें अफाट आणि भयंकर रूप पाहूनहि मला काडीइतकें भय वाटलें नाहीं. उलट उत्साह, आनंद आणि शांति माझ्या हृदयांत उदित होऊं लागली. ह्या वेळेस ह्या स्वाभाविक घटनेपासून मी जो धडा शिकलें तो कधीं विसरणार नाहीं. मनुष्य जोंपर्यंत धैर्यानें विपत्ति आणि शत्रु ह्यांचा सामना करीत नाहीं तोंपर्यंत त्याला त्यांचा बाऊ वाटतो. भितरें माणूस जसजसें भेकडपणानें घरांत किंवा अंथरुणांत डोकें खुपसून बसण्याकडे वळतें तसतसें त्याचें भय वाढून निराशेमुळें त्याच्या दाही दिशा अंधकारमय होऊन जातात. पण गड्या एकदां "कार्यं वा साधयेयं, देहं वा पातयेयं" म्हणजे एक तर कार्य साधीन, नाहीं तर शरीर टाकीन, असा निश्चय करून तुझ्या शत्रूंचा आणि निराशादि विपत्तींचा सामना कर, म्हणजे भय हा शब्द तुझ्या स्मरणांतून नाहींसा होईल, आणि तूं जीवन्मुक्ताप्रमाणें निर्भय होऊन सारें जग जरी तुझ्या विरुद्ध असलें

तरी सत्यावर आणि सत्साहसावर अवलंबून आपलीं कार्यें साधशील. ह्या अगाध संसारसमुद्रांत आमच्या वाताहत नांवांना किती तुफानांचा सामना आपल्याला करावा लागत नाहीं? त्या वेळीं धैर्य धरून भयंकर समुद्र कल्लोळांशीं झुंजलों तर खचितच आम्हांला जयश्री मिळेल आणि मनाला शांतीहि प्राप्त होईल. परंतु पाल पसरण्याच्या किंवा गुंडाळण्याच्या उद्देशानें डोलकाठी वर चढत किंवा उतरत असतांना जर करतां मिथ्याभयरूपी भुतानें आमच्या हृदयांत संचार केला आणि आमचे हात पाय थरथरां कांपू लागले तर मात्र आमची दशा कुत्र्यालाहि नकोशी होईल.'[१]

संसारांत अनेक वादळें उद्भवतात. त्यांतील कितीतरी समुद्रमंथनांतून अनंत रत्नें वर डोकावून पुनः तळांशीं जाऊन गडप होतात. तीं दृष्टिपथांत येतांच झटपट पकडून त्यांचा संग्रह केल्यास मानवी जीवन केवढें संपन्न होईल? परंतु प्रसंगाच्या तीव्रतेनें, भीति वाटून माणसाचे डोळे मिटतात व अशा अमोल रत्नांना तो मुकतो. रमाबाईंच्या खडतर आयुष्यांत जी कमालीची तेजस्विता दिसून येते ती त्यांच्या अंगीं असलेल्या डोळसपणानें त्यांना प्राप्त करून दिलेल्या ह्या रत्नसंग्राहक शक्तीमुळें.

बाईंची बोट बर्फांत अडकून पडली, मग गाळांत रुतून बसली—असे बरेच हाल होऊन शेवटीं एकदांचें दुसरें एक तारूं बोलावून त्यांत पहिल्या वर्गांतील उतारूंना बसवून फिलाडेल्फिया येथें नेऊन पोंचविण्यांत आलें. बाकी मंडळी दुसऱ्या दिवशीं जहाज गाळांतून वर काढल्यावर बंदरांत आली.

आनंदीबाई व गोपाळराव जोशी रमाबाईंना उतरवून घेण्यासाठीं दोन दिवस बंदरावर वाट पहात बसले होते.

'अमेरिकेंत गेल्यापासून आनंदीबाईंना त्या दिवसासारखे कठीण दिवस कधींच गेले नाहींत. पंडिता रमाबाईंविषयीं आनंदीबाईंच्या मनांत पूज्यबुद्धि होती. आपली प्रकृति क्षीण झालेली, परीक्षेच्या जाचामुळें थकवा आलेला, अशी स्वतःची स्थिति असतां केवळ मनाचा मोठेपणा व अंतःकरणांतील पूज्यबुद्धि व्यक्त करून दाखवावी म्हणून समुद्रावरील तो दुष्ट वारा सहन करून आनंदीबाई दोन दिवस रमाबाईंची वाट पाहत बसल्या.'[२]

---

१. युनायटेड स्टेट्संची लोकस्थिति व प्रवासवृत्त. पृष्ठें ४,५.
७. काशीबाई कानिटकरकृत आनंदीबाई जोशी : पृष्ठ २६८

रमाबाई आपल्या आत्याबाई आहेत असें जरी आनंदीबाईंनीं अमेरिकेंतील आपल्या मित्रमंडळीस सांगितलें होतें तरी अद्यापपर्यंत त्या दोघींची कधीं गांठभेटहि झालेली नव्हती कीं कधीं कोणीं कोणाचें तोंडहि पाहिलें नव्हतें. त्यामुळें बाईंच्या प्रथम दर्शनानें आनंदीबाईंवर कोणता परिणाम केला हें पाहाणें फार महत्त्वाचें आहे. आनंदीबाई म्हणतात :

'ही स्त्री फुलासारखी अगदीं सुकुमार आहे. या कारणानें थोडीशी भित्रीहि आहे.'

रमाबाईंच्या बाबतींत उलट असें म्हणतां येईल कीं भित्रेपणाला त्यांच्या जवळ मुळींच थारा नव्हता. कदाचित् ही स्त्री अत्यंत विनयशील आहे असें आनंदीबाईंना म्हणायचें असेल. त्या पुढें म्हणतात :

'परंतु तिनें आपल्या धैर्यानें मोठमोठ्या योद्ध्यांसहि खालीं पाहण्यास लावलें आहे. तिजविषयीं आजपर्यंत माझी जी कल्पना होती, ती तिनें खरी करून दाखविली. यामुळें मला फार आनंद वाटतो. या आनंदाची मी फार दिवसापासून इच्छा करीत होतें. शेवटीं तसा योग आला.'[१]

आणखी एका पत्रांत त्या म्हणतात :

'पंडिता रमाबाई येथें खुशाल येऊन पोंचल्या. वादळ, नद्या व ओढे यांमुळें त्यांना येण्यास वेळ लागला. समुद्राच्या धक्क्यावर मीं त्यांची दोन दिवस वाट पाहिली. त्या काल (६ मार्च १८८६) सुमारें आठ वाजून दहा मिनिटें झालीं तेव्हां आल्या. त्यांची मुलगी त्यांच्या बरोबरच आहे. ती फार गोजिरवाणी आहे. ती सुस्वरूप व उमलणाऱ्या ताज्या गुलाबाच्या कळीप्रमाणें सुकुमार व मनोहर दिसते. ज्या तिच्या आईनें आजपर्यंत दुःखें भोगलीं आहेत, त्या आईला तिच्यापासून समाधान वाटत असेल....'[१]

११ मार्च १८८६ रोजीं आनंदीबाईंचा पदवीदान समारंभ होता. तो समारंभ सकाळीं १० पासून रात्रींच्या १० पर्यंत चालला होता. रमाबाई, मनोरमा व आनंदीबाई ह्या तिघींना, सर्वांच्या नजरेस त्या पडाव्या अशा

---

१. काशीबाई कानिटकरकृत आनंदीबाईचें चरित्र. पृष्ठ २६८

सोइस्कर रीतीनें बसविण्यांत आलें होतें.[१] त्या दिवशीं रमाबाई नुसत्या पाहुण्या म्हणून हजर होत्या तरी त्यांच्याकडे श्रोतृवृन्दाचें लक्ष लागलें होतें. पण दुसऱ्या दिवशीं म्हणजे १२ तारखेला रमाबाईंच्या सन्मानार्थ त्याच ठिकाणीं मोठा समारंभ थाटण्यांत आला. त्या समारंभाची सर्व तयारी व व्यवस्था खुद्द कॉलेजच्या प्रिन्सिपॉल डॉ. बॉडले ह्यांनीं जातीनें केली होती. ह्यानंतर पुढें दोनतीन आठवडे पंडिता रमाबाईंना व त्यांच्याबरोबर आनंदीबाईंना मित्र-मंडळीच्या घरीं फराळाला किंवा वनभोजनांला आणि प्रसिद्ध स्थळें पाहण्यास आमंत्रणें येत होतीं. आनंदीबाईंनीं अमेरिकेंत फार चांगली छाप बसविली होती. आनंदीबाईंच्या चरित्रकर्त्या काशीबाई कानिटकर म्हणतात, 'आनंदी-बाईंनीं तिकडे जितकी वाहवा मिळविली तितकीच किंबहुना त्याहिपेक्षां अधिक आपली नाचक्की गोपाळरावांनीं करून घेतली.'[२] हें येथें मुद्दाम सांगण्याचें कारण, गोपाळरावांनीं इकडे आल्यावर अशीहि आणखी एक थाप झोकून दिली असावी कीं आपल्याच शिफारसीमुळें व साह्यामुळें अमेरिकेंत रमाबाईंचीं व्याख्यानें झालीं.

आनंदीबाईंचा पदवीदानसमारंभ, रमाबाईंचा स्वागतसमारंभ, त्याच्या आधींचा, उसळलेल्या सागरांतील तो भयंकर प्रवास व शेवटीं अमेरिकेंत पोंचल्यावर दोनतीन आठवडे झालेला जंगी पाहुणचार, ह्यांमुळें दगदगलेली मनोरमा चांगलीच आजारी पडली. आनंदीबाई स्वतः डॉक्टर असून त्यांच्याहि तोंडचें पाणी पळालें. त्या मनोरमेच्या बिछान्याजवळ उभ्याच्या उभ्या होत्या. कित्येक दिवसांनीं मनोरमेला आराम पडला. परंतु ह्या श्रमानें, व तेवढ्या गडबडींत एका अडलेल्या बाळंतणीला सोडविण्यांत आनंदीबाईंनीं केलेल्या अविश्रांत श्रमामुळें, अभ्यासानें आधींच क्षीण झालेल्या त्यांच्या शरि-रांत वास करणाऱ्या क्षयजंतूंना जोर चढला व हिंदुस्थानांत येऊन पोंचल्यावर लवकरच आनंदीबाईंवर मृत्यूनें आपले पाश आवळले.[३]

---

१. काशीबाई कानिटकर कृत आनंदीबाईचें चरित्र. पृष्ठ २६९

२. तेंच पुस्तक. पृष्ठ २७०

३. आनंदीबाई १६ नोव्हेंबर १८८६ रोजीं भारतांत येऊन पोंचल्या, व २६ फेब्रुवारी १८८७ रोजीं निधन पावल्या.

आनंदीबाईंच्या मृत्यूमुळें रमाबाईंना अतिशय दुःख झालें. काय असेल तें असो, मृत्यूला रमाबाईंच्या नात्यांतीलच माणसें आवडत असें नाहीं तर त्यांनीं आपलीं म्हटलेलीं त्यांची मित्रमंडळीहि तो टिपून नेऊं लागला. आनंदीबाईंना नेऊन स्वर्ग-लोकीं पोहंचवून रिकामा होतांच तो डॉ. बॉडलेकडे वळला व त्यांना घेऊन गेला. ह्याच बाईंनीं रमाबाईंना अमेरिका दाखविली व अमेरिकेला बाईंची ओळख करून दिली. भारतांत पाय टाकतांच बाईंच्या कानीं ह्यांच्या मृत्यूची बातमी आली.

आनंदीबाईंवर बाईंचा किती जीव होता हें त्यांनीं आपलें High-Caste Hindu Woman हें पुस्तक आपल्या मातेला व आनंदीबाईंना मिळून अर्पण केलें आहे ह्यावरून दिसून येतें.

अमेरिकेंत आल्यावर अमेरिकेनें रमाबाईंचें व रमाबाईंनीं अमेरिकेचें चित्त इतकें वेधून घेतलें कीं केवळ कांहीं महिने अमेरिकेंत राहून आपला इंग्लंडमधील अभ्यासक्रम पुरा करण्यासाठीं परत इंग्लंडला यायचें हा त्यांचा मूळचा बेत जागच्या जागींच राहून गेला. स्वतः परत जाण्याऐवजीं त्यांनीं जहाजावरील एका 'स्टुवर्डेस'[1] बरोबर मनोरमेलाच इंग्लंडला परत पाठवून दिली. डॉ. बॉडले म्हणतात : 'रमाबाईंची इंग्लंडमधील अभ्यासाची प्रगति फार झपाट्यानें झाली होती व त्यांना हिंदुस्थान सरकारच्या शिक्षणखात्यांत मोठ्या नोकरीचें आमंत्रण येण्याचा दाट संभव दिसूं लागला.' परंतु सरकारी नोकरी किंवा रमाबाई बंगालमध्यें एकट्या पडल्या असतां त्यांना महाराष्ट्रांत आणून त्यांच्या ताब्यांत मुंबईची मुलींची शाळा देण्याचा महाराष्ट्रीय प्रागतिक पुढाऱ्यांचा प्रयत्न, हीं दोन्ही बाईंच्या प्रकृतीस न मानवणारीं अशीं कुपथ्यें होतीं. तेव्हां सरकारी हुद्द्याची मोठी नोकरी त्यांना आपल्या ध्येयापासून परावृत्त करूं शकत नव्हती. स्त्रीजातीची उन्नती हें एकच अढळ ध्येय त्यांच्या डोळ्यांपुढें होतें. भारतांतून त्या इंग्लंडमध्यें गेल्यावर तेथील स्त्रियांची परिस्थिति, त्यांचा सामाजिक दर्जा, त्यांचें शिक्षण ह्या साऱ्या गोष्टींनीं बाई आश्चर्यचकित झाल्या. परंतु अमेरिकेंतील स्त्रियांनीं केलेली प्रगति पाहून तर तेथून कांहीं तरी शिकून घेतल्यावांचून त्यांचा पायच निघेना.

१. जहाजावरील व्यवस्थापिका.

२. हाय-कास्ट हिंदु ऊमन : प्रस्तावना : पृष्ठ १९

तेथील शिक्षणपद्धतीनें त्यांचें लक्ष इतकें वेधून घेतलें कीं त्यांनीं तेथील एका ट्रेनिंग कॉलेजमध्यें आपलें नांव दाखल करून अभ्यासाला सुरुवातहि केली. बाईंनीं भारत सोडलें तेव्हां हायस्कूल-कॉलेजसारख्या उच्च स्त्रीशिक्षणाच्या कल्पना त्यांच्या डोक्यांत घोळत होत्या. परंतु अमेरिकेंत येतांच त्यांच्या नजरेस एक नवीनच तऱ्हेचा शिक्षणप्रकार पडला. आपल्याकडे त्या वेळेस तात्या पंतोजीचा छडी-घोडी-आंगठ्याचा काळ होता. त्या वेळेस जेव्हां अमेरिकन 'प्री-प्रायमरी स्कूल' पद्धत त्यांच्या दृष्टीस पडली तेव्हां त्यांचें लक्ष त्या बालशिक्षणाकडे खिळून गेलें. फिलाडेल्फिया येथील बालशिक्षणपंडिता, कुमारी ॲना हॅलोवेल ह्यांची बाईंशीं गांठ घालून देण्यांत आली. मिस् हॅलोवेल ह्यांनीं रमाबाईंना फ्रोबेलचीं तत्त्वें समजावून दिलीं व त्या तत्त्वांनुसार चाललेल्या शिक्षणपद्धतीच्या शाळा साऱ्या देशभर हिंडून त्यांना दाखविल्या. आपल्या ताब्यांत येणाऱ्या बालविधवांना ह्या शिक्षणपद्धतीनें केवढा फायदा होणार आहे हें बाईंच्या ध्यानांत येतांच त्यांनीं त्या पद्धतीवर मराठी पुस्तकें लिहिण्यास तेथल्या तेथेंच सुरुवात केली.

कोणतीहि कृति अथवा कसलाहि अभ्यास अगदीं तडीला पोंचविण्याची रमाबाईंची नेहमींचीच रीत असे. ज्या स्त्रीनें प्रथम 'फ्रोबेलची' अमेरिकेला ओळख करून दिली त्या मिस् इलिझाबेथ पीबडी अद्याप हयात आहेत असें कळतांच बाई त्यांना जाऊन भेटल्या. त्यांच्याविषयीं बाईंना स्वतःच्याच शब्दांत बोलूं देणें अधिक इष्ट आहे. बाई लिहितात :

'प्रसिद्ध मिस् इलिझाबेथ पीबडी ह्या महामान्य वृद्ध बाईस एतद्देशीय लोक 'बालशिक्षणाची आई' असें म्हणतात. ह्या सज्जन बाईनें नाना प्रकारच्या विपत्ति भोगून आणि विघ्नें व प्रतिकूल लोकमत यांशीं झुंजून बहुत वर्षे दीर्घ प्रयत्न करून ह्या देशांत फ्रोयबलच्या बालोद्यान 'किंडर गार्टन' शिक्षणपद्धतीचा प्रसार केला....तिचें वय हल्लीं ८६ वर्षां जवळजवळ असून शरीरप्रकृति अगदीं अशक्त आहे. जरी तिचें शरीर जरेनें शिथिल करून टाकलें तरी तिचें मन व बुद्धि तरुण आहेत. विद्याशिक्षणाविषयीं बोलतांना तिचें मुख प्रसन्न होतें. तिनें मला आपल्या लहानपणाचा अनुभव सांगितला........ आपल्या आईबद्दल बोलतांना वृद्ध पीबडीबाईचें तोंड आनंदानें प्रफुल्लित झालें आणि ती क्षणभर आपलें वार्धक्य विसरून बाळपणांत गेल्याप्रमाणें दिसूं

लागली....त्या प्रेमळ माउलीच्या अनुग्रहानेंच....देशाची विद्यारूपी इमारत बांधणारांपैकीं मुख्य मनुष्यांत इलिझाबेथ पीबडीची गणना होत आहे,"[१]

अमेरिकेंत आणखी एका स्त्रीनें रमाबाईंवर विलक्षण छाप बसविली. ती इतिहासप्रसिद्ध स्त्री मिस् फ्रॅन्सिस ई. विलर्ड ही होय. अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन, येथें 'कीर्तिमहाल' (Hall of Fame) नांवाचें एक स्थान आहे. अमेरिकेंतील प्रत्येक संस्थानानें ह्या ठिकाणीं आपआपल्या संस्थानांतील अत्यंत प्रख्यात व प्रभावी अशा केवळ दोनच व्यक्तींचे पुतळे ठेवण्याची परवानगी आहे. आत्तांपर्यंत तेथें उभारण्यांत आलेल्या पुतळ्यांत स्त्रीचा फक्त एकच पुतळा आहे. तो ह्या फ्रान्सिस ई. विलर्डबाईचा. बाकी सर्व पुतळे पुरुषांचे आहेत. विलर्डबाईच्या जोडीला, तिच्या संस्थानानें दुसरा जो पुतळा ठेवला आहे तो अमेरिकन राष्ट्रपिता व अमेरिकेचा पहिला अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन ह्याचा! ह्यावरून त्या स्त्रीची योग्यता केवढी असेल ह्याची कल्पना करतां येईल. पुढें ज्याला 'व्हॉल्स्टेड कायदा' म्हणून ओळखण्यांत येऊं लागलें, त्या अमेरिकेंतील दारूबंदीच्या कायद्याची भूमिका तयार करण्याचें महान् कार्य ह्या बाईनें केलें. हें काम व हा कायदा बहुतेक स्त्रियांच्याच मेहनतीचें फळ होतें. आतां अमेरिकतील दारूबंदी मागें घेण्यांत आली असली तरी मिस् विलर्डच्या वेळीं मद्यपाननिषेधाचें हें जें काम स्त्रियांनीं सुरू केलें होतें तें अद्यापहि चालू आहे. मिस् ई. विलर्ड ह्यांच्या संगतींत रमाबाईंचा बराच काळ जाऊं लागला असें दिसतें. शिकॅगोच्या 'इंटर ओशन' दैनिकातर्फे बाईंची १८८७ च्या डिसेंबर मध्यें मुलाखत घेण्यांत आली, ती विलर्डबाईच्याच घरीं. मद्यपाननिषेधाच्या चळवळींत रमाबाईंनीं चांगलाच भाग घेतला असावा असेंहि दिसतें, कारण पुढें जेव्हां बाईंच्या कार्याला आर्थिक मदत करण्याचा प्रश्न आला तेव्हां ह्याच चळवळींतल्या स्त्री पुढाऱ्यांनीं बाईंना खूप मदत केलेली दिसते. हेलन डायर आपल्या रमाबाई चरित्रांत आपली व रमाबाईंची ओळख झाल्याची माहिती सांगतांना म्हणतात:

"However, Ramabai's appearance at the meetings of the Women's Christian Temperance Union, then at the zenith

---

१. युनायटेड स्टेटसची लोकस्थिति आणि प्रवासवृत्त : पृष्ठ १७७

of its popularity under Frances Willard, gave her an introduction among the Christians, and it was at these meetings that I first met Ramabai.'[1]

रमाबाई मद्यपाननिषेधक सभांमधून दिसूं लागल्या. फ्रान्सिस विलर्ड ह्यांच्या नेतृत्वानें त्या वेळीं त्या चळवळीनें लोकप्रियतेचें शिखर गांठलें होतें. ह्या सभांमुळें अमेरिकेंतील ख्रिस्ती लोकांना प्रथम रमाबाईंची ओळख झाली. अशाच एका संमेलनासाठीं नॅशव्हिली येथें रमाबाईंना हजर राहण्याचें आग्रहाचें आमंत्रण आलें. त्यांनीं तें स्वीकारून त्या महोत्सवासाठीं त्या हजर राहिल्या. त्यासंबंधीं बाई लिहितात :

'पुष्कळ मनुष्यांनीं पुष्कळ प्रकारचे तर्क केले. ही मंडळी काय आणि कशी आहे, हें कोणास चांगलेसें माहीत नव्हतें. पुष्कळांस असें वाटलें कीं हा कांहीं लुटुपुटीचा खेळ आहे. अर्ध्या वेड्या व अर्ध्या शाहण्या अशा बायकांच्या युक्तिशून्य कल्पनेचें हें एक सोंग असेल. कित्येक देवळांचे आचार्य हें कांहीं तरी अधार्मिक कृत्य असून, ह्या बायका बायबलची आज्ञा मोडून स्त्रीजातीस न शोभणारीं अशीं कृत्यें करीत आहेत, म्हणून आपल्या देवळांत (चर्चमध्यें) त्यांना सभा भरविण्याची परवानगी देईनात. शेवटीं तेथील एका सार्वजनिक पुस्तकालयाच्या सभामंडपांत सदरील स्त्रियांची सभा भरविण्याचा निश्चय झाला. नॅशविलीच्या मद्यनिषेधक मंडळीनें भगीरथ प्रयत्न करून तेथील बायकांस ह्या महोत्सवांत मदत करण्यास रिझवून आणलें. त्या उदार मनाच्या बायांनीं दुरून आलेल्या बायकांस आपल्या घरीं उतरण्यास बोलावून, उत्तम प्रकारें त्यांचा आदरसत्कार केला.

'सकाळच्या नऊ वाजण्याच्या सुमारास स्त्रियांच्या मंडळीनें सभामंडप भरून गेला. मग अध्यक्ष फ्रॅन्सिस ई. विलर्ड ह्यांनीं सर्वांस एकाग्र होण्यास इशारत देऊन, समाजकार्यास प्रारंभ केला.

'त्या प्रसंगीं कांहीं प्रमुख स्त्रियांनीं ज्या उत्तम व चित्तवेधक प्रार्थना केल्या, जीं मधुर संगीतें गायिलीं, जे हृदयद्रावक उपदेश केले आणि फ्रॅन्सिसबाईंनीं जें अप्रतिम, सारयुक्त, चित्तवेधक, महार्थसंपन्न आणि सर्वांगसुंदर असें भाषण

१. हेलन डायर : पंडिता रमाबाई : पृष्ठ १० नवी आवृत्ति.

केलें, त्या सर्वांचें वर्णन करण्यास एक महाकवि तेथें हजर असण्याची अवश्यकता होती.

'पहिल्या दिवसाची पहिली सभा विसर्जन होण्यापूर्वीं त्या गांवांतील पुष्कळ आचार्यांचीं मतें फिरून, त्यांनीं 'आमच्या मंदिरांत येऊन सभा भरवा, भाषणें करा, आमच्यावर एवढी मेहेरबानी कराच,' म्हणून आग्रह करून, स्त्रियांच्या ह्या अपूर्व मंडळीस आमंत्रणें धाडलीं....पुढें तो आठवडाभर त्या मंडळींतील प्रमुख स्त्रियांनीं दररोज सहासात ठिकाणीं जाऊन सकाळीं, संध्याकाळीं व दुपारीं भाषणें करावीं, उपदेश करावे, तरी तेथील लोकांची तृप्ति होईना.'[1]

एकदां बाईंना कॅंटकी संस्थानांतील लूडविल या गांवीं लोकांच्या आग्रहावरून भाषण करण्याचा प्रसंग मिळाला. अमेरिकेंतील स्त्रिया पुष्कळ सुधारलेल्या परंतु कांहीं कांहीं बाबतींत किती मागासलेल्या होत्या याचें प्रत्यंतर बाईंना येथें आलें. बाई म्हणतात :

'या प्रसंगीं मी ज्या देवळांत भाषण करणार होतें त्याच्या आचार्यानें मला वेदीवर (Pulpit) बसण्याचा आग्रह केला. मी तेथें बसणार तर, मजबरोबर त्या गांवांतील कित्येक स्त्रियांनीं वेदीवर येऊन बसावें असा माझा मनोदय होता. परंतु त्या बाया म्हणाल्या :

"अहो आम्हीं जन्मांत कधीं हें कृत्य केलें नाहीं, तें आतां आमच्यानें कसें होईल ?"

मीं म्हटलें,

"बायांनो, यापूर्वीं तुम्ही कधीं वेदीवर बसलां नाहीं तर तसें करण्यास प्रारंभ करण्यास काय बाध आहे ? तुम्ही एकदां माझ्याबरोबर तेथें येऊन बसा तर खऱ्या, मग त्यापासून कांहीं अपाय झाला तर पुनः तसें करूं नका म्हणजे झालें."

तेव्हां होय नाहीं करतांकरतां चार पांच बायका माझ्याबरोबर वेदीवर बसण्यास तयार झाल्या, आणि माझें भाषण संपेपर्यंत तेथेंच बसल्या होत्या;

१. युनाइटेड स्टेट्सूची लोकस्थिति आणि प्रवासवृत्त. पृष्ठ २८८.

तरी त्यांस कांहीं अपाय झाला नाहीं हें सांगणें नको. त्या दक्षिण भागांत बायका जरी पडदंपोशी नाहींत तरी त्यांपैकीं थोडयांच्याच अंगीं असावें तसें स्वातंत्र्य आणि समाधृष्टपणा आलेला दिसून येतो.[१]

रमाबाईंनीं अमेरिकन स्त्रियांनाहि सभाधीट बनविण्यास कमी केलें नाहीं असें दिसून येतें.

तरी रमाबाईंना ह्या अमेरिकन स्त्रियांनीं एकंदरींत दिङ्मूढ बनविलें. बाई म्हणतात 'हैह्यार्जुनतुल्य महानदी प्रवाहाचा रोध करणारें बल, व तें ज्यांच्यांत आहे अशा शतमुख, सहस्रमुख रावणासारख्या अजस्र राक्षसांचा वध करणाऱ्या सीतादेवी खरोखरच माझ्या दृष्टीस पडतील, ही गोष्ट सात वर्षांपूर्वीं माझ्या ध्यानींमनींहि आली नव्हती. परंतु कालक्रमेंकरून ह्या अद्भुत गोष्टी माझ्या पाहण्यांत आल्या, आणि त्यांचा वृत्तांत थोडा तरी माझ्या देशबंधुभगिनींस सादर करण्याची ही संधि माझ्या वाट्यास आली ह्याचा मला मोठा आनंद वाटतो.'[२]

बाईंनीं वरील विचार लिहिण्यास लेखणी हातांत धरली त्याच्या केवळ ५० वर्षेंच आधीं अमेरिकन स्त्रियांची परिस्थिति अवलोकन करण्यास इंग्लंडहून एक प्रसिद्ध विदूषी–हॅरिएट मार्टिनो–अमेरिकेंत आली होती. तिनें नंतर 'अमेरिकन समाज' नांवाचें एक पुस्तक लिहिलें, त्यांत ती अमेरिकन बायकांविषयीं असें म्हणते कीं 'त्या केवळ इतर विकत घेतलेल्या दासांप्रमाणें आहेत.' ही १८४० मधील गोष्ट. बाई गेल्या तेव्हां ह्या गोष्टीला ४५–४६ वर्षेंच झालीं होतीं. एवढ्या अल्पावधींत तेथील स्त्रियांनीं आपली जी उन्नति करून घेतली तिचें वर्णन वरील प्रास्ताविक शब्दांनंतर बाईंनीं आपल्या ह्या प्रवासवृत्तांत पानांमागून पानें भरून लिहिलें आहे. त्या म्हणतात.

'आतांशा कोठें स्त्रियांनीं काढलेल्या कल्पनांस थोडें थोडें उत्तेजन मिळूं लागलें आहे. इतक्यांतच त्यांनीं एकोणीसशें पस्तीस नवीन कल्पना व शोध काढून युनायटेड स्टेट्स्च्या सरकारापासून तितक्यांबद्दल आपला हक्क नोंदवून घेतला आहे. ह्या कल्पना म्हणजे लहानसहान आहेत असें नाहीं....उदा-

१. युनाइटेड स्टेट्सची लोकस्थिति व प्रवासवृत्त. पृष्ठ २६८.
२. तेंच पुस्तक पृष्ठ २१४.

हरणार्थ, सन १८४५ त एका बाईनें अंतर्जलदूरदर्शक यंत्र शोधून काढलें. त्याचप्रमाणें एकीनें समुद्रांत प्रवास करणाऱ्या लोकांकरितां प्राणरक्षक कवचें आणि प्राणरक्षक ताफे बनविले. आणखी एकीनें बाष्पोत्पादक यंत्र निर्माण केलें. दुसऱ्या एकीनें आगगाडीच्या वाफेच्या यंत्रांत सुधारणा केली. एकीनें शहरांतून चालणाऱ्या आगगाड्यांचा नाद कमी व्हावा, म्हणून एक युक्ति काढली, दुसऱ्या एकीनें पाण्याचा पूर येऊन शेतें वाहून जाऊं नयेत म्हणून एक युक्ति काढली; आणखी एकीनें अप्रवर्तक विजेचा शेंडा (Non-inductive Electric Cable) बनविला. तारवावर धान्य चढविण्याचें यंत्र, शेत कापण्याचें यंत्र, दाणा आणि सालपट पृथक करण्याचें यंत्र इत्यादि फार उपयोगी यंत्रें स्त्रियांनीं निर्माण केलेलीं आहेत.' ज्या फिलाडेल्फिया शहरांत बाई प्रथम उतरल्या व जेथें पहिलें स्त्री वैद्यक विद्यालय स्थापन झालें तेथल्या पुरुष वैद्यांनीं—'फिलाडेल्फिया काउंटी मेडिकल असोसिएशन' नांवाच्या पुरुष वैद्यांच्या प्रख्यात सभेनें—स्त्रीवैद्यांवर बहिष्कार घालून, त्यांचें मुखावलोकन करायचें नाहीं असा ठराव केला होता. याचें कारण असें होतें कीं स्त्रियांचीं पवित्र मनें वैद्यक शिकल्यानें अपवित्र होतील आणि त्या अस्वाभाविक वर्तन करूं लागतील. स्त्रियांचा मेंदूचें वजन पुरुषांच्या मेंदूच्या वजनापेक्षां कमी असल्यानें त्यांस वैद्यकासारख्या गहन शास्त्रीय विषयामध्यें असावी तितकी प्रवीणता नसणार म्हणून त्यांच्या हातून पुष्कळ प्राण्यांचा संहार होण्याचा संभव आहे. या आमच्या बंधूंनीं वर सांगितलेल्या दुसऱ्या निमित्तानें स्त्रियांवर बहिष्कार घालण्यापूर्वीं, त्यांस आपण यमराजाचे वडील बंधु आहोंत या गोष्टीचा विसर पडला असावा असें वाटतें. या यमाच्या दादांच्या हातून जितके लोक मरतात, तितके यमाच्या हातून मेलेले कोणाच्या ऐकिवांत नाहींत.'[२]

पुढें ह्या कौंटी मेडिकल असोसिएशनचा 'मेंदू बराच निवळून त्यांनीं हा बहिष्कार काढून टाकला.' त्यांनीं एक मोठें बक्षिस जाहीर करून 'स्त्रियांना अस्पृश्यसमयीं विश्रांति असण्याची आवश्यकता' ह्या विषयावर निबंध मागविले.

---

१. युनाइटेड स्टेट्‌ची लोकस्थिति व प्रवासवृत्त, पृष्ठ २५७.

२. तेंच पुस्तकः २४७.

तरी त्यांस कांहीं अपाय झाला नाहीं हें सांगणें नको. त्या दक्षिण भागांत बायका जरी पडदपोशी नाहींत तरी त्यांपैकीं थोड्यांच्याच अंगीं असावें तसें स्वातंत्र्य आणि समाधृष्टपणा आलेला दिसून येतो.'[1]

रमाबाईंनीं अमेरिकन स्त्रियांनाहि सभाधीट बनविण्यास कमी केलें नाहीं असें दिसून येतें.

तरी रमाबाईंना ह्या अमेरिकन स्त्रियांनीं एकंदरींत दिङ्मूढ बनविलें. बाई म्हणतात 'हैह्यार्जुनतुल्य महानदी प्रवाहाचा रोध करणारें बल, व तें ज्यांच्यांत आहे अशा शतमुख, सहस्रमुख रावणासारख्या अजस्र राक्षसांचा वध करणाऱ्या सीतादेवी खरोखरच माझ्या दृष्टीस पडतील, ही गोष्ट सात वर्षांपूर्वीं माझ्या ध्यानींमनींहि आली नव्हती. परंतु कालक्रमेंकरून ह्या अद्भुत गोष्टी माझ्या पाहण्यांत आल्या, आणि त्यांचा वृत्तांत थोडा तरी माझ्या देशबंधुभगिनींस सादर करण्याची ही संधि माझ्या वाट्यास आली ह्याचा मला मोठा आनंद वाटतो.'[2]

बाईंनीं वरील विचार लिहिण्यास लेखणी हातांत धरली त्याच्या केवळ ५० वर्षेंच आधीं अमेरिकन स्त्रियांची परिस्थिति अवलोकन करण्यास इंग्लंडहून एक प्रसिद्ध विदूषी—हॅरिएट मार्टिनो—अमेरिकेंत आली होती. तिनें नंतर 'अमेरिकन समाज' नांवाचें एक पुस्तक लिहिलें, त्यांत ती अमेरिकन बायकांविषयीं असें म्हणते कीं 'त्या केवळ इतर विकत घेतलेल्या दासांप्रमाणें आहेत.' ही १८४० मधील गोष्ट. बाई गेल्या तेव्हां ह्या गोष्टीला ४५–४६ वर्षेंच झालीं होतीं. एवढ्या अल्पावधींत तेथील स्त्रियांनीं आपली जी उन्नति करून घेतली तिचें वर्णन वरील प्रास्ताविक शब्दांनंतर बाईंनीं आपल्या ह्या प्रवासवृत्तांत पानांमागून पानें भरून लिहिलें आहे. त्या म्हणतात.

'आतांशा कोठें स्त्रियांनीं काढलेल्या कल्पनांस थोडें थोडें उत्तेजन मिळूं लागलें आहे. इतक्यांतच त्यांनीं एकोणीसशें पस्तीस नवीन कल्पना व शोध काढून युनायटेड स्टेट्स्च्या सरकारापासून तितक्यांबद्दल आपला हक्क नोंदवून घेतला आहे. ह्या कल्पना म्हणजे लहानसहान आहेत असें नाहीं....उदा-

१. युनाइटेड स्टेट्सची लोकस्थिति व प्रवासवृत्त. पृष्ठ २६८.

२. तेंच पुस्तक पृष्ठ २१४.

हरणार्थ, सन १८४५ त एका बाईनें अंतर्जलदूरदर्शक यंत्र शोधून काढलें. त्याचप्रमाणें एकीनें समुद्रांत प्रवास करणाऱ्या लोकांकरितां प्राणरक्षक कवचें आणि प्राणरक्षक ताफे बनविले. आणखी एकीनें बाष्पोत्पादक यंत्र निर्माण केलें. दुसऱ्या एकीनें आगगाडीच्या वाफेच्या यंत्रांत सुधारणा केली. एकीनें शहरांतून चालणाऱ्या आगगाड्यांचा नाद कमी व्हावा, म्हणून एक युक्ति काढली, दुसऱ्या एकीनें पाण्याचा पूर येऊन शेतें वाहून जाऊं नयेत म्हणून एक युक्ति काढली; आणखी एकीनें अप्रवर्तक विजेचा शेंडा (Non-inductive Electric Cable) बनविला. तारवावर धान्य चढविण्याचें यंत्र, शेत कापण्याचें यंत्र, दाणा आणि सालपट पृथक करण्याचें यंत्र इत्यादि फार उपयोगी यंत्रें स्त्रियांनीं निर्माण केलेलीं आहेत.' ज्या फिलाडेल्फिया शहरांत बाई प्रथम उतरल्या व जेथें पहिलें स्त्री वैद्यक विद्यालय स्थापन झालें तेथल्या पुरुष वैद्यांनीं—'फिलाडेल्फिया काउंटी मेडिकल असोसिएशन' नांवाच्या पुरुष वैद्यांच्या प्रख्यात सभेनें—स्त्रीवैद्यांवर बहिष्कार घालून, त्यांचें मुखावलोकन करायचें नाहीं असा ठराव केला होता. याचें कारण असें होतें कीं स्त्रियांचीं पवित्र मनें वैद्यक शिकल्यानें अपवित्र होतील आणि त्या अस्वाभाविक वर्तन करूं लागतील. स्त्रियांचा मेंदूचें वजन पुरुषांच्या मेंदूच्या वजनापेक्षां कमी असल्यानें त्यांस वैद्यकासारख्या गहन शास्त्रीय विषयामध्यें असावी तितकी प्रवीणता नसणार म्हणून त्यांच्या हातून पुष्कळ प्राण्यांचा संहार होण्याचा संभव आहे. या आमच्या बंधूंनीं वर सांगितलेल्या दुसऱ्या निमित्तानें स्त्रियांवर बहिष्कार घालण्यापूर्वीं, त्यांस आपण यमराजाचे वडील बंधु आहोंत या गोष्टीचा विसर पडला असावा असें वाटतें. या यमाच्या दादांच्या हातून जितके लोक मरतात, तितके यमाच्या हातून मेलेले कोणाच्या ऐकिवांत नाहींत.'[२]

पुढें ह्या कौंटी मेडिकल असोसिएशनचा 'मेंदू बराच निवळून त्यांनीं हा बहिष्कार काढून टाकला.' त्यांनीं एक मोठें बक्षिस जाहीर करून 'स्त्रियांना अस्पृश्यसमयीं विश्रांति असण्याची आवश्यकता' ह्या विषयावर निबंध मागविले.

---

१. युनाइटेड स्टेट्‌ची लोकस्थिति व प्रवासवृत्त, पृष्ठ २५७.
२. तेंच पुस्तक: २४७.

साऱ्या देशांतून निबंध आले. त्यांत ज्या निबंधाला पहिलें बक्षिस मिळालें तो एका स्त्री डॉक्टरचा होता! ह्या बाईनें आपलें संपूर्ण नांव न घालतां केवळ आद्याक्षरें घातलीं असल्यानें आपण बक्षिस देत आहों ती एक स्त्री आहे हें ह्या असोसिएशनला शेवटपर्यंत कळलें नाहीं व अशा रीतीनें त्यांची परस्पर फजिती झाली. मात्र त्यानंतर त्यांनीं तो बहिष्कार काढून टाकला.

'युनायटेड स्टेट्सच्या स्त्रिया शिक्षकिणीचें काम दोन प्रकारें करीत आहेत. त्यांतील एक प्रकार शाळांतून विद्या शिकविणें व दुसरा प्रकार वर्तमानपत्रांच्या द्वारां लोकसमाजाला नीतिशिक्षण देऊन, त्यांची बुद्धि सुधारणें, हा होय. सुमारें पंचवीस वर्षांपासून स्त्रियांनीं वर्तमानपत्रकाराचा धंदा पत्करिला आहे. त्याच्या-पूर्वीं वर्तमानपत्रांत ज्याला जें वाटेल तें त्यानें लिहावें, अशी बहुतेक चाल होती. वर्तमानपत्रांतून अश्लील भाषा घालण्यास फारसा प्रतिबंध नव्हता. हें शिक्षित स्त्रियांस आवडलें नाहीं. कारण तीं पत्रें लहान मुलांच्या व मुलींच्याहि वाचण्यांत येत असत, यावरून त्यांनीं हळूहळू वर्तमानपत्रांतील एक एक भाग आपल्याकडे घेण्याचें आरंभलें....सहासात वर्षांपूर्वीं पांचसहा बायकांनीं अडीच हजार डॉलरचें भांडवल घेऊन 'युनियन सिग्नल' नांवाचें साप्ताहिक काढलें. त्या वेळेस मद्यपाननिषेध हा विषय लोकांचा आवडता नव्हता. हें पत्र ह्या विषयास वाहिलेलें असून हें वर्तनानपत्र चालविणाऱ्या बायकांच्या मंड-ळीनें मद्यनिषेधक मताच्या प्रसारार्थ आणखी चारपांच वर्तमानपत्रें काढलीं आहेत. 'सन १८८८ त या मंडळानें पांच कोटी वीस लक्ष पृष्ठांइतका छापील मजकूर प्रसिद्ध करून.... मद्यनिषेधाच्या कामीं फार साहाय्य केलें.'[१]

अमेरिकन संस्था, अमेरिकन स्त्रिया, तेथील चर्च, शिक्षण इत्यादींचा अगदीं बारकाईनें व सर्व बाजूंनीं रमाबाईंनीं अभ्यास केला. त्यासाठीं त्यांनीं ३०,००० मैलांचा प्रवास केला. अनेक भाषणें केलीं. त्यांच्यासाठीं तेथें अनेक सभा भरविण्यांत आल्या. बाईनीं ह्या लोकांवर आपली छाप जितकी बसविली तितकी त्या वेळपर्यंत कोणताहि परकी माणूस बसवूं शकला नव्हता. मात्र विशेष हें कीं हें सारें करतांना त्यानीं आपलें भारतीयत्व यत्किंचितहि बदललें नाहीं. आपल्या पोषाखांत, वागण्यांत व विशेषतः आपल्या आहारांत

१. युनाइटेड स्टेट्सची लोकस्थिति व प्रवासवृत्तः पृष्ठ २४५.

पाश्चात्य राहणीचा किंवा थंड हवेचा कांहीं परिणाम होत आहे असें त्यांनीं मुळींच भासूं दिलें नाहीं. असें करतांना एखादे वेळेला मोठीच अनवस्था होई.

फिलाडेल्फिया येथें ज्या बाईच्या घरीं रमाबाईंचें बिऱ्हाड होतें तेथें एकदां त्यांना मोठा विलक्षण अनुभव आला. त्यांना तिसऱ्या मजल्यावर खोली देण्यांत आली होती. बाई म्हणतात तेथें आपण कांहीं केलें तरी कोणी अडथळा करीत नसे. पण जेवणाखाण्याच्या वेळेला चारचौघांत खालच्या मजल्यावर जावें लागे तेव्हां फार जपून वागावें लागे. एक दिवस जून महिन्यांत दुपारची ऊष्णता फार भासूं लागली म्हणून बाई पेलाभर थंड पाणी पिण्यासाठीं खालच्या मजल्यावर स्वैंपाकघरांत आल्या. त्या अनवाणीच आल्या. दोन प्रहरीं घरांत चहूंकडे सामसूम असल्यानें त्यांनीं पोषाखाच्या टापटिपीकडे लक्ष दिलें नाहीं. पाणी पिऊन आतां वर जाणार इतक्यांत वृद्ध डॉक्टर ब. हे दत्त म्हणून पुढें उभे! बाईंचे अनवाणी पाय पाहून म्हातारा अगदीं खजिल झाला व बाईंनाहि चोरट्यासारखें झालें. त्या तशाच धावत वर आपल्या खोलींत जाऊन बसल्या. बाई ह्या घटनेसंबंधीं म्हणतात : 'त्याचें तोंड अगदीं उतरून जाऊन एखाद्या भयभीत झालेल्या किंवा कांहीं निर्लज्जपणाचें आचरण पाहून सखेदाश्चर्यानें थक्क झालेल्या मनुष्याप्रमाणें त्याची मुखचर्या झालेली दिसून आली. म्हणून मी त्याच्या तोंडाकडे फार वेळ न पाहतां आपल्या खोलीकडे गेलें.' ह्यानंतर एकदोन घंटे बाई आपल्या खोलींत चुपचाप वाचीत बसल्या होत्या. ही गोष्ट त्यांच्या ध्यानांतूनहि नंतर निसटली. पण इतक्यांत कोणी तरी हळूच दार ठोठावलें. 'अहो आंत या' असें बाईंनीं म्हटल्यावर डॉक्टर ब. चा नातू एक चिठ्ठी घेऊन आंत आला. तिच्यांत असा मजकूर होता :

'तुमच्या देशांत सर्वांनीं मोजे किंवा जोडे घातल्यावांचून इकडेतिकडे अनवाणी येण्याजाण्याची चाल आहे हें मला माहीत आहे. तरी आमच्या देशांत तसें करणें मर्यादशीलपणाचें मानलें जात नाहीं. तुम्हांला अनवाणी चालतांना पाहून माझ्या कुटुंबांतील माणसांस सखेदाश्चर्य वाटतें. तुम्ही खालीं येतांना पायांत मोजे आणि जोडे चढवून येण्याची मेहरबानी करावी.

तुमची मैत्रीण
मिसेस बी....

क्लेमेंटेना बटलर, म्हणून रमाबाईंच्या एक चरित्र-लेखिका होत्या पुढें दहा वर्षांनीं 'रमाबाई असोसिएशन'च्या ऐवजीं 'अमेरिकन रमाबाई असोसिएशन' स्थापन झालें त्याच्या ह्या चिटणीस झाल्या. त्यांनीं रमाबाईंचें अमेरिकेंतील चरित्र फार बारकाईनें अभ्यासिलें होतें व प्रत्यक्ष पाहिलें होतें. आपल्या 'पंडिता रमाबाई सरस्वति' ह्या पुस्तकांत त्या म्हणतात :

'बोस्टनमधील श्रोत्यांना शुभ्र वस्त्र परिधान केलेल्या, मानेपर्यंत केस कापलेल्या ह्या ठेंगण्या स्त्रीचा व तिच्या जळजळीत भाषणांचा कधीं विसर पडणार नाहीं. तिचे ते आखूड केस, तिच्या वैधव्याचे निदर्शक होते. बाळपणींच विवाहरज्जूंनीं गळफास दिलेल्या बालविधवांच्या करुण कहाण्या ती सांगत होती."[1]

आणि ह्या करुण कहाण्या सांगत बाईंनीं सारा देश हलविला. त्यासाठीं त्यांनीं अमेरिकेंत ३०,००० मैलांचा प्रवास केला. पण तो सुखाचा नव्हता. त्यांना त्यांत अत्यंत हालअपेष्टा सोसाव्या लागल्या. त्या फार कडकडीत शाकाहारी होत्या. अंडीं तर राहोत पण त्यांच्या जेवणांत कांद्यालसणालासुद्धां मज्जाव होता हें मागें सांगितलेंच आहे. बटलर बाई ह्यासंबंधानें लिहितात :

'मेन पासून कॅलिफोर्नियापर्यंत आपल्या कामाची माहिती सांगत व कामासाठीं मंडळें स्थापीत फिरत असतां पंडितेला फार हाल सोसावे लागले असतील. एकसारखी हवापालट व एकसारखा थकवा ह्यामुळें होणाऱ्या दुष्परिणामांना तोंड देण्यास फार निकोप प्रकृति असायला हवी. ज्यांना हिंदुस्थानची प्रत्यक्ष माहिती आहे त्यांच्या चटकन ध्यानांत येण्यासारखी एक बारीकशी गोष्ट अमेरिकेच्या ध्यानांत येणार नाहीं. पंडितेच्या कडकडीत शाकाहारामुळें त्यांना केवढे हाल सोसावे लागले असतील ह्याबद्दल बाईंच्या विनयशीलतेमुळें कोणाला कल्पना करतां आली नसेल. कारण त्यांनीं त्याबद्दल कोठें अवाक्षरहि काढलें नाहीं. नंतर आमच्या ध्यानांत आलें कीं पंचपक्वान्नांनीं भरलेल्या पंक्तींत त्यांना नुसते बटाटे खाऊन पुष्कळदां उठावें लागत असे. त्या शाकाहारी असून तो त्या अत्यंत कडकडीतपणें पाळतात हें जेव्हां लोकांना कळलें, तेव्हां त्यांची बरदास्त नीट राखण्याचा प्रयत्न होऊं

---

१. पंडिता रमाबाई सरस्वतिः बटलर : पृष्ठ २१

लागला; पण त्यांत फारसें यश येत नसे. अनेक वेळेला मोठ्या मजेदार चुका व्हायच्या. एकदां त्यांच्या सन्मानार्थ न्यूयॉर्कमध्यें एका घरधनिणीनें मोठी जेवणावळ करून मोठमोठे पाहुणे आमंत्रिले.’

परंतु यजमानीणबाईंना पंडिताबाईंच्या शाकाहारासंबंधीं कोणीच कांहीं सांगितलें नव्हतें. त्यामुळें पुढें येईल त्या पदार्थांत मांसांश असल्यानें बाईंना कांहींच खातां येईना! रमाबाईंनीं फक्त पाव व लोण्यावर भागविलें. घरधनिणीला काय करावें समजेना. पण त्यांनीं व रमाबाईंनीं हसून तें संकट वारलें. इतक्यांत शेवटचा गोड पदार्थ आला’ (ह्या पदार्थाला ‘डेझर्ट’ म्हणतात व जेवणाच्या शेवटीं मुखशुद्धी म्हणून तो खातात.) आतां यजमानीणबाई खूष झाल्या. त्या म्हणाल्या, ‘आतां आपल्या पाहुण्याबाईंना आवडेल असा पदार्थ आला!’ पण खरीं गंमत बाईंनाच ठाऊक होती.

‘ह्यानंतर पुष्कळ दिवसांनीं हिंदुस्थानांत परत आल्यावर एकदां रमाबाई अमेरिकेंतील कांहीं गमती आपल्या हिंदी श्रोत्यांना सांगत होत्या! त्या श्रोत्यांत एक अमेरिकन स्त्री बसली होती पण तें रमाबाईंच्या लक्षांत आलें नाहीं. आपण अमेरिकेंत पक्वान्नांनीं भरलेल्या पंक्तींत कसे उपास काढीत होतों ह्याचें वर्णन सांगतां सांगतां बाईंना वर उल्लेखलेली गोष्ट आठवली, त्या वर्णन करूं लागल्या. आमची यजमानीण मोठ्या आनंदानें तो खाऊ खाण्याचा मला आग्रह करूं लागली. अगदीं खमंग अशी केक, तिच्यावर गुलाबी स्टॉबेरींचा थर, सुंदर वास येत असलेला तो पदार्थ! काय वर्णन करायचें त्याचें! ऐका मुलींनो, त्या सुंदर पदार्थावर त्यांनीं कशाचा थर दिला होता! त्यावर डुकराच्या चरबींत तळलेली मिठाई हलक्या हातानें पसरून दिली होती! हें ऐकतांच खूप जोरानें हशा पिकला. पण बिचाऱ्या अमेरिकन बाईला मात्र हा विनोद कळला नाहीं.

बटलरबाईंच्या घरीं रमाबाई एकदां गेल्या असतांनाचा एक प्रसंग त्या सांगतात:

‘रमाबाई खुद्द माझ्या घरीं पाहुण्या म्हणून आल्या तेव्हां मीं स्वतः त्यांच्यासाठीं करतां येईल इतकी छान आमटी तयार केली. मसाला अगदीं हिंदुस्थानांतून डबा भरून आणला होता. मला खात्री वाटत होती कीं ज्या देशाला मी

आपलाच समजत होतें त्या माझ्या देशांतच मी 'करी' करायला शिकलेली! तेव्हां रमाबाईंना माझी 'करी' खात्रीनें आवडणार. पण त्यांना ती फारशी आवडली नसल्याचें माझ्या चटकन ध्यानांत आलें. मी आग्रह करूं लागलें तेव्हां रमाबाईनीं मला अगदीं प्रांजलपणें माझ्या तीन चुका दाखवून दिल्या. पहिली चूक आयता तयार केलेला डब्यांतला मसाला वापरणें. तसा तो एका प्रख्यात कंपनीनें बनविला होता पण असा आयता मसाला वापरीत नसतात! मसाला नेहमीं ताजा घेऊनच वांटायचा असतो. दुसरा दोष म्हणजे मीं त्यांत कोंबडीचें पिल्लूं पकविलें होतें, आणि तिसरें म्हणजे मीं कांदा वापरला होता! कांदा ही हलकी वनस्पती समजली गेली आहे! आम्ही दोघीहि ह्या चुकांवरून खूप हसलों आणि दुसऱ्या दिवशीं मी बाईंना माझ्या स्वैपाक खोलींत बोलावून नेलें व त्यांना आमटी करायला विनंति केली. मी अगदीं बारकाईनें पहात होतें. त्यांचा हातच तेवढा जणूं कांहीं हळुवारपणें काम करीत होता. मीं बघतच राहिलें. प्रथम त्यांनीं लोणी कढविलें आणि हिंदुस्थानांत तूप म्हणून जो पदार्थ वापरतात, तो तयार केला. त्यांत मग त्यांनीं मसाल्याचे पदार्थ घातले व शेवटीं मिरपूड टाकली. अमेरिकेंत त्यांना निदान हें एक तरी जेवण त्यांच्या मनाप्रमाणें मिळालें असेल अशी आशा आहे.'[1]

अमेरिकेंतील स्त्रीपुरुषांत रमाबाईंनीं हिंदुस्थानच्या बालविधवांबद्दल इतकी कमालीची सहानुभूति उत्पन्न केली कीं त्यांच्या कार्याला मदत करण्यासाठीं 'रमाबाई असोसिएशन' नांवाची एक संस्था काढण्यांत आली. त्यांच्या कार्यासाठीं रमाबाईंना सुरुवातीचा खर्च देऊन पुढें दहा वर्षें दरसाल त्यांना पैशाची मदत करण्यास ह्या संस्थेनें स्वतःला बांधून घेतलें.

1. Pandita Ramabai Saraswati by Clementina Butler. पृष्ठ ५५, ५६, ५७.

## १३ रमाबाई असोसिएशन व तिचें कार्य

**१३** डिसेंबर १८८७ रोजीं बोस्टनमधील प्रसिद्ध चॅनिंग हॉलमध्यें सायंकाळीं ४ वाजतां एक सार्वजनिक सभा भरली होती. सभेला अमेरिकेंतील प्रसिद्ध स्त्रीपुरुष जमले होते. सभास्थानांत इतकी गर्दी झाली होती कीं कोणास उभें राहण्यास सुद्धां जागा मिळेना. त्यांतल्या त्यांत फिलाडेलफिया येथील महिला मेडिकल कॉलेजच्या डीन प्रसिद्ध डॉ. बॉडले व पुढें अमेरिकेंत जारी झालेल्या दारुबंदी कायद्याच्या आद्य प्रवर्तक मिस् फ्रॅन्सिस ई. विलर्ड अशांसारख्या स्त्रिया होत्या.[१]

प्रथम पंडिता रमाबाईंनीं आपल्या साध्या भाषेंत व अस्खलित वाणीनें हिंदुस्थानांतील विधवांची करुण कहाणी सांगून श्रोतृसमूह हालवून सोडला. नंतर अनेक भाषणें होऊन रमाबाई असोसिएशनची मुहूर्तमेढ तेथल्या तेथें रोवण्यांत आली.

ह्या कामासाठीं पूर्वतयारी म्हणून असोसिएशनच्या भावी चालकांनीं रमाबाईंसंबंधीं व त्या अंगिकारणार असलेल्या कार्यासंबंधीं इंग्लंडांतून व हिंदुस्थानांतून शिफारसपत्रें जमा केलीं होतीं. 'प्रोव्हिजनल कमिटीनें' हीं शिफारस पत्रें व जुलैपासून इंग्लंड अमेरिकेंतील प्रमुख वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेला लेखांचा संग्रह ह्या सभेच्या आधींपासूनच तयार करून ठेवला होता. त्यांतील

---

१. हेलन डायर आपल्या रमाबाईच्या चरित्राच्या नव्या आवृत्तींत म्हणतात :
The personnel of the Committee was composed of such as would be called "liberal". Many were warm-hearted women, foremost in philanthropic labours. Frances Willard was very keen on the work, and her coadjutors were among its most ardent and liberal supporters. पृष्ठ ११.

दोनतीन उतारे खालीं दिले आहेत. त्यावरून रमाबाईंसंबंधीं व त्यांच्या नियोजित कार्यासंबंधीं लोकमत किती अनुकूल होतें तें दिसून येतें.

**प्रो. मॅक्स मुलर :** 'एका जरी बालविधवेला साह्य करण्याची संधी रमाबाईंना मिळत असली व त्यांना पंख असते तर त्यांनीं तिच्यासाठीं भारतांत झेप घेतली असती. भारताचा भावी उद्धार, भारताच्या स्त्रियांच्या उद्धारावर अवलंबून आहे. बालविधवांच्या ह्या वसतिगृहावर व शालागृहावर पुढील सुखी गृहें, सुशिक्षित बायका व स्वावलंबी माता निर्माण करण्याची कामगिरी अवलंबून राहील.'[1]

(व्हिक्टोरिया राणी विधवा व तिच्या सन्मानार्थ केलेल्या उत्सवांत भाग घेणाऱ्या मुली अज्ञ बालिका. ह्या दोन्हींचा विचार मनांत एकदमच येऊन प्रो. मॅक्स मुलरनीं पुढील उद्‌गार काढले असावे)

'गेल्या जूनमध्यें हाईड पार्कमध्यें फराळासाठीं जमलेल्या शेंकडों लहान लहान मुलींनीं 'ईश्वर राणीचें रक्षण करो' असा घोष केला. तो ऐकणारांना ही जाणीव नसेल कीं ज्यांना विधवा म्हणण्यांत येत आहे अशा, त्यांच्या एवढ्याच लहानलहान पांच लाख मुली ह्या घटकेला हिंदुस्थानांत आहेत. त्यांना बिचाऱ्यांना लग्नें करतां येत नाहींत, त्यांना महारोग्यांप्रमाणें वागविण्यांत येतें, आत्महत्या किंवा बेअब्रू त्यांच्यापुढें हात पसरून उभीं असतात, आयुष्यांत ज्याला सुख म्हणतात तें काय असतें हें ज्या बिचाऱ्यांना स्वप्नांतहि ठाऊक नाहीं, अशांचा विचार मनांत आला कीं तुमचीं अंतःकरणें विरघळतील अशी माझी खात्री आहे.'[1]

**सर विल्यम वेडरबर्न :** 'पंडिता रमाबाईंसंबंधाचें वृत्त ऐकून लेडी वेडरबर्नला व मला फार आनंद वाटतो. स्त्रीशिक्षणाचे आम्ही दोघे फार चाहाते आहों व विशेषतः हिंदु स्त्रियांच्या शिक्षणाविषयीं आम्हांला फार आस्था वाटते. पंडितेच्या नार्मल स्कूलविषयीं ऐकून आम्हांला परम संतोष होत आहे व त्या कामीं करतां येईल ती मदत करण्यास आम्ही तयार आहों. तुमचा आराखडा तयार झाल्यावर कृपया आम्हांला फिरून कळवा. तोंवर पंडिता रमाबाईंना अमेरिकेंत इतकी चांगली मित्रमंडळी प्राप्त झाली आहे म्हणून आम्ही त्यांचें अभिनंदन करतों.'

---

१. London Times 22 Aug 1887

**डॉ. रामकृष्ण भांडारकर** आपल्या कित्येक मित्रांच्या तर्फे लिहितात :

'तुम्ही अमेरिकन भगिनी हिंदुस्थानच्या स्त्रियांचीं दुःखें कमी करण्यासाठीं पुढें येत आहां म्हणून आम्हांला फार आनंद होत आहे. तुम्हांला सर्व प्रकारची मदत देण्याचें आम्ही अभिवचन देतों. पंडिता रमाबाई व त्यांच्याबरोबर येणाऱ्या शिक्षिका इकडे येऊन पोंचल्यावर त्या आपल्या कामाचा सविस्तर आराखडा तयार करतील असें वाटतें.'

डॉ. भांडारकर कोण हें अमेरिकन लोकांना माहिती असणें शक्य नसल्यानें त्यांच्या बाबत ह्या "प्रोव्हिजनल कमेटीनें", भारतांत ३६ वर्षें काम केलेल्या ऑनरेबल लिऑनेल अॅशबर्नर नांवाच्या एका ब्रिटिश अधिकाऱ्याकडून एक ओळखपत्र मिळविलें होतें. अशा तऱ्हेनें सर्व बाजूंनीं सर्व प्रकारची माहिती गोळा करून मगच ह्या मंडळानें रमाबाईंच्या कामाला हात घातला. व एकदां तो घातल्यावर ठरल्याप्रमाणें दहा वर्षांत कधींहि मागें घेतला नाहीं.

रमाबाई असोसिएशनची घटना येणेंप्रमाणें होती.

१. पंडिता रमाबाईंनीं पश्चिम हिंदुस्थानांतील पुणें शहरांत किंवा त्या शहराजवळच उच्चवर्णीय बालविधवांसाठीं शाळा काढून चालवावी म्हणून संस्था स्थापण्यांत येत असून तिचें नांव 'द रमाबाई असोसिएशन' असें ठेवण्यांत येत आहे.

२. ह्या संस्थेची शैक्षणिक पद्धती संपूर्णपणें पंथातीत (Un-secterian) राहून संस्थेच्या संस्थापक पंडिता रमाबाई ह्यांच्या नियंत्रणाखालीं ती राहील. असोसिएशनच्या बोर्ड ऑफ ट्रस्टीजला त्या जबाबदार राहतील.

३. असोसिएशनचे सभासद, दहा वर्षेंपर्यंत, दरसाल कमींत कमी, एक डॉलर वर्गणी देण्यास स्वतःला बांधून घेत आहेत. दरसाल १०० डॉलर्स, दहा वर्षेंपर्यंत देणाऱ्या सभासदाला 'शिष्यवृत्ति-दाता' म्हणण्यांत येईल.

४. असोसिएशनचे हुद्देदार खालीलप्रमाणें असतील : अध्यक्ष, (एक किंवा अधिक) उपाध्यक्ष, खजिनदार, (एक किंवा अधिक) चिटणीस, विश्वस्त मंडळ (Board of Trustees), सल्लागार मंडळ (Advisory Board) व कार्यकारी मंडळ (Executive Committee)

५. बोस्टन येथील विश्वस्त मंडळ शाळेसंबंधीं सर्व तऱ्हेच्या आर्थिक व देवघेवीसंबंधींच्या जबाबदाऱ्या हिंदुस्थानांतील जबाबदार सल्लागारमंडळाच्या सल्ल्यानें आपल्या शिरावर वाहील. त्याप्रमाणें ह्या मंडळास आपल्यांत रिकाम्या पडणाऱ्या जागा भरण्याचा व नवीन सभासद घेण्याचा अधिकार राहील.

६. कार्यकारी मंडळ सर्व तऱ्हेच्या कामकाजावर देखरेख ठेऊन कामासंबंधीं ठरलेल्या वेळीं विश्वस्त मंडळाकडे आपला अहवाल सादर करील. असोसिएशनपुढें ठेवण्यासाठीं वार्षिक अहवाल तयार करण्याची जबाबदारी ह्या मंडळावर राहील व आपल्यांत कांहीं जागा रिकाम्या झाल्यास त्या भरण्याचा व नवीन सभासद घेण्याचा अधिकार ह्या मंडळास राहील.

७. असोसिएशनची वार्षिक सभा डिसेंबरमध्यें अध्यक्ष ठरवितील त्या जागीं व त्या वेळीं भरविण्यांत येत जाईल.

८. विश्वस्त मंडळाच्या बैठका वर्षांतून दोनदां व कार्यकारी मंडळाच्या दरमहा भरत जातील. गरज पडेल तेव्हां विशेष सभा बोलविण्यांत येतील.

९. जीं वेगवेगळीं 'रमाबाई सर्कल्स' स्थापण्यांत आलेलीं आहेत त्यांना असोसिएशनच्या शाखा म्हणून काम करतां येईल. ह्या शाखेंतील जो सभासद वार्षिक एक डॉलर दहा वर्षेंपर्यंत देण्याचें वचन देईल त्याला वार्षिक सभेंत मताधिकार राहील.

१०. ह्या घटनेंत फेरफार करण्याचा अधिकार वार्षिक सभेला किंवा त्या कारणाप्रीत्यर्थ मुद्दाम बोलावण्यांत आलेल्या सभेस आहे. मात्र असा फेरफार करण्यासाठीं मताधिकार असलेल्या हजर सभासदांपैकीं दोन तृतियांश सभासदांचीं मतें पडलीं पाहिजे.

अमेरिकेंत 'द रमाबाई असोसिएशन'च्या बरोबरीनें काम करण्यासाठीं 'रमाबाई सर्कल्स' स्थापण्यांत आलीं होतीं. पहिल्याच वर्षीं अशीं १८ 'रमाबाई सर्कल्स' अस्तित्वांत आलीं. पुढें पांच वर्षांत त्यांची संख्या ७५ झाली. त्यांपैकीं दोन सर्कल्सचा सहाव्या रिपोर्टांत विशेष उल्लेख करण्यांत आला आहे.

हीं दोन्ही सर्कलें लहान मुलींचीं होतीं. एक 'ॲलिस स्पेन्स प्रेन्टिस मेमोरियल सर्कल' व दुसरें 'ओगाण्ट स्कूल' फिलाडेल्फिया. ॲलिस नांवाची

शाळेची एक मोठी आवडती विद्यार्थीण वारली. तिच्या स्मरणार्थ तेथील मुलींनीं हें सर्कल स्थापन केलें तर फिलाडेल्फियाच्या 'ओगॉण्ट स्कूल'ला रमाबाईनीं भेट दिली होती, त्या निमित्तानें तेथील मुलींनीं एक सर्कल काढलें.

सर्कलचे सभासद खालीं दिलेलें प्रतिज्ञापत्रक भरून देत.

I, the undersigned, do hereby pledge myself to pay annually, for the space of ten years, the sum hereinafter set opposite my name, to the Ramabai Circle for the elevation of Woman in India, of which Circle by virtue of the said payment, I become a member ; and the said payment shall be due on the first day of November in each year.

वरील प्रतिज्ञापत्रक सर्कलचे सभासद भरीत. अशाच प्रकारचीं प्रतिज्ञापत्रकें असोसिएशनच्या सभासदांनाहि भरावीं लागत. सर्कलांच्याहि घटना होत्या. त्या जवळजवळ असोसिएशनच्या घटनेबरहुकूम असत.

ह्यानंतर २६ जुलै १८८८ रोजीं 'द रमाबाई असोसिएशन ऑफ पॅसिफिक कोस्ट' नांवाची एक संस्था स्थापून पश्चिम अमेरिकेंतील लोकांनीं रमाबाईंच्या कार्याला हातभार लावण्यास सुरुवात केली. बाईच्या कार्याला हातभार लावण्याची जणूं काय अहमहमिका सुरू झाली. ह्या कामांत मजा अशी कीं बाईंना साह्य करण्यास पुढे सरसावलेल्या लोकांत ख्रिस्ती धर्मांतील सर्वच निरनिराळ्या मतानुयायी लोकांचा भरणा होता. वर दिलेल्या प्रतिज्ञापत्रकावरून दिसून येईल कीं ही मदत ख्रिस्ती धर्मप्रचाराच्या अटीवर आधारलेली नव्हती.

धर्मकारणातीत दातृत्व अमेरिकेंत खास अधिक आहे. लोकांचें औदार्य केवळ मिशनरी कार्यांतच दिसून येतें असें नाहीं. ह्याचें एक अलीकडील उदाहरण घ्यावयाचें झालें तर युद्धसमाप्तीनंतर १९४५ पासून १९५७ पर्यंतच्या १२ वर्षांच्या अवधींत युद्धकाळांत हानि झालेल्या लोकांच्या मदतीसाठीं खाजगी देणग्यांच्या रूपानें अमेरिकेंतील जनतेनें सरकारी मदतीशिवाय स्वयंस्फूर्तीनें ६,०००,०००,००० डॉलर्स दिले हें दाखवितां येईल. ह्यापैकीं दोन अब्ज डॉलर्स धार्मिक संस्थांमार्फत गेले असें तेथील Department of Commerce नें प्रसिद्ध केलें आहे.

पहिल्या सभेंतच सल्लागार मंडळांत तिघां हिंदी गृहस्थांचा समावेश करण्यांत आला होता. हे सगळे ख्रिस्तीतर होते. पुढें त्यांच्यापैकीं एकजण

दिवंगत झाल्यानंतर जे दोघे ह्या मंडळावर घेण्यांत आले तेहि ख्रिस्तीतरच होते. पहिल्या यादींत रावबहादूर रामकृष्ण गोपाळ भांडारकर, रावबहादूर महादेव गोविंद रानडे व राव बहादूर देशमूख अशीं नांवें होतीं. हे रावबहादूर देशमूख बहुधा लोकहितवादी गोपाळ हरि देशमूख असावे. त्यांचा मृत्यु लौकरच झाल्यानें नंतर रावबहादूर चिंतामणराव भट व रावबहादूर कृष्णाजी लक्ष्मण नूलकर हे सल्लागार झाले.

वार्षिक ५००० डॉलर्स विद्यार्थिनींच्या खर्चासाठीं व इमारत फंडासाठीं एक रकमी २५,००० डॉलर्स अशी मागणी करण्यांत आली होती. ती मागणी सभेंत मान्य होऊन तडकाफडकी पैसे जमविण्यास सुरुवातहि झाली. त्याचवेळीं असेंहि ठरलें कीं रमाबाईंनीं हिंदुस्थानांत परत जातांना आपल्याबरोबर तीन अमेरिकन शिक्षिकाहि न्याव्या. एक किंडर गार्टनसाठीं, एक सामान्य विज्ञानासाठीं व एक धंदेशिक्षणासाठीं. ख्रिस्ती धर्म–शिक्षण देण्यांत येणार नाहीं व शाळेंत संपूर्ण धर्मस्वातंत्र्य राहील हें समजून उमजून व हडसून खडसून स्पष्ट करण्यांत आलें होतें.

१३ डिसेंबर १८८७ रोजीं रमाबाई असोसिएशनची स्थापना झाली आणि त्यानंतर आठ दहा दिवसांत म्हणजे २२ तारखेला 'न्यू यॉर्क इव्हॅन्जेलिस्ट' पत्रांत 'फिबी' हें टोमण नांव घेऊन कोणी तरी एक पत्र लिहिलें. त्यामुळें बाईच्या कार्याला कांहीं अडथळा येतो कीं काय असा किंचित्काल भास उत्पन्न झाला. पण 'रमाबाई असोसिएशन' इतक्या बळकट पायावर उभारलेली होती कीं बाईंच्या कामाला कोठें कांहीं भगदाड पडल नाहीं. ह्या 'फिबी'च्या पत्राचे पडसाद इकडे पुण्याच्या केसरी—सुधारक पत्रांत उठले म्हणून त्या पत्राचें भाषन्तर खालीं दिलें आहे.

### *एक मोठा थोरला यत्न*

### *A GRAND ENDEAVOR*

प्रिय संपादकः तुमच्या पत्रलेखिकेवर एक नाजुक कामगिरी येऊन पडली आहे. सप्तेम्बरच्या 'सेंचुरी'मधील तसेंच नोव्हेम्बरच्या 'चटाक्वान' मधील लेखांवरून—शिवाय वेळोंवेळीं इतरत्र पाहण्यांत येत असलेल्या प्रसिद्धिपत्रकांवरून, पुष्कळशा दुसऱ्या वाचकांप्रमाणे तुमच्या ह्या लेखिकेलाहि पंडिता

रमाबाई नांवाच्या हिंदु स्त्रीच्या व्यक्तिमत्वाबद्दल व कार्याबद्दल आत्यंतिक कुतूहल उत्पन्न झालें आहे. ही स्त्री सध्यां आपल्या देशांत आली असून तिच्या स्वतःच्या देशांत परत जाऊन तेथील अति करुणास्पद हिंदु विधवांच्या शिक्षणासाठीं कॉलेज काढावें म्हणून येथें ती पैसा गोळा करीत आहे.

स्वतः वैधव्यदशेंत असलेल्या ह्या लोकविलक्षण स्त्रीचा इतिहास व आपल्या भगिनीवर्गाची त्या देशाच्या रीतिरिवाजांतून व कायद्याच्या छळणुकींतून सुटका व्हावी म्हणून ती जी खटपट करीत आहे ती पाहून तिच्याविषयीं आदर व कौतुक वाटल्यावांचून राहणार नाहीं. ह्या दोन्ही बाबतींत तिची करावी तेवढी स्तुति कमीच ठरेल. अशा ह्या आदरणीय स्त्रीचा उत्साह खच्ची करणं किंवा तिच्या शौर्ययुक्त प्रयत्नांना आळा घालणें अशांसारख्या गोष्टी करण्याचें कोणीहि टाळील.

विशेषतः पंडितेच्या बाबतींत असें म्हणतां येईल कीं आपल्या कार्यासंबंधीं कांहीं गैरसमजानें आपल्याला मदत मिळते आहे किंवा लोकांना आपली बाजू योग्य रीतीनें आकलन करतां न आल्यानें ते आपल्याला मदत करीत आहेत हें तिच्या ध्यानांत आलें तर ती तसली मदत स्वीकारण्यापूर्वीं विचार करील.

आतां मी जें सांगणार आहें तें सांगण्यांत बरीच दिरंगाई झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं, कारण आतांपर्यंत महत्त्वाच्या व्यक्तींच्या नांवाचें वजन खर्च करून व ठळक संस्थांमार्फत लोकांचें लक्ष आकर्षित करून बाईच्या कार्यासाठीं ठिकठिकाणीं कार्यकेंन्द्रें (Circles) स्थापण्यांत आलीं आहेत. परंतु हें सत्य असल्यानें तें बोलून दाखविण्यास हरकत नाहीं. लेखिकेच्या मनांत खुद्द रमाबाईच्याच 'हाय कास्ट हिंदु ऊमन' ह्या पुस्तकाच्या वाचनानें जसा प्रकाश पडला तसा इतरांच्याहि मनांत—मंदपणें कां होईना—पडून ह्या विषयासंबंधीं वाढीस लागलेली आस्था थोडीशी तरी डळमळूं लागली असती. ह्या शेवटल्या प्रकरणांत ज्या संस्थेच्या स्थापनेसाठीं आपणाकडे मदत मागण्यांत येत आहे तिचें वर्णन करतांना म्हटलें आहे, कीं ज्या बाल-विधवा ह्या संस्थेंत शिक्षण घेण्यासाठीं गोळा करण्यांत येतील *त्यांचा धार्मिक विश्वासाबाबत चित्तक्षोभ होऊं देण्यांत येणार नाहीं. त्यांना जातिनिर्बंधासंबंधीं संपूर्ण स्वातंत्र्य राहील;* शिक्षक जे नेमण्यांत येतील त्यांना अशी समज देण्यांत येईल कीं *त्यांनीं कोणत्याहि धर्मासंबंधीं किंवा धार्मिक रीतिरिवाजा-*

*संबंधीं अनादरयुक्त शब्द काढायचा नाहीं.* अशी परिस्थिति असल्यानें हा विषय जनतेपुढें मिशनरी कार्य म्हणून कसा मांडतां येईल किंवा यथान्याय जो पैसा व जें शक्तिसामर्थ्य मिशनरी कार्यासाठीं खर्च होणें अवश्य, त्याचा ओघ बदलून तो दुसरीकडे वळविणें किती सुज्ञपणाचें ठरेल हें स्पष्ट होत नाहीं. निदान आपल्या कार्याची पूर्ण फोड करून मगच मदतीसाठीं हात पसरावा हें योग्य नाहीं का होणार ?

शुभवर्तमानाच्या (Gospel) स्वीकारार्थ शिक्षणाची जरुरी आहे असें जर कोणाला वाटत असेल तर, किंवा ती त्याची पहिली पायरी आहे असें जर कोणी म्हणत असेल तर, मला एवढेंच सुचवून ठेवावेंसें वाटतें कीं हिंदुस्थानच्या पुरुषवर्गाच्या बाबतींत ती कल्पना फोल ठरली आहे. आम्ही असें ऐकतों कीं असंख्य शिकलेसवरलेले हिंदू आपल्या शास्त्राचा त्याग करून हर्बर्ट स्पेन्सरचा स्वीकार करतात. आपल्या प्रभूच्या आगमनानंतर स्त्रीचा दर्जा वाढला तो शिक्षणानें वाढला का शुभवर्तमानानें ? 'जा आणि सर्व राष्ट्रांस शिष्य करा' असा अगदीं सरळ व सोपा संदेश प्रभूनें दिलेला आहे. तो म्हणतो, 'मीं तुम्हांला ज्या गोष्टी करण्याविषयीं आज्ञापिलें आहे त्या त्यांना शिकवा.' ख्रिस्तीतरांना (Heathen) ख्रिस्तीतरच राहूं देऊन शिक्षण द्यावें व अप्रत्यक्ष रीतीनें ख्रिस्तीधर्म-प्रसार करावा असें कित्येकांना वाटत असेल पण आपल्या महान् सेनाधिशानें दल कूच करीत असतांना जे हुकूम दिले आहेत ते पाळण्यांतच खरा सयुक्तिकपणा आहे.

आपल्यापुरता आपला असा विश्वास असायला हवा, कीं प्रभूनें म्हटलें आहे त्याप्रमाणें प्रभूच्या सर्व आज्ञा ह्या ख्रिस्तीतर लोकांस शिकविणें हाच एक मार्ग आपल्याला ध्येयाप्रत पोंचविणारा उत्तम मार्ग आहे. उत्तमच केवळ नव्हे तर तोच एक त्वरित मार्ग आहे. ह्याऐवजीं अलीकडे ज्या स्त्रिया प्रत्यक्ष मिशनरी कार्याकडे आपलें लक्ष अधिकाधिक केन्द्रित करून मोठें अभिनंदनीय मिशनरी कार्य करूं लागल्या होत्या त्यांचें लक्ष त्या कार्यावरून उडवून निराळ्याच मार्गाकडे तें वेधविणें ही गोष्ट फार अयोग्य होय.

---

१. 'Heathen' ह्या शब्दाचें भाषान्तर 'विदेशी' 'परदेशी' किंवा 'राष्ट्रिक' असें बायबलच्या निरनिराळ्या मराठी भाषान्तरांत केलेलें आहे.

ह्या लोकमान्य चळवळीवर टीकात्मक पत्र लिहितांना मनांत किंतु आल्यावांचून राहात नाहीं. पत्रलेखिकेच्या मनाला हा विषय अगदीं स्पष्ट व सोपा वाटत आहे. परंतु तिचें म्हणणें सत्य असेल तर आत्तांपर्यंत ह्या गोष्टीविरुद्ध कोणीं आपला आवाज कसा उठविला नाहीं ह्याचें आश्चर्य वाटतें. असा आवाज उठविला नाहीं ह्यावरूनच रमाबाईंचीं स्पष्ट विधानें पुढें असतांहि आपल्या विचारसरणींत तर कोठें कांहीं चुकत नाहीं ना, अशी तुमच्या पत्रलेखिकेला शंका येते. तिच्या शंकेचें समाधान कोणी करून तिची चूक तिच्या पदरांत घालील तर त्याबद्दल लेखिकेइतका आनंद दुसऱ्या कोणाला वाटणार नाहीं. उलट तुमच्या पत्रलेखिकेच्या विचारसरणींत कांहीं चूक नाहीं असें जर ठरलें तर मग विचारी लोक एकनिष्ठ रमाबाईंना व त्यांच्या सल्लागारांना पटवूं शकणार नाहींत का कीं त्यांनीं आपल्या ह्या होऊं घातलेल्या संस्थेसंबंधीं फेरविचार करून तिची घटना अशी बनवावी कीं ती सर्वमान्य झालेल्या मिशनरी बोर्डाच्या कार्यपद्धतीच्या विरुद्ध राहणार नाहीं. ही मिशनरी पद्धत फार बारकाईनें विचार करून अवलंबिलेली आहे व आतांपर्यंत तिचा पूर्ण अनुभवहि घेण्यांत आलेला आहे.

आमच्या अडचणीविषयींच्या ह्या स्पष्ट लिखाणामुळें ह्या विषयाचें कांहीं स्पष्टीकरण करण्यांत येऊन मनाचा गोंधळ उडविणाऱ्या शंकांचें निरसन झालें, व आमच्या आस्थेवाईक स्त्रीवर्गाला, एक पृथ्वीखंड व एक महासागर ओलांडून येथें आलेल्या वीरस्त्री रमाबाईंनीं, पदतलीं तुडविल्या जाणाऱ्या त्यांच्या व *आमच्याहि* भगिनींच्यासाठीं मारलेल्या करुणाजनक आरोळीला 'ओ' देण्यास मनःपूर्वक मोकळीक दिल्यासारखें होईल. असें झालें तर तुमच्या ह्या लेखिकेचें हें पत्रलेखन व्यर्थ झालें असें होणार नाहीं.

'फिबी.'

ह्या पत्राला रमाबाईंनीं ताबडतोब उत्तर देऊन आपली बाजू जेवढ्या स्पष्ट शब्दांत मांडतां येईल तेवढया स्पष्ट शब्दांत ती मांडली. मिशनरी कार्याविरूद्ध मी हें काम करीत नाहीं. त्यांच्या पैशाचा ओघहि मला आपल्या कार्याकडे वळवून घ्यावयाचा नाहीं. त्यांचें व माझें कार्य अगदीं भिन्न आहे. व माझ्या कार्यासाठीं ज्या कोणाला मदत करावयाची असेल त्यांनीं ती त्यांची

मदत थांबवून मुळींच करूं नये. माझें काम मिशनरी काम नाहीं व तें करण्याची पात्रताहि माझ्या अंगीं नाहीं.माझ्या ह्या पंथातीत (Non Sectarian) कार्यासाठीं ज्या कोणाला साह्य करावयाचें असेल त्यानें तें केवळ भूतदयेनें प्रेरित होऊन करावें, अन्यथा नव्हे, असें बाईंचें उत्तर होतें. व ह्या उत्तराला त्याच अकांत एक जोरदार स्फुट लिहून संपादकांनींहि दुजोरा दिला होता.

फिबीबाईंनीं सोडून दिलेल्या ह्या लाटेसारखीच पण पहिलीपेक्षां बरीच मोठी अशी दुसरीहि एक लाट नंतर बाईंच्या कार्याला बुडवायला उसळून आली. ती म्हणजे बाई 'युनिटेरियन' मताच्या असून त्यांच्या कायाला सहानुभूति असलेली त्यांची मित्रमंडळी 'युनिटेरियन' आहेत व म्हणून त्यांचें कार्य ख्रिस्ती लोकांच्या मदतीला पात्र नाहीं असा एक प्रवाद आतां पसरूं लागला. ह्या व अशाच इतर कांहीं प्रश्नांवर 'डेली इंटर ओशन'च्या प्रतिनिधीनें बाईंची मुलाखत घेऊन ती १० डिसेंबर १८८७ च्या अंकांत म्हणजे रमाबाई असोसिएशन स्थापन झाली त्याच्या दोन दिवस आधीं ती प्रसिद्ध केली. बाई त्यावेळीं मिस् फ्रॅन्सिस विलर्ड ह्यांच्या घरीं होत्या. त्या मुलाखतींतील कांहीं प्रश्नोत्तरें अशीं होतीं :

पहिला प्रश्न होताः अमेरिकेंत येणारी पहिली हिंदु स्त्री आपण आहां असें म्हणतात तें खरें आहे काय?

ह्यावर बाईंनीं उत्तर दिलें कीं असेंच कांहीं म्हणतां येणार नाहीं. माझी मावस बहीण (Cousin) डॉ. आनंदीबाई जोशी, माझी मुलगी व मी अशा तिघी-जणी येथें आलों.

दुसरा प्रश्न होता धर्ममताबद्दलः असा जो प्रवाद आहे कीं तुम्ही 'युनिटेरियन' आहां त्याबद्दल तुम्हांला काय म्हणावयाचें आहे?

बाई म्हणाल्या : बोस्टनमध्यें लोकांनीं मला विचारलें कीं तुम्ही 'युनिटे-रियन' आहां काय? त्यावर मीं नाहीं असें उत्तर दिलें. मी 'ट्रिनिटेरियनहि' नाहीं. हे आधुनिक शोध मला मुळींच कळत नाहींत. मी फक्त ख्रिस्ती आहें. नव्या करारांत 'युनिटेरियन' व 'ट्रिनिटेरियन' हे शब्द मला आढळले नाहींत.

ह्यावर मिस् विलर्ड म्हणाल्या : पण मी ट्रिनिटेरियन आहें. मला दुसरें

कांहीं असणें शक्यच नाहीं. माझ्या बाळपणींच माझ्या मेंदूच्या वळकट्यांत तें मत चांगलें गुंडाळलें गेलें आहें. माझ्या माझेपणाचाच तो एक भाग झाला आहे.

ह्यावर बाई म्हणाल्या: पण माझ्या मेंदूच्या वळकट्यांत कांहीं तें गुंडाळलें गेलें नाहीं. व बायबलमध्यें मला 'युनिटेरियन' हा शब्द कोठें सांपडत नाहीं तसाच 'ट्रिनिटेरियन' हाहि शब्द सांपडत नाहीं. म्हणून बायबल जें म्हणतें तें सरळ सरळ आहे तसें मी घेतें आणि तें कितीतरी सोपें वाटतें.

बाईच्या ह्या मुलाखतीवरून त्या किती सरळ व निर्भीड होत्या हें दिसून येतें. त्यांना लोकमताचें भय इकडे भारतांत कधीं वाटलें नाहीं तसेंच अमेरिकेंतहि वाटलें नाहीं.

नंतर पृच्छकानें पाश्चात्य ख्रिस्ती लोकांना नेहमीं छळणारा दुसरा एक मुद्दा काढला : तुम्ही कोणत्या मताच्या ( Denomination ) ख्रिस्ती आहां ? ह्यावर पंडिताबाईनीं म्हटलें ख्रिस्ताच्या जागतिक चर्चची मी सभासद आहें. माझ्या चांगल्या चांगल्या बॅप्टिस्ट, मेथॅाडिस्ट, एपिस्कोपेलियन्स व प्रेस्बिटेरियन्स ह्यांच्याशीं ओळखी होतात. तेव्हां प्रत्येकजण मला बायबलचा वेगवेगळा अर्थ लावून सांगतो. तेव्हां मला वाटतें कीं ह्या कोणाचेंच न ऐकतां मीच सरळ बायबल वाचून त्यांत काय आहे तें शोधून घेतलेलें काय वाईट ? आणि मी सरळ अशी बायबलकडे धाव घेतली कीं मला तेथें जगाचा तारक प्रत्यक्ष आढळतो. मी कोणत्याहि एका पंथाची नाहीं व मला भारतांत परत जातांना कोणत्याहि पंथानुयायी म्हणून परतायचें नसून ख्रिस्ताची अनुयायी म्हणूनच केवळ जायचें आहे.

अमेरिकेंत बाईच्या कामाविषयीं सहानुभूति बाळगणारे लोक होते, व त्यांत वेगवेगळ्या पंथांचे अनुयायी होते. त्यांतील कांहीं निर्विवाद युनिटेरियन होते, तसेच कांहीं नास्तिकहि असतील. पण बाईंनीं ह्या प्रश्नाला उत्तर देतांना ६ डिसेंबर १८९२ रोजीं रेव्ह. डॉ. पेन्टिकॉस्ट नांवाच्या एका प्रसिद्ध उपदेशकाला लिहिलेल्या पत्रांत म्हटलें आहे :

Why a work purely philanthropic cannot be undertaken by a Christian I do not see, for hundreds and thousands of good Christian people of all denominations are engaged in such works in Christian lands. Not only that, but Unitarains and Evangelical Christians, Jews and unbelievers are working together for the betterment of the conditions of

suffering Humanity. I do not see why the same is not possible in the interest of poor Hindu widows? I have invited people of every name and clime to help me to do this work, and thus far they have been helping me. 'As for my taking up and openly standing on some ground—either with Unitarians or Evangelical Christians—I do not see my way to it.'

थोडक्यांत म्हणजे शुद्ध भूतदयाविषक कार्य पंथभेद मनांत न आणतां ख्रिस्ती माणसास कां करतां येऊं नये असें बाई विचारतात. बाईंच्या कार्याला सनातनी ख्रिश्चनापासून तर यहुदी लोकांपर्यंत सर्वांचा पाठिंबा होता. इतकेंच काय, पण ख्रिस्ती धर्मावर अजिबात विश्वास नसलेल्यांचाहि त्या कामाला पाठिंबा होता. 'ज्यांना इव्हॅन्जेलिकल' म्हणतात तेहि लोक त्यांत होते. ह्या विषयावर २६ डिसेंबर १८९२ रोजीं लिहिलेल्या आपल्या पत्रांत बाई म्हणतात अगदीं सनातनी पंथांच्याहि लोकांनीं असोसिएशनच्या निवडणुकींत भाग घेतला होता, आणि त्यांनीं सगळ्यांनीं सतत पांच वर्षें ज्या अध्यक्षांची एकमतानें निवड केली ते युनिटेरियन होते. बाई म्हणतात :

At the first meeting when our Association was organised in Boston in Dec. 1887, he (i.e. Dr. Edward Hale) was unanimously chosen president by such prominent persons belonging to the orthodox Churches as the Rt. Rev. Bishop Brooks, Rev. Dr. Gordon and Ex-Governor of Massachusets; and though more than two-thirds of the officers of our Association and the majority of its members belong to the orthodox churches they have continued to elect Dr. Hale to be the president for the last five years.

बाईच्या पत्रांतील वरील दोन उताऱ्यांवरून दिसून येतें कीं त्यांच्या पाठीराख्यांत सर्व पंथीयांचा भरणा असला तरी सनातनी चर्चचे सभासद अधिक होते. मात्र त्यांचे अध्यक्ष युनिटेरियन मताचे होते. कदाचित् ह्याच एका कारणानें त्यांच्या कपाळावर युनिटेरियन असा शिक्का मारण्यांत येऊन त्यांचा तेथील पाठिंबा ढळविण्याचा प्रयत्न झाला असावा. डॉ. पेटिकॉस्ट हा गृहस्थ तर त्यांच्या पाठीशीं हात धुऊन लागला होता असें दिसतें. त्यानें केवळ अमेरिकेंतच नव्हे तर इंग्लंडांतहि वक्तव्य करून बाईंची रसद तोडण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या माऱ्याचीं ठिकाणें दोनतीन होतीं. एक तर बाई युनिटेरियन आहेत असा प्रचार व शिवाय त्यांची शाळा 'देवहीन' आहे असाहि

प्रचार करण्यांत येत होता. बाईंनीं दिलेल्या उत्तरांत ह्या प्रचारासंबंधीं असें लिहिलें आहे. (६ डि. १८९२.)

'The report of one of your speeches delivered at the Hall of Congregational House—Boston, was sent to me by one of my friends. In it I found certain statements of yours which have pained me very much. . . . the report represents you as having said that my school was "a godless school"—a school under the patronage of a committee of women here in Boston with ramifications all over the country. You (i.e. I) are forbidden by them to pray with your pupils, to read the Bible in their presence, to speak of Chirst to them. . . All this and more is imposed upon you by a body calling itself religious. In some places he i.e. Dr. Penticost, credits the Unitarians alone with this despotic Godless rule.'[1]

रमाबाई असोसिएशन ही एक मिशनरी संस्था नव्हती हें वरील उताऱ्यांवरून दिसून येईल. ती मिशनरी संस्था नाहीं म्हणून अमेरिकेंतील मिशनरी धार्जिण्या लोकांनीं व संस्थांनीं तिला कसून विरोध केला हेंहि वरील उताऱ्यांवरून लक्षांत येईल. सारेच अमेरिकन किंवा इंग्रज मिशनरी नसतात व साऱ्याच अमेरिकन व इंग्लश संस्था मिशनरी संस्था नसतात. परंतु ही एक मिशनरी संस्था आहे अशा गैरसमजानें अगदीं सुरुवातीपासूनच इकडे कित्येकांनीं बाईंना व त्यांच्या कार्याला कट्टा विरोध केला.

उलट ह्या संस्थेंत धार्मिक स्वातंत्र्य काटेकोर रीतीनें ठेवण्यांत येतें कीं नाहीं ह्या बाबतींत असोसिएनचे अमेरिकेंतील पदाधिकारी किती जागरूक होते हें पुढें असोसिएन बंद झाल्यानंतरच्याहि एका पत्रव्यवहारावरून दिसून येतें. हा पत्रव्यवहार १९०२ मधील आहे. रमाबाई असोशिएशन बंद होऊन तिच्या ऐवजीं 'अमेरिकन रमाबाई असोसिएशन' नांवाची संस्था स्थापण्यांत आली व ती फक्त केडगांवांतील 'शारदा सदन' ह्या संस्थेशींच निगडित होती. तेथील मुक्तिसदन, कृपासदन इत्यादि सदनांशीं शारदासदनाचा संबंध नव्हता. ही शारदासदन शाळा अद्यापहि अस्तित्वांत आहे. ह्या नवीन संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. ई. डब्ल्यू. डोनॉल्ड ह्यांनीं बाईंना ह्या बाबतींत कांहीं प्रश्न विचारले होते. त्यांना बाईंनीं दिलेल्या उत्तरावरून, २५ ऑक्टोबर १९०२ रोजीहि ही जागरूकता दिसून येते.

1. The Christian Patriot. 26-12-1892.

ाइ म्हणतात :

No. 4 "No one officially connected with 'Sharada Sadan' made any direct efforts or used direct influence to convert the pupils to Christianity. Indirect Christian influence has always existed in the Sharada Sadan as stated in my letter.

(१३ सप्टेंबरचें पत्र)

No. 5 "No one officially connected with Sharada Sadan has been in the habit of inducing the pupils to attend Christian religious worship. But both the Hindu pupils and converted pupils have, I am sure, used their influence equally on their fellow students to induce them to follow their respective religions.

No. 6 "Provision is carefully and willingly made for supplying the Hindu pupils with all that is necessary to keep their caste, and no one of them is prevented from worshipping the idols which she may have brought with her. Nor is she prevented from fasting on the days she considers sacred, nor from shaving her head if she wishes to do so."

शारदासदन स्थापन झाल्यापासून १५ वर्षांनंतरची ही गोष्ट आहे. ह्यावरून शारदासदनाशीं व रमाबाई असोसिएशनशीं संबंध असलेल्या अमेरिकन अधिकारी वर्गाचा दृष्टिकोन लक्षांत येईल.

रमाबाई असोसिएशन स्थापन होण्याच्या सहा महिने आधीं बाईंचें 'उच्च-वर्णीय हिंदु स्त्री' हें सुप्रसिद्ध इंग्रजी पुस्तक प्रसिद्ध झालें होतें. ह्या पुस्तकाचा प्रत्यक्ष फायदा म्हणजे त्याच्या विक्रीवर त्यांना स्वतःचा व त्यांच्याबरोबर इकडे येण्यास निघालेल्या शिक्षिकांपैकीं दोघींचा प्रवासखर्च व त्यांनीं लिहिलेल्या किंडरगार्टनच्या मराठी पुस्तकांत घालण्यासाठीं तयार करून घेतलेल्या ६०० इलेक्ट्रोटाईप प्लेटींचा खर्च वरच्यावर निघाला. ह्याशिवाय रमाबाई असोसिएशन स्थापणेस त्यांच्या अमेरिकेंतील प्रवासाइतकाच ह्या पुस्तकांचाहि उपयोग झाला.

निघण्याच्या थोडें आधीं रमाबाईंना भेटायला एक बाई आल्या. त्यांनीं सरळ प्रश्न केला, 'तुम्ही हा पैसा जमा केला आहे तो अनाथ विधवांसाठीं व विपदावस्थेंत सांपडलेल्या स्त्रियांसाठीं ना? मग तुम्ही मनोरमेची काय सोय

केली आहे?' बाईंनीं उत्तर केलें कीं 'आपण त्या गोष्टीचा विचारच केला नाहीं.' तेव्हां ती बाई म्हणाली, 'मग असें करा मी करतें तिचा खर्च. मला तेवढें करूं द्या, आणि त्यानंतर, १८ वर्षे तिनें मनोरमेचा सारा शिक्षणाचा वगैरे खर्च केला.

एवढें झाल्यानंतर बाई परत भारतास येण्यासाठीं निघाल्या. मात्र येतांना त्या पॅसिफिक महासागराच्या मार्गानें येऊन त्यांनीं एक पृथ्विप्रदक्षिणा पुरी केली.

# १४ शारदासदन

आपल्या कामासाठीं अलोट पैसा व भक्कम पाठबळ मिळवून १८८९ च्या फेब्रुवारींत पंडिता रमाबाई कलकत्त्याच्या किनाऱ्याला लागल्या. २० एप्रिल १८८३ रोजीं त्यांनीं अिंग्लंडला जाण्यासाठीं मुंबई बंदर सोडलें होतें. सहा वर्षांत दोन सुधारलेले देश पाहून तेथें मिळवितां येईल तें सगळें ज्ञान मिळवून आपल्या कार्यासाठीं सर्व प्रकारची तयारी करून पृथ्वीला प्रदक्षिणा घालून त्या आपल्या मायदेशाला येऊन पोंचल्या होत्या.

रमाबाईंची कन्या मनोरमा आधींच हिंदुस्थानांत येऊन आपल्या मातेची वाट पाहात होती. पुण्याच्या वॅंटेज सिस्टर्स (पंच हौद जवळचें सेंट मेरीज कॉन्व्हेन्ट) तिची काळजी वाहात होत्या. आईला सामोरी राहण्यासाठीं तिला मुंबईला नेण्यांत आलें. बाईंच्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली गेली ती पुण्यास न रोवतां मुंबईस रोवावयाची होती व त्या प्रसंगीं मनोरमा हजर होती.

११ मार्च १८८९ रोजीं मुंबईस विल्सन कॉलेजच्या जवळ चौपाटीवर एका भाड्याच्या ऐसपैस घरांत शारदा सदनाची स्थापना झाली. सदन मुख्यतः बालविधवांसाठीं स्थापन करण्यांत आलें होतें परंतु सदनांत पहिली मुलगी घेण्यांत आली ती बालविधवा नसून पुनर्विवाहित बालविधवेची एक लहानशी कन्यका होती. तिचें नांव शारदा गद्रे होतें व असें म्हणतात कीं ह्याच मुलीवरून सदनाचें 'शारदा सदन' हें नांव ठेवण्यांत आलें. ह्या कुमारिकेच्या पाठोपाठ सदनाची पहिली खरीखुरी विधवा विद्यार्थीण आली. ती म्हणजे महर्षि अण्णासाहेब कर्वे ह्यांची भावी पत्नी सौ. आनंदीबाई कर्वे.

आनंदीबाई आपल्या आत्मचरित्रांत म्हणतात. '११ मार्च १८८९ रोजीं

शारदा सदनाची शाळा उघडली, तेव्हां मी पहिली विद्यार्थीण म्हणून गेलें. त्यावेळीं मी एकटी विद्यार्थीण होतें.'

आणि ही पहिली विद्यार्थीण सदनाच्या नियमांना थोडी मुरड घालून घेण्यांत आली होती:

'जाहिरातींत वीस वर्षांचें वय असलें तर चालेल असें होतें; आणि मी तर २४ वर्षांची होत आलेली म्हणून दादांनीं पंडिताबाईंचीं व माझी भेट केली. सुदैवानें त्या होय म्हणाल्या.'

आनंदीबाई अद्याप वसतिगृहांत राहात नव्हत्या. नंतर तीन महिन्यांनीं त्या तेथें रहायला गेल्या. पण ह्या तीन महिन्यांच्या अवधींत शारदासदनांत दोनाच्या जागीं बावीस विद्यार्थिनी जमल्या.

मनोरमाबाई त्या पहिल्या दिवसाचें वर्णन करतात :

'१८८९ च्या मार्च महिन्यांतील एका आल्हादकारक सायंकाळीं पांचच्या सुमाराला विल्सन कॉलेजच्या पिछाडीचा एक रस्ता गाड्याघोड्यांनीं अगदीं गजबजून गेला होता. समोरच एका बंगल्याच्या कपाळपट्टीवर 'शारदा सदन' अशी पाटी झळकत होती. गाड्यांतून उतरतांच पाहुण्यांना एका मोठ्या दिवाणखान्यांत नेण्यांत येत होतें. प्रत्येक खुर्चीवर सदनासंबंधीं त्रोटक माहितीचें एक एक हस्तपत्रक ठेवलेलें होतें. तें वाचून सर्वजण कुतूहलपूर्ण नेत्रांनीं पुढच्या कार्यक्रमाची वाट पहात बसलेले होते.'

'दिवाणखाना पूर्णपणें भरून गेल्यावर सभेला सुरुवात करण्यांत आली. ह्या सभेचें अध्यक्षस्थान सौ. काशीबाई कानिटकर ह्यांना देण्यांत आलें. काशीबाई ह्या एक उच्चवर्णीय विदुषी होत्या. ह्याबद्दल एका प्रमुख मराठी पत्रानें असा शेरा मारला आहे कीं 'अशा महत्त्वाच्या प्रसंगीं एखाद्या हिंदी स्त्रीनें अध्यक्ष-स्थान विभूषित करण्याची ही पहिलीच वेळ असली पाहिजे. खरोखर त्या घटनेंत मोठें औचित्य दिसून आलें.'[१]

---

१. माझें पुराण : पृष्ठ १९

१. Pandita Ramabai : Australasian Edition by Manoramabai पृष्ठें १०८, १०९

## १४ शारदासदन

आपल्या कामासाठीं अलोट पैसा व भक्कम पाठबळ मिळवून १८८९ च्या फेब्रुवारींत पंडिता रमाबाई कलकत्त्याच्या किनाऱ्याला लागल्या. २० एप्रिल १८८३ रोजीं त्यांनीं अिंग्लंडला जाण्यासाठीं मुंबई बंदर सोडलें होतें. सहा वर्षांत दोन सुधारलेले देश पाहून तेथें मिळवितां येईल तें सगळें ज्ञान मिळवून आपल्या कार्यासाठीं सर्व प्रकारची तयारी करून पृथ्वीला प्रदक्षिणा घालून त्या आपल्या मायदेशाला येऊन पोंचल्या होत्या.

रमाबाईंची कन्या मनोरमा आधींच हिंदुस्थानांत येऊन आपल्या मातेची वाट पाहात होती. पुण्याच्या वॅंटेज सिस्टर्स (पंच हौद जवळचें सेंट मेरीज कॉन्व्हेन्ट) तिची काळजी वाहात होत्या. आईला सामोरी राहण्यासाठीं तिला मुंबईला नेण्यांत आलें. बाईंच्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली गेली ती पुण्यास न रोवतां मुंबईस रोवावयाचीं होती व त्या प्रसंगीं मनोरमा हजर होती.

११ मार्च १८८९ रोजीं मुंबईस विल्सन कॉलेजच्या जवळ चौपाटीवर एका भाड्याच्या ऐसपैस घरांत शारदा सदनाची स्थापना झाली. सदन मुख्यतः बालविधवांसाठीं स्थापन करण्यांत आलें होतें परंतु सदनांत पहिली मुलगी घेण्यांत आली ती बालविधवा नसून पुनर्विवाहित बालविधवेची एक लहानशी कन्यका होती. तिचें नांव शारदा गद्रे होतें व असें म्हणतात कीं ह्याच मुलीवरून सदनाचें 'शारदा सदन' हें नांव ठेवण्यांत आलें. ह्या कुमारिकेच्या पाठोपाठ सदनाची पहिली खरीखुरी विधवा विद्यार्थीण आली. ती म्हणजे महर्षि अण्णासाहेब कर्वे ह्यांची भावी पत्नीं सौ. आनंदीबाई कर्वे.

आनंदीबाई आपल्या आत्मचरित्रांत म्हणतात. '११ मार्च १८८९ रोजीं

शारदा सदनाची शाळा उघडली, तेव्हां मी पहिली विद्यार्थीण म्हणून गेलें. त्यावेळीं मी एकटी विद्यार्थीण होतें.'

आणि ही पहिली विद्यार्थीण सदनाच्या नियमांना थोडी मुरड घालून घेण्यांत आली होती:

'जाहिरातींत वीस वर्षांचें वय असलें तर चालेल असें होतें; आणि मी तर २४ वर्षांची होत आलेली म्हणून दादांनीं पंडिताबाईचीं व माझी भेट केली. सुदैवानें त्या होय म्हणाल्या.'[1]

आनंदीबाई अद्याप वसतिगृहांत राहात नव्हत्या. नंतर तीन महिन्यांनीं त्या तेथें रहायला गेल्या. पण ह्या तीन महिन्यांच्या अवधींत शारदासदनांत दोनाच्या जागीं बावीस विद्यार्थिनी जमल्या.

मनोरमाबाई त्या पहिल्या दिवसाचें वर्णन करतात :

'१८८९ च्या मार्च महिन्यांतील एका आल्हादकारक सायंकाळीं पांचच्या सुमाराला विल्सन कॉलेजच्या पिछाडीचा एक रस्ता गाड्याघोड्यांनीं अगदीं गजबजून गेला होता. समोरच एका बंगल्याच्या कपाळपट्टीवर 'शारदा सदन' अशी पाटी झळकत होती. गाड्यांतून उतरतांच पाहुण्यांना एका मोठ्या दिवाणखान्यांत नेण्यांत येत होतें. प्रत्येक खुर्चीवर सदनासंबंधीं त्रोटक माहितीचें एक एक हस्तपत्रक ठेवलेलें होतें. तें वाचून सर्वजण कुतूहलपूर्ण नेत्रांनीं पुढच्या कार्यक्रमाची वाट पहात बसलेले होते.'

'दिवाणखाना पूर्णपणें भरून गेल्यावर सभेला सुरुवात करण्यांत आली. ह्या सभेचें अध्यक्षस्थान सौ. काशीबाई कानिटकर ह्यांना देण्यांत आलें. काशीबाई ह्या एक उच्चवर्णीय विदुषी होत्या. ह्याबद्दल एका प्रमुख मराठी पत्रानें असा शेरा मारला आहे कीं 'अशा महत्त्वाच्या प्रसंगीं एखाद्या हिंदी स्त्रीनें अध्यक्ष-स्थान विभूषित करण्याची ही पहिलीच वेळ असली पाहिजे. खरोखर त्या घटनेंत मोठें औचित्य दिसून आलें.'[1]

---

१. माझें पुराण : पृष्ठ १९

१. Pandita Ramabai : Australasian Edition by Manoramabai पृष्ठें १०८, १०९

ह्या वेळीं पंडिता रमाबाईंनीं एक समयोचित भाषण केलें. त्या म्हणाल्या, 'वर्तमानपत्रकर्त्यांना किंवा सर्वसाधारण जनतेला म्हणायचें असेल ते तीं म्हणोत, परंतु एक गोष्ट सत्य आहे कीं आपल्या देशांतील स्त्रियांची स्थिति हृदयाच्या ठिकऱ्या उडवून टाकण्याइतकी शोचनीय आहे. केवळ आपणच ह्या गोष्टीचें आकलन करूं शकूं. दुसऱ्या कोणाला तें शक्य नाहीं. परकीयांना तर तें कधींच समजणार नाहीं. ब्रिटिश पार्लमेंटांत आपला एकहि प्रतिनिधि नाहीं ही एकच गोष्ट घ्या. ह्यामुळें गरीब हिंदुस्थानच्या खऱ्या परिस्थितीचें त्यांना आकलन करतां येत नाहीं. हिंदी स्त्रियांची स्थितीहि अगदीं तशीच आहे. सद्‌गृस्थ हो, तुमच्याहि पार्लमेंटमध्यें'—(बाई काँग्रेसला उद्देशून बोलत होत्या)—'आमच्यापैकीं एकाहि स्त्रीला तुम्ही कधीं आपली शोचनीय स्थिति तुमच्यापुढें मांडण्याची संधी दिली नाहीं. ब्रिटिश पार्लमेंटला हिंदुस्थानची परिस्थिति जितकी माहिती आहे त्यापेक्षां सद्‌गृहस्थ हो, तुम्हांला तुमच्या स्त्रियांची दुःस्थिति अधिक चांगली ठाऊक आहे अशी माझी खात्री आहे.'[२]

पहिल्या सहा महिन्यांत ५ विधवा वसतिगृहांत राहण्यास आल्या व ३ बाहेरून येत. १७ कुमारिका शाळेंत होत्या. सदन विधवांसाठीं व तेंहि बालविधवांसाठीं होतें. परंतु सारेंच कांहीं लोकविलक्षण असल्यानें ज्यांच्यासाठीं एवढी खटपट त्याच पुढें येईनात. सहा महिन्यांत केवळ आठ विधवा मुली शिक्षण घेण्यासाठीं धाडण्यांत आल्या.

सदनांत बाई आपल्या विधवा मुलींचें किती करीत व त्यांचें संगोपन कसें करीत हें आनंदीबाईंच्या अनुभवावरून उत्तम रीतीनें दिसून येतें. आनंदीबाई सदनांत आल्यावर हळू हळू बाईंनीं आनंदीबाईंना केस वाढविण्यास उत्तेजन दिलें. आपण केस वाढवीत आहों हें कोणास कळूं नये म्हणून आनंदीबाई डोक्यावरून पदर घेत व हनुवटीखालीं सेफ्टीपिन लावून तो घट्ट बसवीत. दर सुट्टीला त्या माहेरीं जात तेव्हांहि असेंच. त्यांनीं केस वाढविले आहेत हें कोणाच्या लक्षांत येत नसे. आनंदीबाईंना सदनांत राहण्याची परवानगी मिळविण्यासाठीं एक युक्ति त्यांनीं केली होती. त्यांचे वडील त्यांना कामासाठीं

२. इंदुप्रकाशः १८-३-१८८९

कोंकणांत घेऊन जाणार होते. आनंदीबाई दरम्यान 'डे स्कॉलर' म्हणून शाळेला येत असत. पण वडिलांच्या ह्या बेतानें सगळेंच शिक्षण आटोपण्याचा प्रसंग आला. तेव्हां रमाबाईंनीं आनंदीबाईंच्या वडिलांना वार्षिक ५० रुपये देऊन गडी किंवा बाई ठेवण्याची त्यांनीं व्यवस्था करावी व इकडे त्याबद्दल आनंदीबाईंनीं बाईंचें कांहीं काम करून त्या पैशांची फेड करावी असें ठरलें. खरें पाहतां ह्या व्यवस्थेनें बाईंचा फायदा म्हटल्यापेक्षां आनंदीबाईंचाच व तोहि दुहेरी फायदा झाला. एक तर आपण हे ५० रुपये फुकट घेतल्याचा मिंधेपणा वाटण्याचें कारण उरलें नाहीं व दुसरें आपल्यांतील पांढरपेशा मंडळीला काम करण्याची लाज वाटण्याचा रोग जो चटकन जडतो त्यापासून त्यांची मुक्तता झाली. बाकीचें शिक्षण, बोर्डिंग वगैरे खर्च सारें मोफत होतेंच.

सदनांतील इतर विधवा मुलींपेक्षां आनंदीबाई बऱ्याच मोठ्या असल्यानें त्यांच्यावर कामें पडलीं तीं अशीं:

आनंदीबाई म्हणतात.

'पंडिता रमाबाईंनीं माझ्या वडिलांना दिलेल्या रकमेबद्दल मी त्यांच्या मुलीचें काम करीं. तिची अंघोळ, व्याकबेवर तिला फिरायला घेऊन जाणें, कपडे, वगैरे कामें मला करावीं लागत.....शिवाय सहा महिने ब्राह्मणाची बाई मिळाली नाहीं म्हणून माझें जेवणहि मलाच करावें लागे....मी मोठी म्हणून मोठ्या कामाच्या पाळ्या माझ्यावर येत. गाईचें दूध काढणें, बाईंच्या गाडीच्या 'चेतक' नांवाच्या घोड्याचें औषध तयार करणें, पाहुण्यांची विचारपूस करणें, वगैरे....गोविंदराव व काशीबाई कानिटकर, हरि नारायण आपटे वगैरे मंडळी केव्हां तरी सदनांत आलीं म्हणजे एखाद्या वेळीं त्यांच्यासाठीं स्वैंपाक सुद्धां करावा लागे.'[1]

पंडिता रमाबाईंच्या शारदा सदनासाठीं अमेरिकेंतून रमाबाई असोसिएशन पैसा मिळवून पाठवीत असे. अशा रीतीनें दहा वर्षेपर्यंत मदत करण्याचें असोसिएशननें पत्करिलें होतें. प्रत्येक मुलीमागें १० पौंड वार्षिक खर्च ही संस्था पाठवीत असे असें आनंदीबाई म्हणतात. पंडिताबाईंनीं येथें आल्यावर रमाबाई असोसिएशनच्या अनुमतीनें आपल्याला सल्लामसलत देण्यासाठीं

१. माझें पुराण : पृष्ठ २२

म्हणून एक सल्लागारमंडळ निवडलें होतें. ह्या सल्लागार मंडळांत रा. ब. कृष्णाजी लक्ष्मण नूलकर, न्या. माहादेव गोविंद रानडे, सर डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर न्या. काशिनाथ त्र्यंबक तेलंग वगैरे मंडळी होती. मुंबईस असतांना सल्लागार मंडळ निराळें व पुण्यास गेल्यावर निराळें होतें कीं काय हें नक्की सांगतां येत नाहीं. परंतु एकंदर माहितीवरून असें दिसतें कीं मुंबईस न्या. तेलंग व पुण्यास रा. ब. नूलकर हे ह्या कामांत प्रामुख्यानें भाग घेत असावे.

बालविधवांचा त्यांच्या घरीं व विशेषतः सासरीं अतिशय छळ झालेला असे. त्यांना अगदीं घरच्यासारखें वाटून त्यांचे दिवस अत्यंत सुखांत जावे अशी बाईंची सारी खटपट असे. पण ह्या सल्लागार मंडळीला तें पसंत पडत नसावें असें आनंदीबाईंच्या लिखाणावरून दिसतें. आनंदीबाई लिहितात:

'सल्लागार मंडळी म्हणे आपल्या जातींतील विधवांना चैनीनें राहणें बरें नव्हे. पण रमाबाईंना तें आवडत नसे. पूर्वींचे दिवस त्यांच्या मनांत येत. त्या म्हणत, मीं विद्यार्थिनींना हालांतून वर काढण्यासाठीं, त्यांचे हाल कमी करण्यासाठीं शाळा घातली. मीं त्यांना सुखांत ठेवायचें ठरविलें आहे. तें कमी होणें नाहीं.'[१]

शारदासदन दीड वर्षानें म्हणजे १८९० च्या नोव्हेंबर महिन्यांत पुण्यास आणण्यांत आलें. पुणें बाईंच्या फार विरुद्ध होतें व तेथें विरोधी पक्षाची मंडळी शारदासदन यशस्वी होऊं देणार नाहीं असें पुष्कळांचें म्हणणें होतें. पण लोकमतापेक्षां बाईंना मुलींच्या बऱ्याचा अधिक ध्यास होता. मुलींना मुंबईच्या हवेपेक्षां पुण्याची हवा अधिक चांगली म्हणून 'वैरीयाच्या उरावरी पाय द्यावा' असाच कांहींसा धाडसाचा हा प्रयोग' करण्याचें बाईंनीं ठरविलें व त्यांनीं आपलें शारदासदन मुंबईहून उचलून पुण्यास आणलें.

पुण्यास आल्यावर सदनांत विद्यार्थिनींची संख्या ६४ झाली. त्यांत दुर्गाबाई किर्लोस्कर, काशीबाई देवधर, वेणूबाई नामजोशी[२] ह्याहि विद्यार्थिनी होत्या. ह्या तिघींनींहि पुढें हिंगण्याच्या अनाथबालिकाश्रमांत काम केलें.

पुण्यास आल्यावरहि विधवा मुलींना सुखांत ठेवण्याच्या बाबतींत बाईंनीं

---

१. पंडिता रमाबाईः प्रबोधनकार ठाकरे. पृष्ठ ४५.

२. वेणूबाई नामजोशी ही प्रिन्सिपाल आगरकरांची मामेबहीण. कर्वे आत्मचरित्र पृष्ठ १८८

मुलींच कृपणपणा केला नाहीं. कृष्णाबाई गद्रे म्हणतात: (ह्या कृष्णाबाई सदनाच्या पहिल्या विद्यार्थीण शारदाबाई गद्रे ह्यांच्या कनिष्ठ भगिनी. ह्यांनीं तेथील परिस्थिति लहानपणीं प्रत्यक्ष पाहिलेली.) 'सुमारें एक वर्षानें मुंबईचें ठाणें बदलून हवेशीर अशा पुणें शहरीं तें आणलें. अमेरिकेंतील लोकांच्या उदार साह्यामुळें पुण्यांतील अगदीं चांगल्या वस्तीमध्यें एक बंगला खरेदी करण्यांत आला. काय त्या बंगल्याची शोभा व काय तो सुंदर फुलांनीं श्रृंगारलेला वगीचा. जिकडे पाहिजे तिकडे मोकाट फिरण्याची आम्हांला मुभा. दिवाणखाना देखील आमची बैठकीची जागा. सुंदर कोचां-खुर्च्यांवर बसून गप्पा माराव्यात, बागेंत जाऊन जाई, जुई, मोगरा, चमेली, वकुळी व मधुमालतीच्या वेण्या गंफून केसांवर लादाव्यात, रमाबाईंनीं आम्हांला फुलांची, पक्ष्यांची व झाडांची माहिती देऊन दुर्बिणींतून (सूक्ष्मदर्शक यंत्रांतून) त्यांचें निरीक्षण करण्यास शिकवावें. काय ते लाड ! अशा सुंदर वातावरणांत आपले दिवस घालवायला कोण बालविधवा येणार नाहीं ? चित्रें व पुस्तकें ह्यांचा हवा तेवढा संचय. कधीं कधीं रमाबाई स्वतः पाहाटेस उठून आम्हांला आगाशीवर नेऊन नक्षत्रें व तारे दाखवीत व त्यांचीं नांवें वगैरे आम्हांला मोठ्या आवडीनें शिकवीत.'[१]

ह्या सगळ्या मोकळ्या वातावरणांत मुलींच्या खाण्यापिण्याची कधीं आबाळ झाली नाहीं. 'रमाबाई आपल्या मुलींना दुधातुपांत नुसतें लोळविते.' असें लोक म्हणत. शारदासदनांतील ह्या खाण्यापिण्यावरून एकदां केसरी व सुधारक ह्या पत्रांत वाद झाला होता !'[२]

शारदासदन प्रथम पुण्यास आणलें तेव्हां आगाखानाच्या बंगल्यावर सदनाची व्यवस्था करण्यांत आली. परंतु पुढें १८९२ त शारदासदन आपल्या सत्तेच्या इमारतींत गेलें. ही इमारत ४२००० रुपये खर्च करून बांधण्यांत आली होती. रा. ब. चिपळूणकर ह्यांच्या कनॉट व्हिला नांवाच्या बंगल्यासमोर ती बांधण्यांत आली होती. तिचा उद्‌घाटन समारंभ २६ जुलै १८९२ रोजीं डॉ. आत्माराम पांडुरंग ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. डॉक्टरसाहेब ह्या समारंभासाठीं

१. कृष्णाबाई गद्रेकृत स्मृतिसुमनें पृष्ठ ४० : २. केसरी २० जा. १८९६ व सुधारक. ३ फे. १८९६

मुंबईहून मुद्दाम आले होते. त्या वेळीं पुष्कळ युरोपियन व महाराष्ट्रीय स्त्रीपुरुष हजर होते.

ज्या वेळेस पाहुणे मंडळीला बाईंनीं आपली सुसज्ज अशी ही संस्थेची इमारत हिंडून दाखविली. त्या वेळेस बाईंनीं समजावून सांगितलें :

'ह्या सर्व चांगल्या चांगल्या सुसज्ज खोल्या शिक्षकिणींसाठीं राखून नाहींत ठेवल्या बरं का. दिवाणखान्यासकट हव्या त्या ठिकाणीं जाण्यायेण्याची, राहण्याची, माझ्या विद्यार्थिणींना पूर्ण मुभा आहे. हें सारें सदन व सुखसोयी त्यांच्याचसाठीं आहेत. कौटुंबिक व सामाजिक छळवादानें ज्यांचें जिणें नरकतुल्य झालें आहे, अशा शेकडों अनाथ नि अपंग भगिनींना येथें प्रेम नि माणुसकीचा जिव्हाळा मला प्रत्यक्ष पटवून द्यायचा आहे. चित्रें व पुस्तकें दाखवून जगाची त्यांना माहिती करून द्यायची आहे. बागेंत हिंडतांना देवाच्या अद्‌भुत करणीचें त्यांनीं कौतुक करावें आणि इमारतीच्या छपरावर ठेवलेल्या सूक्ष्मदर्शकांतून व दुर्बिणींतून सूक्ष्म प्राण्यांचे नि आकाशस्थ तारकांचें निरीक्षण करावें, असें माझ्या मनांत आहे[१]!'

शारदा सदनांतील मुलींना अगदीं घरच्यासारखें वाटावें, ज्या बिचाऱ्या बाल विधवांना कधीं कोणी प्रेमाचा एक शब्द बोललें नाहीं कीं प्रेमानें ज्यांच्या पाठीवरून कोणी हात फिरविला नाहीं—नवऱ्याला खाल्लंस, तोंड पाहिलें तुझं, झाला अपशकून—असल्या बोलण्यावांचून ज्यांच्या कानीं कधीं दुसरे शब्द पडायचे नाहींत त्यांच्या रमाबाई खरोखरच आई बनल्या. त्या प्रत्येक मुलीचा मुका घ्यायच्या. आपल्याकडे हें फारच विलक्षण वाटेल.

मनोरमाबाई लिहितात :

'Miss Hamlin went to her room one morning a little before the hour, . . . kneeling before her sobbing bitterly, was G——. The night before she has diobeyed Ramabai, and in punishment the good-night kiss had been omitted, which clearly broke her heart. Ramabai explained that the Hindus do not generally caress their children after infancy ; and it seems strange and delightful, especially to poor little widows, to receive any show of affection. At

१. प्रबोधनकार ठाकरे कृत पंडिता रमाबाई : पृष्ठ ४५.

first she kissed only her own child, then the others seemed to wish it, and now the most orthodox came for a kiss and a loving word'[1]

('एक दिवस मिस् हॅम्लिन ठराविक वेळेच्या किंचित् आधीं रमाबाईंच्या खोलीकडे गेल्या. तेथें बाईंच्या पुढ्यांत गुडघे टेकून बसलेली व हुंदके देत असलेली गो.....त्यांच्या नजरेस पडली. झाले होतें काय कीं आदल्या रात्रीं तिनें बाईंची कांहीं अवज्ञा केली होती व शिक्षा म्हणून बाईंनीं नेहमींच्या पद्धती-प्रमाणें निजायला जाण्याच्या आधीं तिचा मुका घेतला नव्हता. ह्या गोष्टीमुळें तिला भयंकर दुःख झालें होतें. रमाबाई म्हणाल्या, हिंदु लोकांत बहुतकरून मुलांना तीं तान्ही असतांनाच आंजारतात, गोंजारतात. (नंतर नाहीं). त्यामुळें विशेषतः गरीब बापड्या लहानग्या विधवांना अशा तऱ्हेचें स्नेहप्रदर्शन फार विलक्षण वाटत असलें तरी मोठें विलोभनीय वाटतें. आधीं आधीं रमाबाई फक्त आपल्या मुलीचेच मुके घेत. पण त्यावेळीं दुसऱ्या मुलीहि आशाळभूतपणें पाहात. आणि आतां तर अगदीं सनातनी मुलगी सुद्धां बाईंकडून चुंबनाची व प्रेमळ शब्दांची अपेक्षा करतांना आढळते.)

शारदासदनाच्या मालकीच्या इमारतीचा उद्‌घाटन समारंभ झाला तेव्हां बाईंनीं डॉ. भांडारकरादिकांचे आभार मानले तसेच जमलेल्या पाहुण्यांनीं आपल्या स्त्रियांना त्या प्रसंगीं हजर राहण्याची परवानगी दिली म्हणून त्यांचेहि आभार मानले. त्यावर डॉ. भांडारकरांनीं उत्तर देतांना म्हटलें: 'पंडिता रमाबाईंनीं आपल्या भाषणांत आभारांची एक लांबलचक माळ ओवली आहे. ती ऐकून मला फार वाईट वाटलें. एखाद्या इसमानें लहानशा काडीनें एखादा किडा दूर फेंकून देऊन नंतर त्या काडीच्या मदतीबद्दल तिची तारीफ करावी तशांतला हा वास्तविक प्रकार झाला. सर्वस्वीं निराधार अशा एका बाईनें आपल्या उदार अंतःकरणाच्या प्रेरणेनें केलेलें हें महत्कृत्य मनांत आणलें, म्हणजे आमच्या सारख्यांच्या साहाय्यास काडी इतकीहि किंमत नाहीं हें प्रत्येकाला कबूल करावें लागेल. पंडिताबाईंची आम्हांस प्रथम माहिती म्हणजे काय ती त्यांच्या शीघ्रकवित्वाबद्दलची व त्यांच्या संस्कृत ज्ञानाची. त्यांच्याठायीं एवढी

1. Pandita Ramabai by Manoramabai पृष्ठ ११२.

मोठी कर्तबगारी आहे असें आमच्या स्वप्नींहि नव्हतें.[1] त्या येथें आल्या तेव्हां त्यांना इंग्रजी भाषेचें ज्ञान मुळींच नव्हतें. अशा स्थितींत इंग्लंडास जाऊन दोनतीन वर्षांच्या इंग्रजी अभ्यासानें परक्यांच्या भाषेंत परक्यांचें मन वळविण्याची करामत साधणें म्हणजे मोठेंच अद्भुत कृत्य होय. आम्ही दहा दहा वर्षें, बारा बारा वर्षें इंग्रजीचा अभ्यास करूनहि जी वक्तृत्वशक्ति आम्हांपैकीं पुष्कळांस असाध्य, ती ह्यांनीं अवघ्या तीन वर्षांत संपादिली. यावरून कोणालाहि यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेची कल्पना होणार आहे. बरें, अशा बुद्धिमत्तेचा तरी त्यांनीं स्वार्थ साधण्याच्या कामीं उपयोग केला काय? नाहीं. प्रथमपासून आपल्या देशांतील अनाथ विधवांची शोचनीय स्थिति नाहींशी करण्याकरतां कायावाचामनेंकरून झटण्याचा जो त्यांचा कृतसंकल्प तो शेवटास नेण्याच्या कामींच त्यांनीं आपल्या बुद्धिमत्तेचा उपयोग केला. आज अनेक वर्षें आमच्या डोळ्यांदेखत हजारों विधवा दुःसह क्लेश सोशीत आहेत. परंतु त्यांच्यासाठीं कांहीं प्रयत्न करण्याचें कधीं आमच्या गांवींहि आलें नाहीं. आणि तें काम एका यःकश्चित् मानलेल्या अबलेनें केलें....त्यांच्या कवित्वशक्तीबद्दल आरंभीं सांगितलें आहेच....आपण स्त्रियांस या समारंभास येऊं दिल्याबद्दल आपले आभार मानण्यांत त्यांनीं जो आपणास टोमणा दिला आहे तो आपण निमुटपणें सोसला पाहिजे कारण स्त्रियांसंबंधानें आपलें वर्तन तसेंच आहे.'[2]

१. ही कर्तबगारी मुंबईस शारदासदनाची स्थापना झाली तेव्हां इंदुप्रकाशमध्यें आलेल्या रिपोर्टावरून दिसून येते. इंदुप्रकाश : दिनांक १८-३-८९ च्या अंकांतील स्फुट : शारदा सदनाकरितां पंडिताबाईनीं सहा क्रमिक पुस्तकें तयार केलीं आहेत. ह्या पुस्तकांतून घालण्याकरितां त्यांनीं अमेरिकेच्या कारागिरांकडून १०,००० रुपयांचीं चित्रें आणलीं आहेत. पंडिताबाईनीं 'हिंदुस्थानांतील उच्चवर्णीय स्त्रिया' यावर जें पुस्तक लिहिलें तें अमेरिकेंत इतकें लोकप्रिय झालें कीं, त्याच्या १०,००० प्रती खपून पंडिताबाईस ५०,००० रुपये मिळाले. पैकीं २५,००० रुपये सदर पुस्तक छापण्याच्या खर्चास व बाकी उरलेले पैसे शारदासदन पुस्तक मालेच्या छपाईकडे लावायचे आहे. बाई म्हणाल्या : 'परक्या देशामध्यें परक्या लोकांच्या पैशासंबंधानें इतका विश्वास संपादन करण्यास मला काय कष्ट करावे लागले असतील याची कल्पना तुम्हांस सुज्ञांस होणारच आहे. एक पाटी आणि एक केरसुणी घेऊन मी त्या देशांतून पैसे गोळा करून आणले नाहींत.'

२. सुधारक. १ आगष्ट १८९२.

ह्याच समारंभांत मिसेस एम्. बी. डिनिंग नांवाच्या एका आंग्ल महिलेनें बाईंच्या व त्यांच्या कामाच्या स्तुतिपर एक इंग्रजी कविता म्हटली. त्या काव्याच्या शेवटल्या कांहीं ओळी अशा होत्या :

*So here today with heart and voice,*
*We people of such various race,*
*Unite as one to say, 'Rejoice'*
*'Rejoice' that in this goodly place*
*We see the fruits of toil and love*
*Rejoice that here in learning's path*
*So many feet may learn to tread,*
*Rejoice to know the good begun*
*Shall still go on when we are dead.*
*Brave Ramabai may all things fair*
*And all things pure be always thine*
*Yes, they are thine for dwelling where*
*Self and self-seeking do not come*
*Seeking the good of others, balm*
*Unto thine own souls shall be given*
*Mother of many, thou shall know*
*While still on earth, some joy of Heaven.*

नागपूरचे प्रा. भवानीशंकर पंडित ह्यांनीं वरील इंग्रजी कवितेचें खालीं दिलेलें रूपान्तर करून दिलें आहे :

पंडिता रमाबाईप्रत [अष्टाक्षरी छन्द]

*अन्तःकरणपूर्वक "एक" होऊन आपण—*
*आहों एकत्र जाहलों आज येथें सारे जण,*
*असे प्रत्येकाचा जरी वेगवेगळाला वंश*
*तरी आलों आनंदानें करावया "जयघोष."*
*आनंदानें—कारण ह्या पुण्यभूमीवरी साची—*
*आपणांस दिसतीं हीं फळें प्रेमाचीं—श्रमाचीं;*
*आनंदानें—कारण ह्या येथें ज्ञानमार्गावरी*
*तीव्र जिज्ञासु पाउलें पडतील कितीतरी;*
*आनंदानें—कारण कीं शुभकार्याचा आरंभ—*
*आम्ही गेलों तरी, पुढें चालेल हा अ-विलंब.*
*वीरे रमे ! प्राप्त होवो तुला सदासर्वकाळ*

जें जें पवित्र पावन, जें जें सुंदर सोज्वळ;—
तुझेंच तें सारें सारें, कां कीं तेथें तुझा वास—
तेथें नाहीं अहंभाव आणि नाहीं स्वार्थपाश.
परहितसाधनांत तुझा अंतरात्मा लीन
म्हणून हें सारें कांहीं तुला व्हायाचें अर्पण.
तुला पटेल निश्चिती अगे ! अवघ्यांचे आई—
स्वर्गसुखाची प्रतीति ह्याच डोळां, ह्याच देहीं !

ह्यावेळीं मुलींनीं स्वतः रचलेलीं गाणीं म्हटलीं. त्यांतील एक असें होतें.

धाव धाव प्रभो, पाव सख्या भगवंता
मज दुर्धर जडली चिंता ॥ धृ०॥
गुज सांगुं कुणा तुजवांचुन इतरांहीं
दुर्दैवें पिडिलें मजशीं
आहे विधवा मी हीन दैव परदेशी
वय अल्पचि सासुरवाशी
चाल : नाहिं लेश सुखाचा मजला
आनंद दीप कीं विझला
मम रडुन पदरही भिजला
करूं गत कैशी न सुचे कांहीं आतां
मज दुर्धर जडली चिंता १
पांचवे वर्षी लग्न पहा मम झालें
वहु वृद्ध पती निर्मीले
साठ वर्षांचें वय त्यांचें मग कळलें
आप्तवर्ग तिकडे वळले
चाल : मायेचें कोणी न उरलें
शत रुपयांशीं मज विकिलें
सर्व सौख्य त्वरितचि सरलें
कधिं पाहिली का मजसम दुःखी दुहिता
मज दुर्धर जडली चिंता २

ही कविता बरीच मोठी आहे. पुढें पतिनिधनाचा अपरिहार्य प्रसंग, आईबापांचा मृत्यु, सासरच्यांचा अमानुष छळ, न्हाव्या पुढचा प्रसंग, इत्यादि हृदयद्रावक ओळी ह्यापुढें आहेत.

त्या वेळच्या एका बालविधवेला बाईनीं स्वतःच एक स्त्रीगीत रचून दिलें असल्याचें ती सांगते. त्यापैकीं केवळ एक ओळ तिला आतां आठवते ती अशीः

'सास्वा झाल्या दारोंदार हजार नणंदा'

असो.

पुण्यास मोठा विरोध असतां तेथेंच रमाबाईंनीं शारदासदन नेलें त्याबद्दल बाईंच्या हितचिंतकांना मोठी भीति वाटूं लागली तर कित्येक शत्रूंना गुदगुल्या होऊं लागल्या. पण झालें वेगळेंच, पुण्यास आल्यापासून शारदासदनाची चांगलीच भरभराट होऊं लागली. मुंबईहून शारदासदन हालविण्यांत आलें तेव्हां त्यांत १८ विधवा मुली वसतीगृहांत होत्या. १८९३ मध्यें जेव्हां फारच जोरांत वादळ उठलें त्या वेळीं ५३ मुली सदनांत आल्या होत्या, आणि हें वादळ होऊन गेल्यावर व पंडिता रमाबाई नांवाची एक राक्षसीण मुलींना बाटवीत आहे असा जेव्हां भडका उडाला तेव्हां तर जाचांत असलेल्या विधवांचें त्या सदनाकडे अधिकच लक्ष वेधलें व मुलींची संख्या अधिकच वाढली. राक्षसीण असली तरी आमचा सांभाळ तर करते आहे ना, मग आम्ही तिच्याकडेच धांव घेणार असें त्या म्हणूं लागल्या व अपेक्षेप्रमाणें बाईंचें काम मुलींच्या अभावीं मुळींच अडून राहिलें नाहीं.

बाईंना जरी गांवांत सक्त विरोध होता तरी हरि नारायण आपटे, वामन आबाजी मोडक इत्यादि मंडळींस त्यांच्याविषयीं फार आदर असे व तो व्यक्त करण्याची संधी ते कधीं वायां जाऊं देत नसत. 'एकदां हरिभाऊ व त्यांचे उत्साही स्नेही ह्यांनीं मिळून मेहेंदळ्यांच्या बागेंत पंडिता रमाबाई व मिस् हॅम्लिन ह्या दोघींना मोठी मेजवानी दिली. हरिभाऊ आदिकरून त्यांचे स्नेही व त्यांच्या पत्न्या यांनाहि मुद्दाम बोलावलें होतें. त्यालाच कोणीं सहभोजन असें नांव दिलें. हरिभाऊंच्या घरीं हें कळतांच त्यांना ह्या बाडगेपणाबद्दल बरींच बोलणीं खावीं लागलीं'.[1]

---

१. वेणूबाई पानसेकृत 'हरि नारायण आपटेः' पृष्ठ ११७.

रमाबाईंच्या शारदासदनाच्या कार्याचा परिणाम यवद्वीपच्या (Java) एका राजकन्येवर, तिच्या देशभगिनींवर किंबहुना संपूर्ण इंडोनेशियावर कसा झाला हें, दर वर्षी २१ एप्रिलला, साऱ्या इंडोनेशियांत ह्या राजकन्येचा जो जन्मोत्सव करण्यांत येतो त्यावरून दिसून येतें. ह्या संस्मरणीय राजकन्येचें नांव कार्टिनी असें होतें. ती आदिपति सास रोनिंग्रथ राजाची दुसरी कन्या. इंडोनेशिया त्या वेळीं डचांच्या जोखडाखालीं खितपत होता. आपल्याकडे जसे संस्थानिक होते तसेच तेथेंहि संस्थानिक होते. ते व तेथील बहुतेक प्रजाहि मुसलमान होती, त्यामुळें स्त्रियांना वयाच्या बाराव्या वर्षानंतर घराच्या बाहेर पडणें हें सामाजिक पातक समजण्यांत येई. स्त्रीशिक्षणाची कल्पनाच कोणी करूं शकत नव्हता. मात्र ह्या गोष्टीला कांहीं फारच थोडे अपवाद होते. बऱ्या डच सरकारी आफिसरांच्या उत्तेजनानें कार्टिनीला व तिच्या बहिणींना प्राथमिक शाळेंत जाण्याची परवानगी मिळाली होती. ह्या शाळांत इंडोनेशियन नसलेल्या सरकारी अधिकाऱ्यांच्या वगैरे मुली शिक्षण घेत. तेथेंच कार्टिनीला फ्रेंच वाचतां येऊं लागलें होतें. एकदां एका फ्रेंच वर्तमान पत्रांत रमाबाईंच्या कामाविषयीं तिनें वाचलें. व आपल्या देशांतहि स्त्रियांची प्रगति व्हायला हवी ही कल्पना त्या मुलीच्या लहानशा डोक्यांत घोळूं लागली. तिनें युरोपमध्यें पुष्कळशा पत्रमैत्रिणी (Pen Friends) मिळविल्या.[१] आपल्या चार भिंतींच्या आंत बसून करतां येईल तें ती करूं लागली, व तिच्या खटपटीनें स्त्रीशिक्षणास सुरुवात झाली. स्वतः तिनें युरोपमध्यें जाऊन शिक्षण घेण्यासाठीं एक सरकारी शिष्यवृत्ति मिळविली. पण तिचा तिनें प्रत्यक्षांत स्वीकार केला नाहीं कारण त्यामुळें तिच्या कुटुंबियांना अतिशय दुःख होणार हें तिला कळून चुकलें, कारण

'Kartini too had to obey the hard rules of Javanese 'adat' and so on reaching the age of twelve she was forced to stay at home; the four hardest years of her life, during which this lively eager girl yearned for the world outside and even more longed to continue her lessons at school. Her books and her correspondence were her main consolation at this time.'[२]

१. श्री. वि. स. सुखटणकर ह्यांच्या आठवणीप्रमाणें Letters of a Javanese Princes नांवाचे एक पुस्तक प्रसिद्ध झालें होतें. तो बहुतेक ह्याच पत्रांचा संग्रह असेल, परंतु ह्या पुस्तकाचा कोठें आढळ होत नाहीं.

२. इंडोनेशियन कौन्शुलेटच्या पत्रांतील उतारा.

आपल्याला मिळालेली शिष्यवृत्ति तिनें दुसऱ्या एकाला देऊन टाकण्याची व्यवस्था केली. अलीकडे प्रसिद्धीला आलेले इंडोनेशियाचे 'मिनिस्टर फॉर फॉरेन अफेअर्स' एच्. ए. सेलीम हे त्याच शिष्यवृत्तीमुळें युरपमधील आपला अभ्यासक्रम पुरा करूं शकले.

कार्टिनीच्या पत्रांचा संग्रह पुढें, 'Through Darkness into Light' ह्या नांवानें प्रसिद्ध करण्यांत आला. त्यांत आपल्या ह्या कामाचें उत्तेजन आपल्याला रमाबाईंच्या उदाहरणानें प्राप्त झालें असें तिनें म्हटलें आहे. तिच्या कामाचा हा आराखडा देतांना वर उल्लेखिलेल्या इंडोनेशियन एम्बेसीच्या पत्रांत असें म्हटलें आहे कीं :

'. . . the letters in which she set out her thoughts, her hopes and her ideals, these remained, and it was these thoughts and ideas which lit the torch she herself was not able to carry nor even to lift, but which since then has been taken up by others and now illuminates the path leading Indonesian women, through a period of strife and hardship, to their rightful and responsible place in the community . . .'

आतां ह्याच देशांत स्त्रिया सर्व तऱ्हेचें शिक्षण घेत आहेत व राष्ट्राच्या प्रगतींत हातभार लावीत आहेत. परंतु ज्ञानदीप पेटविणाऱ्या ह्या राजकन्येला त्या देशच्या 'अदत' प्रमाणें अल्प वयांत विवाहबद्ध व्हावें लागलें व वयाच्या २५ व्या वर्षीं पहिल्या बाळंतपणांत तिला मृत्यु आला.

पश्चिमेकडील एका राणीनें रमाबाईंच्या कार्याबद्दल ऐकून भारतांत त्यांच्या सूचनेप्रमाणें स्त्रियांसाठीं विशेष वैद्यक सोय लावली, तर पूर्वेकडील एका राजकन्येनें स्त्रीशिक्षणाची व स्त्रीस्वातंत्र्याची मशाल पेटविण्यासाठीं रमाबाईंकडून स्फूर्तीची ज्योत आपल्या देशांत नेली.

## १५ आश्रमवासिनी

शारदा सदनांत आलेल्या विद्यार्थिनींच्या गोष्टी मोठ्या हृदयद्रावक आहेत. कित्येक तर कल्पित कादंबऱ्याच वाटतील. त्या त्या परिस्थितींत फोटो काढून घेतले होते ते पाहून त्या खऱ्या असल्याचें पटतें.[1]

ह्या प्रकरणांत अशा कांहीं गोष्टी दिल्या असून एका बाबतींत मुलगी सदनांत न घेतल्यामुळें लावण्यांत आलेला अन्वयार्थहि दिला आहे.

पहिलीच गोष्ट त्या बारा वर्षांच्या तिरळ्या कुरूप मुलीची सांगतां येईल. तिला एका कनवाळू शेजाऱ्यानें रमाबाई इंग्लंडला जाण्यापूर्वी त्यांच्याकडे आणून पोंचविलें होतें. तिलाच पाहून अशा तऱ्हेच्या सदनाची बाईंना जरुरी भासली. १८९० सालीं पुण्यास जरा स्थिरस्थावर झाल्यावर-रमाबाई माळहेरंजी व गंगामूळ येथें जाऊन आपल्या मातापित्यांच्या निवासस्थानानें पुनीत झालेल्या पवित्र स्थलांना भेट देऊन आल्या. त्यांचे सावत्र बंधु रामशास्त्री दिवंगत झाले होते. पुत्रप्राप्तीसाठीं त्यांनीं दोन बायका केल्या होत्या. त्यांच्यापैकीं धाकटी मनकर्णिका ही जवळजवळ बालविधवाच होती. तिला व आपल्या नात्या-गोत्यांतील आणखी तीनचार विधवांना येतांना रमाबाई पुण्यास घेऊन आल्या. त्यांपैकीं एक रुक्मिणीबाई ही त्यांची लांबची सून लागत होती. रुक्मिणीबाई अद्याप हयात असून केडगांव मुक्कामीं त्या आहेत.[2] वरतीं एका स्त्रीगीताची ओळ दिली आहे तें गीत रमाबाईंनीं रुक्मिणीबाईंनाच जुळवून दिलें होतें.

ह्या रुक्मिणीबाईंची कथा फारच हृदयद्रावक आहे. ती एक बालविधवा होती. तिच्या सासूसासऱ्यानें तिचा अनन्वित छळ मांडला होता. आढ्याला

---

१. त्या पैकीं कांहीं फोटो ह्या पुस्तकांत इतरत्र आढळतील.

२. ता. २३ जानेवारी १९६० ला केडगांवीं दिवंगत झाल्याचें कळतें.

दोर बांधून त्यावर तिला घोडी देत—म्हणजे वरती आढ्याला बांधलेल्या दोरीला टांगीत—तिनें खालीं उडी टाकूं नये म्हणून खालीं काटे किंवा निखारे पसरीत. अशा रीतीनें विचारीला तास न् तास लोंवकळत रहावें लागे. हिला तिच्या सासूसासऱ्यांच्या हातून सोडवायचें कसें हा मोठा प्रश्न होता.

बाईंनीं सर्वांना पुणें दाखविण्याचें आमंत्रण दिलें व तें सर्वच लटांबर घेऊन त्या पुण्यांत दाखल झाल्या. पुण्यास आल्यावर हळूं हळूं रुक्मिणीबाईची भीति नष्ट झाली व तिनें एक दिवस आपल्या सासूला स्पष्ट सांगितलें कीं ह्यापुढें मी परत येणार नाहीं. आपल्या 'त्यो'[1] बरोबरच ह्यापुढें जन्मभर राहणार.

रमाबाईंचें एक चिकटबुक आमच्या हातीं आलें आहे त्यांत त्यांनीं अशा बऱ्याच गोष्टी लिहून ठेवल्या आहेत. त्यांतील ही ताराबाईची गोष्ट पहा. मोठी हृदयद्रावक वाटते.

७ एप्रिल १८९२ रोजीं रमाबाईंना गिचमिड अक्षरांत एक पत्र आलें. त्यावर पत्ता किंवा तारीख नव्हती व अक्षर मुद्दामच गिचमिड काढलें असल्याचें तेव्हांच लक्षांत येत होतें. एका लहानग्या बालविधवेकडून तें आलें असून त्यांत तिची हलाखीची परिस्थिति व होणारा छळ ह्यांचें वर्णन केलें होतें. ह्या पत्रांत सविस्तर माहिती नव्हती, तरी जें होतें त्यानें बाईंच्या डोळ्यांना टचकन पाणी आलें. ह्या मुलीला शोधायचें तरी कसें व तिचा पत्ता काय हें एक मोठें कोडें बाईंच्यापुढें येऊन उभें राहिलें. त्यांनीं परमेश्वराची मनापासून प्रार्थना करण्यास सुरुवात केली कीं हे देवबाप्पा मला ह्या मुलीला सोडविण्याचा मार्ग तूं दाखीव. सहा आठवडे झाले. त्या पत्राच्यानंतर त्या मुलीविषयीं आणखी कांहीं बातमी लागेना. त्यांची तिच्याबद्दल अखंड प्रार्थना चालूच होती. मे महिन्यांत दक्षिण महाराष्ट्रांतून एक तरुण बाई रमाबाईंच्या दारीं आश्रयासाठीं येऊन उभी राहिली. तुमच्या शाळेंत राहून शिकायाची मला संधि द्या असें ती त्यांना विनवूं लागली. रमाबाईंना कां कोणास ठाऊक, त्या बाईबद्दल भरंवसा वाटेना. त्यांनीं तिला शाळेंत न घेतां आपल्या घरांत दोनतीन दिवस ठेवून घेतलें. ही बाई आपल्या गांवासंबंधीं माहिती देताना तेथील एका बालविधवेच्या हालअपेष्टांबद्दल बोलून गेली. पण पुढें बोलतां बोलतां ती चूप झाली. तेव्हां

१. 'त्यो' म्हणजे काय ह्याचा पुढें परिशिष्ट ३ मध्यें खुलासा केला आहे.

बाईंना तिचा अधिकच संशय येऊं लागला. त्यांनीं पुनः प्रयत्न करून हळूं हळूं तिच्याकडून त्या मुलीचें नांव व पत्ता काढून घेतला. हा पत्ता व नांव द्यायला तिनें फारच आढेवेढे घेतले त्यामुळें येथें कांहीं पाणी मुरतें आहे असें बाईंच्या लक्षांत आलें. दुसऱ्या दिवशीं बाईंनीं आपल्या कारकुनाला एका मास्तरणीबरोबर त्या गांवीं प्रत्यक्ष तपास काढून आणण्यास पाठविलें. जमलें तर त्या मुलीला घेऊनच या असेंहि त्यांना सांगण्यांत आलें. पण तीं गेल्यानंतर तीन चार दिवस त्यांच्याकडून कांहींच निरोप न आल्यानें बाईंना काळजी वाटूं लागली. इकडे ती पाहुणी आपला खरा रंग दाखवूं लागली. ती बरीच अस्वस्थ दिसूं लागली. मुलींत मिसळून त्यांना वाईट साईट गोष्टी ती शिकवूं लागली. तेव्हां बाईंनीं तिला अगदीं वेगळें काढून एका बाजूला ठेवलें. तेथून पळून जाण्याचा तिचा प्रयत्न चौकीदारानें विफल केला. त्या मुलीचा पत्ता लागेपर्यंत बाईंच्या मनांत तिला जाऊं द्यायचें नव्हतें. म्हणून तिला जवळजवळ एक प्रकारचा तुरुंगवासच भोगावा लागला.

बाई म्हणतात : ‘तिला अशी दाबून ठेवण्याचा हेतु इतकाच होता कीं तिनें परत आपल्या गांवीं जाऊन मुलीच्या छळवाद्यांना सावध करूं नये. म्हणून खूप काळजी घेऊन व मोठ्या परिश्रमानें तिला कसेंतरी आणखी एक [illegible] ’

दुसऱ्या दिवशीं ११ वाजतां बाइचीं माणसें त्या मुलीला घेऊन आलीं. तिला मुलाचा पोषाख घातला होता. त्या वेळचें तिचें चित्र घेतलें आहे. हीं माणसें फाटकांतून आंत शिरत होतीं तशीं त्या बाईच्या नजरेस पडलीं आणि तिनें मुलीला चटकन ओळखलें. परंतु रमाबाईंनीं घाईघाईनें त्या मुलीला लपविलें. अशी अल्पवयीन मुलगी तिच्या ‘गार्डियन’च्या घरांतून पळवून आणणें एक गुन्हा आहे व ह्या बाईनें मुलीच्या घरीं जाऊन कांहीं आग लावूं नये अशी रमाबाईंची सहाजिकच खटपट होती. म्हणून दुपारीं त्यांनीं त्या बाईला हवें होतें तेथलें तिकीट काढून गाडींत बसवून पाठवून दिलें.

ह्या मुलीचें नांव राधा होतें. रमाबाईंनीं तें नांव बदलून तिला तारा असें नवीन नांव दिलें. ही एक ब्राह्मणाची मुलगी होती. पांचव्या वर्षीं तिला तिच्या बापानें ४५ वर्षांच्या एका ब्राह्मणाला १०० रुपये घेऊन देऊन टाकली होती. विवाह झाल्यावर एका वर्षानें तिला वैधव्य आलें. ह्या मुलीला तिच्या आई-

बापांनीं सोडूनच दिलें होतें. त्यांनीं तिची वास्तपूसहि केली नाहीं. तिला आपल्या सासूकडे राहावें लागलें. घरांत दीर व जाऊ होतीं. ह्या तिघांच्या जाचांत वयाच्या पांचव्या वर्षापासून हें विचारें अज्ञ अर्भक सांपडलें होतें. त्या तिघांनीं तिचा अमानुष रीतीनें छळ चालविला. इतक्या लहानपणापासून तिला मरेमरे तों काम करावें लागे. वर सगळ्यांकडून एकसारखी शिव्यांची लाखोली सकाळपासून तों रात्र पडेपर्यंत चाललेली असे. ह्याशिवाय मार मिळे तो वेगळाच. डाग दिल्याचे वण तोंडावर व अंगावर तिनें जन्मभर वागविले होते. प्रेमाचा शब्द तिला आपल्या स्वप्नांत कधीं ऐकायला मिळत नव्हता. उठतां लाथ व बसतां बुक्की असा तिचा खुराक होता. तिचा दीर म्युनिसिपालिटींत ८–९ रुपयांवर नोकर होता. त्याला आपल्या संसाराचा गाडा हाकण्यासाठीं खाणावळीचा जोडधंदा चालवावा लागत होता. व त्याची उष्टीं खरकटीं काढण्यांत, भांडीं घासण्यांत व पाणी वाहण्यांत तिचा सारा वेळ जात असे. अशीं वयाचीं आणखी सहा वर्षे गेलीं. आतां ती ११ वर्षांची झाली होती. आतां तिच्या गळ्यांत स्वैंपाकहि पडला होता. माराचा व शिव्यांचा खुराक मुळींच कमी झाला नव्हता. उलट वृद्धिंगत होत होता. पुढें पुढें तर तिला पाव मैलावरून रोज ३०–४० घागरी पाणी आणावें लागे.

तिचा हा छळ पाहून कांहीं लोकांना तिची दया येई तर कांहीं आपल्याला काय करायचें आहे म्हणून डोळ्यावर कातडें ओढीत. आतां हा छळ तिच्या सहनशक्तीच्या बाहेर गेला. त्याच्यांतून कसें तरी मुक्त झालेंच पाहिजे असें तिनें आपल्या मनाशीं ठरविलें. कोणी कोणी तिला पळून जाऊन 'धंदा' करण्याचा सल्ला देत. असले धंदे करणारे स्त्री-पुरुष टपून बसले होते. रमाबाईंनीं डांबून ठेवलेली बाई अशांपैकींच होती. आपल्या हातचें एक सावज निसटलें म्हणूनच तिचा तडफडाट झाला होता व म्हणूनच तिनें ताराचें नांव व पत्ता सांगतांना जीभ चावली होती. कोणास ठाऊक बिचारीचें काय झालें असतें तें. तिला पळवून नेण्यासाठीं हीं गिधाडें टपून बसलीं होतीं. पण इतक्यांत एका शेजाऱ्याला तिची दया येऊन त्यानें तिच्या संमतीनें रमाबाईंना तें गिचमीड अक्षरांचें पत्र टाकलें. पण तें टाकतांना दोघांनाहि केवढें भय वाटत होतें कीं तेवढ्यासाठीं त्यांनीं नांव व पत्ता दिला नव्हता. अर्थात् ही त्यांची क्लृप्ति अजब खरी.

रमाबाईंची माहिती असलेली एक स्त्री त्या गांवापासून जवळ राहात होती. तिनें ताराला सहज त्यांच्या शाळेविषयीं सांगितलें होतें. व नंतर शेजारच्या त्या गृहस्थाला पत्र लिहिण्याचें सुचविलें होतें, व अशा रीतीनें तें निनांवी पत्र बाईंच्या हातीं येऊन पडलें होतें.

रमाबाईंचे लोक त्या गांवीं येऊन पोंचले. पण मुलीचा तपास करून गुपचिप तिची गांठ घेणें इतकें सोपें नव्हतें. त्यामुळें पहिले दोनतीन दिवस असेच निष्फळ गेले. नंतर मात्र ताराची व त्यांची गांठ पडली तेव्हां तिला अतिशय हर्ष झाला. ती एकदम त्यांच्याबरोबर निघण्यास तयार झाली. पण तशी तिला कशी आणतां येणार? त्यांनीं तिला सारी निजानीज झाल्यावर मध्यरात्रींच्या सुमारास उठून ये म्हणून सांगितलें होतें. त्याप्रमाणें ती आली नाहीं तेव्हां बाईंचे लोक मोठ्या काळजींत पडले. पळतांपळतां ही पकडली गेली! का तिला मारबीर बसला! का मारून टाकण्यांत आलें? त्यांना कांहीं कळेना. पण पहाटेच ती त्यांच्याकडे आली व सांगूं लागली कीं रात्रीं सर्व निजानीज झाल्यावर एकदम दहाबारा पाहुणे खाणावळींत प्रगट झाले व त्यांच्या स्वैंपाकास तिला लागावें लागलें. झालें; अशा रीतीनें पहिल्या दिवशींचा बेत पाहुण्यांनीं फसविला. आतां पुनः आज रात्रीं प्रयत्न करीन असें घाबऱ्या घाबऱ्या सांगून ती परतली. त्या रात्रीं मात्र ठरल्याप्रमाणें ती हजर झाली. तिला बाईंच्या लोकांनीं ताबडतोब मुसलमानी मुलीचा पोषाख चढविला आणि तिघे स्टेशनवर येऊन पोंचले. त्यांच्या मागोमाग चारपांच पुरुष मंडळीला घेऊन तिची जाऊ स्टेशनवर येऊन पोंचली. त्यांना पाहून ह्या लोकांना काय झालें असेल ह्याची कल्पनाच करायला हवी. तारा तर जवळजवळ मेल्यासारखी झाली. ते शोधीत शोधीत त्यांच्या अगदीं जवळ आले. त्यांनीं कंदिल ताराच्या तोंडाजवळ नेऊन तिच्या तोंडावरील चादर सरकविली. पण काय गंमत कीं त्यांना ती ओळखूं आली नाहीं. पण त्यांनीं त्याच डब्यांत ठाण मांडलें. तेथून तिसऱ्या स्टेशनवर ताराचे कोणी दूरचे नातेवाईक होते तेव्हां ती बहुतेक त्यांच्याकडे पळून चालली असावी व तेथें ती खात्रीनें उतरणार अशा समजुतीनें ते तिसऱ्या स्टेशनपर्यंत त्यांच्याबरोबर त्यांच्याच डब्यांत बसून आले. तोंपर्यंत ह्या तिघांचा जीव जागेवर कसा राहिला देव जाणे. त्या स्टेशनवरून गाडी ढळल्यावर व जाऊबाई खालीं उतरून गेल्याची खात्री झाल्यावर त्यांच्या जिवांत जीव आला.

सकाळीं तारा आली. त्यासंबंधानें रमाबाई त्या वहींत लिहितात :

'Tara was brought home safely to me in the morning on 27th of May. You may have some idea of how happy and joyful I felt when I held Tara in my arms and kissed her. I wept for joy as I thanked the Good Heavenly Father for so wonderfully rescuing her and bringing her home to me. I do not remember of ever before feeling so happy as I did on this day.' . . . 'Tara is enjoying her new life. She often tells me, she never had any one to love her and was never so happy as she is here.' . . . 'She is like a bird of cage who has first got its liberty and it is quite a treat to see her running about and laughing with girls of her age.'

रमाबाईनीं तिला उराशीं धरलें, तिचे मुके घेतले. ह्या पिंजऱ्यांतून मोकळ्या सुटलेल्या पांखराला आनंदानें इकडेतिकडे भिरभिरतांना पाहून मला जो हर्ष होत आहे तसा पूर्वी कधीं झाल्याचें आठवत नाहीं असें त्या म्हणतात.

जिऊची गोष्ट तर एखाद्या कादंबरीला हार खायला लावील. जिऊ ही दक्षिण हिंदुस्थानांतील एका शेतकऱ्याची मुलगी. लहानपणींच एका वृद्धाशीं तिचें लग्न लावण्यांत आलें होतें. घरकारभार सारा त्या म्हाताऱ्याची बहीण चालवायची. म्हातारा आजारी पडला. जिऊ त्या वेळीं नऊ वर्षांची होती. तिच्या आईबापांच्या घरून त्यानें तिला आणविली. पण हें पाहून बहिणीला मोठा राग आला व ती त्या फणकाऱ्यांत निघून गेली. त्या आजाऱ्याची शुश्रूषा करण्याचें काम आतां त्या नऊ वर्षांच्या पोरीवर पडलें. आपल्या रोगाविषयीं त्या म्हाताऱ्यानें अनेक ब्राह्मणांना प्रश्न विचारले. त्यांच्या उत्तरां-वरून असें कळून आलें कीं जिऊच्या पुर्वजन्मींच्या कांहीं अज्ञात पातकांचीं फळें तो नवरा भोगीत आहे. त्यांतून नवऱ्याची सुटका व्हावी म्हणून जिऊच्या मागें कांहीं व्रतें उद्यापनें लागलीं. घरांतलीं सारीं कामें उरकून नवऱ्याला बरें वाटावें म्हणून तिला ग्रामदेवतेभोंवतीं शंभर प्रदक्षिणा घालाव्या लागत, त्या शिवाय इतर व्रतें होतींच आणि वरतीं नवऱ्याची सेवा. इतकें सारें करून तो बरा होण्याचें कांहीं लक्षण दिसेना. एक दिवस त्याचा जीव अगदीं घाबरा झाला. त्यानें तिला लौकर घरीं येण्यास सांगितलें. पोरगी अगदीं कंटाळून गेली होती. काम उरकून लौकर येण्याची नवऱ्याची आज्ञा!

धावपळ करीत ती आपलीं कामें उरकत होती. तशांत तिला रस्त्यानें एका बैलानें धक्का दिला. तिच्या हातांतलें पूजेचें साहित्य खालीं पडलें. मोठाच अपशकून झाला! धावत धावत घरीं येऊन पाहाते तों नवरा अत्यवस्थ. त्यानें आपल्या बापाला जवळ बोलावून मरतांना आपला सारा पैसा जिऊला द्या असें सांगितलें. पण त्याचा प्राण निघून गेल्यावर त्याच्या इच्छेला कोण मान देतो? हातोहातीं सर्व कांहीं नातलगांनीं लांबविलें. तिला बिचारीला तेवढीं शुष्क व त्रासदायक क्रियाकर्मान्तरें करीत बसावें लागलें. वर नवरा खाल्ला म्हणून जो तो नाकें मुरडत होता तें वेगळेंच. कांहीं दिवसांनीं सासरीं तिचा फार छळ होऊं लागल्यातें ती माहेरीं पळून आली. पण माहेरच्या माणसांचेंहि नवरा खाल्ला हें पालुपद होतेंच. तेथेंहि तिला सुख लागेना. एक दिवस तिच्या भावाचें लग्न निघालें. तिला घरांत कोंडून घालून लग्नसोहळा सुरू झाला. कशी तरी सुटका करून घेऊन ती लग्नमंडपांत आपल्या बापाजवळ येऊन वसली. पण तिला पाहतांच वऱ्हाडी मंडळींत एकच हाहाःकार उडाला. तिला फरफटत नेऊन त्यांनीं कड्याकुलपांत बंद करून टाकली. बिचाऱ्या जिऊला आपण असा काय अपराध केला आहे तेंच कळेना. आईबाप होते तोंवर तिला आधार तरी होता. पण ती तेरा वर्षांची होते न होते तों तिचे आईबाप वारले. आतां तर तिच्या हालांनीं सीमा गाठली. मरणाच्या अगोदर जिऊच्या बापानें तिला एक दुभती गाय व एक नारळाचें झाड दिलें होतें. ती त्यांचा उपभोग घेत आहे हें पाहून तिच्या भावजयीच्या पोटांत दुखूं लागलें. तिच्या तेवढ्याच त्या आनंदांत खो आणण्याचा तिनें चंग बांधला. जिऊ घरचीं जनावरें चारायला घेऊन जात असे. त्याच वेळीं त्या खेड्यांत कोणी मिशनरी आले. ते तेथें ख्रिस्ती धर्माचा उपदेश करीत. जनावरें चारतां जिऊचें त्यांच्याकडे लक्ष गेलें. जनावरांना चरायला सोडून देऊन ती त्यांच्याकडे जाऊन बसूं लागली. खाऊंपिऊंहि लागली. हें जेव्हां तिच्या भावाला कळलें तेव्हां त्यानें तिला खूप बडविलें. मूर्तिपूजा करण्याचें एक दिवस तिनें नाकारलें त्यावर भावानें तिला आणखी मरेमरे तों मारलें. हा छळ असह्य होऊन जीव देण्यासाठीं ती नदीवर गेली. पण तिला चांगलें पोहतां येत असल्यानें जीव देणें जमलें नाहीं. शेवटीं डोंगरावर एका वाघाच्या गुहेंत जाऊन ती निजली. हेतु हा कीं वाघोबानें येऊन आपल्याला खाऊन टाकावें.

पण त्याच दिवशीं नेमके वाघोबा कोठें दूर शिकार करायला गेले असल्यानें त्यांची व जिऊची चुकामूक झाली. इकडे जिऊ बेपत्ता झाल्यानें तिच्या भावानें पोलिसांत खबर दिली. पोलिसांनीं तिचा शोध लाऊन तिला पोलीस ठाण्यावर आणली. पोलीस अधिकाऱ्याला जिऊची सर्व हकीगत समजल्यावर त्यानें जिऊच्या भावावर खटला भरण्याचा घाट घातला. पण जिऊ साक्ष देण्यास तयार होईना. तेव्हां पोलीस अधिकाऱ्यानें तिला रमाबाईविषयीं सांगून तिला पुण्यास पाठवून देण्याची व्यवस्था केली. वाटेंतून तिला परत नेण्याचा जिऊच्या भावानें प्रयत्न केला पण तो यशस्वी झाला नाहीं. पुण्याच्या स्टेशनवर तिला उतरून घेण्यास स्वतः पंडिताबाई गेल्या होत्या. त्यांना पोलीसनें तार केली होती. पण त्यांची चुकामूक झाली. टांगेवाल्यानें जिऊला शारदासदनांत नेऊन पोंचविली. पण तेथें पोंचल्यावर आपण भलत्याच ठिकाणीं येऊन पडलों असें वाटून ती रडूं लागली. इतक्यांत बाई तेथें आल्या. जिऊला रडतांना पाहून त्यांनीं तिला विचारलें, 'तूं कां रडतेस ? तुला काय पाहिजे ?'

जिऊनें रडत रडत म्हटलें, 'मला रमाबाई पाहिजेत.'

बाईंनीं तिला कानडींत उत्तर दिलें 'मीच रमाबाई आहें.' तिला पोटाशीं धरलें, तिचे मुके घेतले. जन्मांत कोणाकडून तिला असली ही वागणूक अनुभवायला मिळाली नव्हती. त्यानंतर कित्येक आठवडे जिऊ तापानें फणफणली होती. बाईंनीं स्वतः तिच्या बिछान्याजवळ बसून तिची शुश्रूषा केली. ही मुलगी बाईंची फार आवडती होती. तिचें चांगलें शिक्षण करून बाईंनीं तिला पुढें अमेरिकेला पाठविलें व अमेरिकेंतून परत आल्यावर तिनें केडगांवीं बाईंना आपल्या कामांत खूप मदत केली.

बाई आपल्या ह्या कात्रण वहींत आणखी एका मुलीची हकीगत लिहितात :

'पुण्याजवळ २५–३० मैलांवर एक गांव आहे. तेथें ब्राह्मणाची एक बालविधवा होती. चार महिन्यांपूर्वीं (ह्याच्या खालीं तारीख २३ डिसेंबर १८९२ आहे.) तिच्या आईबापांनीं इतर नातेवाइकांच्या संमतीनें तिचे केस काढण्याचें ठरविलें, मुलीला पहिल्यापासूनच आईबाप छळीत होते. कारण एकच. ती विधवा झाली होती. तिला आपले केस काढायला नको होते. पण तिचें कोणी ऐकेना. शेवटीं त्या दिव्याची तारीख ठरली. आतां तिला एकच मार्ग उरला

होता आणिं तो म्हणजे पळून जाणें. आदल्या दिवशीं रात्रीं ती तेथील मुसलमान जहागीरदाराकडे पळून गेली. मुसलमानी धर्म स्वीकारशील तर तुला आश्रय मिळेल असें त्या जहागीरदारानें तिला सांगितलें. ताबडतोब तिच्याकडून कलमा पढवून घेऊन तिला मुसलमानी धर्माची दीक्षा देण्यांत आली. दुसऱ्या दिवशीं गांवांत बोंब झाली. जहागीरदारानें स्पष्ट सांगितलें कीं मीं तिला बोलावणें पाठवायला गेलों नव्हतों व कोणी माझ्या दारांत आश्रय मागायाला आलें तर तो मला नाकारतां येत नाहीं. तुम्हांला हवी तर तिला घेऊन जा. पण ती मुसलमान झाली आहे.

तिला कोणी नेण्यास तयार होईना. तिला सोडवून आणण्याचा मीं प्रयत्न केला पण माझा निरोपच तिच्यापर्यंत पोंचणें कठीण होतें.'

दुसरी अशीच एक गोष्ट ह्याच सुमाराला घडली. तेथेंहि आपल्याला कांहीं करतां आलें नाहीं म्हणून रमाबाईंना फार दुःख झाल्याचें त्या लिहितात. वरच्याप्रमाणेंच हीहि गोष्ट होती. फरक एवढाच कीं ह्या मुलीचें केशवपन तिला टाळतां आलें नाहीं, व त्यानंतर तिचा अधिकच छळ होऊं लागला. ही मुलगी शेवटीं पळून गेली. कोणी तिला थारा देईना. शेवटीं तिची भयंकर उपासमार होऊं लागली व तिनें अहमदनगरला आपल्या शीलाचा बाजार मांडला. तिच्याहि बाबतींत आपल्याला फार उशिरां कळलें, त्यामुळें अगदीं नाइलाज झाला असें बाई म्हणतात.

सरस्वती नांवाची अठरा वर्षांची वैश्य जातीची एक विधवा आपल्या दीड वर्षाच्या अर्भकाला घेऊन मुंबईहून पुण्यास आली. ती आठ वर्षांची असतां तिचा बाप वारला. आई लोकांचीं भांडीं घासूं लागली व त्यांतच ती वाईट मार्गाला लागली. तिला आतां आपल्या मुलीचं ओझं वाटूं लागलें तेव्हां तिनें आपली मुलगी एका कुंटणखान्याच्या बाईला विकण्याचें कबूल करून तिचे पैसेहि घेतले. त्या वेळीं पोरगी आठ वर्षांची झाली होती. तिला विशेष कांहीं कळत नव्हतें तरी आपली आई कांहीं तरी चमत्कारिक वर्तन करीत आहे हें तिनें ओळखलें व बचावासाठी तिनें शेजाऱ्याकडे धाव घेतली. कांहीं तरी विशेष चाललं आहे असें शेजाऱ्याच्या ध्यानांत आलेंच होतें. त्यानें काय आहे त्याचा शोध लावून मुलीची दया येऊन तिच्या आईनें कुंटणखान्याकडून तिची जी किंमत घेतली होती ती भरून पोर आपल्या ताब्यांत घेतली

व त्यानें व त्याच्या बायकोनें तिला आपल्या पोटच्या पोरीप्रमाणें वाढविलें. त्यांनाहि मुलेंबाळें होतीं पण तीन वर्षे त्यांनीं सरस्वतीचें लालनपालन आपल्या पोटच्यां पोरीप्रमाणें केलें. ती ११ वर्षांची झाल्यावर त्यांनीं तिचें एका चांगल्या माणसाशीं लग्न लाऊन दिलें. सरस्वतीला एक मूल झालें. त्यांचा संसार मोठा सुखाचा चालला होता. पण तें सुख तिला फार लाभलें नाहीं. तिचा नवरा एकाएकीं हृदयविकारानें वारला. त्याला केवळ एक बहीण होती. तिनें व तिच्या नवऱ्यानें सरस्वतीचा सारा पैसा गिळंकृत करून तिला जाचण्यास सुरुवात केली. कोठें काम मिळालें तर तेथें पातकी पुरुषांचा ताप. शेवटीं ती आपल्या कल्याणकर्त्या शेजाऱ्याकडे गेली. पण आतां तो वृद्ध झाला होता व त्याला तिचा व तिच्या मुलाचा संभाळ करणें शक्य नव्हतें. शेवटीं मूल कोणाच्या तरी दारांत टाकून द्यायचें व आत्महत्या करायची असें तिनें ठरविलें. इतक्यांत कर्मधर्म संयोगानें रमाबाईंची माहिती असलेल्या एका बाईची व तिची गांठ पडून तिनें बाईंना तिच्याबद्दल लिहिलें. बाईंचें उत्तर येतांच तिला पुण्यास पाठवून द्यायचें असें त्यांचें आपसांत ठरलें. पण त्याच रात्रीं सरस्वती धावपळ करीत त्या बाईकडे आली व म्हणूं लागली, आत्तांच्या आत्तां मला पाठवा आज रात्रीं माझ्या अब्रूवर घाला पडणार—नाहीं तर हें मूल तुमच्या दारांत टाकून मी अफूची गोळी खातें. तशी त्या बाईनें तिच्या हातीं रमाबाईंना एक पत्र देऊन तिला गाडींत बसवून दिलें. पुण्याच्या स्टेशनवर उतरतांच पुनः तिच्यामागें टोळभैरव लागले. चल, तुला पंडिता रमाबाईंकडे नेऊन पोंचवितों असें सांगून त्यांनीं तिला कुठल्या कुठें नेलें. तिला संशय येऊं लागला. कारण शारदासदन स्टेशनाजवळच असल्याचें तिला मुंबईस कळलें होतें. ती अडून बसली, पुढें पाऊल टाकीना. इतक्यांत तिच्या नजरेस एक पोलीस पडला व त्याच्याबरोबर ती शारदासदनाच्या रस्त्याला लागली. परंतु ते टोळभैरव तिचा पाठलाग करीत शारदा सदनाच्या फाटकापर्यंत आलेच. ती बिचारी घाबरून आपल्या बाळीला उराशीं धरून फाटकाशीं उभी होती, रमाबाई कोठें बाहेर गेल्या होत्या त्या इतक्यांत परत आल्या आणि त्यांनीं तो प्रकार पाहून सरस्वतीला आंत जाण्यास सांगून त्या त्या लोकांकडे पाहत उभ्या राहिल्या. बाईंची क्रुद्ध चर्या पाहतांच त्या टोळांनीं तेथून पोबारा केला.

सरस्वतीबद्दल मुंबईहून तांतडीचें पत्र आलेंच होतें पण त्याचें उत्तर

द्यायच्या आधींच बाई रमाबाईंच्या आश्रयाला येऊन उभी राहिली. रमाबाईंनीं तिची विचारपूस करून तिला आश्रय दिला. त्या म्हणतात: 'बिचाऱ्या सरस्वतीच्या अंगावरील चिंध्या व तिचें तें काळवंडलेलें व खप्पड झालेलें तोंड पाहून मला किती भडभडून आलें हें कसें वर्णन करून सांगूं? आणि तिच्या कडेवरील मुलगी तर एखाद्या माकडाच्या पिलाच्या हाडाचा सांगाडाच दिसत होती. तिच्याकडे अगदीं पहावत नव्हतें. मीं व माझ्या मुलींनीं तिला सुखी करण्याचा अटोकाट प्रयत्न चालविला. तीन आठवडे आम्ही तिला माणसांत आणण्याचा प्रयत्न करीत होतों. पोटभर खात जा व निजत जा असें मीं तिला सांगून ठेवलें होतें. हळू हळू तिची प्रकृति सुधारली व ती प्रफुल्लित दिसूं लागली. तिची मुलगी मात्र कित्येक दिवस माणसाळली नाहीं. कोणीहि जवळ आलें कीं तें आपल्याला मारायला येत आहे असें तिला वाटे. तिनें मनुष्य-प्राण्याची एवढी भीति घेतली होती. बिचारीच्या आठवणींत आपल्या आईखेरीज कोणीच तिच्याशीं प्रेमळपणें वागलें नसावें व तिला एकसारखा मार खावा लागला असावा. कांहीं केलें तरी कित्येक दिवस आम्हाला कोणालाच तिला हसवितां आलें नाहीं, शेवटीं एकदां माझ्या ध्यानांत आलें कीं हिला फुलें आवडतात. आणि मग आम्हाला जें साधलें नाहीं तें त्या फुलांनीं करून दाखविलें. ती हळूं हळूं हसती बोलती झाली व आम्हां सर्वांना त्या माय-लेकींनीं एक प्रकारचा विजय प्राप्त करून दिला.'

आमच्या हातीं आलेल्या कात्रणवहींत बाईंनीं लिहिलेल्या कित्येक पत्रांचे उतारे आहेत. त्यांत असल्या आणखी कितीतरी गोष्टी आहेत. हालअपेष्टा सोसून मग शारदासदनासारख्या ठिकाणीं राहण्याचें भाग्य ज्या दुःखी निराश्रित जीवांना लाभलें त्यांचा आनंद केवळ त्याच एक जाणोत, इतरांना त्याची कल्पनाहि करतां येणार नाहीं. ज्या मुली पूर्वीं दिवाभीताप्रमाणें कोठें तरी तोंड लपवून घाबरून बसायच्या त्या आतां ह्या मोकळ्या वातावरणांत फुलपांखरां-सारख्या धाऊं खेळूं लागायच्या. ज्यांना प्रेम म्हणजे कशाशीं खातात ह्याची कल्पनाहि करतां येणें शक्य नव्हतें, त्यांच्यावर रमाबाईंच्या प्रेमाचा नुसता वर्षाव व्हायचा. त्या त्यांच्याशीं नुसत्या गोड बोलायच्या एवढेंच नाहीं तर त्यांना पोटाशीं धरून गोंजरायच्या. त्यांचे मुके घ्यायच्या. थोडक्यांत म्हणजे एखाद्या प्रेमळ मातेनें करावें तेवढें त्या त्यांचें करायच्या. आणि ह्यांत लाघवी-

पणा, ढोंग, देखावा वगैरेचा मागमूसहि नसे. आंत एक आणि बाहेर एक असा बाईंचा स्वभावच नव्हता. त्यांच्या ह्या वागण्यामुळें बहुतेक मुलींना तीच आपली आई आहे असें वाटायचें. त्या त्यांना म्हणायच्याहि आईच. आईच्या प्रेमाला आंचवलेल्या जीवांच्या त्या खरोखरच आई होत असत.

आतां ह्या चित्राशेजारीं हें चित्र ठेऊन पाहा. सदनाला भेट देणाऱ्या एका संस्थानिक शहाण्याला तेथील फुलपांखरांप्रमाणेंच मुलींचेहि आनंदी चेहरे पाहून संताप आला व त्यानें हे उद्गार काढले : 'विधवांसाठीं विद्यालय? विधवांना सुखाची व विद्येची अपेक्षा करण्याचा काय हक्क आहे? ह्यांची सेवा घेण्यास ह्यांना ना नवरे ना मुलगे! त्यांची किंमत रस्त्यावरील कावळ्याकुत्र्यांहून अधिक नाहीं. त्यांच्यासारखें रहावें त्यांनीं! एखादा भाकरीचा तुकडा नाहीं तर मूठभर धान्य सहज मिळण्यासारखें आहे.'[1]

ह्या संस्थानिकाइतकी हीन वृत्ति बोलण्यांत न दाखविणाऱ्यांनींहि ह्या अभागी महिलांकरितां काय केलें हें पाहिल्यास पंडिताबाईंच्या कार्याचें महत्त्व मनावर विशेष बिंबेल. सनातनी केवळ बोटें मोडण्यांत व शक्य तर ह्या कार्यांत अडथळे निर्माण करण्यांत गुंतले होते पण सुधारकांनीं तरी महर्षि कर्वे पुढें येईपर्यंत कांहीं कार्य करून दाखविलें का? डॉ० रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे ह्यांनीं १९१५ सालीं महर्षि कर्वे ह्यांच्या जीवनाचा एक लहानसा आराखडा इंग्रजींत प्रसिद्ध केला होता त्यांत ते म्हणतात : '१८९३ सालीं शारदासदना-विरुद्धची चळवळ अगदीं कमाल दर्जापर्यंत पोंचली असतांना त्याच धर्तीची एक स्वदेशी (indigenous) संस्था काढण्याबद्दल कित्येकांनीं तोंडची नुसती वाफ दवडली. पण श्री. कर्वे कार्य करण्यास पुढें येईपर्यंत ह्या तोंडी योजनांचें कांहीं झालें नाहीं. ह्या दिशेनें दोन स्वदेशी व अंशतः यशस्वी प्रयत्न केले गेले. शशिपाद बानर्जींनीं बंगालमध्यें एक आश्रम काढला होता, पण पंधरा वर्षें तो चालविल्यानंतर ते वयोमानानें थकल्यामुळें व त्यांचें कार्य चालू ठेवण्यास कोणीच पुढें न आल्यानें त्यांनीं तो आश्रम बंद केला. दुसरा प्रयत्न वीरेशलिंगम् पंतलूंचा. त्यांनीं एक लहानसा आश्रम मद्रासला काढला व पुढें तो राजमहेंद्रीला नेला. त्यांनीं आपलं सर्वस्व ह्या आश्रमासाठीं दिलें तरी

---

१. १८९१ च्या अहवालावरून.

लोकांनीं त्यांना पुरेशी मदत दिली नाहीं. तो आश्रम आज ( १९१५ त ) अस्तित्वांत आहे, पण विशेषशा सुस्थितींत नाहीं.' ही झाली साऱ्या हिंदुस्थानांतील स्वदेशी किंवा ज्याला कोणी कोणी 'हिंदु' म्हटलें आहे, अशा विधवाश्रमांची तेव्हांची कहाणी.

इकडे महाराष्ट्रांत १८९३ ते १९०३ पर्यंत काथ्याकूट करून शेवटीं रमाबाईंच्या आश्रमांतून मुली काढून त्यांचा सांभाळ करायचा असें ठरलें. त्यांपैकीं एकजण शंभर मुली घेण्यास तयार होते पण हे महाराष्ट्रीय नसून सुरतचे हरदेवराम म्हणून एक गुजराथी गृहस्थ होते. त्यांचा एक अनाथाश्रम होता. मात्र त्याची ख्याति अशी होती कीं त्यांच्या दारांत नीच जातीचीं मुलें येऊन मरत जरी पडलीं तरी त्यांचा त्या अनाथाश्रमांत प्रवेश होणें शक्य नव्हतें. रमाबाईंच्या आश्रयाला तर १९०३ पर्यंत कोणत्याहि जातीचीं अनाथ मुलें येऊन पडलीं होतीं! तेव्हां हीं शंभर मुलें त्यांच्याकडून काढून नेण्याची कल्पना जागच्या जागीं विरली. आणखी एक गृहस्थ चाळीस मुली घेण्यासाठीं पुढें सरसावले पण 'सुधारक' पत्रानें ह्या गृहस्थासंबंधीं असमाधानकारक उद्गार काढून ह्यांच्याकडे मुली पाठविण्यापेक्षां त्या रमाबाईंकडे आहेत तेथेंच राहिलेल्या बऱ्या असें जाहीर केलें त्यामुळें त्यांचेंहि नांव पुढें ऐकायला मिळालें नाहीं[१].

ह्याच अनुषंगानें पुढील उतारा पाहण्यासारखा आहे.

हा उतारा प. वा. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे ह्यांच्या आत्मचरित्रांतून उद्धृत केला आहे.[२] जनाक्का ह्या कर्मवीरांच्या धाकट्या भगिनी. त्यांचा सासरीं छळ होत असल्यानें त्यांना माहेरीं आणलें होतें. कर्मवीर म्हणतात:

'**पंडिता रमाबाई** : ह्या वेळीं पंडिता रमाबाई व त्यांचा ख्रिस्ती धर्म बराच गाजत होता. त्यांची पुणें लष्करांत शारदा सदन नांवाची एक मुलींची बोर्डिंग शाळेची संस्था होती. माझ्या बहिणीची कांहीं सोय लागते कीं काय हें पाहण्यासाठीं मी या मोठ्या धेंडाला भेटायला गेलों. बाई शांत व गंभीर दिसल्या;

---

१. Dhondo Keshav Karve A sketch by R. P, Paranjpe : पृष्ठ ५०

१. सुबोधपत्रिका: १५ फेब्रुवारी १९०३: 'आयत्या पिठावरील रांगोळ्या' ह्या लेखावरून.

२. माझ्या आठवणी व अनुभव: पृष्ठें १०३. १०४. १०५.

पण त्यांचा खिस्ती कावा बरेंच बोलणें झाल्याशिवाय दिसण्यासारखा नव्हता. बाई माझ्या बहिणीस आपल्या पंखाखालीं घेण्यास तयार होत्या. त्यांनीं माझ्यासारख्या बाहेरगांवाहून नुकत्याच आलेल्या बावळटाला पाहिलें व माझ्या बहिणीच्या निराधारपणाची कहाणी ऐकली, तेंव्हां त्या एकेक अटी घालून आपलें जाळें विणूं लागल्या. त्या म्हणाल्या कीं, मुलगी त्यांच्या स्वाधीन केल्यावर पांच वर्षें तिला सुट्टी वगैरे मिळणार नाहीं. तिला आमचे घरीं पाठवणार नाहीं. आम्ही मुलीच्या शिक्षणक्रमांत अडथळे आणूं. ह्याचा सरळ अर्थ मला तरुण हिंदुला कळेना. मुलीच्या हिताच्या दृष्टीनें ही अट अवश्य होती; असें बाईंचें मत पडलें. पण ज्या नवमताचें पाणी ही पंडिता प्याली होती. त्याचे चार थेंब माझ्याहि पोटांत गेले होते. मीं उत्तर दिलें, 'बाई, शिक्षणांत अडथळे आणण्यासाठीं मी बहिणीस तुमच्याकडे पाठविण्याचें नाकारीन हें खरें कारण नाहीं. तिनें खिस्ती होण्यास आम्ही अडथळे आणूं ही भीति तुम्हांस असणें साहजिक आहे. मुलीच्या हिताची काळजी निदान तुमच्याइतकी तरी मला व मुलीच्या आईबापांना आहेच, हा विश्वास तुम्हांला असावा. तुमच्या शिक्षणानें मुलगी आपखुशीनें व अक्कलहुशारीनें खिस्ती होऊं लागल्यास निदान मी तरी अडथळा आणणार नाहीं. तिच्यावर तिला न कळत तर जबरी राहोच, पण भुलभुलावणी होऊं लागली तर तें मी सहन करणार नाहीं. बेहत्तर आहे अशी तुमची अटीतटीची मदत न मिळाली तर!

'पंडिता रमाबाईंना मी तरुण असून दिसतों तसा बावळट नाहीं, हें कळून चुकलें. त्यांनीं माझ्याविषयीं अधिक चौकशी केली. मी फर्ग्युसन कॉलेजचा विद्यार्थी आहें असें ऐकल्यावर, ह्या कॉलेजचे प्रोफेसर नास्तिक आहेत, असा त्यांनीं शेरा मारला. जखडलेल्या धर्मापेक्षां मोकळा नास्तिकपणा बरा असें माझें मत मीं त्यांना त्या वेळीं सांगितलें.'

पुढें कर्मवीर डॉ. कर्व्यांकडे गेले. ब्राह्मणेतर मुलींना घेण्याचा काळ अद्याप आला नाहीं असें त्यांना तेथें सांगण्यांत आलें. शेवटीं त्यांच्या बहिणीला मिस् भोर ह्या खिस्ती महिलेचा व मिस् हरफर्ड (ज्या रमाबाईसाहेब रानडे व पंडिता रमाबाई ह्यांना बायबल शिकण्याची तयारी असेल तर इंग्रजी शिकवीन ह्या अटीवर इंग्रजी शिकवीत त्या ह्या मिस् हरफर्ड) ह्यांचाच आश्रय व ह्यांचेंच साहाय्य मिळालें हें पाहाण्यासारखें आहे.

आपल्याला दुसरा असतो तसा दिसत नाहीं, दिसणें शक्य नसतें, कारण आपल्याला दिसते ती आपण आपल्या मनांत रंगविलेली त्याची विपर्यस्त प्रतिमा असते. ही विपर्यस्त प्रतिमा आपण आपल्या अतिशयोक्तिपूर्ण अशा आधारविरहित मतांच्या चष्म्यांतून पाहात असतों. तेव्हां आपली नजर खरोखरी त्याच्या सत्य प्रतिमेचें आकलन करूं शकत नाहीं.

कोणत्याहि विचारप्रवाहाकडे सहानुभूतीनें पाहूं लागल्यास किती तरी गोष्टींचा उलगडा चटकन होण्यासारखा आहे. परंतु पूर्वग्रह व द्वेष, सहानुभूतीला ग्रहण लावतात तर अभिमान व डौल हे सहानुभूतिस्त्रीकाराच्या आड ओढलेले अडसर असतात.

दृष्टि निर्मळ असली म्हणजे सर्व कांहीं शक्य आहे. ती गढूळ असली म्हणजे कांहींच आकलन होत नाहीं. गढूळ दृष्टीचे लोक आणखी एका साखळ-दंडानें जखडलेले असतात. त्यांना नेहमीं आपलेंच म्हणणें खरें वाटत असतें, दुसऱ्याचें म्हणणें केवळ खोटें इतकेंच नाहीं तर मुद्दाम जाणूनबुजून आपल्या विरुद्ध आहे असा त्यांचा दृढ व न पुसला जाणारा गैरसमज झालेला असतो. ह्या गोष्टीचें अगदीं उत्तम उदाहरण म्हणजे कर्मवीर शिंदे ह्यांचें रमाबाईंच्या बाबतींत बनलेलें हें मत.

कर्मवीर जर रमाबाईंच्या म्हणण्याचा विचार निर्मळ मनानें करते तर त्यांना कांहीं गोष्टी स्वच्छ दिसल्या असत्या. ब्राह्मण व ब्राह्मणेतर ह्यांच्या सामाजिक व्यवस्थेमध्यें त्या काळांत केवढा फरक होता. खुद्द कर्मवीरांच्या घरची चाल-रीत फार पुढारलेली असेल परंतु त्यांच्याच सभोंवताली त्यांच्या घराला वेढा देऊन बसलेला त्यांचा समाज त्या काळीं खात्रीनें एवढा समजूतदार व पुढें गेलेला नव्हता. ब्राह्मणांतच बालविवाह इतके रूढ होते तर ब्राह्मणेतरांत पाळण्याला बाशिंग बांधण्याचीहि पद्धति अगदीं लोकमान्य. खुद्द कर्मवीर आपल्या लग्नांत आठ नऊ वर्षांचे तर त्यांच्या पत्नीला पाळण्यांतून आणून त्यांच्या मांडीवर ठेवून लग्न लावलेलें, (पृष्ठ २८) ज्या वहिणीच्या शिक्षणासाठीं ते पंडिताबाईंकडे गेले होते तिचे पति अक्षरशः अविचारी व उर्मट, त्यांना बाहेरचा नाद लागलेला व त्यांनीं द्वितीय संबंधाची बायको घरांत आणलेली. (पृष्ठ ९६). त्यांच्यांत स्त्रीशिक्षणाचें नांव नव्हतें. अशा परिस्थितींत मुलगी घरीं, त्या वातावरणांत गेली तर तिच्या मनावर काय परिणाम झाला असता,

ह्याचा विचार रमाबाईंच्या पुढें प्रामुख्यानें असला पाहिजे. हे गृहस्थ बाईंच्यावर त्या वेळेस जे पेटले होते ते त्यानंतर कित्येक वर्षांनीं तसेच पेटलेले राहिले होते हें त्यांनीं वापरलेल्या भाषेवरून स्पष्ट दिसून येतें. बाईंच्या मनांत जर कांहीं 'ख्रिस्ती कावा' असता तर आधीं 'कलमा पढा' व मग पुढें बोला असें चक्क त्यांनीं सांगितलें असतें. बाईंच्याकडच्या मुली ख्रिस्ती झाल्या त्या कशा झाल्या हें पुढें वाचकांना दिसून येईल. 'रमाबाई असोसिएशन' ह्या बावतींत किती डोळ्यांत तेल घालून होती हेंहि दिसून येईल. पण ह्या 'घेंडा'ला भेटायला हे कर्मवीर गेले तेच मुळीं आपण एका राक्षसिणीपुढें बोलणार आहों तेव्हां आपण आपला पवित्रा व्यवस्थित टाकला पाहिजे अशा तयारीनें. तेव्हां त्यांना रमाबाईंचें म्हणणें म्हणजे केवळ ख्रिस्ती काव्यापलीकडे दुसरें कांहीं दिसूं नये ह्यांत काय नवल ?

कर्मवीरांपेक्षां रमाबाईंना जगाचा अनुभव फार अधिक होता. विशेषतः असल्या मुलींचे होत असलेले हाल त्यांना प्रत्यक्ष माहीत होते. ब्राह्मणेतरांत तेव्हांच काय पण आत्तांसुद्धां मोहोतुराची चाल आहे व हीं मोहोतुरें केवळ विधवांचींच नव्हे तर नवऱ्यांनीं टाकलेल्या बायकांचीसुद्धां होतात अशीं उदाहरणें किती तरी दाखवून देतां येतील. त्यांच्यांतील तरुण मुली पळवून नेल्याचींहि उदाहरणें सांपडतील. तेव्हां आपण शिकवून सवरून तयार केलेली मुलगी खात्रीनें योग्य मार्गावर राहील एवढ्यासाठीं रमाबाईंनीं ती अट घातली असें न समजण्याचें कारण केवळ ती गढूळ दृष्टि, दुसरें कांहीं नाहीं.

आणखी एक गोष्ट ध्यानांत धरायला हवी होती कीं शारदा सदन हें विधवांसाठीं व विशेषतः बालविधवांसाठीं होतें. बालविधवांना ठाऊक नसलेल्या कित्येक नाजुक गोष्टींची माहिती विवाहित व परित्यक्ता स्त्रियांना असण्याचा संभव अधिक. अशा स्त्रियांच्या संवयींची व खोडींची संपूर्ण माहिती झाल्याशिवाय रमाबाई त्यांना आपल्या इतर मुलींत मिसळूं देत नसत. सदनांतील बहुतेक मुली बाल्यतारुण्याच्या सीमेवर असलेल्या होत्या. त्या वयांत वडीलधाऱ्या माणसांनीं फार जपायला हवें असतें. कॉलेजमधल्या ह्या तरुण पोराला ही बाजू आकलन करतांच येणें अशक्य- कर्मवीर अद्याप कर्मवीर झाले नव्हते. मॅट्रिक झाले तेव्हां ते १८ वर्षांचे होते (पृष्ठ ८५) व पुण्यास आले त्या वेळीं आपण पुरे २० वर्षांचे देखील नव्हतों असें खुद्द कर्मवीरच म्हणतात (पृष्ठ ८६). कोण-

तीहि मुलगी रमाबाईंकडे आली कीं तिला ताबडतोब इतर मुलींत त्या सोडून देत नसत,[1] ही आपल्या इतर मुलींना कांहीं वाईट गोष्टी शिकवणार नाहीं अशी खात्री होईपर्यंत तिला वेगळेंच ठेवण्यांत येई. कर्मवीरांच्या बहिणीला त्यांच्या घरीं सुटीला पाठवून दर वेळेला ती परत आल्यावर तिच्या विचारांची व वागणुकीची टेहेळणी कशी करीत बसायचें? हा मोठा प्रश्न उद्‌भवण्याचें कारण मुलगी विवाहित होती, तिच्या भोंवतालचा समाज अशिक्षित होता व ती वयानें लहान होती. त्या वयांत पुष्कळ गोष्टींचे परिणाम काय होतात ह्याची कल्पना नसते. आपल्या बरोबर आणलेल्या खेड्यांतील शिदोरींतील किती वानगी आपल्या मैत्रिणींना द्यायची ह्याचें तारतम्य सांगणारणीला व ऐकणारणीला नसतें. ह्याहि गोष्टीचा विचार कर्मवीरांच्या मनांत त्या पोरवयांत येणें शक्य नव्हतें.

---

१. पृष्ठ २३५ : ओळीं २४ व २५ : पृष्ठ २३६ : ओळी ९ व १०.

## १६ वादळापूर्वी

मुलींना रमाबाई आपली आईच वाटायच्या. नुसतें त्यांचें प्रेमच नाहीं तर त्यांचें पावित्र्यहि मुलींवर परिणामकारी प्रभाव पाडीत होतें. बाई अशा तर त्यांचा धर्म असाच असला पाहिजे, त्यांचा गुरु असाच असला पाहिजे हें न सांगतां त्यांना कळत असे. शारदा-सदनांत ख्रिस्ती धर्माचा उपदेश करायचा नाहीं असें बंधन बाईंनीं स्वतःवर घालून ठेवलें होतें. धार्मिक बाबतींत ढवळा ढवळ करायची नाहीं हें एकदां ठरल्यानंतर त्यांनीं अगदीं डोळयांत तेल घालून तें आपलें व्रत पाळलें. पण त्यांच्या व्यक्तिमत्वाला त्या कसा आळा घालणार? तें तर झांकून ठेवतां येत नव्हतें? त्या म्हणत, येथें सर्वांना धार्मिक स्वातंत्र्य आहे. पण ह्याचा अर्थ मुलींनाच तें आहे व मला नाहीं असा नाहीं. त्यांच्या सल्लागार मंडळाचें म्हणणें कीं बाईंना मुलींनीं आपल्या प्रार्थनेच्या वेळेला आंत आपल्या खोलींत येऊं देऊं नये. मुली हळू हळू न बोलावतां त्यांच्या प्रार्थनेच्या वेळीं हजर राहूं लागल्या होत्या. व येथून सल्लागार मंडळींत व बाईंत फाटाफुटीला सुरुवात झाली. १८९१ च्या रिपोर्टांत बाई म्हणतात :

"My Hindu brethren thought I was Christianizing the girls. They wanted me to shut my room when I was reading the Bible and praying. I said, No! I have the same freedom to practise Christianity which these girls have to practise their religion. Why should I shut the door of my room, which I do not shut it at any other time during the twenty-four hours of the day? The Hindu friends were much offended at it, and wanted to pull our school down and raise another school on its ruins; but I am glad to say that the foundations of this school have not been on sand,

but on Eternal Rock; it stands there to this day, and will stand for ever and ever.'

धर्मस्वातंत्र्य म्हणजे ज्याला जो पाहिजे तो धर्म स्वीकारण्याची किंवा अनुसरण्याची मुभा. बाईंच्या म्हणण्याप्रमाणें मुलींना मुलींचा व बाईंना बाईंचा धर्म अनुसरण्याची मुभा असणें एवढ्यांतच स्वातंत्र्य समावत नाहीं. बाईंना जर मुलींचा धर्म आचरण्याची इच्छा झाली असती तर तो त्यांना आचरूं देण्यास कोणाची आडकाठी न येणें म्हणजे धर्मस्वातंत्र्य. पण येथें विरोध्यांचेंच केवळ नव्हे तर सल्लागारांचेंहि म्हणणें होतें कीं मुलींना प्रार्थनेच्या वेळीं, तुमच्या खोलींत येण्यास मज्जाव करीत जा. ह्याचाच अर्थ असा कीं त्यांना धर्मस्वातंत्र्य देऊं नका. ह्यावर बाईंचें म्हणणें काय होतें तें त्यांच्याच शब्दांत वर दिलें आहे.

बाईंच्या खोलीचे दरवाजे नेहमींच उघडे असत. ही त्यांची पद्धत आयुष्याच्या शेवटल्या घटकेपर्यंत त्यांनीं कधीं बदलली नाहीं. पहांटे पांच वाजतां त्या, मनोरमा व शाळेंतील एक ख्रिस्ती शिक्षकीण बाईंच्या खोलींत गाणीं म्हणून बायबलमधून शास्त्रभाग वाचीत व प्रार्थना करीत. आधीं आधीं कुतूहल म्हणून मुली बाहेरून बाहेरून डोकावून पहात. मग त्या आंत येऊन बसूं लागल्या व शेवटीं त्या प्रार्थनेंतहि भाग घेऊं लागल्या. बाईंनीं त्यांना कधीं या म्हणून म्हटलें नाहीं तसेंच कधीं जा म्हणूनहि म्हटलें नाहीं व इथेंच त्यांचा त्यांच्या सल्लागारांशीं मतभेद होता. बाईंनीं 'या' म्हटलें नाहीं हें ठीक केलें पण त्यांनीं 'जा' म्हणायला हवें होतें असें त्यांचें म्हणणें.

ही गोष्ट १८९०–९१ मधील. येथूनच वादळाचीं पूर्वचिन्हें दिसूं लागलीं. सल्लागारांपैकीं एकानें सर्वांच्या वतीनें ह्याच वेळेस रमाबाई असोसिएशनकडे राजिनामा पाठवून दिला. परंतु तो स्पष्ट नसल्यामुळें किंवा दुसऱ्या कांहीं गैरसमजामुळें दुर्लक्षिला जाऊन असोसिएशनच्या पुढच्या वर्षींच्या रिपोर्टांत सल्लागार मंडळ म्हणून ह्याच मंडळीचीं नांवें पुनः प्रसिद्ध झालीं.

---

१. बायबलः लूक ६:४८. 'तो कोणा एका घर बांधणाऱ्या मनुष्यासारखा आहे; त्यानें खणीत खणीत खोल जाऊन खडकावर पाया घातला; मग पूर आला तेव्हां ओघ त्या घरावर जाऊन आदळला, तरी तें त्यामुळें हाललें नाहीं; कारण तें मजबूत बांधलें होतें'.

ह्यावर पुण्यांतील तिघांही सल्लागारांनीं आपल्या सह्यांनिशीं तारीख १८ ऑगस्ट १८९३ रोजीं एक पत्र असोसिएशनच्या सेक्रेटरीला पाठविलें. त्यांत आपलीं नांवें सल्लागार म्हणून कशीं प्रसिद्ध करण्यांत आलीं ह्याबद्दल आश्चर्य व्यक्त करून आपला व रमाबाईच्या कामाचा कांहीं संबंध नसल्याचें अगदीं स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे. हें पत्र अनेक दृष्टींनीं फार महत्त्वाचें असल्यानें त्याचा संपूर्ण तर्जुमा खालीं दिला आहे :

पुणें : १३ ऑगस्ट १८९३

मिसेस जे. डब्ल्यू. अँड्रयूज
चेअरमन, एक्झिक्यूटिव्ह कमेटी,
रमाबाई असोसिएशन : बोस्टन.

बाईसाहेब,

मॅनेजिंग बोर्डाचें विसर्जन करण्यांत आल्यावर आमच्यापैकीं एकानें आपणांस लिहिलें होतें. (हा बोर्ड येथें आलेल्या आपल्या प्रतिनिधि मिस् हॅम्लिन ह्यांच्या संमतीनें तयार करण्यांत आला होता.) पण मिस् हॅम्लिन ह्यांनीं केलेली तरतूद तुमच्या कमेटीला मान्य न झाल्यानें शारदा सदनाच्या सल्लागार मंडळाची जबाबदारी घेण्यास आम्ही तयार नव्हतों. खाजगी रीतीनें मात्र पंडिता रमाबाईंना गरज पडेल तेव्हां मदत करण्याची आमची तयारी होती. तरी तुमच्या रिपोर्टांत पुण्याचे सल्लागार म्हणून आमचीं नांवें प्रसिद्ध झालेलीं पाहून आम्हांस आश्चर्य वाटलें. तुमच्या सांगण्यावरून बोर्डाचें विसर्जन करण्यांत आल्यानंतर आमच्या बैठकीहि झालेल्या नाहींत. सल्लागार ह्या नात्यानें गेल्या दोनतीन वर्षांत आम्ही कधीं एकत्रहि आलों नाहीं. आतां त्या बोर्डाचे अस्तित्वच नाहीं. सदनाच्या सध्यांच्या परिस्थितींत आम्हांला ह्या संस्थेशीं ह्यापुढें कांहीं विशिष्ट कारणानें आमच्या सदसद्विवेकबुद्धीला अनुसरून संबंध ठेवणेंहि शक्य नाहीं. तुमच्या कमेटीच्या (बाईशीं झालेल्या) पत्रव्यवहारांतील कांहीं विधानांमुळें उत्तेजन मिळून, पंडिता रमाबाईंनीं गेल्या दीडदोन वर्षांपासून आरंभीं आरंभीं धार्मिक बाबतींत ज्या कडक तटस्थपणानें कार्याला सुरुवात करण्यांत आली होती, व सदन चालविण्यांत येत होतें, तो आतां सोडून दिला आहे. आम्हांला असें

विश्वसनीय रीतीनें कळलें आहे कीं (We have strong reason to believe) पुष्कळशा मुलींना बाईंच्या खाजगी प्रार्थनेला हजर राहण्यास व बायबल वाचण्यास उत्तेजन देण्यांत येतें (induced) व तेथें ख्रिस्ती धर्म-तत्त्वांचें त्यांना शिक्षण देण्यांत येतें. पंडिता रमाबाईंनीं आपल्या क्रियाकारक मिशनरी वृत्तींनीं (active missionary tendencies) मुलींच्या आईबापांना व पालकांना लिहून त्यांच्या ह्या बाबतींत परवानग्याहि मागितल्या आहेत. आणि निदान एका तरी बाबतींत एकाला त्यांनीं तुम्ही स्वतःच ख्रिस्ती होऊन जा असा सल्ला दिला. दोन मुलींनीं आपण ख्रिस्ताचा स्वीकार केला असल्याचें आपल्या पालकांना जाहीर केलें आहे. संस्थेसंबंधीं मूळ जो समज होता तो असल्या वागणुकीनें नाहींसा होऊन असलें हें अतिक्रमण संस्थेची स्थिरता व जनतेचा तिच्यावरील विश्वास ढळविल्यावांचून राहणार नाहीं असें आमचें मत आहे. खाजगी रीतीनें आम्हीं त्यांची व्यक्तिशः केलेली कानउघाडणी पालथ्या घड्यावरील पाण्याप्रमाणें ठरली. सदनाचा उपयोग जर उघड उघड मुली 'बाटविण्या'साठीं (avowed proselytising) करायचा असेल तर आम्हांला ह्या संस्थेशीं कांहीं संबंध ठेवतां येणें शक्य नाहीं. ह्या आमच्या निवेदनाची दखल घेऊन आमचीं नांवें जीं सल्लागार मंडळांत अद्याप कायम ठेवण्यांत आलीं आहेत तीं काढून टाकण्याची खबरदारी घ्यावी. (take note) ह्या पत्राची एक प्रत माहितीसाठी आम्हीं पंडिता रमाबाईंकडे पाठवीत आहों.

आपले विश्वासू
आर. जी. भांडारकर
एम्. जी. रानडे
सी. एन्. भट. '

बाईंच्या चिकट बुकांतील एका कात्रणावरून दिसतें कीं ह्या पत्राला श्री. भटांचा खालीलप्रमाणें ताजा कलम होता.

'ता. क. मी हें नमूद करण्याची परवानगी घेतों कीं माझ्या संमतीवांचून गेल्या वेळच्या रिपोर्टांत प्रथमच माझें नांव घातल्याचें दिसून येतें.'

ह्या पत्राच्या वाचनानंतर सल्लागार मंडळीनें त्या वेळपर्यंत केलेल्या साह्याबद्दल असोशिएशनच्या आभारप्रदर्शनाचा ठराव पास करून हा राजीनामा संमत केला.

बाईच्या चिकट बुकांत त्यांच्या एका मुलाखतीचें कात्रण आहे. त्याखालीं १७ डिसेंबर १८९४ असें हातानें लिहिलेलें आहे. कोणतें वृत्तपत्र होतें ह्याचा अंदाज करतां येत नाहीं पण तें इंग्लिश किंवा अमेरिकन असावें असें वाटतें. पत्रप्रतिनिधि भारतांत फिरत असतां त्यानें ही मुलाखत घेतलेली दिसते. त्यांत एक प्रश्न असा होता :

'What was the immediate cause that led to the resignation of the Advisory Board ?'

मुंबईचा 'मनेजिंग बोर्ड;'[१] व मिस् हॅम्लिनच्या सूचनेवरून स्थापन करण्यांत आलेला पुण्याचा 'अॅडव्हाइजरी बोर्ड';[२] पहिल्या बोर्डाचा राजीनामा; व नंतर रेकार्डवर न आलेला पुण्याच्या बोर्डाचा १८८९–९० च्या सुमाराचा पहिला राजीनामा; त्यानंतर त्यांनीं १८९३ मध्यें स्पष्ट शब्दांत दिलेला दुसरा राजीनामा; इतका जो घोटाळ्याचा इतिहास ह्या बाबतींत ह्या चारपांच वर्षांत घडला त्याचा उलगडा बाईनीं दिलेल्या ह्या प्रश्नाच्या उत्तरांत होतो. बाईचें ह्या प्रश्नाला असें उत्तर होतें.

'जेव्हां सदन प्रथम मुंबईस उघडण्यांत आलें तेव्हां "मॅनेजिंग बोर्डा"चा असा आग्रह होता कीं सोवळ्या ओवळ्याचे नियम अगदीं कडकडीत रीतीनें पाळले पाहिजेत. त्यामुळें मला किंवा दुसऱ्या ख्रिस्ती शिक्षकिणीला स्वैपाकघरांत जाण्याची मनाई होती. त्यांचा असाहि आग्रह होता कीं सदनाच्या बाहेरहि व मुलींच्या पालकांची पूर्ण संमती व परवानगी असली तरीहि मुलींना धार्मिक ज्ञान देऊं नये.

[धार्मिक ज्ञान म्हणजे ख्रिस्ती धर्माचें ज्ञान असा बाईचा आशय दिसतो.]

'त्यांचा असाहि आग्रह होता कीं ज्या मुली कायदेशीर रीतीनें सज्ञान झाल्या असतील, ज्यांना पालक नसतील व ज्यांना स्वतःच्या आयुष्याचें धोरण ठरविण्यास हवें असेल, त्यांनाहि तें ठरविण्यास मोकळीक असूं नये. त्यांनीं मुलींना माझ्या खाजगी प्रार्थनेला हजर राहण्यास प्रतिबंध केला व मी प्रार्थना करतांना आपल्या खोलीचीं दारें बंद करून घ्यावीं असा मला आदेश

१. Report of the Annual Meeting of The Ramabai Association held March 12, 1894. पृष्ठ ३०–३१

२. 'मॅनेजिंग बोर्ड' व सल्लागार मंडळ हे शब्द बहुतेक एकाच अर्थानें वापरले असावे.

देण्यांत आला. ह्या उलट ज्या मुलींना हिंदु देवळांत जावयाचें असेल त्यांना तसें करण्यास मनाई नव्हती. थोडक्यांत म्हणजे त्यांना सदन हें एक सनातनी वसतिगृह करावयाचें होतें. अमेरिकेंतील 'एक्झीक्युटीव्ह कमेटीनें' कडकडीत तटस्थवृत्तीचें जे धोरण ठरविलें होतें त्याच्या अगदीं विरुद्ध असें हें धोरण होतें. तेव्हां त्यांचें हें धोरण अमेरिकेंतील कमेटीपुढें ठेऊन त्यांचा निर्णय मागविण्यांत आला. त्यांनीं 'मॅनेजिंग कमेटीचें' हें वागणें नियमबाह्य ठरविलें व त्यामुळें 'मॅनेजिंग बोर्डा'नें आपले राजीनामे सादर केले. मला अमेरिकेंतील कमेटीनें सांगितलें कीं संस्थेची मुख्य म्हणून मीं आपलें पूर्वींचें धोरण पुनः चालू ठेवावें, व संस्थेची मुख्य म्हणून मीं आपल्या दर्जाप्रमाणें वागावें. पुनः मी आपल्या खोलीचे दरवाजे उघडे ठेऊन माझ्या प्रार्थना पूर्वीप्रमाणें सुरू केल्या. मुली पुनः पहिल्यासारख्या माझ्याशीं वागूं लागल्या व खेळीमेळीचें वातावरण तयार झालें. माझ्या खाजगीं प्रार्थनेच्या वेळीं मुली येऊन बसल्या तर मी त्यांना येण्याची मनाई करीत नसे. त्यांच्यापैकीं कांहींजणींना पालक नव्हते. त्यांचें पालनपोषण मी करीत असतें. कांहींना आपल्या आईबापाकडून व पालकांकडून माझ्या खाजगी प्रार्थनेला येऊन बसण्याची परवानगी मिळालेली होती. कांहीं मला परवानगी विचारीत तेव्हां मी त्यांच्या पालकांना विचारून त्यांच्या म्हणण्याप्रमाणें काय करावयाचें तें ठरवी. कांहीं मुलींना सोवळें ओवळें पाळण्यास (observe caste) घरून सांगण्यांत आलेलें आहे. त्यांच्यासाठीं वेगळी जागा त्यांना देऊन जिला तिला आपल्या जाती रिवाजाप्रमाणें सर्व नियम पाळण्यास व सोवळें ओवळें करण्यास मुभा आहे.

'नंतर आम्ही पुण्यास आलों. पुण्यास आल्यावर 'ॲडव्हाइजरी बोर्ड' नेमण्यांत आलें. ह्याचें काम फक्त बाहेरील गोष्टींसंबंधीं—म्हणजे जागा घेणें, इमारती बांधणें इत्यादि संबंधीं—होतें. आंतील व्यवस्थेसंबंधीं त्यांचा कांहीं संबंध नव्हता. रा. ब. एम्. जी. रानडे, डॉ. आर. जी. भांडारकर व रावबहादूर चिंतामण नारायण भट[1] हे ह्या बोर्डाचे सभासद होते. कांहीं दिवस आमचें

१. बाई ॲडव्हाइजरी बोर्डांत भट ह्यांच्या नांवाचा उल्लेख करतात. सुरुवातीच्या बोर्डाचा त्यांना उल्लेख करायचा असल्यास देशमूख ह्यांचा उल्लेख करावयास पाहिजे. असें दिसतें कीं बाईनीं अनवधानानें चालू म्हणजे शेवटल्या बोर्डाचा उल्लेख केलेला असावा.

ठीक चाललें होतें. पण माझ्या खाजगी प्रार्थनेला येऊन बसणाऱ्या मुलींची संख्या वाढत वाढत २० पर्यंत गेली. ही गोष्ट सल्लागार मंडळाच्या निदर्शनास आणण्यांत आली. कारण आम्ही कधींच कांहीं चोरून लपून करीत नव्हतों. माझ्या खोलीचीं दारें नेहमीं सताड उघडीं असतात. त्यांनीं मला विचारलें, तुमच्या खाजगी प्रार्थनेला मुली येतात काय? त्यावर मीं होकारार्थी उत्तर दिलें. मग त्यांनीं मला म्हटलें तुम्ही त्यांचें येणें बंद करा. मीं म्हटलें, तसें करणें माझ्या विवेकबुद्धीला पटत नसल्यानें मी तसें करणार नाहीं. मग मी कडक तटस्थता पाळीत नाहीं असा त्यांनीं मजवर आरोप केला. मीं त्यांना स्पष्ट सांगितलें कीं माझ्या मुलींशीं माझे जे दळणवळणाचे संबंध आहेत त्यांवर मी नियंत्रण घालून घेणार नाहीं. मुख्य व्यक्ति ख्रिस्ती असल्यानें मुली ख्रिस्ती वातावरणांत (under Christian influence) राहाणें अपरिहार्य आहे. एखादी नास्तिक मुख्याध्यापिका जर असती तर मुली नास्तिक वातावरणांत वाढल्या असत्या. ह्यावर बोर्डाच्या सभासदांनीं आपले राजीनामे पाठविले व आपल्या सह्यांनिशीं एक पत्रक काढून सदनांत मुली पाठवूं नयेत असें पालकांना कळविलें.

अशा रीतीनें सदनांतून २५ मुली काढून घेण्यांत आल्या. त्यांपैकीं १६ विधवा होत्या. नंतर त्यांपैकीं बारा जणींना फीमेल हायस्कुलांत[१] घालण्यांत आलें.

---

१. ह्या शाळेचें नांव पुढें हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स असें करण्यांत आलें व अलीकडे सांगलीच्या राणीसाहेबांनीं दिलेल्या देणगीच्या अटीनुसार ती 'चिंतामणराव पटवर्धन हायस्कूल' म्हणून ओळखिली जाते. लोकांत तिला सामान्यतः 'हुजूरपागा' म्हणतात. ह्या शाळेसंबंधीं १९१५ सालीं डॉ. परांजपे म्हणतात. 'जरी तेथील शिक्षण कार्यक्षम आहे तरी त्यांत असें कांहीं आहे कीं जें कांहीं पालकांना आवडत नाहीं, कारण कीं A purely Hindu atmosphere can hardly be kept up, in an institution under the direct supervision of a European or Christian lady' (Dhondo Keshav Karve: A Sketch, Page 60.) ह्या कांहीं लोकांचा युरोपियनच नव्हे तर ख्रिस्ती—अर्थात् हिंदी ख्रिस्ती शाळाप्रमुखांच्या प्रत्यक्ष कारभाराला विरोध १९१५ सालींहि दिसून येतो, तो पाहतां पंडिताबाईविरुद्ध १८९१ सालीं वातावरण खवळून सोडणें किती सोपें गेलें असावें हें समजण्यासारखें आहे.

पण गम्मत अशी कीं एकीकडे हें चाललें होतें तों दुसरीकडे आश्रयाला मुली पाठवायची वेळ आली कीं हीच मंडळी पंडिताबाईंकडे धांव घेई. १८९१ सालीं जेव्हां द्वेषपूर्ण असे जोराचे हल्ले बाईंवर व त्यांच्या कामावर चालले होते तेव्हां अगदीं त्या माऱ्यांत एक दिवस सौ. रमाबाई रानडे पंडिता बाईंच्याकडे एका अनाथ विधवेला व तिच्या मुलाला घेऊन आल्या व सांगूं लागल्या कीं ज्यांचे तुमच्यावर अव्याहत हल्ले चालले आहेत त्यांच्याच विनंतीवरून ह्या अभागी बाईला मी तुमच्याकडे घेऊन आलें आहें. ह्या बिचाऱ्या अनाथ ब्राह्मण विधवेचे हाल त्यांना पहावेनात म्हणून त्यांनीं मला आग्रह करून हिला तुमच्याकडे पोहंचविण्याची गळ घातली आहे.[1]

सल्लागार मंडळींत न्या. रानड्यांसारखे विचारवंत व शांतवृत्तीचे लोक होते; पण त्यांच्याहि मनाची चलबिचल झाली. त्या सल्लागारांनीं ज्या मुलींना बाप्तिस्मा नको होते अशा मुलींची निवड करून त्यांच्या साक्षी घेतल्या. त्यांनीं सांगितलें कीं पंडिताबाईंनीं आपल्याला कधीं प्रत्यक्ष ख्रिस्ती धर्माचा उपदेश केला नाहीं. पण तेथील एक ख्रिस्ती मास्तरीण रमाबाईंच्या न कळत उपदेश करीत असे.[2] ह्या सल्लागारांनीं बाईंना जाब विचारला. तेव्हां बाईंनीं त्यांना अत्यंत गंभीरपणें तोंड दिलें.

ह्या बाबतींत पुढें कित्येक वर्षांनीं रमाबाई रानड्यांनीं मिस् फुलर जवळ असे उद्गार काढले :

The Committee was deeply chagrined and called Ramabai sternly to task. She met them, so Mrs. Ranade told me many years after, as so great a person could'.

बाईंनीं आपली दिलगिरी व्यक्त करून क्षमा मागितली नाहीं कीं आपल्यावर आलेली तोहमत खोटी असल्याचें सिद्ध करण्याच्या भानगडींत त्या पडल्या नाहींत. आपल्या ख्रिस्ती मास्तरणीकडून चूक घडली एवढें म्हणून जर त्यांनीं त्या मास्तरणीला घरीं बसविलें असतें तर सर्व स्थिरस्थावर झालें

१. MacNicol's Pandita Ramabai. पृष्ठ ८२.

२. Pandita Ramabai by Miss Fuller. पृष्ठ ३३.
ख्रिस्ती मास्तरणीच्या ह्या गोष्टीला मिस् फुलर ह्यांच्या आठवणीशिवाय दुसरा आधार दिसत नाहीं.

असतें व सल्लागार मंडळानें राजीनामे परत घेतले असते. पण ह्यापैकीं कांहींच करण्याची रमाबाईंची तयारी नव्हती.

हें सगळें चाललें होतें तरी शारदासदनाची संख्या वाढतच होती व त्यावरील पुष्कळांचा बसलेला भाव दृढ होत होता.

राजीनाम्यासंबंधीं सल्लागारांचें हें दुसरें पत्र गेलें त्यावेळीं सदनांत ५३ मुली होत्या व त्यांपैकीं २० जणी बाईंच्या पहाटेच्या प्रार्थनेला हजर राहात. ह्या पत्राच्या अगोदर चारपांच महिने म्हणजे ११ मार्च १८९३ रोजीं सदनाचा वाढदिवस फार मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला होता. सदनाला पांच वर्षें पुरीं झालीं होतीं. ह्या वाढदिवसाचें वैशिष्ट्य म्हणजे सदनाची पहिली विद्यार्थीण गोदूबाई हिचा ह्याच दिवशीं पुनर्विवाह होऊन ती सौ. आनंदीबाई कर्वे झाली. ह्या विवाहानिमित्त रमाबाईंनीं सदनांत मोठी जेवणावळ घातली. ह्यासंबंधीं डॉ. कर्वे आपल्या 'आत्मवृत्तांत' लिहितात: 'आनंदीबाई ही पंडिता रमाबाईंची फार आवडती विद्यार्थीण होती. त्यांनीं तिला वस्त्रें व भूषणें यांच्या देणग्या देण्यांत व तिच्या अभिनंदनार्थ जो भोजन समारंभ केला त्यासाठीं बराच पैसा खरचला. आपल्या पहिल्या विद्यार्थिनीची योग्य व्यवस्था लागत आहे हें पाहून त्यांना अतिशय आनंद झाला होता. सदनांतील विद्यार्थिनींनाहि आपल्या एका मैत्रिणीला संसारसुखाचा अनुभव घेण्याची संधि मिळाल्यामुळें आणि विधवांच्या भावी सुस्थितीचें द्वार मोकळें होत चालल्यामुळें अत्यंत हर्ष झाला होता. तो व्यक्त करण्याची त्यांनीं संधि साधली. *ह्या वेळीं शारदा सदन अत्यंत भरभराटीच्या स्थितींत होतें व आमच्या पुढाऱ्यांच्या विश्वासांतून उतरलेलें नव्हतें.*'[1]

समारंभाच्या शेवटीं कांहीं मुलींनीं ह्या दंपतीच्या अभिनंदनपर गाणीं म्हटलीं. तीं मुलींनींच रचलीं होतीं. त्यानंतर अण्णासाहेब व आनंदीबाई ह्यांचीं उत्तरादाखल भाषणें झालीं. अण्णासाहेब ह्याबद्दल पुढें म्हणतात:

'पन्नाससाठ विधवा विद्यार्थिनींनीं नवपुनर्विवाहित दंपत्याचें अशा रीतीनें अभिनंदन करायचा हा योग अपूर्व होता. विधवांच्या शिक्षणासाठीं कमालीचें प्रयत्न करून शारदासदन यशस्वी करून दाखविणाऱ्या बाईंच्या उत्तेजनानें

---

१. आत्मवृत्तः पृष्ठ ११७ :

त्यांच्या विधवा शिष्यिणींनीं केलेलें हें अभिनंदन आम्हांला फार स्फूर्तिदायक वाटलें.'[१]

सौ. आनंदीबाई म्हणतात 'जेवणाला मोतीचुराचे लाडू केले होते. चहाला वेडिंग केक वगैरे होती. मोठा थाट झाला. सर्व मंडळी एकाच पंक्तीला जेवलों. तेव्हांपासून जाति भेदाची कल्पना माझ्या मनांतून जाऊं लागली.... सर्वांनीं प्रेमानें आशीर्वाद दिले....बाईंनीं मला दागिने व कपडे दिले....तसेच जांवयाला–कर्व्यांना—कपडे दिले.'[२]

ह्या वेळेस 'शारदासदन अत्यंत भरभराटीच्या स्थितींत होतें व पुढाऱ्यांच्या विश्वासांतून तें उतरलेलें नव्हतें.' हें खरें तरी वादळाचीं पूर्वचिन्हें १८९०–१८९१ मध्येंच दिसूं लागलीं होतीं. पण खरें जोराचें वादळ सुरू झालें तें मात्र १८९३ च्या ऑगस्ट महिन्यापासून.

आरंभीं त्या राजीनाम्यांचें पत्र दिलें आहे. त्यांत तुम्हीहि खिस्ती व्हा असें बाईंनीं एका पालकाला लिहिल्याचा मजकूर आहे तो श्री. दादासाहेब गद्रां-संबंधीं. त्यांची मुलगी शारदा खिस्ती झाल्याची बातमी कोणा उपद्व्यापीनें उठवून दिली होती. ती खोटी होती. त्यावरून झालेल्या पत्रव्यवहारांत बाईंनीं दादांना म्हटलें होतें, 'अहो, तुम्हीच खिस्ती होऊन जा म्हणजे झालें.'

---

१. आत्मवृत्तः पृष्ठ ११८.

२. आनंदीबाई कर्वेकृतः माझें पुराण : पृष्ठ २७.

खरोखर सदनाला चार वर्षें पुरीं होऊन हा सदनाचा पांचवा वाढदिवस होता. रमाबाईंनीं ह्या समारंभाला बोलविलेल्या पाहुण्यांना पाठविलेल्या आमंत्रण चिठ्ठ्या स्वतः हातानें लिहिल्या होत्या असें आमच्या संग्रहीं असलेल्या एका कार्डावरून दिसतें. कार्डावर आरंभीं अर्धा इंची नक्षीचा ब्लॉक छापला असून त्यावर Come Early असे शब्द आहेत. पुढला मजकूर इंग्रजींत येणेंप्रमाणें आहे.

"The undersigned requests the pleasure of Mr. & Mrs. Vamanrao Ranade's company at a meeting held in honour of the 5th anniversary of the Sharada Sadan on Monday 12th 1894 at 4-30 P.M. Ramabai

पृष्ठ ९५ वर ह्या निमंत्रण पत्रिकेचें चित्र दिलें आहे.

ह्यावरून व तुळशीच्या रोपाच्या कथेवरून पुण्यांतील गोपाळराव[1] व वासूकाका ह्या जोशीद्वयानें वादळाची पूर्वतयारी चांगलीच करून ठेवली होती.

गोपाळराव हे पुढें स्वतःच ख्रिस्ती झाले. परंतु आधीं आधीं सुधारक दुर्धारक वगैरे सगळ्यांचीं 'बिंगें' बाहेर काढायचें काम त्यांनीं आपल्या शिरावर घेतलें होतें. त्यांतूनच पुण्यांतील पंच हौद मिशन चहा प्रकरण निघालें व लोकमान्य टिळकांपासून तों न्यायमूर्ति रानड्यांपर्यंत सगळ्यांना त्याची झळ लागूं लागली. ह्याच जोश्यांनीं गाढवागाढवींचें लग्न लावून अल्पवयी मुलींचें लग्न लावणाऱ्या एका सबजज्जांना पुण्यांतील लोकांचा हास्यविषय बनविलें होतें.[2] असल्या ह्या उचापतींत पुण्याचे वासूकाका जोशी हटकून गोपाळरावांना हातभार लावायचे. ह्या दोघांनींच तुळशीचा उद्योग केला.

वासूकाका जोशी ही पुण्यांतील एक सुप्रसिध्द सार्वजनिक व्यक्ति होऊन गेली. त्यांचें संपूर्ण नांव वासुदेव गणेश जोशी असें होतें. पुण्यांतील चित्रशाळा मुद्रणालयाचे ते मालक होते. टिळक पक्षाचे कडवे अनुयायी व लो. टिळकांचे मित्र. ह्या गोष्टीचा आपल्या धंद्यांतहि त्यांना चांगला उपयोग झाला. पण त्यांचा हा आणखी एक विशेष होता कीं ते गोपाळरावांसारख्यांच्या उपद्व्यापांत त्यांना साह्य करायला धावत व करायचें तें एक कांकणभर अधिकच करून दाखवीत.

---

१. सौ. डॉ. आनंदीबाई जोशी ह्यांचे पति. लोकांना हे कसे पेचांत आणण्यास पाहात व त्यांना त्याबद्दलच्या युक्त्या किती विद्युद्वेगानें सुचत ह्याचें एक उदाहरण १८९५ च्या पुण्याच्या सामाजिक परिषदेंत घडलें. परधर्मांत गेलेल्यांना हिंदु धर्मांत परत घ्यावें असा ठराव तेथें संमत होतो न होतो तोच हे गृहस्थ आपली खुर्ची सोडून अध्यक्ष डॉ. भांडारकर ह्यांच्यासमोर जाऊन उभे राहिले आणि म्हणाले, 'हा मी ख्रिस्ती झालेला माणूस परत हिंदु होण्यास तयार आहें. तरी मला त्या समाजांत परत घ्या.' त्यावर अध्यक्षांनीं खुलासा केला कीं 'लोकांना ख्रिश्चानिटींतून हिंदुइझममध्यें परत आणण्याची यंत्रणा ह्याच स्थळीं ह्याच क्षणीं सुरू करण्याचीं इरादा नाहीं.' [ह्या परिषदेचा इंग्रजी वृत्तांत; प्रथम भागः पृष्ठ ६१] नाहीं तरी जोश्यांना दाखवून द्यायचें असेल एवढेंच कीं ठराव संमत करून घेणें वेगळें व ते ठराव अमलांत आणणें वेगळे व तें त्यांनीं साध्य केलें.

२. सुधारक : १२ डिसेंबर १८९०: स्फुटः असामान्य व अपूर्व विवाह.

रमाबाईंचीं कांहीं बिंगें शोधून काढून त्यांना 'समाजांतून उठवाय'चा ह्या दोघांनीं चंग बांधला व त्यांत त्यांना बाईंनीं गद्रे ह्यांना लिहिलेलें तें पत्र व सदनांतील तुळशीचें रोप हीं दोन हत्यारें चांगलीं मिळालीं.

वासूकाका जोश्यांच्या चरित्रांत तुळशीची कथा सांगितली आहे ती अशी :

'रमाबाईंच्या गैरहजेरींत त्यांनीं (जोशीद्वयानें) पुष्कळशा तुळशीच्या कुंड्या शाळेंतील हिंदु मुलींकरतां पाठवून दिल्या. रमाबाई खरोखर जर हिंदु-धर्माविरुद्ध नसत्या तर त्यांनीं ह्या कुंड्या तेथें ठेऊं दिल्या असत्या. पण रमाबाई मंगळुराहून परत येतांच त्यांनीं लाथा मारून त्या कुंड्या फोडून टाकल्या. हें कळल्याचें कारण असें होतें. रमाबाईंच्या जवळ गंगाधरपंत गद्रे म्हणून एक कारकून होता. तो प्रार्थनासमाजिस्ट होता. त्याची व काकांची ओळख.' (काका म्हणजे वासूकाका जोशी.) 'तो ह्या बातम्या सांगत असला पाहिजे. काकांना जेव्हां हा प्रकार समजला तेव्हां ते व गोपाळराव जोशी हॅम्लिनकडे गेले. कारण ती म्हणे, कीं रमाबाई हिंदु धर्माविरुद्ध नाहीं. तिला जेव्हां तुळशीच्या कुंड्यांची ही शोचनीय हकीगत सांगितली, तेव्हां ती गप्प बसली. पण तेवढ्यानें गोपाळराव व काका स्वस्थ बसणारे नव्हते. ते तसेच नूलकरांकडे गेले. त्यांना ही हकीगत सांगितली आणि त्यांना घेऊन रात्रीं अकरा वाजतां हॅम्लीन बाईकडे गेले. नूलकरांच्या देखत पुनः तोच प्रकार झाला. हॅम्लीननें हा प्रकार झाला नाहीं असें म्हटलें नाहीं. नंतर नूलकर रमाबाईंकडे गेले. त्यांनीं तर ठणठणीतपणें मी असेंच करणार असें उत्तर दिलें. नूलकरांचा रमाबाईंबद्दल भ्रमनिरास झाला व त्यांनीं सल्लागार मंडळावरील आपल्या जागेचा राजीनामा दिला.' अशी आहे वासूकाकांच्या चरित्रांतील हकीकत.

बाईंच्या चिकट बुकांत एक वर्तमानपत्री उतारा सांपडतो. त्यांत असें म्हटलें आहे कीं हें झाड नूलकरांनींच लावलें होतें. ह्या नूलकरांची सही राजिनाम्याच्या पत्रावर नाहीं व रमाबाई असोसिएशनचे जे रिपोर्ट हातीं आले त्यांतहि नाहीं. मात्र रमाबाईंनीं २ डिसेंबर १८९० च्या केसरींत जें एक मोठें स्पष्टीकरण ह्या बाबतींत केलें आहे त्यांत नूलकर शारदासदनाच्या व्यवस्थापक मंडळाचे सभासद आहेत असें म्हटलें आहे. आतां व्यवस्थापक

मंडळ व सल्लागार मंडळ अशीं दोन मंडळें होतीं कीं काय कळत नाहीं. पुढ पुनः वासूकाकांचे चरित्रकार म्हणतात: 'वर ज्या गद्र्यांचा उल्लेख केला आहे त्यांची मुलगी शारदासदनांत होती. तिला रमाबाईनीं एके दिवशीं बाप्तिस्मा दिला हें ऐकून गद्रे खूपच क्रुद्ध झाले. त्यांनीं रमाबाईंना एक पत्र लिहिलें व त्यांत या प्रकारांतील सत्यतेची व खुलाशाची मागणी केली. रमाबाईनीं त्यांच्या मुलीविषयीं बातमी खरी आहे एवढेंच नव्हे तर तुम्हीहि तुमच्या कल्याणाकरितां धर्मांतर करा असा उपदेश केला. हें पत्र घेऊन गद्रे वासूकाकांकडे आले. काकांनीं पत्र नीटपणें वाचून परत करतों असें सांगितलें. अर्थात् तें वरवरचें होतें. काकांनीं चित्रशाळेंत त्या पत्राचा फोटो घेतला. नंतर ते ताबडतोब टिळकांकडे गेले व टिळकांना त्यांनीं तें पत्र दाखविलें. टिळक म्हणाले, संध्याकाळीं क्लबांत दाखवूं....क्लबांत गंगाधरपंत आले व काकांजवळ पत्र मागूं लागले. काकांनीं पत्र देऊन टाकलें.'[1]

खरें पाहतां शारदाबाई कधींच ख्रिस्ती झाल्या नाहींत व अर्थात् त्यांचा बाप्तिस्मा झाला नाहीं. (प्रकरण २४ पाहा) ह्याच पुस्तकांत रमाबाईंसंबंधीं आणखीहि असत्यें घुसडून दिलेलीं सांपडतात. त्यांचा समाचार ९ व्या प्रकरणांत घेतला आहे.

'पंडिता रमाबाईंचें बिंग कसें फोडावें याबद्दल कोणाला कांहीं सुचेना, काकांनीं त्यांच्या हातचें पत्र मिळविलें, पण तें पत्र ताबडतोब परत करायचें होतें. काकांनीं त्या पत्राचा फोटो घेऊन पत्र परत केलें आणि ह्या फोटोच्या जोरावर त्यांनीं रमाबाईंना हिंदुसमाजांतून उठविलें'[2]

वासूकाका जोश्यांना 'रमबाईंचें बिंग फोडायचें' होतें व त्यांना 'हिंदु समाजांतून उठवायचें होतें.' त्यांनीं आपलें काम सोळा आणे बजावलें! मात्र काकांनीं बाईंना 'हिंदु समाजांतून उठवलें' तें त्या हिंदुस्थानांत परत आल्यानंतर चारपांच वर्षांनीं हें लक्षांत ठेवायाला हवें.

दुसरी व्यक्ति म्हणजे गोपाळराव जोशी. ह्यांना ह्या उद्योगांतून काय साध्य करून घ्यायचें होतें ह्याचा कोठें उल्लेख सांपडत नाहीं. पण आपण धार्मिक

१. वासूकाका जोशी: पृष्ठ १८७–१८८.
२. वासूकाका जोशी. पृष्ठ ५५८.

बाबतींत ढवळाढवळ करीत नाहीं अशी शेखी मिरवून रमाबाई तशी ढवळाढवळ करायला कमी करीत नाहींत एवढें लोकांच्या नजरेस आणून त्यांना शतकृत्य व्हायचें होतें. असल्या तऱ्हेचे उद्योग त्यांनीं असंख्य केले होते, जपानहून परत आल्यावर ते श्री. गोविंदराव कानिटकरांकडे जाऊन राहिले. 'बाबा खुशाल राहा. खा, पी, पण कांहीं उचापती करूं नको' असें गोविंदरावांनीं त्यांना बजावून सांगितलें होतें. पण गोपाळरावांची मळमळ कांहीं पोटांत राहीना. एक दिवस ती 'पुणें वैभवां'तून बाहेर पडलेली आढळली. सकाळीं गोविंदरावांच्या हातांत 'पुणें वैभव' पडलें व त्यांत गोपाळराव जोश्यांच्या सहीशिक्क्यानिशीं बातमीपत्र कीं कानिटकर केवढे उदारमतवाले! गोपाळराव जोशी जपानमध्यें कोंबडीचा रस्सा खाऊन आलेले, त्यांनीं प्रायश्चित्तहि घेतलेलें नाहीं, तरी कानिटकर दररोज गोपाळरावांना आपल्या पंक्तीला घेऊन जेवतात, पंडिता रमाबाई ढोंगी आहेत. त्यांचे खायचे दांत एक व दाखवायचे एक आहेत असें बहुतेक त्यांना सिद्ध करून दाखवायचें असेल. त्यांनींहि आपल्या मताप्रमाणें एक शतकृत्य करून टाकलें.

खरें पाहतां रमाबाईनीं तुळशीचीं रोपें लाथेनें उडवून दिलीं ह्या म्हणण्यांत यत्किंचितहि तथ्य नाहीं.

पंडिता रमाबाईनीं ह्या बाबतींत केसरी पत्रांत एक प्रगटपत्र प्रसिद्ध करून खालीलप्रमाणें खुलासा केला आहे.

'सदनांतील मुलींना विशेष धर्मकृत्यें आपल्या खर्चानें (देवदर्शन, व्रतांचीं उद्यापनें, श्राद्धें, इ.) सदनाच्या आवाराबाहेर करण्यास पूर्ण मुभा आहे. तशी सोयहि आहे. पण ज्या ख्रिस्ती लोकांनीं केवळ भूतदयेनें प्रेरित होऊन मुलींच्या सांभाळासाठीं व शिक्षणासाठीं पैसा दिला आहे त्यांच्या धर्माचें शिक्षण येथें दिलें जात नसतांना, जी गोष्ट त्यांच्या धर्माविरुद्ध आहे ती त्यांच्याच पैशानें चालविलेल्या सदनांत करूं देणें रास्त होणार नाहीं. तुळस स्वैपाकीणबाईनें लावली होती ती काढून जवळच विहिरीपाशीं लावली आहे. तेथें कोणासहि तुळसीची पूजा करतां येईल..'[1]

वासूकाकांच्या चरित्रांतील, आधार न देतां केलेलीं विधानें, त्यांत नूलकर रात्रीं ११ वाजतां हॅम्लिनबाईकडे खुलासा मागण्यासाठीं गेल्याचा उल्लेख

१. केसरी २-१२-१८९०

वगैरे असंभवनीय गोष्टी ह्यांची जास्त चर्चा करण्याचें कारण नाहीं. एवढें खरें कीं हें तुळशी प्रकरण व शारदासदनांतील विद्यार्थिनींचें धर्मस्वातंत्र्य ह्यांबद्दल कांहीं मतभेद होऊन रा. ब. नूलकरांनीं ह्यानंतर सल्लागार मंडळाचा राजीनामा दिला. हा इतर दोघां सल्लागारांच्याहि वतीनें होता असें मागें म्हटलें आहे. पण हे इतर ह्या वेळीं सल्ला करण्यास उपलब्ध नव्हते काय? रावबहादूर नूलकरांच्या राजीनाम्यामुळें नाना कंड्या पिकल्या. तशा त्यावेळच्या पुण्यांत कंड्या बोलतां बोलतां पिकत. शेवटीं केसरीनें आपला प्रतिनिधि बाईंकडे पाठवून त्यांची मुलाखत घेतली व ती प्रसिद्ध केली. त्या मुलाखतीनें आणखी विपर्यस्त माहिती पेरून दिली. शेवटीं बाईंनीं केसरीस एक स्वदस्तुरचें पत्र लिहून अखेरचा खुलासा केला, तो असा :

'वि. वि. खालीं लिहिलेल्या चार ओळींस आपल्या पत्रीं जागा देण्याची कृपा करावी. गेल्या आठवड्यांत आपल्या बातमीदारानें येथें येऊन शारदा-सदनासंबंधीं कांहीं गोष्टींची विचारपूस केली. तीं प्रश्नोत्तरें केसरींत प्रसिद्ध झालीं आहेत. हीं प्रश्नोत्तरें सूत्रवत् असल्यामुळें आणि त्यांत माझे शब्द जसेच्या तसेच उतरून घेतलेले नसल्यामुळें त्यावरून गांवांत पुष्कळांची गैरसमज झाली आहे. ती दूर व्हावी म्हणून आपणांस तसदी देत आहें.

'नूलकरांनीं मिस् हॅम्लिन बाईंच्यातर्फे गेले गुरुवारीं भाषण केलें त्यांत त्यांनीं हिंदु समजुतीबद्दल अमूक व्यवस्था केल्या म्हणून म्हटलें होतें त्या म्हणण्याविरुद्ध ही गोष्ट दिसते असें आपल्या बातमीदाराचें म्हणणें आहे. रा. ब. नूलकरांनीं भाषण केलें त्या दिवशीं मी येथें हजर नव्हतें. तेव्हां ते काय बोलले हें मीं आपल्या कानांनीं ऐकलें नाहीं. परंतु त्या वेळेस नूलकरांनीं काय भाषण केलें तें आतां आम्हांला चांगल्या आधारावरून कळल्यामुळें मी असें म्हणतें कीं, मीं व आमच्या व्यवस्थापक मंडळींनीं केलेल्या ठरावास विरुद्ध असें ते कांहींच बोलले नाहींत. रा. ब. नूलकर हे ह्या शाळेची व्यवस्था पहाणाऱ्या मंडळीपैकीं एक असून हें सदन स्थापन करण्यास मुख्यतः साहाय्य करणाऱ्या लोकांचा उद्देश ते जाणून आहेत अशी माझी समजूत आहे. तेव्हां त्या उद्देशाच्या विरुद्ध असें कांहीं त्यांच्या भाषणांत किंवा कृतींत येण्याचें संभवत नाहीं. ता. २५ नोव्हेंबरच्या "ज्ञानचक्षू"त प्रसिद्ध झालेला रा. ब. नूलकरांच्या भाषणाचा सारांश यथार्थ आहे, असें खुद्द रा. ब. च्या सांगण्यावरून कळतें.

तेव्हां त्यांतील कांहीं वाक्यें हीं त्यांचींच अशी समजून येथें उतरून घेतें. त्यांवरून त्यांचें स्पष्ट मत दिसून येतें :

'मला वाटतें कीं हल्लीं केल्या आहेत त्या व्यवस्था पाहिजेत तितक्या आहेत. आपल्यापैकीं नुकतीच कोणी अशी सूचना केली कीं, येथें एक वृद्ध पुराणिक नेमून त्याजकडून विद्यार्थिनींस रोज तास दोन तास पुराण सांगण्याची व्यवस्था केली तर चांगलें होईल. मीहि ती व्यवस्था पसंत करतों. परंतु सदनाच्या फंडाचा पैसा या कामाकडे खर्च करतां येणार नाहीं. तो सर्व पैसा अमेरिकेंतील ख्रिस्ती धर्मीयांनीं हिंदुस्थानांतील उच्च जातीच्या विधवांना सुशिक्षण मिळून त्यांचा सदुद्योगानें जीवनव्यापार चालावा व त्यांना आपलें कष्टमय अवशिष्ट आयुष्य परोपकार व लोकोपयोग यांमध्यें घालवतां यावें अशा प्रकारची संस्था स्थापण्यासाठीं पाठविला आहे हें लक्षांत आणलें म्हणजे तो पैसा फक्त विद्यार्थिनींच्या शिक्षणाकडे व निर्वाहाकडे लावण्यांत येईल. कोणत्याहि प्रकारच्या धर्मशिक्षणाकडे त्याचा उपयोग करतां येणार नाहीं. आपल्या विधवा विद्यार्थिनींना धर्मशिक्षण पाहिजे असल्यास आपल्यामध्यें स्वतंत्र फंड उभारून त्यानें एखादा पुराणिक ठेवला अथवा तेथें शारदासदनाजवळ एखादें देऊळ बांधून त्यामध्यें विद्यार्थिनींनीं देवदर्शनाला जावें अशी व्यवस्था केली तर त्या योजनेस शारदासदनाचे व्यवस्थापक 'कोणत्याहि प्रकारची हरकत घेणार नाहींत. ह्याबद्दल आपल्याला कांहीं करणें असेल तर आपण स्वतंत्र मुखत्यार आहांत.'

'हें रा. ब. नूलकरांचें म्हणणें आमच्या व्यवस्थापक मंडळीस व मलाहि सर्वथा मान्य आहे. आणि आतांपर्यंत ह्या शाळेंत जी व्यवस्था होती व जी आतां आहे ती ह्या म्हणण्याच्या विरुद्ध बिलकुल नव्हती, व नाहीं, अशी माझी समजूत आहे. येथें राहणाऱ्या मुलींच्या नियमधर्मांत व आचारविचारांत व्यत्यय आणण्याचा आमचा उद्देश नाहीं. देवदर्शन, व्रतांचें उद्यापन, श्राद्धें, इ. विशेष धर्मकृत्यें जीं या शाळेच्या हद्दींत होण्याची सोय आम्हांस करतां येत नाहीं तीं जवळच दुसऱ्या ठिकाणीं करण्यास विद्यार्थिनींस फारशी गैरसोय होण्यासारखी नाहीं. असे कांहीं गृहस्थ शारदासदनाच्या व्यवस्थापक मंडळींत आहेत कीं ज्यांनीं विद्यार्थिनींची, त्यांच्या मातापितरांची व कायदेशीर पालकांची इच्छा असल्यास विशेष धर्मकृत्यें करण्याची सोय यथाशक्ति करून देण्याचें

पत्करिलें आहे. ज्या ख्रिस्ती लोकांनीं या सदनाच्या स्थापनेकरतां पैसा दिला, त्यांच्या धर्माचें शिक्षण या शाळेंत दिलें जात नाहीं, त्यांनीं केवळ दया परवश होऊन व्यावहारिक शिक्षणाकरतांच इतका पैसा दिला आहे. हे त्यांचे आमच्या-वर केवढे मोठे उपकार आहेत बरें! असें असतां जी गोष्ट अगदीं प्रत्यक्षतः त्यांच्या धर्माविरुद्ध आहे ती त्यांच्याच पैशांनीं विकत किंवा भाड्यानें घेतलेल्या जागेवर करूं देणें रास्त होणार नाहीं हें सुज्ञ मनुष्यास सांगावयास पाहिजे असें नाहीं. अशा प्रकारचा विचार मनांत आणून पूर्वीं स्वयंपाकीणबाईनें ज्या ठिकाणीं तुळस ठेवली होती ती तेथून काढण्यास सांगितलें होतें. ती आतां त्यांनीं विहिरीपाशीं बंगल्याजवळच परंतु बंगल्याच्या हद्दीबाहेर चांगल्या जागेंत ठेवली आहे. तेथें जाऊन पाहिजे त्यांनीं पूजा केल्यास आम्हांकडून हरकत येणार नाहीं.'

ह्यानंतरचा मजकूर मिस् हॅम्लिनबद्दलचा आहे. मिस् हॅम्लिनचें व बाईंचें वितुष्ट आलें अशीहि एक बाजारगप्प पुण्यास त्या वेळेस धुडकूस घालीत होती. मिस् हॅम्लिन ही बरीच लोकप्रिय झाली होती. पत्राचा शेवट बाईंनीं असा केला आहे;

'मिस् हॅम्लिन यांचें व माझें वितुष्ट पडलें आहे, मी येथील विद्यार्थिनींस त्यांच्या स्वधर्माप्रमाणें वागण्यास हरकती आणीत आहें, त्यांनीं पूजा करण्यास ठेवलेली तुळस मीं लाथाडून उपटून फेकून दिली वगैरे ज्या कंड्या पुण्यांत सर्वत्र पिकल्या आहेत असें मी ऐकतें त्या अगदीं खोट्या व निराधार आहेत.'[1]

केसरीच्या प्रतिनिधीनें बाईंची मुलाखत घेतली तेव्हांच सदनांतील कोठी-वाल्या बाईला गांठून तिचीहि कस्सून उलटतपासणी केली होती. त्या उलट-तपासणींत कांहीं निष्पन्न झालें नाहीं. त्या बाईंनीं उत्तर दिलें कीं 'आमच्या मनास येथील कोणतीहि व्यवस्था वाईट वाटत नाहीं. आम्हांस पंडिताबाई धर्माच्या कामांत अमूक करा अमूक करूं नका वगैरे कांहीं सांगत नाहींत. आमच्या घरच्या माणसांस आमची येथील स्थिति बरी वाटते असें माझ्या स्वतःच्या अनुभवास आलें आहे.'[2]

---

१. केसरी ९-१२-१८९०; २. केसरी २-१२-१८९०

शारदासदन धर्मातीत ठेवायचें ह्या आपल्या जाहीर वचनाला व ब्रीदाला बाई डोळ्यांत तेल घालून जागत परंतु पुण्यांतील एका विशिष्ट गटाच्या मतें बाईंना तसें करणें शक्यच नाहीं व त्यांचा अंतस्थ हेतु मुलींना फूस लावून "बाटविणें" हा आहे असें वाटे व त्यांना हें सिद्ध करावयाचें होतें. म्हणून त्या गटानें बाईंना त्यांच्या कार्यांत कधीं स्वस्थता लाधूं दिली नाहीं. बरें, इकडे 'ज्ञानोदयानें' व त्यांतील बाबा पदमनजी सारख्या लेखकांनीं त्या शारदासदनाचा उपयोग धर्मोपदेश करण्यासाठीं करीत नाहींत म्हणून त्यांच्यावर झोड उठविली होती. अशा वेळीं बाईंना खरोखर तारेवरचा नाच करावा लागत होता.

१८९१ सालीं पंडिताबाईंवर केसरीनें जी झोड उठविली होती ती मुख्यत: बाई शारदासदनांत हिंदुधर्माप्रमाणें मुलींनीं वर्तावें असा स्वत: आग्रह धरीत नाहींत ह्यावरून असावी. केसरी संस्थेचेंच मराठा म्हणून एक पत्र होतें. त्याचे संपादक प्रो. वा. बा. केळकर[१] ह्यांनीं शेवटीं केसरीकारांची ह्या बाबतींत कानउघाडणी केली. ते म्हणतात :

'शारदासदन हें सर्वस्वी पुराणमतवादी पद्धतीनें चालेल किंवा चालावें, अशी फुकट्या हिंदुसमाजानें अपेक्षा तरी कां करावी? त्यांतल्यापेक्षां अधिक जुन्या पद्धतीचें शिक्षण पाहिजे असल्यास त्यांनीं वर्गण्या काढून स्वतंत्र संस्था कां काढूं नये? सरकारी शाळेंत जितक्या बेताची धार्मिक दृष्ट्या तटस्थ वृत्ति राहूं शकेल, तितकी रमाबाई ह्यांची राहिली म्हणजे बस्स झालें.'[२]

ह्या मुद्यासंबंधानें खुद्द रमाबाईंनीं पुढें दिलेलें उत्तर तर ह्याहिपेक्षां खडखडीत आहे. त्या म्हणतात :

'आमच्या देशबंधूंनीं योग्य आश्रय व उत्तेजन दिलें असतें, तर शारदासदन ही संस्था खिस्ती होण्याची कांहींच जरूर नव्हती. ही संस्था खिस्ती

१. हे केळकर त्राटिका नाटकाचे लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. पतीच्या मृत्यूनंतर पुण्यास आल्यावर आपणास चार सद्गृहस्थांनीं अत्यंत ममताळूपणें वागविलें असा उल्लेख बाईंनीं आपल्या ए टेस्टिमनी ह्या पुस्तकांत एके ठिकाणीं केला आहे. त्यांत रानडे, मोडक व भांडारकर ह्यांच्याबरोबर केळकर ह्यांचाहि उल्लेख आलेला आहे. ते केळकर हेच असावे.

२. टिळक जीवनरहस्य. पृष्ठ २३-२४

होऊं नये म्हणून पूर्वीं पुष्कळ प्रयत्न झाला होता व अजूनहि तो सुरू आहे. हिंदु लोक असली शाळा घालण्याकरतां पैसे देईनात म्हणून मीं ख्रिस्ती लोकांपाशीं भिक्षा मागितली. आतां तुम्ही ती शाळा चालविण्यास सिद्ध असाल तर आमच्या ख्रिस्ती आश्रयदात्यांकडून बिलकुल अडथळा येणार नाहीं. तुम्ही खर्च द्या, हवे ते शिक्षक नेमा, एखाद्या हिंदु बाईला शाळेची मुख्य नेमा. तसें झालें तर मूळ हेतूला अनुसरून आम्ही ख्रिस्ती लोक तुम्हांस मदतच करूं. कोणतेंहि काम स्वतः करण्यापेक्षां लोकांच्या कामांतील दोष दाखविणें हें फार सोपें आहे हें आम्हांला आणि तुम्हांलाहि माहीत आहे.'

दुसऱ्या एका वावटळीनें शारदासदनाचें श्राद्ध करण्याची वेळ आणली; त्याची हकीकत पुढें अठराव्या प्रकरणांत दिली आहे.

## १७ संमतिवय-बिलाचा आघात

संमतिवयाच्या कायद्याविरुद्ध पुण्यास जोराची चळवळ चालली असतां पंडिता रमाबाईंनीं स्त्रियांची बाजू हिरिरीनें घेतली. ह्यांत अनपेक्षित असें कांहींच नव्हतें. श्री. न. चिं. केळकर ह्यांनीं ह्या बिलाची एका वाक्यांत माहिती अशी दिली आहे.

'बारा वर्षांच्या लग्न झालेल्या मुलीशींहि संभोग झाला तर नवऱ्याला देखील कायद्यानें शिक्षा व्हावी हीच संमतिवयाच्या कायद्याची चळवळ होय.'[१]

परंतु ही चळवळ निघाली कशी ह्याचा इतिहास पाहिला म्हणजे बाईंनीं ह्या बाबतींत इतका हिरिरीनें भाग कां घेतला होता हें चटकन ध्यानांत येतें.

'फुलमणी दासी नांवाच्या एका आठ वर्षे वयाच्या मुलीचें लग्न अडतीस वर्षे वयाच्या माणसाशीं होऊन लग्न लागलें त्याच रात्रीं बिचारी फुलमणी मृत्युमुखीं पडली. मुलीच्या आईचा आक्रोश कानीं पडून देशभर ह्याविषयीं क्षोभ उत्पन्न झाला व संमतिवयाच्या बिलाचा असा उगम झाला.'[२]

पुरुषांप्रमाणें स्त्रियांची ह्या बिलाला संमति पाहिजे कारण त्यांचेंच हित ह्या बिलानें मुख्यत्वें पाहिलें आहे, म्हणून मुंबईस स्त्रियांची एक अनुकूल सभा भरविण्यांत आली. मुंबईच्या सभेचें चालकत्व पंडिता रमाबाईंकडे व अध्यक्ष-स्थान मिस् सोराबजीकडे[३] होतें. पुण्यास झालेल्या सभेबद्दल 'सुधारक' पत्रांतील त्या वेळची हकीकत व नंतर टिळकचरित्रांत श्री. केळकर ह्यांनीं दिलेली हकीकत हीं दोन्ही तुलना करून पाहाण्यासारखीं आहेत.

---

१. केळकरकृत लोकमान्य टिळक चरित्र. (भाग १) पृष्ठें २५०,२५१,२५२

२. Pandita Ramabai Saraswati : Butler: पृष्ठ ४९ वरील तळटीप

३. मिस् सोराबजी ह्या महाराष्ट्रांतील पहिल्या कायदेपंडिता होत्या. त्या ख्रिस्ती होत्या.

सुधारकांतला वृत्तांत असा होता.

'गेल्या शनवारीं तिसऱ्या प्रहरीं रा. ब. कीर्तने ह्यांच्या घरीं संमतिवयाचा विचार करण्याकरितां येथील 'आर्य महिला समाजा'ची सभा भरली होती. सुमारें शंभर कुलस्त्रिया हजर होत्या. पंडिता रमाबाईनीं प्रस्तुत विषयाचें स्वरूप व त्याची आवश्यकता यासंबंधानें सुरस भाषण केलें. नंतर सौ. काशीताई कानिटकर यांनीं हें बिल पास करावें व त्यासाठीं सरकारास अर्ज करावा अशी सूचना केली. पुढें बरीच भवति न भवति होऊन पांचसहा स्त्रिया खेरीज करून बाकी सर्वजणींस ही सूचना मान्य झाली व त्याप्रमाणें त्यांनीं तेथेंच तयार केलेल्या अर्जावर सह्या केल्या.[1]'

विरुद्ध दृष्टिकोणांतून ह्याच सभेची हकीकत सांगतांना श्री. केळकर लिहितातः

'सौ. काशीबाई कानिटकर यांनीं बिलाचें समर्थन केलें. पण दुसरी एक बाई उठून म्हणाली, या बिलाअन्वयें तुमच्या जांवयावर उद्यां खटला झाला तर तो तुम्हांस आवडेल काय ? काशीबाई पडल्या हाडाच्या हिंदु, त्यांच्यानें उत्तर देववेना. रमाबाईहि हाडाच्या हिंदूच. पण धर्मान्तरानें त्यांचें विचार सर्वच बदललेले होतें. काशीबाई निरुत्तर झाल्यावर रमाबाई म्हणाल्या, बेहेत्तर आहे. मुलीपेक्षां जावई अधिक नाहीं.'[2] हें उत्तर पंडिताबाईंच्या सडेतोड स्वभावास धरूनच होतें. हा स्वभाव धर्मांतरानें नव्यानें बनलेला नव्हता.

'शेवटीं सभेंत अर्जावर सह्या झाल्या. कांहीं झाल्या नाहींत. कांहीं स्त्रिया म्हणाल्या, आम्हीं घरीं विचारलें नाहीं, सह्या कशा कराव्या?'[3]

ह्यावर केसरीची पुढील टीका केळकरांनीं उतरून घेतली आहे.

'ख्रिस्ती लोकांस असा प्रसंग येण्याचा संभवच नाहीं. त्यांतूनहि जावई अशा अपराधाबद्दल कैदेंत गेलाच तर घटस्फोटाचा मार्ग त्यांच्यांत खुला आहेच.'

केसरीचें ह्या वादांतील एकंदर धोरण व वाद करण्याची पद्धत पाहतां त्यानें असें लिहावें ह्यांत कांहींच आश्चर्य नाहीं. येथें एवढाच खुलासा करण्यचा कीं

---

१. सुधारक. ३ फेब्रुवारी १८९१.

२. केळकरकृत टिळक चरित्र. भाग १. पृष्ठें २७३, २७४

ख्रिस्ती घटस्फोटाचा कायदा केसरीकारांना वाटला तितका सोपा नाहीं. नवरा तुरुंगांत गेला कीं घटस्फोट मागतां येतो अशी कल्पना करून देणें अगदीं सोपें पण वस्तुस्थिति तशी नाहीं. ह्या बाबतींत भारतांतील ख्रिस्ती दंपतीला लागू असलेला कायदा कोणाला पाहायचा असेल तर त्यानें १८६९ चा ४ था कायदा वाचून पाहावा. गेलीं एक्याण्णव वर्षे हा कायदा आहे तसाच आहे, व त्या कायद्यामुळें भारतीय ख्रिस्ती माणसास घटस्फोट जवळजवळ अशक्य आहे.

हा वाद खेळतांना कशा तऱ्हेनें गैरसमज केले जात होते, त्याचें हें एक ठळक उदाहरण आहे. पण एवढ्यानेंच झालें नाहीं. खुद्द टिळक हे बाईबद्दल प्रकृति-स्वभावानेंच (Temperamentally) समतोलबुद्धि ठेवूं शकत नव्हते हें त्यांचे चरित्रकारच पुढील शब्दांत सांगत आहेत:

'टिळकांच्या स्वभावावरून पाहातां पंडिताबाईंच्या प्रथम दर्शनाच्या वेळींच त्यांनीं नाक मुरडलें असेल व कपाळास आठी घालून पाहिलें असेल.'[1]

हा त्यांचा स्वभाव व त्यांच्या हस्तकांचें पुराणानुयायित्व (Conservatism) ह्यामुळेंच त्यांनीं शारदासदनाबाबतहि टीकेची झोड उठविली व त्यांत 'केसरी' विरुद्ध 'सुधारक' ह्या सामन्यांत ती संस्था गोवली गेली. टिळकांच्या व केसरीच्या वादपद्धतीसंबंधानें सुधारकानें म्हटलें होतें :

'अशी शंका येणार कीं शारदासदनांत म्हणण्यासारखा दोष नसेल तर केसरीकारांसारखे विद्वान गृहस्थ त्याच्या पाठीमागें हात धुवून कशासाठीं लागले आहेत? त्या शंकेवर समाधानकारक असें एकच उत्तर आहे तें हें कीं केसरीकारांनीं व त्यांच्या स्वभावाच्या इतर इसमांनीं संमतिबिलास अनुकूल असलेल्या लोकांचा आणि त्यांनीं चालविलेल्या संस्थांचा होईल तितका दुर्लौकिक व नुकसान करावयाचें असा पणाचा विडाच उचलला आहे.'[2]

संमतिवयाच्या बिलाला उचलून धरणारांचे त्यावेळीं पुण्यास कसे हाल केले जात होते ह्याची थोडीशी चुणुक डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर ह्यांच्या चरित्रांत खालीलप्रमाणें आढळते.

'अपमान! चेष्टा! दगडांचा मार! लोकांच्या घरांत (भांडारकरांस) कोंडून घेण्याची आवश्यकता! जीव घेण्याची धमकी! त्यावेळीं पुण्यांतील

१. केळकरकृत टिळक चरित्र. भाग १. पृष्ठ ३३१.
२. सुधारक २० जुलै १८९१.

धर्माभिमानी म्हणविणारे शहाणे लोक आपलें मनुष्यपण विसरून पशुवृत्तीस शोभण्यासारखींच कृत्यें करीत होते. तरीपण आगरकरांनीं म्हटल्याप्रमाणें विद्येनें, वयानें, स्वभावानें व आचारानें अत्यंत पूज्य अशा डॉ. भांडारकरां-सारख्या गृहस्थाला पुण्याच्या लहानमोठ्या लोकांनीं दिवसाढवळ्या दगड मारावे, आणि संध्याकाळ होतांच भल्या मनुष्याच्या घरांत कोंडून घातल्या सारखें करून त्यांच्यावर वाळूचा, दगडांचा व कुशब्दांचा वर्षाव करावा व पोलिसानें कांकण घातलेल्या स्त्रियांहूनहि स्त्रैण होऊन असल्या गोष्टी धडधडीत आपल्या समोर होऊं द्याव्या याहून पुण्याच्या लोकांच्या आणि पुण्याच्या पोलिसांच्या नांवास कलंक आणणारी शोचनीय व लज्जास्पद गोष्ट कधींहि घडली नसेल.'[१]

ह्याच पुस्तकांत संमतिवय बिलावरून लोकक्षोभ कोणीं उत्पन्न केला व तो कोणत्या थराला नेऊन पोहंचविला व तें करतांना कोणकोणत्या मार्गाचें अवलंबन करण्यांत आलें ह्याचें वर्णन वाचायला मिळतें.[२]

ह्या बिलाला अनुकूल असलेल्या व्यक्ती व त्यांचा संबंध असलेल्या संस्था ह्यांचा दुर्लौकिक व नुकसान करण्याचा विडाच विरोधी पक्षानें उचलला होता हें सुधारकाचें म्हणणें कितपत बरोबर होतें हें अजमावण्यास वाचकांना टिळक-चरित्रांत भरपूर साधनें उपलब्ध आहेत. ह्या वादानेंच 'पटाईत भांडखोर'[३] म्हणून इतर प्रान्तांतहि टिळकांचें नांव माहीत झालें[४] आहे असें केळकरांनीं म्हटलें आहे. असो. ह्याच वादांत शारदासदन ह्या संस्थेचा हेतु धर्मान्तर करण्याचा आहे हें सिद्ध करण्याकरितां केसरीनें १४ जुलै १८९१ च्या अंकांत पांच उतारे दिले आहेत. सुधारकाच्या मतें हे उतारे अगदीं कुचकामी असून केसरीकारांनीं, 'नेहमीं प्रमाणें त्यांचें भाषान्तर करण्यांत व विशेषतः त्यांच्यापासून भलभलतीं अनुमानें काढण्यांत करूं नये इतकें चातुर्य खर्च केलें आहे. ज्या कोणास इंग्रजी भाषा बरीच समजत असेल त्यानें, खुद्द पंडिताबाईंच्या हातचा

---

१. गुरुवर्य डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांचें चरित्रः श्री. ना. कर्नाटकी पृष्ठ २६०.
२. वरील ग्रंथः प्रकरण १५.
३. केळकरकृत टिळक चरित्र. भाग १. पृष्ठ २५१.
४. तळटीप ३ प्रमाणें.

म्हणून निषाणी नंबर दोनचा उतारा घेतला आहे व ज्यावर केसरीकारांनीं इतकी मदार ठेवली आहे तो थोडा लक्षपूर्वक वाचला असतां त्यांस असें दिसून येईल कीं ज्याला जें पाहिजे तेंच त्याला पुढें घेतलेल्या कागदांत दिसतें. अशां-खेरीज त्या उताऱ्यावरून ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराकरतां मी रमाबाई शाळा काढणार आहें असा अर्थ कोणी काढूं शकेल असें आम्हांस वाटत नाहीं.[1]

केसरीनें घेतलेल्या पंडिता रमाबाईंच्या उताऱ्यांत, धर्म प्रसाराचा हेतु त्यांनीं आपल्यापुढें ठेवला नाहीं म्हणून त्यांच्या व्यावहारिक शिक्षणाच्या कार्यास मदत देऊं नये म्हणणाऱ्या कांहीं अमेरिकनांना बाईंनीं असें उत्तर दिलें होतें कीं धर्मप्रसाराच्या कार्यासाठीं सुद्धां प्रथम हें व्यावहारिक शिक्षण अवश्य आहे, म्हणून धर्मप्रसाराच्या पुरस्कर्त्यांनींहि ह्या कार्यास मदत करणें हें त्यांचें कर्तव्य ठरतें. टीकाकारांवर त्यांची बाजू उलटवणाऱ्या ह्या कोटिक्रमाबद्दल 'सुधारक' विचारतो कीं ह्यांत बाईंच्या लेखनचातुर्याची तारीफ करायची कीं त्यांतून विपरीत अर्थ काढून त्याबद्दल त्यांस दोष द्यायचा?

केसरी सुधारकांतील ह्या वादांत जास्त खोल न शिरतां आम्ही सुधारकानें घेतलेल्या मुख्य वादास लागू असलेल्या कांहीं उताऱ्यांकडे वाचकांचें लक्ष वेधतों. सुधारक म्हणतो:

'आमचा पहिला उतारा लंडन टाईम्सला रमाबाईंनीं १८८७ च्या सप्टेंबर महिन्यांत लिहिलेल्या पत्रांतून घेतला आहे. विधवागृहासारखी संस्था स्थापण्याच्या खटपटींत न पडतां विधवाविवाहास उत्तेजन देण्याच्या कामीं रमाबाईंनीं परिश्रम करावे, अशा अर्थाचें पत्र मि. जस्टिस स्कॉट यांनीं त्या पत्रास लिहिलें होतें. त्या पत्रास रमाबाईंनीं उत्तर दिलें होतें व विधवागृह स्थापणें किती अवश्य आहे, तें कशा प्रकारचें असावें, त्याची व्यवस्था कोणत्या रीतीनें ठेवावी, व त्याला परक्या लोकांनीं मदत कां व किती द्यावी यांविषयीं आपले विचार त्या पत्रांत प्रदर्शित केले होते. या पत्रांतून घेतलेल्या एकाच उताऱ्या-वरून वाचकांची अशी खात्री होईल कीं, शारदासदनांत ख्रिस्ती धर्म शिकवावा असा रमाबाईंचा पूर्वीपासून बेत होता हें म्हणणे सर्वथैव निराधार व खोटें आहे.

---

१. सुधारक: २० जुलै १८९१

'ही संस्था ख्रिस्त्यांवर किंवा परकीयांवर सर्वकाळ अवलंबून असतां कामा नये. विधवांना मदत करण्यासाठीं अशा प्रकारच्या संस्थेची आवश्यकता किती आहे हें कालेंकरून माझ्या देशबांधवांच्या प्रत्ययास आलें, म्हणजे त्यांनीं हें काम आपल्या शिरावर घ्यावें अशी माझी इच्छा आहे. आम्ही विद्यार्थिनींच्या जातींत ढवळाढवळ करणार नाहीं. एक ब्राह्मण जातीची स्वैपाकीणबाई त्यांच्यासाठीं स्वैंपाक करील आणि प्रत्येकीला आपआपल्या धर्मसमजुतीप्रमाणें वागण्याचें पूर्ण स्वातंत्र्य मिळेल. शाळेच्या तासांत ख्रिस्ती मास्तरणीनें शिक्षण दिल्यानें किंवा अन्य जातींच्या मुलींशीं संसर्ग आल्यानें, जसा पुरुषांकडून जात्यतिक्रम होत नाहीं, तसा बायकांकडूनहि होणार नाहीं. शाळेच्या आणि सभ्यतेच्या नियमांचें उल्लंघन न होऊं देतां, सदनांतील प्रत्येक विद्यार्थिनीस विचारस्वातंत्र्य आणि आचारस्वातंत्र्य मिळेल. तेव्हां ख्रिस्ती लोकांनीं किंवा तद्धर्मबाह्य इतर लोकांनीं एकत्र होऊन हातानें आणि मनानें असली संस्था किती यशस्वी होते, याचा अनुभव घेऊन पाहाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अशा शुद्ध परोपकारित्वाच्या कृत्यास मदत करण्यास लोकांनीं कांकूं करावें, हें अत्यंत शोचनीय आहे.'

हें उत्तर **लंडनच्या** एका प्रमुख पत्रांत बाईंच्या धोरणांना हरकत घेणाऱ्या लोकांना उद्देशून लिहिलेलें आहे हें लक्षांत घेण्यासारखें आहे. त्यामुळें **इकडील** कोणाच्या डोळ्यांत धूळफेक करण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं.

सुधारक पुढें म्हणतो :

'वरील लेख वाचून वाचकांच्या ध्यानांत हें सहज येणार आहे कीं, विधवागृहाचा बोजा सर्वकाळ परकीय लोकांवर न पडावा, आणि अशा संस्थेची आवश्यकता आपल्या लोकांस दिसून आल्यावर त्याचा भार त्यांनीं आपल्या शिरावर घ्यावा अशी रमाबाईंची पहिल्यापासून इच्छा आहे. विधवा-गृहांत ख्रिस्ती धर्माचे पाठ देण्याचा त्यांचा विचार असता तर त्याचा खर्च पुढेंमागें एतद्देशियांनीं चालवावा अशी इच्छा त्यांस कधीं करतां आली नसती, हें समंजस वाचकांस सहज समजणार आहे.

'आमचा दुसरा उतारा अमेरिकेंतील सुप्रसिद्ध न्यूयॉर्क शहरच्या 'इव्हँज-लिस्ट' नांवाच्या पत्रांतून घेतला आहे. हिंदुस्थानांतील विधवांसाठीं एक

विधवाबालागृह स्थापण्यास अमेरिकन लोकांनीं मदत करावी, म्हणून रमाबाईनीं तिकडे प्रयत्न सुरू केले, तेव्हां एका बाईनें 'फीब' हें टोपण नांव धारण करून 'इव्हँजलिस्ट' पत्रास असें लिहिलेलें कीं, 'ज्या अर्थी विधवागृहांत ख्रिस्ती धर्म शिकविण्याचा बाईंचा विचार नाहीं त्याअर्थी ख्रिस्ती लोकांनीं त्याला मदत करणें उचित नाहीं. ह्या फिब[1] बाईला रमाबाईनीं असें उत्तर दिलें कीं 'केवळ परोपकार दृष्टीनें विधवागृहास मदत करणें ज्यांस रुचेल त्यांनींच याला हातभार लावावा. ख्रिस्ती धर्म पढविण्यास मी योग्य नाहीं. व्यावहारिक शिक्षण देऊन माझ्या निराश्रित भगिनींच्या बुद्धि होतील तेवढ्या विकसित करण्याचा प्रयत्न करणें एवढेंच माझें कर्तव्य आहे आणि तेवढेंच करण्यास मी शक्त आहें.'

सुधारक पुढें म्हणतो :

'आमचा तिसरा उतारा बोस्टन येथील इव्हिनिंग ट्रान्स्क्रिप्ट नांवाच्या पत्राच्या १८८८ च्या फे. च्या अंकांतून घेतला आहे. न्यूयॉर्क येथील 'इव्हन्जलिस्ट' पत्रांत फीब बाईनें विधवागृहाविरुद्ध प्रसिद्ध केलेलें पत्र, त्यावर रमाबाईनीं दिलेलें उत्तर आणि त्या उभयतांच्या लेखावर त्या पत्रकर्त्याचा अभिप्राय या सर्वांवर ट्रॅन्स्क्रिप्टांत अभिप्राय दिला आहे. या व मागल्या (म्हणजे फिबीच्या पत्राला उत्तर) उताऱ्यांत रमाबाईंच्या पत्राच्या ज्या भागाचें भाषांतर आलें आहे, तो लक्षपूर्वक वाचला असतां असें दिसून येईल कीं, विधवागृहांत ख्रिस्तीधर्म शिकविला जाणार नाहीं असें रमाबाईनीं फिबिला उत्तर देतांना होईल तितकें स्पष्ट केलें असूनहि चॅपमन बाईनें त्या उत्तरावरून पंडिताबाई अप्रत्यक्ष रीतीनें ख्रिस्ती धर्मास मदत करतील, असा आपल्या मनचाच अर्थ काढून तो आपल्या पुस्तकांत नमूद केला आहे आणि केसरीकारांनीं मिसेस चॅपमनचा असला कलुषित लेख पंडिता रमाबाईविरुद्ध निषाणी नंबर ४ चा पुरावा म्हणून दाखल केला आहे. अशा रीतीनें हव्या त्या निरपराधी मनुष्याला सदोष ठरवितां येणार आहे. फार काय, खुद्द केसरी-

१. फिबी बाईच्या ज्या पत्रावरून केसरीला व सुधारकाला आपआपली लेखनकरामत दाखविणें प्राप्त झालें तें पत्र होतें तसें अनुवादित करून बाराव्या प्रकरणांत दिलें आहे.

कार देखील केसरी द्वारां ख्रिस्ती धर्माचा उपदेश करतात असें सिद्ध करून देतां देईल.'

केसरी व सुधारक चॅपमन बाईचा उल्लेख करतात तो चुकीचा असून, तो जर जेनी चॅपेल बाईच्या पुस्तकाचा असेल तर त्यांत असा अर्थ पिरगळ्ळून काढण्या-सारखा कांहीं भाग सांपडत नाहीं. नाहीं म्हणायला खालीं दिलेला एक उतारा सांपडतो. ह्या उताऱ्याचा कांहीं भलताच अर्थ करतां येईल असें वाटत नाहीं. उलट हा 'सुधारक'कारांच्या विचारांना टेंकूच देणारा आहे असें म्हणतां येईल.

'Parting from her true friend, Dr. Rachel Bodley the Pandita begged her to remind the readers of her book that "it was out of Nazareth that the Blessed Redeemer of mankind came", that great reforms have again and again been wrought by instrumentalities that the world despised. Tell them to help me to educate the high-caste child-widows, for I solemnly believe that this hated and despised class of women, educated and enlightened, are by God's grace to redeem India.

'Ramabai's personal humility (indelible mark perhaps of her race and sex), notwithstanding her courage and high aspirations, it will be illustrated by her own comparison. 'Christ' she once said, 'came to give different gifts to different people. Some he made prophets; some He made preachers, some He made teachers. Since I have become a Christian I have thought He has given me the gift of being a *sweeper*. I want to sweep away some of the old difficulties that lie before the missionaries in their effort to reach Hindu widows.'[1]

ह्या दोन उताऱ्यांतील शेवटलें वाक्य केसरीकारांच्या टीकेस कारणीभूत झालें असल्याचा संभव आहे. पण एक लक्षांत ठेवायला हवें कीं रमाबाई ह्या ख्रिस्ती होत्या—त्यांच्या ख्रिस्तीधर्माच्या अंगिकाराचें कारण ख्रिस्ताचें चरित्र,

१. 'Women Who have Worked and Won' by Jenny Chappell: पृष्ठ १४५.

त्याचें व्यक्तित्व. त्यामुळेंच त्यांना हिंदी अनाथ विधवांच्या बाबतींत इतकें धडाडीनें काम करण्यास उत्तेजन आलेलें. पूर्वीं ह्या विधवांबद्दल त्यांना अत्यंत सहानुभूति होती परंतु त्यांच्या हितासाठीं जीवितसर्वस्व वाहण्याची तयारी त्यांनीं खिस्ती झाल्यानंतर केली.[1] इंग्लंडला जाण्यांतील त्यांचा एक हेतु वैद्यकीय ज्ञान मिळवून डॉक्टर होण्याचा होता हें आपण मागें पाहिलेंच आहे. पण बाप्तिस्मा झाल्यानंतर त्यांचें कार्यक्षेत्रच बदललें. ज्या व्यक्तीच्या जीवनाचा त्यांच्यावर एवढा परिणाम झाला तिची ओळख, आपण ज्यांच्यासाठीं काम करणार त्यांनाहि व्हावी ही इच्छा असणें अगदीं साहजिक होतें. पण ती ओळख करून देण्याचें काम त्यांनीं पत्करलें नव्हतें. त्यांचें काम 'Sweeper'चें होतें व तें त्यांनीं अत्यंत कसोशीनें करण्याचें ठरविलें. त्यामुळें आपल्या वचनाप्रमाणें शारदासदनांत त्यांनीं धार्मिक स्वातंत्र्य कसोशीनें राहूं दिलें होतें.

सुधारककार म्हणतात 'पंडिताबाईंची सत्यनिष्ठा किती जागरूक आहे व विधवागृहाविषयीं चुकीचे ग्रह न होऊं देण्याविषयीं त्यांनीं किती खबरदारी पूर्वींपासून ठेवली आहे, हें वाचकांच्या ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं.'

'ट्रून्स्क्रिप्ट' पत्रानें ह्या बाबतींत आपला स्वतःचा असा अभिप्राय दिला आहे :

'फिबीबाईनें काढलेल्या शंकांमुळें अल्पकृति पण शूर अशा या पंडिताबाईंनीं आरंभिलेल्या सत्कृत्यांस मदत करूं नये, असें काहींसें वाटणार आहे खरें; पण त्यांचा निःस्सीम प्रामाणिकपणा पाहूनच अनेक लोकांना त्यांच्या कामास हातभार लावावा, अशी इच्छा होईल.'

---

१. श्री गणेश ल. चंदावरकर म्हणतातः 'त्यांचे हातून जी लोकसेवा घडली ती त्यांनीं खिस्ती धर्माचा स्वीकार केला नसता तर घडली असती काय? या प्रश्नाचें उत्तर देणें कठीण नाहीं. खिस्ती धर्मांत, खिस्ताच्या शिकवणींत, त्याच्या जीवनादर्शांत मानवता, प्रेम, अनुकंपा यांना उच्च स्थान प्राप्त झालें आहे त्यामुळें रमाबाईंचें मन त्यांच्याकडे आकर्षिलें गेलें. हा साक्षात्कार त्यांच्या पुढील जीवनांत त्यांना प्रेरणा व धीर देता झाला. हा साक्षात्कार त्या हिंदु धर्मांत राहिल्या असत्या तर त्यांना होऊं शकला नसता व ह्या साक्षात्कारामुळेंच रमाबाईंच्या अंगीं असलेलें आर्यस्त्रीतेज अधिक उजळलें व त्यांच्या जीवनकार्याच्या रूपानें त्याची परिपूर्णता झाली.'
(अनुराधा : एप्रिल १९६० पृष्ठ ७४)

वादळापूर्वींचा काळ म्हणजे १८९०, १८९१ व १८९२ हीं तीन वर्षें. १८९३ सालीं तर ह्या वादळांतून एक झंजावात निर्माण झाला. त्यासंबंधीं पुढच्या एका प्रकरणांत ऊहापोह केला आहे. पण ह्या 'टेम्पेस्ट' नाटकांतील 'एरियलचें सोंग' 'पुणें वैभवकारां'नीं वठविलें होतें व त्यांत त्यांचा पुरा मोड झाला, एवढी गोष्ट येथें सांगितली पाहिजे.

१८९१ सालीं गोपाळराव जोशी ह्यांचा पुण्यास संगमावर जाहीर रीतीनें बाप्तिस्मा झाला. पूर्वीं जोश्यांचें क्रीडाक्षेत्र 'पुणें वैभव' होतें. या पत्राद्वारेंच गोपाळरावांनीं पंच हौद मिशन चहा प्रकरण रंगदार बनविलें होतें व वर्ष दोन वर्षें साऱ्या पुणेंभर गोंधळ उडवून दिला होता. आपला पित्त्याच "बाटला" तेव्हां 'पुणें वैभव' गांगरून गेलें. गोपाळरावांवर सूड उगवायचा व जमलें तर तापल्या तव्यावर पंडिता रमाबाईंनाहि खरपूस भाजून काढावयाचें असें 'पुण वैभवकारांनीं' ठरविलें व १२ जुलैच्या अंकांत सदभिरुचीला किळसवाणें वाटेल असें स्फुट लिहून पंडिता रमाबाईंची मधल्यामध्यें त्यांत बेअब्रू केली. बाईंच्या मित्रमंडळीला तें स्फुट वाचून अत्यंत चीड आली. बाई नको म्हणत असतां आतां अतीच झालें म्हणू 'पुणें वैभवकारां'वर फिर्याद करायला बाईंना जवळ जवळ त्यांनीं भाग पाडलें.

बाईंच्या बाजूनें जे साक्षीदार कोर्टांत हजर होते त्यांत रावबहादूर चिंतामणराव भट स्पेशल मॅजिस्ट्रेट, श्री. गोपाळराव आगरकर, डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर अशी मंडळी होती. शिवाय एज्युकेशनल इन्स्पेक्टर मि. कर्कहॅम ह्यांच्यासारखे कांहीं युरोपियन ऑफिसरहि होते.

कोर्टांत आल्यावर असल्या ह्या साक्षीदारांकडे पाहून पुणें वैभवकारांना पश्चात्तापाचा झटका आला व त्यांनीं मुकाट्यानें खालीलप्रमाणें एक माफीपत्र सादर केल.

'पंडिता रमाबाई यांस,

आपण जो लेख आपल्या अब्रुनुकसानीचा आहे असें म्हणतां तो प्रसिद्ध करण्यांत आमचा आपली अब्रु घेण्याचा किंवा मन दुखविण्याचा बिलकुल इरादा नव्हता असें आम्ही आपणास खात्रीपूर्वक कळवितों. हे शब्द वापरतांना आमच्या हातून आमच्या मनांत नसतां अपराध घडला असें आढळतें, व तो विनाकारण

घडला हें आम्हांस कबूल आहे. त्याजबद्दल आम्ही आपली अंतःकरणपूर्वक दिलगिरी प्रदर्शित करतों आणि पुनः या तऱ्हेचा आपला अपराध करणार नाहीं असें वचन देतों. हें पत्र आम्ही आपल्या पत्राच्या येत्या अंकांत प्रसिद्ध करूं.

पुणें, तारीख १ ऑगस्ट १८९१.[१]'

मुंबईस शारदासदन असतां कंड्यांचें पीक भरघोस येई तसेंच पीक पुण्यासहि येई. शारदासदन मुंबईस होतें तेव्हां त्यांत असलेल्या दोन मुली पंडिता रमाबाईबरोबर बायबल वाचूं लागल्या. यावरून कित्येकांनीं असा तर्क काढला कीं पंडिताबाई सदनांत ख्रिस्ती धर्म शिकवूं लागल्या. ह्याबद्दल सुधारक म्हणतो, 'खरी गोष्ट अशी आहे कीं या मुली पूर्वीं फ्री चर्च स्कुलांत जात असत. व झनाना मिशनच्या लेडीज् त्यांचे घरीं जाऊन त्यांना शिकवीत असत पुढें त्यांच्या पालकांनीं त्यांना सदनांत घातलें आणि *पंडिताबाईंस त्यांच्याकडून बायबल वाचून घेण्यास विनंति केली*. पं. बाईंनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारला असल्यामुळें त्यांना ती विनंति मान्य करणें योग्य वाटलें. असें असून दुसरे दिवशीं गांवांत एकच बोभाटा. वास्तविक पहातां अशा स्थितींत मुलींकडून बायबल वाचविण्याचा आग्रह धरून बसण्यास कांहीं हरकत नव्हती. तथापि ऑ. मि. जस्टिस तेलंग वगैरेंनीं असें करणें योग्य असलें तरी लोकांच्या दुराग्रहामुळें सदनास तें अपायकारक होईल असें सांगितल्यावरून पं. बाईंनीं त्या मुलींकडून बायबल वाचविणें सोडून दिलें.'[२]

तर इकडे त्याच गोष्टीमुळें ख्रिस्ती लोकांत बाईंच्या विरुद्ध केवढें काहूर उठलें: ६ फेब्रुवारी १८९० च्या सुबोधपत्रिकेंत 'यापुढें कोणा विद्यार्थिनीची किंवा तिच्या पालकाची इच्छा असली तरी ख्रिस्ती धर्माचें किंवा कोणत्याच धर्माचें शिक्षण शारदासदनांत दिलें जाणार नाहीं' असें पंडिता रमाबाईंनीं प्रसिद्ध केलें. त्यावरून ज्ञानोदयांत ख्रिस्ती लोकांकडून टीकेची झोड उठली. शेवटीं ज्ञानोदयाच्या संपादकांना समजूत काढावी लागली कीं,

'शारदासदनाचे हरएक बाबतींतील प्रत्येक नियमाविषयीं पंडिताबाई ह्या जबाबदार नाहींत. कारण हे नियम पंडिताबाईंनीं स्वतः केले नाहींत, व

---

१. ज्ञानोदय ६ ऑगस्ट १८९१

२. सुधारक: २० जुलै १८९१.

असें करण्याची त्यांना मोकळीकहि नाहीं. सदनाचे कोणते नियम कायम करावे आणि कोणते रद्द करावे इत्यादि व्यवस्था करणें हें अमेरिकेंतील असोसिएशन व मुंबईंतील सल्ला देणारी कमेटी या लोकांच्या हातीं आहे. म्हणून शारदासदनानें धर्म शिक्षणासंबंधीं तिऱ्हाईतपणाविषयीं आपला पूर्वीचा नियम अलीकडे अधिक कडकपणें अमलांत आणला यावरून ताबेदार ज्या पंडिताबाई यांजवर दोषाचा सर्व भार लादावा हें करणें अयोग्य आहे..... शारदासदनाच्या सूत्रधारांस सोडून देऊन त्यांच्याबद्दल फरमान-बरदारं[१] विचाऱ्या पंडिताबाई, ज्या कोणत्या ना कोणत्या रीतीनें स्वदेशियांचें कल्याण करण्यांत मेहनत करीत आहेत, त्यांजवर खरमरीत टीका करणें हें आमच्या मतें प्रशस्त नाहीं.'[२] ह्यानंतर प्रसिद्ध ख्रिस्ती साहित्यिक बाबा पदमनजी ह्यांनीं शारदासदनाचें विदारण करण्यासाठीं व त्यांतच जातांजातां ज्ञानोदयानें बाईंची बाजू घेतली म्हणून त्याचीहि हजरी घेण्यासाठीं ज्ञानोदयांत एक लेख प्रसिद्ध केला व ज्ञानोदयानें बाबासाहेबांची समजूत घालण्यासाठीं त्याच्या पुढच्या दोन अंकांत लेख लिहिले.[३]

थेट असाच प्रकार सदन पुण्यास आणल्यावर तेथेंहि झाला. रमाबाईंनीं सदनांतून गैरवर्तनामुळें हाकलून दिलेल्या कृष्णाबाई नांवाच्या बाईनें आपली मुलगी, पंडिताबाई नको नको म्हणत होत्या तरी, त्या चर्चला निघाल्या असतां, त्यांच्या गाडींत नेऊन बसविली, पण पुढें हकालपट्टी झाल्यावर 'केसरी'ला एक पत्र लिहून पंडिताबाई विरुद्ध हाकाटी केली कीं 'माझ्याबद्दल खोटेंनाटें लिहून कळविलें आणि सदनाची अब्रू राखण्यासाठीं माझी अब्रू खराब केली' आणि ह्या कृष्णाबाईंचें म्हणण सत्य व बाईचें खोटें हें सिद्ध करण्यासाठीं टिळक चरित्रकार म्हणतात. 'कृष्णाबाई ही रमाबाईंची सख्खी आतेबहीण.'[४] जणूं काय सख्ख्या आतेबहिणीला खोटेंनाटें सांगतांच येत नाहीं, आणि आतेबहिणीवर विश्वास ठेवायचा तर तिला दुर्वर्तनाबद्दल हाकलून देणाऱ्या मामेबहिणीवर कां नाहीं ठेवायचा? ह्यासंबंधीं सुधारककार म्हणतात : 'त्याच कृष्णाबाईनें, पं. बाई

१. हुकमाचे ताबेदार.
२. ज्ञानोदयः मार्च २०.: १८९०.
३. ज्ञानोदय ७,१४ व २१ ऑगस्ट १८९०
४. केळकरकृत टिळकचरित्र. भा १ः पृष्ठ ३२५-६.

देवदर्शनाला सदनाचा गडी बरोबर देऊन मुली धाडण्यास हरकत घेतात, पण चर्चला त्यांना आपण होऊन घेऊन जातात अशी कंडी उठविली, सुधारकाच्या पुढच्याच अंकांत अहमदनगर जिल्ह्यांतील अकोले तालुक्याचे मामलेदार श्री. व्यंकटेश दामोदर पुणतांबेकर ह्यांनीं पत्र लिहून कळविलें कीं 'आपले पत्रांत कृष्णाबाईसंबंधानें मजकूर आहे तो बरोबर आहे.' सुधारक पुढें म्हणतो 'पालकांच्या सांगण्यावांचून ज्या प्रमाणें कोणत्याहि मुलीस चर्चला धाडण्यांत पंडिताबाईंची हरकत नाहीं, त्याप्रमाणेंच जर पालकांकडून मुलींना विठ्ठलवाडीला, चतुःशृंगीला किंवा दुसऱ्या एखाद्या ठिकाणाला सणावारीं योग्य रीतीनें घेऊन जाण्याची तजवीज होईल तर त्याला रमाबाई कधींच हरकत करणार नाहींत. मात्र ख्रिस्ती पैशानें तुमच्या मूर्तिपूजेला त्यांना उत्तेजन देतां येणार नाहीं व त्यांनीं तें देऊहि नाहीं असें आम्हांला वाटतें. ....सदनांतील पुस्तकालयाचीहि तशीच गोष्ट. इंग्रजी व इतर धर्मपुस्तकांबरोबर बायबलच्या चारदोन प्रती ठेवल्या तर त्यापासून काय भयंकर परिणाम घडणार? धार्मिक स्वातंत्र्याचा कित्ता पंडिताबाईंच्या हाडांस खिळून गेल्यासारखा झाला आहे. पालकांच्या सांगण्यावरून ज्या मुलींना जीं पाहिजेत तीं व्रतें वैकल्यें त्या करूं देतात, आणि गीता भागवतादि जुन्या संस्कृत ग्रंथांवरून आणि रामदास तुकाराम इत्यादि अर्वाचीन साधूंच्या पुस्तकांवरून धर्माचीं आणि नीतीचीं तत्त्वें शिकवितात. ज्याला ह्या गोष्टीचा प्रत्यय घेऊन पहावयाचा असेल त्यानें पंडिताबाईंची लायब्ररी अकस्मात् जाऊन पहावी, किंवा पाहिजे त्या मुलीस त्यांच्या पश्चात् हवे ते प्रश्न करून पहावे. पण कृष्णाबाई सारख्या दुष्ट व खुनशी बाईकडून काढून घेतलेल्या जबानीवरच आपल्या आरोपांचा व्यूह रचावयाचा असेल त्यांनीं खऱ्या चोराला साव, आणि खऱ्या सावाला चोर म्हणावें, हें त्यांच्या नीतीला उचित आहे. गेल्या संक्रांतीला गांवांतील कांहीं पोक्त बायकांस व हायस्कुलांतील मुलींस पंडिताबाईनीं सदनांत बोलाविलें होतें. पंडिताबाई मोठ्या बायकांचें आगतस्वागत करण्यांत गुंतल्या असतां हायस्कुलांतील मुलींनीं सदनांतील मुलींबरोबर लाडू, पेढे, फळफळावळ वगैरे जिनसांचा फराळ केला. पण लोकांत ही गोष्ट कोणत्या रूपानें पसरली ती पाहा. हायस्कुलांतील मुलींचें रूपान्तर एका ख्रिस्ती शाळेंतील मुलींत झालें व रमाबाईनीं सदनांतील मुलींकडून त्यांच्याबरोबर बसवून

पुण्यांचा फराळ करविला, असा त्याचा विपर्यास करण्यांत आला.'[१] फीमेल हायस्कुलांतील मुली म्हणजे ख्रिस्ती शाळेंतील मुली ही धडधडीत खोटी गप्प ठेवून दिल्यानंतर तिच्यावर पुढची सारी इमारत उठवून देणें अवघड नव्हतें.

येणेंप्रमाणें सुरुवातीलाच वाहूं लागलेल्या वादळी हवेंत गोपाळराव जोशी व वासूकाका जोशी ह्यांच्या करामतीची भर पडून वादळाचें रूपांतर प्रचंड झंझावातांत झालें. 'पुणें वैभवकारां'सारख्यांच्या नुसत्या शिव्याशापांवर व बदनामीकारक लेखनावरच भागलें नाहीं. रमाबाईंना स्वस्थता मिळूं न देण्याचा पुणेंकरांनीं चंगच बांधला होता. त्यासाठीं त्यांनीं अन्य मार्गांचेंहि अवलंबन केलें. मनोरमाबाईंनीं ह्याचें एक उत्तम शब्दचित्र काढलें आहे, त्यावरून ह्या प्रकाराचें चांगलें दिग्दर्शन होईल. पुणें वैभवकारांना बाईंनीं कसें तोंड दिलें तें आपण पाहिलेंच आहे. मनोरमाबाईंच्या ह्या लिखाणावरून ह्या प्रकारालाहि त्यांनीं कसें तोंड दिलें तें दिसून येईल. मनोरमाबाई लिहितात:

'As for less noble souls, there were no bounds to the things that they said. The baser sort of papers were filled with gross attacks, and anonymous letters threatened her life. Ramabai, however, was singularly incurious of other people's opinions about herself, and praise no less than blame, affected her very little. My mother saw her stuff into her wastebasket unread, papers sent to her containing blue-penciled articles about herself—sometimes of eulogy, sometimes of violent abuse. She would glance at the headlines to get the drift, and then some encomium like "Image of Wisdom" or "Ocean of Learning" would make her laugh heartily.'

जीव घेण्याच्या धमकीचीं पत्रें येत, त्यामुळें बाई कोठें बाहेर गेल्या कीं मुली व मास्तरणी घाबरून त्यांच्या वाटेकडे डोळे लावून चिंताक्रांत होऊन बसायच्या. परंतु पुण्याची ही शहामत खरी, कीं त्यानें बाईंचा जीव घेतला नाहीं, कीं त्यांच्या अंगाला बोट लावलें नाहीं. ह्याला कारण निनांवी पत्रलेखकांच्या अंगीं असलेला धिटाईचा अभाव हें असेल, किंवा रमाबाईंच्या अंगीं असलेल्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव हें असेल.

---

१. सुधारक: २० जुलै १८९१.

# १८ सार्वजनिक चरित्र संपलें ?

'रमाबाई ख्रिस्ती झाल्या, त्या केडगांवाला गेल्या व त्यानंतर त्यांचा जनतेशी कांहीं संबंध उरला नाहीं. तेथेंच त्यांचें सार्वजनिक चरित्र संपलें. येथपर्यंतच त्यांचें चरित्र आहे, पुढें अंधार.' असें कित्येक म्हणतात. म्हणून बाईंच्या केडगांवांतील कार्याचा इतिहास सांगण्यापूर्वी त्यांनीं केलेल्या इतर चळवळींचें दिग्दर्शन ह्या प्रकरणांत केलें आहे.

आज ज्या विषयाला सार्वजनिक वादविवादांत अग्रस्थान प्राप्त झाल आहे, त्या हिंदी भाषाविषयक प्रश्नाचा पुरस्कार प्रथम रमाबाईंनीं केला. कॉंग्रेसमध्यें स्त्रियांचे प्रतिनिधित्व उभें करण्याचा पहिला प्रयत्न रमाबाईंचा. सोशल कॉन्फरन्समध्यें चार हजार पुरुषांत उभें राहून केशवपनाविरुद्ध मांडण्यांत आलेल्या ठरावाला अनुमोदन देतांना सभा गाजविली ती बाईंनीं. पुण्याच्या प्लेगविषयक धामधुमींत ज्या लेखानें ब्रिटिश पार्लमेंटांत हिंदी लोकमताचा प्रतिध्वनि उठविला तो जळजळीत लेख पंडिता रमाबाईंचा. ह्याच लेखावरून त्यांची व मुंबईच्या गव्हर्नराची खटाखटी झाली व बाईंनीं गव्हर्नरचें तोंड बंद केलें.

बाई आपल्या बोलण्या लिहिण्यांत कोणाची भीडमुर्वत धरीत नसत. मग ती एखादी व्यक्ति असो, संस्था असो कीं सरकार असो. सोलापुरास दारू व तंबाखूच्या व्यसनाविरुद्ध बोलतांना त्या वेळच्या शिष्ट समजण्यांत आलेल्या व्यक्तींची त्यांनीं कशी हजरी घेतली होती हें आपण मागें पाहिलेंच आहे. बाईंनीं मुंबईस अमेरिकेसंबंधीं कांहीं व्याख्यानें दिलीं. एकटया केसरीखेरीज त्यांचे रिपोर्टहि कोणी देण्यास धजले नाहीं. त्या व्याख्यानांवर अशी टीका करण्यांत येत होती : 'अशा देशांत, अशा वेळीं, ( म्हणजे ज्या देशांतील लोकांचें राज्य नष्ट झालें आहे व ज्या वेळीं रशिया येऊं पाहातो आहे अशी भीति

पडली आहे, त्या या देशांत, व त्या ह्या वेळीं ) पंडिताबाईंनीं अशीं व्याख्यानें देण्यांत किती मूर्खपणा केला, हें दाखविणारा तिला कोणी भेटत नाहीं काय ?'[१]

बाईंच्या ह्या भाषणांत एके ठिकाणीं असें विधान आहे: 'स्वदेशाभिमान कसा असावा ह्याविषयीं इकडे शाळांत कांहींच शिकवत नाहींत. इकडचीं पुस्तकेंहि शिक्षणार्ह नाहींत. इकडच्या पुस्तकांतील मुख्य तत्त्व काय, तर राणीसरकारची भक्ति करा. राजनिष्ठ असणें हें मी कांहीं वाईट म्हणत नाहीं, परंतु आपल्या आईच्या भक्तीहून त्या भक्तीची मी अधिक मातब्बरी समजत नाहीं. आपल्या जननीस लत्ताप्रहार करून राणीची भक्ति करण्यांत विशेष आहे असें मला वाटत नाहीं.'[२]

खालीं दिलेल्या चारी घटना बाई ख्रिस्ती झाल्यानंतरच्याच. त्यांपैकीं तीन त्या केडगांवला जाण्याच्या आधींच्या व एक केडगांवला गेल्यानंतरची आहे.

पहिली घटना म्हणजे बाईंनीं ७० वर्षांपूर्वीं हिंदी हीच राष्ट्रभाषा असली पाहिजे असा दिलेला इशारा : युनायटेड स्टेट्सची लोकस्थिति व प्रवासवृत्त[३] ह्या अपूर्व ग्रंथांत बाईंनीं हा इशारा दिला आहे. हा इशारा डिसेंबर १८८९ चा आहे. बाई म्हणतात....

पृथ्वीवर सर्वत्र जाऊन वसाहत करणारे एकंदर जवळजवळ दहा कोटी लोक इंग्रजी कुलांतून जन्मले असून इंग्रजी भाषा बोलतात. हें प्रमाण घेऊन त्या भाषेचे अभिमानी लोक म्हणूं लागले आहेत कीं इंग्रजी भाषाच पृथ्वीवरील सर्व लोकांची भाषा होणार. ही गोष्ट कितपत खरी होईल हें सांगवत नाहीं. परंतु या भाषेची वाढ कांहीं विलक्षण आहे एवढें मात्र खरें. आतां आमच्या लोकांनीं ह्या गोष्टीचा थोडासा विचार कां करूं नये ? आमची राष्ट्रीय सभा कलकत्त्यांत, मद्रासेंत, मुंबईंत किंवा पंजाबांत भरली, म्हणजे हिंदुस्थानच्या एका भागांतून गेलेल्या वक्त्यांची बोली दुसऱ्या भागांतील लोकांस समजत नाहीं; मग ते इंग्रजी भाषेंत थोरलालीं व्याख्यानें झोडतात. त्यांचा सर्वसाधारण लोकांस काय उपयोग ? आमच्या देशांत असलेल्या सर्व भाषा

---

१. ज्ञानोदयः १. ऑगस्ट १८८९ पृष्ठ २४५.

२. परिशिष्ट १० पाहा.

३. परिशिष्ट १० पाहा.

नाहींशा करून त्यांच्या जागीं इंग्रजी भाषा स्थापणें म्हणजे हिंदुस्थानाला समुद्रांत बुडवून त्याच्या जागीं ब्रिटिश बेटें आणून ठेवण्यासारखें आहे. आमचे विद्वान्, बुद्धिमान्, विचारी लोक, स्वदेशाची व स्वजातीची उन्नति करूं पाहतात तर आमच्या देशांत सगळ्यांना समजण्यासारखी एक भाषा व ती स्वदेशी भाषाच असणें अवश्य आहे ही गोष्ट त्यांच्या ध्यानांत कशी येत नाहीं ? इंग्रजी भाषा जशी आतां दहा कोटी मनुष्यांची भाषा झाली आहे तशी आपल्याहि देशांत एक भाषा आहे. हिंदी भाषा हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व लोकांस समजते.....मुसलमानांचें राज्य होतें तेव्हां त्यांनीं उर्दू भाषेंत सर्वांशीं बोलचाल ठेवली होती. उर्दू भाषा म्हणजे एक निराळी भाषा नसून तींत अर्धी हिंदी व कांहीं आरबी, फारशी, मराठी, कानडी वगैरे भाषांतील शब्दांचें मिश्रण आहे. हिंदी भाषा शिकण्यासहि फारसे श्रम घ्यावे लागत नाहींत. इंग्रजीप्रमाणेंच, हिंदींत पृथ्वींतील सगळ्या भाषांचा समावेश होऊं शकतो. म्हणून तिची वाढ होण्यास कांहीं अडचण नाहीं. हिंदी भाषेचें व्याकरणहि फार सोपें आहे. तींत आरबी, फारसी, संस्कृत, इंग्रजी आणि राक्षसी भाषेचे देखील शब्द घेऊन त्यांस हिंदीचें स्वरूप देतां येईल. असली अमोलिक सुरेख भाषा आपल्यास लभ्य असतां आणि ती राष्ट्रीय भाषा करण्याचें इतकें सुलभ असतां आमचे विद्वान् बंधु हिंदुस्थानांतील सार्वजनिक गोष्टींची वाटाघाट करण्याची ती, साता समुद्रापलीकडून आलेल्या, प्राचीन मिश्री चित्रलिपीप्रमाणें साधारण लोकांस न कळणाऱ्या इंग्रजी भाषेंतून काय म्हणून करतात ह्याचा उलगडा ते करून देतील काय ? आमच्या राष्ट्रीय आणि सार्वजनिक सभांनीं जर ही गोष्ट मनावर घेतली तर कन्याकुमारीपासून हिमालयापर्यंत आणि सिंधुसमुद्रसंगमापासून मणिपूरच्या सरहद्दीपर्यंत सगळे दीर्घदर्शी देशहितचिंतक आपापल्यापरी हिंदी भाषेचा प्रसार करण्यास झटतील."[१]

बाईंनीं त्याच वेळेस देवनागरी किंवा बालबोध लिपीचा अत्यंत जोराचा पुरस्कार केला आहे. ह्या लिपींत जगांतील कोणतीहि भाषा अगदीं बिनचूक लिहितां येते असें त्या म्हणतात. आणि खरोखरच उच्चाराच्या दृष्टीनें अत्यंत

१. युनाइटेड स्टेट्स्‌ची लोकस्थिति व प्रवासवृत्त : पृष्ठें १८३, १८४ व १८५.

कठीण अशी रशियन भाषासुद्धां बालबोधमध्यें सहज लिहितां येते असें एका इंग्रजी भाषातज्ज्ञानें प्रत्यक्ष अनुभव घेऊन आम्हांजवळ कबूल केलें होतें.

बाईंची एक अत्यंत महत्त्वाची राष्ट्रीय कामगिरी म्हणजे त्यांच्या खटपटीनें कॉंग्रेसमध्यें स्त्रीप्रतिनिधींचा झालेला प्रवेश. मद्यपाननिषेधक स्त्रीमंडळाच्या रमाबाई ह्या एक महत्त्वाच्या क्रियाशील सभासद होत्या. त्यांनीं ह्या चळवळींत अमेरिकेंत असतांनाच भाग घेतला होता. त्यामुळें कदाचित् इकडे आल्यानंतर त्यांच्याच उत्तेजनानें येथें मद्यनिषेधक स्त्री समाज स्थापण्यांत आला असेल किंवा येथें असलेल्या एखाद्या तसल्या समाजाला बाईंनीं हाताशीं धरून कार्यशील केला असावा.

कॉंग्रेसच्या पांचव्या अधिवेशनाच्या रिपोर्टांत स्त्रीप्रतिनिधींबद्दल असें म्हटलें आहे.

'First we must notice that no less than ten lady delegates graced the assembly, one elected by men at a public meeting,[1] the others by various ladies' associations, the Women's Christian Temperance Union, the Bengal Ladies' Association, and the Arya Mahila Samaj.'

परंतु ह्या ठिकाणीं दहा स्त्रीप्रतिनिधि होते असें म्हटलें असलें तरी कॉंग्रेस रिपोर्टाच्या पान १२७ व पान १३८ वर जीं प्रतिनिधींचीं नांवें व माहिती दिली आहे तीवरून प्रत्यक्ष ९ च स्त्रीप्रतिनिधि होत्या असें दिसतें. कदाचित् ही दहावी बाई प्रेक्षक म्हणून आलेली असावी.

हे प्रतिनिधि कोणातर्फे पाठविण्यांत आले हेंहि त्यांच्या नांवापुढें दिलें आहे. त्यावरून ह्या कामीं बाईचा हात किती होता हें दिसून येतें.

योगायोग असा विलक्षण कीं १८८९ सालीं भरलेल्या ह्या अधिवेशनास प्रतिनिधीहि १८८९[२]च होते. त्यांपैकीं ८ स्त्री प्रतिनिधींचे अनुक्रम १०९४ ते ११०१ होते व एकीचा अनुक्रम १४२४ होता[३].

---

1. Report of The Fifth National Congress held at Bombay on the 26th, 27th and 28th Dec. 1889. VIII-IX.

२. वरील रिपोर्ट पृष्ठ १५५.

३. १८८९ मध्यें राष्ट्रीय सभेच्या प्रतिनिधींची वाटणी अधिक पद्धतशीरपणें करण्याचें

(पुढील पानावर चालू)

त्या काँग्रेसच्या रिपोर्टांत पुढील पानावरील तक्ता प्रसिद्ध करण्यांत आला आहे. यावरून पुष्कळ गोष्टी अगदीं आरशासारख्या चक्क दिसून येतात. पहिली गोष्ट म्हणजे ह्या नऊच्या नऊ प्रतिनिधींची निवड मुंबईस झालेली आहे. पैकीं चार आहेत आर्यमहिला समाजाच्या प्रतिनिधी व चार आहेत मद्यपान-निषेध स्त्री सभेच्या प्रतिनिधी. ह्या दोन्ही संस्था रमाबाईंच्या नेतृत्वाखालीं चालल्या होत्या. अंबाल्याची प्रतिनिधि सुद्धां मुंबईच्या पब्लिक मीटिंगनें निवडली होती ! ह्या बाई व मिस् रायडर, ह्या दोघी रमाबाईंच्या **अमेरिकन** मैत्रिणी असून रिपोर्टाप्रमाणें दोघी एम. डी., होत्या. मिस् कार्लटनबद्दल रिपोर्टांत म्हटलें आहे कीं :

Miss Jessie Royce Carlton M.D.., a young lady doctor, has realized in practice the Christian Idyl (sic) and is the idol of the people of Ambala amongst whom she lives and labours, untiringly, by her own choice on the barest pittance, in the purest spirit of Christian love and self abnegation.'[1]

रमाबाईंच्या दुसऱ्या अमेरिकन मैत्रिणीबद्दल रिपोर्टांत असें वर्णन आहे :

Mrs. Emma Brainerd Ryder, M.D.—who travelling for health, came to India with Pandita Ramabai—is the organizer of the Sorasis Club, a literary and artistic association for young Indian ladies, which is already doing much good. She has also formed a Women's Technical Education Association to give some kind of industrial training to young native females, who, left widows and unprovided for, (and who, brought up at Orphanages, or from other causes, have no homes to which to return,) would (and **do**) in default of

---

ठरलें. त्याचाहि कदाचित् थोडासा परिणाम असेल, परंतु मुख्यतः त्यानंतर रमाबाईसारखी कोणीं खटपट न केल्यामुळें लगत नजीकच्या राष्ट्रीय सभांस स्त्रीप्रतिनिधि एखाददुसरीच आल्याचें दिसतें. आम्हांस १८९४ व १८९५ सालचे राष्ट्रीय सभांचे वृत्तांत मिळूं शकले. त्यांवरून पाहातां १८९४ त जी एकच प्रतिनिधि होती तिचें वर्णन 'लंडनमधील घरमालकीण व तेथील स्कूल बोर्डाची सभासद्' असें केलेलें आढळतें. १८९५ सालीं पुण्यास भरलेल्या राष्ट्रीय सभेसहि एकच महिला प्रतिनिधि होती. तिचें वर्णन कुमारी केळवकर, विद्यार्थी, फर्ग्यूसन कॉलेज असें आहे. त्यांची निवड कोल्हापूरच्या एका सार्वजनिक सभेनें केली होती !

1. Report of the Fifth Indian National Congress : IX.

| Number | Electoral Division | Name | Race Religion | Occupation & Address | How & When Elected |
|---|---|---|---|---|---|
| 1094 | Arya Mahila Samaj Bombay | Pandita Ramabai | Christian | Teacher | Women's Christian Temperance meeting held on the— |
| 1095 | „ | Miss Serene Manock Cursetjee | Parsi | Lady Supdt. Alexandra Girls' School | Meeting of the Arya Mahila Samaj held on the— |
| 1096 | Women's Christian Temperance Union | Mrs. Ryder | Christian | Physician | Women's Christian Temperance Union held on the— |
| 1097 | „ | Mrs. Trimbak | „ | Supdt. of Schools | „ |
| 1098 | „ | Mrs. Nikambe | „ | Teacher | „ |
| 1099 | Arya Mahila Samaj Bombay | Mrs. Kanitkar | Hindu | Journalist & Author | Meeting of the Arya Mahila Samaj; held on the— |
| 1100 | „ | Mrs. Ghosal | „ | | „ |
| 1101 | „ | Mrs. G. N. Das | „ | | „ |
| 1424 | Umbala | Miss Jessie Royce Carleton | American Christian | Physician | Public Meeting held on the 15th of Dec. |

some occupation by which to earn an honest livelihood, drift into evil courses.[1]

पहिल्या अंबाल्याला व दुसऱ्या पुण्यास बाईच्या तत्त्वाप्रमाणें कामें करीत होत्या. ह्याच दोघी बाईंच्या बरोबर अमेरिकेंतून आलेल्या असाव्या.

सौ. घोसाळ व सौ. दास ह्याहि बाईंच्या बंगाली मैत्रिणी होत्या व जरी त्या बंगालहून त्या अधिवेशनासाठीं आल्या होत्या तरी त्यांची निवड झाली ती मुंबईच्या आर्यमहिला समाजातर्फे ! त्या ब्राह्मो होत्या.

मुंबईच्या चार दक्षिणी प्रतिधींपैकीं तिघी ख्रिस्ती होत्या. व ज्या हिंदु होत्या त्या म्हणजे सौ. काशीबाई कानिटकर. काशीबाई बाईंच्या एक अत्यंत जिव्हा-ळ्याच्या मैत्रीण होत्या. बाईंनीं अत्यंत हिरिरीनें त्या वर्षी कॉंग्रेसला स्त्री प्रतिनिधि मिळवून दिले. त्यांचें हें कृत्य फार महत्वाचें होतें, कारण स्त्रियांनीं इतक्यांतच राजकारणांत भाग घेऊं नये अशा मताचे न्यायमूर्ति रानडे होते. त्यांनीं रमाबाई रानड्यांना ह्यांत भाग घेऊं दिला नाहीं. रमाबाईसाहेब नाहींत तर पुण्याच्या स्त्रिया नाहींत ! त्यामुळें ह्या वेळेस पंडिता रमाबाईंवर सारी जवाबदारी येऊन पडली. ह्या वेळेस न्यायमूर्ति रानड्यांच्या मताविरुद्ध वागण्याचा व पुढें संमति वय बिलाच्या वेळेस लोकमान्य टिळकांशीं सामना देण्याचा प्रसंग आला असतां तेव्हांहि बाई त्रिलकूल डगमगल्या नाहींत, हें पाहण्यासारखें आहे. बाईंनीं प्रतिनिधि मिळविण्याचें काम केवढ्या शिताफीनें केलें होतें हें मागील पानावरील तक्ता जरा बारकाईनें अभ्यासिला म्हणजे लक्षांत येईल. तसेंच ह्या बाबतींत काशीबाई कानिटकरांनीं आणखी दोन ठिकाणीं लिहिलें आहे तेंहि पाहण्यासारखें आहे. काशीताई म्हणतात : मुंबईची दुसरी कॉंग्रेस झाली तेव्हां तीस चार्लस ब्रॅडला हजर राहणार होते. ‘तुम्ही आत्तांपासूनच स्त्रियांना सभासद करून घ्या. पुढें मागें तुमची राष्ट्रीय सभा पार्लमेंट होईल तेव्हां जसें स्त्रियांना पार्लमेंटमध्यें घेण्याबद्दल इंग्लंड मध्यें आज लढे पडले आहेत, तसे तुमच्यामध्यें पडूं नयेत म्हणून आत्तांपासूनच स्त्रियांना प्रतिनिधी करून घ्या,’ अशा आशयाचीं पत्रें त्यांनीं कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांना पाठविलीं होतीं. एक पत्र पंडिता रमाबाईंना आलें होतें. त्यांनीं मुंबई इलाख्यांतील स्त्रियांना प्रतिनिधि करून घेण्याची खटपट सुरू केली. बंगालच्या

१. Report to the Fifth Indian National Congress : पृष्ठ IX.

स्त्रियांत टागोर घराण्यांतल्या सुवर्णकुमारी देवी टागोर होत्या. चौघां महाराष्ट्रीय स्त्रियांत रमाबाई, मिसेस त्रिंबक व निकंबे ह्या तीन ख्रिस्ती व मी चौथी होतें. प्रतिनिधि होण्यासंबंधीं मला विचारिलें तेव्हां सरकारी नोकरीची अडचण मीं दाखविली. त्या वेळचे गव्हर्नर लार्ड रे यांना ह्यासंबंधानें विचारतां त्यांनीं सांगितलें कीं पुरुष आमचे नोकर, बायका कांहीं आमच्या नोकर नाहींत, तरी तुम्ही त्यांना खुशाल घेऊन जा. याप्रमाणें आम्हां स्त्रियांचा राष्ट्रीय सभेंत प्रवेश झाला....आणि आज तर काय, मंत्री आणि परराष्ट्रीय वकील होण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे. काँग्रेसच्या या पहिल्या आठ स्त्री प्रतिनिधींत सरकारी नोकराची पत्नी मी एकटीच होतें.'[१]

वरील उताऱ्यांत मिसेस त्रिंबक म्हणून उल्लेख आहे त्या मिसेस शेवंतीबाई त्रिंबक कनारन. त्यांच्या कन्या, कुमारी लुल्लू कनारन लिहितात:

'I remember my mother Shewantibai telling me that she was one of the first to attend the Congress along with Mrs. Pandita Ramabai and Mrs. Nikambe and that a photo was taken in which my mother was there. . . . Mother and Pandita were great friends. I had photos of Pandita Ramabai which mother had taken.'

सौ. शेवंतीबाई कनारन ह्या मुंबईच्या रे. सुमंत विष्णु करमरकरांच्या भगिनी. श्री. करमरकर नुसतेच अमेरिकेला जाऊन बी. डी. होऊन आले होते व त्यांच्या पत्नी तेथें जाऊन एम्. डी. होऊन आल्या होत्या. ख्रिस्ती समाजांत हें कुटुंब फार शिकलेलें व पुढारलेलें म्हणून एक वेळ प्रसिद्ध होतें. त्यांनीं समाजसेवेचीं पुष्कळ कामें केलीं होतीं.

सुबोधपत्रिकेचे विद्यमान संपादक प्रिन्सिपाल ग. ल. चंदावरकर मिसेस निकंबे ह्यांना फार चांगले ओळखीत. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें मिसेस निकंबे ह्याहि रमाबाईंच्या बरोबर मुंबईस भरलेल्या पांचव्या कॉंग्रेस[२] अधिवेशनांत स्त्री

---

१. सौ. राधाबाई चिपळूणकरकृत नाणी नवीं जुनीं पृष्ठ ३७. (स्वराज्य १९४७ वरून)

२. मुंबईस दुसऱ्यांदां भरलेलें कॉंग्रेसचें अधिवेशन खरोखरी पांचवें होतें. मुंबईस पहिल्यांदा भरलें तें कॉंग्रेसचें पहिलें अधिवेशन होतें. ते २८–१२–१८८५ रोजीं व पांचवें २६–१२–१८८९ रोजीं. काशीबाई मुंबईस दुसरी राष्ट्रीय सभा झाली म्हणून म्हणतात ही पांचवी सभा पण मुंबईतील दुसरी.

प्रतिनिधि म्हणून हजर होत्या. मिसेस निकंबे ह्यांचें नांव मेरीबाई ऊर्फ शेवंतिकाबाई असें होतें. आधीं त्या रमाबाईंबरोबर मुंबईस शारदासदनांत काम करीत परंतु शारदासदन पुण्यास गेल्यावर उच्चवर्णीय स्त्रियांसाठीं त्यांनीं मुंबईत एक शिक्षण वर्ग सुरू केला. लेडी चंदावरकर ह्यांनींहि मेरीबाईकडून शिक्षण घेतलें होतें.

उमाकान्तकृत रमाबाई रानडे चरित्राला काशीबाई कानिटकरांनीं एक प्रस्तावना लिहिली आहे. तींत ह्याच विषयासंबंधीं त्या लिहितातः

'राजकीय कामांत बायकांनीं अजूनपर्यंत भाग घेण्यासारखी स्थिति आली नाहीं तेव्हां त्यांनीं भाग घेऊं नये असें त्यांचें [रानड्यांचें] प्रथम मत असावेसें वाटतें. आणि म्हणूनच मुंबईस दुसरी राष्ट्रीय सभा झाली त्या वेळेस मि. ब्रॉडला हे हजर राहिले होते. त्यांनीं पंडिता रमाबाई वगैरे स्त्री पुढारी बायकांना सुचविलें कीं तुमची राष्ट्रीय सभा अजून फार मोठी झाली नाहीं तोंच स्त्री प्रतिनिधि तींत घेण्याची व्यवस्था करा. पुढें हीच सभा तुमच्या देशाची पार्लमेंट होईल. नंतर स्त्री सभासद घेण्याचें मनांत आलें तरी फार कठीण जाईल. यासाठीं अगोदरपासून वहिवाट असूं द्या. नाहींतर इंग्लंडसारखीं रणें माजतील. ब्रॉडले साहेबांच्या ह्या सूचनेप्रमाणें पं. रमाबाई खटपट करूं लागल्या. पण रावसाहेब रानड्यांनीं वहिनीबाईंना किंवा पुण्यांतील अन्य पुढाऱ्यांच्या बायकांना प्रोत्साहन दिलें नाहीं. पंडिता रमाबाईंनीं फार खटपट करून सात-आठ स्त्री डेलिगेट मिळविल्या.'[२]

मि. ब्रॉडला ह्यांचें म्हणणें त्या वेळेस एकट्या रमाबाईंनाच पटल्यासारखें दिसतें व तें एकदां पटल्यावर कॉंग्रेस मध्यें–म्हणजे भावी हिंदी पार्लमेंटमध्यें–स्त्री प्रतिनिधि घेऊन हजर राहाण्याचें त्यांनीं ठरविलें. महाराष्ट्राच्या कार्यकर्त्यांची 'मक्का' पुण येथून सहकाऱ्यांचा, व कार्यकर्त्यांचें आश्रयस्थान रानडे ह्यांच्या सहानुभूतीचा, खडखडाट झालेला असतांना बाईंनीं तें काम नेटानें पुरें केलें. वेळ अगदीं थोडा राहिला होता, रमाबाईसाहेब रानडे ह्यांच्यासारख्या नेहमीं पाठीशीं राहणाऱ्या मैत्रिणींचा अभाव, उघड विरोध नसला तरी पुढाऱ्यांचा सहानुभूतिशून्य थंडपणा, अशा परिस्थितींत आपल्याच निकटच्या मैत्रिणींची स्त्री प्रतिनिधींची सेना बनवून, त्यांना घेऊन बाईंनीं कॉंग्रेसमध्यें प्रवेश केला

२. कै. रमाबाई रानडे : लेखक उमाकान्त. प्रस्तावना पृष्ठ १६

ह्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. मिस् जेसी राईट कार्ल्टन ह्या अंबाल्याला राहणाऱ्या ! त्यांची निवड मुंबईच्या पब्लिक मीटिंगकडून केवळ दहा दिवस अगोदर होते आणि चौघां आर्य महिला प्रतिनिधींची, व मद्यनिषेध संस्थेच्या प्रतिनिधींची निवडणूक कोणत्या तारखांना झाली ह्याचा पत्ताच नाहीं; ह्यावरून 'In anticipation' ह्या निवडणुका बाईनींच करून टाकलेल्या दिसतात. कांहींहि असलें तरी तेवढी वेळ मारून नेऊन बाईनीं स्त्री प्रतिनिधींच्या बाबतींत भावी हिंदी पार्लमेंट्चा पाया मात्र घालून टाकला.

ह्या स्त्री प्रतिनिधींची माहिती ह्या रिपोर्टांत दिली आहे. त्यांत बाईच्याविषयीं अगदीं आरंभींच असे उद्‌गार आहेत.

'It is sufficient to mention Pandita Ramabai's name which—as well as the good work she is so zealously carrying on,—is, we believe, as well known in Europe and America as in India.'[1]

बाईच्या चरित्रांतील ह्या घटनेवर त्यांच्या पुष्कळशा चरित्रकारांनीं एक छानसें कल्पित काव्य रचलें आहे! आणि तें असें आहे कीं बाईच्या चरित्रांत तें सहज पचून जावें. त्या म्हणे कॉंग्रेसच्या व्यासपीठावर भाषण करण्यास उभ्या राहिल्या, तेव्हां त्यांचा नाजुक आवाज सगळ्यांच्या कानांपर्यंत पोंचेना. —बाईचा आवाज मुळींच नाजुक नव्हता. अगदीं खणखणीत होता—लोक पुढें पुढें सरकूं लागले, तेव्हां बाई म्हणाल्या,

"बांधव हो क्षमा करा, माझा आवाज आपल्यापर्यंत पोंचत नाहीं. पण त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहींच नाहीं. आज शतकानुशतकें स्त्रीचा आवाज आपल्या कानापर्यंत पोचण्याइतका प्रबल होण्याची संधी तरी आपण तिला कधीं दिली होती का? ह्या प्रश्नानें सर्वांना निरुत्तर केलें आणि स्त्रीदास्यविमोचनाच्या व्याख्यानास अनुकूल वातावरण उत्पन्न झालें."

प्रत्यक्षांत मात्र त्या अधिवेशनांत संमत झालेल्या १५ ठरावांत एकहि ठराव स्त्रीदास्यविमोचनावर नव्हता कीं कसल्याच सामाजिक विषयावर नव्हता !

पण बाईनीं त्याच सुमारास दुसऱ्या एका सभेंत सामाजिक विषयावर भाषण केलें होतें व त्याचा मात्र बराच बोलबाला झाला होता. त्याची हकीगत अशी :

1. Report of the Fifth Indian National Congress. IX.

कॉंग्रेसबरोबरच व त्याच मंडपांत सामाजिक परिषद भरत असे. मुंबईस कॉंग्रेसचें अधिवेशन संपतांच २९ डिसेंबर रोजीं त्याच मंडपांत तिसऱ्या सामाजिक परिषदेचें अधिवेशन भरलें. त्या परिषदेच्या खुल्या अधिवेशनाला बाईंना खुद्द अध्यक्षांकडून विशेष आमंत्रण गेलें होतें. त्यांच्याबरोबर आणखी एकच महिला त्यावेळीं हजर होती. श्रोतृसमाज ४००० होता असा 'टाईम्स ऑफ इंडियाचा' अंदाज आहे. सभेला हजर असलेल्या मोठमोठ्या लोकांची टाईम्सनें यादी दिली आहे. त्यांत कॉंग्रेसचे अध्यक्ष सर डब्ल्यू वेडरबर्न, जस्टिस तेलंग, डॉ. भांडारकर, सुब्रह्मण्यम् अय्यर वगैरे नांवें आहेत. तेलंग ह्यांना अध्यक्ष निवडण्यांत आलें. चवथ्या ठरावावर बाई बोलल्या. सोशल कान्फरन्सच्या रिपोर्टांत टाईम्समध्यें त्यांच्या भाषणाचा खालील-प्रमाणें विस्तृत गोषवारा दिलेला आहे[1] :

ठराव विधवा केश-वपनासंबंधीं होता. तो श्री. सुब्रह्मण्यम् अय्यर ह्यांनीं मांडला. त्याला दुजोरा देतांना बाई म्हणाल्या :

"आपल्या देशांत हजारों लाखों विधवा आहेत आणि म्हणूनच हा ठराव संमत झाला पाहिजे. मात्र ह्या ठरावाला मी एक दुरुस्ती सुचवितें. ती अशी कीं ठरावांत सुचविलेली अठरा वर्षांची वयोमर्यादा अजिबात गाळून टाकावी. विधवा वयांत आल्यावर आपण कसें राहायचें तें ठरविण्याची तिला संपूर्ण मोकळीक असावी. आपले केस वाढवावे असें जर तिला वाटत असल तर तसें करण्यास तिला संपूर्ण स्वातंत्र्य असावें. तिला जर आपले केस काढावेसे वाटले तर तसें करण्याची तिला पूर्ण मुभा असावी. आजपर्यंत मीं असंख्य विधवा पाहिल्या आहेत, त्यांपैकीं एकीलाहि आपले केस काढून घेण्याचीं हौस दिसून आली नाहीं. (टाळ्या) उलट आपले केस काढण्यास नकोत असेंच त्या म्हणतांना आढळल्या आहेत. ही शोभा करून घेण्यास त्यांना भाग पाडण्यांत येतें. ('शेम' 'शेम'च्या आरोळ्या) त्यांना असें सांगण्यांत येतें कीं जर तुम्ही आपले केस लांब वाढूं दिलेत तर त्याच केसांनीं यमलोकीं तुमच्या नवऱ्यांना अधिक आवळून बांधण्यांत येईल. ही एक अत्यंत वेडगळ समजूत आहे हें काय मीं सांगायला पाहिजे? कोकणांत तर दहा दहा वर्षांच्या बालिकांचे केस

---

१. टाईम्स. ३० डिसेंबर १८८९

भादरलेले मीं पाहिले आहेत. माझ्यापुढें बसलेल्या किती सद्गृहस्थांना पत्नी-निधनानंतर न्हाव्यापुढें बसून मारून मुटकून आपलीं डोकीं भादरून घ्यायला आवडतील? (टाळ्या) असला प्रसंग तुमच्यावर आल्यास तुम्हांला तो अत्याचार वाटेल. तर सद्गृहस्थ हो, असलाच अत्याचार आपल्या लेकीसुनांवर होत असतां त्यांच्या मदतीला तुम्ही नको का यायला? ह्याच मंडपांत एकसारखा टाहो फोडण्यांत येत होता कीं सरकारनें जनतेचें वाक्स्वातंत्र्य हिरावून घेऊं नये. तोच न्याय सर्व स्त्रिया पुरुषांजवळ मागत आहेत. एका भागूबाईछाप पित्याची एक गोष्ट मला ह्या वेळीं आठवते. आपल्या नातेवाइकांच्या आरडा-ओरडीला घाबरून त्यानें आपल्या बालविधवा कन्येचे केस काढण्यास अडथळा केला नाहीं. कायद्याचा आश्रय घेण्याचें त्याच्या अंगीं धैर्य असतें तर त्या बिचाऱ्या पोरीवर असा प्रसंग आला नसता. असें जुलमी कृत्य करणा-राला कायद्यानें तीन वर्षे सक्त मजुरीची शिक्षा ठेवली आहे. पण त्यानें जाती रिवाजाला मान तुकविली. त्या बिचाऱ्या पोरीला ह्या कायद्याचें ज्ञान नव्हतें. तरी माझी आपणांस विनंति आहे कीं आपण सर्वजण जनतेला ह्या कायद्याचें ज्ञान करून द्या. समाजाचा हा काळिमा पुसून टाकावा असें ज्यांस वाटत असेल त्यांच्याशीं माझा वाद नाहीं. मला सांगायाचें तें एवढेंच कीं हा ठराव संमत केला कीं त्याचें पालन खात्रीपूर्वक झालेंच पाहिजे अशी खबरदारी घ्यायला हवी. आपल्या विधवांचें केशवपन करायचें नाहीं असें तुम्हीं ठरविलें कीं कदाचित् आपल्या घरांतील बायका जुन्या स्पार्टन स्त्रियांनीं लढाईस निघालेल्या पुरुषांना धनुष्यबाणासाठीं आपल्या केसांचे पेड कापून दिले तसे आपण होऊन स्वतःचे केस त्या तुम्हाला अर्पण करतील."[१] (टाळ्यांचा प्रचंड व प्रदीर्घ कटकडाट)[२]

---

१. टाईम्स ऑफ इंडिया. ३० डिसेंबर १८८९.

२. मुंबईच्या ठरावांत म्हटलें होतें: 'The disfigurement of child widows before the age of 18, and even after that age without the consent of the widow, recorded in writing before a Panch and a Magistrate, should be prohibited by law. १८९१ च्या नागपूरच्या सामाजिक परिषदेंत हाच ठराव काशीबाई कानिटकर ह्यांनीं मांडला तेव्हां 'should be prohibited by law ऐवजीं 'should be

(पुढील पानावर पहावें)

ह्या गोष्टीनंतर आठ वर्षांनीं बाईंनीं सार्वजनिक आयुष्यांत पुनः एकदां पदार्पण केल्याचें आढळून येतें. १८९७ सालची ती गोष्ट आहे. रँड साहेबाचा खून होऊन गेला होता. त्याच सुमाराला बाईंनीं गार्डियन साप्ताहिकांत एक पत्र प्रसिद्ध करून सरकारी अधिकाऱ्यांना चांगलेंच तापविलें. ब्रिटिश पार्लमेंटमध्यें मेजर रॅश ह्यांच्या प्रश्नाला उत्तर देतांना, ता. २६ जुलै १८९७ रोजीं लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन ह्यांनीं तें पत्रच वाचून दाखविलें व त्याला अशा रीतीनें इंग्लंडमध्येंहि चांगलीच प्रसिध्दी मिळाली.

त्या पत्राचा मराठी तर्जुमा खालीं दिला आहे :

'प्रिय गार्डियन

मी प्लेग हॉस्पिटलमध्यें राहायाला आलें आहे. पण ईश्वरी कृपेनें सुरक्षित व धडधाकट आहें. माझ्या एका मुलीला डॉक्टरांच्या हुकमावरून स्टेशनवरूनच येथें आणण्यांत आलें व त्यामुळें तिची काळजी घेण्यासाठीं मलाहि तिच्याबरोबर येथें यावें लागलें. ह्या धोक्यांच्या जागीं दुसऱ्या कोणास पाठविण्यास मला छाती होईना. ही जागा खरोखरच धोक्याची आहे. वर वर पाहाणाराला

(मागील पानावरून)
'discouraged' by law अशी दुरुस्ती लोकमान्य टिळक ह्यांनीं सुचवली व ती काशीबाईंनीं मान्य केल्यानंतर ठराव मंजूर झाला. मूळ ठराव वाचकांपुढें नसल्यामुळें टिळकांच्या दुरुस्तीचें मर्म समजणें अशक्य आहे. शिवाय त्या दुरुस्तींत by law हे शब्द नव्हते. टिळकांचा आग्रह समाजसुधारणेंत सरकारचा हात नको असा होता. रानडे वगैरेंनाहि समाजसुधारणा होतां होईल तों स्वावलंबनानें व्हावी हें मान्य होतें. पण जेथें दंडशक्ति सरकारच्या हातीं तेथें समाजसुधाणेसाठीं सरकारकडून कायदे करून घेणें अपरिहार्य होतें हें रानडे ह्यांनीं पुनःपुनः दाखवून दिलें होतें. सामाजिक इच्छेविरुद्ध केशवपन हा पीनल कोडखालीं सुद्धां गुन्हा होतो. हा प्रश्न पुनः पुढें आला तो १८९५ च्या पुण्याच्या सामाजिक परिषदेंत. श्री. के. नटराजन ह्यांनीं तेव्हां मांडलेल्या ठरावांत म्हटलें होतें कीं :

'The practice of disfigurement in the case of child widows is an enormity which must be put down by strenuous private efforts in all places.'

ह्यांत प्रौढ विधवांच्या वपनाच्या प्रश्नाचा उल्लेख नाहीं. वास्तविक खाजगी प्रयत्न त्यांच्या बाबतींत ज्यास्त आवश्यक होते. बालविधवांसाठीं कायद्याचा बडगाच जरूर होता.

दवाखान्याच्या शिस्तीप्रमाणें हें स्थळ मोठें स्वच्छ व चांगलें भासेल. येथें रोग्यांची देखभाल करणारे किती तरी डॉक्टर आहेत, कितीतरीं परिचारिका आहेत, केवढा मोठा नोकरवर्ग आहे ! पण अंदरकी बात मात्र संशयास्पद आहे. मला वाटतें कदाचित् वरच्या अधिकाऱ्यांना त्याची दाद नसेल. आगगाडीच्या स्टेशनवर कित्येक डॉक्टर मोठ्या चमत्कारिक रीतीनें वागतात.

काल येथें प्लेग हॉस्पिटलमध्यें एका तरुण माणसाला पाठविण्यांत आलें. तो चांगला धष्टपुष्ट आहे. दुसऱ्या कोणत्याहि निरोगी माणसाइतका निरोगी आहे. पण राहातो आहे येथें! कारण डॉक्टरसाहेबांनीं त्याची येथें रवानगी केली आहे ना! अशीच एक दिवस मी माझ्या मुली घेऊन तळेगांवहून केडगांवला चाललें होतें. कामावर आलेल्या डॉक्टरानें गाडींत सर्व मुली तपासल्या. त्यांपैकीं एक मुलगी हवेंतील ऊष्णतेमुळें व तळेगांवला झालेल्या श्रमांमुळें तापली होती. पण तिला कांहीं झालें नाहीं असा अभिप्राय देऊन जाऊं दिलें तर दुसऱ्या एका मुलीला कांहींहि झालें नसतां आजारी ठरवून स्टेशनवर उतरावयाला लावलें. बिचारी पोर भीतीनें अर्धमेली झाली. घाबरून ती रडायला लागली. तिची परीक्षा झाली. अंगांत ताप नसल्यानें तिची सुटका झाली. परंतु त्याच डॉक्टरानें केडगांवहून येणाऱ्या आमच्या एका लहान मुलीला पाहिलें. तिला खरूज झाली होती व ती दुष्काळी मुलगी असल्यानें तिला हाडेतापहि होता. डॉक्टरसाहेबांनीं आम्हांला हुकूम पाठविला कीं मुलीला ताबडतोब प्लेग हॉस्पिटलमध्यें पाठवून द्या. आज तिच्या अंगांत ताप नाहीं पण डॉक्टर म्हणतात आणखी दोनतीन दिवस तिनें येथें राहिलेंच पाहिजे. पण मला त्यांत कांहीं खेद वाटत नाहीं.

दोन महिन्यांपूर्वीं मि. प्लँकेट ह्यांनीं जेव्हां माझ्या शाळेला भेट दिली तेव्हां कांहीं दुष्काळी मुली आजारी होत्या. कांहींना खरूज झाली होती, कांहींना गालगुंड झालें होतें, तर कांहींचीं पोटें साफ नव्हतीं. थोडेसें जरी कांहीं होत असलें तरी ह्या साऱ्याच्या साऱ्या मुली ससून हॉस्पिटलमध्यें पाठवून द्या असें मि. प्लँकेट ह्यांनीं मला सांगितलें. त्याच वेळेस त्यांनीं मला असें आश्वासन दिलें कीं सर्व मुली सुरक्षित राहातील व सर्वांची काळजी घेण्यांत येईल. मीं माझ्या पुष्कळ मुली त्याप्रमाणें तिकडे पाठविल्या. आणि लौकरच त्यांतील बहुतेक सुरक्षित परत आल्या. त्यांपैकीं एक दुष्काळी मुलगी होती. ती

विधवा होती. तिला खूप ताप आलेला होता. तिला प्लेग झाला असेंठरवून ह्या प्लेगच्या दवाखान्यांत पाठविण्यांत आलें. आम्हांला सांगण्यांत आलें कीं डॉक्टर सांगतील तोंवर राहाण्याची तयारी असेल तरच आमच्यापैकीं कोणाला रोग्याला सोबत करायला राहतां येईल, नाहीं तर नाहीं. ह्या मुलीबरोबर राहाण्यास मला कोणालाच पाठविता येईना आणि स्वतःहि राहातां येईना. कारण मला १८० मुलींना सांभाळायचें आहे, त्याशिवाय मॅजिस्ट्रेटच्या हुकुमावरून त्यांना ताबडतोब पुण्याहून बाहेर हालवायचें आहे.

मला थोडी उसंत मिळून मी पुण्याला येईपर्यंत सहा आठवड्यांचा काळ निघून गेला होता. पुण्यास येऊन त्या मुलीबद्दल ससून हॉस्पिटलच्या डॉक्टरकडे विचारपूस करतां मला सांगण्यांत आलें कीं मुलगी मागेंच मेली. परमेश्वरा, खरोखर आज तिला जसें जगावें लागत आहे तशा जगण्यापेक्षां ती मेली असती तर बरें झालें असतें. काल रात्रीं मी येथें आलें व तपास करूं लागलें तर मला असें आढळून आलें कीं मुलगी जिवंत असून चांगली धडधाकट आहे. तिला भेटावयाचा मीं प्रयत्न केला तर तेथील नोकरानें व चौकीदारानें सांगितलें, हॉस्पिटलच्या एका पहारेकऱ्यानें तिला 'ठेवलें' आहे. तो पहारेकरी म्हणतो ती निघून गेली व कोठें गेली तें आपल्याला माहीत नाहीं. काल रात्रीं दोन डॉक्टरांनीं व दोन कामदारणींनीं सांगितलें, ती चांगली वरी असून उद्यां तुमची तिची गांठ पडेल. तेच लोक आज म्हणतात, ती येथें नाहीं! कांहीं दिवसांपूर्वीं तिला 'डिसार्ज' मिळाला. हॉस्पिटलमधून 'डिसचार्ज' दिल्याचें मला कळविण्याची जबाबदारी आपली नाहीं असें त्यांचें आतां म्हणणें आहे. ही व्यवस्था मोठी विलक्षण म्हणायची. बिचारी मुलगी पापाच्या खाईंत लोटून दिली. नेहमींचा—कायमचा तिचा नाश केला. काय भयंकर ही स्थिति. माझें अंतःकरण पिळवटून निघतें आहे. किती चांगली मुलगी होती बिचारी. माझ्या मुलींपैकीं एखादीवर असा हा प्रसंग येण्याच्या अगोदरच मीं डोळे मिटले असते तर किती तरी बरें झालें असतें! *हें दुःख व हें संकट माझ्यावर आणलें आहे तें पुण्यांतील सरकारी अधिकाऱ्यांनीं. किती तरी चांगल्या चांगल्या मुली प्लेग हॉस्पिटलच्या व सेग्रेगेशन कॅम्पच्या निमित्तानें आपापल्या सग्यासोयऱ्यांपासून अशा रीतीनें दुरावल्या गेल्या असतील व त्यांच्या आयुष्यांचा नाश करण्यांत आला असेल, हें एक परमेश्वरालाच माहीत.*

किती दुःखी माता आपल्या कन्यकांसाठीं आक्रोश करीत असतील हेंहि एक परमेश्वरच जाणे. सिटी मॅजिस्ट्रेटला किंवा चैनींत लोळणाऱ्या इतरेजनांना ह्या गोष्टींची दाद नसेल कीं, पर्वाहि नसेल. पण त्यांच्या हलगर्जीपणामुळें व त्यांच्या वागण्याच्या ह्या पद्धतीमुळें शेकडों दुर्दैवी स्त्रिया अशा बळी पडत असतील.

मधून मधून सेग्रेगेशन कॅम्पला भेटी देणाऱ्या साहेबांना व मेमसाहेबांना वरवरची स्वच्छता पाहून मोठें समाधान वाटत असेल. त्यांना वाटतें तें हें कीं आमच्यासारख्या गरीब 'नेटिवांना' उष्णतेची बाधा होत नाहीं कीं इतर गैरसोईचा त्रास होत नाहीं. ह्या ठिकाणीं व्यवस्थित अशा मोऱ्यासुद्धां नाहींत. स्त्रियांना विसावा घेण्यास खोल्या नाहींत. आपल्या आजारी नातेवाइकांची काळजी घेण्यासाठीं जे लोक येथें येऊन राहतात त्यांचे हाल तर कुत्रा खाणार नाहीं. कालची रात्र मला उघड्या जमिनीवर पडून काढावी लागली. अंगाखालीं खडे रुतत होते, ढेकूण होते, मच्छर होते, पिसवा होत्या—ह्या साऱ्यांमुळें डोळ्याला डोळा लागणें अशक्य. जवळच खाटेवर एक पेशंट पडलेली आहे. ती बहुतेक प्लेगची केस असावी. तिला सारख्या ओकाऱ्या येत आहेत. माझी ही लहान मुलगी तिच्याच शेजारीं टाकण्यांत आली आहे. त्या बाईचा तरुण मुलगा तिच्या खाटेजवळच निजला व तेथून सहा फुटाच्या अंतरावर मला माझ्या मुलीशेजारीं निजण्यास सांगण्यांत आलें हें ऐकून तुम्हांला काय वाटेल? मला वाटतें हॉस्पिटलच्या अधिकाऱ्यांना वाटत असावें कीं हिंदी स्त्रिया आपली सारी लाजलज्जा कोळून प्यालेल्या असतात. मी उष्णतेंत भाजून निघत आहें. मला अशा परिस्थितींतच पुष्कळ लिहिण्याचें काम करावयाचें आहे. येथील डॉक्टर म्हणतात, माझे डोळे आले आहेत व मी डोळ्यांची काळजी घ्यायला हवी. मीं विनंति केली कीं माझ्या ह्या मुलीसह मला एखाद्या स्पेशल खोलींत ठेवा. तेथें माझ्या डोळ्यांना प्रकाशाचा त्रास होणार नाहीं. डॉक्टरांनीं मोठी मेहेरबानी करून मला एक मोकळी खोली दाखवून तेथें जाण्याची परवानगी दिली. पण नंतर मला कळलें कीं ती खोली प्लेगचा रोगी तींत मेल्यानें मोकळी पडली आहे! आतां माझ्यापुढें प्रश्न आहे तो आंधळेपणा पत्करायचा, सन्स्ट्रोक होऊं द्यायचा, डोकेंदुखी लावून घ्यायची कीं ह्या खोलींत जाऊन प्लेग जंतूंना आमंत्रण द्यायचें! स्त्रियांसाठीं येथें एकच

पायखाना नेमून देण्यांत आला आहे. त्याचा घाणेरडेपणा तर वर्णनातींत आहे. ज्या स्त्रिया येथें येऊन आपल्या नातेवाइकांची सेवाशुश्रूषा करतात त्यांनीं सर्व लाजलज्जा सोडायला हवी नाहीं तर क्लेश भोगायला हवे. इतकी लज्जास्पद व खालीं पाहायला लावणारी परिस्थिति मीं माझ्या जन्मांत कधीं अनुभवली नव्हती. ह्या परिस्थितीबद्दल मला अधिकाऱ्यांचे आभार मानायला हवेत. पण माझ्यावर ह्या मुलीची जबाबदारी आहे ना. त्याला काय उपाय आहे? माझे डोळे आले आहेत तरी मी हें लिहीत आहें. आईबापांना व रोग्यांच्या मित्रमंडळीला मला हा इशारा दिलाच पाहिजे कीं प्लेग हॉस्पिटलें व सेग्रेगेशन कॅम्प ह्या ठिकाणीं तुमच्या तरुण मुली सुरक्षित राहाणें अत्यंत कठीण आहे. ह्या मुलीजवळ राहून तिची शुश्रूषा करण्यास माझ्या दुसऱ्या मुली तयार आहेत. पण येथला हा सारा प्रकार पाहतां मीं त्यांना हें काम करण्यास येऊं दिलें नाहीं हें फार चांगलें केलें असें मला वाटतें. माझ्या अंगांत थोडकीशीहि शक्ति कायम असेपर्यंत मी येथें कोणाला एकटी कधींच पाठविणार नाहीं. देवा देवा, ज्या तरुण स्त्रियांना ह्या नरकतुल्य ठिकाणीं येणें भाग पडतें त्यांना तूंच सांभाळ. आमचे सिटी मॅजिस्ट्रेट व त्यांचे सहकारी ह्यांना त्यांच्या हृदयशून्य व अन्यायी वागणुकीचे काय परिणाम होतात तें दाखीव. मला माझ्या दुरावलेल्या कन्येबद्दल जें मरणप्राय दुःख होत आहे तें माझ्या सख्ख्या मुलीच्या मृत्यूमुळें झालें असतें इतकें तीव्र आहे. ह्यापेक्षां मृत्यूनें सर्वांचा शेवट केला असता तरी परवडलें असतें. मातांनो, आपल्या जिवाचें मोल देऊन आपल्या कन्यांचें रक्षण करा.

सरकारी प्लेग हॉस्पिटल — आपली
मे १८,१८९७. — **रमाबाई**

ह्याबाबत आणखी विशेष पत्रव्यवहार प्रसिद्ध झाला तो असा :

बॉम्बे गार्डियन : (१ सप्टेम्बर १८९७)

"My dear Guardian,

. . . The shameful way in which women were to submit to treatment by male doctors goes to prove that the English authorities in general do not believe that the Indian women are modest and need special consideration. I know it would

have been impossible to provide women doctors, in all the places where the Plague appeared. It was therefore out of necessity that male doctors had to treat the women. But I do not see why women patients could not at least have been screened and protected from the public gaze, while being treated by the Government physicians.

How would an English woman, poor though she may be, like to be exposed to the public gaze and roughly handled by male doctors? Is not the Indian woman quite as modest as the English woman? Does she not as a woman deserve better treatment at the hands of the Governor and the Plague Committee of Poona?"

ह्यावर मुंबईच्या गव्हर्नरनें बाईचें हें म्हणणें (grossly inaccurate and misleading) संपूर्णपणें सत्याला सोडून व गैरसमज पसरविणारें आहे असा शेरा मारला. रमाबाईनीं यावर गव्हर्नरला येणेंप्रमाणें ठणकावलें :

"My dear Guardian,

. . . So the Governor of Bombay has declared my statement about the shameful treatment of one of my girls and the bad management of the Poona Hospital as 'grossly inaccurate and misleading.' Some assume that only Orientals make certain assertions, without giving any proof of their truth. But I see that the Occident also can boast of some people including our worthy Governor who make certain assertions without giving any proof of their truth. How else could he say that he made enquiries about things stated in my letter when he never condescended to ask me a word about it. The manager of the Plague Hospital can never be expected to acknowledge the truth of the facts stated by me for they were not the suffering parties. In the name of truth and justice, I ask the conscientious Christian public to say if Lord Sandhurst did right to declare my statements as 'grossly inaccurate' when he has never so much as asked me to prove them."

ह्या गोष्टीकडे मराठी पत्रांनीं विशेष लक्ष दिलें नाहीं अशी तक्रार करून अमृत बझार पत्रिकेनें त्यासंबंधीं एक स्फुट लिहिलें आहे : (१२ सप्टेम्बर १८९७)

"No Maharatta paper, we believe, has delineated the arrangements in the plague hospital in such horrid colours as the learned Pandita has done. Lord Sandhurst is bound to contradict the statements as specifically as they have been made by her; for the Pandita has sought to turn the table upon him."

डॉ. निकल मॅकनिकल ह्यांनीं लिहिलेल्या पंडिता रमाबाईंच्या इंग्रजी चरित्राच्या प्रस्तावनेंत ते म्हणतात :

"The aim that I have in view is to show the Pandita in her place not only as a Christian but as an Indian, a true product of India's past and a powerful fashioner of India's future."[1]

खरोखरच रमाबाई ह्या नुसत्या ख्रिस्ती नव्हत्या, भारताच्या भूतकालाचा वारसा त्यांच्याकडे आला होता, व भविष्यकालावर त्यांची छाप पडल्यावांचून राहिली नाहीं.

ह्यानंतर मात्र, रमाबाईंनीं, केडगांवांत जमविलेल्या शेकडों अशिक्षित, शरिरांनीं व मनांनीं दुर्बळ बनलेल्या, कित्येक बाबतींत अधार्मिक तर त्यांतहि कांहीं कांहीं अनैतिक अशा स्त्रियांना माणसांत आणण्याकडे आपलें शक्तिसर्वस्व खर्च करण्याचें ठरविल्यानें बाहेरच्या सार्वजनिक आयुष्यांत त्यांनीं फारसा भाग घेतला नाहीं. त्यांचें सर्व लक्ष ह्यानंतर केडगांवांत केन्द्रित झालें.

मोत्याच्या शिंपल्यांत स्वतःला आंत ओढून घेणाऱ्या, गालवाला बाहेरचें जग बंद झालें तरी आंत केवढें मोठें कार्य करायचें असतें—बहुमोलाचे मोतीं तो बनवूं लागतो. त्या कार्यांत तो बाहेरचें जग विसरून जातो, पण त्यानें तयार केलेले मोत्याचे तेजस्वी दाणे जेव्हां बाहेर पडतात तेव्हां जग त्याची किंमत ओळखतें. केडगांवांत स्वतःला कोंडून घेऊन बाईंनीं मानवी मोती तयार केले—व त्या कार्यालाहि फार मोठें मोल आहे.

बाईंच्या ज्या पत्रावरून लंडनच्या पार्लमेंटपर्यंत आवाज उठला, त्या पत्राचें मराठी भाषान्तर पृष्ठ २९६, ते ३०० वर वाचकांनीं पाहिलें आहे,

---

१. डॉ. मॅक्निकलकृत इंग्रजी 'पंडिता रमाबाई' प्रस्तावना पृष्ठ १.

त्याच पत्राच्या शेवटच्या भागाचें बाईंच्या हस्ताक्षरांतील मूळ इंग्रजी खाली दिलें आहे.

baking here in the heat and must write for I have much writing to do. The Surgeon told me I had bad eyes and must take care of them. I requested him to let me go into a separate room with my child, where I could have a little shaded place. He kindly consented to let me go into a vacant little ward. but I hear now that it has been occupied by plague stricken people. I must choose between either having my eyes blinded by the sun have sunstroke or headache, or consent to breathe in the plague germs by going into a ward formerly occupied by plague patients. The filthiness of the only bath room assigned for women living here is indescribable. Women who come here to take care of their sick relations must give up all modesty or suffer pain. Never before have I felt so mortified or put to shame, but now this evil has come upon me. and I have to thank the authorities for it. I am writing this with my sore eyes to warn parents and friends of young women against the moral evils of the plague hospitals and segregation camps, that these young women are more safe in such places. Some of my girls offered to come here ~~and~~ to take care of the child. and now I am glad I did not allow them to come. I shall never let a girl come alone to this dreadful place while there is little strength in me. God help the young women who may be obliged to come to such a place as this. and may He open the eyes of our City Magistrate and his colleagues to see the evils resulting from their heartless unjust rule. I am mourning over my lost child as much as ever a mother mourned. and wish death had put an end to all this. May mothers protect their girl-children. even though it may be at the cost of their own lives

Believe me
Yours in the Lord's service
Ramabai

Government Plague Hospital
May 18th 1897.

आतां पुढच्या दोन प्रकरणांत रमाबाई केडगांवला कशा येऊन पोंचल्या तें पाहूं.

## १९ कृष्णमेघ व त्याची रुपेरी कड

रमाबाईंच्या विलक्षण प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा परिणाम त्यांच्या निकट सान्निध्यांत असणाऱ्या शारदासदनांतील मुलींवर होणें अपरिहार्य होतें. ख्रिस्तनिष्ठा हा तर रमाबाईंच्या व्यक्तिमत्वाचा मेरुमणीच. सदन चालविण्यास त्याच निष्ठेनें त्यांना प्रेरणा दिली होती. संसारदुःखानें व अंध रूढीनें गांजून रमाबाईंकडे आसऱ्यास आलेल्या त्या मुलींना ह्या सर्व गोष्टी न कळणें अशक्य होतें. मग मुली त्यांच्या प्रार्थनेस हजर राहूं लागल्या तर त्यांत नवल तें काय? पुढें तर धर्मान्तर करण्यांत आपण स्वतःहि रमाबाईंचें अनुकरण करावें अशी भावना कांहीं मुलींत बळावली. तेव्हां ती भावना दडपून टाकायची कीं काय असा प्रश्न रमाबाईंपुढें उभा राहिला. ती दडपून टाकणें स्वतः रमाबाईंना त्यांच्या धार्मिक निष्ठेमुळेंच नव्हे तर मानसशास्त्रदृष्ट्याहि शक्य नव्हतें. अशा परिस्थितींत सामान्य लोकांना अंधारांत न ठेवतां रमाबाईंनीं 'सुधारकास' कळविलें कीं 'सदनांत पाठविलेली हिंदु मुलगी हिंदूच राहील ही हमी मला घेतां येणार नाहीं.'

'सुधारका'नें पहिल्यापासून बाईंना उचलून धरलें होतें व त्यावरून 'केसरी'शीं तंटे केले होते. परंतु बाईंची ही स्पष्टोक्ति 'सुधारकाला'हि पसंत पडली नाहीं. तरी तशाहि परिस्थितींत आगरकर म्हणतात—'मधूनमधून सदनावर अनेक कारणांनीं काहूर येत असे. परंतु तें बहुधा जागच्या जागींच जिरून जात असे व हळू हळू सदन लोकप्रिय होत चाललें होतें. परंतु मध्यंतरीं कोणाच्या, पालकांच्या परवानगीनें म्हणा, कोणा प्रौढ विधवेच्या इच्छेमुळें म्हणा, मुलींच्या नैसर्गिक जिज्ञासेमुळें म्हणा, किंवा दुसऱ्या कांहीं अज्ञात कारणामुळें म्हणा, रमाबाईंबरोबर प्रार्थना करूं इच्छिणाऱ्या मुलींची संख्या वाढत गेली. आतां ही संख्या वाढविण्याच्या कामीं पंडिताबाईंकडून

प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें प्रयत्न झाला नाहीं हें आम्हांस माहीत आहे. परंतु कोणत्याहि कारणामुळें म्हणा, प्रार्थनेस जाणाऱ्या मुलींची संख्या वाढली आहे व ही गोष्ट रमाबाईंसहि मान्य आहे. व या मुलींपैकीं कोणी ख्रिस्ती धर्माविषयीं अधिक ज्ञान मिळविण्याची इच्छा दर्शविल्यास ती जागच्या जागीं दाबून टाकण्यास पंडिताबाई तयार नाहींत. 'अंधेरांत असलेलें मनुष्य आपण होऊन उजेडांत येण्याचा प्रयत्न करीत असतां त्यास मागें लोटण्याचें आपल्या हातून होणार नाहीं' असें यावर रमाबाईंचें म्हणणें आहे. तेंहि त्यांच्या समजुतीप्रमाणें वावगें नसल्यामुळें त्याची थट्टा करण्याचें आम्हांस प्रयोजन दिसत नाहीं. परंतु असें करण्यांत अल्पहित साधण्याकरितां मोठें हित गमवावें लागतें हें रमाबाईंस दिसूं नये, किंबहुना दिसत असूनहि त्यांनीं जाणूनबुजून तिकडे दुर्लक्ष करावें हें आमच्या स्त्रीवर्गाचें दुर्दैव होय. हल्लीं शारदासदनांत जो प्रकार चालू आहे तेवढ्यावरून त्या सदनास मिशनरी संस्था म्हणतां येईल किंवा पुढें केव्हांहि तें निव्वळ मिशनरी बनेल असें आम्हांस अद्याप वाटत नाहीं. परंतु सदन लोकप्रिय होऊन त्यापासून इच्छित हेतु सिद्धीस जाण्यास इतकेंच पुरेसें नाहीं. तसें होण्यास ख्रिस्तीधर्मप्रसाराशीं या सदनाचा संबंध आहे असा नुसता संशय घेण्यासहि जागा रहातां कामा नये. हल्लीं तर ती झाली आहे! रमाबाईंचा ख्रिस्ती धर्मावर पूर्ण विश्वास असल्यामुळें मुली आपणहून तिकडे वळूं लागल्यास त्यांस मागें परतविण्याचें कठीण वाटावें हें साहजिकच आहे. परंतु त्याच्या पायीं हिंदु स्त्रियांची उन्नति करण्याचा जो आपला हेतु त्यास जबर धक्का बसूं देण्यासहि त्या प्रवृत्त होतील असें आम्हांस वाटलें नव्हतें. रमाबाई अजूनहि पोक्त विचार करून आपला मुख्य हेतु सिद्धीस नेण्यासाठीं आपला पूर्वक्रम स्वीकारतील तर त्यांचें सदन फिरूनहि लोकप्रिय होईल असें आम्हांला वाटतें. परंतु रमाबाईस हें पटेल तेव्हां खरें."[1]

त्याच वेळेला एका मुलीनें आपल्याला बाप्तिस्मा द्या अशी मागणी केली असतां 'Ramabai Association'च्या (अमेरिकेंतील रमाबाई मंडळाच्या) नियमानुसार सदनांत राहून तिला बाप्तिस्मा घेण्याची बाईंनीं मनाई केली.

त्यासंबंधानें सच्छास्त्रप्रदीपक नांवाच्या मासिकांत श्री. शंकर बळवंत

---

१. सुधारक : ११ सप्टेंबर १८९३

कुळकर्णी ह्यांनीं खालीं दिलेली माहिती प्रसिद्ध केली आहे.

"काठेवाडांतील एक सुशिक्षित कुमारिका शिक्षणार्थ बाईंच्या आश्रमांत दाखल झाल्या. त्यांच्यावर रमाबाईंच्या खिस्ती शीलाचा परिणाम होऊन त्यांच्यांत पवित्र आत्म्याचें कार्य सुरू झालें. त्याचें पर्यवसान म्हणजे त्यांनीं खिस्ताला आपला तारणारा, म्हणून श्रद्धापूर्वक पत्करण्यांत झालें.[१]"

हीच कथा 'कामगार'[२] पत्रांतून उतरून घेऊन सुबोधपत्रिकेनें प्रसिद्ध केली आहे. आतां ती पाहा :

"कच्छ भूजकडे एक गुजराथी बाई राहात होती. तिला एक मुलगी होती. तिला तिनें लहानपणापासून शाळेंत घालून गुजराथी पांचसहा यत्तांपर्यंत शिकविलें. पुढें येथें शारदा सदनाची स्थापना झाल्याची खबर गुजराथी वर्तमानांतून तिकडे जाऊन कांहीं लोकांनीं बाईला मुलीस सदनांत पाठवून इंग्रजी शिकविण्याची सल्ला दिली. बाईला मुलीस विद्या शिकविण्याची हौस असल्यामुळें ती तिला घेऊन आली व तिनें मुलीला सदनांत घातली. मुलगी विधवा नव्हती. तरी तिच्या स्थितीचा विचार करून मुलीला सदनांत घेतली."

'कामगार' पत्रांतील वर दिलेल्या उताऱ्यांतील कांहीं विधानें विशेष लक्षांत घेण्यासारखीं असल्यानें त्या पत्रांतील पुढचा भाग देण्याआधीं त्यांचा विचार करूं.

बाई कच्छभूजकडील राहणारी. ती गुजराथी. मुलीचें शिक्षण गुजराथींत झालेलें. कच्छभूजकडील त्या वेळेची सामाजिक स्थिति महाराष्ट्राहून किती तरी अधिक मागासलेली. तरी मुलगी अविवाहित. (पुढें तीन वर्षांत ती खिस्ती होते, एकदोन वर्षांत ती विलायतेला जाते, तेथें एखादें वर्ष राहून परत येतांच तिचा विवाह होतो, म्हणजे बाईंकडे ती आली तेव्हां अगदींच "बाल" नव्हती.) बडोद्यास शिक्षणाची वगैरे व्यवस्था, पुण्यापेक्षां तिला अधिक जवळची म्हणून सोईची. शिवाय तेथली भाषा गुजराथी. तरी "लोक" तिला पुण्यास आणण्याचा सल्ला देतात व तो ऐकून ती तिला इकडे घेऊन येते, आणि "तिच्या स्थितीचा विचार करून" मुलगी विधवा नसूनहि तिला इकडे प्रवेश

---

१. सच्छास्त्र प्रदीपक : नो. १९३१.

२. कामगार पत्र श्री. सदाशिव पांडुरंग केळकर काढीत असत. (सामाजिक परिषद. रिपोर्ट १८९५ : प्रतिनिधींची यादी)

३. सुबोध पत्रिका २४ सप्तेम्बर १८९३.

देण्यांत येतो, हें सर्व गौडबंगाल ध्यानांत ठेऊन आतां पुढची कथा वाचावी. प्रथम सुबोधपत्रिकेंत काय प्रसिद्ध झालें तें पाहूं.

—"आज तीन वर्षें मुलगी सदनांत होती. मुलीला ख्रिस्ती धर्माचा उपदेश सदनांत गुप्त रीतीनें होत होता. आईच्या कानांवर ही गोष्ट येऊन ती त्याबद्दल कुरकूर करीत होती. मुलीला परतहि घेऊन जात होती. पण कशा तरी रीतीनें मुलगी आजपर्यंत सदनांत राहिली. कांहीं दिवसांपूर्वी मुलीचा कान वहात होता म्हणून तिला पंडिताबाईंनीं येथील (मुंबईंतील) कामा हॉस्पिटलांत आणून ठेवली होती. आई वरचेवर तिच्या समाचारास जात असे. एक ख्रिस्ती बाईहि तिच्याकडे दररोज समाचाराला येत असे. एक दिवस मुलगी इस्पितळांतून गेली असें आईला समजल्यावरून ती परत पुण्यास सदनांत गेली असावी अशा समजुतीवर मुलीला घेऊन येण्याकरितां आई पुण्यास गेली. तेथें जाऊन पाहिलें तों मुलगी तेथें नाहीं. मुलगी इस्पितळांत नाहीं असें ऐकून रमाबाई मुलीच्या आईबरोबर मुंबईस आल्या. पोलीसाला तपास करण्याठीं वर्दी दिली व परत पुण्यास गेल्या. पुनः एकदां येथें येऊन पुनः परत गेल्या. पुनः म्हणजे गेल्या मंगळवारीं (१२–९–९३) येथें येऊन पोलीसानें मुलीचा पत्ता लावून तिला आणली आहे, ती मि. क्रमी डि. पो. कमिशनर यांच्या समक्ष मुलीच्या आईपाशीं देणार आहे म्हणून आईला व एका तिऱ्हाईत मनुष्याला बरोबर बोलावूं लागल्या. आईनें सांगितलें मला पोलिसांत येण्याचें काम नाहीं, तुम्ही मुलीला आणून पाहिजे तर चार गृहस्थांच्या साक्षीनें माझ्या स्वाधीन करा. पंडिता रमाबाईनीं तें नाकबूल करून मि. क्रमी ह्यांच्याकडे जाऊन त्यांच्या बंगल्यावर मुलींला सोडून आपण चालत्या झाल्या. 'आईच्या घरीं पोंचवितों, तूं जातेस काय?' म्हणून मुलीला विचारतां 'आई मला वाईट कामाला लावील, मी तिच्या घरीं जात नाहीं, मला पाहिजे तिकडे जाईन,' असें ती म्हणूं लागली, मि. क्रमी व दुसऱ्या दोन गृहस्थांनीं मुलीची पुष्कळ समजूत केली पण तिनें वर सांगितलेलें एकच उत्तर दिलें. शेवटीं ती एका युरोपियन गृहस्थांच्या घरीं निघून गेली. ते गृहस्थ मि. क्रमी ह्यांच्या बंगल्यांत नुकतेच एकदां येऊन गेले होते. त्यांनीं आपली आया मुलीला घेऊन जाण्याकरितां ठेविली होती. सदर गृहस्थांच्याकडे मुलीच्या आईनें तपास करतां मुलगी फक्त त्या रात्रीं त्यांच्या बंगल्यावर चाकरमाणसां-

बरोबर राहिली होती, सकाळीं ठाण्याचे एक मिशनरी[१] येऊन तिला घेऊन गेले, असें कळलें. मुलगी इस्पितळांतून गेल्यावर ठाण्याच्या त्या मिशनरीकडेच होती व त्यांनींच तिला बाप्तिस्मा दिला वगैरे सदरहू गृहस्थांनीं सांगितलें.'[२]

आतां हीच गोष्ट ह्या मुलीचें पुढें लग्न झाल्यावर तिचे पति श्री. शंकर बळवंत कुळकर्णी ह्यांनीं सांगितली आहे ती पाहूं :

'ह्या बाईचें नांव गोमतीबाई असें होतें. अमेरिकन रमाबाई मंडळाच्या नियमानुसार सदनांत त्यांना बाप्तिम्सा घेण्याची बाईंनीं मनाई केली. पण गोमतीबाईंची श्रद्धां अढळ असल्यानें त्यांनीं ठाणे एम्. ई., मिशनचे मिशनरी ह्यांचे हस्तें बाप्तिस्मा घेऊन प्रसिद्धपणें प्रभूचा सन्मान केला. ज्या गोमती-बाईमुळें शारदासदनाचें श्राद्ध होण्याची वेळ आली होती त्या गोमतीबाई पुढें मि. व मिसेस डायर बरोबर इंग्लंडांत गेल्या. त्या परत आल्यावर कांहीं महि-न्यांनीं पंडिताबाईंनीं गोमतीबाईचा व लेखकाचा विवाह घडवून आणला.'[३] गोमतीबाईना बाप्तिस्मा हवा होता पण तो सदनांत देण्यांत येणार नाहीं असें बाईनीं सांगितल्यांवर त्यांनीं बाईचा आश्रय सोडला असें दिसतें. बाईंचें मुलीच्या आईला घेऊन मुंबईस येणें, आईच्या भीतीनें मुलीचें दवाखान्यांतून नाहींसें होणें, ती तशी नाहींशी झाल्याचें ऐकून बाईचें मुंबईला पुनरागमन व पोलीसची मदत घेणें ह्या सर्व गोष्टींवरून रमाबाईचा सरळपणाच सिद्ध होतो. उलट कांहींहि केलें तरी गोमतीबाई आपल्या आईबरोबर जायला तयार होत नव्हती व मी वाटेल तिकडे जाईन पण आईकडे जाणार नाहीं असें ती पोलीस कमिशनरला स्पष्ट म्हणत होती त्यावरून ती सज्ञान होती व तिला आपलें हित कळत होतें, हें सिद्ध होतें. आईकडे मला धाडल्यास माझी धडगत नाहीं हें गोमतीबाईचें टुमणें व तिच्या आईनें प्रत्यक्ष जाऊन मुलीचा ताबा घेण्याची तिला पोलीस कमिशरनें दिलेली संधी डावलून मुलीचा ताबा घेण्यांत केलेली टाळाटाळ ह्या गोष्टी मोठ्या चहाडखोर आहेत.

१. 'She was taken away by Rev. Mr. Prautch of the Methodist Episcopal Mission of Thana and baptised by him.' रमाबाईचें चिकट-बुक.

२. सुबोधपत्रिका. २४ सप्टेंबर १८९३.

३. सच्छास्त्र प्रदीपक. नोव्हेंबर १९३१.

हीच गोष्ट पुढें मिसेस डायरनीं आपल्या रमाबाई चरित्राच्या १९०० सालच्या आवृत्तींत सांगितली आहे: त्यावरून रमाबाई आपल्या वचनाला किती कसोशीनें जागल्या हें दिसून येतें.

मिसेस डायर म्हणतात :

'एका मुलीच्या सुटकेशीं आमच्या कुटुंबाचा संबंध येतो. ही सुटका म्हणजे पूर्वकालीन नीग्रो गुलामांच्या सुटकेइतकी खळबळजनक होती. ही सुटका खरोखरच गुलामगिरींतून होणाऱ्या सुटकेइतकी सत्यहि होती. ह्या गोष्टीपैकीं थोडाच भाग येथें सांगणें शक्य आहे. ह्या मुलीला रमाबाईंनीं आपल्या मुलीप्रमाणें मानली होती. तिची आई एक गुजराथी विधवा असून पुढें ती मुंबईस राहण्यास आली.'

एका प्रमुख प्रागतिकानें मुलीला पंडिता रमाबाईंकडे आणून घातली होती. रमाबाईच्या शारदा सदनांतील चोख व्यवस्था व तेथील नैतिक वातावरण समजण्याइतकें मुलीचें वय होतें व तिनें पुढें जो खंबीरपणा दाखविला त्यावरून तिचें नैतिक बळहि प्रत्ययाला येतें. आई राहते ती वस्ती आपल्या शीलाला पोषक नाहीं अशी तिची खात्री होती व त्या ठिकाणच्या लोकांत आपण जाऊन पडलों तर आपला अधःपात होण्यास वेळ लागणार नाहीं हें ती ओळखून होती. परंतु तिला रमाबाईंच्याकडे आणून पोंचविणाऱ्या ह्या प्रागतिकाच्या कानावर जेव्हां बातमी गेली कीं मुलगी ख्रिस्ती होत आहे तेव्हां त्यांनींहि आपला सूर बाईविरुद्ध आरडाओरडा करणारांच्या सुरांत मिळवून दिला व त्या आईचें मन वळवून तिला आपली मुलगी हस्तगत करून घेण्यास फूस दिली. मिसेस डायर पुढें म्हणतात :

'ख्रिस्ती होण्यापेक्षां बेहेत्तर आहे मुली वाममार्गाला लागल्या तरी, असें म्हणणाऱ्या लोकांत तेहि जाऊन मिळाले.

'ह्या मुलीला त्याच वेळेस तिच्या एका जुनाट दुखण्यानें बेजार केलें. म्हणून तिला मुंबईच्या दवाखान्यांत पाठवून देण्यांत आलें. त्याच वेळेस मला मुंबईस निरोप आला कीं तिला जाऊन भेटत जा व जमल्यास तिच्या-पुढें उभ्या राहिलेल्या भयंकर संकटांतून तिची सुटका करील असा कांहीं मार्ग शोधण्याच्या कामीं तिला मदत करा. त्या सुमाराला मुंबईस हिंदुमुसलमानांचे दंगे सुरू झाले, त्यामुळें मला कांहीं तिच्याकडे जातां आलें नाहीं. त्याच वेळेस

आमच्याकडे मिसेस मन्सुखलाल ह्या राहात होत्या. त्यांना बरोबर घेऊन नंतर मी त्या मुलीला भेटायला गेलें. पुढे मिसेस मन्सुखलाल तिला वारंवार भेटायला जाऊं लागल्या. त्यांच्याजवळ त्या मुलीनें आपलें मन मोकळें केलें. ती म्हणाली, मला असें कोठें पाठवा कीं मी माझ्या आईच्या तावडींतून सुटेन. तिच्या तावडींत मी सांपडलें तर माझा नाश निश्चित होईल. दवाखान्यांतून ज्या दिवशीं 'डिश्चार्ज' मिळायचा त्या दिवसाची तर त्या मुलीनें अगदीं धास्तीच घेतली. रोग्यांना भेटण्याच्या वेळीं मुलीची आई उपाध्यायांना (priests) घेऊन येई. तिच्या हातीं हिंदु शास्त्र देऊन तिचें बायबल काढून घेण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. त्या लोकांनीं 'डिश्चार्ज' मिळण्याच्या सुमाराला हॉस्पिटल भोंवतीं डोळ्यांत तेल घालून पहारा ठेवल्याचें आढळून आलें. पण तेथील मेट्रनच्या कनवाळूपणामुळें आम्ही तिला तेथून अनपेक्षित अशा वेळेला काढून नेऊं शकलों. एकदम शहराच्या बाहेर काढून, आम्हीं तिला दुसरीकडे एका मिशनरीकडे पाठविली. *ती कोठें आहे ह्याचा आम्हीं रमाबाईंना मुळींच थांग लागूं दिला नाहीं.* तिची आई रमाबाईंना आतां सांगूं लागली कीं मुलीचें वय पूर्वीं सांगितलें होतें त्यापेक्षां दोन वर्षांनीं कमी आहे. रमाबाईंची मात्र खात्री होती कीं मुलगी सज्ञान असून आपलें हिताहित कळण्यासारखें कायदेशीर असें तिचें वय झालेलें आहे.

'संपूर्ण हिंदी वृत्तपत्रांनीं आतां रमाबाईंभोंवतालीं एक नवीन वादळ निर्माण केलें. अशा वेळेस आपल्या स्वतःच्या अपकीर्तीपेक्षां रमाबाईंना आपल्या संस्थेची अब्रू सांभाळण्याची तळमळ लागून राहिली होती. त्या मजकडे येऊन म्हणूं लागल्या, मुलगी जर त्यांच्या स्वाधीन न केली तर साऱ्या संस्थेचें नुकसान होईल. पण मीं मात्र मुलीला अशा प्रकारांत लोटून द्यायचें साफ नाकारलें. शेवटीं रमाबाईंनीं फारच गयावया केल्यावर ज्या मिशनरीकडे मुलगी होती त्यांचा पत्ता मीं रमाबाईंना दिला. त्यांनीं शेवटीं मुलीला पोलीस प्रमुखाकडे आणून पोंचविलें व त्यांनीं काय तें ठरवावें, त्याला आपण कबूल आहों असें त्यांस कळविलें. मुलीला त्या ठिकाणीं आणलें, पण तिची आई कबूल केल्याप्रमाणें हजर राहिली नाहीं. तिच्या वतीनें एक पुरुष माणूस आला होता परंतु मुलीला त्याच्या हवालीं करण्यास पोलीसानें नकार दिला व नंतर माझ्या मित्रमंडळीनें तिला परत आणलें. पुनः तिला नेण्याचा प्रयत्न झाला

पण ज्या मिशनरीकडे तिला ठेवलें होतें त्यांनीं तिचा बाप्तिस्मा केला. ह्या-नंतर मात्र तिला नेण्याचा कोणीं प्रयत्न केला नाहीं....ती ख्रिस्ती झाल्यानें आतां तिच्या आईला किंवा आईच्या मित्रमंडळीला कांहीं करायचें उरलें नाहीं. तिला तिच्या प्राक्तनाच्या हवालीं करून ते निघून गेले.

'मुलीच्या स्वतःच्या अत्याग्रहामुळेंच तिला बाप्तिस्मा देण्यांत आला होता. बाप्तिस्म्याला *रमाबाईंनीं संमती तर दिली नव्हतीच पण त्यांना त्या गोष्टीची दादहि लागूं देण्यांत आली नव्हती*. तरी "दगलबाज रमाबाई" म्हणून साऱ्या वृत्तपत्रांनीं तावडतोब डांगोरा पिटण्यास सुरुवात केली.'[१]

गोमतीबाईंच्या मातोश्री पुढें कित्येक वर्षांनीं केडगांवला येऊन त्यांनीं रमाबाईंच्याच आश्रयाला आपले शेवटले दिवस काढले असें कळतें. तशा १८९३ मध्यें शिक्षण मिळालेल्या ह्या गोमतीबाई त्या वेळच्या एकंदर परिस्थित्यनुरूप पुष्कळच शिकल्या होत्या व हुशारहि होत्या हें खालीं दिलेल्या त्यांच्या दोन प्रमाणपत्रांवरून दिसून येईल.

> 'लखी आपवामां आवे छे के स्कालर गोमती वालजी कच्छ मांडवी शेख इब्राहिमभाई कन्या शाळामा सने १८८८ मां मेहेरबान अे. ओ. साहेब मजकूर कन्या शाळानी वारशीक परीक्षा करी तेमां ते गुजरात पांचमा धोरणमां पहेले नंबरे पास थई छे. विद्याभ्यास करवामा महेनुतले ने चालचलन सारी छे.
>
> दिवाणीबाई नारणजी
>
> ९–१–१८९१. कच्छ अंजार कन्याशाळा
>
> मु. स्त्री शिक्षक

> 'श्रीमती गोमतीबाई ही कच्छ भूज मधील मुलींच्या शाळेमध्यें गुजराथी सहाव्या इयत्तेपर्यंत शिकली. त्यानंतर माझ्या शाळेंत मराठी पांचव्या आणि इंग्रजी चौथ्या

१. मिसेस डायरकृत पंडिता रमाबाईंच्या इंग्रजी चरित्राची १९०० ची आवृत्ति पृष्ठ ३६


इयत्तेपर्यंत शिकली आहे. या मुलीची वर्त्तणूक चांगली असून तिला जें येतें तें ती शिकवील असें मला वाटतें.

शारदासदन रमाबाई
पुणें ता. १० फेब्रुवारी १८९६[1]

बातिस्मा झाल्यावर ह्या गोमतीबाई मिसेस डायरबरोबर विलायतेला गेल्या. व तेथून परत आल्यावर रमाबाईंनीं त्यांचा विवाह लाऊन दिला, हें आपण वरतीं पाहिलेंच आहे. शंकररावांनीं आपल्या कुटुंबाचें सासरचें नांव द्वारकाबाई असें ठेवलें. त्यांनीं १६ वर्षें संसार करून त्या १३ मे १९११ रोजीं वारल्या. त्यांना त्यांच्या सासरच्या मंडळींनीं लग्नाच्या वेळीं कांहीं दागिने

---

१. हीं प्रमाणपत्रें आमच्या संग्रहीं आहेत त्यापैकीं रमाबाईच्या हस्ताक्षरांतील खालीं दिलें आहे.


श्रीमती गोमतीबाई ही कृष्णनगर येथील मुलींच्या शाळेमध्ये मराठी सहाव्या इयत्तेपर्यंत शिकली, व नंतर माझ्या शारदेंत मराठी पांचव्या आणि इंग्रजी चौथ्या इयत्तेपर्यंत शिकली आहे. या मुलीची वर्तणूक चांगली असून तिला जें येतें तें ती शिकवील असें मला वाटतें.

रमाबाई.

शारदासदन
पुणें ता १० फेब्रुआरी १८९६.

पाठविले होते ते मोडून त्यांनीं एका खेड्यांत थोडीशी शेती केली व तेथेंच त्या आपल्या पतिसमवेत राहिल्या. त्यांच्या मृत्यूनंतर एका हिंदु गांवकऱ्यानें एक विस्तृत मृत्युलेख लिहिला होता, त्यावरून बाईंच्या धर्मांतरावर पुष्कळ प्रकाश पडतो. तेवढ्यासाठीं त्यांतील बराचसा भाग खालीं उतरून घेतला आहे.

'मी लेखक पूर्ण मूर्तिपूजक आहें व ख्रिस्तीधर्मद्वेषक आहें पण साध्वी गोमतीबाई ह्यांच्या सौजन्यामुळें ख्रिस्ती धर्माविषयीं कांहीं तरी सहानुभूति वाटूं लागली आहे. इतकें म्हटलें म्हणजे पुरे.

सर्व प्रसंगीं आत्मत्याग करणाऱ्या द्वारकाबाई ह्या जरी ख्रिस्ती होत्या तरी आम्हां नागरिकांना फारच वंदनीय होत्या. त्यांनीं दापोडीचे सीमेंत, आपल्या वतनदारीचे जागेंत लहानसें घर बांधून चिरकालीन स्मारक करून ठेवलें आहे. हें गुप्त माणिक सतत १० वर्षे आमच्या शिवारांत होतें. साध्वी द्वारकाबाईंनीं स्वतः स्वनाकार करून, नागरिक गोरगरिबांस द्रव्य धान्य द्वारां अनेक प्रसंगीं साहाय्य केलें आहे. प्रामाणिकपणा व सत्यवचन तशीच सरळ कृति, वाईटाचा निषेध करणें हे व असल्या प्रकारचे अनेक सद्गुण त्यांच्या हाडींमांसीं खिळलेले होतें. साधेपणविषयीं तर आम्हीं लिहिण्यापेक्षां तुमच्या ख्रिस्ती लोकांची खात्री होऊन चुकली असेल....ख्रिस्ती धर्मावरील त्यांची श्रद्धा अवर्णनीय होती.... द्वारकाबाईंच्या आश्रमावर कांहीं वर्षांपूर्वीं दरोडेखोरींनीं रात्रीं हल्ला केला. तर असल्या बिकट प्रसंगीं द्वारकाबाईंनीं आपल्या मताप्रमाणें अस्खलित वाणीनें चोरांना ख्रिस्ती धर्माचा उपदेश केला. पुढें कांहीं वर्षांनीं चोर सांपडले. त्या वेळा त्यांना आश्रमांत नेण्यांत आलें. तेथें जबानींत बाईंनीं केलेल्या उपदेशाचा सारांश त्यांनीं सांगितला. धन्य! धन्य द्वारकाबाई! ह्यापेक्षां अधिक धैर्य तें कोणतें? आम्हांस चांगलें आठवतें कीं बाईंनीं आमच्या गांवच्या एका गरीब माळ्यास सबंध शेताचें उत्पन्न देऊन शिवाय त्याची कौटुंबिक स्थिति सुधारण्यासाठीं वर त्यास १०० रुपये दिले. ह्याला कोण उदारता म्हणणार नाहीं.?'[1]

गोमतीबाईसंबंधीं इतकें विस्तारानें लिहिण्याचें कारण बाई ख्रिस्ती झाल्यानें तिचें लौकिक किंवा पारमार्थिक कोणतें नुकसान झालें हें वाचकांनीं आपल्या

१. गोमतीबाईंनीं एकदां रे. ना. वा. टिळक ह्यांना सुद्धां त्यांच्या कामासाठीं दहा रुपये पाठविले होते.

मनाशीं ताडून पाहावें. हें एक शीत आणि तेंहि पाहिलेंच आहे. ह्या एका शितावरून सर्व भाताची परीक्षा सहज करतां येईल.

शारदासदनांतून ख्रिस्ती होणारी ही पहिली मुलगी. बाईचे पाठीराखे सुबोधपत्रिकाकार व सुधारककार हेहि ह्यानंतर बाईंना क्षमा करायला तयार नव्हते. मुली भराभर काढून घेण्यांत येऊं लागल्या. शारदासदनाची शारदाहि गद्र्यांनीं सदनांतून काढून घेतली. सुधारकाचे संपादक प्रिन्सिपॉल गो. ग. आगरकर ह्यांनीं सदनांतून आपली मामेबहीण श्री. वेणूबाई नामजोशी हिला काढून घेतली व खालीं दिल्याप्रमाणें सुधारकांत एक स्फुट लिहिलें.

'ज्याअर्थी डॉ. भांडारकर, रा. ब. रानडे व रा. ब. भट यांसारख्या विचारी व चौकस गृहस्थांस सदनाच्या साहाय्यकारिणी मंडळींतून आपलीं नांवें काढून घेणें अवश्य वाटलें आहे त्याअर्थी सध्यां त्या संस्थेची असावी तशी स्थिति नसली पाहिजे असें अनुमान करणें अवश्य आहे. तथापि ती आजच केवळ असह्य झाली आहे असें आम्हास वाटत नाहीं. तसेंच शारदासदन केव्हांहि निवळ मिशनरी संस्था होईल असें आमच्यानें म्हणवत नाहीं. हिंदु धर्माप्रमाणें आचरण करूं इच्छिणाऱ्या मुलींस तसें करण्याला रमाबाईकडून यत्किंचितहि प्रतिबंध होत नाहीं असें आम्हांस पक्कें ठाऊक आहें. परंतु असल्या संस्थेंत एवढा नियम पाळल्यानेंच धर्मांतराची भीति नाहींशी होत नाहीं. ती होण्यास आईबापांच्या किंवा पालकांच्या स्पष्ट परवानगीशिवाय कोणत्याहि मुलीस स्वधर्मांतून परावृत्त न होऊं देण्याचा अशा संस्थेच्या मुख्य चालिकेचा दृढ संकल्प असला पाहिजे आणि तो असेल तरच ती लोकांच्या आदरास व विश्वासास पात्र होऊन तिच्यापासून होईल तितका फायदा करून घेण्यास त्यांच्या मनाची प्रवृत्ति होऊं शकणार आहे. सदनाच्या सांप्रत स्थितीविषयीं आम्हांस जी माहिती लागली आहे तीवरून असलें दृढ बंधन करून घेण्याची इच्छा किंवा शक्ति रमाबाईंस आतां राहिली नाहीं असें वाटतें, तेव्हां अर्थातच पूर्वीं एकदां ज्या ईर्षेनें या शाळेचा पक्ष आम्हीं घेतला होता त्या ईर्षेनें तो आज घेण्याला आम्हीं असमर्थ आहों. धर्मासंबंधानें आमचीं मतें कशींहि असलीं तरी हिंदु स्त्रियांनीं किंवा पुरुषांनीं कोणत्याहि ऐहिक अथवा पारमार्थिक लाभासाठीं ख्रिस्ती व्हावें ही गोष्ट आम्हांस बिलकूल संमत नाहीं. मुमुक्षु मर्त्यांनीं धर्मावांचून मरूं नये हें खरोखरीच इष्ट असल्यास

*स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः*

या गीतावचनांतील रहस्य आम्हांस पूर्णपणें मान्य आहे. शारदासदनांत असणाऱ्या मुलींना स्वधर्मत्याग करण्याची बुद्धि होऊं न देण्यास्तव रमाबाई जितकी खबरदारी घेण्यास राजी आहेत असें आम्हांस आजपर्यंत वाटत होतें तितकी त्या घेत नाहींत अशी थोड्या दिवसांत आमच्या नजरेस आलेल्या कांहीं गोष्टींवरून आमची खात्री झाली आहे, आणि म्हणून आजपर्यंत त्या सदनाचा जितका अभिमान आम्हीं वाहिला तितका तो यापुढें वहाणें अशक्य आहे असें आम्ही मोठ्या कष्टानें कबूल करतों.'[१]

मुलींचा ओढा बाईंमुळें खिस्ती धर्माकडे वाढूं लागला हें ध्यानांत आल्या-बरोबरच ज्या मुलींना त्यांच्या प्रार्थनेला पहांटे हजर राहण्याची इच्छा होती त्यांच्या पालकांना लिहून त्यांची त्या गोष्टीला संमती मिळविली. तसें पाहिलें तर तीनचतुर्थांश मुलींच्या पालनकर्त्या सर्वस्वी बाईच होत्या. त्यांच्यापैकीं बहुतेकांना आपलें म्हणायला कोणी नसल्यानें त्या बाईंनाच आपली आई समजत. तरी त्यांच्यापैकींसुद्धां ज्यांची इच्छा असेल अशा मोजक्या मुलीच प्रार्थनेच्या वेळेस येऊन बसत. मुंबईच्या सुबोधपत्रिकेनें ज्या अंकापासून बाईंवर कडाडण्यास सुरुवात केली त्याच अंकांत पत्रिकेच्या संपादकांनीं म्हटलें आहे कीं :

'१८ पैकीं ११ मुलींच्या पालकांची मुलींना बाईंच्या प्रार्थनेच्या वेळीं हजर राहण्यास परवानगी होती. प्रार्थनेला हजर रहाणाऱ्या अठरा मुलींपैकीं अकरांना तसें करण्यास परवानगी आहे असें धरलें तर, बाकीच्या सात मुली स्वमतानेंच हजर राहतात असें म्हणावें लागतें.' सुबोधपत्रिकेला ह्यावरून काय सुचवायचें आहे कळत नाहीं. सात मुली बाईंनीं तेथें जबरीनें ओढून आणल्या असें तर त्यांना सुचवायचें नव्हतें? त्यांना पालक नसतील, त्या सज्ञान झालेल्या असतील, किंवा दुसरें असेंच कांहीं कारण असेल, कीं ज्यामुळें त्यांच्या पालकांची संमति घेण्याची जरुरी नसावी, किंवा तशी संमति पालकाच्या अभावीं मिळणें शक्य नसेल. नाहींतर जेथें ११ मुलींच्या

१. सुधारक. २१ ऑगस्ट १८९३. प्रकरणाच्या सुरुवातीला जो एक मोठा उतारा सुधा-रकांतून घेतला आहे तो ह्यानंतरचा तीन आठवड्यांचा आहे हें विशेष आहे.

पालकांची संमति मिळविण्यांत आली तेथें आणखी सातांचीं आणणें काय कठीण होतें? आणि तसें पाहिलें तर कन्यांच्या लग्नाच्या वेळीं सदनांत जवळजवळ ५० विधवा होत्या. म्हणजे सदनांत त्यावेळीं केवळ १८ च मुली होत्या असें नाहीं, पुष्कळच अधिक होत्या. त्यांपैकीं केवळ १८ बाईंच्या प्रार्थनेच्या वेळीं हजर राहात व त्यांत फक्त ११ च्याच पालकांच्या संमतीची गरज होती.

हा झंझावात रमाबाईंनीं पुढें पुणें सोडून केडगांवला कायमचें वास्तव्य करीपर्यंत घोंगावतच राहिला. त्याचा जोर पुष्कळ कमी होत गेला तरी मधून मधून वाऱ्याच्या दीर्घ किंकाळ्या किंवा एखादी लख्खकन चमकणारी वीज, बाईंना बेजार करीतच होती. १८९५ सालीं पुण्यास प्रथमच काँग्रेसचें अधिवेशन भरलें. त्या वेळीं साऱ्या हिंदुस्थानचे पुढारी पुण्यास जमले होते. व त्यांतील कित्येकांना बाईंच्या कामाबद्दल कुतूहल वाटून त्यांनीं सदनाला भेटी दिल्या. ह्या वेळपर्यंत सदनांतील बारा मुलींनीं बाप्तिस्मे घेतले होते. त्या वेळच्या सामाजिक परिषदेंत विधवावपनाचा निषेध करणारा व विधवांस शिक्षण देऊन स्वावलंबी बनविण्यासंबंधीं जो ठराव मंजूर झाला तो 'इंडियन सोशल रिफॉर्मचे' ख्यातनाम संपादक श्री. के. नटराजन ह्यांनीं मांडला. त्या वेळीं केलेल्या भाषणांत ते म्हणाले:

'विधवांच्या शिक्षणासाठीं प्रयत्न करण्याचा जो पायंडा पंडिता रमाबाईंनीं घालून दिला आहे व ह्या शहरांत त्यांचें कार्य जें इतक्या यशस्वीपणें चालू आहे, त्याची प्रशंसा केल्याखेरीज माझ्यानें राहावत नाहीं. कांहीं धर्मांतरें झालीं त्यांच्याबद्दल रमाबाईंवर जे टीका करीत आहेत त्यांच्याबद्दल मला सहानुभूति वाटत नाहीं. ठोकळेबाज धर्ममतांवर (Doctrines & Dogmas) माझा विश्वास नाहीं. आपल्या बंधूंचें भलें करणें हा मी सर्वोच्च धर्म समजतों. भुकेलेल्याला अन्न देणें हें अत्यंत उच्च दर्जाचें धार्मिक कृत्य व श्रेष्ठ प्रतीचें दान (Charity) आहे. पंडिताबाई व तिचे अमेरिकेंतील मित्र व साहाय्यक ह्यांचें आपल्यावर इतकें ऋण आहे कीं आपण तें कधींहि फेडूं शकणार नाहीं; मग धर्ममतांबद्दल कितीहि मतभेद असोत.'[1]

---

१. सामाजिक परिषदेचा इंग्रजी वृत्तांत. १८९५. पृष्ठ ४८, ५३.

नंतरचे वक्ते श्री. एम्. व्ही. महाजनी एम्. ए. ह्यांनीं विधवांकरतां हिंदूंनीं सदनें काढावीं असें सांगून म्हटलें कीं, 'जर आपण आपलीं सदनें काढण्याची फिकीर करीत नाहीं तर पंडिता रमाबाईच्या संस्थांची निंदा करण्याचा कांहीं उपयोग नाहीं.' ह्यानंतर श्री. नारायण राय वर्मा म्हणाले, 'मी कट्टर हिंदु आहें व तसाच राहण्याचा माझा विचार आहे. तरी पण पंडिता रमाबाई जें करीत आहेत त्याबद्दल मला पूर्ण सहानुभूति आहे. ह्याचें साधें कारण असें कीं ह्या अबलेनें (She, a mere woman) जें कार्य करून दाखविलें आहे तें आपल्यापैकीं कोणाहि पुरुषापेक्षां जास्त आहे. इंग्लिश येत नसतां त्या इंग्लंडला गेल्या; त्यांनीं स्वतःला इंग्लिश शिकविलें व आपल्या साहित्यिक गुणांनीं (Literary Talents) व आपल्या दुःखी भगिनींची जी करुणोत्पादक (Pathetic) वकिली त्यांनीं केली तीमुळें, इंग्लिश व अमेरिकन लोकांची सहानुभूति त्यांनीं संपादन करून घेतली. त्यामुळेंच पुण्यास त्या हें सदन स्थापन करूं शकल्या. ती संस्था आज जें कार्य करीत आहे त्याची अत्यंत गरज आहे. धार्मिक कारणांनीं जे ह्या सदनाचा निषेध करतात (Condemn) त्यांनीं आज तें सदन इतक्या कार्यक्षमतेनें जी उणीव भरून काढीत आहे ती भरून काढण्याकरितां एक प्रतिस्पर्धी हिंदु सदन हेंच काम करण्यासाठीं काढावयास पाहिजे.'

श्री. नारायण राय वर्मा ह्यांनीं सदनाला भेट दिली त्या वेळीं 'बारा मुली ख्रिस्ती झाल्या ह्यांत कांहीं वावगें झालें नाहीं' असा आपला अभिप्राय त्यांनीं जाहीर केला असें सांगून त्यावर २१ जानेवारी १८९६ च्या केसरींत नारायणराय वर्मा व त्यांच्या 'अजागळपणा'वर केसरीनें झोड उठविली.

'हिंदु धर्मांतील १२ मुली नाहींशा झाल्या याबद्दल आमच्या अंतःकरणास कांहीं देखील चटका न लागतां, पुनः कोडग्यासारखें सदनांत जाऊन आम्ही आपल्या मनांतील समाधान करून घेतों, यास काय म्हणावें तें आम्हांस समजत नाहीं. इतक्या तऱ्हेनें आम्हीं हतवीर्य व्हावें हें आमच्या देशाचें दुर्दैवच समजलें पाहिजे. आमच्या कित्येक सुधारकांस त्यांत मोठेपणा वाटत असेल तर असो. आमचें तर असें ठाम मत आहे, कीं आपलेपणा सोडून देणारे असले हे गृहस्थ कितीहि विद्वान् असले तरी एक प्रकारें ते आमचे व देशाचे शत्रूच होत.'

हा उतारा मुद्दाम येथें उध्दृत करण्याचें कारण, त्या वेळेस व कांहीं अंशीं अद्यापहि ख्रिस्ती लोक हे आपले व देशाचे शत्रू असल्याचें ठाम मत बाळगणारे व तसा प्रचार करणारे लोक आढळतात. ह्यामुळें ते एका फार मोठ्या व महत्त्वाच्या भारतीय वर्गाला आपल्यापासून दूर लोटीत असतात. आपोआपच अशा तऱ्हेनें दूर लोटलेला वर्ग भीतिग्रस्त होऊन पुढें स्वतः होऊनच दूरदूर सरकत जातो.

काळ्याकुट्ट ढगाभोंवतीं कधीं रुपेरी तर कधीं सोनेरीहि कडा दिसूं लागतात. बाईंच्या या तीन चार वर्षांच्या कसोटीच्या काळांत त्यांच्याहि संकटाभोंवतीं अशा रुपेरी व सोनेरी कडा शोभून गेल्या. १४ डिसेंबर १८९१ च्या एका पत्रांत त्या म्हणतात कीं 'आमच्या डोक्याभोंवतीं घोंगावणाऱ्या वादळांतून आम्ही अद्याप बाहेर पडलों नव्हतों. लोकांनीं आमच्याकडे येण्याचें सोडलें होतें. नोव्हेंबरची २४ तारीख होती. मी दिवसभराच्या कामानें अगदीं दमून गेलें होतें. सूर्य मावळायला लागला होता. इतक्यांत फाटकांतून एक गाडी आंत येतांना दिसली. कोण असावें म्हणून तर्क करायच्या आधींच मी त्या व्यक्तीला ओळखलें. माझी मैत्रीण रमाबाई रानडे होत्या त्या! त्यांनीं आमच्या मुलींसाठीं दिवाळीचें फराळाचें आणलें होतें! अनाथ आणि त्यांतहि विधवा, अशांच्यासाठीं कोण एवढें करतो? शाळेंतल्या या गरीब प्राण्यांसाठीं असें कोणी कांहीं करण्याची ही पहिली वेळ.

रमाबाईसाहेबांच्या ह्या दयालुत्वापाठीमागें खात्रीनें रावबहादुरांचा कनवाळूपणा असला पाहिजे.

अगदीं अत्यल्प कृति, परंतु तिच्यामुळें रमाबाईंना केवढें धन्य वाटलें असेल :

*मायेनें जो कर धरिला । शब्द धिराचा जो आला ।।*
*वदवेना परि ऐकियलें । ज्या उच्छ्वासें जाणविलें ।।*
*देवाची वाणी आली । एक वचें जीवा गमली ।।*
*अल्प अती हीं अल्प खरीं । महत्त्व कसलें यांस तरी ।।*
*परंतु जेव्हां हृदयाचे । तुकडे होती मनुजाचे ।।*
*तेव्हा हीं अल्पेंच तया । सावरितीं दावून दया. ।।*

जेव्हां नूलकर वगैरे मंडळी राजिनाम्याच्या तयारींत होती त्याच वेळीं 'अहो, तुम्ही सगळे पुढारीच बाईंच्या विरुद्ध ओरड करतां आहां! तुमच्या

पैकीं किती जणांच्या लेकीसुना सदनांत आहेत? आम्हां पालकांचें तर म्हणणें ऐकून घ्याल? असें म्हणून पेठे व पुणतांबेकर नांवाच्या दोघां पालकांनीं सुधारकांत पत्रें लिहून आपले स्वतःचे अनुभव सांगून बाईंवर करण्यांत येत असलेले आरोप निराधार आहेत असें प्रसिद्ध केलें. इतकेंच केवळ नाहीं तर श्री. पुणतांबेकर ह्यांनीं आपल्या म्हणण्याला दुजोरा देऊन आपलाहि तसाच अनुभव असल्याचें सांगणाऱ्या श्री. रामचंद्र गणेश मुंडले, रावसाहेब मनोहर विष्णु काथवटे व श्री. बाळकृष्ण रावजी मुंगीकर इतक्यांचीं नांवें प्रसिद्ध केलीं. श्री. पुणतांबेकर अकोल्यांत मामलेदार होते.

दाभोळहून 'स्पष्टवक्ता' ह्या सहीनें एक पत्र प्रसिद्ध झालें आहे. त्यांत म्हटलें आहे. (ह्यांची मुलगी अविवाहित म्हणून अमेरिकन बोर्डाच्या सल्ल्यानुसार परत धाडली होती.)

'दोन महिने पंडिता बाईंच्या वर्तमानासंबंधानें वारंवार विचारपूस करीत असूं. तिच्या सांगण्यावरून बाईंचा चांगूलपणा, प्रामाणिकपणा, सचोटी, दक्षपणा, मुलींवर लक्ष ठेवणें, खाणेंपिण, कपडालत्ता, स्वतः मेहनत घेऊन मुलींस शिक्षण देणें, प्रपंच न करणें, अशा अनेक गोष्टींनीं खात्री झाली. अशा व्यक्ति आमच्या देशांत मोठमोठ्या विद्वानांत सांपडणें कठीण. बाईंच्या शुद्ध वर्तनाविषयीं आमची खात्री आहे.'[1]

एवढ्या कडकडाटांत मधूनच होणाऱ्या अशा पुष्पवृष्टीनें बाईंना केवढा धीर येत असेल!

एवढ्यानेंच झालें नाहीं; आणखीहि पुष्कळ उत्तेजनदायक अनुभव त्या वेळीं येत असत.[2]

एक मध्यभारतांतील कडकडीत सोवळा ब्राह्मण. मुली काढून घ्या, मुली काढून घ्या, अशी ओरड सुरू झाली, मंडळीचीं पत्रें गेलीं; वर्तमानपत्रांतील टीकेची झोड त्याच्या नजरेस पडली, तेव्हां तो शान्तपणें उठला आणि आपल्या सुटीला नेलेल्या विधवा मुलीला रमाबाईंच्या कडे घेऊन आला,

---

१. सुधारकः २७ जुलै १८९१ व १७ ऑगस्ट १८९१

२. खालील अनुभव रमाबाई असोसिएशनच्या चेअरमनच्या १८९४ च्या रिपोर्टांतून घेतले आहेत.

इतकेंच नाहीं तर त्यानें तिच्याबरोबर शेजाऱ्याचीहि एक विधवा मुलगी शिकायला आणून घातली.

मुली सदनांत पाठवूं नका अशी जोराची मोहीम सुरू झाल्याबरोबर एका उच्चवर्णीय ब्राह्मणानें आपल्या पत्नीला सदनांत आणून घातली. तो स्वतः फर्ग्युसन कॉलेजांत शिकत होता व पुढें मेडिकल कोर्स घेण्याचा त्याचा मानस होता. आपल्याला शिकलेली, संसारदक्ष व पुढें मुलांचें संगोपन चांगलें करील अशी पत्नी हवी असें त्याचें म्हणणें होतें. ज्या हायस्कूलमध्यें सदनांतील मुली काढून पाठविण्यांत आल्या होत्या त्या हायस्कुलांत आपल्या बायकोला सदनासारखें उत्तम शिक्षण मिळणार नाही असें त्याचें म्हणणें होतें.

किंडरगार्टनचें शिक्षण येथें अगदीं पद्धतशीर व काळजीपूर्वक देण्यांत येतें, अशी ख्याति असल्यानें तें घेऊन आपल्या राज्यांत त्या पद्धतीच्या शिक्षणाची सुरुवात करण्याच्या उद्देशानें कोल्हापूर दरबारनें रमाबाईंच्याकडे एक शिक्षिका पाठविली. दरबारनें ही शिक्षिका शारदासदनांतून काढून घ्यावी असा प्रयत्न झाला. सल्लागार मंडळानें तशीं पत्रें कोल्हापूर दरबारला पाठविलीं. परंतु दरबारनें त्यांना मुळींच दाद दिली नाही. उलट रमाबाईंच्याविरुद्ध करण्यांत आलेल्या ह्या खटपटीनंतर मुलीचा अभ्यास त्या वेळेस संपला होता व तिला परत जाण्याची वेळ आली होती तरी इंग्रजी शिक्षणाचें निमित्त करून तिला आणखी दोन वर्षें रमाबाईंकडे ठेवण्याचें दरबारनें ठरविलें.

ह्याशिवाय समाधानाच्या आणखी कितीतरी गोष्टी त्या वेळेस घडत होत्या. गव्हाचा दाणा मातींत पडला, दृष्टिआड झाला, तरी त्याला जोमदार अंकूर फुटून नवीन झाड उत्पन्न होतें. रमाबाईंच्या ह्या दर्शनी अपयशांत केवढें यश दडून बसलें होतें, हें पुढें कर्वे पतिपत्नीनें केलेल्या अवाढव्य यशस्वी कार्यानें दिसून येतें. सौ. आनंदीबाईंनीं तर आपण आपल्या कार्याची स्फूर्ति रमाबाईंकडून घेतली हें पुढें कित्येक वर्षांनींहि स्पष्ट शब्दांत नमूद करून ठेवलें आहे[1]. आणि अण्णासाहेबांनींहि बाईंच्याबद्दल वाटणारी कृतज्ञता अनेक प्रकारें व्यक्त केली आहे. लग्नांत त्यांनीं बायकोचें नांव घेतांनाच आपली सदनाविषयींची भावना अगदीं सारभूत रीतीनें खालीलप्रमाणें व्यक्त केली होती. 'सदनाचे उपकार। मजवर झाले फार। आनंदीनें फेडायला असावें तयार।"[1] हा उखाणा सौ.

१. माझें पुराण : पान २३–२४.

आनंदीबाईंनीं आपल्या सदनाविषयींच्या उपकाराची आठवण म्हणून जन्मभर आपल्या मनांत खूणगाठीसारखा बाळगला.

रमाबाई असोसिएशनच्या अध्यक्षांना लिहिलेल्या एका पत्रांत अण्णासाहेबांचे खालील उद्गार सांपडतात.[१]

'माझ्या पत्नीला सदनांतील चार वर्षांच्या निवासांत जे असंख्य फायदे झाले त्या सर्वांचा उल्लेख करणेंहि अशक्य आहे. ह्या शाळेंतून ती आपल्याबरोबर तीव्र ज्ञानलालसा घेऊन बाहेर पडली. येथेंच तिचें मन सुसंस्कृत व अंतःकरण विशाल बनलें........जीवितहेतु व ह्या जगांतील कार्य ह्या संबंधींचा तिचा दृष्टिकोन वस्तुतः बदलला. आमच्या पुष्कळशा हलक्या दर्जाच्या वेडगळ समजुतींपासून तिची मुक्तता झाली. तिला आतां असें वाटूं लागलें आहे कीं आपल्या अधिक दैवहीन भगिनींची उन्नती करतां येईल इतकी आपली प्रगति झाली आहे. आयुष्य हा एक शाप नसून एक शुभाशीर्वाद आहे असें आतां तिला वाटूं लागलें आहे. थोडक्यांत म्हणजे एक अत्युत्तम गृहिणी व जीविताची जोडीदारीण मला सदनाच्या कृपेनें लाभली आहे..... ज्या उदार अमेरिकन लोकांच्या साह्यानें शारदासदनाचा योगक्षेम चालतो त्यांच्याबद्दल मला कृतज्ञता वाटते....कारण माझी पत्नी आज आहे ती त्या सदनाचें फळ आहे....तशीच पंडिता रमाबाईंविषयीं वाटत असलेली कृतज्ञताहि मला व्यक्त केली पाहिजे. त्यांच्या ठायीं मातृदेवता अवतरल्याचें मुलींना वाटतें. त्यांचे प्रेम आणि शिस्त ह्यांमुळेंच सदन इतक्या उत्तम रीतीनें चाललें आहे....'

रमाबाईंचीं स्मारकें आणखीहि उभारलीं जात होतीं. मुंबईस शारदा-सदन होतें तेव्हां बाईंना साह्य करीत असलेल्या सौ. मेरीबाई ऊर्फ शेवंतिका-बाई निकंबे ह्या अत्यंत कर्तबगार स्त्रीनें त्यांच्या तालमींत काम केलें होतें. शारदासदन पुण्यास आल्यावर त्याच भांडवलावर मेरीबाईंनीं उच्चवर्णीय विधवांसाठीं, गृहिणींसाठीं व अविवाहित कन्यकांसाठीं एक नमुनेदार शाळा काढली. ह्याबद्दल रमाबाई असोसिएशनचा १८९४ च्या वार्षिक सभेचा अहवाल म्हणतो :

१. Report of The Annual Meeting of the Ramabai Association held March 12, 1894. पृष्ठ २७–२९.

"Mrs. Nikambe's school is the direct outcome of Sharada Sadan. . . . Out of pity for the pupils who could not accompany Ramabai, she opened a little school expressly for them, which has been wonderfully successful."

शारदा सदनामुळें संपूर्ण मुंबई इलाख्यांत किंडरगार्टनचा प्रसार झाला. पूर्वी इकडे किंडरगार्टनचें नांव ऐकूं येत नव्हतें. पण आतां शारदा सदनांतून त्या वर्गासाठीं शिक्षिका तयार करयण्यात येऊं लागल्या व बाहेर पाठविण्यांत येऊं लागल्या. शारदा सदनाचें हें आणखी एक जीवंत स्मारक ठरलें. रमाबाईंचें एक गाणें त्यांचें प्रातःस्तोत्र बनलें असेल.

*संस्करुनी जी नवीन वाट दाविली ।*
*तींत चालण्यास आत्मशक्ति देउनी ।*
*माझिया हृदिं अपार प्रीति लाविली ॥*

## २० पंधराचा वर्ग करून मागणी

बाईंच्या धर्मकन्यांची संख्या आतां पंधरा झाली. शारदा-सदनांत बाकी फरक कांहीं झाला नव्हता. पूर्वीप्रमाणेंच कांहींचें बाईंच्या प्रार्थनेला हजर राहाणें, तर कांहींचें कडक सोवळें ओवळें हीं चालू होतीं. एकच फरक झाला होता कीं रविवारच्या किंवा इतर दिवशीं कधीं ख्रिस्ती उपासनेला सदनाबाहेर जायचें तें बाई ह्या पंधरा मुलींना घेऊन जाऊं लागल्या. मात्र ह्या नवीन परिस्थितीमुळें बाईंच्या इतर कार्यक्रमांत कांहीं फरक पडला नाहीं.

ह्या सुमारास बाईंना वाटूं लागलें कीं आपण ख्रिस्ती झालों असलों तरी आपणास ख्रिस्त सांपडला नाहीं. आपण बायबलसंबंधीं पुष्कळ पुस्तकें वाचलीं असलीं तरी खुद्द बायबलचा जसा बारकाईनें अभ्यास करायला हवा तसा केला नाही. त्या म्हणतात, 'पवित्र शास्त्राचें शिक्षण आत्मसात् करण्यासारखें माझें मन चपळ नसून त्याच्यांत जडपणा आला आहे....मी दुसऱ्या पुस्तकांचा अभ्यास करायचें सोडून दिलें व केवळ बायबल नियमितपणें वाचण्यास सुरुवात केली. असा क्रम दोन वर्षें चालला होता. मला माझ्याबद्दल फार निराशा वाटूं लागली. एक दिवस मुंबईच्या गार्डियन मिशन प्रेसमध्यें कांहीं कामाकरतां गेलें असतां तेथें मि. हॅस्लॅमकृत 'From Death Unto Life' नांवाचें पुस्तक पाहिलें. लेखक चर्च ऑफ इंग्लंडचा एक धर्मोपदेशक होता. आपल्या पुस्तकांत त्यानें परमेश्वराशीं सान्निध्य ह्या विषयावर लिहिलें होतें. बाई पुढें लिहितात. 'माझ्या बाप्तिस्म्यानंतर कित्येक वर्षें मला असें समाधान वाटे कीं मला सांपडलेला धर्म स्त्रियांना व पुरुषांना सर्व तऱ्हेनें सारखी वागणूक देणारा धर्म आहे. त्यांत जातिभेद नाहीं, वंशभेद नाहीं. पण मला ह्या गोष्टीची जाणीव नव्हती कीं ख्रिस्ताच्या ठायीं आपण परमेश्वराशीं

युक्त आहों, व त्याच अवस्थेंत सुज्ञपण, पावित्र्य, नीतिमत्व व मुक्ति प्राप्त होते. अशा स्थितींत मीं काय करायला हवें होतें? माझी कोती विचारशक्ति साहाय्यास येण्यास समर्थ नव्हती. शेवटीं मी अगदीं हताश झालें व सपशेल आणि बिनशर्त माझ्या तारणाऱ्याला शरण गेलें. माझ्या वाचकांपैकीं कोणाला असा अनुभव आहे का की त्याला एखाद्या खोलींत बंद केलें आहे, तेथें अंधार गुडुप आहे व आपल्याला हवें असलेलें कांहीं तरी त्या खोलीभर तो चांचपडत आहे. योहान्नाच्या पुस्तकांत ९ व्या अध्यायांत दिलेल्या अंधाच्या गोष्टीची मला आठवत होते. तो जन्मान्ध होता व चाळीस वर्षें तो तसा राहिला. नंतर त्या दृष्टि देणाऱ्या समर्थाची व त्याची गांठ पडली. त्याला दृष्टि प्राप्त झाली. त्यावेळीं त्याला झालेल्या हर्षाचें वर्णन कोणाला करतां येईल? ........मी जी थोड्या वेळापूर्वीं अंधारांत बसलें होतें त्या मला एकदम महान् प्रकाश प्राप्त झाला. ज्या माणसाला येशूच्या नांवानें उठून चालण्यास सांगण्यांत आलें होतें त्याच्यासारखी माझी स्थिति झाली. तो मंदिराच्या दारांत भीक मागत बसला होता. ख्रिस्तशिष्य पेत्र व योहान तेथें आले. तो त्यांच्याकडे आशाळभूतपणें पाहात होता. तेव्हां पेत्र म्हणाला होता, 'माझ्याजवळ सोनेंरुपें कांहीं नाहीं, जें आहे तें तुला देतों; नासोरी येशूच्या नामानें चालूं लाग....तो उडी मारून उभा राहिला आणि चालूं लागला. आणि चालत, उड्या मारीत व देवाची स्तुति करीत त्यांच्याबरोबर मंदिरांत गेला.'[1]....'१८९१ पासून मी येशू ख्रिस्ताविषयीं साक्ष देत आहें. ख्रिस्ती माणसाच्या आयुष्यांत ख्रिस्ताच्या प्रेमाविषयीं व त्यानें पातक्यांच्या उद्धारासाठीं केलेल्या आत्मत्यागाविषयीं इतरांना सांगण्यांत जो आनंद असतो तो दुसऱ्या कशांतहि नसतो.'[2] १८९५ सालीं आमंदा स्मिथ नांवाच्या एका स्त्रीची कथा रमाबाईंच्या वाचनांत आली. मुक्त करण्यांत आलेली ही एक अमेरिकन नीग्रो गुलाम होती. ख्रिस्ती धर्मोपदेशक म्हणून ती पुढें प्रसिद्धीला आली. आपण दोन प्रकारच्या गुलामगिरींतून दोन वेळां मुक्त झालों आहों असें म्हणून ती आनंदानें आरोळी ठोकीत असे. प्रथम देहाच्या गुलामगिरींतून व नंतर पापाच्या गुलामगिरींतून. कुठें भारत? कुठें

---

१. बायबल : प्रेषितांचीं कृत्यें : अध्याय ३. वचनें १ ते ११. २ A Testimony पृष्ठ-१५-१६

आफ्रिका? कुठें रमाबाईसारखी विद्वान् व सुसंस्कृत स्त्री व कुठें आमंदासारखी खऱ्या खुऱ्या गुलामगिरींतून मुक्त झालेली एक गुलाम! पण आमंदाबाईंचा अनुभव रमाबाईंच्या मनाला इतका भिनला कीं तिच्याप्रमाणें आपल्याहि आयुष्यांत प्रभु येशूनें येऊन राज्य करावें असें त्या मनःपूर्वक प्रार्थूं लागल्या. ह्यानंतर ग्रेगसन नांवाच्या एका उपदेशकाचे उपदेश त्यांना मुंबईस व लोणावळ्यास भरलेल्या एका धार्मिक सभेच्या प्रसंगीं ऐकण्यास मिळाले. ग्रेगसन साहेबांशीं लोणावळ्यास बाईंनीं पुष्कळ विचारविनिमय केला व येथून पुढें आपल्यांत 'पवित्र आत्म्याचा, प्रभाव त्यांना पटूं येऊं लागला.' प्रार्थनेवर व पवित्र आत्म्याच्या सान्निध्यावर येथून पुढें त्यांनीं आपल्या कार्यांत अधिक भर दिला. मि. हॅस्लॅम ह्यांचीं भाषणेंहि ह्याच सुमाराला त्यांना ऐकण्यास मिळालीं. पूर्वीं त्यांनीं ह्या उपदेशकाचें फक्त एक पुस्तक वाचलें होतें. (बायबलःस्तोत्र ३२:८ व यिर्मया ३०:११) "मी तुला बोध करीन, ज्या मार्गानें तुला गेलें पाहिजे त्याचें शिक्षण तुला देईन. मी आपली दृष्टि तुजवर ठेवून तुला बुद्धिवाद सांगेन." "कारण तुझा उद्धार करण्यास मी तुजबरोबर आहें....मी तुझा पुरा नाश करणार नाहीं; तरी तुला योग्य शासन करीन," इत्यादि बायबलमधील वचनांच्याद्वारें परमेश्वरानें आपल्या भक्तांसाठीं करण्याचें जें अंगावर घेतलें आहे त्यावर बाईंची अधिकाधिक श्रद्धा बसूं लागली. ह्यानंतर न्यू हेब्रेडीज येथील मिशनरी जॉन जी. पेटन, ब्रिस्टलचा जॉर्ज मुलर इत्यादि भक्तांच्या हातून विश्वास व प्रार्थना ह्यांच्या बळावर जीं आश्चर्यकारक कृत्यें घडल्याचें बाईंना त्यांच्या चरित्रवाचनांत आढळलें, त्यावरूनहि त्यांच्या विश्वासाला अतिशय बळकटी आली.

१८९६ मध्यें बाई पुन्हा लोणावळ्यास प्रार्थनेच्या बैठकीसाठीं गेल्या. ह्या वेळेस त्यांनीं आपल्या १५ धर्मकन्यका बरोबर नेल्या होत्या. त्या सर्वांचे बाप्तिस्मे झालेले होते. शारदासदनांतील त्या विधवा होत्या. त्या वेळेस शारदा सदनांत एकंदर ४९ विधवा होत्या. बाईंनीं ह्या १५ ना बरोबर घेऊन परमेश्वराची अशी आग्रहाची प्रार्थना चालविली कीं ह्या पंधरांचा वर्ग

---

१. पूर्वीं रमाबाई पवित्र आत्म्यास परमेश्वराची पवित्र चिच्छक्ति म्हणत: (पृष्ठ १८६ ओळ ८)–तो प्रघात त्यांनीं का, केव्हां व कसा सोडला सांगतां येत नाहीं.

करून एका वर्षाच्या आंत मलां १५ च्या जागीं २२५ धर्मकन्या दे. प्रार्थना फार आग्रहाची होती. दररोज ह्या सोळाजणी ती नित्य नियमानें न चुकतां व न कंटाळतां करीत. प्रार्थनेला सुरुवात केली, तेव्हांपासूनच आपली विनंति मान्य केली जाणार अशी त्यांची खात्री होती. ह्या संबंधानें लिहितांना मनोरमाबाई आपल्या आईचें म्हणणें उद्धृत करतात :

"The last camp meeting I attended at Lonauli, proved to be an occasion of special joy to me, as I was accompanied by fifteen of my own girls, who were believers in the Lord Jesus, and had confessed Him as their Saviour before the public. Amid the troubles and trials that faced me at that time, I rejoiced much to think that the Lord had given me fifteen immortal souls, whom I could· call my spiritual children. One day, early in the morning, I went out to a quite place in the woods, when I saw the sun rising in all its glory. Then I thought of the Sun of Righteousness, and wished much that my people should be willing to open their eyes and hearts, and see Him rise in all His heavenly glory. At that time my heart was full of joy and peace, and offered thanks to the Heavenly Father for having given me fifteen children, and I was by the Spirit led to pray that the Lord would be so gracious as to square the number of my spiritual children before the next year's camp took place."[1]

वरील उताऱ्यावरून असें दिसून येईल कीं अशी प्रार्थना करण्याची प्रेरणा मुळीं त्यांना पवित्र आत्म्याकडून झाली होती. आणि अत्यंत श्रद्धापूर्वक ती प्रार्थना केल्यावर त्यांच्या मनांत शंका आली व त्या परमेश्वराला म्हणूं लागल्या, पण हें शक्य कसें होईल ? कारण शारदा सदनांत आज आत्तां ४९ मुली आहेत. जागा केवळ ६५ मुलींना पुरेल इतकी आहे आणि अन्न तर ५० जणींपुरतेंच आहे. रमाबाई मोठ्या आग्रहानें परमेश्वराजवळ मागूं लागल्या कीं, तूं एवढयांचें करशील व तूंच त्यांचें चालविशील असें मीं कशावरून धरून चालावें, तें मला स्पष्टपणें दाखीव ! ह्या प्रार्थनेला त्यांना उत्तर मिळालें व त्यांनीं तें उत्तर आणि ती तारीख आपल्या स्मरणवहींत ताबडतोब उतरून

१. मनोरमाबाईकृत पंडिता रमाबाई (इंग्रजी चरित्र) पृष्ठ १२७

ठेवली. त्यांच्या मनांत त्या वेळीं जें शास्त्रवचन स्फुरलें व आपल्याला परमेश्वराकडूनच हा संदेश आला आहे अशी त्यांची ज्या वचनाबद्दल खात्री वाटत होती तें वचन असें होतें. "पाहा मी परमेश्वर सर्व मानवजातीचा देव आहें. मला अवघड असें कांहीं आहे काय ?"[1]

१५ च्या जागीं २२५ धर्मकन्या आपल्याला मिळणार आणि त्याहि एका वर्षाच्या आंत ह्याबद्दल बाईंना कांहीं शंकाच नव्हती. कारण तशी प्रार्थना करण्यास त्यांना मुळीं पवित्र आत्म्यानेंच प्रेरणा केली होती. पण एवढ्या मुली ठेवायच्या कोठें व त्यांना खायला घालायचें कोठून हाच मोठा अवघड प्रश्न त्यांच्यापुढें उभा होता. व मुली याव्या म्हणून नव्हे—कारण त्या तर खात्रीनें येणारच होत्या—तर त्या आल्यावर त्यांच्या खाण्या राहण्याची आबाळ होऊं नये व आपल्याला त्यांची चांगली व्यवस्था करतां यावी म्हणून त्या व त्यांच्या पंधरा धर्मकन्या सहा महिने दररोज पहांटे पांचला उठून अगदीं न चुकतां प्रार्थना करूं लागल्या.

ह्यानंतरची घटना फारच आश्चर्यकारक आहे. बाईंच्या किंवा त्यांच्या त्या प्रार्थनामंडळाच्या ध्यानींमनीं नसलेली गोष्ट घडून आली. ह्याला कोणीं बोलाफुलाला पडलेली गांठ म्हणतील, तर कोणी म्हणतील 'निर्दय बाईनें परमेश्वराजवळ भलतीच प्रार्थना करून आणि त्यांच्याहिपेक्षां भयंकर अशा परमेश्वरानें त्यांची ती प्रार्थना सफळ करण्याकरितां मध्यप्रान्तांत मोठा थोरला दुष्काळ पाडला व आपलें वचन सत्य केलें! बाईंची बत्तिशी वठली, त्यांना २२५ धर्मकन्या हव्या होत्या, त्या ऐवजीं शेकडों कन्यका त्यांना मिळाल्या !'

पण मजा अशी कीं बाईंच्या प्रार्थनेचा तसा अर्थ लावण्यांत आला व तोहि डॉ. सर भांडारकर ह्यांच्या सारख्यांकडून ! ७ जानेवारी १८९९ च्या त्यांच्या डायरींत असा मजकूर आढळतो:

"Pandita Ramabai has carried the theory of prayer to a childish extent, believing that the famine was sent to answer her prayer to increase the number of her converts to the square of the number,—famine which rendered many female children orphans whom she took and baptised."[2]

१. बायबल : यिर्मयाचें पुस्तक : अध्याय ३२ वचन २७.

२. डॉ. भांडारकर ह्यांचें चरित्रः कर्नाटकी. पृष्ठ. २७३.

'मुली आल्यावर पहिल्या दुष्काळानंतर पांच वर्षांनीं व दुसऱ्यानंतर तीन वर्षांनीं १२०० मुलींनीं इच्छा दर्शविल्यानें त्यांचे बाप्तिस्मे करण्यांत आले.'[1]

पण ही गोष्ट घडली त्याच्या आधीं सहा महिने त्यांच्या प्रार्थना चालल्या होत्या. कोठेंहि दुष्काळ पडणार आहे अशी त्यावेळीं त्यांना अस्पष्ट व अंधुकहि कल्पना नव्हती. दुष्काळ पडावा अशी राक्षसी प्रार्थना त्यांनीं केली नव्हती, तशी प्रार्थना करायला त्यांच्यापैकीं कोणीहि एखादी पिशाची किंवा लाव नव्हती. बाईंसकट सर्वांनींच असल्या दुःखाचा स्वतःच पुरेपूर अनुभव घेतला होता. दुसऱ्यावर दुःखाचे प्रसंग यावे अशी कल्पना त्यांना कधीं स्वप्नांतहि येणें शक्य नव्हतें. बाईंचे एक आचरट टीकाकार म्हणतात, 'बाई दुष्काळ पडावा म्हणून प्रार्थना करीत होत्या.' मशारनिल्हे लेखक ह्या विधानानें अप्रत्यक्ष रीतीनें एवढें मात्र कबूल करतात म्हणायचे कीं परमेश्वर बाईंच्या प्रार्थना ऐकत असे!

बाईंनीं जेव्हां दुष्काळाचीं वर्णनें ऐकलीं तेव्हां त्यांचें अंतःकरण पिळवटून निघालें,

श्री. द्वा. गो. वैद्य आपल्या नवयुग मासिकांतील बाईंच्या चरित्रांत म्हणतात : 'पुण्यास गेल्यावर रमाबाईंनीं आपली संस्था विशेष प्रसिद्ध करण्याचे प्रयत्न केले. थोड्या दिवसांनीं शारदा सदनांत बऱ्याच गतभर्तृका आल्या. लोकांचा संस्थेवर विश्वासहि बसूं लागला व रमाबाईंचें काम चांगल्या रीतीनें चाललें होतें. आपल्या हातून जें अल्प स्वल्प काम होत आहे त्याची माहिती लोकांस व्हावी म्हणून पंडिताबाई वारंवार सदनामध्यें संमेलनें भरवूं लागल्या. एकदां तर सुबोधपत्रिकेनें असे उद्गार काढले कीं, 'परदेशीं जावें किंवा न जावें, गेलें तर किती शेण मूत खावें, याची वाटाघाट करीत आमची विद्वान् मंडळी बसली आहे, अशा वेळीं एकट्या स्त्रीनें अमेरिकेसारख्या सात समुद्राच्या पलीकडच्या देशीं जावें, तिकडील लोकांच्या अंतःकरणांत आपल्याविषयीं कळवळा उत्पन्न करावा, त्यांच्याकरितां सत्तेचें विद्यालय व १० वर्षेपर्यंत त्याला लागणारा सर्व खर्च मिळवून आणावा, याला जर अलौकिक पराक्रम म्हणूं नये तर म्हणावा कशाला? हें परकी लोकांचें साहाय्य

१. प्रकरण २१ व २६ पाहा.

सारें दहा वर्षेच मिळायचें आहे. त्यांतील चार वर्षे तर निघून गेलीं. अशींच बाकीचीं राहिलेलीं सहा निघून जातील. असें जर झालें तर आमच्या लोकांच्या निर्दयतेला किंवा कर्तव्यपराङ्मुखतेला कांहीं सीमा राहील काय? अशी उपयुक्त संस्था १० वर्षें वाढवून तिला सर्व अज्ञजनकृत छलादि रोगांतून मुक्त करून ती आमच्या हातांत परकी लोकांनीं द्यावी व पुढें तिचें संरक्षण आमच्या हातून होऊं नये यासारखी शरमेची आम्हांला दुसरी गोष्ट कोणती होईल?' अखेरीस वरील भाकित बहुतेक खरें झालें. शारदा सदनाला हिंदु जनतेकडून थोडीबहुत मदत होऊं लागली होती; परंतु ती फार अपुरी होती. सदनामध्यें ख्रिस्ती नसलेल्या बायांना ख्रिस्ती धर्मासंबंधानें आग्रहाचा उपदेश. होतच असे असें नाहीं; त्याचप्रमाणें जुन्या आचारविचारानुसार चालणाऱ्या विद्यार्थिनींस जरी पूर्ण स्वातंत्र्य होतें तरी सदनासंबंधानें लोकांमध्यें जो उत्साह असावयास पाहिजे होता तो कमी झाला होता.

'रमाबाई असोसिएशनच्या मदतीच्या १० वर्षांपैकीं निम्मा काळ संपून गेला होता. हिंदुस्थानच्या लोकांकडून पुढें सदनाला कांहीं मदत होईल किंवा सदन आपल्या हातांत घेऊन चालविण्यास ते पुढें सरसावतील अशी आशाच करणें अदूरदृष्टीचें होतें. तेव्हां बाईंनीं पुण्यापासून ३४ मैलांवर असलेल्या केडगांव नांवाच्या गांवीं एक १०० एकरी बरड जमीन खरेदी करून टाकली होती. हेतु हा कीं तेथें जाऊन शेती वगैरे करून मुलींचें संगोपन करायचें.

दरम्यान पुण्यास प्लेग सुरू झाला. केडगांवच्या जमिनीचें बाईंना जवळ-जवळ विस्मरण पडलें होतें पण ह्या प्लेगनें त्यांना त्याची आठवण झाली.

'केडगांवला झोंपड्या बांधून शारदा सदनाचें अर्धेमुर्धे काम तिकडे हाल-विलें. इतक्यांत मध्यप्रांतांत भयंकर दुष्काळ पडल्याच्या बातम्या इकडे येऊन पोंचल्या. १८९७ सालचा हा तो भयंकर दुष्काळ. रमाबाईंनीं सर्व प्रकारच्या आपत्ति सहन केलेल्या होत्या. दुष्काळ तर राहो, सभोंवतालीं सुबत्ता असतां त्यांना उपास काढावे लागले होते, अन्नावांचून दिवस काढणें किती यातना-दायक असतें ह्याचा त्यांनीं प्रत्यक्ष अनुभव घेतलेला. दहा दिवसपर्यंत झाडाचा पाला खाऊन त्यांनीं जीव जतन केलेला, भाकरीच्या एका चतकोर तुकड्या-साठीं शेजारणीकडे जाऊन तोंड वेंगाडणें म्हणजे केवढें दुःखदायक दिव्य, ह्याचा त्यांनीं प्रत्यक्ष अनुभव घेतलेला. त्या वेळच्या त्या दुष्काळग्रस्त लोकांची

दया त्यांना येणें अगदीं साहजिक होतें. त्यांच्यासाठीं हृदय पिळवटून निघणें हें त्यांच्याच बाबतींत शक्य होतें.

'आणि लोणावळ्याच्या सफरींत आपल्याला पवित्र आत्म्यानें तशी प्रार्थना करायला कां प्रेरणा केली त्याचा अर्थ बाईंना कळला. हातांत कांहीं माया नसतांना व शारदा सदनाचीच कशी व्यवस्था करावयाची हा प्रश्न पुढें अस-असतांना केवळ आपल्याला परमेश्वराची आज्ञा आहे कीं, "जा आणि ह्या दुष्काळग्रस्तांना हात दे" असें पक्केंपणीं ओळखून बाई मध्यप्रदेशास जाण्यास निघाल्या.'

श्री. वैद्य त्या परिच्छेदाचा शेवट असा करतात :

'संस्था (शारदा सदन) ख्रिस्ती झाल्यामुळें आपण होऊन तींत कोणी आपल्या मुली पाठवीनासे झाल्यानें दुष्काळाची संधि साधून आयतें आलेलें पीक जमा करण्यासाठीं रमाबाई दुष्काळग्रस्त प्रांतांत गेल्या व त्यांना तेथें कल्पनेच्या बाहेर लाभ झाला असें कित्येक म्हणतात. पण हें खरें नाहीं. हजारों माणसें अन्नान्नदशेंत असतांना घरीं बसून दोन घांस सुखानें खाणें त्यांस बरें वाटलें नाहीं म्हणून त्या बाहेर पडल्या.'

ह्या दुष्काळी प्रान्तांत बाईंच्या आंतड्याला पीळ बसविणारीं दृश्यें त्यांनीं पाहिलीं. वेळोंवेळीं त्यांनीं तेथून लिहिलेल्या पत्रांतील कांहीं मजकूर पुढें दिला आहे; तो पाहून बाईंच्या कनवाळू अंतःकरणाची व त्या लोकांच्या क्लेशांची कल्पना करतां येईल.

बुंदेलखंडांतील नौगांवाहून लिहिलेल्या पत्रांत बाई म्हणतात :

'आज दोनतीन दिवस मी पावसांतच प्रवास करीत आहें. पाऊस आला ह्याचा फार आनंद वाटतो; पण ह्या पावसाळ्यांत ह्या दुष्काळ पीडित लोकांची जी दुर्दशा झाली आहे, ती पाहून हृदय दुभंग झाल्यासारखें होतें. मी काल आणि आज गाडींतून प्रवास करीत असतांना रानावनांतून शेकडों गरीब लोकांना इकडेतिकडे हिंडतांना पाहिलें. बिचाऱ्यांना निवाऱ्याची जागा नाहीं, अंगावर चिंध्या, त्याहि भिजून चिंब झालेल्या, पोटांत भुकेचा डोंब उठलेला, बाहेरून थंडीवाऱ्याची पीडा, कोणी झाडांना तर कोणी पडित भिंतींना चिकटून कुडकुडत उभीं आहेत. पुरुष, बायका, मुलें, म्हातारीं, तरणीं, सगळ्या प्रकारचीं माणसें अशीं मरणापन्न स्थितींत कसा तरी देहभार वाहात आहेत.

आज मी तांग्यांत बसून इकडे येतांना चार तास पावसांत भिजलें तें मला जड गेलें, पण एक गरीब बिचारी बाई माझ्याच वयाची रस्त्यानें चालली होती, तिच्या अंगावरील चिंध्या सगळया भिजून गेल्या होत्या. मुसळधार पावसांतून रानावनांतून ती चालली होती. माझ्यापासून कांहीं तरी मिळेल म्हणून अर्धा तास ती माझ्या तांग्यामागें धांवत चालली होती. मीं तिच्याकडे पैसे टाकले पण ते तिला मिळाले नाहींत. ती तशीच धांवत येऊं लागली. तांगा 'मेल' घेऊन चालला होता. तो उभा करतां येईना. अर्धा तास धावून थकून ती मागें राहिली. माझ्या आणि तिच्या स्थितींत कितीतरी अंतर होतें! माझें भिजणें तांग्यांत बसून आणि तेंहि दोनतीन तासांचें; पण तिचें बिचारीचें केव्हांच न संपणारें. आतां ती कोठें कुडकुडत मरत पडली असेल कीं काय कोण जाणे! आगगाडीच्या स्टेशनावर पुष्कळ लहानलहान मुलें भीक मागावयास आलीं होतीं. तीं सगळीं निराश्रित, निराधार आहेत. सर्व पावसानें भिजत व भुकेनें मरत आहेत. एक लहान बच्चा, सरासरी पांचसहा वर्षांचा, देवींनीं सबंध भरलेला होता. तरी पोटाच्या आहाळामुळें देवींचें दुःख विसरून तशा त्या पावसांतून भीक मागावयास आला होता. अरेरे, ह्या लहानशा लेकरासाठीं काय करावें तें कळत नाहीं. आमच्या शाळेंतल्या कित्येक मुली चांगल्या स्थितींत असूनहि मजवर नाहींतर दुसऱ्या कोणावर रागावून सहज म्हणतात, 'मी जाईन कोठें तरी भीक मागत.' त्यांची मला कींव येते. त्यांना भिकेचें सुख माहीत नाहीं म्हणूनच त्या असें म्हणतात."

बाई दुःखविमोचनास तिकडे गेल्या होत्या पण सुरुवातीला त्यांच्या त्या कामांतहि अडथळे आले. मनोरमाबाई म्हणतात:

"जानेवारी १८९७ मध्यें लिहिलेल्या एका पत्रांतील हा उतारा आहे. 'चार महिने होऊन गेले, मीं ऐकलें कीं मध्यप्रदेशांत लोक मोठया संकटांत सांपडले आहेत. सहानुभूतीमुळें माझ्या हृदयाला एकदम कशीतरी तिकडची ओढ लागली. मानवी व्यवहारज्ञान म्हणूं लागलें, 'येथेंच थांब, तुझ्या हातांत जें काम आहे तेंच नीट सांभाळ व येथेंच स्वस्थ बैस. म्हणतेस ती जबाबदारी अंगावर उचलून घ्यायला तुझ्याजवळ पैसा नाहीं कीं तुझ्या अंगीं तशी शक्ति नाहीं. तुझ्या सामर्थ्याला कांहीं ठराविक सीमा आहेत, व ह्या दुर्दैवी भुकेल्यांना मदत करायला तूं धावून गेली नाहींस तर त्याबद्दल कोणी तुला जबाबदार

धरणार नाहीं. खरोखर भुकेनें तळमळणाऱ्या हजारों लोकांना माझ्यासारखी एकाकी व अशक्त स्त्री काय करणार? शिवाय हिंदुस्थान सरकार व इतर परोपकारी लोक जें कांहीं करायचें तें करीतच आहेत. मला करण्यासारखें आणखी काय उरलें होतें? अशा रीतीनें मी माझ्या मनाच्या ओढीची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण माझ्या हृदयस्थ परमेश्वरानें मला दरडावलें, 'जुने दिवस आठव. मिसरदेशांत तूं गुलामगिरींत होतास, तेथून तुझा देव परमेश्वर ह्यानें तुझी सुटका केली.'[1] कोणास ठाऊक? ह्या काळास उपयोग व्हावा म्हणून परमेश्वरानें माझी आधींपासूनच योजना केली असल्यानें मी ख्रिस्ती झालें असें नसेल कशावरून?

एका महिन्यापूर्वी मीं मध्यप्रदेशांत आलें. तेथील एका मिशनरीस घेऊन सोहागपूरला आलें, व आम्हीं एकदम कामाला सुरुवात केली. तेथील कांहीं चांगल्या लोकांनीं आम्हांला सांगितलें कीं अनाथ मुलांना घेण्यास सरकारी परवानगी पाहिजे. तेव्हां आम्हांला आधीं जाऊन त्या कामाची जबाबदारी असलेल्या डॉक्टरांची गांठ घ्यावी लागली. 'पुअर हाऊस' तेथील तहशील-दाराच्या ताब्यांत होतें त्यांनाहि भेटावें लागलें. आम्ही दवाखान्यांत गेलों ते फार पहांटे. अजून डॉक्टर आले नव्हते. त्या दवाखान्याच्या तोंडाशींच दुष्काळानें पीडिलेलीं तीन लहान मुलें येत होतीं.

हा करुण देखावा मी कधींच विसरणार नाहीं. त्यांचा बाप नुकताच वारला होता व आई दोन दिवसांपूर्वींच मेली. सर्वांत वडील मुलगी केवळ सात वर्षांची होती, दुसरा मुलगा होता, तो पांच वर्षांचा असेल व धाकटें तीन वर्षांचें होतें. मुलगी आपल्या अंगावरील चिंध्यांनीं कसें तरी थंडीचें निवारण करीत होती पण तीं दुसरी पोरें बिचारीं अगदीं उघडीं होतीं. त्यांचीं सुरकुतलेलीं व भकास तोंडें त्यांच्या भयंकर दुःखाच्या व क्लेशाच्या गोष्टी न बोलतां सांगत होतीं. सर्व जणांनीं कांहीं अन्न मिळावें म्हणून टाहो फोडला होता. आमच्याजवळ खायला देण्यासारखें कांहीं नसल्यानें आम्हांला कांहीं करतां येईना. सर्वांत धाकट्याचे डोळे आले होते व त्यामुळें त्यानें डोळे घट्ट मिटून घेतले होते. त्यांत बिचाऱ्याला आंव रक्त पडत होतें. तरी अशा रीतीनें खुरडतखुरडत चालला असतां मागून बैलगाडी आली. गाडीवान

---

१. बायबल : जुना करार : निर्गम १३ : ३

ओरडला त्यामुळें घाबरून विचारा पोरगा खालीं पडला व त्याला जखम झाली आणि भळभळां रक्त गळूं लागलें. पण ह्या बाळाची काळजी घ्यायला कोण होतें? तो रडत होता पण डोळ्यांतून अश्रू बाहेर पडत नव्हते. बिचारीं मुलें दवाखान्याच्या पुढें अगदीं नजीक होतीं पण कोणीं त्यांच्याकडे लक्ष दिलें नाहीं, कोणाच्या हृदयाला पाझर फुटत नव्हता. ह्या गरीब बिचाऱ्या पोरक्या पोरांना हातहि लावण्यास आम्ही धजत नव्हतों, कारण सरकारी परवानगी अजून आम्हीं मिळविली नव्हती.

तो देखावा पाहून मनास जे क्लेश झाले व जी तीव्र दहशत उत्पन्न झाली ती मी कधीं विसरणार नाहीं.

"आम्हीं जें पहिलें 'पुअर हाऊस' पाहिलें तें मुळीं 'हाऊसच' (घरच) नव्हतें. गांवाच्या शिवेजवळच असलेलें एक गर्द छायेचें तें ठिकाण होतें. भुकेनें ग्रस्त झालेले लोक तेथें एकत्र जमून बसले होते. कांहीं एकमेकांना चिकटून मोळ्या करून पडले होते. त्या घाणेरड्या जागेंत कित्येकजण राखेंत लोळत होते. कांहींच्या अंगावर चिंध्या होत्या तर कांहीं कांहीं अगदीं उघडे होते. त्यांत म्हातारे होते, तरुण होते, पुरुष होते, स्त्रिया होत्या व लहानमोठीं मुलेंहि होतीं. बहुतेक सर्वच कांहीं ना कांहीं रोगांनीं पछाडलेले होते. त्यांत रक्तपिती व अनुल्लेखनीय रोगांनीं पीडिलेले रोगीहि होते, वाईट पुरुष, अनीतिमान स्त्रिया, सात्त्विक तरुण मुली, निष्कपट अज्ञ बालकें, म्हातारे कोतारे, चांगले, वाईट, असे सगळ्या प्रकारचे लोक सरसहा एकमेकांत मिसळले होते व बोलत होते. मोकळ्या हवेंत उघड्यावर ते रात्र काढीत व सरकारकडून जो जाडाभरडा भाकर तुकडा मिळे तो पोटांत ढकलीत. अन्न तर केवळ सुकें पीठ व मीठ एवढें मिळत होतें. सराईत डोळ्यांना चटकन एक गोष्ट दिसून येई कीं पीठ दळण्याच्या आधीं धान्यांत माती कालविलेली असली पाहिजे. लहान लहान अज्ञान अनाथ मुलांना भाकरी भाजून कोण देतें? त्यांना खरोखरच पीठ खावें लागे, नाहींतर तेथल्या एखाद्या वडील माणसाच्या तोंडाकडे पहावें लागे, आणि बळवानाला कांहींहि करण्याचा हक्क असल्यानें तीं मोठीं माणसें ह्या लहान लहान मुलांचें पीठ लुबाडीत.

गरिबीमुळें ह्या लोकांत कांहीं सहृदयताच उरली नाहीं. एकमेकांशीं व सभोंवतालच्या मुलांशीं ते फार निर्दयतेनें वागतात. स्वतःच्या मुलांची सुद्धां

त्यांना पत्ता नसते. कांहीं लोक त्यांच्या हातीं अन्न आलें कीं स्वतःचे व आपल्या पोराबाळांचें जें अन्न हातीं येई तें सर्वच गट्ट करून तेवढ्या दुष्काळांतहि चांगले पोसले आहेत. त्यांचीं मुलें भुकेनें हाडांचे नुसते सांपळे बनले आहेत[१] कित्येक तर मृत्युमुखीं पडत आहेत पण त्यांच्या आईबापांना त्याची कांहीं खंत वाटत नाहीं. त्यांना त्यांच्याबद्दल प्रेमच उरलें नाहीं.

आपल्या मुलींना नेऊन विकणारे आईबापहि आढळले. एक रुपयाला, कांहीं थोड्याशा आण्यांना, किंवा थोड्या भाकरीच्या पिठालाहि ह्या पोरी फुंकून टाकण्यांत येत आहेत."

ही परिस्थिति पाहून बाईंच्या हृदयाला घरें पडत. त्या प्रवासांतील आणखी पुष्कळच गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. पण केवळ एकदोनच सांगितल्यास बाईंनीं जमविलेल्या ह्या मालमसाल्यांतून पुढें त्यांनीं उभारलेलें मुक्तिसदन तयार करणें ही गोष्ट किती कमालीची अवघड होती हें दिसून येईल.

स्त्रियांची विक्री व त्यांना अनीतीच्या मार्गीं नेऊन सोडणें हा तर त्या भयंकर दुष्काळांत मुंबई—कलकत्त्यासारख्या शहरांतील गुंडांचा व्यापारच बनला होता. रमाबाईंच्या एका साह्यकारी बाईस एक १२ वर्षांची मुलगी आढळली. ती व तिची बहीण "रिलीफ कँप" कडे निघाल्या होत्या. तीनच आठवड्यां-पूर्वीं त्यांचा बाप मेला होता. कोणी आधार न राहिल्यानें त्यांनीं रिलीफ कँपचा मार्ग धरला होता. 'तूं येतेस का माझ्याबरोबर?' असा तिला प्रश्न करतां ती म्हणाली, 'माझी बहीण धुणें धुवायला गेली आहे, ती आल्यावर सांगतें. ती सांगेल तशी मी वागेन.' थोड्या वेळांत तिची बहीण आली. तिनें सांगितलें कीं आम्ही "रिलीफ कँप"कडे चाललों आहों. तेथें जवळच एक बाई आल्या आहेत व त्या आमच्यासारख्या अनाथ मुलींना सांभाळतात असें ऐकलें. त्यांच्याकडे आम्हांला जायचें आहे. तुमच्याबरोबरहि यायला आम्ही तयार आहों, पण आम्हांला वाईट मार्गाला लावूं नका. आतांपर्यंत असे पुष्कळ लोक आम्हांला पळवून न्यायला टपलेले भेटले व आम्ही कशातरी त्यांच्या हातून निसटलों. जर तसा कांहीं तुमचा हेतु असेल तर आम्हाला मेहरबानी

१. ह्याचा एक नमुना पुस्तकांतील चित्रांत दिलेला आहे.

करून जाऊं द्या." असें म्हणून ती रडूं लागली. ही मुलगी पंडिता रमाबाई-चाच आसरा शोधीत होती हें बाईंच्या मैत्रिणीच्या ध्यानांत येतांच त्यांनीं तिला धीर दिला. इतक्यांत मुलींचा व्यापार करणारे चारपांच व्यापारी तेथें गोळा होऊन त्यांनीं त्या बाईस गराडा घातला. त्या दोन पोरींना पळविण्याचा त्यांचा घाट होता. परंतु तो साध्य झाला नाहीं व त्यांना हात चोळीत तेथून पळ काढावा लागला. ह्यासंबंधानें मनोरमाबाईंच्या पुस्तकांत बाईंच्या पत्रांतला उतारा सांपडतो:

"जर वेळेवर मदत आली नसती तर ह्या बिचाऱ्या मुलींचें काय झालें असतें ? किती काळ त्यांनीं टिकाव धरला असता ?" रिलीफ कँप मध्यें त्यांचें कोणीं रक्षण केलें असतें ?

"हे रिलीफ कँप' म्हणजे खरोखर नरकस्थळें होतीं. तेथील डॉक्टर व सरकारी अधिकारी ह्यांच्या पाठा फिरल्या म्हणजे अबल व अवला ह्यांच्यावर जे जुलूम व अत्याचार होत ते ऐकून अंगावर शहारेच येतील."

बाईंनीं पुष्कळशीं अनाथ मुलें गोळा केलीं, व त्यांचे जीव वांचविले, इतकेंच नाहीं तर अनीतीच्या खाईंतून त्यांना ओढून काढलें. पण मुलांना जडलेले दुर्गुण त्यांच्या अंगीं इतके खिळले होते कीं ते कसे व कधीं जाणार हा एक प्रश्नच होता. बाई ह्याचें एक उदहारण देतात.

'दोन दिवसांच्या बैलगाडीच्या कठीण प्रवासानंतर आम्ही जबलपुरापासून २३ मैलांवर असलेल्या हेरना नदीवर येऊन पोंचलों. आम्ही सगळ्याजणी गाड्यांतून खालीं उतरलों, थंड पाण्यानें हातपाय, तोंडें धुतलीं, व फराळ केला. दिलेलें जेवण पसंत न पडून एक मुलगी शेजारच्या शेतांत शिरून तिनें कांहीं कणसें चोरलीं. दुसऱ्याहि मुली तिच्या मागें निघाल्या होत्या पण आमच्या ध्यानांत हें येतांच त्या मुलीला आम्ही उतरलों होतों तेथें आणलें. तीं कणसें तिच्यापासून घेऊन शेतकऱ्याला परत केलीं. ह्यानंतर त्या मुलीला व तिच्या अनुयायी मुलींना प्रामाणिकपणावर एक व्याख्यान देण्यांत येऊन त्या व्याख्यानाचा विचार करण्यास त्यांना संधी देण्यांत आली. पण ह्या व्याख्यानाचा परिणाम त्या लहानशा टोळीच्या पुढारी मुलीवर कांहीं झाला नाहीं असें आढळून आलें. कारण आमचा डोळा चुकवून तिनें तेथून पोबारा केला. एक गाडीवाला तिचा पाठलाग करीत निघाला व त्यानें

बऱ्याच वेळानें तिला पकडून आणलें. तिला मजकडे आणल्यावर मीं तिला सांगितलें, 'असें पळून जाण्याचें तुला कांहीं कारण नव्हतें. तुला पाहिजे तिकडे जायला तूं मोकळी आहेस. आमच्याबरोबर राहण्याचा आमचा आग्रह नाहीं.' आमच्या ह्या नवीन कुटुंबांत तिचा समावेश करून घेण्याची माझी तयारी नव्हती कारण तिनें स्वतः होऊनच त्या हक्कावर लाथ उगारून, आपण त्याला नालायक आहों हें सिद्ध केलें होतें. तिनें आतां पश्चात्तापाचें व दुःखाचें चांगलें सोंग केलें. पण तें ओळखण्याइतकी बुद्धि माझ्या ठायीं होती. दुसऱ्या मुलींना हें फारच वाईट उदाहरण होणार म्हणून मीं तिला निक्षून सांगितलें कीं मी तुला आमच्यांत घेणारच नाहीं. तूं जा आतां.

'सायंकाळ झाली. पांचच्या सुमाराला गाड्या जुंपल्या. आमच्या सात बैलगाडया होत्या. ह्या रांगेच्या शेवटल्या गाडींत मी बसलें होतें. त्या लहानग्या अपराध्यानें पुन्हा आपल्याला बरोबर घेण्याची विनंती केली व आपल्याला पूर्ण पश्चात्ताप झाला आहे व आतां येथून पुढें आपण असें वागणार नाहीं असें म्हटलें असलें तरी हें सर्व बोलणें वरवरचें आहे, ती मनापासून बोलत नाहीं असें मला वाटलें. मी तिला नाहीं म्हटलें. ती तेथेंच खिन्नपणें वसून राहिली. आम्ही निघालों. गाडया हळूहळू चालल्या होत्या. तुम्हीं मला नेलें नाहीं तर मी चालत चालत तुमच्या मागें येईन असें ती म्हणत होती. ती जर खरोखर तशी आली तर तिला खराच पश्चात्ताप झाला आहे असें समजायला हरकत नाहीं असें मीं मनाशीं ठरविलें व गाडीवाल्यांना गाडया हळूहळू हाकण्यास सांगितलं होतें. आम्ही निघालों तशी ती उभी राहिली पण जागची हालली नाहीं. बिचारीच्या शरीराचें ओझें वाहून नेण्यास तिचे बापडे अशक्त पाय असमर्थ होते. ती तेथेंच वसून राहिली. आम्ही निघाल्यावर तिच्याभोंवतीं कांहीं लोक जमले. पण ती त्यांच्याशीं कांहीं बोलल्याचें दिसलें नाहीं. त्यांनाहि तिची गरज दिसली नाहीं. ती तेथेंच खालीं मान घालून बसलेली कितीतरी वेळ मला दिसत होती. तिची आकृति पुसट होऊं लागली तेव्हां माझ्या मनांत विचारांचें काहूर उठलें.

"माझी वागणूक थंडगार व बेपर्वाईची तर वाटली नसेल तिला? बिचाऱ्या पोरीला असें तर वाटलें नसेल कीं ही बाई आपल्यावर प्रेम करीत नाहीं? असल्या प्रेमहीन माणसाच्या वस्तीला नको जायला असें वाटून तर

ती जागच्या जागीं थवकली नसेल?" अंधार पडूं लागला होता. ढग जमूं लागले होते व बहुतेक पाऊस पडेल असा रंग दिसत होता. त्या दुःख व असहायतेच्या दुर्दैवी जिवंत चित्राच्या पार्श्वभूमीला पाठीमागें निर्मनुष्य असे उदास डोंगर उभे होते. जग फार फार विस्तीर्ण भासूं लागलें व त्या एवढ्या मोठ्या जगांत हा एकटा जीव जणूं काय गृहहीन, मित्रहीन, साह्यहीन अशा परिस्थितींत झुगारून देण्यांत आला होता. माझ्या हृदयावर हें चित्र नेहमींचें कोरून ठेवण्यांत आलें आहे. मी गाडीवाल्याला गाडी थांबविण्यास सांगितली. मला एक तसूभरहि पुढें सरकवेना.

'माझें मन आंतल्या आंत करपूं लागलें. माझ्या स्वर्गीय पित्यानें माझ्यावर केलेल्या उदात्त प्रेमाचा विचार माझ्या मनांत आला. मी त्याच्या विरुद्ध कितीतरी वेळेस बंडखोरी केली आहे! किती तरी वेळेला मी त्याच्यापासून दूर दूर पळालें आहे! त्यानें मला परत बोलावलें. माझा शोध करीत पुनः पुनः तोच मजकडे आला आहे.....त्या अरण्यस्थळीं माझ्या देवबाप्पानें मला एका मोठ्या धड्याचें प्रात्यक्षिक दाखविलें.....कांहीं क्षण मी स्वस्थ बसून राहिलें. गाडी थांबविली होती. ओरडून तिला माझा आवाज ऐकूं गेला नसता. मी हातानें खूण करून तिला बोलावलें. ती पाहून तिला केवढा आनंद वाटला! तिनें उडी मारून माझ्याकडे धूम ठोकली! जणूं काय तिच्या शरिरांत नवचैतन्यानें प्रवेश केला होता. तिच्या तोंडावरील तो ओसंडणारा आनंद पाहून मलाहि फार समाधान वाटलें. गिरिजेची स्थापना आमच्या कुटुंबांत अशी झाली.'

श्री. द्वारकानाथ गोविंद वैद्य म्हणतात : रमाबाई 'अशा रीतीनें दुष्काळांतील मुली, बाया, मुलगे जमा करीत होत्या. त्यांत रमाबाईंचा हेतु केवळ आपला कळप वाढवावा असा होता असें मानावयास आमची मति धजत नाहीं. अशा प्रकारें उद्योग करून माणसें जमा करतां करतां रमाबाईंनीं एके काळीं जवळ जवळ तीन हजार मुलांना दोन वेळ्यां कोरडी भाकर खाऊं घालणें म्हणजे किती व्याप आहे! ह्या सर्व मुलांच्या नुसत्या निजण्याची व्यवस्था करणें म्हणजे किती त्रास आहे! ह्याचा विचार रमाबाईंचे टीकाकार करीत नाहींत. तीन हजार मुलांना रमाबाईंनीं खिस्ती केलें म्हणून आम्हांलाहि वाईट वाटतें, पण ह्या तीन हजार प्राणांची तर सोडाच, पण तीनशें

प्राणांची कांहीं तरी सोय लावण्याची आमची तयारी होती काय?'

'....हा एवढा व्याप रमाबाईंनीं कोणाच्या जिवावर वाढविला? पहिल्या दहा वर्षांपुरती सर्व जबाबदारी अमेरिकेंतल्या रमाबाई असोसिएशननें घेतली होतीं हें खरें; त्यांना सरकारी मदत नव्हती, त्या कोणत्याहि मिशनच्या तर्फे आपलें काम करीत नव्हत्या. त्यांना ज्याप्रमाणें प्रेरणा होई त्याप्रमाणें त्या वागत. त्यांचा सर्व भरिभार परमेश्वरावर असे.. आपल्या संस्थेची काळजी देवाला आहे. मी त्या बायांची कितीशी काळजी घेणार? मी ह्या बाळांचें कितीसें रक्षण करणार? मी ह्यांना रोगापासून किती दूर ठेवणार? प्रभू सर्वसमर्थ आहे. प्रभूला ह्या लेकरांची काळजी आहे. तो सर्व कांहीं करीत आहे. असें त्या वारंवार म्हणत. आपल्याला साह्य करा अशी याचना करावास त्या कोणापाशीं जात नसत. हिंदी व सधन ख्रिस्ती लोकांकडूनहि त्यांस म्हणण्यासारखें द्रव्यसाहाय्य होत नसे. तें सर्व परदेशांतून येत आहे. आपल्या कामाची माहिती त्या परदेशीं कळवीत. आणि त्यांच्या कामाची चांगली माहिती झालेली असल्यामुळें त्यांस साहाय्य भरपूर होत असे. आपल्या कामाची काळजी देवाला आहे, तोच सर्व मदत करीत आहे, असा त्यांचा विश्वास होता.'

कांहीं काम पुण्यास व कांहीं केडगांवला अशी परिस्थिति फार दिवस राहणें शक्य नव्हतें. विशेषतः केडगांवची जबाबदारी व केडगांवचें काम पुण्यांतील जबाबदारीपेक्षां व पुण्यांतील कामापेक्षां नाहीं नाहीं तरी दहा पटीनें अधिक होतें. तशांत पुण्यच्या प्लेगनें बाईंना शारदा सदनांतील मुली कोठें तरी हालविणें प्राप्तच होतें. रमाबाई असोसिएशनची मुदतहि संपत आली होती, तेव्हां त्यांनीं असोसिएशनच्या संमतीनें शारदा सदन केडगांवला आणून पुण्यांतील शारदासदनाची मालमत्ता विकून टाकली.

मिस् एब्राहामच्या हातीं मुक्तीचीं सूत्रें देऊन रमाबाई १८९८ च्या सुरुवातीला फिरून अमेरिकेला गेल्या. दहा वर्षें संपलीं होतीं. रमाबाई असोसिएशनची घटना त्यांना असंदिग्ध अशी करून घ्यायला हवी होती. धार्मिक स्वातंत्र्य म्हणजे केवळ ख्रिस्ती धर्मासंबंधीं त्यांचें तोंड बंद करणें नव्हे तर त्यांच्या हिंदु विद्यार्थिनींना आपला धर्म सांगण्यास व आचरण्यास जेवढी मुभा द्यायची तेवढीच त्यांनाहि असायला हवी. तसेंच मागच्याप्रमाणें सल्लागार मंडळाचा जंजाळ पाठीमागें नको हीहि त्यांची एक इच्छा होती.

त्यामुळें अमेरिकेंतील रमाबाई असोसिएशननें ती असोसिएशन बंद केली व सारी इस्टेट बाईंना बक्षिस देऊन टाकली. नवीन असोसिएशन स्थापन करण्यांत येऊन तिचें नांव 'अमेरिकन रमाबाई असोसिएशन' असें ठेवण्यांत आलें. बाईंना मिळालेली सर्व इस्टेट बाईंनीं त्या नव्या असोसिएशनच्या नांवें करून दिली.

१६ मार्च १८९८ रोजीं बोस्टन येथील चॅनिंग हॉलमध्यें बाईंचें भाषण झालें. 'तुम्हीं मला दिलेल्या ९५,००० डॉलर्स पैकीं ५०,००० डॉलर्स मीं तुम्हांला इमारतींच्या रूपानें व १०,००० बागेच्या रूपानें परत केले आहेत. खर्चासाठीं मीं तुम्हांजवळ दरसाल ५००० डॉलर्स मागितले असतां तुम्हीं मला ६००० देऊन उपकृत केलें. ह्या दहा वर्षांत १४ उच्च वर्णीय विधवांना शिक्षकिणींचें शिक्षण मिळालें, ९ ना उत्तम नोकऱ्या मिळाल्या, दोघींनीं स्वतःच्या संस्था काढल्या, आठजणी परिचारिका झाल्या, दोघी गृहव्यवस्था पाहातात आणि दहा जणींचीं लग्नें होऊन त्या सुखानें संसार करीत आहेत.' शारदा सदनांत आलेल्या एकंदर ३५० विद्यार्थिनींपैकीं ४९ जणींनीं बाप्तिस्मा घेऊन ख्रिस्ताचा स्वीकार केला आहे.

ह्या दहा वर्षांच्या काळानंतर हिंदू लोक सदनाचा कारभार व व्यवस्था आपल्या हातीं घेतील अशी रमाबाईंना आशा होती पण तिला मात्र वाटाण्याच्या अक्षता लागल्या.

नंतर 'अमेरिकन रमाबाई असोसिएशन'नें शारदासदनाची जबाबदारी आपल्या शिरावर घेतलेली होती. "रमाबाई असोसिएशनच्या" व ह्या नवीन असोसिएशनच्या ध्येयांत हा फरक होता कीं आतां शारदा सदनांत ख्रिस्ती धर्म शिक्षण देण्यास मनाई नव्हती. तें दिलें जाणार होतें व ज्याला तें नको असेल त्यानें त्या शिक्षणाच्या वेळेस गैरहजर राहिल्यास हरकत नव्हती. नवीन असोसिएशननें आपलें हें ध्येय स्पष्ट केलें होतें कीं शारदा सदन ही संस्था ह्यापुढें एक ख्रिस्ती संस्था म्हणून काम करील.[३] खुद्द बाई ह्या संबंधानें लिहितात: "Since then every pupil admitted in the

१. बटलर ५२–५३:

२. चॅपेल १५२.

३. मॅक्निकल १०६.

School has been receiving religious instruction, retaining, perfect liberty of conscience"

आतां रमाबाईंच्या विनंतीवरून ह्या दुसऱ्या असोसिएशनचाहि शेवट करण्यांत आला आहे. ह्या दोन्हींकडून बाईंना शारदा सदनाच्या बाबतींत पैशाच्या दृष्टीनें फार मदत झाली.[1]

अमेरिकेंतील आपला दुसरा दौरा संपवून १८९८ च्या ऑक्टोबर महिन्यांत बाई परत आल्या. येतांना त्या कांहीं काळ इंग्लंडला थांबल्या. ह्यानंतर मात्र त्या कधीं परदेशीं गेल्या नाहींत. सात महिने बाई परदेशीं राहिल्या पण तेवढा काळ पुण्यांत सुंदराबाई पवारांच्या व केडगांवांत मिस् एब्राहाम ह्यांच्या दोन्ही ठिकाणच्या मुलींचें उरकतां उरकतां नाकीं नऊ आलें. बाई परत येऊन त्यांनीं जेव्हां सर्व सूत्रें हातीं घेतलीं तेव्हां सर्वांना हायसें वाटलें.

१. फुलर ५२.

## २१ केडगांव

बाईंची प्रार्थना देवानें ऐकली. त्यांना २२५ धर्मकन्या मिळाल्या व त्याहि त्यांच्या मागणीप्रमाणें एका वर्षाच्या आंत. परंतु हें म्हातारपणचें तान्हें 'अक्राळविक्राळवाणें' होतें. हें तान्हें वाढवायाला त्यांना जें घरकूल मिळालें होतें तेंहि तसेंच अजब होतें. त्याचें वर्णन मिस् फुलर आपल्या रमाबाईंच्या चरित्रांत करतातः रुक्ष, खडकाळ, रखरखीत, झाडाझुडुपाचा पत्ता नसलेली, जेथें पाण्याचा थेंब मिळण्याची मारामार—अशी ही जमीन होती.

ही जी जमीन मिळाली व तिचीहि गोष्ट अजबच आहे. मागें आपण पाहिलेंच आहे कीं बाईंनीं अडीअडचणीला उपयोगी पडावी म्हणून एक शंभर एकर जमीन घेऊन टाकली होतीं.—व ती जमीन कशी होती हें वर आलेंच आहे.—ती घेतल्यावर आपल्या मालकीची अशी अशी एक जमीन आहे ह्याचासुद्धां बाईंना विसर पडल्यासारखें झालें होतें. परंतु पुण्यांतील प्लेगमधेंच व दुष्काळानें आणलेल्या मानवी लोंढ्यानें बाईंना त्या जमिनीची आठवण करून दिली.

रमाबाई असोसिएशनच्या दहा वर्षांची मुदत संपण्याची वेळ भरत आली होती. केवळ दोन वर्षें राहिलीं होतीं. ह्यानंतर काय असा प्रश्न होता. हा अमेरिकन पाठिंबा नाहींसा झाल्यावर महाराष्ट्र शारदा सदनाची जबाबदारी आपल्या शिरावर घेईल ही आशा वेडगळपणाची होती. त्याच वेळेस बाईंना कोणीं सांगितलें कीं पुण्याहून ३४ मैलांवर रेल्वे स्टेशनला लागून बरीच पडीत जमीन असून ती स्वस्तांत मिळण्याचा संभव आहे. बाईंच्या मनांत एक

---

१. 'It was to this bare, stony, treeless, shelterless, waterless place that Ramabai eventually took her waifs.'[1]

स्वप्न चमकून गेलें, कीं आपण जमीन घेऊन तेथें चांगली शेतीवाडी करून आपल्या मुलींचें चालवूं. त्यांच्या घरीं शेतीवरच त्यांच्या वडिलांचा योगक्षेम चालल्याचें त्या विसरल्या नव्हत्या. आपला व आपल्या विशाल कुटुंबाचाहि योगक्षेम कां नाहीं शेतीवर चालवितां येणार ? शिवाय अमेरिकेंत त्यांनीं लोकांना आपल्या हातांनीं काम करतांना पाहिलें होतें. तसेंच स्वावलंबनाचें शिक्षण आपल्याला आपल्या मुलींना ह्या शेतीच्या निमित्तानें स्वावलंबी जीवनाचे धडेहि देतां येण्यासारखे होते.[१]

पण ही जमीन खरेदी करण्यास हातांत पैसा हवा ना ? त्यांना एक कल्पना सुचली—अशी अशी जमीन स्वस्तांत मिळत आहे, ती घेऊन ठेवल्यास पुढचा खर्चाचा प्रश्न मिटेल, तेव्हां तुमचा पैसा वापरून पुढची तरतूद म्हणून जमीन घेऊन टाकूं का असें त्यांनीं रमाबाई असोशिएशनला विचारलें. अर्थात् पुढेंमागें त्या ही रकम परत देऊन टाकणार होत्या. रमाबाई असोसिएशनच्या घटनेप्रमाणें असोसिएशनला आपल्या पैशाचा अशा रीतीनें विनियोग करण्याचा अधिकार नव्हता. त्यांनीं आपली दिलगिरी व्यक्त करून मोठ्या नाखुपीनें रमाबाईंच्या सूचनेला नकार दिला. ह्या धावपळीवर नाहींतरी रमाबाईंचा भरंवसा नव्हताच. 'रानांतहि भोजनाची सिद्धता करण्यास ईश्वर समर्थ आहे काय ?'[२] असा प्रश्न यहुदी भक्तांना पडल्याची गोष्ट बायबलच्या जुन्या करारांत आहे. बाई असल्या संमोहांत कधींच पडल्या नाहींत. त्यांचा 'आश्रयाचा खडक'[३] परमेश्वर होता. त्याच्याकडे त्या आपलें गाऱ्हाणें घेऊन गेल्या. चोचींत चारा भरण्यास परमेश्वर माउली सिद्ध होती[४] प्रार्थनेंत असतांच त्यांना तिचें उत्तर आलें. अमेरिकेहून एका मैत्रिणीची तार आली : 'केडगांवची जमीन घ्या. पैशाची व्यवस्था झाली आहे.' पैशाची व्यवस्था अशी कशी झाली हें कळेना. पण बाईंनीं जमीन खरेदी केली. अमेरिकेंत रमाबाई असोसिएशननें नकार दिल्यावर ती बातमी कर्णोपकर्णीं गेली, व बाईंच्या तेथील मैत्रिणींनीं ताबडतोब आपापसांत देणग्या गोळा करून

---

१. The Triumph of An Indian Widow. पृष्ठ ४६

२. बायबल : निर्गम १६ : ३-४

३. स्तोत्र १८ : २

४. स्तोत्र ८१ : १० 'Open thy mouth and I will fill it'

त्यांना हवी असलेली रक्कम अगदीं बाईंची खासगी म्हणून त्यांच्याकडे रवाना केली. ह्या रकमेचा रमाबाई असोसिएशनशीं किंवा शारदा सदनाशीं कांहीं संबंध नव्हता. बाईंनीं आपल्या नांवावर जमीन खरेदी केली, मात्र ती त्यांना कधीं आपली खासगी मालमत्ता वाटलीच नाहीं. हीच ती जमीन कीं जी खरेदी केल्यावर तिच्याबाबत त्या जवळजवळ विसरून गेल्या होत्या. आपल्या नवीन कन्यका पुण्यास घेऊन येईपर्यंत त्यांना त्या जमिनीची जणुं कांहीं जाणीवच राहिली नव्हती. त्यांनीं सुमारें ६०० अनाथ स्त्रिया व मुलगे व मुली बरोबर आणलीं होतीं. त्यांच्यापैकीं ज्यांना खरोखर त्यांच्या मदतीची गरज होती अशींच ३०० आपल्याजवळ ठेऊन घेऊन बाकीच्यांची रवानगी त्यांनीं इतर ठिकाणीं केली. मात्र त्यांचा स्वीकार करायला मिशनरींवांचून दुसरें कोणी पुढें आलें नाहीं.

बाई आपल्या ह्या मुलींना घेऊन पुण्यास आल्या. त्यांनीं शारदा सदना-जवळच त्यांना राहण्यासाठीं झोंपड्या बांधल्या पण तेवढ्यांत प्लेग सुरू झाल्यानें म्युनिसिपालिटी[१] ह्या दुष्काळी मुलींना पुण्यांत ठेवूं द्यावयाला परवानगी देईना. त्यांनीं रमाबाईंना नोटीसच दिली कीं अठ्ठेचाळीस तासांच्या आंत मुली पुण्याच्या बाहेर काढा.

आतां बाईंना आपल्या केडगांवांतील जिंदगीची आठवण झाली. आपला कबिला उचलून त्यांनीं केडगांवला कूच केलें. पुण्याचें शारदा सदन सुंदराबाई पवारांनीं सांभाळलें. शारदा सदनांतील कित्येक विद्यार्थिनीहि केडगांवला बाईंच्या बरोबर आल्या. ज्या स्त्रियांनीं आपल्या जातीच्या पलीकडे कोणाचा स्पर्श देखील विटाळ मानला होता त्या स्त्रिया बाईंचें पाहून ह्या अठरापगड जातींची कसलीहि सेवा करायला पुढें झाल्या. ह्या नवीन भगिनींत अस्पृश्यांपासून ब्राह्मणापर्यंत सर्व जातींतील बायांचा व मुलींचा भरणा होता. त्यांच्या डोक्यांतील उवा लिखा काढण्यापासून तर त्यांच्या हातांपायांवर वाढलेल्या खरजेच्या खरपुड्या खरडण्यापर्यंत सर्व कामें बाई जातीनें करीत व त्यांच्या शारदा सदनांतील धर्मकन्या आपल्या आईचा कित्ता

१. हा भाग त्यावेळेस शहर म्युनिसिपालिटीच्या हद्दींत नसल्यानें हा हुकूम बहुतेक कॅन्टोनमेंट बोर्डाचा किंवा सिटी मॅजिस्टेटचा असावा.

गिरवीत. ह्या दुष्काळी मुलींना शारीरिक स्वच्छता कशी ठेवायची ह्याची जणूं माहितीच नव्हती. खोटें बोलणें, चोऱ्या करणें, मारामाऱ्या करणें इत्यादि दुर्गुण तर त्यांच्या पांचवीला पुजले होते. ते निपटून काढणें हें कामसुद्धां कांहीं हलकेंसलकें नव्हतें.

बाई ह्या मुलींना माणसांत आणण्याचे प्रयोग करीत असतां १८९७ चा मे महिना उजाडला. त्यांच्या कानीं पुन्हां मध्यप्रदेशांतील वाढत्या दुष्काळाच्या भीषण आरोळ्या आल्या. ह्या तीनशें मुलींच्या सेवेनें त्यांना आपल्या ह्या नव... बंधुभगिनींबद्दल अधिकच आत्मीयता वाटूं लागली. त्या अनाथांकडे त्यांचा जीव ओढूं लागला. जवळ पैसा अगदीं नव्हता. तरी पण केडगांवचें काम शारदा सदनाच्या जुन्या विद्यार्थिनींवर व सहकार्यांवर सोंपवून त्या मध्य प्रदेशाकडे जायला निघाल्या. हातीं खरोखरच भाड्यापुरते पैसे होते. भुसावळ स्टेशनवर त्यांना प्रेरणा झाली कीं तेथें उतर. त्याप्रमाणें त्या उतरल्या. त्यांना तेथें पुढच्या कामासाठीं बरेच पैसे मिळाले ही गोष्ट पुढें २२ व्या प्रकरणांत सांगितली आहे. बाईंनीं ह्या वेळेस आणखीं पुष्कळ दुष्काळग्रस्त मुली आणल्या व त्या सर्वांची व्यवस्था त्यांनीं त्याच ओसाड व उजाड रखरखीत माळरानांत केली. ह्यानंतर १९०० सालीं गुजराथमध्यें मोठा दुष्काळ पडला. तिकडेहि बाईंनीं धाव घेतली. पहिल्या वेळीं शारदा सदनाच्या मुलींनीं मध्यप्रदेशांतील दुष्काळी मुलींच्या खस्ता खाल्ल्या, तशा आतां ह्या गुजराथी मुलींच्या खस्ता त्या मध्यप्रदेशीय मुलींनीं खाल्ल्या.

बाईच्या केडगांवला आतां मोठी वसाहत थाटली गेली. समोरच एक ताडवन होतें तें बाईंनीं विकत घेऊन टाकलें. त्या झाडींत ताडीविक्रीचें एक छप्पर होतें तेंहि काढून टाकविलें. तेथील ताडीचीं झाडें तोडून ताडवनाचें त्यांनीं मैदान बनविलें. त्या मैदानांत त्यांनीं केडगांवचा व आसपासच्या खेड्यांचा आठवड्याचा बाजार भरविण्याची व्यवस्था केली व आठवड्याचा बाजार तेथें भरूं लागला. संध्याकाळपर्यंत मोठा बाजार आठवड्यांतल्या एका दिवशीं भरे. रात्र पडूं लागली, गिऱ्हाईक सगळें निघून गेलें, कीं बाई जाऊन उरलेला सगळा माल खरेदी करून टाकीत. त्यामुळें खेड्यांतील शेतकरी जसे बाजारावर खूष असत तसे व्यापारीहि खूष असत.

जेथें असंख्य झोपड्या पसरल्या होत्या तेथें आतां पक्क्या दगडी इमारती

उठल्या. जगामध्यें पैसा पुष्कळ आहे व त्यापैकीं कांहीं पैशानें ठरविलें कीं बाईंच्या पायीं लोळण घ्यायची. १८९७ च्या अस्तापूर्वीं ८५,००० डॉलर्स ह्या इमारती बांधण्यासाठीं धडपडूं लागले. त्यांच्या धडपडींना यश येऊन केडगांवास टोलेजंग इमारती उभ्या राहिल्या. बाईंच्या कामाची माहिती हस्तें परहस्तें परदेशीं जाई पण मला अमुक अमुक मदत हवी ती द्या, असें बाई म्हणत नसत.

बाईंच्याकडे येण्यासाठीं नुसते डॉलर्सच धावपळ करीत नसत, माणसेंहि तेंच करीत. बाईंचें पाहून कित्येक परदेशीय स्त्रिया त्यांच्या हातांखालीं काम करायला आल्या. कित्येक आल्या त्या परत गेल्याच नाहींत. येथेंच त्यांनीं आपलें आयुष्य वेंचलें. त्यांना वेतन मिळे तें खरोखरच अन्न व वस्त्र. वर-खर्चाला जें अगदीं थोडें कांहीं लागे, त्याचाहि बोजा त्यांनीं बाईंवर पडूं दिला नाहीं. त्यांच्या देशांतील त्यांची मित्रमंडळी त्यांना मधूनमधून कांहीं देणग्या पाठवीत त्यावर त्यांच्या अल्प गरजा भागत. मुली ह्यांना मावशा[1] म्हणत; कारण त्या रमाबाईंच्या बहिणी. मोठ्या मुलींना अक्का म्हणत कारण त्या मनोरमाबाईंच्या वडील बहिणी. मनोरमाबाईंना मुली ताई म्हणत. खुद्द रमाबाईंना आई म्हणण्याचा प्रघात होता आणि तेंच नामाभिधान योग्य होतें. कारण त्यांचें प्रत्येक मुलीवर आईप्रमाणें प्रेम असे. पण प्रेम होतें म्हणजे त्यांनीं मुलींना लाडावून ठेवल्या नव्हत्या. त्यांची शिस्त अत्यंत कडक होती. ह्या संबंधानें श्री. द्वारकानाथपंत वैद्य म्हणतात :

'त्यांची शिस्त फार कडक होती. त्यांच्या ताब्यांत कोणत्या प्रकारचीं मुली, बाया व मुलें होतीं याचा चांगलासा विचार न करतां, त्यांच्या कडक शिस्ती-बद्दल कांहीं ख्रिस्ती लोकहि त्यांस दोष देतात, हें आम्हांस माहीत आहे. परंतु दोनपासून तीन हजार रानवट, अक्षरशत्रु माणसांना माणसाळविण्याचें काम कोणीं केलें आहे? त्या कामांतील अडचणींचा अनुभव कोणीं घेतला आहे? त्या वर्गांतील मुलींचें वर्तन इतर मुलींच्या शीलास बट्टा लावण्यासारखें होऊं लागलें, म्हणून थोडाबहुत कडकपणाचा अवलंब करावा लागला, तर त्याबद्दल रमाबाईंना दोष देतां येत नाहीं. त्यांची शिस्त जितकी कडक होती,

१. प्रकरण २० व परिशिष्ट ५ पाहा.

तितकी त्यांची प्रेम करण्याची शक्ति अमूप होती. त्यांच्या अंतःकरणांत अप्रेमाला, द्वेषाला, तिरस्काराला जागा नव्हती, ह्यांत कांहीं संशय नाहीं.'[१]

ह्या शिस्तरक्षणांत बाईंचा इतका काटेकोरपणा असे कीं एखाद्या वरिष्ठ न्यायाधिकाऱ्यालाहि तो आपल्या गृहव्यवस्थेंत पाळतां आला नसता. कोणी चूक केली कीं त्याचें परिमार्जन त्याला करावेंच लागे. परमेश्वर न्यायी आहे व प्रीतिकरहि आहे हें म्हणण कित्येकांना पटत नाहीं. पण जेव्हां तो ह्या गोष्टी आपल्या भक्तांच्या चरित्रांत प्रत्यक्ष दाखवितो तेव्हां ह्या गोष्टींचा उलगडा होतो. बाईंनीं शिस्त राखण्यासाठीं दादासाहेब गद्र्यांसारख्या वृद्धाला सुद्धां अनेक वेळेला शिक्षा केल्या आहेत! इतकेंच काय पण कोणीं पाहुणा आला व त्याच्या पोरांनीं व्रात्यपणा केला तर त्या पोरांनाहि प्रसाद मिळाल्याखेरीज राहात नसे.[२] पण ह्या पद्धतीमुळें बाई कधीं अन्याय करीत नाहींत व सर्वांना सारख्या वागवितात अशी मुलींत त्यांची प्रसिद्धी झाली होती. व त्यामुळें त्यांचा दरारा अधिकच वाढला होता. पण इतकें होतें तरी त्यांचा प्रेमळपणा असीम होता.

केडगांवला आणलेल्या दुष्काळी मुलींचे पटापट बाप्तिस्मे करून टाकले जात असा एक प्रवाद आहे: सांपडला पक्षी जाळ्यांत, कीं पकड त्याला, बुचकळ पाण्यांत आणि कर त्याला ख्रिस्ती. अशी ख्रिस्तीकरणाची पद्धति नसते. बाईंनीं दुष्काळांतून आणलेल्या मुलींना बाप्तिस्मे देऊन मग जवळ केलें असें नसून पाहिजे तर जवळ केल्यानें त्यांनीं बाप्तिस्मे घेतले असें म्हणतां येईल. ह्या बाबतींत सध्यांच्या सुपरिंटेंडंट ह्यांना जुने कागदपत्र पाहून आम्हांला कळविण्याची विनंति केली असतां त्या म्हणतात :

'In none of her writings can I find anything to indicate that they were baptized when they were brought in. She speaks of them being taught about the Saviour and of baptizing large numbers who desired to make this confession of their faith. There were of course, large numbers at

१. नवयुग मासिक : एप्रिल–मे १९२२ जोड अंक

२. खुद्द लेखकाला आगगाडीचे रूळ ओलांडल्याबद्दल बाईंनीं शिक्षा केली होती. लेखक आपल्या वडील मातोश्रींबरोबर केडगांवला बाईंकडे कांहीं दिवसांसाठीं पाहुणा म्हणून वयाच्या आठव्या वर्षी होता.

the time and one cannot be positive that every one of these hundreds of girls fully understood the full meaning of baptism at the time, but it is quite certain that Ramabai did not baptise any of the girls unless she requested it. In the condition in which the famine girls came, it is quite impossible to think of Ramabai baptising them as soon as they were brought in.'

शारदा सदन केडगांवास आल्यानंतर सहासात वर्षांनीं बाईंच्या एक चरित्रलेखिका, मिस क्लेमेंटिना बटलर, ह्या केडगांवला भेट देऊन गेल्या. त्यांना त्याहि वेळेस सनातनी रिवाजाप्रमाणें आपले नियमधर्म पाळणाऱ्या कांहीं उच्चवर्णीय हिंदु विधवा तेथें आढळल्याचें त्यांनीं आपल्या पुस्तकांत नमूद करून ठेवलें आहे. शारदा सदनप्रमाणें मुक्ति सदनावर कांहीं धर्मशिक्षणा-संबंधीं स्वयंशासन नसतांहि मुक्ति मिशनांतील स्त्रियांनाहि त्यांनीं मागितल्या-खेरीज वर्ष वर्ष बाप्तिस्मे देण्यांत आले नव्हते. ह्या अनाथ स्त्रिया दुष्काळांत काळाच्या दाढेंतून ओढून आणलेल्या होत्या.

२८ जानेवारी १९०२ च्या केसरींत "मुक्ति म्हणजे २५०० बायकांचा तुरुंग" ह्या शीर्षकाखालीं एक विपर्यस्त स्फुट आलें होतें. साऱ्या टीकेचें सार त्यांच्याच शब्दांत असे देतां येईल: "भूलथाप किंवा भुरळ पाडून हव्या तेवढ्या मुली दुष्काळग्रस्त प्रदेशांतून आणणें, त्या सदनांत आल्यानंतर त्यांस जुलमानें धर्मांतर करावयास लावणें, त्या धर्मांतर करीत नसल्यास खावयास नीट न घालणें, व बाहेरहि जाऊं न देणें, सदनांतल्या सदनांत शिक्षण तर राहूंच द्या, पण त्यांच्याकडून होईल तितकें काम करून घेणें, त्या बाहेर पडल्या असतां पुढें व पाठीमागें कैद्याप्रमाणें रामोशाचा पहारा, वगैरे सर्व कैदखान्यांतले प्रकार या सदनांत चालू आहेत." शेवटीं गव्हर्नरला विनंति केली होती कीं प्रत्यक्ष जाऊन तपास करावा. त्या सूचनेनुसार गव्हर्नरनें पुण्याच्या कलेक्टरला केडगांवला जाऊन प्रत्यक्ष मुलींशीं बोलण्यास सांगितलें. 'कोणाला निघून जायचें का, असें विचारून पहा म्हणजे शेकडा ७५ स्त्रिया बाहेर पडतील' असेंहि केसरीनें जातांजातां गव्हर्नर साहेबांना सुचवून ठेवलें होतें.

१. Pandita Ramabai Saraswati by Clementina Butler.

वरील सूचनेप्रमाणें पुण्याचे कलेक्टर केडगांवला एक "अकस्मात" भेट देऊन गेले. त्यासंबंधानेंहि आम्हीं चौकशी केली होती. सध्यांच्या सुपरिंटेंडंटनीं त्याहि प्रश्नाला उत्तर दिलें आहे,

'It is true that the Collector of Poona paid a surprise visit and that he asked the girls who wanted to go back to their home. Many remember this; (त्या वेळीं हजर असलेल्या पुष्कळ मुलींना ती गोष्ट आजहि आठवते[1].) but they remember too that there were none who raised their hands. Had they raised their hands the Collector would surely have sought to fulfill their request and this never happened."

मागच्या प्रकरणांत आपण गिरिजेची गोष्ट वाचली आहे. ती आठवल्यावर केसरीच्या सर्व आरोपांना आपोआप उत्तर मिळतें. रामोशी जर बरोबर ठेवायचे नाहींत तर गुंडांशीं प्रसंग पडल्यास काय मुलींनीं स्वतः त्यांच्याशीं मल्लयुद्ध करायचें? त्यांना स्वसंरक्षणासाठीं कोणता मार्ग केसरीकारांनीं सुचविला असता? आज त्या गोष्टीला पन्नाससाठ वर्षें झालीं आहेत तरी चांगले शिकलेले सवरलेले लोक सुद्धां आणि तेंहि पुण्या मुंबई सारख्या ठिकाणीं शाळेला जाणाऱ्या मुलींची चेष्टा करायला कमी करीत नाहींत. मग तेव्हां तर काय विचारायलाच नको होतें! चांगल्या चांगल्या मुली रस्त्यानें मोकळ्या हिंडूं लागल्या असत्या आणि सहज हात धरून कोणी त्यांना पळवून नेल्या असत्या, तर त्याचें काय? पोलीस ॲक्शनच्या आधीं औरंगाबादेस रस्यावर चांगल्या स्त्रिया फिरकत तरी होत्या का?

शिक्षणासंबंधानें 'केसरी' कारांच्या शंकेला 'सुबोधपत्रिका'कारांनीं परस्पर उत्तर देऊन ठेवलें आहे. "प्रथमतः हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं पंडिता रमाबाईंचा व्यक्तिमात्राच्या बौद्धिक शिक्षणावर फारसा विश्वास नव्हता, व 'मुक्तीं'त त्यांनीं त्या शिक्षणाचा फारसा पसारा घातलेला नाहीं, असें होतें तरी पूर्वींचें शारदासदन हें नांव अद्याप कायम असून शारदा सदन हायस्कूल नामक संस्थेंत प्रवेशपरीक्षेपर्यंत आज शिक्षण दिलें जातें. सुबोधपत्रिकाकार पुढें विचारतात: "१८९७ नंतर पुष्कळ दुष्काळ महाराष्ट्रांत पडले; त्यांतल्या एकांत तरी ह्या टीकाकारांपैकीं कोणीं पुढें होऊन रमाबाईंसारखा स्वतःच्या

१. चित्रमालिकेंतील शेवटलें चित्र पहा.

जिवाचा आटापिटा केला आहे का? कोणी पुढाकार घेऊन ह्या खालच्या जातींच्या दुःखितांना साह्याचा हात पुढें करून रमाबाई प्रमाणें उराशीं धरलें आहे का?"

केसरीची ही टीका १९०२ च्या सुरुवातीची म्हणजे गुजराथच्या दुष्काळाच्या शेवटीं शेवटीं लिहिलेली आहे, गुजराथमध्यें शंभर वर्षांत पडला नव्हता असा भयंकर दुष्काळ त्या सालीं पडला होता. ह्या वेळेलाहि बाईंना स्वस्थ बसवेना. ह्या अनाथांच्या आरोळ्या जणूं काय त्यांच्या कानठळ्या बसवूं लागल्या. आतां त्यांना साह्य करायला, मध्यप्रदेशांत त्यांनींच वाचविलेल्या बाया पुढें आल्या. त्यांच्यापैकीं आठ जणींना त्यांनीं गुजराथमध्यें पाठवून दिलें. त्यांच्या बरोबरीला शारदासदनांतल्या व इतर स्त्रिया होत्याच. ह्यांनीं दुष्काळाच्या खाईंतून १३५० बाया व मुलें वांचवून केडगांवला आणलीं.

बाई केडगांवला गेल्या त्या तिकडेच गडप झाल्या, त्यांचें नांव त्यानंतर महाराष्ट्राला ऐकूं आलें नाहीं ह्याचें पुष्कळांना आश्चर्य वाटतें. पण बाईंनीं इतके लोक माणसांत आणले. एका लहानशा कुटुंबांतलीं चार पोरें उनाडक्या करूं लागलीं म्हणजे त्या कुटुंबांतील वडील माणसांची कोण त्रेधा उडून जाते. तेव्हां एवढ्या मोठ्या कुटुंबाचें चालवितांना, एवढी मोठी जबाबदारी शिरावर वाहतांना, त्यांचें शिक्षण, त्यांचा भविष्यकाळ, त्यांच्या पोटपाण्याची व्यवस्था हीं सारीं उरकतां उरकतां बाईंना केडगांवच्या बाहेर पहायला एका क्षणाचा तरी मोकळा वेळ सांपडणें शक्य होतें काय ह्याचा वाचकांनींच विचार करावा!

केडगांव हें पुणें सोलापूर रेल्वे मार्गावर पुण्यापासून दौंडकडे जातांना पांचवें व दौंडकडून पुण्यास येतांना तिसरें स्टेशन आहे. स्टेशनच्या बाहेर पडतांच तेथें बहुतेक दोन बैलांची एक मोठी धमणी उभी असलेली आढळेल. मुक्ति मिशनहून पाहुण्यांना नेण्याकरतां ती आलेली आहे. स्टेशनपासून एक दोन फर्लांगवर मुक्तीची हद्द लागते. थोडेसें गेल्यावर गाडी उजवीकडे वळते व तेथूनच मुक्तीच्या इमारती लागतात. दवाखाना, बाहेरच्या लोकांसाठीं बांधलेलें उपासनालय इत्यादि इमारती सोडल्यावर उजवीकडे एक लहानशी बाग दिसते, तिथेंच धमणी थांबते. उजव्या हाताला एक फाटक आहे. त्यांतून आंत शिरल्यावर आपण पंडिताबाईंच्या खोलीजवळ येतों. त्यांची खोली

त्यांच्या अनुयायांनीं अद्याप तिच्या पहिल्या मांडणीसह होती तशी ठेवली आहे. खोलींत शिरूं लागतांच अद्याप बाई तेथें आहेत असें वाटूं लागतें. त्यांच्या खोलींतील बैठे मेज व बैठ्या खुर्च्या बाईंच्या ठेंगण्या बांध्याची कल्पना देतात. खोलींत बाईंचें स्वतःचें, त्यांचे पति श्री. मेधावी यांचें, मनोरमाबाईंचें, व मदर जिऱ्यालडीन इत्यादि त्यांच्या आवडत्या व्यक्तींचीं चित्रें पाहायला मिळतात. ह्याशिवाय ज्या मुलींना त्यांनीं मोठ्या संकटांत हात देऊन वर काढलें अशा कित्येक मुलींचीं चित्रें तेथें पहाण्यास मिळतात. त्यांनीं वापरलेलें बायबल तेथें पाहण्यास मिळतें. बाई ज्यांच्यासाठीं वैयक्तिक प्रार्थना करीत अशा शेंकडों लोकांची यादी त्या बायबलच्या पुस्तकांत लिहून ठेवलेली तेथें आढळते. ती यादी पाहून मन आश्चर्यादरानें भरून जातें. किती तरी माणसांबद्दल त्यांना हा असा जिव्हाळा वाटत असे. त्या वापरीत असलेलें अंथरूण पांघरूण तेथेंच ठेवलेलें आहे. त्यावरून त्यांच्या अत्यंत साध्या राहणीची कल्पना होते. त्यांच्या वापरांतील साधीं पितळेचीं भांडीं स्वच्छ घासून पुसून ठेवलेलीं असतात.

खोलीच्या बाहेर पडलें कीं बाईंच्या विश्वासाचें स्मारक, म्हणजे तेथील उपासनामंदिर डोळ्यांपुढें येतें. ऑस्ट्रेलिया देशांतील एका पाहुणीनें ह्या मंदिराबद्दल लिहून ठेवलें आहे : 'मंदिर बाहेरून पाहिलें तर त्याच्या भक्कम दगडी बांधकामांत कोठेंहि पडझड झालेली दिसत नाहीं. मंदिराची बांधणी साधी, मजबूत व बिनभपक्याची आहे. या इमारतीवर उंच उंच मनोरे नाहींत, कीं डोळ्यांना आल्हाद देणाऱ्या रंगीत खिडक्या नाहींत.' बाई कोणत्या एखाद्या विशिष्ट धर्मपंथी नव्हत्या.'White Already to Harvest' च्या प्रतिनिधीनें घेतलेल्या मुलाखतींत त्या म्हणतात :

I did not adhere to any particular sect, nor do I so now. It was enough for me to be called a Christian, on the ground of my belief in Christ as the Saviour of mankind.'

त्यामुळें त्यांच्या उपासनामंदिराला ठराविक चर्चभेद दर्शविणाऱ्या रंगीत खिडक्या किंवा मनोरे नाहींत. खिडक्यांना फक्त साधी जाळी लावलेली आहे. या जाळींतून प्रकाश व हवा आंत येतात....देवाच्या सामर्थ्याची व त्यावरील भरभक्कम विश्वासाची चिरकाल आठवण देणारी अशी ही इमारत आहे. ह्या इमारतीच्या कोनशीलेवर असा लेख कोरलेला आहे: "परमेश्वराचा धन्यवाद करा. बलानें नव्हे, पराक्रमानें नव्हे, तर माझ्या आत्म्यानें कार्यसिद्धि

होईल असें सेनाधीश परमेश्वर म्हणतो. तो खडक तर ख्रिस्त होता. ह्या खडकावर मी आपली मंडळी रचीन, व तिच्यापुढें अधोलोकाच्या दारांचें कांहीं चालायचें नाहीं. ख्रिस्त येशू हाच कोनशिला आहे. त्याच्यामध्यें प्रत्येक इमारत जोडून रचिली असतां वाढत वाढत प्रभूच्या ठायीं पवित्र मंदिर होतें. आमचे पुत्र आपल्या तारुण्याच्या भरांत उंच वाढलेल्या रोप्यासारखे आहेत; आमच्या कन्या राजमंदिराच्या कोपऱ्यांत कोरलेल्या खांबासारख्या आहेत. सप्टेंबर २०, १८९९."

ह्या इमारतींत उपासनेसाठीं एका वेळेस २००० माणसें बसूं शकतात. ही भव्य दगडी इमारत पाहिल्यानंतर पंडिता रमाबाईंनीं बांधलेल्या इतर इमारतींकडे लक्ष जातें. ह्या इमारतींत मुक्तींतल्या बहुतेक मुली व व्यवस्थापक वर्ग राहातो. ह्या साऱ्या इमारती काळ्या पाषाणाच्या आहेत. ह्याशिवाय बाईंच्या निर्याणा नंतर करण्यांत आलेलें बांधकाम तांबड्या विटांचें आहे. तें ह्या इमारती शेजारींच आहे. ह्या ठिकाणीं मुक्तीच्या रहिवाशांची सेवाशुश्रूषा करण्यासाठीं याच इमारतींत दवाखाना आहे. त्यांत एका वेळीं ५० रोगी राहूं शकतील अशी व्यवस्था आहे. दवाखान्यांत शस्त्रक्रियेची व्यवस्था आहे. तेथें एक प्रयोगशाळाहि आहे. एक सुविद्य डॉक्टरीण आपल्या हातांखालील परिचारिकांच्या मदतीनें येथें एकसारखी खपत असते.

बाई प्रार्थना करतात, व रोग्यांना औषधोपचार करूं देत नाहींत असा एक आचरट आरोप बाईंवर एका टीकाकारानें केला होता, त्याला हें चांगलें उत्तर आहे. आजच काय पण बाईंच्या काळांतहि तेथें दवाखाना होता. त्यासंबंधीं तेथें जाऊन आलेले त्या काळचे एक ख्रिस्ती गृहस्थ 'ज्ञानोदयां'त लिहितात :

'आजाऱ्यांची शुश्रूषा करण्यास व औषधपाणी देण्यास एक अनुभवशीर व हुशार डॉक्टर, डॉ. भास्करराव गोवंडे तेथें आहेत; त्यांना मदत करण्यास सरकारी दवाखान्यांतून पास झालेल्या नर्स म्हणजे डॉ. गोवंडे यांचेंच कुटुंब आहे.' येथें असतांनाच डॉ. गोवंडे यांनीं आपलें प्रसिद्ध "ज्वरबिंदु" हें औषध तयार केलें. बाई स्वतः औषध घेत नसत. अगदीं शेवटीं दोन वर्षें जीर्णज्वरानें त्या पीडित होत्या, तेव्हांहि त्यांनीं औषध घेतलें नाहीं. परंतु ह्याचा अर्थ असा नाहीं कीं रोगनिवारणार्थ आपल्याप्रमाणेंच इतरांनीं नुसत्या प्रार्थना कराव्या असला हट्ट त्या धरीत व आपल्या हट्टानें रोगी मारीत.

संस्थेच्या मुख्य इमारतींच्या सभोंवतीं उंच उंच भिंती आहेत. मुक्तीला तुरुंगाची उपमा देतांना व बाईंना "जेलर" म्हणतांना केसरीकारांच्या डोळ्यांत ह्या भिंती खुपल्या असाव्यात. पण सुरुवातीला जेव्हां अत्यंत बेजबाबदार उठवळ व उच्छृंखल अशा मुली त्यांना सांभाळायच्या होत्या त्या वेळेस ह्या भिंतींचें बुजगावणें गुंडांना नसतें तर दोन रामोश्यांना ते गुंड आवरले नसते. नंतर मुलींत कमालीचा फरक झाला व त्यांच्यावर विश्वास टाकण्यास हरकत उरली नाहीं,[२] तेव्हां त्यांना रामोश्यांचीहि गरज उरली नाहीं. त्या खुशाल पंढरपूर-सारख्या ठिकाणींहि जाऊन काम करूं लागल्या. पण आतां त्यांच्यांत आत्म-विश्वास व शील ह्या गोष्टींचा पुरेपूर सांठा तयार झाला. मात्र एकदां बांधलेल्या भिंती अजून कायम आहेत. त्या पाडून टाकण्या इतकी त्यांच्या अस्तित्वाची आतां कोणाला जाणीव नसते.

बाईंनीं बारा विहिरी खणल्या होत्या. त्यांच्यांतून पाणी काढून त्याचा पुरवठा चाळीस एकर जमिनी भिजविण्यासाठीं करणें हें एक मोठें कामच होतें. दर वर्षीं पाऊस अनिश्चित असे. कित्येकदां तर पाण्याचें रेशनिंग करावें लागे. पाण्याचें दुर्भिक्ष सुरू झालें कीं रमाबाई प्रार्थना करीत व त्यांची गरज भागे. त्यांच्या पावलांवर पावलें ठेवून आतां त्यांच्या मागें राहिलेल्या कामकऱ्यांनीं पाण्यासाठीं एकसारखी प्रार्थना सुरू केली. पाण्याच्या प्रश्नाचा सर्व बाजूंनीं विचार करून नव्या विहिरीची जागा मुक्रर करण्यांत आली. मग सर्व जणींनीं जमून प्रार्थना करून पहिली कुदळ टाकली. खड्डा खोल खोल जाऊं लागला, पण पाण्याचें लक्षण दिसेना. प्रार्थना एकसारख्या चालल्याच होत्या. इतक्यांत एक दिवस सकाळीं एक माणूस धापा टाकीत आला व सांगूं लागला, विहिरीला पाणी लागलें, धबधब्यासारखें पाणी वाहात आहे. खरोखरच जिवंत झरे लागून भरपूर पाण्यानें विहीर पाहतां पाहतां भरून गेली. एकानें ह्या विहिरी-साठीं १३८१४ रुपये देणगी म्हणून पाठवून दिले. कोणीं पाठविले त्याचा कधींच कोणाला पत्ता लागला नाहीं. इकडे पाणी मुबलक वाहूं लागलें तर तिकडे पंप, इंजीन, नळ वगैरे सर्व सामग्री देणगी म्हणून मिळाली. ठिकठिकाणीं साऱ्या

१. ज्ञानोदय ३०:११:१९०४. (लेखकःप्रसन्नकुमार नथोजी.)

२. विशेषतः २७ व्या प्रकरणांत सांगितलेल्या घटनेनंतर हा फरक प्रामुख्यानें दिसून येतो.

मुक्तीभर नळावाटे पाणी पसरून देण्यांत आलें. मुक्तिला कधींच माहीत नसलेली पाण्याची सुबत्ता लाभली. बाईंच्या वेळच्या स्त्रिया आतां वयस्कर झाल्यानें त्यांना आपलें पाणी वाहून आणणें जड जाऊं लागलें होतें.[1] देवानें आपली कृपा किती योग्य समयीं केली, म्हणून सर्व मुक्ति आनंदानें देवाची उपकारस्तुति गाऊं लागली.

आतां बाईंच्या वेळच्या स्त्रियांची दृष्टीहि मंद होऊं लागली आहे. सायंकाळीं मंदिरांत त्यांना आपलें बायबल व उपासनासंगीताचें पुस्तक वाचणें जड जाऊं लागलें आहे. सर्व जणी आतां एकसमयावच्छेदें करून प्रार्थना करूं लागल्या कीं 'देवा, आम्हांला वीज पुरव.' इंग्लंडमध्यें एक मध्यम स्थितींतील बाई होती. सारें आयुष्य तिनें साधेपणांत घालविलें होतें. चैनीच्या वस्तू किंवा कपडेलत्ते घेण्याचें ती टाळी. तो सारा पैसा तिनें देवाच्या कामासाठीं म्हणून जतन करून ठेवला होता. देव सांगेल तसा त्याचा शेवटीं विनियोग करण्याचें तिनें ठरविलें होतें. एक दिवस तिनें केडगांव मुक्ति कामासंबंधीं ऐकलें. तिला वाटूं लागलें कीं आपला पैसा तेथील कामासाठीं पाठवून द्यावा. तुमची विजेची गरज जर माझ्या पैशानें भागवितां आली तर मला फार बरें वाटेल असा निरोप पाठवून तिनें आपल्या आयुष्यभराची पुंजी केडगांवला पाठवून दिली. ह्या बाईंच्या देणगींतून मोठा 'जनरेटर' घेतां आला, पण अजून तारा, दिवे वगैरेंचा खर्च होताच. फार वर्षांपूर्वी बाईंनीं आणलेल्या स्त्रिया आतां पुढें आल्या. त्यांनींहि कांहीं थोडा थोडा पैसा सांठविला होता. तो त्या सगळ्यांनीं बाहेर काढला व मंदिरांत वेदीपुढें आणून ठेवला. आम्हांला कांहीं नसलें तरी चालेल, पण देवाच्या मंदिरांत प्रकाश पाहिजे असें त्या म्हणत होत्या. विश्वासाचें आणि स्वार्थत्यागाचें हें प्रदर्शन बाईंच्या आत्म्याला किती तोषदायक वाटलें असेल! ज्या मुली आल्या तेव्हां एकमेकींच्या भाकरी सुद्धां लुबाडायला कमी करीत नसत, त्याच आपलें सर्वस्व द्यायला अशा तयार झालेल्या पाहून कां बरें बाईंच्या आत्म्याला समाधान वाटणार नाहीं?

बाईंनीं मुक्तिसदनाची स्थापना केल्यावर हळूहळू शारदा सदनहि केड-

---

१. चित्रमालिकेंतील शेवटलें चित्र पाहा.

संस्थेच्या मुख्य इमारतींच्या सभोंवतीं उंच उंच भिंती आहेत. मुक्तीला तुरुंगाची उपमा देतांना व बाईंना "जेलर" म्हणतांना केसरीकारांच्या डोळ्यांत ह्या भिंती खुपल्या असाव्यात. पण सुरुवातीला जेव्हां अत्यंत बेजबाबदार उठवळ व उच्छृंखल अशा मुली त्यांना सांभाळायच्या होत्या त्या वेळेस ह्या भिंतींचें बुजगावणें गुंडांना नसतें तर दोन रामोश्यांना ते गुंड आवरले नसते. नंतर मुलींत कमालीचा फरक झाला व त्यांच्यावर विश्वास टाकण्यास हरकत उरली नाहीं,[२] तेव्हां त्यांना रामोश्यांचीहि गरज उरली नाहीं. त्या खुशाल पंढरपूर-सारख्या ठिकाणींहि जाऊन काम करूं लागल्या. पण आतां त्यांच्यांत आत्म-विश्वास व शील ह्या गोष्टींचा पुरेपूर सांठा तयार झाला. मात्र एकदां बांधलेल्या भिंती अजून कायम आहेत. त्या पाडून टाकण्या इतकी त्यांच्या अस्तित्वाची आतां कोणाला जाणीव नसते.

बाईंनीं बारा विहिरी खणल्या होत्या. त्यांच्यांतून पाणी काढून त्याचा पुरवठा चाळीस एकर जमिनी भिजविण्यासाठीं करणें हें एक मोठें कामच होतें. दर वर्षीं पाऊस अनिश्चित असे. कित्येकदां तर पाण्याचें रेशनिंग करावें लागे. पाण्याचें दुर्भिक्ष सुरू झालें कीं रमाबाई प्रार्थना करीत व त्यांची गरज भागे. त्यांच्या पावलांवर पावलें ठेवून आतां त्यांच्या मागें राहिलेल्या कामकऱ्यांनीं पाण्यासाठीं एकसारखी प्रार्थना सुरू केली. पाण्याच्या प्रश्नाचा सर्व बाजूंनीं विचार करून नव्या विहिरीची जागा मुकर्रर करण्यांत आली. मग सर्व जणींनीं जमून प्रार्थना करून पहिली कुदळ टाकली. खड्डा खोल खोल जाऊं लागला, पण पाण्याचें लक्षण दिसेना. प्रार्थना एकसारख्या चालल्याच होत्या. इतक्यांत एक दिवस सकाळीं एक माणूस धापा टाकीत आला व सांगूं लागला, विहिरीला पाणी लागलें, धबधब्यासारखें पाणी वाहात आहे. खरोखरच जिवंत झरे लागून भरपूर पाण्यानें विहीर पाहतां पाहतां भरून गेली. एकानें ह्या विहिरी-साठीं १३८१४ रुपये देणगी म्हणून पाठवून दिले. कोणीं पाठविले त्याचा कधींच कोणाला पत्ता लागला नाहीं. इकडे पाणी मुबलक वाहूं लागलें तर तिकडे पंप, इंजीन, नळ वगैरे सर्व सामग्री देणगी म्हणून मिळाली. ठिकठिकाणीं साऱ्या

१. ज्ञानोदय ३०:११:१९०४. (लेखकः प्रसन्नकुमार नथोजी.)
२. विशेषतः २७ व्या प्रकरणांत सांगितलेल्या घटनेनंतर हा फरक प्रामुख्यानें दिसून येतो.

मुक्तीभर नळावाटे पाणी पसरून देण्यांत आलें. मुक्तिला कधींच माहीत नसलेली पाण्याची सुबत्ता लाभली. बाईंच्या वेळच्या स्त्रिया आतां वयस्कर झाल्यानें त्यांना आपलें पाणी वाहून आणणें जड जाऊं लागलें होतें.[1] देवानें आपली कृपा किती योग्य समयीं केली, म्हणून सर्व मुक्ति आनंदानें देवाची उकारस्तुति गाऊं लागली.

आतां बाईंच्या वेळच्या स्त्रियांची दृष्टीहि मंद होऊं लागली आहे. सायंकाळीं मंदिरांत त्यांना आपलें बायबल व उपासनासंगीताचें पुस्तक वाचणें जड जाऊं लागलें आहे. सर्व जणी आतां एकसमयावच्छेदें करून प्रार्थना करूं लागल्या कीं 'देवा, आम्हांला वीज पुरव.' इंग्लंडमध्यें एक मध्यम स्थितींतील बाई होती. सारें आयुष्य तिनें साधेपणांत घालविलें होतें. चैनीच्या वस्तू किंवा कपडेलत्ते घेण्याचें ती टाळी. तो सारा पैसा तिनें देवाच्या कामासाठीं म्हणून जतन करून ठेवला होता. देव सांगेल तसा त्याचा शेवटीं विनियोग करण्याचें तिनें ठरविलें होतें. एक दिवस तिनें केडगांव मुक्ति कामासंबंधीं ऐकलें. तिला वाटूं लागलें कीं आपला पैसा तेथील कामासाठीं पाठवून द्यावा. तुमची विजेची गरज जर माझ्या पैशानें भागवितां आली तर मला फार बरें वाटेल असा निरोप पाठवून तिनें आपल्या आयुष्यभराची पुंजी केडगांवला पाठवून दिली. ह्या बाईंच्या देणगींतून मोठा 'जनरेटर' घेतां आला, पण अजून तारा, दिवे वगैरेंचा खर्च होताच. फार वर्षांपूर्वीं बाईंनीं आणलेल्या स्त्रिया आतां पुढें आल्या. त्यांनींहि कांहीं थोडा थोडा पैसा सांठविला होता. तो त्या सगळ्यांनीं बाहेर काढला व मंदिरांत वेदीपुढें आणून ठेवला. आम्हांला कांहीं नसलें तरी चालेल, पण देवाच्या मंदिरांत प्रकाश पाहिजे असें त्या म्हणत होत्या. विश्वासाचें आणि स्वार्थत्यागाचें हें प्रदर्शन बाईंच्या आत्म्याला किती तोषदायक वाटलें असेल! ज्या मुली आल्या तेव्हां एकमेकींच्या भाकरी सुद्धां लुबाडायला कमी करीत नसत, त्याच आपलें सर्वस्व द्यायला अशा तयार झालेल्या पाहून कां बरें बाईंच्या आत्म्याला समाधान वाटणार नाहीं?

बाईंनीं मुक्तिसदनाची स्थापना केल्यावर हळूहळू शारदा सदनहि केड-

---

१. चित्रमालिकेंतील शेवटलें चित्र पाहा.

गांवला आणलें. ह्या संबंधानें 'White Already to Harvest' च्या प्रतिनिधीस बाईंनीं सांगितलें होतें :

'The Mukti Home is entirely supported by faith; but the Sharada Sadan has practically its support guaranteed by friends in America who have been interested since its inception."

शारदा सदनाच्या इतिश्रीबद्दल आपण १६ व्या प्रकरणांत वाचलेंच आहे. शारदा सदनास बाई नको म्हणेपर्यंत 'अमेरिकन रमाबाई असोसिएशन' कडून मदत मिळत असे. तें हायस्कूल म्हणून चालविण्यांत येत होतें व अद्याप ती शारदासदन शाळा अस्तित्वांत आहे. मात्र आतां तिच्यांत फक्त मिडल स्कूलपर्यंतचें शिक्षण देण्यांत येतें.

मुक्तींत बाईनीं आणखी कांहीं सदनें काढलीं. (त्यांतील मुलांकरितां काढण्यांत आलेल्या सदानंद सदनाखेरीज बाकी) अजून चालू आहेत व कांहीं त्या वेळेपेक्षांहि अधिक उपयुक्त कार्य करीत आहेत.

'कृपासदन' ह्या नांवाचें एक सदन आहे. बाई इंग्लंडमध्यें असतांना ज्या कामावरून त्यांचें ख्रिस्ती धर्माकडे विशेष लक्ष गेलें त्या Sisters of Mercy च्या धर्तीवर हें सदन काढण्यांत आलें आहे. ज्यांचें पाऊल वाकडें पडलें असेल किंवा पाडलें असेल, ज्यांना त्यामुळें जगांत तोंड दाखवायला जागा नसेल, ज्यांना सारें जग तिरस्करणीय मानतें अशांना आपलें म्हणून येथें आश्रय मिळतो. त्यांना येथें त्यांचें गतायुष्य विसरून नवजीवन जगण्यास संधि देण्यांत येते. पतित स्त्रियांकडे कठोर दृष्टीनें पाहणें व त्यांना बहिष्कृत समजणें ही आपली रीत. बाईंनीं ती मोडली. त्यांनीं अशा स्त्रियांसाठीं हें आश्रयाचें स्थान तयार करून त्यांना पुनः माणसांत आणलें. कृपा सदनांत साऱ्या हिंदुस्थानांतून पतित स्त्रिया आश्रयासाठीं येतात व त्यांना येथें नवजीवन-प्राप्ति होते.

येथें 'प्रीति सदन' म्हणून एक सदन आहे. त्यांत वृद्ध व अशक्त, लंगड्या व लुळ्या अशा स्त्रियांना आसरा मिळतो. बाईंच्या वेळेस खुद्द बाईच त्यांच्या सुखसोयींकडे विशेष लक्ष असे. त्या त्यांना आपल्या मैत्रिणी म्हणत. आपल्या परावलंबी जीवनाचा विसर पडेल अशा गोष्टी सांगून बाई त्यांचें मनरंजन करायच्या. त्यांना आनंदी ठेवण्याकडे बाईंचें विशेष लक्ष असे. हेंहि

सदन अद्याप केडगांवला पाहण्यास मिळतें.

आंधळ्यांसाठीं एक सदन आहे त्याला 'बार्तमी सदन'[१] असें नांव आहे. येथील अंध स्त्रियांना व मुलींना फार प्रेमानें वागविण्यांत येतें. त्यांना ब्रेल पद्धतीनें लिहायला वाचायला शिकविण्यांत आलें आहे. हातांच्या बोटांनीं चांचपून त्या आपलीं पुस्तकें वाचतात. त्या वाचतात इतकेंच नव्हे तर त्यांना निरनिराळ्या प्रकारचीं विणकामें सुद्धां फार चांगलीं येतात. स्वेटर विणणें, वेताच्या खुर्च्या विणणें, केळीच्या सोपटींच्या टोपल्या तयार करणें, वाकाच्या दोऱ्या तयार करणें, इत्यादि कामें ह्या अंध स्त्रिया मोठ्या कुशलतेनें करतात. भारतांतील पहिली अंधशाळा हीच होय.

येथें एक मुलांसाठीं सदन होतें. त्याच नांव 'सदानंद सदन' ठेवलें होतें. त्याचें काम मिस् कौच पहात असत. पुढें तें काम नॉर्टन साहेब पाहूं लागले. शेवटीं नॉर्टन साहेबांनीं हे सारे मुलगे दौंडला नेले व दौंडास मुलांसाठीं स्वतंत्र काम सुरू केलें.

---

१. बायबलमध्यें बार्तमी नांवाच्या अंधाची गोष्ट आहे.

# २२ झरोक्यांतून

रमाबाईंचें 'आत्तापर्यंतचें' चरित्र वाचून आपल्याला त्यांच्या करारीपणाचें, रचनाचातुर्याचें, बुद्धिमत्तेचें, कामसूपणाचें, ध्येयनिष्ठेचें, विश्वसाचें, अविश्रान्त श्रमाचें, अशीं अनेक दर्शनें झालीं. परंतु अशा माणसाचें अंतरंग पाहायचें झालें तर त्याच्या माजघरांतील हालचालींचें निरीक्षण करावें व तें अशा रीतीनें करावें कीं आपल्या हालचाली कोणी पाहात आहे हें त्याच्या लक्षांत येऊं देऊं नये. मात्र अशा ह्या निरीक्षणासाठीं आपल्याला एखादा दुसरा झरोका शोधून काढावा लागतो.

रमाबाईंच्या एका दैनंदिनीवरून व त्यांची पुतणी राजस कृष्ण डोंगरे ह्यांच्या खाजगी आठवणींच्या आधारानें हें निरीक्षण सहज करतां येईल.

एकदां बाईंनीं आपली एका दिवसाच्या कामाची दैनंदिनी लिहून काढली होती. ती आमच्या हातीं आली आहे. तींत पहांटे उठल्यापासून निजेपर्यंत काय काय केलें त्याचें टिपण आहे.

'पहांटे ४ वाजतां चर्चची घंटा वाजली. तिच्यामुळें सर्वांना जाग येते. साडेचारला मी माझ्या खोलींतून चर्चला गेलें. तेथें शिक्षिकांचें काम करणाऱ्या विद्यार्थिनी व कांहीं नवीन मुली प्रार्थनेसाठीं व बायबल शिक्षणासाठीं जमल्या होत्या. त्यांनीं एक गीत म्हटलें, मग मी बायबलमधून एक धडा वाचून त्याची फोड केली. मग प्रार्थना झाल्या. शेवटीं सर्वांनीं मिळून प्रभूची प्रार्थना म्हटली. आतां ६·१५ झाले. त्या विद्यार्थीशिक्षिका आतां आपाआपल्या न्याहऱ्या घ्यायला गेल्या आहेत. त्या तिकडूनच शाळेची तयारी करून येतील. ह्या वेळेस आम्ही सर्वजण—कामकरीसुद्धां—न्याहारी करतों. नवीन मुली ५ ला उठल्या. त्यांच्या मेटून बाया त्या मुलींना आपआपले बिछाने गुंडाळून ठेवण्यांत व खोल्यांची झाडलोट करण्यांत, तसेंच तेथील सामान व्यवस्थित

लावण्यास मदत करीत आहेत. ज्या मुली लहान लहान मुलींचीं व अपंगांचीं धुणीं धुतात त्यांनीं आपल्या कपड्यांचीं गाठोडीं बांधून डोक्यावर घेतलीं आहेत. विहिरींतून मोटांनीं पाणी काढण्यांत येत आहे. आठ बैल व तीन गडी हें पाणी उपसण्याचें काम करीत आहेत. दोन थारोळ्यांत पाणी पडतें व तेथून तें भाजीपाल्याला व फळझाडांना देण्यांत येतें. सकाळीं तेथें सर्व धुणें धुण्यांत येतें व तेथेंच उन्हांत वाळविण्यांत येतें. ह्यांपैकीं कांहीं कांहीं जणी तेथेंच अंग धुतात व आपल्या साडया धुतात. मग त्या सगळ्या 'धोबिणी' परततात. मग जेवण आणि मग शाळा.

शिक्षकिणींचें काम करणाऱ्या विद्यार्थिनी न्याहारी करून मग शाळेला जातात. ८ वाजतां 'कृपा सदनांतील' कांहीं वर्ग शालागृहांत जमतात व १० पर्यंत अभ्यास करतात. त्यानंतर त्या जाऊन अंग धुतात. मुक्तींतील मोठ्या मुली आंघोळीला जातात तोंपर्यंत लहान मुली जेऊन घेतात. आतां लहान मुलींच्या आंघोळींना सुरुवात होत आहे व मोठ्या मुली जेवायला बसत आहेत. आतां शिक्षिका झालेली एक मोठी मुलगी इकडे तिकडे हिंडून स्वच्छतेकडे लक्ष ठेवीत आहे. झाडूवाल्यांना ती कामासंबंधानें सूचना देत आहे. ती नंतर मुलींच्या निजायच्या खोल्यांत जाऊन त्यांनीं बिछाने वगैरे व्यवस्थित ठेवले आहेत कीं नाहीं तें पाहून येते. एकंदर स्वच्छतेकडे पाहण्याचें व कोठें कांहीं उणें असलें तर तें मला येऊन सांगण्याचें काम तिचें आहे.

मी इकडेतिकडे हिंडलें, कामकरी आपापल्या कामावर आहेत काय, व नीट काम करीत आहेत काय तें पाहिलें. मुकादमाला सांगून कामाचे कांहीं फेरबदल सुचविले. दिवाबत्तीच्या खोलीजवळ आणखी एक खोली बांधायची आहे तिचा पाया घेतला. माळ्याला एक झाड लावायला सांगितलें व दुसरीं अगदीं इमारतीजवळ लावलीं आहेत तीं काढून दूर लावायला सुचविलें. दवाखान्याच्या जागीं गेलें.[1] १० वाजले. विद्यार्थिनी–शिक्षिकांनीं आपले धडे संपविले. त्या आतां उठल्या. त्यांच्या जागीं दुसऱ्या मुली येऊन बसूं लागल्या. सर्वच मुलींना बसायला पुरेल इतकी जागा नाहीं.

---

१. बाईच्या वेळेलाहि दवाखाना होता, त्या कोणाला औषध घेऊं देत नसत म्हणणारांनीं हें ध्यानांत घ्यावें.

त्यांत नवीन मुलींचा खूपच मोठा घोळका जमला आहे. लहान, मोठ्या, उंच, ठेंगण्या अशा सर्वच तऱ्हेच्या मुली आहेत. चालल्या त्या सर्व शाळेकडे. १० मिनिटांत सर्वजणी आपापल्या जागेवर जाऊन बसल्या. त्यांना पाट्या, पेन्सिली देण्यांत आल्या. फळे साफसूफ झाले. नवीन धडा त्यांना देण्यांत येत आहे. किंडरगार्टनचें कामहि सुरू झालें. मोठें चित्तवेधक काम वाटतें तें. ह्या कामीं विद्यार्थी–शिक्षकिणींना कसें शिकवायचें तें समजावून देणारी शिक्षकीण रागावली आहे. रागानें ती निघून गेली. आतां तें काम माझ्यावर पडलें आहे. किंडरगार्टनच्या मुली तिसरी 'देणगी' शिकत आहेत. घंटी वाजायला लागली. शाळा दुपारच्या सुट्टीपुरती सुटत आहे. मुली आतां जेवायला चालल्या. आतां नवीन मुली आपापल्या वर्गांत जमूं लागल्या. त्या आतां दोन तास शिकतील. विद्यार्थिनी–शिक्षकिणी आतां आपल्या अभ्यासाला लागल्या आहेत. दोन मोठमोठ्या दळणाच्या खोल्यांत ६० ज़ातीं रोवलीं आहेत. तेथें हें दळणाचें काम चालतें.

३ वाजले, घंटी वाजत आहे. आतां सर्व मुली चर्चमध्यें गायनाच्या वर्गासाठीं जमतील. सर्व बाजूंनीं आपापल्या मेट्रनबायांबरोबर त्या गोळा होतात. लहान मुली व किंचित् मोठ्या मुली फार हौशीनें गाणें शिकतात. ४ वाजतां गायनाचा वर्ग सुटतो. मग सर्व मुली आपापलीं ताटें व वाट्या घेऊन तीं घासायला जातात. मग सर्व मंडळी जेवणाच्या जागीं जमा होते. मेट्रन बाया त्यांना आपापल्या जागीं व्यवस्थेनें बसवितात. मुख्य मेट्रन लहानशी घंटी वाजविते. सर्व मुली आपापल्या जागीं भक्तिभावानें उभ्या राहातात. हात जोडतात, नम्रपणें मान खालीं वांकवितात आणि प्रार्थना करतात. संध्याकाळच्या सहाच्या सुमाराला जेवण संपतें. मग मुली खेळायला जातात. कांहीं इकडे तिकडे सहल करताहेत, कांहीं मोकळ्या मैदानांवर बसल्या आहेत, उड्या मारीत आहेत, कांहीं मजेंत गाताहेत, कांहीं नुसत्याच गप्पागोष्टी करीत आहेत, तर कांहीं बागेंतल्या पानांफुलांचें निरीक्षण करीत आहेत. त्यांना आतां फुलें आवडूं लागलीं आहेत. कांहीं वर्षांपूर्वीं झाडपाल्याचा चोळामोळा करण्याकडेच त्यांची प्रवृत्ति असे.

आतां रात्र पडली. झोंपण्याची घंटा वाजत आहे. मुली आपापल्या खेळांतून निजण्याच्या खोल्यांकडे पळूं लागल्या. प्रत्येकजण आपापला बिछाना

पसरीत आहे. एक सतरंजी, एक चादर व दोन घोंगडया हा त्यांचा बिछाना. आतां झोपीं जायचें पण त्याच्या आधीं त्या आपल्या विछान्याजवळ गुडघे टेंकून एकएकट्या प्रार्थना करीत आहेत किंवा मेटून भोंवतीं जमा होऊन मोठ्यानें प्रार्थना करीत आहेत. नवीन मुली ज्या अजून प्रार्थनेच्या बाबतींत बाळेंच आहेत त्यांना प्रार्थना म्हणजे काय हें आत्ताशीं थोडेंथोडें कळूं लागलें आहे. कधीं कधीं त्यांचे शब्द मोठे चमत्कारिक वाटतात. अगदींच लहान मुलींना तेविसावें स्तोत्र पाठ करायला सांगत आहेत. पहिलेंच वचन त्या घोकून घोकून म्हणत आहेत. 'परमेश्वर माझा मेंढपाळ आहे. मला उणें होणार नाहीं.' **उणें** व **नाहीं** ह्या शब्दांवर त्या खूप जोर देत आहेत. बिचाऱ्यांना तेवढ्याच दोन शब्दांचा चांगला परिचय झालेला. आठ वाजतां पुन्हा धंटा वाजते व सर्वजणी आतां झोपून गेल्या.'

केडगांवची दैनंदिनी आपण पाहिली. ह्यांतील जेवणाचा कार्यक्रम तेवढा द्यायचा राहिला.

क्लेमिंटायना बटलर ह्यांनीं आपल्या पुस्तकांत ह्या जेवणाचें वर्णन फार बारकाईनें केलें आहे. पाट, त्यापुढें ताटें, वाट्या, सर्व जेवणाचा थाट भारतीय-अगदीं दक्षिणी पद्धतीचा. अन्न शाकाहारी. बटलर बाईंनीं ह्या पंक्ती स्वत: पाहिलेल्या आहेत व त्यांच्या दृष्टीनें अजब अशा त्या जेवणाच्या पद्धतीनें स्वत:हि दोन घास खाल्ले आहेत.

पुण्यास आल्यानंतर बाई आपल्या गांवीं म्हणजे माळहेरंजीला दोनदां जाऊन आल्या. एकदां त्यांचे सापत्न बंधु रामकृष्णशास्त्री आजारी असतां व एकदां त्यांच्या मृत्यूनंतर. दुसऱ्या वेळेस इकडे येतांना त्यांनीं आपल्या नात्यांतील चार विधवा व एक कुमारिका व आपले चुलत चुलत पुतणे श्री. कृष्ण वासुदेव डोंगरे ह्यांना बरोबर आणलें. पुढें त्यांच्यापैकीं दोन विधवा परत गेल्या व बाकीच्या सर्वांनीं बाप्तिस्मे घेऊन ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला.

बाईची सख्खी मावशी व तिची मुलगी मथू ह्या दोघीहि बाईकडे आपले सोवळें ओवळें संभाळून राहात होत्या. मथूबाई पुढे ख्रिस्ती झाल्या[१].

कृष्णरावांची कन्या कुमारी राजस कृष्ण डोंगरे ह्यांनीं बाइचें एक इंग्रजी

---

१. ही माहिती रुक्मिणीबाईंनीं दिली आहे.

चरित्र लिहिलें आहे. तें अद्याप अप्रसिद्ध आहे. त्यांतील व्यक्तिविषयक भाग खाली दिला आहे,

कृष्णराव अहमदनगरास राहायाचे व त्यांचीं मुलें राजस व निळकंठ हीं दोघें आईबापांबरोबर नगरासच असत. तेथेंच तीं शाळेला जात. परंतु शाळांना सुटी झाली कीं आम्हांला 'मोठ्या आजीकडे' म्हणजे पंडिता रमाबाईंकडे केडगांवला घेऊन जा अशीं तीं एकसारखीं आईच्या मागें लागत.

"आई, सुटी सुरू झाली मोठ्या आजीकडे केव्हां जायचें?"

"अरे पण तुम्ही मोठ्या आजीशीं एक अक्षर बोलत नाहीं. कशाला न्यायचें तुम्हांला मोठ्या आजीकडे?"

रमाबाई ह्या मुलांना फार आवडत, पण त्यांचा त्यांना एवढा मोठा दरारा वाटे कीं त्यांच्या पुढें मुलांच्या तोंडांतून कधीं एक शब्द बाहेर पडायचा नाहीं. पण ह्या वेळेस नेलें तर आपण 'मोठ्या आजी'शीं खूप खूप बोलूं असें त्यांनीं कबूल केलें. मात्र प्रत्यक्ष केडगांवला जाऊन 'मोठ्या आजी'पुढे उभें राहिल्यावर त्यांचे सारे निश्चय लटपटले. रमाबाईंनीं त्यांना जवळ घेतलें. आंजारलें, गोंजारलें. पण त्यांच्या तोंडांतून फक्त बाईंच्या प्रश्नांना 'हो' 'नाहीं' अशीं उत्तरें बाहेर पडतील तेवढेंच त्यांचें त्यावेळचें संभाषण.

लेखिका ह्या प्रसंगासंबंधीं म्हणते : 'आम्हांला इतका कांहीं संकोच वाटत होता कीं आमच्या तोंडांतून शब्द बाहेर पडेना.' तसें पाहिलें असतां खरोखरी त्यांच्याजवळ कांहीं तरी विशेष होतें कीं ज्यामुळें माणसाला त्यांच्यासंबंधानें ओढ वाटावी. जणुं काय कांहीं आकर्षक शक्ति त्यांच्या अंगीं होती, ह्या भावंडांना आईबापां खेरीज आपलें म्हणायला त्यांच्या 'मोठ्या आजी' वांचून दुसरें कोणी नव्हतें व त्याची त्यांना पुरेपूर जाणीवहि होती. ह्यामुळेंच त्यांना नेहमीं केडगांवला जावेंसें वाटें. ऊठपळ केडगांव असें वर्षांतून कितीतरी वेळेला व्हायचें. 'मोठ्या आजी'च्या किंडर गार्टन शाळेंत काढलेले दिवस ह्या नातीला अद्याप चांगले स्पष्टपणें आठवतात. जगांत इतकी चांगली शाळा दुसरी कोठें नसेल असें ती म्हणे. काय तीं सुंदर सुंदर रंगीबेरंगी खेळणीं, तें मणी मोजणें, मणी ओवणें! शिक्षण म्हणजे एक आल्हादकारक खेळ होता तेथें.

ह्या मुलांना मोठें आकर्षण वाटे तें तेथील छापखान्याचें. छापखान्याची देखरेख असे दादासाहेबांकडे. दादासाहेब म्हणजे दादासाहेब गद्रे. दादासाहेब

हे बाईच्याकडे एक कारकून होते असें नव्हे. राजसबाईंचे वडील व दादासाहेब मोठे दोस्त होते. दोघानींहि खिस्ती झाल्यामुळें सारखाच छळ सोसला होता. कृष्णरावांनीं आपलें गणगोत व आपली धनदौलत मंगरूळांत टाकून देऊन खिस्ताला पत्करिलें होतें, तसेंच दादासाहेबांचें होतें. त्यामुळें ह्या दोघां समानशीलांची मैत्री जमली होती. दादा छापखान्यांत गेले कीं कृष्णराव तिकडे जायचे व त्यांच्यामागें त्यांचीं मुलें जायचीं. तसें पाहिलें तर ह्या वेळेस कृष्णारावांचें काम केडगांवच्या उपासनालयाच्या बांधकामावर देखरेख ठेवण्याचें होतें. त्या भव्य इमारतींत त्यांचा हात आहे. ह्या वेळेस हें कुटुंब केडगांवला होतें. राजस छापखान्यांत नेहमीं जायची व तेथील हस्तपत्रिका आणून त्या वाटून टाकायची. वाटून टाकण्यासाठींच त्या होत्या ना! पण त्याबद्दल कोणी त्यांना रागावत नसे. व हा सर्व माल आपल्या 'मोठ्या आजीचा'च आहे ही मनांत खूणगांठ बांधलेली! तेव्हां राजसला त्या मालाची मधून मधून अशी विल्हेवाट लावायला कांहीं हरकत कधीं वाटली नाहीं.

एक दिवस 'मोठ्या आजी' जवळ बसून त्यांच्या कामाकडे राजस लक्ष लावून पाहात होती. तों केवढें आश्चर्य! 'मोठी आजी' पेन्सिल घेऊन छापलेल्या पुस्तकांत कांहीं शब्दांभोंवतीं आळीं रेखाटीत होती! आणखी नंतर तर तिला आश्चर्याचा धक्काच बसला कारण 'मोठया आजीनें' कात्री घेतली व त्या छापील पुस्तकांच्या पानांची कत्तल करायला सुरुवात केली. आजी असें करते आहे तरी काय तिला समजेना. घरीं येतांच तिनें आपल्या वडलांना आजीच्या ह्या विलक्षण कृत्याचा अर्थ विचारला. तेव्हां तिला कळलें कीं आजी नवीन पुस्तक तयार करीत असून त्यांत बायबलच्या निरनिराळ्या पुस्तकांत कसेकसे वेगवेगळे शब्द येत आहेत तें आपल्या पुस्तकांत दाखविण्यासाठीं हे तुकडे कापीत आहे[१].

आपली 'मोठी आजी' काम करीत असली म्हणजे राजस एका कोपऱ्यांत बसून आजीकडे कौतुकानें व कुतूहलानें पाहात राहायची. त्या एका कामांत शेकडोंशें अडथळे येत राहायचे. कोणी कांहीं सल्ला विचारायला यायचे तर कोणी त्या दिवसाच्या कामाचा आराखडा घ्यायचे, कोणी कांहीं भांडण मिट-

१. टिपणी पुढील पानावर पहा.

वायला सांगायचे तर कोणी आपल्या रोजच्या भाकरीची तक्रार घेऊन यायचें. आजीच्या खोलीचें दार कधीं बंद नसे. रात्रंदिवस तें सताड उघडें असायचें. त्यामुळें आजीपुढें कोणीहि केव्हांहि दत्त म्हणून येऊन उभें राहायचें. एकदां दोन मुलींना आजीपुढें आणून उभें करण्यांत आलें. दोघींनीं पदरांनीं आपआपलीं तोंडें झाकून घेतलीं होतीं. आजींनीं त्यांना आपल्याकडे पाहायला सांगतांच त्यांचे पदर व हात खालीं झाले. आजी दोन मिनिटें त्यांच्याकडे टक लावून पाहात राहिल्या आणि मग त्यांनीं मेट्रनला सांगितलें. 'हिला शारदा सदनांत ठेवा व हिला कृपा सदनांत ठेवा.' त्यांनीं अशी ही निवड कां केली सांगतां येणार नाहीं, पण तिच्यामुळें तो प्रश्न मिटल्यासारखें वाटतें.

---

१. राजसनें पाहिलेला चमत्कार तो हा. ह्याविषयीं पुढें प्रकरण २५ मध्यें अधिक खुलासा सांपडेल.

| 13 πορευθέντες | δὲ | μάθετε | τί |
|---|---|---|---|
| go ye | But | and learn | what |
| go ye | But | and learn | what |
| go ye | But | and learn | what |
| having gone, | but | learn ye | what |

| ἐστιν, | [1]Ἔλεος | θέλω, | καὶ | οὐ |
|---|---|---|---|---|
| that meaneth, | mercy | I will have, | and | not |
| this meaneth, | mercy | I desire, | and | not |
| this meaneth, | mercy | I desire, | and | not |
| is, | Kindness | I will. | and | not |

| θυσίαν· | οὐ | γὰρ | ἦλθον | καλέσαι |
|---|---|---|---|---|
| sacrifice: | not | for | I am come | to call |
| sacrifice· | not | for | I came | to call |
| sacrifice: | not | for | I came | to call |
| sacrifice. | not | for | I did come | to call |

| δικαίους, | ἀλλ' | ἁμαρτωλοὺς | [2]~~εἰς~~ |
|---|---|---|---|
| the righteous, | but | sinners | to |
| the righteous, | but | sinners. | — |
| the righteous, | but | sinners | — |
| righteous men, | but | sinners. | to |

| ~~μετάνοιαν.~~ |
|---|
| repentance. |
| — |
| — |
| reformation.' |

1 or delight in N.

2 Nestle's text omits εἰς μετάνοιαν.

13 But go ye and learn what *this* meaneth, 'I desire mercy, and not sacrifice:' for I came not to call the righteous, but sinners.

[illegible]

१३ परंतु मला दया हवी आहे, आणि यज्ञ नको, याचा अर्थ काय हें जाऊन शिका; कारण कीं मी नीतिमानांस बोलवायाला नाहीं, तर पाप्यांस पश्चात्तापासाठीं [बोलावण्यास] आलों.

१३ परंतु यज्ञापेक्षां मला दया आवडती, याचा अर्थ काय हें जाऊन शिका; कारण कीं मी नीतिमानांस नाहीं, तर पाप्यांस पश्चात्तापासाठीं बोलावण्यास आलों.

१३ मला दया पाहिजे, यज्ञ नको" याचा अर्थ काय हें जाऊन शिका। कारण मी धार्मिकांस नाहीं, तर पाप्यांस बोलवायास आलों

१३ परंतु मला दया हवी आहे, आणि यज्ञ नको, याचा अर्थ काय हें ~~जाऊन~~ शिका; ~~कारण कीं मी नीतिमानांस~~ बोलवायाला नाहीं, तर पाप्यांस ~~पश्चात्तापासाठीं~~ [बोलावण्यास] आलों.

तुम्ही जा, आणि
न्यायींस
आलों
(बोलवायाला)

१३ परंतु तुम्ही जा, आणि मला दया हवी आहे, आणि यज्ञ नको, (याचा) अर्थ काय हें शिका; कां कीं मी न्यायींस बोलवायाला आलों नाहीं, तर पाप्यांस (बोलवायाला आलों.)

१३ लूक ५:३१, ३२, होशे ६:६, मीखा ६:६-८; मत्तय १२:७; १ तिमो. १:१५.

त्यांना जणूं काय आपल्यासमोर आलेल्या व्यक्तींच्या मनांतले विचार वाचतां येत असत. त्या क्षणभर त्या व्यक्तीकडे टक लावून पाहायच्या आणि मग ताबडतोब आपला निर्णय द्यायच्या व तो निर्णय कधीं चुकत नसे. राजसच्या म्हणण्याप्रमाणें बाई कोणाशीं वादविवाद करण्यांत किंवा हुज्जत घालीत बसण्यांत आपला वेळ घालवीत नसत. त्यांच्या दृष्टीवरूनच त्यांचें होय नाहीं कळावयाचें.

येणाऱ्या सगळ्या कुलंगडयांतून मोकळ्या झाल्या कीं त्यांची दृष्टि पुनः आपल्या पुढील लेखनाकडे वळायची व दुसरा अडथळा येईपर्यंत त्या एकाग्रचित्तानें आपल्या कामाला सुरुवात करायच्या.

'मोठी आजी' आपल्याला नेहमीं आपल्या आध्यात्मिक जीवनाविषयीं प्रश्न विचारायच्या. प्रार्थना केलीस का, वर्गांत कोणता शास्त्रभाग शिकलीस, इत्यादि प्रश्न त्या नेहमीं विचारीत असें राजस म्हणतात. त्यावर त्या उत्तर करायच्या 'मोठी आजी, मला येथलें सगळें कांहीं फार फार आवडतें. पण पहांटे उठायला नाहीं आपल्याला आवडत.' त्यांना सगळ्यांना पहांटे साडेपांचला उठून देवळांत जाऊन प्रार्थना कराव्या लागत तें मात्र मोठें कठीण काम होतें. आपल्याला यावेळीं साखरझोप येत असते व पुष्कळदां देवळांत पुढें बायबल ठेऊन गुडघ्यावरच डुलक्या खात असतों आपण. त्यांचें हें बोलणें चालले आहे इतक्यांत कोणीसें आंत आलें तेव्हां बाई म्हणाल्या, पहा ही मुलगी, पहांटे प्रार्थनेच्या वेळीं डुलक्या खाते. रात्रीं लौकर निजलें म्हणजे असें होणार नाहीं, असें नाहीं का वाटत तुम्हांला ? बाई स्वतः पहाटे तीनलाच उठायच्या व अंग वगैरे धुऊन आपली खाजगी प्रार्थना करून देवळांत जायच्या.

राजसला रमाबाईंचा सायंकाळचा दिनक्रम विशेष आवडायचा. त्या पाहुण्यांच्या खोल्यांपुढून फेरफटका करायच्या व आपल्या जनावरांना भेटी द्यायच्या. ह्या वेळेस त्यांना अगदीं निवांत वेळ आहे असें वाटे. बागेंत खुर्च्या आणून टाकीत. लेखकाला बाईंनीं बनविलेल्या विशिष्ट खुर्च्या आठवतात. त्या वेताच्या असत. त्यांचा आकार अवग्रहासारखा किंवा इंग्रजी S ह्या अक्षरासारखा असे. बाईंना ऐकायला कमी येई त्यामुळें ह्या खुर्च्या फार सोईस्कर पडत. दोघे बसणारे अशा रीतीनें बसत कीं त्यांचीं तोंडें एकमेकांच्या कानाजवळ येत. आतां

हळूं हळूं लोक बाईच्याजवळ गोळा होत. प्रथम दादा येत. मग त्यांच्या मागोमाग एक एक पाहुणा आपल्या खोलींतून बाहेर पडे. बाईंच्याभोंवतीं मोठें वर्तुळ गोळा होई. गप्पांना बहर येई, हास्यविनोदानें दिवसभराच्या श्रमाचें परिमार्जन होई. बाईंच्या आयुष्यांतील गमती गमतीचे अनुभव ऐकायची ती वेळ असे. हा क्रम जेवणाची घंटा होईपर्यंत चालायचा. अर्धा पाऊण तासच, पण हा वेळ फारच मधुर वाटायचा.

राजसला रमाबाईंच्या प्रार्थना म्हणजे—

*श्वसन परेशाचें । प्रार्थना । श्वसन परेशाचें ।*
*भक्तांच्या हृदयांत संचरे परतोनी जाई ।*
*अंतःकरणीं प्रेमाग्नीला उत्तेजन देई ।*
*ज्वाला त्याची सुरम्य निर्मल दिव्य ऊभी राही ।*
*ह्या हो ज्वालेचें प्रार्थना नांव असे साचें ॥*

असें वाटे.

बाईंच्या प्रार्थना ऐकल्या म्हणजे मुक्ति मिशन प्रार्थनेवर जगतें आहे ह्याचा प्रत्यय येई असें त्या म्हणतात.

किंबहुना बाईंच्या प्रार्थना एकून असाहि भास व्हायचा कीं

*'स्वर्ग पृथ्वीमध्यें उभारीला जीना ।*
*तयाचें प्रार्थना नाम साजे ॥'*

किंवा

*प्रार्थना पित्याची मांडीच केवळ ।*
*चढे वरी बाळ लडिवाळें ॥*

मनोरमाबाई वारल्या होत्या, त्यावेळेस आपल्या आईबरोबर राजस रमाबाईंचें समाधान करायला आली होती. त्यावेळीं बाईंची समाधानी वृत्ति पाहून आपण आश्चर्यचकित झालों असें त्या म्हणतात. रमाबाई अशा तऱ्हेनें बोलत होत्या कीं जणूं कांहीं कांहींच विशेष घडलें नाहीं.

विल्सन कॉलेजांत राजस पहिल्या वर्षाच्या वर्गांत असतां एक दिवस त्यांना केडगांवहून त्यांच्या 'मोठ्या आजी'कडून एक पार्सल आलें. त्यांत हूड आणि गाऊन होता! इंग्लंडमधें असतांना तेथल्या कॉलेजांत शिकतांना

बाईंनीं हा पोषाख वापरला होता व इतकीं वर्षें तो संभाळून ठेवला होता. राजस म्हणतात : परीक्षा संपतांच आपण घाईघाईनें केडगांवला गेलों. ती आपली शेवटली भेट ठरणार असें आपल्याला स्वप्नांतहि वाटलें नाहीं. 'तुझ्या गांवीं चांगलासा सोनार आहे का ग?' असा प्रश्न रमाबाईंनीं केला तेव्हां त्यांना आश्चर्य वाटलें. सोन्या मोत्याच्या चौकशा करणाऱ्यांपैकीं बाई नव्हत्या. पण हा प्रश्न करून त्या आंतल्या खोलींत गेल्या व त्यांनीं एक सोन्याची अंगठी आणली. तिच्यावर जांभळ्या अंजिरी रंगाचा खडा आहे व वरती R असें अक्षर आहे. बाईंची ही लग्नाची अंगठी त्यांनीं इतकीं वर्षें जतन करून ठेवलेली होती. ती राजसच्या बोटांत घालून त्यांनीं त्या अंगठीचें महत्त्व त्यांना समजावून सांगितलें. आपल्या मोठ्या आजीबरोबर घालविलेले ते अत्यंत मोलाचे क्षण आपल्या आयुष्यांतील एक अमूल्य सांठा असल्यासारखे राजसना वाटतें. रमाबाईंनीं त्यांना हात धरून एका बाजूला नेलें व त्या त्यांच्याशीं तास दीड तास बोलत बसल्या. आपली 'मोठी आजी' आपल्याशीं पूर्वीं कधींच इतका वेळ बोलत बसलेली त्यांना आठवत नाहीं.

'तुझ्या परीक्षेचा निकाल कधीं आहे? मला त्याची फार उत्सुकता लागली आहे. ही अंगठी तुजजवळ माझी आठवण म्हणून राहूं दे. ही माझ्या लग्नाची अंगठी आहे. माझ्याजवळ हा एवढाच दागिना आहे. हा दागिना आपल्या कुटुंबाचा ठेवा आहे. आपल्या प्रभू येशूप्रीत्यर्थ आपण आपलें सर्वस्व अर्पण करून टाकलें आहे हें तुला ठाऊकच आहे. अनंतशास्त्री डोंगऱ्यांच्या कुळांतली तूं आहेस हें कधीं विसरूं नको. त्या नांवाचा तुला अभिमान वाटला पाहिजे. त्याचा कधीं त्याग करूं नको. लग्न केलेंस तरी तें नांव सोडूं नको.

बाईंनीं स्वतः डोंगरे आडनांवाचा त्याग केला नव्हता. त्या डोंगरे-मेधावी असें जोडनांव लावीत असें राजस म्हणतात.'[१]

त्या तास दीड तासांत बाईंनीं राजसना ख्रिस्ताविषयीं, आपल्या कामाविषयीं आणि हिंदी चर्चेविषयीं पुष्कळ सांगितलें. त्यांनीं अशी इच्छा व्यक्त

१. चित्रमालिकेंतील पहिल्या चित्राखालच्या, व नंतर पृष्ठें ९५ व ३०३ वरील रमाबाईंच्या सह्या केवळ 'रमाबाई' अशाच आहेत. ह्या शिवाय त्यांच्या वर्तमानपत्रांत आलेल्या लेखांतहि त्यांची हीच सही आढळते. त्यावरून मेधावी, डोंगरे किंवा डोंगरे—मेधावी असें कोणतेंच आडनांव त्या वापरीत असाव्या असें दिसत नाहीं.

केली कीं राजसनीं एम्. ए. व्हावें, परंतु त्यांचें पहिलेंच बी. ए. च्या वेळचें 'कॉन्व्होकेशन,' रमाबाई गेल्यानंतर झालें.

बाईंच्या वेळेस केडगांवला येणाऱ्या पाहुण्यांना विशेष वाटायचें तें त्यांच्या बरोबरच गाडींतून उतरणाऱ्या असंख्य पाहुण्यांचें. हें पाहुण्यांचें लटांबर त्यांच्या बरोबरच धमण्यांत बसून बाईकडे येण्यास स्टेशनवरून निघे. बाईंच्या आदरातिथ्याला सीमा नसे. पाहुण्यांसाठीं एक चाळच बांधलेली होती. त्या चाळींतील खोल्या नेहमीं पाहुण्यांनीं गजबजलेल्या असत. मिस् काऊच त्यांची बरदास्त ठेवण्यांत गढून गेलेल्या असायच्या. पुष्कळ पाहुणे न विचारतां न कळवितां एकदम येऊन उभे राहायचे. त्यांना आपण कां आलां? किती दिवस राहाणार? पत्र कां टाकलें नाहीं? असले अडचणीचे प्रश्न कधीं विचारण्यांत येत नसत. दर गाडीला धमणी स्टेशनवर जायची व पाहुणे भरून आणायची. वर्षाकांठीं पाहुण्यांची संख्या हजार दीड हजारावर जायची.

बाईंच्या पाहुण्यांत इंग्लंडमधील एखाद्या लॉर्डापासून तों भणंग भिकाऱ्यापर्यंत सर्व तऱ्हा असत. बायबलमध्यें सांगितलें आहे ना, 'कोणी भुकेला असेल तर त्याला खायला दे, तान्हेला असेल तर त्याला प्यायला दे, उघडा असेल तर त्याला वस्त्र दे, परका असेल तर त्याला घरांत घे'—हेंच बाईंचें ह्या बाबतींत ब्रीदवाक्य असे. मात्र त्या सर्वांना अगदींच हिंदी तऱ्हेनें खावें प्यावें लागे. अशीच एक यात्रेकरू एक दिवस आली. उपासानें अगदीं खंगली होती. हातापायांच्या काड्या झाल्या होत्या. अंगावर एक फाटका पंचा होता. बाईंनीं तिला ठेऊन घेतलें व विसावा घेण्याचा आग्रह केला. एक दिवसाची पाहुणी तीनचार दिवस, तीनचार दिवसांची तीन चार महिने व पुढें होतां होतां सात वर्षें ती राहिली.

हें सारें करायला बाईंजवळ अलोट पैसा होता असें नाहीं. कृष्णाबाई गद्रे लिहितात, 'रमाबाई म्हणत असत माझा हात पैसा चाळण्याची चाळणी आहे. पैसा हातांत आला कीं चाललाच.'

प्राणीमात्रावरील बाईंच्या प्रेमाच्या कितीतरी गोष्टी सांगतात त्यांपैकीं कित्येक लेखकानें प्रत्यक्ष पाहिलेल्या आहेत.

दिल्ली दरबारचा दिवस पाळीत. त्या दिवशीं जन्मलेला बाईंचा एक आवडता कुत्रा होता. त्याचें नांवच 'दरबार' ठेवून दिलें होतें. दरबारच्या

दिवशीं ह्या कुत्र्याचें महत्त्व विशेष. त्याच्या गळ्यांत फिती किंवा फुलें घालण्यांत येत. सदनांतील प्रत्येक मुलगी आपल्या पिठांतून थोडें पीठ बाजूला ठेऊन त्याची एक बारीकशी चांदकी करून बाईंना बक्षिस द्यायची. बाईंच्या खोलींत अशा चांदक्यांचा ढीग होऊन पडे. त्या दिवशीं मुक्ति-सदनांतील सर्व जनावरांना बाईंकडून फराळाचें प्रेमपूर्वक आमंत्रण असे. सर्व रस्ता गायी म्हशींनीं आणि बैलांनीं भरून जायचा. बाई प्रत्येक जनावराला नांवानें हाक मारायच्या, त्याच्या पाठीवरून हात फिरवायच्या व त्याच्या तोंडांत घास भरायच्या. मग सर्व मंडळी खुशीनें डुलत डुलत परत फिरायची.

मग बाई पक्ष्यांच्या पिंजऱ्यांत जायच्या, मोठा थोरला पिंजरा होता. त्यांत मोर, पोपट, कबुतरें इत्यादि विविध पक्षी बाईंची वाटच पाहात बसलेलीं असायचीं. येरे माझ्या मिठू, माझ्या छोटू, माझ्या चिट्टू, माझ्या मिट्टू असें म्हणून त्या त्या पक्ष्यांना गोंजारायच्या.

एक गाढवी होती. ती व्याली म्हणजे आपल्या छबकड्याला घेऊन बाईंच्या खिडकीशीं येऊन उभी राहायची. मग बाईंनीं येऊन तिच्या पाठीवरून हात फिरवायचा, तिच्या पिछाला गोंजारायचें, तिच्या तोंडांत घास भरायचा. पुढें बाई वारल्यानंतर ती अशीच आपल्या नव्या बच्चाला घेऊन आली व त्यांच्या खिडकीशीं उभी राहिली; तें दृश्य पाहून किती तरी मुलींच्या डोळ्यांत पाणी उभें राहिलें.

बाईंचा एक मोठा थोरला बैल होता. नंदीच होता तो एक. लहान वासरूं होतें, तेव्हांपासून बाईंनीं त्याचे फार लाड केले होते. केडगांवहून गाडी निघ-तांना आंत कोण बसतें आहे हें मागें तोंड करकरून तो पाहायचा, व बाई असल्या म्हणजे मोठ्या खुशीत डुलत डुलत तो चालायला लागायचा. त्याच्या गळ्यांतील घुंगुरांचा आवाज त्याची खुशी दर्शवायचा.

बाई तेथील लुळ्या पांगळ्या, फेंपरेकरी, अपंग अशा स्त्रियांना आपल्या 'मैत्रिणी' म्हणत. दरबारच्या दिवशीं ह्यांच्यासाठीं त्या स्वतः हातांनीं स्वैपाक करीत. त्यांना जेवायलाहि स्वतः वाढायच्या, मदत घ्यायचीच तर ती मनोरमा-बाईंची व कांहीं मावश्यांची.

नाताळच्या सणाची तयारी तर सहा सहा महिन्यांपासून चाले. दोन दोन हजार आश्रमवासियांपैकीं कधीं एकहि चुकून विसरलें जायचें नाहीं.

केली कीं राजसनीं एम्. ए. व्हावें, परंतु त्यांचें पहिलेंच बी. ए. च्या वेळचें 'कॉन्व्होकेशन,' रमाबाई गेल्यानंतर झालें.

बाईंच्या वेळेस केडगांवला येणाऱ्या पाहुण्यांना विशेष वाटायचें तें त्यांच्या बरोबरच गाडींतून उतरणाऱ्या असंख्य पाहुण्यांचें. हें पाहुण्यांचें लटांबर त्यांच्या बरोबरच धमण्यांत बसून बाईकडे येण्यास स्टेशनवरून निघे. बाईंच्या आदरातिथ्याला सीमा नसे. पाहुण्यांसाठीं एक चाळच बांधलेली होती. त्या चाळींतील खोल्या नेहमीं पाहुण्यांनीं गजबजलेल्या असत. मिस् काऊच त्यांची बरदास्त ठेवण्यांत गढून गेलेल्या असायच्या. पुष्कळ पाहुणे न विचारतां न कळवितां एकदम येऊन उभे राहायचे. त्यांना आपण कां आलां? किती दिवस राहाणार? पत्र कां टाकलें नाहीं? असले अडचणीचे प्रश्न कधीं विचारण्यांत येत नसत. दर गाडीला धमणी स्टेशनवर जायची व पाहुणे भरून आणायची. वर्षाकांठीं पाहुण्यांची संख्या हजार दीड हजारावर जायची.

बाईंच्या पाहुण्यांत इंग्लंडमधील एखाद्या लॉर्डापासून तों भणंग भिकाऱ्यापर्यंत सर्व तऱ्हा असत. बायबलमध्यें सांगितलें आहे ना, 'कोणी भुकेला असेल तर त्याला खायला दे, तान्हेला असेल तर त्याला प्यायला दे, उघडा असेल तर त्याला वस्त्र दे, परका असेल तर त्याला घरांत घे'—हेंच बाईंचें ह्या बाबतींत ब्रीदवाक्य असे. मात्र त्या सर्वांना अगदींच हिंदी तऱ्हेनें खावें प्यावें लागे. अशीच एक यात्रेकरू एक दिवस आली. उपासानें अगदीं खंगली होती. हातापायांच्या काड्या झाल्या होत्या. अंगावर एक फाटका पंचा होता. बाईंनीं तिला ठेऊन घेतलें व विसावा घेण्याचा आग्रह केला. एक दिवसाची पाहुणी तीनचार दिवस, तीनचार दिवसांची तीन चार महिने व पुढें होतां होतां सात वर्षें ती राहिली.

हें सारें करायला बाईंजवळ अलोट पैसा होता असें नाहीं. कृष्णाबाई गद्रे लिहितात, 'रमाबाई म्हणत असत माझा हात पैसा चाळण्याची चाळणी आहे. पैसा हातांत आला कीं चाललाच.'

प्राणीमात्रावरील बाईंच्या प्रेमाच्या कितीतरी गोष्टी सांगतात त्यांपैकीं कित्येक लेखकानें प्रत्यक्ष पाहिलेल्या आहेत.

दिल्ली दरबारचा दिवस पाळीत. त्या दिवशीं जन्मलेला बाईंचा एक आवडता कुत्रा होता. त्याचें नांवच 'दरबार' ठेवून दिलें होतें. दरबारच्या

दिवशीं ह्या कुत्र्याचें महत्त्व विशेष. त्याच्या गळ्यांत फिती किंवा फुलें घालण्यांत येत. सदनांतील प्रत्येक मुलगी आपल्या पिठांतून थोडें पीठ बाजूला ठेऊन त्याची एक बारीकशी चांदकी करून बाईंना बक्षिस द्यायची. बाईंच्या खोलींत अशा चांदक्यांचा ढीग होऊन पडे. त्या दिवशीं मुक्ति-सदनांतील सर्व जनावरांना बाईंकडून फराळाचें प्रेमपूर्वक आमंत्रण असे. सर्व रस्ता गायी म्हशींनीं आणि बैलांनीं भरून जायचा. बाई प्रत्येक जनावराला नांवानें हाक मारायच्या, त्याच्या पाठीवरून हात फिरवायच्या व त्याच्या तोंडांत घास भरायच्या. मग सर्व मंडळी खुशीनें डुलत डुलत परत फिरायची.

मग बाई पक्ष्यांच्या पिंजऱ्यांत जायच्या, मोठा थोरला पिंजरा होता. त्यांत मोर, पोपट, कबुतरें इत्यादि विविध पक्षी बाईंची वाटच पाहात बसलेलीं असायचीं. येरे माझ्या मिठू, माझ्या छोटू, माझ्या चिट्ठू, माझ्या मिट्ठू असें म्हणून त्या त्या पक्ष्यांना गोंजारायच्या.

एक गाढवी होती. ती व्याली म्हणजे आपल्या छबकड्याला घेऊन बाईंच्या खिडकीशीं येऊन उभी राहायची. मग बाईंनीं येऊन तिच्या पाठीवरून हात फिरवायचा, तिच्या पिल्लाला गोंजारायचें, तिच्या तोंडांत घास भरायचा. पुढें बाई वारल्यानंतर ती अशीच आपल्या नव्या बच्चाला घेऊन आली व त्यांच्या खिडकीशीं उभी राहिली; तें दृश्य पाहून किती तरी मुलींच्या डोळ्यांत पाणी उभें राहिलें.

बाईंचा एक मोठा थोरला बैल होता. नंदीच होता तो एक. लहान वासरूं होतें, तेव्हांपासून बाईंनीं त्याचे फार लाड केले होते. केडगांवहून गाडी निघतांना आंत कोण बसतें आहे हें मागें तोंड करकरून तो पाहायचा, व बाई असल्या म्हणजे मोठ्या खुशीत डुलत डुलत तो चालायला लागायचा. त्याच्या गळ्यांतील घुंगुरांचा आवाज त्याची खुशी दर्शवायचा.

बाई तेथील लुळ्या पांगळ्या, फेंपरेकरी, अपंग अशा स्त्रियांना आपल्या 'मैत्रिणी' म्हणत. दरबारच्या दिवशीं ह्यांच्यासाठीं त्या स्वतः हातांनीं स्वैपाक करीत. त्यांना जेवायलाहि स्वतः वाढायच्या, मदत घ्यायचीच तर ती मनोरमा-बाईंची व कांहीं मावश्यांची.

नाताळच्या सणाची तयारी तर सहा सहा महिन्यांपासून चाले. दोन दोन हजार आश्रमवासियांपैकीं कधीं एकहि चुकून विसरलें जायचें नाहीं.

अगदीं आठवून आठवून प्रत्येकासाठीं कांही ना कांहीं तरी बक्षिस बांधून ठेवण्यांत येई. इतक्या मुली व इतक्या बाया तेथें होत्या तरी प्रत्येकीचें नांव व खडा न् खडा माहिती बाईंना असे, व मुलींना तेंच फार आवडे. बाई आपल्याला कधीं विसरत नाहींत ही कल्पनाच त्यांना केवढी सुखदायक वाटायची.

केडगांवला आलेला पाहुणा जर कशानें थक्क होऊन जात असेल तर तो रमाबाई ह्या व्यक्तीनें.

बाईंची मूर्ति ठेंगणी, किंचित स्थूल, मोठे व अत्यंत तेजस्वी निळसर पिंगट डोळे, रंग गोरा गोरा पान, वाणी हृदयाला भिडून जाणारी, मानेपर्यंत कापलेले त्यांचे ते केस हीं सारीं त्यांना विशेषच भव्यता आणीत. मुखावर बुद्धिमत्तेची व पावित्र्याची झांक असल्यानें कांहीं वेळ त्यांच्याकडे पाहातच राहावें असें वाटे. त्यांच्या नाजुक गुलाबी पावलांकडे पाहून मिस् फुलर आश्चर्यानें म्हणायच्या, ह्याच का पायांनीं चार हजार मैल अनवाणी प्रवास केला असेल? बाईंचा सर्वांना फार दरारा वाटे. पण गंमत अशी कीं दरारा वाटत असला तरी भीति वाटत नसे.

बाई कमालीच्या साध्या होत्या. त्यांचें वर्णन कृष्णाबाई गद्र्यांनीं केलें आहे. रमाबाईंचें स्वतःचें खातें पोतें कांहींच नव्हतें. दोनतीन रुपयांवालीं पांढरीं शुभ्र पातळें, पांढऱ्या चोळ्या, पायांत पुणेरी जोडा. एक हिरवी छत्री, हातांत सदा एक कातडी पाकीट, त्यांत चष्मा, दोन सदा प्रवाही टाक, दोन पेन्सिली, एखादें रबर, कीं झाल्या त्या कामाला तयार. त्यांची मुलगी मनोरमाहि आई-प्रमाणेंच साधी होती. ती कधीं रेशमी साडी नेसली नाहीं. सदनांतील इतर मुली वापरायच्या तसे बांड ती नेहमीं वापरायची.

झरोक्यांतून पाहिलें तर असें दिसतें केडगांव.

# २३ मनोरमा

पंडिता रमाबाईंचें संपूर्ण चरित्र आश्चर्यांनीं भरगच्च भरलेलें. त्यांत 'मनोरमाबाई' ह्या एका आश्चर्याची प्रामुख्यानें गणना करायला हवी. रमाबाईंच्या भोंवतीं विहरणाऱ्या ग्रहतारांदिकांत मनोरमा शुक्राच्या चांदणीसारखी शोभावयाची. रमाबाईंनीं तिला भर उन्हाळ्यांत काचारहून मद्रासपर्यंत व तेथून पुढें पुण्यापर्यंत हिंडविलें. त्या वेळेस तिचें वय अवघें आठ महिन्यांचें होतें.[1] बाई आपल्या इंग्लंडचा प्रवास ह्या पुस्तकांत म्हणतात :

"बरें, मुलीला तिच्या आईनें 'भुईवर ठेवलें तर मुंगी चावेल, आणि अधांतरीं ठेवलें तर कावळा नेईल,' अशी आशंका करून अगदीं नाजुकपणानें वाढविली आहे असेंहि नाहीं. मुलीचें वय आठ महिन्यांचेंहि सुरू झालें नाहीं तोंच तिची आई तिला घेऊन ऐन उन्हाळ्यामध्यें हिंदुस्थाच्या एका कोपऱ्यापासून दुसऱ्या कोपऱ्यापर्यंत प्रवास करून आली आहे. ह्या प्रवासांत मुलीच्या प्रकृतीचा बराच परिचय झाला आहे. तिला येथील इंग्लंडमधील हवा मानवणार नाहीं असें मला वाटत नाहीं."[2] पुण्यास आल्यावर एकदोन वर्षांत बाईंनीं मनोरमेसह इंग्लंड गांठलें होतें. तेथून दोनतीन वर्षांत मुलीला पाठीशीं बांधून त्या अमेरिकेला जाण्यास निघाल्या. तेथें पोहंचल्यावर किंचित्कालानें एका जहाजावरच्या कारभारणीबरोबर (Stewardess) तिला एकटीला एवढ्या लहान वयांत इंग्लंडला पाठवून दिली. अमेरिकेंत रमाबाईंचा सर्व वेळ अभ्यासांत, व्याख्यानांत व प्रवासांत जाऊं लागल्यानें मुलीच्या अभ्यासाची हेळसांड होऊं नये म्हणून त्या शूर स्त्रीनें हेंहि दिव्य

---

१. Manoramabai Mary Medhavi. पृष्ठ १३.

२. पंडिता रमाबाई ह्यांचा इंग्लंडचा प्रवास.

केलें. दोघीहि मायलेकींचा अभ्यास अशा रीतीनें सुरळितपणें चालणार होता. आई तिशीच्या घरांतली तरणी बांड महाराष्ट्रीय स्त्री तर कन्या पांच सहा वर्षांची, अज्ञ वालिका. एकमेकींपासून हजारों मैलांच्या अंतरावर व आपल्या मायभूमीलाहि दूर कोठल्या कोठें सारून आपले अभ्यासक्रम करूं लागल्या.

ह्यानंतर कांहीं वर्षांनीं रमाबाई जपान मार्गानें भारतांत परत आल्या. मनोरमा अद्याप इंग्लंडांतच होती. आईला भेटायला तिला परत भारतांत आणली तेव्हां येथें आल्यावर तिला सारें कांहीं नवीन वाटूं लागलें. मराठी अजिबात येत नव्हतें. इकडच्या रीतीभातीहि तिला वेगळ्याच वाटत. त्या वेळेस फुलर उपनांवाचें एक अमेरिकन मिशनरी कुटुंब कांहीं दिवसांसाठीं रमाबाईंकडे येऊन राहिलें होतें. त्यांची मुलगी लुशिया[२] इंग्रजीपेक्षां मराठीच अधिक चांगलें बोलायची. मराठी रीतीरिवाजहि तिच्या अंगीं अगदीं भिनून गेले होते. तिची व मनोरमेची मोठी गट्टी जमली. मनोरमेला इंग्रजी रीतीरिवाजांतील बारकावे किती ठाऊक होते ह्याचें वर्णन लुशियाबाई एका आठवणींत सांगतात :

"एक दिवस माझें पोट दुखत होतें, तेव्हां मी मनूला म्हणालें 'माझें आज किनी पोट दुखतें आहे.' त्यावर तोंडावर हात ठेऊन ती म्हणाली 'असें बोलूं नये! शिष्टसमाजांत पोटाचा उल्लेख करीत नाहींत?' 'मग मी माझें पोट दुखतें आहे हें सांगायचं तरी कसं बाई?' 'माझ्या पदराखालीं दुखतं आहे असं स्त्रियांनीं म्हणावं (Pain under my apron) आणि पुरुषांनीं माझ्या पट्ट्याखालीं दुखतं म्हणावं (Pain under my belt) डॉक्टर लोकांनींच तेवढा पोटाचा उल्लेख आपल्या रोगपरीक्षेंत केला तर हरकत नाहीं.'

वरील संभाषणानें मीं अगदीं स्तंभितच होऊन गेलें. इकडे हिंदुस्थानांत किंवा अमेरिकेंतहि "पोट" ह्या शब्दानें कोणाची एवढी ओशाळल्यागत स्थिति होत नाहीं. तो केवळ सूक्ष्म असा एक इंग्रजी संप्रदाय होता.

मनोरमेला मराठी मुळींच येत नव्हतें पण ती फार बुद्धिमान असल्यानें अगदीं लवकर तिनें मराठी शिकून घेतलें. पण त्या भाषेंतले पुष्कळ बारकावे तिच्या चटकन ध्यानांत येत नसत. एकदां मामी[१] अगदींच माजघरांतलें असें

---

१. मनकर्णिका रामशास्त्री डोंगरे; रमाबाईंची भावजय. मनोरमाबाईंची मामी म्हणून, साऱ्या केडगांवांत त्या 'मामी' म्हणूनच शेवटपर्यंन ओळखल्या जात.

२. रमाबाईंच्या एक इंग्रजी चरित्र लेखिका.

कांहीं मराठी वाक्य तिच्याशीं बोलल्या. तिला तें कळलें नाहीं. तिनें काय म्हणून पुन्हा विचालें. त्यावर "अग, तुला नाहीं कळायचं तें" असं कांहीं बोलून त्या तेथून चटकन निघून गेल्या. ह्यावर ताई किती हिरमुसल्या झाल्या. त्यांचा तो गोरामोरा चेहरा मी कधीं विसरलें नाहीं." असें मिस् फुलर म्हणतात.

"ताईंना जरी मराठी येत नव्हतें व त्या जरी आचारानें संपूर्णपणें इंग्रजी बनल्या होत्या तरी त्यांचा महाराष्ट्रीय बाणा व बंगाली लकब ही त्यांच्यांत कशी तरी कायम राहिली होती. त्याच सुमाराला आमच्याकडे बंगालमधील दोन मिशनरी पाहुणे आले होते. त्यांनीं ताईंना पूर्वी कधीं पाहिलेलें नव्हतें कीं त्यांचे वडील बंगाली होते हेंहि त्यांना ठाऊक नव्हतें. ताई इकडे येतांच साडी नेसूं लागल्या होत्या. ह्या मिशनरींनीं त्यांना दुसऱ्या कांहीं मुलींबरोबर चालतांना पाठमोरें पाहिलें, व एकदम माझ्या आईला त्यांनीं प्रश्न केला कीं ही बंगाली मुलगी येथें कोठून आली? माझ्या आईला ह्या प्रश्नाचें मोठें आश्चर्य वाटलें. तिनें त्यांना विचारलें तुम्हांला कसें कळलें ती बंगाली आहे म्हणून? ती सातआठ महिन्यांची होती तेव्हांच तिनें बंगाल सोडलें आणि आतां तिला बंगालची कांहीं एक माहिती नाहीं. तिचे वडील बंगाली होते. पण हें तुम्हीं कसें ओळखलें?"

ह्यावर त्या मिशनरींनीं सांगितलें कीं तिची चालण्याची ढब अगदींच बंगाली स्त्रियांसारखी आहे. ताईंनी बंगाली स्त्रियाच कधीं पाहिल्या नव्हत्या तर त्यांची चालण्याची ढब तिला कोठली माहिती असणार?

भारताचा वाराहि बालपणापासून न लागलेल्या ह्या मुलीच्या अंगीं जितकें भारतीयत्त्व भिनलें होतें तितकाच तिच्यांत तिला अगदीं न कळत वंगीयपणाहि भिनला होता, असेंच म्हणावें लागतें.

मनोरमेला आपले वडील पाहिलेले आठवत नव्हतें. मात्र त्यांच्या आठवणींचें काल्पनिक चित्र तिच्या मनाला मोठा आनंद देत असलें पाहिजे. एका डायरींतून हळूच सोडवून घेतलेलें एक पान तिनें आपल्या जिवापलीकडे जपून ठेवलें होतें. त्यावर स्पष्ट अक्षरांत तिच्या वडलांनीं लिहून ठेवलें होतें,

> 'Saturday, April 16th Easter Eve, child born at
> 10 minutes to 8 p.m.'[1]

१. शके १८०३: वृषभनाम संवत्सरे, माहे चैत्र, कृष्ण द्वितिया. वार शनिवार : १६ एप्रिल १८८१.

हा ठेवा तिनें आपल्या आयुष्यभर संभाळला होता, व त्याकडे पाहिल्यावर तिचें केवढें समाधान व्हायचें.

मुलगी झाली, मुलगा झाला नाहीं, म्हणून तिच्या आईवडिलांपैकीं एकालाहि खेद वाटला नाहीं कीं खंत वाटली नाहीं. कदाचित् त्यांना मुलीचीच हौस असल्यानें त्यांनीं तिचें नांवहि मनोरमा ठेवलें असेल.

मनोरमा होतीहि अत्यंत गोड मुलगी. वँटेज येथील 'सिस्टर्स' ना ती एक मोठा ठेवा वाटे, अमेरिकेंतून आईला सोडून हजारों मैलांवरून ती परत इंग्लंडला आली होती व तिला त्या 'सिस्टर्सनीं' कांहीं कमी पडूं दिलें नाहीं. कारण ती अत्यंत मनोरम मुलगी होती. महाराष्ट्र व बंगाल ह्या दोन्ही देशांतील उत्तमोत्तम गुणांचा समुच्चय तिच्या अंगीं होता.

रमाबाई वँटेजमध्यें गेल्यावर इंग्रजीच्या अभ्यासास त्यांनीं सुरुवात केली. वँटेज मधील सिस्टर्सनीं लहानग्या 'मनू' चा सांभाळ करण्याचें आपल्या अंगावर घेतलें. वँटेज येथें लहान मूल एकहि नव्हतें. लहान मुलें तेथें कधींच ठेऊं देत नसत. कारण तो एक कॉन्व्हेंट म्हणजे मठ होता. कान्व्हेंट म्हणजे जेथें सर्वसंग परित्याग करून ख्रिस्त सेवेसाठीं व लोककल्याणासाठीं आपलें आयुष्य वेंचणाऱ्या मठवासिनी राहतात तें ठिकाण. अशा कॉन्व्हेंटमध्यें लहान मुलींना मठवासिनी म्हणून थोडाच प्रवेश मिळतो? परंतु रमाबाईंच्या व त्यांच्या मुलीच्या आयुष्यांत सारेंच कांहीं लोकविलक्षण असल्यानें हीहि एक लोकविलक्षण गोष्ट घडली कीं मठवासिनी नसतांना ह्या मुलीला तेथें राहण्यास मिळालें व तेंहि अगदीं बाळपणीं. साऱ्या मठांत हीच काय ती एकुलती एक लहान मुलगी असल्यानें तिचें तेथें मोठें कौतुक व्हायचें. पण त्या कौतुकानें मुलगी लाडावून जाऊं नये इकडेहि डोळ्यांत तेल घालून पाहण्यांत येत असे.

रमाबाई इंग्लंडमध्यें होत्या तेव्हांपासूनच ह्या मठवासिनी भगिनींनीं 'मनू'चें सर्व काम आपल्या अंगावर घेतलें. त्या तिला 'मनो' म्हणत. रमाबाईंना आतां अभ्यासाला मोकळा वेळ मिळूं लागला. मनूचें त्यांना कांहीं करावें लागत नसे. ती फारशी सशक्त नव्हती. त्यामुळें त्या मठवासिनी भगिनींना तिची विशेषच काळजी घ्यावी लागे. त्या वेळेस इंग्लंडमधील उच्चकुलोत्पन्न व उच्च शिक्षण घेतलेल्या 'भगिनी' तेथें होत्या. त्या सर्वजणी

परक्या असूनहि स्वतःच्या मुलांचें कोणीं आईनें करावें त्यापेक्षां अधिक त्यांनीं रमाबाईच्या ह्या लहानग्या मनूचें केलें.

त्या 'भगिनीं' पैकीं एक सिस्टर जिराल्डाईन मनूला फार आवडे. तिला 'डिअर ओल्ड ग्रॅण्मा' म्हणे. आपल्या ह्या 'प्रिय वृद्ध आजीबाईंच्या' मांडीवर बसून तिनें येशूबद्दल कितीतरी गोड गोड गोष्टी ऐकल्या. रमाबाई मनूला 'बॉबी' म्हणत. 'बेबीचें' लाडे लाडे 'बॉबी' झालें होतें. १८८६मध्यें रमाबाई आपल्या 'बॉबी'ला घेऊन अमेरिकेला गेल्या. त्या अजून तिला 'बॉबी'च म्हणत असत. आणि खरोखरच ती 'बेबी' नाहीं तर काय होती? १६ एप्रिल १८८१ चा तिचा जन्म व ६ मार्च १८८६ ला रमाबाई तिला घेऊन अमेरिकेला आल्या. म्हणजे 'मनू'चें वय तेव्हां पुरें पांच वर्षांचेंहि नव्हतें. रमाबाईंनाच काय पण कोणालाहि ती 'बेबी' वाटली असती. ह्या बेबीनें पांचवें वर्ष पुरें व्हायच्या आंत इंग्लंडहून अमेरिकेचा प्रवास केला व सव्वा पांच वर्षांची असतां 'स्टुवर्डेस' बरोबर अमेरिकेहून इंग्लंडचा परत प्रवास केला.

इंग्लंडला पोंचतांच, दुसऱ्या दिवशीं म्हणजे दि. ५ ऑगस्ट १८८६ रोजीं 'बेबीच्या' 'डियर ओल्ड ग्राण्डमा'नें रमाबाईंना पत्र टाकलें.

'आपली आवडती कन्या काल येथें आमच्या हातीं आली. तिला पाठविणें आपल्या जिवावर आलें असेल ह्यांत कांहीं शंका नाहीं. आपण म्हणतां ती निघाली तेव्हां तिची प्रकृति छानदार होती. पण ती जरा वाळलेली दिसते, त्यावरून प्रवासांत तिला त्रास झाला असावा. मी तिला डॉक्टरला दाखविणार आहें.' ह्या पत्रावरून तेथील 'भगिनी मंडळ' 'बेबीची' केवढी काळजी वाहात असत हें दिसून येईल. आपली लहानगी 'शोक-हरिणी व मनोरमा' आपल्यांत परत आलेली पाहून तेथील प्रत्येक आश्रम-वासिनीला अत्यानंद झाला. त्या तिला आपला 'Little Comforter & Heart's Joy' म्हणत.

त्या पोरीलासुद्धां फिरून आपल्या आजीबाईच्या मांडीचा आसरा मिळाला म्हणून खूप समाधान वाटलें. तिनें आतां आपल्या 'डियर ओल्ड ग्र्याण्डमा'ला 'आजीबाई' असें मराठी नांव दिलें होतें. तिच्या सौख्यांत एकच कमतरता होती आणि ती म्हणजे तिची आई तिच्याजवळ नव्हती. तिचें आपल्या

आईवर फार प्रेम होतें. परंतु जात्या तिचा स्वभावच आनंदी असल्यानें ती कसल्याहि परिस्थितींत सुख मानून घेण्यासारखी होती. त्यांतल्या त्यांत तिला एक नवा गमतीचा खेळ आतां मिळाला होता. तो म्हणजे पत्रलेखनाचा. दर आठवड्याला ती आतां आपल्या आईला पत्र लिही. पत्र कधीं कधीं ती स्वतःच लिही तर कधीं कधीं कोणी तरी तिचा हात आपल्या हातांत घेऊन तें लिहवून घेई.

एका पत्रांत ती लिहिते : "प्रिय आईः मी पांचदां शाळेला गेलें. त्यांतील तीन (दिवस) मला आवडले, दोन आवडले नाहींत." दुसरें एक पत्र तिनें सुरू करून दुसरेच कोणीं तें तरी संपविलें होतें. "मी फ्रेंच, गायन आणि कसरत शिकतें. शाळेंत मला जेवण मिळतें व जेवणाच्या अगोदर थोडा वेळ आम्ही बाहुलीचा बंगला बंगला खेळ खेळतों."

पुष्कळदां पत्राचा शेवट असा होत असे :

"मी तुला साठ प्रेमें व चुंबनें पाठवितें." कधीं कधीं हीं प्रेमें व चुंबनें कमी जास्त होत. पत्राचा शेवट असा व्हायचा :

"तुझें प्रेमळ. बाळ मनू" एका पत्राचा शेवट असा आहेः "सिस्टर मे तुला प्रेमाचा एक लठ्ठसा तुकडा पाठवीत आहे, मी पण पाठवीत आहें. माझे प्रेम त्याहिपेक्षां लठ्ठ आहे." साऱ्या पत्रांतून त्या बाळीच्या अशाच गमती गमती पाहायला सांपडतात. कधीं ती आपल्या "कुटुंबा" संबंधीं म्हणजे बाहुल्यांसंबंधीं लिहायची, पुष्कळ वेळेला बागेंत एकटीच झाडांफुलांशीं ती गप्पागोष्टी करतांना आढळे. कधीं कधीं तिच्याशीं खेळायला "सिस्टर्स" तिच्या वयाच्या मुलींना बोलावीत व वनभोजनाचा थाट उडवून देत. एकदां दोनदां ती "रेक्टरी" मध्यें राहायला गेली होती. तेथें तिच्या वयाचीं पुष्कळ मुलें होतीं. त्या मुलांना ही लहानगी हिंदु पोरगी "Little Hindu girlie" फार आवडली. त्यांचें व तिचें चांगलें जमे. हिवाळ्यांत बर्फाचे गोळे करून फेंकण्याचा खेळ तिला फार आवडे, तसेंच समुद्रकांठची सहल तिला फार आवडे. "आपल्या लाडक्या पौर्वात्य कन्येसाठीं" त्या वाटेल तें करावयाला तयार असत. वँटेज येथील भगिनीवर्गानें तिला "Daughter of the Esst" म्हणजे "पौर्वात्य कन्या" असें नांव दिलें होतें.

'मेरी ख्रिस्टमस' 'रमा' 'ह्यारियेट' 'स्नो ड्राप' अशीं तिच्या मुलींचीं म्हणजे

बाहुल्यांचीं नांवें होतीं. त्यांना बागेंत एखाद्या झाडाखालीं बसवून ती वारंवार कांहीं कांहीं शिकवितांना आढळे. एकदां ती त्यांना खोटें बोलण्याच्या पापाविरुद्ध उपदेश करतांना आढळली, झाल होतें काय कीं त्या दिवशीं ती आपल्या आयुष्यांत प्रथमच खोटें बोलली होती. तिच्या लाडक्या आजीबाईंनीं तिला मांडीवर घेऊन खोटें बोलणें किती वाईट आहे ह्याविषयीं समजावून सांगितलें होतें. तिला आपल्या खोटें बोलण्यानें "आजीबाईंना" इतकें वाईट वाटलें तें पाहून रडूंच आलें; मग तिनें आपल्या सगळ्या बाहुल्यांना "खोटें कधीं बोलूं नये" वर व्याख्यान दिलें.

मनोरमा जसजशी मोठी होऊं लागली तसतसा तिचा अभ्यास वाढूं लागला. ती वरच्या वर्गांतून शिकूं लागली. तिचा आरंभीचा बहुतेक अभ्यास इंग्लंड व अमेरिका येथें झाला. अमेरिकेंतील एका शाळेंत तिनें तीन वर्षें काढलीं. मधून मधून भारतांत येऊन ती आईला भेटून जात असे. मध्यंतरीं शारदासदन पुण्यांत असतांना मनोरमेला पुण्यांत आणून मुलींच्या "एपिफनी" नांवाच्या शाळेंत ठेवलें होतें. तेथेंच ती रहायची. तेथें ती १८९४ सालीं होती. ह्या शाळेच्या वसतिगृहांत ४० विद्यार्थिनी राहात असत. त्यांच्याबरोबर एक सिस्टर राही. पंच हौद मिशनला लागूनच ही शाळा होती. शिक्षणाचें माध्यम इंग्रजी होतें. मराठी नीटसें कळत नसल्यानें मनोरमाबाईंना ह्या शाळेंत घातलें होतें. त्याचमुळें मद्राससारख्या दूर दूरच्या ठिकाणाहून मुली येथें येत. मिसेस पॉल अप्पासामीहि बाळपणीं ह्या शाळेंत होत्या. तेथें पंडिताबाई मनोरमेला भेटायला येत. येतांना त्या तेथल्या सगळ्या मुलींसाठीं खाऊ आणीत असें त्या वेळच्या ह्या एक विद्यार्थीण श्रीमती ई. एस्. अप्पास्वामी सांगतात. मनोरमाबाई त्यानंतर पुन्हा इंग्लंडला गेल्या असें दिसतें. कांहीं काळ त्या कोल्चेस्टर येथील एका शाळेंत होत्या. त्यांचें पहिलें "मिशनरी" भाषण त्यांनीं त्या ठिकाणीं केलें. दुसऱ्या एका प्रसंगीं इंग्लंडमध्यें गेल्या असतां त्यांनीं नॉर्थ लंडन कॉलिजिएट स्कूल मध्यें कांहीं काल अभ्यास केला. अमेरिकेंतहि त्यांनीं दोनतीन वर्षें राहून अभ्यास केला. पण त्यांना परदेशांत अधिक काळ राहणें अशक्य झालें, कारण पंडिता रमाबाई मध्यंतरीं बऱ्याच आजारी पडल्यानें मनोरमाबाईंना भारतांत परत यावें लागलें. ह्या वेळेस त्या केडगांवला आल्या. बाई ह्या वेळपर्यंत केडगांवला स्थिरस्थावर झाल्या होत्या. आपल्या

मागें आपलें काम आपल्या मुलीनें चालवावें अशी सहाजिकच बाईंची इच्छा होती. त्याप्रमाणें शारदासदनाचें काम त्यांनीं मुलीवर सोंपविलें. शारदासदन आतां निराळ्या पायावर उभारलें होतें. त्या संस्थेकडे केडगांवची शिक्षणाची बाजू सोंपविण्यांत आली होती. मनोरमाबाईंना इंग्लंड अमेरिकेंतील शिक्षण-पद्धतीचा अनुभव होता. व तेवढ्यावर त्यांनीं शारदासदन आपल्या हातीं घेतलें.

पण आपण इकडल्या शिक्षणपद्धतीला मान्य असलेल्या पदव्या प्राप्त करून घेतल्याशिवाय एवढी मोठी जबाबदारी अंगावर घेणें योग्य नाहीं, असें त्यांचें मन त्यांना एकसारखें टोंचीत होतें. त्यांनीं आपलें काम संभाळून अभ्यास करण्याचें ठरविलें. पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्यें नांव दाखल केलें व अगदीं पुनः पहिल्यापासून अभ्यासाला सुरुवात केली. रोज केडगांवांतील कामाची व्यवस्था लावून मोटार स्वतः चालवून त्या पुण्यास जात. कॉलेजमधील त्या त्या दिवसाचें काम संपवून परत स्वतः मोटार हाकून घरीं केडगांवास येत व आल्याबरोबर शारदासदन शाळेच्या कामांत गढून जात. मग रात्रीं अपरात्रीं बसून अभ्यास करीत व शारदासदनाचा हिशेब वगैरे किचकट काम उरकीत. पुणें केडगांवचें जाऊन येऊन ६८ मैल रोज ड्रायव्हिंगचे शारीरिक श्रम करीत ते वेगळेच. मनोरमाबाई बी. ए. झाल्या. शिक्षक सनदहि त्यांनीं नंतर कोठून तरी मिळविली होती व पुढें एम्. ए. होण्याची तयारी करूं लागल्या. त्यांनीं त्याहि परीक्षेसाठीं बराच अभ्यास केला होता असें दिसतें पण कामाच्या नव्या नव्या जबाबदाऱ्या अंगावर पडून व प्रकृति अधिकाधिक ढासळूं लागल्यानें त्यांचें तें शिक्षण पुरें झालें नाहीं.

त्यांच्या एम्. ए. च्या अभ्यासासंबंधीं श्रीमती पॉल अप्पास्वामी लिहितात:

' १९१८ सालीं मनोरमाबाई मजबरोबर कोडीला आल्या. त्या आमच्याकडे एक महिनाभर होत्या. त्या माझ्या पतीकडून एम्. ए. च्या अभ्यासक्रमाच्या पुस्तकांसंबंधीं नेहमीं सल्लामसलत घ्यायच्या. झोप येत नसली म्हणजे त्या रात्र रात्र वाचीत बसायच्या. गेल्या २५ वर्षांच्या आपल्या कार्यासंबंधीं त्या मला वारंवार सांगत. मुक्तींत, केडगांवला व गुलबर्ग्याला किती तरी मुलींच्या तारणासाठीं आपण झटलों व आपणास त्यांत कसें कसें यश आलें वगैरे त्या सांगत. त्या वेळेस त्यांना बरें वाटत नव्हतें. आपण आपल्या तारणाऱ्या समवेत राहण्यास जाण्याची आपली कशी तयारी झालेली आहे तें त्या सांगत.

त्यांना जडलेला व्याधी फार क्लेशकारक होता. त्यांचें डोकें कमालीचें दुखायाचें. आम्ही त्यांना ताबडतोब डॉक्टरला दाखविलें. त्यांच्या व्याधीला कोडी हें ठिकाण अत्यंत वाईट असें डॉक्टरांनीं सांगितल्यावरून त्या परत केडगांवला गेल्या. कोडी समुद्रसपाटीपासून ७५०० फूट उंचीवर असल्यानें त्यांच्या हृदयविकारास तें ठिकाण फार कुपथ्यकारक होतें. ”

१९१८ सालची ही गोष्ट आहे. त्याच्या आधीं १५-२० वर्षें मनोरमाबाईंनीं आपल्या आईबरोबर व आईचा भार हलका करावा म्हणून अत्यंत श्रम केले. त्यांचें आपल्या आईवर अतिशय प्रेम होतें. लहानपणीं आईला सोडून त्यांनीं इंग्लंडमध्यें व अमेरिकेंत आपला पुष्कळसा काळ कंठिला होता तरी आई त्यांच्या एकसारखी डोळ्यांपुढें असे. लहानपणीं एकदां त्या अमेरिकेंत गेल्या असतां कोणीं त्यांना प्रश्न केला, “अमेरिकेंत तुम्हांला सर्वांत अधिक कोण आवडतें ?” तेव्हां त्यांनीं चटकन उत्तर केलें, “ कसला हा प्रश्न ? येथल्या कोणाहिपेक्षां मला माझी आई अधिक आवडते. ”[१]

आई आजारी आहे हें ऐकतांच आपल्या परदेशांतील अभ्यासक्रमाला तिलांजलि देऊन त्या इकडे आल्या व एकदम कामाला लागल्या. तीन वर्षें त्यांनीं तेथील कॉलेजांत आपला अभ्यासक्रम पुरा केला होता. पण तो अर्धवट सोडून त्या आईसाठीं परत आल्या. येथें पोंचल्यावर त्यांच्या आयुष्यांतील कार्याला सुरुवात झाली व त्यांनीं आपलें काम जिवाची पर्वा न करतां व एक क्षणाचा विसांवा न घेतां सतत शेवटल्या घटकेपर्यंत केलें.

त्यांनीं शारदा सदनाचें काम आपल्या हातीं घेतलें. शारदा सदन अद्याप पुण्यासच होतें. शिक्षक म्हणून त्यांना जणूं कांहीं उपजतच देणगी होती. गुळाच्या ढेपेला मुंग्या चिकटाव्या तशा मुली त्यांना चिकटायच्या. मनोरमाबाईंना सगळ्याजणी “ताई” म्हणत. “ताई” चीं बोटें धरून एकीकडे पांच व दुसऱ्या हाताला पांच मुली चालायच्या, शिवाय मागेंहि मुलींचा घोळका असायचाच. आपण आपल्या ताईला अगदीं चिकटून असावें असें प्रत्येकीला वाटायचें. हा घोळका शाळेच्या बागेंतून फेरफटका मारतांना पाहून पाहाणाऱ्यांना मोठें कौतुक वाटायचें. ही गोष्ट १९०० सालांतली आहे. “ताई” नीं

१. Manoramabai Mary Medhavi. पृष्ट १६

आपल्या आईचें दुसरें मोठें ओझें हलकें केलें तें पत्रव्यवहाराचें. आतां ताई रमाबाईंचा बहुतेक पत्रव्यवहार डोळसपणें करूं लागल्या होत्या. अध्यापन, पत्रव्यवहार व शाळेची सुव्यवस्था ह्या बाबतींत "ताई"नीं कमालीचें कौशल्य दाखविलें.

शारदा सदन पुण्याहून केडगांवला आणल्यानंतर "ताई" एका पाश्चात्य कामकरी भगिनीबरोबर ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंडचा दौरा करायला गेल्या. त्या देशांत त्यांनीं ठिकठिकाणीं प्रार्थनामंडळें स्थापन केलीं. ह्या वेळीं ताईंचें वय केवळ २२ वर्षांचें होतें. म्हणजे ज्या वयांत त्यांच्या मातेनें कलकत्ता व सारा भारत हालविला त्याच वयांत त्यांच्या ह्या आवडत्या लेकीनें ऑस्ट्रेलिया आणि सारे पाश्चात्य देश हालविले. एक ऑस्ट्रेलियन वर्तमानपत्र त्यांच्या विषयीं लिहितें:

"मनोरमाबाई ही एक केवळ २२ वर्षांची गोड मुलगी आहे. आपल्या मातृभूमीहून अधिक काळ त्यांनीं इंग्लंड व अमेरिकेंत काढला आहे. तेथेंच त्यांचें शिक्षण झालें. त्या फार चांगलें इंग्रजी बोलूं शकतात व त्यांच्या भाषणानें श्रोत्यांवर ताबडतोब एक प्रकारची मोहिनी पडते. १९०० सालीं त्या अमेरिकेहून भारतांत तेथील "शारदा सदनाचें" काम अंगावर घेण्यासाठीं परतल्या. आपल्या मातेबरोबर त्या तेथील कामाचा बोजा आतां उचलीत आहेत. त्या त्यांच्या पत्रव्यवहाराचाहि भार वाहतात. तेथील कामाची धुरा आपल्या शिरावर घेण्याच्या तत्परतेमुळें त्यांच्या मातोश्रींना आपल्या कामांत नवचैतन्य प्राप्त झालें आहे. त्या येथें आल्या तेव्हां आम्ही त्यांचा आदर केला तो त्यांच्या मातेसाठीं परंतु आतां त्यांनीं स्वतःच्याच अंगच्या गुणांमुळें आम्हांला त्यांच्यावर प्रेम करण्यास लावलें आहे. जेथें कोठें त्या जातील तेथें तेथें परमेश्वराचा अनुग्रह त्यांच्या पाठीशीं असो, अशी आम्ही प्रार्थना करतों."

बाविसाव्या वर्षी मनोरमाबाई ऑस्ट्रेलियांत गेल्या होत्या. ह्याच वयांत रमाबाईंचें लग्न होऊन त्या संसारांतहि पडल्या होत्या. तेव्हां असा एक विचार चटकन मनांत येऊन जातो, कीं मनोरमाबाईंच्या लग्नाचा विचार त्यांच्या किंवा त्यांच्या आईच्या डोक्यांत कधीं आलाच नाहीं का? हीं दोन्हीं चरित्रें वाचतांना केवळ एकाच वेळेला बाईंच्या एका उल्लेखावरून मनोरमाबाईंच्या

लग्नाची गोष्ट अगदींच अशक्यतेच्या कोटींतील होती असें नव्हतें असें वाटतें. १८९३ मध्यें उपस्थित झालेला शारदासदनासंबंधींचा वाद १९०२ पर्यंत धुमसत होता असें दिसतें. आतां इकडच्या सल्लागार मंडळीचा कांहीं एक संबंध उरला नव्हता. पण अमेरिकन रमाबाई असोसिएशनच्या एक्झिक्यूटिव्ह मंडळीची धार्मिक स्वातंत्र्यासंबंधीं संशयी वृत्ति दिसून येत होती. असोसिएशनचे एक उपाध्यक्ष डॉ. डोनाल्ड ह्यांनीं ह्या विषयावर बाईंना हटकलें होतें व त्यांच्याकडे त्यांनीं एक मोठी थोरली प्रश्नपत्रिका पाठवून खुलासा मागविला होता, व बाईंनीं त्यांना एक खरमरीत उत्तर धाडलें होतें. ह्या पत्रव्यवहारांत असा एक प्रश्न त्यांनीं काढला होता कीं बाईंनीं शारदा सदन हें अगदीं वेगळें करून मनोरमाबाईंच्या हातीं तें सोंपवावें व आपण मुक्तिसदनाची देखभाल करावी. ह्यावर "मनोरमा तसें करूं शकणार नाहीं कारण एक तर तिचीं ह्या बाबतींत माझ्यासारखींच मतें आहेत व दुसरें म्हणजे ती फार लहान आहे, तरुण विधवांची जोखीम घेण्याचें तिला जमायचें नाहीं आणि उद्यां तिचें लग्न झालें, तिला मुलेंबाळें झालीं तर तिला ही जबाबदारी कशी पार पडतां येईल?' असें रमा बाईंनीं उत्तर दिलें होतें.

बस. ह्या बाबतींत ह्या एका उल्लेखाशिवाय दुसरा कसलाच उल्लेख सांपडत नाहीं. असो. ऑस्ट्रेलियांत असतां लग्ना बिग्नाचा कांहीं विचार डोक्यांत न आणतां मनोरमाबाई मात्र मोठमोठ्या धार्मिक सभांपुढें भाषणें करीत होत्या.

एकदां त्यांनीं बायबलमधील खालील वचनावरून उपदेश केला. तो तेथील लोकांना इतका आवडला कीं वर्तमानपत्रांतून त्यांचीं स्तुतिस्तोत्रें ऐकूं आलीं.

"मी तुम्हांस नवें हृदय देईन, तुमच्या ठायीं नवा आत्मा घालीन; तुमच्या देहांतून पाषाणमय हृदय काढून टाकीन व तुम्हांस मांसमय हृदय देईन." (यहेज्केल : ३६ : २६)

ऑस्ट्रेलियांत असतां त्यांनीं अनेक सभा घेतल्या व अनेक भाषणें केलीं. पण इतक्यांतच त्यांचें तेथील कार्य संपलें नाहीं. त्यांनीं तेथें "विधवांची मैत्रीण पंडिता रमाबाई" नांवाचें आपल्या मातेचें एक: जवळजवळ दोनशें पानांचें इंग्रजी पुस्तक लिहिलें. (Pandita Ramabāi, The Widows' Friend: An Australian Edition of "The High-Caste Hindu Woman

by Pandita Ramabai, with a Sequel by her daughter Manoramabai. With Twenty Full—page Illustrations.) रमाबाईंचें उच्चवर्णीय हिंदु स्त्री हें पुस्तक अमेरिकेंत प्रथम प्रसिद्ध झाल्याला १४ वर्षें होऊन गेलीं होतीं. बाईंचीं बहुतेक स्वप्नें ह्या काळांत साकार झालीं होतीं. तीं कसकशीं हें त्यांच्या कन्येनें ह्या पुस्तकांत आपल्या "उत्तरार्ध" (Sequel) ह्या ९५ पानांच्या भागांत दाखविलें आहे. अगदीं एका मुलीपासून सुरुवात झालेल्या संस्थेच रूपान्तर पुढें केडगांवला वसलेल्या "मुक्ति" गांवापर्यंत कसेंकसें होत गेलें ह्याचा इतिहास त्यांच्या ह्या पुस्तकांत सांपडतो. ह्या ९५ पानांच्या मजकुरांत "ताईंचा" भर आपल्या आईच्या परमेश्वरावरील भरंवशाविषयींचा व त्यांच्या प्रार्थनाशील चरित्रा विषयींचा चित्रपट वाचकांपुढें ठेवण्यावर आहे. त्यांत त्यांनीं निरनिराळ्या अनाथ विधवांच्या कथा सांगितल्या आहेत. "ताई"ना आपल्या आईविषयीं केवढा आदर व केवढें प्रेम वाटायचें तेंहि ह्या पुस्तकाच्या पानापानामधून दृग्गोचर होतें.

पंडिता रमाबाईंनीं आपल्या कन्येवर तिच्या वयाला विसावें वर्ष लागण्याच्या आंतच केवढी जबाबदारी टाकली होती व त्या कर्तृत्ववान् कन्येनें ती कशी उचलली व पार पाडली हें पाण्यासारखें आहे. १९०० सालच्या शरदृतूंत त्यांना आपला अमेरिकेंतील अभ्यासक्रम अर्धवट टाकून शारदासदनाचें मोठें काम आपल्या शिरावर वाहून नेण्यासाठीं घाई घाईनें भारतांत परत यावें लागलें. तेव्हांपासून तों शेवटपर्यंत त्यांनीं अहोरात्र काम केलें. मुक्तिमधील अंधांच्या शाळेचें सारें श्रेय मनोरमाबाईंकडे जातें. आईनें स्फूर्ति दिली व लेकीनें शाळा अस्तित्वांत आणली. त्या कामासाठीं आपल्याला सर्व माहिती प्रत्यक्ष हवी म्हणून त्यांनीं अंधाप्रमाणें ब्रेल पद्धतीनें स्वतः लिहिणेंवाचणें परदेशांत असतांनाच शिकून घेतलें होतें व नंतर तें इकडे अंधांना व त्यांच्या शिक्षकांना शिकविलें. शारदासदनाच्या कामाबद्दल 'अमेरिकन रमाबाई असोसिएशननें' त्यांना ३०० डॉलर पगार ठरविला होता. परंतु आपल्या सगळ्या गरजा परमेश्वर पुरवितो ह्या त्यांच्या मातोश्रींच्या अनुभवाशीं त्या सहमत असल्यानें त्यांनीं तो घेण्याच सोडून दिलें. इतर मुलींप्रमाणें त्या बांड नेसत. त्या मुली हातांत बांगडया घालीत नसत, तशा मनोरमाबाईहि मोकळ्या हातांनीं वावरत. अंगावर कधीं दागिने घातले नाहींत कीं कानांत हिऱ्यामोत्याचीं कुडीं घातलीं

नाहींत. इतर मोठ्या मुलींना मुक्ति सदनांत "अक्का" म्हणून हाक मारीत तर मनोरमाबाईंना धाकटी बहीण म्हणून "ताई" असे संबोधीत. रमाबाईंचें आपल्या एकुलत्या मुलीवर अतिशय प्रेम असणें अगदीं सहाजिक होतें व तें तसें होतेंहि. पण रमाबाई किती काटेकोरपणानें आपल्या प्रेमाला मुरड घालीत हें एका सुप्रसिद्ध प्रसंगानें एकदां उघडकीला आलें.

मनोरमाबाईंनीं एका मुलीविरुद्ध आपल्या आईजवळ एकदां कांहीं फिर्याद नेली. रमाबाईंना ऐकायला फार कमी येत असे, त्यामुळें ती फिर्याद सगळी निजानीज झाल्यावर अगदीं शेवटीं बाईंच्याकडे गेली. नाहीं तर बाईंची खोली नेहमीं उघडी असायची व त्यांच्याकडे कोणालाहि केव्हांहि जाण्याची परवानगी असे. त्या दिवशीं "ताई" ची तक्रार जाणार हें माहीत असल्यानें कांहीं मुली बाईंच्या खोलींत ताई गेल्यावर बाहेर बोलणें ऐकत टपून बसल्या होत्या. त्या मायलेकींचा मोठमोठ्यानें चाललेला संवाद खोलीच्या बाहेर स्पष्टपणे ऐकूं येत होता.

"तूं जातेस?"

"हो! नाहीं तर तिला बाहेर लावून दे!"

"जातेस तर जा! तिला मी काढून देणार नाहीं. ती अनाथ आहे. माझ्यावांचून तिचें कोणी नाहीं. मी तिला काढून देणार नाहीं."

केवढी ही समदृष्टि आणि केवढा हा न्यायनिष्ठुरपणा?[1]

मनोरमाबाईंच्या अनेकविध कार्यांत त्यांना पुढें पुढें गुलबर्ग्याचें एक नवें कार्यक्षेत्र प्राप्त झालें होतें. आईप्रमाणें उच्चवर्णीय स्त्रियांची उन्नति करण्यासाठीं २९ सप्टेंबर १९१३ रोजीं त्यानीं त्या वेळच्या निजाम राज्यांत गुलबर्ग्याला एक मुलींची शाळा स्थापन केली. गुलबर्ग्याला नूतन विद्यालय नांवाची मुलांची एक खाजगी शाळा त्या वेळीं होती. मात्र मुलींच्या शिक्षणाची हेळसांडच होती. तेव्हां गांवांतील लोक तेथल्या कोणा एका गॉर्डन नांवाच्या मिशनरीच्या मागें लागले कीं येथें मुलींची शाळा काढा. त्याच्या विनंतीवरून मनोरमाबाईंनीं ही शाळा काढली. रमाबाईंनीं व त्यांच्या बंधूंनीं ४० वर्षांपूर्वी ज्या ठिकाणीं आपल्या प्रिय मातेला मूठमाती दिली होती तेथून ५०

---

१. पृष्ठ ३४६ पहा.

कोसांवर हें ठिकाण आहे. केडगांवची जबाबदारी अंगावर कायम असतां ताईनीं ही एक नवीन जबाबदारी आतां अंगिकारली होती. ह्या नवीन कार्यक्षेत्राला 'शांतिसदन' असें नांव देण्यांत आलें होतें. 'शारदासदन', 'मुक्तिसदन', व आतां गुलबर्ग्याचें हें 'शान्तिसदन' इतक्या जबाबदाऱ्या आतां ह्या मायलेकींवर पडल्या होत्या. रमाबाईचें सर्व लक्ष बायबलच्या मराठी भाषांतरांत असल्यानें 'ताई' वरच ह्या सर्व कामाचा बोजा पडला.

ताईंचा परमेश्वरावरील व प्रार्थनेवरील भाव त्यांच्या मातेच्या श्रद्धेइतकाच पराकोटीचा होता. गुलबर्ग्याचें काम त्यांनीं त्या विश्वासाच्या बळावरच चालविलें होतें. आज त्या शाळेंतील पहिली विद्यार्थीण डॉ. द्रुक एक प्रसिद्ध डॉक्टर म्हणून पुढे आल्या आहेत. शारदासदनाच्या विरोध्यांनीं त्या सदनाच्या पाठीस लागून जशी स्थिति करण्याचा प्रयत्न केला तशीच गुलबर्ग्याच्या ताईच्या ह्या कामाचा खेळखंडोबा करण्याचा तेथील विरोधकांनीं घाट घातला. चार वर्षें सुरळित चाललेल्या ह्या शाळेंत एक दिवस पाहतात तर ७० पैकीं दोनच विद्यार्थिनी वर्गांत हजर! मास्तरणी वर्गावर जाऊन पाहतात तों प्रत्येक वर्गांत बाक व टेबलें तेवढीं विश्वासानें हजर.

झालें होतें काय कीं गुलबर्ग्यांत कोणी चांगलीं घरें बांधल्यास त्यांना जमीन फुकट देण्याचें निजाम सरकारनें ठरविलें होतें. हेतु असा होता कीं शहरची वस्ती सुंदर व डौलदार व्हावी. हें मनोरमाबाईंना कळतांच त्यांनीं एक उत्तम जागा शाळेकरतां ठरवून तिच्यासाठीं अर्ज केला. वरची इमारत बांधण्याला त्यांच्या जवळ त्या वेळेस एक पैसाहि नव्हता पण आईचें विश्वासाचें उदाहरण व अनुभव त्यांच्या डोळ्यांपुढें होतें. त्यांनीं प्रार्थना करून त्या जागेसाठीं अर्ज केला. जागा मिळण्याबद्दल त्यांना तोंडीं आश्वासनहि मिळालें. अमूक दिवशीं येऊन दस्तऐवजावर सह्या करून कबजा घ्यायचा एवढेंच राहिलें आहे असेंहि त्यांना तोंडीं कळविण्यांत आलें. त्याप्रमाणें ठरलेल्या दिवशीं कबजा घ्यायला त्या गुलबर्ग्याला हजर झाल्या. पण तेथें पोंचल्यावर त्यांच्या ध्यानांत आलें कीं कोठें तरी कशीतरी किल्ली फिरून ती जमीन दुसऱ्याच कोणाच्या तरी कबजांत गेली.

त्या फुकट जमिनी ऐवजीं आतां त्यांना असें सांगण्यांत आलें कीं दुसरी

एक जमीन त्यांना जाहीर लिलावांत घ्यायची असेल तर सरकार ती विकीत आहे आणि त्यांनीं येऊन लिलावांत बोलावें.

मनोरमाबाई लिलावांत बोलण्याचा संभव दिसतांच विरोधकांनीं आपल्या कमरा कसल्या. "ताई" जवळ पैसे नव्हते तेव्हां त्यांनीं त्या लिलावाला जाण्याचेंच टाळलें. दुसऱ्याच एकानें ती जमीन लिलावांत घेऊन टाकली. गम्मत अशी कीं त्यानें ती "ताईं" साठींच घेतली होती! हें जर त्या वेळेस बाहेर पडलें असतें तर तीहि जमीन "ताई"ना मिळूं द्यायची नाहीं असें ठरवून भरमसाट किंमत वाढवून टाकण्याच्या हेतूनें विरोधक तेथें आपल्या पैशांच्या थैल्या घेऊन हजर होते. पण तेथें "ताई" किंवा त्यांच्या वतीनें कोणी आलें नाहीं हें पाहून त्यांचा उत्साह जागच्या जागीं झोपीं गेला. अशा त्या परिस्थितींत एकानें ती जमीन अत्यंत स्वस्तांत घेऊन "ताईं"च्या स्वाधीन केली. ताईंना तो जमिनीचा भाग पाहून फार आश्चर्य वाटलें. कारण त्या जेव्हां प्रथम गुलबर्ग्याला गेल्या तेव्हां हीच जमीन पाहून त्या आपल्या सहकाऱ्यांना म्हणाल्या होत्या, ह्या ठिकाणीं जर आपल्याला जागा मिळून येथें शाळेची इमारत उभी राहिली तर किती छान होईल! तेव्हां ही जागा पाहून त्यांना असें वाटूं लागलें कीं परमेश्वरानेंच आपल्याला ती फुकट मिळणारी जागा मिळूं न देतां पूर्वीं त्यानेंच दर्शविलेली ती जागा दिली. पण ह्या जागेचा क़बजा घेण्याच्या वेळींहि खूप अडचणी उत्पन्न करण्यांत आल्या. शेवटीं सर्व व्यवस्थितपणें पार पडून त्या ठिकाणीं शांतिसदन उभेंहि राहिलें. ताईंच्या मागें रमाबाईंनीं ती शाळा मेथॉडिस्ट मिशनच्या स्वाधीन केली. त्यांनीं तेथें कानडी मुलींचें बोर्डिंग काढलें व आज ती शाळा संपूर्णपणें कानडी शाळा झाली आहे.

मध्यंतरीं मनोरमाबाई पुन्हा एकदां इंग्लंडला जाऊन आल्या. तेथें असतांन हिंदी स्त्रियांविषयीं तेथील लोकांत त्यांनीं पुष्कळ जागृति केली. त्यांना तेथें आणखीहि पुष्कळ काम करायचें होतें, पण मधेंच त्या आजारी पडून त्यांना आपला कार्यक्रम आटोपता घ्यावा लागला. परंतु ह्या भेटीचा त्यांना एक मोठा फायदा झाला तो हा कीं येतांना त्या तेथून दोन कार्यकर्त्या स्त्रियांना बरोबर घेऊन आल्या.

केडगांवांत असतांना "ताई" पहांटे साडेचारला कामाला लागत. त्या

तेवढ्या पहांटेला उपासना मंदिरांत १५०० स्त्रिया व मुली जमत. "ताई" उपासना चालवीत. त्यांनीं एकदां तेथें त्या मुलींना बायबलमधील समजायला सर्वांत अवघड पुस्तक "प्रगटविणें" (Revelation) हें अगदीं सोप्या पद्धतीनें समजावून दिलें. मुली तेवढ्या पहांटे न चुकतां आपल्या वह्या पेन्सिली घेऊन हजर राहात व "ताई"च्या शिकवणीचे उतारे लिहून घेत.

१९०६ सालीं "मुक्ति" मध्यें संजीवनाची चळवळ सुरू झाली. मुलींच्या मध्यें आध्यात्मिक दृष्टीनें बदल व्हायला हवा व त्या संपूर्णपणें पवित्र आत्मायुक्त व आध्यात्मिक जीवनांत संपन्न व्हाव्यात म्हणून त्यांच्यासाठीं "ताई" रात्र रात्र प्रार्थनेंत घालवीत. त्यांच्यापाशीं निदान १००० मुलींच्या नांवांची यादी होती. प्रत्येक मुलीचें नांव घेऊन तिचा इतिहास आठवून व तिच्यांत काय उणें आहे त्याचा पूर्ण विचार करून तिचा पालट देवानें करावा म्हणून त्या मनोभावें प्रार्थना करीत व ह्या प्रार्थनेंत रात्र रात्र घालवीत. बायबालमधील एक वचन 'प्रार्थना व उपास ह्या खेरीज हीं टळणार नाहींत' हें नेहमीं त्यांच्या अंतःचक्षूपुढें असे व त्या वचनानुसार पुष्कळशा अवखळ मुलींसाठीं त्या प्रार्थनेबरोबर उपासतापासहि करीत. ह्यासंबंधीं मनोरमाबाईंनीं प्रत्यक्ष अनुभवाच्या कांहीं गोष्टी सांगितल्या आहेत त्या पुढें २७ व्या प्रकरणांत दिल्या आहेत. पण देवाच्या कामांत बिब्बा घालायला सैतान टपून बसलेला असतो. इकडे चांगल्या मुलींचा घोळका वाढूं लागला तर तिकडे वाइटांचा ताफा फुगूं लागला. बायबलमध्यें सांगितलेली येशूच्या चरित्रांतील एक गोष्ट आहे. एकदां पिशाच्चानें झपाटलेल्या एका पोराला बरें करण्याचा प्रयत्न ख्रिस्तशिष्यांनीं केला असतां त्यांना त्यांत यश आलें नाहीं. तेव्हां त्या मुलाला येशूकडे आणण्यांत आलें. येशूनें त्याला ताबडतोब बरें केलें, तेव्हां शिष्यांनीं येशूला एकान्तीं विचारलें, आम्हांला ह्या कामांत यश कां आलें नाहीं? येशूनें त्यांना म्हटलें: "ही जात प्रार्थनेवांचून व उपवासावांचून दुसऱ्या कशांनींहि निघत नाहीं." येशूच्या ह्या वचनावर तंतोतंत अवलंबून मनोरमाबाई अशा अवखळ मुलींसाठीं प्रार्थना तर करीतच परंतु त्यांनीं उपवासहि करण्याचें ठरविलें. एक एका मुलीला घेऊन त्या आतां प्रार्थना करूं लागल्या. ह्या मुलींची संख्या मोठी व त्यांच्या साठीं प्रार्थना करणाऱ्या पुष्कळ असल्या तरी उपवास करणाऱ्या एकट्या "ताई"च असल्यानें त्यांच्यावर अतिशय

ताण पडूं लागला. बहुतेक मुलींवर त्यांच्या उपवासाचा व त्यांच्या प्रार्थनेचा परिणाम मात्र अत्युत्तम होऊन त्यांच्या वागणुकींत मोठ मोठाले फरक दिसूं लागले. महाराष्ट्राच्या इतिहासांतील सुप्रसिद्ध "गड आला पण सिंह गेला" ह्या वचनाची येथें पुनरावृत्ति झाली. मुलींच्या आयुष्यांत पवित्र आत्म्यानें प्रवेश केला पण "ताईंना" त्यासाठीं जवळ जवळ आपल्या प्राणाचें मोल द्यावें लागलें.'

१९१८ सालीं मे महिन्यांत ताईंना श्रीमती अप्पासामी कोडीकनालला आपल्या घरीं हवा बदलण्यास घेऊन गेल्या. तेथें त्यांनीं आपला वेळ फुकट जाऊं नये म्हणून एम्. ए. च्या अभ्यासास सुरुवात केली. पण तेथें त्यांची प्रकृति अधिकच बिघडली व त्यांना केडगांवास परतावें लागलें. समुद्रसपाटी पासून उंच अशा ठिकाणीं त्यांच्या हृदयव्यथेला आराम पडण्याऐवजीं तें कुपथ्यच ठरलें.

परत आल्यावर त्या स्वस्थ बसल्या नाहींत. दुखणें अंगावर नेऊन त्या पुन्हां पहिल्यासारख्या श्रम करूं लागल्या. एखादी स्त्री संकटांत अहे असें ऐकलें तर त्या तिच्या साह्यार्थ धावत निघायच्या, त्यासाठीं कित्येक मैलांचा बैलगाडींतून प्रवास करावा लागला तरी तो करायच्या, एखादे वेळीं रात्र रात्र त्यांना धर्मशाळेच्या ओटीवर बसून वेळ काढावा लागे, नाहीं तर एखाद्या देवळाच्या पायऱ्यावर बसून रहावें लागे. पण शारीरिक कष्टांची त्यांनीं कधींच पर्वा केली नाहीं. माझ्या प्रभूनें किती शारीरिक कष्ट भोगले होते. मग मला एवढेंसें सोसायला काय हरकत आहे, असें त्या म्हणत.

कोडीच्या डॉक्टरांनीं सांगितल्या प्रमाणें त्या मिरजेला जाऊन आल्या होत्या. पण पथ्य पाळणें त्यांच्या इतर कार्यक्रमामुळें झालेंच नाहीं. पुढील सवातीन वर्षांत "ताई"नीं आणखीच श्रम केले, व त्याचा परिणाम म्हणजे त्यांच्या शरीरानें ह्यापुढें काम करण्यास दिलेला नकार. आपला इहलोकीचा प्रवास संपत आल्याचें त्यांनीं ओळखलें होतें. मात्र त्यामुळें त्यांनीं आपल्या कार्यांत व अखंड प्रार्थनेंत यत्किंचितहि खंड पडूं दिला नाहीं.

पण असें किती दिवस चालायाच ? १९२१ च्या जुलैमध्यें ताईंची प्रकृति फारच बिघडली. त्यांना दमा असावा असा आधीं आधीं समज होता, पण तें दुखणें हृदयविकाराचें होतें. मिस् हेस्टींनीं म्हणजे सुंदरामावशींनीं

ताईंना मिरजेला नेण्याचा आग्रह धरला व तो रमाबाईंनीं व ताईंनीं मान्य केला. ताई बिछान्याला खिळून होत्या. मिरजेला जायच्या आधीं दोन दिवस रमाबाई ताईंच्या बिछान्याजवळ उभ्या राहून प्रार्थना करतांना दिसल्या. त्या बोलत होत्या, "प्रभो, तुझी इच्छा. तुला काय करायचें तें तूं कर." आपल्या आईला आपल्यासाठीं कांहीं दुःख किंवा क्लेश होऊं नयेत अशी ताईंना तळमळ लागून राहिली होती.

उद्यां मिरजेला जायला निघायचें तर आज रात्रीं पुष्कळ मोठ्या मुली त्यांच्या बिछान्याभोंवतीं जमा होऊन घोळक्यानें उभ्या राहिल्या. ताईनीं त्या सगळ्यांना विनवून परत लावून दिलें. मला एकटीला राहूं द्या, माझ्या भोंवतीं गर्दी करूं नका अशी त्यांनीं त्या मुलींना विनंति करून सर्वांना लावून दिलें. पण मुलींना चैन पडेना म्हणून त्यांनीं एका लहान मुलीला 'ताईना' सोबत करायला म्हणून त्यांच्याकडे पाठविलें. तिला त्यांनीं आपल्या जवळ राहूं दिलें, तिच्या बरोबर गाणीं म्हटलीं तिच्याकडून "प्रगटविण्याचा" शेवटला अध्याय वाचून घेतला.

"पुढें कांहींहि शापित असणार नाहीं," "ते त्याचें मुख पाहातील, व त्याचें नाम त्यांच्या कपाळावर असेल. त्यापुढें रात्र असणार नाहीं, आणि त्यांस दिव्याच्या अथवा सूर्याच्या प्रकाशाची गरज नाहीं. कारण प्रभु देव त्यांच्यावर प्रकाश पाडतो, आणि ते युगानुयुग राज्य करितील."
मग दोघींनीं गाणें गायिलें

*"प्रिय प्रभूच्या हातीं*
*सुरक्षितसा मी*
*माझ्या जिवा विश्रांती*
*होईल नेहमीं*

मग त्यांनीं प्रार्थना केली.

*"हे बापा, माझ्या आईला आणि माझ्या*
*मुलींना तूं संभाळ. हे प्रभो, तूं जर मला*
*बोलावीत आहेस तर मी येतें."*

त्या मुलीला त्यामधून मधून म्हणत, "प्रभू, मला बोलावीत आहे. मी जातें—" त्या रात्रभर त्या झोंपल्या नाहींत. मग त्या मुलीला त्यांनीं योहानकृत शुभ-

वर्तमानाचा १७ वा अध्याय वाचायला सांगितला. हा अध्याय म्हणजे येशूनें आपल्याला शिष्यांसाठीं देव पित्याजवळ केलेली प्रार्थना आहे.

ह्यानंतर त्यांनीं त्या मुलीबरोबर आणखी एक गाणें म्हटलें.

*"दिव्य तेजें प्रकाशीत स्थळ*
*दिसे विश्वास नयनें वर*
*तेथें आम्हासि वस्ती अढळ*
*प्रभु देईल तो प्रियकर १*
*ध्रु० अहा, त्या सुस्थळीं । पार नाहींच हो विश्रामा*
*तेथेंहि सुदिनीं । भेट होई प्रियांची आम्हा ॥*

गाणें झाल्यावर त्या मुलीला त्या पुन्हा म्हणाल्या,

"मला देवबाप बोलावीत आहे. तुम्ही माझ्या आईला आतां मदत करा."

पहांटे ४ पर्यंत त्या झोंपल्या नाहींत. मग थोडेसें पाणी प्याल्या व पांचच मिनिटें झोंपल्या. त्यांना झोंप घेऊं देऊं नये असा डॉक्टरांचा सल्ला मिळाला होता. त्यामुळें त्या रात्री त्या केवळ पांचच मिनिटें निजल्या. शेवटपर्यंत त्यांचें चाललें होतें, "मला प्रभु बोलवीत आहे. मी जातें. पण माझ्या आईला व माझ्या मुलींना संभाळा."

केडगांवहून कित्येक जण ताईबरोबर त्यांना पोंचवायला पुण्यापर्यंत गेले होते व पुण्याच्या स्टेशनवरहि गांवांतून पुष्कळजण त्यांच्या भेटीला आले होते. पुण्याच्या स्टेशनवर भेटायला आलेल्या लोकांपैकीं कोणी त्यांना ९१ वें स्तोत्र वाचण्यास सांगितलें. पुणें स्टेशन सोडून गाडी मिरजेच्या मार्गाला लागली तेव्हां ताई आपल्याबरोबरच्या 'मावशी'ला म्हणाल्या, किती सार्थ हें स्तोत्र आहे.

*"तूं माझा आश्रय, तूं माझा दुर्ग, तूं माझा देव,*
*तुजवर मी भाव ठेवतों." "तुझ्या सर्व मार्गांत तुझें*
*रक्षण करण्याची तुजविषयीं तो आपल्या दिव्यदूतांस*
*आज्ञा देईल—तुझ्या पायाला धोंड्याची ठेंच लागूं*
*नये म्हणून ते तुला आपल्या हातावर झेलून धरतील."*
*"तूं सिंह व नाग यावर पाय देऊन चालशील.*
*तरुण सिंह व अजगर यांस तुडवीत चालशील."*

ह्या वचनांचा ताईंना त्या प्रवासांत फार आधार वाटला.

पण मिरजेला पोंचल्यावर त्यांना अतिशय क्लेश होऊं लागले. "प्रिय प्रभूच्या हातीं सुरक्षितसा मी: माझ्या जिवा विश्रान्ती होईल नेहमीं" हें गीत व 'Rest, Rest, Rest in The Lord' हे शब्द त्यांच्या जिभेवर एकसारखे होते.

आपलें मृत शरीर केडगांवला नेऊं नये. तें पाहून आपल्या मातेला अतिशय दुःख होईल असें त्यांनीं सांगून ठेवलें होतें. २४ जुलै १९२१ रोजीं वयाला ४० वर्षें व सव्वातीन महिने झाल्यावर ताईनीं आपला नश्वर देह ठेवला व त्या "प्रिय प्रभूच्या हातीं सुरक्षितशा" जाऊन राहिल्या.

# २४ रमाबाईंचे सहकारी

कृष्णाबाई गद्रे रमाबाईंच्या सहकाऱ्यांसंबंधानें आपल्या रमाबाई चरित्रांत म्हणतात, "परमेश्वरानें तारेहि केले. ताऱ्या ताऱ्यांच्या तेजांत भेद आहेत तरी ते सारे तारेच आहेत."

शारदासदनांतील पुष्कळशा बालविधवा आतां शिक्षण घेऊन आपापल्या कामांत तरबेज झाल्या होत्या. रमाबाईंना जेव्हां मुक्तींतील कामांत हातभार लावायला मनुष्यबळाची जरुरी भासली तेव्हां ह्या शारदासदननिवासी विद्यार्थिनी पुढें सरसावल्या व त्यांनीं कंबर कसून बाईंच्या बरोबरीनें मुक्तींतील अनाथ अपंगांची सेवाशुश्रूषा केली.

बाईंच्या कीर्तींत बाईंच्या बरोबरीनें त्यांचाहि वांटा आहे. कितीतरी अमेरिकन, इंग्रज, ऑस्ट्रेलियन, न्यूझीलंडर स्त्रिया बाईंना मदत करण्यासाठीं केवळ पोटावारी राहून काम करूं लागल्या! कित्येक इकडे आल्या त्या परत गेल्याच नाहींत. ह्यांच्या साह्यामुळें रमाबाईंचें काम किती तरी हलकें झालें होतें व त्या ह्या साह्याबद्दल परमेश्वराचे नेहमीं आभार मानीत. बाईंना ह्या साह्यकारी आपल्या सख्ख्या बहिणी वाटत. ह्यांच्यापैकीं ज्या कित्येकींनीं आपलें सारें जीवित बाईंना साह्य करण्यांत वेंचलें त्यांचा नुसता नामनिर्देश करायचा झाला तरी दोन पानें पुरणार नाहींत. तरी त्यांच्यापैकीं कांहीं प्रमुखांचीच लहानशी यादी अशी होईल. मिस मिनि एब्राम्स, मेरी मॅक्डोनल्ड, एमिली बेकन, जोन मॅक्ग्रेगर, एल्मिना हॉफमन, व्हिक्टोरिया ब्रेझियर, केरी काऊच, लिझी काऊच, मेरी बर्किन, लुसी वेकफर्ड, जेसी फर्ग्युसन, मिस् पार्सन्स, मिस् बोज, मिस् ब्राऊन्स, डॉ. मल्फर्ड, डॉ. रॉबर्ट्स, डॉ. टल्बॉट, मिस् वायट, मिस व्हिटले, व मिस हेस्टी. ह्यांपैकीं बाईंच्या पाठीमागें मुक्तीच्या

१. बायबलः उत्पत्ति १:१६. २. बायबलः १ करिंथः १५:४१.

पहिल्या व्यवस्थापक मिस् हेस्टी झाल्या. मिनी एब्राहाम्स ह्यांच्याबद्दल पुढें थोडें विस्तारानें आपण पाहूं.

बाईंच्या वेळीं मेरी बाई आइमन ह्या तेथील ट्रेन्ड नर्स होत्या. कारखाना-प्रमुख सौदामिनीबाई होत्या. शेतकामाच्या प्रमुख काशीबाई होत्या. ह्या बायां-शिवाय गंगाबाई, भीमाबाई इत्यादींनीं दुष्काळाच्या कठीण काळांत दुष्काळी भागांतून हजारों मुलेंमाणसें सोडवून आणून त्यांची निरानिराळ्या ठिकाणीं सोय लावून दिली. ह्यांपैकीं पुष्कळ मुली व स्त्रिया खुद्द केडगांवला आणण्यांत आल्या. त्यांचा सांभाळ, त्यांचें शिक्षण, शिस्त ह्या बाबतींत ह्यांचें फार साह्य झालें.

१८९० व १८९१ सालीं बाई आपल्या भावाच्याकडे माळहेरंजीला गेल्या होत्या. त्यांचे हे सावत्र बंधु. त्यांचें नांव रामकृष्ण अनंतशास्त्री डोंगरे. राम-शास्त्र्यांना पुत्रसंतती नसल्यानें त्यांनीं दोन बायका केल्या, तरीहि संतती झाली नाहीं तेव्हां त्यांनीं अनंत नांवाचा मुलगा दत्तक घेतला. रामशास्त्री वारल्यावर रमाबाई पुन्हा माहेरीं गेल्या. ह्या वेळेस त्यांनीं येतांना आपल्या धाकट्या भावज यीला म्हणजे मनकर्णिकाबाई रामशास्त्री डोंगरे ह्यांना बरोबर आणलें. त्यांना-मामी म्हणत. मामींनीं आपल्या पतीच्या सांगण्यावरून सुभद्रा नांवाची एक मुलगी सांभाळली होती तिलाहि त्या बरोबर घेऊन आल्या. राजसाबाई डोंगरे लिहितात : 'ह्या सुभद्राबाई माझ्या वडिलांच्या नात्यांतील अगदीं जवळची पुतणी लागत होत्या. मामींनीं हिचा सांभाळ केला व मामीहि डोंगरेच होत्या. मामी ह्या माझ्या वडलांच्या मावशीहि होत्या. इकडे आल्यावर मामींनीं कृपा नांवाची आणखी एक मुलगी सांभाळली. केडगांवच्या गृहव्यवस्थेंत मामी रमा-बाईंचा अगदीं उजवा हात होत्या. बाईंच्या आतेवहिणीची सून आणखी एक विधवा, रुक्मिणीबाई—ह्यांनाहि बाई बरोबर घेऊन आल्या होत्या, तशा त्यांनीं कृष्णाबाई, अम्मू, मामी, रुक्मिणीबाई व कुमारी सुभद्रा इतक्या पांच जणींना आपल्याबरोबर आणल्या होत्या. त्यांपैकीं कृष्णाबाई व अम्मू ह्या पांच वर्षे बाईंबरोबर राहून परत गेल्या. जातांना रुक्मिणीबाईंना बरोबर नेण्याचा त्यांनीं घाट घातला होता पण बाईंनीं त्यांना साफ सांगितलें, रुक्मिणीच्या सासऱ्यानें ती मला देऊन टाकली आहे[1], ती तुमच्याबरोबर येणार नाहीं. रुक्मिणी-

१. ही माहिती लेखकाला खुद्द रुक्मिणीबाईंनींच पुरविली आहे.

बाईंना त्यांच्याबरोबर मुळींच जायला नको होतें. ज्या बाईनें आपल्याला एवढ्या संकटांतून बाहेर काढलें तिला आपण कधींच सोडणार नाहीं, असा रुक्मिणीबाईंचाहि निश्चय होता. रुक्मिणीबाई एक बालविधवा होत्या. त्यांच्या सासरच्या छळाला खरोखर तोड नव्हती. आत्तांच्या काळीं त्या गोष्टीवर कोणी विश्वासहि ठेवणार नाहीं. पण त्यांना आढ्याला टांगून, खालीं उडी टाकूं नये म्हणून खालीं निखारे पसरून ठेवीत नाहीतर कांटे अंथरीत. अशा परिस्थितींतून बाईंनीं त्यांची मोठ्या शहामतीनें सुटका केली होती. पहिल्या वेळेला बाई तिकडे गेल्या व तिच्या सासऱ्यानें तिला बाईबरोबर धाडण्याचें कबूल केलें पण सासूनें तिला आजारी असल्याचें ढोंग करण्यास सांगितलें व त्यांनीं अंथरूण धरलें. त्या रात्रीं बाई रात्रभर त्यांच्याजवळ बसून त्यांची शुश्रूषा करीत होत्या. दुसऱ्या दिवशीं त्यांना परत निघायचें होतें. तेव्हां पुन्हा येऊन तुला घेऊन जाईन असें बाईंनीं त्यांना वचन दिलें व त्या निघून आल्या. पण त्या आपलें वचन कधीं विसरल्या नाहींत. भावाच्या मृत्यूनंतर त्या पुनः माळहेरंजीला गेल्या व वरीलप्रमाणें सर्व मंडळीस व रुक्मिणीबाईच्या सासू-सासऱ्यासहि पुण्यास घेऊन आल्या.

मामी व रुक्मिणीबाई रमाबाईंना, 'त्यो' म्हणत. 'त्यो म्हणजे काय', असें रुक्मिणीबाईंना विचारतां त्या म्हणतात "त्यो म्हणजे सासूबाई." ह्यावरून बाईंच्या माहेरी कोणती भाषा बोलत हें ठरविण्याचा प्रयत्न केला. परंतु हा शब्द तुळू किंवा कानडींतहि नाहीं असें कळलें. तसेंच कोंकणींतहि हा शब्द नाहीं. हें-भाषा कोडें न उकलतां तसेंच राहिलें पुढें कित्येक दिवसांनीं त्याचा उलगडा झाला तो परिशिष्ट ३ मध्यें दिला आहे.

रुक्मिणीबाईंवर बाईंचा मोठा जीव होता असें दिसतें. त्यांना बाईंनीं एक स्त्रीगीत करून दिलें होतें व त्यांच्याच परिस्थितीचें त्यांत वर्णन होतें.

केडगांवला आल्यानंतर रुक्मिणीबाईकडे कोठीचें काम देण्यांत आलें होतें. हें काम करण्यांत त्यांची दक्षता व टापटीप फार चांगली प्रत्ययाला आली. प्रार्थनेपेक्षां व्यवहाराकडे त्यांचें विशेष लक्ष असे. उधार अगदीं घ्यायचें नाहीं. उपास पडले तरी हरकत नाहीं. त्यामुळें एखादे वेळेस पैशाची टंचाई असली म्हणजे सारा खडखडाट होई. मग पैसे आल्यावर धावाधाव केली कीं माल मिळे. तेव्हां रुक्मिणीबाई व्यापाऱ्यांशीं संगनमत करून माल घेऊन तेथेंच ठेवा-

यच्या. बाई म्हणायच्या, आतां सर्वजणींनीं प्रार्थना कराव्या व तशा प्रार्थनेला सुरुवात व्हायची. बाई अगदीं कडकडीत उपास करायच्या व प्रार्थना करायच्या. त्यांना प्रार्थनेचें उत्तर आलें म्हणजे त्या रुक्मिणीबाईंना बोलावून सांगायच्या, आतां जा आणि माल आणा. रुक्मिणीबाई जाऊन आधींच खरेदी करून ठेवलेला माल घेऊन यायच्या. एखाद्या वेळीं बाईंच्या ध्यानांत हें यायचें व मग त्या त्यांना रागावयाच्या. पण ह्या लहानशा युक्तींत रुक्मिणीबाईचा हेतु बाईंचें हित व मुक्तिला सहाय्य एवढाच असल्यानें हें पाप त्या डोळे झांकून करीत. रुक्मिणीबाईंचें संपूर्ण नांव रुक्मिणी कृष्ण फाटक. त्या अद्याप केडगांवीं आपले शेवटले दिवस आनंदानें क्रमीत आहेत. * बाईंच्या वेळच्या व जवळ जवळ बरोबरीच्या त्याच तेवढ्या आतां केडगांवीं आहेत.

आज बाईंच्या वेळच्या परंतु बाईंच्या पेक्षां फारच लहान अशा आणखी एक महिला केडगांवला आढळतील. त्यांची गोष्ट फारच हृदयद्रावक आहे. ती कथा थोडक्यांत व त्यांच्याच शब्दांत दिली आहे.

"माझे वडील हरिश्चंद्र पंडित. वडील मुलीला सासरीं झालेल्या छळामुळें मृत्यु आल्यानें व दुसरी बहीण केवळ दहाव्या वर्षीं वैधव्य प्राप्त होऊन त्याच वेळीं घरीं आल्यानें वैतागून तीर्थयात्रा करायला निघाले. त्यांनीं आमच्या मातोश्रींना तिच्या माहेरीं पाठवून दिलें व आम्हा दोघां बहिणींना बरोबर घेऊन ही यात्रा आरंभली. त्या वेळीं मी पांचसहा वर्षांची असेन. आमच्या कांनीं आमच्या प्रेमळ परमेश्वराचें नांव त्यापूर्वीं कधीं पडलें नव्हतें पण त्याची कृपादृष्टि तेवढ्या संकटाच्या समयींहि आमच्याकडे असावी. इटार्शी शहरीं नर्मदा नदीचे कांठीं आम्ही येऊन पोहंचलों. नदीकांठीं वाळूवर आमचे वडील खालीं पडून राहिले. आम्ही त्यांच्या शेजारीं बसलों. आम्हांला कांहीं कळेना. ते बोलेनासे झाले. तेथून एक बैलगाडी चालली होती. ती आमच्याजवळ थांबवून तींतील माणसांनीं बाबांबद्दल विचारलें. आम्हांला कांहीं सांगतां येईना. आम्ही रडूं लागलों. मग त्यांनीं आम्हां मुलींना व बाबांना त्या बैलगाडींत घालून एका धर्मशाळेंत नेऊन टाकलें व ते निघून गेले. सकाळीं आम्ही पाहातों तों वडील गेलेले. काय आमच्या मनाची स्थिति झाली असेल

* पृष्ठ २३५ वरील तळटीप २ पाहा.

वरें? त्यांना लोकांनीं येऊन पुरून टाकलें. माझ्या वहिणीला माझ्यापेक्षां अधिक कळत असे. ब्राह्मण जातीच्या रिवाजाप्रमाणें त्यांचें दहन करायचें तें न करतां त्यांना पुरलें म्हणून तिनें फार शोक केला. आतां कोठें जावें, काय करावें, ह्या विचारांत आम्ही चूर झालों. इतक्यांत एक गोरीपान, अत्यंत स्वच्छ कपडे घातलेली व पवित्र चेहऱ्याची स्त्री आमच्याजवळ येऊन उभी राहिली. तिनें आम्हां दोघींना जवळ घेतलें. आम्हांला कुरवाळलें व म्हटलें, मुलींनो, माझ्याहि वडलांना असाच मृत्यु आला होता. मी व माझा भाऊ असेच तीर्थयात्रा करीत फिरलों. मीं आतां ब्राह्मण विधवा स्त्रियांकरितां शाळा काढली आहे. तुम्ही दोघी माझ्याबरोबर चला. तुमची मी काळजी घेईन. आम्ही बाईवर विश्वासून त्यांच्याबरोबर आलों. माझी बहीण फार कडक सोवळें बाळगणारी असल्यानें तिनें फार दिवस आपला कडकडीत बाणा कायम ठेवला होता. पण पुढें जेव्हां तिच्यांतील जातिभेद विलयाला गेला तेव्हां आम्हीं दोघींनीं ख्रिस्ताला पत्करून बाप्तिस्मा घेतला. व तेव्हांपासून आमचें आध्यात्मिक कल्याण झालें. माझ्या प्रभूची सेवा, मला त्याचें वोलवणें येईपर्यंत मीं करावी एवढीच आतां माझी इच्छा आहे."

आज भीमाबाई केडगांवच्या अनेक भूषणांपैकीं एक आहेत.

शारदासदनावर व विशेषतः मुक्तिसदनावर विशेष प्रभाव पाडणाऱ्या व्यक्ती म्हणजे सुंदराबाई पवार, मिस्. मिनी एब्राम्स, दादासाहेब गद्रे व दादासाहेबांच्या कन्या कृष्णाबाई गद्रे ह्या होत.

सुंदराबाई ह्या रमाबाईंच्या बरोबर व बरोबरीनें काम करीत. मात्र त्यांचा संबंध शारदासदन मुंबईहून पुण्यास आलें तेथपासून तर तें तेथून केडगांवला गेलें तेथपर्यंतच होता. बाई दुष्काळपीडितांच्या हाकेला ओ देऊन जेव्हां जेव्हां पुण्याच्या बाहेर पडत तेव्हां तेव्हां सुंदराबाई पुण्याचें शारदासदनाचें काम सांभाळीत इतकेंच नाहीं तर दुष्काळग्रस्त मुलींना बाई पाठवून देत, तेव्हां त्यांचेंहि त्या करीत.

परमेश्वरानें बाईंच्या जवळचीं माणसें एकामागून एक त्यांच्यापासून दूर केलीं, तशीं गरज पडली तसतशीं एकामागून एक दूरचीं माणसें जवळ आणून उभीं केलीं. शारदासदन मुंबईस होतें तेव्हां मेरीबाई निकंबे, पुण्यास आलें तेव्हां सुंदराबाई पवार आणि तेथून केडगांवला गेलें तेव्हां मिनी एब्राम्स अशा एकाचढ

एक साह्यकर्त्या देवानें बाईंना पुरविल्या. ह्या स्त्रिया नुसत्या सांगकाम्या नसून त्यांच्यांत कांहीं भरीव कामें करण्याचें सामर्थ्य होतें, हें मेरीबाईंनीं मागें राहून मुंबईस महत्त्वाची शिक्षणसंस्था काढून, व सुंदराबाईंनीं पुण्यास ट्रेनिंग कालेज स्थापून सिद्ध केलें आहे. मिनी एब्राम्स ह्या तर पुण्यास स्वतःचीच शाळाच चालवीत होत्या. त्या आपल्या विद्यार्थिनींसह केडगांवला गेल्या.

रमाबाईप्रमाणेंच सुंदराबाईंचाहि चर्चभेदावर विश्वास नव्हता. त्या विषयाला त्या फारसें महत्त्व देत नसत. तें म्हणजे "मुरकूट गाळून काढून उंट गिळून" टाकण्याप्रमाणें त्या दोघींनाहि वाटत असे. सुंदराबाई इंग्लंड-मध्यें असतांना त्यांच्या पाठीमागें बरीच मंडळी ह्या बाबत लागली होती. "तुम्ही कोणत्या चर्चच्या मतानुयायी आहांत ?" हा प्रश्न त्यांना वारंवार विचारण्यांत येई., पण तुमचा पालट कसा झाला हा प्रश्न विचारण्याच्या कोणी भानगडींत पडत नसे. एका भोजनप्रसंगीं कोणत्या तरी मंडळीचें (चर्चचें) सभासद असणें हें अगत्याचें आहे ह्या विषयावर त्यांना मोठमोठालीं प्रवचनें ऐकावीं लागलीं.

एकानें म्हटलें, निरनिराळ्या मंडळ्या ह्या निरनिराळ्या पलटणीप्रमाणें आहेत. तुम्ही कोणत्या पलटणींतील सैनिक आहां हें तुम्हांला सांगतां आलें पाहिजे. त्यावर सुंदराबाईंनीं उत्तर दिलें "मी राजाच्या खास पलटणींतील सैनिक आहें." दुसऱ्या एकानें म्हटलें "अहो ख्रिस्ती पंथ हे घरांतील निर-निराळ्या खोल्यांप्रमाणें आहेत. चर्च ऑफ इंग्लंडचे लोक एका खोलींत, प्रेसबिटेरियन दुसऱ्या खोलींत. वेस्लियन तिसऱ्या, बॅप्टिस्ट चौथ्या आणि इतर अशाच वेगवेगळ्या खोल्यांत ते आहेत. तुम्ही ह्यांपैकीं एखाद्या तरी खोलींत असणें अत्यंत अगत्याचें आहे. प्रभूच्या पुनः येण्यावर तुमचा विश्वास असेलच. तो आल्यावर तुम्हांला त्यानें कोणत्या खोलींत शोधायचें ? त्यावर सुंदरबाईंनीं उत्तर दिलें "प्रभूला भेटण्यासाठीं मीं दारांतच उभी राहीन."

अशा प्रकारच्या निरनिराळ्या पंथांचा विचारच त्यांच्या मनाला शिवत नसे. पाश्चात्य लोकांना ह्या गोष्टींचें जितकें महत्त्व वाटतें तितकें भारतीय ख्रिस्ती लोकांना वाटत नाहीं. "आपण ख्रिस्ताचे"[१] आहों असा विश्वास धरून प्रभूवर

१. बायबल : मार्क ९ : ४१.

मनापासून खरेंपणानें प्रेम करणांचा सहवास ठेवणें[1] ह्यांतच त्यांचा खरा आनंद होता.

हिंदुस्थान व चीन ह्या दोन देशांमध्यें त्या वेळीं फार मोठा अफूचा व्यापार ब्रिटिश सरकारच्या उत्तेजनानें चाले व सरकारला त्याचा फार प्रचंड फायदा होई. ह्या गोष्टीविरुद्ध खुद्द ब्रिटनमध्यें लोकमत जागृत करावें म्हणून तेथें चळवळ सुरू झाली होती. त्या चळवळीच्या पुढाऱ्यांनीं सुंदराबाईंना दोन वेळेला तिकडे नेलें होतें. सर्व देशभर त्यांचीं तिकडे व्याख्यानें झालीं व त्यांचा मोठा परिणाम झाला. त्यांच्या व्याख्यानाला लोकांची गर्दी उसळायाची. त्या भाषणाला अशी सुरुवात बहुतेक करीत :

"उत्तम सूर्यप्रकाशित असा माझा प्यारा हिंदुस्थान सोडून मी ह्या धुक्याच्या अंधकारग्रस्त देशांत इतकी दूर आलें आहें ती कांहीं विद्या प्राप्त करून घेण्यासाठीं नाहीं कीं पदवी अथवा पैसा गोळा करायला आलें नाहीं. दुःखांत खितपत पडलेल्या माझ्या देशबांधवांचा टाहो तुमच्या कानापर्यंत पोंचविण्यास मी आलें आहें.

सुंदराबाईच्या सभेंत नाना प्रकारच्या शंका विचारण्यांत येत. एकानें म्हटलें, हिंदुस्थानच्या व चीनच्या लोकांना अफू मानवते. त्यावर सुंदराबाई म्हणाल्या, मला व येथें बसलेले 'च्यांग' ह्यांना सहा सहा ग्रेन अफू देऊन पहा काय परिणाम होतो तो. दुसरा म्हणाला, अफू हें केवळ औषध म्हणून विकण्यांत येतें. त्यावर बाई म्हणाल्या, असें जर आहे तर सहा ग्रेननें माणूस मरतो हें माहीत असतां सोळाशें ग्रेन अफू बिगर परवाना विकत घेतां येते हें कसें? एकानें म्हटलें, हिंदी लोक तापावर अफूचा उपयोग करतात. त्यावर सुंदराबाई म्हणाल्या, ही अजब गोष्ट मी प्रथम इंग्लंडमध्येंच ऐकतें आहें. आमच्याकडे ही माहिती अद्याप पोहंचली नाहीं.

अशा तऱ्हेनें सारें इंग्लंड व आयर्लंड सुंदराबाईंनीं आपल्या वक्तृत्वानें आणि हजरजबाबीपणानें काबीज करून टाकलें. सुंदराबाईंचा निवास प्रथम मुंबईस होता. पण पंडिता रमाबाई शारदा सदन घेऊन पुण्यास आल्या तेव्हां सुंदराबाईंना प्रेरणा झाली कीं तूं आपलें मुंबईचें काम सोडून पुण्यांत बाईंना येऊन

---

१. बायबल : इफिस ६:२४

साहाय्य कर असें परमेश्वर आपणांस सांगत आहे. त्या संदेशाप्रमाणें त्या पुण्यास येऊन पंडिता रमाबाईंना साहाय्य करूं लागल्या. परमेश्वरानें आपल्याला इतकी उमदी साह्यकर्ती दिली म्हणून रमाबाई परमेश्वराच्या नेहमींच्या ऋणी राहिल्या.

रमाबाईंप्रमाणें सुंदराबाईंचा प्रार्थनेवर फार भर व भरंवसा. ह्या दोघींनीं कित्येक दिवस एक आग्रहाची प्रार्थना चालविली होती कीं आपल्याला मिस् मिनी एब्राम्स ह्या बाईनें येऊन मिळावें. विश्वाससंबंधीं ह्या बाईंची ख्याति होती. त्या एका मिशनमध्यें मिशनरी म्हणून काम करीत. रमाबाईंच्या व सुंदराबाईंच्या आग्रहाच्या प्रार्थना देवानें ऐकल्या. मिस् एब्राम्स ह्यासंबंधानें लिहितात :

"१८९७ च्या सुरुवातीला पंडिता रमाबाई कार्यकर्त्यांसाठीं एकसारख्या प्रार्थना करीत होत्या. 'जॉर्ज मुलरनें'[1] जेव्हां विश्वासावर अवलंबून आपल्या कार्याला आरंभ केला होता तेव्हां त्याच्या पाठीमागें सारें खिस्ती इंग्लंड होतें व त्याला खिस्ती कार्यकर्त्यांचा तोटा नव्हता. रमाबाईंच्यामागें कांहीं असली प्रार्थनाशील खिस्ती मंडळी नव्हती. त्यांचा कितीतरी काळ अशा कार्यकर्त्यांच्या प्राप्तीसाठीं प्रार्थना व उपवास करण्यांत खर्च होत होता. त्यांना स्वतः पुष्कळ वेळेला दुष्काळग्रस्त प्रांतांत हिंडावें लागे. त्यामुळें त्यांच्या सदनांत काम पहाण्यास कोणी नसे. म्हणूनच त्यांनीं आपल्या चोवीस हूड दुष्काळी मुली मजकडे सांभाळण्यास पाठवून दिल्या होत्या. प्रार्थनेनें व शिक्षणानें त्या बऱ्याच ताळ्यावर आल्या होत्या. सप्टेंबरच्या सुमाराला त्या शाळेला जाऊं लागल्या व कांहीं हस्तव्यवसाय शिकूं लागल्या.

"मी एक खेड्यापाड्यांत उपदेश करणारी उपदेशिका होतें. लांबच लांब पावसाळा संपला होता व मी आणि माझ्या इतर सहकारी ह्यांनीं

---

१. जॉर्ज मुलर हा एक प्रसिद्ध जर्मन परोपकारी लोकहितकर्ता गेल्या शतकाच्या शेवटीं होऊन गेला. (१८०५ ते १८९८). तो इंग्लंडमध्यें येऊन स्थायिक झाला होता. १८७५ सालीं त्यानें एक महान् मिशनरी यात्रा सुरू केली होती. प्रार्थनेच्या बळावर त्यानें २००० अनाथांना आश्रय दिला होता. मिस् एब्राहाम मुलरच्या पाठीमागें असलेल्या शेकडों खिस्ती लोकांच्या प्रार्थनांच्या बळाचा उल्लेख येथें करीत आहेत.

एक आठवड्याचा वेळ विशेष अभ्यासक्रम व प्रार्थना ह्यांत घालविला. ऑक्टोबर पहिलीला शांतपणें चिंतनांत घालविण्यास वेळ मिळाला. चारला मी जागी झालें. मला अशी ओढ लागली कीं जणूं काय परमेश्वर मला सांगत आहे, तूं केडगांवला जाऊन ये. मला वाटलें कीं ही पवित्र आत्म्याचीच वाणी मला अशी आज्ञा करीत आहे, म्हणून ती मी मानलीच पाहिजे. मी ताबडतोब उठलें आणि केडगांवला गेलें. तेथें जाऊन पाहातें तों पंडिता रमाबाईंना माझ्याप्रमाणेंच पवित्र आत्म्याकडून प्रेरणा होऊन त्या आदल्याच दिवशीं येथून पांचशें मैल दूर असलेल्या अलाहाबादला निघून गेलेल्या आहेत! पंधरा ते पंचवीस वर्षांच्या वयाच्या पुष्कळ दुष्काळी विधवा त्या ठिकाणीं तट्टयांच्या झोपड्यांत ठेवल्या होत्या. त्यांतच लहानलहान बालविधवाहि होत्या. ह्या मोठ्या थोरल्या समूहाची काळजी वहायला केवळ तीनच ख्रिस्ती बाया तेथें होत्या. त्याहि धार्मिक दृष्ट्या केवळ बाळें होत्या. पंडिता रमाबाईंना बाहेर जाणें भागच होतें. ह्या थोडक्या कामकरी बायांना जरी तें काम खूप जड पडत होतें, तरी आपल्या कामांत त्या कांहीं कुचराई करीत नव्हत्या. पण त्या बापड्या फार थोड्या होत्या. केडगांवहून परत आल्यावर "रविवारीं सकाळीं मी जागी झालें तेव्हां मला वाटलें कीं माझी खोली परमेश्वराच्या अस्तित्वानें भरून गेली आहे व मी त्याच्यापुढें मौन धरलें पाहिजे. असा भास मला होत होता कीं विनंतीच्या नयनांनीं माझा तारणारा मला म्हणतो आहे, 'केडगांवला माझीं अनाथ बालकें उघडीं पडलीं आहेत. त्यांचें रक्षण करायला तूं नाहीं का जाणार?' मला माझें हातांतलें काम आवडत होतें. माझी मिशनरी संस्था मला प्रिय होती, तरी मला परमेश्वराला नाहीं म्हणवेना. पण पंडिता रमाबाई काय म्हणतील ह्याची मला कल्पना नव्हती. सोमवारीं सकाळीं मीं सुंदराबाई पवारांकडे जाऊन सर्व हकीगत सांगितली. त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारांचा वर्षाव होऊं लागला. त्या म्हणाल्या, 'रमाबाई व मी ह्याचसाठीं प्रार्थना करीत होतों. पुष्कळ महिने आम्ही प्रार्थना केल्या आणि एकदां तर खुद्द रमाबाईच तुम्हांला येऊन सांगणार होत्या कीं, तुम्ही केडगांवला जा. पण नंतर त्यांनीं बेत बदलला आणि म्हटलें, नाहीं, सर्व कांहीं प्रभूलाच करूं दे. कांहीं कोठें चूक रहायाला नको. ह्यानंतर रमाबाई परत आल्याबरोबर माझ्या घरीं आल्या. त्यांच्या चेहऱ्यावर

आनंद ओसंडत होता. 'चला, केव्हां येतां केडगांवला ?' त्या म्हणाल्या. देवानें सर्व अडथळे दूर केले आणि १५ ऑक्टोबरला मी माझ्या बोर्डिंगसह केडगांवला येऊन दाखल झालें. मिनी एब्राहामप्रमाणेंच इ. मि. ब्रुअर हेहि केडगांवला असेच खेचले गेले. त्यांनीं केडगांवच्या धर्मोपाध्यायाचें काम विना-वेतन केलें रमाबाईंच्या मृत्यूची बातमी केडगांवच्या बाहेर पडण्याच्या आधींच त्यांना ती घटना जणू प्रेरण्यांत आली व ते बाहेर गांवाहून उठून सरळ केडगांवाला त्या प्रसंगीं हजर झाले. तेव्हां सर्वांना मोठें आश्चर्य वाटलें.

"त्याच, दिवशीं परमेश्वर आणखी एका भक्ताची तयारी करीत होता ह्या भक्तासाठीं मुक्तीच्या चरित्रांत फार मोलवान असे आध्यात्मिक कार्य नेमून ठेवण्यांत आलें होतें. पंडिताबाई अलाहाबादला गेल्या त्या दिवशीं दौंडपर्यंत त्यांच्याबरोबर दादासाहेब गद्रे गेले होते. दौंडास मिस् ब्रूस ह्या त्यांना भेटल्या. त्यांनीं गद्र्यांना विचारलें तुम्ही येशूचा स्वीकार कधीं करणार ? हें बोलणें झाल्यावर मिस् ब्रूस एका बाजूनें गेल्या, रमाबाई नगर वाटेनें अलाहाबादकडे गेल्या व गद्रे परत जाणाऱ्या गाडीची वाट पहात स्टेशन प्लॅटफॉर्मवर खेपा घालूं लागले. रमाबाईंचें शिक्षण, त्यांचें चरित्र, त्यांच्या प्रार्थनांना मिळणारीं विलक्षण उत्तरें, दुष्काळग्रस्तांना पाठविण्यांत येणारीं सहानुभूतिपर पत्रें व देणग्या, बाईंच्या कर्तबगारीमुळें ह्या आपद्ग्रस्तांबद्दल जगांतल्या कानाकोपऱ्यांत उत्पन्न झालेली करुणा, ह्या गोष्टींमुळें गद्र्यांचें मन हेलावून गेलें. आपल्या आयुष्यांतील महत्त्वाचा निर्णय मध्यरात्र उलटण्यापूर्वीं घेण्याचें त्यांनीं ठरविलें.' केडगांवला पोंचल्याबरोबर त्यांनीं रमाबाईंना तार केली: Prejudices and September end together. I become Christian, ताबडतोब त्यांच्या भोवतीं छळाचा डोंब उठला. पण ह्या निश्चयानंतर त्यांनीं आपल्या प्रभूचा त्याग कधींच केला नाहीं. आपल्या प्रार्थनेंत बाई आपल्या मुलींची नेहमीं आठवण ठेवीत. प्रार्थना व उपास हीं नित्य चाललेलीं असत. एक दिवस त्यांच्या मुलींनींहि दादांप्रमाणें आपला निश्चय जाहीर केला व २६ ऑक्टोबर १८९८ रोजीं ब्रुअर साहेबांच्या हस्तें भीमा नदींत ७३ जणांचा बाप्तिस्मा झाला, त्यांतच दादा होते. आणखी कांहीं दिवसांनीं ३२ व त्यानंतर १०९ अशा स्त्रियांचे बाप्तिस्मे झाले.

दादासाहेबांनीं घेतलेला निर्णय घाईघाईनें व भावनाविवश होऊन

घेतलेला नव्हता. पांच वर्षांपूर्वी शारदाबाईच्या बाप्तिस्म्याचा प्रश्न निघाला व गद्र्यांनीं बाईंना त्याबद्दल विचारलें, तेव्हां बाईंनीं त्यांना लिहून कळविलें होतें कीं तुमचेंहि तारण प्रभु येशूवर विश्वास ठेवल्यानें होईल. तेव्हांच हा प्रश्न त्यांच्यापुढें उभा राहिला होता. १८९३ सालीं जेव्हां २० मुली सदनांतून काढून घेण्यांत आल्या त्यांत दादासाहेब गद्रे यांची शारदा हीहि एक होती. त्याच वेळेस त्यांनीं व त्यांच्या पत्नीनें शारदेचें मन वळवून तिचें लग्न लावून टाकलें. तेव्हांपासून त्यांच्या डोळ्यांपुढें हा प्रश्न सतत जागृत होता. ह्या घटनेनंतर पांच वर्षांनीं त्यांनीं हा निर्णय घेतला.

गद्र्यांच्या निश्चयाची चमक त्यांच्या आयुष्यांत पदोपदीं दिसून येते.

'Brother Gadre was born in an orthodox Hindu Family, and was designed for priesthood, but dissatisfied with Hinduism he entered the ranks of Reformers and became a member of the Prarthana Samaj, and remained with them for many years.'[1]

चिपळूण तालुक्यांतील गुहागर हें गद्र्यांचें मूळ गांव. चित्पावन कोंकणस्थ ब्राह्मण मूळ ह्याच ठिकाणाहून आले असें म्हणतात. गुहागरहून गद्रे मुंबईस कसे आले हें सांगतां येत नाहीं. मात्र मुंबईतील मनी स्कूल नामक प्रसिद्ध मिशन शाळेंत त्यांचें शिक्षण झालें हें निश्चित. मनी स्कूल त्या वेळीं धोबी तलावजवळ होतें.

दादासाहेब गद्र्यांनीं पुनर्विवाह करण्याचें आपल्या मनाशीं ठरविलें. त्या वेळीं ह्या प्रश्नावर पूर्वपक्ष उत्तरपक्ष होऊन जोराचा वाद चालला होता. दादासाहेब हे न्या. रानड्यांसारखे कोणी उच्च पदावर चढलेले किंवा फार विद्वान् गृहस्थ नव्हते. ते एक साधेसुधे सुधारक होते. मनाला पटेल तसें करायचें व तसें वागायचें हें त्यांना ठाऊक होतें. तसें करतांना कोणाला भ्यायचें नाहीं कीं कोणाची पर्वा करायाची नाहीं हें त्यांचें साधेसुधें जीवनतत्त्व होतें. गोपाळराव जोशी म्हणत, हे सुधारक करतात थोडें पण ह्यांची मचमच मात्र फार. एखादी स्त्री माझ्या हातीं द्या म्हणजे मी स्त्रीशिक्षणाचा प्रश्न सोडवून दाखवितों. गोपाळरावहि एक असेच साधेसुधे गृहस्थ होते. पण ते बोलके

१. Mukti Prayer Bell : March 1913, page 4.

सुधारक नसून कर्ते सुधारक होते. त्यांनीं आपल्या पत्नीला अमेरिकेंत पाठवून एम्. डी. करून आणलें, व आपला शब्द खरा करून दाखविला. दादासाहेब गद्रे हे असल्या कर्त्या सुधारकांपैकीं एक होते.

दादासाहेबांच्या बाबतींत एक विशेष गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी ही कीं त्यांच्या बाबतींत पुनर्विवाह त्यांच्या पत्नीचा झाला. त्यांचा तो प्रथम विवाहच होता. आतांपर्यंत झालेल्या साऱ्या पुनर्विवाहांत पति विधुर व पत्नी विधवा असे. दादासाहेब विधुर नव्हते. पुनर्विवाह होता तो त्यांच्या पत्नीचा. असला हा पुनर्विवाह पहिलाच, व पुनर्विवाहाचा कायदा पसार झाल्यानंतरचा तिसरा पुनर्विवाह. कल्याणच्या रावजी धोंडदेव जोशी नांवाच्या गृहस्थांच्या दुर्गाबाई नामक गततृभका कन्येशीं दादांनीं पुनर्विवाह केला.

१८५६ सालीं पुनर्विवाहास मान्यता देणारा कायदा पास झाला. त्यानंतर डॉ. कर्व्यांच्या पुनर्विवाहापर्यंत खालीं नमूद केलेले केवळ पांचच विवाह पुण्यामुंबईकडे झाल्याचा पुरावा मिळतो.

१८६९ : पां. नि. करमरकर व वेणूबाई. १८७० : बा. बा. नवरंगे व कृष्णाबाई, १८७१ गंगाधरपंत गद्रे व दुर्गाबाई. १८७८ स. पां. केळकर व दुर्गाबाई. १८९१ अण्णासाहेब कर्वे व गोदूबाई. ह्याच्या आधीं गुजराथी समाजांत आणखी तीन पुनर्विवाह झाले होते.[1]

ह्या विवाहानिमित्त दादासाहेबांच्या वडिलांनीं चिरंजीवांना जो आहेर केला तो त्या काळच्या मंडळीला मोठा विलक्षण वाटला नसेल परंतु आजकाल मात्र कोणी तसला आहेर करणार नाहीं. आपले चिरंजीव एका विधवेशीं पाट लावणार ही बातमी जेव्हां दादांच्या वडलांस लागली तेव्हां ते गुहागरहून मुंबईस आले व त्यांनीं आपल्या मुलाचें मन वळवण्याचा प्रयत्न केला. परंतु मुलगा आपल्या निश्चयापासून ढळत नाहीं अशी त्यांची खात्री झाली तेव्हां तेथेंच त्यांनीं आपल्या जिवंत मुलाचें श्राद्ध केलें व नंतर ते परत गुहागरला गेले !

१. प्रार्थना समाजाचे एक प्रसिद्ध समासद श्री. सदाशिव पांडुरंग केळकर यांनीं ज्ञानदीप नांवाचें एक अल्पजीवी मासिक काढलें होतें. डॉ. कर्व्यांच्या पुनर्विवाहानंतर त्यांनीं ज्ञानदीपाचा विशेष अंक काढला होता; व १८९६ मध्यें त्याची नवीन आवृत्ति निघाली होती. ह्या पुस्तिकेप्रमाणें डॉ. कर्वे ह्यांचा पुनर्विवाह २८ वा होता. पहिला पुनर्विवाह १८५३–५४ सालीं अप्रसिद्ध रीत्या झाला होता.

दादासाहेबांचें नांव गंगाधरपंत असें होतें. दुर्गाबाई सहा वर्षांच्या होत्या तेव्हांच विधवा झाल्या. वडील रावजी धोंडदेव जोशी ह्यांनीं वर्तमानपत्रांत पुनर्विवाहाच्या चर्चा वाचून आपल्या मुलीचा पुनर्विवाह करून द्यायचें ठरविलें होतें. गंगाधरपंतांना पुनर्विवाहच करायचा असल्यानें हें लग्न जुळून आलें. ह्या दांपत्याला ८ अपत्यें झालीं. दुर्गाबाई आपलीं मुलें ख्रिस्ती होऊं नयेत, म्हणून फार जपत. त्या स्वतः एकनिष्ठ प्रार्थना समाजी होत्या व कधींच प्रार्थना समाजाची ईश्वरोपासना चुकवीत नसत. पुनर्विवाहाप्रमाणेंच दादासाहेब स्त्रीशिक्षणाचेहि पुरस्कर्ते असल्यानें त्यांनीं आपली दुसरी कन्या शारदा हिला पंडिता रमाबाईंच्या शारदा सदनांत घातली. १८८९ मध्यें दादासाहेबांना शारदा सदनाचे सेक्रेटरी करण्यांत आले. शारदा सदनाच्या स्थापनेंतहि दादांचा हात होता. रमाबाईंनीं आपल्या मुक्ती प्रेअर बेलच्या मार्च १९१३ च्या अंकांत ह्या गोष्टीचा उल्लेख केला आहे.

शारदा सदनावर ख्रिस्ती संस्कार पुष्कळच झाले होते. कोणीं आपणावर अल्पसा जरी उपकार केला तरी त्याची नोंद ठेऊन आभार मानायाचे असाच एक त्यांचा रिवाज आहे. शारदा सदनांत दादांची मुलगी शारदा होती तिची एक गोष्ट सांगतात. तिनें एक स्मरणवही ठेवली होती. तींत अशा गोष्टी नमूद करून ठेवलेल्या होत्या. वहीवर "Book of Thanks" असें नांव असून, तींत Bai gave me a plantain अशा नोंदी सांपडतात. पुढें पुढें ह्या मुलीचा ख्रिस्ती धर्माकडे ओढा फारच वाढूं लागला तेव्हां दुर्गाबाईंच्या आग्रहावरून मुलीचें लग्न करून टाकण्यांत आलें. हा विवाह १८९५ सालीं झाला. शारदाबाईंच्या पतीचे नांव श्री. लक्ष्मीनरसिंह घंटी असें होतें परंतु नरसिंह हेंच नांव ते चालवीत, श्री. नरसिंह पुढें ख्रिस्ती झाले व एकदां मुंबईच्या इंडियन ख्रिश्चन असोसिएशनचे ते अध्यक्षहि होते. परंतु ते क्वेकर पंथी असल्यानें त्यांचें व इतर ख्रिस्ती लोकांचें त्यांच्याशीं पटलें नाहीं आणि शेवटीं त्यांनीं आपल्या अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला. भारतांत ह्या क्वेकर मताचे अनुयायी फार थोडे आहेत. युद्ध करणें हें पातक आहे असें मानणारे हे लोक असल्यानें कोठल्याच व्यावहारिक ख्रिस्ती पंथाशीं त्यांचें जमणें शक्य नाहीं.

पुढें शारदाबाई बाळंतपण मुंबईच्या कामा हॉस्पिटलमध्यें होऊन त्यांतच

त्या वारल्या. ह्या संबंधानें सुबोधपत्रिकेंत असा मजकूर छापला आहे:

"शारदाबाई सदनांत असतां एकदां त्यांचा ख्रिस्ती होण्याचा पूर्ण निश्चय झाला होता, पण त्यांच्या दृढनिश्चयी मातेनें त्यांना त्यापासून परावृत्त केलें, व त्यांच्या पित्याच्या साह्यानें एकेश्वरी धर्माची सत्यता त्यांच्या अनुभवास आणून दिली. त्यांचा ब्राह्म धर्मावर इतका विश्वास बसला होता कीं त्यांनीं ख्रिस्ती व्हावें म्हणून झालेले सर्व प्रयत्न निष्फळ झाले[1]."

शारदाबाईंचा इंग्रजीचा अभ्यास बराच झालेला असल्यानें त्यांचा आंतर-प्रान्तीय विवाह होणें शक्य झालें.

शारदाबाईंच्या मृत्यूच्या आधीं एक वर्ष त्यांच्या मातुश्रींचा मृत्यु झाला. त्यासंबंधीं सुबोध पत्रिकेनें खालील स्फुट लिहिलें होतें:

"त्यांना आठ मुलें झालीं. त्यांतील तीन मुली व तीन मुलगे हयात आहेत. सर्वांत लहान मुलगा ६ वर्षांचा व मुलगी ७ वर्षांची आहे[2]."

कुटुंबाच्या मृत्यू नंतर दीड वर्षानीं दादासाहेब ख्रिस्ती झाले, आपलीं दोन धाकटीं मुलें त्यांनीं केडगांवला आपल्या बरोबर नेलीं. 'त्यांपैकीं मुलाला त्यांच्या नातलगांनीं पळवून नेलें,' मुलगी कृष्णाबाई केडगांवलाच राहिली, पुढें तिचा बाप्तिमा झाला. कृष्णाबाईंचे रमाबाईंनीं व मनोरमाबाईंनीं अगदीं स्वतःच्या कन्येप्रमाणें व भगिनीप्रमाणें केलें, व ह्या दोघींनंतर कांहीं दिवस केडगांवची जबाबदारी व भार कृष्णाबाईंच्यावरच पडला.

कृष्णाबाईंनीं 'स्मृतिसुमनें' नांवाचें रमाबाईंसंबंधीं एक सुंदर पुस्तक लिहिलें आहे. त्यांत त्या आपल्या वडिलांविषयीं लिहितात:

'आमच्या एकुलत्या एक 'ताई' (मनोरमाबाई) होत्या तसेच आमचे एकुलते एक 'दादा' (दादासाहेब गद्रे) व एकुलते एक 'मामा' (रे. ब्रुअर) होते. ह्या संस्थेच्या कोटांत वाटेल तेथें परवानगीवांचून केवळ ह्या दोनच पुरुषांना प्रवेश होता. मुलींचें ह्या दोघांवर आपल्या पित्याप्रमाणें प्रेम असे, मग त्या लहान बालिका असोत, तरुण असोत कीं वृद्ध असोत.

'दादांचें काम म्हणजे चार पांचशें मुलींना गाणीं, प्रार्थना, शास्त्रांतल्या

---

१. सुबोधपत्रिका: १० एप्रिल १८९८.

२. सुबोधपत्रिका: ७ फे. १८९७.

गोष्टी, वचनें वगैरे शिकविणें. ते पहाटे अंथरुणांत उठून बसत व हातांत चिपळ्या किंवा टाळ घेऊन भजनें म्हणत. एखादे वेळेस पहांटे उठूत भजनें म्हणत म्हणत ते मुक्ति नगरी भोंवतीं फिरत. एखादे वेळेस ते शेजारपाजारच्या खेड्यांतहि भजनें म्हणत म्हणत जाऊन येत. आम्ही जेव्हां त्यांचीं नेहमींचीं आवडतीं भजनें म्हणतों तेव्हां आम्हांला त्यांची खूप आठवण येते.

'प्रत्येक उपासनेच्या वेळेस दादा मंदिरांत आपल्या जागेवर जाऊन वसत. ही जागा म्हणजे पुलपिटाची पायरी. प्रत्येक उपदेश ते आपल्या स्मरण वहींत टिपून ठेवीत व त्या खालीं उपदेशाची तारीख घालीत. प्रार्थना करतांना ते नेहमीं गुडघे टेकीत. गुडघे न टेकतां प्रार्थना करणें हा परमेश्वराचा अव-मान आहे, असें त्यांना वाटे. ते नेहमीं हात जोडून व डोळे उघडे ठेऊन प्रार्थना करीत. अशा वेळेस जर एखादी मुलगी अर्ध्या उघड्या डोळ्यांनीं टिवल्या बावल्या करतांना त्यांना आढळली तर तेथल्या तेथें तिला चापटपोळी मिळाल्या वांचून राहात नसे, व तीहि अशी खमंग कीं तिनें जन्मांत तो प्रसंग विसरूं नये.

'एऱ्हवी त्यांचें साऱ्या मुलीबाळींवर फार प्रेम. कोणालाहि वर उचलावें, खांद्यांवर बसवावें, त्यांचे मुके घ्यावे. आपल्या खोलींत आणून पात्र अर्धे केळें नारिंग, पेरू अगर मिठाई द्यावी व तिला परत पाठवून द्यावें.

'त्यांचीं इतर कामें म्हणजे संस्थेचा बाजारहाट करणें, पत्रव्यहार करणें, हिशेब ठेवणें, पाहुणे मंडळीचा पाहुणचार करणें. तसें म्हटलें तर ते आमच्या रमाबाईंचे एक प्रकारचे 'बॉडी गार्डच' होते. रमाबाईंचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास होता.

'पुनर्विवाहामुळें ते जातीबाहेर पडले होते. पण त्या काळांत ते प्रार्थना-समाजी होते. नंतर ते सत्यशोधक बनले व ह्या अवस्थेंत, रमाबाईंशीं धार्मिक बाबतींत ते नेहमीं कडाक्याचा वादविवाद करीत. त्यांच्या बरोबर दादांनीं पवित्र शास्त्राचें (बायबल) अध्ययन सुरू केलें. पण अंगीं भिनलेली त्यांची वादविवा-दाची ती खोड जाईना. ह्या वितंडवादाचा कांहीं उपयोग नाहीं असें ठरवून बाईंनीं वाद करायचें सोडून दिलें व त्या आतां दादांसाठीं सतत प्रार्थना करूं लागल्या. आपल्या प्रार्थनेच्या यादींत त्यांनीं दादांचें नांव घातलें. दादांनीं पूर्वीं हरएक प्रसंगीं रमाबाईंच्या व त्यांच्या संस्थेच्या विरुद्ध चळवळींत भाग घेतला

त्या वारल्या. ह्या संबंधानें सुबोधपत्रिकेंत असा मजकूर छापला आहे:

"शारदाबाई सदनांत असतां एकदां त्यांचा ख्रिस्ती होण्याचा पूर्ण निश्चय झाला होता, पण त्यांच्या दृढनिश्चयी मातेनें त्यांना त्यापासून परावृत्त केलें, व त्यांच्या पित्याच्या साह्यानें एकेश्वरी धर्माची सत्यता त्यांच्या अनुभवास आणून दिली. त्यांचा ब्राह्म धर्मावर इतका विश्वास बसला होता कीं त्यांनीं ख्रिस्ती व्हावें म्हणून झालेले सर्व प्रयत्न निष्फळ झाले[1]."

शारदाबाईंचा इंग्रजीचा अभ्यास बराच झालेला असल्यानें त्यांचा आंतर-प्रान्तीय विवाह होणें शक्य झालें.

शारदाबाईंच्या मृत्यूच्या आधीं एक वर्ष त्यांच्या मातुश्रींचा मृत्यु झाला. त्यासंबंधीं सुबोध पत्रिकेनें खालील स्फुट लिहिलें होतें:

"त्यांना आठ मुलें झालीं. त्यांतील तीन मुली व तीन मुलगे हयात आहेत. सर्वांत लहान मुलगा ६ वर्षांचा व मुलगी ७ वर्षांची आहे[2]."

कुटुंबाच्या मृत्यू नंतर दीड वर्षानीं दादासाहेब ख्रिस्ती झाले, आपलीं दोन धाकटीं मुलें त्यांनीं केडगांवला आपल्या बरोबर नेलीं. 'त्यांपैकीं मुलाला त्यांच्या नातलगांनीं पळवून नेलें,' मुलगी कृष्णाबाई केडगांवलाच राहिली, पुढें तिचा बाप्तिमा झाला. कृष्णाबाईंचे रमाबाईंनीं व मनोरमाबाईंनीं अगदीं स्वतःच्या कन्येप्रमाणें व भगिनीप्रमाणें केलें, व ह्या दोघींनंतर कांहीं दिवस केडगांवची जबाबदारी व भार कृष्णाबाईंच्यावरच पडला.

कृष्णाबाईंनीं 'स्मृतिसुमनें' नांवाचें रमाबाईंसंबंधीं एक सुंदर पुस्तक लिहिलें आहे. त्यांत त्या आपल्या वडिलांविषयीं लिहितात:

'आमच्या एकुलत्या एक 'ताई' (मनोरमाबाई) होत्या तसेच आमचे एकुलते एक 'दादा' (दादासाहेब गद्रे) व एकुलते एक 'मामा' (रे. ब्रुअर) होते. ह्या संस्थेच्या कोटांत वाटेल तेथें परवानगीवांचून केवळ ह्या दोनच पुरुषांना प्रवेश होता. मुलींचें ह्या दोघांवर आपल्या पित्याप्रमाणें प्रेम असे, मग त्या लहान बालिका असोत, तरुण असोत कीं वृद्ध असोत.

'दादांचें काम म्हणजे चार पांचशें मुलींना गाणीं, प्रार्थना, शास्त्रांतल्या

---

१. सुबोधपत्रिका: १० एप्रिल १८९८.

२. सुबोधपत्रिका: ७ फे. १८९७.

गोष्टी, वचनें वगैरे शिकविणें. ते पहाटे अंथरुणांत उठून बसत व हातांत चिपळ्या किंवा टाळ घेऊन भजनें म्हणत. एखादे वेळेस पहाटे उठूत भजनें म्हणत म्हणत ते मुक्ति नगरी भोंवतीं फिरत. एखादे वेळेस ते शेजारपाजारच्या खेड्यांतहि भजनें म्हणत म्हणत जाऊन येत. आम्ही जेव्हां त्यांचीं नेहमींचीं आवडतीं भजनें म्हणतों तेव्हां आम्हांला त्यांची खूप आठवण येते.

'प्रत्येक उपासनेच्या वेळेस दादा मंदिरांत आपल्या जागेवर जाऊन बसत. ही जागा म्हणजे पुलपिटाची पायरी. प्रत्येक उपदेश ते आपल्या स्मरण वहींत टिपून ठेवीत व त्या खालीं उपदेशाची तारीख घालीत. प्रार्थना करतांना ते नेहमीं गुडघे टेकीत. गुडघे न टेकतां प्रार्थना करणें हा परमेश्वराचा अव-मान आहे, असें त्यांना वाटे. ते नेहमीं हात जोडून व डोळे उघडे ठेऊन प्रार्थना करीत. अशा वेळेस जर एखादी मुलगी अर्ध्या उघड्या डोळ्यांनीं टिवल्या बावल्या करतांना त्यांना आढळली तर तेथल्या तेथें तिला चापटपोळी मिळाल्या वांचून राहात नसे, व तीहि अशी खमंग कीं तिनें जन्मांत तो प्रसंग विसरूं नये.

'एऱ्हवी त्यांचें साऱ्या मुलीबाळींवर फार प्रेम. कोणालाहि वर उचलावें, खांद्यांवर बसवावें, त्यांचे मुके घ्यावे. आपल्या खोलींत आणून पात्र अर्धे केळें नारिंग, पेरू अगर मिठाई द्यावी व तिला परत पाठवून द्यावें.

'त्यांचीं इतर कामें म्हणजे संस्थेचा बाजारहाट करणें, पत्रव्यहार करणें, हिशेब ठेवणें, पाहुणे मंडळीचा पाहुणचार करणें. तसें म्हटलें तर ते आमच्या रमाबाईंचे एक प्रकारचे 'बॉडी गार्डच' होते. रमाबाईंचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास होता.

'पुनर्विवाहामुळें ते जातीबाहेर पडले होते. पण त्या काळांत ते प्रार्थना-समाजी होते. नंतर ते सत्यशोधक बनले व ह्या अवस्थेंत, रमाबाईंशीं धार्मिक बाबतींत ते नेहमीं कडाक्याचा वादविवाद करीत. त्यांच्या बरोबर दादांनीं पवित्र शास्त्राचें (बायबल) अध्ययन सुरू केलें. पण अंगीं भिनलेली त्यांची वादविवा-दाची ती खोड जाईना. ह्या वितंडवादाचा कांहीं उपयोग नाहीं असें ठरवून बाईंनीं वाद करायचें सोडून दिलें व त्या आतां दादांसाठीं सतत प्रार्थना करूं लागल्या. आपल्या प्रार्थनेच्या यादींत त्यांनीं दादांचें नांव घातलें. दादांनीं पूर्वी हरएक प्रसंगीं रमाबाईंच्या व त्यांच्या संस्थेच्या विरुद्ध चळवळींत भाग घेतला

होता. परंतु बाईंनीं केवळ आपल्या सहनशीलतेनें, प्रेमानें व प्रार्थनेच्या बळानें दादांना देवाच्या राज्यांत आणलें, म्हणजे आमच्या दादांनीं पुढें उघडपणें प्रभु येशूला आपला तारणारा म्हणून पत्करिलें. ते पूर्वी जसें कट्टर ब्राह्मण होते तसे आतां ते कट्टर ख्रिस्ती बनले. बाप्तिस्म्याच्या वेळेस त्यांनीं स्वतःला 'देवदास' हें नांव घेतलें होतें व तें त्यांनीं सार्थ करून, १९१२ सालीं आपली इहलोकची यात्रा संपविली.'

ह्यानंतर कृष्णाबाई 'मामा' संबंधीं लिहितात. हे 'मामा' म्हणजे रे. डब्ल्यू. डब्ल्यू. ब्रुअर. हे मेथॉडिस्ट एपिस्कोपल चर्चचे एक अमेरिकन मिशनरी होते.

'मामा म्हणजे आमचे धर्मपिते होते. त्यांच्या इतके प्रेमळ व गोड स्वभावाचे पाळक आतां दुामळ होत चालले आहेत. ते आले कीं आम्ही मामा मामा म्हणून त्यांच्या मागें मागें करावें. त्यांचे ठराविक प्रश्न आम्हाला असत. 'कशा काय आहांत ? बऱ्या आहांत ना ? प्रभूमध्यें आनंदांत आहां ना ? आज सकाळीं देवानें तुम्हांला कोणतें आत्मिक अन्न दिलें ? अशा वेळेस एखाद्या मुलीचें तोंड दुर्मुखलेलें दिसलें कीं त्यांनीं ताडावें ह्या मुलीचें कांहीं तरी बिघडलें आहे. तिला मग त्यांनीं एका बाजूला घ्यावें, तिची समजूत करावी. तिच्या बरोबर प्रार्थना करावी व तिला हसतमुख पाठवून द्यावी.

'महिन्यांतून एकदोन वेळेला ते साक्षीची सभा भरवीत. एकेकीला नांवानें पुढें बोलावून साक्ष द्यायला सांगत. मधून मधून ध्रुपदें गाऊन ते सर्व मंडळीला हर्षानें डोलवून सोडीत. त्यांचीं आवडतीं गाणीं म्हणजे 'मी पार येईन' 'मीं खनान देशांत आहे' 'वधस्तंभ, वधस्तंभ, मला दिसला' आणि 'माझें पाप ओझें पडलें' 'या हो या हो ख्रिस्तापाशीं या आज.'

'मुक्ति सदनांतील निदान एक हजार तरी मुलींचा बाप्तिस्मा त्यांच्या हातून झाला. ते नेहमीं हसतमुख असत. त्यांची वाणी प्रेमळ होती व त्यांचें प्रार्थनेचें जिणें अनुकरणीय होतें.'[1]

केडगांवांतील सोनूबाई अंदा व नानूबाई पुनो नांवाच्या दोघां सहकारी भगिनींनीं कृष्णाबाईच्या निर्याणानंतर लिहिलेल्या त्यांच्या चरित्रपर पुस्तिके-

१. स्मृतिसुमनें. पृष्ठ ५०–५३

वरून बरीच माहिती मिळते. कृष्णाबाईंना मनोरमाबाई सख्ख्या धाकट्या बहिणीप्रमाणें मानीत. मॅट्रिक झाल्यावर त्यांनीं त्यांना इझाबेला थोबर्न कालेज-मध्यें पाठवून त्यांचें बी. ए. पर्यंतचें शिक्षण करून घेतलें. पुढें मुंबईस जाऊन त्या बी. टी. हि झाल्या. आतां बाईंचें व ताईंचें ओझें उचलून घेण्याची त्यांची तयारी झाली. शारदासदनाची सर्व जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यांत आली. शारदासदनांतील प्रत्येक शिक्षक ट्रेण्ड असलाच पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता व त्या ध्येयानुसार त्यांनीं शिक्षक तयार केले.

एखादा विद्यार्थी फार मंद आहे, त्याला कांहीं येणार नाहीं असें कोणीं म्हटलेलें त्यांना मुळींच खपत नसे. त्या म्हणत, असें कां म्हणतां? त्याच्यासाठीं तुम्हीं कांहीं निराळ्या मार्गानें कधीं प्रयत्न केला आहे का? उगीच कां त्याला मंद ठरवितां? आणि त्या तसल्या विद्यार्थ्यांसाठीं विशेष प्रयत्नाला लागत. आणि अशा कितीतरी त्यांच्या प्रयत्नांना गोमटीं फळें लागलेलीं पुढें आढळून आलीं.

पुढें त्या इंग्लंडला जाण्यास निघाल्या. शाळा पैशाच्या अभावीं बंद करावी लागणार म्हणून जातांना त्यांना फारच वाईट वाटत होतें. पण त्या तशाच स्वतःच्या जबाबदारीवर गेल्या. तें १९२८ साल होतें. रमाबाई व मनोरमाताई अशा दोघीहि त्यांच्या पाठीशीं आतां नव्हत्या. सर्व जबाबदारी त्यांची एकट्यांची होती. त्यांना बराच विरोध झाला. पण त्यांनीं आपला सर्व भार परमेश्वरावर टाकला होता व त्याचीं फळें त्यांना मिळालीं.

विलायतेहून परत आल्यावर त्या ऑनररी मिशनरी म्हणून काम पाहूं लागल्या. विधवा, म्हाताऱ्याकोताऱ्या, पोरेंबाळें, ह्या सर्वांचा भार त्या वाहूं लागल्या. १९३८ मध्यें त्यांच्या पुढाकारानें पंडिता रमाबाईच्या नव्या कराराचें भाषान्तर पुनर्मुद्रित झालें. त्यांना आतां मंडळीचें 'पाळकपण' देण्यांत आलें.

११ मार्च १९३९ मध्यें शारदासदन स्थापन होऊन ५० वर्षें झाल्यानें कृष्णाबाईंच्या पुढाकारानें सदनाचा सुवर्णमहोत्सव करण्यांत आला. त्या वेळेस त्यांनीं रमाबाईंच्या आठवणीचें स्मृतिसुमनें नांवाचें सुंदर पुस्तक प्रसिद्ध केलें.

त्यानंतर त्या अमेरिकेला गेल्या. युद्धाला त्याच सुमाराला सुरुवात झाली होती.

त्या जातांना इंग्लंडमध्यें उतरल्या व तेथील आपल्या मित्रमंडळीला भेटून मग पुढें अमेरिकेला गेल्या. अमेरिकेंत पोंचतांच बातमी आली कीं जर्मनीनें इंग्लंड-विरुद्ध युद्ध पुकारलें. अमेरिकेंतील त्यांच्या कामाचा संपूर्ण वर्षाचा कार्यक्रम ठरविण्यांत आला होता. दिवसांत त्यांना कधींकधीं चारचार पांचपांच भाषणें करावीं लागत. त्या अमेरिकेंत देशभर फिरून आल्या व तेथें त्यांनीं लोक-जागृति केली. जातांना ज्याप्रमाणें युद्धाच्या ज्वाला थोडक्यांत दूर राहिल्या त्याचप्रमाणें येतानांहि झालें. येतांना त्या पूर्वेकडून आल्या. सिंगापूर सोडून एक-दोन दिवस होतात नाहीं तों जपान्यांनीं सिंगापूर सर केलें. येतांना न्यूझीलंड व ऑस्ट्रेलिया ह्या दोन देशांत त्यांनीं दौरा केला. अशा एका दौऱ्यांत मात्र त्यांच्या जिवावरचें एक संकट निभावलें. न्यू झीलंडमध्यें दौऱ्यावर असतां त्यांची मोटार उलटली व त्या सर्वांच्या खालीं पडल्या व त्यांच्या बरगड्यांत मोटारीची मूठ घुसून त्यांना जबर मुका मार बसला. पण देवानें त्यांतून व पुढें सिंगापूरच्या माऱ्यांतून त्यांना वांचवून सुखरूपपणें केडगांवांत परत आणलें. केडगांवीं परत येतांच त्यांनीं आपल्या कामाची धुरा पुनः उचलून अंगावर घेतली व त्या पूर्ववत आपलें सर्व काम करूं लागल्या.

परंतु कृष्णाबाईच्या अंगावर पडलेल्या सर्व जबाबदाऱ्या व न्यू झीलंड मधील मोटार ह्यांच्या ओझ्याखालीं त्या अगदीं चिरडून गेल्या होत्या व भरडून निघाल्या होत्या. आजारानें न कळत त्यांच्या शरीरांत घर केलें तें कोणाच्या लक्षांत आलें नाहीं. पाळकपणाचें कामहि त्यांना मुळींच विसावा मिळूं देत नसे. मे महिन्यांत बळें बळें त्यांना सुटीला पाठविण्यांत आलें. देवळाची व पाळकपणाची व्यवस्था करून आपल्या नेहमींच्या सहवासांतील गरिबांबरोबर खंडाळा येथें पर्णकुटींत त्यांनीं आपली सुटी घालविली. त्या नेहमीं हसतमुख व आनंदी दिसत त्यामुळें तेथेंहि आजारानें त्यांचें शरीर किती पोखरून टाकलें होतें तें कोणाच्या लक्षांत आलें नाहीं. त्या परत आल्यावर मात्र त्यांच्या मैत्रिणींच्या लक्षांत आलें कीं लक्षण कांहीं ठीक दिसत नाहीं. बळें बळें त्यांना पुण्यास डॉ. ग्रीनफील्डकडे पाठविण्यांत आलें....तेथें दोन महिने काढून त्या मुंबईस टाटा मेमोरियल हास्पिटलमध्यें गेल्या. मिस पेनो त्यांच्या मदतीला म्हणून त्यांच्याबरोबर राहिल्या व त्यांच्या दुःखांत त्यांचें त्यांना फार साह्य झालें.

दवाखान्यांत असतां पडल्या पडल्या त्यांनीं केडगांव येथील मुक्तीशीं संबंध असलेल्या सर्व परदेशीय मित्रमंडळीस पत्रें लिहून कळविलें कीं आपण प्रभूकडे जात आहों पण तुम्हीं सर्वांनीं मुक्ति मिशनसाठीं जो आपलेपणा दाखविला आहे तो कायम ठेवा व वृद्धिंगत होऊं द्या. बिछान्यावर उठून बसून त्यांना भेटायला येणाऱ्या नातलगांस त्यांनीं येशू ख्रिस्ताविषयीं शुभवर्तमान सांगितलें व ता. २६ ऑक्टोबर १९४२ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां त्यांचें शान्तपणें प्राणोत्क्रमण झालें.

कृष्णाबाईंनीं आपल्या आजारांत जी वृत्ति दाखविली ती पंडिताबाईंच्या व मनोरमाबाईंच्या परंपरेला साजेशी होती. ह्या माताकन्यांनीं कृष्णाबाईंच्या रोपट्याला वाढवून योग्य वळण लावून एक आदर्श महिला व दृढनिश्चयी सेविका बनविलें होतें. कृष्णाबाईंचा नश्वर देह रमाबाईंच्या शेजारीं केडगांवच्या प्रेतभूमींत चिरशांति घेत आहे.

त्यांच्याबद्दल एका मृत्युलेखांत म्हटलें आहे:

*'They climbed the steep ascent of heaven*
*Through sorrow, toil and pain,*
*Oh, God! to us may grace be given*
*To follow in their train.'*

ह्या प्रकरणांत उल्लेखलेल्या सर्वच व्यक्तींच्या समाधींवर कोरण्याजोगे हे शब्द आहेत.

त्या जातांना इंग्लंडमध्यें उतरल्या व तेथील आपल्या मित्रमंडळीला भेटून मग पुढें अमेरिकेला गेल्या. अमेरिकेंत पोंचतांच बातमी आली कीं जर्मनीनें इंग्लंड-विरुद्ध युद्ध पुकारलें. अमेरिकेंतील त्यांच्या कामाचा संपूर्ण वर्षाचा कार्यक्रम ठरविण्यांत आला होता. दिवसांत त्यांना कधींकधीं चारचार पांचपांच भाषणें करावीं लागत. त्या अमेरिकेंत देशभर फिरून आल्या व तेथें त्यांनीं लोक-जागृति केली. जातांना ज्याप्रमाणें युद्धाच्या ज्वाला थोडक्यांत दूर राहिल्या त्याचप्रमाणें येतानांहि झालें. येतांना त्या पूर्वेकडून आल्या. सिंगापूर सोडून एक-दोन दिवस होतात नाहीं तों जपान्यांनीं सिंगापूर सर केलें. येतांना न्यूझीलंड व ऑस्ट्रेलिया ह्या दोन देशांत त्यांनीं दौरा केला. अशा एका दौऱ्यांत मात्र त्यांच्या जिवावरचें एक संकट निभावलें. न्यू झीलंडमध्यें दौऱ्यावर असतां त्यांची मोटार उलटली व त्या सर्वांच्या खालीं पडल्या व त्यांच्या बरगड्यांत मोटारीची मूठ घुसून त्यांना जबर मुका मार बसला. पण देवानें त्यांतून व पुढें सिंगापूरच्या माऱ्यांतून त्यांना वांचवून सुखरूपपणें केडगांवांत परत आणलें. केडगांवीं परत येतांच त्यांनीं आपल्या कामाची धुरा पुनः उचलून अंगावर घेतली व त्या पूर्ववत आपलें सर्व काम करूं लागल्या.

परंतु कृष्णाबाईच्या अंगावर पडलेल्या सर्व जबाबदाऱ्या व न्यू झीलंड मधील मोटार ह्यांच्या ओझ्याखालीं त्या अगदीं चिरडून गेल्या होत्या व भरडून निघाल्या होत्या. आजारानें न कळत त्यांच्या शरीरांत घर केलें तें कोणाच्या लक्षांत आलें नाहीं. पाळकपणाचें कामहि त्यांना मुळींच विसावा मिळूं देत नसे. मे महिन्यांत बळें बळें त्यांना सुटीला पाठविण्यांत आलें. देवळाची व पाळकपणाची व्यवस्था करून आपल्या नेहमींच्या सहवासांतील गरिबांबरोबर खंडाळा येथें पर्णकुटींत त्यांनीं आपली सुटी घालविली. त्या नेहमीं हसतमुख व आनंदी दिसत त्यामुळें तेथेंहि आजारानें त्यांचें शरीर किती पोखरून टाकलें होतें तें कोणाच्या लक्षांत आलें नाहीं. त्या परत आल्यावर मात्र त्यांच्या मैत्रिणींच्या लक्षांत आलें कीं लक्षण कांहीं ठीक दिसत नाहीं. बळें बळें त्यांना पुण्यास डॉ. ग्रीनफील्डकडे पाठविण्यांत आलें....तेथें दोन महिने काढून त्या मुंबईस टाटा मेमोरियल हास्पिटलमध्यें गेल्या. मिस पेनो त्यांच्या मदतीला म्हणून त्यांच्याबरोबर राहिल्या व त्यांच्या दुःखांत त्यांचें त्यांना फार साह्य झालें.

दवाखान्यांत असतां पडल्या पडल्या त्यांनीं केडगांव येथील मुक्तीशीं संबंध असलेल्या सर्व परदेशीय मित्रमंडळीस पत्रें लिहून कळविलें कीं आपण प्रभूकडे जात आहों पण तुम्हीं सर्वांनीं मुक्ति मिशनसाठीं जो आपलेपणा दाखविला आहे तो कायम ठेवा व वृद्धिंगत होऊं द्या. बिछान्यावर उठून बसून त्यांना भेटायला येणाऱ्या नातलगांस त्यांनीं येशू ख्रिस्ताविषयीं शुभवर्तमान सांगितलें व ता. २६ ऑक्टोबर १९४२ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां त्यांचें शान्तपणें प्राणोत्क्रमण झालें.

कृष्णाबाईनीं आपल्या आजारांत जी वृत्ति दाखविली ती पंडिताबाईंच्या व मनोरमाबाईंच्या परंपरेला साजेशी होती. ह्या माताकन्यांनीं कृष्णाबाईंच्या रोपट्याला वाढवून योग्य वळण लावून एक आदर्श महिला व दृढनिश्चयी सेविका बनविलें होतें. कृष्णाबाईंचा नश्वर देह रमाबाईंच्या शेजारीं केडगांवच्या प्रेतभूमींत चिरशांति घेत आहे.

त्यांच्याबद्दल एका मृत्युलेखांत म्हटलें आहे:

*'They climbed the steep ascent of heaven*
*Through sorrow, toil and pain,*
*Oh, God! to us may grace be given*
*To follow in their train.'*

ह्या प्रकरणांत उल्लेखलेल्या सर्वच व्यक्तींच्या समाधींवर कोरण्याजोगे हे शब्द आहेत.

## २५ रमाबाईंची वाङ्मयसेवा

पंडिता रमाबाईंनीं लिहिलेल्या ग्रंथांचे दोन गट पडतात. एक त्या इंग्लंडला जाण्यास निघाल्या तेव्हांपासून परत येऊन केडगांवला स्थाईक होईपर्यंतच्या काळांतील व दुसरा केडगांवला गेल्यानंतरच्या काळांतील.

पहिल्या गटांत स्त्री–धर्म–नीति, इंग्लंडचा प्रवास, द हाय कास्ट हिंदु ऊमन, नांवाचें इंग्रजी पुस्तक, युनायटेट स्टेटसची लोकस्थिति आणि प्रवासवृत्त व बालोद्यान शिक्षण पद्धतीचीं पुस्तकें हीं पुस्तकें पडतात तर दुसयांत मुख्यत्वें-करून बाईंनीं मूळ ग्रीक व ईब्री भाषांतून केलेलें बायबलचें मराठी भाषान्तर व तदनुषंगी इतर पुस्तकें येतात. त्याच वेळेस त्यांनीं येशू ख्रिस्ताचें चरित्र व ख्रिस्ती धर्मविषयक बऱ्याच हस्तपत्रिका प्रसिद्ध केल्या.

स्त्री–धर्म–नीति, इंग्लंडचा प्रवास व युनाटेड् स्टेट्सची लोकस्थिति आणि प्रवासवृत्त, हीं पुस्तकें अतिशय सुरेख असून त्यांची थोडी अधिक माहिती वाचकांस मिळावी म्हणून शेवटीं परिशिष्ट ७,८ व ९ मध्यें त्यांचा गोषवारा दिला आहे. युनायटेड स्टेटसची लोकस्थिति व प्रवासवृत्त हें पुस्तक मुंबई विश्वविद्यालयाच्या बी. ए. च्या अभ्यासक्रमांतएकदां लावलें होतें. इंग्लंडचा प्रवास हें पुस्तक श्री स. पा. केळकर ह्यांनीं छापून प्रसिद्ध केलें होतें.

### स्त्रीधर्मनीति

पतिनिधनानंतर चारपांच महिन्यांत पंडिता रमाबाईंनीं आपलें पहिलें पुस्तक ‘स्त्रीधर्मनीति’ हें लिहिलें. ह्या विषयावर त्याच सुमारास मुंबईच्या हलाई भाटिया महाजनवाडींत त्यांचें भाषण झालें होतें व ह्या भाषणाच्या वेळींच ह्या पुस्तकाचा आराखडा तयार झाला असल्याचें मागें आलेंच आहे.

हें पुस्तक लिहीत असतां त्यांची मनःस्थिति कशी असावी हें पुस्तकाच्या अर्पणपत्रिकेवरून स्पष्ट होतें.

ती अर्पणपत्रिका अशी आहे :

*स्वर्गवासी*
*प्रियतम भर्ता*
*बाबू विपिन बिहारी एम्. ए. बी. एल्*
*ह्यांच्या स्मरणार्थ*
*त्यांच्या शोकाकुल पत्नीनें*
*हें*
*लहानसें पुस्तक रचून*
*स्वदेशभगिनींस*
*प्रीतिपूर्वक नजर केलें*
*असे.*

ह्या अर्पणपत्रिकेवरून व ह्यानंतरच्या 'इंग्लंडचा प्रवास' ह्या पुस्तकांतील खालील वाक्यसमूहावरून रमाबाई आपल्या दुःखांतील अमंगलाला मांगल्याची मुरड कशी घालतात तें दिसून येईल....

"ही माझ्या मनाची स्थिति माझ्यासारखें जें कोणी दीर्घप्रवासी आणि स्वजनांपासून चिरवियुक्त मनुष्य असेल त्याच्याच ध्यानांत येण्यासारखी आहे. दुसऱ्या कोणासहि हिचा अनुभव होणार नाहीं. कारण ज्याला कधीं कांटा बोंचलेला नाहीं त्याला कांटा बोंचल्यानें काय होतें हें कसें कळणार ? परंतु मला वाटतें कीं माझ्यासारखें सुखी मनुष्यहि ह्या जगांत फार कमी असेल. कारण मला जितकें सुखाचें स्वरूप समजतें तितकें दुसऱ्याला समजत नाहीं असें मला वाटतें. (यावरून मला तुम्ही अभिमानी समजूं नका) कारण ज्या मनुष्यानें पुष्कळ दुःखें पाहिलेलीं असतात, त्यालाच सुखाची किंमत काय ती समजत असते. ज्यानें सुखांतच दिवस घालविले त्याला सुख काय तें नीट कळत नाहीं. मी आजन्म वनवासिनी आहें आणि पुष्कळ दुःखेंहि पाहिलीं आहेत; म्हणून मला थोडेंसें सुख झालें तरी त्याचा पूर्ण अनुभव घेण्याची शक्ति देवानें दिली आहे. कोणीहि आपल्यास दुःख किंवा विपत्ति असावी

# २५ रमाबाईंची वाङ्मयसेवा

पंडिता रमाबाईंनीं लिहिलेल्या ग्रंथांचे दोन गट पडतात. एक त्या इंग्लंडला जाण्यास निघाल्या तेव्हांपासून परत येऊन केडगांवला स्थाईक होईपर्यंतच्या काळांतील व दुसरा केडगांवला गेल्यानंतरच्या काळांतील.

पहिल्या गटांत स्त्री–धर्म–नीति, इंग्लंडचा प्रवास, द हाय कास्ट हिंदु ऊमन, नांवाचें इंग्रजी पुस्तक, युनायटेट स्टेटसची लोकस्थिति आणि प्रवासवृत्त व बालोद्यान शिक्षण पद्धतीचीं पुस्तकें हीं पुस्तकें पडतात तर दुसयांत मुख्यत्वें-करून बाईंनीं मूळ ग्रीक व ईब्री भाषांतून केलेलें बायबलचें मराठी भाषान्तर व तदनुषंगी इतर पुस्तकें येतात. त्याच वेळेस त्यांनीं येशू खिस्ताचें चरित्र व खिस्ती धर्मविषयक बऱ्याच हस्तपत्रिका प्रसिद्ध केल्या.

स्त्री–धर्म–नीति, इंग्लंडचा प्रवास व युनाटेड् स्टेट्स्ची लोकस्थिति आणि प्रवासवृत्त, हीं पुस्तकें अतिशय सुरेख असून त्यांची थोडी अधिक माहिती वाचकांस मिळावी म्हणून शेवटीं परिशिष्ट ७,८ व ९ मध्यें त्यांचा गोषवारा दिला आहे. युनायटेड स्टेटसची लोकस्थिति व प्रवासवृत्त हें पुस्तक मुंबई विश्वविद्यालयाच्या बी. ए. च्या अभ्यासक्रमांतएकदां लावलें होतें. इंग्लंडचा प्रवास हें पुस्तक श्री स. पा. केळकर ह्यांनीं छापून प्रसिद्ध केलें होतें.

## स्त्रीधर्मनीति

पतिनिधनानंतर चारपांच महिन्यांत पंडिता रमाबाईंनीं आपलें पहिलें पुस्तक 'स्त्रीधर्मनीति' हें लिहिलें. ह्या विषयावर त्याच सुमारास मुंबईच्या हलाई भाटिया महाजनवाडींत त्यांचें भाषण झालें होतें व ह्या भाषणाच्या वेळींच ह्या पुस्तकाचा आराखडा तयार झाला असल्याचें मागें आलेंच आहे.

हें पुस्तक लिहीत असतां त्यांची मनःस्थिति कशी असावी हें पुस्तकाच्या अर्पणपत्रिकेवरून स्पष्ट होतें.

ती अर्पणपत्रिका अशी आहे :

*स्वर्गवासी*
*प्रियतम भर्ता*
*बाबू विपिन बिहारी एम्. ए. बी. एल्*
*ह्यांच्या स्मरणार्थ*
*त्यांच्या शोकाकुल पत्नीनें*
*हें*
*लहानसें पुस्तक रचून*
*स्वदेशभगिनींस*
*प्रीतिपूर्वक नजर केलें*
*असे.*

ह्या अर्पणपत्रिकेवरून व ह्यानंतरच्या 'इंग्लंडचा प्रवास' ह्या पुस्तकांतील खालील वाक्यसमूहावरून रमाबाई आपल्या दुःखांतील अमंगलाला मांगल्याची मुरड कशी घालतात तें दिसून येईल....

"ही माझ्या मनाची स्थिति माझ्यासारखें जें कोणी दीर्घप्रवासी आणि स्वजनांपासून चिरवियुक्त मनुष्य असेल त्याच्याच ध्यानांत येण्यासारखी आहे. दुसऱ्या कोणासहि हिचा अनुभव होणार नाहीं. कारण ज्याला कधीं कांटा बोंचलेला नाहीं त्याला कांटा बोंचल्यानें काय होतें हें कसें कळणार? परंतु मला वाटतें कीं माझ्यासारखें सुखी मनुष्यहि ह्या जगांत फार कमी असेल. कारण मला जितकें सुखाचें स्वरूप समजतें तितकें दुसऱ्याला समजत नाहीं असें मला वाटतें. (यावरून मला तुम्ही अभिमानी समजूं नका) कारण ज्या मनुष्यानें पुष्कळ दुःखें पाहिलेलीं असतात, त्यालाच सुखाची किंमत काय ती समजत असते. ज्यानें सुखांतच दिवस घालविले त्याला सुख काय तें नीट कळत नाहीं. मी आजन्म वनवासिनी आहें आणि पुष्कळ दुःखेंहि पाहिलीं आहेत; म्हणून मला थोडेंसें सुख झालें तरी त्याचा पूर्ण अनुभव घेण्याची शक्ति देवानें दिली आहे. कोणीहि आपल्यास दुःख किंवा विपत्ति असावी

असें इच्छित नाहीं हें खरें, पण माझी गोष्ट तशी नाहीं. एकदां पांडवांच्या मातुश्रीनें म्हटलें होतें तसें मी ईश्वराला म्हणतें

*'विपदः संतु नः शश्वत तत्र तत्र जगत्पते।'*

म्हणजे हे जगत्पते! तूं मला सर्वदा व सर्व स्थळीं विपत्तींतच ठेव, कारण मला त्यांतच सुख आहे."

पतिनिधनाचें दुःख त्यांच्या मनांत अगदीं ताजें होतें. त्याला थोडा विरंगुळा म्हणून त्यांनीं हें पुस्तक झटपट लिहिण्यास घेतलें. ४ फेब्रुवारी १८८२ ह्या दिवशीं श्री. मेधावी वारले व ३० जून १८८२ रोजीं पुस्तकाची जाहिरात फडकली. पतिनिधनानंतर पत्नीधर्माबद्दल एखादा ग्रंथ मराठींत सांपडतो काय म्हणून त्या शोध करूं लागल्या, पण तसा ग्रंथ त्यांना सांपडेना. तेव्हां त्यांचें मन अगदीं अस्वस्थ असूनहि व तो "महाराष्ट्र भाषेंत पुस्तक लिहिण्याचा प्रथमच परिश्रम" त्यांचा होता तरी त्यांनीं हें काम अंगावर घेऊन अत्यंत थोड्या अवधींत हातां वेगळें केलें. पुस्तक इतकें उपयुक्त ठरलें कीं जून १८८२ मध्यें पहिली आवृत्ति निघून ती ताबडतोब खपली व १८८३ च्या सुरुवातीला किंवा १८८२ च्या शेवटीं शेवटीं पुस्तकाची दुसरी आवृत्तीहि काढावी लागली. आज सुद्धां पुस्तकें छापायला सोपीं असलीं तरी खपायला किती अवघड असतात ह्याची माहिती पुष्कळांना आहे. पाऊणशें वर्षांपूर्वींच्या ह्या पुस्तकाला इतका चांगला लोकाश्रम मिळाला ह्यावरून ह्या पुस्तकाचें मोल कळून येतें. अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक ह्या ग्रंथाचे लेखक म्हणतात, "ह्या पुस्तकांतील विचार आजहि स्त्री समाजानें मनन करण्यासारखे आहेत." ह्याची पहिली आवृत्ति ज्ञानप्रकाश छापखान्यांत व दुसरी पुणें वैभव छापखान्यांत छापली होती.

## रमाबाईंचा इंग्लंडचा प्रवास

बाई इंग्लंडला जाण्यास निघाल्या तेव्हां त्यांच्या बहुतेक मित्रमंडळीनें ह्या गोष्टीला मोडा घातला. न जाण्याचीं अनेक कारणें त्यांनीं त्यांच्यापुढें मांडलीं. त्या साऱ्यांना उत्तरें देण्यास त्या वेळीं त्यांना वेळ नव्हता आणि उसंतहि नव्हती. मात्र इंग्लंडला पोंचतांक्षणींच त्यांनीं त्या साऱ्या प्रश्नांना आणि आक्षेपांना उत्तरें लिहून तें पत्र येथील एका मित्राला दिलें. परिशिष्ट ८ मध्यें

त्यांच्या ह्या उत्तरांचा गोषवारा दिला आहे. बाईंच्या इंग्लंडच्या प्रवासाला स्त्री-धर्म-नीति ह्या पुस्तकानें जसा हातभार लावला तसा ह्या पत्रानें त्यांच्या इंग्लंडमधील खाण्याराहण्याच्या खर्चाला लावला. कारण त्या मित्रानें ह्या पत्राचें एक पुस्तक छापून तें विकलें व आलेला पैसा बाईंना पाठवून दिला.

हें पुस्तक कशा तऱ्हेचें आहे तें संपूर्ण व होतां होईल तों आहे तसेंच वाचल्यावर समजेल.

बाईंनीं ह्यांत वृद्ध-कुमारी विवाहाविरुद्ध कांहीं तडाखे दिले आहेत तर लठ्ठपणाची टेर उडविली आहे. हे त्यांतील दोन उतारे पाहा :

"दुसऱ्या बाजीरावांनीं साठ वर्षांच्या वयांत, अंध झाल्यावर अग्निहोत्र कायम ठेवण्याकरतां एका ९–१० वर्षांच्या मुलीशीं लग्न केलें होतें. थोड्याच दिवसांमागें एका ६५ वर्षांच्या गृहस्थानें एका ११ वर्षांच्या मुलीच्या बापाला ३०,००० रुपये देऊन लग्न लावलें हें आपल्यास माहीत असेलच. असे पुण्यात्मे आमच्या देशांत हजारों आहेत."

"वयोवृद्ध झाल्यावर मनुष्यांत वजन वाढतें हें अचल मिचल बाईला पाहिल्यावर कोणासहि खरें वाटण्याजोगें आहे. एक दिवस सदरहू बाई आणि मी गाडीनें बसून फिरावयास गेलों होतों. तेव्हां त्या गाडींत बसतांक्षणींच गाडी आतां मोडते कीं काय असें मला भय पडलें होतें. परंतु ईश्वरी कृपेनें तसें कांहीं झालें नाहीं. पण वजन वाढण्यास ज्ञान जितकें कारणीभूत आहे तितकें वयोवार्धक्य आहे असें म्हणणें सर्वांशीं खरें ठरत नाहीं. पुण्यांत रस्त्यांतून पायीं फिरणाऱ्या वामनरावांचें[1] वय ६५ वर्षांपेक्षांहि जास्त आहे, परंतु त्यांची प्रकृति पाहून त्रेतायुगांतील रामानुचर हनुमान मरून हे कलि-युगांत वामनराव झाले आहेत असें वाटल्यावांचून राहात नाहीं."

## युनाइटेड स्टेट्सची लोकस्थिति आणि प्रवासवृत्त

स्त्री–धर्म–नीति ह्या पुस्तकाचा आराखडा जसा मुंबईच्या हलाई भाटिया महाजनवाडींतल्या त्या भाषणांत तयार झाला तसाच ह्या पुस्तकाचा बाईंनीं अमेरिकेसंबंधीं मुंबईस दिलेल्या व्याख्यानमालेंत झाला असला पाहिजे.[2] त्यांपैकीं

१. वामन आबाजी मोडक

२. परिशिष्ट १०:

एका भाषणांत इंग्लंडहून भारतांत येणाऱ्या इंग्लिश प्रवाशाचें व त्याच्या धावपळीचें वर्णन त्यांनीं मोठ्या बहारीचें केलें आहे. रमाबाईंनीं मात्र तसल्या धूमकेतूप्रमाणें धावत धावत येऊन पळत पळत जातांना अमेरिकेचें हें वृत्त लिहिलें नाहीं. त्यांनीं अमेरिकेंत १८८६ च्या मार्च महिन्यापासून १८८८ च्या नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीपर्यंत राहून त्या देशांत सुमारें ३०००० मैलांइतका प्रवास करून माहिती मिळविली. आणि ती माहिती ह्या पुस्तकांत ग्रथित केली. अमेरिकेंतून परत आल्यावर त्यांनीं डिसेंबर १८८९ मध्यें हा ग्रंथ प्रसिद्ध केला.

त्यांत लिवरपूलपासून फिलाडेल्फियापर्यंतचा जलप्रवास, अमेरिका किंवा पाताळ, अमेरिकेंतील शासनपद्धति, तेथील लोकस्थिति, गृहस्थिति, तेथील विद्याव्यासंग, धर्ममतें, दानधर्म, स्त्रियांची स्थिति, व्यापारधंदे इत्यादि विषय हाताळून बाईंनीं आपला चतुरस्रपणा दाखवून दिला आहे. त्यांचें सूक्ष्म निरीक्षण व तत्कालीन आपल्या देशांतील त्यांनीं केलेलें तुलनात्मक निस्पृह परीक्षण चालू घडीच्या राजकीय क्रान्तीच्या मन्वन्तरांत सुद्धां चिंतनीय आहे. ७० वर्षां-पूर्वीं प्रथम आम्हाला प्रजासत्ताक राज्यव्यवस्थेचें सुबोध शब्दचित्र बाईंनींच काढून दाखविलें. त्या वेळच्या वाचकांना तें एक मनोरंजक वाचन वाटलें असेल परंतु प्रजासत्ताक राज्यांत जनतेचे आचार, विचार, व्यवहार व मनो-व्यापार कसे चालतात व कसे चालायला हवेत ह्या विषयींचे त्यांचे इशारे आजहि मननीय आहेत. भारताला एकच राष्ट्रीय भाषा असायाला हवी व ती हिंदी असें अगदीं खणखणीत बजावलें होते तें सत्तर वर्षांपूर्वीं बाईंनींच. तसेंच आपल्या म्युनिसिपालिट्या, फायर ब्रिगेड, पोलीस, दानधर्म, शाळा इत्यादींमध्यें कशा कशा सुधारणा व्हायला हव्यात हेंहि बाईंनीं ह्या पुस्तकांत त्या वेळींच सांगून ठेवलें होतें.

त्यांचें हें निरीक्षण व तुलनात्मक परीक्षण आजहि आपल्या विचारांना चालना देण्यासारखें आहे.

The High-Caste Hindn woman

२० एप्रिल १८८३ रोजीं "बुखारा" आगबोटीनें रमाबाईंनीं हिंदुस्थान सोडलें. इंग्रजी येत नसतां लहान पोर काखोटीला मारून ही २५ वर्षांची तरणीताठी हिंदु स्त्री इंग्लंडला जाण्यास निघते काय आणि तेथें पोंचून नंतर

अमेरिकेला जाऊन इंग्रजींत व्याख्यानें देते काय! सारेंच मानवी बुद्धीला थक्क करणारें अघटित. पण त्याहीपेक्षां आश्चर्याचा धक्का देणारी गोष्ट म्हणजे साडेतीन चार वर्षांत इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवून त्या भाषेंत पुस्तक लिहून सारी अमेरिका हालविणें!! 'उच्चवर्णीय हिंदु स्त्री' हें बाईंचें तिसरें पुस्तक-मात्र तें इग्रजींत लिहिलेलें आहे—ह्या पुस्तकानें अमेरिकन जनतेचें लक्ष हिंदुस्थानाकडे वेधलें गेलें. ह्याच पुस्तकानें अप्रत्यक्ष रीतीनें बाईंना आपल्या कामासाठीं लक्षावधि रुपये मिळवून दिले. ह्या पुस्तकामुळें शारदा सदनाची दहा वर्षांची पैशांची तरतूद झाली. ह्या पुस्तकांत सात प्रकरणें आहेत. पुस्तकाचा विषय भारतांतील स्त्रियांची दुःस्थिति हा आहे. प. वा. डॉ. आनंदीबाई जोशी ह्यांच्या व आपल्या मातेच्या स्मृतीस तें अर्पण केलें असून पुस्तकाला फिलाडेल्फियाच्या स्त्रियांच्या मेडिकल कॉलेजच्या डीन डॉ. आर. एल. बॉडले ह्यांनीं २४ पानांची प्रस्तावना लिहून तींत डॉ. आनंदीबाई जोशी व पंडिता रमाबाई ह्यांचीं त्रोटक चरित्रेंहि दिलीं आहेत.

## बालोद्यान

अमेरिकेंतील बालोद्यान शिक्षण पद्धतीनें बाईंचें लक्ष इतकें वेधून घेतलें, कीं त्या शिक्षणपद्धतीचें शिक्षण त्यांनीं स्वतःच घेण्यास सुरुवात केली. इतकेंच केवळ नाहीं तर त्यांनीं तेथल्या तेथें त्या पद्धतीच्या मराठी पुस्तकांच्या लेखनास प्रारंभ केला. प्रवास, व्याख्यानें, व अभ्यासक्रम सांभाळून त्यांनीं लेखनाचेंहि काम केलें. प्रथम त्यांनीं फ्रोबेलच्या बालोद्यान शिक्षणपद्धतीच्या अभ्यासास सुरुवात केली व मोकळ्या वेळांत देशी भाषेंत पुस्तकें लिहिण्यास घेतलीं असें क्वॉर्टर्ली मिशन पेपर्सवरून दिसतें.[1]

अमेरिकेंत व्याख्यानें देऊन बाईंनीं उच्चवर्णीय हिंदु विधवांच्या बाबतींत बरीच सहानुभूति मिळविली होती. त्याच सुमारास त्यांच्या 'हाय कास्ट हिंदु ऊमन' ह्या इंग्रजी पुस्तकाचें प्रकाशन झालें होतें. त्या पुस्तकाच्या १०,००० प्रती खपल्या व खर्च वजा जातां त्यांना त्यावर बराच पैसा आपल्या विधवाशिक्षणाच्या कार्यासाठीं आणतां आला. त्यांतूनच त्यांनीं ६० इलेक्ट्रो टाइप चित्रांच्या प्लेटी आपल्या बालोद्यान पुस्तक मालेसाठीं करवून घेतल्या.

---

१. म्याक्नीकल. पृष्ठ ६६.

ह्या पुस्तकमालेंत पांच क्रमिक वाचन पुस्तकें, एक भूगोलाचें व एक सृष्टिज्ञानाचें,[1] (Natural History) अशीं पुस्तकें होतीं.

## रमाबाईकृत बायबलचें भाषान्तर

ह्या प्रकरणाचा हा दुसरा भाग अगदींच वेगळ्या रीतीनें लिहावा लागत आहे. डेमी आकाराच्या पायका टाइपांत छापलेल्या १७१७ पानांच्या ह्या प्रचंड ग्रंथनिर्मितीसंबंधीं लिहितांना तदनुषंगी इतर बऱ्याच गोष्टींचा ऊहापोह करावा लागला आहे.

"पवित्र शास्त्रावर" म्हणजे बायबलवर रमाबाईंचा विशेष भाव होता. त्या आपली "पवित्र शास्त्राची" प्रत नेहमीं जवळ ठेवायच्या. त्यांच्या लिहिण्याच्या कामीं त्यांना साहाय्य करणाऱ्या नानूबाई सांगतात:

"देऊळ सुटल्यावर कधींकधीं मी आईंच्याबरोबर त्यांच्या खोलीकडे यायची. एक दिवस त्यांच्या जवळून मी त्यांचें पवित्र शास्त्र मागूं लागलें, माझा हेतु त्यांना साहाय्य करण्याचा होता, पण त्यांनीं शास्त्र मला घेऊं दिलें नाहीं. त्या म्हणाल्या 'दुसरें कांहींहि माग, पण शास्त्र मागूं नको. तें नेहमीं मला माझ्या हातांत हवें.' मला वाईट वाटलें. मी त्या दिवशीं नेहमींप्रमाणें त्यांच्याकडे खाऊ घ्यायला गेलें नाहीं, तेव्हां त्यांनीं मला बोलाऊं पाठविलें. मायेनें माझ्या पाठीवरून हात फिरवून त्या मला म्हणाल्या, 'नानू, तुला राग आला माझा? हें पहा, मी कधीं शास्त्र माझ्यापासून दूर होऊं देत नाहीं. शास्त्र हें माझें अन्न आहे. म्हणून मीं तें तुजजवळ ओझें वाहण्यापुरतें सुद्धां दिलें नाहीं, तूंहि शास्त्रावर असेंच प्रेम करीत जा म्हणजे मला आनंद वाटेल.'

आपल्या ह्या बायबलच्या पुस्तकावर बाईंनीं हजारों नांवें लिहून ठेवलेलीं आहेत.[2] दररोज शास्त्रवाचन झाल्यावर त्या प्रार्थना करीत तेव्हां त्या भागावरील नांवें वाचून त्या त्या इसमावर परमेश्वराची कृपा व्हावी म्हणून त्याचें नांव घेऊन आठवणीनें परमेश्वराला आळवीत. केडगांवांतील शेंकडों व्यक्तींसाठीं तर नांव घेऊन त्या प्रार्थना करीतच पण इतरहि हजारों व्यक्तींचीं नांवें त्या यादींत होतीं. त्या सर्वांसाठीं त्या प्रार्थना करीत.

---

१. "Women Who have Worked & Won." Chappel. पृष्ठ १४४.

२. चित्रमालिकेंत पाहा.

बायबलमधील ठेवा आपल्याप्रमाणेंच इतरांच्या हातीं यावा म्हणून बाईंना नेहमीं तळमळ लागलेली असे. तें अगदीं अडाणी व अशिक्षित माणसालाहि समजावें, गरीबगुरिबांनाहि मिळावें, वाटेवरील अगदीं सामान्य माणसाची किंबहुना मूर्ख माणसाचीहि चूकभूल त्या वाचनानें होतां कामा नये अशी भाषांतरकारानें दृष्टि ठेवायला हवी व बायबलाचें वैशिष्ट्य सालंकृतता व संस्कृतप्रचुरता नसून अत्यंत साधेपणा व सोपेपणा हें आहे, असें त्या म्हणत.

बायबल सोसायटीनें सुधारून जें नवें भाषांतर केलें त्या भाषांतरासंबंधीं बाईंचा विशेष कटाक्ष होता. ह्या भाषांतरासंबंधीं केवळ बाईच नव्हेत तर इतरहि विद्वान् माणसें माणसें फारशीं खूष नव्हतीं. सर नारायण चंदावरकरांचेंहि तसेंच मत दिसतें. ह्यासंबंधीं एक मिशनरी लिहितात :

"मराठी बायबलचीं आधींचीं भाषांतरें मुख्यत्वेंकरून मिशनरींनीं केलेलीं होतीं. अर्थात् त्यांत चुका होत्या व त्या भाषांतराला कोणी पाद्री मराठी म्हणून हिणविल्यास त्यांत कांहीं नवल नव्हतें. परंतु नंतरच्या सुधारलेल्या भाषांतरासंबंधीं मराठी भाषेचे एक विद्वान् तज्ज्ञ सर नारायण चंदावरकर ह्यांनीं जोराची तक्रार केली आहे. ते म्हणतात, 'जर त्या मराठी भाषांतराचा बहुजनसमाजाच्या जीवनावर व लेखनावर कांहीं परिणाम व्हायला हवा असेल तर त्यांत पाद्री मराठी प्रमाणच शास्त्री मराठीहि टाळायाला हवें. बहुजनसमाजाच्या भाषेचाच शेवटीं अंगिकार केला जाईल. कारण बायबलाची बोली ही मेंढपाळांची व शेतकऱ्यांची बोली होती. आणि सर्वच खऱ्या धार्मिक लेखनाची तीच भाषा असायला पाहिजे. तसें पाहिलें तर तिलाच खरी भाषा म्हणतां येईल.'"[१]

रमाबाईंचा आध्यात्मिक अनुभव जसा दांडगा होता तसाच त्यांचा भाषाव्यासंगहि अफाट होता. बाईंना अनेक भारतीय भाषांशिवाय, ग्रीक व हिब्रू ह्या जुन्या परकीय भाषाहि चांगल्या अवगत होत्या हें मागें सांगितलेंच आहे. संस्कृतांत तर त्यांचा हात धरणारा फारच क्वचित् कोणी भेटला असता. त्यांच्या संस्कृत ज्ञानाविषयीं प्रा. म. दा. साठे ह्यांची मोठी महत्त्वाची साक्ष सांपडते. ह्या गृहस्थांची १९०९ सालीं बाईंशीं गांठ पडली. श्री. साठे हे बाईंकडे कांहीं संस्कृत कामासाठीं गेले होते. श्री. साठे लिहितात : "बाईंशीं मुलाखत झाल्यावर त्यांनीं

१. हेलन डायर : पंडिता रमाबाई. १११

माझी संस्कृतची परीक्षा घेतली. बाई नामधारी पंडिता नव्हत्या तर प्राचीन परंपरेनें त्यांनीं वडिलांजवळ व्याकरणशास्त्राचें अध्ययन केलें होतें. त्यांना सिद्धांतकौमुदी पाठ येत होती. माझेंहि त्या ग्रंथाचें अध्ययन झालें आहे असें सांगितल्यावर त्यांनीं मला पाणिनीचें एक सूत्र व त्यावरील वृत्ति पाठ म्हणण्यास सांगितली. ती म्हणून दाखविली परंतु तसें करतांना अनवधानतेनें एक चूक माझ्याकडून झाली. त्याबरोबर बाई खटकल्या व म्हणाल्या 'तुमच्या म्हणण्यांत झालेली चूक तुमच्या लक्षांत आली का?' त्याबरोबर मी उमगलों व पुन्हा शुद्ध पाठ म्हणालों. बाईंचें समाधान झालें पण मी चकितच झालों.'[१]

प्रा. साठे ह्यांनीं जें सूत्र म्हटलें होतें तें पाणिनीचें 'सुप्तिऽन्त पदम् १·४·१४। हें सूत्र होय. 'सुबन्तं तिडन्तं च पदसंज्ञं स्यात्। अशी सिद्धांत कौमुदींत वृत्ति आहे. प्रा. साठे चुकून 'पदसंज्ञा' असें म्हणून गेले. त्याबरोबर 'पदसंज्ञं' असें नपुंसकलिंगी पद पाहिजे असें बाईंनीं हटकल्याबरोबर त्यांच्या ध्यानांत आलें.'

पंडिता रमाबाईंनीं संस्कृतमध्येंसुद्धां काव्य लिहिलें असल्याचें त्यांच्या कलकत्त्यास व सिल्हटला झालेल्या सन्मान समारंभाच्या वेळीं दिसून आलें. तो क्रम त्यांनीं खिस्ती झाल्यावरहि सोडला नव्हता. मंगळूरचे श्री. तंत्री लिहितात कीं आपल्या आजोबांकडे रमाबाइनीं रचलेल्या अशाच संस्कृत कविता आपल्याला सांपडल्या होत्या व त्या आपण लिहूनहि ठेवल्या होत्या. त्यांपैकीं आतां फक्त दोनच उपलब्ध आहेत. त्या अशा:

*१. पापं बिभर्ति लोकस्य तापं हरति देहिनः।*
*पतितानां सुहृद्वीरं प्रपद्येऽहं दिवस्पतिम्।*

*१. रुधिराक्तरक्तगात्रं कंटकपरिधानमुत्तमांगंच।*
*आलोकदीप्तिमध्ये स्मरामि त्वां प्रेमलं जगत्त्राणम्॥*

ह्यांचा अर्थ:

१. लोकांचें पाप धारण करणारा, मानवांचें दुःख हरण करणारा, आणि पतितांचा थोर मित्र, अशा स्वर्गांत राहाणाऱ्या (देवाला) मी शरण जातें.

१. वसंत मासिक: मे १९५८

२. ज्याचें गात्र रक्तानें माखलेलें असल्यानें (रक्त म्हणजे) तांबूस आहे, ज्याच्या डोक्यावर (उत्तमांगावर) कांट्याचा मुकुट आहे (मुकुटानें झांकलें आहे) अशा प्रकाशांत तेजानें तळपणाऱ्या प्रेमळ व जगाचें रक्षण करणाऱ्या (प्रभूला) मी स्मरतें.'

संस्कृत भाषेचें एवढें गाढ ज्ञान असल्यानें त्यांना त्या भाषेच्या द्वारें प्रगट होणाऱ्या छटा न् छटा चटकन् आकलन करतां येत. त्यांत त्यांनीं पुढें ग्रीक व हिब्रू भाषांचाहि कसून अभ्यास केला. अशा रीतीनें बायबलचें स्वतः स्वतंत्र भाषान्तर करण्याची त्यांची तयारी झाली.

सोपें, म्हणजे एखाद्या 'मूर्ख' माणसाची सुद्धां दिशाभूल होणार नाहीं इतकें सोपें, व मुळाला धरून भाषान्तर करायचें होतें. ख्रिस्तीतर धर्माची तरळती अर्थछटा त्यांत घुसडूं द्यायची नव्हती, व हें सर्व कार्य त्या एकट्या जीवावर अवलंबून होतें. बायबल हा कांहीं लहान ग्रंथ नाहीं. दररोज नियमानें नुसता वाचायचा म्हटलें तरी एक वर्ष त्या वाचनाला पुरें पडत नाहीं. त्यांतील एक एक शब्द घेऊन त्याचा कीस काढून योग्य शब्द निवडायचा व जागच्या जागीं बसवून द्यायचा, हें अवघड काम बाईंनीं आतां अंगावर घेतलें. व हें सारें त्यांना तेथील दोन हजार कुटुंबियांचा संसार चालवून करायचें होतें.

'मुक्ति'मध्यें प्रथम बाईंनीं एक लहानसें छापण्याचें यंत्र आणून त्यावर आपल्या कामाची सुरुवात केली. आरंभीं खिळे जुळविण्याचें व छापण्याचें काम एकच माणूस करीत असे. हळूं हळूं ह्याहि कामासाठीं पैसा जमला. होतां होतां इ. स. १९१० मध्यें १२ अश्व शक्तीचें इंजिन व एक मोठें छापण्याचें यंत्र उभें राहिलें. कांहीं काळ छापण्याचें हें काम पुरुष व मुलगे करीत असत. पुढें हें काम मुक्तींतील मुलींना शिकविण्यांत आलें. महाराष्ट्रांत छापखान्यांतील कंपोजिंग व प्रिंटिंग हीं कामें प्रथम ह्याच ठिकाणीं स्त्रियांनीं[1] संपूर्णपणें केलीं आहेत. ह्या कामावर एका अमेरिकन बाईंची[2] योजना करण्यांत

---

१. नागपुरच्या A. I. Reporterच्या छापखान्यांत अगदीं अलीकडे कांहीं वर्षें स्त्री कामदार ठेवण्यांत आले होते असें समजतें.

२. मिस् म्याक्ग्रेगर ह्यांच्याकडे हें काम होतें. ह्यांना रमाबाईंनीं 'सोनू मावशी' असें हिंदी नांव दिलें होतें. शेतकी, अंधशाळा व शेवटीं सुपरिंटेंडंट इतकीं कामें त्यांनीं केलीं.

आली होती. प्रथम प्रथम हें काम करण्यास फार थोड्या मुली पुढें आल्या पण हळूं हळूं पुष्कळ मुली तयार होऊन शेवटीं तेथें एकहि पुरुष कामगार राहिला नाहीं. आतां छापण्याच्या हरएक कामांत मुली तरबेज झाल्या. त्या बाईंडिंग सुद्धां उत्तम प्रकारें करूं लागल्या. बाईंच्या वेळीं एकदां छापखान्यांतील निरनिराळ्या विभागांत १०० स्त्री कामदार कामें करीत होत्या.

बायबलचें नवीन भाषान्तर करण्याचें मुख्य कारण बाईंनीं असें दिलें आहे कीं बायबल सोसायटीच्या भाषान्तराची शब्दयोजना संस्कृतप्रचुर असल्यानें ती खेड्यापाड्यांतील व इतर अज्ञ जनांस समजणें कठीण होई. जनता ही असल्या साध्यासुध्या लोकांचीच बनलेली आहे, विद्वानांची नव्हे, असें त्या म्हणत. दुसरें कारण म्हणजे बायबल सोसायटीच्या नवीन भाषान्तरांत वापरलेले कांहीं कांहीं शब्द हिंदू कल्पनांशीं इतके निगडित झालेले आहेत कीं त्यांची आयात करतांच ख्रिस्ती धर्माला संमत नसलेल्या तत्त्वांचा व विचारांचा ख्रिस्ती धर्मांत प्रवेश करवून देण्यासारखें होणार होतें. ह्यामुळें असे शब्द त्या आपल्या भाषान्तरांतून कटाक्षानें वगळीत.

त्यांतील कांहीं शब्द खालीं दिले आहेत.

### उत्पन्न

ह्या शब्दाचा अर्थ स्वतःच्या पासून कांहीं तरी तयार करणें. एखादा कोळी स्वतःच्या शरिरांतून तंतू काढून आपलें जाळें बनवितो त्याप्रमाणें देवानें आपल्यांतून आकाश व पृथ्वी हीं उत्पन्न केलीं; आपल्यांतील कांहीं अंशांचीं हीं बनविलीं. परमेश्वरानें हीं उत्पन्न केलीं असें म्हटलें कीं हीं सारीं त्याचाच अंश आहेत असें मानावें लागतें, तेव्हां ह्यांपैकीं कशाचीहि पूजा केल्यास ती परमेश्वराचीच पूजा केल्यासारखें होतें. ही कल्पना पूर्णपणें हिंदु आहे. ख्रिस्ती तत्त्वज्ञानास ती विसंगत आहे. रमाबाईंच्या ह्या आक्षेपाचा परिणाम होऊन बायबल सोसायटीनेंहि आपल्या भाषान्तरांत 'उत्पन्न केली' ह्या शब्दप्रयोगाऐवजीं 'निर्माण केली' असा बदल केला. मात्र बायबलमधील पहिल्याच पुस्तकाला सोसायटीनें "उत्पत्ति" तर रमाबाईंनीं "प्रारंभ" अशीं नावें दिलीं आहेत.

पुत्र म्हणजे पुम् नांवाच्या नरकांतून पित्याच्या मृत्यूनंतर श्राद्धादि क्रियांनीं जो पित्याचें तारण करतो तो. "पुम् नाम नरकात् त्रायते स पुत्रः"[1] अशा पुम् नरकाची कल्पना खिस्ती धर्मांत नाहीं. म्हणून बाईनीं आपल्या भाषान्तरांत अगदीं नेहमींच्या प्रचारांतला साधा 'मुलगा' असा शब्द वापरला आहे. श्री. कृ. स. अभ्यंकर म्हणतात स्वयंभू मनूच्या नांवावर दडपून दिलेली 'पुत्र' शब्दाची व्युत्पत्ति हा सर्वस्वी कल्पनेचा खेळ आहे. प्रिन्सिपल आपटे ह्यांनीं आपल्या कोशांत ह्या व्युत्पत्तीचा श्लोक दिला असला, तरी ह्या व्युत्पत्त्यनुसार पुत्र हा शब्द 'पुत्त्र' असा लिहिला पाहिजे असें म्हटलें आहे. नरकापासून उद्धार करण्याचा प्रश्न असता तर 'पुत्री' ह्या शब्दालाच जागा नसती. अवेस्तांत 'पुथ्र' शब्द आहे व ईरानी शब्द 'पेसर' हि पुत्र शब्दापासून फारसा दूर नाहीं हें लक्षांत घेतां हा शब्द इंडो-जर्मन परंपरेंतून आला आहे हें उघड आहे.

**परमेश्वर :**

परमेश्वर म्हटल्याबरोबर ईश्वर ही कल्पना करावीच लागते. कारण ईश्वर असल्याखेरीज त्याच्यापेक्षां परम असा ईश्वर कसा शक्य असेल? शिवाय परमेश्वर हा शब्द शंकराचा द्योतक आहे. ह्यासंबंधीं अगदीं रमाबाईंच्याच घरची गोष्ट सांगण्यासारखी आहे. बाईंची धाकटी मावशी व त्यांची कन्या मथुताई ह्या दोघी आपलें कडकडीत सोवळें सांभाळून बाईंच्या आश्रयाला केडगांवीं राहात होत्या. बाई दररोज वेळांत वेळ काढून त्यांच्याकडे जात व त्या वेळीं त्या बाईंना त्यांच्या धर्माची माहिती विचारीत. बाई त्यांना सांगत, एकाच परमेश्वराची आराधना करावी. मूर्तिपूजा करूं नये, वगैरे. पण त्यांचा समज होई कीं केवळ शंकराचीच आराधना करावी इतर कोणा देवाची पूजा करूं नये. बाईंच्या तें ध्यानांत येतांच त्या परमेश्वर हा शब्द वापरीनाशा झाल्या व बायबलमधील जुन्या करारांत वापरलेला यहोवा (जेहोवा) हा शब्द त्यांनीं वापरण्यास सुरुवात केली.

**मुक्ति** : मुक्ति म्हणजे मोक्ष, आणि मोक्ष म्हटलें, कीं परमेश्वराच्या ठायीं

---

१. पुन्नाम्नो नरकाद्यस्मात्त्रायते पितरं सुतः । तस्मात्पुत्र इति प्रोक्तः स्वयमेव स्वयंभुवा । (IX 138)

विलीन होणें आलेंच. हें ख्रिस्ती धर्माला विसंगत असल्यानें बाई मुक्तीऐवजीं तारण हा शब्द वापरीत.

मुक्ति ह्या शब्दाला विरोध असतांना त्यांनीं आपल्या संस्थेला मुक्ति हें नांव दिलें व पुढें चालूहि ठेवलें हें आश्चर्य नाहीं काय ?

**पश्चात्ताप :** ह्यांहि शब्दाला बाईंचा विरोध होता. परंतु त्याच्या ऐवजीं दुसरा कोणता शब्द वापरायचा हें कोडें न उलगडल्यामुळें त्यांनीं तोच शब्द ठेवला.

पुढें पुढें त्यांनीं ग्रीक व हिब्रू भाषांचा अभ्यास फारच बारकाईनें केला. त्यांतील शब्दांचे अर्थ व मूळ कल्पना होतां होईतों तों जशाच्या तशा मराठींत उतराव्या म्हणून त्यांनीं मराठी भाषेच्या सौंदर्याचा विचारहि न करतां संपूर्ण बायबल हिब्रू, ग्रीक, व वेगवेगळीं चार इंग्रजी भाषान्तरें व त्यांच्या पुढेंच मराठी भाषान्तर देऊन तें छापून काढलें. त्यांच्या दीर्घोद्योगाचें हें दर्शन घडतांच मनुष्य हतबुद्ध होऊन जातो. मात्र ह्या उद्योगांत व खेड्यांपाड्यांतील अज्ञ जनांस सोपें वाटावें असें भाषांतर करण्याच्या खटपटींत बाईंचें भाषांतर खरोखरच हेंगाडें वाटायला लागतें.

भाषान्तराच्या कामीं मदत व्हावी म्हणून बाईंनीं आपल्या भोंवतीं संस्कृतज्ञ गोळा केले, त्यांतच प्रा. म. दा. साठे हे होते. त्याच वेळेस बाईंनीं कवि नारायण वामन टिळक ह्यांनाहि आपल्याकडे बोलावून घेतलें होतें; टिळक तर त्यांच्याकडे आपल्या मुलासह व लक्ष्मीबाईंसह जाऊन कित्येक महिने राहिले होते. पुढें तेथेंच राहण्याचा त्यांचा बेत होता. त्यांनीं आपल्या मुलाचें नांवहि तेथील शारदा सदन शाळेंत घातलें होतें. तेथील एक रहिवासी श्री. शंकर बळवंत कुळकर्णी आपल्या डायरींत लिहितात: 'सायंकाळीं रे. टिळक व लक्ष्मीबाई घरीं आल्या होत्या. त्यांना शेतांत नेऊन फिरविलें व नंतर मुक्तींत पोंचतें केलें. टिळकांच्या बोलण्यावरून दिसतें कीं पवित्र शास्त्राच्या भाषेची सुधारणा होण्यासाठीं बाई त्यांना तेथेंच ठेऊन घेणार आहेत." (१३ फे० १९०५) पुढें १९३२ त कुळकर्ण्यांनीं बाईसंबंधीं लेखमाला लिहिली होती तींत ते लिहितात. "पवित्र शास्त्राचें सुबोध व सरळ भाषांतर करण्याची प्रेरणा होतांच बाईंनीं वाङ्मयसाहित्यिक व

निष्णात पंडित यांची जुळवाजुळव चालविली. लवकरच इब्री व ग्रीक भाषेचे निष्णात पंडित आणविले. मुक्तींत संस्कृतज्ञ मंडळहि तयार करविलें. याच वेळेस कविवर्य टिळक यांनाहि साह्यकारी म्हणून पाचारण केलें. मराठी जाणणाऱ्यांचीहि व्यवस्थित तयारी केली. या कामीं दररोज १०-१२ तास ५०-६० माणसें झुलत होतीं.'[१]

टिळकांसंबंधीं प्रा. म. द. साठे लिहितातः

रेवरेंड टिळकांना पहिल्यानें मीं केडगांवला पाहिलें व त्यांच्याशीं माझा परिचय करून देण्यांत आला. ते नगरहून कधींकधीं कामासाठीं येत असत. मी नांवानें त्यांना ओळखीत होतों कारण फर्ग्युसन कॉलेजच्या नोटीस बोर्डावर एकदां "टिळकांचें स्वाराज्यावर व्याख्यान" अशी नोटीस लागली होती. तेव्हां विद्यार्थ्यांत चर्चा झाली होती कीं 'स्वराज्य' शब्दाऐवजीं चुकून 'स्वाराज्य' शब्द छापला गेला असावा. पण "स्वाराज्य" शब्दच बरोबर होता. कारण तें व्याख्यान लोकमान्य टिळकांचें नसून रेवरेंड टिळकांचें होतें व "स्वराज्यावर" नसून "स्वाराज्यावर" (स्वर्+राज्य) स्वर्गांतील राज्यावर होतें[२].

टिळकांनीं व बाईंनीं बायबलच्या संस्कृत भाषांतरासंबंधीं कांहीं बेत केले असावे. बंगालमध्यें जेव्हां बाईंची ख्रिस्ती लोकांशीं प्रथम गांठ पडली होती तेव्हां त्यांनीं बाईंना एक संस्कृत भाषेंतील बायबल दिलें होतें. त्याबद्दल बाई लिहितात : "त्या प्रेमळ ख्रिस्ती लोकांनीं मला एक संस्कृत भाषेंतील बायबल व त्याबरोबर आणखीहि कांहीं चांगल्या वस्तू दिल्या. त्यांपैकीं दोघे गृहस्थ बायबलचे भाषांतरकार होते. ते सन्माननीय वृद्ध गृहस्थ होते. त्यांचीं नांवें मला आठवत नाहींत; परंतु बायबलच्या वाचनानें माझें तारण व्हावें अशी त्यांनीं प्रार्थना केली. त्या बायबलचें बाह्य स्वरूप मला आवडलें. तें वाचण्याचा मीं प्रयत्न केला परंतु मला तें समजलें नाहीं. हिंदूंच्या संस्कृत वाङ्मयाहून त्यांतील संस्कृत भाषा फार भिन्न असल्याचें मला वाटलें. तें वाचणें म्हणजे वेळेचा अपव्यय करण्यासारखें आहे; परंतु त्या वेळपासून मीं तें मजजवळ जपून ठेवलें आहे.'[३]

हें संस्कृत भाषांतर शुद्ध करण्याचें काम त्यांनीं प्रा. म. दा. साठे ह्यांच्या

१. स. शा. प्र. ज्या १९३२ पृष्ठ ३. २. वसंत. मे १९५८ पृष्ठ ५३.
३. 'Pandita Ramabai' Helen S. Dyer : पृष्ठ २५.

सहकार्यानें सुरू केलें असावें. नारायण वामन टिळकांना ह्याच कामासाठीं व विशेषतः बायबलच्या मराठी भाषांतराच्या कामासाठीं त्यांनीं मुद्दाम बोलावून घेतलें होतें. टिळक तेथें सरासरी सहा महिने राहिले असावे.

ह्या अवधींत बाईंनीं आपल्या छापखान्यांत टिळकांच्या भक्तिगीतांचें 'भजनसंग्रह' नांवाचें प्रसिद्ध पुस्तक छापलें. ह्या पुस्तकाची दुसरी आवृत्तीहि बाईंनींच काढली. मुलींना भारतीय संगीतावर बसविलेलीं ख्रिस्ती गाणीं शिकवावीं असा टिळकांचा आग्रह असे व त्या मुलींसाठींच हा भजनसंग्रह त्यांनीं तयार करून दिला. त्यापूर्वीं बाईंचा भर इंग्रजी चालीवरील मराठी गीतांवर असे. मराठी उपासना गीतसंग्रहांत बाईंचीं तीन उत्तम गीतें आहेत. पण तीं तिन्ही इंग्रजी चालींवर आहेत. मराठी चालींमुळें नाटकें तमाशांतील गीतांची होणारी आठवण, मराठींतील ध्रुवपद व तें घोळून घोळून म्हणण्याची पद्धत, ह्या गोष्टींमुळें बाईंच्या मनाचा त्याविरुद्ध ग्रह झाला असल्यास न कळे. कारण प्रार्थने-संबंधानें बायबलचें असें वचन आहे कीं "तुम्ही प्रार्थना करतां तेव्हां विदेश्या-सारखी व्यर्थ बडबड करूं नका; कारण आपल्या बहुभाषणामुळें आपलें मागणें मान्य होईल असें त्यांस वाटतें; तुम्ही त्यांच्यासारखे होऊं नका."[२] परंतु टिळक केडगांवांत येईपर्यंत मराठी चालींना तेथें प्राधान्य नव्हतें, एवढी गोष्ट खरी. 'बायबलमधील दावीदाचीं सुंदर स्तोत्रें मी अभंगांच्या चालीवर लिहून देतों, त्यांचा उपयोग करा' असें टिळकांचें बाईंना सांगणें होतें परंतु तेंहि त्यांनीं कबूल केलें नाहीं, कारण त्यामुळें मूळ स्तोत्रांच्या वाक्यरचनेंत उलटापालट होईल. शेवटीं बाईंनीं इतकें कबूल केलें कीं स्तोत्रें आहेत तशींच भारतीय संगीतांत बसविणारा कोणी ख्रिस्ती गवई तुम्ही आणून द्या म्हणजे मी त्याच्याकडून मुलींना तीं शिकवून घेईन. त्याप्रमाणें टिळकांनीं श्री. धैर्यशील नांवाचे एक ख्रिस्ती गवयी त्यांना मिळवून दिले व त्यांनीं दाविदाच्या स्तोत्रांना भारतीय संगीतांत चाली दिल्या व बाईंनीं नंतर त्या नोटेशनसहित स्तोत्रांचें एक पुस्तक छापून काढलें व नंतर मुली त्या चालींवर स्तोत्रें म्हणूं लागल्या.

ह्यालाच उद्देशून श्री. कुळकर्णी आपल्या लेखमालेंत म्हणतात: "आर्य

---

१. वसंत मे ५८ अंक, पृष्ठ ५२.

२. मत्तयः ६: ७, ८.

वैद्यक व गायन वादन कला यांचा फैलाव सशास्त्र सुरू करून बाईंनीं मुलीं-कडून ह्या कामाला मूर्त स्वरूप आणलें."[1] ह्यांतील आर्यवैद्यकासंबंधीं खुलासा होत नाहीं.

परंतु बाईंचें व टिळकांचें त्यांच्या स्वभावभिन्नतेमुळें व मतभिन्नतेमुळें पटणें शक्य नव्हतें. 'पुत्रांतील' 'पुम्' नरक कोणाच्याहि पुढें कधीं उभा राहात नाहीं व 'परमेश्वर' म्हणतांच त्याच्या जोडीला एक 'ईश्वर' येऊन त्याला साथ देऊं लागत नाहीं. लोक ह्या सर्व पूर्वपीठिका विसरून गेलेले असतात व शब्दांना नवीन नवीन अर्थछटा प्राप्त होतात असें टिळकांचें म्हणणें होतें.

मोर नाचायला लागला कीं लांडोरींनीं नाचावें तसें रमाबाईंच्या ह्या सोवळेपणाचें अंधानुकरण कांहीं विद्वान् ख्रिस्ती लोकांनीं चालविलें होतें. 'श्री' ह्या अत्यंत निरुद्रवी शब्दाची अशीच ओढाताण करण्यांत आली होती. पण टिळक म्हणतात :

*"श्री म्हणजे सकल अर्थ । श्री म्हणजे शक्ति अनंत ।*
*श्री म्हणजे तेज नितान्त । दिव्य शांत तमोहर ॥*
*श्री म्हणजे संपन्नता । सर्व ऐश्वर्याची सत्ता ।*
*तुझ्या हातीं जगन्नाथा ।—"*

आणि हिंदुस्थानला तर ते म्हणत :

*"धर्मभूमी रम्य खरी । मद्भूमाता पृथ्वीवरी ।*
*नये दुजीला इची सरी । कल्पान्तरीं मती मम ॥*
*अहो तेजस्विनी अतुला । हिच्या उदरीं सन्मणिमाला ।*
*उपजे प्रकाश अजुनी पडला । जिचा पसरला चहूंकडे ॥"*

अशा वृत्तीच्या टिळकांचें व रमाबाईंचें कसें पटायचें?

अनंतशास्त्री कट्टर वैष्णव झाले होते व वैष्णवधर्माची छाप त्यांनीं आपल्या मुलांवर चांगली बसविली होती. अद्वैतापासून लहानपणासूनच तीं परावृत्त झालेलीं होतीं. परंतु शास्त्रीबोवांनीं त्यांना मराठी संत वाङ्मयापासूनहि दूर ठेवलें होतें. कारण "प्राकृत भाषेंतील ग्रंथ अलीकडचे, मनुष्यांनीं रचिलेले!

---

१. सच्छास्त्र प्रदीपक जानेवारी १९३२ पृष्ठ २.

म्हणजे तुकाराम, रामदास, एकनाथ इत्यादि कवींनीं केलेले ग्रंथ—अलीकडचे; मनुष्यांनीं रचलेले; ऋषींनीं केलेले नव्हत. ते वाचल्यानें कांहीं पुण्य लागत नाहीं. उलट पाप लागतें, अशा समजुतीनें शास्त्रीबोवांनीं आपल्या मुलांना मराठी संत वाङ्मयाचा वाराहि लागूं दिला नाहीं. रमाबाईंना जर संतवाङ्मयाची गोडी ठाऊक असती तर त्या ख्रिस्तीहि झाल्या नसत्या असें डॉ. कमलाबाई देशपांडे म्हणतात. पण ह्याच 'तुका निर्मित सेतूवरुनी। मीहि आलों ख्रिस्तचरणीं ॥' असें टिळक म्हणत. एवढें मात्र खरें कीं मराठी संत वाङ्मयाच्या परिचयानें बायबलच्या भाषान्तराच्या बाबतींत कांहीं शब्दांच्या बाबतींत बाईंचा जो एवढा कडवा विरोध होता तो कदाचित् शिथिल झाला असता.

धर्मांतर करूनहि आपलें राष्ट्रीयत्व व आपली संस्कृति सोळा आणे कायम ठेवणाऱ्या ह्या दोन महान् व्यक्ति महाराष्ट्रावर व त्यांतील ख्रिस्ती लोकांवर आपापल्यापरी एकाच वेळीं परिणाम करीत होत्या. मात्र त्या फार काळ एकत्र राहूं शकल्या नाहींत.

टिळकांनीं केडगांव सोडलें.

परंतु रमाबाईंच्या मनांत त्याबद्दल कधीं अढी राहिली नाहीं. १९१९ मध्यें टिळक आजारी असतां बाईंनीं खुद्द मनोरमाबाईंच्या हातीं टिळकांच्या अडीअडचणीसाठीं म्हणून शंभर रूपये देऊन त्यांना पुण्यास टिळकांना भेटायला पाठविलें होतें. त्याच्या किंचित् आधीं टिळकांच्या मुलाचें लग्न झालें तेव्हां त्या नवदंपतीला आग्रहानें केडगांवला बोलावून बाईंनीं त्यांचा पाहुणचार केला. त्यांनीं स्वतः आपल्या हातांनीं स्वैपाक करून स्वतः त्यांना वाढलें आणि निघतां निघतां दोन पासोड्या, एक कापडाचें ठाण व दहा रुपये त्यांच्या हातांत देऊन आशीर्वाद दिला.

बायबल सोसायटीचें मराठी भाषांतर न आवडून आपलें स्वतंत्र भाषांतर करण्याचा प्रचंड खटाटोप त्यांनीं केला परंतु बायबल सोसायटीशींहि त्यांनीं कधीं विरोध केला नाहीं. त्या वेळपासून तों अगदीं १९२२ पर्यंत कधीं न चुकतां बायबल सोसायटीला त्यांनीं व त्यांच्या मुलींनीं आपल्या देणग्या पाठविल्या आहेत. मुंबई शहर सोडल्यास दुसऱ्या कोणत्याहि गांवापेक्षां

दर वर्षी केडगांवच्या देणगीचा आंकडा मोठा असायचा. बाई १९२२ सालीं वारल्या. त्या आधींच त्यांनीं बायबल सोसायटींत आपली देणगी पाठवून दिली होती. केडगांवहून त्या वर्षी सोसायटीला रु. २०३६ व १२ आणे मिळाले. त्यापैकीं पंडिता रमाबाईंच्या नांवावर रु. २०३४ आहेत. अखेरच्या १० वर्षांत बाईंनीं ह्या संस्थेला एकंदर ११,००० रुपये दिले.

१९१९ मध्यें बाईंना कैसर ई हिंद सुवर्ण पदक मिळालें. तें गव्हर्नरच्या हातून घेण्यासाठीं बाईंनीं मुंबईच्या दरबारीं धांवपळ केली नाहीं. तेव्हां त्यांना तें केडगांवला पाठवून तेथें समारंभानें देण्यांत आलें. पदक कोणाच्या हातून घ्यायला तुम्हांला आवडेल अशी विचारणा करतां त्यांनीं बायबल सोसायटीच्या सेक्रेटरींचें नांव कळविलें. त्यावरून सेक्रेटरीच्या पत्नींच्या हस्तें हा समारंभ केडगांवला पार पडला.

बायबलच्या नवीन भाषांतराचें प्रचंड काम केडगांवला सुरू झालें तेव्हां तेथें बाईंच्या तोडीची एकहि विद्वान् व्यक्ति नव्हती, इतकेंच काय पण त्यांच्याशिवाय कोणींच विद्वान् तेथें नव्हतें म्हटलें तरी चालेल. बाईंना त्याची खंत नव्हती. बायबलमधील एक वचन आधाराला घेऊन त्यांनीं आपल्या कामाला सुरुवात केली. 'कोणीं स्वतःविषयीं आढ्यता बाळगण्याचें कारण नाहीं, कारण देवानें ज्ञान्यांस लाजवावें म्हणून जे मूर्ख त्यांची निवड केली आहे; बलवानांस लाजवावें म्हणून निर्बलांची निवड केली आहे; जे कुलहीन त्यांची निवड केली आहे; जे शून्यवत् त्यांचीहि निवड केली आहे. हेतु हा कीं देवासमोर मनुष्यप्राण्यानें स्वतः आढ्यता मिरवूं नये."[1] ही दृष्टि ठेवून व आपलें कार्य आपलें नसून देवाचें आहे अशा पक्क्या विश्वासानें त्यांनीं तेथील अशाच लोकांकडून हें काम करवून घेतलें. त्यांच्या कितीतरी कामकरी स्त्रियांची मातृभाषाहि मराठी नव्हती व तेथल्या किती तरी स्त्रियांना आपली स्वतःचीहि मातृभाषा धड समजत नव्हती. पण बाईंना अशांचीहि कांहीं ना कांहीं मदत झाली.

१९०५ सालीं केडगांवांतील सुमारें सत्तर रहिवाशांनीं प्रार्थनेचा एक संघ बनविला. दररोज पहांटे एकत्र जमून त्या देवाजवळ आग्रहानें मार्ग-

---

१. बायबलः १ करिंथः १:२७—२९.

दर्शनासाठीं प्रार्थना करीत. ह्या प्रार्थनांच्या दृश्य परिणामाबद्दल बाई लिहितात.

'It pleased the Lord to graciously visit us with a spiritual revival and to tell some of us to devote our time to special service.'[1]

मराठी बायबलच्या भाषान्तराच्या कामाचा आराखडा रमाबाईंनीं तयार केला होता तो पृष्ठ ३६२च्या तळटीपेंत वाचकांनीं पाहिलाच आहे. रमाबाईंनीं भाषांतराच्या कामीं घेतलेल्या श्रमाचें तें एक दृश्य ह्यावरून दिसून येईल.

१. ग्रीक व हिब्रू शब्दांची शब्द-सूची तयार करून बायबलमधील प्रत्येक वचनांतील शब्दांचें व्याकरणदृष्ट्या पृथक्करण करणें,

२. अधिकारी आवृत्ति (Authorised) इंग्रजी सुधारलेली आवृत्ति (Revised), अमेरिकन सुधारलेली आवृत्ति (Revised) ह्यांच्यांतील वाक्यें घेऊन, ओळी ओळीमध्यें शब्दांचें भाषांतर द्यायचें. सुधारलेल्या आवृत्त्या पुष्कळ विद्वानांनीं श्रम करून तयार केलेल्या आहेत. ह्याशिवाय यंगचें शब्दशः भाषांतर बाजूला देऊन खालीं व्यक्तिगत मतदर्शनासाठीं न्यूबरी बायबलमधील उतारे द्यायचे.

३. ओळी ओळीमधील भाषांतर देऊन कांहीं देशी भाषांतील सोपें असें शब्दशः भाषांतर देणें.

४. संक्षिप्त बायबल टीका : पवित्र शास्त्राच्या भाषेंत द्यायच्या.

ह्या सर्व कामाचा हेतुः अल्पशिक्षित स्त्रिया, ख्रिस्ती धर्मशिक्षक, उपदेशक ह्यांना बायबलचा अर्थ स्पष्टपणें आणि—विनासायास कळावा हा होता. भारतांतील बहुतेक भाषांतून बायबलचीं भाषांतरें झालेलीं असलीं तरी त्यांचें स्पष्टीकरण करणारे ग्रंथ नाहींत. त्यामुळें बायबलचा अभ्यास करणें फार अवघड व त्रासदायक काम होतें. बऱ्याच बायबल वाचकांना बायबलमधील पुष्कळशा भागांचें स्पष्टीकरण कसें करावें हें कळत नाहीं व त्यासाठीं त्यांना बायबल-वरील टीका, शब्द-सूची (कंकॉर्डन्स) ह्यांची अत्यंत जरुरी आहे. ह्यासाठीं पवित्र शास्त्र वाचनांत त्यांना साह्य होईल असें कांहीं तरी हवें आहे.

---

१. Christmas Letter of Pandita Ramabai, 1908.

मराठीच्या भाषांतराच्या ह्या कामासाठीं अतिशय श्रम घेणें आम्हाला भाग पडलें. तेव्हां त्याच कामांत काम करतां येण्यासारखें आहे तें इंग्रजीचें व तें केल्यास भारतांतील इतर भाषिकांना तें उपयोगी पडेल असें वाटतें.

कामाचा हा आराखडा पवित्र आत्म्यानें थोडा थोडा आम्हांला प्रेरिला आहे. त्यामुळें कसल्याहि मानवी सल्ल्यावर, शिक्षणावर, किंवा सामर्थ्यावर अवलंबून राहाण्याची आम्हांला गरज पडली नाहीं. **त्यानें** भाषाज्ञान पुरविलें, येणाऱ्या प्रसंगाची योजना **त्यानेंच** केली व **त्याच्याच** नेतृत्वाखाली हें काम होत आहे.

कामाला सुरुवात तर केली आहे. तें कधीं संपेल माहीत नाहीं. गेल्या चार वर्षांपासून ह्यासाठीं मी माझा पत्रव्यवहार थांबविला आहे. दौरे थांबविले आहेत व व्याख्यानें देण्याचें सोडून दिलें आहे.’ [१]

त्यामुळें वर्षांतून एखादें छापील पत्रक काढून तें त्या आपल्या मित्र-मंडळीकडे रवाना करीत. अशाच एका छापील पत्रकांत बाई म्हणतात:

“इंग्रजी शब्दांच्या इतक्या ओळींचा उपयोग काय असा कित्येक जण प्रश्न करतात.” चार चार निरनिराळ्या इंग्रजी आवृत्त्यांतील वाक्यें देऊन त्या-खालीं मराठी वाक्यें घालायचीं अशी जी एक बायबलची आवृत्ति बाईंनीं तयार केली होती, तिला उद्देशून ही टीका होती. त्यावर बाईंनीं उत्तर दिलें कीं, हिब्रू व ग्रीक शब्दसंग्रह (Lexicons) व विल्हेवार याद्या (Concordances) चा अभ्यास करतांना वेगवेगळ्या ग्रंथकारांनीं लावलेल्या निरनिराळ्या शब्दार्थांची फोड होते. अशा प्रत्येक मोठ्या ग्रंथांत मला पुष्कळ व्यक्तींच्या मतांची ओळख झाली. आपल्या देशांतहि विद्वानांनीं ह्याच पद्धतीचें अवलंबन केलें आहे. हे विद्वान्, संस्कृत शब्दकोशांचे, व्याकरणाचे व टीकाग्रंथांचे लेखक आहेत. कोणत्याहि एका व्यक्तीच्या म्हणण्यावरून आपलें मत बनवायला कोणाला आवडत नाहीं.’ एके ठिकाणीं त्या म्हणतात कीं एक एका हिब्रू व ग्रीक शब्दाची फोड करून घ्यायला पन्नास पन्नास पुस्तकांची उलथापालथ करावी लागते व अशी शोधक मंडळी इंग्लंड, अमेरिका व जर्मनी येथें असंख्य

१. Christmas letter:1908

सांपडते. पण त्यांच्या हातांशीं असणारी साधनसामुग्री येथें उपलब्ध नसल्यानें ही एवढी खटपट करावी लागत आहे.

पंडिता रमाबाईंनीं आपलें बायबलच्या भाषान्तराचें काम १९०५ सालीं सुरू केलें. त्याला आयुष्याच्या शेवटल्या घटकेपर्यंत खंड पडला नाहीं. संपूर्ण बायबल तयार व्हायला अठरा वर्षांचा काळ लागला. संपूर्ण जगांत प्रत्यक्ष इब्री आणि ग्रीक भाषांवरून असे अन्य भाषेंत भाषांतर करणारी दुसरी कोणतीहि स्त्री सांपडणार नाहीं.

बाईंच्या या भाषांतराच्या ५०००० प्रती त्यांच्या निधनानंतर त्यांच्याच छापखान्यांत छापून निघाल्या.

## इबरी व्याकरण

बायबलचें मराठी भाषान्तर मूळ भाषांतून करण्याचें ठरविल्यावर बाईंनीं 'इबरी' व 'ग्रीक' भाषांचा अभ्यास केला. कारण इबरी भाषेंत बायबलचा जुना करार व ग्रीक भाषेंत नवा करार लिहिलेले आहेत. इबरीचा अभ्यास संपल्यावर बाईंनीं त्या भाषेंत इतकें प्राविण्य मिळविलें कीं त्यांनीं मराठी अभ्यासूंसाठीं एक लघु इबरी व्याकरण तयार करून तें आपल्या छापखान्यांत छापून काढलें. त्यासाठीं त्यांना इबरी टाईप तयार करवून घ्यावे लागले. डेमी साईजचें ८७ पानांचें हें पुस्तक आहे. ह्या पुस्तकावरून बाईंचे परिश्रम, विषय सोपा करण्याची हातोटी, व विद्वत्ता हीं विशेष प्रकारें दिसून येतात.

ह्याशिवाय त्या काळांत रमाबाईंनीं गीतें, गीतें पुस्तक दुसरें, भविष्यकथा, देव प्रीति आहे, अद्भुत गोष्टी भाग १, एक गोष्ट, पाहिजे, इतकीं पुस्तकें लिहिलीं व आपल्या छापखान्यांतून छापून प्रसिद्ध केलीं.

## २६ विश्वासाचीं व प्रार्थनेचीं फळें

या गोष्टी अनुभवाच्या म्हणून बाईंनीं सांगितलेल्या आहेत, त्यांचा तो अनुभव हजारों लोकांनीं प्रत्यक्ष पाहिलेला आहे, व तो पाहिलेलीं कित्येक माणसें आज हयात आहेत. त्या गोष्टींवरून बाईंनीं काढलेलीं अनुमानें व त्या अनुमानांची प्रचीति त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना आलेली आहे. आजहि त्यांच्याचप्रमाणें केवळ ईश्वरी योजनेवर संपूर्ण विश्वास टाकून, केवळ त्याच्याच प्रार्थनेच्या बळावर अवलंबून असणारी मंडळी केडगांवला आहे. परंतु विल्यम केरीप्रमाणें त्यांचेंहि हें तत्त्व आहे कीं Expect great things from God, attempt great things for God. मोठमोठाल्या गोष्टींची अपेक्षा परमेश्वराकडून करा पण तुम्हीहि त्याच्यासाठीं मोठमोठाल्या गोष्टी अंगावर घ्या. 'असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी' असा प्रकार चालणार नाहीं.

प्रार्थनेचा प्रत्यय प्रथम लोणावळ्यास मिळालेल्या त्या प्रार्थनेच्या उत्तरांत आढळला, हें आपण २० व्या प्रकरणांत पाहिलें आहे. येथूनच बाईंच्या चरित्रांत मोठा थोरला फरक आपल्याला दिसून येतो. आपली बुद्धिमत्ता, आपली कर्तबगारी, आपलें योजना-कौशल्य इत्यादींचा बाईंना ह्यापूर्वी मोठा अभिमान होता. त्यामुळें त्यांच्यांत आपल्या कुळाच्या देणगीचाहि मोठा अभिमान होता. त्यांच्या हंटर कमिशनपुढील साक्षींत एक गोष्ट पदोपदीं दिसून येते. ती म्हणजे उच्चकुलोद्‌भव अनुवंशिकतेचा टेंभा. गांधीयुग सुरू होईपर्यंत पांढरपेशे लोक जेव्हां जेव्हां कोणत्याहि सुधारणेचा विचार करीत तेव्हां तेव्हां त्यांच्यापुढें केवळ उच्च वर्णीय समाजच तेवढा असायचा. विधवा-विवाह ? कोणत्या वर्गांतले विधवाविवाह ? साक्षरताप्रसार कोणाकरतां ? अनाथविद्यालयें ! कोणाकरतां ? शेकडा नव्वदांकरतां नव्हे ! तर शेकडा दहां-

करितां. पुण्यास ग्रामण्य माजलें. दोन वर्षेंपर्यंत वर्तमानपत्रांचे रकानेच्या रकाने भरून मजकूर वाऱ्यावर उधळला जात असे. पानांचा हिशेब करून जर तीं बिलें एखाद्याला आज चुकवायाला सांगितलीं तर त्याचे डोळे पांढरे होतील. इतका खटाटोप कोणाकरतां? बहुजनसमाजाचा ह्या वादानें काय फायदा झाला? अगदीं अलीकडे सुद्धां हा विचार लेखकांच्या मनांत चटकन येत नाहीं : हें पहा;

'ज्या हिंदु समाजानें त्यांच्या पांडित्याचें एवढें कोडकौतुक केलें त्या समाजाला त्यांच्या थोर बुद्धीचा, ज्ञानाचा आणि कर्तृत्वाचा मुळींच फायदा मिळूं शकला नाहीं असें मात्र खेदानें म्हणावें लागतें.'[1] आणि हा हिंदु समाज म्हणजे कोणता? तर ब्राह्मण व तत्सम जातींचा बनलेला हा शेकडा दहांचा समाज! साह्याची गरज असलेल्या, त्यासाठीं हात पसरून शतकानुशतकें रांगेंत उभ्या राहिलेल्या, केविलवाणी मुद्रा करून कोणी आपल्यापुढें कांहीं टाकतें आहे का ह्याची आशाळभूतपणें वाट पाहणाऱ्या शेकडा नव्वदाचा नव्हे.

बहुजनसमाजाचा विचार करण्याची त्या दिवसांत 'फॅशन' नव्हती. भारत म्हणजे बहुजनसमाज—अगदीं अस्पृश्यांसह सारी जनता—हें जेव्हां रमाबाईंच्या मनाला पटलें तोच रमाबाईंच्या खऱ्या पालटाचा दिवस. ह्यानंतर बाईंची सेवा ह्या उच्च वर्णीय हिंदूंच्या भोंवतीं प्रदक्षिणा घालीत बसली नाहीं. ती साऱ्या जगांत स्वैर संचार करूं लागली.

१८७०—७५ च्या दरम्यान तर अस्पृश्यांच्या मुलांना सार्वजनिक शाळांत प्रवेशहि मिळत नसे. नाशिक मुक्कामीं तीन अस्पृश्यांच्या मुलांनीं सरकारी शाळेंत प्रवेश मिळविण्याची खटपट केली असतां तें प्रकरण थेट डायरेक्टर ऑफ एज्युकेशनपासून तर गव्हर्नरपर्यंत जाऊन शेवटीं त्यांना वाटाण्याच्या अक्षता मिळाल्या. 'सरकारी शाळा सर्व जातींच्या मुलांना खुल्या आहेत' असें धोरण १६ जा. १८५७ व १८ मार्च १८५८ ह्या दोन दिवशीं सरकारी ठराव पास करून सरकारनें जाहीर केलें व त्याचीच परीक्षा पाहण्यासाठीं अस्पृश्यांचीं हीं तीन मुलें एका मिशनरीनें शोधून आणलीं होतीं.

---

१. 'मराठी माणसें, मराठी मनें' पृष्ठ ४७.

ह्या परीक्षेंत सरकार व लोकमत हीं दोन्ही अगदीं समूळ नापास झालीं.[1]

अशा वेळीं अतिशूद्र मानलेल्या ह्या जातींसाठीं केवळ एका ब्राह्मणेतरानें धडाडीनें पुढाकार घेऊन शाळा काढल्या. त्यांस मदत त्यांच्या कांहीं ब्राह्मण मित्रांनीं केली. पण त्यांना सरकारी साह्य यथातथाच होतें. पुढाऱ्यांच्या साहाय्याची तऱ्हाहि अशीच होती. प्रोफेसर केरो लक्ष्मण छत्रे, कृष्णशास्त्री चिपळूणकर, विष्णु मोरेश्वर महाजनी व नारायणभाई दांडेकर हे चार थोर गृस्थ एकत्र होऊन दरमहा शाळेस सव्वा रुपया देत असत! म्हणजे प्रत्येकीं पांच आणे! पण ही मोठी रक्कम त्यांनीं दरमहा देण्याचें चालू ठेवलें किंवा नाहीं हें सांगतां येत नाहीं.'[2]

हे ब्राह्मणेतर गृहस्थ आतां महात्मा म्हणून ओळखले जाणारे ज्योतिबा गोविंदराव फुले होत.

वर सांगितलेल्या सद्गृहस्थांखेरीज आणखीहि लोकांनीं फुलेजींना मदत केली. एवढें मोठें पुणें शहर, तेथें एवढी मोठी मदत न मिळेल तर कोठें मिळायची ?

'रिपोर्टांत' ह्या शाळांस आश्रय देणारांचीं नांवें छापलीं आहेत तीं वाचून पाहिलीं असतां सुधारलेल्या लोकांचें औदार्य आणि स्वदेशप्रीति किती आहे हें दिसून येतें. ह्या यादींत दरमहा देणारे सुमारें ३९ आहेत त्यांपैकीं १६ जणांनीं वर्गणी देणें बंद केलें आहे. ह्या वर्गणीदारांमध्यें १ रुपयापासून ४ रुपयांपर्यंत वर्गणीदार ८ आहेत. बाकीचे सर्व दोन आण्यांपासून ८ आण्यापर्यंत देतात. ह्या सर्व वर्गणीदारांकडून दरमहा सुमारें २४ रुपये वसूल होतात. कित्येक वर्गणीदार सरकारचे मोठमोठे कामगार आहेत. त्यांतील कांहींखेरीज बाकीचे तर आठ आण्यांवर वर्गणी देतच नाहींत. काय, एवढ्या मोठ्या पुणें शहरांत एकूण चाळीसच सुधारलेले लोक ?'[3]

महाराबद्दल ह्या 'सुधारलेल्या लोकांच्या मनांत कळवळा नाहीं' हेंच ह्या अनास्थेचें कारण असें पुढें ह्या पत्राचे लेखक म्हणतात. खरोखर तसें

१. त्रिमूर्तिदर्शन : पृष्ठ ८२
२. त्रिमूर्तिदर्शन पृष्ठ ९०.
३. ज्ञानोदय : १८ सप्टेंबर १८५८

नव्हे. खरें कराण उच्च वर्णीय लोक म्हणजेच भारत, व बाकीचे कःपदार्थ ही उच्चवर्गीयांची त्या वेळची दृष्टी. साहाजिकच इतरांच्या अस्तित्वाचीहि जणूं काय ह्यांना जाणीव नव्हती. अतिशय सुंदर असे त्या वेळचे गोष्टीवेल्हाळ घ्या. त्यांनीं लिहिलेल्या बहुतेक गोष्टी आणि कादंबऱ्या एकजात ब्राह्मण वर्गासंबंधीं लिहिलेल्या आहेत असें आढळून येईल.

भारत म्हणजे ब्राह्मण समाज नव्हे. तो समाज अगदींच चिमुकला आहे. भारतांतील बहुजनाची भाषा म्हणजे ब्राह्मण बोलतात लिहितात ती भाषा नव्हे, ती फार थोड्यांची भाषा आहे. लिहिण्याची कल त्यांच्या हातांत असल्यानें ती पुस्तकांत आली. भाषेला बहुजनसमाजाचें वेगळें वळण आहे. पण लेखकाला ह्या गोष्टीचें भान लिहिण्याच्या भरांत राहात नाहीं. पंडिता रमाबाईंनीं ही गोष्ट ध्यानांत वागविली होती हें त्यांच्या मराठी बायबलवरून ध्यानांत येईल.

ह्यापुढें 'उच्च वर्णीय हिंदु स्त्रिया' हे शब्द बाई विसरल्या. ईश्वराचीं सारींच लेकरें एका दर्जाचीं व एका गरजेचीं, त्यांचीं सेवा मी करणार, हें एकच ध्येय बाईंपुढें उरलें. आणि हें कसें करायचें?

'जगांत माझं असे मजजवळ फक्त थोडेसे कपडे व माझें बायबल तेवढें आहे. अशा परिस्थितींत माझे मित्र मला विचारतील, ह्या शेकडों मुलींची वर्षानुवर्ष जोपासना व त्यांचें पालनपोषण मी कसें करणार? माझ्याहि मनांत असे प्रश्न येतात आणि माझ्या मित्रमंडळीच्याहि मनांत तसेच प्रश्न येतात. पण त्यांचें उत्तर देणें अवघड नाहीं. 'मी गरीब गरजवंत असेन, परंतु परमेश्वर माझा विचार करीत आहे.' त्याच्याजवळ अपार साधनसामुग्री आहे, व त्यानें माझ्या सर्व गरजा भागविण्याचें कबूल केलें आहे. 'सैन्यांचा परमेश्वर म्हणतो, रुपें माझं आहे व सोनेंहि माझें आहे.' व तो मला पाहिजे तें सर्व पाठवील. व्यक्तिशः माझी पात्रता आहे म्हणून नव्हे तर परमेश्वर तेवढा प्रेमळ व दयावंत आहे म्हणून. 'आपल्यांत कांहीं पूर्णता आहे व आपल्याला आपणासंबंधीं कांहीं विचार करतां येतो म्हणून नव्हे तर आपली पूर्णता परमेश्वरांत आहे म्हणून.' पुष्कळ मुलींना सोडवून आणण्यांत मीं पुढें पाऊल टाकलें व त्यांना साह्य देण्याचें पत्करिलें त्या वेळीं नुसता पैशांचाच प्रश्न नव्हता. तर त्यांचें बौद्धिक व आध्यात्मिक शिक्षण, त्यांना राहाण्यासाठीं इमारती, दुष्टतेच्या

प्रभावापासून त्यांचें रक्षण करणें, आजारांत त्यांची काळजी घेणें, त्यांना नैतिक शिक्षण देऊन उत्तम स्त्रिया बनविणें, त्यांचें अन्न कसें तयार करायचें, त्यांच्या कपड्यांची कशी व्यवस्था करायची, त्यांचीं वसतिस्थानें, इतकेंच काय पण शरीरें स्वच्छ कशीं ठेवायचीं, त्यांचें आरोग्य कसें राखायाचें, हे व असे आणखी एकशें एक प्रश्न उद्भवतात व त्यांचीं उत्तरें देणें येथें सोपें नाहीं. परंतु माझ्या संशयात्मक व अशक्त मनाला वरील वचनांनीं सामर्थ्य प्राप्त झालें. स्वर्गीय पित्याकडे धांव घेऊन त्याचा सल्ला विचारतां येणें, त्याच्यापुढें आपल्या रोजच्या गरजा मांडतां येणें, आपण केलेले बेत त्याला सांगतां येणें, वगैरे गोष्टींमुळें केवढें समाधान वाटतें. आपलें सारें ओझें जणूं काय त्याच्यावर टाकतां येतें. अशा रीतीनें या आयुष्याचा काळ मोठा सुखकर व आनंदमय झाला आहे. जगावेंसें वाटतें. परमेश्वरानें अत्यंत दयेनें आमच्या साऱ्या गरजा पुरविल्या आहेत. आम्हांला त्यानें अन्न पुरविलें आहे, वस्त्र पुरविलें आहे, व ह्यापुढें आम्हाला तो लज्जित करणारच नाहीं.''[1]

बाईंचा असा हा दृढ विश्वास होता व असा त्यांचा अनुभव होता. श्री. दादासाहेब गद्रे, सुंदराबाई पवार किंवा मिस् एब्राहाम हीं त्यांच्याकडे त्यांच्या प्रार्थनेच्या बळानें आलीं असा बाईंचा व त्याहि व्यक्तींचा दावा आहे. आपण त्याविषयीं २० व्या प्रकरणांत वाचलेंच आहे. बाईंच्या ह्या विश्वासाच्या फळांचीं असंख्य व आश्चर्यकारक उदहारणें देतां येतील, त्यांपैकीं कांहीं पाहूं.

१८९६ च्या दुष्काळांतील ही गोष्ट आहे. तिचा परिणाम प्रबोधनकार श्री. ठाकरे यांच्यासारख्या, ईश्वर न मानणाऱ्या व्यक्तीच्या मनावरहि कसा झाला तें पाहण्यासारखें आहे. ठाकरे म्हणतात. "आगगाडीनें बाई जबलपूरकडे जात असतांना भुसावळला उतर—ह्याच गाडीनें पुढें जाऊं नको असा त्यांना 'आंतल्या आवाजाचा संदेश' आला. त्याच गाडीनें पुढें गेलें नाहीं तर पुढची गाडी चार तासानें उशिरां येणार आणि ठरल्या टप्प्यावर आडवेळीं पोंचणार, असा पेंच पडला तरी बाई उतरल्या आणि धक्क्यावरच्या बाकावर पुस्तक वाचीत वेळ काढूं लागल्या. असा वेळ काढणें फार कठीण असतें.

---

१. Pandita Ramabai by Manoramabai (Australian Edttion). पृष्ठें १५६–१५७

थोडें वाचावें, जरा इकडेतिकडे फिरावें, पुन्हां वाचावें. वाचण्याकडेहि लक्ष लागत नाहीं, डोक्यांत विचारांचें वादळ चालूं. इतक्यांत मुंबईहून नागपूर मेल आली. अवचित मिस् हेलन रिचर्डसन ही रमाबाईंची एक हितचिंतक मैत्रीण त्यांच्याकडे धावतच आली. 'हॅलो रमाबाई, चटकन घ्या बरं हें' असें म्हणून तिनें बाईंच्या हातांत एक नोटाचें पुडकें दिलें. मुंबईहून निघाल्यापासून मी सारखी तुमची आठवण करीत होतें. मनिऑर्डरच पाठविणार होतें. पण इथेंच भेटलांत बरें झालें. गुड बाय, असें म्हणून हेलन बाई चटकन गाडींत बसून निघून गेल्या.'[1] 'रमाबाई प्रचलित सर्व धर्मपंथांचा त्याग करून येशू ख्रिस्ताला शरण गेल्या. जो या भवसागरीं आमचा वाटाड्या, आमचा संशोधक, आमचा साहाय्यक, त्याची परिपूर्ति प्राप्त झाली, म्हणूनच आम्हांला अजब सामर्थ्य प्राप्त झालें, अशी त्यांची खरोखरच श्रद्धा होती आणि त्या श्रद्धेचें फळहि त्यांच्या पदरांत पडलें. ह्या मुद्याचे विषयीं संशय शंका घेण्याचें मला किंवा कोणालाहि कांहीं प्रयोजन नाहीं.'[2]

बाईंच्या म्हणण्याप्रमाणें परमेश्वराच्या संवेदनेनें बाईंच्यावर अवलंबून असणाऱ्या ह्या असंख्य जीवात्म्यांचे जीव वांचविण्यास स्फूर्ति प्राप्त होऊन लोक न मागतां त्यांच्याकडे पैसा पोंचता करीत इतकेंच नाहीं तर त्यांच्या इतर गरजाहि मोठ्या विलक्षण रीतीनें पुरविल्या जात.

मध्य भारतांतून आलेल्या मुलीं पैकीं कांहींचें पाऊल वांकडें पडलें होतें, त्यांचा दोष नसतां परिस्थितीनें पातकी पुरुषांच्या बळजबरीस त्या बळी पडल्या होत्या. अशांची काळजी वाहणें व त्यांना सन्मार्गास आणण्याचें अत्यंत अवघड काम बाईंच्या पुढें उभें राहिलें. त्या एकसारखी परमेश्वराजवळ प्रार्थना करीत होत्या, त्यांना 'मुक्ति गृहांत' ठेवणें योग्य नव्हतें. त्यांच्यासाठीं 'उद्धार-गृहाची' (Rescue Home)ची गरज होती. 'आम्हाला अगदीं कल्पना आली नसती अशी मदत अनपेक्षित रीतीनें परमेश्वरानें पाठवून दिली. एक दिवस अमेरिकेहून मिस एडमंड नांवाची एक भगिनी केडगांवला येऊन उतरली. ती मुद्दाम आम्हांला साह्य करायला म्हणून आली होती. आम्हांला

१. प्रबोधनकार ठाकरेकृत पंडिता रमाबाई पृष्ठ ५६ :
२. तेंच पुस्तक पृष्ठ ६९.

अशा स्त्रियासाठीं काम करणारी विशेष शिक्षण घेतलेली साह्यकारी हवीच होती' आणि खरोखर चमत्कार असा कीं मिस् एडमंड ह्यांनीं त्याच विषयाचा अभ्यास केलेला होता; पण ह्या चमत्काराचा पुढील भाग अधिकच अद्‌भुतरम्य आहे. अमेरिकेंत काम करणाऱ्या मिसेस बेकर नावांच्या एका ख्रिस्ती मिशनरीला एकसारखी अशी टोंचणी लागली कीं 'ऊठ आणि हिंदुस्थानांत जा.' परमेश्वरी संदेश समजून ती खरोखरच हिंदुस्थानास यायला निघाली. त्याच जहाजावर मि. व मिसेस नार्टन नांवाचें एक जोडपें केडगांवला येऊन बाईंच्या कामांत साह्य करावें म्हणून निघालें होतें. त्यांची वाटेनें ओळख झाली व नॉर्टन कुटुंबाबरोबर मिसेस बेकरहि केडगांवला आली. केवळ एक दिवस राहून ती जाणार होती. पण ज्या दिवशीं ही मंडळी केडगांवला पोंचली त्याच दिवशीं 'रेस्क्यू होमचा' उद्‌घाटन समारंभ होता! नवल असें कीं मिसेस बेकर ही बाईहि 'रेस्क्यू होम' चालविण्याचें विशेष शिक्षण घेतलेली अनुभवी स्त्री होती! मिस् एडमंडची व तिची अगदीं ओळख नव्हती. त्याच दिवशीं त्यांनीं प्रथम एकमेकींना पाहिलें. आतां ह्या दोघी बायांनीं परमेश्वरानें आपल्याला येथें कां बोलावलें तें पाहिलें व हा सारा रमाबाईंच्या प्रार्थनेचा प्रत्यय आहे हें पाहतांच त्यांनीं कंबर कसून कामाला सुरुवात केली. केवळ एक दिवस मुक्कामाला म्हणून आलेली पाहुणी घरची बनून तेथील काम पाहूं लागली.

त्या दिवशीं पायाभरणीचा दिवस होता. बाईंच्या हातांत एक पै त्या कामाकरतां नव्हती. बाईंनीं त्या वेळीं सांगितलें कीं प्रभु ही आपल्या विश्वासाची परीक्षा पाहात आहे. त्याचें वचन सांगतें कीं उद्यांची काळजी करूं नको, विश्वास मात्र धर. आज हातांत कांहीं नसलें तरी हें 'कृपा सदन' देव उघडणार आणि देव चालविणार ह्यांत मला कांहीं संशय वाटत नाहीं.

केडगांवला पोहंचून तेथील तो 'रेस्क्यू होम'चा तो उद्‌घाटनसमारंभ पाहीपर्यंत मिसेस बेकरला मात्र, आपली अमेरिकेंतील मोठी, चालू संस्था टाकून हिंदुस्थानांत धाव घ्यावी, म्हणून आपल्याला एवढी प्रबळ प्रेरणा कां होत होती ह्याची जाणीव नव्हती.

त्या वेळेस 'कृपा सदनांत' १२ पतित स्त्रिया होत्या. अजून तें कृपा सदन अस्तित्वांत आहे. सध्यांच्या सुपरिंटेंडंट म्हणतात, 'मुक्तीच्या दुसऱ्या एका भागांत, ज्यांचें पूर्वायुष्य कलंकित होतें, पण येथें आल्यावर ज्या सुधारल्या

आहेत, अशा स्त्रिया राहातात. ह्या स्त्रिया भारताच्या सर्व भागांतून आमच्याकडे आल्या आहेत. परिस्थितीमुळें ज्यांचें पाऊल वाकडें पडलें आहे किंवा ज्यांच्या भोंवतीं वाकडें पाऊल पडण्याजोगी धोक्याची परिस्थिति निर्माण झाली आहे अशा संरक्षणासाठीं आमच्याकडे आलेल्या शंभराच्यावर स्त्रिया येथें आज राहातात. आपलें भावी आयुष्य उपयुक्त सेवेंत खर्च करतां येणें शक्य आहे अशा आशादायी जीवनाची ह्या स्त्रिया अपेक्षा करूं शकतात. कारण येशू ख्रिस्ताच्या ठायीं क्षमा, जीवनाची शुद्धि, व सर्व कांहीं नवीन केलें जाण्याची शक्यता आहे ह्या गोष्टी त्यांना पटल्या आहेत.'[1]

१८९९ मध्यें सरकारनें मुंबई प्रातांत दुष्काळ जाहीर केला. दुष्काळाला खरोखर आधींच सुरुवात झाली होती. बाईंच्या आवतीं भोंवतीं तो भासत होताच. त्यांच्या दीड दोन हजार 'लेकरांवर' उपासमारीची पाळी आल्यानें त्यांच्या पोटांत तुटत होतें. पण त्यांना गहू, तांदूळ, नाहीं तर निदान ज्वारी तरी मिळत होती. पिण्यापुरतें पाणी तरी होतें. पण आसपासच्या खेड्यांत तर त्याचीहि मारामार होती. त्याबद्दल रमाबाई लिहितात:

'गेल्या बुधवारीं सरासरी २०० खेडूत आमच्या आवारांत येऊन उभे राहिले. मी सकाळींच पाण्यावांचून करपून जाणारीं झाडें पहायला गेलें होतें. ह्या झाडांचें कसें रक्षण करावें हा प्रश्न माझ्यापुढें होता. ही मंडळी माझ्या भोंवतीं गराडा घालून उभी राहिली. स्त्रिया तर माझ्या अंगाला बिलगल्या. माझे हात धरून त्या विनवूं लागल्या, कांहीं करा पण खायला द्या. मी इतकी गोंधळून गेलें कीं त्यांच्या समाधानाकरतां दोन शब्द बोलून मी त्यांना जवळच्या गोठ्यांत नेलें. आम्ही तेथें त्यांच्या आत्मिक व शारीरिक स्वास्थ्यासाठीं परमेश्वराजवळ फार काकुळतेनें प्रार्थना केल्या. ते सर्व माझ्या मागून तेथें आले होते व प्रार्थनेच्या वेळीं कोणीहि ख्रिस्ती माणूस जितक्या आदरानें बसला असता तितक्याच आदरानें तेथें खालीं जमिनीवर ते बसले....साठ जणांना मीं ताबडतोब कामावर ठेऊन घेतलें व बाकीच्यांना दुसऱ्या दिवशीं या म्हणून सांगितलें. मग मी परत आलें. दुपारीं काम कसें चाललें आहे तें पहायाला गेलें तों सर्व मंडळी तेथेंच! ते जाईनात! मला त्यांनीं पुनः गराडा

१. 'अग्रेसर स्त्री कैवारी पंडिता रमाबाई' पृष्ठ ९०.

चालला....लहान मुलेंसुद्धां इतकीं केविलवाणीपणें विनवीत होतीं कीं मला कोणालाच नाहीं म्हणवेना. सर्वांनाच या म्हणून मी म्हणालें. त्या वेळीं मनांत असा विचार आला कीं, मी वाईट असूनहि मला गराडा घालणाऱ्या ह्या लोकांना साहाय्य केल्यावांचून माझ्याच्यानें जर राहावत नाहीं तर आपल्या स्वर्गीय पित्याला आपण असाच गराडा घातल्यावर तो कितीतरी अधिक—किती पटींनीं अधिक—आमच्याकडे लक्ष देईल आम्हीं सर्वांनीं एकचित्तानें मात्र त्याच्या सिंहासनाभोंवतीं गराडा घातला पाहिजे.

आम्हांला ह्या लोकांपैकीं फारच थोडक्यांच्या मुखांत घांस घालण्याचें सामर्थ्य आहे. पण ह्याच वेळेस आमच्याकडे मुक्तीसाठीं शाळेची इमारत बांधण्यासाठीं कांहीं उदार लोकांनीं देणगी पाठविली. आम्हीं ताबडतोब त्या इमारतीचा पाया खणला व कामाला सुरुवात केली. आमच्या स्वर्गीय पित्यानें आमची प्रार्थना ऐकली व इतक्या लोकांची सोय झाली.'

ह्याच दुष्काळांत आणखी एक संकट निवारलें गेलें. केडगांवची जमीन नापीक व तेथें पाणी लागणें मोठें मुष्कील. बाईंच्या प्रार्थनेचें फळ अशा त्यांच्या विश्वासाच्या दोन विहिरी होत्या. पण त्यांचें पाणी संपून त्या कोरड्या ठणठणीत पडल्या. दोन हजार माणसांना व जनावरांना पाणीपुरवठा करायचा कसा? त्या शिवाय ही खेड्यांतली जमलेली मंडळी! शिवाय नवीन सुरू केलेलें बांधकाम! त्याबद्दल बाई लिहितात :

'आमच्या दोन मोठाल्या विहिरी वाळून गेल्या होत्या, आणि दुसऱ्या दोनमध्यें फार थोडें पाणी होतें. आम्ही व आमचे पुष्कळ मित्र देवाजवळ पाण्यासाठीं आग्रहाच्या प्रार्थना करीत होतों. 'देवा, पाणी दे.' आणि देवानें आम्हांला पाणी दिलें. सर्वांना पुरेल इतकें पाणी दिलें. भाजीपाल्याला पुरेल इतकें पाणी नव्हतें तरी सर्व लोकांना पुरेल इतकें पाणी त्यानें पुरविलें. एकुणीसशें लोक, शंभर जनावरें व त्याशिवाय बांधायला काढलेल्या इमारती, इतक्यांची गरज भागेल एवढें पाणी आम्हांला हवें होतें. ज्या दोन विहिरींत थोडेसें पाणी उरलें होतें त्या संध्याकाळपर्यंत कोरड्या ठणठणीत पडत, व त्यांचे उघडे पडलेले तळ दिसत. दुसऱ्या दिवसाला पाण्याचा थेंब उरणार नाहीं असें वाटे पण सकाळला ह्या दोन्ही विहिरी भरून येत व आम्हां

सगळ्यांना पुरेसें पाणी मिळे. अशा रीतीनें 'आमचा मुबलक पुरवठा होईल व त्याचें जल आटणार नाहीं.'[1]

बाईंच्या विहिरीबाबत आणखी एक गोष्ट प्रसिद्ध आहे. त्यांनीं ही विहीर खोदायला सुरुवात केली. २५ फूट खोल विहीर गेली, विहीर खणणारे निराश झाले; कोठें पाणी लागण्याचा रंग दिसेना. कामकरी आपलीं हत्यारें घेऊन बाईंकडे आले व आपण आतां हात टेंकले ह्यापुढ पाणी लागण्याचें कांहीं चिन्ह नाहीं. आम्ही चाललों, म्हणून हत्यारें बाईंच्या पुढें टाकून ते निघून गेले. बाईंनीं तावडतोव गुडघे टेंकून प्रार्थनेस प्रारंभ केला. त्यांनीं अत्यंत आग्रहानें रात्रभर प्रार्थना केली. एक मिनिटभर त्या झोंपल्या नाहींत. सकाळ झाल्यावर आपली आरोळी परमेश्वरानें ऐकली अशी त्यांना त्यांचा अंतरात्मा ग्वाही देऊं लागला. त्या उठल्या व तडक त्या विहिरीवर गेल्या तों त्यांच्या व त्यांच्या वरोबरीच्या इतर स्त्रियांच्या नजरेस जें दृश्य पडलें त्यामुळें सर्वच परमेश्वराच्या उपकारस्तुतीनें भरून गेले. विहीर पाण्यानें दहा फूट भरून आली होती! निराश न होतां आपण प्रार्थना केली व तिचें फळ ही धीर देणारी विहीर म्हणून बाईंनीं त्या विहिरीचें नांव 'धीर' असें ठेवलें. बाईंनीं एकंदर बारा विहिरी खणल्या. प्रत्येक विहिरीला नांव आहे, व प्रत्येक वेळेला त्यांना असेच विलक्षण अनुभव आले.

रमाबाईंच्या प्रार्थनेचीं हीं स्मृतिचिन्हें, त्यांच्या विश्वासवृक्षावर उमललेलीं हीं पुष्पें, एकदां त्यांनीं एका पद्यांत गुंफलीं. त्या वेळेस नऊच विहिरी खणल्या गेल्या असाव्या. हें पद्य असें आहे :

## नऊ विहिरींचें गाणें

*उपळुनि ये विहिरी*
*प्रीति तुझे गोड झरे*
*प्रभुमधिं वाहतात*
*संतत विश्रांतिकरे* १

*देव प्रेमाचि खनी*
*तूं उपळून झणीं ये*
*गोड तुझी ओढूं देईं*
*तारण आनंदपये* २

---

१. बायबल : यशयाचें पुस्तक अध्याय ३३ वचन १६.

प्रियकर भक्तजनां
जी प्रभुनें शांति दिली
जग न शकेल घेऊं
ती तुजलाहि पुरली ३

अबल रिती म्हणुनी
येशुकृपा तींत भरे
प्रभु कथि पापियास
माझि कृपा तूज पुरे ४

प्रभु वचनांवरतीं
टेंकुनिया धीर धरी
बहुविध संकटांत
येशू कृपा साह्य करी ५

बहु उपकार करी
जी खणिली देवबलें
उपळुनि तारणाचि वाहाती
तींतील जलें ६

म्हणातिल धन्य तिला
जी दृढ विश्वास धरी
प्रभुवच सत्य यास
साक्ष पटे तीस पुरी ७

मम भजनीं रत जे
माझिच आशा धरिती
नच कधिं लाजतील
ते प्रभुवाणी म्हणती ८

उपळति तूं विहिरी
जीवन दे प्रेमभरें
तुजमधिं वाहताति
देव कृपारूप झरे ९

वरील गाणें अद्याप केडगांवच्या स्त्रिया गातांना दिसून येतात. गाण्याची चाल इंग्रजी आहे.

ह्या नऊ विहिरींचीं नांवें प्रीति, तारण, शांति, येशुकृपा, धीर; उपकार, विश्वास, आशा आणि जीवन अशीं आहेत.

एक दिवस कोठीवाली घाबऱ्या घाबऱ्या बाईंकडे येऊन सांगूं लागली, उद्यांला धान्य नाहीं. उद्यां उपास पडणार. बाईंनीं तिच्या खांद्यांवर आपले दोन्ही हात ठेऊन म्हटलें, 'सत्ता प्रभूच्या खांद्यांवर राहील. आपल्याला तें प्रभूचें ओझें कसें उचलतां येईल ? आपण केवळ त्याच्या आशीर्वादामुळें जगत आहों.' आणि बाई व त्यांच्या मैत्रिणी प्रार्थना करूं लागल्या. संध्याकाळच्या एक्स्प्रेसनें वॅगन भरून गाजरें आलीं ! कोणीं पाठविलीं त्याचा कधींच पत्ता लागला नाहीं. बैलगाड्या भरभरून मुक्तीच्या दारांत आणून तीं ओतण्यांत आलीं.

बाईंनीं सर्व मुलींस बोलावलें व वाटेल तितकीं गाजरें खा म्हणून सांगतलें. त्या घटकेची व्यवस्था झाली. दुसऱ्या दिवशीं कोठून तरी पुरेसा पैसा येऊन बाईंचें काम पुनः पहिल्यासारखें सुरळित चालू झालें. बायबलमधील एका वचनाचा आधार घेऊन बाई नेहमीं म्हणत, 'माझी काथवट व माझें जलपात्र कधीं रिकामें राहायचें नाहीं' आणि खरोखरच त्यांना व त्यांच्यावर अवलंबून राहाणाऱ्या त्यांच्या कन्यकांना परमेश्वरानें कधीं भुकेलें राहूं दिलें नाहीं कीं कधीं तान्हेलें राहूं दिलें नाहीं.

आपण कोणापुढें झोळी फिरवीत नाहीं पण परमेश्वर आपल्या गरजा पुरवितो, आम्ही आमचें जें काय मागणें असेल तें त्याच्याजवळ मागतों, आमच्या मनाला कांहीं आनंद झाला तर त्याला जाऊन सांगतों, आमचीं आसवें पुसावीं असें आम्हाला वाटलें तर आम्ही त्याच्याकडे जातों. तो आमचें सांत्वन करतो.

'White Already to Harvest' च्या पत्र-प्रतिनिधीला १८९९ सालीं रमाबाईंनीं दिलेल्या मुलाखतींत पत्रप्रतिनिधि म्हणतात :

"नंतर आमच्या भाषणाचा ओघ परमेश्वरावरील विश्वासावर व त्यावर अवलंबून राहण्यावर वळला. मीं विचारलें, 'पैसे गोळा करण्याची नेहमींची रुळलेली पद्धत सोडून देऊन परमेश्वरावर टेकून राहण्यास तुम्हाला काय कारण झालें?' त्यावर रमाबाईंनीं उत्तर दिलें, 'आमच्या इंग्लंड व अमेरिकेंतील मित्रांची अशी इच्छा होती कीं मुक्ति गृहाच्या निश्चित योगक्षेमासाठीं कांहीं तरी योजना आंखण्यांत यावी. पण मीं त्या गोष्टीला नकार दिला. पैसे जमविण्यासाठीं झोळी पसरण्याचा, वर्गण्या जमा करण्याचा व त्यासाठीं पत्रें लिहीत बसण्याचा मला वीट आला. हेंच काम करीत बसल्यास येथील एका पेक्षां अधिक व्यक्तींचा वेळ त्यांतच खर्च होईल. एक वर्षापूर्वीं पी. आय. व्ही. मिशनच्या मिस् पार्सनची व माझी गांठ पडली असतां त्यांच्याकडून मला कळलें कीं त्यांच्या मिशनसाठीं कांहीं पैसे देणारी संस्था पाठीशीं नाहीं व त्या मिशनची झोळी फिरत नसते. ते लोक संपूर्णपणें परमेश्वरावर आपला भार आपल्या कामासाठीं टाकतात. ह्या विश्वासाच्या प्रात्यक्षिकानें माझें लक्ष वेधून

१. बायबलः यशयाचें पुस्तकः अध्याय ९ वचन ६

घेतलें व मीं म्हटलें कीं चांगल्या कामाला परमेश्वराचें साह्य केवढें आहे व त्यासाठीं ते लोक केवळ प्रार्थना करतात व परमेश्वर त्यांच्या प्रार्थनेचें फळ त्यांना देतो तर तोच परमेश्वर माझ्या अनाथांना खाऊं पिऊं घालायला, त्यांना अंथरूण पांघरूण द्यायला व त्यांचें शिक्षण करण्याला समर्थ नाहीं का ? मी प्रार्थना करूं लागलें. मला पहिला संदेश आला कीं तूं आपला शारदासदनाचा पगार घेण्याचें सोडून दे,' त्याप्रमाणें मी तो पगार घेण्याचें सोडलें.

शारदासदनाची व्यवस्था व जबाबदारी पूर्वींच्या 'रमाबाई असोसिएशन' च्या हातून नवीन स्थापन झालेल्या 'अमेरिकन रमाबाई असोसिएशन'नें आपल्या शिरावर घेतली. पहिल्या असोसिएशनचीं दहा वर्षें संपलीं होतीं. पण त्या असोसिएशनप्रमाणें ही नवीन संस्थाहि शारदा सदनासाठीं वर्गण्या गोळा करी, 'अपीलें' काढी व तिनेंहि आपली संस्था भक्कम पायावर उभारली होती. त्या दोन्हीहि संस्था बाईंना बाईंच्या कामाबद्दल व मनोरमाबाईंना शारदासदनाच्या हायस्कूलच्या हेड मिस्ट्रेस म्हणून पगार देई पण दोघींनींहि त्यांना मिळालेल्या ईश्वरी संदेशानुसार आपापले पगार घेण्याचें सोडून दिलें. येथें हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं शारदासदन केडगांवास आणण्यांत आलें परंतु त्या कामाचा व मुक्ति मिशनच्या कामाचा कांहीं संबंध नव्हता. मुक्तीचें काम फार विस्तृत व किटकिटीचें होतें. शारदा सदनांत एखादा शेंकडा विद्यार्थिनी असतील नसतील तर मुक्ति सदनांत निदान निदान दोन हजार मुली होत्या व एवढ्यांचें केवळ विश्वासावर व प्रार्थनेच्या बळावर चालवायचें होतें. वर दिलेल्या मुलाखतींत पत्र-प्रतिनिधींना बाईंनीं पुढें म्हटलें :

'But then the question came, How can I go to the Central Provinces to rescue hundreds of famine children with two rupees in my pocket ? But God said 'Go'. Looking out upon the quadrangle she said, 'A year ago we had chhappars where these buildings are : . . . God has given these buildings.'[1]

"आतां प्रश्न आला कीं मुठींत केवळ दोन रुपयांचीं नाणीं घेऊन मध्य प्रदेशांतील शेंकडों दुष्काळी मुलांना वाचवायला मला कसें जातां येईल ! परंतु परमेश्वर म्हणाला 'जा'. सांगतां सांगतां समोरच्या अंगणाकडे त्या

१. 'White Already to Harvest' मार्च—एप्रिल १८९९

पाहूं लागल्या. एकच वर्षापूर्वी येथें झोपड्या होत्या....आतां पाहा देवानें त्या जागीं पक्क्या इमारती बांधून दिल्या आहेत."[1]

आजहि केडगांवच्या चालक मंडळांत हाच भाव दिसून येतो. ह्याचा विचार करतांना कांहीं गोष्टी ध्यानांत धरायला हव्या. केडगांव हें एक शिष्ट अशा भिकाऱ्यांचें गांव नाहीं. तेथील प्रत्येक व्यक्ति पोटापुरतें काम करीत असते. आंधळेसुद्धां कामांत गढून गेलेले आढळतील. केडगांवला आलेल्या एका परदेशीय पाहुण्यानें तेथील कामांची जंत्री देऊन आश्चर्य व्यक्त केलें आहे. 'दिल्लीस बडा दरबार भरला होता. त्या दरबार निरीक्षणार्थ इंग्लंडहून बडी बडी धनाढ्य मंडळी आली होती. मुद्दाम वाकडी वाट करून त्यांतील कांहीं केडगांवला आली. लहान मोठीं सर्व कामें स्त्रियाच करतात, त्याचें त्यांना कौतुक वाटलें, दगड घडणें, चुना मळणें, ओळंब्यानें भिंती बांधणें, सुतारी काम करणें. लोहार कामांत घण मारणें, हीं कामें पाहून तर ते हतबुद्धच झाले. पुढें विहिरी पाहाण्यास गेले तेथें तर कहरच झाला! विहिरीचें खोदकाम बायाच करतात, सुरुंगहि त्याच घेतात, पहारीनें सुरुंग ठासून अखेर बत्ती लावून फार लगबगीनें विहिरींतून बाहेर येतात. सारेंच विलक्षण.'[2] ह्या जंत्रींत नसलेलीं आणखी किती तरी कामें तेथें ह्या स्त्रिया करतात. सुत कातण्यापासून तर खादी तयार करण्यापर्यंतचीं सारीं कामें ह्या स्त्रिया करतात. त्यांना लागणारा त्यांचा सगळा कपडा त्या तेथेंच विणतात. शिवाय शिवणकाम तेथेंच होतें. विणकाम, कशिदा, क्रेट वर्क, लेस वर्क करून व तें विकून त्या पैसा मिळवितात. शेतावरील नांगरणें, वखरणें इत्यादि सर्व कामें त्याच करतात. स्वैपाक तर त्यांचा जन्मसिद्ध हक्कच आहे. आणि तसेंच दळण कांडण. ह्याशिवाय बाईंच्या वेळीं तेथें फार मोठा छापखाना होता व अजूनहि लहानशा प्रमाणावर आहे. तेथील कंपोजिंग, प्रिंटिंग, बाइंडिंग इत्यादि सर्व कामें मुलीच करीत. मशीन चालविण्यास ऑईल एंजीन आहे तेंहि त्याच चालवितात. थोडक्यांत म्हणजे, प्रार्थनेच्या व जेवणाच्या वेळा सोडल्या तर बाकी वेळ सर्व केडगांव एखाद्या मधमाशीच्या पोळ्याप्रमाणें व तेथील रहिवासी

---

१. 'White Already to Harvest' मार्च–एप्रिल १८९९.

२. सच्छास्त्रप्रदीपक, जा. १९३२, पान २.

मधमाशांप्रमाणें कामांत गढून जातात. अशांना भीक मागण्याची गरजच नाहीं. पण मागायची वेळच येते तेव्हां त्या ती देवाजळ मागतात. इतरांजवळ नाहीं.

दुसरी गोष्ट आपल्याला कांहीं मिळावें ह्यापेक्षां आपण कांहीं दुसऱ्यांना द्यावें व दुसऱ्यांकरतां कांहीं करावें अशी तळमळ येथल्या लोकांना लागलेली असते. बायबल सोसायटीला जमा करून पाठवीत असलेलें दान किंवा ह्या अनाथ मुलींनीं परदेशाच्या भुकेल्या अनाथांसाठीं गोळा करून पाठविलेला पैसा हें सिद्ध करतें. युद्धाच्या दिवसांत मुक्ति सदनांतील कांहीं मुलींनीं कांहीं आर्मेनियन पोरक्या मुलांचें संगोपन करण्याचें पत्करिलें; त्यासाठीं त्यांनीं दर रविवारचें आपलें एक जेवण वर्ज्य केलें व त्याचा जो पैसा वांचेल तो त्या मुलांसाठीं पाठवा म्हणून बाईंना सांगितलें.[1] ह्या गोष्टी दाखवितात कीं घेण्यापेक्षां देणें बरें हें बायबलवचन त्यांच्या अंगीं भिनलें आहे. ह्या बाबतींत एक हृदयद्रावक गोष्ट आढळली. शालिनी नांवाची एक मुलगी एक दिवस परमेश्वराच्या दानपात्रांत टाकण्यासाठीं एक जिन्नस घेऊन हळूं हळूं पावलें टाकीत पुढें आली. तिनें आपलें अर्पण आणून वेदी जवळ (पुलपिटजवळ) ठेवलें. ती एक ९ वर्षांची लहान बालिका होती. ती अंध होती. दोन्ही डोळ्यांनीं तिला दिसत नव्हतें. तिचें अर्पण म्हणजे तिची बाहुली. तिची ही एकुलती एक बाहुली होती. तिनें ती अगदीं पोटाशीं आवळून धरली होती. ती पुलपिटवर ठेवतांना पुनः एकदां तिनें ती पोटाशीं धरली. तिचा मुका घेतला. बाहुली ठेवली त्या ठिकाणीं एक कवडसा पडला होता तो बाहुलीच्या तोंडावर पडल्यानें तें तेजस्वी दिसत होतें. भक्ति मंदिरांत जमलेल्या साऱ्यांचें लक्ष त्या बाहुलीकडे वेधून गेलें. साऱ्यांना गहिवर आला. मुलीला नंतर कोणीं विचारलें, तूं आपली बाहुली कां दिलीस, तर ती म्हणाली: 'माझं सर्वांत आवडतं असं तेवढंच कांहीं आहे. मग देवाला ह्याच्याहून मोठं देणं मी काय देऊं?' पुढल्या वर्षीं तिच्याजवळ देण्यासारखें कांहींच उरलें नव्हतें. तेव्हां तिला पुनः कोणीं विचारलें, आतां ह्या वर्षीं तूं देवाला काय देणार? तिनें चटकन उत्तर दिलें: 'ह्या वर्षीं मी स्वतःलाच देवाला देऊन टाकीन. मजजवळ आतां दुसरें कांहीं राहिलें नाहीं, आणि खरोखरच दानार्पणाच्या वेळेस ती जाऊन वेदीजवळ उभी राहिली व जणूं

१. ट्रॅक्ट सोसायटी : पंडिता रमाबाई, पृष्ठ ९६.

कांहीं आपल्या स्वतःला अर्पण करीत आहे अशा रीतीनें खालीं मान घालून प्रार्थना करूं लागली. आणखी एक वर्ष गेलें. नाताळाच्या सुमारास शालिनीच्या नांवानें अमेरिकेंतून एक मोठें पार्सल आलें. त्यांत हातभर उंच अशी केवढी थोरली सुंदर बाहुली होती. शालिनी आपलें दान विसरून गेली होती. आपल्या दानाचें आपल्याला कांहीं असें बक्षिस मिळणार आहे अशी कल्पनाहि तिच्या मनाला शिवली नव्हती. ही एकच गोष्ट 'Appeal, न करतां परमेश्वर त्यांच्या गरजा कशा पुरवतो हें नीटपणें समजून देण्यास पुरें आहे. आपल्या बाहुलीचें दान देतांना ह्या मुलीनें आपल्याला मोठी बाहुली मिळावी अशी तरळतीहि इच्छा धरली नव्हती. पुढल्या वर्षीं तर तिचें दान आणखीहि वरच्या दर्जाचें होतें. त्याच्या पुढच्या वर्षीं तिच्या हातांत चांगली व मोठी बाहुली आली. साहजिकच तिला आनंद झाला. पण आपण देवाला कांहीं उसनें दिलें होतें तें त्यानें सव्याज फेडलें अशी कल्पना मात्र तिच्या मनाला शिवली नाहीं. एकच अखंड विश्वास कीं देव आपला पाठीराखा आहे, त्याला माहीत. हीं कृत्यें करतांना देवाला किंवा इतर कोणाला कांहीं ऋण दिलें आहे व तें फेडलें जाणार आहे, अशी कल्पना त्याच्या पाठीमागें नसते.

त्यामुळें 'अपील' करण्याचा प्रश्नच बाईंच्या कन्यकांपुढें उभा राहात नाहीं व बाईंच्यापुढेंहि तो उभा राहिला नव्हता. त्यांची मित्रमंडळी त्यांच्यातर्फे 'अपील' करतात व तें त्यांनींच केल्यासारखें आहे ह्या म्हणण्यांत सकृद्दर्शनी बराच सत्यांश असल्यासारखें वाटतें. पण खरोखर जें काय होतें तें अगदीं निराळें. ह्या सर्वांनीं आपल्या तोंडाला कुलपें घातलीं तरी हीं सत्कृत्यें व हा विश्वास चहूंकडे आपोआपच समजतो. कोणाचीं तोंडें बंद केलीं तर? 'हे उगे राहिल्यास धोंडे' ओरडूं लागतील आणि हीं कृत्यें जगजाहीर करतील. हीं ऐकल्यावर कोणाला स्वस्थ बसवेल? जाहिरातीसाठीं हीं सांगितलीं जात नाहींत. आपोआप हीं पसरतात. आणि लोकांच्या कानांवर गेल्यावर त्यांचा आपोआपच परिणाम होतो. येथें ईश्वराचा हात दिसून येतो. त्यानें पुष्कळशीं मनें ह्या तऱ्हेच्या वृत्तीला सहमत होऊन तिचें कौतुक करतील अशीं घडविलीं आहेत. त्यांच्यावर आपोआप आणि साहाजिक परिणाम झाल्यावांचून राहात नाहीं. चमत्कार जे घडतात तेहि गुणग्राहकता इकडे ज्या वेळेस तिची जरूर पडेल त्याच वेळेस उत्पन्न होण्यांत व तिचें फळ योग्य वेळीं हातीं पडण्यांत

आहे व हे अनुभव बाईंना पदोपदीं आलेले आहेत. प्रार्थनेनें देवावर कांहीं संकट घालून अमूक एक गोष्ट करायला त्याला भाग पाडतां येतें किंवा देवाला कांहीं सुचत नाहीं, समजत नाहीं, तेव्हां त्याच्याशीं वाद घालून त्याची समजूत पटविणें असेंहि नाहीं. पण तो जें कांहीं करतो त्यांत कृतज्ञतेनें सहभागी होणें व त्याच्याशीं साधर्म्य पावणें ह्या वृत्तीमुळें आपणांस तात्पुरती अप्रिय वाटणारी गोष्टसुद्धां त्याचा प्रसाद म्हणून आपण आनंदानें स्वीकारण्यास तयार होतों.

बाई पहाटे चार वाजतां उठून, आपलें दिवसाचें काम सुरू व्हायच्या अगोदर बराच वेळ प्रार्थनेंत घालवीत. त्यांच्या प्रार्थनांबरोबर पुष्कळ वेळेला त्या उपासहि करायच्या. बाईंच्या प्रार्थनेचीं पुष्कळ उदाहरणें वर दिलीं आहेत. मनोरमाबाईंनींहि आपल्या पुस्तकांत पुष्कळसे अनुभव दिलेले आहेत. त्यांतील एक विशेष अनुभव सांगून दुसऱ्या एका विषयाकडे वळूं.

१९०१ सालची गोष्ट. त्या वर्षी 'रेस्क्यू होमला' पात्र असलेल्या व पातकांतून सोडवून आणलेल्या पुष्कळ बाया केडगांवीं जमा झाल्या होत्या. ह्या स्त्रियांना मुक्ति सदनाच्या किंवा शारदासदनाच्या मुलींत मिसळूं देण्यांत फार मोठा धोका होता. तेव्हां त्यांच्या राहण्याचा एक प्रश्नच उभा राहिला. अजून 'कृपा सदनाची' वेगळी अशी इमारत तयार झाली नव्हती तेव्हां एक मोठी गवताची झोपडी बांधून तींत ह्या स्त्रियांना ठेवण्यांत आलें होतें. एक दिवस ह्या झोपडीला आग लागली. पूर्वेकडून सोसाट्याचा वारा सुटला होता. त्या झोपडीच्या ज्वाला पसरूं लागल्या आणि आतां त्या शाळेच्या इमारतीला येऊन भिडणार अशी भीति उत्पन्न झाली. मनोरमाबाई ह्या बाबतींत म्हणतात :

'Mother was, of course praying all the time that God would help us in some way or other. The men were working as hard as possible but they, too, were beginning to despair when suddenly, in a most marvellous manner the direction of the wind changed and it began blowing from the West instead of the East, thus causing the fire to recede.'[1]

आई एकसारखी प्रार्थना करीत बसली होती. देव कोणत्या ना कोणत्या रीतीनें साह्य करील असा तिचा भरंवसा होता. लोक प्रयत्नांची शिकस्त करीत

१. Quarterly paper of C. S. M. V., Poona

होते. पण त्यांचाहि धीर सुटूं लागला होता. इतक्यांत एकाएकीं एक मोठी आश्चर्यकारक गोष्ट घडली. वारा वाहण्याची दिशा बदलली आणि पश्चिमाभिमुख वारा पूर्वाभिमुख झाला आणि आग ओसरूं लागली.

१४२९ मध्यें जोन ऑफ आर्कच्या आयुष्यांत असाच एक प्रसंग आला होता. संतांच्या आयुष्यांत परमेश्वराची अंगुली कसें मार्गदर्शन करते हें ह्यावरून दिसून येतें. त्याहि प्रसंगीं पूर्वेकडून वाहणाऱ्या वायूची दिशा बदलली होती. 'जोन व बॅस्टार्ड हीं बोलत असतां एकाएकीं वाऱ्यानें आपली दिशा बदलली व तो पश्चिमेकडे वाहूं लागला "

जोन ऑफ आर्कला असाच अनुभव आला होता. पूर्वेकडून वारा वाहूं लागल्यानें त्यांचीं जहाजें त्यांना हाकारतां येईनात. त्यामुळें शत्रूचें चांगलें फावलें होतें. इतक्यांत जोन तेथें येऊन पोंचली आणि एखादा चमत्कार घडावा त्याप्रमाणें वाऱ्यानें आपली दिशा बदलली आणि त्यांना शत्रूचा पराभव करतां आला.'[१]

ह्या दोन स्त्री संतांचा अनुभव किती सारखा व केवढा अभिनव आहे.

*चंचल पवन जशी तव अंगुलि फिरत तसा जगिं नाचे ।*
*तव आदेशे आगम तेवि अनागम ह्या तपानाचें ।*

केडगांवांतील दुसरी अनाकलनीय घटना म्हणजे 'संजीवन.' त्याविषयीं पुढच्या प्रकरणांत पाहूं.

---

१. 'Unfortunately the wind had been blowing from the East for several days and the barges had been unable to put out. While Joan and the Bastard were talking the wind suddenly veered round to the west; the boats ran up briskly, took on their cargoes and were back again before nightfall. The demonstrating party then went home in triumph with a captured 'English standard.' 'From that moment', declared the the Bastard at the Rehabilitation, 'I believed in Joan as I had not before.'—'JOAN OF ARC' Waldman पृष्ठ ९९.

# २७ धर्मसंजीवन

केडगांव येथील धर्मसंजीवनासंबंधीं विचार करण्यापूर्वी आपल्याला बायबलमध्यें धर्मसंजीवनाविषयीं जी माहिती मिळते ती पाहिली पाहिजे.

येशूच्या वधानंतर जेव्हां यहुद्यांच्या 'पन्नासाव्या दिवसा'चा सण प्रथम आला त्या समयीं त्याचे शिष्य एकत्र जमून परमेश्वराच्या प्रार्थनेंत रत झाले असतां संजीवनाचा पहिला अनुभव खिस्ती लोकांना आला. अद्याप त्यांना खिस्ती हें नांव प्राप्त झालें नव्हतें. त्या दिवशीं खिस्तशिष्यांना आलेल्या अनुभवाविषयीं बायबलमधील 'प्रेषितांचीं कृत्यें' ह्या पुस्तकांत असें वर्णन आहे.

'अकस्मात् मोठ्या वाऱ्याच्या सुसाट्यासारखा आकाशांतून नाद झाला. आणि ज्या घरांत ते बसले होते तें सर्व त्यानें भरलें. अग्नीच्या जिभांसारख्या वेगवेगळ्या झालेल्या जिभा त्यांस दिसल्या; आणि त्या प्रत्येकावर एक एक अशा बसल्या. तेव्हां सर्व पवित्र आत्म्यानें परिपूर्ण झाले आणि आत्म्यानें जसें त्यांस वदविलें तसें ते अन्य भाषांतून बोलूं लागले'[१]

१८९६ व त्यानंतर १८९९ ह्या दोन वर्षी मध्य प्रदेशांत व नंतर गुजराथमध्यें जे दोन मोठमोठाले दुष्काळ पडले त्यांतून रमाबाईंनीं हजारों अनाथांना वांचवून आणलें, आश्रय दिला व त्यांचें सर्व कांहीं करण्याची जबाबदारी त्यांनीं आपल्या शिरावर घेतली. त्यांत ब्राह्मणांपासून अस्पृश्यांपर्यंत सर्व जातीच्या माणसांचा समावेश होता. 'माझ्या दाराशीं येईल ती माझी मुलगी, ती उच्चवर्णीय असो नसो, अस्पृश्य मानलेली असो वा गुन्हेगार ठरलेल्या जमातींतील असो. तिच्या पालनपोषणाची, शिक्षणाची, नि कांहीं तरी विद्या उद्योग शिकवून तिला स्वावलंबी बनविण्याची मी जबाबदारी घेईन.' हें व्यापक

---

१. बायबल : प्रेषितांचीं कृत्यें : अध्याय २ वचनें १ ते ४.

धोरण बाईंनीं ठेवलें असल्यानें खरें गरजवंत आतां बाईंच्या भोंवतीं जमा झाले. त्या त्यांना स्वतःच्या कन्या वाटत. त्यांच्या शारीरिक जोपासनेची तशीच नैतिक आणि धार्मिक उन्नतीची जबाबदारीहि बाईंनीं आपल्या शिरावर घेतली होती. ह्या मुलींच्या नैतिक कल्पनाच मोठया अजब होत्या. ह्याविषयीं आपण २०,२१ व २६ ह्या प्रकरणांत वाचलेंच आहे.

अशा माणसांना ख्रिस्ती धर्माचें शिक्षण देणें व त्यांना त्या पातळीवर नेऊन पोंचविणें हेंहि अत्यंत कठीण काम होतें. ह्या मुलींना सुधारण्याचा एकच उपाय उरला होता. तो म्हणजे परमेश्वराजवळ त्यांच्यासाठीं एकसारख्या आग्रहाच्या प्रार्थना करणें. रमाबाईंनीं आपल्या सहकारिणींसह ह्या मुलींसाठीं एकसारख्या प्रार्थना व उपास सुरू केले. मुली आल्यानंतर कित्येक वर्षांनंतर म्हणजे पहिल्या दुष्काळानंतर पांच वर्षांनीं व दुसऱ्यानंतर तीन वर्षांनीं १२०० मुलींनीं आपला बाप्तिस्मा व्हावा म्हणून विनंति केली व त्याप्रमाणें त्यांचे बाप्तिस्मे झाले. ख्रिस्ती चर्चेच्या अमुक एक पंथाच्या रमाबाई नव्हत्या.[१]

'Mukti Church is non denominational and seeks to follow the Bible in regard to doctrne and organization.'

बायबल एवढाच त्यांचा मार्गदीप होता व त्यामुळें जेव्हां पाण्याचा बाप्तिस्मा पावलेल्या अनेक स्त्रियांच्यामध्यें पवित्र आत्म्याचें कार्य दिसून येईना तेव्हां बाईंनीं व त्यांच्या सहकारिणींनीं प्रार्थनांचा व उपवासांचा अवलंब केला.

ह्याबद्दल बाई म्हणतात :

'ह्या प्रार्थनेचे परिणाम फारच समाधानकारक ठरले. पुष्कळच गोष्टींत बदल होण्याची जरुरी होती. नीचवृत्तीची जागा पावित्र्यानें घ्यायला हवी होती. खोटेपणा व फसवेगिरी जाऊन तेथें सच्चेपणा व स्वाभिमान ह्यांची स्थापना व्हायला हवी होती. घुमेपणा व उदासीनता जाऊन ती जागा आनंदी वृत्तीनें भरून काढायला हवी होती. पुष्कळशा मुली दास्यांतून बाहेर पडलेल्या होत्या; पदतलीं तुडविल्या गेलेल्या व अवनत स्थितीस पोहचलेल्या वर्गांतून त्या आलेल्या असल्यानें त्यांच्या अंगीं मुरलेल्या दास्योद्भव दुर्गुणांची पाळेंमुळें खणून काढण्याचें काम सोपें नव्हतें.' ही जात प्रार्थनेवांचून दुसरी

१. Report of the Mukti Church : 1902. (Minnie F. Abrams.)

कशानेंहि निघत नाहीं[1] व मोठ्यानें आरोळ्या ठोकीत भुतें बाहेर पडतात ह्या गोष्टीला मागचा ऐतिहासिक आधार आहे. ध्यानांत धरण्यासारखी गोष्ट म्हणजे संजीवनाचा मुख्य हेतु व संजीवनाचे मुख्य परिणाम जुन्या दुष्ट संवयी व जुने दुष्ट आचार ह्यांचा नायनाट करून त्या जागीं परमेश्वरी प्रेमाची व त्यानें केलेल्या क्षमेमुळें उत्पन्न होणाऱ्या आनंदाची स्थापना करणें,"[2] हीं होतीं.

रमाबाईंच्या म्हणण्याचा संपूर्ण आशय ध्यानीं येण्यासाठीं १९०० वर्षांपूर्वी घडलेल्या इतिहासाकडे दृष्टिक्षेप करायला हवा.

येशूच्या आगमनाचा समय अगदीं जवळ येऊन ठेपला होता. त्या समयीं योहान्न नांवाचा एक विरक्त साधु यार्देन नदीच्या आसपास उपदेश करीत फिरत असे. त्याचें वास्तव्य रानांत होतें तरी त्याचा उपदेश ऐकण्यास निरनिराळ्या व्यवसायांतील व निरनिराळ्या दर्जांचे लोक त्याच्याभोंवतीं गोळा होत. आपलीं पातकें पदरीं घेन त्यांना पश्चात्तापाची व नवीन जीवनाची खूण म्हणून तो यार्देनेच्या पात्रांत गळ्याइतक्या पाण्यांत उभें करून त्यांचा बाप्तिस्मा करी. मात्र लोकांना तो सांगे, 'मी तुमचा बाप्तिस्मा पश्चात्तापासाठीं

---

१. एका भूतग्रस्ताला बरें करण्याचा येशूच्या शिष्यांनीं एकदां प्रयत्न केला होता. परंतु त्यांना त्यांत यश आलें नाहीं. येशूनें नंतर त्याला बरें केलें. यावरून शिष्यांनीं आपल्या अपयशाचें कारण येशूला विचारलें असतां येशूनें शिष्यांना हें सांगितलें होतें : मार्क ९ : २९

२. रमाबाई म्हणतात:

'The results have been most satisfactory. There was much that needed to be changed,—purity to take the place of grossness, uprightness and honour that of falsehood and deceit, gladness that of sullenness and gloom. Many of the girls were 'up from slavery'—members of oppressed and degraded castes, and the task of expelling the slave vices was no easy one, 'This kind can come out by nothing but prayer,' and that it came out with loud cries was also according to precedent. What is to be noted, is that the aim and consequence of this revival was in the first place and chiefly the abandonment of evil practices and the experience of joy in the divine love and the divine forgiveness.' Dr. N. MacNicol's Pandita Ramabai. पृष्ठ ११७

पाण्यानें करतों आहें, परंतु माझ्या मागून जो येत आहे तो येशू ख्रिस्त मजपेक्षां समर्थ आहे. तो तुमचा बाप्तिस्मा पवित्र आत्म्यानें व अग्नीनें करील."[१]

बायबलमधील प्रेषितांचीं कृत्यें ह्या पुस्तकांत पवित्र आत्म्याच्या दानाविषयीं पुष्कळ उल्लेख सांपडतात. पवित्र आत्म्याच्या देणगीविषयीं शिष्यांना जो अनुभव आला, तो आरंभीं दिलेला आहे. त्यानंतर ख्रिस्तशिष्यांचा अनन्वित छळ सुरू झाला व त्यामुळें ते यरुशलेम सोडून अन्य ठिकाणीं पांगले. ह्या गोष्टीचा परिणाम मात्र असा झाला कीं ख्रिस्ती धर्माचा प्रसार परप्रांतांत होऊं लागला. तेथील लोकांचे पाण्यानें बाप्तिस्मे करण्यांत आले परंतु त्यांच्यावर पवित्र आत्म्याचा परिणाम झालेला नव्हता. ती त्यांची गरज भागावी म्हणून यरुशलेममधील शिष्यांनीं पेत्र व योहान्न ह्या दोन शिष्यांना ह्या परप्रांतीय ख्रिस्ती लोकांकडे पाठविलें व त्यांनीं तेथें जाऊन त्या लोकांच्यावर हात ठेवून प्रार्थना केल्यावर त्यांनाहि पवित्र आत्म्याचें दान प्राप्त झालें. ह्यापूर्वीं त्या लोकांचा केवळ प्रभु येशूच्या नांवांत पाण्यानें बाप्तिस्मा झालेला होता.[२] असा पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा आपल्या नव कन्यकांना मिळावा म्हणून आतां परमेश्वराजवळ रमाबाईंच्या आग्रहाच्या प्रार्थना सुरू झाल्या.

ह्याच सुमाराला म्हणजे १९०३ मध्यें ऑस्ट्रेलियामध्यें धर्मसंजीवनाची मोठी लाट उसळली. ह्या संजीवनांत ज्यांना "आत्मिक" लाभ झाला असेल त्यांनीं आपल्या केडगांवांतील ख्रिस्ती भगिनींसाठीं प्रार्थना कराव्या म्हणून व धर्मसंजीवनांत प्रत्यक्ष भाग घ्यावा ह्या हेतूनें पंडिता रमाबाईंनीं आपल्या कन्येला व मिनी एब्रॅम ह्या आपल्या साह्यकर्तीला ऑस्ट्रेलियांत पाठविलें. इतक्यांत वेल्समध्यें व आसाममध्येंहि धर्मसंजीवन सुरू झाल्याचें वृत्त बाईंच्या कानांवर आलें.

मनोरमाबाईंनीं ह्या चळवळीसंबंधानें केडगांवीं प्रत्यक्ष पाहिलेल्या गोष्टींची नोंद आपल्या पुस्तकांत करून ठेवली आहे. त्या म्हणतात :

'१६ जुलैचा दिवस होता. पंडिता रमाबाई नित्याप्रमाणें सकाळीं सहाला प्रार्थनेसाठीं मंदिरांत गेल्या. आज त्यांचें मन फार उदास झालें होतें कारण

१. बायबलः लूक ३:१६.

२. बायबलः प्रे. कृ. ८:१४-१५

आदल्याच दिवशीं पुष्कळशा मुलींनीं असत्य भाषण केलें होतें. त्याच मनःस्थितींत त्यांनीं आपली नित्याची प्रार्थना केली. त्या वेळीं त्यांच्या बरोबर २०० मुली प्रार्थनेला हजर होत्या. नित्याची प्रार्थना झाल्यावर रमाबाई त्या मुलींना म्हणाल्या, आतां तुमच्या पैकीं ज्यांना जायचें असेल त्यांनीं जावें. मी येथेंच प्रार्थना करीत बसणार आहे. ज्यांना माझ्याबरोबर प्रार्थना करीत बसायचें असेल त्यांनीं बसावें. आजच्या दिवस त्यांना त्यांच्या कामावरून रजा मिळेल. कांहीं मुली ह्यानंतर जेवण्याच्या वेळेपर्यंत बसल्या व नंतर निघून गेल्या. पुष्कळशा रमाबाईंबरोबर प्रार्थना करीत बसल्या. रमाबाईंनीं आपलें बायबल उघडून त्यांतून कांहीं वचनें वाचलीं व त्यांवर मोठ्या कळकळीनें अगदीं तळमळून निरूपण केलें. ह्यानंतर पुष्कळ काळपर्यंत अगदीं स्तब्धता पसरली. जवळजवळ दोन घंटे सर्वजणी अगदीं स्तब्ध बसून होत्या. कोणी कांहीं बोललें नाहीं. परंतु तेथें हजर असलेल्या प्रत्येकीला असें वाटत होतें कीं आपण आपल्या स्वर्गीय पित्याशीं बोलतों आहों. शेवटीं एक ख्रिस्ती बाई उभी राहिली आणि नम्रपणें म्हणाली--आपण येथें बसलों असतां मी किती पातकी आहे हें देवानें मला दाखवून दिलें. नंतर ती पंडिताबाईंपुढें येऊन खालीं मान घालून लीनतेनें म्हणाली : आई, मी तुमच्याशीं उद्धटपणानें वागलें त्याची मला माफी करा. त्यानंतर ती दुसऱ्या एका मुलीपुढें जाऊन उभी राहिली. 'परवां मी तुझ्याशीं भांडल्यें. माझीच चूक होती ती. क्षमा कर मला.' नंतर ती अशीच आणखी पांच मुलींकडे गेली व त्यांची तिनें माफी मागितली व शेवटीं आम्ही बसलों होतों तेथें येऊन आमच्याजवळ गुडघे टेकून बसली व प्रार्थना करूं लागली : 'परमेश्वरा, माझ्या पापांची क्षमा कर. मी फार चुका करतें. मला पदरांत घे.'

'दुसरी एक मुलगी उठली व बाहेर गेली. साऱ्यांना ती एक आदर्श ख्रिस्ती मुलगी आहे असें वाटत असे. थोडक्याच वेळांत हातांत एक पुस्तक घेऊन ती परत आली. त्या दोनशें मुलींकडे तोंड करून ती उभी राहिली. अंमळशानें ती म्हणाली, "आपण लायब्ररींत पुस्तकें लावीत होतों तेव्हां मला हें पुस्तक फार आवडलें आणि मीं तें लपवून ठेवलें. मला फार लोभ सुटला." बोलतां बोलतां तिच्या डोळ्यांना पाणी आलें. आर्द्र नेत्रांनीं तिनें तें पुस्तक परत केलें व आपली दिलगिरी तिनें व्यक्त केली. ह्या तरुण मुलींना आपल्या घरीं

असल्या चोऱ्यांचा व लबाड्यांचा कांहीं विधिनिषेध वाटत नसे. ह्यांत कांहीं पाप आहे हें त्यांना माहीतच नव्हतें. त्यांच्या दृष्टीनें पाप जर कशांत असेल तर तें त्या चोऱ्या व त्या लबाड्या धरल्या जाण्यांत होतें. केडगांवला आल्यानंतर अगदीं आरंभापासून त्यांना सांगण्यांत आलें होतें कीं असें वागणें पाप आहे, परंतु पवित्र आत्मा प्राप्त होईपर्यंत ह्या गोष्टी त्यांना समजल्या असल्या तरी उमजल्या नव्हत्या. त्या नंतर पुष्कळ मुलींनीं उठून आपलीं पापें पदरीं घेतलीं. ज्यांचे अपराध केले असतील त्यांच्यापुढें नम्रतेनें उभ्या राहून त्यांनीं पटापट माफी मागितली. पाहतां पाहतां दिलसफाई होऊन वातावरण अगदीं स्वच्छ व पवित्र वाटूं लागलें. ही प्रार्थनेची सभा संपली तेव्हां दुपारचे अडीच वाजले होते. आपण आदल्या रात्रींपासून कांहीं खाल्लें नाहीं हें सुद्धां त्या विसरल्या होत्या. इतक्या त्या, त्या पवित्र वातावरणांत तल्लीन झाल्या होत्या. त्यांना मिळालेल्या "आत्मिक" अन्नापुढें शारीरिक अन्नाची त्यांना काय पर्वा ? ह्यानंतर सहा आठवडेपर्यंत अशाच प्रार्थनेच्या सभा चालल्या होत्या. सभेला अधिकाधिक स्त्रिया हजर राहूं लागल्या. शेवटीं त्यांची संख्या ६०० वर येऊन पोंहचली. एक तरुण मुलगी दररोज उभी राहून नवनव्या पापांचा पाढा वाचूं लागली व तीं धुवून जावीं म्हणून प्रार्थना करूं लागली. एक दिवस ती म्हणाली "परमेश्वर मला रोजच्या रोज माझ्यांतील उणीवा दाखवीत आहे. एक पाप आपणांपुढें मांडलें कीं डोळ्यापुढें दुसरें उभें राहतें, असा आणखी किती दिवस मी आपल्या पापांचा पाढा वाचणार न कळे ! एक मात्र खरें कीं मी आपलें पाप कबूल केलें कीं मला अनन्वित आनंद प्राप्त होतो."

"अशा रीतीनें पुष्कळच मुलींचा पालट झाला. सैतान आपल्या कारवाया करण्याची पराकाष्ठा करीत होता. पण त्याला यश आलें नाहीं. कारण ज्यानें आपणावर प्रीति केली त्याच्या (येशूच्या) योगें ह्या सर्व गोष्टींत आपण विजयी होत आहों (बायबल. रोमकरांस पत्र ८:३७) जो देव आपणास आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताद्वारें जय देतो त्याची स्तुति असो. (बायबल करिंथकरांस पत्र १५ : ५७)" ह्या प्रार्थनांच्या वेळीं दोनतीन गोष्टी प्रामुख्यानें दिसून येत. पुष्कळ वेळेला सर्वच्या सर्व मुली मोठ्यानें एकदम प्रार्थना करूं लागत. कधीं कधीं त्या "अन्य" भाषांत बोलूं लागत व पवित्र आत्मा अग्नि प्रमाणें

येऊन आपल्यावर उतरत आहे असा त्यांना भास होई. हा केवळ भास होता कीं खरोखरच तसें होत होतें हें सांगणें कठीण आहे. लेखक त्यावेळीं प्रत्यक्ष त्या प्रार्थनांच्यावेळीं हजर राहिलेला आहे. त्यावेळीं त्याचें वय लहान होतें तरी त्याला इतकें स्पष्ट आठवतें कीं त्या गोंगाटांत होत असलेल्या प्रार्थना त्यानें ऐकल्या आहेत व स्वतःहि आपल्या पोरवयाला साजेल अशा प्रार्थना त्यानें केल्या आहेत व त्याचाहि सूर त्या गोंगाटांत मिसळला आहे. तरी तो आपली प्रार्थना "अन्य" भाषेंत न करतां अगदीं शुद्ध मराठी भाषेंत करीत असे. त्याचप्रमाणें इतरांचेंहि होत असावें असा त्याचा समज होता. एकाच वेळीं सर्वजण प्रार्थना करीत त्यामुळें कोणाचे शब्द कोणाला उमजत नव्हते. लेखकानें त्या सभांत कधीं अग्नि उतरलेला मात्र पाहिला नाहीं.

पण १९०६ सालीं खुद्द केडगांवच्या मुक्ति छापखान्यांत छापलेल्या एका पुस्तिकेंत पहिल्याच पानावरील हा मजकूर आहे तो पहावा :

"वरून सामर्थ्य प्राप्त होण्यासाठीं.......आम्ही नित्य प्रार्थना करीत होतों, इतक्यांत धर्मसंजीवनास आरंभ झाला."

"जून महिन्याच्या २९ तारखेस, मोठ्या पहांटे ३॥ वाजतां या तीस मुलींपैकीं ×××× नांवाच्या[1] एका मुलीवर पवित्र आत्मा ओतला गेला. असें जेव्हां झालें तेव्हां तिच्या शेजारीं निजलेली बाई जागी झाली, आणि आपली शेजारीण अग्नीनें आच्छादलेली पाहून पोहोराभर पाणी आणण्यासाठीं धावली. तिजवर पाणी ओतणार इतक्यांत तिच्या पाहाण्यांत आलें कीं ××× हिच्या अंगास आग लागलेली नाहीं. या गोष्टीस एक तास झाला नाहीं तों आस पासच्या सर्व तरुण बाया त्या ठिकाणीं गोळा झाल्या व मोठमोठ्यानें रडून प्रार्थना करूं लागल्या व देवाजवळ आपलीं पापें कबूल करूं लागल्या. नुकताच पवित्र आत्मा प्राप्त झालेली ती मुलगी सर्वांच्या मध्यभागीं बसलेली होती व आपणासाठीं देवानें काय केलें आहे हें ती इतरांस सांगत होती.

'दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं, म्हणजे जून ३० रोजीं पंडिता रमाबाई

१. ही मुलगी केशर अक्का नांवानें ओळखली जाते. अद्याप ती केडगांवांत असून तेथील वृद्धाश्रमात राहाते, असें समजतें. केडगांवच्या कांहीं सहवाशांच्या मतें त्या मुलीचें नांव जमनाबाई भानू असें होतें.

आपल्या नेहमींच्या शांत रीतीनें, योहानाच्या ८ व्या अध्यायाचें स्पष्टीकरण करीत असतां पवित्र आत्मा सर्वांवर आला आणि सर्व मुली एकदम मोठ्यानें प्रार्थना करूं लागल्या, अशा कीं पंडिता रमाबाईंना निरूपण करण्याचें सोडून द्यावें लागलें. त्या ठिकाणच्या सर्व मुली मोठ्यानें रडून प्रार्थना करीत होत्या. कित्येक जणींनीं गुडघे टेकले होते. शास्त्रांतील वचनें व बोध ह्यांचें तेथें कांहीं चालत नव्हतें. जणूं खुद्द देव त्यांच्याशीं संभाषण करीत होता. व त्या दुसरें कोणाचें ऐकून घेण्यास तयार नव्हत्या.'[1]

प्रकरणाच्या आरंभीं प्रेषितकालीन अनुभव दिला आहे त्याप्रमाणें आपल्याला खरोखरीच अनुभव येत होता, असें मुलींचें म्हणणें. परंतु त्या म्हणण्यावर सर्वांचाच विश्वास बसत नसे. मुली खोटें बोलत होत्या असें मुळींच नाहीं. परंतु मुलींच्या दृष्टीनें ह्या गोष्टीकडे न पाहाणाराला ह्या गोष्टीचा अर्थ पटणें कठीण होतें एवढें मात्र खरें.

त्याच पुस्तकांत पुढें म्हटलें आहे कीं

'मुक्ति येथें पवित्र आत्म्याचें जें कांहीं महाकार्य घडून आलें त्याविषयीं ह्या पुस्तकाची पहिली आवृत्ति छापून प्रसिद्ध होईपर्यंत फारसें कोणीं लिहिलें नव्हतें. हें महा कार्य एक प्रकारचा आवेशच आहे (hysteria) असें पुष्कळ लोकांस वाटलें. हा आवेश एकदां नाहींसा झाला म्हणजे त्याचा मागमूसहि मागें राहणार नाहीं असेंहि पुष्कळांनीं भाकित केलें होतें. तरी ज्या ज्या व्यक्तीवर हें महा कार्य घडून आलें त्यांचीं चरित्रें उत्तम रीतीनें व विपुल प्रमाणांनीं फलद्रूप झालीं आहेत ही गोष्ट गेल्या पंधरा महिन्यांत सिद्ध झाली आहे.'[2]

ह्या तिन्हीहि अनुभवांत, म्हणजे 'अन्य' भाषांत बोलणें, 'अग्नीचें दृश्य प्रगटीकरण' व 'पापांगिकार.' खुद्द रमाबाईंना मोठासा वांटा मिळाल्याचें दिसत नाहीं. 'अन्य' भाषा बोलण्यासंबंधीं तर प्रेषित पौलानें स्पष्टपणें लिहून ठेवलें आहे कीं: ' मंडळींत अन्य भाषेचे दहा हजार शब्द बोलावे त्यापेक्षां दुसऱ्यास शिकविण्यासाठीं पांच शब्द स्वतः समजून उमजून बोलावें हें मला

१. "पवित्र आत्म्यानें व अग्नीनें बाप्तिस्मा:" पृष्ठ ६.
२. तेंच पुस्तक: पृष्ठ १२.

आवडतें.[१] 'भाषा बोलणारानें आपणाला अर्थ सांगतां यावा म्हणून प्रार्थना करावी.' 'सगळी मंडळी एकत्र जमली असतां सर्वच लोक निरनिराळ्या भाषा बोलूं लागले आणि अशिक्षित किंवा विश्वास न धरणारे आंत आले तर तुम्ही वेडे आहां असें ते म्हणणार नाहींत काय?'[३]

मिसेस डायर लिहितात कीं रमाबाईंना ह्या बाबतींत केवळ दोनच अनुभव आल्याचें त्या सांगतात.[४] एकदां प्रार्थना करीत असतां आपलें अंग पोळतें आहे असा त्यांना भास झाला, व एकदां हिब्रू भाषेंत त्यांनीं कांहीं वाक्यें उच्चारलीं पण तीं आपण उच्चारलीं नसून दुसऱ्याच कोणीं तरी उच्चारलीं आहेत असें त्यांना वाटलें. मात्र आपल्याला हा अनुभव येत नाहीं म्हणून आपल्या मुली कांहीं खोटा बहाणा करीत आहेत असा त्यांना तरळताहि संशय आला नाहीं. रमाबाई ह्या संबंधानें म्हणतात : पवित्र आत्मा प्राप्त झाल्याची एकच खूण म्हणजे प्रेम, परिपूर्ण प्रेम. मात्र रोगनिवारणाची शक्ति, भविष्यकथनाची शक्ति, किंवा अन्य भाषा बोलण्याची शक्ति ह्या पवित्र आत्मा मिळाल्याच्या खुणा नाहींत असें निश्चितपणें म्हणतां यावयाचें नाहीं. मला आज जें कांहीं कळतें आहे त्यापेक्षां पुष्कळच अधिक कळायचें आहे. मी प्रभूला आग्रहानें प्रार्थीन व त्याची इच्छा काय आहे तें समजून घेण्याचा प्रयत्न करीन.[५]

मुंबईच्या सी. एम्. एस. चे एक सेक्रेटरी रे. कॅनन एल्. बी. बुचर ह्यांनीं भारतांत जेथें जेथें संजीवनाची चळवळ होती तेथें तेथें प्रत्यक्ष जाऊन कांहीं संशोधनात्मक निरीक्षण केलें. त्यांनीं केडगांव संबंधीं[६] म्हटलें आहे कीं : ह्या प्रचंड आवाजांत कोण काय म्हणतो आहे ह्याचा अंदाज करणेंहि कठीण होऊन जात असे. असा हा प्रकार तासभर किंवा तासाच्याहि पेक्षां अधिक काळ चाले. ह्या सभांतून विशेषतः केडगांव सोडून इतरत्र झालेल्या असल्या सभांतून अशा संयुक्त प्रार्थनांनंतर साधारणतः चांगला परिणाम

---

१. बायबल : करिंथकरांस पहिलें पत्र. १४ : १३,

२. तेंच पुस्तक, १४ : १९

३. तेंच पुस्तक. १४ : २३

४. Helen Dyre's Pandita Ramabai. पृष्ठ १०१.

५. Mukti Prayer Bell, September, 1907. पृष्ठ ११.

६. Dr. MacNicol's Pandita Ramabai. पृष्ठ १२०.

झालेला आडळे. एकंदर वातावरणावर ताण पडल्यासारखें वाटे, परंतु त्याच अवकाशांत केलेल्या उपदेशाचा परिणाम फार चांगला होई. त्या उपदेशाची संवादी प्रतिक्रिया झालेली चटकन दिसून येई. निरनिराळ्या भाषांतून बोलणें हा केडगांवचा विशेष होता. कॅनन बुचर एकदां एका प्रार्थनेच्या सभेंत स्वतः मनोरमाबाईंच्या शेजारीं बसले होते. प्रार्थनेनंतर त्यांनीं मनोरमाबाईंना विचारलें असतां त्या म्हणाल्या आपण प्रार्थना अगदीं समजून उमजून करीत होतों. बुचर साहेबांना मात्र कोणाच्याच प्रार्थनेचा अर्थ कळला नाहीं. मात्र मनोरमाबाईंप्रमाणेंच इतरांचेंहि म्हणणें होतें कीं आपण अगदीं समजून उमजून प्रार्थना करीत होतों. त्या म्हणत आम्ही अन्य भाषांत प्रार्थना करीत होतों तरी आपण काय बोलत होतों तें आपणाला चांगलें समजत होतें. आणि आपल्याला त्याचा मोठा आत्मिक लाभ झाला. पंडिता रमाबाईंसंबंधानें ते म्हणतात :

She maintained a very sane attitude and while she did not forbid to speak the tongues and gave full liberty to her workers and widows, as she did not wish in any way to check the work of God or limit the spirit, she kept from the extremes to which some of the exponents of the 'tongues' movement were led to and I do not feel that the work of Mukti suffered through these manifestations.

रमाबाईंनीं आपलें धोरण फार समजूतदारपणाचें ठेवलें होतें. अन्य भाषांतून बोलण्याविरुद्ध त्यांनीं कांहीं दडपण आणलें नाहीं. उलट आपल्या कामगारांना व विधवांना त्या बाबतींत त्यांनीं पूर्ण स्वातंत्र्य दिलें होतें. कारण त्यांना देवाच्या कार्याला विरोध करायचा नव्हता कीं पवित्र आत्म्याला बांध घालायचा नव्हता. अन्य भाषांचे कित्येक आग्रही त्या बाबतींत जसे अगदीं कळसाला जाऊन पोंचतात तसें बाईंनीं केलें नाहीं. त्या आविष्करणानें मुक्तीच्या कामाला कांहीं धोका उत्पन्न झाला असेंहि म्हणतां येणार नाहीं. उलट त्यांच्या असेंहि दृष्टोत्पत्तीस आलें कीं मुक्तींतील कितीतरी कामकरी संपूर्णपणें पालट झालेल्या दिसत होत्या.

ईश्वर व खिस्त ह्यांच्यावरील रमाबाईंची श्रद्धा दिवसेंदिवस वृद्धिंगत होत होती. दर गुरुवारीं त्यांचा प्रार्थनेचा विशेष कार्यक्रम व्हायचा. त्यांचा एक

प्रार्थनेचा संघ होता. त्यांत आधीं आधीं सुमारें सत्तर मुली भाग घेत. हा संघ रोज पहांटे पांच ते सहा त्यांच्याबरोबर येऊन प्रार्थना करी. सहा महिन्यांनीं ह्या सामुदायिक प्रार्थनेला उत्तर आलें. कितीतरी लहान मुलींचा व प्रौढ स्त्रियांचा पालट झाला. प्रार्थना संघाची संख्या आतां चारशेंच्या वर गेली. हा संघ २९००० लोकांचीं नांवें घेऊन प्रत्येक व्यक्तीसाठीं प्रार्थना करी. ह्या नांवांची त्यांनीं आपसांत वाटणी करून घेतली होती. अमुक अमुक व्यक्तीला परमेश्वरा, पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा दे व त्यानें येशू ख्रिस्ताचे खरे श्रद्धावान साक्षीदार व्हावें म्हणून त्यांच्यावर अनुग्रह कर अशी ती प्रार्थना असे.

परंतु ह्या संजीवनाच्या चळवळीवर सर्वांचाच विश्वास बसत नसे. कोणाला ह्यांत उन्माद आढळून येई तर कोणाला ढोंगाचा वास येई. ही संजीवनाची बातमी हां हां म्हणतां चहूंकडे पसरली. ती ऐकून बेळगांवचे दोघे मिशनरी मि. अर्विन व मि. स्टोरी हे केडगांवला धावून आले. ह्या प्रकाराविषयीं व त्याच्या दुष्परिणामाविषयीं बायबलमधून शास्त्राधार काढून सुसज्ज होऊन ते आले होते. मि. अर्विन इंडियन ख्रिश्चन नांवाच्या इंग्रजी, व मि. स्टोरी सच्छात्र प्रदीपक ह्या मराठी पत्रांचे संपादक होते. परंतु केडगांवला आल्यावर त्यांनीं तेथें जें कांहीं प्रत्यक्ष पाहिलें व प्रत्यक्ष ऐकलें त्यावरून हा कांहीं आत्यंतिक भावनोद्रेकाचा, उन्मादाचा किंवा सैतानानें तेजोमय रूप धारण करून चालविलेल्या फसवणुकीचा प्रकार नाहीं अशी त्यांची खात्री होऊन व हें कार्य पवित्र आत्म्याचेंच आहे हें पटल्यावर त्या विरुद्ध एकहि शब्द न काढतां ते तेथून परतले. (वरील माहिती आम्हांला बेळगांवचे सध्याचे एक मिशनरी मि. आर. सी. ई. ॲट्किन्सन ह्यांनीं पुरविली आहे.) मिसेस अर्विन ह्या अत्यंत वृद्ध झाल्यानें त्यांना ह्या प्रकरणीं फारशी आठवण नाहीं; तरी त्या लिहितात कीं हे दोघे केडगांवला गेले असतां आपण त्यांना तार केली कीं लवकर परत या, व परत आल्यावर ती तार पाठविली हें फार चांगलें केलें असें ते म्हणाले.

ए. पी. मिशनचे वयोवृद्ध मिशनरी रे. डॉ. एच्. जी. हॉवर्ड ह्यांनीं जेव्हां ह्या सामुदायिक प्रार्थनेविषयीं ऐकलें तेव्हां त्यांनाहि वाटलें कीं अशा प्रकारच्या प्रार्थनेमुळें साराच गोंधळ उडून जात असेल. परंतु ते स्वतः तेथें जाऊन त्यांनीं तेथील परिस्थिति प्रत्यक्ष पाहिली तेव्हां त्यांना ह्या प्रार्थनांत कांहीं

झालेला आढळे. एकंदर वातावरणावर ताण पडल्यासारखें वाटे, परंतु त्याच अवकाशांत केलेल्या उपदेशाचा परिणाम फार चांगला होई. त्या उपदेशाची संवादी प्रतिक्रिया झालेली चटकन दिसून येई. निरनिराळया भाषांतून बोलणें हा केडगांवचा विशेष होता. कॅनन बुचर एकदां एका प्रार्थनेच्या सभेंत स्वतः मनोरमाबाईंच्या शेजारीं बसले होते. प्रार्थनेनंतर त्यांनीं मनोरमाबाईंना विचारलें असतां त्या म्हणाल्या आपण प्रार्थना अगदीं समजून उमजून करीत होतों. बुचर साहेबांना मात्र कोणाच्याच प्रार्थनेचा अर्थ कळला नाहीं. मात्र मनोरमाबाईंप्रमाणेंच इतरांचेंहि म्हणणें होतें कीं आपण अगदीं समजून उमजून प्रार्थना करीत होतों. त्या म्हणत आम्ही अन्य भाषांत प्रार्थना करीत होतों तरी आपण काय बोलत होतों तें आपणाला चांगलें समजत होतें. आणि आपल्याला त्याचा मोठा आत्मिक लाभ झाला. पंडिता रमाबाईंसंबंधानें ते म्हणतात :

She maintained a very sane attitude and while she did not forbid to speak the tongues and gave full liberty to her workers and widows, as she did not wish in any way to check the work of God or limit the spirit, she kept from the extremes to which some of the exponents of the 'tongues' movement were led to and I do not feel that the work of Mukti suffered through these manifestations.

रमाबाईंनीं आपलें धोरण फार समजूतदारपणाचें ठेवलें होतें. अन्य भाषांतून बोलण्याविरुद्ध त्यांनीं कांहीं दडपण आणलें नाहीं. उलट आपल्या कामगारांना व विधवांना त्या बाबतींत त्यांनीं पूर्ण स्वातंत्र्य दिलें होतें. कारण त्यांना देवाच्या कार्याला विरोध करायचा नव्हता कीं पवित्र आत्म्याला बांध घालायचा नव्हता. अन्य भाषांचे कित्येक आग्रही त्या बाबतींत जसे अगदीं कळसाला जाऊन पोंचतात तसें बाईंनीं केलें नाहीं. त्या आविष्करणानें मुक्तीच्या कामाला कांहीं धोका उत्पन्न झाला असेंहि म्हणतां येणार नाहीं. उलट त्यांच्या असेंहि दृष्टोत्पत्तीस आलें कीं मुक्तींतील कितीतरी कामकरी संपूर्णपणें पालट झालेल्या दिसत होत्या.

ईश्वर व ख्रिस्त ह्यांच्यावरील रमाबाईंची श्रद्धा दिवसेंदिवस वृद्धिंगत होत होती. दर गुरुवारीं त्यांचा प्रार्थनेचा विशेष कार्यक्रम व्हायचा. त्यांचा एक

प्रार्थनेचा संघ होता. त्यांत आधीं आधीं सुमारें सत्तर मुली भाग घेत. हा संघ रोज पहांटे पांच ते सहा त्यांच्याबरोबर येऊन प्रार्थना करी. सहा महिन्यांनीं ह्या सामुदायिक प्रार्थनेला उत्तर आलें. कितीतरी लहान मुलींचा व प्रौढ स्त्रियांचा पालट झाला. प्रार्थना संघाची संख्या आतां चारशेंच्या वर गेली. हा संघ २९००० लोकांचीं नांवें घेऊन प्रत्येक व्यक्तीसाठीं प्रार्थना करी. ह्या नांवांची त्यांनीं आपसांत वाटणी करून घेतली होती. अमुक अमुक व्यक्तीला परमेश्वरा, पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा दे व त्यानें येशू ख्रिस्ताचे खरे श्रद्धावान साक्षीदार व्हावें म्हणून त्यांच्यावर अनुग्रह कर अशी ती प्रार्थना असे.

परंतु ह्या संजीवनाच्या चळवळीवर सर्वांचाच विश्वास बसत नसे. कोणाला ह्यांत उन्माद आढळून येई तर कोणाला ढोंगाचा वास येई. ही संजीवनाची बातमी हां हां म्हणतां चहूंकडे पसरली. ती ऐकून बेळगांवचे दोघे मिशनरी मि. अर्विन व मि. स्टोरी हे केडगांवला धावून आले. ह्या प्रकारा-विषयीं व त्याच्या दुष्परिणामाविषयीं बायबलमधून शास्त्राधार काढून सुसज्ज होऊन ते आले होते. मि. अर्विन इंडियन ख्रिश्चन नांवाच्या इंग्रजी, व मि. स्टोरी सच्छात्र प्रदीपक ह्या मराठी पत्रांचे संपादक होते. परंतु केडगांवला आल्यावर त्यांनीं तेथें जें कांहीं प्रत्यक्ष पाहिलें व प्रत्यक्ष ऐकलें त्यावरून हा कांहीं आत्यंतिक भावनोद्रेकाचा, उन्मादाचा किंवा सैतानानें तेजोमय रूप धारण करून चालविलेल्या फसवणुकीचा प्रकार नाहीं अशी त्यांची खात्री होऊन व हें कार्य पवित्र आत्म्याचेंच आहे हें पटल्यावर त्या विरुद्ध एकहि शब्द न काढतां ते तेथून परतले. (वरील माहिती आम्हांला बेळगांवचे सध्याचे एक मिशनरी मि. आर. सी. ई. ॲट्‌किन्‌सन ह्यांनीं पुरविली आहे.) मिसेस अर्विन ह्या अत्यंत वृद्ध झाल्यानें त्यांना ह्या प्रकरणीं फारशी आठवण नाहीं; तरी त्या लिहितात कीं हे दोघे केडगांवला गेले असतां आपण त्यांना तार केली कीं लवकर परत या, व परत आल्यावर ती तार पाठविली हें फार चांगलें केलें असें ते म्हणाले.

ए. पी. मिशनचे वयोवृद्ध मिशनरी रे. डॉ. एच्. जी. हॉवर्ड ह्यांनीं जेव्हां ह्या सामुदायिक प्रार्थनेविषयीं ऐकलें तेव्हां त्यांनाहि वाटलें कीं अशा प्रकारच्या प्रार्थनेमुळें साराच गोंधळ उडून जात असेल. परंतु ते स्वतः तेथें जाऊन त्यांनीं तेथील परिस्थिति प्रत्यक्ष पाहिली तेव्हां त्यांना ह्या प्रार्थनांत कांहीं

वावगें दिसलें नाहीं. त्यांना शेंकडों मुली एकाच वेळीं प्रार्थना करतांना आढळल्या. परंतु त्या मोठ्यानें प्रार्थना करीत होत्या तरी किंकाळत नव्हत्या व त्यांचें बोलणें त्यांना कळत असल्यासारखें दिसत होतें. उलट मोठ्यानें बोलण्यानें त्यांना आपल्या प्रार्थना एकाग्र चित्तानें करतां येत असें म्हणतां येईल. त्या मोठ्यानें बोलत होत्या परंतु दुसऱ्यांच्या प्रार्थनेंत व्यत्यय येईल अशा तऱ्हेचें तें बोलणें नव्हतें.[१]

अँग्लिकन चर्चमध्यें बाप्तिस्म्यानंतर Confirmation किंवा दृढिकरणाचा जो विधी असतो तो कांहींसा पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्यासारखा किंवा पवित्र आत्म्याला आवाहन करण्यासारखा आहे असें म्हणतां येईल.

हिंदूंची मुंज, मुसलमानांची सुंता तशीच ख्रिस्ती लोकांची बाप्तिस्मा ही एक धार्मिक स्थित्यंतराची खूण आहे असें प्रथम दर्शनीं वाटण्यासारखें आहे. परंतु वस्तुस्थिति थोडी वेगळी आहे. बाप्तिस्मा हा जरी एक ख्रिस्ती संस्कार असला तरी त्याला फार वेगळा व महत्त्वाचा अर्थ आहे. बाप्तिस्म्याचा विधि ख्रिस्तपूर्व कालापासून रूढ होता. यहुदीतर व्यक्तींना यहुदी करून घेतांना हा विधि करीत. बाप्तिस्मा करणाऱ्या योहान्नानें त्याला कृतकर्माच्या पश्चात्तापाची दृश्य खूण असा अर्थ दिला, व त्याच वेळेस त्यानें येशूकडून जो बाप्तिस्मा मिळायचा त्याची रूपरेषा सांगितली. येशूचा बाप्तिस्मा पवित्र आत्म्याचा व अग्नीचा असणार असें त्यानें सांगितलें होतें. त्याप्रमाणें ख्रिस्तानें बाप्तिस्म्याचा अर्थ अगदीं बदलून टाकला. शरिराचा मळ काढून तें स्वच्छ व शुद्ध करण्यासाठीं जशी पाण्याच्या स्नानाची अवश्यकता असते तसा आत्म्याचा

---

१. 'When I heard of simultaneous prayer at Mukti Mission I thought it would cause much disorder; but when I went there and actually saw hundreds of women praying at once I saw that there was no disorder at all. No one was praying so loud as to make others hear. No woman was trying to make others hear what she was saying. They were praying aloud (not shouting) to keep them pay attention to the words they were uttering. It is often easier to pay attention to our prayers by praying aloud than by praying in our minds.'
डॉ. हॉवर्ड यांचें खाजगी पत्र. २९.६०

अशुद्धपणा व अपवित्रपणा काढून टाकण्यास 'पवित्र आत्म्याचें स्नान' अवश्य आहे, म्हणजे पवित्र करणाऱ्या प्रेरणांची आवश्यकता आहे, ख्रिस्ताचा एक महत्त्वाचा प्रेषित संत पौल म्हणतो: 'मी जगतों असें नाहीं तर ख्रिस्त माझ्या ठायीं जगतो.'[1]

केडगांवीं पाण्याच्या बातिस्म्याचे विधि होऊन शेकडों व्यक्ती ख्रिस्ती झाल्या होत्या. प्ररंतु अद्याप त्यांचे पवित्र आत्म्यानें बाप्तिस्मे व्हायचे होते हें ह्या प्रकरणाच्या आरंभीं दिलेल्या सातव्या पॅरेग्राफच्या अनुक्रम २ च्या तळटीपेंतील इंग्रजी उताऱ्यावरून दिसून येतें. हें व्हावें म्हणून रमाबाई व त्यांच्या कांहीं सहकारिणी आग्रहपूर्वक प्रार्थना करीत होत्या. पवित्र आत्म्याचा व अग्नीचा बाप्तिस्मा होतांच त्यांचा अंतर्बाह्य पालट झाला. त्यांचें नवीनीकरण व्हायचें होतें तें झालें.

संजीवनाची जी लाट आली तिनें केडगांवला हें कार्य केलें. तेथील मंडळीची पवित्र आत्म्याशीं बोलतांना "ब्रह्मानंदीं लागली टाळी कोण देहातें सांभाळी" अशी स्थिति होत असे. त्यामुळें त्यांना आपलें अंग पोळल्यासारखें वाटे. शरीर आणि मन ह्यांचा केवढा निकटचा संबंध आहे हें कोणीहि शारीरशास्त्राचा अभ्यास करणारा विद्यार्थी सांगूं शकेल. हे भक्त प्रार्थना करीत तेव्हां "अन्य" भाषा बोलत. पन्नासाव्या दिवसाच्या सणाच्या वेळीं येशूचे शिष्य एकत्र जमले असतां प्रार्थनेच्या वेळीं ते अन्य भाषा बोलूं लागल्याचें आरंभीं आपण पाहिलेंच आहे. एक वेळ पालेस्ताईन देश व्यापाराच्या दृष्टीनें फार महत्त्वाचा देश होता. मिसर, युरप व आशिया ह्या सर्व भागांचें दळणवळण ह्या देशांतून होतें. तेव्हां अर्थातच निरनिराळ्या भाषांची तेथें जरुरी होती व शिष्य निरनिराळ्या भाषांत बोलूं लागले व त्यांचें बोलणें तेथील जाणाऱ्या येणाऱ्या लोकांना कळत होतें हें योग्यच होतें. कांहीं लोक असें मानतात कीं धार्मिक आनंदानें उद्दीपित होऊन भिन्न ध्वनि ते मुखावाटें काढतात. त्याला glossalalia म्हणतात. दोन ग्रीक शब्द मिळून हा शब्द बनला असून त्याच अर्थ अन्य भाषा असा आहे. परंतु केडगांवला ही glossalalia भाषा वापरण्यांत आली असवी असें वाटत नाहीं. संत पौल म्हणतो "भाषा बोलणें

१. बायबलः गलतीकरांस पत्रः २:२०

२. बायबलःलूक ३:१६,

आहे तर त्या बोलणारे दोघे किंवा पराकाष्ठा तिघे यांपेक्षां अधिक नसावे. व त्यानें त्या अनुक्रमें बोलाव्या व एकानें अर्थ सांगावा. परंतु अर्थ सांगणारा नसला तर त्यानें मंडळींत गप्प बसावें. स्वत:बरोबर व देवाबरोबर बोलावें."[1]

हें स्वत:बरोबर व देवाबरोबर बोलणें होतें. वरतीं आपण पाहिलेंच आहे कीं रमाबाईंना ह्या प्रार्थनांमुळें आपलें निरूपण थांबवावें लागलें. परमेश्वराशीं तादात्म्य पावून त्या त्याच्याशीं बोलूं लागल्यावर त्यांना आणखी कोणाला आपलें बोलणें कळतें आहे कीं नाहीं हें पाहण्याचें कारणच उरत नाहीं. आणि परमेश्वराला अमूक एक भाषा कळते, दुसरी नाहीं, असें थोडेंच आहे? त्याच्याशीं आपल्या भावनेनें अगदीं निःशब्द देखील बोलतां येतें. केडगांवला अन्य भाषांत प्रार्थना होत हें अगदीं सत्य आहे. व तेथें जमलेल्या मुलींना निदान निदान तरी गुजराथी, हिंदी, मराठी व कानडी अशा चार भाषा मातृभाषा म्हणून येत होत्या, ह्याशिवाय इंग्रजीचें उत्तमपैकीं शिक्षण बऱ्याच जणींचें झालें होतें. हिब्रू व ग्रीकहि कित्येकींना येत होतें. त्या छापखान्यांत ह्या भाषेंत टाइपांची जुळणी करीत. तेव्हां अशा सात भाषांत जर त्यांनीं एकसमयावच्छेदेंकरून प्रार्थना करण्यास सुरुवात केली तर त्यांना व परमेश्वरालाच फक्त तें कळणें शक्य होतें. इतरांना तो एक मोठा गोंगाट वाटला तर नवल नाहीं. कॅनन बुचरचें मनोरमाबाईंबरोबर अशा एका प्रार्थनेनंतर जें बोलणें झालें त्यावरून अगदीं स्पष्ट होतें कीं बुचर साहेबांना मनोरमाबाईंचें बोलणें उमगलें नाहीं तरी खुद्द मनोरमाबाईंना आपण काय बोलत होतों हें पूर्णपणें कळत होतें. आपल्या मायभाषेंत परमेश्वराशीं बोलणाराला तें बोलणें कसें उमगत होतें हें "जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे."

आणि बाईंनीं पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याचा जो अर्थ लावला त्याला संत पौलाच्या एकाच वाक्यानें संपूर्ण पाठिंबा मिळतो. पौल म्हणतो:

"मी मनुष्यांच्या इतकेंच काय पण देवदूतांच्या जिव्हांनीं बोललों परंतु माझ्याठायीं प्रीति नसली तर मी वाजणारी थाळी किंवा झणझणणारी झांज आहें."[2]

---

१. बायबलः करिंथकरांस पहिलें पत्रः १४:२७ व २८.

२. बायबल : तेंच पुस्तक : १३ : १.

## २८ प्रस्थान

आयुष्यांतील अनेक संस्मरणीय प्रसंगांप्रमाणें बाईंच्या चरित्रांत त्यांचा मृत्यूहि एक संस्मरणीय प्रसंग ठरला. तो प्रसंग नजरेसमोरून सरकत असतां टिळकांच्या एका अभंगाची आठवण होते.

*जिंकुन मरणाला मरणाला । जीव कुडींतुन गेला ॥*
*अक्षयतेचा अधिकारी हा । इकडुन तिकडे गेला ॥*
*विश्वासाचा जिना चढोनी । दिव्य मंदिरीं शिरला ॥*
*मेला नाहीं निजला क्षणभर । पुनः सुखानें उठला ॥*
*प्रभुनें ह्याला किती दयेनें । अजरामर हो केला ॥*

नऊच महिन्यांपूर्वीं पंडिता रमाबाईंची आवडती एकुलती एक कन्या मनोरमाबाई देवाघरीं गेली होती. त्या प्रसंगीं रमाबाईंच्या परमेश्वरावरील अत्युत्कट श्रद्धेचें प्रात्यक्षिक पाहण्यास मिळालें. त्यांच्याकडे श्री. रमाबाईसाहेब रानडे त्यांचें समाधान करायाला केडगांवला गेल्या होत्या. अगदीं आरंभाला त्यांची पुष्कळ मैत्री होती. मिस् हरफर्डजवळ इंग्रजीचा व बायबलचा अभ्यास त्या दोघींनीं बरोबर केला होता. आर्य महिला समाजाच्या बाबतींत दोघींनीं खांद्याला खांदा लावूनच काम केलें. त्यानंतर रमाबाई परदेशीं जाऊन आल्या. परंतु न्या. रानडे फिरतीवर व हायकोर्टाच्या कामानिमित्त मुंबईस असल्यामुळें रमाबाईंचा व पंडिताबाईंचा तितकासा संबंध आला नाहीं. पुढें पंडिताबाईंचेंच पुण्याहून स्थलांतर झालें. परंतु रमाबाई रानड्यांना पंडिताबाईंबद्दल पूर्वीं वाटणारें प्रेम कायम होतें. त्यामुळें मनोरमाबाईंच्या निधनाची बातमी लागतांच त्या केडगांवीं पंडिताबाईंना भेटण्यासाठीं गेल्या व दोनतीन दिवस त्यांच्याबरोबर राहिल्या, त्यांनीं अवलोकिलेली पंडिता रमाबाईंची शांत वृत्ति, त्यांचा परमे-

श्वरी योजनेवरील विश्वास व त्याच्याठायीं असलेली त्यांची श्रद्धा पाहून श्री. रमाबाई रानडे चकितच झाल्या. केडगांवहून परत जातांना रमाबाईसाहेब रानडे म्हणाल्या 'बाईंनीं तशाहि मनःस्थितींत मला शुभवर्तमानाचा उपदेश केला.' बाईंना त्या प्रसंगीं हजारों दुखवट्याचीं पत्रें आलीं त्या सर्वांना बाईंनीं एकच उत्तर दिलें, "येशूनें म्हटलें आहे, जीवन व पुनरुत्थान मी आहें."

केडगांव येथील एक सदस्य श्री. भीमाबाई हरिश्चंद्र लिहितात : रमाबाईंना दोन वर्षांपासून हाडी ताप येत होता. दिवसें दिवस त्यांचें जेवण कमी कमी होत होतें. अशक्तपणा वाढत होता. परंतु पवित्रशास्त्राचें भाषांतर पुरें होईपर्यंत देवबापानें आपल्याला राहूं द्यावें असें त्यांनीं आग्रहानें मागितलें व तसेंच झालें.'

'आम्ही सर्व नेहमीं आनंदी असूं ह्याचें कारण प्रार्थना व देवाचें वचन.' मनोरमाबई गेल्या तेव्हां पुण्याहून आनंदीबाई कर्वे, रमाबाई रानडे अशांसारख्या पुष्कळ हिंदु स्त्रिया त्यांचें समाधान करायला आल्या, पण सर्वांना आईचें एकच सांगणें होतें, "यहोवानें दिलें यहोवानें परत घेतलें, त्याचें नांव धन्यवादित असो."

त्या वेळच्या हजर असलेल्या श्री. दयाबाई गुजर लिहितात :

"आमच्या प्रिय ताई मनोरमाबाई दिगंवत झाल्यानंतर पांच सहा महिन्यांनीं आईनें आम्हां हायस्कूलच्या मुलींना त्यांच्या खोलीजवळ जी पाहुण्यांची खोली आहे तेथें बोलावलें. आम्ही सर्व दुपारीं चार वाजतां तेथें गोळा झालों व सर्वजणी विचारांत पडलों कीं, आईनें कां बोलावलें. इतक्यांत आई आल्या. आम्ही सर्वच उभ्या राहिलों. आई म्हणाल्या, बसा खालीं. आम्ही बसल्यावर आईंनीं बोलायला सुरुवात केली. ताईच्या जाण्यामुळें आम्ही किती दुःखी झालों होतों हें आईंना ठाऊक होतें. कारण रोज पहाटे उठून कामाला सुरुवात करण्याच्या आधीं आम्ही गळा काढून रडत असूं. आई तें आठवून म्हणाल्या, मुलींनो, तुम्हांला ठाऊक आहे तुमची ताई, तुमची मोठी बहिण हिला देवानें आपल्याजवळ बोलाविलें आहे, समजा प्रभू तसाच मलाहि बोलवील"—हें वाक्य अर्धवट राहिलें. आम्ही सर्वांनींच गळा काढला व ओरडलों, "आई, तुम्ही तरी जाऊं नका, आम्हांला पुनः अनाथ सोडून जाऊं नका." आई

१. यहोवा = परमेश्वर

म्हणाल्या रडूं नका, देवाची इच्छा असेल तसें होईल. माझ्यामागें मिस् हेस्टी (म्हणजे सुंद्रामावशी) आहेत. त्या तुमच्यावर प्रेम करतात, त्यांना मीं माझ्या-जागीं तुमची काळजी घेण्यासाठीं नेमलें आहे. माझ्यामागून त्या सर्व पाहातील. पण तुम्ही मुली त्यांचें ऐकत जा. त्यांच्या आज्ञा पाळीत जा. त्यांना मदत करा.

मनोरमाबाई मिरजेला जायला निघाल्या होत्या, जाण्याच्या आधीं किंचित्काल त्यांचा डोळा लागला होता, इतक्यांत पंडिताबाई त्यांच्याजवळ येऊन उभ्या राहिल्या. त्यांनीं प्रार्थना केली: "प्रभो तुझी इच्छा, तुला काय करायाचें तें तूं कर." परमेश्वराच्या योजनेवर केवढा हा विश्वास! एका चित्रकारानें विश्वासाचें एक चित्र काढलें आहे, नायगाराच्या धबधब्यावर झाडाची एक फांदी लोंबत आहे, त्या फांदीवर बसून जर कोणी खालीं पाहिलें तर त्याला भोंवळ येईल एवढें खोल खालीं धबधब्याचें पाणी उडी घेत आहे. त्या फांदीवर एक पक्ष्याचें घरटें आहे, त्यांत पिलें आहेत, तीं मात्र शांतपणें झोपीं गेलीं आहेत! खऱ्या शांतीचें हें खरें चित्रण. पिलें शांतपणें झोंपलीं आहेत कारण त्यांचा आपल्या आईवर विश्वास आहे. तसाच विश्वास पंडिताबाईंचा आपला परात्पर पिता जो परमेश्वर, त्याच्यावर होता. त्यांनीं प्रार्थना नैराश्यानें केली नव्हती, तर श्रद्धा गीताचे ते आशापूर्ण स्वर होते.

"प्रार्थना पित्याची मांडीच केवळ। चढे बाळ वर लडीवाळें॥" असें प्रार्थनेचें स्वरूप असल्यानें ती करणें हें परमेश्वर पित्याला व भक्ताला अशा दोघांनाहि आनंददायी असते. तुझ्या इच्छेप्रमाणें होवो कारण तुझ्या योजना मला इतक्या अनाकलनीय आहेत, त्या इतक्या अगाध आहेत, निरनिराळ्या योजनांचें तूं इतकें बेमालूम जाळें विणलें आहेस कीं त्यांतील माझ्या आयुष्यां-तला एक क्षुद्र धागा माझ्यासाठीं विसकटून टाक अशी प्रार्थना करणें हें तुझ्या योजनेवर अविश्वास दाखविण्यासारखें आहे एवढेंच केवळ नाहीं तर स्वार्थ-वृत्तीचें द्योतक आहे.

अशी वृत्ति असल्यामुळें बाईंना आपल्या मुलीबद्दलचें दुःख सहज दिव्यत्वांत विलीन करतां आलें. बाई मनोरमाबाईंच्या नंतर नऊच महिन्यांत वारल्या कारण त्यांनीं मुलीच्या मृत्यूची हाय खाल्ली असें कित्येक म्हणतात पण तें अजिबात खोटें आहे. खरें पाहातां बाईच मनोरमाबाईंच्या आधीं जावयाच्या. केडगांवला सध्यां बाईंच्या बायबल कामावर असलेले रे. फ्रेड

शिल्यांडर तेथील जुन्या जुन्या स्त्रियांना विचारून पूर्ण चौकशी करून लिहितात:

'Ramabai has been growing frail and not too well (low fever) even before Tai's death. She slaved night and day to complete her translation and prayed to God to spare her till she could complete it and she lived only ten days after finishing the Bible translation.'

रमाबाईंची परमेश्वराजवळ एकसारखी प्रार्थना चालली होती कीं माझें हातांतलें काम संपेपर्यंत मला बोलावूं नको. हाडी तापामुळें, वृद्धपणामुळें व व शक्ति पलीकडे त्या करीत असलेल्या श्रमामुळें मनोरमाबाईच्या नंतर त्यांना नऊ महिन्यांनीं आलेला मृत्यु तसें पाहतां नऊ महिने आधींच यावयाचा. पण नाहीं. त्यांना मृत्यु इतक्यांत नको होता. त्यांनीं परमेश्वराजवळ हट्ट घरला होता कीं माझें हातांतलें काम पुरें होईपर्यंत मला बोलावूं नको. आणि परमेश्वरानें त्यांचा हा हट्ट पुरविला. भीष्माचार्यांप्रमाणें त्यांना इच्छा मरण प्राप्त झालें. आपल्या हातांतील बायबलचें शेवटलें प्रूफ वाचून खालीं ठेवल्यानंतर त्यांना मृत्यु आला. मनोरमाबाईसाठीं त्यांनीं हाय खाल्ली म्हणून त्यांना मृत्यु आला असें नव्हे. मनोरमाबाई गेल्या त्यावेळेस 'यहोवानें दिलें, यहोवानें परत घेतलें. त्याचें नाम धन्यवादित असो', असें त्या ज्याला त्याला अगदीं मनापासून सांगून दुसऱ्यांचेंच समाधान करीत होत्या.

श्री. आनंदराव श्रीखंडे ह्यांना बाईंच्या मृत्यूच्या वेळची प्रत्यक्ष माहिती मिळाली ती पुढें दिली आहे. श्री आदंदराव ख्रिस्ती नाहींत त्यामुळें त्यांचें लिखाण पूर्वग्रहदूषित असण्याचा संभव कमी.

'४ एप्रिल १९२२ चा दिवस. पंडिताबाईंना भाषांतरासाठीं घेतलेल्या बायबलचें शेवटचें प्रूफ हातावेगळें करावयाचें होतें. तैनातीस असलेल्या मुलीस त्या म्हणाल्या, 'हें बघ, आज माझी खोली धुऊन स्वच्छ करा, सर्व सामान काढून टाका, माझें अंथरूण झाडून साफ करा, पांघरण्याची पांढरी दुलई ती सुद्धां झटकून पायालगत ठेवा, कंदिल साफ करून ठेवा, अंघोळीसाठीं गंगाळांत पाणी भरून ठेवा'—इत्यादि आदेश देऊन झाल्यावर त्यांनीं हातालगत ठेवलेल्या प्राण्यांना चुचकारलें. बाई आपल्याजवळ ससे, कबुतरें, चिमण्या, पोपट, मांजरी, हरिणी, कोंकरें बाळगीत. पांढरें शुभ्र कुत्रेंहि

पायाशीं पडून असे. प्रुफें तपासतांना जेव्हां थकवा वाटे तेव्हां सर्व प्राण्यांना त्या गोंजारीत. वर दिल्याप्रमाणें आदेश ऐकून मुलीला आश्चर्य वाटलें. असें कधींच बजावून सांगत नसत तर आजच कां असें, असा प्रश्न पडला. शेवटचें प्रुफ तपाशीत असतांना एक मुलगी जवळ येऊन त्यांच्या हातावर हात ठेऊन कानांत कांहीं सांगूं लागली. (बाईंना कमी ऐकूं येत असे) बाईंचा हात गरम लागतांच ती मनांत चरकली व इतर मुलींना सांगूं लागली. पण करणार काय? बाईंना औषध घ्या म्हणून म्हणण्याची सोय नव्हती कारण त्यांनीं औषध घेण्याचें अथवा घरगुती उपचारहि करण्याचें केव्हांच सोडून दिलें होतें. एक प्रभु येशूशिवाय त्या कोणावर विसंबून रहात नसत.

बाईंनीं शेवटचें प्रुफ तपासून हातावेगळें करून छापखान्यांत पाठविलें व त्या स्वतःच्या खोलींत गेल्या. अंधार झालाच होता. अंघोळ करून त्यांनीं प्रभूची प्रार्थना केली व त्या अंथरुणावर आडव्या झाल्या. मुलीला सांगितलें कीं, खाण्यापिण्यासाठीं कोणी उठवूं नका. नेहमीं तेवत असलेला कंदीलहि मालविला गेला. त्यांच्या तैनातींतील मुलगी त्यांच्या जवळच ज़रा अंतरावर निजली. हिचें काम म्हणजे बाईंनीं जरा चुळबुळ केली तर हिनें हळूंच उठून बसावें व पहावें. या रात्रीं बाईंनीं मुळींच हालचाल केली नाहीं. मध्यरात्र उलटून गेल्यावर या मुलीनें हळूच उठून बाईंच्या अंथरुणाशीं जाऊन कानोसा घेतला. श्वासोच्छ्वास सुद्धां ऐकूं आला नाहीं. मुलगी घाबरली, बाहेर येऊन शेजारच्या खोलींतून तिनें आणखी दोघीतिघींना खोलींत आणलें. त्यांनींहि कानोसा घेतला व सर्व मुली तोंडाला पदर लावून हुंदके देऊं लागल्या! बाईंनीं हा नश्वर देह इहलोकीं ठेऊन परलोकीं केव्हांच प्रयाण केलें होतें तें समजलें सुद्धां नाहीं.'

त्या शेवटल्या प्रसंगीं हजर असलेल्या नानूबाई लिहितात :

'शेवटीं शेवटीं आई बऱ्याच आजारी होत्या. धोबी घाटावर जाऊन पाणी आणायचें तर एऱ्हवी मुलींना त्यांच्या खोलीवरूनच जावें लागे. मुलींचा त्यांना त्रास होऊं म्हणून त्यांचा रस्ता बदलला. आईंच्या हें लवकरच ध्यानांत आलें. त्यांनीं विचारलें, माझ्या मुली कशा दिसत नाहींत? तेव्हां त्यांना कोणी सांगितलें कीं त्यांचा तुम्हांला त्रास होऊं नये म्हणून त्या दुसऱ्या रस्त्यानें जातात. आईंनीं तें तावडतोब थांबविलें व म्हटलें, माझ्या मुली

मला पाहायला पाहिजेत, त्यांना माझ्या दृष्टिआड करूं नका. मी आजारी असलें तरी मला माझ्या मुली माझ्या डोळ्यापुढें हव्यात.

'आई दोनतीन दिवसांनीं जाणार तशा त्या सर्व मुलींना भेटल्या. दारांत एक दोरी बांधली व तेथें आंत पडून राहिल्या. दारांतून एक एक मुलगी सरकत पुढें जायची तसा त्यांनीं प्रत्येक मुलीचा हातानें मुका घेतला.'

१४ व्या प्रकरणांत सांगितलेंच आहे, कीं आपल्या मुलीचा त्यांनीं मुका घेतलेला पाहून दुसऱ्या विधवा मुलींना आपणास असें आंजारायाला गोंजारायला कोणी नाहीं हें आठवून हिरमुसल्यासारखें वाटे. बाईंच्या जेव्हां हें लक्षांत आलें तेव्हां त्या सर्वच मुलींचे मुके घेऊं लागल्या. आतां तर त्या साऱ्याजणी मोठ्या बाया झाल्या होत्या तरी बाईंनीं आपलेपणा दाखविण्याची ती रीत कायम ठेवली होती. लहानापासून थोरापर्यंत केडगांवच्या सर्व रहिवासी स्त्रियांचें व मुलांचें त्या चुंबन घ्यायच्या. शेवटीं सर्वांची रजा घेण्याची वेळ आली तेव्हां आपल्या सर्व कन्यकांना तसाच निरोप द्यायला हवा होता पण एक तर बाई अतिशय अशक्त झाल्या होत्या व कन्यकांची संख्या नाहीं नाहीं तरी १७०० किंवा १८०० इतकी मोठी. तेव्हां त्यांनीं मुलगी बिछान्या-जवळ आली कीं तिच्याकडे पाहून आपला हात तोंडाजवळ नेऊन हाताचा मुका घेऊन तिच्यावरील आपलें प्रेम व्यक्त करून दाखविलें.

दयाबाई गुजर लिहितात :

'तारीख ४ एप्रिल रोजीं आम्हांला कळलें होतें कीं आईंना बरें नाहीं, ताप आलेला आहे. रात्रीं १० वाजतां मी माझ्या अक्कांना म्हटलें, आईंना बरें नाहीं, चला आपण त्यांना पाहून येऊं, नंतर झोंपूं. आम्ही सहा जणी गेलों, काळोख निबिड पडला होता. आम्ही कंदील घेऊन गेलों होतों. दिवाण-खान्याच्या पायऱ्यांवर आम्ही जाऊन बसलों. कंदिलाचा उजेड बाईंनीं पाहूं नये म्हणून वात बारीक करून ठेवली. आई आपल्या खोलीच्या दारांत पडवीवर खाट टाकून तीवर बसल्या होत्या. त्यांच्याजवळ एक बाई बोलत बसली होती. त्याच वेळीं त्यांचें लक्ष आमच्या कंदिलाकडे गेलें व त्या उठून आमच्या जवळ आल्या. त्यांनीं विचारलें, 'कोण बसलां आहां?' मीं म्हटलें, 'मी आहें.' आई म्हणाल्या, 'ताईच्या अक्का का?' मीं म्हणालें 'होय आई' तशा त्या म्हणाल्या 'जा, जाऊन निजा, मी बरी आहें.' आईंची ती

गोड वाणी ऐकून आम्हांला धीर आला व आम्ही समाधानानें उठून निजायला गेलों. अगदीं पहांटे एक बाई ओरडत आली, अक्का ऊठ ऊठ, आई चालल्या. एकदम दचकून उठलें व धावतच आईंच्या खोलींत गेलें. त्यांचा हात हातांत धरून मी म्हटलें 'अरे देवा, माझी आई घेऊं नको, आम्हांवर दया कर,' पण प्रभूनें आमची प्रार्थना ऐकली नाहीं. आम्ही आठदहा जणी मोठमोठ्यानें रडूं लागलों. आईंचा हात गरम लागत होता. एका मुलीला घेऊन मी मिस् हेस्टीकडे गेलें. तीन हाका मारल्या. मावशी म्हणाल्या, तूं कोण आहेस? तुला काय पाहिजे? मीं म्हटलें, तुम्ही पाहिजे, उठा आधीं. पायरीवर त्या येतांच त्यांचे हात घट्ट पकडून मी रडूं लागलें, 'मावशी, आई गेल्या.' माझें हें बोलणें ऐकतांच त्या धावत धावत आईंच्या खोलीकडे गेल्या. गुडघे टेकून प्रार्थना करावी तसे आईंचे हात जोडलेले होते व गुडघे पुढें होते. मावशीनें त्यांना नीट निजविलें. ही बातमी पाहातां पाहतां चहूंकडे पसरली. लहान मुली, मोठ्या बाया, साऱ्या साऱ्या मोठ्यानें गळा काढून रडूं लागल्या. मुक्ती मिशन मधून तो मोठा आक्रोश बाहेर चहूंकडे ऐकूं गेला. अजून तांबडें फुटलें नव्हतें तों खेड्यापाड्यांतील हिंदु लोक दाराशीं येऊन उभे राहिले व तेहि मोठमोठ्यानें आक्रोश करूं लागले. कांहीं बाया जमिनीवर लोळूं लागल्या, चहूंकडे एकाच तऱ्हेचे उद्‌गार ऐकूं येत होते, 'अरेरे देवा, पुन्हां तूं आम्हांला अनाथ केलंस!' जसजसा दिवस चढूं लागला तसतशी आसपासच्या खेड्यांतील लोकांची गर्दी वाढूं लागली. मिस् फुलरनीं आणि मीं स्टेशनवर जाऊन ताबडतोब पुणें, मुंबई, गुलबर्गा, अहमदनगर इत्यादि ठिकाणीं तारा केल्या होत्या, त्यामुळें बाहेरगांवची मंडळीहि येऊं लागली. गांवची बाजारपेठ व्यापाऱ्यांनीं बंद ठेवली, कोणी कोणी कपड्यांचीं ठाणें आणून दिलीं. शिकलेले पांढरपेशे हिंदू लोक बाईंच्या पायां पडून जात. एका पेटींत बाईंचें शव ठेऊन ती पेटी देवळांत नेऊन ठेवली होती. बाईंचें अखेरचें दर्शन घ्यायला लोकांची एकसारखी रीघ लागली होती. आम्हांला तर तहानभूक राहिली नाहीं, कोणी पोटांत अन्नाचा एक कण घेतला नाहीं कीं तोंडें धुण्याचीहि कोणाला शुद्ध नव्हती.

ब्रुअर साहेब कसेतरी एकाएकीं उठून आले, त्यांना आमचा निरोप पोंचण्याच्या आधींच ते यावयाला निघाले होते, म्हणूं लागले, "आईंनीं मला येऊन

सांगितलें कीं, 'जा, मुक्ति उघडी पडली.' मी उठलों आणि आलों."

दुसऱ्या दिवसापर्यंत शव ठेवलें होतें. सुंद्रामावशींनीं पुष्कळसें वर्फ आणविलें होतें. त्यामुळें तें ठेवतां आलें व पुष्कळ दूर दूरच्या लोकांना त्यांचें तोंड पाहातां आलें. आम्ही एकसारख्या पेटीजवळ बसूनच होतों.

देवळांत शेवटची भक्ति करण्याचा प्रयत्न केला पण ब्रुअर साहेबांनीं बोलायला तोंड उघडावें, एखादा शब्द उच्चारावा कीं मुलींनीं रडण्यास सुरुवात करावी. त्यांचा हुंदका थांबेपर्यंत साहेब बसत, पुनः बोलण्याचा प्रयत्न करीत, पुनः त्यांच्या तोंडून एखादा शब्द बाहेर पडला, कीं पुनः हुंदक्यांना सुरुवात होई व भाषण बंद पडे, किंवा सुरूच होत नसे. असें सहासात वेळ झाल्यावर भाषण करण्याचा नादच सोडून देण्यांत आला.'

अहमदनगरचे वडील मिशनरी रे. डॉ. आर. ए. ह्यूम, 'अमेरिकन रमाबाई असोसिएशन'चे भारतांतील प्रतिनिधि होते. रे. डब्ल्यू. डब्ल्यू. ब्रूअर हे केडगांवचे आचार्य होते. ह्या दोघांनीं मिळून उपासना चालविली. शवपेटिका छापखान्यांत काम करणाऱ्या मुलींनीं आपल्या खांद्यावर वाहून कबरस्थानांत आणली. मुलींची विनंति होती कीं कोणा पुरुषानें ती वाहूं नये व त्यांच्या इच्छेला मान देण्यांत आला. इतका वेळ हंबरडे फोडणाऱ्या स्त्रियांनीं आतां मात्र अत्यंत गंभीरपणा धारण केला. खुद्द बाईंना जर ह्या प्रेतयात्रेंत भाग घेतां आला असता तर त्या जशा वागल्या असत्या तशा आतां त्यांच्या ह्या प्रिय कन्यका वागल्या. 'माझी इच्छा नको तर तुझ्या इच्छेप्रमाणें होऊं दे,' अशी बाईंची प्रार्थना असे. ती जणूं काय त्यांना आतां आठवली. दोन हजार माणसें प्रेतयात्रेंत होतीं. दोन हजार माणसें आपल्या प्रिय आईला दोन पावलें पोंचवायला चाललीं होतीं. अत्यंत गंभीर प्रसंग होता तो. खिस्ती शवपेटिका नेहमीं काळ्या रंगानें मढवितात. पण बाईंच्या पेटीला पांढरें कापड गुंडाळलें होतें. त्यावर "कारण करणा वाजेल, मेलेले ते अविनाशी असे उठविले जातील, आणि आपण बदलून जाऊं," हें बायबलमधील वाक्य लिहिलें होतें. पेटीवर "पंडिता रमाबाई मेधावी—जन्म २३ एप्रिल १८५८, निद्रा ५ एप्रिल १९२२" अशीं अक्षरें कोरलेली एक पट्टी बसविली होती.

बाई गेल्या. त्या राहात होत्या ती खोली, त्या वापरीत असलेला वस्तुसंग्रह अद्याप होतीं तशींच पाहण्यास मिळतात.

ख्रिस्ती व ख्रिस्तीतर लोकांनीं पंडिता रमाबाईच्या स्मरणार्थ अनेक दुखवटयाच्या सभा भरविल्या. त्यांतील मुंबईच्या जाहीर सभेंत सरोजिनी नायडू म्हणाल्या,

"हिंदु संतमालिकेंत जिचें नांव प्रविष्ट करण्यांत येईल अशी पहिली ख्रिस्ती व्यक्ति.[१]"

---

[१] "In Bombay at a public memorial meeting Mrs. Sarojini Naidu a lady who, as a poet and nationalist leader is notable among the daughters of the New India, laid claim to her in behalf of Hinduism as 'the first Christian to be enrolled in the calendar of saints.' She may concede the claim in the sense that this saint brought the 'glory and honour' of the Hindu spiritual heritage into the Christian Church."—Dr. MacNicol's Pandita Ramabai.

## परिशिष्ट : १

# रमाबाईंच्या चरित्रांतील कांहीं संस्मरणीय तारखा

१७९६ अनंतशास्त्रींचा जन्म

१८४० लक्ष्मीबाईंचा पैठण मुक्कामीं अनंतशास्त्रींबरोबर वीवाह.

१८५२ ते १८५७ च्या दरम्यान बिपिन बिहारीदास मेधावींचा जन्म.

१८५८ एप्रिल : २३ रमाबाईंचा जन्म.

१८७३ मद्रास इलाख्यांतील दुष्काळाचा प्रारंभ : दुष्काळांत डोंगरे कुटुंब

१८७४ जुलै : अनंतशास्त्रींचा मृत्यु.

१८७४ ऑगस्ट : लक्ष्मीबाईंचा मृत्यु.

१८७४ च्या डिसेंबरांत अगर १८७५ च्या सुरवातीस रमाबाईंची वडील बहीण कृष्णाबाई यांचा मृत्यु.

१८७६-७७ मद्रास इलाख्यांतील दुष्काळ रौद्र स्वरूप धारण करतो. ५० लाख लोक उपासमारीनें मृत्यु-मुखीं पडतात.

१८७६–७७ बिपीन बिहारीदास एम्. ए. व बी. एल्. होतात.

१८७८ श्रीनिवासशास्त्री रमाबाईंसह कलकत्त्यास पोंचतात.

१८८० मे ८ श्रीनिवासशास्त्रींचा डाक्का येथें मृत्यु.

१८८० (बहुतेक १३ जून) रमाबाईंचा मेधावींशीं विवाह.

१८८१ एप्रिल १६ मनोरमाबाईंचा जन्म.

१८८२ फेब्रुआरी ४ : मेधावींचा मृत्यु.

१८८२ मे ३१ रमाबाईंचें पुण्यांत आगमन.

१८८२ मे १ : पुणें. आर्यमहिला समाजाची स्थापना त्याच वर्षी ऑक्टोबर अहमदनगर, नोव्हेंबर सोलापूर व डिसेंबर ठाणें येथें आर्य महिला समाजाची स्थापना. नोव्हेंबर ३० रमाबाईंचें मुंबईंत आगमन व आर्यमहिला समाजाची स्थापना.

१८८३ एप्रिल २० : इंग्लंडला प्रयाण.

१८८३ सप्टेंबर २९ : रमाबाईंचा व मनोरमाबाईंचा वॉंटेज, इंग्लंड येथें बाप्तिस्मा.

१८८६ मार्च ६ : इंग्लंडहून अमेरिकेस प्रयाण.

१८८६ मार्च ११ : डॉ. आनंदीबाईंचा पदवीदान समारंभ.

१८८६ मार्च १२ : रमाबाई व मनोरमाबाई ह्यांचा अमेरिकेंत स्वागत समारंभ.

१८८६ ऑक्टोबर ९ : डॉ. आनंदीबाई अमेरिकेचा किनारा सोडतात.

१८८७ फेब्रुआरी २६ : डॉ. आनंदीबाईंचा पुणें येथें मृत्यु.

१८८६ मार्च ते १८८८ नोव्हेंबर रमाबाईचें अमेरिकेंतील वास्तव्य.

१८८७ जून १: 'हाय कास्ट हिंदु ऊमन' पुतस्क तयार: १८८८ च्या प्रारंभीं प्रसिद्धी.

१८८७ डिसेंबर १३: रमाबाई असोसिएशनची स्थापना.

१८८८ नोव्हेंबर: रमाबाई अमेरिका सोडतात.

१८८९ फेब्रुआरी: रमाबाईचें कलकत्त्यास आगमन.

१८८९ मार्च: ११ मुंबईस शारदासदनाची स्थापना.

१८८९ जून डीन डॉ. ब्रॉडले ह्यांचा मृत्यु

१८८९ डिसेंबर: : 'युनायटेड स्टेट्स्ची लोकस्थिति व प्रवासवृत्त': मराठी प्रकाशन.

१८९० नोव्हेंबर: शारदासदन पुण्यास नेण्यांत येतें.

१८९१ जुलै २६: शारदासदनच्या सत्तेच्या इमारतीचें उद्‌घाटन.

१८९६ मध्यप्रदेशांत दुष्काळ-दुष्काळी मुली येतात.

१८९८ जानेवारी ते ऑगस्ट: रमाबाईची अमेरिकेची दुसरी फेरी.

१८९८ मार्च: रमाबाई असोसिएशन १० वर्षें पुरी झाल्यानें बंद व 'अमेरिकन रमाबाई असोसिएशनची' स्थापना.

१८९८ सप्टेंबर २४: मुक्ति मिशन केडगांव उद्‌घाटन.

१८९९ सप्टेंबर २०: मुक्तींतील उपासनालय.

१९०० गुजराथेंतील दुष्काळ. अधिक मुली येतात.

१९०२ मुलांसाठीं काम.

१९०४ बायबलच्या भाषांतराला आरंभ.

१९०६ संजीवन.

१९१० मिस् एब्रॅम व दादासाहेब गद्रे ह्यांचा मृत्यु.

१९१३ सप्टेंबर २९: गुलबर्ग्याला शाळा. शान्तिसदन

१९१७ मनोरमाबाई बी. ए. होतात.

१९१९ रमाबाईना कैसर-ई-हिंद सुवर्ण पदक मिळते.


१९२१ जुलै २४: मनोरमाबाईंचा मृत्यु

१९२२ एप्रिल ५: रमाबाईंचा मृत्यु.

● ● ●

## परिशिष्ट : २

# रमाबाईंचा पितृकुल वंशवृक्ष




१. डोंगरे कुलवृत्तान्त व श्री. धैसास ह्यांनीं पुरविलेल्या माहितीवरून.

२. श्री. मेधावी ह्यांचें कुलनाम दास. श्री. बिपिन बाबू दास न लावतां मेधावी असें आडनांव लावीत. ह्याबद्दल शंका विचारतां श्री. हेमेन्द्रनाथ दास कळवितात.

'Yes, Bipin Babu used to sign his name as Bipin Behary *Medhavi*. The word Medhavi means 'talented'. No doubt, Bipin Babu himself was a talented person but he himself would not take that name because of that. As to the fact that Medhavi became the family name we assume that somebody in the family must have been a very talented person, and since that time the descendants began to be known as Medhavis. Just as it happens in the case of the name Pandt.'

## पंडिता रमाबाईंचा मातृकुल वंशवृक्ष

श्री. नी. दा. अभ्यंकर, पुणें, ह्यांनीं पुरविलेल्या माहितीवरून; त्र्यंबकचे क्षेत्रोपाध्याय श्री. गजानन ऊर्फ रामचंद्र गोविंद घैसास यांनीं पुरविलेली माहितीहि श्री. अभ्यंकरांच्या माहितीशीं जुळते.

पंडिता रमाबाई आपल्या इंग्लंडच्या प्रवासवृत्तांत म्हणतात : दुसरे बाजीराव पेशवे हे आमच्या जातीचे राजे असून नात्यानें माझे मावसे होते. (पृष्ठ १४.) श्री. अभ्यंकरांच्या माहितीप्रमाणें बाजीरावांच्या ११ बायकांपैकीं ७ वी १८१८ नंतर ब्रह्मावर्तास गेल्यावर केली होती. तिचें नांव सत्यभामा असून ती एका अभ्यंकराची मुलगी होती. अभ्यंकराचे मूळ पुरुष रामचंद्रभट हे कोंकणांतील मालगुंडहून प्रथम देशावर आले. पुढें हें कुटुंब वाईस स्थायिक झालें.

रामचंद्रभट

१ बाळकृष्ण २ काशिनाथ ३ महादेव

(२ काशिनाथ यांचे मुलगे:) १ जनार्दन २ सदाशिव ३ गोविंद ४ विष्णु ५ रघुनाथ ६ पांडुरंग ७ भास्कर

[ह्या ७ भावांपैकीं पहिले सहा वाईस स्थाईक झाले. ७ वे साताऱ्याला गेले.]

(४ विष्णु यांचे मुलगे:) १ काशिनाथ २ नारायण ३ विश्वनाथ ४ बाळंभट

(१ काशिनाथ यांचे मुलगे:) १ सखाराम २ लक्ष्मण ३ महादेव (माधव)

(३ महादेव (माधव) यांच्या मुली:) लक्ष्मी ऊर्फ अंबाबाई, मुलगी (मावशी)

लक्ष्मी ऊर्फ अंबाबाई — पंडिता रमाबाई — मनोरमाबाई

मुलगी (मावशी) — मथुमावशी सोमण

(मुलगी (मावशी) व मथुमावशी सोमण:) *

शिवाय १ दत्तात्रय २ गोपाळ ३ कृष्णा | ४ रामचंद्र हे मुलगे परंतु ते लक्ष्मीहून वडील किंवा धाकटे हें कळण्यास माग नाहीं. बहुतेक धाकटे असावे.]

(२ गोपाळ यांचा मुलगा:) वसंत

---

* ह्या दोघी मायलेकी पंडिता रमाबाईकडे केडगांवला आपलें सोंवळें ओवळें संभाळून होत्या. त्यांचा उल्लेख रमाबाईकृत मराठी बायबल ह्या प्रकरणांत आला आहे. मथुमावशी सोमण ह्या पुढें ख्रिस्ती झाल्या.

## श्री बिपिन बिहारीदास मेधावी ह्यांच्या वंशवृक्षाचा कांहीं भाग

वैष्णवचरण दास अष्टपति (सबजज्ज)

- विष्णुचरणदास अष्टपति
  - नवीन चन्द्र दास
    - नादिया चन्द्र दास
- मुलगी सुभद्रा + माणिक्य रामदास
  - बिपिन बिहारीदास मेधावी + पंडिता रमाबाई
    - मनोरमाबाई
- मुलगी
  - महेन्द्रनाथ दास
    - हेमेन्द्रनाथ दास

● ● ●

### परिशिष्ट : ३

## रमाबाईंचें माहेर व माहेरचे नातेवाईक

[श्री. एम्. लक्ष्मण हरिहर जोशी ह्यांच्या कित्येक पत्रांतून घेतलेले उतारे]

१. रामशास्त्री; रमाबाईंचे वडील सावत्र बंधु; ह्यांना दोन बायका होत्या. पहिलीचें नांव सीताबाई व धाकटीचें नांव मनकर्णिकाबाई. ह्या बायकांना मूलबाळ झालें नाहीं म्हणून रामशास्त्र्यांनीं जवळच्या कुटुंबांतला मुलगा दत्तक घेतला. त्याचें नांव अनंतशास्त्री डोंगरे, (म्हणजे पहिल्या अनंत शास्त्र्यांचे दत्तक नातू) ते वारले आहेत. त्यांची विधवा पत्नी अजून हयात आहे. वय अदमासें ६७ वर्षें, नांव नागी ऊर्फ यमुना. हे अनंतशास्त्री पंतोजींचें काम करीत असत. लहानपणीं वात होऊन दोन्ही पायांनीं ते पांगळे झाले होते. मुलांना ते अक्षराभ्यास शिकवीत. ह्या दुसऱ्या अनंतशास्त्र्यांना पांच मुलगे व चार मुली आहेत. ......वडिलार्जित जमीन जुमला सर्व दुसऱ्या अनंतशास्त्र्यांच्या हयातींत विकला गेला. सध्यां १० मण सुपारी होईल इतकी पोफळीची बाग आहे.

पहिल्या अनंतशास्त्र्यांच्या विद्वत्तेबद्दल त्या वेळच्या म्हैसूर महाराजांनीं देऊं केलेलें मानधन ('पेन्शन') पहिले रामशास्त्री ह्यांच्या हयातीपर्यंत प्रतिवर्षी मिळत असे. परंतु त्यांच्या मरणानंतर तें बंद पडलें. तें पेन्शन कोप्पा तालुका ट्रेझरींतून मिळत असे.

हे पहिले अनंतशास्त्री दानशूर गृहस्थ होते. त्यांनीं सोडलेले धर्म उत्तार आजहि चालतात. उदाहरणार्थ, कार्कळला अनंतशयन देवालयाला पूजाअर्चेकरितां सोडलेला

धर्म, दुर्ग येथील श्री. हरिहरेश्वर देवळाला सोडलेला उत्तार आणि माळ, एडपाडी येथील श्री परशुरामच्या देवळाला सोडलेला उत्तार * हे सर्व धर्म वजा खर्च होऊन बाकीचे सध्यांच्या रामशास्त्रीबंधूना ८० ऐशीं रुपये शिल्लक मिळतात. सगळ्या धर्मादायांना आपली जमीन जबाबदार आहे असें व्यवस्थापत्र पहिल्या रामशास्त्र्यांनीं केलें आहे.

पहिले रामशास्त्री ह्यांना वडिलोपार्जित पुष्कळ जमीन होती. पण ती त्यांच्या हयातींतच त्यांच्या उदारतेमुळें गेली. बाकीची दुसऱ्या अनंतशास्त्र्यांच्या काळीं गेली. दुसऱ्या अनंतशास्त्र्यांचे मुलांपैकीं थोरले दुसरे रामशास्त्री सुपारीच्या बागाईतमध्यें आहेत. लक्ष्मणशास्त्री ह्यांना कार्कळला कटलरीचें दुकान आहे. नागी ऊर्फ यमुना आणि वामन माळमध्यें कॉफी हॉटेल करून आहेत.

२. माळ हें गांवाचें नांव आहे. माळ हेरंजी, माळ एडपाडी, माळ मुल्लूर हे विभाग आहेत. ह्या विभागांत सुपारीच्या बागा आहेत. माळ हें वराह पर्वताच्या पायथ्याशीं वसलेलें सहा[१] मैल लांब असें मोठें गांव आहे. तालुक्याचें ठिकाण कार्कळ आहें. माळापासून कार्कळ बारा मैल दूर आहे. उन्हाळ्यांत कार्कळला मोटर जाते येते. रमाबाईच्या वडिलांचें राहातें स्थळ माळहेरंजी होतें.

रमाबाईचा जन्म गंगामूळमध्येंच झाला. रमाबाई सहा महिन्यांचें मूल असतांच अनंतशास्त्री गंगामूळ सोडून बाहेर पडले. अजमासें १८९६ च्या सुमारास एकदां रमाबाई खुद्द येऊन जन्मभूमीचें दर्शन घेऊन गेल्या. तेथील पवित्र तीर्थामध्यें रमाबाईनीं स्नान केलें नाहीं. केवळ तीर्थप्रोक्षणें केलें असें दुसरे अनंतशास्त्री म्हणत.

गंगामूळला भद्रा नदीच्या उगमाला वराह तीर्थ असें म्हणतात. तुंगानदी तीराला नागतीर्थ असें म्हणतात. प्रतिवर्षीं मार्गशीर्ष बहुळ अमावास्येला पुष्कळ लोक गंगामूळला तीर्थयात्रेसाठीं येतात.

गंगामूळ हें ठिकाण माळहेरंजीपासून ७ मैलांवर दूर आहे. पर्वताच्या शिरोभागीं तुंगा व भद्रा नदीच्या उगमस्थानीं तुंगा नदीच्या तीरीं नागतीर्थ म्हणून ठिकाण आहे. अनंतशास्त्री ह्यांचें मोडकें तोडकें घर तेथें आहे. घराच्या भिंती अजून पडल्या नाहींत. घराच्या मध्यभागीं आणि इकडे तिकडे सर्व झाडें वाढलीं आहेत. देऊळ बांधण्याकरितां अनंतशास्त्री ह्यांनीं करविलेले दगडी खांब तुंगा नदींत पडलेले आहेत

* धर्मादायाकरितां नेमून दिलेली जमीन

१. तिकडे घरें सलग नसून एक घर, मग बाग, मग पुन: घर अशीं असतात म्हणून गांवाची लांबी सहा मैल झाली आहे.

२. रमाबाईनीं हें जाणूनबुजून केलें असणें शक्य वाटत नाहीं. एकतर अनंत शास्त्र्यांचा कांहीं गैरसमज झाला असेल किंवा बाईनीं चार थेंब अहेतुक उडविले असतील. ज्याला 'Compromising' म्हणतां येईल असें कांहीं त्या करीत नसत.

आणि त्यांच्या काळीं लावलेलीं साखरजांबचीं झाडें आणि अळूचीं झाडें, सुगंधी फुलांचीं झाडें अद्याप आहेत. तुंगा आणि भद्रा नद्यांचा शीमोगा शहरापासून दहा मैलांवर कूडली येथें संगम होऊन त्या तुंगभद्रा असें नांव पावतात. माळ जुन्या म्हैसूरच्या सरहद्दीपलीकडे ६ मैलांवर आहे. माळ हें कर्कळ तालुक्यांत असून गंगामूळ हें जुन्या म्हैसूर हद्दींत कोप्पा तालुक्यांत आहे. तें रिझर्व फॉरेस्टमध्यें आहे.

येथील आमची भाषा चित्पावनी आहे. ही भाषा जुनी मराठीच म्हटली तरी चालेल. जशी जुनी कानडी आहे तशी. जुन्या मराठी बखरीमध्यें व जुन्या कागदपत्रांमध्यें पुष्कळ शब्द ह्या भाषेचेच आढळतात. सुमारें ३०० वर्षांपूर्वी रत्नागिरी व गोवें ह्या प्रान्तांतून अनेक महाराष्ट्रीय चित्पावन कुटुंबें इकडे[१] येऊन स्थायिक झालीं. रत्नागिरीमध्यें खेडेगांवात आजहि ही चित्पावनी भाषाच बोलतात असें समजतें. ही भाषा तुळू, कानडी, किंवा कोंकणी लोकांना समजणार नाहीं.

[रमाबाईंना मामी ऊर्फ मनकर्णिकाबाई व रुक्मिणीबाई 'त्यो' म्हणत. हा शब्द कोणत्या भाषेंतील ह्या प्रश्नावर श्री. जोशी म्हणतात.]

'त्यो' हा शब्द बहुमानवाचक आहे. बहुवचनहि आहे. सासूबाईंना किंवा नवऱ्याच्या बहिणीला संबोधण्याचा शब्द आहे. कारण सासूबाईंचें नांव घेऊं नये अशी रूढी आहे. जसें तुळूमध्यें (मामिनाकुळू) म्हणतात तसें.

३. रामशास्त्र्यांच्या सख्ख्या बहिणीचें नांव रुखुमाबाई. नवऱ्याचें नांव शंकरभट्ट मराठे. अनंतशास्त्र्यांनीं सुपारीची बाग जावयाला आंदण देऊन त्यांना घरजावई केलें. रुखुमाबाई ह्या पंडिता रमाबाईंच्या थोरल्या (सावत्र) बहीण होत...शंकरभट ह्यांच्या वंशजांची आर्थिक स्थिति चांगली असून सर्वांना सुपारीच्या बागा आहेत.

● ● ●

१ इकडे म्हणजे दक्षिण कन्नडमध्यें. दक्षिण कन्नड जिल्ह्यांत चित्पावनांची वस्ती अगदीं थोडी असली पाहिजे. उत्तर कन्नडच्या ग्याझेटियरच्या (१८८३) दुसऱ्या भागांत शेवटीं सूची दिलेली आहे तिच्या (Index) मध्यें तर चित्पावन ह्या शब्दाचा पत्ताच नाहीं. परंतु शेतकी वगैरेच्या यादींत "Classes who save" ह्यांची पृष्ठ २४ वर यादी आहे. तींत मात्र शेणवी, सारस्वत, ख्रिश्चन वगैरे यादींत चित्पावन हें नांव आढळतें. ह्यांवरून त्याच्या लगतच असलेल्या दक्षिण कन्नडमध्यें चित्पावनांची वस्ती अगदीं थोडी असावी असें वाटतें.


## परिशिष्ट : ४


# पंडिता रमाबाई व मनोरमाबाई ह्यांच्या जन्मपत्रिका.

(प्रा. म. दा. साठे, एम्. ए.)

**पंडिता रमाबाई :** जन्म २३ एप्रिल १८५८. शालिवाहन शक १७८० 'काल' नाम संवत्सरे, वैशाख शुद्ध १० शुक्रवारीं : प्रातःकालीं म्हणजे ६ वाजून १७ मिनिटांनीं[1] : जन्मस्थल : मंगरूळच्या पश्चिमेस गंगामूळ अरण्यांत.

**सायन कुंडली** २२° अयनांशाप्रमाणें  **निरयन कुंडली**




मघा ४ चरण. सिंह राशि. सायन व निरयन अशा दोन्ही कुंडल्या दिल्या आहेत. सायन कुंडली २२ अंशांनीं सामान्यतः पुढें असते. नवाथ्यांच्या 'जातक संग्रह' पुस्तकांत पृष्ठ ७८ व ७९ वर ह्या सायन पत्रिकेची फोड करून ती आयुष्यांतील घटनेशीं कशी जुळते तें दाखविलें आहे. त्याचा थोडक्यांत सारांश असा :

१. भर्तृस्थानीं तीव्र मंगळ आहे म्हणून भर्तृसुख फारच अल्प मिळालें.

२. पंचमस्थानीं कन्येचा चंद्रमा असल्यानें त्यांना फक्त एका मुलीचें सौख्य लाधलें.

३. शनीच्या नवमांत नेपच्यून असल्यानें धर्मान्तराचा योग आला.

४. बुधाची गुरूशीं युति झाल्यानें विद्वत्ता, संस्कृतांत प्रावीण्य,[1] वक्तृत्व, ग्रंथकर्तृत्व, लेखनचातुर्य आणि समयसूचकता हे गुण उपजत प्राप्त झाले.

५. शुक्र हा लग्नांत उदित झाल्यानें शरीरसौंदर्य चांगलें व प्रकृति निकोप होती.

६. त्यांच्या २६ व्या वर्षी शनिमंगळाचा त्रिकोण झाला म्हणून त्या वर्षी सप्टेंबर १८८३ मध्यें त्या खिस्ती झाल्या.

निरयन कुंडलीवरूनहि असाच निष्कर्ष निघतो.

---


१. त्या दिवशीं सूर्योदय ६ वा. १७ मिनिटांनीं झाला म्हणून हा जन्मकाल घेतला आहे.

## मनोरमाबाई

(कन्या)

जन्म : १६ एप्रिल १८८१ शनवार[1] रात्रीं ८ वाजण्यास १० मिनिटें कमी असतां (शके १८०३ वर्षानाम संवत्सरे चैत्र वद्य २ : जन्मस्थल सिलचर, आसाम)

निरयन कुंडली. अयनांश २२°, विशाखा नक्षत्र, चतुर्थ चरण, वृश्चिक राशी त्या दिवशींचा रवि उदय ५ : ४४ रवि अस्त ६ : १६




कुंडलीवरून कांहीं स्थूल निष्कर्ष:[2] चवथ्या घरांत मंगळ असल्यानें ह्यांना भर्तृसुख नाहीं. २ पतिगृहांत केतु व त्यावर राहूची दृष्टि असल्यानें विवाह झाला असता तरी संसारसुख मिळालें नसतें. ३. आश्चर्य असें कीं त्यांच्या आईच्या निरयन कुंडलींतील मेष राशींतील ग्रह तसेच्या तसेच मुलीच्या मेषराशींत आहेत. मेषेंतला रवि बुद्धि दर्शवितो. ४. सर्व ग्रह पत्रिकेंत डाव्या बाजूस असल्यानें ते उदित नाहींत ही मोठी उणीव आहे. मुलगी बुद्धिमान व कर्तृत्ववान असून सुद्धां अल्पायुषी निघाल्यानें वाव मिळाला नाहीं.

• • •

---

१. जन्माच्या आदल्या दिवशीं ' गुड फ्रायडे ' होता.

२. कांहीं व्यक्तींना पंडिताबाईंच्या पत्रिकेबद्दल आस्था वाटत असल्यानें श्री. नवाथे ह्यांनीं आधींच ती पत्रिका मिळवून छापून तिच्यावर चर्चा घडवून आणली असल्यामुळें श्री. साठे ह्यांचें वरील टिपण आम्हीं दिलें आहे. फलज्योतिषावर आमचा मुळींच विश्वास नाहीं. परंतु ज्यांचा विश्वास नाहीं त्यांना हें काय चाललें आहे ह्याची माहिती असावी एवढाच हेतु. हें परिशिष्ट द्यावें न द्यावें ह्याबद्दल बराच विचार करून कांहीं मित्रांच्या सूचनेवरून तें केवळ वरील कारणासाठीं दिलें आहे. ह्या कामीं प्रा. साठे ह्यांनीं माझ्या विनंतीवरून घेतलेल्या तसदीबद्दल मी ऋणी आहें.

दे. ना. टिळक

## परिशिष्ट : ५

# मावश्या

पंडिता रमाबाईच्या कामांत त्यांना साह्य करण्यासाठीं कित्येक पाश्चात्य स्त्रियांनीं आपलें आयुष्य वेचलें. इंग्लंड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया—न्यूझीलंड इत्यादि देशांतून त्या आल्या होत्या. त्या सर्व बाईच्या हाताखालीं काम करीत व त्यांना मावश्या म्हणण्याची पद्धत होती. बाईच्या त्या बहिणी म्हणून त्या मावश्या. त्यांना महाराष्ट्रीय नांवें देण्यांत आलीं होतीं. त्यांपैकीं कांहीं मावश्यांचीं नांवें व त्यांचें कार्यक्षेत्र ह्याबद्दल थोडक्यांत माहिती अशी आहे. बाईच्या इतर साह्यकाऱ्यांबद्दल २४ व्या प्रकरणांत लिहिलें आहेच.

**मिस् ई. काऊच** (इंग्लिश) : ह्यांच्याकडे केडगांवांतील मुलांवर देखरेख करण्याचें काम होतें. मुलगे त्यांना "ममा" म्हणत.

**मिस् सी. काऊच** (इंग्लिश) : बाईच्याकडे पाहुण्यांची वर्दळ फार असे. त्या कामासाठीं एका स्वतंत्र कामदाराची गरज लागे. पाहुण्यांना स्टेशनवरून आणण्यापासून परत नेऊन पोंचविण्यापर्यंत पाहुण्यांची बरदास्त चाले. मिस् काऊचचा पहाटे उठल्यापासून निजेपर्यंत सारा वेळ ह्या कामांत निघून जाई. ह्यांचा व इतर कामाचा व मुलींचा फारसा संबंध येत नसे. त्यामुळें त्यांना भारतीय नांव मिळालें नव्हतें.

**मिस् जे. म्याक्ग्रेग्रर** (न्यू झीलंडर) : ह्यांना सोनू मावशी म्हणत. ह्यांचे केस सोनेरी होते म्हणून बाईनीं त्यांना हें नांव दिलें होतें. ह्यांनीं बाईना निरनिराळ्या कामांत साह्य केलें. शेतकी काम, छापखाना, अंधशाळा व शेवटीं सुपरिन्टेंडंटचेंहि काम त्यांच्यावर पडलें.

**मिस् जे. आय. क्याडॉक** (अमेरिकन) : ह्यांचें मराठी नांव स्तुति मावशी असें होतें. त्यांनीं अंधांच्या शाळेचें व शेवटीं सुपरिंटेंडंटचें काम जवळजवळ १० वर्षें केलें.

**मिस्. एम्. लिझा हेस्टी** (अमेरिकन) : बाईच्या ह्या सुंदरामावशी. त्यांचा चेहरा अत्यंत गंभीर असल्यानें मुलींना त्यांचें भय वाटे. बाई त्यांची समजूत काढीत कीं त्यांचें अंतःकरण सुंदर आहे म्हणून त्यांना मीं सुंदरामावशी असें नांव दिलें आहे, बाईच्या काळांत त्यांनीं सेक्रेटरीचें काम केलें. बाईच्यानंतर चार वर्षें त्यांनीं सुपरिंटेंडंटचें काम केलें.

**मिस् एब्रॅम** (इंग्लिश) : मोठ्या मावशी. ह्यांच्याविषयीं २४ व्या प्रकरणांत विस्तारानें लिहिलें आहे.

**मिस् म्याकडोनॉल्ड** (इंग्लिश) : लहान मावशी. ह्या व मिस् एब्रॅम चर्चचें काम करीत.

## पंडिता रमाबाईनंतरच्या सुपरिंटेंडेंट

**मिस् आय्. हेस्टी** (इंग्लिश) : बाईच्या मृत्यूनंतर त्यांच्याच योजनेनुसार ह्यांनीं व्यवस्थापिकेचें काम हातीं घेतलें. तें सन १९२६ पर्यंत संभाळलें.

**मिस् ई. वेल्स** (अमेरिकन) : १९२६ ते १९३९

**मिस् जे. वुडवर्ड** (अमेरिकन) : १९४० ते १९४४

**मिस् जे. आय्. ऱ्यार्डॉक** (इंग्लिश) : १९४५ ते १९४९ व १९५१ ते १९५५

**मिस् जे. मॅक्ग्रेगर** (न्यू झीलंडर) : मिस् ऱ्यार्डॉकच्या गैरहजेरींत

**मिस् बी. ई. स्टीड** (अमेरिकन) : १९४९ ते १९५०

**मिस् जी. फ्लेचर** (ऑस्ट्रेलियन) : १९५१ ते १९५७

**मिस् सी. एल्. टेरी** (अमेरिकन) : १९५७ पासून

नांवाच्या पुढें देश निर्देशित केले आहेत. चोविसाव्या प्रकरणांतहि मावश्यांची मोठी यादी आहे. त्याहि वेगवेगळ्या देशाच्या होत्या. बाईच्या चरित्रलेखक मिस् फुलर ह्याहि फार वर्षे केडगांवीं काम करीत होत्या. त्या अमेरिकन आहेत.

● ● ●

परिशिष्ट : ६

## आर्यमहिला समाजाचे उद्देश व नियम.

१. आम्हां स्त्रीवर्गाचा अभिलाष पूर्ण होण्याकरितां स्थापन केलेल्या ह्या समाजाचें नांव 'आर्यमहिला समाज' असें ठेविलें आहे.

२. भारतवर्षांतील सर्व सभ्य स्त्रियांवर फार दिवसांपासून चालत आलेल्या अंधपरंपरेच्या चालीप्रमाणें जे (बाल्यावस्थेंत विवाह करणें, अज्ञत्वामुळें पराधीन व दास्य स्थितींत राहाणें वगैरे) अत्याचार होत आहेत त्यांपासून स्त्रियांची मुक्तता होण्यासाठीं आणि स्त्रियांचा धर्म, नीति, व व्यवहार वगैरेंची हल्लीं असलेली शोचनीय स्थिति जाऊन पुढें त्यांची उन्नति व्हावी याकरितां म्हणें हे या समाजाचे दोन हेतू आहेत.

३. भारतवर्षांतील सर्व प्रदेशांत राहणाऱ्या हिंदुस्थानच्याच रहिवासी म्हणविणाऱ्या सर्व स्त्रिया या समाजाच्या मुख्य सभासद होतील.

४. ज्या कोणी विदेशीय स्त्रिया कृपा करून या समाजाचें साहाय्य करूं इच्छितील त्या सहाय सभासद होतील.

५. कुलीन आणि सच्चरित्र अशा स्त्रियाच या समाजाचे सभासदपदीं येऊं शकतील.

६. या समाजाच्या द्वारें होणारीं सर्व कृत्यें व्यक्तिविशेषाचीं नसून सार्वजनिक आहेत, यास्तव ह्या समाजांतील सभासदांनीं कांहीं विशेष आग्रह अथवा पक्षपात करूं नये.

७. ह्या समाजांत सर्व सभासदांचा सारखा अधिकार आहे. म्हणून कोणीं कोणाच्या जाती, कुल, धन इत्यादि पदांवर नजर देऊं नये.

८. या समाजाकडून जें कांहीं कार्य होणें तें सभ्य मंडळींपुढें त्याबद्दल काय तो निश्चय होऊन सर्वांचीं मतें घेतल्यावर ज्या पक्षाला जास्ती सभासदांचें अनुमोदन आहे असें समजेल तोच पक्ष अवलंबन करण्यांत येईल.

९. ह्या समाजाचे सभासद व्हावें अशी ज्या स्त्रियांची इच्छा असेल त्यांनीं सामाजिक कृत्याच्या साहाय्याबद्दल कमींत कमी दरवर्षी सहा रुपये वर्गणी दिली पाहिजे.

१०. ज्या स्त्रिया सधन असतील त्यांनीं आपल्या शक्तीप्रमाणें वर्गणीबद्दल किंवा विशेष दान म्हणून जास्ती रुपये दिले पाहिजेत.

११. ज्या स्त्रिया अगदीं गरीब असतील त्यांजपासून वर्गणीदाखल ३ रुपयांपेक्षां कमी घेतलें जाणार नाहीं.

१२. सभासदांनीं दिलेल्या वर्गणीपैकीं खर्चवेंच वजा जातां बाकी राहिलेला पैसा समाजाच्या नांवानें ब्यांकेंत ठेवला जाईल.

१३. या समाजाचे सभासद व्हावें अशी ज्या स्त्रियांची इच्छा असेल त्यांनीं "या सार्वजनिक कृत्यामध्यें पक्षपात किंवा दुराग्रह सोडून, आमचा प्राण आहे तोंवर आम्ही आमच्यानें होईल तितकें साहाय्य करूं" अशी सर्वसाक्षी परमेश्वराला आणि धर्माला स्मरून प्रतिज्ञा केली पाहिजे.

१४. आपल्या प्रतिज्ञेच्या आणि समाजाच्या नियमांविरुद्ध ज्या स्त्रिया आचरण करितील त्यांचें नांव सभासदांच्या यादींतून काढून टाकलें जाईल.[१]

---

१. प्रार्थना समाजाचा इतिहास : पृष्ठ १६७–१६८,

परिशिष्ट : ७

# स्त्री-धर्म-नीति

ह्या पुस्तकाच्या दोन आवृत्त्या निघाल्या. पहिलीची जाहिरात ३० जून १८८२ ह्या तारखेनिशीं प्रसिद्ध झाली होती. दुसरी त्यानंतर सहा महिन्यांत निघाली असावी, कारण बाई १८८३च्या एप्रिलमध्यें इंग्लंडला गेल्या. पहिल्या आवृत्तीवर १८८२ इतकीच तारीख छापलेली आहे. पहिल्या आवृत्तीचें पुस्तक ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापलें होतें व त्याची किंमत बहुतेक १। रुपया असावी. (आमच्या हातीं आलेल्या प्रतींत छापील किंमतीवर पांचचा आकडा गिरविलेला आहे, परंतु हे शर्विलक पुढच्या 'रुपया'चें 'रुपये' करायला विसरले. त्या प्रतींत १४४च पानें आहेत. पुढचें एक पान गळून पडलें आहे.) दुसऱ्या आवृत्तींत १७२ पृष्ठें आहेत. दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत बाई म्हणतात.

'हा ग्रंथ छापून प्रसिद्ध झाल्यावर त्याच्या गुणदोषाविषयीं वर्तमानपत्रांत बरीच चर्चा झाली, तिच्यावरून ह्या पुस्तकांत अनेक दोष असले, तरी ग्राह्यांशहि बराच आहे असें दिसलें, व तेवढ्यानेंच माझ्या श्रमांचें सार्थक झालें. ह्या ग्राह्यांशाकडे नजर देऊन मेहेरबान डायरेक्टर साहेबांनीं प्रथमावृत्तीच्या ५०० प्रती घेतल्या व बाकीच्या इतर लोकांत खपल्या, म्हणून हल्लीं ही दुसरी आवृत्ति काढली आहे. हींत पहिल्या आवृत्तींत जे शब्दरचनेचे दोष राहिले होते, त्यांपैकीं बरेच काढून टाकले आहेत. संस्कृत व अपरिचित शब्द फार आहेत, अशाविषयीं फारच बोभाटा ऐकला, तेव्हां असे शब्दहि बहुतेक बदलले आहेत. ह्याशिवाय क्वचित् स्थळीं मूळच्या मजकुरांतहि कमीजास्त केलें आहे.'

पुस्तकांत खालीलप्रमाणें आठ 'परिच्छेद' आहेत. १. पाया. २. विद्या. ३. मर्यादा. ४. धर्म. ५. वधूवृत्त. ६. गृहकृत्य. ७. बालकांचें पालन व शिक्षण. ८. इतिकर्तव्यता.

चौथ्या परिच्छेदांत "धर्म" ह्या विषयाची फोड १. धृति म्हणजे धैर्य, २. क्षमा, ३. दम म्हणजे मनोनिग्रह, ४. अस्तेय म्हणजे चोरी न करणें, ५. शौच म्हणजे बाह्य व आंतरिक शुचिता, ६. इंद्रिय निग्रह, ७. धी म्हणजे धर्मसंबंधीं बुद्धि, ८. विद्या, ९. सत्य, १०. अक्रोध : राग व त्याचींच रूपान्तरें द्वेष, मत्सर इत्यादींचा त्याग करणें.

पहिले चार "परिच्छेद" सर्वसाधारण स्त्रीजीवनविषयीं असून पांचव्या "वधूवृत्त" ह्या परिच्छेदापासून स्त्रीच्या चरित्रांत विवाहानंतर होणाऱ्या बदलास अनुसरून उपयुक्त असा मजकूर आहे. "कित्येक स्त्रिया पतीचें उष्टें खाणें, त्याचे पाय धुऊन तें पाणी पिणें इत्यादि बाह्यात्काराचीं सोंगें दाखवितात", परंतु खरा पत्नीधर्म "आपल्या पतीच्या मनास अनुसरून धर्माला आणि ईश्वराला स्मरून आचरण पवित्र ठेवणें" ह्यांत आहे.

"गृहकृत्य" ह्या प्रकरणांत अत्यंत सोप्या रीतीनें त्यांनीं नववधूंना बोध केलेला आहे. आळस नको, चाकरांशीं अदबीनें बोलावें, नणंदा किंवा इतर आप्त ह्यांचीं गाऱ्हाणीं चाकरांजवळ सांगूं नयेत, घरांत सर्व जिनसा आपणांस कोणत्याहि वेळेस सहज सांपडतील अशा ठेवाव्या, केर सांचूं देऊं नये, एखादें मनुष्य कांहीं वाईट कर्म करून निंद्य झालें आहे अशाची तुम्ही निंदा करूं नका, अशासारखा बोध ह्या प्रकरणांत आहे.

शेवटलें प्रकरण "इतिकर्तव्यता" म्हणून आहे. त्याचा शेवट बाईंनीं असा केला आहे : "मांडव्य ऋषि ईश्वरध्यानांत निमग्न असून वनांत राहात होते. त्यांवर चोरीचा आळ घालून दुष्टांनीं त्यांस सुळावर लाविलें. तशा प्राणांतक दुःखदशेंत सुद्धां त्यांचें धैर्य पर्वताप्रमाणें अचल होतें. ते वनांत असतांना त्यांची जी क्षमा तीच शेवटपर्यंत होती. त्यांस ज्या दुष्टांनीं सुळावर दिलें त्यांस त्यांनीं क्षमा केली, व विचार करून सर्व आचरण केलें. त्या वेळेस त्यांस क्रोध, निराशा, वगैरेंनीं अगदीं उपद्रव दिला नाहीं. येशू ख्रिस्तास दुष्ट लोकांनीं क्रुसावर सर्वांगीं खिळे ठोकून मारलें परंतु त्या भयंकर वेळेस त्याचे मनास अगदीं भय किंवा दुःख झालें नाहीं. क्रुसावर अशा शोचनीय दशेंत मरते वेळीं सुद्धां त्यानें स्थिरचित्त होऊन शांत मनानें जगत्पित्याशीं सर्व प्राण्यांचें मंगल होण्यासाठीं प्रार्थना केली, आणि मोठ्या धैर्यानें सर्व यातना सोसून घेतल्या; परंतु तो धर्ममार्गावरून घसरला नाहीं, याचें नांव धार्मिक." ईश्वरादेशावांचून दैव म्हणून दुसरा एखादा कोणी जगांतील कर्ता नाहीं, यास्तव दैवास किंवा ईश्वरास दोष लावूं नये. कोणाचें अत्यंत प्रिय असें एखादें मनुष्य मेलें तर त्याबद्दल शोक न करून संतोषच मानावा, कारण पूर्वीं आपलें प्रिय मनुष्य असतां आपलें सर्व प्रेम त्याचेच ठायीं एकवट होऊन राहिलें होतें, म्हणून निर्मल अंतःकरणानें त्या प्रेमाचा प्रसार इतरांवर करण्यास सवड राहिली नव्हती, आतां ईश्वरकृपेनें निःस्वार्थ प्रेम करण्यासारखे महत्कृत्यास विघ्नस्वरूप तें मनुष्य जेव्हां नाहींसें झालें तेव्हां आतां आपण त्याचा शोक कां करावा ? आपलें प्रेम एका जागींच कोंडून न ठेवतां सर्व प्राण्यांचे ठिकाणीं त्याचा प्रसार करावा, तसें केलें म्हणजे मनास अनिर्वचनीय आनंद आणि समाधान हीं होतील, सर्वांवर निर्मल अंतःकरणानें प्रेम ठेवून निःस्वार्थ परोपकार केल्यानें मनुष्यास जें सुख प्राप्त होतें त्यास उपमा द्यावी असें जगांत कांहींच नाहीं......एखादा जलप्रवाह सारख्या मैदानांतून वाहात असला म्हणजे त्याचे अंगीं अगदीं वेग नसतो, त्याच्या गतीला एखादा पर्वत किंवा अशाच प्रकारचें कांहीं आड आलें म्हणजे त्याचा वेग अतोनात वाढतो."

बाईंनीं पति निधनानंतर काय निश्चय केले, मनाची कशी तयारी केली व पुढील आयुष्याची धांव धांवण्यास त्यांनीं कंबर कशी कसली हेंहि ह्या पुस्तकावरून व विशेषतः ह्या शेवटल्या भागावरून स्पष्ट होतें.

• • •

*परिशिष्ट : ८*

# रमाबाईंचा इंग्लंडचा प्रवास

रमाबाईंनीं इंग्लंडला जाण्याचें ठरविल्यावर त्यांच्या प्रवासाला हरकत घेणारीं अनेक पत्रें त्यांना आलीं. त्या सर्वांना बाईंनीं जें उत्तर दिलें तें पुढें पुस्तकरूपानें छापून प्रसिद्ध करण्यांत आलें. त्यांत त्या म्हणतात :

"माझ्या मताच्या विरुद्ध जीं कांहीं कारणें माझ्या मित्रांनीं दाखविलीं त्यांपैकीं मुख्य अशीं :

१. प्रकृतीची अशक्तता आणि मुलगी लहान आहे. (हें सर्वांत सबळ कारण)

२. मला इंग्रजी बोलतां येत नाहीं.

३. मी इकडे निघून आल्यावर आर्य महिला समाज वगैरे निद्रा घेऊं लागतील.

४. खिश्चन लोकांच्या सहवासांत राहाणें बरोबर नाहीं.

५. इंग्लंडसारख्या चैनबाजीच्या मुलखांत ह्या तरुण वयांत येणें बरोबर नाहीं.

६. या देशाची मला माहिती नसून पुष्कळ लोकांपासून मला अपाय होण्याची भीति आहे.

७. इंग्लंडांत गेल्यावर तिकडल्या वैभवानें डोळे दिपून जातील आणि मग स्वदेशप्रीति अगदीं राहाणार नाहीं.

८. एका गृहस्थानें तर मला असें सुचविलें कीं "अहो तुम्ही इंग्लंडांत जाऊन जीं जीं ठिकाणें पाहाल त्यांचा इतिहास तुम्हांला माहीत नसला तर त्या पाहण्यापासून काय फळ होणार ? लंडनमध्यें एके ठिकाणीं "क्लिओपाट्राज् नीडल" नांवाचा खांब आहे. तो पाहिलांत तर तुम्हाला काय समजणार ? अशा प्रकारच्या पुष्कळ गोष्टी तेथें तुमच्या पाहण्यांत येतील, म्हणून तुम्ही आधीं सगळे इतिहास पाठ करा !

९. आणखी असें कीं तुमचें वय अद्यापि लहान आहे. वयोवृद्ध झालें म्हणजे मनुष्यास पुष्कळ वजन येतें. तुम्ही आणखी दहा बारा वर्षांनीं तिकडे जा."

१०. कोणीं असें म्हटलें कीं, "तुमचा वैद्यकी शिकण्याचा इरादा आहे तर तुम्ही येथें एक दोन परीक्षा पास केल्या पाहिजेत. येथें निदान चार वर्षें राहून चांगला अभ्यास करून म्याट्रिक्युलेशन परीक्षा पास झाली म्हणजे मग जा. कोणाच्या मनाचा तर असा समज झाला कीं, माझ्या स्वदेशीय मित्रांवर माझा अगदीं विश्वास नसून माझा काय तो भरवंसा सर्व मिशनरी लोकांवरच आहे. इत्यादि.

बाईनीं ह्या हरकतींना आपल्या ह्या पुस्तकांत क्रमवार उत्तरें दिलीं आहेत. त्यांपैकीं कांहीं अशीं होतीं :

१. माझी प्रकृति असावी तशी सशक्त नाहीं तरी ही माझी अशक्तता कांहीं रोगमूलक नाहीं. कांहीं कारणावरून गेल्या वर्षी याच दिवसांत मी एका वृद्ध आणि अनुभवी युरोपियन (सिव्हिल सर्जन) डॉक्टरास आपली प्रकृति दाखविली होती. त्यानें अगदीं निश्चयानें सांगितलें होतें कीं, माझ्या शरिरांत कोणत्याहि प्रकारचा रोग नसून प्रकृति फार सुदृढ आहे. अशी सुदृढ प्रकृति फारशी लोकांची नसते. याचें कारण माझ्या शरिरांतील रक्त-मज्जादिक पदार्थांचा अकालीं आणि अतिशय व्यय झाला नाहीं. आणि आज सुमारें आठ वर्षांपासून सतत प्रवासांत माझें आयुष्य गेलें असून शेकडों ठिकाणचें हवापाणी माझ्या प्रकृतीला मानवलें आहे, आणि सुमारें २००० मैल कांहीं एक वाहन नसतां पायांनींच प्रवास केल्यानें शीतोष्णसहिष्णुताहि माझ्या अंगीं आहे. सतत मित भोजन व मिताचार असल्यानें सहसा रोग होण्याचें भय नाहीं. हिमालयासारख्या थंड (जेथें बर्फ पडतें) जाग्याची हवा मला मानवली होती तेव्हां इंग्लंडांतील थंड हवा माझ्या प्रकृतीस अपाय करील असें वाटण्यास कांहीं आधार नाहीं. आतां मुलगी लहान आहे आणि तिच्या प्रकृतीला समुद्र आणि येथील हवा मानवेल किंवा नाहीं हा प्रश्न राहिला. मुलीची आई सहा महिन्यांची (तान्हें लेकरूं) होती तेव्हांच तिचीं आईबापें तिला एका वेताच्या पेटाऱ्यांत घालून गड्याच्या डोकीवर देऊन प्रवासास निघालीं. तेव्हांपासून आजपर्यंत तिच्या कपाळचा प्रवास चुकला नाहीं म्हणून तिची प्रकृति घराच्या सावलींत असणाऱ्या सुखसंवर्धित नाजुक बायकांसारखी नाजुक झाली नाहीं. तेव्हां तिच्या मुलीची प्रकृति नाजुक कोठून होणार? बरें, मुलीला तिच्या आईनें "भुईवर ठेवली तर मुंगी चावेल आणि अधांतरीं ठेवली तर कावळा नेईल" अशी आशंका करून अगदीं नाजुकपणानें वाढविली आहे असेंहि नाहीं. मुलीचें वय आठ महिन्यांचेंहि पुरतें झालें नव्हतें तेव्हांच तिची आई तिला घेऊन ऐन उन्हाळ्यांत हिंदुस्थानच्या एका कोपऱ्यावरून दुसऱ्या कोपऱ्यापर्यंत (काचारहून मद्रास, व तेथून पुण्या-मुंबईचा वगैरे) प्रवास करून आली आहे. या प्रवासांत मुलीच्या प्रकृतीचा बराच परिचय झाला आहे त्यावरून तिला येथील हवा मानवणार नाहीं असें मला वाटत नाहीं.

२. इंग्रजी भाषेच्या अज्ञानामुळें अडचणी उत्पन्न होतील अशी जी कित्येकांनीं भीति घातली होती तीबद्दल त्या म्हणतात, मी हिंदुस्थानच्या पुष्कळ देशांत फिरलें. त्या देशांतील भाषा कशा त्या मला स्वप्नीं सुद्धां माहीत नव्हत्या. त्यांची माहिती नव्हती. तरी त्या त्या देशांतून मला कोणत्याहि गोष्टीची अडचण सोसावी लागली नाहीं. त्या देशांत कांहीं राहिल्यानंतर चोहोंकडे एकच भाषा ऐकू येऊं लागल्यानें ती शिकण्याचा प्रयत्न करतांच ती मला बोलतां, लिहितां आणि वाचतां येऊं लागली. तशीच इंग्रजी

भाषा मला येणार नाहीं म्हणून कशावरून ? आतां ती भाषा आमच्या मुलखानिराळी आहे हें खरें, तरी पाहा, मूल जन्मास येतें तेव्हां त्याला सर्वच भाषा मुलखानिराळ्या असतात. परंतु लोकांचें बोलणें ऐकून आणि पाहून त्याला भाषा येऊं लागते. इंग्रजी भाषेच्या अभ्यासांत मी अगदीं तान्हें बाळ आहें, असें समजा. इतर मुलें जशीं शिकतात तशी मीहि शिकेन. आत्तांच मला ह्या देशांत आल्याबरोबर मोठीं व्याख्यानें द्यायचीं आहेत असें नाहीं—मी तर जाणूनबुजून शिकण्याकरतांच ह्या देशांत येणार होतें तेव्हां मला ही भाषा येत नाहीं म्हणून माझी कोणती मोठी अब्रू जाणार होती ?

३. आर्यमहिला समाज म्हणजे एके ठिकाणीं आहे असें नाहीं. आणि तो जितक्या ठिकाणीं आहे तितक्या ठिकाणीं माझा राहाण्याचा संभव नाहीं. कारण कृष्णासारखीं पुष्कळ रूपें घेऊन सर्व ठिकाणीं मला हजर राहतां येत नाहीं. समाज स्थापन करण्यासाठीं लोकांपाशीं विनंति करणें हें माझें काम आहे. परंतु चालू करणें आणि त्याची उन्नति करणें हें प्रत्येक सभासदाचें काम आहे. तें माझ्या हातीं नाहीं. जेथें सदरहू समाज चालविण्यासारखे लोक असतील तेथें तो मी हिंदुस्थानांत नसलें तरी चालेल. आणि तसे लोक नाहींत तेथें एक सोडून हजार रमाबाई असल्या तरी तो चालावयाचा नाहीं. उदाहरणार्थ, अहमदनगरांतील आर्यमहिला समाज.

४. ख्रिश्चन लोकांच्या सहवासांत राहाणें कां बरोबर नाहीं हें मला समजत नाहीं. या देशांत ख्रिश्चन नाहींत असे लोक फार विरळा. पाण्यांत राहायाचें तर तेथें कोरडी जमीन कोठून मिळणार ? क्वचित् एखादें मातीचें डिखळ असलें तर तेंहि भिजलेलेंच असावयाचें. ज्यानें समुद्रांत उडी टाकायची त्यानें थंडीला भिण्यांत काय अर्थ आहे ? एक मात्र भय, तें हेंच कीं क्रिश्चन धर्म स्वीकारणें. तें करण्यास मला हिंदुस्थानांत पुष्कळ क्रिस्चन लोकांनीं उपदेश केला आहे. मनुष्याचे मनाचा कांहीं निश्चय नाहीं असें जर आहे तर त्याला हिंदुस्थान काय आणि इंग्लंड काय ? आतां मी ज्या क्रिस्चन लोकांच्या सहवासांत आहे त्यांच्या येथें असणें ह्या मंडळीच्या क्रिस्चनावांचून दुसऱ्या पुष्कळ पाद्र्यांस बरें वाटत नाहीं हें मला त्यांनीं नीट उघड करून सांगितलें. आपण हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं हिंदुस्थानांत जसा एका हिंदु धर्मांत शैव, शाक्त, वैष्णव इत्यादि मतभेद असतो तसा एका खिस्ती धर्मांतहि रोमन क्याथोलिक, प्राटेस्टंट, ग्रीक चर्च, चर्च ऑफ् इग्लंड, चर्च ऑफ स्कॉटलंड, चर्च ऑफ् जर्मनी, मेथॉडिस्ट, युनिटेरिटन वगैरे पुष्कळ मतभेद आहेत....ह्यांच्यापैकीं मी कोणाचेंहि साह्य मागितलें नाहीं.

५. इंग्लंडसारख्या चैनबाजीच्या मुलखांत अशा तरुण वयांत जाणें बरोबर नाहीं. इंग्लंडच काय, पण त्याच्यापेक्षां सहस्रपट चैनबाजीच्या मुलखांत गेलें तरी ज्याला जें करायचें नाहीं तें त्याच्यानें कधींच करवणार नाहीं. चैनीला तरुण आणि वृद्ध असा विचार नसतो. आमच्या देशांत अनुद्भिन्नश्मश्रु असे पुष्कळ राजासारखे श्रीमंत संन्यासी होऊन गेले आहेत. आणि उद्यां ज्यांच्या शरिराची स्मशानांत क्रव्यादाग्नींत आहुति

पडणार, जे " अंगंगलितंपलितंमुंडंदशनविहीनंजातंतुंड, वृद्धोयातिगृहीत्वादंडं " या प्रकारचे सशक्त आणि तरुण असे हजारों वृद्ध ८–९ वर्षांच्या मुलींशीं लग्नें करून आपलें अग्निहोत्र कायम ठेवतात, रणांत गेल्यावांचून शूराची परीक्षा होत नाहीं, अभाव-वैराग्याला वैरागी अशी संज्ञा देतां येत नाहीं. एखादा पदार्थ आपल्याला मिळत नाहीं म्हणून त्यावर आपली इच्छा नाहीं असें दाखविणें किंवा तो नाहीं म्हणून आपल्याला तो आवडत नाहीं, म्हणणें हें शुद्ध ढोंग आहे. मला ह्या चैनबाजीच्या मुलखांतच माझ्या मनाची परीक्षा करावयाची आहे.

६. या देशाची मला माहिती नसली आणि येथें पुष्कळ लबाड लोक असले तरी मला त्यांची काय भीति? येथें सर्वच म्हणजे लबाड आहेत असें नाहीं. मी ज्या स्त्रियांच्या समाजांत राहातें त्या सर्व स्त्रिया मोठ्या मोठ्या संभावित आणि श्रीमंत घराण्यांतील असून विशेषेंकरून धर्मार्थ सर्व सोडून संन्यासिनी झाल्या आहेत. ह्या घरांत मोठ्या सभ्य पुरुषांसहि राहाण्याची सक्त मनाई आहे. मग लबाड बायका आणि पुरुष यांचा येथें प्रवेश कोठून होणार? शिवाय पुष्कळ संभावित गृहस्थ व स्त्रिया यांचें येथें जाणेंयेणें आहे. दुसरे लोक ज्यांनीं हा समाज पाहिला नाहीं किंवा ज्यांस योग्यता कळली नाहीं ते कांहीं म्हणोत, परंतु मला या बायांची सभ्य रीति आणि पवित्र आचरण फार आवडतें.

७. इंग्लंडांतील वैभवानें डोळे दिपून आपल्या जन्मभूमीचा विसर पडणें हें मनुष्य-स्वभावाच्या विरुद्ध आहे. आपली आई गरीब असून म्हातारी आहे म्हणून तिला टाकून (किंवा लाथ मारून) दुसऱ्या श्रीमंत, तरुण आणि सुस्वरूप बाईला आईप्रमाणें सन्मान देणारे मनुष्य मनुष्यरूपी राक्षस असे म्हटले पाहिजेत. भर्तृहरीनें म्हटल्याप्रमाणें "ते के न जानीमहे" ते कोण हें (त्यांस काय म्हणावें हें) आम्हांस माहीत नाहीं. इंग्लंडांत येथून इकडच्या वैभवानें डोळे दिपून आपल्या जन्मभूमीला तुच्छ मानणारे नरपिशाच आमच्या दुर्दैवी मातेच्या पोटीं पुष्कळच उपजले आहेत यांत संशय नाहीं, परंतु हल्लीं तर मला असें वाटतें कीं माझ्या आईवरची माझी प्रीति कमी होईल अशी पिशाचप्रकृति अद्याप माझ्यांत शिरली नाहीं. आणि ईश्वरी कृपेनें तें न होवो.

बाईनीं बाकीच्या शंकांनाहि उत्तरें दिलीं आहेत—तुमचा प्रेमा आमच्या पेक्षां मिशनरींवर अधिक आहे ह्या आक्षेपाला त्या असें उत्तर देतात:

"कोणाचें खरें रूप झांकून राहात नाहीं हें तुम्हांस माहीत आहे."

• • •

## परिशिष्ट : ९

# युनाइटेड स्टेट्सची लोकस्थिति आणि प्रवासवृत्त

"युनाइटेड् स्टेट्सची लोकस्थिति आणि प्रवासवृत्त" हें रमाबाईंचें तिसरें मराठी पुस्तक. अमेरिकेंत रमाबाईंनीं मार्च १८८६ ते नोव्हेंबर १८८८ पर्यंतच्या सुमारें अडीच वर्षांच्या काळांत तीस हजार मैलांचा प्रवास करून त्या देशाचा अगदीं बारकाईनें अभ्यास केला. त्यांचें निरीक्षण किती सूक्ष्म होतें हें ह्या पुस्तकांतील प्रकरणांच्या खालीं दिलेल्या जंत्रीवरून दिसून येईल. प्रारंभीं इंग्लंडहून अमेरिकेस केलेल्या प्रवासाचें वर्णन आहे. त्यानंतर अमेरिकेंतील शासनपद्धति, लोकस्थिति, गृहस्थिति, विद्याव्यासंग, धर्ममतें आणि दानधर्म, स्त्रियांची स्थिति, व्यापारधंदे ह्या विषयांचें विवरण आहे.

भारतांतील विविधभाषी, विविधधर्मी जनतेचें वैचारिक ऐक्य साधण्यासाठीं सर्व-परिचित अशा एका भाषेची भारताला फार जरूरी आहे ह्याचा पहिला इशारा रमाबाईंनीं सन १८८९ मध्यें दिला तो ह्या पुस्तकांत सांपडतो. त्याचप्रमाणें म्युनिसिपालिट्या, फायर ब्रिगेड, प्राथमिक शिक्षण, किंडर गार्टन, इत्यादि विषयांवरहि त्यांनीं ह्या पुस्तकांत ऊहापोह केला आहे. किंडर गार्टन हा विषय त्या स्वतः तेथें शिकल्या व भारतांत ह्या शिक्षण पद्धतीचा अवलंब प्रथम त्यांनीं केला.

राष्ट्रभाषा हिंदीच असायला पाहिजे व ती तशी बनविण्याच्या कामीं कॅाँग्रेसनें पुढा-कार घ्यावा असें त्यांनीं ७० वर्षांपूर्वी सांगितलें होतें. त्या वेळीं अमेरिकेंत अकरा हजार वर्तमानपत्रें व मासिकें होतीं. पैकीं दहा हजार पांचशें पंधरा पत्रें आणि मासिकें इंग्रजी भाषेंत निघत होतीं, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. देशांत ऐक्य राहून एका भागांतील मनुष्यास दुसऱ्या भागांतील लोकांचे विचार समजावयाला भाषेचें ऐक्य असणें अवश्य आहे. बाई म्हणतात : "फ्रेन्च......स्क्यांडिनेवियन, स्पेनी, डच, इटालियन, वेल्श, बोहीमियन, पोर्तुगी इत्यादि बहुतेक सर्व युरोपियन जातीचे लोक ह्या देशांत येऊन राहातात. ते आपआपल्या कुटुंबांत स्वदेश भाषा बोलतात; आणि सगळे मिळून हजार एक पत्रें आपल्या भाषांत काढतात परंतु त्यांस बहुतेक सर्वच इंग्रजी भाषा बोलणाऱ्या लोकांशीं दळणवळण ठेवावें लागतें. सार्वजनिक शाळांतून इंग्रजीच शिकवितात. राज्यकारभार इंग्रजींत चालतो. व्यापार-धंद्याचें काम, हिशोब टिशोब वगैरे साऱ्या गोष्टी इंग्रजी भाषेच्या मदतीनें कराव्या लागतात. तेव्हां त्यांना इंग्रजी भाषा शिकल्यावांचून निर्वाहच नाहीं. आणि जेथें चोहोंकडे हीच भाषा ऐकूं येते, तेथें ती शिकण्यास फारसे प्रयास करावे लागत नाहींत. आपणहि

भारतांत एक भाषा व एक लिपी, भारतीय भाषा व भारतीय लिपी म्हणून अंगिकारली पाहिजे. ती भाषा म्हणजे हिंदी व ती लिपी म्हणजे देवनागरी. (ह्याविषयीं २५ व्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. पृष्ठ ४१२ वर.)

हा प्रश्न राष्ट्रीय सभेनें आपल्या हातीं घ्यावा म्हणून त्या लिहितात : पुढील राष्ट्रीय सभेच्या बैठकींत तिनें ह्या गोष्टीचा अवश्य विचार करावा अशी माझी तीस विनयपूर्वक सूचना आहे."

अमेरिकेंतील त्या ३०००० मैलांच्या प्रवासांत पंडिता रमाबाईंचें मन आकर्षण करून घेणारी दुसरी एक गोष्ट म्हणजे तेथील स्थानिक स्वराज्यें—तेथील व भारतांतील म्युनिसिपालिट्यांसंबंधानें लिहितांना त्या म्हणतात :

"शहरांतून आणि खेड्यागांवांतून सुद्धां रस्ते, सभागृहें, वसतीगृहें, पदार्थांचे भाव, इ. सर्व जनांच्या सोईकरतां केलेले असतात. शहरांतील मोठाले रस्ते बहुतकरून गोल नाहींतर चौकोनी दगडांनीं नाहींतर विटांनीं फरसबंदी केलेले असून त्यावरून लोखंडाच्या कांबींचे रस्ते करून घोडे गाड्या[1] स्वत दरानें जिकडे तिकडे जायला सोईवार केलेल्या असतात. श्रीमंती थाटानें पांच डॉलर दराच्या बग्यांत बसून ह्या रस्त्यानें जाणें यणें अबाधित असतें. अर्थातच घरांतून कामावर जाण्याच्या व येण्याच्या वेळीं, फारसा वेळ मोडत नाहीं. (त्याचप्रमाणें शहरांतील गटारें खुलीं नसल्यानें मोऱ्यांच्या दुर्गंधीपासून त्रास होत नाहीं,) इकडच्या म्युनिसिपालिट्या आमच्या देशांतल्या स्वराज्य संपन्न विद्याचारयुक्त म्युनिसिपालिट्यांसारख्या शहाण्या आणि कर्तव्यदक्ष नाहींत, हें युनाइटेड स्टेट्स्च्या लोकांचें महद्भाग्यच समजलें पाहिजे. कारण आमच्या तिकडले म्युनिसिपालिट्यांचे विद्वान् व्यवस्थापक कोणी साहेब आले म्हणजे शहर शृंगारण्यांत आणि रोषनाई करण्यांत, त्याचप्रमाणें साहेब असतील तेथें एखादें सुवर्णसंपन्न सर्वतोभद्र वन सृष्ट करण्यांत पुष्कळ पैसा खर्चीं घालतात, म्हणून शहरांत स्वच्छता ठेवण्याच्या आणि सर्वसाधारण लोक जेथें फार जातात येतात अशा ठिकाणीं दिवेबिवे लावण्याच्या कामीं खर्च करण्यापुरता पैसा त्यांच्या हातीं नसतो. अर्थातच साधारण प्रतीच्या मनुष्यांस स्वच्छतेचें सुख आणि आरोग्यसुख व सोई मिळाव्या तितक्या मिळत नाहींत. युनाइटेड स्टेट्स्मध्यें असला प्रकार घडून येण्याचा संभवच नाहीं. येथें शहरवासी लोक घरपट्टी देतात ती आपल्याच सोईकरतां देतात. ती सोई जर त्यांना मिळाली नाहीं, तर ते म्युनिसिपालिटीच्या हयगईबद्दल नुसता गवगवा करून राहत नाहींत, तर एकदां दोनदां सूचना करूनहि जर व्यवस्थापकमंडळी कर्तव्यतत्पर झाली नाहींत, तर लागलीच तिची उचलबांगडी करतात. युनाइटेड स्टेट्स्मध्यें कोणी पाहिजे ते साहेब आले तरी त्यांच्याप्रीत्यर्थ म्युनिसिपालिटीच्या खर्चानें शहर सुधारण्याची चाल

१. घोड्यांच्या ट्रम्स

मुळींच नाहीं. म्हणून सार्वजनिक रस्त्यांवर दिवे लावण्याकरितां व मोऱ्या वगैरे साफ करण्याकरितां दिलेले पैसे, साहेबांच्या सन्मानार्थ कमानी बांधण्यांत आणि निशाणें उभारण्यांत व्यर्थ खर्चून जात नाहींत. (म्युनिसिपालिट्यांना लागून एक आरोग्यरक्षक मंडळी असतें, ती कोणी सांगितल्यावांचूनच चोहोंकडे जाऊन शहराच्या अरोग्याची देखरेख करते. बाजारांत विक्रीस ठेवलेले भाजीपाले, मासे, दूध, लोणी इत्यादि पदार्थ नीरोग आणि खाण्याजोगे आहेत कीं नाहींत हें तपासून पाहाण्याकडे त्यांचें विशेष लक्ष असतें, त्याचप्रमाणें शहरांतील ज्या भागांत कोणाला कांहीं विशेष रोग उद्भवला असेल तेथील मोऱ्या बिऱ्या साफ आहेत कीं नाहींत, व ते रोग उत्पन्न होण्याचीं कारणें यांचा शोध करून तीं नाहींशीं होतील असा प्रयत्न करण्याची फार काळजी घेतात. शहरांमधून ठिकठिकाणीं सार्वजनिक उद्यानें आणि हवा खाण्याच्या जागा केलेल्या असतात. हीं उद्यानें म्हणजे अमुक एका विशेष वर्गाच्या घरांभोंवतालींच असलीं पाहिजेत असें नाहीं. जेथें जाणें सर्व लोकांस सोयीचें पडेल अशा ठिकाणीं तीं केलेलीं असतात. श्रीमंत लोक आपल्याला पाहिजे तर स्वतःचा पैसा खर्च करून पाहिजे तसे घरगुती बगिचे किंवा दुसरीं सुखाचीं साधनें करून घेवोत. त्या देशांतील म्युनिसिपालिट्या गरीब लोकांचा पैसा खर्च करून श्रीमंतांच्या घरांभोंवतीं शोभा आणून सर्वसाधारण लोकांची गैरसोय करणार नाहींत. कोणत्याहि प्रकारची माहिती मिळविण्यास फार श्रम किंवा खर्च करावा लागत नाहीं. शहरांमध्यें आणि गांवांतून पोलीसांचा बंदोबस्त फार चांगला असतो. आमच्या देशांतील पोलिसांप्रमाणें घरांत चोरी किंवा रस्त्यांत मारामारी होऊन अपराध्याला पळून जाण्याचा अवकाश दिल्यानंतर हळूच गडबड झालेल्या ठिकाणीं येऊन शेंदाडशिपाईगिरी करण्याची विद्या युनाइटेड् स्टेट्स्च्या पोलीस शिपायांस अजून साधली नाहीं. कोणा अनोळखी मनुष्याला शहराच्या रस्त्याची माहिती वगैरे विचारणें झाल्यास तो पोलीसाच्या शिपायास विचारतो म्हणजे तो मोठ्या अदबीनें सांगतो......"

"......कोठें घराला किंवा वखारीला आग लागल्यास पाणी जवळ असावें म्हणून थोडथोड्या अंतरावर रस्त्याच्या कोपऱ्यावरून पाण्याचे बंब बांधून ठेवलेले असतात. घरास आग लागली म्हणजे ती विझविण्याच्या ज्या सोई आहेत, त्या फार उत्तम व लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत. थोड्याथोड्या अंतरावर "फायर स्टेशन्स" म्हणजे आगीचीं ठाणीं बांधलेलीं असतात, त्यामधून आगी विझविण्याच्याच कामांत फार कुशल आणि मोठ्या धाडसाचे लोक त्याच कामासाठीं ठेवलेले असतात. त्यांना पगार मोठमोठाले असतात. आमचें सरकार जसें लढाई नांवाच्या वधस्थानीं मनुष्याचे प्राण बळी द्यावयास आपल्या ऐपतीच्या बाहेर पैसा खर्च करून जंगी सैन्य ठेवीत असतें, त्याच प्रमाणें युनाइटेड स्टेट्स्चें स्थानिक सरकार लोकांचे प्राण वांचविण्यास अग्नीशीं लढणारें सैन्य तयार करून ठेवीत असतें. त्यांची कवाईत,

काम करण्याची चपळाई, आणि व्यवस्थेशीरपणा हीं फार आश्चर्यकारक व उत्तम असतात. त्यांच्या घोड्यांनासुद्धां आपलें काम उत्तम रीतीने करितां यावें असें शिकविण्यांत येतें. आग विझविण्याच्या कामीं लागणाऱ्या शिड्या, रबराचे बंब, खोरीं, कुदळीं, कुऱ्हाडी आणि बंबांतून पाणी वर चढविण्याकरतां अवश्य लागणारें वाफेचें यंत्र इत्यादि पदार्थ उचलून नेण्यास घोडे हवे असतात. त्या घोड्यांचें सामान अशा कांहीं व्यवस्थेनें जागच्या जागीं तयार करून ठेवलेलें असतें कीं, तें घोड्यावर घालण्यास अगदीं उशीर लागत नाहीं. इतकेंच नव्हे तर इकडे इशारतीच्या घांटेचे ठोके ऐकल्याबरोबर स्वतः घोडेच त्या सामानापाशीं जाऊन, तें हालवून आपल्या पाठीवर उतरून घेतात; इतके ते शिकलेले असतात. त्यांची बुद्धि पाहिली म्हणजे मनाला मोठाच चमत्कार वाटतो. गांवांतील निरनिराळ्या ठिकाणीं थोडथोड्या अंतरावर आगीच्या ठाण्यास इशारा देण्याकरितां यंत्राच्या मुठी लावून ठेवलेल्या असतात. त्यांना तारा जोडून विजेच्या योगाने तारायंत्रासारखी उपयोगिता त्यांत आणलेली असते. त्या कोठें आहेत, हें प्रत्येक घराच्या मालकास माहीत असतें. ठिकठिकाणीं कोनाड्यांत किंवा पेटींत लावून ठेवलेल्या छापील नियमांप्रमाणें ती मूठ फिरवावी किंवा दाबावी म्हणजे तिला लागून असलेल्या तारेच्या हालण्यानें जवळील आगीच्या ठाण्यांत घाट वाजते. त्या घांटेच्या ठोक्याच्या संख्येवरून जेथें आग लागली असेल, तें घर कोणत्या रस्त्यावर आहे हें कळून येतें. मग त्या रस्त्यास नजीक ठाण्यावरचे लोक पांच सेकंदाच्या आंत सर्व तयारी करून, आगीशीं युद्ध करण्यास लागणाऱ्या शस्त्रास्त्रांनीं आणि कवचांनीं सज्ज होऊन, मोठ्या वेगानें संकटांत पडलेल्या मनुष्यांचें साहाय करावयास जातात. ज्या घरास आग लागलेली असते तें घर किती उंच असलें आणि आग किती भयंकर असली तरी त्यांना वर चढून आग विझविण्याचें काम करण्यास भय किंवा आळस मुळींच वाटत नाहीं."

"इकडचे लोक कोणी संकटांत पडलें असतां त्याच्या साहाय्यास जाण्यास आळस करीत नाहींत. रस्त्यांत गाड्याबिड्या अडल्या असल्या तर चांगले उंची पोषाख घातलेले पुरुष देखील चिखलांत किंवा गटारांत जाऊन गाडी बाहेर काढण्यास साहाय्य करतील. आमच्या देशांतील संभावित गृहस्थ असल्या प्रसंगीं हें काम आपल्या जातीस किंवा पदास योग्य नाहीं असा विचार करून शांतपणें पुढें निघून जातील."

बाई म्हणतात, आपण बहुतेक शहरांत राहून हा देश पाहिला असला तरी मधून मधून खेड्यापाड्यांचेंहि मुद्दाम जाऊन निरीक्षण केलें होतें. पांच जुन्या मतांच्या व पांच नव्या मतांच्या खेड्यांत व त्याहि निरनिराळ्या १० स्टेट्स् मधील खेड्यांतील लोकस्थितीचें त्यांनीं अवलोकन केलें.

अमेरिकेंतील स्त्रियांनीं मद्यपान व्यसनाच्या बाबतींत केलेलें कार्य बाईंना फारच आकर्षक वाटलें. त्या म्हणतातः

"ही मद्यनिषेध मंडळी म्हणजे, सर्व देशांतील **स्त्रियांचें संयुक्त लोकसत्ताक राष्ट्र** होय. ह्या स्त्रिया आपल्या पांढऱ्या फितींच्या पवित्र बंधनानें, ह्या शांतीच्या आणि प्रीतीच्या खुणेनें सर्व पृथ्वीला मैत्री बंधनांत बांधून एकवट करीत आहेत. सर्व राष्ट्रांतील स्त्रियांमध्यें शांति, प्रीति व मैत्री ह्या अमोलिक, सर्वसुखधाम गुणत्रयाचा प्रसार करीत आहेत. हजारों वर्षांपासून ज्यांच्या हातांत हत्यारें आहेत, ज्यांच्या शरिरांत बळ आहे, व जे समाजाचे चालक व शासक आहेत, अशा पुरुषांच्यानें, राजराजांच्यानें, विद्यादिग्गजांच्यानें, जें महत्कार्य झालें नाहीं, तें ह्या अज्ञ अबला म्हणून धिक्कारलेल्या बायकांनीं केलें! हे परमेश्वरा, तूं धन्य आहेस. अहंकाऱ्यांचा गर्व मोडून टाकायला तूं, अशींच धिक्कारलेलीं माणसें साधनीभूत करतोस. तुझ्या हातीं एकादें तृण देखील वज्रासारखें अपार शक्तिमान होतें[१].

१८८९ सालीं रमाबाईनीं अमेरिकन स्त्रियांबद्दल काढलेले हे शब्द एक भविष्यवाणी ठरून पुढें ३० वर्षांनीं संमत झालेला 'व्हॉलस्टेड ॲक्ट'[२] जणूं त्यांच्या दिव्य दृष्टीला ह्याच वेळेस ज्ञात झाला होता. परमेश्वराच्या हातीं असलें तर तृण देखील अपार शक्तिमान् होतें ही बाईंची उक्ति ह्या कायद्यानें सिद्ध करून दाखविली.

हें सर्वच पुस्तक अतिशय वाचनीय आहे. पुढें एका पिढीनंतर मुंबई युनिव्हर्सिटीनें आपल्या अभ्यासक्रमांत त्याची निवड केली होती.

## परिशिष्ट : १०

# महाराष्ट्राची तेजस्विनी

१८८९ सालीं रमाबाईनीं अमेरिकेंतून परत आल्यावर मुंबईच्या चौपाटीवर कांहीं व्याख्यानें दिलीं. तीं केसरीवांचून कोणीं प्रसिद्ध केलीं नव्हतीं. पुढें ज्ञानोदयानें[३] केसरीवरून तीं संक्षिप्त करून प्रसिद्ध केलीं. ह्या व्याख्यानांतून बाई जातिभेदाच्या किती विरुद्ध होत्या तें जेथें दिसून येतें तो मजकूर आम्हीं जाड टाइपांत दिला असून त्यांचा जाज्वल्य

---

१. यु. स्टे. लोकस्थिति. पान ३१०

२. व्हॉलस्टेड ॲक्ट : १९१९. ह्याचें बहुतेक श्रेय अमेरिकन स्त्रियांना आहे. ह्यानें अमेरिकेंत दारुबंदी करण्यांत आली होती.

३. ज्ञानोदय : १ आगस्ट, ८ आगस्ट व २२ आगस्ट १८८९. पृष्ठ २४५, २५४, २७०

देशाभिमान, सडेतोडपणा, व कळकळ दर्शविणारा मजकूर उजव्या बाजूला किंचित् सरकवून छोट्या स्तंभांनीं दर्शविला आहे.

"मी लहानपणीं शाळेंत गेलें नव्हतें, म्हणून मला त्यावेळीं भूगोलासंबंधीं माहिती होती ती पुराणांत सांगितलेली ! ती ही कीं पृथ्वीवर जंबुद्वीपादि एकापेक्षां एकेक मोठें अशीं सप्त महाद्वीपें असून प्रत्येक महाद्वीपाच्या सभोंवतीं एकेक असे क्षारसमुद्र, सुरासमुद्र, घृतसमुद्र, दधिसमुद्र, क्षीरसमुद्र, इक्षुरससमुद्र, शुद्धजलसमुद्र असे सात महासागर आहेत. तसाच एक मोठा लोकालोकाचल असून त्या सर्वांच्यामध्यें सुवर्णाचा मेरु पर्वत आहे. सूर्याचा एकचक्री रथ असून तो रथावरून फिरत असतो, त्याचें चाक ह्या पर्वतास घासतें वगैरे. हा भूगोल त्यावेळीं मला अगदीं खरा वाटत असे....परंतु आतां पाहातें तों भूगोल निराळा आणि श्वेतद्वीप दिसतें तें निराळें, आतां मीं पाताळ पाहिलें तें निराळें, त्यांत नागलोक नाहींत तर आमच्यासारखींच तेथें मनुष्यें आहेत. आम्ही—मी व माझी मुलगी मनोरमा सन १८८६ मध्यें विलायतेहून आगबोटीनें अमेरिकेंत आलों. जेव्हां अमेरिकेचा किनारा दिसला तेव्हां ती भूमि पाहण्याविषयीं माझी—उत्सुकता फारच वाढली. बंदरांत ज्या वेळीं आगबोट आली तेव्हां सर्व किनारा बर्फानें वेष्टिलेला होता. थंडी तर मी म्हणत होती. समुद्र अगदीं खवळून गेला होता.... आम्ही तशा क्षुब्ध जलांतून नावेंत बसून किनाऱ्यावर येऊन फिलाडेल्फिया शहरांत गेलों.

"अमेरिकेंत जाण्याचा माझा मुख्य उद्देश हा होता कीं, सौ. आनंदीबाई ह्यांस वैद्यविद्येसंबंधानें जें पदवीदान होणार होतें, तो आनंदप्रद समारंभ पहावा. आमच्या देशांतील हतभाग्य स्त्रियांतील एका स्त्रियेस तरी अमेरिकेंत असा सन्मान मिळण्याचा प्रसंग पहाणें किती समाधानकारक होतें. तो समारंभ होतांच सौ. आनंदीबाई जोशी ह्यांच्या बरोबर मी इकडे येणार होतें. परंतु मी इकडे राहिलें. ह्याचें मुख्य कारण हें कीं तो देश चांगला पहावा, तेथील माहिती करून घ्यावी, गृहस्थिति व लोकस्थिति समजावी. हें सर्व होण्यास तेथें बरेंच राहावें लागलें. कोणत्याहि देशांतील खरें ज्ञान व्हावयास तेथें बरेंच राहून सर्वांशीं मिळून मिसळून असलें पाहिजे.

नाहींतर इकडे कित्येक इंग्लंडचे मोठे लोक दोत तीन महिन्यांच्या अवकाशानें हिंदुस्थानच्या माहितीकरतां येतात. आज काय म्हणे मुंबईस आले. कोठें तरी मोठ्याच्या घरीं पाहुणे राहिले, चार आठ दिशीं तेथून निघाले ते कानपूरास गेले. तेथील ऐतिहासिक देखावा पाहून नानासाहेबास अभिश्राप देत देत कलकत्त्यास गेले, तेथें एकादा आठवडा काढून हे लॉर्डसाहेब पुनः येथें येऊन स्वदेशीं गेले. तेथें गेल्यावर मग हिंदुस्थानविषयीं त्यांस वाटेल तें त्यांनीं लिहावें व इच्छेस येईल तें बोलावें. इंग्लंडांत मी असतांना तेथील लोकस्थितीचें वगैरे ज्ञान मला बरेंच झालें होतें. तेव्हां आतां न्यू यार्क वगैरे गृहस्थित्यादिकांचें ज्ञान व्हावें असें मला

वाटलें. येथील आणि इंग्लंडांतील लोक कांहीं निराळे नाहींत. ते गोरे, हेहि गोरे. उभय देशांतील गृहस्थितिहि सारखीच म्हणायची. परंतु दोहोंमध्यें मला बरेंच अंतर दिसतें.

"**हिंदू लोकांत जातिभेद आहे; तो फार वाईट असें मी म्हणतें व आपणहि म्हणत असाल.** परंतु मी इंग्लंडांत दोनतीन वर्षें होतें त्यावरून तिकडेहि हा जातिभेद आहे, असें मला समजलें. तेथें धनी व चाकर, धनीणबाई व चाकरीणबाई, हीं रस्त्यांतून कधीं बरोबर चालायचीं नाहींत, किंवा ह्यांचे जेवण खाणहि बरोबर व्हायचें नाहीं. तेथील लोक असा वर्णभेद पाहिजे म्हणतात. **परंतु युनायटेड स्टेट्स्मध्यें असा वर्णभेद नसूनहि तेथील गृहस्थिति चांगली आहे. ह्यावरून कोणत्याहि राज्यांत वर्णभेद आवश्यक आहेत असें होत नाहीं.**

नंतर पंडिता रमाबाईनीं इंग्लंडांतून प्रथमच अमेरिकेंत गेलेल्या "प्युरिटन" व "क्रेकर" ह्या प्रथमच अमेरिकेंत गेलेल्या मतानुयायांचा इतिहास सांगत असतांना धर्मसंबंधीं जुलूम करणारे ते प्युरिटन म्हणजे आपल्याकडील ब्राह्मण होत, असें त्या म्हणाल्या. ह्यांचा इंग्लंडांत छळ झाला म्हणून ते अमेरिकेंत आले. ते शंभरएक होते. त्यांना तेथील कांहीं माहिती नव्हती. ते ज्या स्थळीं गेले त्याला न्यू इंग्लंड अशी संज्ञा आहे. हे येथेंहि तेथील 'इंदियन' नामक लोकांवर जुलूम करूं लागले. हे देवळांत प्रार्थना करीत तेव्हां एका हातांत बंदुक व एका हातांत 'बैबल' घेत. बैबलांत तर हत्येचा निषेध आहे. हे फार जुलमी व त्रासदायक असल्यामुळें त्यांना तद्देशीय इंदियन लोकांनींहि फार त्रास दिला. परंतु क्रेकर मतानुलंबी तसे नव्हते. हे सर्व मनुष्य सारखे, सर्वांस सारखें स्वातंत्र्य असावें, ईश्वराशीं प्रत्येक मनुष्याचा संबंध समान आहे, अशा मताचे होते. त्यांत विल्यम पेन म्हणून जो गृहस्थ होता तो फार सज्जन होता. ह्यानें आपल्याबरोबर शांति आणली होती. ह्यानें इंदियन लोकांस, आम्ही तुमचे बंधु आहों, आम्ही तुमच्या सारखेच आहों, तुमच्या आमच्यांत कांहीं भेद नाहींत, म्हणून सांगितलें. ह्यानें त्या लोकांचा द्वेष करूं दिला नाहीं. ह्यामुळें ते इंडिअन लोक ह्यांच्याशीं स्नेहानें वागत, त्यांनीं ह्यांस कधींहि त्रास दिला नाहीं. ह्या शांत पुरुषानेंच फिलाडेल्फियाचा पाया घातला. फिलॉस् (philos) म्हणजे प्रीति व एडलफॉस् (adelphos) म्हणजे बंधु. म्हणजे ह्या शहराच्या नांवाचा अर्थ बंधुप्रीति असा आहे, आणि खरोखर हें नगर आपल्या नांवाप्रमाणें प्रेमनगर आहे. ह्या शहराचा मला फार अभिमान वाटतो; ह्या बंधुप्रीति नगरींत आमच्या सौ. आनंदीबाई जोशी डॉक्तर झाल्या. येथें माझ्या पुष्कळ मैत्रिणी आहेत. ह्या शहरांत "इंडिपेन्डन्सी हॉल" म्हणजे स्वतंत्रतेचें सुंदर मंदिर आहे. आणखी "लिबर्टी बेल" नामक घंटा आहे. अहाहा ! ह्या स्वातंत्र्यघंटेचा नाद किती मधुरतर लागतो ! ह्या नगरींत मनुष्याची योग्यता केवढी आहे व स्वातंत्र्याचें मूल्य काय हें समजतें.

लोकहो, तुम्ही त्या स्थलीं जा, त्या स्वतंत्रता मंदिराचें दर्शन घ्या, ती घंटा वाजवा. काशीपासून रामेश्वरापर्यंत तीर्थयात्रा करीत फिराल तर उगाच शीण मात्र होईल. त्यापासून कवडीचाहि लाभ नाहीं. तर तिकडे जाऊन स्वातंत्र्य म्हणजे काय चीज आहे, ह्याचा अनुभव घ्या. इंग्लंडपेक्षां युनैटेड स्टेट्स्चे लोक सर्व प्रकारें अधिक संपन्न आहेत; कारण कीं तेथें उद्योग फार, जो तो सदासर्वकाळ उद्योगांत दंग असतो. पुष्कळ भटांचा असा समज असतो कीं लंका सुवर्णाची आहे; तेथें गेल्यावर हवें तेवढें सोनें मिळतें. तसेंच युरोपांतहि जे कांहीं आळशी लोक आहेत, ते असेंच म्हणतात कीं अमेरिकेंत कॅलिफोर्नियांत जाऊन सोनें आणूं. कॅलिफोर्नियांत सोन्याच्या मोठमोठ्या खाणी आहेत ह्याचा अर्थ एवढाच समजायचा कीं तेथील लोक फार उद्योगी आहेत. आळशांनाहि त्या स्थळीं लाज वाटून ते उद्योगी बनतात. अर्थात् उद्योगापासून द्रव्यप्राप्ति होते.......

"युरोपियन लोकांचें सभ्यतेचें म्हणून लक्षण समजून आमच्यांतील आपणांस सभ्य म्हणवून घेणारे पुष्कळ लोक चिरुटपान व मद्यपान करून गटारांत लोळणारे दृष्टीस पडतात. अनुकरण करणारे फार असतात त्यांत परमार्थ कसा काय आहे हें समजणारे थोडे.......

"हिंदुस्थानची हवा मोठी वाईट आहे. येथें आळस, चैन, ऐष आराम वगैरे फार. इंग्लिश लोकांनाहि हा अवगुण लागत चालला आहे. महाबळेश्वरची शैलयात्रा हें येथील अनुद्योगी व चैनी लोकांचें अनुकरण त्यांनीं उचललें आहे.

"युनायटेड स्टेट्स्मध्यें सर्व लोक प्रातःकाळपासून निजेपर्यंत एकसारखे श्रम करतात. ते बहुधा चाकर ठेवीत नाहींत.[१] ह्यामुळें पडलें काम करावें लागतें. पाय दुखायला लागले तरी त्यांना स्वतःच चेपले पाहिजेत. जेथें उद्योग तेथें लक्ष्मी. अर्थात् तेथील लोक सधन आहेत परंतु तेहि सदा उद्योगरत असतात.

---

१. ह्या म्हणण्यावर ज्ञानोदयाच्या संपादकांनीं अशी टीप दिली आहे कीं रमाबाईचें हें म्हणणें खरें नाहीं. इकडे मिशनरी म्हणून येऊन काम करणारे गरीब लोक सुद्धां आपल्या मायदेशांत एखादी चाकरीण ठेवूं शकतात. सत्तर वर्षांपूर्वी रमाबाईंनीं अमेरिकेंतल्या शहरांनाच नव्हे तर खेड्यांनाहि भेटी दिल्या व तेथें प्रत्यक्ष राहून व त्या समाजांत मिळून मिसळून त्या लोकांच्या गृहस्थितीचा प्रत्यक्ष अभ्यास केलेला होता, इंग्लंडमधील लॉर्डांच्या भारत-भेटीसारखी ती धावती भेट नव्हती. आज तर बाई म्हणतात ही स्थिति तेथें शंभर टक्क्यांनीं आहे. पण सत्तर वर्षांपूर्वीहि शेतकऱ्यांच्या घरांव्यतिरिक्त इतरत्र होती. शेतीवर काम करणाराला इतरांचें साह्य लागे व त्यासाठीं त्याला इतरांची मदत घ्यावी लागे तरी ती मजूर म्हणून नव्हे—बरोबरीचा सहकारी म्हणून. रमाबाईंना येथें जें ठसवायाचें आहे तें हें कीं येथें प्रत्यक्ष हातांनीं काम करणाराला अधिक भाव, उलट चैनबाज जळवांना येथें कांहीं किंमत नाहीं.

वाटलें. येथील आणि इंग्लंडांतील लोक कांहीं निराळे नाहींत. ते गोरे, हेहि गोरे. उभय देशांतील गृहस्थितिहि सारखीच म्हणायची. परंतु दोहोंमध्यें मला बरेंच अंतर दिसतें.

"**हिंदू लोकांत जातिभेद आहे; तो फार वाईट असें मी म्हणतें व आपणहि म्हणत असाल.** परंतु मी इंग्लंडांत दोनतीन वर्षें होतें त्यावरून तिकडेहि हा जातिभेद आहे, असें मला समजलें. तेथें धनी व चाकर, धनीणबाई व चाकरीणबाई, हीं रस्त्यांतून कधीं बरोबर चालायचीं नाहींत, किंवा ह्यांचे जेवण खाणहि बरोबर व्हायचें नाहीं. तेथील लोक असा वर्णभेद पाहिजे म्हणतात. **परंतु युनायटेड स्टेट्स्‌मध्यें असा वर्णभेद नसूनहि तेथील गृहस्थिति चांगली आहे. ह्यावरून कोणत्याहि राज्यांत वर्णभेद आवश्यक आहेत असें होत नाहीं.**

नंतर पंडिता रमाबाईनीं इंग्लंडांतून प्रथमच अमेरिकेंत गेलेल्या "प्युरिटन" व "क्वेकर" ह्या प्रथमच अमेरिकेंत गेलेल्या मतानुयायांचा इतिहास सांगत असतांना धर्मसंबंधीं जुलूम करणारे ते प्युरिटन म्हणजे आपल्याकडील ब्राह्मण होत, असें त्या म्हणाल्या. ह्यांचा इंग्लंडांत छळ झाला म्हणून ते अमेरिकेंत आले. ते शंभरएक होते. त्यांना तेथील कांहीं माहिती नव्हती. ते ज्या स्थळीं गेले त्याला न्यू इंग्लंड अशी संज्ञा आहे. हे येथेंहि तेथील 'इंदियन' नामक लोकांवर जुलूम करूं लागले. हे देवळांत प्रार्थना करीत तेव्हां एका हातांत बंदुक व एका हातांत 'बैबल' घेत. बैबलांत तर हत्येचा निषेध आहे. हे फार जुलमी व त्रासदायक असल्यामुळें त्यांना तद्देशीय इंदियन लोकांनींहि फार त्रास दिला. परंतु क्वेकर मतानुलंबी तसे नव्हते. हे सर्व मनुष्य सारखे, सर्वांस सारखें स्वातंत्र्य असावें, ईश्वराशीं प्रत्येक मनुष्याचा संबंध समान आहे, अशा मताचे होते. त्यांत विल्यम पेन म्हणून जो गृहस्थ होता तो फार सज्जन होता. ह्यानें आपल्याबरोबर शांति आणली होती. ह्यानें इंदियन लोकांस, आम्ही तुमचे बंधु आहों, आम्ही तुमच्या सारखेच आहों, तुमच्या आमच्यांत कांहीं भेद नाहींत, म्हणून सांगितलें. ह्यानें त्या लोकांचा द्वेष करूं दिला नाहीं. ह्यामुळें ते इंडिअन लोक ह्यांच्याशीं स्नेहानें वागत, त्यांनीं ह्यास कधींहि त्रास दिला नाहीं. ह्या शांत पुरुषानेंच फिलाडेल्फियाचा पाया घातला. फिलॉस् (philos) म्हणजे प्रीति व एडलफॉस् (adelphos) म्हणजे बंधु. म्हणजे ह्या शहराच्या नांवाचा अर्थ बंधुप्रीति असा आहे, आणि खरोखर हें नगर आपल्या नांवाप्रमाणें प्रेमनगर आहे. ह्या शहराचा मला फार अभिमान वाटतो; ह्या बंधुप्रीति नगरींत आमच्या सौ. आनंदीबाई जोशी डॉक्तर झाल्या. येथें माझ्या पुष्कळ मैत्रिणी आहेत. ह्या शहरांत "इंडिपेन्डन्सी हॉल" म्हणजे स्वतंत्रतेचें सुंदर मंदिर आहे. आणखी "लिबर्टी वेल" नामक घंटा आहे. अहाहा! ह्या स्वातंत्र्यघंटेचा नाद किती मधुरतर लागतो! ह्या नगरींत मनुष्याची योग्यता केवढी आहे व स्वातंत्र्याचें मूल्य काय हें समजतें.

लोकहो, तुम्ही त्या स्थळीं जा, त्या स्वतंत्रता मंदिराचें दर्शन घ्या, ती घंटा वाजवा. काशीपासून रामेश्वरापर्यंत तीर्थयात्रा करीत फिराल तर उगाच शीण मात्र होईल. त्यापासून कवडीचाहि लाभ नाहीं. तर तिकडे जाऊन स्वातंत्र्य म्हणजे काय चीज आहे, ह्याचा अनुभव घ्या. इंग्लंडपेक्षां युनैटेड स्टेट्स्चे लोक सर्व प्रकारें अधिक संपन्न आहेत; कारण कीं तेथें उद्योग फार, जो तो सदासर्वकाळ उद्योगांत दंग असतो. पुष्कळ भटांचा असा समज असतो कीं लंका सुवर्णाची आहे; तेथें गेल्यावर हवें तेवढें सोनें मिळतें. तसेंच युरोपांतहि जे कांहीं आळशी लोक आहेत, ते असेंच म्हणतात कीं अमेरिकेंत कॅलिफोर्नियांत जाऊन सोनें आणूं. कॅलिफोर्नियांत सोन्याच्या मोठमोठ्या खाणी आहेत ह्याचा अर्थ एवढाच समजायचा कीं तेथील लोक फार उद्योगी आहेत. आळशांनाहि त्या स्थळीं लाज वाटून ते उद्योगी बनतात. अर्थात् उद्योगापासून द्रव्यप्राप्ति होते.......

"युरोपियन लोकांचें सभ्यतेचें म्हणून लक्षण समजून आमच्यांतील आपणांस सभ्य म्हणवून घेणारे पुष्कळ लोक चिरुटपान व मद्यपान करून गटारांत लोळणारे दृष्टीस पडतात. अनुकरण करणारे फार असतात त्यांत परमार्थ कसा काय आहे हें समजणारे थोडे.......

"हिंदुस्थानची हवा मोठी वाईट आहे. येथें आळस, चैन, ऐष आराम वगैरे फार. इंग्लिश लोकांनाहि हा अवगुण लागत चालला आहे. महाबळेश्वरची शैलयात्रा हें येथील अनुद्योगी व चैनी लोकांचें अनुकरण त्यांनीं उचललें आहे.

"युनायटेड स्टेट्स्मध्यें सर्व लोक प्रातःकाळपासून निजेपर्यंत एकसारखे श्रम करतात. ते बहुधा चाकर ठेवीत नाहींत.[1] ह्यामुळें पडलें काम करावें लागतें. पाय दुखायला लागले तरी त्यांना स्वतःच चेपले पाहिजेत. जेथें उद्योग तेथें लक्ष्मी. अर्थात् तेथील लोक सधन आहेत परंतु तेहि सदा उद्योगरत असतात.

---

१. ह्या म्हणण्यावर ज्ञानोदयाच्या संपादकांनी अशी टीप दिली आहे कीं रमाबाईचें हें म्हणणें खरें नाहीं. इकडे मिशनरी म्हणून येऊन काम करणारे गरीब लोक सुद्धां आपल्या मायदेशांत एखादी चाकरीण ठेवूं शकतात. सत्तर वर्षांपूर्वी रमाबाईनीं अमेरिकेंतल्या शहरांनाच नव्हे तर खेड्यांनाहि भेटी दिल्या व तेथें प्रत्यक्ष राहून व त्या समाजांत मिळून मिसळून त्या लोकांच्या गृहस्थितीचा प्रत्यक्ष अभ्यास केलेला होता, इंग्लंडमधील लॉर्डांच्या भारत-भेटीसारखी ती धावती भेट नव्हती. आज तर बाई म्हणतात ही स्थिति तेथें शंभर टक्क्यांनीं आहे. पण सत्तर वर्षांपूर्वीहि शेतकऱ्यांच्या घरांव्यतिरिक्त इतरत्र होती. शेतीवर काम करणाराला इतरांचें साह्य लागे व त्यासाठीं त्याला इतरांची मदत घ्यावी लागे तरी ती मजूर म्हणून नव्हे—बरोबरीचा सहकारी म्हणून. रमाबाईना येथें जें ठसवायाचें आहे तें हें कीं येथें प्रत्यक्ष हातांनीं काम करणाराला अधिक भाव, उलट चैनबाज जळवांना येथें कांहीं किंमत नाहीं.

"कोणत्याहि देशाची खरी स्थिति केवळ शहरांत राहून कधींहि समजावयाची नाहीं....म्हणून मी कित्येक खेड्यांतहि फिरलें. व येथें स्त्रियांकरतां मला शाळा घालवयाची होती म्हणून तदर्थ द्रव्यसंपादनार्थ मला अशा स्थळीं फिरावेंहि लागलें. पुष्कळांच्या सहवासानें, भेटींनीं व तेथें राहण्यानें मला तेथील गृहस्थितीचें बरेंच ज्ञान झालें....खेडेगांवचे लोकहि अविश्रांत श्रम करणारे असल्यानें साधारणतः सुखी आहेत. सत्तर सत्तर वर्षांचे म्हातारेहि उद्योगाभिमुख असतात. तेथें आळशी लोक फार थोडे असतात. व त्यांची वस्ती बहुतेक बिनभाड्याच्या घरांत असावयाची......

**इकडे ब्राह्मणं म्हणतात आम्ही सर्वांत मोठे परंतु तिकडे असा जन्मतःच मोठा कोणी नाहीं.** तिकडे भंगी असला तरीसुद्धां अध्यक्षास भेटतो. ...इकडे राजा कोणी नाहीं व प्रजा हा शब्द नाहीं. रस्त्यांतील झाडणारा व ह्या दोघांचें देशासी एकच नातें. **आमच्या देशांत गळ्यांत जानवें असलें कीं मोठा झाला. मग तो कसाहि असो.** त्यांच्यांत हिंदु लोकांप्रमाणें जातिभेद नाहीं किंवा इंग्लंडप्रमाणें तेथें वर्गभेदहि[1] नाहींत. आपण सर्व एक. आपणामध्यें कोणी उच्चनीच नाहीं अशा समजुतीचें तेथें लहानपणापासून शिक्षण असतें....... तेथें जात्यभिमान नाहीं तर देशाभिमान असतो व जेणेंकरून स्वदेशप्रीति व स्वदेशाभिमान वाढेल अशा तऱ्हेचें शिक्षण मुलांना लहानपणापासून देण्यांत येतें...

'नाहींतर इकडचें शिक्षण. इतिहास शिकवितात तो काय? तर तारखा पाठ करायच्या, व परीक्षकहि अशा तारखांना गुण देतात. अशा घोकंपट्टीनें इतिहासाचा लाभ कसा होणार? आपल्या देशाचें हित कशानें होईल, आपणांस उच्च स्थिति कशी कशी प्राप्त होईल, स्वदेशाभिमान कसा असावा ह्याविषयीं इकडे शाळेंत कांहींच शिकवीत नाहींत. इकडचीं पुस्तकें शिक्षणार्ह नाहींत. इकडच्या पुस्तकांत मुख्य तत्त्व काय तर राणी सरकारची भक्ति करा....आपल्या आईच्या भक्तीहून ह्या भक्तीची मातब्बरी मी समजत नाहीं. आपल्या जननीस लत्ताप्रहार करून राणीची भक्ति करण्यांत विशेष आहे असें मला तर वाटत नाहीं. राणीस मान द्या पण जन्मदात्रीस विसरूं नका......

'युनैटेड स्टेट्स्‌मध्यें कूळ नाहीं व जमीनदार नाहीं, ज्याची त्याची स्वतंत्र जमीन; ह्यामुळें इकडे बंगाल्यांत किंवा तिकडे ऐर्लन्डमध्यें जमीनदार व कुळें ह्यांमध्यें दृष्टीस पडणारें वितुष्ट तिकडे नाहीं. इकडच्या सारखे तिकडे जहागीरदारहि नाहींत.

तिकडे धर्मसंबंधीं व कांहीं राष्ट्रीय सणहि आहेत.... इकडे पहा ना, भटांनीं दक्षिणा

---

१. रमाबाईच्या तीक्ष्ण नजरेंतून नीग्रोंचा प्रश्न कसा निसटला आश्चर्य वाटतें! भारतांतील जातिभेदापेक्षां किंवा इंग्लंडमधील वर्गभेदापेक्षां हा वर्णभेद अधिक भयंकर नाहीं काय? त्याचे कटु अनुभव अद्याप येत आहेत.

मिळविण्यासाठीं 'व्रतराज' म्हणून एक ग्रंथ केला आहे. त्यांत ३६० व्रतें सांगितलीं आहेत. तिकडे सण फार थोडे आहत कारण ते करण्यास तिकडे वेळ नाहीं...(मग तेथील राष्ट्रीय सणांबद्दल सांगून व राष्ट्रीय ध्वजाची माहिती देतां देतां रमाबाईनीं पुढें सांगितलें)

"असे स्वातंत्र्यसूचक ध्वज पाहून पाहाणारास काय वाटत असेल बरें? नाहींतर वर्षप्रतिपदेच्या दिवशीं येथें जे कोठें कोठें पात्रसंयुक्त ध्वज दिसतात ते! त्याला तर कोणी कोणी पंचे लावतात! ह्या ध्वजारोपणाचा मूळचा इतिहास तरी असा पूर्वीं कधीं काळीं आपणास स्वातंत्र्य मिळालें होतें, म्हणून सांगणारा असेल; परंतु हे ध्वज सध्यां तरी आम्ही मूर्ख, आम्ही सर्वतोपरी परतंत्र, आम्ही दरिद्री, आम्ही बलहीन, आमचें घर आम्हांस राखतां येत नाहीं, इत्यादि अनेक गोष्टी सांगणारे होत.

तुम्हांस स्वातंत्र्याची खरी योग्यता काय आहे, ही येथें बसून समजावयाची नाहीं. तेथील लोक स्वतंत्रतेला किती भजतात हें येथून कसें कळणार? तिकडे जाऊन तिकडच्या हवेंतला एक श्वासोच्छ्वास घेतलात कीं स्वातंत्र्याचें वारें तुमच्या अंगीं येईल. (Slaves cannot breathe in America! If their lungs receive that air, that moment they are free!) आपल्या देशांतील कांहीं लोक इंग्लंडास जातात हें तर ठीकच आहे. परंतु व्यापार, कारखाने वगैरेच्या संबंधानें जाणें असेल तर तुम्ही अमेरिकेस जा. तेथील सर्व प्रकार पाहून अमृत प्राशन करा. इंग्लंडांतील लोक वाईट असें मी म्हणत नाहीं. ते लोकहि बरे आहेत.

परंतु हिंदुस्थानांतील विषकारक हवा त्यांना लागली कीं, त्यांची वृत्ति एकदम बदलून जाते. तेव्हां तुम्हांस गेलें पाहिजे, पुष्कळ दिवस राहिलें पाहिजे, सर्व कांहीं शिकलें पाहिजे. मग इकडे कारखाने घातले पाहिजेत. असें कराल तर आज नाहीं उद्यां,—हजार वर्षांनीं तरी ह्या देशांत सुखाचा सुदिन उगवेल.'[1]

१. शब्दश: हेच शब्द पुढें कित्येक वर्षांनीं महात्मा गांधींनीं उच्चारिले होते, हें पाहण्यासारखें आहे.

*परिशिष्ट : ११*

# ग्रंथांचें व इतर लिखाणांचे ऋण


## रमाबाईंच्या चरित्रविषयक

१. स्मृतिसुमनें : कृष्णाबाई गद्रे
२. पंडिता रमाबाई : प्रबोधनकार ठाकरे
३. पंडिता रमाबाई : नवयुग मासिकांस प्रसिद्ध झालेले लेख : द्वा. गो. वैद्य
४. पंडिता रमाबाई यांचें चरित्र मराठी वाङ्मय कमिटी. बॉम्बे रिप्रेझेंटेटिव चर्च कौन्सिल
५. अग्रेसर स्त्री कैवारी : पंडिता रमाबाई. रे. सु. धों. रामटेके व र. ना. हर्षे
६. एक साक्ष : पंडिता रमाबाई
७. Pandita Ramabai: Helen Dyre, 1900 edition.
८. Pandita Rambai : A Great Life in Indian Missions, Helen Dyre.
९. Pandita Ramabai: A Widow's Friend: Australian Edition: Manoramabai.
१०. Pandita Ramabai (Builders of Modern India) Nicol MacNicol.
११. Pandita Ramabai: Pioneer: Barbara Underhill.
१२. Pandita Ramabai Saraswati, Clementina Butler.
१३. The Triumph of an Indian Widow: Life of Pandita Ramabai, Mary L. Fuller.
१४. Women Who Have Worked and Won. Jane Chapel.

## रमाबाईनीं लिहिलेलीं पुस्तकें.

१५. A Testimony :
१६. The High Caste Hindu Woman.
१७. Mukti Prayer Bell and News Letters.
१८. Famine Experience in India: 1900.
१९. Report of Mukti School and Mission.
२०. Printed letters to friends in America.
२१. स्त्री-धर्म-नीति
२२. पंडिता रमाबाई ह्यांचा इंग्लंडचा प्रवास
२३ युनायटेड स्टेट्स्ची लोकस्थिति व प्रवासवृत्त
२४. शब्दबीज

२५. मूळज्ञानांतील वेचे
२६. इब्री व्याकरण

## इतर चरित्रें

२७. वासुकाका जोशी व त्यांचा कालः श्री. त्र्यंबक रघुनाथ देवगिरिकर
२८. माझें पुराण : सौ. आनंदीबाई कर्वे
२९. घोंडो केशव कर्वे, आत्मवृत्त व चरित्र : कर्वे-पटवर्धन
३०. सुंदराबाई पवार ह्यांचें कार्यः केट स्टोरी
३१. आमच्या आयुष्यांतील आटवणी : श्री. रमाबाई रानडे
३२. कै. श्री. रमाबाई रानडे, उमाकांत
३३ सौ. डॉ. आनंदीबाई जोशी ह्यांचें चरित्र : काशीबाई कानिटकर
३४ डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर ह्यांचें चरित्र : श्री. नि. कर्नाटकी
३५ लो. टिळक ह्यांचें चरित्र : नरसिंह चिंतामण केळकर
३६ टिळक जीवनरहस्य : प्रकाशक आर्यभूषण प्रेस, पुणें
३७ हरि नारायण आपटे : वेणूबाई पानसे
३८ रावबहादूर दादोबा पांडुरंग : आत्मचरित्र व चरित्र : प्रियोळकर
३९ गोपाळ गणेश आगरकर : आळतेकर
४० Mahadev Govind Ranade: Patriot and Social Servant: James Kellock.
४१ Life of Father Goreh: C. E. Gardner.
४२ Dhondo Keshav Karve: A Sketch by R. P. Paranjpe (1915).
४३ रे. फादर नेहेम्या नीलकंठशास्त्री गोरे ह्यांचें संक्षिप्त चरित्र : रे. दि. शं. सावरकर
४४ त्रिमूर्तिदर्शन डॉ. वि. भा. गोवंडे
४५ Krishnabai (called chosen faithful): Ramabai Mukti Mission.
४६ Manoramabai Medhavi: Miss Hastie.
४७ Memories of My Life and Time: In the Days of My Youth (1857-84) by Bipin Chandra Paul.
४८ माझ्या आठवणी व अनुभवः कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे
४९ मराठी माणसें आणि मराठी मनें: प्र. के. अत्रे

## इतिहास कुलवृत्तान्त व अहवाल

५० प्रार्थनासमाजाचा इतिहास : द्वा. गो. वैद्य
५१ मुंबई इलाख्यांतील जाती : गोविंद मंगेश कालेलकर
५१ चित्पावन ना. गो. चापेकर
५२ कॉंग्रेसचा इतिहास : डॉ. पट्टाभि सितारामया
५३ Report of the Fifth Indian National Congress held at Bombay on the 26, 27 and 28 of December 1889.

५४ Bengal District Gzaetteer—Mymensing.
५५ Assam District Gazetteer—Vol. I, Cachar.
५६ Hindu Castes and Sects: by Jogendranath Bhattacharya.
५७ A Compendium of the Castes and Tribes found in India, ...... Eustace J. Kitts.
५८ North Kannad Gazetteer, Part II.
५९ १८९१ च्या सोशल कॉन्फरन्सचा रिपोर्ट (इंग्रजी)
६० १८९५ च्या सोशल कॉन्फरन्सचा रिपोर्ट (इंग्रजी)
६१ डोंगरे कुलवृत्तान्त
६२ पेंडसे कुलवृत्तान्त
६३ करंदीकर कुलवृत्तान्त
६४ Shanti Sadan School: Gulbarga. Manoramabai.
६५ Christ in Western India: Dr. Elizabeth Huet.
६६ Pandita Ramabai Centenary: Bombay: S. M. Adhav.
६७ प. वा. शंकर बळवंत कुळकर्णी ह्यांच्या रोजनिशा.
६८ रमाबाई असोसिएशनचे रिपोर्ट

**वर्तमानपत्रांच्या जुन्या फायली**

६९ ज्ञानोदय
७० केसरी
७१ सुधारक
७२ सुबोधपत्रिका
७३ इंदुप्रकाश
७४ सच्छास्त्रप्रदीपक
७५ टाईम्स ऑफ इंडिया

**इतर**

७६ हरिभाऊंचीं पत्रें : काशीबाई कानिटकर
७७ घारापुरी : स. आ. जोगळेकर
७८ मूर्तिविज्ञान : श्री. ग. ह. खरे
७९ महाराष्ट्र साहित्य संमेलन ३२. स्वागताध्यक्षीय भाषण : म. म. दत्तो वामन पोतदार
८० कै. वामन आबाजी मोडक ह्यांनीं रचिलेलीं कीर्तनें व आख्यानें : नारायण वामन मोडक
८१ मराठी वाङ्मयसेवक : तृतीय खंड : गं. दे. खानोलकर
८२ ख्रिस्तीधर्म ईश्वरदत्त आहे : फादर निलकंठशास्त्री नहेम्या गोरे
८३ 'पवित्र आत्म्यानें व अग्नीनें बाप्तिस्मा'

मराठी ... क्र.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...